श्रीः

कविवर्य

मोरोपंतांचे समग्र ग्रंथ.

२

आर्याभारत.

पर्वें

आदिपर्व - सभापर्व - वनपर्व - विराटपर्व

संपादक व प्रकाशक

रामकृष्ण दत्तात्रेय पराडकर.

मुद्रक

अच्युत चिंतामण भट.

'यशवंत'

छापखाना पुणें.

सन १९१२.

श्रीः

प्रस्तावना.

कविवर्य मोरोपंत यांच्या कवितेविषयीं, वर्तमानपत्रें व मासिक तकें वगैरे आधुनिक साधनांचे द्वारें महाराष्ट्रांत, आजपर्यंत तका ऊहापोह झालेला आहे तितका इतर कोणत्या हि महाराष्ट्रवीविषयीं झाला नाहीं. मोरोपंत हे कवी तरी होते किंवा नाहीं थपासून, तों लोकसमाजरूपी न्यायमंदिरांत त्यांच्या महाकवित्वाची ाबिती होईपर्यंत या ऊहापोहाची व्यापकता आहे. सुमारें गेल्या र्धशतकभर झालेल्या ह्या ऊहापोहाच्या रूपानें महाराष्ट्रीयांची यूरभक्ति चांगली च कसोटीला लागली; व प्रस्तुतची—मोरोपंती मग्र काव्यग्रंथांच्या नव्या आवृत्तीची—योजना ही तरी एका ष्टीनें त्या कसोटीचें च स्वाभाविक असें व्यक्त स्वरूप आहे. स्तुत आवृत्तीचें कारण व कार्य हि एक च आहे, व तें कविलिखित तीबरहुकुम छापणें हें होय. पूर्वींच्या सर्व आवृत्यांपेक्षां या का च दृष्टीनें या आवृत्तीस 'अपूर्व' असें म्हणतां येईल. पूर्वानुवाचा स्वाभाविकपणें घेतां येणारा फायदा घेऊन ही आवृत्ती ाढण्याचें योजिलें आहे. अर्थात् पूर्वींच्या व ह्या प्रस्तुतच्या आवृत्तींत कवीच्या तोंडच्या पाठांशिवाय हि टीपा, पुस्तकाचा आकार किंमत या बाबतींत जें अंतर दिसून येईल, तो हि पूर्वानुभवाचा च रिणाम आहे, हें उघड आहे.

प्रस्तुत आवृत्तीची योजना निश्चित केली त्या वेळीं या कार्या-च्या अनेक अभिमान्यांकडून व हितचिंतकांकडून नाना प्रकारच्या सूचना येऊं लागल्या. अकोल्याचे रावसाहेब विष्णु मोरेश्वर महाजनी एम्. ए. यानीं "काव्यसंग्रह टीपांच्या सागरांत बुडाला; तुम्ही हि सावध असा," अशी पत्रद्वारें इषारत दिली; तर एकानें, "निदान काव्यसंग्रहाइतक्या तरी टीपा येतील किंवा नाहीं" अशी पृच्छा केली ! कांहींचें "टीपा मुळीं च नकोत, सरतेशेवटीं शब्दकोश जोडला म्हणजे झालें," असें मत पडलें. कोणी "प्रसंगानुसार चित्रें द्या," असें सुचविलें, तर कोणी, "पाश्चात्यानीं ज्या धर्तीवर शेक्स्पीअरचें वाङ्मय छापून काढिलें आहे, त्या धर्तीवर आपल्या इकडे मोरोपंती वाङ्मय छापून निघावें," अशी इच्छा प्रदर्शित केली. चित्रांची सूचना फारशी महत्त्वाची वाटली नाहीं. शेक्स्पीअरच्या वाङ्मयाच्या दाखल्यासंबंधानें मतभेद नाहीं; पण आपल्या लोकांच्या सांपत्तिक स्थितीच्या दृष्टीनें मोरोपंती वाङ्मयासंबंधानें तशी योजना करण्याचा समय अद्यापि यावयाचा आहे; तथापि आपणाला वाटल्या तशा सूचना प्रेमःपुरसर करून संपादकाला आपला मार्ग निश्चित करण्यास सूचकानीं साहाय्य केलें, यांत संशय नाहीं. मोरोपंती वाचकाचें शिक्षण भाषेच्या दृष्टीनें निदान मध्यम प्रतीचें तरी असावें लागतें च; तथापि ही नवी आवृत्ती अगदी टीपारहित काढणें हि सोईचें झालें नसतें; म्हणून, या योजनेचा पुरस्कार करण्याकरितां केसरीकर्त्यानीं लिहिलेल्या अग्रलेखांत (वर्ष ३१वें अंक २३ वा, ता. ६।६।११ पहा.) केलेल्या बहुतेक सूचना प्राय

निर्विवाद अशा च वाटल्यामुळें त्यांचा अंगीकार करून टीपांचें वगैरे धोरण ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. शब्दार्थ, अन्वयार्थ, भावार्थ व क्वचित् व्यंग्यार्थ ह्या मर्यादेपलीकडे टीपांचें स्वरूप बहुधा गेलेलें नाहीं. कवितेंतील उत्कृष्ट अलंकार व रस, प्रसंगानुरूप शब्द-योजना, मार्मिक कोटिक्रम, यमक साधण्याची हतोटी व भाषेची शैली, वगैरे बाबतींत उदाहरणें देऊन स्पष्टीकरण केलें असतां विद्यार्थी-वाचकाचे मनावर कवीच्या काव्यप्रभेचा यथास्थित प्रकाश पडतो, हें खरें; व अशा रीतीनें प्रयत्न केल्याशिवाय कोणत्या हि कवीचा वाचकवर्ग वाढणें शक्य नाहीं, हें हि आम्हीं जाणून आहों. आज-पर्यंत ह्या कवीच्या भक्तमंडळीकडून या मार्गानें थोडाफार प्रयत्न झालेला आहे च; तथापि मूळाबरहुकुम छापलेली ह्या दृष्टीनें जशी ही आवृत्ति पहिली च आहे, त्याप्रमाणें च ह्या कवीच्या काव्यकृतीची प्रथमतः त्याच्या शब्दांत ओळख करून घेऊन नंतर कोणी तरी काव्यहृदयज्ञ विद्वानानें वर लिहिल्याप्रमाणें काव्य-चर्चा केल्यास ती हि पहिली च ठरेल, म्हणून समग्रग्रंथांतीं, अशा रीतीनें काव्यचर्चा केलेला एक विस्तृत निबंध महाराष्ट्रीयांस सादर करण्याचा आमचा मानस आहे. तसें च छापताना अन्वया-र्थांचे वगैरे बाबतींत निरुपाय म्हणून आम्हीं जीं स्थळें सोडून दिलीं असतील व दिल्या गेलेल्या टीपांतील चूकभूल दुरुस्त करण्या-करितां किंवा कांहीं स्थलांचें विशेष स्पष्टीकरण अवश्य वाटल्यास तसें करण्याकरितां जीं स्थलें पात्र आहेत असें पुढें दिसून येईल, त्या सर्व स्थलांचा समग्रग्रंथांचे अंतीं परिशिष्टरूपानें एकदम च निर्णय

करण्याचें आम्हीं ठरविलें आहे. ह्या कामीं आम्हांस साहाय्य करण्याचें अनेक विद्वानानीं मनावर घेतलें आहे. तथापि मोरोपंतांच्या कोणत्या हि वाचकानीं अशा रीतीनें आपल्या बुद्धिबलाचा आम्हांस लाभ द्यावा, अशी आमची त्याना विनंति आहे. कारण, विविध विचारांच्या मंथनापासून च सत्य निर्माण होतें.

मराठी भाषेच्या व्याकरणनियमांचें व शुद्धलेखनाचें स्वरूप अद्यापि निश्चित झालेलें नाहीं; शिवाय तें निश्चित झालें आहे असें मानलें, तरी जुने ग्रंथ छापताना त्यांतील व्याकरण फार प्रामाणिकपणानें पाळलें पाहिजे. कारण, ऐतिहासिक दृष्टीनें भाषेचा विचार करणाऱ्या चिकित्सकाना जुने ग्रंथ जसेच्या तसे छापलेले असणें च अगत्याचें असतें. पंताना तर त्यांच्या व्याकरणशुद्धीबद्दल आधुनिक विद्वान् फार मानतात; अर्थात् पंतांचे काळीं मराठी व्याकरणाचें स्वरूप अमुक प्रकारचें होतें असें जरी निश्चयानें म्हणतां आलें नाहीं, तरी पंतांच्या लेखणींतून उतरलेल्या मराठीचें स्वरूप कसें आहे, एवढें तरी त्याचे ग्रंथ त्यानीं जसे लिहिले तसे अक्षरशः छापल्यास वाचकाना कळून येईल, म्हणून त्यांच्या अक्षराला जाणूनबुजून कोठें हि धक्का लाविला नाहीं, किंवा प्रस्तुतची प्रत म्हणजे मूळ पंतलिखिताचें छापील प्रतिबिंब करण्याची जबाबदारी क्षणभर हि दृष्टीआड केली नाहीं; तथापि एक गोष्ट मात्र वाचकांचे नजरेपुढें आणणें जरूर आहे; ती ही कीं, 'छे च' या पाणिनीसूत्रान्वयें जेथें तुगागम (त्) होतो व पुढें छ असल्यामुळें तचा च होऊन 'च्छ' असें रूप होतें, तेथें पंत 'छ' असें च

लिहितात; कांहीं जुन्या संस्कृत ग्रंथांतून हि चकारविशिष्ट छबद्दल केवळ छ लिहिण्याचा प्रघात असल्याचें दिसून येतें. संस्कृत-विद्यापीठ अशा काशीक्षेत्रीं लिहिलेल्या व्यासभारताच्या दोन जुन्या संस्कृत पोथ्या विद्यावाचस्पति अप्पाशास्त्री राशिवडेकर ह्यांच्या संग्रहीं हल्लीं आहेत, त्यामध्यें हा प्रघात आहे. पंतांनीं ह्या च प्रघाताचें अवलंबन केलें असल्यामुळें ज्या ठिकाणीं आगम नसतां शच्या योगामुळें तवर्गाला चवर्ग झाला आहे, व श-ला छ झाला आहे अशा ठिकाणीं हि बहुधा केवळ छ च लिहिला आहे; पण सांप्रत तसा प्रचार नसल्यामुळें, उच्चाराच्या कामीं वाचकांचा घोटाळा उडूं नये म्हणून, आम्हीं चालू प्रचारास अनुसरून बहुतकरून ‘ च्छ ’ छापला आहे. विरामचिन्हें हीं आमच्या अर्थाच्या अनुरोधानें दिलेलीं आहेत हें उघड च आहे.

येथपर्यंत प्रस्तुत आवृत्तीच्या स्वरूपाविषयीं सामान्यतः सांगितलें. आतां, ही आवृत्ति निघण्याला कोणाकोणाचे परिश्रम कारणीभूत झाले आहेत, याविषयीं सांगावयाचें. प्रथमतः हें सांगितलें पाहिजे कीं, पंतांचें दप्तर त्यांच्या वंशजांच्या घरीं चव्हाटयावर असल्याप्रमाणें असून व शेंकडों मयूरभक्त पूज्यबुद्धीनें त्या दप्तराचें दर्शन घेऊन गेले असून हि केवळ अदृष्ट नेमानेमाप्रमाणें च प्रस्तुतप्रमाणें आवृत्ति निघण्याचा योग आजपर्यंत आला नाहीं. संपादक हा स्वतां च पंतवंशज असल्यामुळें पर्यायानें येणाऱ्या आत्मश्लाघादोषाच्या भीतीनें संकोच वाटतो, तथापि असें म्हट-ल्याशिवाय रहावत नाहीं कीं, या कामीं जे पंतवंशज कायावाचा-

मनेंकरून संपादकाला साहाय्य करित आहेत, किंबहुना ज्यांच्या साहाय्यानें च आरंभिलेलें कार्य तडीस जाणार आहे, त्यांचे, केवळ संपादकानें च नव्हे, तर, अखिल मयूरभक्तानीं व महाराष्ट्र-भाषेच्या अभिमान्यानीं ऋणी असलें पाहिजे. संपादकाचे चुलत चुलते ती० काशीनाथ व्यंकटेश उर्फ भय्यासाहेब पंत, यानीं तर अगदीं प्रारंभापासून, म्हणजे दप्तराच्या संशोधनापासून, या कामीं अहोरात्र मेहनत घेतली आहे. हे निसर्गतः च मयूरभक्त व काव्य-मर्मज्ञ आहेत. अशा प्रकारच्या कळकळीच्या मनुष्याचें घरच्या घरीं सर्वप्रकारें साहाय्य मिळाल्यामुळें संपादकाचें कार्य फार च सुकर झालें, यांत शंका नाहीं. तसें च रा० कृष्णाजी मोरेश्वर पंत हे हि त्याना शक्य ती मदत निरलसपणें व मनोभावें करित आहेत. यांचे वडील बंधु नारायण मोरेश्वर पंत यांचा उल्लेख करण्याचें बिवावर येतें; कारण, पंढरपुरीं दप्तराचें संशोधन चालू असतां संपादकाला मदत करण्यांत त्यानीं आपल्या मनाची जी प्रशंसनीय उत्कटता दाखविली त्याहून हि अधिक उत्कटता दाखविण्याची संधि काळानें च त्याना दिली नाहीं. ते शके १८३३, अ० शु० ९ रोजीं आपल्या वयाच्या २५ व्या वर्षीं प्लेग होऊन मृत्यु-मुखीं पडले; यांचे वडील मोरेश्वर नारायण ऊर्फ बळवंतराव पंत हे आर्यापंडित होते. कै० न्या० मू० महादेव गोविंद रानडे हे पंढरपुरीं गेले म्हणजे पंतांच्या आर्याविषयीं यांच्याशीं प्रहरप्रहर वाटाघाट करून आपलें शंकासमाधान करून घेत असत, असें कांहींच्या सांगण्यांत येतें.

असो. जेथें साहाय्यकर्ते स्वयंस्फूर्तीनें साहाय्य करीत आहेत, तेथें केवळ भाषेच्या सोईकरितां च त्यांच्यामध्यें तरतमभावाची कल्पना करावी लागते. पंतांचें दप्तर जसें आजपर्यंत पंढरपुरास कपाटांत पडून राहिलें होतें, तशीं च त्या दप्तराचें संशोधन करून तयार केलेलीं टांचणें हि केवळ स्मरणवहीचीं च पानें अडवून बसलीं असतीं; परंतु ' केसरी ' वर्तमानपत्राचे संपादक रा० रा० नरसिंह चिंतामण केळकर यांचेपुढें (पंढरपुर येथें जाऊन संशोधनास सुरुवात करण्यापूर्वीं) दप्तरासंबंधींची जी कच्ची हकीकत तोंडीं मांडली, ती ऐकून च त्यानीं ही नव्या आवृत्तीची योजना अमलांत येण्याविषयीं जो शक्य तो प्रयत्न करण्याचें ठरविलें, व मोरोपंतांच्या बाबतींत केसरीच्या पूर्वीपासून चालत आलेल्या धोरणास अनुसरून ह्या कामीं अनुकूल लोकमत तयार केलें. रा० केळकर ह्यांचा केवळ केसरीचे संपादक या नात्यानें च ह्या योजनेशीं संबंध नसून अशा कामीं जे जे म्हणून प्रसंग उद्भवतात, त्या सर्व बऱ्या वाईट प्रसंगांतून पार पडण्याला त्यानीं संपादकाला मदत केली आहे.

केसरीमध्यें **' पंत व त्यांची कविता '** ही लेखमाला प्रसिद्ध होऊन केसरीकर्त्यानीं अग्रलेखाचे रूपानें तिचा समारोप केला व ह्या नव्या आवृत्तीच्या योजनेची रूपरेखा हि काढून दिली. त्यानंतर ह्या योजनेचा पुरस्कार करण्याकरितां महाराष्ट्रांतील विविध स्वरूपाच्या अनेक विद्वानांच्या सह्यानीं जें जाहीर विनंतिपत्र प्रसिद्ध झालें तें पुढें निराळें दिलें च आहे. हें विनंतिपत्र निघण्याच्या कामीं सुप्रसिद्ध कादंबरीकार रा. रा. हरि नारायण आपटे ह्यानीं मनःपूर्वक प्रयत्न केला.

अशा प्रकारें विद्वज्जनानीं पुरस्कृत केलेली योजना लोकमान्य झाली असल्यास नवल काय! हें जाहीर विनंतिपत्र निघाल्या-नंतर महाराष्ट्रांतील बहुतेक वर्तमानपत्रकर्त्यांनीं त्याविषयीं आपली पूर्ण मान्यता दर्शवून, अशा उपयुक्त योजनेस अपेक्षित लोकाश्रय जरूर मिळाला पाहिजे, असें लिहिलें.

येथपर्यंत सर्व ठीक झालें; पण पुढें हातांत लेखणी घेऊन मदत करण्यास जी मंडळी सिद्ध झाली त्यांचा ग्रंथाचें अंतरंग तयार करण्याच्या कामीं फार च चांगला उपयोग झाला. कविभूषण बाळ-कृष्ण माधव खुपेरकर व रा. रा. मुकुंद गणेश मिरजकर (कोल्हा-पूर), कृष्णाजी नारायण कवडे बी. ए. व जनार्दन सखाराम करंदीकर बी. ए. एल्‌एल्. बी. (पुणें) यानीं आर्याभारताच्या पर्वां-वरील अर्थबोधक टीपा प्रथम तयार केल्यामुळें विचारविनिमयाच्या पद्धतीनें त्यांविषयीं चर्चा करण्याची संपादकाला सवड मिळाली. विद्यावाचस्पति अप्पाशास्त्री राशिवडेकर यानीं त्यांच्यापुढें नेलेल्या शंकित स्थलांचा निर्णय करण्यांत बहुधा प्रत्यहीं आपला कांहीं वेळ खर्चीं घातला आहे; इतकें च नव्हे तर, पंतांची सर्व संस्कृत कविता (मंत्ररामायण, स्तोत्रें वगैरे) सटीप करण्याचें त्यानीं अभिवचन दिलें आहे. प्रोफेसर शिवराम महादेव परांजपे एम्. ए. ह्यानीं काय मदत केली आहे व तिचें महत्त्व किती आहे हें पुढील उपोद्घातावरून कळून येईल च. पंतांच्या बहुतेक उपलब्ध पत्रां-वर लेखनकाल किंवा लेखनकालाच्या निर्णयाचें साधन नसल्या-मुळें आजपर्यंत त्या पत्रांची संगति व त्यांतील मजकुरावरून

निष्पन्न होणारी स्पष्ट व आनुमानिक माहिती पद्धतशीर रीतीनें व सप्रमाण अशी लोकांपुढें आली नाहीं. परंतु ती आतां प्रो. परांजपे ह्यांच्या उपोद्घाताचे द्वारें लोकांपुढें येत आहे, हें सूक्ष्मदृश वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून रहाणार नाहीं. रा. रा. दत्तात्रेय वामन पोतदार बी. ए. ह्यांनीं अत्यंत परिश्रम घेऊन स्वतंत्रपणें विषयानुक्रमणिका तयार केली. रा. सा. नीळकंठ विनायक छत्रे बी. ए. एल्. सी. ई. ह्यांनीं शेजारधर्मास अनुसरून आमची वरी च तसदी सोसली आहे. रावसाहेबांच्या नव्याजुन्या कोशसाहित्याचा आम्हांस फार उपयोग झाला. प्रो. विष्णु गोविंद विजापूरकर एम्. ए. ह्यांच्या मदतीचा उपयोग, मागें उल्लेख केल्याप्रमाणें समग्र ग्रंथांचे अंतीं आम्हीं जें परिशिष्ट देणार आहों, त्यामध्यें होईल. अशा रीतीनें प्रसंगानुसार आणखी हि कित्येक काव्यप्रिय विद्वानांच्या सल्ल्याचा ग्रंथाच्या अंतरंगाला उपयोग झाला आहे. श्री. सरदार खंडेराव चिंतामण मेहेंदळे बी. ए., येथील भारत-इतिहास-संशोधक-मंडळाचे चिटणीस, हे आपल्याला प्रस्तुत योजनेला पोषक असें जें करितां येईल व जें करवितां येईल तें मोठ्या उत्सुकतेनें करितात. रा. रा. गोविंद काशीनाथ चांदोरकर, वकील (धुळें) व रा. रा. शंकर गजानन पुरोहित बी. ए. एलएल्. बी. ह्यांची संस्मरणीय वेळीं संपादकाला मदत झाली आहे.

असो. पुरस्कार करणारानीं पुरस्कार केला, लेखकानीं लिहिलें, कांहीं शंकानिरसनाच्या कामीं उपयोगी पडले. पण ज्यानीं थोर मनानें लोकाश्रय मिळवून देण्याची खटपट करून ह्या योजनेंत "जीव" आणला त्यांपैकीं कांहींचा नामनिर्देश केल्याशिवाय

रहावत नाहीं. रा. रा. रामकृष्ण वासुदेव बर्वे बी. ए. ह्यानीं आणि रा. रा. अनंत नीळकंठ पिटकर व भास्कर विष्णु फडके बी. ए. वगैरेनीं मुंबई येथें लोकाश्रय मिळवून देण्याचा सुयशस्वी प्रयत्न केला. याशिवाय रा. रा. वामन दामोदर तळवलकर वकील, शंकर गणेश लवाटे बी. ए., पांडुरंग नरसिंह पटवर्धन, डॉ. गोपाळ सदाशिव पळसुले व नरहर शिवराम परांजपे (पुणें), तीं० बापूजी रामचंद्र तळवलकर (पंतवंशजांपैकीं च वाईस तळवलकरांचे घराण्यांत दत्तक), रा. रा. अनंत वासुदेव फडणीस (सातारा), शंकर नारायण जोशी (वाई), विनायक नारायण मोदगी बी. ए. एल्. एल्बी. (ठाणें), सदाशिव लक्ष्मण सोमण, वकील (बेळगांव), रघुनाथ कृष्ण जोशी बी.ए.(जुन्नर), दत्तात्रेय शिवराम पुसाळकर, वकील (एरंडोल), विश्वनाथ गणेश जावडेकर, वकील (धुळे), व्यंकटेश गणेश जावडेकर, वकील (अंमळनेर), सदाशिव कृष्ण वैशंपायन, वकील (खांडवा), गोविंद प्रह्लाद देव (नागपूर), तीं० रघुनाथ नारायण पंत–पराडकर (दक्षिण हैद्राबाद) व रा. नारायण काशीनाथ फडके, वगैरे अनेकानीं लोकाश्रय मिळविण्याची खटपट केली आहे. याखेरीज ज्यांचा येथें नामनिर्देश नाहीं अशा हि कित्येक सज्जनांची आम्हांला मदत झाली आहे, व होत आहे.

वर्गणीदार हे द्रव्यदाते असल्यामुळें, व द्रव्यबलावर च आरंभिलेलें कार्य तडीस जाणें सर्वस्वीं अवलंबून असल्यामुळें ते हि ह्या योजनेच्या यशाचे वाटेकरी आहेत; 'यशवंत' छापखान्याचे मालक ह्यानीं मुद्रक ह्या नात्याखेरीज हि उदार मनानें दिलेल्या सवलतीबद्दल व

रा. रा. महादेव नारायण कवडे वगैरे मंडळींनीं, ग्रंथाचें स्वरूप व महत्त्व ओळखून, अशुद्धें सहसा न रहावी म्हणून विशेष काळजी घेतली, ह्याबद्दल त्यांचा उल्लेख करण्यांत आम्हांस संतोष वाटतो.

पंतांच्या हस्ताक्षराच्या छापील प्रतिमेचें काम येथील सरकारी 'फोटोझिंको ऑफीस'नें समाधानकारक रीतीनें करून दिलें.

सरतेशेवटीं वर लिहिल्याप्रमाणें ज्यांचे ज्यांचे परिश्रम व सदिच्छा या नव्या आवृत्तीला कारणीभूत झाल्या आहेत, त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानून, व ज्यांच्या पुण्याईनें मनांतील हेतु येथपर्यंत सिद्धीस गेला व अखेरपर्यंत जाईल, त्या कविश्रेष्ठ मोरोपंतांच्या आत्म्याला वंदन करून 'गंगातर्पण गांगें' ह्या त्यांच्या च उक्तीप्रमाणें त्यांची ही काव्यकृति त्याना अर्पण करितों.

पुणें, विजयादशमी
शके १८३४.

संपादक.

वाचकांस विनंति.

केवळ अपरिहार्यत्वानें ग्रंथांत जीं कांहीं अशुद्धें राहून गेलीं त्यांचें शुद्धिपत्र ज्या त्या खंडाला जोडलें आहे. विषय काव्याचा असल्यामुळें, नजरेस आलीं तीं क्षुल्लक अशुद्धें हि त्यामध्यें शुद्ध केलीं आहेत; तरी वाचकानीं शुद्धिपत्राकडे आपलें लक्ष्य ठेवावें.

महाराष्ट्रीयांस जाहीर विनंतिपत्र.

कविवर्य मोरोपंतांची कविता.

प्रसिद्ध महाराष्ट्रीय कविवर्य मोरोपंत यांच्या काव्यग्रंथांचें शोधन व चर्चा या बाबतींत आजपर्यंत अनेकानीं अनेक वेळां ऊहापोह केलेला च आहे. तथापि या सर्वांत अलीकडचा प्रयत्न रा. रा. रामकृष्ण दत्तात्रेय पराडकर यानीं 'पंत व त्यांची कविता' या मथळ्याखालीं 'केसरी' वर्तमानपत्रांतून एक लेखमाला लिहून केला आहे, हें श्रुत आहे च. रा. पराडकर यांचा प्रयत्न मोरोपंतानीं स्वरचित कवितेचें स्वतः लिहून ठेविलेलें जें दप्तर पंढरपुरास त्यांच्या वंशजांपाशीं आहे, त्यावरून केलेला असल्यामुळें, अर्थात् च त्यांच्या प्रयत्नानें पंतांच्या कवितेच्या विषयांत बऱ्या च नवीन माहितीची भर पडली आहे. पंताची कविता छापून काढण्याचे प्रयत्न जरी आजपर्यंत तीनचारदा झाले, तरी कवीच्या मूळ प्रतीवरून शुद्ध प्रत तयार करून घेण्याची संधि कोणास न मिळाल्याकारणानें, सर्व छापील प्रतींतून पुष्कळ च अपपाठ मिश्र झाले आहेत; मूळ ग्रंथांतील कित्येक ठिकाणचीं पद्यें गळालीं असून कांहीं ठिकाणीं प्रक्षिप्त पद्यांची हि भेसळ झाली आहे; अर्थात् या सर्व कारणानीं, आजपर्यंत छापलेल्या प्रतींपैकीं कोणती च प्रत सर्वस्वी विश्वसनीय अशी होऊं शकली नाहीं, वगैरे मुद्यांचें विवेचन मूळ दप्तराच्या अनुरोधानें रा. पराडकर यानीं आपल्या लेखमालेंत केलें आहे; त्यामुळें पंतांची कविता त्यांच्या स्वलिखित प्रतींच्या दप्तरावरून छापली जाण्याच्या अवश्यकतेचा प्रश्न

ओघानें च पुढें येतो. कवीचे ग्रंथ कवीनें जसे स्वतः लिहिले तसे छापले जाण्यांत जें महत्त्व आहे, तें लेखकपाठकांच्या चुक्यानीं व्याप्त असलेल्या, किंवा कवीची कृति अधिक शोभिवंत करण्यासाठीं सद्भावानें केलेल्या शोधानीं भरलेल्या हि पुस्तकांत नाहीं, हें उघड आहे. रा. पराडकर यानीं मयूरपंडितांच्या स्वलिखित दप्तरावरून छापील प्रतींचें संशोधन केलें आहे. शिवाय आतांपर्यंत उपलब्ध असून अप्रसिद्ध असलेली पंतकविता हि हल्लीं योजलेली मोरोपंती काव्यग्रंथांची नवीन स्वतंत्र आवृत्ति काढताना यथास्थलीं समाविष्ट होईल. म्हणून अशी प्रत काढण्यास महाराष्ट्रभाषेच्या प्रत्येक अभिमान्यानें शक्य तें साहाय्य केलें पाहिजे. तसें साहाय्य केल्यास महाकवि मोरोपंत यांच्या समग्र ग्रंथांची प्रमाणभूत प्रत अस्तित्वांत आणून तिचो प्रसिद्धी केल्याचें श्रेय मिळणार आहे.

विनायक कोंडदेव ओक,
विष्णु मोरेश्वर महाजनी,
काशीनाथ नारायण साने,
गणेश जनार्दन आगाशे,
गोविंद वासुदेव कानिटकर,
लक्ष्मण रामचंद्र पांगारकर,
विश्वनाथ काशीनाथ राजवाडे,
लक्ष्मण गणेशशास्त्री लेले,
शंकर श्रीकृष्ण देव,

मोरेश्वर गोपाळ देशमुख,
खंडेराव चिंतामण मेहेंदळे,
चिंतामण विनायक वैद्य,
सीताराम विश्वनाथ पटवर्धन,
श्रीधर विष्णु परांजपे,
हरि नारायण आपटे,
नरसिंह चिंतामण केळकर,
दामोदर गणेश पाध्ये,
गोविंद काशीनाथ चांदोरकर,

काशीनाथबोवा मसूरकर,
बाळकृष्णबोवा चातुर्मासे,
भिकाजीबोवा ताहाराबादकर.

श्रीः

उपोद्घात.

भगवद्भक्तीसारखी दुसरी उत्कृष्ट गोष्ट या जगामध्यें कोणती आहे? इहलोकीं हिच्यापासून सर्वांपेक्षां अत्यंत कमी नुकसान आणि सर्वांपेक्षां अत्यंत जास्त फायदा होत असल्या-

मोरोपंत.

कारणानें हिची योग्यता व्यवहारदृष्ट्या तर फार मोठी आहे च. पण हिच्यापासून प्राप्त होणाऱ्या पारलौकिक फला-कडे पाहिलें, म्हणजे तर हिच्या तोडीचें सुलभ असें साधन दुसरें कोणतें हि आजवर उपलब्ध झालेलें नाहीं, असें च म्हणणें भाग पडतें. असें उत्तम साधन मनुष्यप्राण्यापुढें वाढून ठेविलेलें असून हि एखाद्या रोगग्रस्ताप्रमाणें तो त्याच्याकडे ढुंकून सुद्धां पहात नाहीं. ही खेदजनक स्थिति पाहून ती बदलण्याकरितां आणि या प्रेमळ भक्तिमार्गाकडे त्याचें मन वेधण्याकरितां नारद, वाल्मीकि, व्यास, शुकाचार्य, इत्यादिकांच्या वेळेपासून त्या त्या काळच्या भगवद्भक्तांचे अश्रांत परिश्रम चाललेले आहेत. या भक्तपरंपरेंतील आपल्या महाराष्ट्रामधील आद्य भगवद्भक्त म्हटले म्हणजे श्रीज्ञानेश्वरमहाराज हे होत. यानीं आपल्या उग्र योगबलानें आणि उत्कृष्ट वाक्चातुर्यानें सर्व महाराष्ट्रीयाना तल्लीन करून सोडलें आहे. ज्ञानेश्वरमहाराजानीं भक्तिमार्गाचा प्रसार करिताना महाराष्ट्रीय कविता ही एक त्या कृत्याला साधन म्हणून हातांत धरली होती. उत्कृष्ट काव्याच्या सुवर्णमय चमसानें त्यानीं भगवद्भक्तीचें

उत्कृष्ट औषध त्रिविधतापसंतप्तांना पाजिलें. आणि अशा रीतीनें श्रीज्ञानेश्वरमहाराजरूपी परिसाचा सहजगत्या स्पर्श झाल्यामुळें आपल्या महाराष्ट्रीय काव्याला सुवर्णमयत्व, सुंदरत्व आणि हृदयंगमत्व अनायासानें प्राप्त झालें. ही भगवद्भक्तीची आणि कवित्वाची जी मैत्री ज्ञानेश्वरमहाराजांचे वेळीं जमली, ती आपल्या महाराष्ट्र-वाङ्मयामध्यें पुष्कळ दिवस अबाधितपणें चालू होती. श्रीज्ञानेश्वर-महाराजांच्या मागून जे कवि झाले, त्यांचा हि मुख्य विषय म्हटला म्हणजे या संसारतापांतून सुटण्याचें मुख्य आणि सुलभ साधन जें भगवद्भक्ति तो च होता. व या साधनाचें प्रतिपादन करण्याकरितां ते हि उत्तम काव्यांचा उपयोग करीत आले. ज्ञानेश्वरमहाराजांचे मागून एकनाथ, मुक्तेश्वर, रामदास, वामन, तुकाराम, वगैरे जे भगवद्भक्त आणि कवि झाले, त्यानीं ज्ञानेश्वरमहाराजांनीं घालून दिलेली परंपरा अव्याहतपणें चालविली. या भगवद्भक्त कविमालिकेपैकीं अलीकडच्या काळांतील शेवटले श्रेष्ठ कविवर्य म्हटले म्हणजे मोरोपंत हे होत. यांच्या काव्यामध्यें भगवद्भक्ति तर आहे च; परंतु यांच्या भगवद्भक्तीमध्यें जें काव्य आहे, तें साहित्यशास्त्रदृष्ट्या फार वरच्या दर्जाचें आहे. आपल्या महाराष्ट्रवाङ्मयाचें मोठें भाग्य, म्हणून त्यामध्यें मोरोपंतांच्या काव्यांचा जन्म झाला. इतर देशांतील आणि भाषांतील कवींचीं काव्यें पाहिलीं, तर त्यांपैकीं कित्येक सरसपणांत आणि सुंदरपणांत मोरोपंतांच्या काव्याच्या बरोबरीला येणार नाहींत, असें नाहीं. परंतु त्यांच्यामध्यें मोरोपंतांच्या कवितेमधल्याप्रमाणें भक्तिरसाचें

अधिष्ठान मात्र क्वचित् च सांपडेल. परभाषांतील परदेशीय काव्यांमधील विषय पाहिले असतां ते बहुतेक ऐहिक, व्यावहारिक व क्षणिक असतात; व त्यामुळें त्यांचा टिकाऊपणा हि बेताबाताचा च असतो. परंतु भगवद्भक्तीची गोष्ट तशी नाहीं. भगवद्भक्ति हा विषय सर्वकालीन आणि सार्वत्रिक आहे. परमकारुणिक परमेश्वर आणि संसारचक्रांत सांपडलेला मनुष्य, ही जोडी जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत भगवद्भक्ति या विषयाच्या टिकाऊपणाला भीति नाहीं. असल्या टिकाऊ पायाचा आधार घेऊन काव्यरसाची कमाल एक जुन्या महाराष्ट्रवाङ्मयाच्या आरंभीं श्रीज्ञानेश्वरांनीं केली, आणि दुसरी ह्या वाङ्मयाच्या अखेरीस मोरोपंतांनीं केली.

ते मोरोपंत परलोकीं जाऊन जरी आज पुष्कळ दिवस झाले आहेत, तरी त्यांचा काव्यमय आत्मा अद्यापि इहलोकीं च आहे.

त्यांच्या काव्यांचें प्रकाशन.

त्यांच्या भगवद्भक्तीच्या बलानें त्यांचा चैतन्यघन जीवात्मा जरी मुक्त झाला असला, तरी त्यांचा काव्यमय आत्मा इहलोकीं—या महाराष्ट्रामध्यें—महाराष्ट्रीयांच्या अंतःकरणांत—अद्यापि बद्धावस्थेमध्यें च पडलेला आहे, आणि तेथून त्याला कधीं काळीं हि मुक्ति मिळण्याचा यत्किंचित् सुद्धां संभव दिसत नाहीं. या सुवर्णमय काव्यरूप हंसाला आपल्या मुक्तीच्या सर्व कल्पना बाजूला ठेवून महाराष्ट्रीय रसिकांच्या मानससरोवरामध्यें च चिरकाल क्रीडा करीत रहावें लागेल, हें अगदीं निश्चित आहे. पंतांची कवितारूपी कन्या जन्मास आल्यापासून आतांपर्यंत प्रत्येक रसिक

तिच्यावर जास्त जास्त च आसक्त होत चाललेला आहे. कमळ फुलल्याबरोबर त्याच्यावर भ्रमरांच्या उड्या पडतात, त्याप्रमाणें पंतांची कविता लिहून झाली कीं, ती वाचण्याला त्यांच्या वेळचे रसिक वाचक अगदीं उत्सुक झालेले असत. त्या वेळीं पंतांच्या काव्यांच्या हस्तलिखित प्रती उतरून घेण्याचा परिपाठ फार असे; आणि जेव्हां छापखाने आणि त्यांत छापलेलीं पुस्तकें नव्हतीं, तेव्हां काव्यप्रसाराचा हा च राजरस्ता होता. मोरोपंतांच्या वेळच्या आणि त्यांच्या मागाहूनच्या ज्या अनेक रसिकानीं त्यांची कविता उतरून घेतलेली होती, त्यानीं महाराष्ट्रभाषेची एक फार मोठीं कामगिरी करून ठेविली होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं. तसल्या कांहीं हस्तलिखित प्रतींवरून पंतांच्या काव्यांची पहिली छापील आवृत्ति नवनीताचे कर्ते सुप्रसिद्ध परशुरामपंत तात्या गोडबोले यांच्या साहाय्यानें कै० माधव चंद्रोबा यांच्या हस्तें प्रसिद्ध झाली. परंतु ती शिळाछापावरची होती. हें त्या आवृत्तीमधील वैगुण्य पुढें रा. तेंडुलकर यांच्या टाइपावर छापलेल्या आवृत्तीनें काढून टाकलें. तरी पण, पंतांची कविता जशीं सुंदर, ठाकठिकीची आणि बांधेसूद, तशा च प्रकारची पुस्तकरचना तिला वास्तविक पाहिजे होती, व ती अखेरीस (काव्येतिहाससंग्रहांतील प्रकाशनानंतर) निर्णयसागर छापखान्याच्या आवृत्तीनें पंतांच्या कवितेला प्राप्त झाली. येथें दोन उत्तमा-उत्तमांचा स्पृहणीय समागम जुळून आला. उत्तम पक्वान्नाला उत्तम पात्र असावें, किंवा उत्तम रत्नाला त्याच्या अनुरूप असें उत्तम कोंदण मिळावें,

त्याप्रमाणें पंतांच्या काव्याला या निर्णयसागरच्या आवृत्तीच्या प्रसंगीं योग आला, यांत शंका नाहीं. त्यांतून रा. रा. जनार्दन बाळाजी मोडक, वामन दाजी ओक, नारायण चिंतामण केळकर, बाळकृष्ण अनंत भिडे, दत्तात्रेय केशव जोशी, इत्यादि मोरोपंतांच्या मार्मिक भक्तानीं सदर आवृत्तीमध्यें विपुल आणि विशद टीपा देण्याच्या कामीं जी मेहनत घेतली आहे, त्यामुळें तर सदर आवृत्तीला फार च महत्त्व प्राप्त झालें आहे. परंतु येथपर्यंत जरी बाह्य सौष्टवाची मजल या आवृत्तीच्या द्वारें पोंचविण्यांत आली, तरी वाचकवर्गाची आणखी एक अपेक्षा अद्यापि अवशिष्ट राहिलेली च होती. बाह्य सौष्टवापेक्षां हि अंतःशुद्धत्व हें कोणत्या हि कवीच्या काव्यामध्यें जास्त अपेक्षित असतें. पुस्तकाच्या सुंदर छपाईपेक्षां हि पुस्तकांतील एकाद्या दुर्बोध स्थळींचा नवीन मिळालेला सुंदर पाठ मनाला जास्त आनंद देतो; आणि वर दिलेल्यासारख्या विद्वानानीं जरी पंतांच्या काव्यांचें मोठ्या परिश्रमानें आलोडन केलेलें आहे, तरी हि त्यांतील सर्व च दुर्बोध स्थळें आणि अपपाठ नाहींसे झालेले आहेत, असें नाहीं. एका हस्तलिखित प्रतीवरून दुसरी हस्तलिखित प्रत, दुसरीवरून तिसरी, तिसरीवरून चौथी, अशा परंपरेनें तयार झालेल्या कोणत्या तरी एकाद्या हस्तलिखित प्रतीवरून आतांपर्यंतच्या प्रती छापलेल्या असल्याकारणानें, त्यांमध्यें वर निर्दिष्ट केलेल्या प्रकारचे कांहीं दोष राहून जाणें अगदीं स्वाभाविक आहे. परंतु आपल्या अंतःकरणवृत्तीप्रमाणें च आपली काव्यरचना हि सदोदित निर्मल, निर्दोष आणि निष्कलंक

असावी, अशी ज्यांची अंतःशुद्धतेविषयीं अतिशय उत्कट इच्छा असल्याचें पावलोपावलीं आढळून येतें, त्या पंतांच्या काव्यांच्या छापील आवृत्तीमध्यें इतकीं सुद्धां अशुद्धें राहूं देणें इष्ट नाहीं, अशा भावनेनें प्रस्तुतची आवृत्ति काढण्याची सुरवात करण्यांत आलेली आहे. हा उद्दिष्ट हेतु सर्व च ठिकाणीं शेवटास जाणें शक्य असतें, असें नाहीं; परंतु महाराष्ट्रीय वाचकांच्या सुदैवानें ही अशक्य गोष्ट हि ह्या आवृत्तींत शक्य झालेली आहे. आतांपर्यंत पंतांच्या काव्यांच्या छापलेल्या आवृत्त्या कोणत्या हि हस्तलिखित प्रतींच्या आधारावर छापलेल्या असोत; परंतु हल्लींची आवृत्ति ही खुद्द पंतानीं आपल्या हातानें लिहून ठेवलेल्या पोथ्यांवरून तयार करण्यांत येत आहे. पंढरपुरास पंतांच्या हातच्या लिहिलेल्या स्वरचित काव्यांचा मोठा संग्रह अद्यापि हि चांगल्या स्थितीमध्यें कायम आहे. या पोथ्यांमधील पंतांचें हस्ताक्षर स्पष्ट आणि सुवाच्य आहे. त्याचा जो एक नमुना या पुस्तकाला अन्यत्र जोडलेला आहे, त्यांवरून या गोष्टीची सत्यता कोणाच्या हि नजरेस येईल.

मोरोपंतांच्या स्वहस्तालिखित पोथ्यांसंबंधानें लिहिण्याच्या या प्रसंगामध्यें येथें ही हि एक गोष्ट वाचकांच्या नजरेस आणून देणें जरूर आहे कीं, मोरोपंत आपली भारताची पोथी स्वहस्तानें लिहित असतां मध्यें च एखादुसऱ्या आर्येचें हस्ताक्षर पंतांच्याहून अगदीं भिन्न असें येतें. या आवृत्तीमध्यें पंतांच्या हस्ताक्षराचा नमुना म्हणून जी एका पृष्ठाची छापील प्रतिमा दुसरीकडे जोडली आहे, ती पाहिली असतां हें दुसऱ्याचें हस्ता-

क्षर तेव्हां च लक्षांत येतें. सदर प्रतिमेमधील ९३ आणि ९४ या मधल्या च दोन आर्या दुसऱ्यानें लिहिलेल्या आहेत. अशा आर्या मोरोपंतांच्या स्वहस्तलिखित भारताच्या पोथीमध्यें एकंदर किती व कोणत्या आहेत, हें समजण्याकरितां त्यांचें एक स्वतंत्र टांचण हि पुढें दिलें आहे. अशा परलिखित आर्या सुमारें ८०।८५ आहेत. या आर्या परलिखित असल्या, तरी त्या पररचित नाहींत, ही गोष्ट निर्विवाद आहे. परंतु त्या धावत्या ओळीच्या मधें च कशा व कां आल्या, हा एक प्रश्न आहे. स्वरचित काव्य लिहितां लिहितां कांहीं कारणानें मोरोपंत कदाचित् मध्यें च थांबले असतील, आणि त्याच्यापुढील आर्या त्यानीं दुसऱ्या कोणाला लिहावयाला सांगितल्या असतील; किंवा अशा ज्या आर्या आहेत, त्या पंतानीं पूर्वीं रचलेल्या असून हि कदाचित् त्या त्यांच्या मनासारख्या झाल्या नसतील, अथवा त्यांतील कांहीं पाठ त्याना न आवडल्यामुळें बदलावयाचे असतील, म्हणून तेवढ्या आर्यांपुरतीं साधारपणें अक्षरें मोजून बेताची जागा सोडून पुढील आर्या त्यानीं लिहून काढल्या असतील, आणि मग मधल्या राहिलेल्या आर्या किंवा त्यांचे पाठ मनाप्रमाणें जुळल्यानंतर त्या आर्या त्यानीं दुसऱ्या कोणाला लिहावयाला सांगितल्या असतील. हें परहस्ताक्षर हि सर्वत्र एकाचें च आहे, असें म्हणतां येत नाहीं. या बाबतींत निश्चयात्मक असें कांहीं ठरवितां येत नाहीं; तथापि ही परलिखित आर्यांची गोष्ट शोधकांच्या नजरेस आणून ठेवणें इष्ट आणि अवश्य वाटल्यावरून आम्हीं हा उल्लेख येथें केला आहे.

या च पोथ्यांमधून पंतानीं कित्येक ठिकाणीं आपल्या कवितेवरील दुसरीं हि कांहीं पाठांतरें दिलेलीं आहेत; दुर्बोध स्थळांवरील त्यांच्या हातच्या टीपा तर पुष्कळ च आहेत. खुद्द पंतांच्या हातच्या इतक्या सगळ्या सामग्रीच्या आधारावर ही आवृत्ति रचिलेली असल्यामुळें हिच्यामध्यें अशुद्धता, अपपाठ वगैरे दोषाना क्वचित् च अवसर सांपडणार आहे. शिवाय या आवृत्तीच्या प्रकाशनाचें काम खुद्द कवीच्या वंशांतील च रा. रा. रामकृष्ण दत्तात्रेय पराडकर यानीं स्वीकारलें असल्यामुळें त्या दृष्टीनें हि या आवृत्तीला एक प्रकारचें विशेष महत्त्व आलेलें आहे. आनुवंशिक संस्कारांचा जो एक मोठा फायदा असतो, तो अनन्यलभ्य फायदा रा. पराडकर यांचेपाशीं सहजसिद्ध आहे. शिवाय पंतांच्या वेळचे सर्व प्रकारचे जुने कागदपत्र, आपल्या पूर्वजांसंबंधींच्या त्यांच्या वंशजांमध्यें चालत आलेल्या दंतकथा व आख्यायिका, आपल्या कुलाविषयीं आणि त्या कुलांतील मोरोपंतासारख्या कुलदीपकाविषयीं असावयाला पाहिजे तो योग्य सदभिमान, व याचसारख्या दुसऱ्या अनेक गोष्टी, यांची अनुकूलता रा. रा. रामकृष्णपंत पराडकर याना निसर्गप्राप्त आहे. तेव्हां अशा संपादकांच्या संपादकत्वाखालीं खुद्द मोरोपंतांच्या स्वहस्तलिखित पोथ्यांवरून जी ही आवृत्ति तयार करण्यांत येत आहे, तिच्यामध्यें सामान्यतः उणीव अशी कांहीं च उरणें शक्य नाहीं. "अयं समुदितः सर्वो गुणानां गणः" या एका संस्कृत कवीच्या उक्तीप्रमाणें येथें स्थिति झाली आहे. आपल्या कवितेचे शुद्ध पाठ आणि आपल्या

कवितेंतील दुर्बोध पदांचे सुगम अर्थ प्रत्यक्ष पंत च जेथें सांगत आहेत, तेथें वाचकाना याहून आणखी जास्त तें काय पाहिजे? मोरोपंत आणि त्यांच्या काव्यांचे वाचक यांची अशा रीतीनें समक्षासमक्ष आणि समोरासमोर गांठ पडल्यानंतर, मग तेथें इतरांची अवश्यकता च नाहीं.

असो; प्रकाशकानीं या प्रस्तुतच्या आवृत्तीचे एकंदर बारा खंड व चार हप्ते करावयाचें योजिलें असून त्यांपैकीं हल्लीं तीन खंडांचा पहिला हप्ता प्रसिद्ध झाला आहे. यांत पंतानीं केलेलें समग्र भारत प्रसिद्ध करण्यांत आलेलें आहे. म्हणून या उपोद्धातामध्यें पंतांच्या चरित्राचा आणि काव्याचा साधारणतः भारतापुरता च विचार करण्याचें आम्हीं योजिलें आहे. जसा ग्रंथ, तसा त्याचा उपोद्धात. मूळ ग्रंथाची जितकी मर्यादा असेल, तितक्या च मर्यादेच्या टापूमधील सामान्य विषयांचें विवेचन त्या ग्रंथाच्या उपोद्धातामध्यें असावें, हें च उचित आणि अनुरूप होय. पंतांच्या चरित्रांतील अनेक प्रसंगांसंबधानें आणि त्यांच्या काव्यांतील अनेक स्थळांसंबधानें पुष्कळ गोष्टी लिहिण्यासारख्या आणि वाचण्यासारख्या आहेत. परंतु त्यांपैकीं ज्या प्रकृतानुपयोगी असतील, त्या खेरीज करून मुख्यतः भारताच्या रचनेला धरून जे मुद्दे असतील ते व तदनुषंगानें जे दुसरे कांहीं मुद्दे प्रसंगप्राप्त होतील ते, एवढ्यांचें च येथें प्रतिपादन करण्याचा आमचा संकल्प आहे.

महाभारत हा आपल्या संस्कृतभाषेमधील—नव्हे, जगांतील सर्व भाषांमधील—एक अप्रतिम ग्रंथ आहे. या ग्रंथाची बरोबरी दुसऱ्या

कोणत्या हि ग्रंथाच्यानें कधीं काळीं सुद्धां करवणार नाहीं.

महाभारत. यांतील सर्व च गोष्टी अत्यंत अद्भुत आहेत. इतक्या अद्भुत आणि उदात्त गोष्टी एकत्र ग्रथित केलेल्या अन्यत्र क्वचित् च आढळतील. काव्यप्रकाशकारानीं " उदात्तं वस्तुनः संपन्महतां चोपलक्षणम् " अशा लक्षणाचा एक उदात्त या नांवाचा अलंकार सांगितलेला आहे. त्या अलंकाराच्या दृष्टीनें या दिव्य ग्रंथांतील ठळक ठळक गोष्टींकडे पाहिलें असतां, महाभारत हें या उदात्तनामक अलंकाराचें केवढें तरी प्रचंड आणि विस्तीर्ण असें एक मूर्तिमंत उदाहरण म्हणून डोळ्यापुढें उभें राहतें! या महाभारताची जी गोष्ट पहावी ती अद्भुत च! या ग्रंथाचा कर्ता महामुनि व्यास! याचा लेखक विद्याधिपति गणपति! याच्या रचनेची जागा हिमालयांतील बदरीनारायणाचीं शिखरें! यांतील नायकांची आणि उपनायकांची पूर्वपरंपरा थेट चंद्रलोकापर्यंत आणि स्वर्गस्थ देवतांपर्यंत गेलेली! धृतराष्ट्राला शंभर पुत्र! पांच पांडव म्हणजे ह्या सृष्टिरचनेच्या अधिकारावरील ज्या पांच मुख्य देवता, त्यांचे मूर्तिमंत अवतार! द्रौपदी म्हणजे तर द्रुपदराजाच्या यज्ञकुंडांतील अग्निज्वाळेची घनीभूत झालेली प्रत्यक्ष शिखा च! साध्या द्यूतांत हि राज्याचा आणि बायकोचा पण! धर्मानें वागणाऱ्या धर्माला बारा वर्षे वनवास! शिष्टाई आणि सारथ्य करण्याला प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्ण परमात्मा इकडून तिकडे हेलपाटे घालतात! घनघोर रणसंग्रामामध्यें शांतिब्रह्माचा उपदेश! भीष्म आणि द्रोण आपल्या वधाचे उपाय आपल्या तोंडानें आपल्या शत्रूंना

सांगतात! अठरा अक्षौहिणी सैन्याचा नाश! राजसूय, अश्वमेघ यांच्यासारखे यज्ञ! असे अद्भुत प्रसंगांचे किती प्रकार वर्णन करावे! सर्व च अलौकिक! असल्या अलौकिक कथासूत्रानीं जो काव्यपट विणला गेला आहे, त्याच्या अद्वितीय दीप्तीनें सर्वांचे डोळे दिपून गेले, आणि आश्चर्यानें सर्वांचीं मनें थक्क झालीं, तर त्यांत आश्चर्य तें काय? अशा या महाभारतानें पंतांचें मन आपल्याकडे आकर्षित करून घेतलें, आणि पंतानीं त्याच्या आधारानें आपली काव्यरचना केली, हें सर्व यथायोग्य च झालें.

सर्व रसिकांच्या अंतःकरणांचा लोहचुंबक—जो हा महाभारत ग्रंथ—त्यानें पंतांचें अंतःकरण आपल्याकडे सर्वांच्या आधीं ओढून घेतलेलें असलें पाहिजे, हीं गोष्ट पंतांच्या एके ठिकाणच्या एका उल्लेखावरून हि स्पष्ट दिसून येते. 'रामरीति' या नांवाचें एक लहानसें प्रकरण पंतानीं लिहिलें आहे. त्यामध्यें त्यानीं सुरस अशा ग्रंथांची एक याद दिली आहे. त्या यादींत हि अग्रपूजेचा मान, राजसूय यज्ञांत धर्मराजानें कृष्णाला दिला त्याप्रमाणें, पंतानीं महाभारताला च दिला आहे; व रामायण, भागवत, विष्णुपुराण यांचीं नांवें त्या यादींत मागाहून आलीं आहेत. त्या आर्या येणेंप्रमाणेः—

भारतरचनेच्या पूर्वीचें पंतांचें ग्रंथकर्तृत्व.

मज सुरस ग्रंथांहीं, वृत्तिपरा जेंवि सोस वतनाहीं. ६१
ज्या सेतुनें भवनदीं वाहुनि संसारखेदभार तरे,
धर्मार्थकाममोक्षप्रतिपादन ज्यांत वेद भारत रे! ६२
त्याला कैसे करितां इतर पुराणासमान? किति हास

चित्तांत आवरावा? म्हणतों रे! हा मुकुंद-इतिहास. ६३
श्रीमद्रामायण जें कोण्ही कांहीं म्हणेल जरि त्यातें
त्याला 'राक्षस' म्हणतों मीं सन्मार्गांत विघ्नकरित्यातें. ६४
श्रीमद्भागवत मला निजपूर्वजपुण्यचरितसें वाटे;
तत्कथितात्मनिधानाऽलाभें कंठ क्षणक्षणीं दाटे. ६५
श्रीविष्णुपुराणाची श्रीभागवतें तसी च गति केली;
वृंदावनें जसी श्रीसाकेताची प्रसिद्धि मृदु ठेली. ६६

भागवत, रामायण, हरिवंश, इत्यादि ग्रंथ संस्कृतमध्यें सर्वमान्य आहेत, व त्यांच्यावर हि पंतानीं आपलीं काव्यें रचिलेलीं आहेत. परंतु तीं भारताच्या मागाहूनचीं आहेत. वरच्यांपैकीं रामायणाला धरून रचिलेलें असें मंत्ररामायण मात्र पंतानीं आधीं लिहिलेलें होतें. पण तें खेरीज करून अवांतर रामायणें, मंत्रभागवत, हरिवंश वगैरे सर्व ग्रंथांवरील आर्या भारताच्या मागाहून लिहिलेल्या आहेत. तथापि पंतानीं भारताच्या आर्या लिहिल्या, त्याच्या आधीं त्यानीं कित्येक लहानमोठीं स्फुट प्रकरणें हि लिहिलेलीं होतीं. कुशलवोपाख्यान, ब्रह्मोत्तरखंडावरील आर्या, मदालसा व हरिश्चंद्र यांचीं आख्यानें, सीतागीत, रुक्मिणीगीत आणि सावित्रीगीत, अशासारखीं बायकांच्या जोगतीं गाणीं वगैरे स्फुट काव्यें, तसें च मंत्ररामायण, प्रह्लादविजय आणि कृष्णविजय हीं मोठीं काव्यें, आणि संशयरत्नमाला, आर्याकेकावली, नामरसायन वगैरे किरकोळ प्रकरणांवरील आर्या, ही सर्व कृति भारताच्या आधींची च आहे. परंतु अशा या लहानमोठ्या स्फुट प्रकरणांवर आपली लेखणी चालवून पाहून, ती आतां आपल्या मनासारखी चालते, अशी

पंतांच्या मनाची खात्री झाल्याबरोबर त्यानीं पहिला जो महाग्रंथ समग्र लिहिण्याकरितां हातीं घेतला तो महाभारत हा होय.

असो; अशा रीतीनें पंतानीं जें भारत लिहिण्याला हातीं घेतलें त्याला त्यानीं निराळें व विशिष्ट असें कांहीं नांव दिलेलें होतें कीं काय, असा एक प्रश्न उपस्थित होतो. सबब या प्रश्नासंबंधानें पंतांच्या स्वहस्तलिखित पोथीमध्यें काय काय प्रमाणें आढळतात, आणि त्यांवरून काय निष्कर्ष काढतां येईल, याबद्दल आपण थोडासा विचार करूं. संस्कृतमधील महाभारतावरून पंतानीं मराठीमध्यें जें महाकाव्य केलें आहे, त्याला हल्लींच्या निरनिराळ्या छापील प्रतींमधून दोन निरनिराळीं नांवें दिलेलीं आढळतात.

महाभारत कीं आर्याभारत ?

निर्णयसागर छापखान्यांतून जी मोरोपंती महाभारताची आवृत्ति बाहेर पडली आहे, त्या आवृत्तीमधील प्रत्येक पर्वाच्या पुस्तकाच्या मळपृष्ठावर आणि आंतील विषमपृष्ठांच्या माथ्यावर हि जरी '**महाभारत**' असें च नांव छापलेलें आहे, तरी सदर आवृत्तींतील सभापर्व, स्वर्गारोहणपर्व वगैरे कांहीं पर्वांच्या पुस्तकाना त्यांच्या संपादकानीं ज्या प्रस्तावना जोडल्या आहेत, त्यांतून त्यानीं '**आर्याभारत**' या नांवाचा फार सढळ हातानें उपयोग केला आहे. शिवाय प्रस्तुतच्या आवृत्तीमध्यें तर '**आर्याभारत**' असें या महाकाव्याचें कायमचें नामकरण करून टाकलेलें आहे. तेव्हां अशीं जीं हीं दोन निरनिराळीं नांवें आढळून येतात, त्यामुळें या काव्याचें खरें नांव कोणतें, अशी स्वाभाविकपणें च शंका उत्पन्न

होते. याकरितां या शंकेचें सप्रमाण पद्धतीनें एकदाचें कांहीं तरी कायमचें निरसन होणें जरूरीचें आहे. म्हणून त्याविषयीं काय माहिती मिळते, तें पाहूं. आपल्या काव्याला काय नांव द्यावयाचें, ही कवीच्या खुषीची गोष्ट आहे. त्याला जें योग्य वाटेल, तें नांव तो आपल्या काव्याला देईल. त्याबद्दल दुसऱ्यानीं वितंडवाद घालीत बसण्याचें कारण नाहीं. सबब या बाबतींत मोरोपंतानीं काय केलें आहे, इकडे क्षणभर आपण आपली दृष्टि वळवूं. मोरोपंतांच्या हातची जी पोथी आज उपलब्ध आहे, ती अशा दृष्टीनें तपासून पहातां त्यामध्यें बरें च वैचित्र्य दिसून येतें. पंतानीं आपल्या काव्याला कोठें 'महाभारत' असें च म्हटलें आहे, आणि कोठें 'आर्याभारत' असें हि नांव दिलें आहे. परंतु त्यां-तल्या त्यांत जास्त बारकाईनें तपासणी केली असतां अशी एक गोष्ट दृष्टोत्पत्तीस येते कीं, 'आर्याभारत' हें नांव देण्याची कल्पना पंतांच्या मनामध्यें प्रथमतः नसावी. कारण, आदिपर्व व सभापर्व या दोन पर्वांच्या आरंभीं किंवा शेवटीं आणि त्यांतील कोणत्या हि अध्यायाच्या शेवटीं पंतानीं 'आर्याभारत' या नांवाचा कोठें हि उल्लेख केलेला नाहीं. परंतु त्याच्यापुढें मात्र आपल्या ग्रंथाला कांहीं तरी विशिष्ट नांव असावें, ही कल्पना पंतांच्या मनामध्यें प्रादुर्भूत झाली असावी, असें दिसतें. कारण, सभापर्वानंतर वन, विराट, उद्योग, भीष्म, द्रोण, ह्या पर्वांतून अध्यायांच्या आणि पर्वांच्या शेवटीं बऱ्या च ठिकाणीं 'आर्याभारत' या पंतविनिर्मित नांवाचा निर्देश आलेला आहे.

यांपैकीं कांहीं प्रसंगीं नुसतें ‘आर्याभारत’ असें म्हटलेलें आहे, आणि कित्येक प्रसंगीं ‘आर्याभिरचित भारत’ असें म्हटलेलें आहे; परंतु ही जी विशिष्ट नामनिर्देशाची लहर मोरोपंतांच्या मनामध्यें मध्यंतरीं आली होती, ती मग पुढें भारताच्या थेट समाप्तीपर्यंत कोठें हि दिसून येत नाहीं. पुढें पर्वांच्या आणि अध्यायांच्या शेवटीं जेथें प्रसंग प्राप्त होतो, तेथें ‘इति श्रीभारते’ अगर ‘इति श्रीमहाभारते’ असा कांहीं तरी उल्लेख येतो. या महाभारताच्या आणि आर्याभारताच्या भांडणामध्यें कोणतीं पर्वें कोणत्या बाजूला आहेत, याबद्दलची मतसंख्या पुढील विभागावरून लक्षांत येईल:

महाभारत	आर्याभारत
१ आदि, २ सभा, ३ कर्ण; ४ गदा, वगैरे ५ स्त्री, ६ शांति, ७ अनुशासन, ८ अश्वमेध, ९ आश्रमवासिक, १० मौसल, ११ महाप्रस्थान, १२ स्वर्गारोहण.	१ वन, २ विराट, ३ उद्योग, ४ भीष्म, ५ शल्य.

या विभागांतून द्रोणपर्वाचें नांव गाळलें आहे, कारण तें पर्व दोन्ही बाजूंकडे आपलें मत देणारें आहे. त्यांत ‘महाभारत’ आणि ‘आर्याभारत’ अशीं दोन्ही हि नांवें मधून मधून आढळतात. म्हणून हें द्रोणपर्व सोडलें, तरी बाकीचीं १२ पर्वें ‘महाभारता’च्या बाजूचीं आहेत, व फक्त ५ पर्वें काय तीं ‘आर्याभारता’च्या पक्षाला आपलें पाठबळ देत आहेत. सारांश, ‘महाभारत’ या नांवाला च मताधिक्य असून त्याची च निवडणूक होणें जरूर होतें.

असें असून हि हल्लींच्या आवृत्तीमध्यें प्रस्तुतच्या ग्रंथाला 'आर्याभारत' असें च नांव देण्यांत आलें आहे. एक तर गोष्ट अशी कीं, 'महाभारत' हें सामान्य नांव आहे व 'आर्याभारत' हें विशिष्ट नांव आहे; आणि विशिष्ट नांवानें नेहमीं सामान्य नांवापेक्षां जास्त अर्थ द्योतित केला जातो. 'महाभारत' हें व्यासांच्या ग्रंथाचें नांव; पंतानीं जर त्याहून भिन्न असा नवीन ग्रंथ रचिला, तर त्याला कांहीं तरी नवीन आणि निराळें नांव असणें हें च सयुक्तिक होय. पंतानीं रामायण, भागवत इत्यादि इतर संस्कृत ग्रंथांवरून मराठीमध्यें जे ग्रंथ केले, त्याना हि त्यानीं 'रामायण,' 'भागवत,' अशीं सामान्य नांवें न देतां 'मंत्ररामायण,' 'मंत्रभागवत,' 'कृष्णविजय,' अशीं कांहीं तरी नवीन आणि निराळीं विशिष्ट नांवें च दिलेलीं आहेत. या त्यांच्या पद्धतीला अनुसरून त्यानीं च योजिलेलें **'आर्याभारत'** हें विशिष्ट नांव उपयोगांत आणणें हें च समंजसपणाचें आणि सयुक्तिकपणाचें दिसतें; आणि म्हणून या आवृत्तीकरितां **'आर्याभारत'** या विशिष्ट नांवाचा च स्वीकार करण्यांत आलेला आहे. दुसरी एक गोष्ट अशी आहे कीं, **'आर्याभारत'** असें म्हटल्याबरोबर दुसरें श्लोकभारत किंवा ओवीभारत वगैरे कांहीं भारत आहे कीं काय, अशी साहजिकपणें च एक आकांक्षा अंतःकरणामध्यें उत्पन्न होते. पंतांच्या पूर्वीं ओवीछंदामध्यें रचिलेलीं कित्येक प्राकृत भारतें अस्तित्वांत होतीं. त्यांच्याहून आपल्या भारताचें भिन्नत्व आणि आर्यावृत्ताचें विशेषत्व अभिव्यक्त करण्याकरितां हि पंतानीं आपल्या महाकाव्याला **'आर्याभारत'** असें नांव कदाचित् दिलें असेल.

हा महाग्रंथ लिहिण्याला पंतानीं केव्हां सुरुवात केली, तो केव्हां संपविला, त्याच्या रचनेला एकंदर किती काळ लागला, त्याची रचना चालली असताना मध्यंतरीं काय काय स्थित्यंतरें उद्भवलीं आणि निरसन पावलीं, इत्यादि गोष्टी जाणण्याला अलीकडच्या काळांतील चिकित्सक वाचकवर्ग अतिशय सोत्कंठ आणि समुत्सुक होऊन रहाणें हें अगदीं स्वाभाविक आहे. परंतु या बाबतींत जितकी निश्चित माहिती मिळावयला पाहिजे, तितकी आज उपलब्ध नाहीं, असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें. तरी पण, कित्येक जुन्या उल्लेखांवरून आणि नव्या अनुमानांवरून जें कांहीं निश्चित करितां येण्यासारखें आहे, तें येथें संकलित करण्याचा आपण प्रयत्न करूं.

आर्याभारताचा रचनाकाळ.

खुद्द पंतांच्या हातची लिहिलेली आर्याभारताची जी पोथी रा. पराडकर यांच्या संग्रहीं हल्लीं आहे, तिच्या प्रारंभीं किंवा शेवटीं कोठें च लेखनकालाचा उल्लेख आढळत नाहीं. परंतु जरी पंतानीं आर्याभारताच्या पोथीवर कोठें हि कांहीं मिती लिहिली नसली, तरी त्यांच्या हातचा दुसरा पुरावा अगदीं च नाहीं असें नाहीं. चातुर्मास्ये यांच्या दप्तरामध्यें पंतांच्या हातचीं कित्येक पत्रें आहेत, व त्यांतून आर्याभारताच्या रचनेसंबंधाचे उल्लेख वरचेवर आलेले आहेत. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं, त्यांतील बहुतेक पत्रांवर निर्णयोपयोगी अशी मिती मुळीं च घातलेली नाहीं. मित्यांवरून फक्त दोन तीन पत्रांचा मात्र लेखनकाळ निश्चित करितां येतो. आपलें

नवीन काव्य लिहून झालें, म्हणजे तें विठोबादादा चातुर्मास्ये यांचेकडे पंढरपूर मुक्कामीं पाठविण्याचा पंतांचा संप्रदाय होता. त्यामुळें आर्याभारताबद्दलची कांहीं माहिती या पत्रांतून मिळते. ती माहिती साधारणतः पर्वानुक्रमानें येणेंप्रमाणें आहेः—

१. **आदिपर्वः**—"श्रीकृपा संसारताप शमवील; चिंता न करावी; मीं श्रीभारत आदिपर्व यांतील अर्थलेशग्रथनव्यासंगें मनास लाविलें आहे." या पत्राला मिति नाहीं. ती असती तर आर्याभारताचा आरंभकाल निश्चित झाला असता. हें पत्र "श्रीमद्वेदशास्त्रसं० राजश्री अण्णा स्वामीचे सेवेसी" अशा रीतीनें आरंभिलेलें आहे. (पंत विठोबादादाना सर्व पत्रांतून "श्रीमद्भगवद्भक्त विठोबादादा" अशासारख्या शब्दांनीं संबोधितात).

२. **सभापर्वः**—एका पत्राच्या मागील बाजूवर (लेखक गंगाधर) पुढील दुर्बोध मजकूर आहे. "आदिपर्व अध्याय ३३ त्यातिल ३० आर्या राहिली=सभापर्व अध्या(य) १ आर्या ३७ अध्या(य) ६ आर्या ८२."

३. वनपर्व
४. विराटपर्व
५. उद्योगपर्व
} "श्रीवनपर्व समाप्तिपत्रें ४ व श्रीविराटपर्व पत्रें ३२ साद्यंत पाठविलें आहे. श्रीचरणीं निवेदून न्यून तें पूर्ण करून आरंभिलें श्रीमदुद्योगपर्व संजययानपर्यंत जालें. हें पुढें चाले असें श्रीचरणापासीं स्मरणपूर्वक प्रार्थून आशीःपत्रें सनाथ करावें हे विनंती." या पत्रावर "चैत्र वद्य षष्ठी" एवढी च काय ती मिति आहे. परंतु

१. मो. च. पृ. ९८ पहा.

शक, वार वगैरे कांहीं नसल्यामुळें कालनिर्णयाला या मितीचा कांहीं उपयोग झाला नसता; तरी पण या पत्रामध्यें एक महत्त्वाची ऐतिहासिक गोष्ट पंतानीं ग्रथित केली आहे, ती अशीः— "प्रतिनिधीचें वृत्त विदित आहे च. भगवंतराव दिवंगत जाले. पुढें कसें होतें पाहावें." भगवंतराव प्रतिनिधी हे चैत्र वद्य प्रतिपदा शके १६९८ रोजीं वारलेले आहेत. यावरून शके १६९८ च्या चैत्र महिन्याच्या पूर्वीं कित्येक दिवस पंतांच्या आर्याभारताच्या रचनेला सुरवात झालेली असून उद्योगपर्वांतर्गत संजययानपर्वापर्यंतच्या आर्या या मुदतीपर्यंत रचून झाल्या असाव्या हें निश्चित होतें. हें पत्र "श्रीमद्वेदशास्त्रसंपन्न भगवद्भक्तिसुधासागर परमसुहृद्राजमान श्रीअनंत पंडित नाना स्वामीचे सेवेसी" अशा मायन्याचें[1] आहे.

६. **भीष्मपर्वः**—या पर्वाचा मात्र कोठें हि उल्लेख नाहीं.

७. **द्रोणपर्वः**—याचा उल्लेख एकंदर सात वेळां आलेला आहे. याच्याइतका उल्लेख या पत्रांतून दुसऱ्या कोणत्या च पर्वाचा आलेला नाहीं. सदर सात उल्लेखांपैकीं पहिला उल्लेख श्रावण वद्य १० (वार किंवा शक कांहीं नाहीं) च्या पत्रांत येणेंप्रमाणें आहे. "श्रीद्रोणपर्व जयद्रथवधांत जालें. रात्रियुद्धाचा आरंभ आहे.

---

१. मोरोपंतांच्या चरित्रग्रंथांत हें एक च पत्र प्रस्तावना, पृष्ठ ३४ मध्यें 'दादामहाराजांस' पुढें च० पृ० ११६ मध्यें 'विठोबादादास' व पुन्हा तिसऱ्या खेपेला पृ०२८१ मध्यें 'पंतांचे मित्र अनंत पंडीत व बाबा पाध्ये या उभयतांस' पाठविलें होतें असें रा. पांगारकर लिहितात!

आपल्या पुण्याशीर्वादें सिद्धीस गेल्यावर आधीं आपणाकडे च पाठवीन." त्यानंतरचा दुसरा उल्लेख असा आहे कीं, "द्रोणपर्व अर्धे प्रारंभापासून श्रीमद्गुरुपुत्र श्रीसदाशिवोपाध्याय कराडीं रहातात त्यांजवळ आहे. उत्तरार्ध नवें लिहिलें तें येथें आहे. हें त्यांजकडे पाठवून पूर्वपुस्तक आणवून आपणाकडे पावतें करीन." या पत्रावर 'आषाढ वद्य ९ रविवासर' अशी मिती आहे. हा तिथीचा आणि वाराचा योग शके १७०३ सालामध्यें येतो. याशिवाय द्रोणपर्वासंबंधींचे जे अवांतर पांच उल्लेख आलेले आहेत ते फारसे महत्त्वाचे नाहींत. द्रोणपर्व कोणी नेलें आहे, आलें म्हणजे पाठवीन, असल्या च मजकुराचे ते उल्लेख आहेत, व शिवाय ज्या पत्रांतून हे उल्लेख आहेत, त्यांवर मित्या हि नाहींत.

८. **कर्णपर्वः**—या पर्वाचा उल्लेख फक्त एकदा च आलेला असून तो 'शके १७०३ आषाढ व. ९ रविवासर' या मितीच्या वर दिलेल्या पत्रामध्यें च द्रोणपर्वाच्या उल्लेखाच्या पुढें येणेंप्रमाणें आहेः—"कर्णपर्व आपणाजवळ अर्धे आहे असें लिहिलें. पुढील, देव दया करील, सांपडेल, असें अभय दिलें, त्यावरून निश्चिंत जालों." (चातुर्मास्यांच्या दप्तरांतील—कर्णपर्वापैकीं अध्याय ३९।५८ येथपासून पर्वअखेरपर्यंतचीं पत्रें (८४ ते १२७) निराळ्या लेखकानें निराळ्या आकाराच्या पत्रांत लिहिलेलीं आहेत. वरील पत्रांत अर्धे कर्णपर्व हरवल्याचा जो उल्लेख आहे तो ह्या प्रतीसंबंधींचा असावा काय? कारण ह्या चातुर्मास्यांच्या कर्णपर्वाला च जोड दिलेली आहे).

९. **शल्यपर्व** १०. **गदापर्व** **सौप्तिकपर्व** **ऐषीकपर्व** ११. **स्त्रीपर्व**	या पर्वांचा उल्लेख दोन पत्रांतून आहे. पहिला उल्लेख वरील आषाढ वद्य ९ च्या पत्रांत पुढीलप्रमाणें आहेः—शल्यपर्व पत्रें १८, गदापर्व २२, सौप्तिक ऐषीक पर्वें २ मिळून पत्रें १२, स्त्रीपर्व पत्रें १५, एवंच

पर्वें पांच पाठविलीं आहेत." दुसऱ्या पत्रामध्यें लिहिलें आहे कीं, 'संबद्धपर्वें शल्य गदा सौप्तिक ऐषीक, म्हणून वर्ण दोचा एक असें आहे. पहावें.' परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं, शल्यपर्वाच्या प्रारंभीं 'ग' हें अक्षर आहे, आणि 'वा' हा वर्ण दोन पर्वांच्या प्रारंभीं नसून गदा, सौप्तिक व ऐषीक या तीन पर्वांच्या प्रारंभीं आहे. या पर्वांच्या चातुर्मास्यांच्या लेखनमित्या शल्य श्रा० शु० १४, गदा भा० शु० १, सौप्तिकैषीक भा० शु० १५, स्त्री भा० व० ७, अशा आहेत. सर्वांचा लेखनशक १७०३ आहे. लेखक नारायण हरी (?) आहे.

१२. **शांतिपर्वः**—याच्या उल्लेखाचीं दोन पत्रें आहेत. त्यांपैकीं पहिलें पत्र आतांपर्यंत पुष्कळ वेळां आलेलें शके १७०३ आषाढ वद्य ९ रविवासरचें च होय. या पत्राच्या मागील बाजूवर आडव्या ओळींत पुढील वाक्य आहेः—"शांतिपर्व, राजधर्म, श्रीभीष्माकडे धर्म, श्रीकृष्ण गेले आहेत. समाप्त पर्व जाल्यावर पाठवीन." दुसऱ्या एका पत्रांत उल्लेख आहे तो असाः— "शांतिपर्व, राजधर्म प्रारंभ झाला आहे. सांप्रत वर्षाकाळीं बुद्धीस आळस आला, राहिलें."

१३. **अनुशासनपर्व**	}	या तीन पर्वांपैकीं १३ आणि १५ या
१४. **अश्वमेधपर्व**		पर्वांचा उल्लेख एका बिनमितीच्या
१५. **आश्रमवासिकपर्व**		पत्रामध्यें येणेंप्रमाणें आहे:–

"आश्रमवासपर्वार्थ लिहित असतों. आनुशासनिक कांहीं लिहोन संपविलें. पुढें चालोन सिद्धीस ग्रंथ पावे, असें श्रीप्रभूच्या चरण-पद्मातें प्रार्थावें." या पत्रांतील मजकुरावरून एक शंका उत्पन्न होते, ती अशी:–१३ वें अनुशासन पर्व लिहून झाल्यावर १४ वें जें अश्वमेधपर्व तें लिहावयाला घेतलें जावें. परंतु त्याचा कांहीं च उल्लेख वरील पत्रांत आला नसून १३ वें पर्व संपल्याचें व १५ वें पर्व लिहित असल्याचें च सांगितलें आहे. तेव्हां त्या वेळीं क्रम-प्राप्त असें जें १४ वें अश्वमेधपर्व तें लिहावयाचें वगळलेलें असावें असें दिसतें; व ही जी या पत्रावरून शंका येते, तिचें दृढीकरण दुसऱ्या एका पत्रांतील मजकुरावरून होतें. त्या पत्रांत असें लिहिलें आहे कीं, "अलीकडे अश्वमेध, महाप्रस्थान दोन पर्वें लिहिलीं. पुढें स्वर्गारोहण लिहितों. हें सिद्धीस पाववितां आपला प्रसाद समर्थ आहे." यावरून हें स्पष्ट होत आहे कीं, अनुशा-सनपर्वाच्या नंतर अश्वमेधपर्व न लिहितां आश्रमवासिकपर्व च लिहिलें असलें पाहिजे. परंतु या अनुमानाला पंतांच्या हातचें च एक प्रत्यक्षप्रमाण हि आहे. 'श्रावण शुद्ध ११' एवढ्या च मिती-च्या एका पत्रामध्यें पंत विठोबादादा याना स्पष्ट असें लिहि-तात कीं, "अश्वमेधपर्व मागून आरंभिलें, तें लिहीत आहों." यावरून तें मागाहून लिहिलें असल्याबद्दल आतां शंका उरण्याचें

कारण च नाहीं. अश्वमेधपर्वाचा पांडवांच्या मुख्य गोष्टीशीं फारसा संबंध येत नसल्यानें तें पंतानीं मागाहून लिहिण्याकरितां ठेविलें असावें. तरी पण, हे वरील पत्रांतील उल्लेख आज आपल्यापुढें नसते, तर हें पर्व मागाहून लिहिलेलें आहे, असें मानण्याला खुद्द त्या पर्वामध्यें कांहीं आधार मिळताना.

१६. **मौसलपर्व** १७. **महाप्रस्थानपर्व** १८. **स्वर्गारोहणपर्व**	यांपैकीं महाप्रस्थान व स्वर्गारोहण या पर्वांचा उल्लेख आलेला वर दिला च आहे. याशिवाय मौसलपर्व

पत्रें ८, महाप्रस्थान पत्रें ४, स्वर्गारोहण पत्रें ६, पाठविलीं असल्याचा उल्लेख दुसऱ्या एका पत्रांत आहे.

येथपर्यंत पर्वानुक्रमानें प्रत्येक पर्वासंबंधानें या पत्रांतून जी माहिती मिळाली, ती वर दाखल केली आहे. परंतु याच्याशिवाय एका पत्रामध्यें आर्याभारताच्या समाप्तीचा हि उल्लेख आहे, तो असा:—"श्रीभारत आपल्या कृपेंकरून सिद्धीस गेलें. आपणाकडील माणूस आल्यास द्रोणपर्व आदिकरून पाठवीन." परंतु येथें हि दुर्दैवाची गोष्ट ही च आहे कीं, या पत्राला हि मिती नाहीं. येणेंप्रमाणें आर्याभारतासंबंधींच्या या पत्रांतील माहितीचा गोषवारा आहे. या माहितीवरून निश्चितपणें एवढें निष्पन्न होतें कीं, शके १६९८ च्या प्रारंभापर्यंत आदि, सभा, वन, विराट इतकीं पर्वें संपून उद्योगपर्व चालू होतें, आणि शके १७०२ च्या आषाढ वद्य ९ पर्यंत आर्याभारताच्या रचनेची मजल शांतिपर्वाच्या अखेरीपर्यंत आलेली होती. याच्याशिवाय जास्त निश्चयात्मक अशी माहिती देण्याला अद्यापि कांहीं आधार मिळत नाहीं.

तरी पण, एकंदर आर्याभारताच्या रचनेला किती वर्षे लागलीं असतील, यासंबंधानें कित्येकानीं कांहीं अनुमानें केलीं आहेत. त्यांपैकीं काव्यसंग्रहाच्या संपादकानीं आर्याभारताच्या रचनेला इ. स. १७६४ (शके १६८६) पासून इ. स. १७८४ (शके १७०६) पर्यंत एकंदर वीस वर्षे लागलीं असावीं, असें अनुमान बांधलें आहे; आणि शके १६९३ पासून शके १७०३ पर्यंतच्या दहा वर्षांमध्यें (मो. च. प्रस्ता. पृ. ३४ पहा) आर्याभारत रचून झालें असावें, असें रा. पांगारकर यानीं (कशावरून ?) ठरविलें आहे. पैकीं हें दुसरें मत च सत्याच्या पुष्कळ जवळ असावें, असें मानण्याला कारणें आहेत. या बाबतींत काव्यसंग्रहाच्या संपादकानीं मौसल वगैरे पर्वांच्या शेवटच्या पुस्तकाच्या प्रारंभीं लिहिलेल्या प्रस्तावनेमध्यें भारतरचनेला लागलेला काळ वीस वर्षांचा असावा, या कल्पनेच्या समर्थनासाठीं जीं कारणें दिलीं आहेत, तीं फारशीं सयुक्तिक दिसत नाहींत. शके १७०५।०६ च्या सुमारास आर्याभारत संपलें असावें, हा जो त्यानीं तर्क केला आहे, तो फार तर एखादद्दुसऱ्या वर्षानें पुढें गेलेला असेल. समाप्तीचे काल हे थोड्याबहुत फरकानें सगळ्यांचे च जवळ जवळ जमत आहेत. परंतु मुख्य प्रश्न काय तो प्रारंभाच्या संबंधानें च उपस्थित होतो.

---

१. परंतु मो. च. पृ. १३५ मध्यें "इ. १७७०–१७८० (शके १६९२–१७०२) पर्यंत भारत झालें असावें असें मीं अन्य प्रसंगीं दाखविलें च आहे," असें रा. पांगारकर च लिहितात व फिरून ते च पृष्ठ १८९ मध्यें "पंतानीं आपल्या कीर्तिमंदिराचा मुख्य स्तंभ जा महाभारत-ग्रंथ तो ७।८ वर्षांत रचला" असें हि सांगतात !

श्रीगीतेचा एकादश संख्याचा जसा उपाध्याय
केवळ भक्तिरसमय श्रीमदनंताख्य जो उपाध्याय,
तो होय शोभवुनि या कवनातें साधु विप्र भासविता;
निजतेजें श्री देवुनि पंकरुहा जेंवि विप्रभा सविता.

ह्या आर्या स्वर्गारोहणपर्वाच्या शेवटीं आल्या आहेत, त्यांवरून आर्याभारताचीं कांहीं तरी पर्वें अनंत पाध्ये यांच्या नजरेखालून गेलीं असावींत, असें काव्यसंग्रहाच्या संपादकांचें मत आहे. अनंत पाध्ये हे शके १६९६ मध्यें वारलेले आहेत; तेव्हां शके १६९६ च्या पूर्वीं केव्हां तरी आर्याभारताला पंतानीं आरंभ केला असला पाहिजे, येथपर्यंत सदर संपादकानीं जें अनुमान काढलें आहे, तें बरोबर आहे. परंतु शके १६९६ च्या मागें जातां जातां शके १६८६ पर्यंत जे ते गेलेले आहेत, त्याला मात्र कांहीं आधार दिसत नाहीं. 'नामरसायन' या काव्याचा शक १६८५ ठरवून त्यांत आर्याभारताचा उल्लेख नाहीं, म्हणून शके १६८५ नंतर भारताला सुरवात झाली असावी, अशी त्यानीं कल्पना केली आहे, ती हि बरोबर आहे; पण याच्यापुढें ते आणखी अशी हि कल्पना करतात कीं, प्रह्लादविजय व कृष्णविजय या दोन विजयांवरून सुचलेला तिसरा नरनारायणविजय—म्हणजे कर्णपर्व—पंतानीं प्रथमतः शके १६८६ चे सुमारास लिहिलें, व तें पर्व लोकाना आवडलें, तेव्हा पंतानीं त्या वेळेपासून आर्याभारताचीं इतर पर्वें लिहिण्याला सुरवात केली. परंतु प्रह्लादविजय आणि कृष्णविजय ह्यांच्या रचनाकाळाला लागून च पंतानीं तिसरा नरनारायणविजय—म्हणजे कर्णपर्व लिहिलें, ही सगळी

कल्पना अगदीं निराधार आणि चुकीची आहे, असें आम्ही पुढें कर्णपर्वासंबंधानें स्वतंत्र विवेचन करणार आहों, त्यामध्यें स्पष्टपणें दाखविण्यांत येईल. सबब त्या चुकीच्या कल्पनेवर आर्याभारताच्या सुरवातीचें म्हणून ठरविलेलें शके १६८६ हें साल हि चुकीचें च असलें पाहिजे, हें उघड आहे. आर्याभारताची सुरवात शके १६८६ या सालाइतकी मागें जाईल, हें संभवनीय दिसत नाहीं; तर रा. पांगारकर यानीं शके १६९३ हा जो सुरवातीचा काल दिलेला आहे, त्याच्या च आजूबाजूला कोठें तरी आर्याभारताला सुरवात झालेली असावी, व संपूर्ण आर्याभारत वीस वर्षांत नव्हे, तर दहा वर्षांत च संपलें असावें, ही च कल्पना जास्त संभाव्य दिसते.

पंतानीं 'श्रीमद्वेदशास्त्रसं० राजश्री अण्णा' याना पाठविलेल्या एका पत्रांतील 'मीं श्रीभारत आदिपर्व यांतील अर्थलेशग्रथनव्यासंगें मनास लाविलें आहे,' या वाक्यांत आर्याभारत सुरू केल्याचें लिहिलें आहे, व 'श्रीमद्भगवद्भक्तोत्तम राजमान्य राजश्री विठोबादादा तथा बाळकृष्णबावा'[1] यांस लिहिलेल्या एका पत्रांतलि 'श्रीभारत आपल्या कृपेंकरून सिद्धीस गेलें,' या वाक्यांत तें समाप्त झाल्याचें हि लिहिलें आहे. ह्या पत्रांवर मित्या असत्या, किंवा त्या अजून हि कांहीं साधनानें ठरवितां आल्या असत्या, तर फार उत्तम झालें असतें, व मग हा सर्व च वाद संपला असता. परंतु तो मार्ग बंद झाल्यामुळें प्रत्यक्ष प्रमाणाच्या अभावीं अनुमानावर च आलें

१. यांचेविषयीं मो. च. पृ. १२९ पहा.

पाहिजे. त्या अनुमानाचा एका निराळ्या रीतीनें उपयोग करून पहातां हि ही दहा वर्षांची च मुदत जास्त सयुक्तिक दिसते. केव्हां हि झालें तरी निश्चितावरून च अनिश्चिताबद्दलचें अनुमान करावयाचें असतें. त्याप्रमाणें पहातां, पंतांच्या भारतचरनेसंबंधीं वर जी माहिती दिली आहे, त्यांत त्यांच्या हातच्या पत्रांवरून एवढें निश्चित होत आहे कीं, चैत्र वद्य ६ शके १६९८ पर्यंत आर्याभारताच्या उद्योगपर्वांतील संजययानपर्वापर्यंतच्या आर्या लिहून झालेल्या होत्या, व आषाढ वद्य ९ शके १७०३ पर्यंत शांतिपर्वाच्या अखेरपर्यंतच्या आर्या लिहून झाल्या होत्या. म्हणजे चैत्र वद्य ६ शके १६९८ पासून आषाढ वद्य ९ शके १७०३ पर्यंतच्या मुदतींत, (म्ह० सुमारें ६३ महिन्यांच्या अवधीमध्यें) उद्योगपर्वांतर्गत संजययानपर्वाच्या अखेरपासून तों शांतिपर्वाच्या अखेरपर्यंतच्या म्हणजे सुमारें ८८००, आर्या पंतानीं लिहिल्या असल्या पाहिजेत, हें निश्चित आहे. ६३ महिन्यांत सुमारें ८८०० आर्या म्हणजे स्थूलमानानें एक महिन्याला १४० आर्या आणि एक १ दिवसाला सुमारें ४।५ आर्या पडतात. सरसकट गुडघाभर पाणी, अशासारखा च कांहींसा हा प्रकार जरी सकृद्दर्शनीं दिसला तरी येथें वाचकाना बुडण्याची मात्र भीति नको! असलें अंकगणिती प्रमाण स्वैर रीतीनें प्रकट होणाऱ्या प्रतिभागुणाच्या मोजदादीला बरोबरपणें लागू पडणार नाहीं, हें एकाद्या आक्षेपकानें सांगण्याच्यापूर्वीं कोणाला हि समजण्यासारखें आहे. कवीच्या लहरीचा कांहीं नेम नसतो. त्याची लहर लागली, तर तो एखादे दिवशीं शेंकडों कविता

करील; आणि ज्या दिवशीं त्याची तार लागणार नाहीं, त्या दिवशीं त्याच्या हातून कदाचित् एक हि कविता होणार नाहीं. हा प्रतिभादेवीचा तऱ्हेवाईकपणा आणि छांदिष्टपणा महशूर आहे, व तो आम्हांला कबूल हि आहे. तसें च, दुसऱ्या हि कित्येक कारणानीं काव्यरचना नियमित चालत नाहीं. खुद्द पंतानीं च एका पत्रामध्यें असें लिहिलें आहे कीं, 'सांप्रत वर्षाकाळीं बुद्धीस आळस आला. खोकला जाला आहे.........वर्षाकाळीं असें बुद्धिमांद्य किंचित् होतें. वृद्धपणीं शक्त्युत्साह उणा पडतो." शिवाय आर्याभारताखेरीज त्याच्या रचनेबरोबर च पंत दुसरीं हि कांहीं प्रकरणें रचित होते, हें हि त्यांच्या पत्रांवरून स्पष्ट होत आहे. तेव्हां या सर्व गोष्टी लक्षांत घेणें अत्यंत अवश्यक आहे. तरी पण, त्या सगळ्या गोष्टी लक्षांत घेऊन सुद्धां वरील ठोकळ प्रमाणाकडे पाहिलें असतां तें सरासरीचें प्रमाण बहुतेक अंशीं ग्राह्य मानण्याला कांहीं प्रत्यवाय आहे, असें दिसत नाहीं. वरील प्रमाणांत रोजच्या सरासरी ४ किंवा ५ आर्या पडतात; म्हणजे पंत कांहीं ४।५ आर्या करून च स्वस्थ बसत असतील, असें नाहीं; कधीं ते याच्यापेक्षां पुष्कळ जास्त हि करीत असतील, आणि कधीं कदाचित् मुळीं च करीत नसतील. तथापि पांच वर्षांतील स्फूर्तीचे आणि सुस्तीचे दिवस यांची सरासरी काढून ठोकळ प्रमाण बसविलें, तर तें वरच्याप्रमाणें बसतें, हें निर्विवाद आहे.

हें च कविता करण्याच्या गतीचें प्रमाण आणखी कांहीं बाबतींत असें च आढळून आलें, तर मग याच्यावर विश्वास ठेवण्याला

कांहीं हरकत नाहीं. म्हणून हें दुसरीकडे कोठें आणि कितपत जमतें, याचा थोडा तपास करूं. हरिवंश हें काव्य रचण्याला पंताना सुमारें ४ वर्षें लागलेलीं आहेत. शके १७०४ च्या म्हणजे भारताच्या समाप्तीच्या सुमारापासून स्थूलमानानें हरिवंशाची सुरवात धरण्याला हरकत नाहीं, आणि चातुर्मास्ये यांच्या मठांत त्यानीं लिहून घेतलेली जी हरिवंशाची पोथी आहे, ती त्यानीं शके १७०९ मध्यें लिहून घेतल्याचा त्या पोथीवर उल्लेख आहे. तेव्हां बहुतकरून शके १७०९ च्या आधींच्या सालांत अगर फार तर शके १७०९ च्या आरंभाला पंतांचा हरिवंश तयार झालेला असला पाहिजे. (यावरून चरित्रग्रंथांत शके १७०७ ते शके १७१० ही जी हरिवंशरचनेची कालावधि दिली आहे, ती शुद्ध दिसत नाहीं.) सारांश, शके १७०४ व शके १७०९ या दोन सालांच्या दरम्यानच्या सुमारें पुऱ्या चार वर्षांच्या अवधीमध्यें हरिवंश रचिला गेला असावा, असें दिसतें. या हरिवंशाच्या एकंदर आर्या ५४४४ आहेत. इतक्या आर्या चार वर्षांत लिहिल्या गेल्या आहेत; म्हणजे एक महिन्याला ११३, आणि एक दिवसाला ४ आर्या सरासरीच्या मानानें पडतात.

हीं व्यक्तिशः निरनिराळ्या एकदोन काव्यांतील प्रमाणें झालीं. परंतु हें प्रमाण पंतांच्या एकंदर सगळ्या काव्यरचनेच्या वेगाशीं कितपत जमतें, हें आतां पाहूं. बहुतेक प्रसिद्ध, कांहीं अप्रसिद्ध, आणि कांहीं अनुपलब्ध मिळून पंतांची एकंदर कविता अदमासें ६०।६१ हजार भरेल. पंत पन्हाळगडावरून आपला गुरुगृहींचा

विद्याभ्यास संपवून बारामतीला शके१६७४ मध्यें आले, आणि ते शके १७१६ चैत्र शुद्ध पौर्णिमा रोजीं परलोकवासी झाले. या दरम्यानच्या मुदतीचा सुमारें ४० वर्षांचा काळ हा पंतांच्या एकंदर काव्यरचनेचा सामान्यतः काळ होय. म्हणजे पंतानीं ४० वर्षांमध्यें सुमारें ६०।६१ हजार कविता केल्या, असें ठरतें. याचा हि गुणाकार भागाकार केला असतां स्थूलमानानें वरीलप्रमाणें च काव्यरचनेचें प्रमाण पडतें. यावरून पंत रोज दीडदीडशें आर्या रचित असत, अशाप्रकारचे जे उल्लेख कांहीं ठिकाणीं आढळून येतात ते कितपत विश्वासपात्र आहेत याची हि कल्पना करितां येण्यासारखी आहे.

असो; एक दिवसाला ४।५ आर्या किंवा एक महिन्याला १४० आर्या हें प्रमाण जें वर अशा रीतीनें निश्चित झालेलें आहे, त्याचा आतां दुसऱ्या अनिश्चित प्रमेयांसंबंधानें उपयोग करून त्यापासून आपल्याला काय निश्चित करतां येतें, हें आपण पाहूं. या कोष्टकावरून आपल्याला आर्याभारताच्या सुरवातीचा आणि समाप्तीचा काळ ठोकळ मानानें ठरवितां येईल. आदिपर्वाच्या प्रारंभापासून संजययानापर्यंतच्या आर्या स्थूलदृष्ट्या ६००० आहेत. तेव्हां वरील कोष्टकाप्रमाणें त्या रचण्याला अदमासें ४२ महिन्यांची अवधि लागली पाहिजे. म्हणजे शके १६९८ चैत्र वद्य ६ च्या पूर्वी ३ वर्षें ६ महिने, म्हणजे १६९४ च्या चतुर्मासांत आर्याभारताच्या रचनेला सुरवात झाली असावी असें स्थूलमानानें दिसतें. आतां

१. मो. च. पृ. ६० पद्य.

आपण त्याच्या समाप्तीकडे वळूं. शांतिपर्वापासून स्वर्गारोहणाच्या अखेरपर्यंतच्या आर्या अंदाजानें २२०० आहेत. इतक्या आर्या करण्याला वरील गतीच्या वेगानें १ वर्ष ३ महिने लागले असावेत. हे शांतिपर्वाची मिति जी आषाढ वद्य ९ शके १७०३, तिच्यांत मिळविले असतां, शके १७०४ च्या चतुर्मासांत आर्याभारताची समाप्ति झाली असावी, असें प्राप्त होतें. हा एक तर्क आहे. तो खरा ठरला तर ठीक च आहे. खरा न ठरला, तर तो बोलूनचालून तर्क च होय! हें कांहीं अगदीं निश्चित च नसेल; परंतु निश्चिताच्या अभावीं निश्चयाचें हें एक साधन आहे, यांत शंका नाहीं.

याच्या उलट, पंताना आर्याभारत रचण्याला वीस वर्षे लागलीं, ही जी कल्पना आहे ती मात्र अगदीं च विसंगतपणाची दिसते. कारण, आर्याभारताच्या एकंदर आर्या १७१३३ आहेत. इतक्या आर्या करण्याला पंताना वीस वर्षे लागलीं असें मानिलें तर एक वर्षाला ८५६, एक महिन्याला ७१, आणि एक दिवसाला २।३ आर्या सरासरीनें पडतात. परंतु हें प्रमाण प्रमाणसिद्ध होत नाहीं. म्हणून या हि कारणाकरितां वरील च कल्पना जास्त सयुक्तिक आहे, हें उघड होतें.

ही जी १० वर्षांच्या अवधीची कल्पना वर प्रदर्शित करण्यांत आली आहे, तिच्याशीं दुसऱ्या कोणत्या हि सिद्ध गोष्टींचा विरोध येत नाहीं, हें हि लक्षांत ठेवण्यासारखें आहे. अनंत पाध्ये

शके १६९६ मध्यें आणि बाबूजी नाईक शके १७०२ मध्यें वारले, या गोष्टी निश्चित आहेत. तेव्हां शके १६९६ मध्यें मरण पावणाऱ्या अनंत पाध्यांच्या नजरेखालून पंतांचीं कांहीं तरी पर्वे गेलेलीं असलीं पाहिजेत, असें पूर्वीं दिलेल्या आर्यांवरून ज्याना मानावयाचें असेल, त्यांच्या मताला शके १६९४ मध्यें आर्याभारताला प्रारंभ झाल्यानें कांहीं अडचण येत नाहीं. कारण, शके १६९४ मध्यें सुरू झालेल्या ग्रंथाचा कांहीं भाग शके १६९६ मध्यें मरण पावणाऱ्या मनुष्याच्या नजरेखालून जाणें अगदीं शक्य आहे. आतां आपण बाबूजी नाईक यांच्या मरणाच्या मितीकडे वळूं.

जो धीरवीरहीर श्रीसिद्धेश्वरमहादयापात्र
श्रीमान् बाबूराय प्रभु, ज्याचें शोभलें यशें गात्र.
भीष्मद्रोणसम गुणें, शांडिल्यसुगोत्रपद्मरवि दे हा
आश्रय, शंकर जैसा उपमन्युमना, मयूरकविदेहा.
शीलजितामरचंदन तन्नंदन पांडुरंगराय हि तें
यश मिरवितो, प्रजांचीं करि दशरथसा न राम काय हितें?

या आर्या स्वर्गारोहणपर्वाच्या शेवटीं आहेत. यांतील 'शोभलें' हें भूतकालवाचक क्रियापद आणि 'प्रजांचीं करि दशरथसा न राम काय हितें' ही दशरथाच्या मागाहून प्रजेचें चांगलें रक्षण करणाऱ्या रामाची पांडुरंगराव नाईक यांजला दिलेली उपमा, या दोन गोष्टींवरून आर्याभारताच्या समाप्तीच्या वेळीं बाबूजी नाईक हे स्वर्गस्थ झालेले असून पांडुरंगराव नाईक यांची कारकीर्द चालू असली पाहिजे, असें स्पष्ट होतें. आणि बाबूजी नाईक तर शके

१७०२ मध्यें वारले आहेत, हें वर सांगितलें च आहे. तेव्हां त्यानंतर केव्हां तरी भारताच्या परिसमाप्तीचा काल आला पाहिजे, आणि त्याप्रमाणें तो आमच्या वरील कल्पनेनें हि येत आहे.

विठोबादादा हे अनव्याहून चतुर्मासासाठीं पंढरीस येऊन राहिले म्हणजे पंत त्याना पत्रें पाठवित असावे असें सर्व उपलब्ध पत्रांतील मजकुरावरून व कांहीं पत्रावर असलेल्या महिन्यांवरून दिसून येतें. ह्या दृष्टीनें पहातां आर्याभारताची समाप्ति झाल्याचें पत्र हि चतुर्मासांतील च असावें. अर्थात् कोणत्या तरी सालच्या चतुर्मासांत आर्याभारत समाप्त झालें असलें पाहिजे, असें यावरून निष्पन्न होतें.

परंतु इतकें च नव्हे, तर शके १७०४ च्या चतुर्मासामध्यें च आर्याभारताची समाप्ति झाली असावी, याबद्दल एक आनुमानिक प्रत्यक्ष प्रमाण पंतांच्या च कांहीं पत्रांमधून आढळून येतें. तें येणें-प्रमाणें:—आषाढ वद्य ९ रविवासर शके १७०३ च्या (१) पत्रामध्यें 'शांतिपर्व, श्रीभीष्माकडे धर्म, श्रीकृष्ण गेले आहेत,' हा मजकूर आहे. त्याच्यापुढील (२) पत्रामध्यें 'शांतिपर्व, राज-धर्म प्रारंभ झाला आहे,' असा मजकूर आहे. या दुसऱ्या पत्राला

---

१. मो. च. प्रस्ता. पृष्ठ ३५ मध्यें बाबूजी नाईक शके १७०२ मध्यें वारले, असें रा० पांगारकर लिहितात, व प्र. पृ. ३४ मध्यें शके १७०३ हा आर्याभारताच्या समाप्तीचा काल देतात; परंतु च. पृ. ६९ मध्यें ते असें लिहितात कीं, " पंतांचा महाभारतग्रंथ संपला तेव्हां बा रामतकरांच्या जहागिरीची सर्व व्यवस्था पांडुरंगराय च पहात होते व बाबूजी नाईक फार वृद्ध झाले होते."

जरी मिति नाहीं तरी हें पत्र पहिल्या पत्राच्या पाठीमागून एक-दोन महिन्यांत च लिहिलेलें असलें पाहिजे. कारण, या दुसऱ्या पत्रांत हि शांतिपर्वाची रचना फारशी पुढें गेलेली नाहीं, व त्याचें कारण हि या पत्रांत दिलेलें आहे. तें असें कीं, 'सांप्रत वर्षाकाळीं बुद्धीस आळस आला, राहिलें. खोकला जाला आहे. आपण हि चार दिवस धीर धरावा.' परंतु या च (२) पत्रामध्यें पंतानीं पंढरपुरास यावें अशाबद्दलचा पुढील मजकुर आढळतो:—'विजयादशमी जाहल्यावरी येणें म्हणून आज्ञा. ती मस्तकीं धरून यावयाच्या उद्योगातें करितों.' म्हणजे शके १७०३ च्या विजयादशमीच्या सुमाराचें हें २ रें पत्र असलें पाहिजे हें उघड होतें. यानंतरचें एक तिसरें पत्र आहे. त्याची मिति आश्विन वद्य दशमी इतकी च आहे. वरील २ ऱ्या पत्रांत पंढरपुरास विजयादशमीनंतर जाण्याचा जो हेतु दर्शविला आहे त्याचा च उल्लेख पुढें या ३ ऱ्या पत्रांत येणेंप्रमाणें आहे:—'तुमच्या आज्ञेवरून दर्शनानंदपात्र व्हावयासी कार्तिकीमहोत्सवावसरीं यावें असा निश्चय आहे. सिद्धीस नेणार आपला आशीर्वाद समर्थ आहे. श्रीनारायण भट्टजी यासमागमें च येत होतों. परंतु पायास कांहीं उपद्रव जाला, म्हणोन राहणें जालें.' यावरून या तिसऱ्या पत्राची मिति जी आश्विन वद्य दशमी, ती शके १७०३ मधील च असली पाहिजे, हें उघड होतें. यानंतर पुढें एक ४ थें पत्र असें आढळतें कीं, त्यांत, 'अश्वमेधपर्व मागून आरंभिलें तें लिहित आहों,' असा मजकुर आहे. या पत्रावर श्रावण शुद्ध ११ अशी मिति आहे.

हा श्रावण म्हणजे अर्थात् च वरील हकीकतीवरून शके १७०३ चा असणें अशक्य असल्याकारणानें तो शके १७०४ चा च असला पाहिजे; व यानंतरच्या दुसऱ्या एका म्हणजे ५ व्या पत्रामध्यें पूर्वींच्या अश्वमेधपर्वाचा उल्लेख करून असें लिहिलें आहे कीं, 'आलीकडे अश्वमेध महाप्रस्थान दोन पर्वें लिहिलीं. पुढें स्वर्गारोहण लिहितों.' महाप्रस्थान व स्वर्गारोहण हीं दोन्हीं पर्वें अगदीं लहान आहेत. तेव्हां शके १७०४ च्या श्रावण शुद्ध ११ रोजीं लिहिल्या जात असलेल्या अश्वमेधपर्वानंतर अश्वमेधाचा उरलेला भाग व महाप्रस्थान आणि स्वर्गारोहण हीं पर्वें लिहिण्याला फार तर एकदोन महिने लागले असतील; यापेक्षां जास्त लागणें शक्य नाहीं. म्हणजे स्वर्गारोहणपर्वाच्या समाप्तीची वेळ भाद्रपद किंवा फार तर आश्विनमहिन्याची येते. या ५ व्या पत्रावर सप्तमी एवढी च मिति आहे. तेव्हां ही सप्तमी शके १७०४ च्या भाद्रपदांतील किंवा आश्विनांतील शुद्ध अगर कृष्ण पक्षाची असेल, व त्यानंतर लवकर च स्वर्गारोहणपर्व आणि त्याबरोबर च आर्याभारत हि समाप्त झालें असलें पाहिजे. म्हणजे आम्हीं वर अनुमान केल्याप्रमाणें आर्याभारताच्या समाप्तीची वेळ या आनुमानिक प्रत्यक्षप्रमाणावरून हि शके १७०४ च्या चतुर्मासामध्यें च येते.

पंतानीं आर्याभारत हा आपला ग्रंथ कसकसा आणि किती काळामध्यें लिहिला याच्याबद्दलची माहिती जी त्यांच्या पत्रांवरून

कर्णपर्व.

आणि इतर साधनांवरून मिळण्यासारखी होती, ती माहिती वर दिली च आहे. त्यामध्यें कर्णपर्व हें एका पाठीमागून एक पर्वें लिहिताना क्रमानें द्रोणपर्वाच्या

नंतर आणि शल्यपर्वाच्या आधीं लिहिलें गेलें असावें, असें च दिसतें. याच्याशिवाय दुसरें तिसरें कांहीं अनुमान करण्याला पंताच्या स्वहस्तलिखित पत्रांत अगर अन्यत्र कोठें कांहीं आधार मिळत नाहीं. असें जरी आहे, तरी कर्णपर्व हें सगळ्या आर्याभारताच्या आधीं पंतानीं लिहिलें, असा एक समज—अथवा गैरसमज—पुष्कळ लोकांमध्यें प्रचलित आहे. या मताचा उल्लेख रा. हंस यानीं आपल्या मोरोपंतावरील निबंधामध्यें केलेला असून त्या मताला विशेष पुष्टि आणि बळकटी काव्यसंग्रहाच्या संपादकानीं दिली आहे. त्याबद्दलची त्यांची उपपत्ति येणेंप्रमाणें आहे:—

(१) पंतानीं विष्णुपुराणावरून प्रह्लादविजय हें एक काव्य आर्याभारतरचनेच्या पूर्वीं बरे च दिवस म्हणजे शके १६८० या वर्षीं रचिलें असल्याचें खुद्द मोरोपंताच्या च हस्तलेखावरून सिद्ध होत आहे. तेव्हां ही गोष्ट निर्विवाद आणि उभयसंमत अशी आहे. त्यानंतर पंतानीं श्रीमद्भागवतांतील दशमस्कंधाच्या आधारानें कृष्णविजय या नांवाचें एक काव्य लिहिलें. या दोन नांवांतील 'विजय' या समान शब्दाच्या साम्यावरून 'विजय' हा च शब्द ज्या नांवाच्या शेवटीं आहे अशा नांवाचें एखादें कांहीं तरी तिसरें काव्य आपण करावें, अशी पंताना इच्छा झाली. तेव्हां त्यानीं महाभारतांतील कर्णपर्वाच्या आधारानें कांहीं आर्या केल्या, आणि त्याना 'नरनारायणविजयग्रंथ' असें नांव दिलें. अशा रीतीनें पंतांचे हे तीन विजयग्रंथ पाठोपाठच्या भावंडांप्रमाणें निर्माण झाले. मग कर्णपर्वावर रचलेला हा 'नरनारायणविजय'

फार लोकप्रिय झालेला पाहून पंतानीं बाकीचें महाभारत रचण्याला मागाहून सुरवात केली.

(२) या नरनारायणविजयाच्या शेवटीं बानूजी नाईकाच्या संबंधानें तीन आर्या आलेल्या आहेत. जर भारतास आदिपर्वापासून आरंभ झाला असता, तर पंतानीं पहिल्या पर्वांत अगर शेवटच्या पर्वांत आपल्या यजमानाचा उल्लेख केला असता; तो मधल्या च एखाद्या पर्वांत केला नसता.

(३) पंतानीं या ग्रंथाला 'नरनारायणविजयग्रंथ' असें नांव दिलें आहे. यावरून हें पर्व प्रथम स्वतंत्र ग्रंथ म्हणून केलेलें दिसतें.

(४) या पर्वाला 'कर्णपर्व' असें पंतानीं कोठें च म्हटलें नाहीं. इतर पर्वांच्या अंतीं अमुक पर्व समाप्त झालें म्हणून लिहिलेलें असतें, तसा प्रकार या कर्णपर्वांत नाहीं.

(५) 'नरनारायणविजय' हा स्वतंत्र ग्रंथ असून हि याच्या पूर्वीं जरी मंगलाचरण नाहीं, तरी तें क्षम्य आहे. कारण, विनायकमाहात्म्य, भक्तभूषण, भृगुचरित्र, इत्यादि पंतांच्या इतर खंडकाव्यांतून हि मंगलाचरण नाहीं.

या वर दिलेल्या एकंदर कारणांवरून कर्णपर्व हें आधीं लिहिलेलें असावें, हा समज—नव्हे गैरसमज—दृढ झालेला आहे. परंतु ही कल्पना अगदीं चुकीची आहे, हें सूक्ष्म शोधाअंतीं आणि विचाराअंतीं कोणाच्या हि लक्षांत येण्यासारखें आहे. वर दिलेल्या भ्रमपंचकापैकीं प्रत्येक भ्रमाचें खंडन पुढें दिल्याप्रमाणें आहे:—

अंक १ यामध्यें जें प्रमाण दिलेलें आहे तें न्यायदृष्ट्या अत्यंत दूषित आहे. जी गोष्ट सिद्ध करावयाची, ती च गोष्ट त्यामध्यें गृहीत धरलेली आहे.

कर्णपर्व आधीं कशावरून लिहिलें? तर 'नरनारायणविजय' या नांवाखालीं तें आधीं लिहिलें होतें म्हणून! अशा प्रकारचा या कारणांतील एकंदर मथितार्थ निघतो. यामुळें हें कारण अगदीं च लंगडें पडतें. परंतु याशिवाय आणखी हि इतर हेतूंस्तव या कारणामध्यें कांहीं बळकटी उरत नाहीं. या कारणांतील मुख्य मदार काय ती 'विजय' या नामसादृश्यावर आहे. आणि म्हणून प्रह्लादविजय आणि कृष्णविजय यांच्या मागून नरनारायणविजय लिहिण्यांत आला असावा, असें अनुमान केलेलें आहे. परंतु नरनारायणविजय म्हणजे काय? हा कोणता ग्रंथ? नरनारायण-विजय म्हणजे कर्णपर्व? ते कां? हिरण्यकशिपूच्या आख्याना-मध्यें प्रह्लादाचा विजय झाला आहे म्हणून त्याला 'प्रह्लादविजय' हें नांव योग्य असेल; आणि भागवताच्या दशमस्कंधामध्यें कृष्णाचा विजय वर्णिला असल्यामुळें त्या ग्रंथाला हि 'कृष्णविजय' हें नांव शोभेल; पण या कर्णपर्वांत नरनारायणांचा असा काय अलौकिक विजय झालेला आहे, कीं ज्यासाठीं या पर्वाला 'नरनारायण-विजय' असें नांव द्यावें? फार झालें तर कदाचित् नरानें कर्णाला मारल्यामुळें नराचा विजय झाला असेल; पण त्यांत नारायणाचा विजय कसला? आतां नरनारायणांच्या शौर्यानें आणि युक्तीनें जर हा विजय झालेला असेल, तर तो फक्त या एका च पर्वांत

झालेला नसून, बाकीच्या हि पर्वांतून तो त्या कारणामुळें झालेला आहे. मग असें असताना आणि बाकींच्या हि पर्वांना ' नरनारायणविजय ' हें नांव सामान्यतः लागू पडत असताना या च पर्वाला हें विशेष नांव कां? शिवाय कर्णपर्वामध्यें कृष्ण आणि अर्जुन यांचा विजय झाला असेल, तर ' कृष्णार्जुनविजय ' असें नांव कर्णपर्वरूपी ग्रंथाला ओघानें आलें असतें. तें सहजप्राप्य नांव टाकून आडवाटेंतून हुडकून आणलेलें ' नरनारायणविजय ' हें विशेष नांव कर्णपर्वाला कां? या व अशा च तऱ्हेच्या दुसऱ्या प्रश्नांचें समाधानकारक उत्तर, कर्णपर्व आधीं रचलें होतें, या कल्पनेला कधीं हि देतां येणार नाहीं. आतां कोणी असें म्हणेल कीं,

या साधुसंगमुदिरें मुदित श्रीरामसुतमयूर कृती
नरनारायणविजयग्रंथ करी व्हावया सुखी सुकृती.

या कर्णपर्वाच्या अखेरच्या आर्येमध्यें खुद्द पंतानीं च ' नरनारायणविजयग्रंथ ' असें म्हटलें आहे. होय, पंतानीं 'नरनारायणविजयग्रंथ ' असें म्हटलें आहे, हें खरें. पण पंतांच्या या शब्दांचा कर्णपर्वपर अर्थ लावण्यांत फार चुकी होत आहे. ' नरनारायणविजयग्रंथ ' म्हणजे फक्त कर्णपर्व च असा मोरोपंताचा अर्थ नसून सबंध महाभारताच्या उद्देशानें त्यानीं हा शब्द वापरलेला आहे. ' नरनारायणविजय ' हें नांव कर्णपर्वाला कां लागू पडत नाहीं, हें वर दिलेल्या प्रश्नांच्या द्वारानें आम्हीं स्पष्ट केलें च आहे. तेव्हां कर्णपर्वाच्या अभावीं ' नरनारायणविजयग्रंथ ' म्हणजे अर्थात् महाभारत असें च प्राप्त होतें. तसें च रा. हंस यानीं मोरोपंतांवरील आपल्या निबं-

धाच्या १३व्या पृष्ठावर आणि रा. पांगारकर यानीं मोरोपंतांचें चरित्र, पृष्ठ ६८ मध्यें 'नरनारायणविजयग्रंथ' म्हणजे 'भारत' अशी च टीप दिलेली आहे. शिवाय याला दुसरीं हि कित्येक प्रमाणें आहेत.

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।
देवीं स्वरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥

हा श्लोक महाभारतांतील प्रत्येक पर्वाच्या प्रारंभीं व्यासानीं घातलेला आहे व तो च श्लोक पंतानीं हि आपल्या बहुतेक पर्वांच्या प्रारंभीं लिहिला आहे. या श्लोकामध्यें नारायण, नर आणि जय (=विजय) हे जे तीन शब्द दिसतात, ते च शब्द 'नरनारायणविजयग्रंथ करी व्हावया सुखी सुकृती' या चरणामध्यें आहेत, असें कोणाला हि प्रत्यभिज्ञान होतें. आणि संस्कृत महाभारतामध्यें 'जय' म्हणजे महाभारत हा इतिहासग्रंथ असा अर्थ टीकाकारानीं अनेक स्थळीं दिलेला आहे. इतकें च नव्हे तर, खुद्द पंतानीं हि इतर पर्वांतून अशा प्रकारची शब्दयोजना एकंदर महाभारताच्या अर्थीं केलेली आहे, हें पुढील उताऱ्यांवरून कोणाच्या हि लक्षांत येईल.

श्रीरामनामगुरुपद सुनिपुणवादक, मयूरमुख वाद्य,
श्रीरामदया गाती, गीत जयग्रंथ, पर्व हें आद्य. १०३–३८ आदि०
पुरुषा आर्यावृत्तें जैसी ग्रंथा जया तसी मोटी
शोभा आर्यावृत्तें आली, भुलतील यासि कवि कोटी. ७९–११
कीं या विजयग्रंथीं हरिहरजनसत्कथा, दुजी थोडी. ८२–११भी०
श्रीमान् सर्वश्रेष्ठ ग्रंथांच्या पूज्य हा जय शतातें
ज्यांत शुकाच्या केलें प्रकट कथुनि धर्मराजयश तातें. ३०–२

22136

अष्टादशपर्व जयग्रंथकथा आपणांत आर्यांनीं
आणिलि जसि आणावी आर्या बहुमान करुनि आर्यांनीं. ५३-२
—स्वर्गारोहण.

आणि वर दिलेल्या आर्यांवर टीपा देताना काव्यसंग्रहकारानीं हि जयग्रंथ, विजयग्रंथ म्हणजे महाभारत असा च अर्थ दिलेला आहे. मग आपल्या इतर लिहिण्याशीं विसंगत असा अर्थ 'नर-नारायणविजयग्रंथ' या ठिकाणीं च जर त्यानीं केला, तर तो अर्थात् बाकीच्या प्रमाणांच्या प्रबलतेवरून चुकीचा ठरतो, हें उघड आहे.

आतां, कर्णपर्व हें आधीं लिहिलें होतें किंवा काय याचा निर्णय (अजून संशयास्पद असेल तर) नक्की ठरविण्याकरितां आपण प्राकृत आर्याभारतांतील कर्णपर्वाच्या आणि संस्कृत महाभारतांतील कर्णपर्वाच्या प्रारंभाच्या तुलनेकडे क्षणभर वळूं. संस्कृत महाभार-तांत भीष्म, द्रोण, कर्ण या पर्वांमध्यें अशी एक चमत्कारिक गोष्ट आढळून येते कीं, या पर्वांच्या प्रारंभींच्या अध्यायामध्यें च त्या त्या पर्वांच्या शेवटीं होणारी भीष्म, द्रोण, कर्ण इत्यादिकांच्या वधाची जी मुख्य गोष्ट ती प्रथमारंभीं च संक्षेपानें सांगण्यांत येते. कर्णपर्वांत कर्णाच्या वधाची हकीकत वैशंपायन जनमेजयाला पहिल्या च अध्यायामध्यें सांगून टाकतो. मग पुढें जनमेजय वैशंपायनाला विचारतो कीं, ही कर्णवधाची बातमी राजा धृतराष्ट्रानें कशी ऐकिली, आणि ती ऐकल्यानंतर धृतराष्ट्राची काय अवस्था झाली? या प्रश्नांचें उत्तर देण्याकरितां वैशंपायन जनमेजयाला

सांगतो कीं, रणांगणावर कर्ण मरून पडल्यानंतर संजय रात्रीं धृतराष्ट्राकडे आला, आणि त्यानें कर्णवधाची बातमी धृतराष्ट्राला थोडक्यांत सांगितली. ती ऐकून धृतराष्ट्राला फार दुःख झालें. पुढें कौरवांकडील आणि पांडवांकडील कोण कोण वीर मेले आणि कोण कोण जीवंत आहेत याच्याबद्दल त्यानें संजयापासून माहिती विचारून घेतली. नंतर फिरून सर्वांबद्दल शोक करून, मग, द्रोणाचार्य दिवंगत झाल्यावर दुर्योधनानें काय केलें व कर्णाचा कसा पराजय झाला, हें तूं मला सविस्तर सांग, अशी धृतराष्ट्रानें संजयाला विनंति केली. इतक्या कथाभागाला संस्कृत महाभारतांतील नऊ अध्याय खर्ची पडलेले आहेत. आणि महाभारतांतील सरणी-प्रमाणें इतक्या आढेवेढ्यांचा उपोद्धात झाल्यानंतर मग दहाव्या अध्यायापासून कर्णपर्वाच्या खऱ्या आणि मुख्य गोष्टीला प्रारंभ झाला आहे. अशी ही मूळ महाभारतांतील स्थिति आहे. आतां ज्याला समग्र महाभारत साद्यंत लिहावयाचें नसून प्रल्हादविजय, कृष्णविजय या स्फुट प्रकरणांप्रमाणें फक्त एकट्या कर्णपर्वाच्या गोष्टीच्या आधारावर 'नरनारायणविजयग्रंथ' या नांवाचें तिसरें एक स्फुट विजयप्रकरण स्वतंत्र रीतीनें लिहावयाचें असेल, तो या कर्णपर्वाची गोष्ट लिहिण्याला स्वाभाविकपणें आणि समंजस-पणें सुरवात कोठून बरें करील? ज्याला नुसत्या कर्णपर्वाची गोष्ट सांगावयाची आहे, आणि त्यामुळें त्या वेळीं ज्याला मागच्यापुढच्या पर्वांची आणि त्यांतील हकीकतीची रिकामी उठाठेव करीत बस-ण्याची वस्तुतः कांहीं अपेक्षा नसावी, तो जनमेजय आणि वैशं-

पायन यांचीं जीं निरर्थक प्रश्नोत्तरें, त्यांच्या भानगडीमध्यें कशाला पडेल? आणि कर्णाच्यापूर्वीं पांडवांकडचे किंवा कौरवांकडचे कोण कोण मेले होते आणि कोण कोण जीवंत राहिले होते याच्याबद्दलची अप्रस्तुतोपयोगी मोजदाद कशाला करीत बसेल? एखादा अडाणी कवि असता, तर त्याच्या ठिकाणीं असलें हें आंधळें भाषांतरानुगतिकत्व शक्य आणि संभवनीय झालें असतें. परंतु पंतांची कांहीं तशी गोष्ट नाहीं. पंतांवर असले आरोप करण्याला कोणी हि धजणार नाहीं. जर पंताना नुसत्या च कर्णपर्वाच्या आधारानें एकादें काव्य रचावयाचें असतें, तर संस्कृत महाभारतांतील कर्णपर्वाच्या दहाव्या अध्यायांत जेथें द्रोणवधानंतरच्या गोष्टीला सुरवात झाली आहे, तेथून च त्यानीं आपल्या काव्याला सुरवात केली असती. हा जो आम्हीं म्हणतो, तो कथाभाग आर्याभारतांतील कर्णपर्वाच्या सातव्या अध्यायापासून सुरू झालेला आहे. त्याच्या पूर्वींचे जे सहा अध्याय पंतानीं लिहिले आहेत, त्यांतील गोष्टी सांगणें हें समग्र भारत लिहिण्याच्या प्रसंगांत च सयुक्तिकपणाचें आणि समंजसपणाचें आहे. एरवीं या अध्यायांची उपपत्ति सामंजस्यानें लागत नाहीं. कांहीं एक उपोद्धात न करितां व हा कर्ण कोठला, कोण, वगैरेबद्दलचा आपल्या वाचकाना कांहीं एक मागमूस लागूं न देतां एकदम 'भव्यप्रताप कर्ण स्वपित्याहुनि फार संगरीं तपला' अशा प्रकारची अरसिकपणाची सुरवात पंतानीं आपल्या स्वतंत्र काव्याला खात्रीनें कधीं हि केली नसती. ज्या दोन काव्यांच्या नामसादृश्यावरून

पंतानीं हें तिसरें नरनारायणविजयकाव्य केलें म्हणून मानण्यांत येत आहे, त्या प्रह्लादविजयामध्यें किंवा कृष्णविजयामध्यें कोठें हि असा अप्रास्ताविक, आकस्मिक आणि अचानक आरंभ केलेला नाहीं.

श्रीमत्प्रह्लादाची लीला गावी खनी सदाह्लादाची,
हरिचरणीं अनिश मन स्थापुनि करिते भवानळाचें शमन.
कश्यपमुनिची दारा दिति दक्षसुता प्रसिद्ध परमोदारा,
तत्सुत हिरण्यकशिपु, ब्रह्मवरें होय मत्त तो देवरिपु.

—प्रह्लादविजय.

'हरिपद भवसंतमसीं भास्कर,' हें गुह्य बोलिले संत मसीं,
गंगेच्या उगमातें त्यातें वंदन असो प्रणतिसुगमातें.

—कृष्णविजय.

हे दोन प्रारंभ पहा, आणि

भव्यप्रताप कर्ण स्वपित्याहुनि फार संगरीं तपला,
कीं, ज्याच्या शररश्मिव्रातपटीं तो सहस्रकर लपला.

हा तिसरा प्रारंभ पहा! आणि या तिसऱ्या विजयाला—म्हणजे कर्णपर्वाच्या स्वतंत्र काव्यात्मक कथानकाला—आरंभ होतो आहे, तों च त्या आरंभाच्या पहिल्या आर्येच्या पुढें च दुसरी आर्या कसली आली आहे, ती पहाः—

स्वसख्याचें साधाया चिंतित जरि पार्थमर्दना जपला,
दुसरे दिवशीं हरिच्या दृष्टिपुढें अर्जुनाशुगें खपला.

या आर्येमध्यें अर्जुनाच्या बाणानीं 'कर्ण खपला' असें एकदम सांगण्यांत आलें आहे. समग्र महाभारत लिहिण्याच्या प्रयत्नांतील हें एक अंग नसून, फक्त एकट्या कर्णपर्वावर च एखादें स्वतंत्र स्फुट काव्य लिहावयाची पंतांची इच्छा असती, तर

त्यानीं वरच्यासारखा असा अस्वाभाविक आरंभ कधीं तरी केला असता काय? आणि त्या आरंभाच्या आर्येनंतर लगे च दुसऱ्या आर्येमध्यें एकंदर काव्याचा मुख्य उपनायक जो कर्ण तो खपल्याचें अशुभ वृत्त एकदम आरंभीं ओघावांचून इतक्या अरसिकपणानें आणि इतक्या अडाणीपणानें सांगितलें असतें काय? परंतु याला पंत काय करणार? त्यांच्या एकंदर आर्याभारतांतील मधला च एखादा भाग घेऊन, तेथून च दुसऱ्या एखाद्या स्वतंत्र काव्याचा प्रारंभ झाला आहे, अशी आपत्ति जर कोणी बळें च त्यांच्यावर लादूं लागेल, तर त्या मध्यभागाच्या ठिकाणीं प्रारंभाचीं चिन्हें पंतानीं कोठून आणावीं?

पूर्वपक्षाच्या पहिल्या कारणासंबंधानें येथपर्यंत अशा रीतीनें विचार झाल्यानंतर पूर्वपक्षाचीं अंक ३,४,५ चीं जीं कारणें आहेत, त्यांच्याबद्दल कांहीं निराळें विशेष लिहावयाला पाहिजे, असें नाहीं. (३) 'नरनारायणविजयग्रंथ' असें नांव या कर्णपर्वाला पंतानीं मुळीं दिलेलें च नाहीं. हें समग्र महाभारताचें नांव आहे, हें वर दाखविलें च आहे. तसें च, मंगलाचरण आणि नीटनेटका प्रारंभ (५) यासंबंधाच्या हि मुद्याचें विवेचन वर आलेलें च आहे. आतां, पूर्वपक्षाच्या ४ थ्या कारणामध्यें असें म्हटलें आहे कीं, "या पर्वाला 'कर्णपर्व' असें पंतानीं कोठें च म्हटलें नाहीं. इतर पर्वांच्या अंतीं अमुक पर्व समाप्त झालें, म्हणून लिहिलेलें असतें, तसा प्रकार या कर्णपर्वांत नाहीं;" परंतु तें हि यथार्थ नाहीं. या पर्वाला पंतानीं 'कर्णपर्व' असें कोठें हि म्हटलें नाहीं,

किंवा या पर्वाच्या शेवटीं ‘ कर्णपर्व समाप्त झालें ’ असें हि म्हटलें नाहीं, असें क्षणभर धरून चाललों, तरी एवढ्यानें पूर्वपक्षाची सिद्धि होणार नाहीं. हा जर ‘ नरनारायणविजय ’ या नांवाचा स्वतंत्र ग्रंथ पूर्वपक्षाच्या मतानें कांहीं वेळ होता, तर ‘ हा नरनारायणविजयग्रंथ येथें समाप्त झाला,’ असा स्पष्ट उल्लेख या काव्याच्या शेवटीं यावयाला पाहिजे होता. प्रह्लाद-विजयाच्या शेवटीं असा स्पष्ट उल्लेख पंताच्या हातचा आलेला आहे, व तो येणेंप्रमाणें आहेः—“ इति श्रीरामनंदनमयूरेश्वरकृति कृतौ श्रीप्रह्लादविजये चतुर्थो विजयः ॥ ४ ॥ श्रीमन्नृसिंहपदक-मलार्पणमस्तु ॥ श्रीः ॥ ” असा एखादा उल्लेख या नरनारायणवि-जयग्रंथाच्या शेवटीं असावयाला पाहिजे होता. म्हणजे पूर्वपक्षाच्या म्हणण्याला कांहीं बळकटी आली असती. पण तो तसा नाहीं. आणि तो तसा नाहीं, इतकेंच नव्हे, तर उलट ज्या कर्णपर्वाचा उल्लेख मध्यें किंवा शेवटीं कोठें हि नाहीं, असें पूर्वपक्षाचें म्हणणें आहे, (जें केवळ अभ्युपगमवादासाठीं पूर्वीं आपण क्षणभर गृहीत धरलें होतें,) त्या कर्णपर्वाच्या नांवाचा उल्लेख मोरोपंताच्या स्वहस्तलिखित पोथीमध्यें जेथें सांपडावयाला पाहिजे अशा प्रत्येक ठिकाणीं—दर अध्यायाच्या शेवटीं आणि एकंदर पर्वाच्या समाप्तीला—सांपडतो. “ इति श्रीकर्णपर्वाणि श्रीरामनंदनमयूरेश्वर-विरचिते प्रथमोऽध्यायः ” “ इति कर्णपर्वणि द्वितीयोऽध्यायः ” “ इति श्रीभारते कर्णपर्वणि श्रीरामनंदनमयूरेश्वरविरचिते तृतीयो-ऽध्यायः ” “ इति कर्णपर्वणि चतुर्थोऽध्यायः ” असे ओळीनें उल्लेख

आहेत, ते सर्व कशाला द्यावयाला पाहिजेत? कर्णपर्वांतील शेवटच्या अध्यायाच्या शेवटीं पुढीलप्रमाणें उल्लेख आहेः– "इति श्रीमन्महाभारते कर्णपर्वणि श्रीरामनंदनमयूरेश्वरविरचिते पंचाशत्तमोऽध्यायः." ह्यावरून पंतानीं याला 'कर्णपर्व' असें कोठें हि म्हटलें नाहीं, असें जें पूर्वपक्षाचें विधान आहे, तें निराधार ठरून उलट याला 'नरनारायणविजय' असें पंतानीं कोठें हि म्हटलें नाहीं, हें मात्र सिद्ध होतें.

आतां बाबूजी नाईक यांचा उल्लेख (२) कर्णपर्वाच्या शेवटीं जरी आलेला असला, तरी वर दिलेलीं इतकीं सारीं बलवत्तर आणि निरुत्तर प्रमाणें उलथून टाकून, आर्याभारताच्या एकंदर पर्वांच्या सांखळीमध्यें दुव्यांत दुवे अडकले जाऊन द्रोणपर्व आणि शल्यपर्व या दोघांच्या कचाटीमध्यें जें कर्णपर्व अगदीं चपखल जाऊन बसलें आहे, त्या कर्णपर्वाला तेथून काढून त्याचें एक स्वतंत्र स्फुट प्रकरण खुद्द बाबूजी नाईक देखील बनवूं शकणार नाहींत, ही गोष्ट निर्विवाद आहे. आर्याभारतांतर्गत कर्णपर्वाच्या शेवटीं बाबूजी नाईक यांचा उल्लेख आला, म्हणून कांहीं मोठेंसें बिघडतें असें नाहीं. एकंदर सर्व पर्वांच्या परिसमाप्तींचें आपण परीक्षण केलें, तर त्यावरून आपल्याला असें दिसून येतें कीं, बऱ्या च पर्वांच्या शेवटीं महाभारताशीं अप्रकृत अशा कांहीं तरी स्वकीय गोष्टींचा पंतानीं उल्लेख केला आहे. 'श्रीगुरूनें हें काव्य लिहविलें,' 'श्रीगुरुरामपदाब्जीं हें पर्व वाहिलें,' 'श्रीमद्रामपदीं हें तुलसीदल वाहिलें,' अशा प्रकारचे सामान्य

उल्लेख तर पर्वोपर्वीं आहेत च. परंतु त्यांतल्या त्यांत आदि, विराट, उद्योग, भीष्म आणि अनुशासन या पर्वांच्या शेवटचे उद्गार विशेष परीक्षणीय आहेत. आदिपर्वाच्या शेवटीं 'देवानें मला स्वबंदिनिकरीं बोलाविलें आणि माझें काव्य व्यासाला हि पसंत पडलें,' असें पंतानीं सांगितलें आहे. विराटपर्वाच्या शेवटीं 'मी गप्पी नाहीं' आणि 'जों जों भगवत्कृपा होत आहे, तों तों मला काव्य करण्याला जास्त स्फूर्ति येत आहे,' असें पंत सांगतात. उद्योगपर्वाच्या उपसंहारांत व्यासानीं जसें महाभारत गणपतीकडून लिहविलें, तसें गुरुप्रसाद हें आर्याभारत मजकडून लिहवीत आहे,' असें सांगतात! भीष्मपर्वाच्या उपसंहारांत तर मोरोपंतानीं बऱ्या च अवांतर गोष्टी गोविल्या आहेत. आर्यावृत्तानें आलेली शोभा, 'ग्रंथ प्राकृत दिसतो परि न प्राकृत,' 'नारदादिक प्रतिभारक्षक असताना दुर्जन काय करूं शकणार आहेत,' हे उल्लेख आलेले आहेत! आणि अनुशासनपर्वाच्या अखेरीस स्वर्गलोकामध्यें आपल्या मातापित्याना हि आनंद होईल, असें पंतानीं म्हटलें आहे. शेवटच्या स्वर्गारोहणपर्वाखेरीजकरून इतर पर्वांतून हे जसे वर दिलेले अप्रस्तुत गोष्टींचे उल्लेख आलेले आहेत, तसा च कर्णपर्वाच्या शेवटीं बाबूजी नाइकांचा एक उल्लेख आलेला आहे. तेवढ्यावरून जर कर्णपर्व आधीं लिहिलेलें होत असेल, तर भीष्मपर्वामध्यें आर्यावृत्ताची महती वर्णिली आहे, आणि या काव्याचें अप्राकृतत्व दिग्दर्शित केलेलें आहे, म्हणून तें हि पर्व आधीं लिहिलेलें कां न मानावें? किंवा कर्णपर्वामध्यें जो पंतांच्या आश्रयदात्या

बाबूजी नाइकांचा उल्लेख आहे, त्याच्यापेक्षां पंतांच्या जन्मदात्या आईबापांचा उल्लेख ज्या अनुशासनपर्वाच्या शेवटीं आलेला आहे, त्याचा स्वतंत्र काव्य होण्याबद्दल जास्त हक्क कां पोचूं नये? सारांश, नुसत्या बाबूजी नाइकांच्या उल्लेखावरून कर्णपर्व हें आधीं लिहिलेलें ठरूं शकत नाहीं, हें उघड आहे.

पंतानीं विठोबादादा चातुर्मास्ये याना आषाढ वद्य ९ रविवासर (शके १७०३) रोजीं लिहिलेल्या एका पत्रामध्यें पुढीलप्रमाणें मजकूर आहे:—"द्रोणपर्व अर्धें प्रारंभापासून श्रीमद्गुरुपुत्र श्रीसदाशिवोपाध्याय कराडीं राहतात त्यांजवळ आहे. उत्तरार्ध नवें लिहिलें तें येथें आहे. हें त्यांजकडे पाठवून पूर्वपुस्तक आणवून आपणाकडे पावतें करीन. कर्णपर्व आपणाजवळ अर्धें आहे असें लिहिलें. पुढील, देव दया करील, सांपडेल, असें अभय दिलें, त्यावरून निश्चित जालों." या मजकुरावरून काव्यसंग्रहकार असा एक तर्क काढतात कीं, कर्णपर्व हें द्रोणपर्वाच्या पूर्वीं लिहिलेलें असावें. व असा तर्क काढून या प्रस्तुतच्या नरनारायणविजयग्रंथाच्या वादामध्यें ते त्या तर्काचा उपयोग करतात. परंतु या दोन्ही हि गोष्टी बरोबर नाहींत. "उत्तरार्ध नवें लिहिलें," या वाक्याला एक च अर्थ आहे, अशा कोत्या कल्पनेवर त्यानीं हा आपला तर्क प्रथमतः उभारला आहे. "उत्तरार्ध नवें लिहिलें," म्हणजे पूर्वीं ज्या उत्तरार्धाच्या कथाभागावर पंतानीं प्राकृतामध्यें कधीं हि आर्या लिहिल्या नव्हत्या, त्या उत्तरार्धावर आर्यारचना प्रथमप्रसंगीं च करून उत्तरार्ध लिहिलें, असा च केवळ या वाक्याचा अर्थ

संभवेल, असें नाहीं. "उत्तरार्ध नवें लिहिलें" म्हणजे कदाचित् पूर्वीं लिहिलेल्या आर्यांच्या प्रतीवरून दुसरी एखादी नवीन प्रत पुष्कळ लोक मागत होते, त्याना देण्याकरितां लिहून तयार केली असेल; किंवा काव्यसंग्रहकारानीं च वरील एकतर्फी अर्थ एका वाक्यांत अंगीकृत करून लगे च त्याच्या पुढल्या वाक्यांत जी एका लोकप्रवादाची दुसरी कल्पना पुढें मांडली आहे, त्या कल्पने-प्रमाणें कदाचित् कठिण झालेल्या द्रोणपर्वाचा कांहीं भाग बदलून त्याच्या जागीं तेवढा भाग नवीन लिहिला असेल; आणि त्या गोष्टीला उद्देशून हि मोरोपंतांचें वरील वाक्य असणें अगदीं संभव-नीय आहे. तेव्हां असे दुसरे हि अर्थ उद्भवत असतां त्यांतील एकादा च अर्थ घेऊन त्यावर प्रमाणांतरबाधित असा कांहीं तरी तर्क बांधणें, हें कांहीं फारसें फायद्याचें नाहीं; आणि तो तर्क ज्या वादांत उपयोगी पडत नाहीं, त्या वादांत त्याचा उपयोग करणें, हें तर त्याहून हि सुतराम् च फाय-द्याचें नाहीं. कारण, नरनारायणविजयस्वरूपी कर्णपर्व हें सगळ्या आर्याभारताच्या पूर्वीं लिहिलें होतें किंवा काय, या वादाच्या प्रसंगामध्यें तें द्रोणपर्वाच्या आधीं लिहिलें होतें, अशी संदिग्ध पुराव्यामुळें संदिग्धतर राहिलेली गोष्ट सांगण्यापासून काय फायदा होणार? कदाचित् कर्णपर्व द्रोणपर्वाच्या आधीं लिहिलें असेल. (आणि असा एकादें पर्व पुढेंमागें लिहिण्याचा प्रकार अश्वमेध-पर्वाच्या बाबतींत झालेला असल्याचें आम्हीं च पूर्वीं दाखवून दिलेलें आहे). पण त्याच्या योगानें काय साध्य होणार? कर्ण-

पर्व हें सगळ्या आर्याभारताच्या आधीं लिहिलें होतें, असें का सिद्ध होईल? आणि तें तर मुख्यतः सिद्ध करावयाला पाहिजे आहे. तेव्हां या कोटीमध्यें हि कांहीं फारसा जीव नाहीं, हें उघड होत आहे.

शिवाय पंतांच्या दुसऱ्या एका पत्रांतील एका वाक्यावरून हि कर्णपर्व हें आधीं लिहिलें गेलेलें नसून आर्याभारताच्या रचनेला आदिपर्वापासून च आरंभ झालेला असला पाहिजे, हें स्पष्ट दिसून येतें. पंत सदर पत्रांत लिहितातः—“ मी श्रीभारत आदि-पर्व यांतील अर्थलेशग्रथनव्यासंगें मनास लाविलें आहे.” या वाक्यांत एक प्रकारची विनम्रता आणि विनयशालिता दिसत आहे. “ तितीर्षुर्दुस्तरं मोहादुडुपेनास्मि सागरम् ” “ प्रांशुलभ्ये फले चाहमुद्बाहुरिव वामनः ” इत्यादि वाक्यांतून कालिदासानें आपल्या काव्याच्या प्रारंभीं जशा प्रकारचे उद्गार काढले आहेत, तशा प्रकारची च ही पंतांची आर्याभारतकाव्याच्या बाहेरची परंतु अत्यंत सुंदर अशी विनम्र उक्ति आहे. असली उक्ति काव्यारंभीं च शोभते. कर्णपर्वासारखें महाभारतांतील एक पर्व इतक्या उत्तम रीतीनें हातून आधीं लिहून गेलेलें असेल, तर संकोच, शालीनता, स्वप्रत्ययाभाव इत्यादिकांचे सूचक असे हे वर दिलेले शब्द तोंडां-तून निघणें शक्य नाहीं. तेव्हां यावरून हि कर्णपर्व आधीं लिहि-लेलें नसून आर्याभारताला आरंभ आदिपर्वापासून च झालेला असला पाहिजे, हें उघड आहे.

असो; येथपर्यंत पंतानीं कोणकोणतीं पर्वें केव्हां आणि कसकशीं लिहिलीं याच्याबद्दलचें विवेचन आज उपलब्ध असलेल्या माहितीप्रमाणें करण्यांत आलें. हीं पर्वें एकंदर अठरा आहेत. त्यांपैकीं प्रत्येक पर्वाच्या पहिल्या आर्येमध्यें विवक्षित अक्षरें योजून पंतानीं '**श्रीपांडवसहायो भगवानरविंदाक्षो जयति**' हा अष्टादशाक्षरी मंत्र साधला आहे, ही गोष्ट त्या त्या आर्या पाहिल्या असतां कोणाच्या हि लक्षांत येईल. अशा च प्रकारचे दुसरे हि कांहीं मंत्र पंतानीं इतरत्र साधले आहेत. '**नमो भगवते वासुदेवाय**' हा द्वादशाक्षरी मंत्र मंत्रभागवतामध्यें आणि '**श्रीराम जय राम जय जय राम**' हा त्रयोदशाक्षरी मंत्र मंत्ररामायणामध्यें साधण्यांत आलेला आहे. हे शेवटीं दिलेले दोन्ही मंत्र सुप्रसिद्ध आहेत व ते सांप्रदायिक हि आहेत. गुरुशिष्यपरंपरेमध्यें गुरु जेव्हां आपल्या शिष्याना मंत्रोपदेश करितात, तेव्हां ते या मंत्राचा उपयोग करितात, हें सर्वांना माहित च आहे. सारांश, हे पूर्वोक्त दोन मंत्र पूर्वसिद्ध आहेत. परंतु 'श्रीपांडवसहायो भगवानरविंदाक्षो जयति' हा मंत्र तशांपैकीं नाहीं. हा मंत्र गुरुशिष्यसंप्रदायापैकीं नसून तो पंतानीं नवीन बनविलेला आहे, असें दिसतें. आणि महाभारतांतील एकंदर कथानकाच्या सारांशाला अनुरूप होईल, असा च तो बनविलेला आहे. भारताच्या अठरा पर्वांपैकीं कर्णपर्व हें आठवें पर्व आहे. हें आधीं लिहिलेलें नसून ओघानें त्याचा क्रम आला तेव्हां च तें लिहिलेलें असलें पाहिजे, हें

श्रीपांडवसहायो भगवानरविंदाक्षो जयति.

वर सिद्ध करून दाखविण्यांत आलेलें च आहे. परंतु या पर्वाच्या प्रारंभीं जें 'भ' हें अक्षर आलेलें आहे, त्याच्यासंबंधाची आख्यायिका अशी आहे कीं, पंतानीं कर्णपर्व पहिल्यानें लिहिलें, आणि नंतर मग आदिपर्वापासून समग्र भारताची रचना करण्याचा संकल्प करून प्रत्येक पर्वाच्या आद्याक्षराच्या द्वारानें 'श्रीपांडवसहायो भगवानरविंदाक्षो जयति' हा मंत्र ग्रथित करण्याचें त्यानीं योजिलें. पुढें प्रत्येक पर्वाच्या आरंभीं या मंत्रांतील एकेक अक्षराची योजना करितां करितां द्रोणपर्वाच्या अखेरपर्यंत मजल आली. आणि पुढल्या पर्वाला मंत्रांतील आठवें अक्षर 'भ' हें पाहिजे! परंतु कर्णपर्व तर आधीं लिहिलेलें! पण तें काढून पाहिलें, तों त्याचें पहिलें अक्षर 'भ' च! असा आश्चर्यकारक योगायोग जुळून आला! अशी ही आख्यायिका आहे. परंतु हिच्यामध्यें कितपत तथ्य आहे, हें कर्णपर्वाच्या रचनाकाळासंबंधानें आम्ही पूर्वीं जें विवेचन केलें आहे, त्यावरून कोणाच्या हि लक्षांत येईल. 'भ' हें अक्षर आकस्मिक रीतीनें किंवा चमत्कारानें किंवा घुणाक्षरन्यायानें जुळून आलें, अशी कांहीं वस्तुतः गोष्ट नाहीं. कर्णपर्व जर मुळीं आधीं लिहिलेलें च नव्हतें, तर मग 'भ' या अक्षरामध्यें दैवी चमत्कार किंवा अदृष्टयोगायोग येणार कोठून? कर्णपर्व हें यथाक्रमानें लिहिलें गेलें असल्यामुळें क्रमप्राप्त झालेला वर्ण जो 'भ' तो जाणूनबुणून च कर्णपर्वाच्या प्रारंभीं घालण्यांत आला असला पाहिजे. आणि विशिष्ट अक्षरें पर्वांच्या प्रारंभीं येण्याकरितां पंताना जेथें थोडीशी वांकडीतिकडी शब्द-

योजना करावी लागली आहे, अशीं जीं कांहीं स्थळें आहेत, त्यांपैकीं च 'भव्यप्रताप कर्ण' हें स्थळ आहे. सभापर्वाच्या प्रारंभीं 'पा' हें अक्षर येण्याकरितां 'पांचाळीपतिस म्हणे मय' या आर्येंत अर्जुनाकरितां 'पांचाळीपति' अशी शब्दयोजना केली आहे. पुढें मंत्रांतील तिसरें अक्षर 'ड' हें आलें. हें तर फार च चमत्कारिक अक्षर! तेव्हां तें वनपर्वाच्या प्रारंभीं बसविण्याकरितां 'डमरुधरप्रियगुणसख पांडव गेले वनासि' या आर्येंत, डमरु धारण करणारा जो शंकर, त्याला प्रिय आहेत गुण ज्याचे असा जो कृष्ण, त्यांचे मित्र जे पांडव, ते वनवासाला गेले, इतका द्राविडी प्राणायाम एका अहेतुगर्भविशेषणानें पंताना करावा लागला आहे. भीष्मपर्वाच्या प्रारंभीं 'हा' या सहाव्या अक्षराची पाळी आली. तेव्हां 'नीलकंठ' वगैरेसारखे शंकरवाचक नेहमींचे शब्द सोडून देऊन 'हालाहलगलसा प्रभु उग्रतपा' अशी शब्दयोजना पंताना करावी लागली आहे. द्रोणपर्वांत 'यो' हें अक्षर आणण्याकरितां 'योधवरतातपतनें अनुदिन धृतराष्ट्र होय कष्टी तें' या आर्येंत 'भीष्म' हें साधें नांव घालण्याचे ऐवजीं 'योधवरतात' असा लांबलचक शब्द घालावा लागला आहे. 'गरुडध्वजचरणाश्रितचरितश्रवण त्रिताप संहरितें' (शल्य), 'विंदुवर नदीनंदन सांगे बहु दानधर्म धर्मातें' (अनुशासन), या ठिकाणीं हि वरील प्रकार च आढळून येतो. या उपरिनिर्दिष्ट सर्व स्थळीं शब्दयोजनेमध्यें जो कृत्रिमपणा दिसून येतो, तो च 'भव्यप्रताप कर्ण' या ठिकाणीं सहृदयांच्या प्रत्ययाला येतो. कर्णपर्वावरून रचलेल्या एखाद्या

स्वतंत्र ग्रंथाला कोणी आरंभ करिता, तर त्या ग्रंथाच्या आरंभीं कर्णाला 'भव्यप्रताप' आणि प्रतापाला 'भव्य' हीं विशेषणें अगदीं स्वाभाविकपणें च आलीं असतीं, असें दिसत नाहीं. 'भव्यप्रताप' हें विशेषण घालण्यामध्यें उद्देश, प्रयत्न, अस्वाभाविकपणा वगैरे अनेक गोष्टी स्पष्टपणें दिसून येत आहेत. यावरून 'भ' हें कर्ण पर्वाचें पहिलें अक्षर दैवी चमत्कारानें आलेले नसून संकल्पपूर्वक मानवी प्रयत्नानें आलेलें आहे, हें उघड होतें. आणि म्हणून या कारणासाठीं सुद्धां कर्णपर्व हें आधीं लिहिलेलें असणें संभवनीय ठरत नाहीं.

असो; येणेप्रमाणें या आर्याभारतांतील मंत्राची हकीकत आहे. असे देवाच्या नांवाचे मंत्र आपल्या काव्यामधून साधण्याची पद्धति प्राकृत कवितेमध्यें पंतानीं च मुख्यतः आणिली, असें म्हणण्यास हरकत नाहीं. संस्कृत साहित्यशास्त्रामध्यें चित्रकाव्य या नांवाची काव्याची एक जाति प्रसिद्ध आहे. त्यापैकीं शब्दचित्र म्हणून जें काव्य असतें, त्याचा हा मासला होय. यमकें, अनुप्रास हीं हि यांत च मोडतात. चक्रजाति, पद्मोत्तरजाति, गोमूत्रिकाबंध, सर्वतोभद्र, वर्धमानाक्षर, नागपाश, इत्यादि काव्यबंधांचे आणि शब्दचित्रांचे संस्कृतामध्यें अनेक प्रकार आहेत. आणि त्यांचीं लक्षणें व उदाहरणें विदग्धमुखमंडनादिक कित्येक साहित्यग्रंथांमधून पहावयाला मिळतात. संस्कृतामध्यें हि चांगले कवि असल्या शब्दचित्रांचा क्वचित् च उपयोग करितात. तरी पण माघ, भारवि, अशासारख्या महाकवींनीं आपल्या महा-

काव्यांतून असल्या क्लिष्ट बंधांचे कांहीं श्लोक घातले आहेत. याशिवाय संस्कृतांत इतर ठिकाणीं हि असल्या काव्यरचनेचा कोठें कोठें उपयोग केलेला आढळतो. बहुधा राजादिकांचीं नांवें एकाद्या पद्मबंधाच्या पाकळीमध्यें किंवा एकाद्या सर्वतोभद्राच्या कोनामध्यें घालून त्याना प्रथमतः आश्चर्यचकित आणि नंतर दानतत्पर करण्याच्या उद्देशानें संस्कृत कवि असल्या पद्धतींचा अवलंब करीत असत. परंतु पंतानीं ही काव्यबंधाची पद्धत संस्कृत साहित्यशास्त्रांतून घेऊन तिचा उपयोग राजाधिराज जो परमेश्वर त्याच्या नामवर्णनाकडे केला. तरी पण, उत्तमकाव्यदृष्ट्या ही शब्दचित्राची पद्धत फारशी हृदयंगम नव्हे. आणि ती हि बेताबाताची असते, तोंपर्यंत तिच्यांत कांहीं तरी स्वारस्य राहतें. आर्याभारताच्या वेळीं असले मंत्र साधण्याचा कल पंतांच्या मनामध्यें फारसा प्रबळ झालेला नव्हता, ही मोठ्या समाधानाची गोष्ट आहे. परंतु पुढें पुढें पंतांची ही प्रवृत्ति बरी च वाढत गेली होती, यांत शंका नाहीं. खुद्द पंतांचें असल्या मंत्रयोजनेसंबंधानें काय मत आहे, तें त्यांच्या मंत्ररामायणाच्या उपोद्घातांतील पुढील आर्यांवरून कळून येण्यासारखें आहे.

श्रीकारापासुनियां मकारपर्यंत वर्ण जे तेरा,
ते राघवचरितांतीं ग्रथिले, हें रामभक्त हो! हेरा.
केवळ उत्तरकांड श्रीरघुपतिमंत्ररत्नमंजूषा;
पूषा खळघूकांचा, अतिसुखदा सर्व साधुची भूषा.
देहीं आत्मा, तैसा आर्यांतीं मंत्रवर्ण सांग वसे;
सूक्ष्मदृशांवांचुनियां कथापरांला चि तो कसा गवसे?

नृपमुद्रांकितपत्र प्रजेशि होतें जसें शिरोधार्य,
प्रभुचरित मंत्रचिह्नित यास्तव धरितील मस्तकीं आर्य.

कोणत्या हि गोष्टीचा अतिरेक हा नेहमीं रसहानीला कारणीभूत होत असतो. एकादे वेळीं कांहीं शब्दचमत्कार केले, तर च ते गोड लागतील. मंत्रवर्ण किंवा विष्णुसहस्रनामासारखीं स्तोत्रें यांचा प्रदेश निराळा आणि काव्याचा प्रदेश निराळा. दोघांची भेसळ केल्यानें धड कोणता च हेतु साध्य होत नाहीं. काव्याच्या मुलखांत भक्तीच्या अतिरेकानें पुंडावा माजविला असतां, तसली भक्ति कदाचित् भोळसराना मानवेल; परंतु तसलें काव्य मात्र सहृदयाना कधीं हि मान्य होणार नाहीं. सुदैवाची गोष्ट ही आहे कीं, असले मंत्र घालण्याची ही प्रवृत्ति आर्याभारताच्या वेळीं पंतांच्या मनामध्यें प्रबळ झालेली नव्हती!

येणेंप्रमाणें पर्वांची व्यवस्था आहे. आतां पर्वांच्या पुढचा विभाग म्हटला म्हणजे अध्यायांचा होय. पंतानीं पाडलेल्या ह्या अध्यायांच्या विभागामध्यें बरा च अनियमितपणा दृष्टिगोचर होतो. संस्कृतमध्यें कालिदासादिकांचीं जीं महाकाव्यें आहेत, त्यांच्यामधील सर्गांतील श्लोकांची संख्या बहुधा जवळ जवळ सारख्या प्रमाणांत असते. आणि सम विभाग हे च सदोदित स्वाभाविक विभाग होत. परंतु पंतकृत आर्याभारताच्या अध्यायविभागामध्यें या धोरणाकडे फारसें लक्ष दिलेलें दिसत नाहीं. मूळ महाभारतांतील कित्येक पर्वें जशीं अतिशय मोठीं आणि कित्येक अगदीं लहान, तशी च

अध्याय.

स्थिति पंतांच्या अध्यायविभागाची झालेली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. कित्येक अध्यायांतील आर्या २०, १५, १२पर्यंत सुद्धां उतरत येऊन वनपर्वांतील शेवटला अध्याय तर फक्त तीन च आर्यांचा करण्यांत आलेला आहे. आणि सगळ्यांत ज्यास्त आर्यांचा अध्याय म्हटला म्हणजे वनपर्वांतील च चवथा अध्याय हा होय. या अध्यायांत ३१३ आर्या आहेत. ३ पासून ३१३ या दरम्यानच्या बहुतेक सर्व निरनिराळ्या संख्येच्या आर्यांनीं पंतांचे निरनिराळे अध्याय ग्रथित झालेले आहेत. इतकें वैचित्र्य हें खरोखर विस्मयकारक आहे. अगदीं एका च संख्येचे सगळे अध्याय असावेत असें जरी नसलें, तरी ३ आणि ३१३ इतकें अफाट अंतर त्यांमध्यें असावें, हें हि फारसें इष्ट नाहीं. यावरून असा एक प्रश्न उद्भवतो कीं, पंत हे आपल्या अध्यायांचे विभाग कोणत्या धोरणावर करीत असत? महाभारताचीं अठरा पर्वें हीं तर सुप्रसिद्ध च आहेत. परंतु या अठरा पर्वांच्या पोटामध्यें पुष्कळशीं उपपर्वें व्यासकृत महाभारतामध्यें च आहेत. कित्येक प्रसंगीं हीं उपपर्वें जेथें संपतात, तेथें पंतानीं आपले कांहीं अध्याय संपविलेले दिसतात. दुसरी एक गोष्ट दृष्टोत्पत्तीस येते, ती अशी कीं, भीष्मपर्वापासून अठरा दिवसांच्या भारती युद्धाला सुरवात होते. त्यांतील भीष्म, द्रोण, या सेनापतींच्या युद्धाच्या प्रत्येक दिवसाच्या शेवटीं 'इति प्रथमादिनयुद्धम्' 'इति द्वितीयदिन-युद्धम्' अशा प्रकारचे उल्लेख कित्येक ठिकाणीं आढळतात. आणि त्या दिवसांच्या अनुसंधानानें पंतानीं भीष्मपर्वांत सर्व स्थळीं

आणि द्रोणपर्वांत कांहीं स्थळीं आपले अध्याय संपविले आहेत. याशिवाय कांहीं ठिकाणीं गोष्टीच्या समाप्तीच्या अनुरोधानें हि कांहीं अध्याय समाप्त करण्यांत आलेले आहेत. आणि कांहीं अध्याय भारताच्या अध्यायांच्या तंत्रानें संपविलेले आहेत. अशा अनेक कारणानीं आर्याभारतांतील अध्यायांचें दीर्घत्व किंवा लघुत्व उत्पन्न झालेलें आहे. अशा या आर्याभारतांतील एकंदर अध्यायांची संख्या २२४ आहे.

आर्या.

इतके सगळे आर्याभारताचे अध्याय पंतानीं आर्यावृत्तामध्यें लिहिलेले आहेत. छंदःशास्त्राच्या नियमाप्रमाणें पाहिलें असतां पंतानीं लिहिलेल्या या वास्तविक आर्या नसून त्या केवळ गीति आहेत. तरी पण, त्याना पंतानीं आर्या हें नांव दिलेलें आहे. आणि तें च नांव हल्लीं सर्वत्र रूढ झालेलें आहे. म्हणून आम्हीं हि त्या च नांवाचा उपयोग करीत आहों. पंतांच्या आर्याभारतामध्यें एकंदर पद्यसंख्या १७१३३ आहे. त्यापैकीं आदिपर्वाच्या शेवटीं फक्त एक शार्दूलविक्रीडिताचा श्लोक आहे, आणि कर्णपर्व अध्याय ६ यांतील ३२ वी आर्या ही आर्यागीति आहे. या दोन अपवादांखेरीजकरून बाकी सर्व मोरोपंती भारत हें आर्याभिरचित आहे. आणि म्हणून त्याला '**आर्याभारत**' हें नांव अगदीं अनुरूप आहे. हें नवीन वृत्त आपण मराठी भाषेमध्यें आणिलें, असे उद्गार पंतानीं अनेक वेळां काढलेले आहेत. या वृत्ताची पूर्वपीठिका अशी आहे कीं, जरी हें वृत्त संस्कृत छंदःशास्त्रामध्यें वर्णिलेलें असलें, तरी देखील संस्कृतांत सुद्धां या वृत्ताचा

प्रसार बेताबाताचा च आढळतो. संस्कृतांतील स्मृतिग्रंथ आणि पुराणग्रंथ हे बहुशः अनुष्टुभ् छंदामध्यें लिहिलेले आहेत. अनुष्टुभ् वृत्त हें संस्कृतमधील फार सोईचें वृत्त आहे. तें पद्यांत पद्य हि आहे आणि गद्यांत गद्य हि आहे. तें रचण्याला सोपें आणि समजण्याला सुगम असल्यामुळें पुराणादिकांसारख्या ग्रंथाना तें फार सोईचें होतें. इतकें च नव्हे, तर कित्येक काव्यकारानीं हि आपलीं उत्कृष्ट काव्यें या वृत्तांत लिहिलेलीं आहेत. आणि संस्कृतमधील सुप्रसिद्ध अशा पंचमहाकाव्यांतील कित्येक उत्कृष्ट सर्गच्या सर्ग या वृत्तांत आहेत. तरी पण एवढें खरें कीं, पुष्कळ ठिकाणीं अनुष्टुभ् वृत्ताच्या ऐवजीं दुसरीं जास्त गोड गोड अशीं अक्षरगणवृत्तें योजण्यांत येत असत. परंतु काव्यांतून आर्या कोठें फारशा आढळून येत नाहींत. तथापि आर्या जरी संस्कृत काव्यांतून कोठें फारशा आढळल्या नाहींत, तरी संस्कृत नाटकांतून आर्या कोठें कोठें घातलेल्या आहेत. कालिदासाच्या नाटकांतून तर आर्या विशेष च येतात. तितक्या इतर नाटकांतून नाहींत. संस्कृतमधील आर्यात्मक काव्यें म्हटलीं म्हणजे आर्यासप्तशती वगैरे च होत. संस्कृतपेक्षां मागधी, शौरसेनी वगैरे प्राकृत भाषांतून मात्र आर्यावृत्ताचा प्रसार पुष्कळ दिसतो. सातवाहनाची गाथासप्तशती, वाक्पतीचा 'गउडवह' (गौडवध) वगैरे प्राकृत काव्यांमधून सगळ्या आर्या च भरलेल्या आहेत. असा प्राकृतामध्यें जरी आर्यावृत्ताचा भरणा पुष्कळ असला, तरी तो संस्कृतामध्यें तितक्या मानानें नाहीं. आणि संस्कृतमधून च मराठी भाषेचा मुख्यत्वेंकरून उगम झालेला

असल्याकारणानें बरे च दिवसपर्यंत मराठी काव्यरचना आर्येव्यतिरिक्त अवांतर वृत्तांमध्यें च चाललेली होती. संस्कृतमध्यें अनुष्टुभ हें जसें सर्वसाधारण वृत्त, तसें च मराठींतील ओवी हें वृत्त होय. पहावयाला गेलें, तर तें पद्य आहे. परंतु काव्यरचना करण्याला अगदीं गद्यासारखें सुलभ. भगवद्गीतेंतील अनुष्टुभ् वृत्तांतील श्लोक हे प्रथमतः मराठीमध्यें ज्ञानेश्वरींत या च ओव्यांच्या रूपानें ओविले गेले. ज्ञानेश्वरमहाराजानीं आपल्या मराठी भाषेला भगवद्गीता आणि ओवीवृत्त हीं दोन्हीं एकदम दिलीं. आणि तेव्हांपासून ही ओवी आपल्यामध्यें नांदत आहे. हिचा जन्म बहुधा संस्कृतमधील त्रिष्टुभ्, अनुष्टुभ् असल्या वृत्तांपासून झालेला असून हिच्यापासून पुढें अभंग वगैरे हिचीं च रूपांतरें मराठीमध्यें झालेलीं आहेत. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या मागून एकनाथ, मुक्तेश्वर, श्रीधर, महीपति इत्यादि कवीनीं ओवीछंदामध्यें च काव्यरचना करण्याचा प्रघात चालू ठेविला होता. या गोष्टीला अनुलक्षून च पंत आर्याभारताच्या शेवटीं एका आर्येमध्यें असे उद्गार काढतात कीं,

बहुमानील चि पूर्वप्रेमातें न त्यजूनि ओव्या ही;
आर्यांसि म्हणेल रसिक, अभिनव विहिणींस जेंवि 'ओ' व्याही.

परंतु नामदेव, तुकाराम वगैरेसारखे भगवद्भक्त कवि ओवीमध्यें थोडेंसें रूपांतर केलेल्या अभंगाकडे वळले; आणि वामनपंडित, रघुनाथपंडित, आनंदतनय, विठ्ठल वगैरेसारखे सहृदय कवि अक्षरगणवृत्तांकडे वळले. अशा रीतीनें ओवी थोडीशी मागें पडून अक्षरगणवृत्तें पुढें सरसावलीं, आणि त्यानीं आपल्या महाराष्ट्रभाषेला

पुष्कळ सौंदर्य आणि माधुर्य, प्रौढत्व आणि प्रतिष्ठितत्व आणून दिलें. पण आर्यादेवी महाराष्ट्रभाषेच्या रंगभूमीवर अद्यापि अवतीर्ण झालेली नव्हती; जणूं काय आर्यापति मोरोपंत यांची वाट पहात ती थांबून च राहिली होती! रघुनाथपंडितांच्या नलोपाख्यानामध्यें एकदोन आर्या आहेत. त्याशिवाय पूर्वींच्या प्रसिद्ध आणि प्रतिष्ठित मराठी काव्यांमधून आर्या उपलब्ध होत नाहींत. असें आर्यावृत्ताचें पूर्ववृत्त असल्यामुळें तें वृत्त मराठींत विशेष प्रचलित केल्याबद्दलचा मान पंताना देणें हें अगदीं योग्य आहे. पंताच्यासारख्या काव्यरचनेचा प्रौढपणा आणि अलंकारभार आपल्या अंगावर सहन करण्याला सुसंस्कृत आर्येशिवाय दुसरी कोण समर्थ असणार? आर्यावृत्त हें सरळ धांवतें वृत्त आहे. त्याच्या चरणांची मर्यादा बरी च विस्तृत आहे. आणि तें मात्रागणवृत्त असल्यामुळें त्यांत कवीचे हातपाय जखडले न जातां कविकल्पनेला पुष्कळ मोकळेपणा मिळतो. इतर वृत्तांची अशी गोष्ट नाहीं. जरी पंतानीं अनेक श्लोकवृत्तांमध्यें काव्यें लिहिलीं आहेत, तरी ही अडचण पंताना भासली होती च. श्रीमद्भागवतामध्यें "इति मतिरुपकल्पिता वितृष्णा भगवति सात्वतपुंगवे विभूम्नि" इत्यादि भीष्मानें केलेल्या कृष्णस्तुतीचे जे अत्यंत प्रेमळ असे पुष्पिताग्रा वृत्तांतील दहा श्लोक आहेत, त्यांच्यावर टीका करिताना भीष्मभक्तिभाग्यामध्यें पंतानीं पुढील उद्गार काढले आहेत.

भीष्मकृत श्रीकांतस्तुतिच्या टीकेसि वृत्त जरि तें च
अवलंबावें, तरि तें अडचण कांहीं तरी हि करितें च.

आणि म्हणून पंत म्हणतातः—

व्यास, शुक, शांतनव, या आर्यांची उक्ति, नुति हि आर्यांची.
आर्यांची आवड ही; लिहितों टीकेसि साधु आर्या चि.

आर्याभारताच्या प्रारंभीं वर दिलेलीं कारणें च मनांत आणून पंत लिहितातः—

व्यासकृत महाभारत लक्षग्रंथ प्रसिद्ध हा भारी
आर्यावृत्तें रचितों; स्वल्पांत चि आणितों कथा सारी.

पुढें भीष्मपर्वाच्या उपसंहारांत एकदां पंत या आर्यावृत्तासंबंधानें पुढीलप्रमाणें उद्गार काढतातः—

पुरुषा आर्यावृत्तें जैसी, ग्रंथा जया तसी मोटी
शोभा आर्यावृत्तें आली, भुलतील यास कविकोटी.

आणि आर्याभारताच्या स्वर्गारोहणपर्वाच्या शेवटीं फिरून पंतानीं या आर्यावृत्ताबद्दल पुढीलप्रमाणें उल्लेख केलेला आहेः—

छंदःशास्त्रीं आद्या सन्मान्या जसि सतीगणीं आर्या;
आर्या हे सद्रसिका, जेंवि शिवा ती तसो प्रिया आर्या.
अष्टादशपर्व जयग्रंथकथा आपणांत आर्यानीं
आणिलि, जसि आणावी आर्या बहुमान करुनि आर्यानीं.
शुद्धें अचंचळमनें अवलोकाव्या बुधें जशा आर्या,
निःशेषपापतापव्यापत्प्रशमार्थ या तशा आर्या.

या आर्यावृत्तासंबंधाच्या आर्याभारतांत आलेल्या आर्यांशिवाय पुढील नामसुधाचषकांतील आर्या हि अवलोकनीय आहेतः—

प्रकटी प्रथम भगीरथ नृप लोकीं सुरनदीस, ती आर्या
तसि हे मयूर; नाहीं तरि सर्वांला न दीसती आर्या.
उचित प्रचार भासो रसिकांस प्राकृतांत आर्यांचा;
युष्मद्वरें चि होतो सत्कार प्राकृतांत आर्यांचा.

५

गद्यें वोव्या सवया दोहांतें सर्व जाणती लोक;
श्लोक प्रिय त्यांस, जयां प्रसन्न तूं पुण्यपूर्वकश्लोक.
आर्यानाथा! आधीं छंदःशास्त्रांत पिंगळाचार्यों
आर्याराध्या देवा! त्वां चि पढविली मनोहरा आर्या.
आर्यासुधा बुधानीं आकंठ प्राशिली च धन्यानीं,
कानीं मात्र परिशिली होती हो! ती सती तदन्यानीं.
ते हे सुधा बुधानीं मज लुब्धाला दिली सदा त्यानीं,
केलों पात्र दयेला आधीं मग मीं किलीस दात्यानीं.

पंतांच्या पूर्वी आर्यावृत्ताचा प्रसार कितपत होता, याच्याबद्दलची हकीकत वर दिली च आहे. त्याशिवाय अलीकडे रामदासांच्या शिष्यमंडळापैकीं बयाबाई रामदासी या नांवाच्या एका बाईच्या कांहीं आर्या प्रसिद्धीस आलेल्या आहेत. रामदासांची शिष्यीण वेणाबाई, आणि वेणाबाईची शिष्यीण बयाबाई, अशी या बाईची परंपरा देण्यांत येते. त्यावरून ही बाई बहुतेक रामदासांच्या समकालीन च असली पाहिजे. हिच्या हल्लीं प्रसिद्ध झालेल्या आर्या सुमारें १५।१६ आहेत. परंतु एवढ्यावरून पंतांच्या पूर्वी मराठींमध्यें आर्यांचा प्रचार म्हणण्यासारखा होता, असें म्हणतां येणार नाहीं. थोड्याबहुत आर्या क्वचित् कोणी केलेल्या असतील; रघुनाथ पंडितानीं केलेल्या आर्यांचा उल्लेख आम्हीं हि वर केलेला च आहे. त्या व या बयाबाईच्या आर्या, याप्रमाणें आणखी हि कदाचित् अनुपलब्ध अशा किरकोळ आर्या असतील; परंतु त्या पंतांच्या वेळीं हि फारशा प्रसिद्ध आणि प्रतिष्ठित असतील, असें दिसत नाहीं. एरवीं ‘भगीरथराजानें या लोकामध्यें

गंगानदीला प्रथम प्रकट केलें, त्याप्रमाणें मयूरकवीनें ही आर्या प्रथम प्रकट केली; नाहीं तर ती कोणाला दिसली नसती.' अशा प्रकारचे उद्गार पंत काढतील, हें संभवनीय दिसत नाहीं. पंत हे आपल्यापेक्षां शंभरसवाशें वर्षांनीं जुने आहेत. तेव्हां पूर्वींच्या काळीं आर्यावृत्ताचा प्रसार मराठी भाषेच्या आर्यावर्तामध्यें कितपत होता, या मुद्यावर त्यांची साक्ष आपल्याला पुष्कळ मदत करील, यांत शंका नाहीं. या दृष्टीनें आर्यावृत्ताच्या नवीन प्रसारासंबंधाच्या उल्लेखाच्या येथें दिलेल्या व येथें न दिलेल्या सर्व आर्या तपासून पाहिल्या असतां हि हें आर्यावृत्त पंतानीं च जास्त प्रचारांत आणिलें, असें दिसतें. आतां पंतांच्या च बाबतींत पंतांची साक्ष योग्य होईल काय, असा एक प्रश्न कोणी काढील. परंतु पंतांचा स्वभाव सत्यापलाप करणारा खात्रीनें नाहीं. त्यांच्या पूर्वी आर्यांचा प्रसार करणारा कोणी प्रसिद्ध आणि प्रतिष्ठित कवि असता, तर त्याचें नांव त्यानीं खात्रीनें झांकून ठेविलें नसतें. ते कांहीं मत्सरी नव्हते. आपल्या पूर्वींच्या निरनिराळ्या कवींच्या अंगामध्यें जे जे विशिष्ट गुण असलेले त्याना आढळले, त्या सर्वांचा उल्लेख त्यानीं प्रांजळपणें केलेला आहे.

आनंदतनय अरणीकर शोभवि फार कवन यमकांहीं.
विठ्ठल कविच्या भलता लंघूं न शके चि चित्र कूटातें.

—सन्मणिमाला

रीति समश्लोकींची अतुला, साधेल काय अन्यास?
केली, भाषाकवि जे, त्यांची तों गर्वहानि यमकांहीं.

—वामनपंडितस्तुति.

या वर दिलेल्या आर्यांत आनंदतनयाचीं यमकें, विठ्ठल कवीचीं चित्र कूटें, वामनाचें समश्लोकी भाषांतर करण्याचें कौशल्य आणि यमक साधण्याचें नैपुण्य, इत्यादि गोष्टींचा उल्लेख पंतानीं अगदीं निरभिमान वृत्तीनें आणि पूज्य भावानें केलेला आहे. पंत स्वतः सर्वांहून उत्कृष्ट यमकें साधीत असून हि जर पूर्वकवि वामन आणि आनंदतनय यांच्या सामान्य यमकांची हि निर्मत्सरबुद्धीनें तारीफ करतात, तर त्यांच्या पूर्वी कोणी चांगला प्रसिद्ध आणि प्रतिष्ठित आर्याकवि असता, तर त्याचा मान आपल्याकडे हिरावून न घेतां, निर्मळ बुद्धीच्या पंतानीं त्याचा उल्लेख खात्रीनें केला असता. शिवाय पंतांचे समकालीन असे जे दुसरे लेखक आहेत, ते हि आर्येच्या प्रसाराचा मान पंतांस च देतात.

सुश्लोक वामनाचा, अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची,
ओवी ज्ञानेशाची, किंवा आर्या मयूरपंताची.

यांत राम बडवे यानीं आर्येच्या विशेषाचा मान पंताना च दिलेला आहे. व राजाराम प्रासादी यानें 'आर्याछंद देखून, व्यासादिक तुकिती मान,' असें वर्णन केलें आहे. या एकंदर गोष्टी लक्षांत घेतल्या असतां जरी पंतांच्या पूर्वींच्या कोठें कांहीं किरकोळ आर्या उपलब्ध झाल्या, तरी आर्याछंदाच्या प्रसाराचा प्रमुख मान पंतांस च देणें योग्य आहे, हें कोणी हि कबूल करील.

येणेंप्रमाणें आपल्या काव्यरचनेकरितां सोईचें असें आर्यावृत्त

प्राकृत.

पसंत करून त्यांत पंतानीं इतर काव्यांप्रमाणें जें आपलें आर्याभारत लिहिलें, त्याची भाषा प्राकृत च आहे, **या**

गोष्टीचा उल्लेख करण्यांत कांहीं विशेष नाहीं. परंतु पंतानीं या गोष्टीचा भीष्मपर्वाच्या उपसंहारामध्यें जो एक जातां जातां उल्लेख केला आहे, त्यांत मात्र विशेष आहे. तो उल्लेख असाः—

ग्रंथ प्राकृत दिसतो, परि न प्राकृत विलोकितां नीट.
गोपांत गोप भासे कृष्ण, परि नये चि पाहतां वीट!

अशा च कटाक्षाचे उद्गार मंत्ररामायणामध्यें हि प्राकृतासंबंधानें आले असून, ते फार सुंदर आणि वाचनीय आहेत. पूर्वींच्या काळची साधारणपणें अशी समजूत दिसते कीं, जो खरा पंडित, शास्त्री किंवा कवि असेल, त्याला जें कांहीं लिहावें असें वाटेल, तें त्यानें गीर्वाणवाणीमध्यें च लिहावें; एरवीं पंडितत्व प्रस्थापित होणें शक्य नव्हतें; व म्हणून च प्राकृतामध्यें ग्रंथ लिहिणें हें कमी दर्जाचें समजलें जात होतें. त्यामुळें ज्ञानेश्वरापासून मोरोपंतांपर्यंतच्या बहुतेक कवीश्वरांच्या काव्यामध्यें प्राकृतांत ग्रंथ लिहिल्याबद्दल क्षमायाचनपूर्वक कांहीं तरी प्रस्तावना केलेली आढळून येते. आणि तसा च प्रकार वरील आर्येमध्यें हि दिसतो. परंतु मराठी कवीना पांडित्यापेक्षां परोपकाराची अपेक्षा जास्त होती. आणि म्हणून च त्यानीं लोकोपकारार्थ प्राकृत ग्रंथ लिहिले. त्याना संस्कृत येत नव्हतें, म्हणून त्यानीं प्राकृत भाषेचा स्वीकार केला, असें मुळीं च नाहीं. मोरोपंत तर संस्कृत भाषेमधील फार च जाडे पंडित होते. काव्य, नाटक, अलंकारशास्त्र, वेदांत, ज्योतिष, धर्मशास्त्र, वैद्यशास्त्र, वगैरे अनेक शास्त्रांमध्यें त्यांची चांगली गति झालेली असल्याचें त्यानीं त्या त्या शास्त्रांवरील स्वहस्तानें

लिहून घेतलेल्या अनेक ग्रंथांवरून स्पष्ट होत आहे. मोरोपंत हे एक साधे पुराणिक होते, ही जी कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या वेळची कल्पना, ती हल्लीं इतकी समूळ नाहींशी झालेली आहे कीं, तिचें आतां पुनरुत्थापन करून खंडन करण्याची बिलकुल अवश्यकता उरलेली नाहीं.

नलगे व्याकरणाची न्यायाची घटपटादि खटपट ती;
वैकुंठ पेठ मोटी, नामावरि हीन दीन खट पटती.

असें एकाग्रानें भगवन्नामाचें माहात्म्य वर्णन करण्याच्या उद्देशानें इतर गोष्टींना स्वाभाविकपणें च गौणत्व देऊन म्हटलें असतां, त्याला न्यायमीमांसादिक शास्त्रांचा गंध हि नव्हता, असें म्हणणें म्हणजे वरील उद्गार काढणाराचा उघडा हेतु हि न समजण्यासारखें आहे. याशिवाय पंतांचीं 'पुनीते' (आदि० ३८–१३) आणि 'अनुष्ठितुम्' (आदि० ३१–२७) हीं दोन संस्कृत पदें व्याकरणशुद्ध नाहींत, असें हि सांगण्यांत येत असतें. पैकीं 'पुनीत' हा एक मराठी च शब्द आहे, असें घेतलें म्हणजे त्यावरील आक्षेप जातो; व हा च मार्ग काव्यसंग्रहकारानीं हि स्वीकारिलेला आहे. आतां दुसरा अशुद्ध शब्द जो 'अनुष्ठितुम्' त्यासंबंधानें काव्यसंग्रहकार लिहितात कीं, "हें रूप लेखकप्रमादानें पडलें असून पंतांचा मूळचा पाठ 'अनुष्ठिति' असा असावा." त्यांचेपाशीं अस्सल प्रत नसल्यामुळें त्यांचें हें लिहिणें ठीक होतें. परंतु सदर आर्येचा चरण पंतांच्या स्वहस्तलिखित पोथीमध्यें काढून पहातां तो

कथमेवमुक्तमदयं तदयं किमनुष्ठितुं क्षमो दयिते !

असा च स्पष्ट लिहिलेला आढळतो. तेथें कांहींएक खोडाखोडी

नाहीं, किंवा पाठभेद हि लिहिलेला नाहीं. दुसऱ्या कोणी पाठां-तर पाहिजे असल्यास सुचवावें. परंतु मूळांतील वस्तुस्थिति ही अशी आहे. परंतु ती तशी असली, म्हणून हल्लीं उपलब्ध झालेल्या नवीन विविध माहितीमुळें पंतांच्या अंगीं पांडित्य आणि शास्त्रज्ञत्व वसत नव्हतें, असें म्हणण्याचें धाडस कोणी हि कर-णार नाहीं. आतां पंतानीं स्वाध्यायासाठीं लिहून घेतलेल्या संस्कृत ग्रंथांची जी यादी त्यांच्या चरित्रग्रंथामध्यें दिलेली आहे, त्या यादीमध्यें व्याकरणशास्त्राचा ग्रंथ नाहीं, हें खरें आहे. पण कदा-चित् ती याद अजून हि अपुरी असेल, अथवा व्युत्पत्ति होण्या-इतकें व्याकरणाचें ज्ञान करून घेऊन पंत आपल्या आवडत्या शास्त्राकडे सरकले असतील, असें हि कदाचित् असेल; पण म्हणून काय झालें? ज्यानें व्याकरणशास्त्र म्हटलें आहे, तो च तेवढा शास्त्री, असें कांहीं शास्त्र नाहीं. अलंकारशास्त्र हें हि व्याकरण, न्याय, मीमांसा इत्यादिकांच्या तोडीचें च शास्त्र आहे. इतकें च नव्हे, तर या शास्त्रांची परिभाषा माहित असल्याशिवाय अलंकार-शास्त्रामध्यें नैपुण्य प्राप्त होणें हें शक्य च नाहीं. आणि पंतांची अलंकारशास्त्रामध्यें किती निपुणता होती, याची साक्ष त्यांच्या आर्या पदोपदीं पटवीत आहेत. पंतानीं प्राकृताप्रमाणें संस्कृतामध्यें हि कित्येक काव्यें फार सरस रीतीनें लिहिलेलीं आहेत; व त्यांवरून त्यांचें गीर्वाणभाषाकोविदत्व चांगलें दिसून येतें. अशा प्रकारच्या सर्व बाजूनीं निर्दोष आणि रमणीय काव्यामध्यें जर कोठें चुकून एखादा

दोष राहिला असेल, तर त्यावर कालिदासाच्या शब्दानीं आम्ही एवढें च म्हणतों कीं,

'एको हि दोषो गुणसंनिपाते निमज्जतींदोः किरणेष्विवांकः'

जरी पंतानीं हा आपला ग्रंथ प्राकृत भाषेमध्यें लिहिला आहे, तरी 'ग्रंथ प्राकृत दिसतो, परि न प्राकृत' या आर्येमध्यें त्यानीं जे उद्गार काढले आहेत, ते अनेक दृष्टीनीं अगदीं खरे आहेत. मोरोपंती आर्याभारत हा कांहीं सामान्य ग्रंथ नव्हे. त्याची योग्यता फार मोठी आहे. ती आपल्यामध्यें पूर्वीं यथार्थरीत्या समजली गेली नाहीं, हें आपलें दुर्भाग्य होय. संस्कृतांत कालिदासादिकांचीं जशीं रघुवंशादिक काव्यें आहेत, त्यांच्या च तोडीचें हें मराठीमधील महाकाव्य आहे. रघुवंशादिकांच्या धर्तीवर आपण महाकाव्यें रचावीं, असें धर्मसिंधुकार काशीनाथबावा पाध्ये यानीं पंताना एका पत्रांत लिहिलें असल्याची गोष्ट सुप्रसिद्ध आहे. आतां त्याप्रमाणें रघुवंशासारखें काव्य पंतानीं केलें नाहीं हें खरें; पण रघुवंशापेक्षां जास्त विस्तृत, जास्त सरस, आणि जास्त अलंकृत, असें आर्याभारतरूपी काव्य पंतानीं केलें. काव्याला लागणारे निर्दोषत्वादि धर्म, शब्दालंकार, अर्थालंकार आणि उत्कृष्ट परिपाक पावलेले नवविध रस, या सर्व गोष्टी पंतानीं आर्याभारतामध्यें साधल्या आहेत. अनुप्रास व यमकें यांची तर पंतांच्या काव्यांत इतकी गर्दी आहे कीं, पंतांची कविता मराठी रंगभूमीवर अवतीर्ण झाल्यानंतर 'यमक्या' हें विशेषण वामनाकडे अद्यापि कां कायम रहावें, हें च समजत

अलंकार.

नाहीं. पंतांच्या आर्येचा पहिला चरण रचला गेला कीं, लगे च ती एक प्रकारची समस्या बनून रहाते. पहिल्या चरणाच्या शेवटीं जीं अक्षरें आलीं आहेत, तीं च दुसऱ्या चरणाच्या शेवटीं आलीं पाहिजेत; पण त्यांचा अर्थ मात्र भिन्न असला पाहिजे; आणि पूर्वापर कथासंबंध तर सुटतां कामा नये; इतकीं धोरणें संभाळून ही समस्या पूर्ण केली पाहिजे; अशी स्थिति बहुधा प्रत्येक आर्येचा पहिला चरण तयार झाल्याबरोबर उत्पन्न होते. उदाहरणार्थ उद्योगपर्व, अध्याय १०, आर्या ८१, यांतील कर्णानें कृष्णाला दिलेल्या उत्तराचा पहिला चरण घ्या;

मातृत्यक्ता मजला राधाहस्तीं दिलें अधिरथानें,

हा चरण घेऊन शेवटचें यमक चार अक्षरानीं जुळवून, अर्थहानि होऊं न देतां कथासंदर्भ संभाळून रसपरिपोष करणारी समस्या दुसऱ्या चरणाच्या रचनेनें परिपूर्ण करावयाची, अशी कल्पना आपल्या मनापुढें मांडावी, व त्यासाठीं प्रयत्न करावा, आणि मग

मज पाजाया प्रेमें पय पळ धरिती तिचीं न धिर थानें.

या पंतांच्या चरणाशीं आपला चरण ताडून पहावा, म्हणजे पंतांच्या श्रमाची, बुद्धीची, कल्पकतेची आणि सहृदयतेची कांहीं तरी कल्पना आपल्याला येईल. अशा अद्भुत समस्या पंतानीं बहुधा प्रत्येक आर्येमध्यें पूर्ण केल्या आहेत. परंतु अनुप्रास आणि यमकें यांच्यापेक्षां पंतांचे अर्थालंकार पाहिले, म्हणजे तर मर्मज्ञांची दृष्टि अगदीं दिपून जाते. इतकें अलंकाररत्नभांडार आणि इतकी अर्थसंपत्ति कोणत्या हि कविराजाच्या कोशामध्यें क्वचित् च

सांपडेल. कवितेच्या पूर्वार्धामध्यें प्रस्तुत कथेची कांहीं तरी गोष्ट सांगून उत्तरार्धामध्यें बहुधा तिच्या अंगावर एकादा अत्युत्कृष्ट असा अलंकार चढवून द्यावयाचा, ही जी कालिदासादिकांची पद्धत, ती च पंतांच्या काव्यामध्यें प्रायशः दृष्टिगोचर होते. निर्णय-सागरच्या आवृत्तीमध्यें टीपांतून हे अलंकार बरे च दाखवून दिलेले आहेत. तरी पण, पंतांचें कविश्रेष्ठत्व प्रस्थापित करण्या-च्या हेतूनें कै० नारायण चिंतामण केळकर यानीं सदर आवृत्तींतील शल्यपर्वापासून अत्यंत परिश्रम करून अलंकारांचीं जीं परिशिष्टें तयार केलीं आहेत, तीं पहावीं. त्यांतील कोष्टकांवरून कोणाच्या हि हें लक्षांत येईल कीं, बहुतेक आर्यांच्या अंगावर पंतानीं कांहींना कांहीं तरी अलंकार घातलेले आहेत च. पंतांच्या जामदारखान्याची ही यादी जो लक्षपूर्वक पाहील, तो आश्चर्यानें थक्क झाला च पाहिजे. कै० राजाराम रामकृष्ण भागवत यानीं हि मोरोपंतांच्या आर्याभारतांतील काव्यालंकारांसंबंधानें एक पद्धतशीर आणि सुलभ पुस्तक लिहिलें आहे. अलंकारशास्त्रज्ञ या नात्यानें पंताची किती मोठी योग्यता आहे, हें ज्याना समजून घ्यावयाचें असेल, त्यानीं शास्त्रीबुवांचें हें पुस्तक अवश्य वाचावें; म्हणजे त्याना अलंकार हि समजतील, आणि पंतांचे गुण हि समजतील. सदर पुस्तकाच्या लहानशा प्रस्तावनेमध्यें शास्त्रीबुवा मोरोपंतांसंबंधानें असा अभि-प्राय देतात कीं, 'मोरोपंतासारखा देशी कवि पूर्वीं झाला नाहीं, हल्लीं नाहीं, पुढें हि होण्याचा फारसा संभव नाहीं.'

पंतानीं आर्याभारत लिहितांना महाभारताचा आश्रय घेतला होता, यामुळें महाभारतांतील रसनिष्पत्तीचा फायदा त्याना आयता च मिळाला. परंतु त्याबरोबर त्यांच्याकडे कांहीं टीकाकारांच्या मतें एक कमीपणा हि आला. तो असा कीं, पंत हे त्यामुळें एक भाषांतरकार म्हणून गणले जाऊं लागले. पंतानीं आर्याभारतामध्यें ज्या लिहिल्या, त्या मूळ संस्कृत महाभारतामध्यें आहेत, एवढी च गोष्ट ज्यानीं वरवर पाहिली, त्यानीं च फक्त मोरोपंतांवरती भाषांतरकर्तृत्वाचा आक्षेप उत्थापित केलेला आहे. परंतु तो अगदीं निराधार आहे. मोरोपंतानीं महाभारतांतील मूळ कथा आधारापुरती घेतली, हें खरें; परंतु त्यामध्यें आपल्या चातुर्यानें, सहृदयतेनें, आणि कवित्वानें नवीन कल्पनांची, नवीन अलंकारांची आणि नवीन मोहकपणाची नवीन भर किती घातली आहे, हें महाभारत आणि आर्याभारत यांची तुलना केल्यानें च लक्षांत येण्यासारखें आहे. अशी थोडीशी तुलना कै० ना. चिं. केळकर यानीं शल्यपर्वापासून करून दाखविलेली आहे. ती जरी थोडीशी च आहे, तरी वरील मुद्यासंबंधानें कोणाची हि खात्री पटवून देण्याला ती पुष्कळ आहे, यांत शंका नाहीं. त्यावरून हें स्पष्ट दिसून येईल कीं, पंतानीं फक्त कथाभागाचा च काय तो आधार महाभारतापासून घेतलेला आहे. आणि असे आधार कोणी घेतलेले नाहींत? संस्कृतमधील कविकुलगुरु जो कालिदास त्याचीं 'रघुवंश' आणि 'कुमारसंभव' हीं दोन उत्तम काव्यें हि जुन्या कथांच्या आधारावर च रचलेलीं आहेत. संस्कृतमधील

भाषांतर?

उत्तम नाटककार जो भवभूति त्याचीं 'महावीरचरित' आणि 'उत्तर-रामचरित' हीं नाटकें हि जुन्या कथांच्या आधारावर च लिहि-लीं आहेत. असलीं आपल्यामधील उदाहरणें आणखी किती तरी दाखवितां येतील. किंबहुना, आपलें बहुतेक जुनें वाङ्मय अशा च तऱ्हेचें आहे. परंतु याच्यापेक्षां हि विशेष आश्चर्य करण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे इंग्रजीमधील सुप्रसिद्ध कवि शेक्स्पिअर याची आहे. हा कवि स्वतंत्र कल्पनेचा होता, याबद्दल कोणी शंका सुद्धां घेण्याला धजणार नाहीं. तरी पण शेक्स्पिअरनें जुन्या रोमन आणि इंग्लिश इतिहासाच्या आधारावर जीं नाटकें लिहिलीं आहेत, त्यांतील कित्येक भाषणें 'प्लूटार्क'च्या चरित्रांतून आणि 'हॉलिन्शेड'च्या बखरींतून जशीं आहेत, तशींच्या तशीं च शेक्स्पिअरनें दिलेलीं आहेत. आणि तरी हि त्याच्या उत्तम-पणांत यत्किंचित् हि कमीपणा आलेला नाहीं, किंवा तें भाषांतर आहे म्हणून त्याला कोणी दूषण हि दिलेलें नाहीं. सारांश, स्वतंत्र कल्पनेच्या कवीनें आपला कथाभाग कोठून घेतला आहे, हा वास्तविक खऱ्या महत्त्वाचा प्रश्न नसून, त्यानें आपल्या कार्या-करितां घेतलेला कथाभाग कशा रीतीनें रंगविला आहे, आणि त्या योगानें तो आपल्या वाचकाना किती तल्लीन करून सोडीत आहे, या गोष्टी टीकाकारानीं मुख्यतः लक्षांत घेतल्या पाहिजेत. आणि अशा दृष्टीनें पंतांच्या आर्याभारताकडे पाहिलें, तर आर्याभारतां-तील वीररसानें स्फुरण पावणारे बाहु आणि करुणरसानें अश्रु ढाळणारे नेत्र हे

धन्य श्रीराम पिता, धन्या लक्ष्मी प्रसू जगीं झाली,
आली सत्यवतीची, कीं, भारतकीर्ति सुतमुखीं आली.

असा मोरोपंतांविषयींचा धन्यवाद प्रत्येक मुखांतून स्वयंस्फूर्तीनें बाहेर काढतील, यांत शंका नाहीं. शिवाय मोरोपंतांच्या वेळच्या परिस्थितीकडे पाहिलें असतां, त्या वेळच्या अभिरुचीला हि कदाचित् असले च कथाभाग अवश्यक असतील. संशयरत्नमालादि रचणारे मोरोपंत रसिक नव्हते, किंवा त्याना स्वतंत्र कल्पनेचे नाटकादिक सुप्रबंध रचतां आले नसते, असें मुळीं च नसून, बहुधा लोकप्रवृत्ति च त्या वेळीं याच्या थोडीशी उलट असावी, असें,

घातूंत जसें हाटक, नाटक वर सर्व सुप्रबंधांत;
तें अरसिकांत संप्रति निष्फळसें, मुकुर जेंवि अंधांत.

या 'श्रीरामरीती 'मधील आर्येतील 'संप्रति ' या पदावरून उघड होत आहे.

परीक्षण. असल्या उत्कृष्ट काव्याचें स्वागत जितक्या प्रेमानें आणि जितक्या आदरानें आपल्या महाराष्ट्रवाङ्मयाच्या मंदिरामध्यें व्हावयाला पाहिजे होतें, तितक्या प्रेमानें आणि तितक्या आदरानें तें झालें नाहीं, असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. जन्मकाळापासून च आपल्या कवीच्या काव्याला थोडेसे अनिष्ट ग्रह लागलेले होते, असें म्हटल्यास हरकत नाहीं. मोरोपंतासारख्या अद्वितीय कविरत्नाला त्या वेळचे राजे जे पेशवे त्यांच्या शिरोभागीं च आश्रय पाहिजे होता. परंतु तसा योग आला नाहीं. उलट राजविरोध मात्र उत्पन्न झाला. आणि दुसऱ्या

बाजीराव पेशव्यांच्या राजवाड्यांतील कीर्तनांत मोरोपंती आर्यांवर बहिष्कार पडण्यापर्यंत वेळ आली. पंताना बाबूजी नाईक बारामतीकर यांचा चांगला आश्रय मिळाला होता, व तेथें त्यांचें कांहीं एक कमी नव्हतें, हें खरें आहे. परंतु बाबूजी नाईक आणि पेशवे यांच्या दरम्यान फारसा स्नेहभाव नांदत नव्हता. सातारकर भोसले, पंतप्रतिनिधी, बाबूजी नाईक वगैरे मंडळी पेशव्यांच्या विरुद्ध असलेल्या पक्षाकडील होत. आणि असल्या पक्षाशीं पंतांचा संसर्ग झालेला होता. तसें च पंतांचे निकटसंबंधी अनंत पाध्ये, काशीनाथ पाध्ये वगैरे मंडळींच्या मनामध्यें हि कांहीं खासगी वृत्तीच्या वादामुळें पेशव्यांच्याबद्दल फारसें प्रेम वसत नव्हतें. अशा रीतीनें पेशव्यांविषयीं थोडीफार प्रतिकूल मनोवृत्ति असलेल्या लोकांच्या गोटामध्यें मोरोपंतांची कविता प्रसव आणि प्रसार पावत होती, ही एक विषाद वाटण्यासारखी गोष्ट आहे.

असो; अशा प्रतिकूल परिस्थितीमध्यें आपलीं काव्यें लिहून नंतर शके १७१० सालीं पंत काशीयात्रेस गेले. त्या वेळीं त्यानीं आपल्याबरोबर आपलें काव्य नेलें होतें. व तें त्यानीं काशींतील पंडितांपुढें मांडलें. पंतांची अशी इच्छा कीं, काशींतील पंडित हे महाविद्वान् आहेत, तेव्हां त्यांचेकडून आपल्या ग्रंथांचें योग्य परीक्षण होऊन गुणग्रहण व्हावें. परंतु काशींतील पंडितानीं काय केलें? आख्यायिका अशी आहे कीं, आपल्या ग्रंथाचें सूक्ष्म परीक्षण आणि आपल्या गुणांचें योग्य ग्रहण व्हावें अशा आशेनें आणि उत्सुकतेनें पंतानीं आपले ग्रंथ त्या काशींतील

पंडितांच्या पुढें ठेविले असतां त्या पंडितानीं एक काडी (शलाका) घेऊन त्या पोथीच्या मध्यें घातली; इतक्यांत काय चमत्कार झाला! एकदम पुढें दिलेल्या आर्या निघाल्याः—

वदवि मयूराकरवीं श्रीराम विराटपर्व चवथें बा!
स्वल्प म्हणोनि न सोडी अमृताची शक्ति सर्व चव थेंबा.
रामघन सत्प्रसादामृत जों जों बहु वळूनि वर्षतसे,
तों तों भक्तमयूर स्वार्याकेका करूनि हर्षतसे.

त्या आर्या पाहून काशींतील पंडित खुष झाले, आणि पंतांच्या कवितेची वाहवा झाली. पण असल्या परीक्षेंत काय अर्थ आहे? आणि ती परीक्षा तरी कसली? कोठें तरी काडी घालून कोठल्या तरी कविता काढावयाच्या आणि त्यांवरून एकंदर काव्याचा चांगलेवाईटपणा ठरवावयाचा, ही पुस्तकपरीक्षणाची पद्धत काशीं-तील पंडिताना हि मोठीशी भूषणास्पद नाहीं, आणि पंताना हि ती फारशी समाधानकारक वाटली असेल, असें वाटत नाहीं. तरी पण, पंतांच्या वेळेपासून त्यांच्या कवितेची चोहोंकडे ख्याति होत चालली होती, यांत संशय नाहीं. परंतु त्याबरोबर त्यांच्या कवितेचा दूषक वर्ग हि अस्तित्वांत आलेला होता, असें

आर्येला मानियलें बहु पाहुनि सज्जनीं चमत्कृतिला
खळ चि न मानिति तैसे बहु दूषणसज्ज नीच मत्कृतिला.

—सभापर्व.

या आर्येवरून दिसून येतें. ही जी पंतांच्या वेळची त्यांच्या काव्याबद्दलची स्थिति सुमारें १००।१२५ वर्षांच्या पूर्वीं होती, ती च स्थिति सुमारें २५।३० वर्षांच्या पूर्वीं हि झालेली होती;

आणि पंतांवर व त्यांच्या कवितेवर नानाप्रकारचे आक्षेप लादण्यांत आलेले होते. परंतु सुदैवानें ती स्थिति हल्लीं नाहींशी झालेली आहे, आणि सोनें जसें तावून सुलाखून कसोटीला लावलें जातें, त्याप्रमाणें पंतांच्या कवितेचें अध्ययन आणि परीक्षण होऊन तिची अद्वितीय योग्यता पूर्णपणें प्रस्थापित झाली आहे. कोठें तरी काडी घालून आणि कोठल्या तरी एकदोन आर्या वाचून मोरोपंतांच्या काव्याचें हल्लींच्या काळांतील परीक्षण झालेलें नसून तें अगदीं शास्त्रीय आणि सप्रमाण झालेलें आहे. अशा मजबूत पायावर उभारलेली पंतांच्या कीर्तिमंदिराची इमारत जोंपर्यंत महाराष्ट्रभाषा आहे आणि ती भाषा बोलणारे महाराष्ट्रीय लोक आहेत, तोंपर्यंत अव्याहतपणें कायम टिकेल, यांत शंका नाहीं!

पुणें, विजयादशमी
शके १८३४. } **शिवराम महादेव परांजपे.**

विषयानुक्रमणिका.

१. आदिपर्व. (पद्यसंख्या २४७९).

अध्याय १ ला; (पृ० १):—नमन (**गीति** १–८); विषयोपन्यास (९–१०); सौतीचा भारतकथनारंभ (११–१९); भारताचें पूर्ववृत्त (२०–२२).

अध्याय २ रा; (पृ० ४):—जनमेजयास सरमेचा शाप (१–६); सोमश्रव्याचा पौरोहित्यस्वीकार (७–१४); आरुणिपरीक्षा (१५–२५); उपमन्यु-परीक्षा (२६–५२); वेदपरीक्षा (५३–६५); उत्तंकचरित:–पौषराजकथा–ताटंक-हरण व सर्पसत्र (६६–१३८);

अध्याय ३ रा; (पृ० १७):—भृगुवंशकथन (१–२); च्यवनोत्पत्ति-कथा:–पुलोमाहरण–अग्नीस शाप व तत्क्रोधसांत्वन (४–२५); रुरुचरित (२६–६०).

अध्याय ४ था; (पृ० २३):—जरत्कारुकथा (१–२१); सर्पोत्पत्ति, अरुणोत्पत्ति, अमृतमथन, विनतादास्य, गरुडचरित (२२–१७२).

अध्याय ५ वा; (पृ० ४०):—शापनिवारणार्थ शेषाचें तप व विधि त्यास प्रसन्न होऊन धराभार देतो (१–११); शापनिवारणार्थ नागांची उपायचर्चा (१२–२४); एलापत्राचें भाषण, विधिभाषणकथन, धार्मिकास अभयदान व तदर्थ जर-त्कारूस वासुकिकन्येच्या दानाची अवश्यकता (२५–३४); ब्रह्मदेवाचा वासुकीस दुहितादानार्थ उपदेश (३५–३८); परीक्षिन्मृगानुगमन व प्रत्युत्तराप्राप्तीमुळें शमीकाविडंबन (३९–४७); शृंगीचा परीक्षितीस शाप (४८–५६); शमीक परीक्षितीस शाप कळवितो (५७); परीक्षिति एकस्तंभप्रासादांत सहा दिवस घालवितो (५८–६०); काश्यपतक्षकसंवाद व परस्परप्रभावप्रकटन (६१–७६); फळकीटकरूप तक्षकद्वारा सप्रासादपरीक्षिन्नाश (७७–८९); जनमेजया-भिषेक (९०–९१); जरत्कारुविवाह (९२–९३); निद्राभंगरूप अप्रिय निमित्तामुळें पत्नीत्याग (९४–१०६); सर्वांचें सांत्वन–आस्तीकजन्म (१०७–११५);

अध्याय ६ वा; (पृ० ५१):—परीक्षिन्मृत्युकथा–जनमेजयाचा सर्पसत्र-निश्चय–सूतकृत ‘विप्रनिमित्तें यज्ञासिद्धि’ असें भविष्य–सर्पसत्रारंभ (१–१५).

अध्याय ७ वा; (पृ० ५२):—जनमेजयाच्या सर्पसत्राचा आरंभ (१–६); आस्तीककृत वासुकिभयानिवारण (८–१६); आस्तीकसर्पसत्रागमन व राजस्तुति (१७–३४); तक्षकहवन (३६–५०); आस्तीकप्रार्थनेमुळें सत्रसमाप्ति (५१–६०); आस्तीकगौरव व त्यास वासुकीचा वर–सर्पसत्रसमाप्ति (६१–६९).

अध्याय ८ वा; (पृ० ५९):—शौनकसूतप्रश्नोत्तरें (१–६); उपरिचर-वसुचरित व सत्यवतीजन्म (७–२७); व्यासजन्म (२८–४६); कृष्णरामभीष्मादींची उत्पत्ति (४७–६५).

अध्याय ९ वा; (पृ० ६५):—सूर्यचंद्रवंशोत्पत्ति (१–५); कचदेवयानी-आख्यान (६–५४);

अध्याय १० वा; (पृ० ७०):—कचकृत देवयानीपरित्याग व स्वर्गगमन (१–१५); शर्मिष्ठा व देवयानी यांच्यांत इंद्र कलह लावितो, देवयानीक्रोध व सांत्वन (१६–७२); ययातिदेवयानीविवाह (७३–९२); यदुजन्म (९३–९६).

अध्याय ११ वा; (पृ० ८०):—शर्मिष्ठागांधर्वविवाह व द्रुह्युजन्म (१–१७); शर्मिष्ठादेवयानीसंवाद (१८–२४); शर्मिष्ठापुत्र आणि देवयानीची यांची भेट (२७–३३); देवयानीकोपप्रश्न व शर्मिष्ठोत्तर (३६–४२); देवयानीचा पतिगृहत्याग व शुक्राचा ययातीस शाप व उःशाप (४३–६३); पूरुकृत ययातिजरास्वीकार (६५–६९); पूरूस राज्यप्राप्ति व ययातीचें वनगमन (७०–७२); ययातीचें स्वर्गारोहण, आत्मस्तुतीमुळें पतन व सत्समागमद्वारा उद्धार (७३–८६).

अध्याय १२ वा; (पृ० ८९):—दुष्यंतशकुंतलाख्यान (१–९८):–शकुंतलाकथितस्वजन्मवृत्तांतर्गत विश्वामित्रमेनकाख्यान (१४–३५); दुष्यंतशकुंतला-समागम–भरतजन्म–दुष्यंतकृत शकुंतलेचा अस्वीकार–आकाशवाणीनंतर स्वीकार–भरतराज्यपदलाभ–भरतवंशविस्तार (३६–९८).

अध्याय १३ वा; (पृ० ९९):—महाभिषराजोपाख्यान (१–८); वसूपाख्यान (९–१६); प्रतीपगंगासंवाद (१७–२६); शांतनुराज्यपदप्राप्ति (२७–३६); शांतनुगंगाविवाह (३७–४४); गंगाक्रोध व भीष्मासह अंतर्धान (४५–५७); भीष्मपुनरागमन व राजपदप्राप्ति (५८–७२); भीष्म शांतनुसत्यवतीविवाह घडवून आणितो (७३–१००).

अध्याय १४ वा; (पृ० १०९):—चित्रांगदविचित्रवीर्यचरित्र (१–१९).

अध्याय १५ वा; (पृ० १११):—वंशवृद्ध्यर्थ भीष्मास सत्यवतीचा उपदेश व त्याचें उत्तर (१–१०); भीष्माची सूचना (११–१८); सत्यवतीचें अनुमोदन व व्यासप्रार्थना (१९–३०); धृतराष्ट्र, पांडु व विदुर यांचें जन्म (३१–५८); मांडव्यऋषिकथा (५९–७८).

अध्याय १६ वा; (पृ० ११९):—पांडूस राज्यप्राप्ति, भीष्मविदुरविचार व धृतराष्ट्रगांधारीविवाह (१–१५).

अध्याय १७ वा; (पृ० १२१):—कुंतीदत्तविधान (१–३); कुंतीस दुर्वासाचें वरदान (४–५); कर्णोत्पत्ति (६–१५); कर्ण 'राधेय' होतो (१६–१८); पांडुकुंतीविवाह (१९); माद्रीपांडुविवाह (२०–२७); पांडुदिग्विजय (२८–३५); पांडुहिमाद्रिगमन (३६–३८); विदुरविवाह (३९).

अध्याय १८ वा; (पृ० १२५):—गांधारीस 'शतपुत्र होतील' असें व्यासवरदान व शतपुत्रोत्पत्ति (१–११); दुर्योधनजन्मवर्णन (१२–२२); युयुत्सुजन्म (२४–२६).

अध्याय १९ वा; (पृ० १२८):—हरिणरूप किंदमऋषीचा पांडुकृत वध व पांडूस शाप (१–१०); पांडूची सस्त्रीक तपश्चर्या (११–२८); मुनिभाषणोत्पन्न अनपत्यत्वदुःख व कुंतीशीं भाषण (२९–३८); व्युषिताश्वकथा (३९–४५); उद्दालककृत धर्ममर्यादा (४६–५४); पुत्रोत्पत्त्यर्थ पांडूची कुंतीस प्रार्थना (५५–६१); धर्मजन्म (६२–६७); भीमजन्म (६८–७३); अर्जुनजन्म (७४–८७); माद्रीशोक—माद्रीस मंत्रशिक्षा व नकुलसहदेवोत्पत्ति (८८–१००).

अध्याय २० वा; (पृ० १३७):—कामातुर पांडूचा माद्रीसह विहार व मरण (१–७); कुंतीमाद्रीविलाप व माद्रीचें सहगमन (८–१६); कुंतीचें सपुत्र हस्तिनापुरागमन व पांडूची उत्तरक्रिया (१७–२३); व्यास सत्यवतीस भावी अनर्थ सांगतात व उभय सुनांसह सत्यवती उत्तमलोकास जाते (२४–२६).

अध्याय २१ वा; (पृ० १४०):—भीमाचा पराक्रम (१–६); जलक्रीडासमयीं कौरव भीमास विषान्न चारून गंगेंत बुडवितात (७–१८); भीमाचें नागलोकीं गमन, सत्कार व शक्तिप्राप्ति (१९–३१); कुंतीचा शोक व विदुरबोध (३२–३८); धर्माचा बंधूंस सावध राहण्याबद्दल इषारा (३९–४४).

अध्याय २२ वा; (पृ० १४५):—शरद्वानकथा—तपोविघ्नार्थ इंद्र अप्सरा

पाठवितो (१–४); 'कृप' व 'कृपी' यांचें जन्म व शंतनुकृत त्यांचें परिपालन (५–८); शरद्वान कृपास धनुर्वेद पढवितो (९–१०); कृप कौरवपांडवांस धनुर्विद्या शिकवितात (११–१२).

अध्याय २३ वा; (पृ० १४६):—भरद्वाजघृताचीकथा व द्रोणजन्म (१–४); द्रोणचरितः—द्रोणद्रुपदस्नेह (६); द्रुपदराज्यप्राप्ति (७); द्रोणकृपीविवाह व अश्वत्थामाजन्म (८–९); परशुरामप्रार्थना व त्याजपासून धनुर्वेदप्राप्ति (१०–१९).

अध्याय २४ वा; (पृ० १४९):—द्रुपदकृत द्रोणापमान (१–६); द्रोण हस्तिनापुरीं येऊन अर्जुनास गुप्त रीतीनें अस्त्रविद्या शिकवितो (७–८); कौरवपांडवांची विहिरींत पडलेली विटी द्रोण गवताच्या काडीनें काढितो (९–१७); भीष्मकृत द्रोणसन्मान (१८–२१); भीष्माप्रत द्रुपदकृतावमान व स्वागमनहेतु यांचें कथन (२२–३९); द्रोणाला कौरवपांडवगुरुपदप्राप्ति (४०–४३); द्रोणेच्छा तृप्त करण्याची अर्जुनप्रतिज्ञा (४४–४६).

अध्याय २५ वा; (पृ० १५४):—अर्जुनादींचें द्रोणाजवळ विद्यासाधन, अर्जुनपरीक्षा व प्राविण्य (१–२१); एकलव्यकथा (२२–४९); द्रोण एकलव्यास शिकविण्याचें नाकारितात—त्याचें मृन्मय गुरूजवळ विद्यासाधन, अद्वितीय प्राविण्यदर्शन (२८–३४); अर्जुनविषाद—एकलव्यापाशीं द्रोण दक्षिणहस्तांगुष्ठ गुरुदक्षिणा म्हणून मागतात—तो ते देतो (३५–५०); द्रोणकृत शिष्यपरीक्षा व अर्जुनास ब्रह्मास्त्रदान (५०–५६).

अध्याय २६ वा; (पृ० १६०):—रंगयुद्ध (१–४); भीमदुर्योधन-गदायुद्ध (५–१०); अर्जुनयुद्धकौशल्य (११–१७); कर्णकौशल्य (१८–२७); कर्णाची द्वंद्वयुद्धसूचना, अर्जुन व कर्ण यांचें भाषण (२८–३६); युद्धाची सिद्धता (३७–४२); कृपाचें कर्णाशीं मर्मभेदक भाषण (४३–४६); कर्णास अंगदेशराज्य-दान (४७–५३); भीमाचें कर्णाशीं कटुभाषण व दुर्योधनाचें कर्णमंडनपर उत्तर (५४–७३); सूर्यास्तामुळें युद्ध टळतें (७४–७७).

अध्याय २७ वा; (पृ० १६८):—द्रोण 'द्रुपदपराभव' ही च गुरु-दक्षिणा मागतात (१–२); कौरव पुढें जातात व द्रोण मागें राहतात (३–५); अर्जुनाचें द्रोणाशीं भाषण (६–८); कौरवपराभव (९–१२); पार्थकृत द्रुपदपराभव (१३–२४); द्रोणद्रुपदसंवाद (२५–३१); द्रुपदास अर्धराज्यदान, त्याचा अंतःसंताप व द्रोणनाशार्थ प्रयत्न (३२–३५).

अध्याय २८ वा; (पृ० १७२):—युधिष्ठिरास यौवराज्याभिषेक व पांडवदिग्विजय (१–४); धृतराष्ट्रचिंता, काणिकनीति व तदंतर्गत जंबुककथा (५–२८).

अध्याय २९ वा; (पृ० १७५):—धर्मगुणवर्णन (१–५); तन्निमित्त कौरवविषाद व दुर्योधनादींचा धृतराष्ट्राशीं कुमंत्र (६–२७); पांडव यात्रेनिमित्त वारणावतास जातात (२८–३९); पौरजनशोक (४०–४५); विदुरोपदेश (४६–५२); पांडवांचा लाक्षागृहवास (५३–६०); विवरसिद्धि व पलायनविचार (६१–६२); कुंतीव्रतनिमित्त विप्रभोजन, निषादागमन, लाक्षागृहदाह, पांडवांची सुटका व वनप्रवेश (६३–७६).

अध्याय ३० वा; (पृ० १८३):—पांडवदहनामुळें पौरविलाप (१–७); कुंतीतृषा व भीमेतर पांडवांची निद्रा (९–१४); भीमक्रोधोद्गार (१५–१९); हिडिंबागमन व तिचें मोहित होऊन भीमाशीं भाषण (२१–२६); भीमाचें उत्तर (२७–३१); हिडिंबासुरागमन व भीमाशीं युद्ध (३२–३६); कुंतीहिडिंबासंवाद (३८–४८); हिडिंबवध (४९–५३); हिडिंबास्वीकार व घटोत्कचजन्म (५४–६४).

अध्याय ३१ वा; (पृ० १९०):—व्यासोपदेशानुसार पांडव एकचक्रा-नगरींत विप्रगृहीं रहातात (१–९); विप्रसंकटनाशार्थ भीमाशीं कुंतीचें भाषण (१०–१३); विप्र व तत्स्त्रीसंवाद (१४–२७); विप्रकन्या व पुत्र यांचीं भाषणें (२८–३३); कुंतीविप्रसंवाद (३४–४६); युधिष्ठिरकुंतीसंवाद (४९–५७) भीमबकयुद्ध व बकवध (५८–६७); पौरानंद व ते विप्रापासून वृत्त समजावून घेतात (६८–७५).

अध्याय ३२ वा; (पृ० १९८):—विप्र पांडवांस द्रौपदीविवाहवार्ता सांगतो (१–४); धृष्टद्युम्नद्रौपदीजन्मकथा (५–२५); द्रोण धृष्टद्युम्नास विद्या शिकवितो (२६–२७).

अध्याय ३३ वा; (पृ० २०१):—व्यास पांडवांस द्रौपदीचें पूर्ववृत्त सांगून तत्प्राप्त्यर्थ द्रुपदपुरीं जाण्यास सांगतात (१–८); वाटेंत अंगारपर्ण गंधर्व व पार्थ यांचें युद्ध, गंधर्वपराभव व अर्जुनास चाक्षुषीविद्यादान (९–२६); अर्जुनगंधर्वप्रश्नोत्तरें (२७–३२); पांडवांस 'तापत्य' म्हणण्याचें कारण व कुरुपिता संवरण व तपती यांची विवाहकथा गंधर्व सांगतो (३३–५९).

अध्याय ३४ वा; (पृ० २०७):—गंधर्व पार्थास वसिष्ठकथा सांगतो—विश्वामित्रकृत धेनुहरणप्रयत्न (१–३२); विश्वामित्राचा उद्वेग व ब्राह्मण होणें (३३–

४०); कल्माषपादद्वारा वसिष्ठशतसुतनाश (४१–५१); वसिष्ठप्राणत्यागप्रयत्न (५२–५६); गर्भस्थ 'पराशर' (वसिष्ठाचा नातु) याची कथा व वसिष्ठमरणेच्छानिवृत्ति (५७–६३); कल्माषावर वसिष्ठकृपा (६४–६९); पराशरमातासंवाद (७०–७४); वसिष्ठ पराशरास शांति उपदेशितो (७५–८५); पराशराचें सत्र (८६–८७); पुलस्त्याचें सत्रोपशमार्थ पराशराशीं भाषण (८८–९४); गंधर्वानुमतें पांडव धौम्यास पुरोहित करितात (९५–१०१);

अध्याय ३५ वा; (पृ० २१९):—पांडव द्रुपद्रपुरींत कुलालशाळेंत रहातात (१–४); अनेकविप्रनृपागमन—द्रुपदाचा अर्जुनाकडे ओढा व घोर पण (५–१०); धृष्टद्युम्न बहिणीस सभेंत आणितो, सर्वांस पण जाहीर करितो व तीस सर्व राजे दाखवितो (१२–२२); कृष्ण बळरामास पांडव दाखवितो (२५–२८); कर्णशिशुपालजरासंधशल्यादिकांचे लक्ष्यभेदप्रयत्न व अपयश (२९–४०); पार्थकृत लक्ष्यभेद, सभ्यमतें व द्रौपदीप्राप्ति (४१–५५); कर्णादींचा कोप व भीमार्जुनांचें कर्णशल्यप्रमुखांशीं युद्ध व कर्णाचा पराभव (५६–७८); सभ्यनृपजिज्ञासा (७९–८१); पांडव द्रौपदीला कुलालशाळेंत आणितात व कुंतीवचनावरून द्रौपदी पांच पांडवांची स्त्री होते (८२–९८);

अध्याय ३६ वा; (पृ० २२९):—रामकृष्णपांडवांची भेट व भाषण (१–१७); धृष्टद्युम्न कुलालशाळेंत येऊन वेषधारी पांडवांची परीक्षा करितो (१८–२५); द्रुपद संतुष्ट होऊन पांडवांस भोजनास बोलावितो (२६–४२); पांडवांच्या कुळादिकांबद्दल द्रुपद आग्रहानें पृच्छा करितो व धर्म त्यास ओळख देतो (४३–४८); कन्यापाणीग्रहणाविषयीं द्रुपदप्रार्थना व पांचांस कशी द्यावी ही शंका (४९–५७); व्यासकृत शंकानिरसन (५९–७७); द्रौपदीविवाह, पांडवसत्कार (७८–७९); दुर्योधनादिक वृत्तश्रवणानें मनांत संतप्त होऊन परत जातात (८०–८१).

अध्याय ३७ वा; (पृ० २३८):—पांडवोदयाबद्दल विदुरधृतराष्ट्रसंवाद व धृतराष्ट्रसंतोष (१–५); दुर्योधन व कर्ण पांडवनाशाविषयीं धृतराष्ट्रास युक्त्या सांगतात (६–१८); भीष्म विरोध न करण्याबद्दल सांगतात (२१–२६); द्रोण पांडवास अर्धें राज्य देण्याबद्दल सुचवितो (२७–२९); कर्णद्रोणांचा कोपसंवाद (३०–३८); विदुर गुरुक्त ऐकण्याविषयीं बोध करितो (३९–४८); द्रोणाची युक्ति मान्य करून धृतराष्ट्र पांडवांस आणण्याकरितां विदुरास पाठवितो (४९–५३);

विदुर द्रुपदास तोषवितो (५४–६२); कृष्णादिकांच्या अनुमतें पांडवांचें हस्तिनापुरीं आगमन व पौरसंतोष (६३–७५); पांडव अर्धराज्य घेऊन इंद्रप्रस्थास रहातात (७६–७८); कृष्ण तेथें एक उत्तम नगर वसवून त्यांत पांडवांची स्थापना करितो (७९–८४).

अध्याय ३८ वा; (पृ० २४८):—इंद्रप्रस्थीं नारदागमन व द्रौपदी-समागमसमयविभागार्थ पांडवांस उपदेश–संदोपसुंदाख्यान (१–२५); पांडवांची प्रतिज्ञा (२६–२७); विप्रधेनुहरण व तद्योगें अर्जुनप्रतिज्ञाभंग (२८–३६); अर्जुनाचा वनवासः–उलूपीचित्रांगदासमागम (३७–४०); द्वारकागमन, कृष्णदर्शन व सुभद्राहरण (४१–५१); कृष्णबलरामसंवाद (५२–६८); पार्थसुभद्राविवाह, द्रौपदीकोप व पार्थकृत तन्निवारण (६९–८०); कृष्णादींचें इंद्रप्रस्थागमन (८१–८३); अभिमन्युजन्म (८४–८७); प्रतिविंध्यादि पांच पुत्र द्रौपदीस होतात (८८–९१); अग्नि भक्षणार्थ खांडववन मागतो व अर्जुनास अक्षय्य भाता व गांडीव देतो (९२-९६); खांडवदहन व मयरक्षण (९७–१०२); उपसंहार (१०३–१०४).

---

२ . सभापर्व. (पद्यसंख्या ६८०).

अध्याय १ ला; (पृ० २६०):—पांडवार्थ मय सभा निर्मितो व अर्जुनास देवदत्त शंख व भीमास गदा देतो (**गीति** १–७); मयसभावर्णन (८–११); नारदांचे प्रश्न व धर्मोत्तर (१२–१९); इंद्र, यम, वरुण, कुबेर व ब्रह्मदेव यांच्या सभांचें वर्णन व मयसभेशीं तुलना (२०–४०); हरिश्चंद्रयशोवर्णन व यशोहेतुकथन (४१–४५); नारद राजसूययज्ञ करण्यास सांगतात (४६–४९); राजसूययज्ञोपक्रम (५०–५३); कृष्णास पाचारण व त्याचें आगमन (५४–५७); कृष्णाची मान्यता व जरासंधभयकथन (५८–६३); जरासंधाच्या वधाविषयीं धर्मकृष्णभीमार्जुनांचीं भाषणें (६४–७०); जरासंधोत्पत्तीची कथा (७१–८५); कृष्ण भीमार्जुनांसह विप्रवेषानें जरासंधाकडे जातो (८६–९२); कृष्णजरासंधसंवाद व बंदिस्थ राजे सोडण्याविषयीं कृष्णाचें मागणें (९३–१०८); जरासंधभीमयुद्ध, जरासंधवध व कृष्णाचें द्वारकेस जाणें (१०९–११६).

अध्याय २ रा; (पृ०२७३):—पांडवांचा दिग्विजय (१–५); कृष्णाचें सहाय (६–७); धर्मास राजसूयदीक्षा (८–१३); राजसूयवर्णन (१४–२५);

कृष्णकृत शिशुपालवध (२६–४३); व्यासभविष्यकथन (४६–५०); धर्ममानसोद्वेग व सांत्वन (५१–५८).

अध्याय ३ रा; (पृ० २८६):—मयसभेंतील दुर्योधनाची फजिती (१–६); शकुनि दुर्योधनास शोकहेतु विचारितो व पांडव सुकृतफळें भोगीत आहेत, असें सांगतो (७–१९); कपटद्यूतद्वारा पांडवसंपत्तिहरणविचार व धृतराष्ट्र-संपत्ति (२०–४३); धृतराष्ट्र विदुराची सल्ला घेतो (४४–५२); विदुर धर्मास द्यूतार्थ बोलावितो, व धर्म सकुटुंब हस्तिनापुरीं येतो (५३–६५).

अध्याय ४ था; (पृ० २९३):—द्यूतारंभ व धर्म रथ, दास वगैरे हरतो (१–११); द्यूतांतील कपटाविषयीं विदुराचें धृतराष्ट्राशीं निषेधपर भाषण (१२–२७); दुर्योधन विदुराचा धिक्कार करितो (२८–३९); विदुराचें उत्तर (४०–४६); धर्म हयधेन्वादिक हरतो (४७–५१); सर्व धन व नंतर क्रमानें नकुळ, सहदेव, अर्जुन, भीम व मग सर्वस्वासह स्वतःला पणास लावतो व शकुनि सर्व जिंकितो (५२–६९); शकुनीच्या सूचनेवरून द्रौपदीस पणास लावतो व हरतो (७०–८१); दुर्योधन विदुरास द्रौपदीस आणण्यास सांगतो व विदुर त्याचा धिक्कार करितो (८२–८६); दुर्योधन प्रातिकामि दूतास पाठवितो, व द्रौपदी, येण्यापूर्वी 'मी जिता कीं अजिता' या प्रश्नाचें उत्तर सभ्यांकडून मागविते (८८–१०४); धर्म द्रौपदीस येण्याबद्दल सुचवितो व दुःशासन तिला आणण्यास जातो (१०५–११२).

अध्याय ५ वा; (पृ० २९८):—दुःशासन द्रौपदीला केश धरून सभेंत ओढीत आणतो–तिची त्यास विनवणी व बोध (१–११); द्रौपदीचा धिक्कार, खेद व छळ (१२–२१); भीष्म स्पष्टोत्तर देत नाहींत (२२–२४); स्पष्टोत्तरार्थ द्रौपदीची पुनः प्रार्थना (२५–३०); भीमाचा क्रोध, धर्माचे हात जाळण्याची सिद्धता व अर्जुनकृत तन्निवारण (३२–४३); विकर्णाची स्पष्टोक्ति व सभ्य-संतोष (४४–५५); कर्ण त्याचा उपहास करितो (५६–६३); पांडव व द्रौपदी यांचें वस्त्रहरण (६४–६७); द्रौपदी कृष्णाचा धावा करिते (६८–७९); कृष्णाचा 'अंबरावतार' (८०–९०); दुःशासनरक्तप्राशनाची भीमप्रतीज्ञा (९१); स्पष्टोत्तरार्थ विदुराची विनवणी व राजकन्या केशिनी इच्या कथेचें उदाहरण (९३–११५); द्रौपदीची विटंबना व पुनः प्रश्न (११७–१२४); भीष्माचें संदिग्ध उत्तर, त्यांतला

हेतु व शेवटीं धर्माकडे निवाडा सोंपविणें (१२५–१३३).

अध्याय ६ वा; (पृ० ३१३):—'धर्माला 'अनीश अनृत' म्हटलें तर सोडतों,' असे दुर्योधन द्रौपदीस म्हणतो (१–४); भीमाचें क्रोधयुक्त भाषण (७–१३); कर्णाचें द्रौपदीस कटुभाषण (१५–२२); भीमक्रोध व दुर्योधनाच्या मांडीवर गदाप्रहार करण्याची प्रतिज्ञा (२३–२९); विदुर, दुर्योधन व अर्जुन यांचे उद्गार (३०–३२); अशुभचिन्हें (३३–३४); धृतराष्ट्र दुर्योधनावर रागावतो व द्रौपदीची माफी मागून तीस पतिमोचक वर देतो (३५–४५); कर्णार्जुनभीम यांचीं भाषणें (४६–५३); धृतराष्ट्रधर्मसंभाषण–धर्म परत जातो (५४–६३); दुर्योधनाचे चिथावणीवरून पुनर्द्यूतोपक्रम (६५–८२); गांधारीचा उपदेश (८३–८५); दूत पांडवांस द्यूतार्थ पाचारितो (८८–९३); 'बारा वर्षें वनवास व एक वर्ष सजनीं अज्ञातवास' या प्रतिज्ञेवर द्यूतारंभ (९४–९९); धर्माचा पराजय (१००–१०४).

अध्याय ७ वा; (पृ० ३२४):—वनवासास निघालेल्या पांडवांचा दुःशासनकृतोपहास (१–१०); भीमप्रतिज्ञा (११–१२); दुःशासनाच्या चेष्टा व भीम, अर्जुन, सहदेव, नकुळ यांच्या दुर्योधनकर्णशल्यदींना मारण्याविषयीं प्रतिज्ञा (१३–२८); धर्म सर्वांचा निरोप घेतो (२९–३१); कुंतीला विदुराकडे ठेवितात (३२–३८); कुंतीविलाप व सांत्वन (३९–५५); पौरविलाप (५६–५९); पांडव वनास कसे गेले, असें धृतराष्ट्र विचारतो व विदुर पांडवांच्या वेषादींचें सरहस्य वर्णन करितो (६०–७३); नारदागमन व त्याचें कौरवनाशकथन (७४–७५); कौरव द्रोणाला शरण जातात व तो त्यांना भावी नाश सुचवितो (७६–८४); धृतराष्ट्र व संजय यांचा संवाद (८५–९१); उपसंहार (९२).

---

३. वनपर्व. (पद्यसंख्या १६५३).

अध्याय १ ला; (पृ० ३३५):—पांडववनवास व स्थालीप्राप्ति (**गीति** १–७); विदुरोपदेश (८–१५); विदुरनिर्भर्त्सना व त्याचें पांडवांकडे जाणें, तत्कृत सत्कार व सांत्वन (१६–२३); धृतराष्ट्रानुताप, विदुरानयनार्थ संजयप्रेषण विदुराचें प्रत्यागमन, धृतराष्ट्रकृत सांत्वन (२४–३५); विदुरागमनामुळें दुर्योधनादिकांची भीति व शकुनिकर्णांच्या मसलतीवरून दुर्योधन पांडवांशीं युद्ध करण्याकरितां निघतो (३६–४९); व्यास त्यास निवारून, धृतराष्ट्रास मुलास ताळ्यावर आणण्या–

बद्दल सुचवितो, धृतराष्ट्रव्याससंवाद (५०–६३); कौरवांस मैत्रेयोपदेश, धृतराष्ट्र-मैत्रेयसंवाद, दुर्योधनास मैत्रेयशाप व उःशाप (६४–८७); विदुर धृतराष्ट्रास भीम-कृत बकबंधुकिर्मीरवध कथन करितो (८८–९६).

अध्याय २ रा; (पृ० ३४५):—यादव, पांचाळ व पांडव यांची भेट (१–३); कृष्णार्जुनसंवाद (४–१२); द्रौपदीकृत स्वदुःखवर्णन व कृष्णकृत सांत्वन (१३–२६); धृष्टद्युम्नकृत द्रोणादिवधप्रतिज्ञा (२८–३१); विलंबानिमित्त कृष्णकृत शाल्ववधनिवेदन व अभिमन्यु वगैरेना घेऊन जाणें (३२–३७); प्रतिविंध्यादिकाना धृष्टद्युम्न नेतो व नकुळसहदेवभार्या स्वपितृगृहीं जातात (३८–३९); पांडवमार्कंडेय-संवाद (४०–४१); द्रौपदीचें धर्मास कडक भाषण (४२–५२); धर्म क्षमेचें महत्त्व वर्णितो (५३–५८); भीमाचें क्रोधयुक्त भाषण (५९–७५); धर्म पुनः शांति उपदे-शितो (७६–९२); व्यास धर्मास प्रतिस्मृतिविद्या शिकवितात व तदाज्ञेनें धर्म अर्जुनास ती शिकवितो—अस्त्रप्राप्त्यर्थ तपःसाधनोपदेश करितो (९३–१०१); तपार्थ अर्जुनाचें इंद्रकीलपर्वतीं गमन (१०२–१०५); इंद्रदर्शन, अर्जुनेंद्रसंवाद, शंकरोपासनो-पदेश, वरदान व अंतर्धान (१०६–११६).

अध्याय ३ रा; (पृ० ३५६):—किरातार्जुनाख्यान (१–३३):—अर्जुनतप, तपस्विभय, किरातरूपी शंकराचें आगमन (१–५); वराहाकृति मूकदाना वागमन व तन्निमित्त किरातार्जुनांचा कलह व युद्ध, शंकराचा धावा, किरातशिवैक्यज्ञान, क्षमायाचना व पाशुपतास्त्रप्राप्ति (६–३३); वरुणादिकांपासून अर्जुनास अस्त्रप्राप्ति (३४); इंद्रप्रेषितमातल्यागमन व अर्जुनाचें स्वर्गगमन (३५–३९); अर्जुनसत्कार व इंद्रासनार्धोपवेश (४०–४३); चित्रसेनापाशीं अर्जुनाचें नृत्यादिशिक्षण (४४–४५); चित्रसेनद्वारा इंद्रकृत पार्थचिंतानाशार्थ उर्वशीप्रेरणा (४६–५५); उर्वशीकृत विलासया-चना व पार्थकृत तन्निषेध (५६–७१); अर्जुनास उर्वशीचा ‘ हो क्लीब ’ असा शाप (७२); इंद्रकृत अर्जुनसांत्वन (७३–७५); लोमशाला इंद्र अर्जुनवृत्त सांगतो व अर्जुनास तीर्थयात्रेला घेऊन जाण्यास विनवितो (७६–८०); व्यासमुखें धृतराष्ट्रास अर्जुनोत्कर्षकथानिरूपण व धृतराष्ट्रखेद (८१–८२); धृतराष्ट्रसंजयसंवाद (८३–८७).

अध्याय ४ था; (पृ० ३६५):—बृहदश्वास धर्म द्यूतपराजयकारण व अर्जुनवृत्त विचारितो (१–८); बृहदश्व त्यास नळदमयंतीकथा सांगतो (९–३१०):—नळवर्णन व दमयंतीजन्म व स्वरूपवर्णन (९–२१); नळकृत हंसविमोचन, दमयंती-

स्वयंवर व तदर्थ इंद्रादिदेवागमन (२२–४४); नलद्वारा देव दमयंतीचें मन वळविण्याचा प्रयत्न करितात; पण अपयशातें पावतात (४५–६७); देवाना वगळून दमयंती नल-राजाला च वरते (६८–७६); नळास देव वर देतात (७८–८१); नळोत्कर्षामुळें कलिसंताप, इंद्रोपदेश, नळबंधुपुष्करकृत द्यूतद्वारा नळाचा कलिकृत नाश (८२–९५); नळाचें सस्त्रीक वनभ्रमण, कलिकृत वस्त्रहरण व दमयंतीपरित्याग (९६–१२२); दम-यंतीविलाप व दुःख, पार्थाबरोबर गमन, पलायन, त्रिपुरापुरींत आगमन व राज्ञी-सैरंध्रीत्वस्वीकार (१२३–१५४); नलकर्कोटकभेट, कर्कोटकरक्षण व तत्कृत दंशानें नळरूपांतर व त्याचा उपदेश (१५५–१७३); नळाचा ऋतुपर्णराजसारथ्यस्वीकार व बाहुकनामधारण (१७४–१८२); सुदेवविप्र दमयंतीस ओळखतो, सुनंदादींस सर्व वृत्त सांगतो व दमयंती पित्रगृहीं येते (१८३–१९७); नळशोधार्थ प्रयत्न व पर्णाद-कृत शोध (१९८–२१०); दमयंती धूर्तपणें पुनः स्वयंवर योजिते (२११–२१७); नळविलाप (२१८–२२२). बाहुक ऋतुपर्णाला घेऊन विदर्भनगराकडे स्वयंवरार्थ निघतो, मार्गांत ऋतुपर्णदर्शित प्रसंख्यानकौशल्य, नळास अक्षहृदयलाभ, कलि नळा-स शरण येतो व 'स्मरणें त्वद्भावातें पाहेन जनीं लवें हि अनलसमीं' असा वर देतो (२२३–२४९); विदर्भनगरागमन व ऋतुपर्णसत्कार (२५०–२५५); अपत्य-दर्शनादि विविध प्रकारानीं बाहुकनलैक्य ठरवून दमयंती त्यास अंतःपुरांत आणते (२५६–२६९); नलदमयंतीसंवाद (२७३–२९३); आकाशवाणी होऊन नळ दम-यंतीचा स्वीकार करितो (२९४–३०६) पुष्करपराजय व नळास गतवैभवप्राप्ति (३०७–३१०); नळापेक्षां तुझी अवस्था बरी, असें सांगून बृहदश्व धर्मास अक्षहृदय-विद्या व आशीर्वाद देऊन जातो (३११–३१३).

अध्याय ५ वा; (पृ० ३९९):—धर्मचिंता, तीर्थयात्राविचार (१–४); लोमशकृत अर्जुनवृत्तकथन व सपांडव तीर्थयात्रागमन (५–११); गंधमादनप्रवेश-मार्गदुर्गमता व तन्निमित्त धर्मभीमसंवाद–द्रौपदीक्लेशप्राप्ति (१२–२३); घटोत्कचाचें ससेवक सहाय्यार्थ आगमन, त्यांच्या खांद्यावरून पांडवादि नारायणाश्रमीं उतरतात. (२४–३८); सौगंधिकपद्महरणार्थ भीमगमन, मारुतिदर्शन, भीमगर्वपरिहार (३९–६१); मारुतिभीमरूपदर्शन व भीमास सहाय्याभिवचन व सौगंधिकपुष्करणीमार्गदर्शन (६२–७२); कुबेररक्षक व भीम यांचें युद्ध, भीमविजय (७३–७९); भीमार्थ धर्म-चिंता व द्रौपदीशीं संवाद, भीमभेट व संवाद (८०–९०); आकाशवाणीवरून धर्म

परत नारायणाश्रमीं आला (९१–९३); जटासुरवध (९४–९७); आर्ष्टिषेणाश्रमागमन व पांडवकुबेरदर्शन, कुबेरकृत मणिमत्कथाकथन (९८–१०६); इंद्रदर्शन (१०७–१११); अर्जुनदर्शन व स्ववृत्तकथन (११२–१२०); धर्मकृत अर्जुनभाग्यवर्णन, पाशुपतप्रभावदर्शनयत्न व सुरकृत तन्निवारण, धर्म परत फिरतो (१२१–१२७).

अध्याय ६ वा; (पृ० ४१२):—यामुनपर्वतावर अजगररूप नहुष भीमाला धरतो (१–८); धर्मचिंता, भीमदर्शन, नहुषप्रश्नोत्तरदान व नहुषमोचन (९–३०); पांडव काम्यकास आले, कृष्णधर्मसंवाद (३१–५०); द्रौपदीचें सांत्वन (५१–५३); नारदमार्कंडेयागमन व नारदकृत अनेककथाकथन (५४–५६); सत्यभामा द्रौपदीस पतिवशीकरणोपाय विचारते–द्रौपदीचें उत्तर (५७–६६); द्रौपदीस कृष्णाचें आश्वासन (६७–६९); कृष्णनिर्गमन (७०).

अध्याय ७ वा; (पृ० ४२०):—स्ववैभवदर्शनानें पांडवांना दुःख देण्याचा कर्णशकुनिदुर्योधनांचा विचार, धृतराष्ट्राची असंमति व शकुनीच्या मोहक भाषणानें पश्चादनुमति (१–१२); घोषयात्रेनंतर दुर्योधनादिकांचें द्वैतवनांत जलक्रीडार्थ गमन, पूर्वागत चित्रसेनगंधर्वाबरोबर कर्णादींचें युद्ध, कर्णपलायन, चित्रसेन दुर्योधनाला बांधून नेतो (१३–३०); दुर्योधनसचिवप्रार्थनेवरून धर्म बंधूंस दुर्योधनमोचनार्थ आज्ञा करितो, अर्जुनचित्रसेनयुद्ध, दुर्योधनमोचन, युधिष्ठिरार्जुनगंधर्वसंवाद व दुर्योधनसत्कार (३१–५८); पूर्वी पळालेल्या कर्णाला दुर्योधन स्वपराभववृत्त कथितो व मरणाची इच्छा व तयारी करितो (५९–७०) कर्ण व असुर दुर्योधनाचें सांत्वन करितात, दुर्योधनगृहगमन (७१–९०); भीष्मोपदेश (९१–९७); कर्णादींचा असंतोष (९८–१०३); असहाय कर्ण दिग्विजय करितो (१०४–१०९); दुर्योधन वैष्णवसत्र (पौंडरीक यज्ञ) करितो, व्रतामुळें धर्म येण्याचें नाकारितो (११०–११६); यज्ञोत्तर कर्ण अर्जुनवधाची प्रतिज्ञा करितो (११७–१२०).

अध्याय ८ वा; (पृ० ४३३):—व्यास धर्मास मुद्गलचरित्र सांगतात (१–६); दुर्वासास दुर्योधन संतुष्ट करितो व पांडवांचें सत्व पाहण्याविषयीं विनंति करितो (७–१२); पांडवांकडे दुर्वासागमन व द्रौपदी कृष्णाचा धावा करिते (१३–२०); कृष्णकृत स्थालीपरीक्षा (२१–३०); दुर्वासाची आचमनानें च तृप्ति, भय, पलायन व सच्छळ न करण्याचा निश्चय (३१–४२); कृष्णकृत धर्मचिंतानिवारण (४३–५२); धर्मकृत द्रौपदीस्तुति (५३–५५).

अध्याय ९ वा; (पृ० ४३९):—पांडवमृगयागमन, जयद्रथद्रौपदी-दर्शन, जयद्रथाचा अभिलाष व कोटिकप्रेषण (१–६); कोटिकभाषण, द्रौपदीकृत जयद्रथधिक्कार (७–१६); जयद्रथास धौम्यबोध, तदवमान व द्रौपदीहरण (१७–३०); पांडवप्रत्यागमन, जयद्रथाशीं युद्ध, त्याचा भीमकृत पराभव व पांच पाट काढून, 'पांडवदास' असें म्हटल्यास जीवदानाशा दाखवून, भीम त्यास धर्माकडे बांधून आणतो (३१–५७); धर्मद्रौपदींचे सांगण्यावरून भीम त्यास सोडतो, धर्माचा जयद्रथास सदुपदेश (५८–६७); जयद्रथकृत शिवाराधन, पांडवचतुष्टयपराभववरदान-संपादन व गृहगमन (६८–७६).

अध्याय १० वा; (पृ० ४४७):—मार्कंडेय धर्मास श्रीरामचरित्र सांगतात (१–१०२):–रामरावणादिजन्मवर्णन (१–१२); रावणादिकांस वरप्राप्ति (१३–२५); रावणकृत कुबेरैश्वर्यपरिहार (२६–३०); जनपीडन, विधिप्रार्थना, देवांस वानर व ऋक्ष होण्याची सूचना, वानरोत्पत्ति, मंथरोत्पत्ति (३१–४२); रामकृत विश्वामित्रमखरक्षण, ताटकावध, अहिल्योद्धार, शिवधनुर्भंग व जानकीपरिणय (४३–५५); रामयौवराज्याभिषेक, मंथराकृत कैकेयीचा बुद्धिभेद, कैकेयीवराप्रमाणें रामवनगमन (५६–७०); दशरथनिधन, भरतागमन, कैकेयीनिंदा, भरतसंवाद (७१–८२); रामभरतभेट व भाषणें, भरतास पादुकादान व त्याचा नंदिग्रामनिवास (८३–१०२).

अध्याय ११ वा; (पृ० ४५८):—पंचवटीस शूर्पणखाविडंबन–तिची रावणास चिथावणी–सह्याद्योपक्षी रावणास मारीचाचा उपदेश (१–१५); मारीचकृत कनकमृगरूपधारण–सीतामोह–रामप्रेषण–मारीचकपट–रोदन व मृत्यु–सीताकोप–लक्ष्मणप्रेषण (१६–३०); रावणकृत सीताहरण–जटायूशीं युद्ध–जटायुपक्षच्छेद (३१–४४); रामलक्ष्मणसमागम–रामविलाप–जटायुदर्शन–जटायुकृत सीतावार्ताकथन–जटायुदहन (४५–५८); रामशोक–कबंधहनन–त्याचें शापमोचन व सुग्रीवसख्यसाधनसूचना (५९–७२); रामाचा करुणविलाप (७३–८४); लक्ष्मणकृत सांत्वन (८५–९०); सुग्रीवसख्यसाधन–सप्ततालीभेद–वालिवध–सुग्रीवराज्यलाभ (९१–१०३); अशोकवनस्थ सीता–रामक्रोध–सुग्रीव शरण येतो व सीताशोधार्थ दूत पाठवितो–शोध नाहीं (१०४–१२२); हनुमान् शोध लावून सीतेचा चूडामणी दाखवितो–रामकृत हनुमत्प्रशंसा–युद्धाची तयारी (१२३–१३३).

अध्याय १२ वा; (पृ० ४७४):—रामसागरतीरागमान व सागरकृत नळद्वारा सेतुबंधसूचना (१–४); बिभीषणास अभयदान (५–८); सेतूत्प्रेक्षा (९–१५); अंगदशिष्टाई (१६–२९); लंकावरणखनन (३०–३५); कुंभकर्ण-जागृति–युद्ध– मृत्यु (३६–४६); इंद्रजिद्युद्ध–राममोहन व बिभीषणकृत तन्नि-वारण–इंद्रजिन्मृत्यु (४७–५५); रावणकृत सीतावधोद्योग–अविंध्यकृत तन्निवारण (५६–६१); रामरावणयुद्ध व रावणवध (६२–७६); रावणस्त्रीविलाप–बिभीषण-लंकाराज्याभिषेक (७७–८१); सीतामोचन–अनंगीकार–सीताशपथ–देववाणी (८२–९८); सीतास्वीकारार्थ दशरथोपदेश व सीतास्वीकार (९९–१०७); मृतवानरोत्था-पन, त्रिजटा, अविंध्य व हनुमन्तोपकारकीर्तन (१०९–११६); पुष्पकारोहण – सीतेशीं रामाचें भाषण–अंगदास यौवराज्याभिषेक, अंगदतारादिकांसह प्रयाण (११७ –१३३); रामभरतभेट (१३४–१४६); अयोध्याप्रवेश (१४७–१५३); माता व मंथरा यांचें सांत्वन (१५४–१५९); रामराज्याभिषेकवर्णन (१६०–१६८).

अध्याय १३ वा; (पृ० ४९३):—सावित्रीकथा (१–१०८):—धर्म-प्रश्न व मार्कंडेयकृत सावित्रीचरित्रारंभ (१–४); पित्राज्ञेवरून सावित्रीकृत निज-वरशोधन (५–९); नारदाश्वपतिसंवाद (१०–१३); सावित्री सत्यवान पसंत करिते, त्याला नारदांची नापसंती व कारणकथन, सावित्रीचा अढळनिश्चय, नार-दांची संमति (१४–२७); सत्यवत्सावित्रीपरिणय, सावित्रीचें वल्कलपरिधान, व व्रत (२८–३९); सत्यवानाबरोबर सावित्री वनांत जाते, सत्यवानाची निद्रा, यमसावित्री-संवाद व तत्कृत सत्यवानप्राणहरण (४०–५९); सावित्रीचें यमानुगमन, यमाशीं भाषण, व वरचतुष्टयसंपादन (६०–७८); सत्यवत्पुनरुज्जीवन–दोघांचें भाषण–आश्र-मागमन व स्ववृत्तकथन (७९–१०३) द्युमत्सेनाला राज्यप्राप्ति व कथासमाप्ति (१०४–१०८).

अध्याय १४ वा; (पृ० ५०४):—विप्रवेषधारी इंद्रास कवचकुंडलें न देण्याविषयीं सूर्याचा कर्णास स्वप्नांत बोध (१–५); कर्णाची असंमति, सूर्यकर्णसंवाद, कर्ण इंद्राजवळ दिव्य वासवी शक्ति मागण्याचें कबूल करितो (६–१६); इंद्र कवच-कुंडलें घेऊन वासवी देतो (१७–३१); कर्णप्रशंसा (३२–३५).

अध्याय १५ वा; (पृ० ५८):—विप्रारणिहारकमृगान्वेषी पांडवांची विश्रांति (१–४); यक्षनिषेध न ऐकून जलपान करणाऱ्या धर्मेतर पांडवांचें पतन

(५–९); धर्मशोक (१०–२२); यक्षप्रश्नोत्तर, यक्षसंतोष, व भ्रातृचेतना (२३–३४); यक्ष व धर्म यांचा संवाद–यक्षकृत वरदान व उपदेश (३५–४४).

अध्याय १६ वा; (पृ० ५१३):—पांडवांचें अज्ञातवासार्थ प्रयाण (१–२); उपसंहार (३).

४. विराटपर्व. (पद्यसंख्या ७४०).

अध्याय १ ला; (पृ० ५१४):—पांडवांस राजसेवाधर्मकथन, त्यांचें विराटनगरास गमन व शमीवृक्षावर शस्त्रसंन्यास (**गीति** १–५); धर्म (कंक), भीम (बल्लव), व द्रौपदी (सैरंध्री) यांचा विराटसेवास्वीकार (६–२७); पांडवांची कष्टदशा (२८–३३); बल्लवकृत मल्लगर्वपरिहार (३४–४१); कीचकाचें आख्यान (४२–१९१):—सुदेष्णानुमतें कीचककृत द्रौपद्यभिलाष व द्रौपदीचा निषेध (४२–५२); सुरानयनार्थ कीचकाकडे द्रौपदीप्रेषण–कीचकाचें भाषण–द्रौपदीचें पलायन–भरसभेंत कीचक द्रौपदीस लत्ताप्रहार करितो–द्रौपदीचा विलाप–विराटादिप्रार्थना–सुदेष्णाकृत सांत्वन (५३–८१); भीमद्रौपदीसंवाद व भीमाश्वासन (८२––११४); नृत्यशालाप्रसंग व कीचकवध (११५–१३६); द्रौपदीचें मृत कीचकास पाहून भाषण व रक्षकास वृत्तनिवेदन (१३७–१५७); उपकीचकादिकांचें आगमन–द्रौपदीबंधन–तिची गंधर्वप्रार्थना–भीमकृत उपकीचकनिर्दालन (१५८–१७५); सैरंध्रीविषयक विराटभीति—बल्लवसैरंध्रीउद्धार–बृहन्नडासैरंध्रीसंवाद–सैरंध्री जाण्यास तेरा दिवसांची मुदत मागून घेते (१७६–१९१).

अध्याय २ रा; (पृ० ५३७):—कीचकनिधनजन्य दुर्योधनशोक व कर्ण दुःशासनादींचा संवाद (१–१३); भीष्मोपदेश–कृप व द्रोण यांचीं भाषणें (१४–२८); दक्षिणगोग्रहण–सुशर्म्याची विराटावर कौरवानुमतें स्वारी–(२९–३८); विराटपराभव–भीमकृत सुशर्म्याचा पराभव व बंधन–त्याचें धर्मानुज्ञेवरून मोचन(३९–६५) कंकादिकांचा विराटकृत सत्कार व विजयानंद (६६–७५).

अध्याय ३ रा; (पृ० ५४६):—गोपाध्यक्षाचें कौरवकृत गोहरणवृत्तनिवेदन (१–६); बृहन्नडाकृत उत्तरसारथ्यस्वीकार (७–३३); उत्तरभय (३४–४३); उत्तरास अर्जुनोपदेश (४४–५८); उत्तरपलायन–अर्जुनानुगमन व कौरवतर्क (५९–७१); अर्जुनकृत उत्तराकर्षण (७२–८०); अशुभचिन्हें व द्रोणादींचीं

भाषणें (८१–८९); शमीवृक्षस्थ पांडवशस्त्रें अर्जुन काढवितो व उत्तरार्जुनांचा एतद्विषयीं संवाद (९०–११६); अर्जुनकृत अस्त्रस्मरण व युद्धार्थ प्रयाण (११७–१२४).

अध्याय ४ था; (**पृ० ५६०**):—अर्जुनाचें शंखस्फुरण (१–९); द्रोणभाषण दुर्योधनकर्णाचीं कोपोत्तरें (१०–२४); कृपाचें कर्णास उत्तर (२५–३५); अश्वत्थाम्याचें कर्णाशीं भाषण व अर्जुनाशीं लढण्याची नाखुषी (३६–५२); भीष्मकृत समेट–'चांद्रमतें पांडवांचा अज्ञातवास बरोबर संपतो,' असें दुर्योधनास उत्तर व पांडवांशीं सख्य करण्याची सूचना (५३–६५); दुर्योधन अर्धें सैन्य घेऊन भीष्माज्ञेवरून मागे राहतो–व्यूहरचना (६६–७१); द्रोणहर्ष (७२–७५); अर्जुनकौरवयुद्ध–कौरवपराभव व गोमोचन (७६–८९); अर्जुन दुयोधनास गांठतो–कर्णाशीं युद्ध व त्याचें पलायन (९०–९७);

अध्याय ५ वा; (**पृ० ५७१**):—कृपादींचा पराभव (१–७); द्रोणार्जुनयुद्ध (८–२३); अश्वत्थामार्जुनयुद्ध (२४–३८); कर्णार्जुनयुद्ध (३९–५६); भीष्मार्जुनयुद्ध (५७–६०); दुःशासनादिकांचें पलायन (६१–६६); कर्णकृपद्रोणादींचें पलायन (६७–६८); भीष्माशीं पुनर्युद्ध व भीष्ममूर्छा (६९–९२).

अध्याय ६ वा; (**पृ० ५८३**):—कौरवपराभव व पलायन (१–४९):–दुर्योधनार्जुनयुद्ध, अर्जुनाचें त्याशीं भाषण (१०–१८); कौरवांचें पार्थकृत संमोहन व वस्त्रहरण (२८–३३); अर्जुनाचीनिवर्तन–उत्तरार्जुनसंवाद व उत्तरनगरप्रवेश (५०–७६); धर्मविराटांची अक्षक्रीडा–बृहन्नडास्तुतिजन्य विराटक्रोध–धर्मास अक्षप्रहार व निसृतरक्तावरोध (७७–९३); उत्तरागमन–कंकसूचनेवरून द्वास्थकृत बृहन्नडानिरोध (९४–९८); उत्तरभाषणावरून विराट कंकाची क्षमा याचितो (९९–१०३); विराटोत्तरांचा युद्धविषयक संवाद व उत्तरकृत देवसहायनिवेदन (१०४–११५); उत्तरोत्तर–उत्तरबृहन्नडामंत्र (११६–१२४).

अध्याय ७ वा; (**पृ० ५९६**):—पांडवप्रकटन व विराटास अर्जुनोत्तर (१–९); उत्तरविराटसंवाद (१०–१५); अर्जुनोत्तराविवाहार्थ विराटाची प्रार्थना (१६–२०); अभिमन्यूत्तराविवाहयुक्तत्वदर्शक अर्जुनभाषण व धर्मविराटानुमति (२६–२७); श्रीकृष्णादिआप्तागमन व अभिमन्यूत्तराविवाहवर्णन (२८–३४); उपसंहार (३५–३७).

॥ श्रीगणेशाय नमः ॥

कविवर्य मोरोपंतकृत

आर्याभारत.

आदिपर्व.

(गीतिवृत्त)

अध्याय पहिला.

श्री[1]मत्सद्गुरु-नारद-वाल्मीकि-व्यास-शुक-कवीशें[2] मनीं
आणुनि नमितों भावें, जे मोहतमाचिया[3] रवी शमनीं[3]. १
श्रीशें[4]-श्रीकंठ-चरण नमितों, जे सर्व-सेवक-स्वरगें[5].
भलतेहि वर्णे[6] होति श्रुतिमत[7] यन्निष्ठ[8] जेंवि सुस्वरंगें[9]. २

श्रीगणेशाय नमः। १. पंतकृत आर्याभारताच्या प्रत्येक पर्वांच्या प्रथमार्येचें
ाद्याक्षर घेतलें असतां, '**श्रीपांडवसहायो भगवानरविंदाक्षो जयति**'
सें अष्टादशाक्षरी संस्कृत वाक्य तयार होतें. या आर्येतील प्रथमाक्षर '**श्री**'
देवतावाचक असल्यानें मंगलाचरणाच्या दृष्टीनेंहि प्रशस्त आहे. २. कविश्रेष्ठ
ालिदासादि. ३. मोहरूपी अंधःकार नाहींसा करण्याविषयीं. ४. लक्ष्मी-
ते विष्णु व नीलकंठ महादेव यांचे चरण. ५. स्वर्=स्वर्ग+अग=वृक्ष=कल्पवृक्ष.
. अक्षरें (पक्षीं) जाती. ७. कर्णमधुर (पक्षीं) वेदमान्य. ८. ज्यांची भक्ति
ःणारे. ९. मधुरस्वरांत असलेले, (गायलेले).

नमिला गजमुख, ज्याचे सेवुनि मृदु मधुर बोल कानाहीं,
चुंबुनि, शंभु म्हणे, 'बा! तुजसम आम्नाय[1] बोलका नाहीं.' ३
नमितों सरस्वतीतें, जी कवि-कीरांसि[2] पढवुनीं वदवी;
जीचा प्रसाद देतो वाचस्पतिची[3] जडांसही[4] पदवी[5]. ४
गुरु[6]-भागवत-वरेंद्र-प्रेरित कविमुदिर[7] भारताब्धिरसा[8]
प्राशिति, तृप्त कराया स्वरसें[9] सद्रसिकमंडली[10]-सु-रसा. ५
नमिला वैशंपायन[11], सुखवी जनमेजया श्रवणसक्ता[12].
तैसाचि लोमहर्षणनंदन[13] उग्रश्रवाहि जयवक्ता[14]. ८
त्यां शौनकादि साधु श्रोते नमिले, जयांसि कानांहीं
दोंहीं पूर्ति[15] नसे; जे म्हणाति, 'अहा![16] हे उदंड[17] कां नाहीं?' ७
हरि ज्यांचा कैवारी, त्या पांडुसुतांसि वंदितों भावें.
वाटे, चरित्र त्यांचें कांहीं आपण तरावया गावें. ८
व्यासकृत महाभारत लक्ष ग्रंथ[18] प्रसिद्ध हा भारी,—
आर्यावृत्तें[19] रचितों, स्वल्पांतचि[20] आणितों कथा सारी. ९
श्रीरामनाममंत्र, श्रितचिंतामणि[21], करील हें पूर्ण;
चूर्ण प्रत्यूहांचें[22]; रसिकांचें चित्तही सुखी तूर्ण[23]. १०

---

१. वेद. २. पोपटांस. ३. बृहस्पतीची. ४. बुद्धिमंदासहि. ५. स्थान. ६. गुरु व भगवद्भक्त यांच्या वररूप इन्द्रानें प्रेरणा केलेले. ७. कवि हेच कोणी मेघ. ८. [मूळ] भारतरूपी समुद्राचे जलास. (मूळ भारत संस्कृतांत असल्यानें प्राकृत जनांना तें अगम्य आहे, म्हणून तें सुगम करण्यासाठीं मोरोपंतादि कवि त्याचें प्राकृत भाषेंत रूपांतर करितात). ९. स्वकीय जलानें (कविपक्षीं) शृंगारादि नवरसानें. १०. चांगले मार्मिक लोक हीच कोणी सुपीक जमीन. ११. इतिहास-वक्ता ऋषिविशेष. १२. ऐकण्याविषयीं आसक्त अशा जनमेजयास. १३. लोम-हर्षणाचा मुलगा उग्रश्रवा. (हाच सौति या नांवानें प्रसिद्ध आहे). १४. जय=भारत, तें सांगणारा. १५. पूर्तता. (तृप्ति). १६. कान. १७. पुष्कळ. १८. एक ग्रंथ म्ह० बत्तीस अक्षरें. १९. पंत गीति वृत्तास च आर्यावृत्त म्हणतात. २०. थोडक्यांत. २१. आश्रितांस चिंतामणीसारखा. २२. विघ्नांचें. २३. लवकर.

नैमिषवनांत[1], शौनककुळपतिच्या[2] द्वादशाब्दिकीं[3] सत्रीं[4]
गेला सौति, अळि[5] जसा कमळीं सद्गंधसद्रसामत्रीं[6]. ११
नमुनि मुनींतें, अंजलि जोडुनि, विनयें तपःसमृद्धि पुसे.
ते ऋषि त्यासि सुखविती, प्रणतासि मधुस्मराद्यसाद्रिपुसे[7]. १२
'कमळदलाक्षा[8] सौते ! साधो ! कोठूनि पातलासि? कसें?
कोठें क्रमिलें[9] बा त्वां?' पुसिलें एकें द्विजें तयासि असें. १३
सांगे स्ववृत्त विनयें त्यांतें, अंजलि करूनियां, तो तों;
'अहिसत्रीं[10] जनमेजयराजर्षीच्या समीप मीं होतों. १४
वैशंपायनवदनें, व्यासरचितभारतेतिहासाचें
घडलें श्रवण; नृलोकीं[11] प्याला पीयूष[12] दास हा सांचें[13]. १५
मग मीं तीर्थें, क्षेत्रें, पुण्यारण्यें विलोकिता झालों;
कुरुपांडवरणमखमहि[14] पाहोनि, तुम्हां पहावया आलों. १६
आज्ञा द्याल तरि सुखें सांगेन, रुचेल जें तुम्हां स्वामी !
गंगातर्पण[15] गांगें[16], हें इच्छितसें तसें अहो बा ! मीं.' १७
ऋषि म्हणति, 'महाभारतपीयूष[17] तुवां यथेष्ट पाजावें;
चंद्र चकोरांत जसा, तैसें आम्हां द्विजांत साजावें'. १८
विश्वगुरुप्रति[18] वंदुनि तो सौति सुखें करी तदारंभा[19];
त्या रसिकांत मुनींची मनोरमाकृति[20] गमे तदा रंभा[21]. १९
इतिहास साठ लक्ष व्यासें स्वमनींच योजिला पहिला;
मग [22]विधिनें वर दिधला; गणनाथें[23] भक्तवत्सळें लिहिला. २०

---

१. नैमिष नांवाच्या अरण्यांत. २. आश्रमाचा मुख्य. ३. बारा वर्षांनीं समाप्त होणाऱ्या. ४. यज्ञांत. ५. भुंगा. ६. सुगंध आणि मधुररस यांचें पात्र. ७. मधुदैत्य, मदन, [यांचे] रिपु विष्णु शिवसें—पंत. ८. कमलपत्रनयना. ९. कालक्रमणा केलीस. १०. सर्पसत्रामध्यें. ११. मनुष्यलोकीं. १२. अमृत. १३. खरोखर. १४. कौरवपांडवांच्या रणयज्ञाची जागा. १५. गंगेचें तर्पण. १६. गंगाजलानें. १७. अमृत. १८. जगद्गुरु जो परमेश्वर त्यास. १९. महाभारताच्या आरंभास. २०. सुंदर मूर्ति. २१. अप्सराविशेष. २२. ब्रह्मदेवानें. २३. गणपतीनें.

त्यांतूनि तीस लक्ष त्रि[1]दशांला, पंधराचि पितरांला,
गंधर्वांला चौदा, एक सुमनुजां दिला, न इतरांला. २१
सांगे मुनीश्वरांला एकशतसहस्र सं[2]हिता सौती.
[3]श्रुति-गंगा-सुरभींच्या त्या त्या सु[4]गुणेंकरूनि ज्या [5]सौती. २२

अध्याय दुसरा.

[6]पारिक्षित जनमेजय [7]बहुवार्षिक सत्र करि कुरुक्षेत्रीं.
सत्रांत [8]श्वा येतां, [9]जनमेजयबंधु ताडिती [10]वेत्रीं. १
तो [11]सुरशुनीसुत तिला, गेला रोदन करीत, सांगाया.
सरमा म्हणे नृपाळा, 'त्वां केला व्यर्थ दंड कां गा! या? २
म्हणतो, नाहीं सिवलों [12]दृष्टिकरुनिही [13]धराधवा! [14]हविला.
कां धर्म व्यर्थ तुवां, गांजुनि हा निरपराध, वाहविला? ३
[15]अघ न करितांहि दंडनि माझ्या पुत्रासि मज दिला ताप;
तरि तुज [16]अतर्कितचि भय येईल.' असा तिणें दिला शाप. ४
देउनि शाप, क्रोधें जातां तेथूनि सुरशुनी सरमा,
झाला विषाद[17]भाजन नृप; चिंता त्यासि लागली [18]परमा. ५
सत्रसमाप्ति करुनि तो गेला मग हस्तिनापुरा; राजा
चिंता करी बहु; म्हणे, 'कोण निवारील शाप हा [19]माजा?' ६
त्यावरि नृप मृगयेला गेला असतां [20]सदाश्रमा पाहे;
नामें श्रुतश्रवा मुनि जेथें निरुपम तपोनिधी राहे. ७

---

१. देवांला. २. ग्रंथ. ३. वेद, गंगा, आणि कामधेनु यांच्या. ४. ज्ञान, पवित्रता व इष्टफलदातृत्व हे अनुक्रमें गुण, त्यांनीं. ५. सवती. (स्पर्धा करणाऱ्या). ६. परीक्षितीचा पुत्र. ७. पुष्कळ वर्षें चालणारें. ८. कुत्रा. ९. श्रुतसेनादि तिघे. १०. वेताचे काठीनें. ११. देवांची [सरमानामक] कुत्री, तिचा पुत्र. १२. डोळ्यांनींही. १३. हे भूपते! १४. होमद्रव्याला. १५. पाप, अपराध. १६. अकस्मात्. [illegible] (स्थान). १८. मोठी. १९. माझा. २०. उत्तम मुनिस्थानास.

सोमश्रवा तयाचा सुत, तेजस्वी, सुविद्य त्याहूनीं.
राजा बहु आनंदे, त्या दोघां आश्रमांत पाहूनी. ८
[1]नमुनि श्रुतश्रव्यातें सांगुनि निजवृत्त नृप म्हणे 'स्वामी!
हो मत्पुरोहित[2]; तुला वरदा[3]! वर दास मागतों हा मीं.' ९
तो मुनि म्हणे, 'नृपाळा! जें माझें गलित शुक्र[4] तें व्याली[5]
प्याली, या तेजस्विप्रवरा[6] मन्नंदनासि ती व्याली[7]. १०
हा सर्व पापकृत्या[8] नाशील; न एक शंभुची कृत्या;
रक्षील आश्रितासि व्यसनीं; हर रक्षितो जसा भृत्या[9]. ११
व्रत याचें एक असे, जो जें मागेल तें तया द्यावें;
हें चालविशील तरि स्वपुरोहित करुनियां सुखें न्यावें.' १२
मान्य करूनि नृपें तो वंदुनि सोमश्रवा पुरीं[10] नेला.
भ्रात्यांतें हितबोध स्वपुरोहितवाक्यपालनीं[11] केला. १३
तक्षशिळादेशातें[12] जाउनि, जिंकूनि, वश करी राजा,
दावी शत्रुजनीं बळ, दावित होता जसा पिता[13], आजा[14]. १४
होता धौम्य मुनि, तया शिष्य तिघे, ज्यांसि गुरुपदींच रुची;
उपमन्यु एक, दुसरा आरुणि, तिसराहि वेद; सर्व शुची[15]. १५
गुरु आरुणिला सांगे, शालिक्षेत्रांत[16] फार जळ जातां
नाशेल वीज, म्हणउनि रोधावा मार्ग वारिचा[17] बा! तां[18].' १६
दुर्जयजळप्रवाहें आरुणिकृत सेतुबंधशत[19] नेलें.
श्रीगुरुनें योगबळें[20] शिष्यपरीक्षार्थ तें तसें केलें. १७

---

१. पाठांतर—**नमुनि मुनिला म्हणे नृप, 'नंदन सोमश्रवा तुझा स्वामी!** २. माझा उपाध्याय. ३. वर देणाऱ्या. ४. वीर्य. ५. सर्पिणी. ६. तेजस्वी लोकांमध्यें श्रेष्ठ अशाला. ७. प्रसवली. ८. एक दुष्ट देवता. ९. सेवकाला. (भक्ताला). १०. नगराला. ११. आपल्या (सोमश्रवा) उपाध्यायाचें वचन पाळण्याबद्दल. १२. गांधारदेशाची राजधानी. १३. परिक्षिति. १४. अभिमन्यु. १५. पवित्र. १६. साळीच्या शेतांत. १७. पाण्याचा. १८. त्वां. १९. पाण्याच्या ओघाला प्रतिबंध होण्यासाठीं घातलेले शेंकडों बांध. २०. योगसामर्थ्यानें.

दुर्वारवारिमार्गी मग रचिलें शीघ्र आपुलें गात्र[1];
आरुणि म्हणे, 'न नाशो गुरुशालिक्षेत्र एक हें मात्र.' १८
शिष्यांप्रति धौम्य पुसे, 'आरुणि कोठें?' करूनि ते प्रणती[2]
'केदारखंडबंधन[3] आज्ञापुनि, धाडिला तुम्हीं,' म्हणती. १९
जाउनि केदाराप्रति आपण शिष्यासि धौम्य तो पाहे.
धेनु जसी निजवत्सा 'एहि[4]; कास्यारुणे[5]!' असें बाहे[6]. २०
गुरुशब्द श्रवण करुनि, आरुणि धावोनियां धरी चरण.
पुसतां स्ववृत्त सांगे, तें करि मुनिचित्तवृत्तिचें हरण. २१
गुरुधान्यक्षेत्राहुनि ज्या ज्ञानक्षेत्रही[7] उणें कायें,
त्या श्रीगुरुप्रसादस्वर्द्रुममूळाश्रिता[8] उणें काय? २२
त्या कर्मे 'उद्दालक[9]' नाम, शिरीं पाणिपद्मही[10], ठेवी.
त्यासि वराशी[11] दे तो, देतो पुत्रासि जसि पिता ठेवी. २३
झाला गुरुप्रसादें लोकत्रयमान्य आरुणि कविवर.
छात्रीं[12] नुरवि तिळहि खळदृष्टिसि गुरुराज कारुणिक[13] विवर[14]. २४
ज्ञानामृतें भरुनि तो स्वस्थाना, जेंवि मेघ जळधीनें[15],
पाठविला, निववाया जग, त्या गुरुनें दयाविमळधीनें[16]. २५
उपमन्यु गुरुनिदेशें[17] धेनु वनामाजि सर्वदा रक्षी;
सूर्यास्तीं घेउनि ये; त्यातें गुरु, चरण वंदितां, लक्षी[18]. २६
धौम्य म्हणे, 'रे वत्सा! भ्रमसि वनीं, तदपि दिससि तूं मोटा?'
उपमन्यु म्हणे, 'येउनि, भिक्षा मागोनि, तर्पितों[19] पोटा.' २७
'न निवेदितीं[20] मला त्वां भिक्षा भक्षूं नये,' म्हणे धौम्य.

---

१. शरीर. २. नमस्कार. ३. शेतास बांध घालणें. ४. ये. ५. क-असि-अरुणे? हे अरुणे! कोठें आहेस? ६. हांक मारी. ७. शरीर. ८. श्रीगुरुप्रसादरूप कल्पवृक्षाचे मूळाचा आश्रय केलेल्यास. ९. 'विदारण करणारा' असा याचा मूळार्थ. १०. करकमल. ११. उत्तम आशीर्वाद. १२. शिष्याचे ठिकाणीं. १३. दयाळु. १४. छिद्र, (दोष). १५. समुद्रानें. १६. दयेनें शुद्धबुद्धि झालेल्या गुरूनें. १७. गुरूच्या आज्ञेनें. १८. पाहे. १९. संतुष्ट करितों. २०. अर्पण करितां.

आज्ञा माथां वाहे; तैसेंचि करी गुरूक्त तो सौम्य. २८
भैक्ष्य[1] निवेदी जें तें सर्वहि घे नित्य गुरु, जसा खोटा;
पुनरपि पुसे तयाला, 'वत्सा! दिसतोसि तूं बरा मोटा?' २९
'दुसरी भिक्षा खातों' ऐसें कथितां, म्हणे गुरु, 'प्राज्ञा!
अन्याय हा, न करणें परवृत्त्युपरोध[2]; हे असे आज्ञा.' ३०
भिक्षाहारनिवारण केल्यावरिही दिसे बरा तुष्ट;
म्हणुनि उपाध्याय पुसे, 'वत्सा! आहेसि तूं कसा पुष्ट?' ३१
उपमन्यु म्हणे, 'स्वामी! धेनूंच्या सेवितों वनीं दुग्धा.'
धौम्य म्हणे, 'तुज आज्ञा नसतां करिसी असें कसें मुग्धा[3]?' ३२
आज्ञा धरी शिरीं, परि उपमन्यु दिसे तथापि तो पीन[4];
पुनरपि पुसे गुरु; मनीं कीं, 'मीं सर्वस्व यासि ओपीन[5].' ३३
शिष्य म्हणे, 'स्तनपानीं, वत्समुखीं ये तयाचि फेंसाचें
प्राशन करितों; स्वामी! कारण या पीनतेसि हें साचें.' ३४
'हे वत्स सुगुण, सकरुण, आत्मविभागीं करूनियां तोटा
देताति फेनपा[6]! तुज फेन बहु; अहा! अधर्म हा मोटा.' ३५
देशिकें[7] ऐसें सांगे; 'न करीन' असें पुन्हा म्हणे; तो भी.
जठराग्निप्रशमार्थी[8] उपमन्यु तसें करी, नव्हे लोभी. ३६
मग धेनु चारितां तो क्षुद्विकळ[9] वनांत अर्कतरु[10] लक्षी.
त्याचीं पत्रें प्राज्य[11] क्षीर[12] स्रवती[12] म्हणोनि बहु भक्षी. ३७
त्यांच्या तीक्ष्णविपाकें[13] झाला तत्काळ अंध; कूपांत[14]
आश्रमपदासि येतां पडला उपमन्यु घोररूपांत[15]. ३८
आल्या धेनु, न आला शिष्य, म्हणुनि त्यासि गुरु वनीं हुडकी[16]

१. भिक्षाद्रव्य. २. दुसऱ्याच्या उपजीविकेस अडथळा. ३. मूढा! ४. पुष्ट. ५. अर्पण करीन. ६. फेंस प्राशन करणाऱ्या! ७. गुरु. ८. पोटाची आग शांत करू इच्छिणारा. ९. भुकेनें व्याकुळ. १०. रुईचें झाड. ११. पुष्कळ. १२. चीक प्रसवतात. (टाकितात). १३ भयंकर परिणामानें. १४. विहिरींत. १५. भयंकर स्वरूपाच्या अशा (विहिरींत). १६. शोधी.

'एक' म्हणे 'लेववली, हा! घडितां सांडिली दुजी कुडकी[1].'
'एहि[2]; कास्युपमन्यो[3]! वत्स!' असी हाक फोडितां थोर,
श्रवण करुनि उत्तर दे, दूरुनि तो, तोयदा[4] जसा मोर. ४०
'स्वामी! हा मीं आहें, कूपीं पडलों पथीं न लक्षूनीं;
झालों अंध स्वकृतें[5], अर्कद्रुदळें[6] यथेष्ट भक्षूनीं.' ४१
'तुज दृष्टि आश्विनीसुत[7] देतील स्तुति करीं,' असें सिकवी.
परते करुणाघन[8] गुरु, शिष्यक्षेत्रांत सद्यशें[9] पिकवी. ४२
स्तवितांचि भेटले गुरुभक्ताला देववैद्य नासत्य.
व्यसनीं गुरूपदेशचि रक्षी, दुसरा न, या जना, सत्य. ४३
जो भक्षी अर्कांचा, दास्यीं[10] वागावया वपू, पाला;
सत्व पहाया देती, त्या क्षुधिताच्या करीं, अपूपाला[11]. ४४
उपमन्यु म्हणे, 'गुरुला पुसिल्यावांचूनि, या अपूपा मीं
खाया उत्साह मनीं पावत नाहीं, दया करा स्वामी!' ४५
'अस्मद्वचनें, आम्हीं देतांचि, अपूपसेवना, सत्य,
पूर्वीं करिता झाला त्वद्गुरुही,' म्हणति देव नासत्य. ४६
तदपि, तसेंचि विनवितां, गुरुभक्तप्रेमविगलदस्रांनीं[12],
देवूनि आत्मदृष्टिहि, केला तो बहुकृतार्थ दस्रानीं. ४७
'त्वद्गुरुचे कार्ष्णायस[13] दंत, हिरण्मय[14] तुझे, असोत' असें
वदले दस्र; 'तदर्थ स्वगुरुपरिस होउनीं कृतार्थ असें. ४८

---

१. कर्णभूषण. (एक आरुणिरूप कुडकी कानांत घातली म्ह० आरुणि कसास उतरला; पण दुसरी उपमन्युरूप कुडकी तयार होत असतांनाच सांडली, असा भावार्थ). २. ये. ३. हे उपमन्यो! कोठें आहेस? ४. मेघाला. ५. आपल्या(च) कर्मानें. ६. रुईच्या झाडाचीं पानें. ७. अश्विनीकुमार. (देवांचे वैद्य). ८. दयामेघ. ९. चांगली कीर्ति. (विद्यार्थीरूपी क्षेत्रांत गुरु स्वकीर्तिरूप बीज पेरून अर्थात् विद्यार्थ्यांस उत्तम ज्ञान देऊन आपल्याच कीर्तीचा प्रसार करीत आहे). १०. सेवाकर्मामध्यें. ११. अनरशाला. १२. गुरुभक्त उपमन्यूवरील प्रेमानें स्रवमाण नेत्रोदकें ज्यांचीं अशांनीं. (अश्विनीकुमारांनीं). १३. पोलादी. १४. सुवर्णाचे.

ब्रह्मज्ञ गुरु नसे, परि तूं भक्तिबळेंकरूनि होसील.
गुरुभक्त धन्य तूंचि; च्छळ कोण असा अधन्य सोसील?' ४९
उद्धरुनि देव गेले, मग तो उपमन्यु गुरुपदीं लागे;
पुसतां, झालें वृत्त, प्रांजळि होऊनि, सर्वही सांगे. ५०
धौम्य म्हणे, 'तुज यावें शास्त्रांसह कंठपाठ[१] वेदानीं;
हो धन्य, मज वरांच्या, प्रेमभरें, किमपि नाठवे दानीं. ५१
जें आश्विनेय[२] वदले, त्या कल्याणासि पात्र होसील.
शिष्यचकोरांसि[३] तुझा अमृतें मुखचंद्र नित्य पोसील.' ५२
हे उपमन्युपरीक्षा; वेदपरीक्षाहि आयिका आतां.
गुरुसेवासुकृतफळप्राप्ति[४] गुरूपासकां असे गातां. ५३
'कांहीं काळ करावी शुश्रूषा; श्रेय[५] पावशील,' असी
आज्ञा करि गुरु, लावी सेवनशाणीं[६] गुणार्थ शिष्यअसी[७]. ५४
गुरुसदनीं[८] वेद जसा, विषयींहि तसा न देह राबेल.
तो[९] दास्यरूप वाहे त्या नित्य, चुकों न दे, हरा बेल. ५५
गुरुसदन अमृतसागर, त्यामाजि तरंगवृंद[१०] तें कृत्य.
मोटें लहान न म्हणे, सेवी भवदावदग्ध[११] तो भृत्य. ५६
वेद जसा गुरुभजना, यक्ष कृपणहि न तसा धना जपला.
रात्रिंदिव उत्साहें दुष्करसेवामहातपें तपला. ५७
निजपूजाचि विसरला, चुकला जठराग्निलाचि तर्पाया;
निद्रेलाचि न जपला, खिजला[१२] मन आळसासि अर्पाया. ५८
होय प्रसन्न बहुतां दिवसीं गुरु-वामदेव[१३] वेदा त्या.

---

१. तोंडपाठ. २. अश्विनीकुमार. ३. शिष्यरूप चकोरपक्ष्यांस. (हा पक्षी चंद्रांतून स्रवणाऱ्या अमृतावांचून दुसरें कांहीं सेवन करीत नाहीं, असा कविसंकेत आहे). ४. गुरुसेवेनें मिळणाऱ्या पुण्यरूप फलाची प्राप्ति. ५. कल्याण. ६. सेवारूप साहाणेवर. ७. शिष्यरूपी खड्ग. ८. गुरूच्या घरीं. ९. अन्वय–तो (शिष्य) दास्यरूप बेल त्या हरा (हररूप गुरूला) नित्य वाहे, चुकों न दे. १०. लाटांचा समुदाय. ११. संसाररूप वणव्यानें दग्ध असा. १२. सलज्ज झाला. १३. गुरु हाच शंकर.

सर्वज्ञत्व कुशळवर दे; कोण न कां[1]म देववे दात्या? ५९
प्रथमच्छात्र[2]परीक्षातात्पर्य असेंचि जाणती आर्य;
अत्यल्पहि निजगुरुवें साधावें, त्यजुनि देहही, कार्य. ६०
गुरुनें अत्यावश्यक अशनादि निषेधितांचि सोडावें.
हें उपमन्युपरीक्षातात्पर्य प्रेमळेंचि जोडावें. ६१
वेदपरीक्षेचें हें तात्पर्य, गुरूक्त अनुचितहि कर्म
करितां, हिमोष्ण[3]दुःखा तदनुग्रह[4] मानितां, घडे शर्म[5]. ६२
जरि गुरु सेवेसि न घे, शिष्यें अर्थेंकरूनि तरि त्यातें
प्रार्थूनि तोषवावें, अहिततमाज्ञानबीज[6] हरित्या[7]तें. ६३
गुरुदक्षिणार्थ उद्यम[8] करितां, शक्रादि[9]देवता तूर्ण
होती सहाय; दुर्जन[10]विघ्नितही कार्य होतसे पूर्ण. ६४
हें प्रतिपादन आहे वेदचरित्रांत; तेंचि परिसा हो!
गुरुभक्तांचा महिमा पापांत, महागजांत[11] हरिसा[12] हो[13]. ६५
वेद गुरुकुळा[14]पासुनि, अंबुधि[15]पासूनि जेंवि चंद्र, निघे.
त्यासहि होते झाले उत्तंकप्रमुख साधु शिष्य तिघे. ६६
सेवा न घेचि गुरुकुळवासानुभवी, म्हणोनि, तो कांहीं
शिष्यांहीं अनुभविलें लालनसुख जेंवि वृद्धतोकांहीं[16]. ६७
जनमेजयपौष्यांचा[17] झाला होता पुरोहित स्ववरें[18].
वेदासि कोण न म्हणे गुरु? ज्यावरि ढळति गुरुकृपाचवरें. ६८
एका समयीं ठेउनि उत्तंकाला निजाश्रमीं, वेद
याज्या[19]प्रति, कुमुदा[20]प्रति विधु[21]सा, गेला हरावया खेदें[22]. ६९

---

१. इच्छा. २. शिष्य. ३. शीतोष्णांच्या दुःखाला. ४. गुरुप्रसाद. ५. सुख. ६. अत्यंत अकल्याण करणाऱ्या अज्ञानाचें मूळ. ७. हरण करणाऱ्यास. ८. उद्योग. ९. इन्द्रादि. १०. दुर्जनांनीं विघ्न केलेलें. ११. मोठ्या हत्तींत. १२. सिंहासारखा. १३. होय. १४. कुल=घर. १५. समुद्रापासून. १६. वृद्धांच्या मुलांनीं. १७. पुष्य राजाच्या वंशजांचा. १८. त्यांच्या प्रार्थनेवरून. १९. [आपल्या] यजमान राजाकडे. २०. कमलाप्रत. २१. विधु=चंद्र. २२. संकोच (पक्षीं) दुःख.

उत्तंकाला कांहीं सांगे स्वाभिमत[१] कार्य गुरुभार्या;
श्रीमदयोध्या जैसी भरता[२] गुरुभक्तिसादरा आर्या. ७०
जेंवि वसिष्ठाद्युक्ती[३] सांगति, 'भरता! वरीं गुरुश्रीतें,[४]
उत्तंकासि मुनिसत्या[५] 'स्वीकारीं' म्हणति 'निजगुरुश्रीतें'. ७१
राम जसा भरतातें, उत्तंकातें तसाचि गुरु वेद
सुखवी वरप्रसादें; नाहीं गुरु देव यांत तिळ भेद. ७२
उत्तंक म्हणे गुरुला, 'द्यावी म्यां काय दक्षिणा सांगा?'
वेद वदे, 'बहु दिधलें, वत्सा! उपरोध[६] करिसि हा कां गा?
त्वां मज अर्थ दिला जो, न म्हणे गुरु[७] त्यापरीस हेमांगा;[८]
पूस उपाध्यायीतें,[९] जरि तूं म्हणतोसि आग्रहें मागा'. ७४
प्रार्थुनि तसेंचि पुसतां त्यासि उपाध्यायिनी असें मागे;
'पौष्यस्त्री-ताटंकें[१०] दे; न प्रिय अर्थ मज दुजा लागे. ७५
होणार आजिपासुनि चवथे दिवसींच पुण्यकव्रत;[११] ती
वेळा सांभाळीं कीं होइल तुज इष्टदा सुरव्रतती.[१२] ७६
तीं कुंडलें स्वकर्णीं घालुनि म्यां श्रीसमान[१३] साजावें,
वाढावें विप्रांतें; तरि सत्वर शुद्धमानसा! जावें. ७७
उत्तंका! त्या समयीं येतां तूं पावसील कल्याण.
नाहीं तरि तें कैंचें? तुजवरि घालील शाप पल्याण.[१४]' ७८
आज्ञा घेउनि जातां, पुरुष वृषारूढ[१५] देखिला वाटे;[१६]
सांगे मद्वृष-गोमयभक्षण;[१७] तें त्यासि निंद्यसें वाटे. ७९
'गुरुनेंहि[१८] भक्षिलें,' हें त्या पुरुषें सत्य सांगतांच, मना

१. स्वतःस इष्ट. २. दशरथपुत्रास. ३. वसिष्ठादिकांचा उपदेश. ४. वडिलांचें संपत्तीतें. ५. मुनिपत्न्या. ६. अडथळा. (आग्रह). ७. थोर. ८. हेम=सुवर्ण+अग=पर्वत=मेरुपर्वतास. ९. गुरुपत्नीतें. १०. कुंडलें. ११. पवित्र असें एक व्रत. १२. देव-वल्ली=कल्पवल्ली. १३. लक्ष्मीसारखें. १४. खोगीर. (शाप तुजवर खोगीर ठेवील म्ह० मी तुला शाप देईन. हा एक मराठी भाषेंतील विशेष सांप्रदाय आहे). १५. बैलावर बसलेला. १६. वाटेनें. १७. माझ्या बैलाचें शेण.

ये; भक्षी, शीघ्र निघे; उठतां उठतां करूनि आचमना. ८०
वृष धर्म; पुरुष ईश्वर; जें गोमय, मूत्र, अमृत, धर्मफळ;
तें मृत्युभयहर म्हणुनि, सेवन करवी प्रभू करूनि बळ. ८१
पौष्यनृपाप्रति जाउनि, अमृतरसस्त्रावि[1] कुंडलें याची[2];
तों तो, प्रसन्नचित्तें, याञ्चा[3] सफळा करावया याची,
कृतपुण्यासि हरि[4] जसा कल्पलतेजवळि इष्ट पावाया
स्वगृहीं, स्त्रीनिकट, तसा भूप प्रेषी विशुद्धभावा या[5]. ८३
पाहे गृहांत परि ती, देवी[6] कोठेंहि न दिसतां क्षिप्र[7]
परते; म्हणे, 'नृपा ! या योग्य विनोदासि हा नव्हे विप्र'. ८४
करुनि विचार नृप म्हणे, 'केला म्यां शोध, म्हणसि, बहु धांमी
देवी न पाहिली, तरि म्हणतों, उच्छिष्ट अससि बहुधा, मीं. ८५
साध्वीदर्शन दुर्लभ अशुचि[9] जनाला; करीं बरें स्मरण';
ऐसें म्हणतां, स्मरला गुरुचे चित्तांत चिंतितां चरण. ८६
उत्तंक म्हणे, 'केलें आचमन उठोनि चालतां वाटे;
तें झालें व्यर्थ खरें मज तों साध्वीच देवता वाटे'. ८७
होउनि शुद्ध यथाविधि सदनीं जातांचि देखिली देवी.
ती या सत्पात्राच्या चरणीं शिर, कुंडलें करीं, ठेवी. ८८
'सावध पथीं असावें, तक्षक[10] जपतो;' असें सती सिकवी;
दे आशीर्वाद; निघे तो शीघ्र; पुसोनि त्यांस[11] तीसि कवी[12]. ८९
गुणवंत्[13] पात्र[13] म्हणुनि, तो भूपें श्राद्धार्थ विनवितां राहे;
भोजनसमयीं पात्रीं शीत[14] सकेशान्न[15] वाढिलें पाहे. ९०
कोपे, म्हणे, 'असें हें श्राद्धीं विप्रासि अन्न वाढावें ?
हो अंध, प्रभुनें पद मत्तापासूनि शीघ्र काढावें. ९१
भूप म्हणे, 'अन्न अशुचि नसतां जरि दूषितोसि, घे शाप,

---

१. अमृतरस स्रवणारीं. २. मागे. ३. याचना. ४. इंद्र. ५. या उत्तंकाला. ६. राणी. (पौष्यस्त्री). ७. लवकर. ८. घरीं. ९. अपवित्र. १०. सर्पविशेष. ११. त्या पौष्यास. १२. सुज्ञ, पंडित. १३. विद्वान् ब्राह्मण. १४. थंड. १५. केशयुक्त अन्न.

अनपत्य[1] हो; तुझें तुज बाधो शुद्धान्नदूषका[2]! पाप'. ९२
विप्र म्हणे, 'अन्न पहा; पौष्या! नससीच योग्य कोपाया,
जैसी असती[3] पतिला, करुनि बळें पाप, शाप ओपाया'. ९३
अन्न सदोष पहातां, राया अपराध आपुला कळला.
शापनिवृत्ति[4]वरार्थ प्रांजलि होतांचि, विप्र तो वळला. ९४
विप्र म्हणे, 'येईलचि, परि चिरें[5] न टिकेल, अंधता, राया!'
साधु समर्थचि, धरितां चरण, च्छेदूनि बंध, ताराया. ९५
'तूंहि स्वशाप वारीं' म्हणतां विप्रासि नृप म्हणे, 'बापा!
क्षत्रियहृदय क्षुरसम[6], जाणतसे द्यावयाचि हें शापा. ९६
हृदय नवनीत तुमचें, वचन क्षुर; आमुचें वचन लोणी,
चित्त क्षुरचि; सहजगुण लोकीं केला न अन्यथा कोणी'. ९७
उत्तंक म्हणे, 'राया! जरि मीं शुद्धान्न दूषितों तरि तो[7]
मज बाधता; तसें तों नाहीं; मग शाप काय गा! करितो?' ९८
ऐसें वदोनि, त्याचा जायासि निरोप, कार्य साधुनि, घे;
आठवुनी मनिं आणुनि, तो, श्रीमद्गुरु सभार्य, साधु निघे. ९९
क्षण दृश्य[8] अदृश्य पथीं, नग्न क्षपणक[9] विलोकितां, क्षिप्र
धांवे बुध[10]; दुःस्वप्न प्रेक्षुनि काशीपथीं तसा विप्र. १००
उदकार्थ पथीं गुंते, ताटंकें वेगळीं क्षण स्थापी;
क्षपणकतनु[11] तक्षक खळ तितुक्यांतचि कुंडलें हरी पापी. १०१
पळतांचि देखिला खळ; वंदुनि गुरुदेवतांसि, तो रागें
त्या दुष्टाच्या लागे, जैसा सुमुमुक्षु[12] मृत्युच्या मागें. १०२
विप्रें धावुनि धरितां क्षपणक वेष त्यजूनि निजरूपें
शिरला बिळांत तक्षक; तों क्षोभे द्विज, जसा दहन तूपें. १०३
ऐसें होतां, तो मुनि, रक्षाया स्वयश आणि ताटंकें,

---

१. निःसंतान. २. पवित्र अन्नास दोष देणाऱ्या! ३. व्यभिचारिणी. ४. निवारण. ५. फार वेळ. ६. वस्तऱ्यासारखें तीक्ष्ण. ७. शाप. ८. दृग्गोचर. ९. बौद्ध संन्यासी. १०. पंडित. ११. यतिवेष धारण केलेला. १२. मोक्षाची इच्छा करणारा.

झाला क्षितिला दंडें[1], जेंवि शिळेलागि, खाणिता, टंकें[2]. १०४
तें पाहुनि शक्र म्हणे, 'वज्रा ! मुनिच्या प्रविष्ट हो दंडीं;
आश्रय दिला खळाला जेणें, त्या भूमिकुक्षिला[3] खंडीं[4].' १०५
वज्रें तसेंचि केलें, खणिली यांवद्भुजंगदेश[5] रसा[6].
गेला द्विज पाताळीं, चापच्युत[7] रावणारिचा शरसा[8]. १०६
जावूनि नागलोकीं[9], नागांतें स्तवुनि, कुंडलें मागे.
परि ते त्यासि न वळले. स्तुति करितां, हस्त जोडितां, भंगे[10].
दोघी स्त्रिया सितें[11] असितें[12] तंतूनीं विणिति पट[13] असें पाहे;
तों द्वादशार[14] चक्रहि सों[15] शिशुनीं[16] फिरवितांचि जें वाहे. १०८
देखे तसाचि तेथें एक पुरुष, एक त्याजवळ वाजी[17];
त्यांतें स्तवि. पुरुष म्हणे, 'माग.' वदे विप्र, 'नाग वळवा जी !'.
पुरुष म्हणे, 'विप्रा ! या अश्वापानीं[18] करीं अगा ! धमन[19].
साधो ! तुझें न मानू, त्या खळबळजळधिला अगाध[20], मन.'११०
विप्र तसेंचि अनुष्ठी[21]; तों हयवदनादिरंध्रभवधूम[22],
मूषकबिळीं[23] जसी, तसि करि त्या नागालयांत बहु धूम[24]. १११
पाताळांत सधूम ज्वाळा शिरतांचि तापले भोगी[25].
संसर्गीही[26] भोगिति, दोषीच न दोष आपले भोगी. ११२
'मरतों' ऐसें कळलें, व्यसनांत सुचेचिना उपाय; नतें[27],
नागें, मग, कुंडलयुग जें, केलें मुनिपदीं उपायन[28] तें. ११३
'चुकलों; रक्षीं.' ह्मणतां कर जोडुनि, लाज तक्षका नाहीं.

---

१. काठीनें. २. टांकीनें. ३. भूप्रदेशाला. ४. खणून टाक. ५. सर्पदेश (पाताळ) पर्यंत. ६. पृथ्वी. ७. धनुष्यापासून सुटलेल्या. ८. रामाच्या बाणासारखा. ९. पाताळामध्यें. १०. दमला. ११. पांढऱ्या १२. काळ्या. १३. वस्त्र. १४. बारा अरांचें. १५. सहा. १६. मुलांनीं. १७. घोडा. १८. घोड्याच्या गुदद्वारांत. १९. फुंकणें. ('फुंक' असा भावार्थ). २०. खोल. २१. करी. २२. घोड्याच्या मुखादि छिद्रांपासून उत्पन्न झालेला धूर. २३. उंदिराच्या बिळांत. २४. धामधूम दंगा. २५. सर्प. २६. सहवासी. २७. नम्रें. २८. नजराणा.

दंडेंचि खळ वळे; हें तत्व प्राशूत दक्ष[1] कानाहीं. ११४
देउनि अभय नतातें, घेउनि तीं कुंडलें, म्हणे, 'आजि
पुण्यक मीं दूर; अहा! क्षोभेल गुरुप्रिया[2] मनामाजि'. ११५
तो पुरुष म्हणे, 'विप्रा! हो अश्वारूढ; दिव्य वाजिप[3] हा
क्षणमात्रें गुरुसदना तुज नेयिल; कुतुक तेंहि आजि पहा.' ११६
चढतांचि, आणिला तो क्षणमात्रें गुरुकुळासि अश्वानें.
व्यसनें पराभवासि न पावे गुरुभक्त; सिंह न श्वानें. ११७
तों गुरुपत्नी 'न्हावुनि, वेणी करवीत बैसली होती.
'टळलाचि अवधि; द्यावा शाप;' असें जों मनीं म्हणे हो! ती,
तीतें वंदुनि, ठेवी कुंडलयुग तीपुढें, पुन्हां वंदी.
गुरुपत्नीनें केला धन्य, शिवा[4]-दृष्टिनें जसा नंदी. ११९
मग अमृतघनाच्याही, जीची हांसेल धूलि[5], करकेला,
गुरुपदयुगळी[6] नमिली; व्हीत[7] जिणें पारिजातकर[8] केला. १२०
पुसतां विलंबकारण, सांगे मग, जें विलोकिलें होतें
वृष-गोमयभक्षण; जें पाताळांतीलही पुसे तो तें. १२१
गुरु वेद म्हणे 'वत्सा! चितिति[9] जीतें सदैव धीर, चिंती
ती एक दुजी[10] माया अमित ब्रह्मांडकुंभ[11] जी रचिती; १२२
जें तंत्र[12] देखिलें त्वां, तें होय अनेकवासनाजाळ;
सित[13] असित तंतु तीं सुखदुःखें; पट भव, तसेचि जे बाळ १२३
ते वत्सा! तुज कथितों; एक अविद्या[14], असें मनीं आण;
तैसीच अस्मिता[15] ती दुसरी, ऐसें महामते[16]! जाण; १२४

---

१. चतुर. २. स्त्री. ३. अश्वश्रेष्ठ. ४. पार्वती. ५. गारा—पंत. ६. गुरूचे चरणद्वय. ७. लज्जित. ८. कल्पवृक्षाचा हात. ९. चितकला. १०. स्त्री दुसरी माया—पंत. ११. ब्रह्मांड हेच घट. १२. माग. (तंतवो वितन्यते यस्मिन् तत्तंत्रं =ज्यावर वस्त्र विणण्याकरतां तंतू पसरतात तें). १३. पाठांतर—**जे शुक्ल कृष्ण तंतू तीं सुखदुःखें, तसेचि जे बाळ.** १४. अज्ञान. १५. अहंकारत्व. १६. महाबुद्धिमान् अशा उत्तंका !

तिसरा राग; चतुर्थ द्वेष; अभिनिवेश[1] पांचवा; सावी
ती ईश्वरमाया; हें व्हावी अध्यात्मखुण तुला ठावी. १२५
जें चक्र पाहिलें तें स्थूळ शरीर; प्रमाण हें बापा!
याच्या संचाराचा हेतु अविद्यादिषट्क[2] निष्पापा!. १२६
जो पुरुष सांगसी, तो अंतर्यामी महेश, मायावी.
जो अश्व, जीव तो; हें दृष्टि तुला साधुसत्तमा[3]! यावी. १२७
पौष्याप्रति जातां, जो पुरुष वृषारूढ देखिला अयनीं[4],
तो परमेश्वर; वृष, तो धर्म; वृषभरूप भासला नयनीं. १२८
गोमय भक्षविलें, तें अमृत; म्हणोनीच नागगेहांत[5]
तूं वांचलासि वत्सा! विषबाधा जाहली न देहांत. १२९
परमेश्वरें अनुग्रह तुजवरि केला; स्वतत्व कळवीलें.
त्या आम्हां जीवांच्या सुहृदें[6] दुस्तर[7] अरिष्ट पळवीलें. १३०
आहे तुझी स्वधर्मी सन्निष्ठा, तीच या फळा फळली.
हो मदधिक सत्संमत[8]; जा स्वगृहा; चित्कळा[9] तुला कळली.'
गुरुला नमुनि निघाला. गेला तो हास्तिनापुरासि कवी.
तक्षशिलाजयमुदितां[10] भेटे जनमेजया; असें सिकवी, १३२
'कर्तव्य तें न करितां, राया! भलतेंचि करिसि बाळकसा;
काय म्हणावें तुज या भरतकुळीं[11] तूं असा नृपाळ कसा?' १३३
पूजुनि त्यासि नृप म्हणे, प्रकृतींच्या[12] पाळनें सदा धर्म
रक्षितसें, भगवंता!; वद जें चुकलों असेन मीं कर्म.' १३४
उत्तंक म्हणे, 'केला भस्म तुझा तात[13] तक्षकें अहितें[14];
आजुनि तरि फेडावें गुरुचें[15] ऋण, भस्म करुनि त्या अहितें[16]. १३५

---

१. आग्रह. २. [वरील आर्यांतून आलेले] अविद्यादि सहा प्रकार. ३. साधुश्रेष्ठा! ४. मार्गीं–पंत. ५. गृहांत. (पाताळांत). ६. जिव्हाळ्याच्या मित्रानें. ७. अति कठीण. ८. साधूंस मान्य. ९. चैतन्य कळा. १०. तक्षशिलादेश जिंकल्यानें आनंदयुक्त अशा. ११. दुष्यंतपुत्र भरताचे वंशांत. १२. प्रजेच्या. १३. बाप परीक्षिति. १४. शत्रूनें. १५. बापाचें. १६. सर्पांतें.

विषहरणदक्ष कश्यप[1], धन देवुनि, फिरविला; असा खोटा.
विघ्न करुनि गुर्वर्थी, मजहि दिला ताप त्या खळें मोटा. १३६
जरि त्यासि सर्पसत्रीं, दहनीं तूं होमिसील, तरि तात
स्वर्गी होईल सुखी. गुरुविप्रप्रिय सुशील करितात.' १३७
मुनिवाक्य श्रवण करुनि, जनमेजय नृप पुसे अमात्यांतें[2].
होतेंचि विदित; डसला तक्षक भोगी नरोत्तमा त्यां तें. १३८

अध्याय तिसरा.

शौनक मुनिवर्य[3] म्हणे, 'सौते! भृगुवंश आमुच्या कर्णी
यावा; त्यातेंचि सुखें आधीं तूं साधुसत्तमा! वर्णी'. १
सौति म्हणे, 'ब्रह्मयाचा पुत्र भृगु; तदीय पुत्र तो च्यवन;
त्याचा प्रमति; तयाचा रुरु; तत्सुत शुनक, सु-मतिचें भवन[4]; २
तो तव पूर्वपितामह; शौनक तुज म्हणति यामुळें. आतां
च्यवनत्वहेतु[5] कथितों. सुख होतें साधुवंशयश गातां. ३
भृगुची वधू पुलोमा, ती होती प्रथमगर्भिणी धार्मी;
गेला असतां तीर्थस्नानाला एकदा तिचा स्वामी, ४
दुष्ट पुलोमा राक्षस त्या भृगुच्या आश्रमांत, रामाच्या
रावणसा, सिरला हो! आश्लेला शिरिं धरूनि कामांच्या[6]. ५
'घे राक्षसा! दिली तुज,' वदला होता पिता असें, रडतां,
तें दुःख मनीं वाहे, योग पुढें भृगुसवें तिचा घडतां. ६
अग्निगृहीं अग्नीतें पाहुनि, राक्षस म्हणे, 'अगा आर्या!
वद साचें; हे माझी, किंवा भृगुचीच, होय हे भार्या? ७

---

१. मुनीचें नांव. २. प्रधानांतें. ३. मुनिश्रेष्ठ. ४. घर. ५. च्यवन असें नांव पडण्याचें कारण. ६. मदनाच्या.

तातें इच्या प्रथम मज मग भृगुला हे समर्पिली, दहना[1]!
देवमुखा! तुज पुसतों; कीं आहे धर्मगति महागहना[2]'. ८
अग्नि म्हणे, 'प्रथम तुला शब्देंचि दिली तुवां मनीं धरिली;
भृगुनें मग विधिपूर्वक, मजला साक्षी करूनि हे वरिली'. ९
'प्रथम स्वस्त्री' ऐसें, येतां वाक्यांत वह्निच्या, तुष्ट
होउनि, सूकररूपें[3] भृगुच्या पत्नीसि तो हरी[4] दुष्ट. १०
रडतां दुःखें, कोपें गर्भ सतीचा पथीं गळाला हो!
तो राक्षस तत्तेजें[5], क्षय दहनें शलभसा[6], जळाला हो!. ११
जननी-कुक्षींतूनि[7] क्रोधें च्यवला[8], म्हणोनि तो च्यवन.
विधि[9] सांत्वितां, सवत्सा धेनु तसी, पावली सती भवन. १२
जे अश्रुबिंदु मार्गामाजि गळाले, तिहीं महासरिता[10]
झाली; तीतें म्हणती बिंदुसरा; निववि ती अघज्वरिता[11]. १३
भृगु येतां स्त्रीस ह्मणे, 'कथिसी न अनर्थहेतुला कां? गे!'
ती कर जोडुनि राक्षसपावकसंवाद[12] जाहला सांगे. १४
तें कळतां, मुनिवर भृगु, त्या देवाच्या शिरीं अघ[13] स्थापी;
'हो सर्वभक्ष' ऐसें कोपें सर्वामरानना[14] शापी. १५
छळविधिहि[15] सत्य म्हणतां देवमुखालाहि बाधला शाप.
विधिसि असत्य म्हणे जो राक्षस, झालाचि भस्म तो पाप. १६
अग्नि म्हणे, 'ब्राह्मण मज मान्य, भृगो! तूं दिलाहि जरि शाप,
सुज्ञें ताप सहावा; द्यावा तापप्रदासिहि न ताप.' १७
रुसला भगवान् पावक, झाला गुप्त, त्यजूनि लोकांतें.

---

१. हे अग्ने! २. अतिशय कठिण. ३. डुकराच्या रूपानें. ४. हरण करी. ५. त्या गर्भाचे तेजानें. ६. पतंगासारखा. ७. कुशींतून. ८. गळून पडला. ९. ब्रह्मदेव. १०. मोठी नदी. ११. पातकरूपी ज्वरानें पीडित झालेल्यास. १२. अग्नि. १३. पातक. १४. संपूर्ण देवांच्या मुखास म्ह० अग्नीस. १५. 'घे राक्षसा दिली तुज' असा मूळ उगी रहावें या छलानें (हेतूनें) झालेला दानविधि.

सोसील सत्यवादी दूषण जगदेकपूज्य[1] तो कां तें? १८
झाला जेव्हां हुतभुक्[2] गुप्त भृगुकृतावमानजें[3] कोपें;
लोकत्रयहि व्याकुळ होय स्वाहास्वधाक्रियालोपें[4]. १९
ऋषिदेवांहीं कथिला विधिला निजताप, अग्निचा शाप;
तेव्हां तो समजावी त्या दहना, जेंवि बाळका बाप. २०
'एकाच्या कोपें कां बहुतांचा घात करिसि? शापातें
देता भृगु; परि वागुच्चारीं[5] जें बळ, तुझेंचि बापा! तें. २१
क्रव्यादा[6] मूर्ति तुझी; अपानसंबंधिनीहि[7] ज्या ज्वाळा
त्या सर्व भक्षितील, स्वाहाप्राणप्रिया! स्वधापाळा![8] २२
स्वांशें अमेध्यभक्षण[9] करितां, तुज लेशही नसो दोष;
हो प्रकट जगांत पुन्हां; कांहीं चित्तीं धरूं नको रोष.' २३
ऐसें सांत्वन करितां वह्नि पुन्हां प्रकटला असा चंड[10],
भृगुनें केला सत्याभासाला[11] सत्य मानितां दंड. २४
च्यवनोत्पत्तिकथा हे. शुनकाच्याही तुम्हांसि मीं गुरुची
कथितों कथा पवित्रा, प्रमतिघृताचीतनूद्भवा[12] रुरुची. २५
विश्वावसुच्या[13] वीर्यें, प्रसवोनि सुतेसि, मेनका[14] देवी
श्रीस्थूळकेशमुनिच्या आश्रमनिकटीं, नदीतटीं, ठेवी. २६
स्थूलकेच[15], वनीं पाहुनि तें कन्यारत्न, आश्रमीं आणी.

---

१. जगामध्यें एकच पूज्य असा अग्नि. २. हवन केलेलें द्रव्य खाणारा—अग्नि. ३. भृगूनें केलेल्या अपमानापासून उत्पन्न झालेल्या. ४. स्वाहाक्रिया म्ह० हव्य, (देवांप्रीत्यर्थ कर्म) आणि स्वधाक्रिया म्ह० कव्य (पितरांप्रीत्यर्थ कर्म). ५. (शाप-)वाणी उच्चारण्याचे वेळीं. ६. मांस खाणारी अशी. (अग्नीच्या अनेक मूर्ति आहेत. त्यांपैकीं येथें एक मांसाहार करणारी घेतली आहे). ७. गुदस्थ वायूसंबंधीं असणाऱ्या. ८. स्वाहा व स्वधा या दोन अग्नीच्या स्त्रिया आहेत. ९. अपवित्र. १०. प्रखर. ११. सत्य भासविणाऱ्या वस्तूला. १२. प्रमति आणि घृताची यांच्या शरीरांपासून उत्पन्न झालेल्या. १३. चित्रसेन गंधर्वाचा पुत्र, त्याच्या. १४. अप्सराविशेष. १५. स्थूलकेशऋषि.

तैसेंचि तो दयालु ब्राह्मण निजलोचनद्वयीं पाणीं. २७
ती पोषिली मुनीनें; प्रमद्वरा नाम ठेविलें विधिनें;
वाढविली, मूर्तिमती आत्मतपःसिद्धिसी[1], दयानिधिनें. २८
जेव्हां विलोकिली ती गंधर्ववराप्सरोद्भवा[2] सुरुची[3],
झाली सर्वस्मरशरलक्ष्य[4] मनोवृत्ति तत्क्षणीं रुरुची. २९
तें निजसुतमित्रमुखें कळतां, स्थूळालका[5]प्रति प्रमती
मागे प्रमद्वरेला. तोही 'देतों' म्हणे उदारमती. ३०
निश्चय विवाहतिथिचा केला; त्यावरि तिला डसे व्याळ;
तें कळतां, तच्छोकें रुरु एकांतीं रडे, पिटी भाळ[6]. ३१
शब्देंचि कलिपली स्त्री मरतां, रुरु पावला महाकष्ट;
तात्पर्य या कथेचें हें कीं, दुःखद परिग्रह[7] स्पष्ट. ३२
'तप, दान, गुरूपासन[8], जरि मज घडलें असेल, तरि तेणें
वांचो; हातीं येऊ, जें हरिलें काळतस्करें[9] लेणें[10]'. ३३
जरि मीं असेन जन्मप्रभृति[11] शुचि, उठो मनःप्रिया तरि, ती.
हा! आधिसर्पदष्टा[12] विकळा[13] मन्मतिहि विकळ मज करिती.' ३४
ऐसे करी विलाप स्त्रीशोकें प्रमतिपुत्र जो, त्यासि
दे देवदूत दर्शन; रवि जेंवि तमीं[14], विमूढ होत्यासि[15]. ३५
दूत म्हणे, 'जो प्राणी, सरतां आयुष्य, पावला अंत,
तो न पुन्हां उठला; हें वदति रुरो! तत्व जाणते संत. ३६
पुण्यें देसी; परि तीं, क्षणभरिहि न उठवितील मेलीला.
गतबुद्बुदेच्छुशिशुची[16] जसि, तसिच तुझी मला गमे लीला. ३७

---

१. आपल्या तपःसिद्धीप्रमाणें. २. गंधर्वश्रेष्ठ आणि अप्सरा यांपासून उत्पन्न झालेली. ३. लावण्यवती. ४. मदनांच्या सर्व (पांची) बाणांस वेध्य. ५. स्थूलकेश. (अलक=केश). ६. कपाळ. ७. स्त्री, (अर्थात् संसार). ८. गुरुसेवा. ९. काळरूप चोरानें. १०. [प्रमद्वरारूप] अलंकार. ११. जन्मापासून. १२. मनोव्यथारूप सर्पानें दंशित अशी. १३. व्याकुळ. १४. अंधकारांत. १५. अत्यंत मोहयुक्त होणाऱ्यास. १६. नष्ट झालेल्या बुडबुड्याची इच्छा करणाऱ्या बाळाची.

तुज या [1]दयिता-विरह-व्यसनापासूनि व्हावया मुक्ती,
एक भविष्यज्ञानीं कथिली, ती सांगतों, तुला युक्ती. ३८
अर्ध स्वायुष्याचें जरि तूं देसील तीस, नवरी ती
वांचेल; रीति पहिली तीच पहासील तूं, न नव रीती.' ३९
विप्र म्हणे, 'आयु दिलें; येणें हस्तेंकरुनि, निजलीला
उठवावें, तैसें तूं उठवीं; प्रकटीं जनांत निज-लीला.' ४०
मग तो विश्वावसुसह दूत सुरांचा यमाकडे गेला;
[2]स्वोक्ताचा निर्वाह, प्रार्थुनियां त्यासि, तन्मतें केला. ४१
[3]धर्में दिव्यवरकरें जागविली ती प्रमद्वरा सुरुची;
जासि अधनाची [4]श्रीनें, त्या स्त्रीनें दृष्टि निववली रुरुची. ४२
[5]तत्पाणिग्रहणोत्तर [6]भार्गव घे अहिवधव्रत क्रोधीं;
तो चंड दंडपाणी सर्प वधीं; वारुळें, बिळें शोधी. ४३
तो एकदा, वनांत भ्रमतां, रुरु [7]निर्विषा हिला पाहे;
दंड उगारूनि म्हणे, 'दुष्ट भला पुष्ट भेटला आहे.' ४४
[8]डुंडुभ म्हणे, 'वधिसि अपराध न करितां किमर्थ? सांग मला.
हा [9]अनपराधभूतद्रोह अहित, तदपि विहित, कां गमला?' ४५
रुरु त्यासि म्हणे, 'माझी वधिली होती प्रिया खळें नागें.
म्यां व्याळवधव्रत हें त्यापासुनि घेतलें असे रागें.' ४६
सर्प म्हणे, 'ते अन्य प्राणघ्न व्याळ, करिति जे दंश;
आकृति सम, परि त्यांच्या स्वगुणाचा डुंडुभीं नसे अंश. ४७
अपराधी दंडावा, किंवा भलताचि जो अनपराधी?
धर्मज्ञा! कैंवि तुझी झाली हे [10]पापसाधनपरा [11]धी?' ४८
हा ऋषि, ऐसें जाणुनि, हेतु पुसे [12]सर्पयोनिच्या अहिला.

---

१. दयिता=स्त्री. २. आपल्या भाषणाचा. ३. यमधर्मानें. ४. संपत्तीनें. ५. त्या प्रमद्वरेशीं विवाह केल्यानंतर. ६. भृगुपुत्र. ७. विषरहित सर्पाला. ८. दुतोंडें. (एक सर्पजात). ९. निपरपराधी प्राण्यांचा द्वेष. १०. पापाचे साधनाविषयीं आसक्त. ११. बुद्धि. १२. सर्पाच्या जन्माला येण्याचा.

त्यास्तव सांगे रुरुला डुंडुभ वृत्तांत आपुला पहिला. ४९
'होतों ब्राह्मणसुत मीं, मन्नाम सहस्रपात्, सखा माझा,
त्याचें नाम खगम तो, मुनिवृंदीं उडुगणीं[1] जसा राजा[2]. ५०
बाळपणीं, तृणसर्पें[3] भिवबुनि, कोपोद्यासि त्या खगमीं
करिता झालों, आलों तच्छापें या कुयोनिला मग मीं. ५१
खगमें कथिलें होतें, होइल भृगुच्या कुळांत, त्या रुरुचें
दर्शन हरील शापा, तापाला नाशितें जसें गुरुचें. ५२
तो तूं प्रमतिसुत मला मद्भाग्यें भेटलासि नवसानीं.'
ऐसें वदतां झाला शापाच्या, दिव्यरूप, अवसानीं[4]. ५३
प्राप्तस्वरूप तो मुनि मग त्या रुरुला म्हणे, ' अगा बापा !
हिंसा तुज योग्य नव्हे, जोडिसि दाटूनि कां महापापा ? ५४
ब्राह्मणधर्म अहिंसा, सत्योक्ति, तिजी क्षमा, मनीं आण.
क्षत्रियधर्म प्रकृतिप्रतिपालन, दंड, उग्रता, जाण. ५५
जनमेजय भूपाच्या अहिसत्रामाजि भग्नदर्पांतें[5]
आस्तीक विप्र यत्नें संरक्षी तक्षकादिसर्पांतें.' ५६
भार्गव रुरु त्यासि म्हणे, 'कथिला त्वां मज बरा नय[6] मुने ! तें
वृत्त कथीं, न उपेक्षीं; गंगा मिळतां त्यजी न यमुनेतें.' ५७
'इतिहासज्ञ मुनि तुला कथितील' असें म्हणोनि तो विप्र
झाला गुप्त; चकोरा क्षुधिता सोडुनि जसा विधु[7] क्षिप्र[8]. ५८
हारपला[9] चिंतामणि[10], मणि घ्यावा तोंचि काय तो हातें ?
बहु शोधेंहि न मिळतां, पावे रुरुविप्र शोकमोहातें. ५९
सावध होउनि गेला; प्रमतिप्रति वृत्त सांगता झाला;
मग रुरु तातमुखें तें आख्यान श्रवण करुनियां धाला[11]. ६०

---

१. नक्षत्रसमूहामध्यें. २. चंद्र. ३. गवताच्या सर्पानें. ४. शेवटीं. ५. ज्यांचा गर्व नष्ट झाला आहे अशा सर्पांतें. ६. नीति ७. चंद्र. ८. चटकन. ९. हरवला. १०. इष्ट वस्तु देणारें रत्न. ११. संतुष्ट झाला.

अध्याय चौथा.

शौनक पुसे, तयाला सौति म्हणे, चरित आयिका चारु[१];
होता यायावरकुलतिलक[२] प्रथमाश्रमी[३] जरत्कारु[४]. १
यतचित्त[५] ऊर्ध्वरेता[६], जितनिद्राहार[७], तरुतळीं राहे;
गर्तांत[८] पूर्वजांतें[९] करितां तीर्थाटनासि तो पाहे. २
त्यांसि जरत्कारु पुसे, 'कोण तृणस्तोमलग्नपाद[१०] असे ?
गर्तीं अधोमुख[११] तुम्हीं लोंबतसा ? पावलां विपत्ति कसे ? ३
ज्याचा अवलंब[१२] तुम्हां, त्याहि तृणस्तोममूळकासि[१३] महा-
मूषक खंडितसे कीं, हा शीघ्रचि गर्तपातहेतु[१४], अहा !' ४
भूलोक गर्त, मूषक काळ, तृणस्तंब[१५] वंश, हा भाव[१६];
संतति नसतां, स्वर्गीं पितरांसि वसावया नसे ठाव. ५
ते पितर म्हणति, 'आम्हीं यायावरनाम ऋषि जनख्यात[१७];
आहों पतनोन्मुख[१८]; हा होत असे संततिक्षयें घात. ६
आहे वंशीं एकचि पुरुष, जरत्कारुनामक, ज्ञानी;
परि तेणें, स्त्री न करुनि, केली हे संततिक्षयें हानी. ७
एक तपचि करितो तो मंद, करीनाचि यत्न संतानीं[१९];
संतानोत्पादन जरि निंदित, केलें कशासि संतांनीं[२०] ? ८
आम्हींच मंदभाग्य, स्वर्गापासूनि होतसों भ्रष्ट;
तूं कोण साधु ? दुःखितवृत्तें होसील विव्हळ स्पष्ट.' ९

---

१. सुरेख. २. यायावरनामक ऋषीच्या कुलामध्यें श्रेष्ठ. ३. ब्रह्मचारी. ४. ऋषि-विशेष. ५. चित्ताचें नियमन केलेला. ६. तेजस्वी वीर्याचा. ७. निद्रा आणि भोजन जिंकलेला असा. ८. खळग्यांत. ९. पितरांतें. १०. तृणसमुदायीं गुंतले आहेत पाय ज्याचे. ११. खालीं तोंड होऊन. १२. आश्रय. १३. मुळ्यांस. १४. खळग्यांत पडण्यास कारण. १५. गवताची पेंडी. १६. अभिप्राय. १७. लोक-प्रसिद्ध. १८. अगदीं पडण्याच्या बेतांत. १९. संततीविषयीं. २०. साधूंनीं.

त्यांसि म्हणे, '[1]तो मींच. स्वोद्धारांचा[2] प्रयत्न मज सांगा.'
ते म्हणति, 'जरत्कारो! वत्सा! पुससी कळोनियां कां गा? १०
स्त्री संपादुनि जोडीं तीचा ठायीं विशुद्ध संततिला;
तारील तीच आम्हां; म्हणति 'व्यसनांत नाव' संत तिला.' ११
[3]येरीं म्हणे, 'जरि मला नामें, शीलें, वयें, समा कन्या
देतील बंधु भिक्षेपरि, तरि मान्या असे; नसे अन्या. १२
पोषण न करीन तिचें; स्वल्पहि न तदर्थ वित्त जोडीन;
होतांचि गर्भधारण संग तिचा मीं स्वतंत्र सोडीन. १३
विधि हाचि मान्य आहे, याहुनि विधि मान्य मज नसे इतर.'
ऐसें ऐकुनि म्हणती, 'आम्हांला हेचि लक्ष' ते पितर. १४
मग पृथिवीवरि फिरला, परि कोठेंही न कांम[4] तो घडला.
दारकरग्रहणार्थी[5] साधु जरत्कारु संकटीं पडला. १५
'कन्याभिक्षार्थी मीं विप्र जरत्कारु, वचन माना, व्हा
सिद्ध, मला द्या विधिनें परि तीहि असेल जरि समानाव्हा[6]'. १६
यापरि वनांत हाका मोठ्यानें तीन विप्र जों फोडी,
तों भगिनीतें आणुनि वासुकि तत्काळ कर तया जोडी. १७
'नाम जरत्कारु' असें पुसतां कथिलें; दिली यथाविधिनें.
वरुनि तिला, हर्षविलें निजपूर्वजचित्त त्या तपोनिधिनें. १८
'जनमेजयसत्रीं निजजननीशापें हुताश[7] भक्षील;
त्या व्यसनीं तेजस्वी भगिनीसुत आपणांसि रक्षील.' १९
या अर्थे वासुकिनें दिधली अनुजा[8] तयासि आणूनि.
शापाचा परिहार श्रीविधिच्या[9] आननेंचि जाणूनि. २०
आस्तीकनामक तिला सुत झाला; अग्नि जेधवां भक्षी,

---

१. तो जरत्कारु. २. आपल्या उद्धाराचा. ३. तो [जरत्कारू]. ४. इच्छित. ५. भार्येचा हस्त धरण्याची म्ह० विवाहाची इच्छा करणारा. ६. माझेसारखें [जरत्कारु हेंच] नांव जीचें अशी. ७. अग्नि. हुत=हवन केलेलें द्रव्य+अश्नाति=खातो तो. ८. धाकटी वहीण. ९. ब्रह्मदेवाच्या.

जनमेजयसत्रीं, तो जावुनि, हुतशेष[1] मातृकुळ रक्षी. २१
आतां अहिशापाचें कारण सूतात्मजोक्त[2] बोलावें;
संक्षेपविस्तरज्ञ श्रोत्यांचें मस्तकाब्ज[3] डोलावें. २२
कद्रू विनता कन्या दक्षाच्या, कश्यपर्षिच्या जाया[4];
पतिनें दोघींस दिले वर, झाल्या मागत्या प्रिया ज्या या. २३
कद्रू समवर्चस[5] दशशत सुत मागे तिला म्हणे तो 'घे.'
विनतेसहि दे कद्रूतनुजाधिकशक्ति पुत्रमणि[6] दोघे. २४
'यत्नें गर्भ धरावे' ऐसा उपदेश आदरें केला.
मग तो भगवान् कश्यप तप साधाया तपोवना गेला. २५
प्रसवे अनल्पकाळें[7] कद्रू अंडें सहस्र वरदानें.
विनता दोनि प्रसवे. दिधलीं पतिनें अभीष्टवरदानें[8]. २६
वृद्ध्युचितोष्णस्थानीं[9] दासींनीं, पूर्ण पांचशत वर्षें
केलीं अंडें जतन, प्राणांसम, कृपणवित्तसम, हर्षें. २७
अंडें भेदुनि झाले प्रकट अहिसहस्र; माय सुख पावे;
विनता म्हणे, 'अहा! सुत कां न उपजले? वरें मजहि व्हावें.'
फोडी अंडाप्रति तों पाहे पूर्वार्धसिद्ध[10] देहातें;
ताप अधैर्यें[11] विनता आपुलिया आपणासि दे हातें. २९
क्रोधें तो पुत्र म्हणे, 'त्वां जीची[12] धरुनि मानसीं स्पर्धा,
करुनि त्वरा, अधीरे[13]! केला मद्देह हा असा अर्धा. ३०
या अन्यायें तीची दासी होसील पंचशत अब्द[14];
देवविला शाप तुझ्या कर्में; लावूं नको मला शब्द. ३१
जरि दुसऱ्याहि सुताचा घात असा न करिसील, तरि मुक्त

१. हवन होऊन बाकी राहिलेले. २. सूतपुत्र सौतीनें सांगितलेलें. ३. शिरकमल. ४. भार्या. ५. सारख्या तेजाचे. ६. पुत्ररत्न. ७. पुष्कळ दिवसांनीं. ८. इच्छित वर देणाऱ्यानें. ९. वाढण्यास योग्य अशा उबेच्या जागीं. १०. कंबरेपर्यंतचाच भाग तयार झालेल्या. ११. उतावीळपणें. १२. ज्या कद्रूची. १३. उतावीळ स्त्रिये! १४. वर्षें.

दासीत्वापासुनि तुज करिल, असों दे मनांत हें उक्त[1]. ३२
पंचशताब्दानंतर उपजेल दुजा तुजा सुत, न तूर्ण[2];
जरि रक्षिसील तोंवरि, करिल मनोरथ समस्त परिपूर्ण.' ३३
विनतेचा प्रथम तनुज अरुण; तरणिसूत[3] जाहला आहे.
दुसरा गरुड उपजतां भरला गगनीं; न मंदिरीं राहे. ३४
झाला क्षुधित प्रलयानळसा[4], तेजस्विवर्य तो पक्षी
क्षुत्पीडाशमनार्थें[5] ब्रह्मयानें अन्न कल्पिलें भक्षी. ३५
त्या कद्रूची विनता दासी, सुतशापकारणें, झाली,
तीच कथा सांगावी, म्हणुनि, अमृतमथनसत्कथा आली. ३६
चतुराननमुख्यामर[6] सर्व कनकनगशिरीं[7] बसोनि, 'कसें
अमृतोत्पादन करणें?' चिंतिति नारायणासमक्ष असें. ३७
हरिनें विधिला केलें अमृतप्राप्त्यर्थ युक्तिचें कथन.
'मंदरनगें[8] करावें लवणोदधिचें[9] सुरासुरीं मथन.' ३८
प्रभुमंत्रें[10] संधि[11] करुनि, झाले एकत्र देवदैत्य, मग
यत्न करिति, परि त्यांच्या वीर्यें नुचलेचि मंदराख्य नग. ३९
अकरासहस्र योजन[12] तो[13] वारि, तितुकाचि भूमिच्या पोटीं.
उचलेना गिरि, देवांदैत्यांचीं भागलीं बळें मोटीं. ४०
नारायणासि अचलोद्धरणाची[14] युक्ति तेधवां सुचली;
आज्ञापितां अनंता[15], तो भगवान् तत्क्षणीं तया उचली. ४१
नेला नग सिंधुप्रति, झाला आधार कूर्मराज तळीं,
वासुकि मंथनरज्जु, भ्रमविति सुरअसुर त्यासि अब्धिजळीं[16].४२
मुख जिकडे वासुकिचें धरिती तिकडेचि ते असुर मानी[17];

---

१. [माझें] बोलणें. २. लवकर. ३. सूर्याचा सारथी. ४. प्रलयकाळच्या अग्नीसारखा. ५. भुकेची बाधा दूर होण्याकरितां. ६. चतुर्मुख ब्रह्मदेव ज्यांत मुख्य आहे असे देव. ७. मेरुपर्वताच्या माथ्यावर. ८. नग=पर्वत. ९. क्षारसमुद्राचें. १०. विष्णूच्या मसलतीनें. ११. सलोखा. १२. चव्वेचाळीस हजार कोस. १३. तो मंदर. १४. पर्वत उचलण्य ची. १५. शेषाला. १६. समुद्राचे पाण्यांत. १७. अभिमानी.

तद्गरळज्वाळांनीं[1] प्राणांची निश्चिताचि जरि हानी. ४३
दैत्यानीं वासुकिचें त्यजिलें जें काय[2] मानुनीं तुच्छ,
तें धरिलें देवानीं, स्वहितकरप्रभुवरोदितें[3] पुच्छ. ४४
विषधूमार्चिस्पर्शश्रांतां[4] करि शांत शक्र जळदानीं.[5]
त्यां श्रमशिथिलभुजांतें[6] प्रभु झाला मुक्तहस्त[7] बळदानीं.[8] ४५
मथितां सिंधूंतूनि प्रथम प्रकटे कळानिधी[9] सोम[10];
तो धवळात्मा धवळी स्वांशुपटें[11] करुनि दिङ्महिव्योम.[12] ४६
झाली प्रकट मग श्रीदेवी; देवी सुरा[13] मग निघाली;
प्रकटे धवल तुरग[14] मग, झगमग[15] जो आपुली गगनिं घाली. ४७
कौस्तुभ मणि प्रकटला, श्रीसह घे श्रीपति स्वयें त्याला;
मग अमृतकमंडलुकर,[16] भगवान् धन्वंतरि प्रकट झाला. ४८
श्वेत, चतुर्दंत, करी[17] ऐरावण जन्मला, तया हरि[18] घे;
हयपतिसहि[19] घे; तैसें कवणाच्या रत्न मानसीं न रिघे? ४९
अतिनिर्मथनें[20] प्रकटे अतिदारुण काळकूटनाम गर,
तद्दर्पें[21] विश्व विकळ झालें, जैसें दवानळें नगर. ५०
दहनव्यसन शमाया, प्रार्थावा जलद त्या जसा नगरें,
शंभु विनविला विश्वें, कीं खावें आपणासि या न गरें. ५१
ब्रह्मप्रार्थित शंकर, त्या त्रिजग्द्रासैसिद्धपाप्याला,[22]
तत्काळचि, लीळेनें, विश्वावरि करुनियां कृपा प्याला. ५२

---

१. त्या वासुकीच्या विषज्वालांनीं. २. अवयव. ३. स्वकीयांचा हितकर्ता जो प्रभुश्रेष्ठ त्याच्या भाषणानें. ४. विषाच्या धूमयुक्त ज्वालेच्या स्पर्शानें थकलेल्यांस. ५. मेघांनीं. ६. श्रमानें थकले बाहू ज्यांचें, त्यांतें. ७. सढळ हाताचा. ८. शक्ति देण्याविषयीं. ९. षोडशकलापूर्ण. १०. चंद्र. ११. आपल्या किरणरूपी वस्त्रानें. १२. दिशा, पृथ्वी आणि आकाश. १३. दारू. १४. घोडा. १५. लकाकी. १६. अमृत (भरलेलें आकारविशेष) पात्र हातीं आहे असा. १७. हत्ती. १८. इन्द्र. १९. अश्वश्रेष्ठ. (उच्चैःश्रवा). २०. अतिशय मंथन केल्यानें. २१. त्या विषाच्या दर्पानें. २२. त्रैलोक्याचा ग्रास करण्यास तयार झालेल्या पापी काळकूटाला.

कंठींच विष धरि प्रभु; त्यास्तव आणी निका[1] मनीं लाभ;
कीं अतुळ यश मिळालें; कंठहि शोभे निकाम[2] नीलाभ[3]. ५३
धन्वंतरिपासुनि तो अमृतकमंडलु बळें असुर हरिती;
करिती चिंता निर्जरें[4]; जाणे त्यांचा अभीष्टकर हरि ती[5]. ५४
अद्भुत ललनारूप[6] स्वीकारुनि, विश्वरूप हरि, त्यांचें
प्रथम हृदय, मग अमृतहि हँरि[7], अप्रार्थित बळेंचि हरित्यांचें.
प्राप्तहि अमृत, करींचें स्त्रीसंगें जाय हें जना कळवी.
प्रभु दृक्पातें[8], हंसितें[9], भुलवुनि, सर्वस्व जोडिलें पळवी. ५६
जे जे साधु, स्वाश्रित, त्यांतें तें अमृत मोहिनी वाढी.
तात्पर्य अमृतमथनीं ऐसें मणिगर्भकार[10] हें काढी. ५७
सुररूप[11] असुर राहु प्राशी अमृतासि, तें तरणि इंदु
सूचविति तोंचि हरि हरि[12] अरिनें[13] अरिशिर, गिळों न दे बिंदु. ५८
गुरुचा प्रसाद नसतां अमृत न पावे असाधुजन कपटें.
हें कळविलें बुधांतें अमृत पितां वधुनि राहु कनकपटें[14]. ५९
तें गगनग[15] राहुशिर द्वेषें अद्यापि रविविधुग्रास
करितें, कवि अघभीरुचि[16] बहु भीति अघां तयाचि[17] उग्रास. ६०
राहून्मथनीं झाला अतुल, तुमुल, दितिजदनुजनाकिरण[18].
रविचे शररेणुपटलपटधिकृत[19] न दिसती जना किरण. ६१

---

१. पूर्ण. २. अतिशय. ३. नीलवर्ण. ४. देव; ज्यांना जरा म्ह० वृद्धावस्था नाहीं ते. ५. चिंता. ६. सुंदर तरुणीचें रूप. (मोहिनी). ७. हरण करी. ८. दृष्टिक्षेपानें. ९. हास्यानें. १०. भारतावरील एक टीकाकार. ११. देवाचें रूप ज्यानें घेतलें आहे असा. १२. छेदी. १३. चक्रानें. १४. सुवर्णासारखें पिवळें आहे वस्त्र ज्याचें, त्यानें, (विष्णूनें). १५. आकाशांत उडालेलें. १६. पापभीरु. १७. सूचकत्व दोषास—**पंत**. १८. दैत्य, दानव आणि देव याचें युद्ध. (नाक म्ह० स्वर्ग ज्यांना आहे ते नाकी=देव). १९. बाण आणि धूलि यांच्या समूहरूपी वस्त्रानें आच्छादित.

नरशरगणें[1], चतुर्भुजचक्रें, झाले असंख्य असुरहित[2].
अमृतें न तसें होतें, रणमरणें[3] होय फार असुर-हित. ६२
अमृतार्थ युद्ध दारुण केलें, ती बहु कथा असो, यत्नें
सिंधूंतूनि चतुर्दशसंख्याक[4] प्रकट जाहलीं रत्नें. ६३
'त्यांतिल हरि[5] किंवर्ण[6]?' स्वसपत्नीला असें पुसे कद्रू.
निजमत्सर वृद्धिंगत सत्वर व्हाया, जसा सुसेक[7] द्रु[8]. ६४
विनता म्हणे 'भगिनि! त्या हयपतिचा वर्ण निश्चयें धवळ;
तूं तर्कें वद कैसा? पाहूं जावूनियां तयाजवळ.' ६५
कद्रू म्हणे, 'नसे तो धवळ, असे काळवाल[9] हें साचें.'
विनता म्हणे, 'दुधाच्या मित्राचि तें अश्वरत्न फेंसाचें.' ६६
कद्रू ह्मणे 'करीं पण.' तेव्हां विनता ह्मणे, 'जिचें लटिक
होईल, तिणें व्हावें, जीचें तर्कित खरें, तिची चेटिक[10].' ६७
व्याळांची माय ह्मणे, 'बहु बरवें, आजि तों असो, राहूं;
दोघी उद्यांचि जावुनि उच्चैःकर्णाप्रति[11] स्वयें पाहूं.' ६८
निश्चय करूनि ऐसा, कद्रू सांगे सुतांसि गूढ पण;
सिकवी कुमति, स्वमुखें प्रकट करी आपुलेंचि मूढपण. ६९
'अंजननिभ[12] केश तसे होऊनि शिरा तुरंगपतिपुच्छीं.'
ऐसें कपट सिकवितां, जे स्वमतीं घालिती न मन तुच्छीं. ७०
त्यांसि म्हणे, 'जनमेजयसत्रांत जळाल,' तों 'तथास्तु' तिला
विधिहि म्हणे; करि, करितां पूर्ण स्वमहामनोरथा, स्तुतिला. ७१

---

१. नरमुनीच्या बाणसमुदायानें. (या युद्धाचे वेळीं नरनारायण युद्ध करण्याकरितां आले होते; त्यांपैकीं नराच्या बाणसमुदायानें). २. प्राणरहित. ३. वीरांना युद्धांत मरण आल्यानें स्वर्गप्राप्ति होते असें शास्त्रमत आहे. ४. चवदा आहे संख्या ज्यांची. ५. घोडा. ('हरि' हा शब्द अनेकार्थवाचक आहे; कोश पहा). ६. कोणत्या रंगाचा? ७. चांगलें केलें आहे सिंचन ज्याला. ८. वृक्ष. ९. काळ्या केंसाचा. १०. दासी. ११. उच्चैःश्रव्याप्रत. १२. काजळासारखे.

विधि कश्यपासि सांगे, 'जगदहित[1]भुजंगशाप मज रुचला;
खेद तुवां न करावा; होणारासारिखा तिला सुचला.' ७२
प्रातःकाळीं कद्रूविनता लंघूनि जलधिला, खपथें[2]
गेल्या अश्व पहाया, दासीपण करुनि दृढ पुन्हां शपथें. ७३
जातां, विनता अश्वीं कद्रूका काळवालता[3] पाहे;
पावे वल्ली, भरितां जेंवि विषें आलवाल[4], तापा हे. ७४
हयपुच्छवर्ण फिरवुनि, ऐस्या कपटेंकरूनि लटिक पण,
कद्रूनें आत्मोचित[5] विनतेसि दिलें बळेंचि बटिकपण. ७५
तेव्हां विनतेमागें झाला उत्पन्न गरुड पावकसा[6].
त्रस्त सुर म्हणति, 'अग्ने! आटोपीं स्वोग्रतेज, पाव कसा.' ७६
अग्नि म्हणे, 'तो विनतासुत, गरुड, खगेंद्र; जाणतां[7] अरुणा.
तदनुज[8] तो साधु तुम्हां देवांवरि करिल सर्वदा करुणा.' ७७
सुरमुनि दूरुनि विनतापुत्राला मग करूनियां प्रणति[9],
स्तवुनि यथामति, जोडुनि कर, 'जगदभयार्थ[10] सौम्य हो' म्हणती.
होउनि सौम्यतनु गरुड त्यांसि म्हणे, 'म्यां स्वतेज आवरिलें,
सोडावें[11] तें, तुमच्या हृदयानीं, न समजोनि, ज्यां[12] वरिलें.' ७९
देतां अभय असें, ते वंदुनि गेले तया सकरुणातें[13];
सिंधुपरतटा[14] गेला पृष्ठीं वाहोनि गरुड अरुणातें. ८०
पूर्वोदधिपरपारीं[15] गरुडें नेऊनि ठेविला अरुण;
रवि जें झाला होता, करावया विश्व भस्म, निष्करुण[16]. ८१
रविचा क्षोभ असा कीं, 'सूचविला सुरहितार्थ जो अरि तो
राहु, स्ववध कराविला म्हणवुनि, पीडा सुदुःसहा करितो.' ८२

---

१. जगाला शत्रूसारख्या अशा सर्पांना दिलेला शाप. २. आकाशमार्गानें. ३. केंसाचा काळेपणा. ४. अळें. ५. आपणास योग्य असें. ६. अग्नीसारिखा. (प्रखर). ७. तुम्हीं जाणतच आहां. ८. त्या अरुणाचा धाकटा भाऊ. ९. नमस्कार. १०. जगाला अभय देण्यासाठीं. ११. भय. १२. भयास. १३. सदयातें. १४. समुद्राचे परतीरास. १५. पूर्वसमुद्राचे परतीरावर. १६. निर्दय.

सर्व उदासीनपणें पाहति, आम्हांसि देवुनीं भरिला;
प्राशाया अमृताला आपण सिद्ध, न सहावया अरिला.' ८३
या क्षोभें, अस्ताप्रति गेल्यावरि, सर्वलोक तापवुनीं,
बहु विकळ करी रात्रौ; ग्रीष्मींच्याही तसा न ताप वुनीं. ८४
कथिति महर्षि सुरांला, 'ताप नुगवतांहि देतसे अर्क[1];
भस्म करील जगत्रय उदयानंतर असा दिसे तर्क.' ८५
सुर म्हणति, 'चला जावूं, कळवूं विधिला.' तसेंचि मग करिती.
सूर्याभिप्राय कथुनि, विधि सांगे युक्ति जी तिला वरिती. ८६
भानुपुढें अरुणाचें स्थापन, गरुडासि सांगवुनि, करवी;
पात्र अकाळित्रिजगन्नाशापयशासि[2] होय तो न रवी. ८७
जलनिधिच्या परपारीं गेला मातेसमीप मग पक्षी[3].
आंधिमलिन[4] मुख न तिचें, नतिचें[5] भाजन[6] पदांबुजाचि, लक्षी[7].८८
दासी होवुनि, कद्रूचरणयुगीं सर्वदा असे विनता.
कपटजिता[9] दक्षसुता खगपतिमाता महासती विनता. ८९
तीतें दे ताप सदा सर्वांगीं जेंवि वाढली दद्रू[10].
एके दिवसीं सांगे न्याया द्वीपांतरासि ती कद्रू. ९०
घे स्कंधीं कद्रूला विनता, नागांसि गरुडही वाहे.
तेजस्वी परि मातृस्नेहें स्वातिक्रमासि[11] तो साहे. ९१
नागांसि रामणीयद्वीपा[12] नेतां नभःपथें, पक्षी
सूर्यासमोरचि उडे, व्याळांची विकळता न तो लक्षी. ९२
तेव्हां इंद्रासि म्हणे कद्रू, जोडूनियां स्वकर, 'पावें.'
इंद्रहि वृष्टि करी कीं, अहिकुळ तीव्रातपें[13] न करपावें. ९३
गेली द्वीपा ससुता कद्रू; तें स्थान, जेंवि नाकवन[14],

१. सूर्य. २. अकालीं त्रैलोक्याचा नाश केल्याचे अपयशाला. ३. गरुड. ४. मनोव्यथेनें निस्तेज झालेलें. ५. नमस्काराचें. ६. स्थान. ७. पाहे. ८. विनम्रा. ९. कपटानें जिंकलेली. १०. खरूज. (गजकर्ण). ११. आपल्या उल्लंघनास म्ह० उपमर्दास. १२. रामणीयनामक बेटांत. १३ प्रखर उन्हानें. १४ नंदनवन.

दे सुख त्यांला, जैसें साधूचें सर्व सज्जना कवन[1]. ९४
गरुडाला अहि म्हणती, 'याहुनिहि स्थळ असेल जें रम्य,
तेथें आम्हांला ने; सामर्थ्यें सर्व तुज असे गम्य[2].' ९५
गरुड म्हणे मातेला, 'ऐकावें पन्नगोक्त म्यां कां? गे!'
अश्रुमुखी[3] ती विनता पुत्राला वृत्त सर्वही सांगे. ९६
नागांला गरुड पुसे, 'उक्त कराया असेंचि उद्युक्त;
सांगा तुमच्या दास्यापासुनि होईन मीं कसा मुक्त?' ९७
अहि म्हणति, 'अमृत जरि तूं आणुनि देसील, मुक्त होसील;
नाहीं तरि तुजसह तव माता हें दास्य नित्य सोसील.' ९८
तें मान्य करुनि, सांगे मातेला; मग म्हणे, 'न कुत्सा[4] हें
भुजयुग[5] पावो, जातों अमृतानयनार्थ[6] आजि उत्साहें. ९९
परि भक्षावें काय? क्षुद्बाधा दारुणा, वदें युक्ति;
तनुमतिसामर्थ्याचें[7] कारण सर्वांसि पाहिजे भुक्ती[8].' १००
विनता म्हणे, 'पयोनिधिकुक्षींत[9] निषाद[10] फार आहेत,
ते खा; आणुनि अमृत, क्षिप्र करीं मुक्त, पुरविं हा हेत[11]. १०१
ब्राह्मण मात्र न खावा; तद्वातें होय आपुला घात;
दहन, रवि, शस्त्र, विष, तो; जोडावे त्यासि सुमतिनें हात. १०२
चिन्ह पुससि तरि कंठीं जाळील, तयावरूनि वळखावा.
विप्र करूनि निराळा, त्वां सर्व निषादलोक खळ खावा. १०३
तव पक्षांतें मारुत, पृष्ठातें चंद्रसूर्य रक्षूत;
वन्हि शिरातें; तनुतें वसु[12]; वत्सा! विघ्न तुज न लक्षूत.' १०४
आशीर्वादें सुखउनि, आज्ञा दे पादपंकजीं विनता[13];

---

१. गाणें, (काव्य). २. जाण्यास शक्य. ३. [दुःखानें] मुखावर अश्रु गळाले आहेत अशी. ४. निंदा. ५. बाहुयुग, (पण येथें 'पक्षयुग'). ६. अमृत आणण्यासाठीं. ७. शरीर आणि बुद्धि यांच्या सामर्थ्याचें किंवा शरीर बुद्धि आणि सामर्थ्य यांचें. ८. भोजन. ९. समुद्रतीरावर. १०. मासे मारणारे कोळी. ११. हेतु. १२. अष्टवसु. १३. नम्र अशाला, (गरुडाला).

मग तो तैसेंचि करी वदली होती जसें सती विनता. १०५
वृंदावनीं अजगरें मोडुनि गिळिले निषाद सर्व, तसे
जठरानळांत झाले भस्म, प्रळयानळांत पर्वतसे. १०६
जेव्हां गरुडें, पसरुनि मुख, गिळिले बहु सहस्र ते कोळी,
तेव्हां कंठीं एक ब्राह्मण अंगारराशिसा[1] पोळी[2]. १०७
त्याला खग 'नीघ' म्हणे, परि न निघे, विप्र तो विषादी[3] तें
मरण तसें मान्य करी; मग सोडी तत्प्रिया निषादीतें[4]. १०८
भक्षूनि निषादांतें, वंदी जावूनि कश्यपासि मग.
आशीःकुशलप्रश्नें[5] तातें केला प्रहृष्टचित्त[6] खग. १०९
वृत्त कथुनि, गरुड म्हणे, 'आलों ताता! त्वदंघ्रि[7] देखाया;
अमृताहरणा जातों, क्षुत्परिहारार्थ[8] अन्न दे खाया.' ११०
कश्यप म्हणे, 'सुता! या कासारीं[9] एक कूर्म जो राहे,
तो उन्नत[10] त्रियोजन[11] दशयोजनमंडलें[12] स्वयें आहे. १११
गजहि वनीं एक असे, सा गावें उच्च, आयतहि[13] बारा;
ते भक्षावे; स्यां हा तुज वत्सा! अंडजा[14]! दिला चारा. ११२
गज सुप्रतीकनामा मुनि, जो कच्छप विभावसू तो, ते
झाले असे स्वशापें धनलोभें, अनुजअग्रजनि[15] होते. ११३

---

१. जळजळीत निखाऱ्यांच्या राशीसारखा. २. जाळी. ३. दुःखी. ४. गरुडाच्या सर्व निषाद खाऊन टाकण्याच्या सपाट्यांत चुकून एक ब्राह्मण सांपडला. परंतु गरुडमाता विनता इनें ब्राह्मण ओळखण्याची खूण सांगून ठेविल्याप्रमाणें ब्राह्मण घशांत जातांक्षणीं त्या ठिकाणीं आगीचा भडका उडाला. तेव्हां गरुडानें ब्राह्मणास बाहेर निघण्यास सांगितलें. तथापि तो बाहेर निघेना. कारण, त्याची प्रिया एक निषादी (कोळीण) होती; ती आंत आडल्यामुळें तिच्या विरहदुःखानें तो ब्राह्मण मरण पतकरण्यासही तयार झाला. असें पाहून गरुडानें त्या दोघांसही घशांतून बाहेर काढिलें, अशी कथा आहे. ५. आशीर्वाद देऊन आणि कुशलप्रश्न करून. ६. आनंदित आहे चित्त ज्याचें. ७. तुझे पाय. ८. क्षुधानिवारणार्थ. ९. सरोवरामध्यें. १०. उंच. ११. योजन=चार कोस. १२. मंडल=घेर. १३. लांब. १४. अंड्यापासून उत्पन्न झालेल्या! १५. लहानमोठे भाऊभाऊ.

अद्यापि पूर्ववैरें कलह करिति, उठति त्या गजीं, कूर्मीं,
दृक्पात[1]वातयोगें क्रोधविषाब्धींत तापकर कूर्मी[2].' ११४
आशीर्वाद निरोपही दे, मग खगपति तसेंचि करि तो, घे
एकेंचि नखें कच्छप, गजही एकेंचि, उचलिले दोघे. ११५
करिकच्छपधरखगवर तो जाय उडोनि मेरुच्या[3] शिखरीं.
आश्रय द्याया भ्यालीं त्यांचीं गुरुतरुवनें[4]हि त्यासि खरीं. ११६
आश्रय वृक्ष न देती, कांपति; मग खग म्हणे, 'करूं कैसें?'
तों एक वट[5] वदे, 'ये, मच्छाखेवरि खगेश्वरा! बैसें.' ११७
शतचर्मतंतुमाजि न मायाची[6], आणि लांब शत गावें,
भंगे बसतांचि; तिचें त्या गुरुभारें स्वधैर्य न तगावें[7]. ११८
पाहे जों शाखेला तों तीच्या आश्रयें अर्धस्तुंडें[8]
श्रीवालखिल्य[9]वृंदें लोंबत होतीं, तपोग्निचीं कुंडें. ११९
नाश न पावावीं तीं दिव्यतपः[10]श्रीविलासिनीसदनें,
म्हणउनि पडतांचि धरी शाखेला वैनतेय[11] तो वदनें. १२०
गजकच्छपशाखाधर गरुड उडाला, नभीं बहु भ्रमला;
[12]मुन्यवनाधिभरेंचि, न शाखादिभरें करूनि, तो श्रमला. १२१
मग, गंधमादनाप्रति जातां, पाहे पिता[13], म्हणे, 'बा! हें
साहस न करीं, तुजला भस्म न मुनिवर करूत हे, राहें[14].' १२२
प्रार्थुनि म्हणे मुनीं[15]प्रति, 'मजवरि करुणा करूनि, हे शाखा
सोडा, सद्यश जोडा, व्यसनीं विनताप्रजा[16] तुम्हीं राखा.' १२३

---

१. दृष्टिभेटरूप वाऱ्यानें. २. कु+ऊर्मी=भयंकर लाटा. (एकमेकांस पाहतांक्षणीं त्यांना अतिशय संताप येतो, असा भावार्थ). ३. मेरुपर्वताची. ४. प्रचंड वृक्षांचीं अरण्यें. ५. वडाचा वृक्ष. ६. मावयाची. ७. टिकावें. ८. अधोमुख अशी. ९. श्रीवालखिल्य नांवाच्या अति सूक्ष्म मुनींचा समूह. १०. उत्तम तपसंपत्तीरूप विलास करणाऱ्या स्त्रीचीं घरें. ११. विनतापुत्र गरुड. १२. ऋषींचें संरक्षण व्हावें या काळजीच्या भारानें. १३. कश्यप. १४. थांब. १५. वालखिल्यनामक मुनिसमूहाला. १६. विनतेची संतति (जो गरुड).

ते मुनि त्या शाखेला सोडुनि गेले हिमालया, मग, ती
तातकथित विजननगीं गरुडें त्यजितांचि, कांपिली जगती. १२४
ज्यावरि शाखा त्यजिली, त्याचि नगशिरीं बसोनियां, पक्षी
त्या [1]स्वचरणनखरशिखरलग्नद्विपकच्छपांसि तो भक्षी. १२५
भोजन करुनि उडे तो अमृत हरायासि, तेधवां झाले
भूकंपाद्युत्पात,[2] त्रिदश[3] महेंद्रादि सर्वहि भ्याले. १२६
उत्पातबीज पुसतां, हरिसि[4] गुरु[5] म्हणे, "करीं स्मरण, मागें
वदले, त्वां स्वबळमदें अपमानित, वालखिल्य जें रागें. १२७
पूर्वीं करीत होता पुत्रार्थी कश्यप स्वयें यजन;
साहित्य देत होते सुर, ऋषि, गंधर्व, सर्व भव्य[6] जन. १२८
समिधांचा गिरिसम गुरु भुजलीळेंकरूनि आणितां भार,
मार्गांत वालखिल्यहि तुज येतां भेटले निराहार. १२९
अंगुष्ठोदरमितवपु[7] ते, एक पलाशवृत्तिका,[8] वाटे
आणित असतां श्रमले होते; गोष्पदहि[9] सिंधु ज्यां वाटे. १३०
त्या गोष्पदांत पडतां, बुडतां, श्रमतां, तयांसि पाहूनीं,
तूं हांसलासि; नाहीं झालासि सहाय, जवळि राहूनीं. १३१
त्या अपमानें चित्तीं कोपातें धरुनि, यज्ञ ते धन्य
करिते झाले स्वतपें निर्माया इंद्र तूजहुनि अन्य. १३२
कामगम,[10] कामरूप,[11] स्वाधिकबळ इंद्र निर्मितील मुनी,
करितील पदच्युत मज, हें त्वां [12]स्वपित्यासि कळविलें नमुनीं.
त्यांप्रति कश्यप वदला, 'मुनि हो! स्वतपें नवी जगद्रचना
शक्यचि तुम्हां असे परि विधिच्या मिथ्या करू नये वचना. १३४

१. आपल्या पायांच्या नखाग्रांना अडकलेल्या हत्ती आणि कासव यांना. २. उत्पात=अशुभ चिन्हें. ३. देव. ४. इंद्राला. ५. बृहस्पती ६. थोर. ७. आंगठ्याच्या मध्यभागाएवढ्या शरीराचे. ८. पळसाचा एक देंठ. (येथें मूळ भारतात 'पलाशवृन्तिका' असा पाठ आहे). ९. गाईच्या पावलानें उमटलेल्या चिन्हांत सांठतें इतकें अत्यल्प पाणी. १०. इच्छेस येईल तिकडे जाणारे. ११. वाटतील तीं रूपें धारण करणारे. १२. कश्यपास.

मिथ्या संकल्प नसो तुमचाहि, करा खगेंद्र, विप्रभ[1] या
हरिचें वदन पहा हो! वारा याच्या तुह्मीं सुविप्र भया.' १३५
ते सुप्रसन्न होउनि, वदले ऐसें, 'प्रजापते! साधो!
तरि हा त्वत्पुत्र असो, त्वसंकलिपतहि या फळें साधो.' १३६
तो विनताकुक्ष्युद्भव[2] काश्यपि[3], पक्षींद्र[4], गरुड, बळशाली,
जातो अमृत हराया, उत्पातोत्पत्ति तद्भयें झाली." १३७
हें ऐकुनि इंद्र म्हणे 'सुर हो! पक्षी हरो न सोमातें[5];
रक्षा; खगकृतपरिभवनूलमषीलेप[6] हा नसो मातें.' १३८
झाले सिद्ध सुर सकळ, नेले अमृतासमीप अशनिकरें[7].
म्हणति, 'करावाचि सुधाहरणेच्छु विहंग कालवश[8] निकरें[9].' १३९
तो तेथें गेला तो खगकुळचूडामहामरीचिमणी[10].
भ्याली त्यासि सुरचमू[11], श्येनांचें[12] जेंवि भय धरी चिमणी. १४०
नखपक्षतुंडपातें[13] बहु मूर्च्छित होय विश्वकर्मा[14]; तें
वर्णावें किति? त्याच्या वाखाणी फार विश्व कर्मातें. १४१
उडवूनि पक्षपवनें[15] धूळि, करी अंध देवसेनांतें;
जें धैर्य मनीं होतें, वीरांला पाठि दे, वसेना तें. १४२
शक्रें पवनाकरवीं रज वारवितांचि[16], देवकटकांहीं[17]
बहु शस्त्रवृष्टि केल्या, परि नाटोपेचि पक्षिभट[18] कांहीं. १४३
मग गगनग[19] खग त्यांतें जर्जर करि पक्षतुंडनखरानीं.
सुरकटकीं तो तैसा, जैसा प्रज्वलित वायुसख[20] रानीं. १४४

---

१. निस्तेज. २. विनतेच्या कुक्षीपासून उत्पन्न झालेला. ३. कश्यपाचा पुत्र. ४. पक्ष्यांचा राजा. ५. अमृतानें. ६. पक्ष्यानें (गरुडानें) केलेल्या पराभवरूप काजळाचा लेप. ७. वज्रहस्त इन्द्रानें. ८. मृत्यूच्या अधीन. ९. एकवटून. १०. पक्ष्यांचे कुलामध्यें मस्तकांतील अति तेजस्वी रत्नासारखा. ११. देवसेना. १२. ससाण्याचें. १३. नखें, पंख आणि चोंच यांच्या आघातानें. १४. देवांचा शिल्पी. १५. पंखांच्या वाऱ्यानें. १६. घालवितांचि. १७. सैन्यांनीं. १८. योद्धा गरुड. १९. आकाशांत उडालेला. २०. वाऱ्याचा मित्र, (अग्नि).

पळवुनि सुर सकळ, वधुनि अश्वक्रंदादि यक्ष, नव धरणी
रंगविली; सर्वांचा केला तेणें द्रवोनि[1] न वध रणीं. १४५
कोटांचि[2] होय अनळ[3], जैं जाय हरायासि गरुड सोमातें.
गर्वें म्हणे, 'विदारूं खरनखराघात[4] करु, डसो, मातें.' १४६
विझवी त्यासि गरुड, बहुमुख[5] होउनि, करुनि बहुनदीपानें.
दावावा झंझानिळ-सूर्यांतें[6] गर्व बहु न दीपानें. १४७
क्षुरपर्यंत[7], सुदारुण[8], चक्र वरि भ्रमतसे; तळीं दोघे
अमृतघटप[9] चक्षुर्विषअहितें[10] पाहूनि, सूक्ष्म वपु तो घे. १४८
शिरला अरांतरें[11] तो वायु तसा, मग अनल्प[12] रजें[13] उडवी;
अंध करुनि ते काळव्याळ, न भरतां निमेष, तो तुडवी. १४९
घेउनि अमृतघट, करुनि चक्राचा भंग, जाय कवि; त्याचें
तेज अतुळ; म्हणाति, 'नभीं तैं मंडळ लोपलेंचि सवित्याचें[14].' १५०
प्याला अमृत न लेशहि, केवळ सदतिक्रमासि[15] तो भ्याला;
म्हणउनि, निस्पृहजनधन[16] भगवान् दे भेटि त्या अलोभ्याला. १५१
विष्णु म्हणे, 'विहगवरा ! तूं माग मला अभीष्ट वर दात्या.'
मागे सुधेविणें अजरामरता[17], केतुवास[18], वरदा त्या. १५२
आपणहि म्हणे प्रभुला, 'मजपासीं तूंहि इष्ट वर मागें.'
देव म्हणे, 'मद्रथ हो.' सरले नाहींच शिष्टवर[19] मागें. १५३

---

१. कळवळून. २. किल्ला. ३ अग्नि. ४. तीक्ष्ण नखांचा आघात. ५. पुष्कळ मुखांचा. (अग्नि विझविण्याकरितां गरुडानें असंख्य मुखें धारण केलीं आणि पुष्कळ नद्यांचें पाणी प्राशन करून तें अग्नीवर सोडलें). ६. पावसासहित सोसाट्याचा वारा आणि सूर्य, यांतें. ७. अग्राला वस्तऱ्यासारखी धार असलेलें. ८. अतिशय भयंकर. ९. अमृतघटांचे संरक्षक. १०. ज्यांच्या दृष्टीमध्येंच विष आहे अशा सर्पांतें. ११. चक्रधारांच्या फटींतून. १२. पुष्कळ. १३. धूळ. १४. सूर्याचें. १५. थोरांच्या उपमर्दास. १६. विरक्त लोक हेंच द्रव्य ज्याचें. १७. जरामरणरहितता. १८. ध्वजस्तंभीं वास. १९. थोरथोर लोक.

स्वपराभव करुनि, बळें जातां घेवूनि सोमकलश, मन
क्रोधासि होय वश; मग ताडी वज्रें तयासि [1]बळशमन. १५४
विहगेंद्र म्हणे, ‘[2]जेणें निजतेजें सकळ अचळ कांपविला,
[3]दांटुनि मजवरि सोडुनि, अपयश दिधलें रणांत कां [4]पविलें?’
विप्रा[5]स्थिच्या अनादर न करावा, म्हणुनि सोडिलें [6]पत्र;
हें तुमच्या दृष्टींला हो साक्षात् दिव्यरुचि [7]सुधासत्र. १५६
सुरपति म्हणे, ‘[8]सुपर्णा! सांग मला स्वबळ, आयकों दे गा!
वरिच्यावरि तें तुझिया [9]श्रितजयदभुजांत काय कोंदे गा!’ १५७
[10]तार्क्ष्य म्हणे, ‘आत्ममुखें न करिति आत्मप्रशंसन ज्ञानी;
परि कथितों संकोचें, कीं हें घ्यावें मनीं न अज्ञानीं. १५८
[11]सनगवनसमुद्रा हे [12]क्षिति पक्षाग्रीं सदैव वाहेन;
[13]ब्रह्मांडकंदुकें मीं क्रीडेन; असीं सहस्र साहेन.’ १५९
शक्र म्हणे, ‘विहगेंद्रा! घे, देतों, तूं सुपात्र सख्यातें.’
गरुड म्हणे, ‘तृप्त असें मीं [14]सुरसें याचि, सुरसिकख्यातें.’ १६०
इंद्र म्हणे, ‘जरि अमृतप्राशनवांछा नसेचि, मग, मातें
खिन्न करुनि, काशाला नेसि? न देसी फिरोनि [15]खगमा! तें? १६१
तूं देणार जया हें, ते आम्हां पीडितील; या सुरसा
भलता उचित नव्हे, बा! तूं पीः असती महाशया! [16]सुरसा.’
गरुड म्हणे ‘हें, कांहीं कारण आहे, म्हणोनियां, मात्र
नेतों; त्वां आणावें ठेविन तेथूनि निजसुधापात्र.’ १६३

---

१. बलनामक राक्षसाचा वधकर्ता. (इन्द्र). २. ज्या वज्रानें. ३. जाणूनबुजून. ४. वज्राला. ५. ब्राह्मणास्थिरूप वज्राचा. (वज्र हें दधीचि ऋषीच्या हाडांपासून झालें). ६. पंख. ७. अमृताचें सतत दान. ८. गरुडा! ९. आश्रिताला जय देणाऱ्या बाहूंत. १०. गरुड. ११. पर्वत, अरण्यें व समुद्र यांसह. १२. पृथ्वी. १३. ब्रह्मांडरूप चेंडूनीं. १४. सख्यरूप मधुर रसानें. १५. आकाशांत संचार करणाऱ्या पक्ष्या! १६. देवासारिखा.

गोत्रारि[1] म्हणे, 'झालों त्वत्साधुत्वें सुतुष्ट; वर माग.'
वीशें[2] म्हणे, 'मज हें, दे, भक्षावे म्यां समस्त खळ नाग.' १६४
इंद्रें 'दिधलें' म्हणतां, जाउनि सर्पांसि तो म्हणे, 'उक्त[3]
केलें; हें घ्या; आम्हीं दास्यापासूनि जाहलों मुक्त. १६५
म्यां ठेविला कुशांवरि[4] हा तुमचा अमृतघट; पहा; सेवा;
स्नान करा; शुचि व्हा; हो! उद्योगांतर[5] मुहूर्तभरि ठेवा.' १६६
अहि गेले स्नाना, तों अमृत हरुनि, हरि म्हणे 'धुवा वपु, न्हा;
खळ हो! पहाल पुष्कळ निजनेत्रांतील[6] अमृत, 'हें[7] न पुन्हां.' १६७
न्हाले, भूषित झाले, आले त्या लेखजीवनां[8] प्याया.
अन्योन्यातें म्हणती, 'व्हा अजरामर, करा त्वरा, प्या, या.' १६८
कलश न दिसतां, सोडिति निश्वासा, तळमळोनि, अहिमां[9]; या
हानीच्या हेतूतें समजति ते आपुलीच अहि माया. १६९
तो घात त्यांसि दुःसह; सर्वस्वविनाश साहता शतदा.
'चुकलों, मुकलों स्नानें;' म्हणती ते सर्प 'हा!' हताशें[10] तदा.
'लटिक बटिक, फटि[11] कपटें 'हें[12] दुःसह, सह्य वैर वरचील.
खाय चराचरां चावुनि, उग्रत्व तसें न भैरव[13] रचीलें[14].' १७१
चुकवी कुगति, यशें उत्सुकवी सन्मन, असन्मुखें सुकवी[15];
सुखवी मातेला निज[16]मुखवीक्षामृतरसेंचि, 'तो[17] सुकवी. १७२

---

१. पर्वतशत्रु इंद्र. (इन्द्रानें पूर्वीं पर्वतांस असलेलें पंख वज्रानें तोडले म्हणून तो पर्वताचा शत्रु झाला). २. वि=पक्षी+ईश=राजा=गरुड. ३. बोललेलें. ४. दर्भांवर. ५. दुसरा उद्योग. ६. उदक. (अश्रु). ७. अमृत. (येथें 'अमृत' शब्दावर श्लेष आहे). ८. देवांचें जीवन जें अमृत त्याला. (लेख=देव). ९. उष्ण. १०. निराश असे. ११. फणि—**पंत**. १२. पाठांतर—**माय न हें**. १३. शिवाचे भयंकर स्वरूपांपैकीं एक. १४. या आर्येच्या अन्वयार्थाविषयीं पुढें परिशिष्टांत पहावे. १५. निस्तेज करी. १६. स्वमुखनिरीक्षणरूप अमृत रसानें. १७. तो उत्तम शहाणा गरुड. (हा या आर्येंतील सर्व क्रियापदांचा कर्ता आहे).

अध्याय पांचवा.

कद्रूचा ज्येष्ठ तनय शेष; दुजा वासुकी महाभाग;
ऐरावत, कर्कोटक, तक्षक, कालीय, बहु असे नाग. १
सर्वगुरूत्तम[1] माता, परि तीची रीति ती नव्हे नीट,
ह्मणवुनि शेष तप करी, दुःसंगतिचा धरूनियां वीट. २
अत्युग्र गंधमादनगोकर्णादिस्थळीं सदा तपतां,
भेटे त्यासि पितामह,[2] यमनियमांतें[3] सुयुक्तिनें जपतां. ३
'वत्सा! कां उग्रतपें तापुनि, लोकांसि तापविसि? बोल.
मद्दृष्टिवरतरिगता[4] शेषा! न मनोरथाब्धि तुज खोल.' ४
शेष म्हणे, 'द्वेष करिति गरुडाचा, न धरिती भया, भ्राते;
दुर्मति परस्परांहि,[5] अरिसम भांडति. सर्वदा दयाभ्रा![6] ते. ५
जन्मांतरींहि त्यांचा संग नसावा म्हणोनि देहातें
त्यागाया तप करितों, वरदा! वरदान हेंचि दे हातें.' ६
द्रुहिण[7] म्हणे, 'मीं जाणें कद्रूचें, आणि त्यांहि सापांचें,
विनतागरुडद्वेषप्रभृति विचेष्टित[8] अशेष,[9] पापांचें. ७
वर माग, शोक न करीं, म्यां तत्परिहार योजिला आहे,
सन्मतिला वर देतां, माझें मागेंपुढें न मन पाहे. ८
मज नयनिष्ठ,[10] शुचि, तुझें नवनीताहूनि हृदय मउ ठावें.
या त्वन्मतिमधुपानें,[11] धर्मसरोजें[12] त्यजूनि, न उठावें.' ९

---

१. सर्व गुरूंमध्यें श्रेष्ठ अशी. (न मातुः परदैवतम्). २. सर्पांचा पिता कश्यप आणि कश्यपाचा ब्रह्मदेव; हा सर्पांचा आजा. ३. इंद्रियदमन आणि स्नानसंध्यादि नित्यकर्मे, यांतें. ४. माझ्या दृष्टिरूप श्रेष्ठ नौकेमध्यें बसलेल्या शेषा! ५. आपसांत सुद्धां. ६. दयामेघा! ७. ब्रह्मदेव. ८. आचरण. ९. एकूणएक. १०. नीतिमान. ११. तुझ्या बुद्धिरूप भ्रमरानें. १२. धर्मरूप कमल.

'हाचि वर मला द्यावा' शेष म्हणे. विधि करी दया फार.
मग त्याला प्रभु सांगे निजमाथां घ्यावया धराभार[1]. १०
धरिली पृथिवी माथां, त्या पाताळीं शिरोनियां विवरें[2].
सख्यें आनंदविलें, विधिच्या आज्ञेकरूनि, त्यां[3] वि-वैरें[4]. ११
वासुकिहि करी चिंता; न सुचे कांहींच शाप[5]परिहार;
झाला म्लान; फिरविला पुष्पांचा जेंवि वन्हिवरि हार. १२
वासुकिला कोण्ही अहि म्हणती, 'आम्हीं विचार हा केला;
जनमेजयराज्याच्या घ्यावें, होवूनि विप्र, भाकेला[6]. १३
गोवुंनि[7] त्यासि ह्मणावें, भरतकुळश्री[8]सुरत्नहारा! हो
सत्यप्रतिज्ञ, राया! अहिसत्रारंभ उग्र हा राहो.' १४
अन्य अहि ह्मणति, 'होऊं तन्मंत्री, दाखवूनि नयन[9]पटुता.
पुसतां विचार, आणूं तच्चित्तीं सर्प[10]सत्रफळकटुता.' १५
इतर ह्मणति, 'सत्रज्ञ ब्राह्मण, नृपहित, असेल जो शिष्ट,
तो चावुनि मारावा भलत्या भुजगें, विचार हा इष्ट. १६
असतील तज्ज्ञ बहु, तरि मारूं सर्वांसही, करूं दंश.'
साधु ह्मणति, 'शिव! शिव! या मंत्रें[11] वांचेल हा कसा वंश?'
एक ह्मणति, 'घन होऊं, विझवूं अनलाशि, सत्रविघ्न करूं.'
एक ह्मणति, 'स्रुगादिक[12] पात्रें, असतां असावधान, हरूं.' १८
किति ह्मणती, 'मळमूत्रें दूषावें सर्व अन्न; तो यज्ञ
मग कैसा चालेल?' स्वमत असें बोलती किती अज्ञ[13]. १९
'ऋत्विज होउनि सत्रीं रायाला दक्षिणार्थ अडवावें;
प्रारंभींच करावा प्रत्यूह[14], बहु च्छळूनि, रडवावें; २०
अथवा उदकीं क्रीडा करितां, राजा धरूनि आणावा,
बद्ध करावा, हाचि स्वश्रेयस्कर उपाय जाणावा.' २१

१. पृथ्वीचा भार. २. बिळांतून. ३. शेषास. ४. पक्षिश्रेष्ठ गरुडानें. ५. शाप-विमोचनाची युक्ति. ६. शपथेला. ७. [शपथेमध्यें] गोवून. ८. श्री=लक्ष्मी. ९. (राज-)नीतिचातुर्य. १०. सर्पसत्राचा अनिष्ट परिणाम. ११. मसलतीनें. १२. पळी आदिकरून यज्ञपात्रें. १३. मूर्ख. १४. विघ्न.

कोणी पंडितमानी अहि ह्मणति, 'तुह्मांसि लागलें खूळ;
चावूं नृपासि; खाणूं स्वानर्थांचें अशेष तें मूळ.' २२
वासुकि ह्मणे, 'भुजग हो! तुमचा मजला विचार हा न रुचे.
क्षुधितें कसे गिळावे कवळ[1] गरळदूषितांतरा[2] चरुचे? २३
गुरुलाचि शरण जावें; वाटे आम्हांसि तोचि रक्षील;
वारील शापताप प्रभु जरि करुणेकरूनि लक्षील.' २४
एलापत्र[3] म्हणे, "मीं वदतों, परिसा त्यजूनि संताप;
होतों तेव्हां अंकीं मातेच्या, जेधवां दिला शाप. २५
सुर हळहळले, वदले, 'तीक्ष्णा न स्त्रीपरीस तरवारी.'
मग ते विधिसि विनविती तो त्यांचा खेद शीघ्रतर[4] वारी. २६
जवळचि तेव्हां होतों, म्हणउनि, म्यां ऐकिलें तदुक्त[5] असें,
'मज शाप मानला हो! जरि नसता मान्य, वारितों न कसें?
तीक्ष्णजगदहितपन्नगवृद्धि[6] नसावी, असें मनीं होतें.
मद्वांछित[7] स्नुषेच्या तेजें सिद्धीस पावलें हो! तें. २८
जे पापाचार, खळ, व्याळ, जगत्काळ, तेचि मरतील.
दुस्तरशापव्यसनीं, जे धार्मिक, सदय, तेचि तरतील. २९
आस्तीकनामक द्विज, पुत्र जरत्कारुचा तयां कवच[8]
होयील, स्वस्थ असा; हें माझें देव हो! मृषा[9] न वचें[10].' ३०
देवानीं, श्रवण करुनि विधिची अभयप्रदा असी उक्ती,
आस्तीकमौक्तिकाची पुसिली त्या ज्ञानसागरा शुक्ती[11]. ३१
'अभिधान समान जिचें वरिल जरत्कारु तीस, तसि कन्या
कद्रूची, वासुकिची अनुजा आहे, जगीं नसे अन्या.' ३२

---

१. ग्रास. २. विषानें दूषित आहे अंतर ज्याचें अशा भाताचे. ३. सर्पविशेष. ४. अत्यंत लवकर. ५. त्याचें (ब्रह्मदेवाचें) बोलणें. ६. भयंकर आणि जगास अहितकर अशा सर्पांची वृद्धि. ७. माझें इच्छित. ८. आच्छादन. ९. असत्य. १०. बोलणें. ११. आस्तीक मुनि हा मोती तर त्याची आई म्ह० अर्थातच मोत्यें जींत उत्पन्न होतात ती शिंप.

ऐसें आइकिलें म्यां. स्वजरत्कारु स्वसा[1] तया ऋषितें
द्यावी जीवनकामें[2]. यत्न करावाचि सर्वथा तृषितें." ३३
एळापत्रोक्त ते झाले सानंद सर्वही भोगी[3].
अमृतमथनींच ऐसा मंत्र करी वासुकी महायोगी. ३४
शापातें[4] वासुकिनें, मग डोळे करुनि अश्रुनीं ओले,
विधि सुरमुखें विनवितां, जें एळापत्र, तेंचि तो बोले. ३५
अमृतमथन झाल्यावरि, वासुकिनें सावधानधी[5] भोगी
आज्ञापिले, 'कथावा होतांचि विवाहकाम[6] तो योगी[7]'. ३६
दिव्यतपस्यासंगें[8] भुलला होता महर्षि; तो कां जी!
स्त्रीला[9] स्मरेल? रसिक, त्यजुनि सुधा, कोण सेवितो कांजी?
ऐसें असतां, त्याचा त्या व्यसनीं[10] काळ लोटला प्राज्य[11];
जोंपर्यंत परीक्षिन्नृपति करायासि लागला राज्य. ३८
त्या अभिमन्युकुमारें हर्षविली, रक्षुनि प्रजा, अवनी[12];
एका दिवसीं केला मृगयाक्रीडेस्तव प्रवेश वनीं. ३९
तेथें एक शरक्षत हरिण पळाला, म्हणोनि, त्यामागें
लागे तो नृप; ऐसें झालें नव्हतें कधीं च त्यामागें. ४०
पुनरपि विंधावा[13] मृग, म्हणउनि, तो धरुनि सज्य[14] धनु, सरला[15]
विशिखा[16] योजुनियां मख-हरिणातें[17] हर[18], तसाचि अनुसरला. ४१
झाला अदृश्य मृग तो स्वर्गतिचा हेतु होय त्या रूपें.
केला, भरीं भरोनि, श्रम भोगुनि, शोध काननीं भूपें. ४२

---

१. बहीण. २. जिवंत राहूं इच्छिणाऱ्यांनीं. (आपण). ३. सर्प. ४. शापानें पीडिलेल्या. ५. सावध चित्ताचे. ६. विवाह करण्याची ज्यास इच्छा आहे असा. ७. जरत्कारु. ८. तपश्चर्यारूप दिव्य स्त्रीच्या संगतीनें. ९. कोणा अन्य स्त्रीला. १०. नादांत. ११. पुष्कळ. १२. पृथ्वी. १३. मारावा. १४. दोरीसहीत असें. (तयार). १५. सरळ. १६. बाणाला. १७. यज्ञपुरुषरूपी मृगाच्या मागें. १८. शंकर. (शंकरांनीं दक्षयज्ञाचा विध्वंस केला, तेव्हां यज्ञपुरुषानें मृगरूप धरून पळ काढला. त्यावेळीं शंकर त्याचा पाठलाग करीत गेले, ह्या कथेकडे येथें कवीचें अनुसंधान आहे).

देउनि वियोग [1]निधिनें लुब्ध, नृप भ्रमविला तसा [2]एणें.
मग विपिनीं[3] मौनव्रत, फेनप[4] मुनि एक देखिला [5]तेणें. ४३
नाम शमीक तयाचें, जो सत्वाचि[6] शुद्धमानसां[7] गमला;
त्यासि म्हणे, 'क्षतमृग[8], जरि तुज आढळला असेल, सांग मला.
मुनि न वदे; नृप कोपे; मग कार्मुककोटिनें[9] मृता अहिला
घाली त्याच्या कंठीं, घडला पूज्यापराध तो पहिला. ४५
[10]भाविप्रबळभ्रम तो, सर्वहि बालिशें[11] असो, असो सुकवी[12],
होणार, सत्पथींही, दिवसींही, डोळसासिही, चुकवी. ४६
नृपति निजपुरा गेला. न क्षोभे मुनि, न तो मनांत रुसे.
साधु, कृतोपद्रवही, प्रतिकूळ न होति ते जना, तरुसे[13]. ४७
त्या साधुशमीकाचा सुत, नाम तया महर्षिचें शृंगी;
सेवी दृष्टि जयाची ब्रह्मपदाब्जा[14] सदा जसी भृंगी. ४८
तो स्वाश्रमासि, विधिला वंदुनि येतां, तयाप्रति सखा तें
गुरुलंघन[15] सांगे कृश[16]. असमंजस कर्म सन्मतिस खातें. ४९
वृत्त अशेष कृशमुखें कळतां शृंगी तदा असें शापी,
'तक्षकदंशें सप्तम दिवसीं तत्काळ तो मरो पापी.' ५०
मग आश्रमासि येउनि, शृंगी जों तातमूर्तिला पाहे,
मृतसर्प कंठदेशीं तोंवरि तैसाचि अर्पिला आहे. ५१
काढुनि सर्प, पित्याला सांगे, 'ज्या दुर्जनें असें पाप
केलें, म्यां त्यासि दिला, तक्षकदंशें मरो असा शाप.' ५२

---

१. ठेव्यानें. २. हरिणानें. ३. अरण्यांत. ४. फेंस पिणारा. ५. त्या राजानें. ६. [साक्षात्] सत्वगुणच. ७. शुद्ध अन्तःकरणाच्या मनुष्यांला. ८. जखमी केलेला हरिण. ९. धनुष्याचे टोकानें. १०. पुढें निश्चयानें घडून येणाऱ्या गोष्टीसंबंधींचा अनावर मोह. ११. मूर्ख. १२. चांगला जाणता. १३. वृक्षासारखे. (वृक्ष हा स्वतःचें छेदन करणाऱ्यावरीलही सावली दूर करीत नाहीं). १४. ब्रह्मपदा, अब्जा. १५. बापाचा अपमान. १६. एक मुनिकुमार.

पुत्रासि शमीक म्हणे, ‘ सुतपस्या व्यर्थ गेलि; हें काय
केलें? न पावलें क्षय कंठगतप्रेतलेलिहें[1] काय. ५३
पूज्य दशश्रोत्रियसा[2], अध्ययनतपक्रतुक्रियाहेतु[3],
राजा, गुरु प्रजांचा, चोरादिव्यसनसागरीं सेतु. ५४
या क्रोधदस्युतिलकें[4] कोण तपोधन जगीं नसे लुटिला?
बापा! विचक्षणा[5]! तूं कैसा विश्वासलासि[6] या कुटिलां[7]?’ ५५
बहु हळहळोनि मुनिनें गौरमुख[8] छात्र[9] शीघ्र पाठविला;
शाप नृपासि कळविला. तेणें स्वकृतापराध आठविला. ५६
गुरुलंघनपरितप्तें[10] भूपें तो गौरवदन बोळविला.
आधीं मस्तक त्याच्या असकृच्छुचिपदरजांत[11] लोळविला. ५७
मंत्रिमतें तोषविले विषनाशोपायदक्ष[12] कनकांहीं.
ते म्हणति, ‘स्वस्थ असा; आम्हांहुनि शक्त तक्षक न कांहीं.’ ५८
शीघ्र करविला एकस्तंभप्रासाद; त्यांत नृप राहे;
जेथें प्रवेश त्याच्या आज्ञेवांचूनि वातहि न लाहे. ५९
तेथेंचि राजकार्यें करितां, सा दिवस लोटले नीट.
आप्तोक्त[13] करी, परि नृप भ्याला नाहींच तो महाधीट. ६०
सप्तम दिवसीं काश्यपमुनि, कोणीएक, मृत्यु वाराया
धावोनि येत होता, द्विजतनु[14] तक्षकहि त्यासि माराया. ६१
दोघांसि गांठि पडतां, तक्षक त्यातें पुसे, ‘अगा आर्या!
सांग, त्वरा करुनि, तूं कोठें जातोसि? कोणत्या कार्या?’ ६२

---

१. गळ्यांत असलेल्या मृत सर्पाच्या योगानें (लेलिह=सर्प). २. वेदाध्ययन केलेल्या दहा ब्राह्मणांसमान. ३. अध्ययन, तपश्चर्या व यज्ञक्रिया यांचें (हीं निर्विघ्न होण्याचें) कारण. ४. क्रोधरूप अट्टल चोरानें. ५. हे शहाण्या! ६. ‘विश्वास’ ह्या नामापासून हें क्रियापद तयार केलें आहे. ७. खळाला. ८. शिष्याचें नांव. ९. विद्यार्थी. १०. थोराचा अपमान करून पश्चात्ताप पावलेल्यानें. ११. वारंवार, पवित्र अशा पायधूळींत. १२. विषबाधेचा नाश करण्यामध्यें कुशल (असे लोक). १३. आप्तांनीं सांगितलेलें. (आप्त=यथार्थवक्ता). १४. ब्राह्मणाचें रूप घेतलेला.

काश्यप म्हणे, ‘परिक्षिन्नृतीतें आजि विप्रशापानें.
तक्षक डसणार, तया जातों रक्षावया प्रतापानें.’ ६३
त्यासि म्हणे, ‘जो तक्षक डसणार तयासि, तो महाविष मीं;
साधो! जा मागें, तूं कां पडसी संकटीं अशा विषमीं[1]? ६४
विप्र म्हणे, ‘मद्विद्याबळ मज ठावें; तुझेंहि हारिन गर;
[2]पतिकुशळमुदित गजपुर[3] करिन, जसें नागमुक्त[4] हरिनगर[5].’ ६५
नाग म्हणे, ‘जरि मद्विषहत[6] नृप उठवावयासि तूं शक्त,
म्यां चाविला तरु करुनि जीवंत, स्वबळ दाखवीं व्यक्त[7].’ ६६
विप्र म्हणे; ‘हूं.’ तों तो स्वविषाचा दाखवी विभव[8], डास
घेउनि, तक्षक भस्मचि करि एका घनघटानिभ[9] वडास. ६७
तो मुनि हांसोनि म्हणे, ‘हा अद्भुत गा! अहे! तुझा डास;
क्षणहि न भरतां, झाला ऐसा भस्मत्वहेतु झाडास. ६८
आतां माझें विद्याबळ, लोकीं अतुळ, निर्विवाद, पहा.
होता तसाचि करितों, जरि झाला भस्मराशि पादप[10] हा.’ ६९
ऐसें वदोनि, मुनिनें, तें सर्व करूनि[11] भस्म एकवट,
केला जीवंत, करुनि त्यावरि विद्यासुधाभिषेक[12], वट. ७०
आला क्षणांत अंकुर, नव पत्र, स्कंध, पल्लवहि दाट;
झाला वृक्ष यथास्थित मुनितेजेंकरुनि; तोहि अहि भाट[13]. ७१
तक्षक म्हणे, ‘मुने! तूं धन्य, ब्रह्माचि भाससी, बापा!
हरिसील गरळ माझें, इतरांचेंही, समस्त, निष्पापा!. ७२
जरि अससील धनार्थी, तरि मजपासूनि अर्थ[14] बरवे घे;
नृप तों गतायु; कुशळ न खंडितमूळाफळद्रुवर[15] [16]वेघे. ७३

१. कठिण अशा. २. भूपतीच्या क्षेमानें आनंदित असें. ३. हस्तिनापूर. ४. कालीय सर्पानें सोडलेलें. ५. गोकुळवृंदावन. ६. माझ्या विषानें मेलेला. ७. स्पष्ट. ८. प्रभाव. ९. मेघसमुदायतुल्य. १०. पादैः पिबति=मुळांनीं जलसेवन करितो तो, वृक्ष. ११. रचूनि—**पंत**. १२. (विषबाधानाशक) विद्यारूप अमृताचा अभिषेक. १३. स्तुतिकर्ता. १४. धनादि. १५. ज्याचें मूळ तोडिलें आहे अशा वांझ वृक्षावर. १६. चढे.

दुर्वारविप्रशापें निःशेष प्राशिलें नृदेवायु[1];
तेथें करसिल काय? न वृद्धि निरंधन[2]शिखीसि दे वायु; ७४
अयश न जोडावें त्वां; क्षीणायु क्षितिप[3] निश्चयें मरतो;
येथूनचि पुष्कळ धन घेउनि, अमलिनयशा[4] भवान्[5] परतो. ७५
ध्यानें जाणोनि म्हणे मुनि, 'तोचि तपस्विशेखर[6] खरा हो[7].'
धन घेऊनि परतला; परि चित्तीं लागला खरखरा[8] हो!. ७६
मग तक्षक नृपतीचें जाणुनि बहु सावधानपण, सद्मीं[9]
नागांतें मुनिवेषें प्रेषी; ते शिरति, अलि[10] जसे पद्मीं[11]. ७७
भेटति कपटमुनि, कुशळ पुसति सबहुमान, साधुता राया
दावुनि, फळजळ अर्पिति, वदति प्रिय, मानसा धुतारा[12]या. ७८
पूजुनि, बोळउनि तयां, मग, तो नृप, विप्रदत्त तीर्थजळें
घेउनि माथां, ससचिव, सेवूं बैसे ऋषिप्रसादफळें. ७९
शिरला होता तक्षक योगबळें ज्यांत, तेंचि भूप फळ
घेता झाला; वाटे मोटें सर्वां बळांत भाविबळ[13]. ८०
त्यांत नृपासि कृमि[14] दिसे, ज्याहुनि वर्णें लहान[15] सेंदूर;
ज्यांचें[16] नेत्रयुग म्हणे, 'तिमिरा! उपमा लहा, नसें, दूर.' ८१
त्या ह्रस्वकाणुकृमिला[17] राजा सचिवांसि दाखवी; हांसे.
भ्रमला सुविचक्षण परि; पडले कंठांत मृत्युचे फांसे. ८२
सचिवांसि म्हणे, 'सप्तम दिन सरलें; मरण युक्तिनें टळलें;
कृमि कंठीं डसवावा; शृंगिवचनही न पाहिजे मळलें.' ८३

---

१. राजाचें आयुष्य. २. जळण नसलेल्या अग्नीस. ३. भूपति. (परीक्षिति राजा). ४. यश मलिन झालें नाहीं ज्याचें असा. ५. तूं. (येथें 'भवान्' शब्द योजिला आहे म्हणून पुढील 'परतो' हें क्रियापद तृतीयपुरुषीं घातलें आहे). ६. तपस्व्यांमध्यें श्रेष्ठ. ७. होवो. ८. चटपट. ९. घरांत. १०. भ्रमर. ११. कमलीं. १२. ठकवायास. १३. भवितव्यतेचें बळ. १४. किडा. १५. कमी. १६. ज्याचे डोळे अंधकारास म्हणत कीं, माझें सादृश्य तूं मिळीव; दूर राहूं नको. (तात्पर्य, त्या किड्याचे डोळे अतिशय काळे होते). १७. अति सूक्ष्म किड्याला.

सचिव म्हणति, 'बहु उत्तम; न करावा शब्द साधुचा लो
टळलाचि समय; जाया अस्ताप्रति भानुला नको घटिक
काळप्रेरित, सचिवानुमतें, नृप आपुल्या करें क्रमिला
डसवी कंठीं; हांसे; तों तेणें कंठदेश आक्रमिला.
भीषण[1]भोगें वेष्टुनि, फूत्कारें कांपवूनि साग[2]-रसा,
नागें, कंठीं चावुनि, नृप केला घटज[3]पीतसागरसा.
दवर्क[4]वळित नगखगसे, तग[5] सेवक काढिती न तैं पळ ते
जळते प्रासादासह नृपतिसवें, जरि न तत्क्षणीं पळते.
मोटा नाद करुनि, मग गगनपथें तो उडोनियां जाय.
राय, प्रासादासह, होय भस्मित[6]; सर्व पुर म्हणे, 'हाय!'
परलोकहित नृपाचें करुनि, गुरु पुरोहितप्रधानजन
करिति जनमेजयाचें, अभिषेकुनि सविधि पितृपदीं, भजं[7]
बाळपणींच सुमति तो जनमेजय रंजवि प्रजा; माता-
तात तसा पाळी, ज्या गुरुधनसत्कार्य[8], विप्र, जामाता.
काशिप सुवर्णवर्मा राजा, जनमेजया नृपा धन्या,
संबंध योग्य जाणुनि, देता झाला वपुष्टमा[9] कन्या.
त्या काळींच, ब्राह्मणवर्य जरत्कारु, सोडुनी पहिला
आश्रम, दुसरा सेवी, धन्य करी स्वांगना[10]ग्रजा अहिला[11].
वासुकिनें रम्य गृहीं, करउनि साहित्य सर्व, वसवीला.
मुक्त्यर्थ उमाशंकर जाणों देवालयांत बसवीला.
स्त्रीस मुनि म्हणे, 'अप्रिय करितांचि त्याजिन तत्क्षणीं तुज
विप्रिय सोसी विषयी[12]; हा विषयाकारणें नसे सुजला[13].'

---

१. भयंकर वेटोळ्यानें. २. पर्वतासह पृथ्वी-**पंत**. ३. अगस्ति ऋषींनें प्या
समुद्राप्रमाणें=जीवनहीन. ४. दावाग्नीनें ग्रस्त. ५. धीर धरिती. ६.
७. सेवा. ८. ज्याला, विप्र हा, पुष्कळसें द्रव्य देऊन सत्कार करण्यास योग्य
जांवईच कीं काय असें वाटे. ९. नामविशेष. १०. आपल्या भार्येच्या व
बंधूला. ११. सर्पाका. (वासुकीला). १२. कामुक, कामी. १३. उतावीळ झ

त्या शब्दें कंपिततनु झाली, झंझानिलें जसी कदली.
पदलीना ती साध्वी, मान्य करुनि, 'बहु बरें' असें वदली. ९५
भयचकितता मृगाची, शुनकाची[१] जागरूकता[२] सिकली,
ती इंगितज्ञताही काकाची; म्हणुनि सेवनीं टिकली. ९६
पत्नी अंतर्वत्नी[३] होतांचि, म्हणे मनांत तो 'जावें;
हा स्नेहपाश कैसा तोडावा? यासि काय योजावें?' ९७
एका समयीं, स्त्रीच्या अंकीं ठेऊनि शिर, निजे श्रमला[४].
साध्वीस तोचि अवयव सर्वावयवांत धन्यसा गमला. ९८
संध्यासमयावधि पति निजला, न उठे, म्हणोनि, ती व्याली,
निद्राभंग कराया, न करायाही, सती मनीं भ्याली. ९९
'निद्राभंग बरा, परि न बरा आवश्यकक्रियालोप[५];'
करुनि विचार असा, जों उठवी, तों विप्र तो करी कोप. १००
'कां गे! भुजंगमे! त्वां मजला निद्राभरांत जागविलें?
काय करसील? अंकीं शिर ठेउनि, तुज उदंड भागविलें[६]. १०१
जातों; न साहवे मज ऐसा अवमान, पळहि, हा कांहीं.
गृहसुख पुरे; कळविलें; शूळचि उठले शिरांत हाकांहीं[७]. १०२
'अस्तासि चालिला रवि, संध्याविधि अंतरेल,' या भावें,
म्हणसी जागविलें, तरि माझें सामर्थ्य तुज नसे ठावें. १०३
मीं निजलों असतां, बळ कैंचें अस्तासि जावया रविला?
म्यां[८] काय द्यूतांत ख्यात स्वतपःप्रताप हारविला?' १०४
दाटूनि दोष ठेवी, तो काय किति प्रकार बोलावा?
स्नेहाचा, निजचित्तीं लेशहि येऊं न देचि, ओलावा. १०५
जातां स्त्रीस म्हणे, 'मीं होतों सुखरूप, या तुझ्या भवनीं;
गेल्यावरि वासुकिला सांगावें, योग्य हा जन स्व-वनीं.' १०६

---

१. श्वानाची. २. सावधपणा. ३. गर्भिणी. ४. श्रमलासा. ५. नित्यकर्म (स्नानसंध्यादि) त्यांचा लोप. ६. श्रमविलें. ७. हांका मारण्यानीं. ८. मी.

नमुनि जरत्कारु[1] म्हणे, 'नसतां अपराध, टाकितां दासी;
द्विजराज तुम्हीं या अपवादांकें घ्याल हर्ष चांदासी. १०७
वासुकिनें, ज्या अर्थें, या देहें पूजिले भवच्चरण;
अजि वरद ! अहो वत्सळ ! आहे कीं तें नसे तुम्हां स्मरण ?'
विप्र म्हणे, 'त्वद्गर्भी आहे गुणमणिकरंड[2], कवि, शिष्ट.'
शांपव्याकुळमातुळकुळविपदर्णवतरंडक[3], विशिष्ट.' १०९
वासुकि पुसे, 'अहा ! तो कां हो ! गेला मुनि? स्वसे[4] ! नमनीं
चुकलोंचि काय आम्हीं ? क्षणभरिहि स्वस्थ निःस्वसे[5] न मनीं.
मुनिच्या अभयोक्तीनें झाला सानंदचित्त वासुकि; ती
स्वस्थ करी विश्वातें; तेथें कद्रूतनूद्भवासु[6] किती ? १११
चिंतामणि पेटोला, कीं जेंवि निधानकुंभ[7] सुक्षितिला,
कीं अमृतरस कुपीला, बहु गौरव दे तिचाचि कुक्षि[8] तिला.
स्वहितेच्छु भुजग जपती फार जरत्कारिला, जसे, चुकवी
जो बोध मरण, त्याच्या माते विद्योसि सर्वदा सुकवी[9]. ११३
उत्तम समयीं झाला पुत्र तिला; प्रकटतां रवि प्राची[10]
जसि शोभे, तसि तेणें ती भार्या फार फार विप्राची. ११४
आस्तीक नाम त्याचें ठेउनि, मानूनि लाभ लाभाचा,
वासुकिनें स्वप्राणांहूनि सदा रक्षिला भला भाचा. ११५

---

१. जरत्कारूची स्त्री. २. गुणरूप रत्नांचा डबा. ३. शापानें व्याकुळ जें मातुळकुळ (सर्पकुळ), त्याला विपत्तिरूप समुद्र तरण्याविषयीं नौका असा. ४. हे भगिनी ! ५. निर्धनासारिखे मनीं क्षणभरिहि स्वस्थ नव्हतों. ६. कद्रुपुत्र सर्पांचे प्राण. ७. द्रव्यानें भरलेला हंडा. ८. कुशी. (लक्षणेनें येथें 'गर्भ' असा अर्थ घ्यावयाचा). ९. शहाणे, विद्वान् (जपतात). १०. पूर्वदिशा.

सूचना—अध्याय ५।३३ मधील 'जीवनकामें' या पदावरील छापली गेलेली टीप रद्द आहे. तेथें 'सर्पपक्षीं जगण्याच्या इच्छेनें व तृषितपक्षीं पाण्याच्या इच्छेनें' असें समजावें.

अध्याय सहावा.

सचिवमुखें जनमेजय परिसे साद्यंत तातघातकथा.
कोपें म्हणे, 'न शापीं, पापीं भुजगींच, तातघातकता[1]. १
हा! तात! मला झाली अत्यंत असह्य, तापदा, वार्ता.
हा! साहवेल कवणा? क्षणतरि सोसेल ताप दावार्ता[2]'? २
भूप अमात्यांसि म्हणे, 'झालें वनवृत्त तें कसें श्रवण?
काश्यपतक्षक-भाषण ऐकोनि तुम्हांसि भेटला कवण?' ३
म्हणति प्रधान, 'होता काष्ठार्थी पुरुष वटनगारूढ[3];
होऊनि भस्म, झाला जीवंत वटासवेंचि, तो गूढ[4]. ४
तेणें कथिलें देवा! जरि मध्यें प्राप्त जाहलें मरण,
काश्यपमुनिच्या विद्यासामर्थ्यें त्यासि राहिलें स्मरण.' ५
सचिवांसि म्हणे राजा, 'जेणें बाधा दिली न हानि वडा;
वांचविता ताताला तो मुनि, चित्तांत भाव हा निवडा[5]. ६
मार्गांतूनि फिरविला काश्यप, देवूनि धन, असा मोटा
आग्रह घातीं ज्याचा, तो तक्षक अहि कसा नव्हे खोटा? ७
तोचि भुजग कृतपातक, घातक; तात कपटें खळें वधिला.
शृंगिक्षोभ बरा; परि न बरा त्या कुमतिच्या मनामधिला. ८
प्रिय आपुलें कराया, उत्तंकाचेंहि, मीं तया अरिला
भस्म करीन कुळासह; संकल्प असा स्वमानसीं धरिला.' ९
ऋत्विक्पुरोहितांतें[6] भूप म्हणे, 'तक्षकें जसा तात
केला भस्म, तसा मीं त्या दुष्टांचाहि इच्छितों घात. १०
होतील भस्म दहनीं पन्नग[7] जेणें, जरि प्रयोग असा
अवगत असेल सांगा; हो पतिरिपुकुळविनाशहृष्ट[8] रसा[9].' ११

१. तातघातकत्व. (तातघात केल्याचा दोष). २. वणव्यानें होरपळल्याला. ३. वडाचे झाडावर चढलेला. ४. न कळत. ५. धारण करा, ठेवा. ६. ऋत्विज आणि उपाध्याय, यांतें. ७. नाग. ८. राजा परीक्षितीच्या शत्रुकुळाच्या नाशानें आनंदित अशी. ९. पृथ्वी.

ते म्हणति, 'नृपा! आहे वेदपुराणोक्त सर्पसत्र, पहा
कौतुक; म्हणोत होउनि अहि पश्चात्तप्त, सभय, सत्रप[1], 'हां[2]!'
'पारीक्षित जनमेजय नरनाथ करील सर्पसत्रास;'
बुध वदति; तूंचि तो हो दीक्षित; होवूत सर्प सत्रास[3].' १३
साहित्य नृपति करवी; यज्ञायतनार्थ[4] मोजितां भूतें[5],
'विप्रनिमित्तें यज्ञासिद्धि[6]' असें भावि वर्णिलें सूतें. १४
तें परिसोनि नृप म्हणे द्वास्था[7] 'या यज्ञमंदिरामाजी
मज न कळतां, न कोणी यावा; आज्ञा मनीं धरीं माजी.' १५

अध्याय सातवा.

दीक्षा नृपासि देउनि, विधिलागि जपोनि, धीर[8] विप्र कृती
करिती सत्रारंभ व्यासादि तपोनिधी रविप्रकृती[9]. १
गुरु[10]शापविधिकृततदनुमोदनसन्मंत्रमुनिबळें कुंडीं,
जैसे पतंग दीपीं, पडति अमित[11] सर्प वन्हिच्या तुंडीं. २
नानावर्ण, महाबळ, वृद्ध, शिशु, व्याळ म्हणति 'हा!' रडती;
पडतां कृशानुवदनीं[12], दीन महाकाय फार आरडती. ३
उद्गाता[13] कौत्समुनी, पिंगल अध्वर्यु[14], त्या मखीं होता.
शार्ङ्गरवऋषि ब्रह्मा[15], च्यवनात्मज चंडभार्गवहि होता[16]. ४

---

१. सलज्ज. २. हाय! हाय!! ३. त्रासयुक्त. ४. यज्ञमंडपाकरितां. ५. भूमीतें. ६. यज्ञाची असिद्धि. ७. द्वारपाळाला. ८. धैर्यवान् आणि कर्तृत्ववान् असे विप्र. ९. सूर्यासारखे तेजस्वी. १०. मातेचा शाप, त्याला ब्रह्मदेवाचें अनुमोदन, उत्तम मंत्र आणि मुनींचें सामर्थ्य, यायोगें. ११. असंख्य. १२. अग्निमुखीं. १३. सामवेदी ऋत्विज. १४. यजुर्वेदी ऋत्विज. १५. तीन वेद जाणणारा ऋत्विज. १६. ऋग्वेदी ऋत्विज.

मौद्गल्य, देवशर्मा, कोहल, उद्दालक, प्रमिति, वत्स्य,
कुंडजठर, कालघट, श्रुतश्रवा वेदवारिनिधिमत्स्य[1], ५
इत्यादि मुनि सदस्य[2]; व्यासहि; ती अद्भुतप्रताप-सभा.
लोपे वैश्वानरभा[3]; अधिक दिसे त्या मखांत तापसभा[4] ६
शक्रासि शरण गेला तक्षक, जाणोनि त्या मखारंभा.
दे अभय हरिहि; शरणागतचि सखा शंमद[5], न सखा रंभा. ७
बहु भुजग भस्म होतां, उरतां परिवार केवळ स्वल्प,
वासुकिहि, विकळ होउनि, 'सर्वांचा पातला' म्हणे 'कल्प[6].' ८
भगिनीस म्हणे, "वत्से! वाटे उसळोनि मींहि त्या कुंडीं
सत्वर पडेन, सर्पग्रासकरीं मंत्रदीप्तशिखितुंडीं[7]. ९
दिग्भ्रम झाला; गेलें धैर्य-बळ; भ्रमतसें महातापें;
मन न वळे मज, जैसा गज अंकुश न वसतां महातापें[8]. १०
आम्हां रक्षील तुझा आत्मज, कथिलें भविष्य हें विधिनें[9];
म्हणुनि जरत्कारुकरीं पूर्वीं म्यां तुज समर्पिलें विधिनें. ११
तें आजि सत्य व्हावें; वत्से! वत्सासि सांग, 'माहेर
व्यसनीं न बुडो, काढीं पुत्रातें प्लवें[10] करुनि बाहेर.' १२
आस्तीकासि तसी तूं बहुमान्या, जानकी जसी कपिलीं[11].
कीं देवहूति माता जैसी त्या सर्वमुनिवरा कपिलीं[12]." १३
स्वस्थ हृदय वासुकिचें करुनि, जरत्कारु वृत्त सत्वर तें
पुत्रासि कथी; तेव्हां अभय दिलें त्यांसि[13] त्याहि सत्वरतें[14]. १४

---

१. वेदरूप समुद्रांतील जणुं मत्स्यच असे. (सर्व वेदांचें पूर्ण ज्ञान असणारे). २. यज्ञांत वेदोक्तकर्मे नीट चालली आहेत किंवा नाहींत हें पाहणारे, ऋत्विजविशेष. ३. अग्नीचें तेज. ४. ऋषितेज. ५. सुखद. ६. कल्पकाळ=मरणकाळ. ७. सर्पांचा ग्रास करणाऱ्या मंत्रप्रज्वलित अग्नीचें मुखच अशा कुंडांत. ८. महाताजवळ. ९. विधिपूर्वक. १०. नौका. ११. वानराला. (मारुतीला). १२. कपिल महामुनीला. (हाच सांख्यशास्त्रप्रवर्तक कपिलमुनि; यानें आपली माता देवहूती इला तत्वांचा उपदेश केला). १३. वासुकीस. १४. सत्वगुणाचे ठिकाणीं रममाण असणाऱ्या आस्तीकानें.

आस्तीक म्हणे, 'मामा! तुमचे असु या भयें न कांपावे.
स्वकृतसुकृत रक्षोद्यत[1] असतें; तें संकटीं न कां पावे? १५
जे मेले ते मेले; उरले रक्षील; आळस त्राता
हारिसि नसे; वारीलाचि सर्वात्मा विश्वपाळ सत्रा त्या.' १६
देउनि अभय असें, तो रक्षाया वासुकिप्रभृति भोगी,
वामन जसा बळिकडे, गेला जनमेजयाकडे योगी. १७
व्हावा प्रवेश म्हणउनि, 'मखऋत्विङ्नृपसदस्ययश[2] वर्णी
साधु, जरत्कारुमुनीश्वरबाळ, व्याळपाळ, मुनि, वर्णी[3]. १८
'सोम, वरुण, प्रजापति, सुरपति, यम, रंतिदेव, शशबिंदु,
नृग, गय, अजमीढ, धनद, दशरथकुळदुग्धसिंधुचा इंदु[4]; १९
नृपति युधिष्ठिर, भगवान् व्यास, असे सुविधिदेशसमयज्ञ[5]
जे जे त्यांहीं केले मख, हाही होय त्यांचिसम यज्ञ. २०
या सत्रींचे विप्र श्रुतिशास्त्रयशस्तपोनिधि[6], ज्ञानी.
हे साक्षात् वेदपुरुष, गावे, ध्यावे, सदा विधिज्ञानीं. २१
भगवान् पुत्रच्छात्रांसह वेदव्यास देव आपण, ज्या
सान्निध्य देतसे, निजभाग्यें बहुमान्य भूप हा पणज्या[7]. २२
जे विधिनें तुज भजले, तरलेचि भवांत वीतिहोत्रा[8]! ते.
त्वां अभय ज्यासि न दिलें, रक्षाया त्यासि भीति हो! त्राते. २३
राया! अपूर्व दिधला त्वां हा या हव्यवाहना[9] भाग.
तूं तैसाचि, जसे ते खट्वांग, दिलीपें[10], भीष्म, नाभाग[11]. २४
भीष्म व्रतें; दिवाकर तेजें; प्रभुतेकरूनि तूं शक्र;
द्युतिनें नारायण तूं; यद्यपि नाहीं तुझ्या करीं चक्र. २५

---

१. रक्षण करण्याविषयीं तत्पर. २. यज्ञ, ऋत्विज, राजा आणि सदस्य यांची कीर्ति. ३. ब्रह्मचारी. ४. दशरथ कुळरूप क्षीरसमुद्राचा चन्द्र, (अर्थात् रामचंद्र). ५. शास्त्र, प्रदेश आणि प्रसंग चांगल्या तऱ्हेनें जाणणारा. ६. वेद, शास्त्र, कीर्ति आणि तपश्चर्या यांचें भांडार. ७. बाप परीक्षिति, आजा अभिमन्यु, पणजा अर्जुन, त्याला. ८. अग्नि—**पंत**. ९. अग्नीला. १०. सूर्यवंशांतील अंशुमान राजाचा पुत्र. ११. दशरथाचा पणजा. इक्ष्वाकूचा बंधु.

गुणरत्नाकर कृष्णापरि; धर्मविनिश्चयज्ञ तूं धर्म;
आश्रय वसु[1]श्रियांचा, तूं यज्ञनिधान, भूमिचें शर्म. २६
तूं अस्त्रशस्त्रशास्त्रज्ञाता दाशरथि राम बाहुबळें;
और्व[2], त्रित[3], तेजें तूं, भगीरथ, पहावया अशक्य खळें. २७
वीर्य सदा गुप्त तुझें जैसें वाल्मीकिचें; जितक्रोध
जोडा[4] तूंचि वसिष्ठा; न दुजा; केला उदंड म्यां शोध. २८
अस्मन्मनःप्रिया[5]! तुज या सर्वांसह सदा असो स्वस्ति[6].
त्वद्यश[7] करो, तुझा अरिभटकटकांसह, दिगंतरीं वसती. २९
या ऐशा सत्राचा कर्ता तूं मात्र भारता! राया!
तूं व्यसनीं सेतु[8] जना, वाहूनि जनाधिभार[9], ताराया.' ३०
ऐसें करितां स्तवन, प्रज्ञातेजोनिधि[10]प्रति द्वारीं
रोध करावा कवणें? झाला बहुमान्य वेदविद्वारीं[11]. ३१
वय अल्प, अनल्प तपोविद्यातेज, प्रगल्भता[12] शब्दीं;
पाहोनि, सर्व सादर झाले मुनि ते, जसे शिखी[13] अब्दीं[14]. ३२
भूप म्हणे, 'बाळ दिसे, परि मतिनें वृद्धसा, न बाळकसा;
वय अल्प, परि अनल्प ज्ञान, म्हणावा असाहि बाळ कसा? ३३
वर द्यावासा वाटे; भलत्यासि सुपात्र हें नव्हे लभ्य.
सांगोत श्रीव्यासप्रभृति, करुनि ऐकमत्य, मज सभ्य.' ३४
सर्व सदस्य म्हणति, 'बहु उत्तम सत्कारयोग्य हें पात्र;
द्यावे वर; थांबावें परि ये तक्षकभुजंग तों मात्र.' ३५

---

१. अष्टवसूंच्या वैभवांचा. २. वडवाग्नि. ३. ऋषिविशेष. ४. तप आणि सहनशीलता याविषयीं वसिष्ठाची साम्यता तुला आहे. ५. आमच्या मनास आवडणाऱ्या! ६. कल्याण. ७. भीतीनें तुझे शत्रु दिशांतरीं पळून जावोत आणि त्यायोगें चहूंकडे तुझी कीर्ति पसरो, हें तात्पर्य. ८. संकटरूपी समुद्रावरील पूल. ९. लोकांच्या दुःखाचा भार. १०. बुद्धि आणि तेज यांचा सांठाच अशा आस्तिकाला ११. वेद जाणणाऱ्यांच्या समुदायांत. (वार=समूह). १२. प्रौढता. १३. मोर. १४. मेघांचे ठिकाणीं.

आस्तीकचातकावरि तो नृप जीवनद[1] ओळला होता;
तों तेंचि वदे; जाणुनि मखविघ्न, मनांत पोळला होता[2]. ३६
'तक्षक येऊं द्यावा' ऐसें म्हणतांचि, राय होत्यातें
प्रार्थुनि म्हणे, 'शिखिमुखीं होमा; अवकाश काय हो! त्यातें?'
ऋत्विज म्हणति, 'नृपा! सुरपति[3] आहे सिद्ध शत्रुच्या अवनीं[4];
शस्त्राधिदेवता[5] हें सांगति, 'हरिच्याचि[6] तो असे भवनीं[7].'' ३८
तो लोहिताक्ष सूतहि बोले, 'मुनि बोलिले यथार्थ, नृपा!
कथितों पुराणमत मीं; कोण न शरणागतीं करील कृपा?' ३९
इंद्रें स्वतातघातक पाठीसीं घातला, म्हणोनि, करें
कर चोळी; अधरातें[8] चावे जनमेजय प्रभू निकरें[9]. ४०
नृपतिप्रियार्थ होता मंत्रबळें तक्षकासि आकर्षी;
गडबडले बहु तेव्हां वासव, सुर, साध्य[10], सिद्ध, नाकर्षी[11]. ४१
शक्र, बसोनि विमानीं, लपवुनि अहि उत्तरीयवस्त्रांत[12],
सत्रासि जाय, होवुनि विवश[13]. बळ अनंत विप्रशस्त्रांत[14]. ४२
सर्पमखायतनोपरि[15] गगनीं आला भयार्त मघवा[16] हो!
अतुळा ऋषिकीर्तिसुधातटिनी[17]; तीमाजि सर्व अघ[18] वाहो. ४३
तों नृप होत्यासि म्हणे, 'आझुनि हरि जारि अरीस[19] सोडीना,
निजभक्तसंततीचें करुनि हित, प्रेमयशाहि जोडीना, ४४
तरि काय पाहतां? हो! दोघांसहि पावकांत होमा जी!
तुमच्या पदप्रसादें वांच्छा सफळा जगांत हो माजी.' ४५
ऐसी यजमानाची आज्ञा होतांचि, विप्रवर होता
झाला सिद्ध, तयीं त्या यज्ञाच्या उपरि वज्रधर[20] होता. ४६

---

१. जलद. (मेघ). २. हवनकर्ता. ३. इन्द्र. ४. रक्षणीं. ५. शस्त्रांच्या (मंत्रविशेषांच्या) मुख्य देवता. ६. इन्द्राच्या. ७. घरीं. ८. ओष्ठातें. ९. जोरानें. १०. देवविशेष. ११. स्वर्गांतील ऋषि. १२. पांघरण्याच्या वस्त्रांत. १३. व्याकुळ. १४. ब्राह्मणाच्या हत्यारांत, (मंत्रांत). १५. सर्पसत्राच्या मंडपावर. १६. इन्द्र. १७. तटिनी=नदी. १८. पातक. १९. शत्रु तक्षकास. २०. इन्द्र.

भ्याला नाहीं जो प्रभु, करितां वृत्रासवेंहि भीमरणा[1],
पविधर[2], कवि, धरभेत्ता[3], तोही सुरराज, फार भी मरणा. ४७
त्यजिला सुरपतिनें तो शरणागत तक्षक स्वपदरींचा;
पावेलाचि भंगातें प्रभुहि, जरि धरील पक्ष सदरींचा[4]. ४८
हरि भवनासचि गेला, सोडुनि शरणागत स्वहस्तींचा.
दवकळवळितनिजकलभत्राणीं[5] दुर्बळचि पतिहि हस्तींचा. ४९
ओढूनि आणिला हो! तो तक्षक मंत्रशक्तिनें जवळ;
आपण 'घे' म्हणतांचि, ज्वलनें घ्यावाचि आननीं कवळ. ५०
ऐसें करूनि ऋत्विज म्हणति, 'नृपा! जें त्वदिष्ट[6] सत्कार्य,
तें हें झालेंचि बरें; सत्कारीं शिशु[7]मुनींद्र सत्कार्य[8]. ५१
बहुधा अहि कंपितहरिहस्तापासूनि पावला पतन;
हे नाद तक्षकाचे; भवदहिता[9] करिल कोण गा जतन?' ५२
मुदितमना नृपति म्हणे, 'बाळमुने! वर तुला महाकविला
देतों; माग; न आम्हीं कोणीहि कधीं सकाम हाकविला.' ५३
आस्तीक म्हणे, 'देवा! तुमचा महिमा बहूत्तम खरा हो.
जरि वर देतां, द्या हा, न बरा अत्यंत उग्र मख, राहो.' ५४
नृपति म्हणे, 'मणि, कांचन धेनु, गज, ग्राम घे; न मख राहो;
देवी सरस्वतीच्या, मजवरि तूं सुप्रसन्न, मखरा[10]! हो.' ५५
विप्र म्हणे, 'मणि, कांचन, धेनु नको, हय नको, नको हस्ती;
ग्राम नको, धाम नको, मख राहो. मातृकुळ[11] असो स्वस्ति[12].' ५६
ऋत्विक्, सदस्य म्हणती, 'राया! स्तुतिचा मनोज्ञ[13] नवरा हो;
दे वर मुनिला; त्वद्यश साधुवदान्यांत[14] नित्य नव राहो!' ५७

---

१. भयंकर युद्धास. २. वज्रधर. ३. पर्वत फोडणारा. ४. साधूंच्या शत्रूंचा ५. वणव्यांत सांपडलेल्या आपल्या छाव्याचे रक्षणाविषयीं. ६. तूं इच्छिलेलें. ७. बाल [असला तरी] मुनिश्रेष्ठ [असलेला]. ८. सत्कार करण्यास योग्य. ९. तुझ्या शत्रूला. १०. देवी सरस्वतीच्या मखरा. ११. आईचें कुल. (सर्पांचें कुल). १२. सुखी. १३. सुंदर. १४. वदान्य=दाता.

नृप लोभवीत होता जोंवरि मुनिला अनेकवरदानें,
सांवरिला होता अहि मुनितेजानें प्रपन्नकरदानें.[१] ५८
मग त्या आस्तीकाला भूप म्हणे, 'जरि नको दुजें वस्तु;
'त्वत्सत्रमेव विरमतु'[२] म्हणसि, तरि तुझेंचि इष्ट तें अस्तु.'[३] ५९
विप्राचें प्रिय करितां, सर्वहि ऋत्विक्, सदस्य, वरदा त्या
म्हणति, 'भला ब्रह्मण्या![४] सर्वां दात्यांत तूंचि वर दात्या!' ६०
केलें सत्र समाप्त, क्षितिपतिनें विप्र तर्पिले वित्तें;
गौरविला आस्तीक प्रेमें, मानूनि आत्मभू[५] चित्तें. ६१
जेणें 'विप्रनिमित्तें विघ्नित होईल मख' असें भावी[६]
कथिलें होतें, नृप त्या सूतींहि महागुणज्ञता[७] दावी. ६२
'व्हावें सदस्य माझ्या हयमेधीं[८] त्वां महामनुज्ञात्या![९]'
ऐसें आस्तीका नृप विनवुनि, दे जावया अनुज्ञा[१०] त्या. ६३
दुष्कर कर्म करुनि तो मुनि, जावुनि शीघ्र मातुळावासा,[११]
दे हर्ष, घनें दिधल्या दवार्तहर्षासवें तुळावासा.[१२] ६४
जीवनदानें झाला सर्वांसह सुप्रसन्न नागवर[१३]
वासुकि, त्या भगिनीच्या पुत्रासि म्हणे, 'यथेष्ट माग वर.' ६५
आस्तीक म्हणे, 'माझ्या आख्यानीं अर्पितील जे श्रवण,
त्यांसि न लेशहि द्यावें भय, व्हावें सर्वथा तुम्हीं प्रवण.[१४]' ६६
पन्नग[१५] म्हणति, 'दिला वर बापा! त्वच्चरितनामगात्याचा
घात करील अही जो, मूर्धा[१६] शतधा उलेल[१७] गा! त्याचा.' ६७
ऐसा आस्तीक मुनि व्याळांचा शाप, मृत्यु, वारूनि,
तप करुनि, वंश ठेउनि, गेला मोक्षासि, भक्त तारूनि. ६८

---

१. शरणागतास हात देणाऱ्यानें. २. राहो. ३. असो. ४. ब्राह्मणांच्या हितकर्त्या! ५. स्वयंभू. (ब्रह्मदेव). ६. पुढें होणारें. ७. मोठी गुणग्राहकता. ८. अश्वमेध यज्ञामध्यें. ९. महामंत्र जाणणाऱ्या! (मनु=मंत्र). १०. निरोप. ११. वासुकीमामाच्या घरीं. १२ तुलना करावी असा. १३. सर्पश्रेष्ठ. १४. नम्र. १५. (वासुकी आदिकरून सर्व) सर्प. १६. मस्तक. १७. फुटेल.

सौति म्हणे, 'हे शौनकमुनिवर्या! सुमतिकीर्तिसदनानें
रुरुला असी प्रमतिनें पूर्वीं कथिली कथा स्ववदनानें.' ६९.

अध्याय आठवा.

शौनक सौतीसि म्हणे, 'सत्रीं कर्मांतरीं कथा व्यासें
कथिल्या नृपा तस्या त्या वाटे आम्हां तुवां कथाव्यासें[1].' १
सौति म्हणे, 'परिसा जी! कथनीं आहे मलाहि हव्यास[2]:
सांगेन तेंचि, वदला नृपतिप्रति जें सुखावह व्यास.' २
व्यासासि म्हणे राजा, 'संतति संरक्षिली तुवां कुरुची;
क्षयहेतु विरोधाची उठली तीच्या मनांत कां कु-रुची[3]? ३
कौरव पांडव बंधू, वैर कसें त्यांत वाढलें? अजि! तें
सांगा, न वारिलें त्वां प्रभुनें कां? त्याहि ईश्वरें अजितें[4]?' ४
श्रीव्यासें स्वच्छात्र श्रीवैशंपायना दिली आज्ञा:
'पूर्वजकथा कथावी राया जनमेजया तुवां प्राज्ञा!' ५.
सांगे वैशंपायन संक्षेपें प्रथम सर्वहो, परि तें
तृप्ति न दे, म्हणुनि पुन्हां सांगे राया सविस्तरें चरितें. ६
उपरिचरवसुकथा, जी मुनिगीता[5], आयका कवी हो! ती.
हेचि सुधा; तुळितां तरि, बहु बोलों काय? काकवी होती. ७
पुरुवंशज वसु पूर्वीं उग्र तप करि प्रजावनं[6] त्यागी;
त्यासि हरि[7] म्हणे, 'तुज भूत्राणाचि[8] हित, हे नव्हे असल्या गी[9].'
सुरमुनिहि तसेंचि म्हणति; मग वसु तें मान्य करि; तया माळा
यष्टि, स्फटिक, विमानहि दे शक्र सख्या स्वचेदिभूपाळा[10]. ९

१. सांगाव्या असें. २. उत्कंठा. ३. वाईट आवड. ४. अजिंक्य अशा श्रीकृष्णानें.
५. मुनींनी वर्णिलेली. ६. प्रजेचें रक्षण. ७. इन्द्र. ८. पृथ्वीचें अर्थात् प्रजेचें रक्षण.
९. वाणी. १०. स्वकीय अशा चेदिदेशच्या राजाला.

तो हरिदत्तविमानीं हरिसा साजे; म्हणोनियां प्रणती
करुनी, 'उपरिचरवसु[1]' प्रेमें गंधर्व अप्सरा म्हणती. १०
होती नदी श्रुतिमती त्याच्या नगरासमीप जी, तीतें
रोधुनि बळेंचि कोलाहलनग[2] भोगी[3], त्यजूनि नीतीतें. ११
तटिनीस[4] सोडवाया, बळसिंधु नृपति, जसें विटा[5] मत्ता,
त्या कोलाहलगिरिला हाणी, अशनी[6] जसी, तसी लत्ता[7]. १२
पादाघातें पडलें विवर; तयांतूनि ती[8] निघोनि, नृपा
अर्पुनि नगज[9] सुत-सुता[10], 'मजवरि केली' म्हणे 'उदंड कृपा.'
सेनापति करुनि तिचा सुत, वसुनें तत्सुतेहि गिरिकेला[11]
स्त्रीत्वें वरूनि विधिनें, श्वशुरत्वें धन्य तोहि गिरि केला. १४
गिरिकेच्या ऋतुकाळीं केली आज्ञा स्वयेंचि पितरानीं;
म्हणुनि मृगयार्थ गेला, संपादाया तदीय हित रानीं. १५
तें वन चैत्ररथोपम[12], खवळी कामासि, म्हणुनि गिरिकेला
वसुनृप चिंती; मदनें वश तो तत्काळ धैर्यगिरि केला. १६
चित्तांत चिंतितांचि स्त्रीसंगसुखासि शुक्रपात[13] घडे;
पत्रपुटीं[14] धरुनि, वसु क्षितिपति पळमात्र संकटांत पडे. १७
वीर्य अमोघ[15] व्यर्थ न जावें, ऐसा विचार आठविला;
तें स्त्रीस द्यावयाला, मग खग[16] नगरासि शीघ्र पाठविला. १८
पत्रपुट धरुनि तुंडीं श्येनें[17] उडे, त्यासि धांवतां अडवी
आमिषशंकी[18] अन्य श्येन नभीं; दैव अन्यथा घडवी. १९
ते श्येन तुंडयुद्धीं जेव्हां खपथीं[19] प्रवर्तले दोघे,
तेव्हां पादनखानीं पत्रपुटातें धरूनि खग तो घे. २०

१. उपरिचर=वर आकाशांत संचार करणारा. २. कोलाहल नांवाचा पर्वत. ३. उपभोगी. ४. नदीस. ५. जार पुरुषाला. ६. वज्र. ७. लत्तेनें. ८. नदी. ९. पर्वतापासून उत्पन्न झालेला. १०. मुलगा आणि मुलगी. ११. तिची मुलगी गिरिका, तिलाही. १२. कुबेराच्या उपवनासारिखें. १३. वीर्यपतन. १४. द्रोणामध्यें. १५. व्यर्थ न होणारें. १६. पक्षी. १७. [तो] ससाणा. १८. मांसाची शंका घेणारा. १९. आकाशमार्गीं.

तें वसुवीर्य गळालें, श्येनाचें चित्त गुंततां युद्धीं;
पडलें दैवनियोगें श्रीमद्भास्करसुतोदकीं[1] शुद्धीं. २१
त्यातें मत्स्यी प्राशी; ती[2] तैसी अद्रिकाप्सरा शापें
विधिच्या झाली होती, आपण संपादिल्या तशा पापें. २२
शापान्तहि, वसुवीर्यें प्रसवोनि अपत्ययुग, तिचा विधिनें
केला होता निश्चित, पूर्वीं शापूनिही दयानिधिनें. २३
वसुवीर्य सेविल्यावरि, मास दहावा भरे, अशा काळीं
सांपडली दाशांला[3] ती, त्या यमुनेंत टाकिल्या जाळीं. २४
चिरितां अपत्ययुग दे, मुक्तायुग उकलितां जसी शुक्ती;
तत्काळ अद्रिका त्या शापापासूनि पावली मुक्ती. २५
ते त्या उपरिचराला आश्चर्यें दाश दाविती बाळें;
कन्या दाशांसि दिली, सुत आपण घेतला धरापाळें. २६
तो मत्स्यनाम राजा; जी दाशपतीसि ओपिली कन्या
ती सत्यवती, धीवरवरसदनीं[4] वाढली सती धन्या. २७
त्या कन्येच्या देहीं मीनाचा गंध येत होता; तें
परि वपु निरुपम; रक्षी यमुनातीरीं स्वतात-पोतांतें[5]. २८
त्यांवरि[6], ज्याच्या जन्में होय वसिष्ठ स्वयें परमहर्षी,
तीर्थाटनप्रसंगें तेथें आला पराशर महर्षी. २९
वंदुनि सत्यवतीनें बैसविला निजतरींत उतराया;
झाला प्रसन्न विनयें, निरुपमरूपेंहि, शक्तिसुत[7] राया! ३०
दिव्यज्ञानमुनि म्हणे, 'सुंदरि! मज अंगसंग दे; हरितें
त्वद्रूप मन्मनातें; कामज्वर जुरवि तिळहि देह रितें.' ३१
ती त्यासि म्हणे, 'दोहीं तीरीं सर्वत्र विप्र आहेत;
दिवसा, अशा प्रकारीं, तुमचा कैसा घडेल हा हेत?' ३२

---

१. सूर्याची मुलगी यमुना, तिच्या पाण्यांत. २. ती अद्रिकाप्सरा. ३. कोळ्यांला. ४. त्या श्रेष्ठ कोळ्याचे घरीं. ५. [पोत=]नौका—**पंत**. ६. तदनंतर एके वेळीं. ७. वसिष्ठपुत्र शक्ति, तत्पुत्र पराशर.

करि अंधकार तेथें, निर्मुनि तो योगिराज नीहा[1]र;
त्यावरुनि, मनिं म्हणे ती, 'दुर्लभतम होय हा[2] जनीं हा[3]र.' ३३
विनवुनि ती त्यासि म्हणे, 'गुरुजन देती वरासि कन्या; या
मार्गासि लंघितां, मीं प्रभुजी! होईन पात्र अन्याया.' ३४
तो मुनि हांसोनि म्हणे, 'स्वपरांच्या दूषणासि कवि[3] टाळी;
'हूं' म्हण; माग वर; सुमुखि! कोणासहि साधुसंग न विटाळी.
'देहीं दुर्गंध नसो' ऐसा वर मागतांचि दे; हातें
स्पर्श करुनि, करि विप्र क्षिप्र तिच्या दिव्यगंध[4] देहातें. ३६
योग्यत्व अंगसंगीं आलें; कुदशा, त्यजूनि तनु, सरली[5];
योजनगंधा[6] मुनिला, जसि गंगा शंकरासि, अनुसरली. ३७
सदयमुनिनें भवाध्वश्रांतांचें[7] दुःख हरिलें; रेतें
नच उर्तला[8]; सुक्षेत्रीं[9] कल्पद्रुमबीज पेरिलें रे! तें. ३८
वाटे, सोडुनि जातां, गर्भवती निरविलीच यमुनेतें;
वदली असेल तीही, 'विसरावें स्ववरदान न मुने! तें.' ३९
यमुनाद्वीपीं झाली तत्काळ सुखप्रसूति; सुत[10] पातें
हालों न दे पहातां; करि कौतुक शक्तिपुत्र सुतपा तें. ४०
प्रसवें कन्याभाव न मळला; पळ लागलें न सुटकेला.
सत्यवतीकुक्षीनें लज्जित सद्रत्नशुक्तिपुट[11] केला. ४१
तो उपजतांचि झाला प्रौढ मुनि; स्वजननीस करि नमन;
तीस म्हणे 'येतों मीं; स्मरतां, भेटोनि, हृष्ट करिन मन.' ४२

---

१. धुई–**पंत.** धुकें. २. ही योगिराजरूपी माला. ३. पंडित, जाणता. ४. अलौकिक सुवास असलेला असा. ५. गेली–**पंत.** ६. चार कोसपर्यंत जिच्या अंगचा सुवास जाई अशी. ७. संसार रूपमार्गी थकलेल्यांचें. ८. उन्मत्त झाला नव्हता; [तर,]. ९. चांगल्या शेतामध्यें. (स्त्री हें गर्भबीजाचें शेतच आहे.) १०. पुत्र. (सुत पाहतां डोळ्याचें पातें हालों न दे, इ० इतका तो सुंदर होता.) ११. उत्तम मोत्यें प्रसवणारा शिंपल्यांचा पुडा.

द्वीपें[1] अयन-आश्रय-त्या मुनिसि उपजतां, म्हणोनि, कवि त्यातें
'द्वैपायन' म्हणति नृपा! अज्ञानमहा[2]तमिस्र[3]सवित्यातें. ४३
होतिल बहु कलिमलिनप्रज्ञ[4] जन न पावतील भव्यास[5];
यास्तव करी चतुर्धा[6] वेदविभागासि, म्हणुनि, तो व्यास. ४४
ऐसा भगवान् व्यास ब्राह्मणरूपें मुकुंद अवतरला;
जन, ज्याच्या उपदेशें, निजहित जाणुनि, सुखेंचि भव तरला.
या श्रीव्यासप्रभुला वंदुनि, मीं भारते[7]तिहासरस
पाजीन तुम्हां श्रोत्यां, अमृतरसाहूनि फार हा सरस. ४६
दितिज, दनुज, राक्षस बहु, धरुनि मनुष्यादिरूप, या महिला
पीडिति अधर्मभारें, धरुनि सुरद्वेष मानसीं पहिला. ४७
निजभरपरिहारार्थ प्रार्थी श्रीपद्मयोनि[8]ला अवनी[9];
तो देवांसि म्हणे, 'जा अंशें, व्हा सिद्ध भूमीच्या अवनीं[10].' ४८
इंद्रें विष्णु विनविला; झाला वसुदेवपुत्र तो अंशें;
ज्याच्या उदयें लोकीं वरिलें सद्यश सुधांशुच्यां[11] वंशें. ४९
बळदेव शेष झाला; यादव देवांश, भीष्म वस्वंशें[12];
जेणें निजप्रतापें कुरुचा नाहीं बुडों दिला वंश. ५०
मांडव्याच्या शापें झाला यमधर्म शूद्रयोनिजनी[13];
कुरुच्या वंशीं तेजें भीष्म विदुर हींच[14] दिव्य दोनि जनीं. ५१
सूर्यांशें कुंत्युदरीं कर्ण उपजला; तसाचि जो द्रोण
तो अंश बृहस्पतिचा; तैसा होता सुविद्यजन[15] कोण? ५२

---

१. बेट. २. अज्ञानरूपी महांधकाराचा नाश करणाऱ्या सूर्यातें. ३. अंधकार **—पंत** ४. कलियुगामुळें ज्यांची बुद्धि मलिन झाली आहे असे. ५. कल्याणास. ६. चार प्रकारानें. ७. भारत नांवाचा इतिहास हाच रस. ८. कमलोद्भव ब्रह्मदेवाला. ९. पृथ्वी. १०. रक्षणीं. ११. चंद्राच्या. १२. अष्टवसूंचा अंश. १३. शूद्रयोनींत ज्याची उत्पत्ति असा. १४. हीच दोनी [अपत्यरत्नें]. १५. चांगला विद्वान् मनुष्य.

तो रुद्र[1]काळकामक्रोधांशोत्पन्न हें नृपा ! जाण
जो द्रोणाचार्यांचा अश्वत्थामा बहिश्चर[2] प्राण. ५३
रुद्रगणांशोद्भव कृप, शकुनिनृप द्वापरांशज ख्यात;
मरुदंशज[3] कृतवर्मा; द्रुपदहि, शैनेय[4] तोहि, तज्जात. ५४
गंधर्वपति अरिष्टानंदन[5], नामेंकरूनि जो हंस,
तो धृतराष्ट्र, सुयोधन कलि[6], केला ज्या खळें कुळध्वंस[7]. ५५
दुर्योधनानुजन्मे[8] पौलस्त्य[9]; तयां न साधु मानावें.
विस्तरभयें तयांचीं मीं सांगेनाचि सर्वथा नावें. ५६
पहिला दुर्योधननृप; तदनुज दुःशासनाख्य तो दुसरा;
दुःसह, दुःशल, ऐसे शत झाले, [10]मकर कुरु[10]कुळा सुसरा. ५७
वेश्यापुत्र[11] युयुत्सु स्तुत्य, शतावेगळाचि तो त्यांत;
जैसें गुणें अधिक गज[12]मौक्तिक एकाचि अनेक मोत्यांत. ५८
अत्र्यंश[13] पांडुराजा; त्याच्या दोघी सुलक्षणा भार्या,
त्या सिद्धिधृती[14] कुंती माद्री झाल्या सुरांचिया कार्या. ५९
त्यांचा ठायीं झाले जे, कुरुचा भूषवावया वंश,
सुत पांच, धर्ममारुतहरिदस्रांचे[15] प्रसिद्ध ते अंश. ६०
शच्यंश[16] द्रुपदसुता झाली, साध्वीजनीं जिची अर्चा[17].
कृष्णानुजोदरज[18] जो अभिमन्यु सुधांशु-पुत्र[19] तो वर्चा[20]. ६१

---

१. रुद्र, काळ आणि कामक्रोध यांच्या अंशापासून झालेला. २. शरीराबाहेर फिरणारा. ३. मरुत्=मरुद्गण. ४. सात्यकी. ५. अरिष्टानामक अप्सरेचा मुलगा. ६. कलिपुरुष. ७. कुलनाश. ८. दुर्योधनाचे धाकटे बंधु. ९. पुलस्त्य मुनींचे पुत्र. (सर्व राक्षस). १०. कुरुकुलरूप उत्तम सरोवराला मकरासारखे [दूषणीय]. ११. [धृतराष्ट्रास] वेश्येपासून झालेला मुलगा. १२. हत्तीचे मस्तकांत अनुपम-सुंदर मोत्यें निर्माण होतात अशी प्रसिद्धि आहे. १३. अत्रि=मुनिविशेष. १४. [साक्षात्] सिद्धि धृतीच. १५. यम, वायु, इन्द्र व अश्विनीकुमार यांचे. १६. शची=इंद्राणी, इंद्रस्त्री. १७. पूजा. १८. कृष्णाची धाकटी बहीण सुभद्रा तिच्या उदरीं झालेला. १९. चंद्रपुत्र बुध. २०. तेजस्वी.

कुरुगु[१]रुशिरोंबुजातें जो धृष्टद्युम्न धरुनि [२]असि खंडी
तो अग्न्यंश; नृपाळा! राक्षस तो, सुर मनुष्य न शिखंडी. ६२
प्रतिविंध्य युधिष्ठिरसुत, सुत सोम वृकोदरात्मज ख्यात;
श्रुतकीर्ति-शतानीक-श्रुतसेनांचे क्रमें [३]तिघे तात. ६३
हे पांच द्रुपदसुताकुक्ष्युद्भव अंश विश्वदे[४]वांचे;
अवतरले अंश असे, बहु सुखवायासि विश्व, देवांचे. ६४
जो विप्रचित्ति दानव, तोचि जरासंधनृप महास[५]त्त्व;
शिशुपाळ हिरण्यकशिपु; कंसहि तो काळनेमि हें तत्व. ६५

अध्याय नववा.

जनमेजयनृपति पुसे, वैशंपायन कथी सविस्तर; तें
बहु; मीं लेशचि गातों; जग लेशेंही महद्यशें तरतें. १
श्रीकां[६]तनाभिपद्मीं प्रकटे विधि, विप्र[७]सर्जनीं दक्ष;
तद्दक्षांगु[८]ष्ठोद्भव विख्यातयशा प्रजाप[९]ती दक्ष[१०]. २
त्याची कन्या अदिती; कश्यपभार्या, महासती, ज्येष्ठा.
तीचा पुत्र विव[११]स्वान्; वैवस्वत म्हणति तत्सुता श्रेष्ठा. ३
त्या वैवस्वतमनुची, सोमात्मजबु[१२]धवधू, इ[१३]ळा तनुजा;
तीचा पुरूरवा सुत, पुर प्रति[१४]ष्ठान दे स्वयें म[१५]नु ज्या. ४
तत्सुत आयु, तयाचा नहुष, तदात्मज ययाति जो अरिला
यमसम समरीं झाला, शु[१६]क्रसुतेनें स्वयेंचि जो वरिला. ५

---

१. कौरवांचा गुरु द्रोणाचार्य, त्याच्या शिरकमलातें. २. खड्ग. ३. अर्जुन, नकुळ, सहदेव. ४. विश्वसंज्ञक देवांचे. ५. मोठा बलवान्. ६. लक्ष्मीपति विष्णूच्या नाभिकमलांत. ७. ब्राह्मणांच्या उत्पत्तीविषयीं. ८. त्याच्या उजव्या आंगठ्यापासून उत्पन्न झालेला. ९. प्रजा उत्पन्न करणाऱ्यांमध्यें मुख्य. १०. एका प्रजापतीचें नांव. ११. सूर्य. १२. चंद्रपुत्र बुधाची भार्या. १३. इळानामक कन्या. १४. प्रयाग-**पंत.** १५. वैवस्वतमनु. १६. [असुराचार्य] शुक्राच्या कन्येनें. (देवयानीनें).

झाला ययाति कविंचा[1] जामाता; तीच सत्कथा परिसा-
या चरितामृतपानें या लोकीं सर्व रसिक हो! हरिसा[2]. ६
देवाचार्य बृहस्पति, कवि असुराचार्य, हे जगन्महित[3];
शिष्याभिमान धरुनि, स्पर्धा करिती सदा जसे अहित[4]. ७
सुरशस्त्रांहीं जे जे भट होती संगरांत असु-रहितें[5]
संजीविनीबळें[6] त्यां उठवी, करि काव्य[7] नित्य असुर-हित. ८
ती विद्या सुरगुरुला अवगत नव्हती, म्हणोनि समरांत
बहु मरती; तें पाहुनि न टिके उत्साह-धैर्य अमरांत. ९
ती विद्या साधाया देवानीं सद्विचार आठविला;
शुक्राकडे स्वगुरुसुत कच विनउनि, युक्ति कथुनि, पाठविला.१०
शिष्यत्वें जाउनि, कच सांगे गुरुदास्यकाम, पद नमुनीं;
प्रणतीं शत्रुसुतींही द्रवला तो सुप्रसन्नवदन मुनी. ११
आराधिला कचें गुरु, गुरुची कन्याहि देवयानी; ती
झाली प्रसन्न सत्वर; सिकविति तैसीच देव यां नीती. १२
असुर म्हणति, ‘ विद्येनें प्रबळ करायासि देव, या नीचें
मन मोहिलें गुरूचें, गुरुचित्ताहूनि देवयानीचें.’ १३
गुरुगोरक्षण करितां, देवद्वेषें हरूनि असु रानीं.
कचमांस वृकांसि[10] दिलें वांटुनि भक्षावयासि असुरानीं. १४
गायी गृहासि आल्या, मावळला रविहि, कच न आढळला:
तेव्हा सोडुनि धृतिनग[11] शुक्रसुताबुद्धिभूमिला[12] ढळला. १५
शुक्रसुता गहिंवरली; न्हाणी तदुरःस्थळासि[13] अश्रु तिचें.
कवणाला न प्रिय तें गुणमणिमय[14] केलिमंदिरें[15] श्रुतिचें[16] ? १६

---

१. शुक्राचा. २. हर्षा, आनंद पावा. ३. जगमान्य. ४. शत्रु. ५. प्राणरहित. ६. जिवंत करण्याच्या विद्येनें. ७. असुराचार्य शुक्र. ८. गुरुसेवा करण्याची इच्छा. ९. कचास. १०. लांडग्यांस. ११. धैर्यरूप पर्वत. १२. देवयानीच्या बुद्धिरूप पृथ्वीला. १३. तिच्या वक्षःस्थळास. १४. गुणरूप रत्नांनीं मढविलेलें. १५. क्रीडागृह. १६. वेदाचें.

तातासि म्हणे, ‘ आला नाहीं अद्यापि कच; नसे अवधी;
लव धीर बुद्धि न धरी माझी; ताता ! सुनिष्ठुरा तव धी[1]. १७
येता मर्यांचि, असता जरि कुशळी, करिति खळ अघा[2]; बरवी
गति न दिसेचि कचाची; कुशळिजनविरह[3] असें न घाबरवी. १८
कच आजि न येतां, मीं प्राण त्यागीन न भरतां घटिका;
आण तुझी; जाण खरें; केला निश्चय नव्हेचि हा लटिका.’ १९
काव्य म्हणे, ‘धैर्य धरीं; आहे संजीविनी सुधाधारा[4];
उठवूनि आणितों कच, चिंतुनि विश्वंभरा[5] बुधाधारा.’ २०
मंत्रजप करुनि तो कवि, ‘ये रे ! वत्सा ! कचा !’ असें बाहे;
भेदुनि वृकोदरें[6], पळ[7] सर्व निघे, त्यांत लेशहि न राहे. २१
होता तसाचि झाला; उठला; आचार्य देव तारी; ती
शक्ति तसीच निरुपमा; भिन्ना गुर्वन्यदेवतारीती[8]. २२
कच येतां बहु हर्षे; ‘धन्य’ म्हणे ‘मींच कन्यका; मातें
वांचविलें, त्वांचि दिला; या देइल कोण अन्य कामातें ?’ २३
पुसतां वधवृत्त, कच स्वगुरुसुतेला समस्त आयकवी.
प्रार्थुनि म्हणे, ‘उगी; हा स्वस्ति असो सर्वविप्रराय कवी[9].’ २४
त्यांवरि[10], गुरुकन्योक्तें[11] पुष्पें आणावयासि जाय वना;
सांपडला त्या असुरां कच, जैसा वत्स[12] एकला यवना. २५
पुनरपि त्या पापानीं सद्विप्रकुमार चरचरां चिरिला;
भय न धरिलें तिळहि, त्या पापांच्या जोडितां महागिरिला. २६
खंड तिळप्राय करुनि, नेउनि, केले निमग्न जळधींत[13].
नाहींच धर्म, करुणा, पापभय, विचारलेश खळधींत[14]. २७

---

१. बुद्धि. २. पापाला, (पक्षीं) घाताला. ३. सुखरूप असलेल्या जनांचा रह. ४. अमृताची केवळ धारच अशी. ५. ज्ञात्यांना आधार असलेल्या व श्वपोषक अशा (परमेश्वराला). ६. लांडग्यांचीं पोटें. ७. मांस. ८. गुरूवांचून न्य देवतांची रीति. ९. कुशळ—**पंत.** १०. त्यानंतर एकदां. ११. देवयानीच्या ांगण्यावरून. १२. गोवत्स. १३. धी=सांठा. १४. धी=बुद्धि.

[1]जो मुनि तयासि कन्याप्रियकाम, दयालु काव्य तो तारी.
रज[2] गोळा करुनि, घडी शिष्याची मूर्ति, जेंवि ओतारी[3]. २८
पुनरपि तो कच वधिला; केला तद्देह दग्ध रुष्टांनीं[4];
शुक्रासि पाजिलें हो! तद्भस्म सुरारसांत[5] दुष्टानीं. २९
कच न दिसतां रडे सुरयानी[6]; तीतें पिता म्हणे, 'कां गे!
वत्से! रडसी?' ऐसें पुसतां, तैसेंचि[7] ती पुन्हां सांगे. ३०
शुक्र म्हणे; 'वत्से! मीं वांचवितों, परि पुनःपुन्हां मरतो;
आग्रह करूनि म्हणसि, 'प्रेतगतिंगत[8]हि कच पुन्हां परतो.' ३१
त्यज शोक; मत्प्रसादें तुज काय उणें असे? नकोचि रडों.
दाटुनि माथां वाहुनि दुर्वह[9] दुःखाद्रि[10]लों, नको चिरडों. ३२
ती तातासि म्हणे, 'कच गुरुभक्त, कुलीन, साधुकार्यकर;
जरि त्यासि सोडिलें जळ[11], तरि जळ सोडूं मलाहि आर्यकर[12]. ३३
ब्रह्मघ्नां[13] शिष्यांची भीड धरुनि, साधु शिष्य मोकलिला[14],
म्हणतिल; न ऐकवे तें; न[15] स्वहित कवी असें गमो कालिला.' ३४
स्वमनिं म्हणे कविसत्तम, "मळवावें पंडितें न यश; हाणी
प्राणांचीहि बरी; परि न यशाची;' सांगती नय शहाणी[16]. ३५
मग मेळवी महात्मा एकत्र समस्त असुर कोपानें;
खवळे प्रियशिष्य[17]भस्मसितामिश्रितमधुच्याहि तज्ज्ञ तो पानें. ३६

१. अन्वय—जो कन्याप्रियकाम (कन्येचें प्रिय करण्याची इच्छा असलेला) दयालु काव्यमुनि तो तयासी (कचासी) तारी. २. कण—पंत. ३. धातूचें ओतीव काम करणारा. ४. रागावलेल्या (असुरांनीं). ५. सुरा=मद्य. ६. देवयानी. ७. मागील १७ ते १९ या तीन आर्यांत वर्णिल्याप्रमाणेंच. ८. मृतास्थितीला गेलेला. ९. वाहण्यास (झेंपण्यास) कठिण. १०. अद्रि=पर्वत. ११. 'पाणी सोडणें' असा प्रयोग मराठीमध्यें 'त्याग करणें' ह्या अर्थीं उपयोजितात. १२. श्रेष्ठ अशा तुमचा हात. १३. ब्राह्मणहत्त्या करणाऱ्या. १४. गमावला. १५. अन्वय—कवीं स्वहित (आपला हितकर्ता) असें कलिला (पापी काळाला) न गमो. १६. शहाणी देवयानी अशी नीति सांगते. १७. प्रियशिष्य कचाचें भस्म मिसळलेलें मद्य प्याल्यानें.

असुरांसि म्हणे, 'कां रे! नेणा[1] अद्यापि मत्तपा? मरतो
कीं वांचतो? पतंग, न भी जो ज्वलनासि मत्त, पामर, तो. ३७
'विप्र अवध्य' म्हणे श्रुति; हाणोनि तिच्या[2]हि लात हाके[3]ला,
कचहननें सुरगुरुचा न, तुम्हीं माझाचि घात हा केला. ३८
ब्राह्मण कणसे खुपती तुमच्या नेत्रीं; नसो[4] सवे, काढा.
युक्तचि मरणाराला हितपरिणामहि न सोसवे; काढा,' ३९
धिक्कारुनि असुरांतें, धर्मचि तो अमृतमयवचा[5] सिकवी;
बाहे[6] विद्याकरुणादिव्यतपस्याबळें कचासि कवी. ४०
जों गुरु 'वत्स! कच!' म्हणुनि 'एहि[7]' असें तो म्हणावया योजी,
तों विद्यासामर्थ्यें उपजोनि गुरूदरीं, म्हणे 'ओ जी!' ४१
उदरप्रवेश पुसता झाला तो पुण्यराशि शुक्रमुनी;
सांगुनि खळकपट, म्हणे, 'येथ वसो काळ हा शिशु क्रमुनी. ४२
निर्भय वसेन, काळ क्रमुनि पवित्रोदरीं, असाचि सुखें.
न हित गुरूदरदारण[8]; निघतां मज निंदितील साधुमुखें.' ४३
शुक्र म्हणे, 'वत्से! कच कुक्षि विदारुनि निघेल बाहेर.
हा तरलाचि; परि तुझें या कुव्यसनीं[9] बुडेल माहेर.' ४४
सुरयानी त्यासि म्हणे, 'वदतां हें अशुभ काय? हो तात!
व्हावे[10] दोघेहि मला; चिंतामणि[11] हेचि पाय होतात. ४५
तारुनि शिष्यासि, तरो गुरु; म्हणत्यें, पात्र काय कन्या या
नोहे वरासि? वरदा! जाणसि तूं सुज्ञनायक न्याया.' ४६
भीड सुतेची भारी; विद्या संजीविनी कचा सिकवी;
गुरुलाहि वांचवाया योग्य करी, सज्जना कचासि, कवी. ४७

---

१. माझी तपश्चर्या जाणत नाहीं काय?. २. श्रुतीच्या. ३. (लक्षणेनें) आंझेला. ४. [अशी] संवय नसावी; [ती] काढून टाका. ५. अमृतमय (मधुर) भाषण ज्याचें असा शुक्र. ६. हाका मारी. ७. वत्सा! कचा! ये. ८. गुरूचें पोट फाडणें. ९. [कुक्षिविदारणरूपी] घोर संकटीं. १०. पाहिजेत. ११. इच्छित वस्तु देणारें रत्न.

गुरुकुक्षि विदारुनि कच बाहेर निघे; परंतु बहु तो भी;
उठउनि गुरु, संकोचे नमुनि. रडे कुलज[1], कीर्तिचा लोभी. ४८
गुरुदक्षिणाविधीतें कच गुरुचा आप्त, विद्यमानधनें
देहें[2] साधी; धन्यचि केला तो आप्त[3]विद्य मानधनें. ४९
कचघातकासुरांतें सुरयानीचा स्वयें जनक दापी[4]
कीं, 'जो ब्रह्मद्वेष्टा कुशळ न पावेल तो जन कदापी. ५०
समजा बरें, जसा मीं विप्र, गुरु, तसाचि हा कच; पळाला
ब्रह्मांडांतुनि जरि रिपु, वधिन, न देतांहि हाक, चपळाला.' ५१
असुरांसि करुनि शिक्षा, बाहु उभारुनि, म्हणे 'अहो! कानीं
घ्यावें माझें हितकर मर्यादावचन साधुलोकानीं. ५२
जो विप्र आजिपासुनि मद्यप्राशन करील, तो पापी
ब्रह्मघ्नासम निश्चित.' असि मर्यादा स्वयें कवि स्थापी. ५३
होता सहस्र वर्षें कच गुरुसेवेंत; मग तया प्राज्ञा
शुक्रें बहुसंतोषें दिधली जाया पित्याकडे आज्ञा. ५४

अध्याय दहावा.

कच सिद्ध[5] होय जों, तों शुक्रसुता त्या मनोहरा, उचिता,
स्वकरग्रहार्थ[6] विनवी; बहु आवडली सुविद्यता[7] शुचिता. १
जें गुरुचें, तेंचि तिसीं, पूज्यत्वाचें धरूनि कच नातें,
ठेवूनि दृष्टि धर्मीं, तो न तिच्या मान्य होय वचनातें. २
पडतां गळां, म्हणे कच, 'भगिनीला वरुनियां न भाउ तरे.
करितां अधर्म, सद्यः[8] स्वपितृसुहृज्जन[9]मुखप्रभा उतरे. ३

१. कुलवान्. २. जवळ असलेलें द्रव्यच अशा देहें. ३. आप्त=प्राप्त—**पंत.** ४. रागें भरून सांगे कीं. ५. [पित्याकडे परत जाण्यासाठीं] तयार. ६. आपल्याशीं लग्न लावण्यासाठीं. ७. [कचाची]. ८. तत्काळ. ९. आपल्या पितरांच्या आणि खावरील तेज.

सुख व्हावें, तरि धर्माप्रति 'म्हण माथां वसें, नसें दूर';
पूजा कैंची लोकीं? जरि दगड शिरीं धरी न सेंदूर. ४
धर्म अनंत असो, परि तो करितां कीर्तन स्वसे! वेचे[1];
सांग प्रकार याहुनि दुसरे कांहीं मज स्वसेवेचे. ५
ज्या उदरीं वास तुझा, तेथें माझाहि, हें असें नातें.
केंवि करग्रहण करूं? संमत धर्मासि जें असेना तें.' ६
बहु दिवसांची आशा तत्काळ च्छेदितां कचें, रुष्टा
शुक्रसुता त्यासि म्हणे, 'रे कपटपटो[2]! भला भला दुष्टा! ७
ऐक कृतघ्ना! जरि मीं, 'उठवाचि मदर्थ या हता[3]' शतदा
ऐसें गुरुसि न म्हणत्यें, कैसा उठतासि तूं हताश[4]! तदा? ८
मलिन, कुटिल, नीरस, जड, अजड, पुनर्भवपणेंहि कचसाच;
धरिला शिरींहि न स्वप्रकृतिगुण त्यजिसि; नाम कच साच.[5] ९
न करीं विफळ मदाशा; आशा भंगूं नयेचि साधूनीं;
जरि भंगिसीच, विद्यासिद्धि नसो, जीस नेसि साधूनीं[6].' १०
कचहि म्हणे, 'गुरुवेदानुज्ञा नाहीं; म्हणोनि या कर्मा
मान्य नसें मीं; शापीं; कीर्तिकराचि शाप, न चुकतां धर्मा. ११
पढवीन ज्यासि विद्या, ही त्यासि फळेल; तूंहि घे शाप;
परि कोणहीहि ऋषिसुत न वरिल तुज: फळो तुझें तुला पाप.'

---

१. खर्च होई. २. कपटकुशला. ३. मेलल्याला. ४. दुष्टा! ५. अर्थ–देवयानी म्हणते, हे कचा! तूं आपल्या 'कच'या नांवाच्या अर्थाप्रमाणें म्ह० केसाप्रमाणें आहेस. केश मलिन=काळे तर तूं मलिन=पापी; केश कुटिल=वक्र, कुरळे तर तूं दुष्ट; केश नीरस=रसशून्य तर तूंहि अरसिक; (कारण, माझ्यासारखी तरुणी, विवाहकाम अशी तुझ्याकडे आली असतांही तूं तिचा धिक्कार करितोस). केश जड=निर्जीव तर तूं मतिमंद; पुनःपुन्हां उत्पन्न होण्याच्या समानधर्माप्रमाणें केश व तूं उभयतांहि अजड=सचेतन आहां, व तुम्हां उभयतांना डोक्यावर वागविलें तरी ही तुम्ही आपले पूर्वोक्त स्वाभाविक गुण टाकीत नाहीं. सारांश, हे कचा! तुझें 'कच' हें नांव अगदीं यथार्थ आहे. ६. संपादून.

जातां स्वर्गीं मिरविति निजगुरुसुतरत्न देव यानीं[1] तें.
वर्णिति किति दैत्यांतें, किति कवितें, कितिक देवयानीतें. १३
विद्यालाभमुदितसुर[2] हरिसि म्हणति, 'विक्रमासि यासम, या-
पूर्वी, न पावलोंचि; प्रभुजी ! टाकूं नकाचि या समया. १४
आम्हां न दिसेचि दुजा सुखदायक शत्रुनाशसम यज्ञ.
समयीं पराक्रमातें कारिति शुभयशोधनाश,[3] समयज्ञ.[4]' १५
'वृषपर्वतडागाचा[5] होऊं नेदी विनाश कविरोध.[6]
पाडावा यांत यशःसंपज्जीवनविनाशक[7] विरोध.[8]' १६
करुनि विचार असा हरि जेथें वृषपर्वदैत्यपतिराज्य,
त्या देशीं जाय, म्हणे, 'जरि मिळतें रंध्र लघुहि, तें प्राज्य.[9]' १७
तों रम्यवनीं शक्रें जलकेलिरता, सखीयुता,[10] धन्या
अवलोकिल्या, कविसुता[11] एक, दुजी सर्वदैत्यपतिकन्या.[12] १८
विप्रासुरवरकन्या पाहुनि, हर्षे मनीं म्हणे बळहा,[13]
'भगवंत पावला; या दोघींत प्रथम लावितों कलहा.' १९
उदकीं क्रीडत होत्या; त्यांचीं वस्त्रें सरस्तटीं[14] होतीं.
मारुतरूपें[15] शक्रें मिश्रित केलीं परस्परें हो ! तीं. २०
राजसुता शर्मिष्ठा जळकेलि करूनियां तटीं आली.
होती जळाशयींच श्रीमत्कविकन्यका तिची आली.[16] २१
शर्मिष्ठा कविजांबर[17] नेसे झडकरि; कळों न वासव[18] दे.
तों तीस देवयानी, ओढुनि तत्परिहितात्मवास,[19] वदे:- २२

१. विमानांत. २. संजीविनीविद्येच्या लाभानें आनंदित असे देव. ३. शुभ अशा यशोरूप धनाला इच्छिणारे. ४. काळवेळ जाणणारे. ५. [दैत्यराज] वृषपर्वरूप तळ्याचा. ६. शुक्ररूप बांध. ७. कीर्ति व संपत्तिरूप उदकाचा नाश करणारा. ८. छिद्र, उणेपणा, निमित्त. ९. मोठें. १०. सखीजनांसमवेत. ११. शुक्रकन्या देवयानी. १२. दैत्यराज वृषपर्व्याची कन्या शर्मिष्ठा. १३. बलाराति. (इन्द्र). १४. सरोवराच्या तीरावर. १५. वायुरूप अशा. १६. सखी. १७. देवयानीचें वस्त्र. १८. इन्द्र. १९. राजकन्या जें नेसली तें स्ववस्त्र—**पंत.**

'असुरसुते! मच्छिष्या होउनि, मद्वस्त्र नेससी कां? गे!
बहु मातलीस ऐसें मज समुदाचारलोप[1] हा सांगे.' २३
'मर्यादा पाळावी, निजशिवें[2] गुरुचेचि पाय, रीतीतें
सोडूं नये,' म्हणति कवि, 'साधुपदाचीच पायरी, तीतें.' २४
शर्मिष्ठा तीस म्हणे, 'बैसावें जैं सभेंत मत्तातें[3],
त्वत्तातें व्हावें तैं बंदी[4]; तूं विसरलीस मत्ता[5] तें. २५
सिंहासनीं विराजे मद्गुरु, न सहस्रकर[6]हि, परि सविता[7];
बैसे खालें त्वद्गुरु कवि, कविता करुनि, त्यासि परिसविता[8]. २६
तूं तों कन्या, जो स्तुतिकर, याचक, दान घे सदा, त्याची;
मीं कन्या स्तव्याची[9], भव्याची, सर्वसेव्यदात्याची[10].' २७
माझी न पाविजे त्वां, मत्ताताची तुझ्या न सरि[11] तातें;
जें जन्हुकन्यकेचें[12] भाग्य न पावेल अल्पसरिता तें. २८
होती महेंद्रनयनें, पाहुनि राजेश्वरा जया, चकितें,
मत्तातभाग्य कैंचें त्वत्ताता भिक्षुकासि, याचकि! तें? २९
मत्ताताची जी श्री[13], कीर्ति, कवीला नयेचि भिक्षुकि! ती.
अमृतरसासीं व्हाया सम माधुर्यें समर्थ इक्षु किती? ३०
राजसुतेचें यश जें, तुज येइल काय गे! दरिद्रे! तें?
पाहसि विकावया तूं केसरमूल्यें[14] कसें हरिद्रेतें[15]?' ३१
निर्भर्त्सना करी बहु; संपादी द्वेष, पाप; गाढ कली[16]
करुनि, कविजेसि कूपीं[17] ती कोपाची महापगा[18] ढकली. ३२

---

१. सदाचार—**पंत.** २. आपलें कल्याण करणारे. ३. माझ्या बापानें. ४. भाट, स्तुतिपाठक. ५. माझा पिता वृषपर्वा. ६. हात (पक्षीं) किरण. ७. सूर्य. ८. ऐकविणारा. ९. स्तुति करण्यास योग्य अशाची. १०. सर्वांनीं सेवा करण्यास योग्य अशा दात्याची. (वृषपर्व्याची). ११. बरोबरी. १२. जान्हवीचें, गंगेचें. १३. भाग्य, संपत्ति. १४. केशराच्या किंमतीनें. १५. हळदीला. १६. कलह. १७. विहिरींत. १८. मोठी नदी.

मेलीच असें मानुनि, शर्मिष्ठा आपुल्या घरा गेली.
कूपीं कविजा होती, जैसी नागी[१] मनांत रागेली; ३३
तों मृगयाश्रांत[२], तृषित, तोयार्थ[३], ययाति तेथ एकाकी[४]
आला, शर्मिष्ठा ज्या कूपीं त्या देवयानिला टाकी. ३४
कूपीं पाहे सहसा सत्कन्यारत्न तो ययाती तें.
'कोणाची कोण ?' असें मंजु[५] पुसे, करुनियां दया, तीतें. ३५
सांगे 'तज्जा[६] मीं, 'कवि' म्हणाति द्विजनायका, ययाते ! ज्या.'
नरवर म्हणे, 'प्रसवला तो भगवान् काव्य काय या तेज्या ?' ३६
कविजा म्हणे, 'नरेंद्रा ! स्वतपें, तुझिया यशेंहि, तुज जाणें[७];
मज दक्षकर[८] धरुनियां वर घेउनि, करुनि धन्य भुज, जाणें.' ३७
क्षुधितापुढें सुधेची पात्री[९] दैवेंचि वाढिली; वरिती[१०]
झाली मनें; गुरुभुजें दक्षिणकर धरुनि, काढिली वरिती. ३८
भूप म्हणे, 'धिक् !' चित्ता 'क्षत्रा[११] विप्रात्मजा न सेव्या ही.'
तीहि म्हणे, 'नहुषेतर[१२] कविला' चित्ता 'जनीं नसे व्याही.' ३९
नृप गेला; मग आली शोधाया घूर्णिका[१३] तिला, 'हां गे !
जा, सांग पित्याला, म्यां त्यजिलें वृषपर्वपुर' असें सांगे. ४०
वृत्त कथुनि कविसि म्हणे ती, 'निष्ठुरता पहा निरोपाची.
छाया[१४] कराचि; न करो अतिनिष्ठुर ताप हानि रोपाची[१५].' ४१
भेटोनि, तितिक्षेचे[१६] गुण सांगे साधु बाप तनयेतें;
कीं कोपाच्या संगें स्वविभागा[१७] सर्वथा पतन येतें.' ४२

---

१. सर्पिणी. २. शिकार करून थकलेला. ३. पाणी पिण्याकरितां. ४. एकटा. ५. मधुर [स्वरानें]. ६. त्याची कन्या. ७. जाणत्यें. ८. उजवा हात. ९. पात्र. १०. देवयानी ययातीस वरिती झाली. ११. क्षत्रियाला. १२. नहुष राजाहून अन्य. (राजा नहुष हा ययातींचा पिता असल्यामुळें आपल्या पित्याचा तो व्याही व्हावा या म्हणण्याचा अर्थ, तूं ययातिराजाच माझा पति व्हावास असा आहे). १३. दासीचें नांव. १४. [कृपेची] सावली. १५. कन्या देवयानीरूपी कुलांकुराची. १६. सहनशीलतेचे. १७. आपल्या वांट्याला.

शर्मिष्ठोक्ति[1] पित्यातें कथुनि, म्हणे, 'तूं असाचि अससील;
सोसुनि अपमान सुखें, वाटे या दुर्जनांत वससील.' ४३
शुक्र म्हणे, 'विधि वदला मजला 'तूं विश्ववृष्टिपति[2]' तनये!
स्वमुखें काय वदों? मज पाहों तो शरण केंवि पतित न ये. ४४
अज्ञ मुलें कलह करिति; न वदावें तेंचि बोलति स्वैर[3];
तें चित्तांत धरूनि, प्राज्ञें पुरुषें करू नये वैर.' ४५
सुरयानी गुरुंसि[4] म्हणे, 'बा! नेणति थोर थोर कवि ज्यातें,
धर्माचें तत्व बरें जाणतसे हे सुबुद्धि कविजा तें. ४६
धर्माधर्मबळाबळवार्ता तों दुर्लभाचि अन्या या;
कन्या या पायांची जाणे न्याया, तथैव अन्याया. ४७
त्यांत पळहि न वसावें, ज्यांत दुरितभीति[6], धर्म, नय, नाहीं.
तृणचरमुखें[7] सुखें अवलोकावीं, खळमुखें न नयनाहीं. ४८
दुर्जनसहवास सदा तापद; हा काय नरक सामान्य?
होईल यासि दाटुनि मानधन[8] प्राज्ञनर कसा मान्य?' ४९
वृषपर्व्यासि म्हणे कवि, 'मीं विप्रचि कीं अविप्र? मत्तनया
पीडावी? हरिंसि[9] हसति वाटे सोडुनि अवि[10] प्रमत्त[11] नया[12]. ५०
त्यजितों तुला, अतिक्रम[13] साहे ऐसा नव्हे पुरोधा[14] मीं.
वृत्त्यर्थ[15] तापसा मज शाक[16] पुरो, वा न वा पुरो, धामीं[17].' ५१
असुरपति[18] म्हणे, 'स्वामी! नमितों मीं सर्वथैव अपराधी.
पहिली एकाचि[19] असो या दासजनीं, नसोचि अपरा[20] धी[21]. ५२

---

१. शर्मिष्ठेचें भाषण. (मागें २५ ते ३१ गीती पहा). २. जग आणि पाऊस यांचा पति. ३. वाटेल तसें ४. बापाला. ५. शुक्रपुत्री देवयानी. ६. पापभीति. ७. पशुमुखें. ८. मान हेंच धन ज्याचें असा. ९. सिंहास. १०. मेंढे. ११. अतिशय मस्त झालेला. १२. नीतीस. १३. अपमान. १४. उपाध्याय. १५. उपजीविकेकरितां. १६. भाजी. १७. [स्वतांच्या] घरामध्यें. १८ वृषपर्वा. १९. एकच [कृपेची]. २०. अन्या. [क्रोधाची] २१. बुद्धि. (दृष्टि).

जरि सिंधु जीवनाचीं, क्षणहि न दे, करुनियां दया दानें,
तरि वांचावें कैसें? रक्षावें बा! स्वयाद[१] यादानें? ५३
त्यजितां मरेल हा जन; न प्रभुवर लाविला मळा सुकवी[२].
स्वयशासि सकृप-अकृपत्वाच्या लागों न दे मळा सु-कवी.' ५४
काव्य म्हणे, 'मीं जातों; व्यसनांत तुम्हीं[३] तरा, बुडा, लोलें[३],
आतां सुर येतील; क्षिप्र पळा हो! मला नसे बोल. ५५
तुमचें प्रिय, कन्येचें अप्रिय, मज हा न दोष करवेल.
लावाल शत सुरांचे[४], अजिरीं[५], परि ते न तोषकर वेलें[४]. ५६
वृषपर्वा नमुनि म्हणे, 'श्रीचा, माझाहि नाथ तूं, देवा!
हो सुप्रसन्न; आम्हां दासांपासूनि घे सदा सेवा.' ५७
शुक्र म्हणे, 'जरि म्हणसि, स्वश्रीचा, आपुलाहि नाथ मला,
तरि, कन्याचि मदात्मा[६], प्रार्थूनि करा प्रसन्न जो श्रमला.' ५८
राजा म्हणे, 'बहु बरें'; मग सुरयानीकडे तयासहित
जाय कवि; तदुक्त[७] कथी, जें तीस, तया कृताश्रयास[८], हितें[९]. ५९
परिसुनि तातोक्त म्हणे, 'म्हणतो तुज 'आत्मवित्तनाथ[१०]' मुखें;
राजा मज 'माग' म्हणो; मग मीं मागेन इष्टकाम सुखें.' ६०
राजा म्हणे, 'गुरुसुते! देतों, जें मागसील तें नमुनी.
आम्हां तूं तसि पूज्या, पूज्य, जसा हा तपोनिधान[११] मुनी.' ६१
कविदुहिता[१२] त्यासि म्हणे, 'दशशतकन्यायुता[१३] तुझी तनया
शर्मिष्ठा मद्दासी व्हावी; कामासि इच्छितें मन या. ६२
यावें मजसह मत्पतिसदनासि, त्यजुनि भाउ, दासीनें.
दास्य करावें भावें[१४], न असावें मानसें उदासीनें. ६३

---

१. स्वकीय जलचर प्राणी. २. वाळवी—**पंत**. ३. चंचल असे तुम्हीं. ४. कल्पलता. ५. अंगणांत. ६. माझा जीव, प्राण. ७. वृषपर्व्याचें म्हणणें. (५७ वी गीति पहा). ८. [आपला] आश्रय ज्यानें केला आहे अशा (तया वृषपर्व्याला). ९. हितकर. १०. आपल्या द्रव्याचा स्वामी. ११. तपश्चर्येचें भांडार. १२. दुहिता=कन्या. १३. सहस्र कन्यांसहवर्तमान. १४. भक्तीनें. (मनापासून).

राजा धात्रीस[1] म्हणे, 'होंचि शिवें[2]; तुझीच आण; जागे[3] हा
श्रीगुरु अस्मत्त्राणीं[4]; कन्येला शीघ्र आण; जा गेहीं[5].' ६४
धात्रीनें समजावुनि जावुनि कथितांचि पितृमुखाज्ञा[6], ती
शिबिकेंत बसोनि निघे, कीं[7] पात्र असोत जयसुखा ज्ञाती. ६५
गुरुतनयेसि म्हणे, 'तुज देयील तुझा जयासि बा[8], धामीं
त्याच्याहि तुझी दासी येत्यें, न गणूनि दास्यबाधा, मीं.' ६६
स्मितें[9] करुनि, देवयानी, राजवधूगल्ल[10] व्हावया ओले,
टोले शर्मिष्ठेच्या माथां हाणावया, असें बोले:—
६७
'मज्जनक तव पित्याचा बंदी; स्थिति रीति हे असी; गाई[11]
घेतो याचक; माझी दासी होसील तूं कसी? गाई[12]!' ६८
शर्मिष्ठा उत्तर दे, 'जो बहु आग्रह करील, अज्ञा ती.
कुळजेनें[13] व्यसनकरीं[14] प्राणहि द्यावे, परंतु न ज्ञाती.' ६९
सुरयानी गुरुसि म्हणे, 'विद्यातेजें, विवेकविज्ञानें[15],
बापा! सत्य निवाल्यें निववूनि जना, निवे कवि, ज्ञानें. ७०
चाला, आला चित्ता आतां मुनिनायका! पुरा[16] वास[16].
वास तुझ्याचि यशाचा मधुर; असा काय कापुरा वास? ७१
जाय पुरीं, उत्सव दे मुनि शिष्यां; जेंवि अर्क[17] राजीवां[18].
वांटी मधुरा आशी[19] कावे वृषपर्वाहि शर्करा जीवां[20]. ७२
त्यावरि, एका समयीं त्याच वनीं शुक्रकन्यका गेली,
संगीं सहस्र दासी, शर्मिष्ठा; काननीं[21] करी केली[22]. ७३

---

१. दाईला. २. कल्याणकारक. ३. जागृत असे. ४. आमच्या रक्षणाविषयीं. ५. घरीं. ६. बापाच्या तोंडची आज्ञा. ७. स्वजन (राक्षस), जयप्राप्ति झाल्यानें होणाऱ्या सौख्याला पात्र व्हावेत म्हणून. ८. बाप. ९. मंदहास्य. १०. राजकन्येचे गाल. ११. धेनु—**पंत.** १२. अगाई! १३. कुलीन स्त्रीनें. १४. संकटाचे हातां. १५. विचारानें प्राप्त झालेल्या विशेष प्रकारच्या ज्ञानानें. १६. नगरामध्यें राहणें. १७. सूर्य. १८. कमलांना. १९. आशीर्वाद. २०. प्राण्यांना. (अर्थात् सर्व लोकांना). २१. वनांत. २२. क्रीडा.

गेला पुरासि घेउनि, बसवूनि मनुष्य[1]देव यानीं[2]; तें,
श्रीतें[3] पद्म[4] तसें, वरसद्म[5] सुखद होय देवयानीतें. ९३
स्त्रीरतीं बहु रमला नृप, सरसीं[6] रसिक काय तो कवनीं?
बहुपुण्यवंत रमतो जैसा सानंद देवलोकवनीं[7]. ९४
सदनीं करी ययाती, जे कांहीं सुखविलास तीस हित;
रायें स्वात्मा तैसा, जेंवि हरें सुखविला सती[8]सहित. ९५
कविजासुत[9] यदु पहिला; त्याचें गुरुलोचनीं[10], मना तुंडें[11]
निववी; शशिबिंब जसें, करि कविचें मुदित[12] धाम[13], नातुंड. ९६

अध्याय अकरावा.

होय ऋतुमती सुमती शर्मिष्ठा, व्याकुळा वराधीनें[14];
चित्तीं म्हणे, 'सहावें किति दुःख कळेवरें[15] पराधीनें? १
प्रियतम सहाय नसतां, यौवनवहनेंकरूनि जो सीण,
तद्गणनीं कुंठितमति होयील स्वरस्वतीहि जोशीण[16]. २
शिशु पाळण्यांत घालुनि हालवितां, निजवितां, सुखें '[17]जो जो'
धात्री म्हणति, सखीला[18] अमृतरसचि तो, निघे मुखें जो जो. ३
' काय करूं? एकांतीं जरि होती भेटि, वाटतें मतिला,
विनउनि वरित्यें पुत्रप्राप्त्यर्थ, तरि, स्वयें सखीपतिला. ४

---

१. राजा. २. पालखींत. ३. लक्ष्मीला. ४. कमल. ५. नवऱ्याचें घर. ६. प्रेमयुक्त (पक्षीं) नवरसयुक्त. ७. नंदनवनीं. ८. सती हें पार्वतीचें पूर्वजन्मांतील नांव. ९. देवयानीचा मुलगा. १०. आईबापांच्या नेत्रांला. ११. तोंड. १२. आनंदित. १३. घर. १४. पतिप्राप्तीविषयींच्या मानसिक व्यथेनें. १५. शरीरानें. १६. गणना करण्याचें काम जोश्याचें असतें. सरस्वती स्त्रीलिंगी आहे म्हणून ती जोशीण. १७. 'जो जो बाळा' हा शब्द. १८. देवयानी—**पंत**.

न उपेक्षील कदापि क्षितिपति, धर्मज्ञ, शरण आलीला.
मजही व्हावे, झाले कामद ते जेंवि चरण आलीली[1].' ५
नृपहि उपवनीं गेला; एकांतीं तीहि दृष्टिला पडली;
न घडावीच कधीं, परि दोघांची गांठि विधिबळें[2] घडली. ६
देतां दुर्लभ दर्शन एकांतीं, करुनियां दया, तीतें
कळला प्रसाद; मग ती विनवी मंजु[3] स्वयें ययातीतें. ७
'द्वारीं मृगपतिहस्तांतूनि[4] अहो वीरराय! जी मुक्ता[5],
ती सेविजेल इतरें सिंहावांचूनि काय जी! मुक्ता[6]?' ८
नृपति म्हणे, 'जें वदसीं, जाणतसें मीं यथार्थ, सुंदरि! तें.
सरस असोचि; मधुपबहुमत जरिहि रसेंकरूनि कुंद[7] रितें[8]. ९
'तुज शयनीं न बहावें,' वदला कवि; मज अलंघ्य आज्ञा ती.
माझे तुझेहि न पुन्हा मुनिच्या क्षोभें म्हणोत 'हां[9]!' ज्ञाती[10].' १०
शर्मिष्ठा त्यासि म्हणे, 'गम्यस्त्रीविषयकानृतें[11] पाप
न शिवे धर्मज्ञाला; आर्तजनांचा[12] निवारिजे ताप. ११
वरिलासि मत्सखीनें; म्यांही वरिलासि तूं मनें; मातें
पापापासुनि रक्षीं; या माझ्या चालवूनि नेमातें.' १२
भूप म्हणे, 'व्रत माझें, कोण्ही जन जें अभीष्ट मागेल,
तें द्यावें त्यासि असें; मज तत्त्यागेंहि[13] दोष लागेल.' १३
ऐसें वदे, मग नृपति, द्याया त्या सुंदरीस मुदतिशय[14],
हांसे; म्हणे, 'धरूं दे, सुंदरि! रंभोरु[15]! सुभ्रु! सुदंति[15]! शय[16].' १४

---

१. मैत्रिणीला. (देवयानीला). २. सुदैवानें, दैवबलानें. ३. मधुरवाणीनें. ४. सिंहाच्या हस्तांतून. ५. सुटलेली. ६. मौक्तिक. ७. कंदपुष्प. ८. जरिहि रसेंकरुनि कुंद रितें (रिकामें) [तरांहि] मधुपबहुमत (भ्रमराला पुष्कळ मान्य) [असतें]. ९. हाय! १०. स्वजन. ११. उपभोगास योग्य अशा स्त्रीविषयीं खोटें बोलण्यानें. १२. पीडित जनाचा. १३. त्या व्रताच्या त्यागानेंहि. १४. आनंदातिशय. १५. केळीसारख्या [गोल व सुकुमार] मांड्या असलेल्या, उत्तम भिंवया असलेल्या व उत्तम दांत असलेल्या अशा सुंदरि! १६. हात.

केली कृपा नृपानें, प्रथम स्वमनीं नमूनि त्या ऋषितें[1].
प्याली तीहि चकोरी पतिमुखचंद्रामृता मनें तृषितें. १५
स्वप्रसवें[2] सुखशोभा दे क्षितिस परांहि[3] जेंवि सुक्षितिचा[4];
प्रसवोनि सुतासि, तसा सुखशोभा दे विशुद्ध कुक्षि[5] तिचा. १६
शर्मिष्ठेला झाला सुत, नाम द्रुह्यु ठेविलें आहे;
ऐसें कळतां, चित्तीं चिंतेला काव्यकन्यका वाहे. १७
भेटुनि तिला म्हणे, 'हें कर्म उचित सुभ्रु! काय गे! हा! तें
विमळ कुळ मळविलें कीं, लावियला अग्नि हाय! गेहातें. १८
धवळांबरासि[6] कज्जळ, तैसें जें शुचिकुळासि पाप डसे;
तें धूतां श्रम बहु; गुरु[7] भाजति दुःखाग्निमाजि पापडसे.' १९
येरि[8] म्हणे, 'ऋषि आला, श्रुतिपारग[9], धर्मशीळ वरदा त्या
प्रार्थूनि, याचिला म्यां ऋतुकाळीं पुत्रकामवर दात्या.' २०
देवी म्हणे, 'खरें हें जरि, तरि शोभनचि[10], मानलें मजला;
मज नाम सांग त्याचें, सुंदरि! जो वरद ऋषि तुला भजला.' २१
दैत्यपतिजा म्हणे, 'ऋषि गमला रविसाचि; नामगोत्रास
कैंची शक्ति पुसाया? सांगों मीं देवि! काय तो त्रास?' २२
राज्ञी म्हणे, 'बरें; मज नाहीं कोप त्वदीयसुतलाभें.
जन न उतला जगीं जो, तो पावे नित्य भद्र[11], उतला[12] भें[13].' २३
वदल्या दोघी प्रेमें, झाल्या सानंद, हांसल्या आली[14];
आलिंगिलें परस्पर; मग निजसदनासि भार्गवी[15] आली. २४
त्यावरि दुसरा झाला, तो तुर्वसु शुक्रकन्यकातनय.
अनु पूरु पुत्र दोघे, शर्मिष्ठेला. करी न घात नय. २५

---

१. शुक्राचार्यांतें. २. आपल्या (धान्यादिकांच्या) उत्पत्तीनें. ३. दुसऱ्यांलाही. ४. चांगल्या जमिनीचा. ५. कूस. ६. शुभ्र वस्त्रास. ७. मातापितरादि. ८. शर्मिष्ठा. ९. वेदपारंगत. १०. चांगलें. ११. कल्याण. १२. उन्मत्त झाला. १३. भय. १४. सख्या. १५. शुक्रकन्या.

कविकन्येचे दोघे, शर्मिष्ठेचे तिघे सुत, नुरविते[1]
पितृचिंतातिमिर[2], सुहृन्नयनाब्जें[3] सुखविते सुतनु[4], रवि ते. २६
एका समयीं देवी पतिसह गेली अशोकवनिकेला[5];
'क्रीडावें तेथ सुखें' संकल्प असा तिणें स्वमनिं केला. २७
शोभे सती उपवनीं पतिसह, जसि शंभुसह उमा रमणी.
तों देखिले तिणें सुरगर्भसमप्रभ तिघे कुमारमणी. २८
देवी[6] राज्यासि पुसे, 'सुरकलभांची[7] हिरून गति घेते,
कोणाचे शिशु? जैसें[8] देवांचे चालते नग तिघे ते. २९
दिसति तुम्हांसम रूपें, श्रीचे[9] संकेतकुंज[10] ते ज्यांचे
काय[11] रुचिर[12]; काय सुचिर झाले हे प्रकट पुंज[13] तेजांचे?' ३०
पाचारुनि त्यांसि[14] म्हणे, 'कोणाचे बाळ हो! तुम्हीं? धाम[15]
कोठें तुमचें? सांगा. कुळ तुमचें कोण? काय हो! नाम? ३१
अंकीं[16] तुम्हांसि घेउनि, आलिंगुनि, हृष्ट[17] कोण होतात?
कोणासि माय म्हणतां? तुमचा कृतसुकृत[18] कोण हो! तात?.
माता सांगुनि, पुसतां तात, ययातीस दाविती बोटें.
खोटें कर्म नृपाचें जाणुनि, ती[19] दुःख धरि मनीं मोटें. ३३
गेले शिशु जवळि परि, न त्यां तो करुणासुधानदीपति[20] घे.
ते त्या क्षणींच रुचले स्वकुळाचे त्या बुधा न दीप तिघे. ३४
उत्सुक झाले होते अंकारोहार्थ[21] पुत्र, पर तो न
प्रभु घे, मग मातेप्रति गेले रोदन करीत परतोन. ३५

---

१. न उरविणारे. २. बापाचा चिंतारूप अंधकार. ३. मित्रांचीं नेत्रकमळें. ४. देखणे, सुंदर. ५. अशोक वृक्षाच्या बागेंत. ६. राणी देवयानी. (राजाबरोबर पट्टाभिषिक्त, अशा राणीला 'देवी' असें म्हणतात). ७. देवांच्या हत्तींच्या छाव्यांची. ८. पाठांतर—**जंगम नव अमरांचे जसे.** ९. लक्ष्मीचे. १०. संकेतांचीं लतागृहें. ११. देह. १२. सुंदर. १३. समूह. १४. शर्मिष्ठेच्या पुत्रांस. १५. राहण्याचें ठिकाण. १६. मांडीवर. १७. आनंदित. १८. कृतपुण्य. १९. देवयानी. २०. दयारूप अमृताचा सागर. (ययाती). २१. मांडीवर बसण्याकरितां.

पतिकृतकपटें पावे, आणुनि नेत्रांसि वारि[1], खेदासी.
तीस म्हणे, 'कां? गे! हे ऋषिसुत तरि नृपतिसारिखे दासी!
त्वां हा भूप भुलविला, केला माझा दहांत अपमान;
बटिक लटिकें[2] तूं दुष्टे! वद, लंघ्य[3] तुला मदीय तप, मानें[3]?' ३७
राजसुताहि म्हणे, 'तूं, कमळाला मधुकरी[4] जसी तृषिता[5],
ज्या भाळलीस ऋषिजा[6]; त्या सत्पुरुषीं कसी नसे ऋषिता[7]? ३८
जो त्वत्पति, तो मत्पति, देवि! पहा धर्म, मीं तुझी आली.
त्वां म्यांहि मनें वरितां, ऋषिता पतिता प्रभूकडे आली. ३९
तूं ज्येष्ठा विप्रसुता, राजसुता मीं सये[8]! कनिष्ठा हो!
जैसी तुझी नृपपदीं, माझीहि तसीच एकनिष्ठा हो. ४०
वदल्यें सत्यचि पूर्वी, देवि! पहातां, ऋषीच पति, तत्वें;
क्षोभों नको वृथा तूं, हा जन दूषूं नकोचि पतितत्वें[9]. ४१
जी स्मरहता[10], पदनता[11], त्यजिल न शशिवंशसदनदीप[12] तितें;
भेटेल नदी जी जी, ती अनुकंप्याचि[13] नदनदीपतितें[14].' ४२
शुक्रसुता पतिसि म्हणे, 'हें विप्रिय[15] काय उचित महिम्यातें[16]?
त्यजिलें आजि तुझें जें श्रीपद्म[17]ाहि सद्म[18] शुचितम[19]हि म्यां तें.' ४३
आरोपूनि स्वशिरीं, दासीसंगें करूनि विटलीला[20],
पंडितवर परि न शके समजावाया ययाति विटलीला[21]. ४४
गुणें[22] वावडीस, सुदृढ प्रेमाचि स्त्रोस, आवरायाचा;
तो तुटतां यत्न नसे कांहीं; गेलाचि आव[23] रायाचा. ४५

---

१. पाणी. २. खोटी. ३. माझी तपश्चर्या व माझा मानमरातब यांचें तुला (दासीला) उल्लंघन करितां येतें काय? ४. भ्रमरी. ५. तहानेलेली. ६. तूं ऋषिकन्या. ७. ऋषित्व. ८. सखे! ९. पापीपणानें. १०. कामार्ता. ११. चरणास शरण आलेली. १२. चंद्रवंशरूपी घरांतील दिवा. (ययाती). १३. कृपेला पात्र. १४. समुद्राला. १५. अनिष्ट गोष्ट. १६. मोठेपणाला. १७. लक्ष्मीचें [निवासस्थान] जें कमल तसें. १८. घर. १९. अत्यंत शुद्ध. २०. जारलीला–**पंत.** २१. त्रासलेल्या देवयानीला. २२. दोरा. २३. धैर्य.

जाय पित्याच्या सदना, करुनि परित्याग बायको पतिचा;
पुत्रांतेंहि न पाहे. सांगावा उग्र काय कोप तिचा? ४६
नाहींच कांतवचना, हृदयांत धरूनि तें असुख, वळली.
वाटे नृपासि धरितां, सोडीलचि आपुले असु[1], खवळली. ४७
भूप म्हणे तीस, 'परिस माझें सुखसंपदे! विनवणें, हो[2]
चित्त सुवृत्त; न पावो विश्लेषें[3] कंप; देवि! निर्वर्णें[4] हो!' ४८
दावार्ता[5] जेंवि मृगी कासारीं[6] जाय, ती स्वमाहेरीं;
पावे नृपहि[7], म्हणे तों नमुनि गुरुसि, तापसोत्तमा[8]! हेरीं[9]. ४९
ताप दिला जेणें, तो हा कामी तापसा! हतांस[10] दया
उठवि तुझी, किति मारूं हाका? मीं ताप साहतां सदया!' ५०
'माझी[11] दासी मजहुनि बहुमान्या, यासि बा! दया तीची;
तीन तिला सुत दिधले, दोघे मज, ती प्रिया ययातीची.' ५१
स्वतपाच्या तीव्रत्वें लाजविता योगिराज जो पविला[12],
तो स्वातिक्रम[13] कळउनि, सुरयानीनें क्षणांत कोपविला. ५२
'वृंदावनासि[14] मानिति, अव्हेरिति मूर्ख मत्त पनसा[15]; हे
तीच गति; अतिक्रम परतप[16] साहो; लवहि मत्तप न साहे. ५३
जेणें अधर्म घडला, नाशो बळवीर्य आजि राया! तें;
वपुला आतांचि जरा[17] ग्रासो; हा दंड सांजिरा[18] यातें.' ५४
भूप म्हणे, 'शाप दिला उग्र विपत्पातहेतु[19]; म्हातारा
झालों पहा; अहा जी! जोडितसें हात हे तुम्हां, तारा. ५५
ऋतुदान धर्म कीं जी! हा[20] यास्तव हाय! काय शापावा?

---

१. प्राण. २. होवो. ३. वियोगानें. ४. शांत हो. ५. वणव्यानें होरपळलेली. ६. सरोवरीं. ७. नृपहि [देवयानीच्या माहेरीं] पावे=गेला. ८. तपस्विश्रेष्ठा ९. सूक्ष्म दृष्टीनें पहा. १०. मृतांस [सुद्धां]. ११. देवयानी आपल्या पित्याला म्हणते. १२. वज्राला. १३. आपला अपमान. १४. एक कडूफळ, त्याला. १५. फणसास. १६. दुसऱ्याचें तप. १७. वार्धक्य. १८. योग्य. १९. विपत्ति येण्यास कारण. २०. ययाति.

कन्येकडे तरि पहा, रक्षा मुनिनायका! यशा, पावा. ५६
म्हणतां सत्यचि देवा! जें, हें न विचारिलें तुम्हां चुकलों;
परि शापें तुमच्या प्रिय[1]दुहितेच्या मीं समागमा मुकलों. ५७
करुणा करा सुतेवरि, गुरुजि! प्रभुजि! स्वशाप हा फिरवा;
मिरवा प्रसाद लोकीं, जिरवा मनिं रोष, मज इला निरवा[2]. ५८
मीं यौवनीं अतृप्तचि; ईच्या आतांचि भर विलासाचा;
[3]शापमिषें त्वां तापचि आम्हां दोघांसि भरविलों साचा.' ५९
शुक्र म्हणे, 'नरनाथा! नाहीं होणार शाप हा लटिका;
तेज पहा वचनाचें, ज्यासि फळाया न लागली घटिका. ६०
परि मद्वरें तयाप्रति जाइल, देसील हे जरा ज्यातें;
येयील तुजप्रति, जें त्याचें तारुण्यतेज, राज्या! तें.' ६१
भूप म्हणे, 'दोघींला दिधले म्यां पांच तनय निजरेतें[5];
तो राजा हो, देइल यौवन जो त्यांत घेउनि जरेतें.' ६२
काव्य म्हणे, 'होंहि दिलें जा; परि होऊनि वीर्यमत्त नया[6]
न विलंघीं; धर्मातें रक्षीं; दुखवीं पुन्हां न मत्तनया[7].' ६३
गुरुची आज्ञा, कन्या घेउनि, जाउनि गृहासि तो[8] जीनें[9]
आणी मनीं असें कीं, 'यदुच्या देहीं जरेसि योजीन.' ६४
त्यास म्हणे, 'स्वजरा घे' यौवन दे; अयश नें[10] नुत[10] न यदो! घे;'
तो तें न करी; तुर्वसुही; तेहि द्रुह्यु, अनु, तनय [11]दोघे. ६५
[12]पूरूनें आज्ञेचा केला स्वीकार; ते जरा याला
स्पर्शों, काव्यवरबळें याचें तारुण्यतेज रायाला. ६६
करितां आज्ञाभंग, क्षोभाचें पात्र जाहले चवघे;
पूरु प्रसाद गुरुचा पावे; सत्कीर्तिची सदा चव घे. ६७

---

१. आवडत्या मुलीच्या. २. इच्या हातीं मला द्या. ३. [हा शाप दिला नाहीं; तर] शापाच्या निमित्तानें. ४. खाऊं घातला. ५. आपल्या वीर्यानें. ६. नीतिला. ७. माझी मुलगी. ८. वृद्ध ययाति. ९. जीनों, जीर्णः—**पंत.** १०. न नुत=अनिंद्य. ११. शर्मिष्ठेचे दोघे पुत्र द्रुह्यु आणि अनु हे. १२. शर्मिष्ठापुत्र.

पूरुप्रति भूप म्हणे, 'वत्सा! [1]मत्सार्वभौमपदवीतें
तूंचि सुपात्र; मज तुझें साधुत्व तव [2]स्तवासि वदवीतें. ६८
तूं धन्य, अन्य न असा, कैंची सर्वत्र साधु सुतरीती?
बापा! प्रजा असी, जी पितरांसि [3]भवार्णवांत [4]सुतरी, ती.' ६९
धर्मार्थकाम सेवी पुत्रवयें नृप सहस्र [5]वत्सर तो;
मग मनिं म्हणे, 'पुरे हें; या [6]श्रीसंगीं मदीय [7]वत्स रतो. ७०
स्वल्पचि एकाहि [8]स्रक्चंदनवनितादि सर्व विषय मही;
कळले मज हे भोगचि मारक, न व्याळ, शस्त्र, विष, यमही.
[9]श्रीसेव्या! [10]सदलिमता! वस [11]राज्यसरीं, न [12]मज्ज, [13]राजीवा!
वत्सा! बहु कष्टविलें त्वां, स्वीकारूनि मज्जरा, जीवा.' ७२
जाय नृप, श्रीकरवीं धरवुनियां पूरुहस्त, वनवासा.
न गमे प्रजांसि पति तो, [14]गुणजित-सुरभूरुह-स्तव, नवासा. ७३
जाउनि तपोवनातें, सेवी राजा महातपा पवना;
जाळी [15]ज्ञानदवें तो [16]चित्तगजाचा महात पापवना. ७४
गेला स्वर्गासि अमित सुकृतें जोडूनि राय; तें [17]नाकीं
होय सुदुःसह [18]शंका, जैसें बाळासि रायतें नाकीं. ७५
एका समयीं सुरपति त्याचेंचि महत्त्व तन्मुखें वदवी;
[19]ऋजुभावें नृप नेणे कीं, [20]आत्मस्तोत्र कुगतिची पदवी. ७६
'स्वतपें तूं कवणासीं तुल्य?' असें [21]हरि पुसे ययातीतें.

---

१. माझ्या सार्वभौम ऐश्वर्यातें. २. स्तुतीस. ३. संसारसागरांत. ४. उत्तम नौका. ५. वर्षें. ६. राजश्रीच्या संगतींत. ७. पुत्र. ८. माळा, चंदन, स्त्री आदिकरून. ९. लक्ष्मीनें सेवन करण्यास योग्य अशा! १०. साधुरूप भ्रमरांस मान्य अशा! ११. राज्यरूप सरोवरामध्यें. १२. बुडूं नको. १३. कमला! १४. स्वगुणांनीं जिंकली आहे कल्पवृक्षाची स्तुति ज्यानें. १५. तपोग्नीनें–**पंत.** १६. मनोरूप हत्तीचा. १७. स्वर्गामध्यें. १८. पाठांतर–**दैवा.** १९. सरळपणानें. (भोळेपणानें). २०. आत्मस्तुति. २१. इन्द्र.

त्यातें नाहुष[1] राजा सत्यचि सांगे मनें भयातीतें[2]. ७७
'देवेंद्रा! कोण्हीही स्वतपें मत्तुल्य जन असेना कीं.
काय वदों? नर ते क्षिति? न महर्षिजनीं असे, तसे नाकीं.' ७८
शक्र म्हणे, 'बहु भास्वर[3] रविसम ज्याचे तपोगुणें काय,
त्वत्तुल्य त्वदधिकही आहेत तपोनिधी; उणें काय? ७९
हें काय उचित तुजला? साधु न कोणासही अव्हेरीती.
अभिमानें स्वतपःक्षय केला कीं; हे बरी नव्हे रीती. ८०
झाला सर्व तपःक्षय, पाव प्रक्षीणपुण्य[4] तूं पतन.
बहु तप करिता तापस धन्य नव्हे; धन्य करिल जो जतन.' ८१
नाहुष म्हणे स्वपतनावसरीं[5] प्रार्थूनि नाकपाळाला[6],
'हा जन संतांत पडो, जरि आलें पतन या कपाळाला.' ८२
इंद्र म्हणे, 'तुज राया! संतांत घडेल पात[7], कमळाला
रविसे ते हर्ष तुला देतील, हरूनि पातकमलाला.' ८३
पडतां, स्वर्गासि पुन्हां गेले घेऊनि संत राज्याला,
नृप अष्टक, प्रतर्दन, वसुमान्, शिबिनामक स्वआज्याला[8]. ८४
तरला ययातिराजा, दर्शन होतांचि संतरायांचें;
सद्दर्शनचि सुदर्शन करि गट चट कटक[9] अंतरायांचें[10]. ८५
जे दुरिततृणचया[11] दव[12] यादव यदुचे; हरी[13] अरिगजांचे[14].
त्या पूरुचेहि पौरव; पौरें[15] वदति नाकगोष्ठिहि[16] न ज्यांचे. ८६

---

१. नहुषाचा पुत्र तो नाहुष. (ययाति). २. निर्भय अशा. ३. तेजस्वी. ४. नष्टपुण्य. ५. आपण पडण्याचे वेळीं. ६. स्वर्गाधिपति इंद्राला. ७. पतन. ८. ययातीची कन्या माधवी इचे हे अष्टकादि चार पुत्र होते. म्हणून ययाति त्यांचा आजा. ९. सैन्य. (समुदाय). १०. विघ्नांचें—**पंत.** ११. पातकरूप गवताचा समूह, त्याला. १२. वणवा. १३. सिंह. १४. शत्रुरूप हत्तींचे. १५. नागरिक. १६. पौरवपुरं स्वर्गाधिकं—**पंत.**

अध्याय बारावा.

श्रीमद्ययातिनंदनपूरुकुळीं भूप जन्मले [1]शतशा,
श्रवणें [2]तत्कीर्ति हरिति ताप, [3]सुधांच्या नद्या न लेश तशा. १
त्या पौरवांत झाला राजा [4]दुष्यंत [5]धर्मपर, [6]महित.
स्वगुणें करि प्रजांचें [7]अनुदिन तो [8]मूर्तधर्म परम हित. २
तो एकदा वनाला जाय, कराया यथेष्ट मृगयेतें;
[9]बलकोलाहल परिसुनि, 'कुळनाश[10]व्यसन' म्हणति मृग 'येतें.'
वधिले व्याघ्र, [11]वृकें, [12]खळश्वापद; धरिले प्रमत्त गज रानीं;
चिरिले [13]किरि लेशहि [14]धृति [15]मृगयूथीं नुरविलोच [16]गजरानीं. ४
एका हरिणामागें [17]एकाकी भूप धांवला, श्रमला;
जातां दूर श्रीमत्कण्वाश्रम रम्य पाहतां रमला. ५
तें [18]सत्यलोकतुल्यचि आश्रम[19]पद, ज्यांत [20]अण्वंघ न साच.
तेथील तापस [21]शिखीचातकसे, त्यांत कण्व [22]घनसाच. ६
श्री[23]मालिनीतटीं तो त्या शुद्धाश्रमपदांत शिरला, हो!
चित्तांत म्हणे, '[24]काश्यपपदपद्मरजःप्रसाद शिर लाहो.' ७
मुनि आश्रमांत नव्हता, त्याची कन्या शकुंतळा होती.
पूजी [25]नरदेवातें, करि तेव्हां स्ववपु दीपकज्योती. ८

---

१. शेंकडों. २. त्या राजांची कीर्ति. ३. अमृतांच्या. ४. दुष्यंत हा पूरूपासून अठरावा वंशज होय. ५. धार्मिक. ६. मान्य. ७. प्रतिदिनीं. ८. मूर्तिमंत धर्मच असा. ९. [त्याच्या] सैन्याचा कलकलाट. १०. व्यसन=संकट. ११. लांडगे. १२. क्रूरपशू. १३. रानडुकर. १४. धैर्य. १५. हरिणांच्या कळपामध्यें. १६. आरोळ्यांनीं. १७. एकटा. १८. ब्रह्मलोकासारखें. १९. पद=स्थान. २०. लेशभरही पातक. २१. मोर आणि चातकपक्षी यांसारिखे. २२. मेघासारिखा. २३. मालिनी नदीच्या तीरावर. २४. काश्यप=कण्व. २५. [दुष्यंत] राजातें.

अवलोकितांचि, आधीं भुलला लावण्यकल्पलतिकेला.[1]
त्यांत तिणें उचितादर सस्मितमधुरोदितेंहि[2] अति केला. ९
चित्तीं म्हणे नृपति, 'हे जातीची[3] सस्मिता[4] सुकळिका;[5] मीं[6]
होईन काय चुंबुनि ईतें सफलेच्छ, तृप्त, अळि कामीं?'[7] १०
मग तीस पुसे, 'सुंदरि! चतुरे! तूं कोण? सत्य सांग मला.
तुज या वयांत हित हा उग्र तपोनियमताप कां गमला? ११
'कण्वसुता मीं' म्हणसी, परि न गमे सत्य, सत्य वद नातें;
दे मत्कर्णतृषाहरवृत्तसुधाचषकता[8] स्ववदनातें. १२
त्वत्तात ऊर्ध्वरेता[9] कण्व कसा? तूं सुता कसी? बोल.
मीं पौरव दुष्यंत त्वद्वृत्ताकर्णनीं[10] असे लोल.'[11] १३
ती त्यासि म्हणे, 'पूर्वीं एकें मुनिनें विचारिलें होतें;
जें त्यातें मत्तातें[12] कथिलें मज्जन्म,[13] सांगत्यें हो! तें.' १४
"विश्वामित्र तप करी, केलें कोण्हींहि तेंवि तप नाहीं.
तापे मुनितेजें जग, जैसें कल्पांतकाळतपनाहीं.[14] १५
उग्रतपःसामर्थ्यें विश्वामित्र प्रभु स्वपद हरितो,
ऐसें शंकोनि म्हणे, धरुनि करें मेनकाकरा,[15] हरि[16] तो. १६
'स्वश्रीभोग[17] बहुत जरि केला, परि तो गमे न केला हो;
म्हणुनि ईचा[18] हा,[19] कौशिकमुनिहि[20] तुझा भोग मेनके! लाहो. १७
स्वपदहर गमे सकळां, मजलाचि प्रियतमे! न केवळ तो;
न वळेल उपाशयतें, तुजचि मुनी नियत[21] मेनके! वळतो. १८

---

१. सौंदर्याची जणुं कल्पवल्लीच अशा शकुंतलेला. २. हास्ययुक्त अशा मधुर भाषणानें. ३. जाईची. ४. किंचित् विकसित. ५. उत्तम कळी. ६. मी भ्रमर. ७. कामीं तृप्त. ८. माझ्या कर्णांची तृषा हरण करणारें [तुझें स्वकीय-] वृत्तरूपी अमृत पिण्याचें पात्र—त्याचा भाव=पात्रपणा. ९. योगी, ब्रह्मचारी. १०. तुझी हकीकत ऐकण्याविषयीं. ११. साभिलाष, उत्सुक. १२. माझ्या बापानें (कण्वानें). १३. माझा जन्मवृत्तांत. १४. प्रलयकाळच्या सूर्यांनीं. १५. मेनकाप्सरेच्या हाताला. १६. इन्द्र. १७. आपल्या इन्द्रपदाचा भोग. १८. स्वश्रीचा. १९. मीं इन्द्र. २०. कुशिकपुत्र विश्वामित्र. २१. खात्रीनें.

तूं पात्र, गाधिजाला[1] सदुपायन[2] करुनि देह, नुतितें[3] हो[4];'
हरि वारंवार असें, स्वकरेंचि धरुनि वदे, हनु[5], तितें हो! १९
'भ्रूधनु[6] ओढुनि, कज्जलविषदिग्ध[7] कटाक्षशर वरारोहे[8]!
सोडुनि, लुटीं तपोधन; सौभाग्यश्री तुझी भरारो[9] हे.' २०
ती अप्सरा म्हणे, 'तो भस्म करिल मज महातपा शापें;
जाइल कवण यमाच्या जोडुनि बळेंच हात, पांशापें[10]? २१
मीं अबळा भीरु कसी साहों त्या गाधितनयतेज्यातें?
भ्यालासि असा, दुःसह मानुनियां तूंहि सुरपते! ज्यातें. २२
गातातिं [11]कीर्ति ज्याची मुनिसुतहननत्रिशंकुरक्षणजा[11].
[12]ब्रह्मसखित्वाचि दे नवसृष्टीचा दिव्य अंकुर क्षण ज्या. २३
जें दुष्कर पुरुषवरा तुजहि, कसें करिल काज रामा[13] तें?
[14]सदमृततरु तो मुनि, परि कपटें होईल [15]कांजरा मातें. २४
करिल कसें मांजर, जें दुष्कर [16]हरिहननकाज वाघांस?
न शकति अग्नि विधु[17]; कसा दिनमणिचा[18] करिल काजवा घांस?
त्या मुनितें मोहाया हा जन काय प्रभु[19]? प्रभो! परि तें
तेज पहाया जात्यें; [20]परिजनगत-नाथतेज जय करितें. २६
जात्यें; तव आज्ञेचा कोण सुधी जन करील अवमान?

---

१. विश्वामित्राला. २. उत्तम भेट, नजराणा. ३. स्तुतीतें. ४. होई. ५. हनवटी. ६. भृकुटिरूप धनुष्य. ७. काजळ हेंच विष त्या विषानें लिप्त. ८. पृथुनितंबाचे स्त्रिये! (तात्पर्य, सुंदर स्त्रिये!). ९. वाढो. १०. पाशाजवळ. ११. वसिष्ठमुनीचे पुत्र मारणें व त्रिशंकुराजाचें रक्षण करणें या उभय कृत्यांमुळें झालेली कीर्ति. (विश्वामित्रानें वसिष्ठाचे शंभर पुत्र मारिले होते व त्रिशंकुराजास स्वर्गास पाठविण्याचा प्रयत्न केला होता, ही कथा येथें अनुसंधेय आहे). १२. ब्रह्मदेवाचें मित्रत्व. (सृष्टिनिर्माता ब्रह्मदेव असल्यामुळें नूतन सृष्टि निर्माण करणारा विश्वामित्र, हा समान क्रियेमुळें ब्रह्मदेवाचा अर्थातच मित्र झाला). १३. [अबला] स्त्री. १४. उत्तम अमृतवृक्ष. १५. कुचला नांवाचा एक विषवृक्ष. १६. सिंहास मारण्याचें काम. १७. चंद्र. १८. सूर्याचा. १९. समर्थ. २०. सेवकाचे ठिकाणीं असलेलें.

परि मन्निकट असावे मज साह्य [1]वसंतकामपवमान.' २७
शक्र म्हणे, 'सर्वहि सुर आहों तुजला सहाय; कार्य करीं.'
आज्ञा दे; मग गेली आणाया तूर्ण तोहि [2]आर्य [3]करीं. २८
जेथें करीत होता दारुण तप तो तपो[4]नदीन मुनी,
तेथें जाउनि, खेळे [5]तन्निकट, प्रथम तत्पदीं नमुनीं. २९
होती करीत [6]कंदुककेलि, मधुर गान, मोहिनी, तीतें
स्पर्शे प्रथम [7]वसनहरपवन, मग त्यजुनि [8]तोहि नीतीतें. ३०
सुरतरसांत बुडाला, जाणों स्त्रीरत्न शीत[9]नवसर, तो
तप्त [10]मतंगज रतला; शक्र म्हणे, बहु करूनि नवस, 'रतो.' ३१
झाली गाधिजसंगें हे कन्या; मालिनीतटीं ठेवी;
स्वर्गासि जाय तेथुनि, बहु निष्ठुर चित्त करुनि, ती [11]देवी. ३२
संरक्षिली वनीं, मधु पाजुनि मातेविना, [12]शकुंतानीं.
असतां [13]विधिकवच, नव्हे काळाच्याही विनाश [14]कुंतानीं. ३३
स्नानार्थ मालिनीतें गेलों, तों कळविलें इच्या [15]रुदितें;
आणुनि [16]उटजीं केलें [17]म्यां पालनलालन, [17]स्वयें [17]मुदितें. ३४
झाले शकुंत पाळक, म्हणवूनि 'शकुंतळा' असें नाम
ठेउनि वागविलें हें रत्न गळां जेंवि [18]मालतीदाम.' ३५
ऐसी [19]तातमुखश्रुत निजजन्मकथा शकुंतळा कळवी;
पळ [20]विस्मित करुनि, नृपतिमनिची [21]स्वालभ्यताव्यथा पळवी.
नृपति म्हणे, 'तरि सुंदरि! सुदति! [22]मुदातिशय तुला, मलाहि घडो.

---

१. वसंतऋतु, मदन आणि [दक्षिणेकडचा] वारा. २. श्रेष्ठ. (विश्वामित्र). ३. हातांत. (ताब्यांत). ४. (तपाचा) सागर—**पंत.** ५. त्याचे शेजारीं. ६. चेंडूचा खेळ. ७. वस्त्र हरण करणारा वारा. ८. विश्वामित्रहि. ९. थंड व नूतन असें सरोवर. १०. हत्ती. ११. मेनका. १२. पाखरांनीं. १३. दैवाचें कवच. १४. भाल्यांनीं. १५. रडण्यानें. १६. पर्णशाळेंत. १७. स्वतां आनंदित अशा मी. १८. मालतीच्या फुलांचा हार. १९. पित्याच्या मुखांतून ऐकिलेली. २०. चकित. २१. आपल्या प्राप्तीची अशक्यतारूप व्यथा. २२. आनंदातिशय.

[1]सत्कृतिसीं रसिकाची; माझी तुजसीं तसीच गांठि पडो. ३७
कुळशीळगुणांहीं तूं योग्या, नृपकन्यका, [2]महोदारा;
घे राज्य सर्व, नाहीं त्वदधिक मज अन्य [3]काम, हो [4]दारा.' ३८
हांसोनि ती म्हणे, 'हो ! प्रार्थावें [5]प्रणत-पारिजातातें;
देवा स्वयें वहावें या [6]निजकारुण्यवारिजा तातें. ३९
मजकरवीं न तुम्हीं [7]बुध [8]गुरुमर्यादातिपात करवा हो !
सत्पात्रीं स्वधनातें [9]चिंतामणि-कण्वतातकर वाहो.' ४०
भूप म्हणे, '[10]गांधर्वें तुजसीं होईन शीघ्र [11]अन्वित मीं;
नाहीं तरि [12]अदयस्मरशरहत झालों, बुडेन [13]तन्वि ! [14]तमीं. ४१
अन्या, धन्या, कन्या, अन्यायन्याय जाणत्या, मागें
गांधर्वेंचि वरातें भजल्या; [15]तद्गुरुहि न भरले रागें. ४२
गुरुदेवताप्रसादा हो [16]भाजनें; आपुल्याचि देहातें,
सत्कीर्ति जगीं व्हाया, सत्पात्रीं आपुल्याचि दे हातें.' ४३
'सुत युवराज असो,' हा वरुनि वर [17]निका, शकुंतळा [18]आली
झाली. करा तयाच्या [19]मधुपवर[20]निकाशकुंतळा आली. ४४
तेव्हां तद्दैव म्हणे, 'योग्य तुला न नर अन्य [21]केलीला;
श्री विष्णुसीं तसी तूं यासीं करिं कण्वकन्यके ! लीला.' ४५
लब्धमनोरथ, राजा दुष्यंत म्हणे 'प्रियंवदे ! विरहा

---

१. चांगल्या कवितेशीं. २. मोठा उदार. ३. इच्छा. ४. स्त्री, भार्या. ५. शरण आलेल्यास पारिजातवृक्षाप्रमाणें असलेल्या ह्मणजे त्याची कामना पूर्ण करणाऱ्या कण्वमुनीतें. ६. आपल्या दयारूप जलामध्यें उत्पन्न झालेल्या (वाढलेल्या) या कमळास ह्म० मला. ७. सुज्ञ. ८. वडिलांच्या मर्यादेचें उल्लंघन. ९. चिंतिलें फल देणारें रत्न, (त्यासारखा). १०. गांधर्वविवाहपद्धतीनें. (प्रीतिविवाहानें). ११. युक्त. १२. निर्दय मदनाच्या बाणांनीं विद्ध. १३. सुंदरि! १४. दुःखामध्यें. १५. त्यांचीं वडील माणसें. १६. पात्र. १७. उत्तम. १८. सखी (अर्थात् पत्नी). १९. भ्रमरश्रेष्ठाशीं सदृश (काळेभोर) आहेत केश जीचे अशी. २०. सदृश—पंत. २१. क्रीडेला.

मींही भ्याडचि, सेना पाठवितों तों असीच देवि ! रहा. ४६
दे मज निरोप, हंसें, वद, विस्मरिजेल काय देवि ! सर[1]?
भिन्न दिसों, एकचि वपु; हें कोण्हासहि न काय[2] दे विसर.' ४७
गेला निरोप घेउनि; परि बहु कण्वासि भूप तो भ्याला.
चित्तीं म्हणे, 'अहा ! मुनि शापिल मज परमविषयलोभ्याला.'
आला कण्व मुहूर्तें[3]; फळपुष्पसमित्[4]कुशांसि आणूनीं,
झाला प्रसन्न भगवान्, दिव्यज्ञानेंकरूनि जाणूनी. ४९
कण्व म्हणे, 'वत्से ! त्वां केला निश्चित आजि तातकर[5];
न धरीं संकोच; नव्हे गांधर्वविधि स्वधर्मघातकर. ५०
तुज सुत होईल भला, निववील यशोमृतें कुलीनमनें;
त्यासि मदाशीर्वादें करितील समस्त नृप मुली ! नमनें.' ५१
तातातें नमुनि म्हणे, 'म्यां दुष्यंतासि वाहिलें काय.
भवदाश्रमीं[6] अतिथिचें[7] न्हतां[8] प्रिय उचित राहिलें काय? ५२
त्यावरि[9] कृपा करावी, द्या हा वर; योग्य होय कन्या यां[10].'
कण्व म्हणे, 'हेंहि दिल्हें; कां भीसी न करुनींहि अन्याया ?' ५३
झाला शकुंतळेला सुत; सुतपा[11] कण्व त्यासि परिपाळी;
गृहधर्माची कुतुकें दे तो[12] भगवान् विरक्त परि पाळी. ५४
भरवी मृगार्भका[13], मग तो भरवी कां न नातवा घांस ?
झाला असा, शिशुपणीं[14] बद्ध करी काननांत[15] वाघांस. ५५
तो[16] आश्रमवृक्षांसीं शार्दूळवराहहस्तिहरिसेना[17]

---

१. सरोवर. २. हें शरीर. (हा दुष्यंत). ३. घटकाभरानें. ४. समित्=समिधा. ५. पितृहस्त. ६. तुमच्या आश्रमांत. ७. पाहुण्याचें. ८. न होतां. ९. त्या अतिथीवर=दुष्यंतावर. १०. वरास. ११. तपस्वी. १२. तो भगवान् कण्व विरक्त; परि गृहधर्माची पाळी कुतुकें दे. (मोठ्या कौतुकानें गृहस्थासारखी वागणूक करी). १३. बालहरिणाला. १४. लहानपणीं. १५. अरण्यांत. १६. तो सहा वर्षांचा शिशु=बालक. १७. वाघ, डुकर, हत्ती व सिंह यांचे समूह.

बांधी सा वर्षांचा शिशु; कण्वोक्तांत तेंचि[1] पारिसेना. ५६
'सर्वदमन' त्यासि म्हणाति, कीरति सदा सुवरवृष्टि[2] जलदमुनी[3];
'निरुपम सुख प्रजांला हा शिशु देईल, सर्व खळ दमुनी.' ५७
कण्व म्हणे, 'मुलि! झाला राज्योचित[4] सुत, मलाहि लाभ वनीं;
जा पतिगृहासि; शोभे स्त्रीजन पतिच्याचि राहिला भवनीं. ५८
राज्यसुख पहा; पतिची सेवा कारें; मज उदास मुलि! न मनीं[5];
पतिसह वृद्धपणीं ये, जरि[6] हें वन, सिंधुतीरपुलिन मनीं[6].' ५९
आज्ञापिले स्वशिष्य, स्वसुता नेत्रें पुसोनि पाठविली;
साश्रुमुनिजनीं[7], कण्वें शतवार तदीयभक्ति आठविली. ६०
दुष्यंतसद्मपद्मीं[8], ती स्त्रीश्री[9] कण्व[10]-भानुशिष्यकरीं
नेली पुत्रसुगंधासह[11], धर्मनयांबुपूर्णनगरसरीं[12]. ६१
पतिला म्हणे मुनिसुता, 'द्यावें पुत्रासि यौवराज्य नृपा!
स्मृति आहे कीं? पूर्वी केली जी काश्यपाश्रमांत कृपा.' ६२
राजा म्हणे, 'कवण तूं? कोणाचा पुत्र? काय गे! वदसी?
का[13] च स्मृतिरयि, तापसि! मैवं प्रलपात्र भूभुजःसदसि[13].' ६३
साध्वी म्हणे, 'अहो! नयधर्मज्ञ तुम्हीं नरेंद्र[14] पौरव[14] कीं?

१. 'तेंचि' या पदानें, तो शकुंतलेचा बालक जरी कण्वाची इतर कोणतीही आज्ञा मानी तरी 'सिंहव्याघ्रादि हिंस्रपशूंसीं धिटाई करूं नको' एवढीमात्र आज्ञा मानीत नसे, असें ध्वनित केलें आहे. २. चांगल्या वररूप जलाची वृष्टि. ३. मुनिरूप मेघ ४. राज्य (चालविण्यास) योग्य. ५. नको मानूं–**पंत.** ६. जरि [तुझ्या] मनीं हें वन [आणि] सिंधु तीरपुलिन=[मालिनी] नदीच्या कांठचें वाळवंट [येत असेल=तुला राहायला आवडत असेल तर]. ७. अश्रुपूर्ण नेत्र ज्यांचें अशा मुनींनीं. ८. दुष्यंताच्या गृहरूपी कमलामध्यें. ९. शकुंतलारूपी शोभाच. १०. कण्वरूपी सूर्याच्या शिष्यरूपी किरणांनीं. ११. शकुंतलापुत्ररूपी सुगंधासह. १२. धर्मनीतिरूप जलानें पूर्ण अशा नगररूप सरोवरामधील दुष्यंताच्या गृहरूप कमलामध्यें. १३. अयि तापसि! काच स्मृतिः? अत्र भुभुजः सदसि मा एवं प्रलप=हे तपस्विकन्ये! कसली आठवण? येथें राजदरबारांत असें बडबडूं नकोस. १४. थोर पूरुकुळांतील राजे.

वदतां असें कसें ? हो ! करितां विश्वासघात रौरव[1] कीं. ६४
मृगयेचिया प्रसंगें, हरिणामागें वनांत लागोनीं
आलासि मालिनीच्या तीरीं कण्वाश्रमासि भागोनि. ६५
सिद्धाश्रमांत[2] नव्हता तात; तुला म्यांचि पूजिलें वन्यें[3];
जागें काय करावें निपट[4] कपटनिद्रिता जना अन्यें ? ६६
मज्जन्मवृत्त पुसिलें त्वां; मग म्यां मेनकाप्सरा माय,
कौशिक बाप, असें तुज कथिलें; तें विसरलासि तूं काय ? ६७
सुतयौवराज्यवर[5] मज देउनि, गांधर्वविधि करूनि मला
वरुनि, 'न जाणें' म्हणसी; पूरुकुळीं तूंचि सुज्ञ साधु भला[6]. ६८
स्त्रीस म्हणति 'जाया'; सुतरूपें पति तदुदरांत[7] जन्मति; तें[8]
श्रुतिवचन तुज असावें ठावें, परि मान्य होय सन्मतितें. ६९
मीं जाया सत्कार्या[9]; आत्माचि[10] तुझा कुमार हा राया !
झाला प्राप्त, परि गळां न धरिसि अद्यापि रत्नहारा यां[11].' ७०
भूप म्हणे, 'भग्नव्रत[12] तात तुझा; मायही तुझी असती[13];
नसतीस तत्सुता तूं, लज्जा कांहीं तरी तुला असती. ७१
सा वर्षांचा म्हणसी; इतुक्यांतचि एव्हडा कसा गे ! हा ?
स्वीकारुनि तुज, लावूं डाग कसा मूढलोकसा गेहां[14] ?' ७२
साध्वी म्हणे 'मिळविलें ज्ञानतपःकीर्तिभाग्य मत्तातें[15],

---

१. रौरव नामक नरकवास. २. ईश्वरसाक्षात्कार झालेल्या मुनीच्या आश्रमाला 'सिद्धाश्रम' म्हणतात. ३. वनांतील फळपुष्पांनीं. ४. केवळ. ५. [तुझ्या] पुत्रास यौवराज्य देईन असा वर. ६. 'तुम्ही फार शहाणे आहां' यासारखाच हा प्रयोग आहे. ७. तिच्या (भार्येच्या) पोटांत. ८. "तज्जायाजाया भवति यदस्यां जायते पुनः" हें तें वचन होय. ९. सत्कार करण्यास योग्य. १०. [तुझा] जीवच. ("आत्मावैपुत्र नामासि" या श्रुतिवाक्यास अनुलक्षून हें वाक्य आहे). ११. या पुत्ररूप रत्नहारा. १२. [मेनकेनें] भग्न केलें आहे तपोव्रत ज्याचें तो. (विश्वामित्र). १३. व्यभिचारिणी. १४. घराला. (घराण्याला). १५. विश्वामित्रानें.

कैंचें तुझ्या कपाळीं नीचा! अतितुच्छभाग्यमत्ता[1]! तें? ७३
ती ब्रह्मयोनि[2] देवी मन्माता मेनका, सुरांस मता[3];
नीचा[4] तुझीच माता; करिल सुधेची कसी सुरा[5] समता? ७४
जन्हि मुख्यसत्यधर्मच्युत आपण, विश्वनिंद्य जन; नीचा!
निंदिसि कसें पदातें मत्ताताच्या मदीय जननीच्या? ७५
पौरव रौरवगौरवकर्ता[6], भर्ता भला मला गमसी;
समशीलबुद्धि होउनि, नीतीनें आजि बोलुं लाग मसी. ७६
बहुधा तुझें कपाळ न साहे सुतरत्नसन्निधानातें[7];
हतभाग्य न घे, देतां दाटुनि आणूनि, सन्निधानातें[8]. ७७
क्षितिपति मत्सुतचि असो, तेजांचा मूर्तिमंत हा निकर[9];
हा निकर[10] मांडला तूं; देसील कर[11] स्वकीर्तिहानिकर.' ७८
ऐसें वदोनि, जाया उठली तों जाहली नभोवाणी[12],
'दुष्यंता! काय करिसि? समजावीं आपुली सती राणी. ७९
त्वां हे विधिनें[13] वरिली; या साध्वीचें विशुद्ध जनु[14]; रागें[15]
पुर, राष्ट्र भस्म न करो; समजावीं सुतवतीस अनुरागें[16]. ८०
पुत्राचें भरण करीं; भाग्यें तुज लाधला, भर[17] तयातें;
म्हणतील आजिपासुनि भुवनीं जन सर्वही 'भरत' यातें.' ८१
स्वकुळपुरोहित, ऋत्विक्, मंत्री, आचार्य, साधु जे होते,
राजा म्हणे, 'परिशिलें?' म्हणती सारेहि एकदा 'हो' ते. ८२

---

१. [ज्ञानतपःकीर्तिभाग्याच्या मानानें] अतितुच्छ [अशा राज्यसंपदेच्या] भाग्यानें मत्त झालेल्या! २. ब्रह्मदेवापासून उत्पत्ति जीची अशी. ३. मान्य. ४. असती, व्यभिचारिणी. ५. मद्य. ६. रौरवनरकाचा गौरव (बहुमान) करणारा. ७. पुत्ररत्नाच्या सहवासाला. ८. उत्तम ठेव्यातें. ९. समूह. १०. अनर्थ. ११. राजग्राह्य द्रव्य. (कर). १२. आकाशवाणी. १३. यथाशास्त्र. १४. जन्म. १५. [ती आपल्या] क्रोधानें. १६. प्रेमानें. १७. पोषण–**पंत.**

'मत्सुत,[१] मद्दयिता[२] हें मीं जाणें; परि जनासि कळवाया
ऐसें निष्ठुर वदलों, तुमची शंका अशेष पळवाया.' ८३
कळवुनि असें समस्तां, हृदयीं सप्रेम बाष्पभर तातें
आलिंगिलें, गुरुसुहृत्सचिवानुमतेंकरूनि, भरतातें. ८४
कण्वसुतेसि म्हणे नृप, 'दयिते! साध्वि! क्षमा करीं; भीरु!
त्वत्क्षोभा भ्याला सति! हा जन,[३] बहु पावका जसा भी रू[४]. ८५
असकृत्[५] विरहद, तापद, परि मित्रीं[६] काय सुमुखि! भीरु! सति!
दयिते! नलिनी, न धरुनि चित्तीं स्वप्रेमभंगभी, रुसती. ८६
माझी कीर्ति, श्री तूं; बोलाया वचन कोरडें ज्या ये;
तत्कंठ काय दाटे? येऊं देऊं नको रडें ज्याये[७]! ८७
वदलों शुध्यर्थ असें; भीतों बहु मानसांत डागातें;
निंदिल हंस कसा मधुरस सेवुनि, मानसा[८] तडागातें?' ८८
स्त्री सुखउनि, दुष्यंतें गुरुसेवापुण्यकीर्तिलाभरत
युवराज पुत्र केला; कविनीं तो सुबहु कीर्तिला[९] भरत. ८९
दुष्यंत जधीं राजा,[१०] झाले रिपुनृप तधींच नक्षत्रें;
भरत तरि रवीच, परीं तें यश केलें कधींच न क्षत्रें[११]. ९०
कण्वें भरताकरवीं बहुदक्षिणयज्ञ कराविले शतशा;
याचा प्रताप मिरवि छवि[१२] पाताळींहि, न रवि लेश तशा. ९१
गोविततवाजिमेधीं[१३] ब्राह्मणपूजाद्यनंतलाभरतें[१४]
दिधल्या सहस्रपद्में[१५] कण्वाला धेनु दक्षिणा भरतें. ९२
केली कीर्ति शशिकुळीं भरतें, नाशूनि भूमिभार तता[१६];

---

१. [हा भरत] माझा मुलगा. २. [ही शकुंतला] माझी भार्या. ३. मी. ४. कापूस. ५. वारंवार. ६. सूर्याचे ठिकाणीं. ७. भार्ये! ८. मानससरोवरातें. ९. गाइला, वर्णिला. १०. राजारूपी चंद्र. ११. क्षत्रियानें. १२. कांति. १३. अश्वमेधयज्ञामध्यें अनेक प्रकार आहेत. त्यांपैकीं गोविततनामक एक प्रकार आहे. १४. ब्राह्मणपूजादि अनंत लाभांचे ठिकाणीं रत अशा. १५. एक हजार अशी पद्मसंख्या. १६. विस्तृता.

म्हणवूनि पौरवांचा ठायीं नांदे प्रसिद्ध भारतता. ९३
भरतसुत भुमन्यु नृपति, तत्पुत्र सुहोत्र तत्तनय हस्ती,
तत्तनुज तो विकुंठन, म्हणति सदा साधु, '[1]अस्तु ते स्वस्ति.'
नंदन विकुंठनाचा अजमीढ, जगत्पवित्र यत्स्मरण,
पुत्र चतुर्विंशतिशत त्याचे, कुळकर तयांत संवरण. ९५
संवरणाचा सुत कुरु, त्याचा नंदन विदूर मतिशाली[2],
त्याचा तनुज अनश्वा, स्त्री अमृता मागधी तया झाली. ९६
तत्पुत्र परीक्षिन्नृप, तन्नंदन भीमसेन भूमिपती,
त्याचा प्रतिश्रवा सुत, त्याचा तनुज प्रतीप शुद्धमती. ९७
अमृतें[3]-प्रतीपचरित प्राशावें श्रवण भरुनि आर्यांनीं[4].
गायील रामकरुणाघनभक्तमयूर[5] तेंचि आर्यांनीं[6]. ९८

अध्याय तेरावा.

इक्ष्वाकुवंशज महाभिष राजा सांगराजसूयशतें[7],
हयमेधसहस्रेंही[8] जोडी, दुर्लभ सुरांहि जें, यश तें. १
तो नृप झाला स्वर्गीं बहुमान्य सुरांसि, सुकृतें[9] साधूनीं,
ब्रह्मसभेंत बसविला होता तंत्रत्य[10] सर्व साधूनीं. २
विधिदर्शनार्थ गेली ब्रह्मसभेप्रति सरिद्वरा[11] गंगा,
तों तदुरोंचळ[12] उडउनि, मारुत[13] उघडें करी तिच्या अंगा. ३
सर्व अधोमुख झाले, पाहे नृप तो तसाचि गंगेतें,

---

१. तुझें कल्याण असो. २. बुद्धिमान्. ३. अमृतासारखें. ४. थोर लोकांनीं. ५. राम हाच दयामेघ, तत्सेवक मोर. (रामभक्त मोरोपंत कवि). ६. आर्या-छंदांनीं. ७. यथासांग केलेल्या शेंकडों राजसूय यज्ञांनीं. ८. अश्वमेधसहस्रांनेंही. ९. पुण्य. १०. तेथील—**पंत.** ११. नद्यांमध्यें श्रेष्ठ अशी. १२. तिच्या उरावरील पदर. १३. वारा.

जाणे द्रुहिण[1], महाभिषमन तद्रूपीं[2] क्षणार्ध रंगे, तें. ४
ब्रह्मा म्हणे, ‘ नृपा ! नरलोकीं जा, घे सुजन्म, थापटुनीं
भुज जिंकिलें न कोण्हीं ज्ञानासिविनाचि[3] मन्मथा[4] पटुनीं. ५
जाणोनि अहित केवळ, ज्या संत्यजिलेंचि विषयमद्य[5] जनीं,
ते साधु सत्यलोकीं राया ! होताति योग्य मद्यजनीं[6]. ६
भोगुनि विषय, विटोनि, स्वर्गतिला पावसील विषयमते !
राया ! कळो तुज अमृत अनुग्र, कीं विषय उग्र विष, यम ते.’
स्वमनीं म्हणे महाभिष, ‘आत्मा शुद्ध प्रतीपभूपाचा,
व्हावें तत्सुत, आश्रय योग्य पयोराशिचा[8] न कूपाचा[9].’ ८
परते तेथुनि गंगा, त्याचि नृपातें मनांत रेखूनीं;
मार्गीं पुसे वसूंतें[10] तद्वृत्त तयां सखेद देखूनी. ९
वसु म्हणाति, ‘वसिष्ठानें नमन न केलें म्हणोनियां, शाप
‘व्हा योनिसंभव’ असा दिधला; अत्यंत पावलों ताप. १०
तूं देवि ! मानुषी हो, आम्हां त्वत्कुक्षिमाजि जन्म हित,
अन्योदरवास[11] नसो, भगवति ! भवदुदरवास[12] सन्महित.’ ११
गंगा पुसे तयांला, ‘तुमचा होयील कोण हो ! कर्ता[13] ?’
वसु सांगति, ‘प्रतीपक्षितिपतिसुत शांतनु क्ष्माभर्ता[14].’ १२
गंगा म्हणे, ‘ करीन प्रिय तुमचें, त्याहि नृपतिचें इष्ट.’
धर्मयशस्कर जें जें कर्म स्वीकारितीच तें शिष्ट. १३
वसु म्हणती, ‘जो होइल, तो तो सुत निज जळांत बुडवावा,
त्वां क्षिप्रं[15] विप्रसत्तम[16]दत्तास्मच्छापताप उडवावा.’ १४

---

१. ब्रह्मदेव. २. अंग उघडें पडलेल्या त्या गंगेच्या रूपाचे ठिकाणीं. ३. ज्ञानरूप खड्गावांचून. ४. मदनाला. ५. विषयरूपी मद्य. ६. मत्+यजनीं=माझ्या पूजेविषयीं. ७. अ० १२ गीति ९७ पहा. ८. समुद्राचा ९. विहिरीचा. १०. अष्टवसूंतें. ११. कोणा दुसरीच्या पोटीं राहणें. १२. तुझ्या उदरीं राहणें. १३. [उत्पन्न] करणारा. १४. पृथ्वीपति. १५. लवकर. १६. ब्राह्मणश्रेष्ठानें (वसिष्ठमुनीनें) आम्हांला दिलेला शापरूप ताप.

स्व[1]ःसिंधु म्हणे, 'वसु हो! ऐसेंचि असो; परंतु मत्संगा
पावुनि, नृप न निवाला, या पात्र न अपयशासि हो गंगा.' १५
वसु म्हणति, 'सर्व देवूं स्वाष्टमतेजोंश[2] एक सुत राया,
होईल सेतु केवळ नष्टात्मजशोकसिंधु[3] उतराया.' १६
ऐसा निश्चय केला गंगाद्वारीं मग प्रतीपातें
पाहे गंगा देवी मूर्तिमती पूरुवंशदीपातें. १७
नृप जप करीत होता, तों त्याच्या ती हळूचि, निष्पंकी[4],
अतिरुचिरांगी[5] गंगा बसली जावूनि दक्षिणीं[6] अंकीं[7]. १८
तीतें 'कल्याणि! तुझें प्रिय काय करूं?' असें पुसे राजा,
गंगा म्हणे, 'करावा स्वीकार; त्याग न करिजे माजा.' १९
भूप म्हणे, 'हें न घडे; असवर्णा[8] तूं शुभांगि! परदारा[9].
मज ठावें, नरकाच्या जातोचि परांगनेच्छु[10] नर दारा.' २०
गंगा म्हणे, 'अनिंद्या, दिव्या मीं; मत्प्रसंग[11] न विटाळी.
भज मज; येतां असुलभ वस्तु करा, त्यासि कोण कवि टाळी?'
नृपति म्हणे, 'तरि म्हणतों, स्वकरा हा दिव्यलाभ, यावा मीं,
अंकीं[12] जरि कल्याणि! प्रथमचि तूं बैसतीस या वामीं[12]. २२
अंक स्नुषासुतांला[13] दक्षिण[14] योग्य; स्त्रियांसि वाम हित.
सोसून विलंबातें, हो सूनचि; पंथ[15] नव्हे नवा माहित[16].' २३
गंगा म्हणे, 'बहु बरें; तुमचा आत्मा कुमार जो भावी[17],
त्याच्या तरि वामांकीं हे सून यथाभिलाष[18] शोभावी. २४
पावेल पति सुगतिला, वर्तन असेंचि साधु[19] बहुधा मीं;
परि साधु, असाधु, किमपि न म्हणावें; हित करीन बहु धामीं.

---

१. स्वर्गनदी, गंगा. २. आपल्या तेजांचा आठवा अंश असा. ३. मृतमुलांविषयींचा शोकरूपी सागर. ४. निष्पाप अशा. ५. अतिशय सुंदर अंगाची. ६. उजव्या. ७. मांडीवर. ८ अन्य जातीची. ९. दुसऱ्याची बायको. १०. परस्त्रीची इच्छा करणारा. ११. माझा संबंध. १२. डाव्या मांडीवर. १३. मुलींना आणि सुनांना. १४. उजवें. १५. चाल, रीत. १६. मान्य. १७. पुढें होणारा. १८. [तुमच्या] इच्छेप्रमाणें. १९. चांगलें, बरें.

[1]म्हणतां 'अवश्य' झाली गुप्त सती [2]क्षिप्र ती; [3]परायास
प्राप्त्यर्थ न करितांचि स्वमुखें प्रार्थी प्रतीपरायास. २६
पुत्रार्थ यज्ञ केले; आर्जविले अमर, विप्र; [4]ती परते;
त्यापासूनि तपीं, स्त्रीसह, [5]कुळसारसरवि प्रतीप रते. २७
पोटासि महाभिष नृप आला, झाला कुमार बहु रुचिर;
बहु वृद्धपणीं फळला [6]विधि, करितां परम उग्र तप [7]सुचिर. २८
कुळ [8]शांत जाहलें, तें जन्मुनि विस्तारिलें, म्हणोनि सुता
'शांतनु' ऐसें ठेवी नृप नाव, यशें दुधाचिया हि [9]उता. २९
धन्य प्रतीप राजा; भासे जोडाचि शांतनु रवीतें;
होतें [10]शोकतम मनीं, कीं, झाला वंश शांत, नुरवी तें. ३०
सुत [11]यौवनस्थ होतां, [12]पूर्वकथा त्यासि भूप तो कानीं
सांगोनि, म्हणे, 'तैसी स्वप्नींहि न पाहिलीच लोकानीं. ३१
भेटेल तुला तनया! धन्य कराया स्वयेंचि ती [13]महिला;
मजपासीं [14]वर वरिला आहेचि; भजें तिला; दुज्या [15]महिला. ३२
जें ती करील, तें त्वां सर्व सहावेंचि; [16]रुक्ष न वदावें;
प्रेम तुटतांचि जाइल, [17]तेंचि करीं तीस नित्य नव [18]दांवें. ३३
हा [19]बाल्हीक अनुज, हें राज्य तुझें घे [20]करीं; करीं [21]अवन;
[22]भवन [23]हितें नव्हे आम्हां; हित कुरुकुळजांसि या [24]वयांत वन.'

---

१. प्रतीपानें गंगेच्या म्हणण्यावर 'अवश्य' असें म्हणतां. २. तत्काल. ३. अत्यंत श्रम. ४. गंगा—**पंत.** ५. कुलरूपी कमलाला [विकसित करणारा] सूर्यच असा. ६. दैव. ७. चिरकालपर्यंत. ८. नष्टप्राय. ९. तत्तस्य यशोति धवळमिति भावः—**पंत**=तीं त्याची कीर्ति अतिशय शुभ्र होती, असा भावार्थ. 'यशें दुधाच्त्रिया उताहि नाव ठेवी.' १०. शोकरूपी अंधकार. ११. वयांत आलेला. १२. गंगेसंबंधींची कथा. १३. स्त्री. (गंगा). १४. मी तुमची सून होईन असा वर. १५. पृथ्वीला. (पृथ्वी हीहि राजाची एक स्त्रीच होय). १६. कठोर. १७. तें प्रेमच. १८. गुरें बांधण्याची दोरी. (स्वाधीन ठेवण्याचें साधन असा भावार्थ). १९. देवापि, शंतनु व बाल्हीक हे प्रतीपाचे तीन पुत्र. २०. हातीं. २१. रक्षण. २२. घर. २३. हितकर. २४. वृद्धपणीं.

समजावुनि शांतनुला जाय, जसा ज्येष्ठपुत्र देवापी[1];
किति राज्य? दे तपस्या[2] सुख, अमृताचीहि तें[3] न दे वापी[4]. ३५
बहु महिमा शांतनुचा; स्पर्शे ज्या ज्यासि तो सकारुण्य[5],
त्या त्या जीर्णांसि पुन्हां तत्काळ प्राप्त होय तारुण्य. ३६
तो मृगयाशीळ नृपति एकाकी सुरसरित्तटीं[6] धन्वी
होता, तों एकांतीं तेणें दूरूनि देखिली तन्वी[7]. ३७
सेविति आमरण[8] सदा यतिपति, जे परम शांत, नुसतीतें[9]
निरुपम तनु[10] प्रकटितां कां हो! न भुलेल शांतनु सतीतें? ३८
नृपति म्हणे, 'तूं कोण त्रिभुवनसौंदर्यमूर्ति? रुचिरतमीं[11]
रूपीं लुब्ध, चकोरचि झालों त्वन्मुखसुधांशुरुचिरत[12] मीं. ३९
वद सुदति! या वनीं कां? मीं तों भूप प्रतीपसुत धन्वी
भ्रमतों असाचि मृगयाशीळ वनीं; सांग कोण तूं? तन्वि! ४०
वर मागतों तुला, तव शृंगारामृतरसांत मज्जाया[13];
दे दान हें उदारे! हो, होवुनि सुप्रसन्न, मज्जाया[14].' ४१
गंगा स्मित करुनि म्हणे, 'राया! होईन मीं तुझी भार्या;
परि विप्रिय न करावें, दूषुनि माझ्या शुभाशुभा[15] कार्या[15]. ४२
विप्रिय करितांचि नृपा! जाईन, असें रुचेल तरि, हें मीं
स्त्रीरत्न योग्य अंकीं बसवावें, जेंवि रत्नवर हेमीं[16].' ४३
तें मान्य करी राजा; तेव्हां दे त्यास दान वपु[17] राणी;
त्या त्यांत रस, जसा मन रसिका दे त्या सदा नव पुराणीं. ४४
झाले सुत आठ तिला; त्यांत उपजतांचि बुडविले सात;

---

१. प्रतीपाचा वडील पुत्र. (हा पूर्वीच राज्य सोडून तपोवनाला गेला होता). २. तपश्चर्या. ३. जें तपस्या सुख दे तें सुख. ४. विहीर. ५. सदय. ६. देवनदी गंगा, तिच्या तीरावर. ७. सुंदरी. ८. मरेपर्यंत. ९. केवळ प्रवाहरूप अशा गंगेतें. १०. शरीर. ११. अत्यंत सुंदर अशा रूपीं. १२. तुझ्या मुखचंद्राच्या कांतीचे ठायीं रममाण. १३. बुडाया. (स्नान कराया). १४. माझी बायको. १५. बऱ्या-वाईट कृत्याला. १६. सुवर्णामध्यें. (कोंदणामध्यें). १७. [आपलें] शरीर.

त्यागभयें नृप साहे, जन्हि संततिचा करी असा घात. ४५
सुत आठवाहि होतां, नृप पावे पुत्रशोककष्ट महा;
'न करीं कुळघात' म्हणे 'एक तरि असो कुमार अष्टम हा.४६
त्वां न सुत, पति बुडविला, झालों सुतशोकपावकीं[1] तप्त;
यासहि बुडविसि काय ? क्रूरे ! ते बुडविले जसे सप्त[2].' ४७
देवी म्हणे, 'नृपा ! तुज पुत्र प्रिय; मीं नव्हें प्रिया, युक्त[3];
हा सुत घे; जात्यें; त्वां विप्रिय केलें; न रक्षिलें उक्त[4]. ४८
विप्रिय करूनि माझें, त्वां मत्सहवाससमय संपविला.'
ऐसें वदोनि गंगादेवीनें तो नृपाळ कंपविला. ४९
मग कथिलें, 'मीं गंगा; सुत हे वसु; आपवें[5] दिला शाप.
केले विमुक्त, नाहीं केलें, त्वत्सुत वधूनि, म्यां पाप.' ५०
वसुशापाचें कारण पुसतां, गंगा म्हणे, 'असें झालें,
एका वसुच्या चित्तीं स्वस्त्रीचें दुष्ट बोलणें आलें. ५१
हरिली वसिष्ठमुनिची धेनु श्रीनंदिनी[6] स्वबळदर्पें[7],
मग शापिलें; डसावें पुच्छ तुडवितां पदें जसें सर्पें. ५२
'जन्मा मनुष्यलोकीं' ऐसा सर्वांसि शाप त्यांत नृपा !
'सत्वर सुटाल जन्मुनि,' असि केली, कवळितांचि पाय, कृपा.
जेणें केलें मुनिचें धेनुहरण, तो द्युसंज्ञ हा; याला
ऋषिचा वरप्रसाद, प्रणति करुनि विनवितां, असा झाला. ५४
राहेल हा द्युनामा नरलोकीं बहुत काळ; परि हार
होईल सज्जनांचा; प्रणतार्तीचा[8] करील परिहार[9]. ५५
शास्त्रनिपुण, धर्मात्मा, पितृभक्त, ब्रह्मचर्यपर, महित
होइल लोकीं, जोडुनि कीर्ति; कुळाचें करील परम हित. ५६
नेत्यें शिशुला; मग हा येईल; त्याजिल न वसु धामातें;

---

१. अग्नीमध्यें. २. सात. ३. योग्य. ४. [विप्रिय करणार नाहीं हें] वचन. ५. वसिष्ठ—**पंत.** ६. गाईचें नांव. (कामधेनूची मुलगी). ७. स्वसामर्थ्याच्या गर्वानें. ८. शरणागताच्या पीडेचा. ९. निवारण.

बहु भुलविला पति, म्हणुनि हे देवूं शाप न वसुधा[1] मातें.' ५७
दयिता गेल्यावरि, तो हास्तिनपुरनाथ शांतनु प्राज्य[2]
क्रतु[3]-दान-धर्म साधी; श्रीरामासारिखें करी राज्य. ५८
वेदानें कथिलीं तीं करि कर्मै, ब्राह्मणांसि दे दानें.
वर्षें छत्तीस नृपति कंठी गंगावियोगखेदानें. ५९
गंगातटासि मृगयाव्यासंगें जाय एकदा भूप.
तों स्तब्ध, अल्पहि दिसे तोय[4]; म्हणे, 'कां इचें असें रूप?' ६०
भूप म्हणे, 'जाणवला प्रियविरहक्लेशहेतु दुष्करसा.
गंगाहि मद्वियोगें झाली मत्तुल्य काय शुष्करसा[5]?' ६१
करुनि विचार पाहतां सर्वत्र, कुमार पटु[6] धनुष्पाणी[7]
दिसला; यत्कृतमार्गणसेतुस्तव[8] तें तसें दिसे पाणी. ६२
झाला अदृश्य सत्वर दिव्याकृति जेधवां कुमारमणी[9],
सुत आठवुनि नृपें ती विनविलि, जसि शंकरें उमा रमणी. ६३
दुर्लभ दर्शन, तनयहि द्याया, ती आपणासि तरुनि, करें
सुत धरुनि ये, जिचें यश गावें संतानकादितरुनिकरें[10]. ६४
आली निववायाला सहसा[11] देवी जसी नवसुधा हो!
दर्शन[12] होतांचि, दिसों सहसा दे, वीजसी न वसुधा हो! ६५
गंगा म्हणे, 'अहो जी! तुमचा हा पुत्र आठवा, याला
न्या स्वगृहीं, मज समयीं, यातें पाहूनि आठवायाला. ६६

---

१. पृथ्वी. (आपला पति राजा शांतनु हा या गंगेनें स्वतांच्या फार नादीं लावला, म्हणून पृथ्वीनें मला शाप देऊं नये, असें गंगा म्हणते.) २. पुष्कळ. ३. यज्ञ. ४. पाणी. ५. शुष्क (अल्प झालें) आहे पाणी जींचें अशी. ६. हुषार. ७. धनुष्य हातांत आहे असा. ८. ज्यानें (कुमारानें) केलेल्या बाणांच्या सेतूमुळें. ९. तो कुमारश्रेष्ठ. १०. संतानादिक कल्पवृक्षांच्या समुदायानें. ११. सस्मिता—**पंत.** १२. हो! दर्शन होतांचि सहसा वीजशी वसुधा दिसों न दे. (तिचें दर्शन होतांच विजेप्रमाणें एकाएकीं डोळे दिपून पृथ्वीहि दिसेनाशी झाली).

हा शिष्य वसिष्ठासीं, [1]भृगुरामासींहि सम, न वेदांत,
शास्त्रांत उणा, आधीं या आले वेद, मग नवे दांत. ६७
गुरुशुक्रनीतिशास्त्रीं पटु, [2]भटपति [3]शक्रसम, रवि खरा या
लाजेल कीं कुशळ हा, बहु [4]शरकर, करुनि [5]समर [6]विखराया.
म्यां 'देवव्रत' ऐसें याचें [7]अन्वर्थ ठेविलें नाम.
ने पुत्ररत्न, शोभो येणें कुळदीपकें तुझें धाम.' ६९
देवुनि सुतरत्न करीं, घेउनि [8]पतिचित्तवित्त ती गेली.
नेत्रोदकें तिघांच्या गंगा गंगातटीं [9]नवी केली. ७०
पुत्रासि पुरीं नेवुनि, शांतनु दे यौवराज्यपद त्यातें.
[10]सामात्य पौर झाले वश त्या [11]प्रियपथ्यसत्यवदत्यातें. ७१
[12]सत्पुत्रें सर्व [13]भर स्वशिरीं घेतां, [14]प्रतीपसुत हर्षें
नेता झाला घटिका च्यार तसीं च्यार त्याउपरि वर्षें. ७२
यमुनातीरवनीं तो गेला होता सुभूषित, [15]सुवासा;
तेथें नृपासि मारुत भेटे [16]न्हावूनि, आणुनि [17]सुवासा. ७३
सत्यवतीनिकट नृपा नेलें गंधें [18]तदंगसंभूतें,
जैसें तपोयशें मन वेधूनि उमासमीप शंभूतें. ७४
[19]चेतोहरगंधाढ्या ती म्हणतों [20]दिव्य [21]पद्मकळिका [22]मीं;
घेउनि सुवास धांवत गेला [23]जो रसिक तोहि अळि [24]कामीं. ७५
यमुनातीरीं कन्या सत्यवती सुतनु देखिली भूपें.

---

१. भार्गवराम जो परशुराम त्यांशीं. २. योद्ध्यांचा अग्रणी. ३. इन्द्रासारखा. ४. बाणरूपी किरण. ५. युद्ध. ६. पसरण्यास. ७. यथार्थ. ८. पतीचें चित्तरूप द्रव्य. ९. नवी गंगानदी. १०. प्रधानांसह. ११. मधुर, हितकर आणि खरें बोलणाऱ्या देवव्रताला. १२. देवव्रतानें. १३. राज्याचा भार. १४. शंतनु. १५. चांगलें वस्त्र धारण केलेला. १६. सजल होऊन. (ज्यामध्यें बारीक बारीक जलतुषार मिश्र आहेत असा वारा). १७. सुगंधाला. १८. तिच्या अंगापासून उत्पन्न झालेल्या. १९. मनोहर सुवासानें पूर्ण अशी. २०. स्वर्गीय. २१. कमलकलिका. २२. मी कवि मोरोपंत. २३. जो वारा. २४. मदनाविषयीं.

गमली ती भूमिगता[1] साक्षाद्देवीच अद्भुतें रूपें. ७६
पुसतां सांगे कन्यारत्न न वदवे त्रपाभरें[2] तरि तें;
'धर्मार्थ वाहत्यें पितृवचनें[3], मीं दाशपतिसुता[4] तारितें[5].' ७७
चित्तीं म्हणे नृप, 'अहा! चवरीची झाडणीच[6] कीं केली!
मोळिविक्यानें काष्ठें फोडाया असिलता[7] वना नेली!' ७८
भरली मनांत नवरी, मागाया दाशपतिकडे गेला,
मग त्यास स्वमनींचा अर्थ श्रुत आपुल्या मुखें केला. ७९
दाशपति म्हणे, 'आहें जातीनें मीं, नव्हें नवा[8], हीन.
द्यायाचीच सुता, वररत्नपदीं[9] तीस कां न वाहीन? ८०
परि आहे मच्चित्तीं, तो राया! एक कांम[10] पुरवा हो!
[11]सद्वरलाभसुखामृतपूरीं माझें प्रकाम[12] पुर वाहो.' ८१
'वद काम, देयें[13] देवूं,' भूप म्हणे; दाशपति वदे वाचा,
'तुजमागें नृप हो, जो होईल इला कुमार देवांचा[14].' ८२
[15]स्मरहत जरि नृप निर्मळ जें मेळविलें मळों न दे यश तें;
गेला पुरासि; कीं तो न सुता देइल वळोन देयशतें[16]. ८३
[17]भूप म्हणे, 'हा[18] करितो युग, न धरुनि भीड, काम यामातें[19].
सुखवील तीचें[20] मात्रा, नाशुनि हृत्पीडकामया[21], मातें.' ८४

---

१. पृथ्वीवर अवतरलेली. २. लज्जातिशयानें. ३. बापाच्या सांगण्यावरून. ४. कोळ्याच्या राजाची मुलगी. ५. नौकेतें. ६. केरसुणी. ७. तलवार. ८. मी जातीनें नवीन हीन (हलक्या दर्जाचा) झालों आहे असें नव्हे; तर माझें कुलच हीन आहे. ९. उत्तम नवऱ्याचे पायावर. १०. इच्छा. ११. चांगला जांवई लाभल्यानें होणाऱ्या सुखरूप अमृताच्या पुरामध्यें. १२. पुष्कळ. १३. देण्यास योग्य असेल तें. १४. नृपाचा—**पंत.** (तुझा). १५. कामार्त. १६. शेंकडों देणग्यांनीं. १७. हें शंतनूचें स्वगतभाषण आहे. १८. हा काम यामातें (प्रहरातें) युग करितो: ('घटकेचा प्रहर होणें' यासारखाच हा प्रयोग आहे). १९. प्रहर—**पंत.** २०. ती सत्यवतीरूप मात्राच. २१. हृदयाला पीडा करणाऱ्या रोगास.

गांगेय[१] पित्यासि पुसे, ‘दिसतां कृश, हरिण[२]; काय हो तात!
कारण? चिंतारोगें जन ऐसे क्षीणकाय[३] होतात. ८५
चिंता काय तया तुज, धरुनि शिरीं सर्व भूप पादरज्या,[४]
भावें उपासिती, सुर शक्रासि तसे, सदैव सादर ज्या. ८६
व्याधि कळों द्या; त्याची क्षिप्र करीन प्रतिक्रिया[५] देवा!
अस्वस्थ सर्व झाले, तुमची, स्वर्वल्लि,[६] ज्यां जनां, सेवा.’ ८७
राय म्हणे, काय वदों? वत्सा! देवव्रता! तुज पहातों
तेव्हांचि पावतों तट[७]; चिंतापूरीं[८] सदैव हि वहातों. ८८
एक अपत्य जया, तो अनपत्यचि; त्यांत नित्य तूं शस्त्री[९];
लोकींहि[१०] अनित्य[११] वाटे; करिजे रक्षावया स्ववंश स्त्री. ८९
जें पूर्वजीं मिळविलें, करिशिल वाढवुनि तूं जतन यश तें.
तूं स्वसमचि बा! घ्यावें कुशळें एका हि तूज तनयशतें[१२]. ९०
काळप्रवाह दारुण; नेणों होईल चळन सेतूतें[१३];
हें दुःखाचें कारण गांगेया! पाठिबळ नसे तूतें.’ ९१
पितृवचन श्रवण करुनि, देवव्रत पितृसखा अमात्यातें
गुरुचिंताहेतु[१४] पुसे; तो सांगे सर्व सत्तमा त्या तें. ९२
वृद्धामात्यें कथितां, तातप्रिय[१५] दाशपतिकडे तूर्ण
सार्य[१६] नदीसुत गेला, कार्य पित्याचें करावया पूर्ण. ९३
लंघी,[१७] जेंवि गयेच्या, बुध,[१८] तो गुरुचित्तरंजनाश,[१९] पथा.
दाशेवरोक्त[२०] शिरीं घे; करि तत्संदेहभंजना[२१] शपथा. ९४

१. गंगापुत्र. (भीष्म). २. पांडुरवर्ण, फिकट. ३. कृश शरीराचे. ४. पायाच्या धुळीला. ५. उपचार. ६. कल्पलता. ७. तीर. ८. काळजी हाच पूर, त्यांत. ९. शस्त्रधारी. १०. इहलोक. ११. नाशवंत. १२. शेंकडों पुत्र मोबदला देऊन. १३. पूल, बांध. १४. बापाच्या काळजीचें कारण. १५. पितृभक्त. १६. अमात्यादिक श्रेष्ठजनांसह. १७. अतिक्रमण करी. १८. सुज्ञजन. १९. पित्याचें मनोरंजन व्हावें असें इच्छिणारा. २०. दाशपतीचें जें म्हणणें होतें तें शिरसामान्य करी. २१. त्याचा संशय घालविण्यासाठीं.

पुनरपि दाशपति म्हणे, '[1]त्वदपत्याचें परंतु भय वाटे;
कीं राज्यलोभ दारुण; [2]या ग्रीष्मीं [3]स्नेहनीतिनद आटे.' ९५
गांगेय म्हणे, 'त्यजिला स्त्रीसंग;' [4]सशंक दाशवर ज्यांत;
'अनृत वदेन तरि गळो हें, न [5]रणमखीं कदा, [6]शव [7]रज्यांत.' ९६
करितां असी प्रतिज्ञा, दशपति म्हणे, 'दिली [8]सुता [9]साधो!
या धर्मैं त्वच्चिंतित सर्वहि [10]पितृभक्तसंस्तुता! [11]साधो.' ९७
त्या समयीं ऋषिसुरगण करुनि कुसुमवृष्टि म्हणाति, 'हा [12]भीष्मः
हा [13]विषयवासनासरिदंतकतेजाचि केवळ ग्रीष्म.' ९८
तो सत्यवतीस म्हणे, 'चालः असो [14]ताताचित्त [15]महि, माते!
वर्णिति पहा नभीं ऋषिदेव तुझा अतुळभाग्यमहिमा ते.' ९९
दिधली सुदुर्लभा त्या सत्पुत्रें त्या पित्यासि सत्यवती.
'[16]स्वच्छंदमृत्यु हो' असि [17]आशी तातेंहि त्यासि [18]सत्यवती. १००

अध्याय चवदावा.

सत्यवतीसुत पहिला चित्रांगद, जेंवि [19]रात्रिकांत नवा,
सुखकर; दुसरा झाला, त्या नाम विचित्रवीर्य [20]शांतनवा. १
शंतनुनृप भीष्माच्या हातीं तें [21]पुत्रयुग्म दे हातें
[22]गेहातें देवांच्या जातां, [23]काळाचिया स्वदेहातें. २

१. तुझ्या [भावी] मुलाचें. २. या राज्यलोभरूप उन्हाळ्यांत. ३. प्रीति आणि नीति हाच कोणी नद. ४. संशययुक्त. ५. रणयज्ञामध्यें. ६. प्रेत, शरीर. ७. धुळींत. ८. मुलगी. ९. हे सत्पुरुषा! १०. पितृभक्तांमध्यें प्रशंसनीय अशा! ११. साध्य होवो. १२. भयंकर. १३. विषयवासनारूप नदीचा नाश करणारें आहे तेज ज्याचें असा. १४. बापाचें चित्त. १५. सोत्सव—**पंत.** (मह=उत्सव, त्यानें युक्त तें महि). १६. स्वतांच्या इच्छेस वाटेल तेव्हां मरण पावणारा. १७. आशीर्वाद. १८. खरी. १९. निशापति. (चंद्र). २०. शंतनूचा मुलगा. २१. पुत्रद्वय. २२. गृहातें. (स्वर्गास). २३. मृत्यूच्या [हातीं] स्वदेहातें. [दे].

भीष्में राजा केला चित्रांगद; तो अतीव अभिमानी.
काय कथा मनुजांची? असुरांसि, दिवौकसांसि[1]हि न मानी. ३
त्यातें, गंधर्वाधिप चित्रांगद कपटपाटवें[2] भारी,
तीरीं सरस्वतीच्या, वर्षत्रय युद्ध करुनियां मारी. ४
शांतनवें मातृमतें विधिनें देवूनि पितृपद भ्रात्या
बाळा विचित्रवीर्या, दिधली नयशक्ति[3]ही अदभ्रा[4] त्या. ५
होतां विवाहदीक्षायोग्य भ्राता, नदीज तो कानीं
काशिपसुतास्वयंवर[5] परिसे, कथितां स्वदूत लोकानीं. ६
वाराणसीस जावुनि, काशिपतिसुता तिघीहि भीष्म हरी.
कन्यार्थि[6], युयुत्सु[7], समरनिपुण[8], नृपतिकुंजरांत[9] होय हरी[10]. ७
बहु भूप भग्न केले परि मागें शाल्व लागला एक.
जाणों महोरगावरि[11] गेला धावोनि मातला[12] भेकें[13]. ८
तो विरथ[14] मात्र केला आवरिला घातकाम[15] हात रणीं;
तेजाचि खद्योताचें[16] हरिल, करिल घात कां महातरणी[17]? ९
भगिनी[18] सुतासुनाशा[19] त्या नेल्या निजगृहासि शांतनवें.
त्याचें जन्मापासुनि सदय विमळ चित्त; न प्रशांत नवें. १०
लग्नोपक्रमसमयीं[20] ज्येष्ठा अंबा म्हणे, 'मला न वरा;
नवराजीवाक्ष[21]हि हा नलगे; मज शाल्व मानला नवरा. ११
माझा मज्जनकाचा, शाल्वाचाही विचार हा; निकर[22]

---

१. देवांस. (स्वर्ग हेंच ज्यांचें स्थान असे). २. भारी (अत्यंत) कपटपटुत्वानें. ३. राजनीतिज्ञान. ४. पुष्कळ. ५. काशिराजाच्या कन्यांचें स्वयंवर. ६. कन्या इच्छिणारा. ७. युद्ध करूं इच्छिणारा. ८. युद्धकुशल. ९. [अन्य] राजे हेच कोणी हत्ती त्यांमध्यें. १०. सिंह. ११. मोठ्या सर्पावर. १२. माजलेला. १३. बेडूक. १४. रथरहित. १५. ठार मारण्याची इच्छा असलेला. १६. काजव्याचें. १७. सूर्य. १८. त्या बहिणीबहिणी. (काशिराजाच्या तिघी मुली). १९. मुली किंवा सुनांप्रमाणें. २०. विवाहारंभाचे वेळीं. २१. नूतन कमलासारिखे नयन ज्याचे असा. २२. समूह.

क्षत[1] मन्मनोरथांचा करितां, हें कर्म धर्महानिकर.' १२
पाठविली माघारी अंबा; कथिलें तसेंचि साधूनीं;
बंधूसि[2] अंबिकेसह दिधली अंबालिकाहि साधूनीं. १३
नृप[3] कामात्मा[4] झाला; लावण्य, प्रेम अतुळ दोघींचें;
वाहे शृंगाररसीं तन्मानस, जेंवि पुष्प ओघींचें[5]. १४
स्त्रीविषय सातवर्षें रात्रिंदिव भोगितां न तो धाला[6].
झाला वश कामाच्या अहिता; न हिता स्वकीय बोधाला. १५
देहज[7] यक्ष्मा[8] त्याला खाय, जसा आश्रयाश[9] आहुतिला.
जो राजकांति[10] होती, लेशहि नुरवीच रोगराहु तिला. १६
न चुकेचि भावि; चुकतें तरि, मृत्यु न व्हावयास काम[11] रण
करिताचि भीष्म; येतें मग त्या मध्यमवयास कां मरण? १७
सत्यवती साश्रु म्हणे, 'गेला टाकुनि सकाय[12] गेहा[12] हा;
लोकांत मंदभाग्या मींच; करूं यत्न काय? गे! हा! हा!' १८
चिंताशोकव्याकुळ भीष्महि मुकला क्षण स्वभावाला;
करवूनि पारलौकिक, करि सद्गति समुचित स्वभावाला[13]. १९

अध्याय पंधरावा.

दीना होउनि देवी सत्यवती पुत्रशोकतापानें,
भीष्मासि म्हणे, 'साधो! रक्षावें कुळ तुवां अपापानें[14]. १
धर्में त्वन्माता मीं, धर्मज्ञा! धर्मसेतु[15] रक्षाया
कथित्यें, तें मान्य करीं, स्वीकारीं स्त्री स्वधर्मदक्षा यां[16]. २

---

१. नष्ट. २. विचित्रवीर्यास. ३. राजा विचित्रवीर्य. ४. मदनाधीन. ५. प्रवाहांतील. ६. तृप्त झाला. ७. शरीरांत उत्पन्न झालेला. ८. क्षयरोग. ९. अग्नि—**पंत.** १०. राजाचें (पक्षीं) चंद्राचें तेज. ११. यथेच्छ. १२. देहासहवर्तमान गेहा=घराला. १३. आपल्या बंधूस. (विचित्रवीर्यास). १४. निष्पाप अशा तुवां. १५. धर्ममर्यादा. १६. या अंबा व अंबालिका.

मीं गुरु[1], मदुक्तिनें या स्त्रीस्वीकारीं तुला नसे पाप.
आपद्धर्म[2] असे हा बा! पद गुरुचें वरीं, हरीं ताप. ३
स्वजनां हो तृप्ति तुझ्या ठायीं, जैसी शिलीमुखां[3] बकुळीं.
कुरुकुळगृह न खचावें; याला आधार तूंचि खांब कुळीं.' ४
भीष्म म्हणे, 'माते! त्वां धर्मचि कथिला, परि प्रतिज्ञा ते
अत्याज्य[4]. भिती सत्यभ्रंशासि, न बहु अरिप्रति ज्ञाते. ५
म्यां ब्रह्मचर्यसुव्रतनियम[5] स्वमुखें त्वदर्थ जो केला,
देह त्याज्य, परि न तो त्याज्य; न सेवील सुज्ञ ओकेला[6]. ६
त्यजितील पंचभूतें[7] स्वगुणांसि[7], रवि छवीस[8] सोडील,
शीतत्वातें चंद्रहि, शक्रहि कर विक्रमासि जोडील; ७
उष्णत्व त्यजिल दहन, मर्यादेतेंहि सिंधु[9] मोडील,
धर्मपर धर्मराजहि सद्धर्मप्रीतिलाहि तोडील; ८
परि हा शांतनव, तुझा सुत, केवळ कृपण मान, सत्य जितां[10],
मेल्याहि न टाकील, प्राणांसि न भीतमानस त्यजितां.' ९
देवी म्हणे, 'खरें हें; सांगाया योग्य होय मीं; नातें
गंगेचें माझें सम; जाणें तुज सत्य-तोय-मीनातें.' १०
भीष्म म्हणे, 'मज न शिवे सत्यभ्रष्टत्व, वंश यश राहे,
ऐसा विचार[11], शिष्टश्रुतिमान्य, विचारिसील तारे आहे. ११
पूर्वी पितृवधकुपितें[12] रामें[13] स्वीकारुनि स्वगुरुकेली[14],
वधुनि सहस्रभुजार्जुन[15], असकृन्निःक्षत्रिया धरा केली. १२
क्षत्रियवंश बुडविले; वधिले जे जे प्रसिद्ध योध रणीं;

---

१. वडील. २. संकटकाळचा धर्म. ३. भ्रमरांस. ४. सोडण्यास अयोग्य. ५. ब्रह्मचर्य ह्याच उत्तम व्रताचा नियम. ६. वांतिला. ७. पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश हीं पंचमहाभूतें, आणि त्यांचे गुण, अनुक्रमें गंध, रस, रूप, स्पर्श व शब्द. ८. कांतीस. ९. समुद्र. १०. जिवंत असतां. ११. पाठांतर—**उपाय**. १२. बाप जो भृगु त्याच्या वधानें रागावलेल्या. १३. परशुरामानें. १४. आपला गुरु जो शंकर त्याची (संहार करण्याची) क्रीडा. १५. एक हजार बाहु ज्यास असा अर्जुन. (कार्तवीर्य).

पोटीं[1] शिशु हि नुरविले; राम म्हणे, 'क्षत्रहीन हो धरणी.' १३
संतानार्थ शरण मग विप्रांसि क्षत्रियस्त्रिया गेल्या.
ज्या केवळचि बुडाल्या संतति, त्या प्रकट मागतीं[2] केल्या. १४
गुरुशप्त[3] उतथ्याचा[4] सुत, ममताकुक्षिजात,[5] दीर्घतमा[6]
होता प्रकाशमैथुनदोषी,[7] परि आश्रय श्रुतोपशमा.[8] १५
स्त्रीपुत्रानीं तो ऋषि, त्या दोषें, जान्हवींत[9] वाहविला;
संतानार्थ बळिनृपें प्रार्थुनि तो निजगृहांत राहविला. १६
त्यापासूनि सुदेष्णाराज्ञीला पुत्र जाहला अंग,
दुसरा कलिंग, पुंड्रहि, सुह्महि, तैसाचि पांचवा वंग. १७
ऐसा आपद्धर्मव्यवहार असे; म्हणोनियां क्षिप्र
कोणहीं विचित्रवीर्यक्षेत्रीं[10] संतान वाढवू विप्र.' १८
देवी[11] म्हणे, 'हित वदसि तूं बा! सद्बुद्धिच्या अंगारा![12] या
माझ्याहि हितगुजाचें श्रवण करीं सज्जना! अगा! राया!' १९
लज्जा वदों न दे, परि चिंतिति ज्याचे पवित्र पाय कवी,
श्रीमत्पराशराची पुण्यकथा स्वानुभूत[13] आर्यकवी. २०
व्यासजनन कथुनि, म्हणे, 'प्रदक्षिणा पुत्र मज करी नमुनीं.
जातां[14] वदे असें कीं, 'स्मरतां येउनि, सुखी करीन,' मुनी. २१
येइल तुझ्या मना, तरि त्याला या संकटांत बाहेन.[15]

---

१. पोटांमध्येंहि. (गर्भांमध्येंहि). २. मागाहून. ३. बृहस्पतीनें शापलेला. ४. उतथ्य हा बृहस्पतीचा बंधु; त्याचा. ५. उतथ्याच्या ममतानामक स्त्रीच्या कुशीपासून झालेला. ६. उतथ्याच्या पुत्राचें नांव. ७. उघड्या स्थळीं मैथुन करण्यामुळें दोषी. ८. शास्त्र व उपशम (शांती) यांला. ९. गंगेंत. १०. विचित्रवीर्याची पत्नी अंबालिका, तिचे ठायीं. ११. सत्यवती. १२. घरा. १३. स्वतः अनुभवलेली. १४. पाठांतर—**जातां वदला, 'स्मरतां संकट नाशुनि सुखी करीन,' मुनी.** १५. हांक मारीन.

संततिचिंताशमन[1] प्रार्थुनि त्या मुनिवरासि पाहेन.' २२
भीष्म वदे, पडतां तें कानीं, ' नमुनि वरदास, विश्वास[2]
ध्याया, स्मर; रक्षिल तो कानीन[3] मुनिवर दासविश्वास[4].' २३
स्मरतांचि, दर्शन दिलें मातेला ईश्वरें पराशरजें[5],
वाहति माथां, ज्याच्या चरणांचीं, शुद्धधी पराश[6] रजें[7]. २४
येतांचि, धांवला[8] हो! पाहत होताचि वाट पान्हा, तो.
जाणों म्हणति मिथः[9] स्तनदृष्टि क्षीरें न आटपा न्हातो.' २५
सिंपुनि कमंडलुजळें मग, आधीं दर्शनेंचि, निववीली.
शोकवियोगदवार्ता[10] त्या अमृतघनें पळांत जिववीली[11]. २६
माता पूजुनि सुखवी पुत्रातें, नमुनि तोहि मातेतें.
विश्व पदरजीं लोळे, परि तिळमात्रहि न तेज मातें[12] तें. २७
मातेसि पुसे इच्छावरद श्रीव्यास भक्तसंतान[13].
मागे[14] विचित्रवीर्यक्षेत्रीं कुरुकुळशिवार्थ[15] संतान. २८
'ताताकडील भीष्म, व्यासा! मातेकडील तूं शिष्ट;
मृतबंधुचें करावें धर्मार्थ तुम्हीं असेल जें इष्ट. २९
असतां समर्थ तूं सुरतरुगुरुवरचरणरेणु[16] देवर[17], 'हां[18]!'
या त्वत्प्रजावतीनीं[19] न म्हणावें, स्वजननीस दे वर हा.' ३०

---

१. संतति कशी होईल या काळजीचें निवारण [करण्याविषयीं]. २. जगाला तृप्त कराया. ३. कन्यावस्थेंत झालेला मुलगा. (व्यास). ४. भक्तांस विश्वासभूत असा. ५. ईश्वरावतारी पराशरपुत्र व्यासानें. ६ परपदार्चा आशा धरणारें. ७. रजःकण, धूलि. ८. तो पान्हा धांवला=स्तनांतून दूध अतिशय जोरानें वाहूं लागलें. ९. व्यास नमस्कार करीत असतां स्तन आणि दृष्टि मिथः (परस्पर) म्हणतात कीं, क्षीरें (स्तनपक्षीं दूध व दृष्टिपक्षीं अश्रु) न आटपा; [कारण,] व्यास न्हातो आहे. १०. शोक आणि वियोग हाच वनाग्नि (वणवा) त्यानें पीडित. ११. जगविली. १२. उन्मत्त होई. १३. भक्त-[काम]-कल्पद्रुम. १४. माता मागे. १५. कल्याणाकरितां. १६. कल्पवृक्षाचा मुख्य गुरु आहे चरणधूलि ज्याची. १७. दीर. १८. हाय! हाय! १९. तुझ्या भावजयांनीं.

व्यास म्हणे, 'धर्मज्ञे! माते! आज्ञा तुझी शिरोधार्या[1].
सांगेन तें करूं दे व्रत, वर्षभरि त्वदात्मभूभार्या[2].' ३१
काली[3] म्हणे, 'अहा! बा! होईल अराजक[4], प्रजालोप.
आर्तमनासि[5] महाश्रय अभ्रततरूचें लहानही रोप. ३२
कौसल्या[6] गर्भातें पावो आतांचि; बा! विलंब कसा
साहों? अधर्म[7] टपतो लोकां, मीनां गिळावया बकसा.' ३३
व्यास म्हणे, 'माते! तरि कौसल्या मद्विरूपता[8] साहो.
माझी करू प्रतिक्षा, ऋतुकाळीं सुव्रता, सुवासा[9] हो.' ३४
ऐसें सांगोनि, श्रीसत्यवतीच्या पदांबुजां नमुनी,
तो योगिवेष ईश्वर झाला अंतर्हित[10] क्षणांत मुनी. ३५
सांगे सुनेसि देवी, 'कुरुकुळ तारावयास भाव्यासीं[11]
बोल, रम सुतार्थ, जसी रमत्ये बोधार्थ सत्सभा, व्यासीं.' ३६
झालीच मनें प्रांजलि ती पुत्रास प्रसू[12]; न शयनातें
मोडिति करूनि अंजलि नेतां सून प्रसूनशयनातें[13]. ३७
सासूनें शुचिशयनीं सून निजविली धरूनि हनु. कंपा
पावे, चिंती[14] भीष्मा; ये मुनिहि करावयासि अनुकंपा[15]. ३८
मुनिवररवि[16]च्या उदयीं ती कैरविणी[17]च अंबिका झाली.
अत्युग्र रूप पाहुनि, झांकी तत्काळ लोचनें, भ्याली. ३९
त्या साध्वीवरि करुणा केल्यावरि, सूनु[18]ला पुसे माता,
'होईल पुत्र कैसा? सांग मला, सर्व जाणसी ताता[19]!' ४०

१. शिरसावंद्य. २. तुझ्या मुलाची बायको. ३. सत्यवती. ४. राजरहित. ५. दुःखित मनास. ६. कौसलदेशच्या राजाची मुलगी (अंबिका). ७. अराजकता रूपी अधर्म. (प्रजेचा नियामक राजा नसेल तर प्रजेमध्यें अधर्म हा फार बळावतो.) ८. माझें विलक्षण रूप. ९. उत्तम वस्त्रें धारण केलेली अशी. १०. गुप्त. ११. दिराशीं. १२. प्रसवणारी. (माता). १३. पुष्पशय्येप्रत. १४. चिंतन करी. (भीष्माचें स्मरण करूं लागली). १५. दया. १६. मुनिश्रेष्ठ व्यास हाच कोणी सूर्य त्याच्या. १७. कमलिनी. १८. पुत्राला. (व्यासाला). १९. बाळा!

व्यास म्हणे, 'होइल सुत नागायुतबळ,[1] सभाग्य, विदितनय,[2]
राजर्षि, साधुसत्कृत; त्यासहि होतील शत बळी तनय; ४१
परि मातेच्या दोषें[3] होइल जात्यंध,[4] एव्हडेंचि उणें.
चंद्रीं अंक तसें हें; परिपूर्ण परंतु सर्वसाधुगुणें.' ४२
माय म्हणे, 'माझें मन, जाणुनि होणार नृप अचक्षु,[6] भितें;
योग्य दुजा सुत द्यावा; लंघावें त्वां न हें वच क्षुभितें.'[7] ४३
मान्य करुनि मुनि गेला; अंधचि सुत अंबिकेसि मग झाला.
'धृतराष्ट्र' असें भीष्में संस्कारुनि नाम ठेविलें त्याला. ४४
अंबालिकेसिही मग विनवी, गेला म्हणोनि सुतपा[8] 'हूं.'
'त्वांहि न भ्यावें; सिंहासनगत बाई! तुझाचि सुत पाहूं.' ४५
तीही भ्याली मुनिला; झाली पांडु[9] क्षणांत; कातरता[10]
स्त्रीगुणचि; असो दोष; न पुरुषहि त्या भीतिदायका तरता. ४६
कृष्ण[11] म्हणे, 'म्यां दिधला संप्रति[12] सुंदरि! कुमार तुजला जो,
तद्वर्ण पांडु, नामहि; वरकर्पूरप्रसूहि[13] तुज लाजो.' ४७
तेंही, पुसतां, कथिलें पांडुत्व; म्हणूनि धरुनियां हनुतें,
माय म्हणे, 'वा! तिसरा द्यावा त्वां कल्पतरुसमूहनुतें.'[14] ४८
लाजे, हांसे, पाहे पायांचिकडे प्रसन्नवदन मुनी.
'अंब![15] श्रुतिराज्ञा ते,' ऐसें बोलोनि जाय पद नमुनी. ४९
झाला पांडु; तयावरि पहिलीला वासवी[16] तदेव[17] पुन्हां

---

१. दहा हजार हत्तींचें बळ. २. माहीत आहे नीति ज्यास असा. ३. संभोगसमयीं त्या पुत्राच्या आईनें डोळे झांकले होते ह्या दोषामुळें. ४. जन्मांध. ५. डाग, लांछन. ६. नेत्ररहित. (अंध). ७. क्रोधिष्ठानें. (रागावून). ८. सुतपा (तो तपस्वी व्यास) हूं (होय) म्हणोनि गेला, [म्हणून सत्यवती] मग अंबालिकेसही विनवी [कीं]. ९. फिकट. १०. भित्रेपणा. ११. व्यासाचें एक नांव. १२. आतां. १३. उत्तम कापराला प्रसवणारी रंभा. (केळीचें झाड). पाठांतर—**शुचिकर्पूरप्रसूहि.** १४. कल्पवृक्षाच्या समूहानें स्तविलेल्या अशा त्वां. १५. माते! तुझी आज्ञा म्हणजे साक्षात् वेदवाक्यच आहे. १६. [वसुपुत्री] सत्यवती—**पंत.** १७. तेंच.

सांगे, 'आजि मुनिकडे जा, येईल[1], उदित[2] होउ दे वपु, न्हा.' ५०
तें सांगे दासीला आपण चित्तांत फार भीडस ती;
व्यांळीसीच[3] गमे मुनितनु; रक्षी सासुचीहि भीड सती. ५१
त्या प्रभुला ठकवि असें कोण्हीहि न कर्म ठक; विनटलीला[4]
तारावया भजे, हो! भुलला न सुकर्मठ कवि नटलीला[5]. ५२
व्हाया प्रसन्न जोडुनि सजलोत्थितरोम[6] हात, 'पार[7] मला
दावा,' म्हणे 'भवाचा[8];' तरिच तिसीं तो महातपा रमला. ५३
गुरुवरसेवालाभें झाली लोकत्रयीं उजळ दासी.
पंक झडोनि गळाला, अनुसरतां त्या सुपुण्यजळदासी[9]. ५४
सेवाधर्मे पूजुनि, भवसागरसेतु सुखविला साचा.
संपादिला प्रसाद प्रभुचा, जो हेतु[10] सुखविलासाचा. ५५
मुनिराज म्हणे तीतें, 'भावें झालीस आनत[11] पदासी.
तरलीस; यावरि न तूं दासी; ऐसें न आन[12] तप, दासी!'. ५६
'होइल सुत धर्मात्मा, सर्वसुमतिपति, महायशा; शीलें[13]
गातिल कवि; महिला, कुरुपति करुनि तया सहाय, शासील[14].
केलें मद्वचन हें; प्रसवेल सुमेरुतुल्य सुत राई[15];'
ऐसें मातेसि कथुनि, गेला होउनि मुनींद्र उतराई. ५८
मांडव्याच्या[16] शापें झाला दासीकुमार यमधर्म.
'विदुर' असें नाम तया ठेउनि गांगेय दे सुबहु शर्म[17]. ५९
शापाचें मूळ[18] असें, मांडव्यमहर्षि तरुतळीं उग्र

---

१. (मुनि) येईल. २. वपु उदित होउ दे=शरीर उदयाला येऊं दे. ३. [डस-णाऱ्या, चावणाऱ्या] सर्पिणीसारखी. ४. [दासीपणाला] कंटाळलीला. (कवि म्हणतात, त्या दासीनें व्यासांना फसविणें हें शक्यच नाहीं; तर व्यासच तिच्या हीनावस्थेची कींव येऊन तिला तारण्यासाठीं समजून उमजून भजले). ५. त्या सजलेल्या दासीला. ६. धर्मरोमांचयुक्त. ७. परतीर. ८. संसारसमुद्राचा. ९. उत्तम पुण्यरूप मेघास. १०. कारण. ११. नम्र. १२. अन्य. १३. स्वभाव. १४. रक्षील. १५. मोहरी. १६. ऋषिविशेष. १७. सुख. १८. आदिकारण.

तप करि; निजाश्रमपदद्वारींच उभा; दिसे स्वयें उग्र.[1] ६०
कृश, तेजस्वी, मौनव्रत, ऊर्ध्वभुज, प्रशांत पात्यातें
पातें लावुनि होता; म्हणति मुनी सुर 'महातपा' त्यातें. ६१
कोणा एका नरपतिनगरीं चोरी करूनि, चोरांनीं
पळतां आश्रय केला आश्रम, वांचावयासि, तो रानीं. ६२
मागोनि लाग लावित नृपबळ येउनि, पुसे तया [2]तपत्या.
सांगेल काय मौनी? ध्यानस्था एक ठावुकें तप त्या. ६३
त्या आश्रमींच तस्कर सांपडतां, मुनिहि मानिला चोर.
बांधुनि नेतां हि न तो डगमगला, शांति साधुची थोर. ६४
राजाज्ञेनें शूळीं मुनिहि चढविला, परंतु न क्षोभे.
तेथेंहि तपस्तेजें, [3]एकलतालाग्रगार्कसा, शोभे. ६५
होता तसाचि शूळीं; तिळहि न धैर्यप्रताप डळमळला.
न [4]ज्ञानदृक्शतांशहि, येउनि [5]देहात्मतापडळ, मळला. ६६
तापसजनास त्याचा ध्यानीं वृत्तांत तो सकळ कळला;
मग [6]खगरूपें रात्रौ येउनि, पाहूनि त्यास, कळकळला. ६७
मुनि म्हणति, 'वा! अहा! हें काय? प्रख्यात तूं ऋषी, [7]वळसा
हा कां? क्षेत्रीं सुकृतचि पिकविसि, कीं शाळितें [8]कृषीवळसा?'
मांडव्य म्हणे, 'मुनिहो! सुविचारें [9]यांसि दंडकर [10]हा तो
मुख्य न; [11]कृत भोगावें; शांतीसीं तारेच [12]दंडक रहातो.' ६९
तें[13] [14]वध्यस्थळरक्षकवदनें परिसोनि, भूप कर जोडी;

१. शंकर. २. तप करणाऱ्या त्या मांडव्याला. ३. एकल्या ताडवृक्षाच्या अग्रावर असलेल्या सूर्यासारखा. ४. ज्ञानदृष्टीचा शतांश देखील. ५. देहाविषयींची आत्मता (ममता), तिचा पडदा. ६. पक्ष्याच्या रूपानें. ७. अनर्थ—**पंत.** ८. शेतकऱ्यासारखा. ९. या मला. १०. हा राजा. ११. केलेलें कर्म. १२. मर्यादा. १३. मांडव्याचें बोलणें. १४. वधस्थानाचें रक्षण करणाऱ्याच्या तोंडून.

अभयवरद मुनि उतरुनि, म[1]ग मूळीं, शूळ न निघतां, तोडी.
तत्प्राणांचा न करी जन्हि अंतर्गतहि, ती अ[2]णी क[3]वळ.
होता स्वस्थ; तपाचें सांगावें काय हो अ[4]णीक बळ? ७१
त्याचें प्रख्यात 'अणी-मांडव्य' असेंचि जाहलें नाम.
होय परशुराम, जसा परशूच्या धारणामुळें, राम. ७२
सं[5]यमनीप्रति जाउनि, ध[6]र्मासि म्हणे मुनींद्र, 'म्यां पाप
काय कधीं केलें? रे! आलें फळ ज्यास, हा असा ताप. ७३
तत्वज्ञ आपणाला म्हणविसि; वद तत्व शीघ्र पितृ[7]पा! हूं.
मग मत्तपोबळ पहा; बोल, तुझें आजि सुज्ञपण पाहूं.' ७४
धर्म म्हणे, 'भगवंता! मन ठेवुनि कुतुकसाधनीं तुच्छीं,
बा! घातली ई[8]षीका बाळपणीं त्वां प[9]तंगिकापुच्छीं.' ७५
'अपराध अल्प असतां, त्वां केला दंड हा असा; धू[10]सी
बहुधा असेंचि जीवां; शिक्षावें म्यांचि तुज असाधूसी. ७६
हो मानुषदासीसुत, हाचि उचित दंड; पूस नय मातें;
जें अज्ञपणीं घडलें अ[11]घ, आणावें मनांत न यमा! तें.' ७७
ऐसा मुनिनें दिधला दासीपुत्रत्वहेतु हा शाप;
तो धर्म विदुररूपें संरक्षी कुरुकुळा, जसा बाप. ७८

अध्याय सोळावा.

धृतराष्ट्र, पांडु, विदुर भ्राते, सू[12]र्येंदुवन्हि जेंवि, हि[13]तें
झाले प्रजांसि; करिती सर्व सुखें कर्म, ज्यांसि जें विहि[14]तें. १

---

१. तो पोटांत शिरलेला शूळ सगळा बाहेर निघेना, तेव्हां तो मूळांत तोडून टाकिला; तथापि त्याचें अग्र पोटांत राहिलें. २. [शूळाचें] टोंक. ३. ग्रास. ४. आणखी. ५. यमाचे सभेप्रत. ६. यमधर्मास. ७. हे पितृपते! यमा! ८. दर्भाची काडी. ९. मधुमक्षिकेच्या पुच्छांत. १०. धुऊन टाकितोस, अर्थात् शिक्षा करून निर्दोष करितोस. ११. पाप, अपराध. १२. सूर्य, चंद्र व अग्नि. १३. हितकर. १४. योग्य.

'द्वापर कृतयुग झालें,' आलें यांतचि समृद्धिचें कथन.
ज्ञातज्ञेय[1] तिघेही; कारि त्यांचें यशचि शत्रुचें मंथन[2]. २
धृतराष्ट्र अंध, शूद्रीसुत विदुर, म्हणोनि राहिले दोघे.
भीष्में केला राजा पांडु; तदाज्ञाबळेंचि पद तो घे. ३
एका समयीं हर्षें भीष्म म्हणे, स्वाशिवाद्रिच्या भिदुरा[3],
'साधो! धर्मरहस्यज्ञाननिधे[4]! वांसरा[5]! सख्या! विदुरा! ४
हें कुळ सत्यवतीनें, व्यासानें, म्यांहि रक्षिलें कुरुचें;
कुळयश वाढवुनि, तुम्हीं सुखवा मन या कुळाचिया गुरुचें. ५
म्यां ऐकिलें असें कीं, यदुकुळजा कुंतिभोजनृपकन्या,
सुबळसुता, मद्रेश्वरतनया, या सुकुळजा वधू धन्या. ६
संतानार्थ कुळाच्या, भार्या तव अग्रजांसि त्या उचिता;
अस्मत्संबंधी ते नृप; त्यांची विदित मज असे शुचिता[6]. ७
आल्या मनासि माझ्या; तूं सांग स्वमत; वृद्धिला गोत्र[7]
म्यां त्वांहि पाववावें; योग्यचि तूं, हें नव्हे वृथा स्तोत्र[8].' ८
विदुर म्हणे, 'शिशु आम्हीं; तूं माता, तात, गुरु; करीं हित तें.
स्वकुळकथा काय? मुदित जग केलें बा! तुझ्या यशें वितते[9].'
विप्रमुखें भीष्माला कळलें, आराधुनि स्मरहरातें[10],
गांधारी सुबळसुता झालीसे पात्र शतसुतवरातें. १०
धृतराष्ट्रार्थ वराया गांधारीतें, नदीसुतें जवन[11]
त्या गांधारपतिकडे पाठविला दूतवर, जसा पवन. ११
वर अंध म्हणुनि कांहीं पहिली पडली विचारणा; परि तो
आला मना. कळंक न चंद्राच्या गुणगणा वृथा करितो. १२
गांधारी स्ववराच्या जाणुनि नेत्रांत अंधकारा, ती

१. जाणावयाचें [सर्व] जाणलें आहे ज्यानीं असे. २. नाश. ३. आपल्या अकल्याणरूपी पर्वताला वज्रच अशा (विदुराला). ४. हे धर्माच्या गूढज्ञानाच्या सांठ्या! ५. वत्सा! ६. शुद्धता. ७. कुळ. ८. स्तुति. ९. विस्तृत अशा यशें. १०. मदनारि शंकरातें. ११. वेगवान्.

बांधीं निजनयनांतें; भावी अंधाहि[1] अंधकाराती[2]. १३
[3]नागपुरीं भगिनीचें शकुनी पूजूनि सूरि[4], दान करी.
नगरपथांतें पंकिलें[5] करिती तद्दत्त[6] भूरिदान[7] करी. १४
गांधारीनें स्वगुणें गुरुजन[8], पति, पोष्यवर्ग[9] तोषविले.
नाहींच घेतलें परपुरुषांचें नाम परि न रोषविले. १५

अध्याय सतरावा.

केला होता शूरें[10] प्रथमापत्यप्रदानपण[11] सत्य;
हृष्ट कराया स्वजनकभगिनीसुत कुंतिभोजें[12] अनपत्य[13]. १
वसुदेवाच्या जनकें पहिली कन्या दिली सख्यास[14] पृथा[15];
कीं साधुनें प्रतिज्ञा जाऊं देऊं नये कदापि वृथा. २
ती कुंती पितृसदनीं कासारीं[16] पद्मिनी[17] तसी वाढे.
तों दुर्वासा तेथें ये, ज्याचे जाच कटु जसे काढे. ३
त्या मुनितें, ती, सेवा करुनि करि बहु प्रसन्न[18] देवी; 'द्या
वर मज' असें न मागे, परि तो तीस स्वयेंचि दे विद्या[19]. ४
मुनि कुंतीस म्हणे, या मंत्रें ज्या ज्या सुरा वहासील[20],
त्या त्या सुरप्रसादें वत्से! तूं पुत्रसुख पहासील.' ५
सर्वभविष्यज्ञ मुनिप्रवर, असी करुनियां दया, गेला.
मग कौतुकें पृथेनें सूर्यागमनार्थ मंत्रजप केला. ६

१. धृतराष्ट्रालाहि. २. अंधकासुराला मारणारा (शंकर). ३. हस्तिनापुरीं. ४. विद्वज्जन, पंडीत. ५. चिखलयुक्त. ६. त्याने दिलेले. ७. भूरि (पुष्कळ) आहे दान (मदजल—गंडस्थलांतून वाहणारें पाणी) ज्यांचे ठायीं असे. ८. वडिल माणसें. ९. आश्रित, सेवक. १०. शूरनामक राजानें. ११. पहिलें मूल [दत्तक] देण्याचा निश्चय. १२. एक राजा. १३. संततिरहित असा. १४. मित्र कुंतिभोजास. १५. हिलाच पुढें कुंती म्हणूं लागले. १६. सरोवरांत. १७. कमलिनी. १८. राजपुत्री कुंती. १९. मंत्रविद्या. २०. बोलाविशील.

एकांतीं गंगेच्या तीरीं जपतांचि दिव्य मंत्रास,
दिसला दिनकर, येतां, होय चमत्कार, हर्ष, सं[1]त्रास. ७
येउनि निकट रवि म्हणे, 'सुंदरि! पाचारिलेंस कां मातें?
काय करूं इष्ट तुझें? तूं कोणा इच्छितीस [2]कामातें?' ८
कुंती म्हणे, 'प्रभो! मज [3]सेवापरितुष्टविप्रवर विद्या
देता झाला; कुतुकें मीं वदल्यें, जरि असेल बरवि, द्या. ९
विद्याबळ जाणाया, पाचारुनि पाहिलें तुम्हां देवा!
चुकल्यें, क्षमा करा; हें विद्येचें कृत्य; किति [4]ईचा केवा?' १०
भानु म्हणे, 'वरदाता दुर्वासा गुरु तुझा मला कळला.
फळला तो कल्पद्रुम; तद्वर न कधींहि अपयशें मळला. ११
भीरु! भय त्यजुनि, मिठी घालीं माझ्या गळ्यांत बाहूनीं.
दर्शन [6]अमोघ माझें; तुज उचित न हा नकार, [7]बाहूनीं. १२
बंधुजनापासुनि तूं [8]मुग्धे! चित्तीं भिवूं नको; [9]मळता
[10]जन तरि बहुकर होतों? कां जाणसि आमुची न कोमळता?"
सत्य, प्रिय, हित बोलुनि, योजुनि [11]अंकीं निवास, रमणीतें
घेउनि, देवुनि अधरामृत, भोगी रत्न [12]वासरमणी तें. १४
झाला [13]सहजकवचमणिकुंडलधर तत्क्षणीं रुचिर बाळ;
तीहि कुमारी झाली; आली जाणों प्रसूतिची आळ. १५
रवि गेल्यावरि, तो सुत गंगेच्या घातला तिनें पदरीं;
केलें कठिन मन. असो पुत्रफळ; त्यागमति [14]नव्हे [15]बंदरीं. १६

---

१. भीति. २. मनोरथातें. ३. सेवा केल्यामुळें संतुष्ट झालेला विप्रवर (दुर्वास). ४. आत्मानं दर्शयति–**पंत.** इचा=माझा असें म्हणून स्वतःला दाखविते. ५. सामर्थ्य. ६. व्यर्थ न होणारें. ७. बोलावून. ८ हे सुंदरि! ९. [मी] मळलेला (पापी) जन [असतों] तरि बहुकर होतों (असतों काय)? १०. पाठांतर–**जन तरि बहुकर नसतों; ठावी तुज न शुचिता न कोमळता.** ११. मांडीवर. १२. सूर्य. १३. उपजतच कवच आणि रत्नकुंडलें धारण केलेला. १४. होत नाहीं. १५. [क्षुल्लक] बोराविषयींहि.

तें पुत्ररत्न दिधलें गंगेनें अधिरथासि[१], तद्भार्या
राधा त्यातें पोषी; त्यास्तव 'राधेय' म्हणति त्या आर्या[२]. १७
त्यांहीं 'वसुषेण' असें पुत्राचें नाम ठेविलें विधिनें.
झाला शूर उदार, स्तविलें ज्याच्या यशा सुधानिधिनें[३]. १८
कुंतीनें पांडुनृपति नृपवृंदांत[४] स्वयंवरीं वरिला,
जैसी वरिती झाली देवसमूहीं पुलोमजा[५] हरिला[६]. १९
दुसरा विवाह व्हावा पुत्राचा हें मनांत आणूनीं,
मद्रपतिकडे गेला आपण गांगेय योग्य जाणूनीं. २०
यच्चरितें[७] सुजनाच्या हृदयीं अमृतेंचि, शत्रुच्या शल्यें;
सद्विज[८], सामात्य, सबळ[९], तो भरतश्रेष्ठ[१०] पूजिला शल्यें[११]. २१
भीष्म म्हणे, 'राया! वच[१२] सप्तर्षींचें जसें करि हिमाद्री[१३],
करिं तूंहि या ऋषींचें; आहे जरि एक, दे तरिहि माद्री.' २२
शल्य म्हणे, 'कुरुनाथा! अढळ कुळाचार, जेंवि हेमाद्री[१४].
ठावा असेल तुजला द्यावी म्यां शुल्कदासि[१५] हे माद्री.' २३
भीष्म म्हणे, 'कुलधर्मत्याग नव्हे उचित, मान्य मज आहे;
सत्कुळजाचेंचि सदा स्वकुळाचाराकडेचि मन वाहे.' २४
ऐसें मान्य करुनि, दे कन्याशुल्कार्थ भूषणें, वस्त्रें,
रत्नें, कनकें, वाजी[१६], हस्ती, रथ आणि चांगलीं शस्त्रें. २५

---

१. हें एका सारथ्याचें नांव. (हा दुर्योधनाचा सारथि होता). २. त्या श्रेष्ठ कुंतीपुत्राला. ३. चंद्रानें. ४. राजसमूहांत. ५. पुलोमानामक ऋषीची मुलगी. (इंद्राणी). ६. इंद्राला. ७. ज्याचीं (भीष्माचीं) चरित्रें. ८. ब्राह्मणांसह. ९. सैन्यासह. १०. भरतकुलांत श्रेष्ठ असा. ११. मद्रदेशचा राजा शल्य यानें. १२. वचन. १३. हिमालय. (शंकरानें पार्वतीला मागणी घालण्याकरितां सप्तर्षि हिमालयाकडे पाठविले, तेव्हां, सप्तर्षींचें तें म्हणणें हिमालयानें कबूल केलें, ह्या कथेस अनुलक्षून हें वाक्य आहे). १४. सुवर्णपर्वत मेरु हा ज्याप्रमाणें अढळ आहे त्याप्रमाणें आमचा कुळाचारहि अढळ आहे. १५. कन्येचें मोल देणाऱ्यास. १६. घोडे.

शल्य मग नदीजाचा अनुजेनें अंक शोभवुनि उजवा,
प्रार्थुनि म्हणे, 'पुरा न्या; प्रेमरसें ईस लोभवुनि उजवा[१].' २६
त्या लावण्यखनीला आला घेऊनि भीष्म मग लग्न
झालें, पांडुसुहृन्मन[२] हर्षीं, दुःखीं अमित्रमन[३], मग्न. २७
कुंतीसीं माद्रीसीं करुनि सुखविहार एकमासभरी,
भीष्मादिगुरुमतें तो पांडु प्रस्थान[४] भूजयार्थ[५] करी. २८
पवनातें[६], तेजातें प्राशुनि निःशेष न करि अहि, तरणी;
न तसा पांडु महाबळ; याच्या उरला न एक अहित रणीं. २९
अरिनाग[७], पांडुहरिच्या[८], केले शतचूर्ण, सायकरदानीं[९].
त्यजुनि दुरभिमान, स्वप्रियहित वरिलें न काय करदानीं[१०]? ३०
अहित अहि, तयां झाला विवरें[११], विवर[१२] सांपडों दिलें न रणीं.
महित[१३] महितळीं झाले नमुनि न मुनिसुत हठी द्विषन्मरणीं. ३१
करद[१४] पर दमुनि[१५] केले; धनदमन[१६] दरिद्र आपणा मानी
ऐसी वित्तें घेउनि, अक्षत[१७] आला पुरासि तो मानी. ३२
बहु मानिला[१८] नदीजें पांडु, जसा शंकरें स्वसेनानी[१९].

---

१. उज्ज्वलित करा, अर्थात् इचा विवाह करा २. पांडुराजाच्या मित्रांचें मन. ३. शत्रूंचें मन. ४. प्रयाण. ५. पृथ्वी जिंकण्याकरितां. (दिग्विजयार्थ). ६. अन्वयार्थ—अहि पवनातें [आणि] तरणी तेजातें प्राशुनि निःशेष न करी. सर्प व सूर्य अनुक्रमें वारा व तेज यांचें सेवन करितात; तरी त्यांना अगदींच नाहीसें करीत नाहींत. परंतु महाबली पांडु तसा नाहीं. याच्याशीं युद्ध करीत असतां एकहि शत्रु उरला नाहीं. ७. शत्रुरूप हत्ती. ८. पांडु राजा हाच कोणी सिंह, त्याच्या. ९. बाणरूप दांतानीं. १०. करभार देणारे जे (राजे) त्यांनीं. ११. पक्षिश्रेष्ठ गरुड. १२. छिद्र, बिळ. १३. अन्वयार्थ—हठी (हटयोगी) मुनिसुत [ईश्वरास] नमुनि महितळीं महित (पूज्य) न झाले [इतकें] हठी (हट्टी) द्विषत् (शत्रु) मरणीं (संग्रामांत आलेल्या मरणामुळें) महितळीं महित झाले. १४. करभार देणारे. १५. शिक्षा करून. १६. कुबेराचें मन. १७ व्रणरहित. (सुखरूप). १८. आदरिला. १९. आपला सेनापति (कार्तिकस्वामी).

तें वेष्टुनि केलें गजपुर लंकाद्वीपतुल्य सेनानीं. ३३
शोभे स्थळस्थळीं तें राशीकृतरत्नकनक नगर; मला
वाटे, गमलें लोकां कीं, येथें रत्नकनकनग[1] रमला. ३४
भीष्मादिकांसि तें धन दिधलें वांटूनि; जेंवि धनदानें,
केलीं आश्रित-याचक-हृदयें संतुष्ट भूरिधनदानें[2]. ३५
एकछत्रा, कंटकें[3]रहिता, स्ववशा, करूनियां अवनी,
भवनीं रमोनि, पांडु क्रीडे तुहिनाद्रिदक्षपार्श्ववनीं[4]. ३६
येउनि गेला संगें कुंतीतें आणि त्याहि माद्रीतें.
गंगागौरीगुरुसा[5] आश्रय करि पांडु त्या हिमाद्रीतें. ३७
धाडी धृतराष्ट्र सदा साहित्य वनांत आदरें पुरतें.
अनुकूळदारसंगें कां हो! न गमेल पांडुला पुर तें[6]? ३८
पांडु वनीं असतां, सुरसिंधुज[7], विदुरार्थ आणवुनि बरवी
देवकमहीपतीची पारसवी[8] कन्यका, तिला वरवी. ३९

अध्याय अठरावा.

एकासमयीं क्षुधित, श्रांत, श्रीव्यास मंदिरा आला.
गांधारीनें सादर तोषविला, सुप्रसन्न तो झाला. १
'वर माग' असें म्हणतां, मुनिच्या पायांसि ती सती लागे;
शतपुत्रवर हरा जो मागितला, तोचि त्यासही मागे. २
मग गर्भवती झाली, होती तैसीच दोनि अब्द[9] सती;
कुंतीस पुत्र झाला, ऐसें परिसोनि, होय खिन्नमती. ३

---

१. नग=पर्वत. २. पुष्कळ द्रव्यदानानें. ३. निष्कंटक, शत्रुरहित अशी. ४. हिमालयाच्या दक्षिण भागच्या अरण्यांत. ५. गंगा आणि पार्वती यांचा पति शंकर, त्यासारखा. ६. तें अरण्य. ७. गंगापुत्र भीष्म. ८. शूद्रीचे ठायीं ब्राह्मणापासून झालेली कन्या. ९. वर्षें.

दुःखें निजोदराला[१] ती गांधारी स्वमुष्टिनीं ताडी.
गर्भासि बळात्कारें, भवितव्यबळेंहि, संकटें पाडी. ४
लोहाची[२] कांडीसी पडली पेशीच[३] एक मासाची;
चित्तीं म्हणे सुबळजा[४], 'हे त्यागावीच दुःखदा साची.' ५
तों तें जाणुनि, येउनि, मुनि[५] साहसकारिणीस त्या वारी[६];
वरदा श्वशुरासि म्हणे, मग ती आणूनि लोचनीं वारि[७], ६
'दिधलें मज शतसुतवरदान तुम्हीं वरदराज! मामाजी!
झाली पेशी; वर्षद्वय हे तनु पावली श्रमा माजी. ७
झाला सुत कुंतीला परिसुनि, मज दुःख वाटलें मोटें.
मग म्या उदर बडविलें; स्वामीपासीं वदों नये खोटें.' ८
व्यास म्हणे 'गे वत्से! लोकीं सर्वज्ञतेसि मीं पात्र;
जाणें सर्वहि; तिळहि न जाणें लटिकें वदावया मात्र. ९
शत घृतकुंभांत[८] रवे[९] पेशीचे घाल कन्यके! शीतें
उदकें सिंपावी तें[१०]; सद्यः[११] शतधा करील पेशीतें.' १०
केलें तसेंच; तेव्हां कन्येचा काम मानसीं आला;
श्रीमन्मुनिप्रसादें, भाग अधिक एक त्या शतीं झाला. ११
घृतकुंभरक्षणाचा विधि, अविधिहि, कथुनि, कृष्णमुनि[१२] गेला.
झाला प्रथम सुयोधन; तेणें खरशब्द[१३] उपजतां केला. १२
गांधारीसुतकृत रव[१४] परिसुनि, गोमायु[१५], गृध्र[१६], खर, काक,
हाक स्वयेंहि देती; धृतराष्ट्राच्या मनीं शिरे धाक. १३
भूदेव, भीष्म, विदुर स्वगृहीं आणवुनि, आंबिकेय[१७] वदे,
'व्यासेश्वरप्रसादें झाला सुत, परि मना न उत्सव दे. १४
राजसुत युधिष्ठिर तों राजाचि; स्पष्ट तो कुळज्येष्ठ;

---

१. आपल्या पोटाला. २. लोखंडाची. ३. पिशवी. ४. सौबली=गांधारी ५. व्यासमुनि. ६. निवारण करी. ७. पाणी. ८. तुपाच्या शंभर घागरींमध्यें. ९. तुकडे. १०. तें शिंपडणें. ११. तत्काळ. १२. कृष्णद्वैपायन व्यासमुनि. १३. गाढवाचा शब्द. १४. शब्द. १५. कोल्हे. १६. गिधाडें. १७. आंबिकापुत्र धृतराष्ट्र.

हाहि नृपचि [1]त्यामागें; भवितव्य वदा [2]बरें तुम्हीं श्रेष्ठ.' १५
म्हणति भविष्यज्ञ द्विज, 'बुडवाया जाण हा नि[3]दान कुळा;
त्यागावाचि. न [4]भुजगें पोसावें प्राणहानिदा [5]नकुळा.' १६
विदुर म्हणे, 'त्यागावी [6]अहिदष्टा तत्क्षणींच [7]आंगोळी.
मारक कळतां, घ्यावी उग्र विषाची वळेंचि कां गोळी? १७
[8]एकोनशतसुतांसीं, एक कुपुत्र त्यजूनि, नांदावें.
व्याकुळ व्हाया, फुंकुनि भाजों द्यावें स्वगेह कां [9]दावें? १८
झाला कुळकीर्तींच्या, आप्तजनांच्या, कुपुत्र हा, नि[10]धना.
त्यजिति [11]यशोधन देहहि, यश रक्षिति, म्हणति, 'होवु हानि धना.'
[12]उग्रनिमित्तें सर्वहि भ्याले, एकचि न अंध तो भ्याला.
होय [13]मरणहेतूल्कामुखभूतीं [14]सुनिधिवुद्धि लोभ्याला. २०
पितृसुर[15]तृप्तिप्रद, जगदाल्हादक, तापहर, सुवृ[16]त्त, [17]शुचि,
शशिचें मंडळ, कुळही; तेथ हरिण [18]अंकें, येथ [19]हा पशुचि. २१
ज्या दिवसीं दुर्योधन झाला, कुंतीस भीम त्या दिवसीं.
स्वगुणें एकें तमें, एकें केलीं सुहृन्मनें [20]हिंवसीं. २२
धृतराष्ट्राला झाले शत सुत, कन्याहि एक वरदानें.
जैसें कथिलें होतें श्रीमद्व्यासें अभीष्टवरदानें. २३

---

१. त्या पांडुराजाच्या मागें. २. चांगलें, शुभ. ३. कारण. ४. सर्पानें ५. मुंगसाला. ६. सर्पानें जीला दंश केला आहे अशी. ७. अंगुलि=बोट. ८. एक उणा ज्यांत अशा शंभर पुत्रांशीं. ९. वणव्यानें. १०. नाशाला. ११. यश हेंच ज्यांचें धन असे लोक. १२. भयंकर अपशकुनानीं. १३. मरणास कारण जें उल्कामुख (ज्वाला ज्याच्या मुखांत असें) भूत त्याचे ठायीं. १४. पाठांतर—**भूतहि सन्निधान.** १५. पितर आणि देव यांस तृप्ति देणारें. (चंद्राच्या कला पितर आणि देव भक्षण करितात अशी प्रसिद्धी आहे). १६. वर्तुलाकार (पक्षीं) चांगल्या आचरणाचें. १७. शुभ्र (पक्षीं) शुद्ध. १८. लांछन (पक्षीं) काळिमा. १९. दुर्योधन—**पंत.** २०. हिम (बर्फ), त्यासारखीं थंडगार.

अंतर्वत्नी[1] असतां, गांधारीनें स्वयेंचि सेनयेला
दिधला सद्वैश्याच्या, निजपतिसेवाधिकार, तनयेला[2]. २४
वैश्या सेवादक्षा, प्रज्ञाचक्षुहि[3] कृतज्ञ, भजलीला
दे पुत्रफळ; गमे सुरतरुची प्रभुचीहि, तुल्य मज लीला. २५
नाम युयुत्सु तयाचें; एकाधिक शतकुमार यासकट.
सर्वांत साधु वैश्यानंदन, होईल तें पुढें प्रकट. २६

अध्याय एकोणिसावा.

होता महावनांत स्त्रीसख नृप पांडु, तत्कथा परिसा.
अरिसामंतनमितपद[4] तो मृगयार्थें फिरे वनीं हरिसा[5]. १
तेणें मैथुनसमयीं हरिणीसह हरिण देखिला पुष्ट;
वधिला पंचशरानीं सस्त्रीक अदुष्ट तो, जसा दुष्ट. २
तो ऋषिपुत्र, तपोधन, भार्येसीं काननांत मृगरूपें
रतिकेलिसक्त होता, वधिला सहसा मृगभ्रमें भूपें. ३
किंदमनामा तो ऋषि भूमिवर पडोनि पांडुला गांजी.
कर जोडुनि नृपहि म्हणे, 'भ्रमलों; मृगरूप घेतलें कां ? जी !' ४
किंदम म्हणे, 'अरे ! म्यां, व्हावा सुत ऋष्यशृंगसा मातें,
हें मात्र वांछिलें रे ! मन वश होवूं दिलें न कामातें. ५
जनलज्जेस्तव मृगतनु घेउनि, रमतां वनीं मृगीसहित,
केला कसा तुवां वध ? केलें नसतांहि लेश म्यां अहित. ६
मृगयाधर्म तुज, मजहि आहेतचि विदित; परि सुरतशर्म[6]
अनुभवुनि, कसें केलें हनन ? अरे ! काय हें उचित कर्म ? ७
ब्रह्मवधें दुरित[7] नसो; नकळत घडला तुला, परंतु नृपा !

१. गरोदर. २. नीतिमतीला. ३. अंध. (धृतराष्ट्र). ४. शत्रु आणि मांडलिक राजे यांनीं नमस्कृत. ५. सिंहाप्रमाणें. ६. संभोगसुख. ७. पाप.

सुरतसुखज्ञा तुजला यावी, आली कसी न लेश कृपा ? ८
दुष्टोचित शासन कीं; सोसावें काय तापसानें हें ?
कां निरपराध वधिला ? राया ! वद काय पाप सानें[1] हें ? ९
घे शाप तापसाचा, तुजही करितां मनःप्रियासंग
मृत्यु घडो; या माझ्या शापाशनिचा[2] कधीं न हो भंग.' १०
शापवचन मलिन तया करि, कज्जळ जेंवि पांडुरमणीतें[3].
मुनि गेल्यावरि, येउनि तें कळवी साश्रु पांडु रमणींतें. ११
'व्यसनें तात[4] बुडाला, मींही भोगील काय मंद रसा[5] ?
झालों स्वगुरुसुहृज्जनहृत्सागरमथनहेतु[6] मंदरसा[7]. १२
कामाब्धि बुडविलें जग, हें ऐकावेंहि न व्यसन कानें.
इतर किति ? पाविजेलचि विषयें भय नित्य नव्य सनकानें[8]. १३
झालों विचित्रवीर्यक्षेत्रीं[9] मीं पांडु कृष्णसुत[10]; पाला
भक्षीन, करीन सुखें, होउनि संगीं वितृष्ण[11], सुतपाला. १४
मीं नाठवीन राज्य, स्वजन, स्त्री, शयन, वसन, अन्न, मनें.
जा हस्तिपुरासि तुम्हीं, सांगा भीष्मादिकांसि मन्नमनें.' १५
म्हणति स्त्रिया, 'करूं तप आम्हींही, अधिक काय संन्यासीं ?
येथें तपोनि, भोगा स्वर्गीं सुख कुंतिमद्रकन्यांसीं. १६
भार्या न त्यागाव्या, विरहज्वलनांत या न भाजाव्या;
अंतीं स्वर्गासि तुम्हांसह, तेजें शोभवुनि नभा, जाव्या.' १७
दारोदारोक्ति[12] करी मान्यचि, कीं प्रेम शुद्ध, निष्कपट.

१. लहानसहान. २. शापरूप वज्राचा. ३. पांढऱ्या मण्यातें. ४. बाप विचित्रवीर्य. (अध्याय १४, गीति १४ ते १७ पहा). ५. पृथ्वी. ६. स्वतःचीं वडील माणसें आणि मित्रजन यांच्या हृदयसागराचें मंथन करण्यास (त्यांना दुःखी करण्यास) कारण. ७. मंदरपर्वताप्रमाणें. ८. सनकऋषीनें सुद्धां. ९. विचित्रवीर्याच्या अंबालिकास्त्रीचे ठिकाणीं [व्यासांच्या वीर्यापासून] झालेला. १०. व्यासपुत्र. ११. निराभिलाष. १२. स्त्रियांचें उदारपणाचें भाषण.

काढी अंगद[1], कुंडल, कटकयुगुळ[2], मौलिरत्न[3], निष्क[4] पट[5]. १८
तीं भूषणें, सुवस्त्रें अर्पुनि विप्रांसि, तो म्हणे, 'स्वामी !
जाउनि नागपुरीं हें सांगावें, मागतों वरा या मीं.' १९
वल्कल नेसोनि, म्हणे दासांसि, 'पुरासि जा सखे[6] ! खग हो !
जळला शापदवें[7] हा[8]; आश्रय सर्वांसि भीष्म सद्द्रुम[9] हो. २०
दुर्दैवग्रीष्मानें[10] गेला आटोनि पांडुकासार[11].
जा भीष्ममानसाप्रति[12] दासमधुप हो ! विचार हा सार[13]. २१
भीष्म, धृतराष्ट्र, विदुर, स्वर्द्रुम[14] तुमचे; तदाश्रयें वर्ता.
हा पांडु, आजपासुनि, झाला यति, भूमिचा नव्हे भर्ता.' २२
सस्त्रीक पांडु गेला पूर्वीं राघव तपोवना जेंवीं;
वाढुनि शोकविष, समच तो, सकळांच्या म्हणे मना, 'जेंवीं.' २३
सेवकजन बहु रडला; समजावें केंवि त्या अनाथानें?
पांडुरत्नें जासि त्याच्या, शिशुच्याहि न तृप्ति तासि मना थानें. २४
त्यांनीं नागपुरीं ती नेली बहु शीघ्र तापदा वार्ता.
अंबा वृष्टिनें[15] तासि केली सर्व प्रजा तिणें आर्ता[16]. २५
आजी[17], माय[18] बहु रडे; भीष्म विदुर फार जाहले कष्टी.
धृतराष्ट्र म्हणे, '[19] विधिनें केंवि पळविली अचक्षुची यष्टी?'
तो पांडु हिमगिरीतें लंघुनियां, गंधमादना गेला.
इंद्रद्युम्नसराप्रति जाउनि, शतशृंगपर्वतीं[20] ठेला. २७
तेथें पांडु, तप करुनि, पावे सुमहर्षितुल्यता सुकृती.
काय न साधील, पथा साधूंच्या अनुसरोनि, सासु[21] कृती? २८

१. बाहुभूषण. २. सलकड्याचीं जोडी. ३. उत्तम प्रतीचा मुकुट. ४. उरोभूषण. ५. वस्त्रें. ६. मित्ररूपी पक्षी हो ! ७. शापरूप वणव्यानें. ८. हा मी पांडुरूप वृक्ष. ९. चांगला वृक्ष. १०. दुर्दैवरूप उन्हाळ्यानें. ११. पांडुरूप सरोवर. १२. भीष्मरूप मानससरोवराप्रत. १३. श्रेष्ठ, योग्य. १४. कल्पवृक्ष. १५. निखाऱ्याच्या वर्षावानें. १६. दुःखित अशी. १७. सत्यवती. १८. अंबालिका. १९. दुर्दैवानें. २०. पर्वताचें नांव. २१. प्राणी. (स=सह+असु=प्राण; प्राणांसह=तो प्राणी).

तेथील महर्षिनिकर[1] अन्योन्यातें म्हणे, 'उठा, चाला;'
श्रीब्रह्मदेवदर्शन घ्यायास्तव सिद्ध एकदा झाला. २९
पांडु म्हणे, 'मीं येतों;' मुनि म्हणती, 'वायु कीं महर्षिजन
जाया समर्थ, न इतर विधिलोकपथीं[2] करावया व्रजन[3].' ३०
समजे पांडु तदाशय[4], कीं झालों जरिहि अनृण इतरांचा,
तरिहि अनपत्यतेस्तव आहेंचि ऋणी समस्त पितरांचा[5]. ३१
पितरांच्या फेडाया न समर्थ, करुनि महातप, रिणा मीं.
घडतां अधःपतन, मज पुण्यें देतिल न हात परिणामीं. ३२
त्यांसि म्हणे, 'स्वामी हो! तारावा संकटांत हा भक्त;
अनपत्यत्व स्वर्गद्वारनिरोधासि[6] हेतु, हें व्यक्त[7]. ३३
जेंवि पितृक्षेत्रीं मीं, मत्क्षेत्रींही तसेंचि संतान
होतें, तरि तरतों; हा काम पुरवितें तुम्हींच संतान[8].' ३४
मुनि म्हणति, 'भारता! हा काम तुझा देवताप्रसादानें
होईल पूर्ण, ऐसें दिसतें आम्हांसि पाहतां ज्ञानें.' ३५
मुनि गेल्यावरि, पांडु ज्येष्ठस्त्रीतें म्हणे, "प्रिये! कांहीं
कथितों, तें मान्य करीं; तुज तों अमृतहि मदुक्त्यधिक[9] नाहीं. ३६
मद्वचनें संपादीं सन्मुनिपासूनि शुद्ध संततिला.
संततिलाभाचि लाभ; 'स्वर्निःश्रेणी[10] च' म्हणति संत तिला.
शरदंडायनभार्या[11], पतिच्या आज्ञेकरूनि, सन्मुनितें
भजली पूर्वीं; तारी सदपत्यत्रय तयांसि, जन्मुनि, तें." ३८
कुंती म्हणे, "तुम्हीं मज कथितां ज्या काय आजि कार्यातें,

---

१. महर्षिसमुदाय. २. ब्रह्मलोकाच्या वाटेनें. ३. गमन. ४. ऋषींच्या त्या म्हणण्याचा भाव. ५. अपत्यावांचून पितरांचें ऋण फिटत नाहीं व अनपत्य मनुष्यास स्वर्गलोकप्राप्ति होत नाहीं, असें शास्त्रवचन आहे. ६. स्वर्गद्वारीं अडथळा होण्यास. ७. उघड, स्पष्ट. ८. कल्पवृक्ष. ९. माझ्या वचनापेक्षां अधिक [प्रिय]. १०. स्वर्गास जाण्याची शिडी. ११. पाठांतर–**शरदंडायनभूपस्त्री पत्याज्ञे-करूनि सन्मुनितें.**

व्युषिताश्वकथा[1] जाणुनि, मग मान्य करील कोण आर्या[2] तें? ३९
व्युषिताश्व भूप मेला; त्याची भद्रा वधू सती, पतिचें
शव आलिंगूनि, करी विलाप बहु; न गणि मत सुहृन्मतिचें.
स्वपदीं दृढ भाव तिचा जाणोनि, नभांत बोलिला वाणी,
सोडीनाचि शवाला, संततिचा काम धरुनि, जें राणी, ४१
'न करीं विलाप सति! घे वर; ऋतुकाळीं तुवां मदंगातें[3]
रक्षुनि घ्यावें शयनीं; देईन अपत्यहेतुसंगातें[4].' ४२
भद्रा तैसेंचि करी; झाले तिस शाल्व, मद्र सुत सात.
हें ऐकिलें असेल व्युषिताश्वचरित तुम्हींहि विख्यात. ४३
शापप्रतिबंध खरा; परि अस्मद्भाव, भाग्य-पुण्यबळें,
स्वामी तुम्हींच कल्पद्रुम घाल स्वस्त्रियांसि पुत्रफळें. ४४
तेंवि, मनःसंकल्पें, दिव्यतपोयोगसिद्धिमंतानें,
माझा ठायीं देवा! निर्मावीं त्वांचि शुद्ध संतानें." ४५
पांडु म्हणे, 'गे! साध्वि! व्युषिताश्व जसा, तसा नसे अन्य.
तो साक्षाद्देवोपम; लोकीं सन्मान्य, योगनिधि, धन्य. ४६
मज आहे श्रुत ऐसें, कीं कामविहारिणि[5] स्त्रिया स्ववशा[6]
पूर्वीं होत्या, भजती भलत्यासि, जशा वनीं गजास वशा[7]. ४७
उद्दालकमुनिपुत्रें रीति तयांची विलोकिली खोटी:
केली हे मर्यादा, जे आतां चालत्ये जगीं मोटी. ४८
उद्दालकपत्नीतें एक ब्राह्मण धरी करीं[8], कामी.
'क्रीडों चाल' म्हणे, जन्हि देखत होता तिचा पती धामीं[9]. ४९
तें पाहुनि उद्दालकमुनिसूनु म्हणे, तयासि, 'कर सोडा:
भव्यार्थ[10], आजिपासुनि, या दुष्ट दंडकासि[11] कर जोडा.' ५०
तात म्हणे, 'वत्सा! हे रीति पुरातन, तुवां न कोपावें.

---

१. व्युषिताश्वराजाची कथा. २. सच्छील स्त्री. ३. माझ्या शरीराला. ४. अपत्योत्पत्तीला कारण अशा संभोगातें. ५. यथेच्छ विलास करणाऱ्या. ६. स्वतंत्र. ७. हत्तिणी. ८. हातीं. ९. घरीं असलेला. १०. कल्याणाकरितां. ११. रीतीला.

स्त्रीप्रियकामविहारीं; विघ्न किमपि तूं करूं नको, पावें.' ५१
तें मात्र वचन न करी मान्य श्रीश्वेतकेतु[1] बापाचें;
स्पष्ट म्हणे, 'हें कारण होइल नरक[2]प्रदोग्रपापाचें. ५२
यावरि ती भ्रूणघ्नी[3], परपुरुषाला भजेल जी असती;
भ्रूणघ्न सतीत्यागी पुरुषहि; नरकीं घडो तयां वसती. ५३
पुत्रोत्पत्त्यर्थ धवें[4] आज्ञा देतांहि, जीहि आज्ञा ते
न करिल, तसीच तीही; भंगितिल न धर्मसेतु[5] हा ज्ञाते.' ५४
असि मुनिकृत मर्यादा लोकीं अद्यापि चालत्ये कांते!
जाणसि मदुद्भवा[6]सहि; मान्य करीं वचन कनक[7]निभकांते! ५५
कल्माषपादपत्नी मदयंती, जाणताति संत तिला;
ती पावली वसिष्ठापासुनि गति[8]कीर्तिहेतुसंततिला. ५६
त्वांहि तसेंचि करावें; म्यां रचिला आजि सफळ अंजलि हो.
मन्नाम पुत्रवंतांमाजि यमामात्य[9]पाणिकंज लिहो.' ५७
जनमेजयासि सांगे मुनि[10], कीं वाणी[11]सही, करुनि पण जी
जिंकूं शके सुभाषण[12]निपुणत्वें, ती वदे तुझि निपणजी[13]. ५८
'मत्पितृसदनीं होता श्रीदुर्वासा महोग्र, परि चरण
म्यां अर्चिले सदाही; केलें, साहोनि कष्ट, परिचरण[14]. ५९
तेणें प्रसन्न होउनि मंत्र मला एक शिकविला आहे.
पुत्रार्थ सुराकर्षण कथिलें, वेळाहि पातली त्या[15] हे. ६०
श्रीगुरुदत्तमनु[16]बळें सांगाल तया सुरासि बाहेन.
परपुरुषाला, तुमच्या वचनें, पुत्रोद्भवार्थ पाहेन.' ६१

---

१. उद्दालकाच्या पुत्राचें नांव. २. नरक देणाऱ्या (नरकाला नेणाऱ्या अशा) भयंकर पापाचें. ३. गर्भहत्या करणारी. ४. पतीनें. ५. धर्ममर्यादा. ६. माझ्या उत्पत्तिकथेस. ७. सुवर्णासारखी कांति जिची अशा [स्त्रिये !]. ८. मोक्ष आणि कीर्ति होण्यास कारण अशा संततीस. ९. यमाचा अमात्य जो चित्रगुप्त त्याचें हस्तकमल. १०. वैशंपायन. ११. सरस्वतीलाही. १२. चांगलें भाषण करण्याविषयींच्या चातुर्यानें. १३. कुंती. १४. सेवा. १५. देवांच्या आकर्षणाची. १६. मनु=मंत्र.

पांडु म्हणे, धर्मातें वाहें, वाहें तयासि हें काय.
तज्ज[1] न सज्जनमतपथ सोडिल, अगुणें सुविग्रहें[2] काय? ६२
पतिस नमुनि, गुरुचरणस्मरण करुनि, मंत्रजप करी विधिनें;
तत्काळ दिलें दर्शन धर्मै, मंत्राहतें, दयानिधिनें. ६३
परिसुनि धर्म वदे, 'अयि! सति! कुंति! मतं ददामि किं ते?'[3] तें[4]
परिसुनि म्हणे पृथा, 'जें सुतरत्न हरील सर्व चिंतेतें.' ६४
धर्मै तसाचि दिधला सुत, करुणा करुनि पांडुभूपाळीं.
इषशुक्लपंचमीतिथि[5] होती, तज्जनन होय ज्या काळीं. ६५
तो उपजतांचि, झाली वाणी अशरीरिणी[6] अशी व्योमीं,
'हा कुरुकुळीं युधिष्ठिर हित सकळां, अमृतरस जसा सौमीं[7].
हा पांडुपुत्र सत्यव्रत, सुज्ञ, अजातशत्रु, भूतरणी[8];
हा मूर्त धर्म, भूपतिपति, यश जोडील परम पूत[9] रणीं.' ६७
सुतमुखशशिरुचि[10] सेवुनि, पांडु निवाला; परंतु एकानें
तृप्त नव्हेचि; जसा मरुतरुप[11] सकृत्प्राप्तवारिसेकानें[12]. ६८
पुनरपि म्हणे तिला, 'बळशाली सुत आणिखी असावा गे!
सबळाचि वीरखळवळीं, विपिनीं समरुद्दवा[13] असा, वागे.' ६९
कुंती: मंत्रजप करुनि, चिंती मनिं कीं, 'समीरदेवा! यो[14].'
तोही तसाचि आला; त्यासि म्हणे ती, 'सुपुत्र दे वायो!' ७०
पवनापासुनि झाला सुत बळनिधि भीमसेन, तज्जननीं
होय गगनगी[15], हर्षे भूमिहि, केवळ न एक तज्जननी[16]. ७१

---

१. त्यापासून झालेला. २. चांगल्या शरीराच्या. (सुरूप पण निर्गुण अशा पुत्रानें काय उपयोग ?). ३. अयि! सति! कुंति! ते मतं किं ददामि?=अगे! सति-कुंति! तुला इष्ट असें काय देऊं? ४. धर्माचें वाक्य. ५. आश्विन शुक्ल पंचमी—**पंत.** ६. जीस शरीर नाहीं अशी वाणी, अर्थात् आकाशवाणी. ७. चंद्रीं. ८. पृथ्वीवरील सूर्य. ९. पवित्र. १०. पुत्रमुखरूप चंद्राची कांति. ११. मारवाडांतील मोठा वृक्ष. १२. एकवार मिळालेल्या पाण्याचे सिंचनानें. १३. वाऱ्यासह वणवा. १४. यावें. १५. आकाशवाणी. १६. त्याची आई.

'हा बळजळधि खळांचा समरीं उतरील सर्व हा रैंचें[1].
चूर्ण करील शिलादृढशत्रूरें[2] मुष्टिच्या प्रहारेंच.' ७२
अंकीं निजला असतां, व्याघ्रभयें ती पृथा उठे तूर्ण[3].
तों घनसा[4] भीम पडे, होय तनुभरें तळीं शिळा चूर्ण. ७३
'तिसराहि पुत्र लोकश्रेष्ठ असावा' असें मनीं आणी.
उग्र तप करी राजा पांडु; तदुक्तें तसीच ती राणी. ७४
आराधिला सुरेश्वर[5]; भेटोनि म्हणे तयासि, 'माग वर.'
पांडु म्हणे, 'दे मजला आत्मसम कुमार भूरिभाग[6], वर.' ७५
इंद्र म्हणे, 'मत्सम तुज पुत्र दिला सर्ववीरवर हो तो.
हो तूंहि पुत्रिवर[7]; बहुगुण सुजनीं अर्पिला सुवर होतो.' ७६
हरि गेल्यावरि, पांडु स्त्रीस म्हणे, 'एक वर्ष तपलीस[8]
ज्या अर्थें[9] तूं देवि! स्वव्रतनियमासि फार जपलीस, ७७
तें तप फळलें; तुज सुत देणार हरी, म्हणोनि, गुरुदत्ता
विद्या तुवां जपावी, जीची सांची[10] जगत्त्रयीं सत्ता.' ७८
कुंतीनें शुभदिवसीं, एकांतीं, इष्टकाम जाणविला.
आत्रेयदत्तविद्याहुती[11] योजूनि शक्र आणविला. ७९
इंद्रापासुनि अर्जुन होतां, तद्गुण[12] मनोरम नभोगी[13]
वर्णी, तच्छ्रवणें सुख बहु कुंतीपांडुसाधुमन भोगी. ८०
'हा रंजवील गुरुजनचित्तातें; श्रुतिरहस्य[14] कवळील;
दुग्धाब्धिफेनधवळें[15] स्वयशें कुरुच्या कुळासि धवळील[16]; ८१
लीळेनें सुरदुष्कर कर्म करिल; संगरीं न आटेल;

१. गर्व. २. दगडासारखीं कठिण अशीं शत्रूंचीं उरस्थलें. ३. घाईघाईनें. ४. घणाप्रमाणें. ५. देवाधिपति इंद्र. ६. महाभाग्यशाली. ७. पुत्रवंतांमध्यें श्रेष्ठ. ८. तप केलेंस. ९. हेतूनें. १०. खरोखर. ११. अत्रिपुत्र दुर्वासानें दिलेल्या विद्यारूपी दृतीस. १२. त्या अर्जुनाचे गुण. १३. नभस्+गी= आकाशवाणी. १४. वेदरहस्य. (आत्मज्ञान). १५. क्षीरसमुद्राच्या फेंसाप्रमाणें पांढरें असें. १६. शुभ्र करील. (हा नामधातु आहे).

फाटेल भयें याच्या द्विषदुर[1]; हा मूर्त काळ वाटेल; ८२
हा तोषवील युद्धीं त्यासहि, जो काळकंपद पिनाकी[2].
पावेल पाशुपतही, ज्या पात्र न, जऱ्हि कृती तदपि नाकी[3]; ८३
किंबहुना विष्णु जसा सुखद अदितिला, तसाचि हा तुजला;
धन्याऽसि[4] कुंति! पांडो! त्वत्क्षेत्रीं[5] कल्पवृक्ष कीं रुजला.' ८४
ऐसी अंबरवाणी झाली, शुभकुसुमवृष्टि बहु मोटी;
वाद्यध्वनि बहु झाले; आले आदित्यरुद्रमुनि कोटी. ८५
पावे दशरथगृह जें यश, पांडूटजाहि[6] जिष्णुजननीं[7] तें;
बहु मानिलें सतीनीं कुंतीतें जेंवि विष्णुजननीतें. ८६
पांडु पुन्हांहि प्रार्थी, त्यातें कुंती म्हणे, 'पुरे, लोभें
होईन बंधकी[8] मीं; क्षोभें न सनीं, इहींच बहु शोभें.' ८७
माद्री पतिप्रति म्हणे, "झाले माझ्या कुमार जांवेला[9];
सुख गमलें; म्हणत्यें मीं, 'वृद्धीतें यापरीस जा वेला!' ८८
दोघी वंध्या होतों, परि फळला सत्प्रसाद एकीला.
झाला तुम्हांसि संततिलाभ, जसा वृष्टिलाभ केकीलीं[10]. ८९
मीं मात्र मंदभाग्या; सांत्वुनि म्हणतां, 'रहा सुखें, न रडें.'
परि मुनिशापच्छेंकें[11] या हरिणीचें कवळिलें मुखें नरडें. ९०
मत्संतानार्थ तुम्हीं दयितेला[12] भीड घालितां, तरि ती
आज्ञा न मोडिती, या सवतीवरिही सती दया करिती." ९१
पांडु म्हणे, 'माझ्याही चित्तीं आहे असेंचि; पदर तिला
पसरीन; करील वचन; भंगील न ती मदियपदरतिला[13].' ९२
कुंतीस म्हणे, 'देवि! त्वद्गजनीं सादरा तुझी आली[14]

१. शत्रुहृदय. २. पिनाक नांवाचें धनुष्य ज्याजवळ तो, शंकर. ३. स्वर्गवासी. (देव). ४. हे कुंति! तूं धन्य आहेस. ५. तुझ्या पत्नीरूपी शेतामध्यें. ('क्षेत्र' हा शब्द पत्नीवाचक आहे). ६. पांडूची झोंपडी. ७. अर्जुनाच्या जन्मवेळीं. ८. जारिणी. ९. गांधारी—पंत. १०. मयूराला. ११. लांडग्यानें. १२. प्रियपत्नीला. १३. माझ्या चरणसंबंधी प्रेमाला. १४. सखी.

माद्री त्वां तारावी; हे चि न दुःखाब्धि[1]च्या तटा आली. ९३
यश बहु वाढेल तुझें; हें चि भल्यानीं जपोनि सांचविलें;
सर्वस्व वेचिलें[2], परि एक भलेपण जगांत वांचविलें.' ९४

आज्ञा स्वीकारुनि, ती, मंत्रजप करुनि म्हणे तिला, 'जावें;
पुत्रार्थ संकृत्[3] दैवत चिंतावें त्वां; सये[4] ! न लाजावें.' ९५

ती दस्रांतें[5] चिंती, तों ते पावोनि[6] म्हणति, 'हे माद्री !
द्यावें काय तुज? तुवां स्वावयवें[7] जिंकिलाचि हेमाद्री[8].' ९६

माद्री हांसोनि म्हणे, 'जाणुनि हृद्रोग, त्यासि अगदानें[9]
दूर करा, जी ! रोगी न निवे कनकाचियाहि अगदानें[10]. ९७

त्यांपासुनि ती पावे अत्यंत मनोरमांग यमळांतें[11];
नकुळ सहदेव ते बहु सुखविति त्या पांडुनेत्रकमळांतें. ९८

अणखी माद्रीविषयीं पांडु प्रार्थी पृथेसि एकांतीं.
मान्य न करी; गमे ती वृष्टि उघडली[12] मयूरकेकांतीं[13]. ९९

कुंती बोले, 'माझा उपमर्द करील ती, असें गमतें;
द्वंद्वाह्वानें[14] पुत्रद्वंद्व जिणें सहज साधिलें स्वमतें.' १००

अध्याय विसावा.

झाले पांच सुरद्रुमसम सुत, आनंद पांडुचा पिकला.
पिकें[15] लाभला बहुदिसां आम्रांला, सुरभि[16] ज्यामधें टिकला. १

---

१. [अनपत्यताजन्य] दुःखसमुद्राच्या. २. खर्च केलें. ३. एकवार. ४. सखे ! ५. अश्विनीकुमारांतें ६. येवोनि. ७. आपल्या अवयवानें. ८. सुवर्णपर्वत मेरु. (तिचे स्तन अतिशयच पुष्ट होते. त्यानीं मेरूसहि जिंकलें होतें). ९. औषधानें १०. पर्वतदानानें. ११. जुळ्या मुलांतें. १२. बंद झाली. १३. मोराच्या टाहोनंतर. १४. दोघांस बोलावण्यानें. १५. कोकिल. १६. वसंत—पंत.

त्यावरि वसंतकाळीं, एकांतीं, रम्यनंदनाभवनीं,[1]
माद्री अनुसरली, जसि सेवी त्या पूरुनंदना[2] भवनीं.[3] २
होता विरक्तिभस्माच्छादित[4] कामाग्नि पांडुहृत्कुंडीं;
फुंकिला, सुरभिवनश्रीधमनी[5] काळें[6] धरूनियां तुंडीं. ३
पावे स्मराग्नि, जागा होता, स्त्रीदृष्टिसर्पिराहुतिला.[7]
लोपे विवेकशशिरुचि[8] मुनिशापाचि[9] होय दर्पि[10] राहु तिला. ४
धृति[11] नव्हति काय? मुनिचा नव्हता तो विदित काय कोप तिला?
परि होणार चुकेना! वारूं न शकेचि बायको पतिला. ५
स्मरकाळमूढ[12] पांडु प्रेमें आलिंगुनि स्वैरामेला,[13]
सुरतीं प्रवर्तला जों, झाला मुनिशाप तो खरा, मेला! ६
दृङ्मीलन[14] निश्चलता पांडूची प्रथम भासली सुरतें.
मग मरण समजलें, हो! झालें वपु शीत कांतिभासुर[15] तें. ७
माद्री, 'हा प्राणेश्वर! हा देव!' असें करी विलाप वनीं.
ते नेउनि भेटविले क्षिप्र तिचे शब्द कुंतिला पवनीं.[16] ८
ससुता कुंती तेथें जाय म्हणे, 'हाय! माद्रि! हें काय?
शाप विदित असतां, त्वां स्पर्शों द्यावें पतीस हें काय?[17] ९
क्षणसुखलोभें मूढे! एकांतीं कांत भुलविला, साचा
केला घात! कसा गे! या व्यसनीं काम तुज विलासाचा? १०
माद्री म्हणे, 'न म्यां, नरदेव नियतिनेंचि,[18] भुलविला साचा-
बाइ! हरि[19] पुढें दिसतां आठवहि[20] करेणु[21] करि विलासाचा? ११

---

१. नंदनवनासारख्या रम्य वनांत. (आभ=सदृश). २. पूरुकुलांतील मुलगा जो पांडु त्यास. ३. गृहीं. ४. विरक्तिरूप भस्मानें आच्छादिलेला. ५. वसंतवनशोभा हीच कोणी फुंकणी. ६. मृत्युपुरुषानें. ७. स्त्रीदृष्टि हीच तुपाची आहुती, तिला. ८. विचाररूप चन्द्राची कांति. ९. किंदममुनीचा शाप. (अ० १९, गी.१० पहा). १०. उद्दाम. ११. धैर्य. १२. मदन हाच कोणी काळ, त्यानें मोहित केलेला. १३. आपल्या स्त्रीला. (माद्रीला). १४. डोळे झांकणें. १५. कांतीनें शोभणारें असें. १६. वाऱ्यानें. १७. शरीर. १८. दुर्दैवानें. १९. सिंह. २०. आठवण. २१. हत्तीण.

दीप[1]कलिकेसि धावुनि आलिंगी आग्रहें पतंग जसा,
पडला गळांचि माझ्या; रंभेच्या[2] दीप्तमद[3] मतंगजसा[4], १२
कुंती म्हणे, 'पतीसीं[5] मीं जात्यें, ऊठ, तूं मुलें पाळीं.'
माद्री म्हणे, 'मला दे आज्ञा, माझ्याचि हें असो भाळीं[6].' १३
तूंचि मुलें रक्षाया दक्षा, यादवि[7] ! न मीं, तुझी ममता
सर्वत्र तुल्य आहे; राहेल न मन्मनीं असी समता. १४
दे मज आज्ञा, स्वर्गीं पतिसह सुकृतें तुझ्याचि जाईन.
बाई ! न दया टाकीं, तेथें मीं त्वद्गुणासि गाईन.' १५
कुंतीनें माद्रीची सफळा सहगमन-कामना केली.
नियतिमनीं[8] ये त्यांचा[9] सवतीच्या ये न कां मना केली ? १६
शतशृंगवासि मुनिजन झाला तेथें समस्त एकवट;
आश्रय मुनिला[10] बुडतां, कुंतीसहि होय तोचि एक वट. १७
त्या पांडुकुटुंबातें ते साधु महर्षि गुह्यकवनांत
उघडें पडों न देती, सुकवि जसे वेदगुह्य[11] कवनांत. १८
पंच सुतांसह कुंतीप्रति समजावूनि, आपुल्या संगें,
संस्कार[12] घडायास्तव त्या दोघांचींहि आणिती अंगें[13]. १९
येउनि पुरासि केलें मुनिनीं तें स्वांघ्रिशुद्धिवृत[14] राष्ट्र.
भेटाया आणविले सत्यवती भीष्म-विदुर-धृतराष्ट्र. २०
वृत्त कथुनि, बाळ, पृथा भेटवुनीं, दाखवूनि अस्थि, 'रहा

१. दिव्याच्या ज्योतीला. २. केळीच्या. ३. मदोन्मत्त. ४. हत्तीसारखा. ५. पतीबरोबर. ६. कपाळीं. (दैवामध्यें). ७. यदुकुलोत्पन्ने ! (कुंति !). ८. दैवाच्या मनाला. ९. पांडुमाद्रींचा [सहगमनरूपी] विलास. १०. मार्कंडेयास—**पंत.** (भगवंतानीं आपली माया मार्कंडेयाच्या प्रत्ययास आणून देण्यासाठीं एकदा जलप्रलय केला असतां, मायेनेंच निर्माण झालेला एक वटवृक्ष त्याला आधारभूत झाला, अशी कथा आहे). ११. वेदांचें रहस्य. १२. उत्तरक्रिया. १३. अवयव. (दग्ध शरीरांतील अंगें, अर्थात् अस्थि, हाडें). १४. आपल्या चरणानीं केलेल्या शुद्धीनें युक्त.

धैर्यनगें, धर्मपथीं,' मुनि म्हणति, 'असाचि, अर्थ अस्थिर हा.'
मुनि गेले, झालें तें पांडुमरणवृत्त धृतिनगीं भिदुरें.
करवी उत्तरकार्य प्रज्ञाचक्षुर्मतें सुधी विदुर. २२
विध्युक्त पारलौकिक झाल्यावरि पुत्र पांडुचे गेहीं
नेले, गमले, सिरले ते पंचप्राण टाकिल्या देहीं. २३
त्यावरि मातेसि कथी व्यास कुरुकुळीं अनर्थ जो भावी;
धाडी तपोवना; कीं, ती स्वर्गीं तप करूनि शोभावी. २४
दोघी सुनांहि घेउनि, भिष्मासि पुसोनि, जाय ती न टिके.
त्यजिले आप्तजन तसे, स्वप्नींचे अर्थ ते जसे लटिके. २५
गेल्या तिघीहि उत्तमलोकीं त्या धरुनि कास योगाची.
पडली गळांचि त्यांच्या निःसीम समृद्धि दिव्यभोगाची. २६

अध्याय एकविसावा.

पांडुसुतांचीं झालीं उपनयनें ते श्रुतिस्मृती पढले.
अल्पवयांतचि पांचहि बंधु महत्वीं हळूहळू चढले. १
भीम बळी, त्यापासुनि होती धृतराष्ट्रपुत्र परिभूत.
मंत्रज्ञ सहज पाहे, पावति अत्यंत ताप परि भूत. २
ज्या त्या क्रीडेंत मुलें भीमापासूनि पावती भंग.
सन्माणिक्यमणिपुढें गोमेदांचा फिका पडे रंग. ३
भीमाच्या साहजिकें तेजें ते भंग पावति क्षुद्र.

---

१. अशाश्वत. २. धैर्यरूपी पर्वतावर. ३. वज्र. ४. सत्यवतीला. ५. अंबा व अंबालिका. ६. कास धरणें=आश्रय करणें. ७. मौंजीबंधनें. ८. पराभव. ९. पिशाच. १०. माणिक नगरांत उद्भवणारें एक रत्न. ११. सिंधुनद व हिमालय येथें सांपडणारें एक रत्न.

ऋक्षांत[1] रवि, तसा तो त्यांत महात्मा, पशूंत[2] कीं रुद्र[3]. ४
चढति फळार्थ नगीं[4] ज्या, तन्मूळीं भीम निजपदें ताडी;
लीळेनें तत्फळदळकुसुमांसह त्यांसि भूतळीं पाडी. ५
शशिरंकुपुढें[5] कैसे होतील न भग्नगर्व काळविट[6] ?
भीमबळोत्कर्षें ते खळ धरिति मनांत सर्वकाळ विट. ६
स्पर्धा करूनि साधूं जातां, भलतेंहि काज, वेगमती
न पुरे; तो भीम शशी भासे; ते सर्व काजवे गमती. ७
मारुतिसिंह[7] वधावा कपटें, तद्बंधु हेहि अवि[8] च्यारी
बांधावे, ऐसें हें योजी दुर्योधनाख्य[9] अविचारी. ८
जळकेलीचें करवी साहित्य मग प्रमाणकोटींत[10].
वरि दावि प्रेम असें, कीं, प्रेम न तत्प्रमाण[11] कोटींत. ९
ने पांडवांसि तेथें, बहुत भला भासला, न वंचकसा[12].
कळलाचि न संसर्गायोग्याचि[13], तो मूर्तपापपंचकसा[14]. १०
गेले प्रमाणकोटिस्थानीं गंगातटीं वरोपवनीं[15].
तेथ पटगृहीं[16] शोभा केली होती, जसी महाभवनीं[17]. ११
धृतराष्ट्रपुत्र, पांडव त्या सदुपवनीं, जया जसें इष्ट,
गंगातटपटसद्नीं ते भक्षिति अन्न विविध जें मिष्ट. १२
दुर्योधनें विषान्नें वाढविलीं, भीम जेविला भावें.
आदर तसा करी खळ, बहु दिवसां मित्र जेंवि लाभावें. १३
'इष्टार्थाची निश्चित सिद्धि,' म्हणे तो मनांत खळ, 'केली.'

---

१. नक्षत्रांत. २. प्राण्यांत. (पश्यंति-पाहतात-ते पशवः=प्राणिनः) ३. पशुपति, शंकर. ४. झाडावर. ५. चंद्रस्थ हरिणापुढें. ६. [बलवान् असेंहि इतर] हरिण. ७. मरुत्पुत्र भीमरूपी सिंह. ८. मेंढे. ९. दुर्योधन-नामक. १०. गंगातीरावरील एका ठिकाणीं. ११. त्याचें माप. १२. ठकासारखा. १३. सहवासास अयोग्य. १४. मूर्तिमंत पंचमहापातकांसारखा. (ब्रह्महत्या, सुरापान, सुवर्णस्तेय, गुरुपत्नीगमन आणि हीं चार पातकें करणाराशीं सहवास, हें पापपंचक). १५. सुंदर बागेंत. १६. वस्त्रांच्या गृहांत, तंबूमध्यें. १७. मोठ्या वाड्यामध्यें.

मग ते सूर्यास्तावधि करिति श्रीजान्हवींत जळकेली. १४
आले कुमार तीरीं, त्यांत बहु श्रांत भीम; गरळानें[1]
तो व्यापिला, ऱ्हद[2] जसा तैलाच्या बिंदुनें सुतरळानें. १५
जळकेलींत श्रमला, प्रथमहि सविषान्न जेविला तिपट,
निजला शीत पटगृहीं, तीरीं येतांचि मोहला निपट. १६
दुर्योधनें विषाकुळ मारुति केला निबद्ध वल्लीनीं.
पंकजवद्दुर्जातें[3] करिजेतो घात भृंगवल्लीनीं[4]. १७
दुर्योधनें बुडविला तो गंगेंत त्यजूनि अनुकंपा[5].
ऐसें अघ[6] करितां, त्या पापाची[7] पावली न तनु कंपा. १८
पाषाणसा बुडाला, खळसंगें घात हा असा घडला.
नागकुमारांवरि[8] तो जावुनि, नागालयांतरीं पडला. १९
वरि पडतां डसले ते[9] दैवें तो त्यासि होय हितें[10] दंश.
विष उतरलें अहिविषें[11]; उरला नाहींच लेशहि तदंश. २०
स्वज्ञानातें पुनरपि पावे तो, जेंवि अंध नेत्रातें;
दैवें तद्बळ त्याला झालें, तोडूनि बंधनें, त्रातें[12]. २१
बंधन तोडुनि भीमें डसले होते तनूसि जे सर्प,
गरुडें जसे, तसे ते दूर उडविले, हरूनियां दर्प[13]. २२
नागकुमारमुखें[14] श्रुत होतां आश्चर्यवृत्त तें, राजा
वासुकि पाहों आला, कुंतीचा आर्यकाख्य जो आजा[15]. २३

---

१. अत्यंत चंचलानें. २. अगदीं. ३. कमलासारख्या दुष्टानें. ४. भुंग्या-प्रमाणें जो लीन झाला त्याचे ठिकाणीं. (सूर्यास्तसमयीं कमलाचें मीलन (मिटणें) झालें असतां त्याच्या सुगंधास लुब्ध झालेला लीन भुंगा आंतच अडकून राहतो, या वस्तुस्थितीवर ही कल्पना केली आहे). ५. दया. ६. पापकृत्य. ७. पापरूप दुर्योधनाची. ८. सर्पांच्या वरीं. (पाताळीं). ९. ते सर्प. १०. हितकारक. ११. [त्या] सर्पांच्या विषानें. १२. रक्षण करणारें. १३. त्या सर्पांचा गर्व. १४. सर्पबालकांचें मुखानें. १५. कुंतीची माता भोजा, ही आर्यकनामक सर्पाची कन्या; म्हणून आर्यक हा कुंतीचा मातामह (आजा) होय.

आर्यकनाग प्रेमें भेटे भीमासि, कीं कळे नातें.
आर्यांचें[1] दूरत्वें, नसतां सहवासही, मळेना तें[2]. २४
वासुकि म्हणे, 'करावें याचें प्रिय काय, आर्यका! सार[3].
श्रांताला निववावें, इच्छितसे हेंचि कार्य कासार[4].' २५
आर्यक म्हणे, 'प्रभो! प्रिय करिसी जरि सुप्रसन्न चित्तानें,
बहु लाभ काय याला, दिधल्या मणिकांचनादिवित्तानें[5]? २६
आहे सहस्रगजबळ[6] ज्या रसकुंडीं[7] प्रतिष्ठित प्राज्ञा!
जितुका रुचेल तो रस तितुका सेवू, असी दिजे आज्ञा.' २७
रससेवनार्थ आज्ञा वासुकिची होय, दाविलें कुंड.
सुपरिश्रांतें भीमें त्या रसकुंडासि लाविलें तुंड. २८
केलीं एकोच्छ्वासें[8] एक असीं रिक्त[9] आठ रसकुंडें.
पात्रें स्वल्पजळाचीं जैसीं तृषितें गजें निहितशुंडें[10]. २९
अंश जगत्प्राणाचा[11] म्हणवुनि रस तो महातपा प्याला.
सुकृत[12] अमित नसतें, तरि लावूं देते न हात पाप्याला. ३०
एकांतीं सुखशयनीं पांडव निजला पिवूनियां सुरसा.
रूपें गुणें बळें तो सकळां नागांसि भासला सुरसा[13]. ३१
इकडे धर्म पृथेला जातांचि गृहीं पुसे, 'पुढें आला
भीम? न येतां दिसला, केला बहु शोध, काय तो झाला?' ३२
कुंती म्हणे, 'अहा! हा! दैवा! हे रीति काय गा! बरवी?'
ती प्रियपुत्रगति जसें तीस, पतिगतिहि[14] तसें न, घाबरवी. ३३
कुंती विदुरासि म्हणे, 'भावोजी! भीम भेटवा, धुंडा;
तद्रहिता हे संतति न हिता, जैसी विपुष्करा[15] शुंडा. ३४

---

१. थोरांचें. २. तें नातें. ३. उत्तम. ४. सरोवर. ५. रत्नें व सोनें आदिकरून धनानें. ६. हजार हत्तींचें बळ. ७. अमृतरसाचे कुंडामध्यें, (पात्रामध्यें). ८. एक श्वास घेण्याबरोबर. ९. रिकामीं. १०. [पात्रामध्यें] घातली आहे सोंड ज्यानें अशा. ११. जगाचा प्राण जो वायु त्याचा. १२. पुण्य. १३. देवासारखा. १४. पतीचें गमन अर्थात् मरण. १५. पुष्कर ह्म० हत्तींचें शुंडाग्र; तद्रहित.

दुर्योधन साहेना यासि जसा शिशु कणासि नयनींच्या;
वाटे, वधिला तेणें; अन्यायचि आवडे, न नय[1], नीच्या.' ३५
विदुर म्हणे ' यावरि हें येऊं देवूं नकोचि तोंडास;
रक्षीं शेष[2], न घे द्विषद्[3]हि मौना[4]स्तीकभक्ति तों डासें[5]. ३६
' त्वत्सुत दीर्घायु ' असें जें वाक्य महर्षिचें[6], न तें विसरें.
होय सदा[7]शीर्वचनें, अमृताच्याही, भलें[8] न तेंवि, सरें[9]. ३७
येईल शीघ्र कीं तो साध्वाशीर्वादपात्र[10] शिवशील[11].
निवशील सुतस्पर्शें, चिंतेला न गण[12]रात्र शिवशील.' ३८
करुनि समाधान असें गेला विदुर स्वमंदिरा; मग तो
आठ दिन निजोनि उठे; प्राणव्यसनींहि पुण्यवान् जगतो. ३९
आर्यकमतें अहींद्रें[13] सुखवाया कुंति[14]कुळपताकेला.
त्या स्थानींच वृकोदर वहु सत्कारूनि पावता केला. ४०
भीमें माता भ्राते क्षिप्र निववि्ले, तसे न घनसारें[15].
तच्चित्त[16]चातकासुख नाशी रस[17]पानवृत्तघन सारें. ४१
धर्म म्हणे, ' दुर्योधनचित्तास प्रेम नित्य नव दावा.
भीष्माविदुरावांचुनि हा अर्थ तुम्हीं परासि न वदावा. ४२
विश्वास खळीं न बरा, सावध व्हा, भय घडे अनवधानें[18];
हा[19] राज्यलुब्ध लेशहि लाजेल न गुरु-सुहृज्जन-वधानें.' ४३

---

१ न्याय. २. अवशिष्ट चार पुत्र. ३. शत्रुरूप सर्प. ४ मौनरूप आस्तीक-ऋषींची भक्ति [असे] तों. ५. चावा. (विदुर म्हणतो, असें भलतेंच बोलूं नकोस; मौन धर; म्हणजे तो शत्रु दुष्ट दुर्योधन इतर पुत्रांचा नाश करणार नाहीं). ६. व्यासाचें. ७. साधूंच्या आशीर्वादानें. ८. वरें, कल्याण. ९. सरोवरानें. १०. साधूंच्या आशीर्वादास पात्र. ११. कल्याणकारक स्वभाव ज्याचा तो. १२. वहु—**पंत.** अनेक रात्रीं. १३. नागराज वासुकीनें. १४. कुंतिभोजराजाची कुलपताकाच अशा कुंतीला. १५. कर्पूरें—**पंत.** १६. माता व बंधु ह्यांचें चित्त हाच चातक त्याचें असुख=दुःख. १७. [नागलोकीं केलेलें अमृत –] रसपानाचें वृत्त हाच मेघ. १८. बेसावधपणानें. १९. दुर्योधन.

पांडव सावध झाले, त्याले दुर्भेद्य विदुरमतकवचा;
साहति सुदुःसहा ही दुर्योधनकर्णशकुनि-हेत[1]कवचा. ४४

अध्याय बाविसावा.

गौतमपुत्र शरद्वान्[2] चापश्रुतिनिष्ठ[3] जो स्वभावानें,
पूर्वीं वज्री[4] भ्याला त्याच्या दारुणतपः प्रभावानें. १
पाठविली सुरकन्या जानपदी[5] स्वर्स्तडागनक्रानें[6],
त्याच्या उग्र तपाला विघ्न[7] करावा म्हणूनि शक्रानें. २
तो बाणधनुष्पाणी[8] मुनि जानपदी-कटाक्षशरपातें[9],
वातें तरुसा कांपे; धैर्य मनें, चाप सोडिलें हातें. ३
प्रथम सशर चाप गळे, त्यावरि तद्वीर्यही गळे क्षिप्रं[10].
होतां विघ्न, स्वाश्रम सोडुनियां जाय तो महाविप्र. ४
मुनिवीर्य शरस्तंबीं[11] पडतां होय द्विधा सुता-सुत[12] तें.
गर्भाशयीं न वसतां दिव्याकृतिलाभ संस्कृतें[13] सुततें[13]. ५
मृगयागत[14] शंतनुच्या तें मिथुन चमूचरें[15] अरण्यांत
अवलोकिलें मुनीच्या स्थानांत, ख्यात जें शरण्यांत[16]. ६
दर्भासन-कृष्णाजिन[17]-वल्कल-शर-चाप-साहचर्यानें[18],

---

१. दुष्टांच्या भाषणाला. २. कृपाचार्यांचा पिता. ३. धनुर्वेदामध्यें निपुण. ४. इंद्र. ५. जानपदीनामक एक अप्सरा. ६. स्वर्गरूप तळ्यांतील नक्र (सुरस) जो इन्द्र त्यानें. ७. हा शब्द संस्कृताप्रमाणें येथें पुल्लिंगीं योजिला आहे. ८. बाण आणि धनुष्य आहेत ज्याच्या हातांत असा. ९. कटाक्षरूप बाणांच्या प्रहारानें. १०. लगेंच, तेव्हांच. ११. शरनामक गवताच्या समूहावर. १२. मुलगी व मुलगा. १३. अतिविस्तृत अशा पुण्यकर्मानें [घडला]. १४. शिकारीसाठीं आलेल्या. १५. सैन्यांतील मनुष्यानें. १६. शरणागतावर दया करणाऱ्यांमध्यें. १७. काळविटाचें कातडें. १८. जवळ असण्यानें.

तें मुन्यपत्ययुग[1] हें निश्चित केलें सुबुद्धिवर्यानें. ७
भेटविलें शंतनुला, तेणें मुनिवीर्यजात[2] जाणोनि
परिपाळिलें 'कृप' 'कृपी' नामें ठेउनि गृहासि आणोनि. ८
येउनि निजाश्रमातें तोहि शरद्वान् महामुनि ज्ञानी,
जाणे[3] शंतनुसदनीं स्वापत्यांच्या स्थितिप्रति ध्यानीं. ९
भेटोनि कृपसुताला तो स्वधनुर्वेददाय[4] दे तात.
पुत्रांसि जोडिलें[5] धन, जेंवि सुखें बाप माय देतात. १०
गुरुच्या अनुग्रहें कृप अभ्यासें फार न पडतां खेदीं,
परमाचार्यत्वातें[6] पावे तो स्वच्छधी[7] धनुर्वेदीं. ११
भीष्में कौरव पांडव शिष्यत्वें त्यासि अर्पिले विधिनें.
ते बाळ धनुर्वेदीं सर्व पढविले कृपें कृपानिधिनें. १२

अध्याय तेविसावा.

जाय भरद्वाज मुनी गंगाद्वारीं करावया स्नान,
होय घृताची[8]-दर्शन तेथें, तों तेंचि लागलें ध्यान. १
सौंदर्यगुणोत्कर्षें[9] फारचि शोभे, जसी रति[10], घृताची.
तद्रूपें हृदयाची होय जसी, पावकें[11] गति घृताची[12]. २

---

१. मुनीचें अपत्यद्वय. (धनुर्वेदामध्यें पारंगत अशा मुनीचीं हीं मुलें आहेत असें त्या चतुर चमूचरानें ओळखलें). २. ऋषीच्या वीर्यापासून झालेलें. ३. हा चरण पोथी लिहितां लिहितांच रचून पंतानीं लिहिला आहे; कारण मूळ पोथींत ह्याच्या मागें एक चरण आहे व तो त्यानीं हरताळीनें खोडला आहे. तो चरण असा–**कळवी गोत्र नृपाला; धरि पुत्राचाहि लोभ न ज्ञानी.** ४. आपला धनुर्वेद हेंच विभागार्ह असें वडिलोपार्जित धन. ५. संपादन केलेलें ६. गुरुवर्याचे पदवीस. ७. निर्मलबुद्धि. ८. अप्सराविशेष. ९. सौंदर्य-गुणाच्या अतिशयानें. १०. मदनस्त्री. ११. अग्नीनें. १२. तुपाची.

पावे कामविकारें तत्काळ अमोघ रेत जें पतन.
द्रोण[1]कलशमखपात्रीं मुनिनें तें तेज ठेविलें जतन. ३
स्वात्युदकें[2] शुक्तिपुटीं[3] होताहे जन्म जेंवि मोत्याचें,
मुनिवीर्यें मखपात्रीं मुनिजन्म, 'द्रोण' नाम हो त्याचें. ४
पढला सांग[4] श्रुति[5] तो निजपितृशिष्याग्निवेशमुनिजवळी.[6]
अग्न्यस्त्रासि सिके, जें रिपुसि, कलिसि[7] रामनामसें, कवळी.
मित्र भरद्वाजाचें पृषत[8] नृप जसें, तदात्मज द्रुपद
द्रोणाचें, अध्ययनीं गुरुचें आराधितां सुरद्रुपद[9]. ६
जाय भरद्वाजमुनि स्वर्गातें, पृषतही; मग प्रांज्य[10]
उत्तरपांचाळांचें द्रुपद करी धर्मनीतिनें राज्य. ७
तप करितां पितरांची आज्ञा झाली म्हणोनि तो द्रोण
विधिनें वरी कृपीतें; न करील गुरूक्त[11] जाणता कोण? ८
प्रसवे कृपी सुतातें; शब्द करी उपजतां तयापरि तो
उच्चैःश्रवा सुरांचा हय हेषे[12] जयापरी करितो. ९
'अश्वत्थामा' ऐसें नाम तया ठेविलें; असें झालें
त्यावरि, त्या द्रोणाच्या कर्णाप्रति परशुरामयश[13] आलें, १०
कीं, 'तो यथेष्ट देतो सद्विप्रांकारणें[14] स्वधन कांहीं
दैन्यें[15] उरों देत नसे संप्रति, बहुमूल्य रत्नकनकांहीं. ११
दिव्यास्त्रांचा ज्ञाता मूर्तधनुर्वेद[16] नीतिशास्त्रज्ञ,
जेणें अगणित केले स्वभुजबळें सांग रणमहायज्ञ[17].' १२

---

१. द्रोणकलशनामक यज्ञपात्रीं. २. स्वातिनक्षत्राच्या उदकानें. ३. शिंपेच्या पोटीं. ४. अंगांसह. (शिक्षा, कल्प, व्याकरण, छंदस्, ज्योतिष आणि निरुक्त). ५. वेद. ६. आपल्या बापाचा शिष्य जो अग्निवेशनामा मुनि, त्याजपाशीं. ७. कलियुगास. (कलिपुरुषास). ८. द्रुपदाच्या पित्याचें नांव. ९. कल्पवृक्षासम चरण. १०. मोठें. ११. गुरूनें सांगितलेलें. १२. खिंकाळण्याला. १३. जमदग्निपुत्र परशुरामाची कीर्ति. १४. उत्तम ब्राह्मणांला. १५. विपत्ति. १६. मूर्तिमंत धनुर्वेदच असा. १७. संग्रामरूप महायज्ञ.

ऐसें परिसुनि जाय, द्रोण महेंद्राचळीं[1] तया भेटे.
ज्याचे विशिख[2] क्षत्रीं[3], व्याघ्रोंचे अविकुळीं[4] जसे पेटे[5]. १३
सांगोनि नाम गोत्र, प्रांजळि[6], वंदूनि तत्पदें, राहे.
वाग्युद्धदानशूर[7] प्रभु राम द्रोणमुनिकडे पाहे. १४
सर्वस्वें[8] प्रिय पोष्य ब्राह्मण ज्या अद्भुतप्रभा वपुसे
'वद इच्छा काय' असें द्रोणाला तो महाप्रभाव[9] पुसे. १५
तो भारद्वाज[10] म्हणे, 'इच्छितसें मीं अनंत धन, दात्या!
व्हावी तुझ्या प्रसादें तुज-मज पाहोनि लाज धनदा[11] त्या.' १६
राम म्हणे, 'विप्रजना दिधलें सर्वस्व[12], कश्यपा[13] अवनी.
अस्त्रें, शरीर आहे; अन्य किमपि राहिलें नसें भवनीं.
यांत तुला सत्पात्रा! द्यावें म्यां काय बोल आशु[14] कसा.'
'द्या दिव्यास्त्रेंचि' असें द्रोण[15]-द्विज मंजु[16] बोलिला शुकसा[17]. १८
अस्त्रें समग्र दिधलीं; सरहस्यव्रत[18] दिला धनुर्वेद.
केला स्वरूपाचि[19] परि छात्रें[20] भक्त्यर्थ उरविला भेद. १९

---

१. महेंद्र नामक पर्वतावर. २. बाण. ३. क्षत्रियांचे ठिकाणीं. ४. मेंढ्यांचे कळपामध्यें. ५. बच्चे. (मेंढ्यांच्या कळपाचा नाश जसे वाघाचे बच्चे करितात, त्याप्रमाणें ज्याचे बाण क्षत्रियांचा नाश करितात, हें तात्पर्य). ६. सन्मानपूर्वक हात जोडून. ७. वाणी, युद्ध आणि दान यांच्याविषयीं शूर. (बोलण्यांत, युद्ध करण्यांत आणि धर्म करण्यांत शूर असा भाव). ८. [स्व] शरीरासारखे. ९. मोठा प्रभाव ज्याचा तो. (परशुराम). १०. भरद्वाजमुनिपुत्र द्रोण. ११. कुबेराला. १२. सर्व धन. १३. कश्यपमुनीला. १४. लवकर. १५. द्रोण ब्राह्मण किंवा द्रोणरूपी द्विज (पक्षी). १६. मधुर. १७. पोपटाप्रमाणें. १८. गुप्त मंत्र आणि ते राखणाचे नियम, यांसह. १९. आत्मतुल्य. २०. शिष्यानें.

अध्याय चोविसावा.

मग भेटोनि द्रुपदा, द्रोण म्हणे, 'मीं तुझा सखा पहिला.'
दे क्षोभ शब्द[1] तो त्या, दंड[2] जसा स्पर्शला[3] खळा अहिला. १
पार्षत[4] म्हणे 'दरिद्रा ! तूं राज्याचा सखा कसा? मुग्धा !
मित्र सधन सधनाचें, साजे गोदुग्ध मित्र गोदुग्धा. २
न करुनि विचार वदतां पडतें शोकांत मानस; ख्यातें,[5]
विद्वत्त्वें, सधनत्त्वें तुल्यें लोकांत मान सख्यातें. ३
झालें जीर्ण[6] विरस[7] जें[8] कोण तया मंदनायका[9] ! पुसतो ?
गतरंगसुगंध,[10] जुना, पावे संमान काय, कापुस तो ? ४
श्रोत्रियसख[11] अश्रोत्रिय, शूरसख क्लीब[12] सुकविसख[13] अकवी,
आम्हां असें नसे श्रुत;[14] हंससख न मानसस्थ[15]ही बक-वि.[16]' ५
बहु बडबडे असें, दे मद्य तसें, त्यासि भाग्य मत्तत्व.[17]
मुनि मनिं म्हणे, 'न करितां परिभव, न कळेल यासि मत्तत्व.[18]' ६
मुनि त्या अपमानातें घोटी,[19] जेंवि त्रिलोचन गरातें.[20]
किमपि विरुद्ध न वदतां, गेला तो हस्तिसाह्वनगरातें.[21] ७

---

१. 'सखा' हा शब्द. २. काठी. ३. ज्यानें स्पर्श केला आहे असा (दंड). ४. पृषतपुत्र. ५. ख्यातें (प्रसिद्ध अशा) व तुल्यें (समान अशा) विद्वत्वें व सधनत्वें लोकांत सख्यातें मान [मिळतो]. ६. जुनें. ७. प्रेमशून्य. (रस=प्रेम). ८. सख्य. ९. मूर्खशिरोमणे ! १०. ज्यांचा रंग व सुगंध गेला आहे असा (कापूस). ११. वेद-वेत्त्या ब्राह्मणाचा मित्र. १२. षंढ. १३. उत्तम ज्ञात्याचा मित्र. १४. ऐकिलेलें. (ठाऊक). १५. मानससरोवरीं राहणारा. १६. बकपक्षी. १७. उन्मत्तपणा. १८. माझी योग्यता, सामर्थ्य. १९. गिळी, सहन करी. २०. विषातें. २१. हस्तीशीं समान आहे आह्व (नाम) ज्याचें अशा नगरातें. (हास्तिनापुरातें).

राहे गुप्त कृपगृहीं द्रोण, तदात्मज[1] सुशीळ[2]राशि कवी.
पार्थांसि[3] कृपानंतर अस्त्रें, कोण्हांसि न कळतां सिकवी. ८
ते कुरुकुमार करितां नगरीबाहेरि जाउनि क्रीडा.
निरुदककूपपतितनिजवीटोद्धृत्यपटु[4] पावले व्रीडा[5]. ९
ते, वृद्ध, कृश, श्याम द्रोणब्राह्मण अदूर[6] पाहोनि
निजवीटोद्धारार्थ प्रार्थिति, भवते उभेचि राहोनि. १०
द्रोण म्हणे त्यांसि, 'तुम्हीं भरतकुळज कीं, कृतास्त्र[7] कीं, तरि ती
वीटा न निघे, धिग्! धिग्! गुण तेचि स्वेष्टसिद्धि[8] जे करिती. ११
वीटा तसी स्वमुद्रा[9] टाकुनि मीं काढितों इषीकांहीं[10].
साहित्य परि करावें प्रेमें मद्भोजनांविषीं[11] कांहीं.' १२
धर्म, 'म्हणे अस्मद्गुरु कृप, तदनुमतें तुम्हांसि ही भिक्षा
शाश्वत मिळेल; दावा, वीटा काढूनि अद्भुता शिक्षा[12].' १३
हास्य करूनि द्रोणें त्या कुरुकुळजांसि द्यावया तुष्टी
कूपांत इषीकांची अभिमंत्रण करुनि सोडिली मुष्टी. १४
एकीचें मुख शिरलें वीटेमध्यें, तिला दुजी जडली,
तिसरी तीस, चतुर्थी तिजला, ऐसी परंपरा घडली. १५
बाहेरि काढिली ती वीटा तत्काळ, जेंवि पात्र गळें[13].
स्वरभंग[14] त्यांत[15] वरिला त्या पार्थांच्या मुहूर्तमात्र गळें[16]. १६
अभिमंत्रित शर सोडुनि मुद्राछिद्रांतरीं तया सिरवी,
वरि अंगुलीयकातें[17] वोढी किरणें जसें पयासि[18] रवी. १७
त्या मंत्रचमत्कारें प्रमुदित होउनि, कुमार ते प्रणती

---

१. त्याचा (द्रोणाचा) पुत्र अश्वत्थामा. २. सत्स्वभावाचा जणूं निधीच. ३. पृथेचे (कुंतीचे) धर्मादि पुत्र, त्यांस. ४. जलरहित विहिरींत पडलेली आपली विटी वर काढण्याविषयीं असमर्थ. ५. लज्जा. ६. जवळच. ७. अस्त्रविद्यानिपुण. ८. आपल्या इष्टार्थाची सिद्धि. ९. [नांव कोरलेली] आपली आंगठी. १०. दर्भसदृश तृणविशेष (कसाड), त्यांनीं. ११. विषीं=विषयीं. १२. अभ्यास. १३. गळानें. १४. गाहिंवर. १५. त्या मुलांत. १६. गळ्यानें, कंठानें. १७. मुद्रिकेतें. १८. उदकातें.

करुनि प्रेमें, 'सांगा, निज नाम, ग्राम, कुळ' असें म्हणती. १८
द्रोण म्हणे, 'सांगा हें भीष्माला ज्ञानभगनदीपाला.[1]
जाणेल तोचि लोकीं; विदित नसे काय गगनदीपाला?[2]' १९
बाळमुखें तें कळतां, भीष्म म्हणे 'परशुराम कीं द्रोण
आला असेल भाग्यें, लोकीं तिसरा असा कृती[3] कोण?' २०
श्रीगुरुसम[5] गुरुबंधु[6] प्रेमें भेटोनि निववला भीष्में.
जैसा मयूर मेघें, जो तापविला सुदुःसहग्रीष्में. २१
आणूनि राजसदनीं, पूजुनि होवूनि सानुराग[7] मनीं,
भीष्में तयासि पुसिलें कीं, 'सांगा हेतु कोण आगमनीं?' २२
द्रोण म्हणे, "परिसावें त्वां, सांगावें तुलाचि सभ्यास.
द्रुपदासि मजहि करवी चापीं गुरु अग्निवेश[8] अभ्यास. २३
गुरुबंधु सखे आम्ही होतों गुर्वाश्रमांत, वीरमणे[9]!
तेव्हां मजला ऐसें पांचाळ द्रुपद गौरवूनि म्हणे: २४
'जेव्हां काय मज सख्या! द्रोणा! देईल राज्यपद तात,
तेव्हां तद्भोक्ता[10] तूं, आण तुझी; कुळज[11] सत्य वदतात.' २५
गेला पढोनि, झाला नृप तो, झालों गृहस्थ मीं, राया!
फळली[12] सुतरत्नफळें त्यावरि माझी कृपी सती जाया. २६

---

१. ज्ञानरूप ऐश्वर्याच्या सागराला. २. आकाशदीप सूर्याला. ३. कर्तृत्ववान्, कुशल. ४. मूळ पोथींत ह्या गीतीपुढें २१ वा क्रमांक घालून लिहिलेली पुढील गीति कवीनें खोडून टाकिली असून पुन्हां २१ वाच क्रमांक घालून पोथी पुढें चालू केली आहे; यावरून पोथी लिहित असतांच कवीनें ही दुरुस्ती केल्याचें दिसून येतें.

आणविला राजगृहीं धाडुनियां सचिव आणि शिबिकेला;
भीष्में न्हीत, द्विजपति रक्षूनि, कपोतपाल शिबि केला. २१

५. गुरु परशुरामासारखा. ६. द्रोण. ७. प्रीतियुक्त. ८. द्रोणाच्या गुरूचें नांव. ९. वीरश्रेष्ठा भीष्मा! १०. त्या राज्याचा उपभोग घेणारा. ११. कुलीन पुरुष. १२. फलद्रूप झाली. (प्रसवली).

[1]धनिकापत्यकृतपयप्राशन पाहोनि, पुत्र पय मागे.
[2]पिष्टोदकें ठकवितां, तें माझ्या शल्य काळिजा लागे. २७
पिष्टोदकपान-[3]मुदित सुत [4]धनिकसुतांत चपळपद नाचे.
[5]मोहिति मज क्षणक्षण [6]त्यांच्या उपहासशब्द[7] वदनाचे. २८
बहु धन असो नसो, परि एक असावेंचि [8]गृहिगृहीं दुभतें.
घ्यावें सुतार्थ शुद्धापासुनि गोदान, [9]संन्मतें शुभ तें. २९
फिरलों बहु कीं, संतति [10]पटु तसि गोदानदी न ताराया,
[11]परि, विधि मज दे, मिळवूं जातां गोदान, दीनता, राया ! ३०
स्मरलें [12]स्वसखद्रुपदस्नेहवचन मज म्हणोनि मग, 'राहो
[13]यत्नांतर' करुनि असा निश्चय, गेलों तदीयनगरा हो ! ३१
भेटोनि तया वदलों, 'पूर्वींचा मीं सखा' असें नातें.
जें [14]तद्दत्तोत्तर तुज सांगाया योग्यसें असेना तें. ३२
परि न कथितां भल्याला [15]हृत्ताप उणा न होय, [16]शांतनवा !
तें ऐकुनि साहेसा कोण दुजा सज्जन प्रशांत नवा ? ३३
धिक्कारिति अज्ञ जसे [17]मागतया भीक सर्वदा [18]भणगा,
मज धिक्कारीः हृदयीं झाले ते शब्द सर्व दाभण, गा ! ३४
वदला असें असें कीं, 'मीं [19]संख्यानर्ह मंद,' राहो तें.
स्मरतां बहु दुःख मनीं, भीष्मा ! [20]खळजळधिमंदरा ! होतें. ३५

---

१. श्रीमंतांच्या मुलानीं केलेलें दुग्धप्राशन. २. पीठ मिसळलेल्या पाण्यानें. (तें दूध म्हणून देऊन). ३. आनंदित. ४. श्रीमंतांच्या मुलांमध्यें. ५. मूर्छित करितात, मूढ करितात किंवा वेडा करितात. ६. धनिकसुतांच्या. ७. खिजविणारे शब्द. ८. गृहस्थाचे घरीं. ९. साधूंच्या मताप्रमाणें. १०. समर्थ. ११. अन्वय—परि गोदान मिळवूं जातां विधि (दैव) मज दीनता दे. १२. आपला मित्र द्रुपद, त्याचें स्नेहयुक्त वचन. (मागें २५ वी गीति पहा). १३. अन्य खटपट. १४. द्रुपदानें दिलेलें उत्तर. १५. अंतःकरणांतील संताप. १६. शंतनुपुत्रा ! (भीष्मा !). १७. मागणाऱ्या. १८. भिकाऱ्याला. १९. स्नेहास अनुचित. २०. दुर्जनरूप सागराचें मंथन करणाऱ्या मंदरपर्वता ! (भीष्मा !).

'देईन अन्न एका दिवसाचें मात्र, पाहिजे तरि घे,'
हें सेवटीं वदे, तों कोपागारीं मदीय चेतें[1] रिघे[2]. ३६
द्रुपदकृतघ्नत्वाची येतांचि प्रत्ययासि पुष्कलता[3],
त्यजिली सभा तयाची म्यां, मधुपें जेंवि घर्मशुष्क[4] लता. ३७
आलों त्वन्नगरा मीं जोडाया अर्थ, शिष्य, यश कांहीं.
कर्ण विटविले माझे द्रुपदाच्या विरसवचनमशकांहीं[5]." ३८
नायक वीरांचा श्रीद्रोण द्रुपदोक्त सर्व आयकवी.
'हाय!' कवी[6] तोहि म्हणे, ज्याच्या मातेसि[7] शंभुसायक[8] वी[9].
भीष्म म्हणे, 'राज्य तुझें, ज्यांच्या प्राप्त्यर्थ देव नवसावे,
ते कुरुभाग्यें आले; हे पाय क्षणहि दूर न वसावे. ४०
सिद्धचि झालें सर्वहि कर्तव्य, असें तुम्हीं मनीं आणा.
बाणासन[10] विज्य[11] करा, कौरव दासानुदाससें जाणा.' ४१
प्रार्थुनि भीष्में द्रोण प्रासादीं[12] स्थापिला महेश्वरसा[13],
केला मान असा कीं, मानी तो सत्य, होय हे स्वरसा[14]. ४२
स्वपदीं कुमार सर्वहि शिष्यत्वें वाहतांचि शांतनवें,
सिकवी धनुःश्रुतिहृदय[15], व्हाया यश, करुनि शत्रु शांत, नवें.
शिष्यांसि द्रोण म्हणे, 'येतां तुमच्या कृतास्त्रता आंगा,
मच्चिंतित कार्य तुम्हीं सिद्धिप्रति पाववाल कीं? सांगा.' ४४
त्यांत म्हणे अर्जुन, 'मीं युष्मच्चिंतितसमस्तकार्यकर[16];

---

१. चित्त, अन्तःकरण. २. शिरे. ३. अतिशयता. ४. उन्हानें सुकलेली अशी. ५. प्रेमशून्य (कठोर) भाषणरूप डासानीं. ६. ज्ञाता. ७. गंगेला. (भीष्माची आई गंगा). ८. विष्णु—पंत. (शंकरानें त्रिपुरविजयाचे वेळीं विष्णूस आपला बाण बनविलें होतें). ९. प्रसवता झाला. (विष्णुचरणापासून गंगेची उत्पत्ति आहे). १०. धनुष्य. (बाणाः अस्यन्ते—क्षिप्यन्ते येन तत् बाणासनं =ज्यानें बाण फेंकिले जातात तें). ११. धनुष्याची दोरी सोडा. १२. राजवाड्यामध्यें. १३. शंकरासारखा. १४. स्वतःची पृथ्वी. १५. धनुर्वेदाचें रहस्य १६. तुम्हीं चिंतलेलीं सर्व कार्यें करणारा.

दुःसाध्य काय? असतां या माथां विजय[1]दायकार्यकर.' ४५
प्रेमें रडे पडे गुरु पार्थगळां त्या तशा उदार पणें[2].
आर्य[3] प्रसन्न होती नुसत्याहि नितोक्तिच्या[4] उदारपणें[5]. ४६

अध्याय पंचविसावा.

दिव्यास्त्रमानुषास्त्रें पार्थां शिष्यांसि पढवितां यश तें
ऐकुनि, राजसुतांचीं[6], त्यां[7] गुरुचे वरिति[8] भव्य[9] पाय, शतें. १
गुरुच्या प्रसादपदवीप्रति शिक्षोत्कर्ष[10] साधुनीं चढतां,
दुर्योधनसख कर्ण स्पर्धा पार्थासवें करी पढतां[11]. २
श्रीगुरु एका समयीं सूक्ष्ममुख[12] कमंडलु स्वशिष्यकरीं
उदक भरुनि आणाया दे; पुत्रासहि म्हणे 'तसेंचि करीं.' ३
जळ आणाया गुरुनें पुत्राच्याही करीं दिला, पर तो
विस्तीर्णमुख कमंडलु होता, कीं शीघ्र एक हा परतो. ४
उपदेशावें कांहीं पुत्रासि रहस्य, न कळतां अन्यां,
केली युक्ति असी कीं, द्यावें भक्ता विचक्षणा धन्या. ५
ऐसें गभीरतर[13], जें स्वगुरुमनोगत अगम्य तर्कशतें,
जाणे अर्जुनमनः कीं, लवहि न गुरुचरणविरहकर्कश[14] तें. ६
तत्काळ वारुणास्त्रें[15] भरुनि स्वकमंडलूंत तो पाणी,
गुरुला[16] गुरुपुत्रासह[16] जोडी तद्दास्यकृतिकृती[17] पाणी[18]. ७
याहि शहाणपणें तो अर्जुन गुरुच्या मनांत शिरला, हो!

---

१. यशदायक [असा आपला]· श्रेष्ठांचा हात. २. प्रतिज्ञा—**पंत.** ३. श्रेष्ठ, थोर. ४. नम्र झालेल्यांच्या भाषणाच्या. ५. उदारत्वानें. ६. [अन्य] राजपुत्रांचीं. ७. द्रोणाचे. ८. सेविती. ९. कल्याणरूप. १०. शिक्षणाचें आधिक्य. ११. शिकत असतां. १२. बारीक तोंडाचा. १३. अत्यंत खोल. १४. गुरुचरणांच्या वियोगाविषयीं कठोर. १५. वरुण आहे देवता ज्याची असें अस्त्र, त्यानें. १६. या ठिकाणचा खोडलेला पाठ—**करुनि निवेदन गुरुला**—असा आहे. १७. गुरुसेवेच्या कृत्यांत दक्ष. १८. हात.

ऐशां गुरुप्रियांचें पदरज एकहि कुळांत शिर लाहो. ८
कथिली रहस्यविद्या दोघांसहि; अधिक काय संतानें[1]?
संतानें[2] पुरवावी संश्रितवांछा[3] तसीच संतानें[4]. ९
त्या अर्जुनीं कराया, उपदेश करूनि सूपकारातें[5]
सांगे एका समयीं गुरु, पाचारूनि सूपकारातें[6]. १०
“[7]जाईल जरि कदाचिद्दीपक भीमानुजाशनावसरीं,
तरि मागतां म्हणावें, ‘अन्न न वाढीन या तम[8]प्रसरीं. ११
ग्रास मुखीं न पडेल, श्रमसील, तमांत जेविसील कसा?’
‘कोणीं कथिलें’ म्हणतां, वद कीं, ‘आहेचि लौकिकार्थ[9] असा.’”
झालें तसेंचि दैवें; दीप कदाचित् प्रभंजनें[10] गेला.
अशन करीताचि होता अर्जुन, तों तर्क तन्मनें केला. १२
‘[11]अत्यभ्यासें जातो, तिळहि न चळतां, मुखींच पाणि तमीं.
होईन शब्दवेधी[12] तिमिरांतहि, हें मनांत आणित मीं.’ १४
तेव्हांपासुनियां तो स्वापसुखाची[13] करूनि कुत्सा[14], हें
ऐसें मनीं धरुनि, शरसंधान करी तमांत उत्साहें. १५
बाणगुण[15]झणत्कारश्रवण करुनि, शयन सोडुनि, द्रोण
चित्तीं म्हणे, ‘अहो! शरसंधान तमांत करितसे कोण?’ १६
पाहे तों, तो अर्जुन आहे एकाग्र बाणसंधानीं;
आलिंगिला भुजानीं, प्रोष्यागत[16] पुत्र जेंवि अंधानीं. १७
आचार्य म्हणे, ‘वत्सा! स्वयश यमाचाहि नायको दंड,
लोकीं असें करीन, त्वद्धनुला अन्य काय कोदंड[17]? १८

---

१. पुत्रानें. २. साधूनें. ३. आश्रितजनांची इच्छा. ४. कल्पवृक्षानें. ५. उत्तम उपकारातें. ६. सूप=वरण, तें करणारा तो सूपकार; रूढार्थ आचारी, स्वयंपाकी. ७. प्रारंभीं ह्या चरणाची सुरुवात कवीनें पुढीलप्रमाणें केली होती—**अर्जुन करीत असतां अशन**. ८. गाढ अंधारांत. ९. लोकांतील चाल. १०. वाऱ्यानें. ११. दृढ अभ्यासानें. १२. पदार्थ प्रत्यक्ष दिसत नसतांही केवळ शब्दश्रवणानें त्या पदार्थाचा वेध करणारा. १३. निद्रासुखाची. १४. निंदा, तिरस्कार. १५. बाण व धनुष्याची दोरी यांच्या शब्दाचें श्रवण. १६. प्रवास करून आलेला. १७. धनुष्य.

तुजसम दुजा धनुर्धर लोकीं कोठेंहि आढळेनाचि.
करिन असें मीं, [1]मद्वरशब्द [2]ध्रुव होय, हा ढळेनाचि.' १९
गुरुच्या, सद्वर देतां, आवरिति न हात पादुका, नातें
तैसेंचि तें, समर्पी शिष्यासि महातपा [3]दुकानातें. २०
झाला तो गुरुसमचि, प्रथम गुणें जरिहि होय [4]बिंदु, पण
[5]दुग्धाब्धिपरिष्वंगीं त्याचें राहेल [6]तोयबिंदुपण? २१
कोणीएक [7]निषाद क्षितिपति होता सुवर्णधनु नामें.
तत्पुत्र एकलव्य द्रोणाप्रति ये [8]धनुर्निगमकामें. २२
[9]सर्वत्र समें सदयें गुरुनें त्या मात्र एकलव्याला
केलें नाहीं, जैसें विधिनें श्रुतिपात्र एकल व्याला. २३
गुरुनें आश्रय न दिला, परि तो [10]नैषादि न विटला चित्तीं.
जों जों दुर्लभ तों तों, [11]सस्पृह वितेच्छु होतसे [12]वित्तीं. २४
जाउनि वनांत, [13]मृन्मय गुरु करुनि, धरूनि [14]भावसारा धी,
[15]ताराधीशचकोरन्यायें तो साधु त्यासि आराधी. २५
पुरवी इष्ट सकळही, न [16]गुरुध्यानप्रभाव [17]नाचारी.

---

१. माझें वरदानसंबंधीं वचन. २. स्थिर, न बदलणारें. ३. शस्त्रास्त्रविद्येच्या भांडारातें. ४. [पाण्याचा] थेंब. ५. दुग्धसमुद्राच्या आलिंगनानें. ६. काकु—**पंत** (उत्तरगर्भित प्रश्न). दुग्धसमुद्रानें तोयबिंदूला आलिंगिलें असतां त्या बिंदूचें भिन्नत्व राहील काय? अर्थात् राहणार नाहीं. ७. भिल्ल, कोळी. ८. धनुर्वेद शिकण्याचे इच्छेनें. ९. अर्थ—ब्रह्मदेवानें एकल्या सर्पालाच काय ते श्रुति पात्र (कान असण्याला योग्य) केलें नाहीं, (सर्पाला कान दिले नाहींत), त्याचप्रमाणें सर्वत्र सम व सदय असलेल्या त्या द्रोणगुरूनेंहि एका एकलव्यालाच मात्र श्रुतीला=वेदाला (अर्थात् येथें धनुर्वेदाला) पात्र केलें नाहीं=धनुर्वेद शिकविला नाहीं. १०. निषादपुत्र. (एकलव्य). ११. इच्छेनें युक्त असा. १२. धनाचे ठिकाणीं. १३. द्रोणाचार्यांचें मातीचें चित्र करून. १४. भक्ति हेंच सार (सामर्थ्य) जीचें अशी. १५. चंद्रचकोरन्यायानें. (चकोरपक्षी चंद्रकिरणसेवनानें आपलें उपजीवन करितो, असा कविसंकेत आहे). १६. गुरूचे ध्यानाची शक्ति. १७. दीन, असमर्थ.

इच्छाफळें, न तैसी कल्पलता, जेंवि भावना[1] चारी[2]. २६
जें तो मृन्मय गुरु दे, सत्यहि गुरु दे न अर्जुना फळ तें.
सद्भावचि सद्गुरु पटु धन्य कराया जना, असें कळतें. २७
होवुनि सुविद्य कुरुकुळनंदन गेले करावया मृगया.
गुर्वाज्ञा कीं, 'सत्वर माघारें बहु न मारितां मृग, या.' २८
मृगया करितां शिरला [3]शशमृगहननार्थ काननीं कुतरा.
नैषादिप्रति पाहुनि भुंके, जाणों म्हणे 'धनू उतरा'. २९
श्वा बहु भुंके पसरुनि तुंडा [4]मांसास्थिवल्लभा, त्यांत
तों सप्त एकलव्य स्वशर भरी, जेंवि [5]भल्ल भात्यांत. ३०
पाहुनि पांडव म्हणती, 'ज्याचे श्वमुखांत सप्त शर भारी,
आहे [6]कृती असाही, तरि मग कां हो! नसेल [7]शरभारी? ३१
क्षत तिळहि न होतां शर भरिले श्वमुखांत जेंवि भात्यांत,
ऐसा [8]लाघवशिक्षानिधि जो भुज, अतुळ [9]वीर्यभा त्यांत.' ३२
विस्मित होवुनि पांडव शोधुनि भेटोनि त्या निषादास,
पुसती वृत्त, श्रवणें पावाया दुःसहा विषादास. ३३
तो निजवृत्त कथी, तों अर्जुनमुख उतरलें [10]विषादानें;
मोहचि पावों पाहे त्या [11]अपकर्षें जसें [12]विषाऽदानें. ३४
येउनि पुरासि अर्जुन, एकांतीं स्वगुरुला म्हणे, "गुरुजी !
स्मरती [13]स्ववरोक्ति तुम्हां [14]मत्पंचप्राणपन्नगा ! [15]गुरु जी ? ३५

---

१. भक्ति, ध्यान. २. चारिते, खाऊं घालिते, (देते). ३. ससे व हरिण यांच्या नाशाकरितां. ४. मांस व हाडें हीं ज्याला प्रिय अशा तुंडा (मुखा). ५. बाणविशेष. ६. कुशल. ७. शरभाचा वैरी. (शरभ नांवाचें एक जनावर असून तें सिंहालाही मारितें असा कविप्रवाद आहे). ८. हस्तलाघवविद्येचा सांठाच असा. ९. पराक्रमाचें तेज. १०. खेदानें. ११. अप्रतिष्ठेनें. १२. विषसेवनानें. (आदान=ग्रहण, सेवन). १३. आपली वरदानसमर्थींची उक्ति. १४. माझ्या पंचप्राणांला सर्पासारख्या (माझ्या पंचप्राणवायूंना भक्षण करणारा सर्पच) अशा गुरुजी! १५. मोठी.

‘ होसील तूंचि माझ्या शिष्यांत विशिष्टतर असामान्य;
दुसरा कोण्हीहिं जगीं छात्र न होईल तुजअसा मान्य.’ ३६
ऐसा वर देउनि, कां मदधिक लोकाधिक स्वशिष्य दुजा
केला निषादपतिसुत? सत्य असावा जगांत बोल तुजा. ३७
कौतुक विलोकिलें तें तैसें आम्हीं वनांत हो तात!
[1]शुष्यद्ध्रदमीन तसे, विकळ मनोरथ मनांत होतात.” ३८
राहे उगाचि, संकटहर युक्ति बरी मनांत पाहूनीं,
जाय वनातें गुरु, जो श्रितंतापापह[2] अनातपाहूनीं[3]. ३९
सार्जुन भारद्वाज[4] प्रेक्षाया त्या पदानता[5] पावे,
पाहुनि म्हणे, छळें[6] हे ऐसे नैष्ठिकें[7] कदा न तापावे. ४०
गुरुचरणव्रतनिष्ठा शरमोक्षाभ्यास[8] सारखा यामीं[9],
ऐसा फार बरा हा; आलों व्हायासि पारखा[10] या मीं.’ ४१
ऐसें मनांत बोलत जाय गुरु; तया निषादतनयानें
वंदुनि पूजुनि केलें सर्वस्वनिवेदनादि[11] विनयानें. ४२
द्रोण म्हणे, ‘तूं माझा जरि शिष्य, दिजे मदीय वेतन[12], हो!
केवळ विफळचि दावुनि नम्रत्व ऋजुत्व[13] मात्र वेतें[14] न हो’ ४३
नैषादि म्हणे, ‘ स्वामी! जें मज सांगाल तें निवेदीन.
प्रकटीकृतगुर्वर्थें[15] शिष्य, जसा बहुधनें निवे दीन.’ ४४
द्रोण म्हणे, ‘साधुजनीं कांहीं वेचूनि आंग[16] ठावा[17] हो.
हा दक्षिण पाणि तुझा मच्चरणीं आजि आंगठा वाहो.’ ४५

---

१. आटणाऱ्या डोहांतील मासे. २. आश्रितांचा संताप दूर करणारा. ३. छायेपेक्षां. ४. द्रोणाचार्य. ५. पदांचे ठायीं नम्र झालेल्या (एकलव्याला). ६. कपटानें. ७. निष्ठावान्. ८. बाण सोडण्याचा अभ्यास. ९. सर्वकाळ. १०. परका. ११. सर्वस्वार्पणादि. १२. पगार. (गुरुदाक्षिणा). १३. सरळत्व. १४. वेताचें झाड. १५. प्रकटलेल्या गुरूच्या कार्यानें. १६. शरीराचा अवयव. १७. ठाऊक, प्रख्यात.

दारुणतर वचन असें परिसे, परि सेकं[1] नवसुधेचाचि[2]
भावी[3], तद्यश सन्मतिचाहि हरी ताप, न वसुधेचाचि[4]. ४६
जों गुरु म्हणे, 'मदिष्ट प्रतिपादूनि[5], स्ववाक्य साच करीं,'
तोंचि छेदुनि घे तो स्वांगुष्ट व्याळदष्टसाच[6] करीं[7]. ४७
साहे छळ आनंदें, वाहे अंगुष्ट, वरि न तो पाहे,
राहे उगाचि; जाणों, देउनि अत्यल्प लाजला आहे! ४८
केली सत्कीर्ति दुणी[8], झाली संधानशीघ्रताचि[9] उणी.
तो काय घात? म्हणती कीर्तिविघातासि आत्मघात गुणी[10]. ४९
शिष्यांतरींहि होतें प्रेम, तदपि फाल्गुनींच[11] एकीं तें.
कवि म्हणति चातकातें घनभक्त जसें, तसें न केकींतें[12]. ५०
सर्वरहस्यज्ञाता गुरुपुत्र, रथप्रवीण[13] धर्म सदा;
असिधरगुरु[14] यम[15], म्हणती भीम सुयोधन, 'धरील कोण गदा?'
सर्वत्र जिष्णु[16] गुरुसा, त्या गुरुशिष्यांत एक मात्र उणें;
वृद्धत्व[17], क्षत्रत्व[17] त्यजुनि पहातां, समान सर्वगुणें. ५२
हरुनि सकळ तम, जोडा[18] होउनि सर्वार्थभासक[19] रवीला,
गुरुनें एक तरुशिरीं शिष्यपरीक्षार्थ भास[20] करवीला. ५३
तेव्हां एक उतरला अर्जुन भेदुनि शिरींच भास कसां[21].
सर्वांत मुख्य पार्थ, ग्रहनक्षत्रांत विश्वभासकसा[22]. ५४

---

१. सिंचन. २. नूतन अमृताचा. ३. मार्गी, समजे. ४. पृथ्वीच्याच. ५. देऊन. ६. सापानें चावलेला असा. ७. हस्तामध्यें. ८. दुप्पट. ९. शरसंधान करण्याची चपलता. १०. गुणवान् लोक. ११. अर्जुनाचे ठायीं. १२. मयूरांतें. १३. रथांतून युद्ध करण्यामध्यें कुशल. १४. खड्गधरांचे गुरु. १५. नकुळ सहदेव. १६. अर्जुन. १७. क्षत्रत्व व वृद्धत्व; क्षत्रत्व गुरूचे ठिकाणीं व वृद्धत्व शिष्याचे ठिकाणीं हें 'एक मात्र' उणें होतें. १८. जोडीदार. १९. सकल पदार्थ प्रकाशित करणाऱ्या. २०. नीलवर्णाचा पक्षिविशेष. (हा द्रोणानें शिल्पिजनाकडून तयार करवून शिष्यपरीक्षार्थ वृक्षाग्रीं ठेविला होता). २१. कसोटीला. २२. सूर्यासारखा.

द्रोणाच्या जंघेला[1] ग्रासी गंगेंत एकदा याद[2].
तें रक्षी जिष्णुः म्हणे गुरु, 'माझा हाँहि[3] एक दायाद[4].' ५५
होतें ब्रह्मशिरोस्त्रद्रविण[5] द्रोणें जपोनि सांचविलें,
तें जिष्णुला दिलें कीं, तेणें प्राणात्ययांत[6] वांचविलें. ५६

अध्याय सत्विसावा.

गुरुनें एका समयीं रंगीं[7] भीष्मादि सर्व मेळविले;
शिष्यांकरवीं तेथें शिक्षित शस्त्रास्त्रखेळ खेळविले. १
रचिते झाले रंगीं शिल्पिवर विचित्र मंच[8] रायाचे.
गमति विमान[9] उतरले क्षितिवरि गगनांत संचरायाचे. २
स्त्रीपुरुषरत्नशोभित बहु मोटा रंग काय वर्णवतो ?
भासे व्यक्त खवळला यादोमणिकोटिकोष[10] अर्णव तो. ३
द्रोणेंदुशिष्यरश्मि[11] स्वगुणसुधा[12] प्रकट करुनि दाखविती;
प्रेक्षकलोकचकोरव्राताकरवीं[13] यथेष्ट चाखविती. ४
झाले कुतुकफळांचे[14] श्रीधर्मादिक सुयोधनग[15] दाते;
आले घेउनि बळजळराशि[16] वृकोदर-सुयोधन गदा ते. ५
सव्यापसव्यमंडलगति[17] दोघे भ्रमति हे, मन गदानीं

---

१. पोटरीला. २. पाण्यांतील प्राणी. (मकर). ३. अर्जुन सुद्धां. ४. आप्त, बंधु. ५. ब्रह्मशिरनामक अस्त्ररूपी धन. ६. प्राणसंकटांत. (अत्यय=नाश). ७. क्रीडास्थानीं. (रंगभूमीवर). ८. मंचक=पलंग. ९. विमान शब्द संस्कृत भाषेंत पुल्लिंगींहि आहे. १०. जलचररूप रत्नकोटींचें भांडारच असा. ११. द्रोण-रूप चंद्राचे शिष्यरूप किरण. १२. आपले गुण हेंच अमृत. १३. प्रेक्षक लोक हाच चकोरसमूह, त्याकरवीं. (व्रात=समूह). १४. कौतुकरूपी फळांचे. १५. उत्तम योद्धे हेच वृक्ष. (नग=वृक्ष; न गच्छति नगः). १६. बळसागर. १७. उजव्या-डाव्या मंडलाकार गति ज्यामध्यें असें भ्रमति.

हर्षविति देखत्यांचें, अधनांचें जेंवि हेमनगदानीं[1]. ६
जन म्हणति, ' होय जैसा परिवेष[2] भ्रमवितां अलातातें[3],
भीमगदेचाहि तसा; केला अभ्यास बहु भला तातें[4].' ७
दुर्योधना हि भवता होय गदेचा तसाचि परिवेष.
'रविमंडलमध्यगहरिसम[5]' म्हणतो 'यांसि, भिन्न परि वेष.' ८
गांधारीला सांगे पुत्रविचेष्टित[6] पृथा; नृपा[7] क्षत्ता.
भीमोत्कर्षोक्ति तयां लागे दोघांसही जसी लत्ता. ९
म्हणती 'साधु[8] ! वृकोदर ! साधु ! सुयोधन !' असें तयीं कोणी.
रंगस्थितिच न केवळ, गडबडली तद्विचेष्टितें क्षोणी[9]. १०
गुरुवचनें गुरुसुत त्या दोघांच्या क्षिप्र राहवी खेळा.
ते पूर्वपश्चिमाब्धी, जाणों, द्रोणात्मजोक्ति[10] ती वेळा[11]. ११
मग राहवूनि वाद्यें, द्रोण म्हणे, 'सूनुहूनि[12] जो मजला
प्रियतर चकोर होउनि, गुरुशस्त्रास्त्रामृतांशुला[13] भजला, १२
तो जिष्णु विष्णुसा या रंगीं यावा, तयासि बोलावा;
भीष्मादि गुणज्ञजन प्रेक्षुनि तद्भुजविलास[14] डोलावा.' १३
गुरुचित्तज्ञ धनंजय ये तनुधर[15] चापवेदसा[16], रंगीं
तुरवी भान स्वगुणें, गीतें गीतज्ञ जेंवि सारंगीं[17]. १४
भेदी सूक्ष्म कठिन चल[18] लक्ष्यें[19], पळतां बसोनि तो यानीं[20],
निववि जनांसि गुणानीं, मेघ जसा चातकांसि तोयानीं. १५

---

१. सुवर्णपर्वतांच्या दानानीं. २. तेजोमंडळ. ३. कोलिताला. ४. भीमानें. ५. सूर्यमंडळाच्या मध्यभागीं असलेल्या विष्णूसारखा. ६. भीमदुर्योधनांचा पराक्रम. ७. धृतराष्ट्राला क्षत्ता (विदुर) सांगे. ८. शाबास ! ९. पृथ्वी. १०. अश्वत्थाम्याचें भाषण. ११. समुद्रमर्यादा. १२. पुत्रापेक्षां. १३. गुरूचीं शस्त्रास्त्रें हाच अमृतांशु (अमृतमय अंशु=किरण ज्याचे तो चंद्र), त्याला. १४. त्या अर्जुनाच्या बाहूंचा खेळ. १५. शरीरधारी. (मूर्तिमंत). १६. धनुर्वेदासारखा. १७. हरिणाचे ठिकाणीं. १८. चंचल. १९. निशाणें. २०. वाहनामध्यें.

अग्न्यस्त्रप्रमुखास्त्रें प्रकट करुनि, वारुणादिकें शमवी,
अर्जुन गुरुप्रसादें प्रेक्षकजनचित्तवृत्तिला रमवी. १६
होय अदृश्य प्रकट क्षणभरि अणु धरि शरीर पर्वतसें.
जनदृष्टिला मिळालें नाहींच कधींहि हर्षपर्व[1] तसें. १७
तों त्या रंगद्वारीं तलताडितबाहुशब्द[2] दुःसहसा
झाला, जसा अशनिचा[3] होतो, पडतां शिळातळीं सहसा. १८
ते अल्प मयूराचे शब्द, करिति चकित विर्मद[4] भुजगा[5] जे.
दचके मनांत रंगीं जन, जेव्हां तो प्रचंडभुज[6] गाजे. १९
द्वाराकडेचि सारे पाहति तों मूर्त[7] राशि तेज्याचा,
कर्ण शिरे रंगीं, भुजरव पविरव[8] म्हणति लोक ते ज्याचा. २०
शत्रुमदाचा[9] कर्णापासुनि व्हायासि अंत रंगांत,
अवकाश दे सुयोधन सानुज तोषोनि अंतरंगांत. २१
वाटे रंगाब्जवनीं[10] आला प्रेमासि अर्क[11] राखाया.
जनदृष्टि उड्या घालिति, बहु मास्या जेंवि शर्करा खाया. २२
भानु नसे तों, तेजें स्वस्तोत्र हिमांशु[12] कीं[13] दिवा करवी,
भीमार्जुन तेजस्वी, वृष नसतां, कीं[14] तया दिवाकर वी. २३
कर्ण[15] द्रोणासि नमुनि, बंधुत्व न जाणतां, निजा अनुजा
जिष्णुसि म्हणे, 'चमत्कृति दाखविल्या त्वां धरूनियां धनु ज्या,
त्या दावितों, चमत्कृतितटिनीशततातमेरुपर्वत[16] मीं;
भ्रमसी वृथा पृथाप्रियपुत्रा[17]! कां तूं शिरोनि गर्वतमीं[18] ?' २५
द्रोण म्हणे, 'दावावे त्वांहि चमत्कार, बोल राहो दे;

१. हर्षाची पर्वणी. २. तळहातानें थोपटलेल्या दंडांचा शब्द. ३. वज्राचा. ४. गर्वरहित. ५. सर्पाला ६. प्रचंड असा तो भुज. ७. मूर्तिमान. ८. वज्राचा ध्वनि. ९. शत्रु जो अर्जुन त्याच्या गर्वाचा. १०. रंग (प्रेक्षागार) हेंच कमलवन. ११. सूर्य. १२. चंद्र. १३. किंवा. १४. कारण. १५. गीति २४–२५ युग्म समजावें. १६. चमत्काररूपी शेंकडों नद्यांचा पिता मेरु असा मी. १७. कुंतीप्रिय-पुत्रा (अर्जुना!). १८. गर्वरूप अंधकारांत.

तव शस्त्रास्त्रचमत्कृतिरसपूरीं सर्व रंग[1] वाहो दे.' २६
कर्णें तसेंचि केलें कर्म; सुविद्या नेता[2] न कां पावे?
सुर-शेष डोलिले, मग नरमस्तक[3] कां तदा न कांपावे? २७
द्रवलें दुर्योधनमन पाहुनि शस्त्रास्त्रयानपटुतेला.[4]
अंतर्मलिन[5] द्रवतें चक्षु जसें पाहतांचि कटुतेला.[6] २८
भेटुनि म्हणे सुयोधन, 'बहु यश वाढोनि तें तगो[7] कर्णा!
बापा! भला भला गा! कार्मुकवेदत्रिनेत्रगोकर्णा.[8] २९
हें राज्य तुझें, भोगीं, भोग जसा चंदनेंद्रु[9] भुजगांनीं,[10]
आम्हीं वरिलासि; तुझे गावूं दे हे गुणाढ्य भुज गानीं.' ३०
कर्ण म्हणे, 'परि आहे एक मनीं काम, तो करीं पूर्ण.
वाटे मजसीं तिसऱ्या[11] पार्थासीं[11] द्वंद्वयुद्ध हो तूर्ण.' ३१
कलिपुरुष[12] म्हणे, 'कर्णा! अरिमूर्धमहत्त्वकक्षदव[13] डावा
त्वच्चरण हो[14], दिगंतीं त्वां रिपुजनमद समूळ दवडावा.' ३२
जिष्णु म्हणे, 'न बहातां[15] जाताति महाजनांत दाटूनि;
बोलतिहि न बोलवितां ते घडिले मूर्खकोटि वांटूनीं.[16] ३३
कर्णा! दंडक[17] रुचला तुज फार तुझा, परंतु हा नीच;
सावध हो, नाहीं तरि, होईल प्राणकीर्तिहानीच.' ३४
कर्ण म्हणे, 'काय तुझें येथें? हा रंग सर्वसामान्य.

---

१. सभा. २. नम्र पुरुषाला. ३. हा शब्द येथें पुल्लिंगीं आहे. ४. शस्त्रास्त्रांच्या गतींविषयींची जी कुशलता तिला. ५. ज्यांत मल शिरला आहे असें. ६. तिखटपणाला. (कटु म्ह० तिखट व तिक्त म्ह० कडु; पण लोकांमध्यें याच्या उलट भाषासांप्रदाय आहे). ७. टिको. ८. धनुर्वेद हाच त्रिनेत्र (शंकर) त्याचें प्रिय वसतिस्थान जें गोकर्णक्षेत्र तसा. ९. चंदनवृक्ष. १०. सर्पांनीं. ११. अर्जुनाबरोबर. १२. दुर्योधन. (कलीच्या अंशानें अवतरलेला पुरुष). १३. शत्रूंच्या मस्तकांचें जें महत्व तेंच गवत, त्यांत वणव्यासारखा. १४. होवो. १५. बोलावल्यावांचून. १६. चूर्ण करून. १७. रीति.

न वदें बहु, तुज[१] बहुधा प्राणपरिचयहि न गर्वसा मान्य. ३५
यावरि कटु वदतां, शिर उडवीन शरें, जसाचि चेंडु करें.
आदिवराहपरिभव[२] न करिजेल स्वकुळनुतिवचें[३] डुकरें.' ३६
ऐसें कर्ण वदे, तों गुर्वाज्ञेसह धनुर्लता पार्थ
स्वीकारी; तेजस्वी लोकीं वर्ते यशप्रतापार्थ[४]. ३७
पांचहि पांडव उठले; भरला उत्साह अंतरंगांत.
उठले कौरव शतही; म्हणति तदा, संत, 'हंत[५]!' रंगांत. ३८
दैवानें दाखविलें समराडंबर[६] वृथा, न नाश तदा;
परि सुतकलहारंभीं 'हाय' असें ये पृथाननां शतदा. ३९
बुडवि पृथापृथिवीला[७] जेव्हां मोहांबुनिधि[८] महा खोल;
तिस उद्धरी गुरुसुमतिदंष्ट्रेनें[९] विदुरकविमहाकोल[१०]. ४०
झाले पांडवपक्षीं[११] द्रोण कृपाचार्य भीष्म उत्साहें.
थोरांसि नावडे, श्रितसाधुत्यागें[१२] घडेल कुत्सा[१३] हें. ४१
जों नाहींच सुतांचे अन्योन्यास्त्रह्रदीं[१४] शर विझाले;
बंधुत्व त्यजुनि, सुतस्नेहें[१५] रिपुसे सुरेश-रवि झाले. ४२
कृप कर्णासि म्हणे, 'हा नृपसुत करणार तुजसवें युद्ध.
जे द्वंद्वयुद्धकर्ते वीर असावे कुळादिकें शुद्ध. ४३
गौरव[१६] हातें वाणीदेवी[१७] हि लिहों शकेचिना ज्यांचें,

---

१. तुज गर्व मान्य नाहीं, (तो जसा तूं तुच्छ लेखतोस), तसा तुला प्राणपरिचयही (स्वप्राणाची आवड हि) मान्य नाहीं [असें वाटतें]. २. विष्णूचा अवतार जो आदिवराह त्याचा पराभव. ३. स्वजातीयांच्या स्तुतिपर भाषणानें. ४. यश आणि पराक्रम याकरितां. ५. अरेरे! ६. युद्धाचे आवेश. ७. कुंतीरूप पृथ्वीला. ८. मोहरूपी समुद्र. ९. महासुबुद्धिरूप दाढेनें. १०. महावराह–**पंत**. ११. पांडवांच्या बाजूंतील. १२. आश्रित सुजनांचा त्याग केल्यानें. १३. निंदा. १४. परस्परांच्या रक्ताचे डोहांत. १५. अर्थ–अर्जुनस्नेहें सुरेश (इन्द्र) आणि पुत्र कर्णस्नेहें रवि (सूर्य) बंधुत्व त्यजुनि रिपुसे झाले. १६. महत्व. १७. सरस्वती.

[1]गौरें वहातें लोकीं यश [2]गांगस्रोतसेंचि राज्यांचें. ४४
ते पूर्वज याचे, हा कौरव [3]गौरवपदें दुकुळजात,
जाणे विश्व; तुवांही सांगावे [4]स्वान्वय, [5]प्रसू, तात. ४५
कोणांचें कुळभूषण तूं, कर्णा! प्रथम हेंचि कळवावें;
भलत्यासींच नृपसुतें द्वंद्व करुनि शस्त्रयश न मळवावें.' ४६
[6]वृषवदन उतरलें, जैं कृपवाक्शर काळजांत [7]खडतरले;
मर्म उघडितां, मानी पुरुष बुडाले [8]त्रपेंत, [9]जड तरले. ४७
अंधसुत म्हणे, 'गुरुजी! [10]जांचा; बहु सोसितो हिरा जाच.
[11]न्यायें तों, सत्कुळजहि, सैन्यपतिहि, शूर तोहि राजाच. ४८
[12]जरि जिष्णु युद्ध न करी, तरि देतों राज्य [13]अंगदेशाचें.
या कर्णाचें यश हो, झालें तें जेंवि [14]अंगदेशाचें.' ४९
ऐसें वदोनि करवी रंगीं राज्याभिषेक तो कर्णी.
भरिला [15]सुहृदी [15]क्षण [16]शिशुतृप्तिदें [17]पीयूषरसचि [18]गोकर्णी. ५०
कर्ण म्हणे, 'राज्य दिलें ऐसें तुज राजनंदना! काय
द्यावें? सांग; [19]गुणज्ञप्रीत्यधिक गमे न चंदना [20]कायें.' ५१
भूप म्हणे, '[21]अत्रुटिता धारा सरळी जसीच तैलाची,
[22]यावज्जीवं असावी त्वन्मैत्री, स्थिति धरूनि [23]शैलाची.' ५२

---

१. शुभ्र. (यश, पुण्य वगैरेंचा रंग शुभ्र असतो, असा कविसंकेत आहे). [२]. भागीरथीच्या प्रवाहासारखें. ३. मोठेपणाचें स्थान जो चंद्रवंश त्यांत उत्पन्न [झा]लेला. ४. आपलें कुळ. ५. प्रसवणारी, माता. ६. कर्णाचें तोंड. ७. आदळले, [टो]ंचले. ८. लज्जेत. ९. अभिमानशून्य, निर्लज्ज. १०. जाच करा. ११. शास्त्रा-[प्र]माणें पाहूं गेलें असतां. १२. कर्ण राजा नाहीं म्हणून जर. १३. हा भागलपुरा-[ज]वळचा देश आहे असें म्हणतात. १४. अंगदनामक वानराचा स्वामी रामचन्द्राचें. [१]५ सुहृदी क्षण? १६. बालकास तृप्ति देणारा. १७. अमृतरस. (दुग्धरस). [१]८. लहान मुलांना दूध पाजण्याचें गाईच्या कानाच्या आकाराचें एक पात्र, त्यामध्यें. [१]९. गुण जाणणाऱ्यांच्या प्रेमापेक्षां अधिक. २०. शरीर. २१. अखंडित. २२. जीव [अ]सेपर्यंत. २३. पर्वताची.

दिधला सुयोधनाला सख्यवर सुतें तसाचि सवित्याच्या[1];
अतुळोदारत्वातें[2] गाति व्यासादि सर्व कवि त्याच्या. ५३
आला तशांत तेथें अधिरथ[3], त्यातें करी नमन कर्ण.
तेव्हांचें कुतुक कथुनि रसिकीं प्रमुदित करीन मन कर्ण. ५४
अधिरथ सूत[4], तदात्मज वृष, कळतां भाव तो तसा रंगीं,
भीम वदे, जो कर्णी विभय[5], जसा सिंहपोत[6] सारंगीं[7]. ५५
'कर्णा ! वर्णाधर्म[8] तूं सूत, तुला युद्धमृति[9] नव्हे उचिता.
परगति[10] पावों पाहसि; परि पदरीं फार पाहिजे शुचिता[11]. ५६
उचित प्रतोदधारण[12] तुज, चापग्रह नव्हे उचित रंगीं.
पावनता[13] निजधर्मीं, गंगेच्याहि न तसी शुचितरंगीं[14]. ५७
अंगविषयराज्यपदीं[15] अनुचित तूं रे ! नराधमा ! उतरें.
पात्र पुरोडाशाला[16] झालें आहे कधीं तरी कुतरें ?' ५८
उपहास असा परिसे, परि सेनानीपिता[17] तसा साहे.
किंचित्प्रस्फुरिताधर[18] कर्ण व्योमस्थ[19] रविकडे पाहे. ५९
कल्यंश[20] म्हणे, "भीमा ! या बोलें मानितील विषम दहा.
न वदावें कटु पटुनें. बोले भुजवीर्यगर्वविषमद[21] हा. ६०
'जे जे कोणी क्षत्रिय त्यांसि बळ ज्येष्ठ' हेंचि सन्मत[22] रे !
अबळ न अहितोदधिला[23] घेउनिहि क्षत्रियांत जन्म तरे. ६१

---

१. सूर्याच्या. २. निरुपम औदार्यातें. ३. यालाच कर्ण हा गंगानदींत सांपडला. ४. सारथी. (ब्राह्मणीच्या ठायीं क्षत्रियापासून झालेला). ५. विगतभय. (भयरहित). ६. सिंहाचा छावा. ७. हरिणांच्या ठायीं. ८. वर्णानें (जातीनें) नीच. ९. युद्धामध्यें मरण. १०. उत्तम गति. ११. पुण्याई. १२. चाबूक धरण्याचें काम. १३. पवित्र करण्याची शक्ति. १४. शुभ्र लाटांमध्यें. १५ अंगदेशच्या राज्यपदीं. १६. हविर्भागाला. १७. कार्तिकस्वामीचा बाप शंकर. १८. किंचित्स्फुरण पावताहेत ओष्ठ ज्याचे असा. १९. आकाशांत असणाऱ्या. २०. दुर्योधन. २१. बाहुबलाचा गर्व हेंच विष, त्याचा मद=कैफ. २२. साधूंना मान्य. २३. शत्रुसागराला.

जेथें बळ गुण तो गुरु[1]; शूर बळा मानिती, न कुळशीला.
गुणहीन शाल्मलि[2] वृथा;लघु न म्हणति,भजति साधु तुळशीला.
शूरांच्या, तटिनींच्या[3] ठेविति सुगुणीं, न मन कवि प्रभवीं[4].
भजति स्वगुरुत्वेंचि; न पाहति कुळशील कनकविप्रभवीं[5]. ६३
उदकापासुनि झाला वैश्वानर[6], कृत्तिकासुत[7] स्कंद[8]
मंद प्रताप त्यांचा म्हणेल तो मूर्खतालताकंद[9]. ६४
असुरांसि जो स्वतेजें घूकांला[10] अर्कसाचि तापवितो,
झाला दधीचमुनिच्या अस्थीपासूनि जन्मता पवि [11]तो. ६५
ज्याच्या यशोमृतरसें झाली आहे सदैव धौत[12] मही,
विश्वामित्र क्षत्रियपुत्र, शरस्तंबजात[13] गौतम[14] ही. ६६
द्रोणगुरुहि कलशोद्भव[15], तुमचाहि प्रभव[16] मज असे कळला.
सांग स्वयोनिदोषें[17] तेजस्वी यांत कोण तो मळला? ६७
सर्वसुलक्षणमंडित, सकवचकुंडल, जगीं असामान्य,
तेजोराशि उपजला, वद दुसरा कोण रे! असा मान्य? ६८
प्राकृत[18] योषा[19] याची जननी, हें तों न येचि युक्तींत;
पिकतें मौक्तिक मुक्ताशुक्तींतचि[20], तें न अन्य शुक्तींत. ६९
प्रसवे व्याघ्रास मृगी? काय उकिरड्यांतही हिरा पिकतो?
जन्हि वाढला कुलायीं[21] काकाच्या काक काय रे! पिक[22] तो?
स्वल्पा न अंगराज्या, समुचित हा सार्वभौमपदवीतें.

---

१. श्रेष्ठ. २. सांवरीचा [उंच] वृक्ष. ३. नद्यांच्या. ४. मूलस्थानीं. ५. सुवर्ण आणि ब्राह्मण यांच्या उत्पत्तीविषयीं. ६. अग्नि. ७. कृत्तिकासंज्ञक नक्षत्रांचा पुत्र. ८. कार्तिकस्वामीचें दुसरें नांव. ९. मूर्खत्वरूप वेलीचा कांदा. १०. घुबडाला. ११. अन्वय—तो पवि (वज्र) दधीचमुनीच्या अस्थीपासूनि जन्मता झाला. १२. स्वच्छ. १३. गवताच्या राशीमध्यें झालेला. १४. कृपाचार्य. १५. कलशनामक यज्ञपात्रांत जन्मलेला. १६. उत्पत्ति. १७. आपल्या उत्पत्तिदोषानें. १८. सामान्य, क्षुद्र. १९. स्त्री. २०. मोत्याच्या शिंपींतच २१. घरट्यांत. २२. कोकील.

आज्ञांकरा[1] मज असें कर्णाचें भाग्य भावि वद्वीतें. ७१
हें ज्याला मानेना तेणें म्हणतील जीप्रति ज्ञाते
अत्युग्रा करुनि असी सिद्ध करावी रणीं प्रतिज्ञा ते. ७२
शत्रु उठावा आम्हांदेखत लावूनि अंघ्रि[2] चापातें;
आम्हांसि वधू[3] कीं हो[4] हतमस्तक[5] अस्मदंघ्रिच्या[6] पातें[7]." ७३
ऐसी रंगीं वदला धृतराष्ट्रकुमार तो यदा[8] वाणी,
हाहाकारें गर्जति तों रंगीं लोक तोयदांवाणी[9]. ७४
व्हावा रण[10]; परि जावुनि अस्ता तो समय साधु रवि टाळी,
क्रुद्धेक्षणांसि[11] देउनि तेज जगद्बांधवत्व[12] न विटाळी. ७५
किति म्हणति, 'रंजवाया वारुण्यबळेसि[13] अर्यमा[14] वळला.'
किति वदति 'कलि[15] न व्हावा म्हणउनि तेजस्विवर्य मावळला.'
अक्षत[16] गृहासि गेले, सर्व करी कुशळ अर्क, राहो तें;
ज्ञातसुतपृथेसि[17] तसें होय, जसें त्यजुनि शर्करा[18] होतें. ७७

अध्याय सत्ताविसावा.

द्रोण म्हणे शिष्यांसि, 'द्रविण[19] किती वाहती असु ज्ञानी.
गुरु पूजूनि सुखविला सुज्ञानीं, दुखविला असुज्ञानीं. १
द्या दक्षिणा असी कीं, द्रुपदाचा सर्व गर्व खाणावा,

---

१. आज्ञेप्रमाणें वागणाऱ्या. २. पाय. ३. वध करो. ४. होवो. ५. मारिलें आहे मस्तक ज्याचें असा. ६. आमच्या पायाच्या. ७. पतनानें—प्रहारानें. ८. जेव्हां. ९. मेघासारिखे. १०. रण व्हावा=युद्ध झालेंच असतें. ११. क्रोधयुक्त नेत्र ज्यांचे त्यांना. १२. जगाचें बंधुत्व. (सूर्याला लोकबंधु, लोकबांधव अशी संज्ञा आहे). १३. पश्चिम दिशारूप स्त्रीला. १४. सूर्य. १५. कलह, तंटा. १६. सुखरूप. १७. जाणलें आहे पुत्राला (कर्णाला) जिणें त्या कुंतीला. १८. साखर. १९. किती (कित्येक) ज्ञानी [गुरूला] द्रविणें (द्रव्य) वाहती [व कित्येक] असु [वाहती].

युद्धीं भग्न करावा, मग बांधुनि मत्समीप आणावा.' २
तें मान्य करुनि सर्वहि शिष्य रथीं प्रथम बसउनीं गुरुला,
चढले स्वरथीं स्वर्गीं तर्पाया सद्यशोमृतें[1] कुरुला. ३
सानुज[2] सुयोधन पुढें धावे, त्या पांडवांसि सोडूनीं,
व्हायास कर्ण आपण धन्य द्रोणार्थ कीर्ति जोडूनीं. ४
शिरले द्रुपदपुरींतहि, गमले जयमूळ[3] काळ तो साचें;
जिष्णुमतें[4] गुरु राहे अंतर सोडूनि अर्धकोसाचें[5]. ५
जिष्णु म्हणे, 'पावति गति[6] इतर पशु न, त्या पिनाकिच्या[7] पशुची[8].
गुरुजी! पात्र शुचि यशा या शिष्याचाचि एक चाप शुची. ६
द्रुपद बळी, हे दुर्बळ, नाहीं येणार यांसि यश कांहीं.
श्येन कसा जिंकावा? पक्षित्वमदें[9]करूनि मशकाहीं. ७
होतील भग्न कौरव, मग आम्हीं दाखवूं निजबळाला.
आधीं प्रबळपरकरें[10] दुष्टांचा पाहिजे मद गळाला.' ८
हा मंत्र[11] मना आला; मग पांचां पांडवांसह द्रोण
मागें राहे. शिशुचें म्हणुनि न घे सूक्त[12] जाणता कोण? ९
निजदेहपरिष्वंगीं[13] मानावे अमृतगोळसे तातें[14],
म्हणुनि द्रुपदपुरातें पीडिति ते, जेंवि टोळ सेतातें. १०
परि अरि सकळ पळविले द्रुपदें समरांगणांत भेटोनि,
जेंवि वृकव्याघ्रादि श्वापद दहनें वनांत पेटोनीं. ११
अरिबळभयार्त निर्भय केलें तें आपुलें पुर द्रुपदें.
अभय दिलें भीतांतें द्रोणें दासांचिया सुरद्रुपदें[15]. १२

---

१. उत्कृष्ट यशरूप उदकानें. २. आपल्या धाकट्या भावांसह. ३. तो काळासारखा द्रुपदराजाहि कौरवांस आपल्या विजयाचें मूळ आहेसें वाटलें. ४. अर्जुनाच्या अभिप्रायानुरूप. ५. [द्रुपदपुरीपासून] अर्ध्या कोसाचें. ६. स्थिति, योग्यता, साम्य. ७. महादेवाच्या. ८. नंदीची. ९. आपणहि [श्येनाप्रमाणेंच] पक्षिजातीचे आहों अशा अभिमानानें. १०. बलाढ्य शत्रूच्या हातानें. ११. मसलत. १२. सुभाषित. १३. आपल्या देहाला आलिंगन देताना. १४. धृतराष्ट्रानें. १५. कल्पवृक्षरूप पद (चरण) ज्याचे त्यानें.

धर्मासि गुरुसमीप स्थापुनि घेवूनियां तदाज्ञा, ते[1]
गेले द्रुपदनृपावरि त्याच्या उतरावया मदा ज्ञाते. १३
रथचक्ररक्षणीं यमें[2] योजुनि तत्काल वैरितां[3]पार्थ,
झाला द्रुपदमदातें स्वशरशिखिमुखांत[4] वैरितां[5] पार्थ. १४
भीम गदेतें घेउनि धांवे हो! एकशृंग[6]पर्वतसा;
गजमद जसा हरिपुढें, त्याहिपुढें शत्रुसैन्यगर्व तसा. १५
भीमगदेतें अरिबळ, जैसें मंडूककँटक[7] उरगीतें[8],
भी मग दे[9] तें पाठि[10]; व्योम भरिति तें प्रसन्न सुर गीतें[11]. १६
पांचाळ[12]बळासि न भी शिरतां तो, जेंवि सागरा मकर.
वाटे द्विजा[13]पराधें आलासे धरुनि राग रामकर[14]. १७
वेदांतीसा[15] अर्जुन, रिपुभट[16] गौतमनय[17]ज्ञसे, नाशा
तद्बळ[18] पावे, पूर्णा होय जयाची न यज्ञसेना[19]शा. १८
श्रीगुरुवरा[20]च्युतोद्धृतफाल्गुनगोवर्धनीं द्रुपदशक्र[21]
वृष्टि करी, परि झालें कौरव[22]गोपाळरोमहि न वक्र. १९

---

१. पांडव. २. नकुल, सहदेव. ३. शत्रूंना ताप देण्याकरितां. ४. आपल्या बाणरूप अग्नीच्या मुखांत. ५. अर्पण करणारा. ६. शृंग=शिखर. ७. बेडकांचें सैन्य. ८. सर्पिणीला. ९. द्रुपदसैन्य. १०. पाठि दे=पळे. ११. गायनानें. १२. पांचाळ देशचा राजा द्रुपद त्याच्या सैन्याला. १३. द्रोण–**पंत.** १४. ब्राह्मणपक्षपातित्वात्–**पंत.** राम=परशुराम+कर=हात. (परशुरामाचा ब्राह्मणाचे ठिकाणीं पक्षपात असे, म्हणून त्याचाच हात रागानें आला कीं काय असें वाटे). १५. वेदान्त जाणणाऱ्यासारखा. १६. शत्रुपक्षीय योद्धे. १७. गौतममुनिविरचित न्यायशास्त्रांत पारंगत अशा पुरुषांसारखे. (वेदान्ताच्या सिद्धान्तापुढें न्यायशास्त्राच्या सिद्धांताचें बळ टिकत नाहीं, तसें अर्जुनापुढें द्रुपदसैन्य टिकलें नाहीं). १८. त्या द्रुपदाचें सैन्य. १९. यज्ञसेन=द्रुपद, त्याची आशा. २०. श्रीगुरुचा वर हाच कृष्ण, त्यानें उचलेला अर्जुन हाच गोवर्धनपर्वत, त्यावर. २१. द्रुपद हाच इन्द्र. २२. कुरुकुलोत्पन्न पांडव हेच कोणी गवळी, त्यांचे केशही. (भागवतांतील गोवर्धनोद्धाराच्या कथेस अनुलक्षून ही गीति आहे).

खंडुनि शस्त्रास्त्रांतें लीळेनें अर्जुनें [१]अ-हीन-कुळें
क्षीण[२]मद द्रुपद [३]धराधव धरिला, हो! जसा [४]अही [५]नकुळें. २०
अर्जुनगरुडें [६]गुरुवरकार्मुकपक्षोत्थशस्त्रवातबळें,
उडवुनि [७]बळाब्धि धरिला भग्नमद [८]द्रुपददंदशूक पळें. २१
गिरिवरि [९]हरिसा चढला क्षिप्र रथीं पांडुपुत्र [१०]करवाळी,
द्रुपदासि धरी, जैसा [११]दशवदना [१२]तन्मदांतकर [१३]वाळी. २२
मग तो भीमासि म्हणे अर्जुन देवुनि दुरूनि हाकेला,
'न वधावें कटक वृथा, परतावें, भूप भग्न हा केला.' २३
हें राजरत्न दुर्लभ, परि न करुनि फारसा उपाय, नतें
पार्थें आणुनि गुरुच्या चरणयुगीं अर्पिलें [१४]उपायन तें. २४
द्रोण म्हणे द्रुपदातें, "तूं माझा, मीं तुझा, सखा पहिला.
आतां तरी म्हणों कीं, [१५]आक्रमिलें [१६]एतदर्थ या [१७]महिला. २५
द्रुपदा! तुज अभय दिलें यावरि पावो तुझी न तनु कंपा.
आम्हीं ब्राह्मण ते, ज्यां न विसंबे[१८] [१९]क्षांति, शांति, [२०]अनुकंपा. २६
[२१]गुरुकुळवासीं होतें, परि सख्य क्षीण जाहलें मग तें;
म्हणुनि अ-सुख अनुभाविलें बहु म्यां [२२]भवदीयदर्शनोपगतें. २७
'भूप सखा भूपाचा, कवि कविचा, धनिक तोचि धनिकाचा,'
ऐसें वदलासि, तुझ्या गमला हा द्रोण विप्र मनि [२३]कांचा; २८
उत्तरपांचाळपती मीं निजतेजें, न तोंड वासूनीं;

---

१. उच्च आहे कुळ ज्याचें अशा. २. हतगर्व. ३. पृथ्वीपति. ४. सर्प. ५. मुंगुसानें. ६. अत्यंत श्रेष्ठ अशा धनुष्यरूपी पंखांपासून उत्पन्न झालेल्या शस्त्र (बाण)रूपी वायूचे बळानें. ७. शत्रूची सेना हाच सागर. ८. द्रुपद हाच सर्प. (दंदशूक=अतिशयेन दशति). ९. सिंहासारखा. १०. खड्गधारी. (करवाल=खड्ग). ११. रावणाला. १२. त्याच्या गर्वाचा नाश करणारा. १३. वानराधिपती वाली. १४. नजराणा. १५. पादाक्रांत केलें. १६. या कारणास्तव. (मित्रत्वास्तव). १७. पृथ्वीला. १८. सोडी. १९. क्षमा. २०. दया. २१. गुरु भरद्वाजमुनींच्या घरीं रहात असतां. २२. तुझ्या दर्शनाकरितां आलेला जो मी, त्यानें. २३. कच्चा.

दक्षिणपांचाळपती तूंही, होसील आजपासूनीं. २९
पांचाळराज तूंही, मींही सख्यासि योग्य समशील[१]
आहे कीं नाहीं, गा! वद, वदतां मज उदार गमसील. ३०
सख्याचा लोभी मीं परि राजपणाविणें घडेना तें[२],
म्हणउनि राजा झालों, कीं न उपायांतरें[३] घडे नातें." ३१
द्रुपद म्हणे, 'ब्रह्मर्षे! तुमच्या जोडा नसेचि अनुभावा[४].
अ-तनु[५] मदपराध तदपि पूर्वस्नेह स्मरोनि तनु[६] भावा[७].' ३२
देवुनि राज्यार्ध नृप द्रोणें सत्कार करुनि बोळविला.
अहि सोडिला जसा पय पाजुनि, मनि[८], मणि हरूनि, पोळविला.
राज्यार्ध, समग्र यश द्रोणें हरिलें म्हणोनि तो मानी
पावे ताप; असा जो, लेशहि न निवेल लक्षसोमानीं[९]. ३४
आपण घट, परि पुत्राकरवीं द्रोणाब्धि आटवायाला
शोधी वरदा[१०] ऋषिला स्वयश, जगीं अतुळ[११] वाटवायाला. ३५

अध्याय अठ्ठाविसावा.

सद्गुणसिंधु युधिष्ठिर धृतराष्ट्रें यौवराज्यभाक्[१२] केला;
वरिला श्रीनें देउनि घेउनिहि गळां पडोनि भाकेला[१३]. १
जे पांडुला न वठले[१४] ते केले करद[१५] जिष्णुनें स्वारी[१६].
भीमानेंही केली तसि जसि विजयार्थ विष्णुनें स्वारी. २
म्हणती गजपुरवासी[१७] 'यांच्या लुटिला धनेश[१८] कटकांहीं[१९].

---

१. समान स्वभावाचा (दर्जाचा). २. सख्य. ३. अन्य उपायानें. ४. सामर्थ्याला. ५. मोठा. ६. अल्प. ७. माना, समजा. ८. मनामध्यें. ९. लक्षावधि चंद्रांनीं. १०. वर देणाऱ्या. ११. निरुपम. १२. युवराजपदाचा अनुभव घेणारा. १३. वचनाला. १४. वश झाले. १५. करभार देणारे. १६. स्वतःचे शत्रु. १७. हस्तिनापुरांत राहणारे. १८. धनाधिपति कुबेर. १९. सैन्यांनीं.

आले नव्हतोचि असे मागें भरिले धनें शकट[1] कांहीं.' ३
वृद्धीस पांडुसंतति बहु पावे, जेवि वन्हिची कणिका[2].
स्वसुतहितोपाय पुसे अंध नृपति नयविशारदा[3] कणिका[4]. ४
धृतराष्ट्रासि रुचेसी सांगे अत्युग्र नीति तो कणिक.
वणिक[5] ग्राहकहस्तीं[6] देतो विषसर्पिशर्करा[7]कणिक. ५
'राज्यार्थ शत्रुवध हा पुरुषार्थ' असेंचि बोलिला कणिक.
तत्कथित जंबुककथा[8] मात्र कथिन कौतुकें न मीं अणिक. ६
"कोठें व्याघ्र, वृक, नकुळ, जंबुक, मूषक[9] सखे वनीं होते;
बहु जपले, परि एका मृगकुळपतिला[10] न पावले[11] हो! ते. ७
जपति जसे पाडाया व्यसनीं[12] सुजनासि सर्वकाळ विट[13],
तेहि तसेचि; परि करी विफळचि तद्यत्न सर्व काळविट[14]. ८
चिंता करितां जंबुक त्यांस म्हणे, 'आचराल जरि सारे,
सांगेन सुयुक्ति, तुम्हीं स्वेष्टफलप्रद[15] मदुक्ति परिसा रे! ९
या आखुनें[16] करावा क्षतखुर[17] जेव्हां असेल तो[18] सुप्त[19],
व्याघ्रें मग मारावा मृगवर, परि मंत्र[20] हा करा गुप्त.' १०
करितां तसेंचि, कोल्हा त्यांसि म्हणे, 'स्नान करुनि या खाया,
तोंवरि सावध बसतों येथें मीं या मृगासि राखाया.' ११
तो स्वार्थपंडित[21] असें सांगे तें, जेंवि अंबु[22] कमळाला,
त्यांच्या मनां रुचे, दे न दिसों कपटींद्र[23] जंबुक मळाला. १२
न्हाउनि येउनि, पाहुनि दोन, पुसे व्याघ्र, 'वद, नवा घाला

१. गाडे. २. फुणगी. ३. राजनीतिज्ञ. ४. ऋषि—**पंत.** ५. वाणी. ६. गिऱ्हाइकाच्या हातांत. ७. विषयुक्त सर्पि (तूप), साखर व कणिक. ८. कोल्ह्याची गोष्ट. ९. उंदीर. १०. हरिणांच्या कळपाच्या पुढाऱ्याला. ११. मिळविते झाले नाहींत. १२. संकटीं. १३. जार, ठक, लुचे. १४. हरिणविशेष. १५. आपल्यास इष्टफळ देणारी. १६. उंदिरानें. १७. कुरतडले आहेत खुर ज्याचे असा. १८. तो काळवीट. १९. निजलेला. २०. मसलत. २१. स्वार्थाविषयीं [जणुं] पंडितच असा. २२. पाणी. २३. कपट्यांमध्यें श्रेष्ठ असा.

पडलासा कां दिससी?' सांगे तो म्लानवदन[1] वाघाला. १३
फेरु[2] म्हणे, 'परिसावें वद्ला जें किमपि आखु खोटा तें,'
'धिग् व्याघ्रातें! माझ्या सामर्थ्यें भरिल आजि पोटातें.' १४
व्याघ्र म्हणे, 'हें नलगे, घालिन मृग-यूथपीं[3] नवा घाला,
देईल या भुजांचें बळ फळ याहूनि पीनें[4] वाघाला.' १५
गेला तो तेजस्वी अभिमानी व्याघ्र भक्ष्य सोडूनि,
तों आला आखु, तया फेरु म्हणे साधुभाव[5] जोडूनीं,[6] १६
"वद्ला, '[7]व्याघ्रामिष विष; तुज खाऊं दे,' असेंचि मुंगस; 'खा'
ऐसें कसें म्हणों मीं? लघु परि तूं मेरुहूनि तुंग सखा." १७
हें ऐकतांचि वंचकवचन,[8] शरण जाय तो बिळाला[9] हो !
चित्तीं म्हणे, 'न मेलों, हाचि महालाभ मज मिळाला हो!'
वृकही आला त्याला फेरु म्हणे, 'मज मृगासि रक्षाया
ठेउनि गेला व्याघ्र; स्त्रीसह येणार सर्व भक्षाया. १९
वांच, मरसि कां लोभें? मांसाशा शीघ्र सांडें,[10] गा! जा गा!'
हें ऐकतांचि निसटे, झाला तत्काळ लांडगा जागा. २०
मग मुंगसासहि म्हणे, ' आखु, वृक, व्याघ्ररायही, नकुळा!
म्यां जिंकोनि पळविले, तेथें तुज लाभ काय हीनकुळा? २१
युद्धीं न भंगितां मज कोण मृगाला शिवे कवळ[11] खाया?
मीं श्वापद्वर आहें, परि तुज नाहीं विवेक वळखाया.' २२
नकुळ म्हणे, 'आखु, वृक, व्याघ्रहि जिंकोनि पळविले जेणें

---

१. उतरलें आहे तोंड ज्याचें असा तो कोल्हा. २. कोल्हा. ३. कळपाच्या पुढाऱ्यावर. ४. पुष्ट. ५. सद्भाव. ६. साध्य करून. (सद्भावाचें सोंग आणून असा भावार्थ.) ७. अर्थ—कोल्हा म्हणाला, "उंदरा! मला मुंगुस असें म्हणाला कीं, 'व्याघ्रसंपादित [मृग] मांस हें विषच आहे, [म्हणून मला तें नको]; तूं [मला] उंदरालाच खाऊं दे.' परंतु 'खा' असें मी कसें म्हणों? तूं लहान असलास तरी मित्र म्हणून मला मेरुपर्वतापेक्षां हि उंचच आहेस." ८. लबाड कोल्ह्याचें भाषण. ९. बिळांत पळून गेला. १०. सोडून दे. ११. ग्रास, घांस.

तेणेंसीं न झगडणें, येणेंचि भलें, न या मृतें एणें[1].' २३
ऐसे मंत्रबळें वृकनकुळव्याघ्राखु मोहुनीं चवघे,
जंबुक निर्भयचित्तें मृगमांसाची वनीं सुखें चव घे. २४
ऐसेंचि कृतप्रज्ञें[2] साधावें आत्मकार्य नैपुण्यें[3].
अघशमनार्थ[4] करावीं, होईल स्वार्थसिद्धि तैं, पुण्यें[5]." २५
विस्तरभयास्तव कणिकनीत्यंतर्गत[6] कथाचि असि कांहीं
लिहिली; इच्या श्रवणीं आदर करिजेल साधुरसिकांहीं. २६
पांडुसुतोच्छेदेच्छा[7] येतां बुद्धींत, नीति कणिकाची
भेटे, व्यभिचारेच्छा धरितां जसि कामिनीस गणिका चि. २७
परि जाणे द्रोणविदुरभीष्मकृपव्याळसन्निधानातें[8],
बहु भी अंध खणाया त्या पांडुकुमारसन्निधानातें[9]. २८

अध्याय एकोणतिसावा.

सद्गुण युधिष्ठिराचे सर्वत्र सदैव सर्व पौर वदे,
कीं, 'हा आम्हांसि तसा पूर्वीं कोण्हीं न हर्ष पौरव[10] दे. १
अरिगज विदारुनि रणीं बहु लाजविले द्विपारिज्या[11] तातें[12],
अर्थिमनोरथ[13] पुरवुनि केलें गतगर्व[14] पारिजातातें[15]. २

---

१. हरिणानें. २. ज्ञान्यानें. ३. निपुणतेनें, कुशलतेनें. ४. पापनिरसन व्हावें म्हणून. ५. सुकर्में. ६. कणिकाच्या नीतिशास्त्रांत समाविष्ट असलेली. ७. पांडवांच्या नाशाची इच्छा. ५. वेश्याच [भेटावी तसी]. ८. [द्रोणादिरूप सर्पांच्या] सान्निध्यातें. ९. पांडुपुत्ररूप उत्तम ठेव्यातें. (द्रव्याचा ठेवा ठेविलेला असतो त्या ठिकाणीं त्याच्या रक्षणाकरितां सर्पादि क्रूर प्राणी असतात; तसें या ठिकाणीं पांडव हेच कोणी उत्तम ठेवा आणि द्रोणविदुरादि हे त्याचें रक्षण करणारे सर्प असा भावार्थ). १०. पूरुकुलोत्पन्न राजा. ११. सिंहाच्या छाव्याला. (द्विप=हत्ती+अरि=शत्रु+ज). १२. धर्में. १३. याचकांची इच्छा. १४. गर्वरहित १५. पारिजातनामक कल्पवृक्षातें.

भू[1]रक्षणभर जेणें भीष्माच्या उतरिला शिरावरिला,
लंघुनि[2] धृतराष्ट्रा जो राज्यश्रीनें स्वयें हिरा वरिला. ३
त्या पांडुचा युधिष्ठिर सुत कुरुपति; योग्य अर्क राज्यातें
ज्या, त्या न दुजा ग्रह[3]; जें यश अमृतीं ये न शर्करा[4]ज्या तें. ४
राज्याभिषेक आम्हीं यास करूं; सुख न या सुखापरतें.
सुप्रभु ताट सुधेचें, कुप्रभु वांतान्नपूर्ण[5] खापर तें.' ५
पौरस्तुतधर्मगुणश्रवणें दुर्योधनादि खळ मळती.
सद्गीत[6] हरिगुण जसे श्रवणीं सिरतां पिशाच तळमळती. ६
करिति कुमंत्र सुयोधनदुःशासनकर्णशकुनि हे चवघे,
साधुद्वेषें उग्र व्यसनांत बळें बुडावया अवघे. ७
दुर्योधन एकांतीं मग गांठी निजपित्यासि भोंदाया[7].
सुतरूपी दुर्विधि[8] तो इच्छी व्यसनाननांत[9] कोंदाया. ८
ऐसें म्हणे पित्याला, "परिसा विज्ञापना अहो! तात!
जे लोकशब्द[10] कर्णीं तप्तायःशंकुतुल्य[11] होतात. ९
'धृतराष्ट्र अंध, राज्यानर्ह[12]; अनघ[13] पांडु आमुचा भर्ता.
तैसाचि युधिष्ठिरही; न पर, घनचि चातकव्यथाहर्ता.' १०
लोकानुराग[14] ऐसा, त्वांहि दिलें यौवराज्य अहितातें[15].
निजसुतशतहि बुडविले पोसूनि गृहांत पांच अहि[16] तातें. ११
'कुरुपति' असें जनें तूं असतां राष्ट्रांत पांडवा गावें,
आम्हीं सेवकभावें धरुनि करीं चापकांड[17] वागावें. १२
परपिंड[18]भक्षणास्तव निजराज्यपदच्युतिस्तव ज्ञाती[19],

---

१. पृथ्वी रक्षण करण्याचें ओझें. २. ओलांडून, अर्थात् वगळून ३. सूर्याहून इतर चंद्रादि. ४. शर्करायुक्त तुपाला. ५. ओकलेल्या अन्नानें भरलेलें. ६. उत्तम रीतीनें गायलेले. ७. फसवाया. ८. दुर्दैव. ९. संकटाच्या तोंडीं. १०. लोकांचे [धर्मस्तुतिपर] उद्गार. ११. तापलेल्या लोखंडाच्या खिळ्यासारखे. १२. अनर्ह=अयोग्य. १३. निर्दोष, निष्पाप. १४. लोकप्रीति. १५. शत्रूंतें. १६. सर्प. १७. धनुष्य व बाण. १८. शत्रू जे पांडव त्यांचें अन्न खातात म्हणून. १९. भाऊबंद.

लेवतील[1] न प्रजाही, नरकगति बरी, नव्हे अवज्ञा[2] ती. १३
दुर्गतिमहापिशाची[3] निजसंतानासि[4] झडपणी[5] न करी,
ऐसा मंत्र जपावा, यूथ[6] उपेक्षील धडपणीं न करी[7]. १४
'कैसें करूं?' असा तूं आधि[8] नरेंद्रा! धरूं नको लेश.
क्षम[9] अससी ताराया संततिस, क्षितिस जेंवि कोलेशीं[10]. १५
हे[11] वारणावताप्रति[12] दवडावे युक्तिनेंचि देवा! तें
काम तुझें; नयनीं कण, कुशळ मुखाच्या, उरों न दे, वातें. १६
युक्तिलहरीशतें त्वां उडवावीं तीं दयानदा! यादें[13];
कां राज्य वृथा देसी? कोण्हासहि यश दिलें न दायादें. १७
आम्हीं स्वपदीं होवूं नीतिवळें बद्धमूळ[14], मग राया!
करितील काय पांडव? आलेहि जऱ्ही फिरोनि नगरा या." १८
प्रज्ञाचक्षु[15] ह्मणे, 'मज हेंचि रुचे कर्म, परि महाखोटें.
भीष्मद्रोणविदुरकृपपौरांचें भय पुढें दिसे मोटें. १९
नत लोटितां पदें अपकीर्ति जगीं सह्य[16] न प्रभावज्ञा[17]:
लोका हें न घडेहि, ग्रहवृंदा[18] ग्रहपतिप्रभावज्ञा[19]. २०
हरितील अस्मदसुधन[20], धर्मप्रिय पौर एकसरतील[21],
पार्थाहिपुढें[22] तुमचे निःशेषहि यत्नभेक[23] सरतील.' २१
दुर्योधन बोले, 'हें भय न धरीं, द्रौणि मजकडे आहे:
गुरुहि मिळेल मलाचि; प्रियपुत्रवियोग कोण हो! साहे? २२

---

१. नग्न होतील. २. अपमान. ३. दारिद्रता ही मोठी पिशाची. ४. आपल्या अपत्यास. ५. झपाटा, बाधा. (पिशाचरूप). ६. समूह. (स्वजात). ७. हर्ता. ८. मनोव्यथा, चिंता. ९. समर्थ. १०. महावराह. ११. पांडव. १२. नगरविशेष. १३. पांडवरूपी जलचरें. १४. ज्यांचें मूळ जमिनींत (राज्यभूमींत) पुष्कळ खोल गेलें आहे असे. १५. धृतराष्ट्र. १६. सहन करितां येण्याजोगी. १७. पराक्रम जाणणाऱ्यास. १८. ग्रहांच्या समुदायाला. १९. सूर्यतेजाचा अपमान. २०. आमचे प्राण आणि धन किंवा प्राणरूप धन. २१. एकवटतील. २२. अर्जुनरूप सर्पापुढें. २३. प्रयत्नरूप बेडूक.

त्यजिजेल कृपाचार्यें निजसर्वस्वहि सुखें, परि न [1]भाचा;
भीष्महि मध्यस्थ सदा, दंडक[2] याचा जयापरि [3]नभाचा. २३
पांडवविवासनातें[4] जरि असति समर्थ पौर[5] वाराया.
मीं वश करीन दानें मानें सर्वांसि पौरवा! राया! २४
आहेत कोश[6] हातीं, लोकांचें रंजवीन मन दानें.
विश्ववशीकरणाचा[7] घ्यावा नलगेचि मंत्र धनदानें[8]. २५
हे आह्मीं काय दिवे? तेजस्वी काय हा रवि? [10]दुरापें
न दुर्जी; परि या कार्यी नेईल न कीर्ति हार विदुरापें[9].' २६
ऐसें वदोनि, मोही त्यास प्रतिकूळ काळ सुतरूपें.
हतभाग्य अशुभचिंतन कां न करी पारिजात-सु-तरूपें[11]? २७
आप्तजनमुखें[12] कळवी 'पशुपतिची[13] वारणावतीं यात्रा,
कीं ती सेवावीच प्राज्ञें भवरोगहरे[14] महामात्रा.' २८
विदुरास उमजलें कीं, बुडवाया कीर्ति सुतप दोदानें[15]
केला मंत्र, व्यसनीं पाडाया पांडुसुत पदादानें[16]. २९
धर्म ह्मणे, 'राजा कां जा ह्मणतो वारणावता? रचितो
कांहीं घात सुयोधन मदांधदिग्वारणावतारचि[17] तो?' ३०

---

१ अश्वत्थामा. २. पद्धति, रिवाज. ३. आकाशाचा. (आकाश सर्वांस सदा सारखें असतें). ४. पांडवांना बाहेर घालवून देणें या गोष्टीस. ५. पुरजन. ६. खजिने. ७. जगाला वश करण्याचा. ८. कुबेरानें किंवा द्रव्य देणाऱ्यानें. ९. हा विदुर. १०. अन्वयार्थ—[विदुराला] दुर्जी [कार्यें] दुरापें (दुष्प्राप्य, दुःसाध्य) नः परि या [पांडवांना बाहेर घालविण्याच्या बाबतींत आमचा विरोध करण्याच्या] कार्यी [मात्र] कीर्ति विदुरापें (विदुराकडे) हार (माळ) न नेईल (कीर्ति विदुराला वरणार नाहीं, विदुर यशस्वी होणार नाहीं). पंतानीं ही आर्या पोथीच्या समासावर मागाहून लिहून येथें समाविष्ट केली आहे. ११. पारिजातासारख्या कल्पवृक्षापाशीं [सुद्धां]. १२. यथार्थ बोलणाऱ्या लोकांकडून. १३. शंकराची. १४. संसाररूपी रोगाचें हरण करणारी. १५. वडील बंधूनें. (धृतराष्ट्रानें). १६. राज्यपद घेण्यानें. १७. मदोन्मत्त दिग्गजाचा [जणुं] अवतारच.

पांडवहि ह्मणति, 'पाहूं, वाहूं वंदूनि शंकरा बेल.
रावति[1] सुर भजनीं[2], मग कोण न होउनि विशंक राबेल?' ३१
तें आप्तमुखें कळतां, धृतराष्ट्र ह्मणे तयांसि, 'बाळक हो!
जा वारणावता, जरि जाणार तुह्मीं गुरूक्तिपाळक हो! ३२
पशुपतिचा यात्रोत्सव आतृप्ति[3] पहा, रहा, वहा रत्नें
देवब्राह्मणचरणीं, धनवस्त्रान्नें जनांसि द्या यत्नें. ३३
तेथें कांहीं काळ स्वर्गी सुरसे सुखें वसा, मग या;
पितरां बहु सुख देत्ये केली[4] आज्ञा जसी, तसी न गया[5].' ३४
धर्म ह्मणे, 'बहु बरवें, ताता! हा तारक त्वदुपदेश.
झाला गुरुवाक्यादृत[6] पूरु[7] महात्मा स्वयें यदुपदेश[8].' ३५
'पशुपतिपाद पहाया पाहूं तें वारणावत नरा[9]! जे[10]
आपण होतात, करुनि संकटविनिवारणा वतन, राजे.' ३६
जाणार पांडुसुत तों खळ दुर्योधन पुरोचना[11] यवना
आधींच पुढें धाडी, करवाया प्राणनाशका भवना[12]. ३७
सानुज युधिष्ठिर निघे मग जाया वारणावता, राजा[13]
आलिंगूनि ह्मणे त्या भूभारनिवारणावतारा[14] 'जा.' ३८
भीष्मादिगुरुजनातें नमुनि ह्मणे, 'अढळ[15] आप्तता राहो,
व्हा विरहाब्धींत मला सेतु तुह्मीं सर्व आप्त तारा हो!' ३९
कुंती-सहित निघाले पांडव, तेव्हां तयांसि पाहोनि,
विप्रादि पुरस्थ ह्मणति, 'आह्मां सुख काय येथ राहोनि? ४०

---

१. खपती. २. सेवेंत. ३. तृप्ति होईपर्यंत. ४. [मान्य] केलेली. ५. प्रसिद्ध पुण्यक्षेत्र. ६. पित्याचें वचन मानिलें ज्यानें तो. ७. ज्यानें पित्याची आज्ञा म्हणून त्याच्या जरेचा स्वतां अंगीकार केला व आपलें तारुण्य त्याला दिलें, तो ययातिराजाचा पुत्र. ८. यदूच्या पदाचा (राज्याचा) अधिकारी. ९. हे अर्जुना! १०. जे पशुपतिपाद. ११ दुर्योधनाच्या मित्राचें नांव. १२. गृहा. १३. धृतराष्ट्र. १४. भूभार निवारण्यासाठीं अवतार ज्याचा अशा धर्माला. १५. दृढ, स्थिर.

अंध परि धूर्त; लोकीं[१], नाहीं दुसरा असा धुतारा[२] या.
आह्मां बुडवाया क्षम होय, नव्हे हा असाधु ताराया. ४१
आंतहि अंधचि[३]: गारा वेंचुनि टाकील कां कवि हिऱ्यांतें?
गंगा टाकुनि जाइल अज्ञचि, जळ ज्यांत टांक[४], विहिऱ्यांतें[५]. ४२
देवा! विश्वपते! या पांडुनृपसुतांसि पाव; कपटानें
खळचि बुडावे, व्हावें भस्मचि, बांधोनि पावक[६] पटानें. ४३
जरि कंडिलाँ[७] तऱ्हि हिरा, स्तविलाहि शिरीं चढे न शिरगोळा[८].
तो हारवील निजशिर, जो खळ करणार साधुशिर गोळा.' ४४
धर्म म्हणे, 'भवदाशीर्वाद[९] खरे स्वर्द्रुचे[१०] सखे, दानें
देतील इच्छिलीं; कां करिजेल मनीं निवास खेदानें[११]?' ४५
म्लेंच्छांच्या भाषेनें विदुर महात्मा हितोपदेश तदा
धर्मासि करी, त्याच्या धृतिला मतिलाहि ओप[१२] दे शतदां. ४६
'कथिलें पुरोचनाला तुमचे अग्नींत काय[१३] होमाया[१४];
सावध व्हा. साधूंची स्वार्थपरखळासि काय हो माया? ४७
गृह करविलें असे तें दहनौषधमय[१५], तयांत उतरा[१६] हो!
दावा विश्वास खळा, कोपविषाचा मनींच उत[१७] राहो. ४८
करिल सुरुंगपंथ[१८] तुम्हां जाया माझा सखा सुखनक[१९] वनीं.
अवनीं[२०] तुमच्या मज जें रसिकाच्याहि रसिका सुख न कवनीं.
तेथुनि रात्रौ ठकवुनि विश्वासें तो चला, भय वनातें
जातां त्यजा; गृहा द्या अग्नि, घडो तोच लाभ यवनातें.' ५०

१. या लोकीं. २. ठक, फसविणारा. ३. आंतहि अंधचि=विचारशून्य असा (धृतराष्ट्र). ४. बिंदुमात्र. ५. झऱ्यांतें. ६. अग्नि. ७. तिरस्कारिला. ८. एक प्रकारचा दगड. ९. तुमचे आशीर्वाद. १०. स्वर्गांतील वृक्षाचे. (कल्पवृक्षाचे). ११. मनांत खेद निवास करणार नाहीं हें तात्पर्य. १२. उजळा, उत्तेजन, प्रोत्साहन. १३. शरीर. १४. जाळावया. १५. ज्वालाग्राही पदार्थांनीं भरलेलें. १६. रहा, बिऱ्हाड करा. १७. कढ, उमाळा. १८. बिलमार्ग, भुयार. १९. शब्दार्थ–चांगलें खणणारा; परंतु येथें हें सार्थ विशेषनाम आहे. २०. रक्षणीं.

[1]मृतिहर मंत्र असा [2]तो सन्मतिचा साधु सोयरा शिकवी,
परते, परि पांडुतनयविरहौर्वा[3] होय तोयराशि[4] केवी[5]. ५१
कुंती पुत्रासि म्हणे, ‘वदला तुजसीं रहस्य काय कवी ?’
धर्म तिला संक्षेपें विदुरोक्तांतील सार[6] आयकवी. ५२
मग वारणावतीं नृप घनसा, पुरजनहि होय चातकसा.
म्हणति भले, तरिच नसे येथ, न लाजेल पारिजात कसा ? ५३
स्तविति नृपा पौर, जसे चातक सेऊनि तोय वनदास[7]
स्थापी लाक्षासदनीं[8], दावुनि बहु भाव, तो यवन दास. ५४
जातांचि धर्म त्या शतदुष्टांचें[9] कृत्य, मतहि अंधाचें,
भीमादिकांसि कळवी करवुनियां ग्रहण भित्तिगंधांचें[10]. ५५
‘सांडुनि हे कणं[11], घेसी पदरीं तनुजा[12] तुषां[12] अगा! राया!
ते[13] उचित प्रासादा[14], पांडुतनय जातुषा[15] अगारा या?’ ५६
ऐसें पांडव म्हणती, धृतराष्ट्रा आठवूनि हळहळती.
चिंतामणि हारवि जो तत्सुहृदांची[16] तसीच हळहळ ती. ५७
म्हणती, ‘जाणविली या कर्में निज नरकनिष्ठता[17] तातें;
साक्षात् ‘धर्म’ म्हणावें, न म्हणावें ‘नर’ कनिष्ठतातातें[18].’ ५८
करुनि दृढ मंत्र मनहीं, होते विश्वस्तसेचि[19] त्या भवनीं.
यवनीं दयाचि दाविति, पाहति मृगयामिषेंचि मार्ग वनीं. ५९
भेटे विश्वासनिधि स्नेहार्थी विदुरसचिव[20] तो खनक.
धर्म म्हणे, ‘संरक्षीं आम्हां तूं रक्षितो जसा जनक.’ ६०

१. मरण चुकविणारा. २. विदुर. ३. पांडवांचा वियोग हाच एक वडवानल. ४. सागर. ५. ज्ञाता. (विदुर). ६. महत्वाचा भाग. ७. मेघास. ८. लाख वगैरे ज्वालाग्राही पदार्थांनीं केलेल्या घरीं. ९. दुर्योधनादिक शंभर दुष्ट भावांचें. १०. भिंतीच्या वासाचें. ११. [आम्ही पांडवरूपी] धान्याचे कण. १२. दुर्योधनादि पुत्ररूपी कोंड्याला. १३. दुर्योधनादि. १४. राजवाड्याला. १५. जतु=लाख, तन्निर्मित. १६. त्याच्या मित्रांची. १७. नरकाला जाण्याविषयींची मनाची आवड. १८. विदुरातें. १९. विश्वास पावलेल्या मनुष्यासारखे. २०. मंत्री. (मित्र).

विवर जतुगृहांत करी कळवी, ‘करितों पुरासि खंदकसें.
जाणेल विदुर मंत्रितं[1] तें तो सज्जनवधेच्छु मंद कसें’? ६१
विळमार्ग सिद्ध होतां धर्म म्हणे स्वानुज्यांसि, ‘हा यवन,
सा[2] जीव अन्य घालुनि करुनि स्वकरें प्रदीप्त हें भवन, ६२
रात्रौ पळों[3]; न काहीं विप्राराधनमखा[4] विलंब करा.’
बकराजसा[5] जपे[6], परि ठकिला खळ, काय हरिपुढें बकरा? ६३
कुंतीचें व्रत कांहीं, व्हावी तत्सांगता असें छद्म[7]
करुनि, ब्राह्मणभोजन केलें, जें जाळणार तें सद्म[8]. ६४
पौरवधू आणविल्या, न्हाणविल्या, गौरवूनि लेवविल्या;
देवविल्या सदलंकृति[9], सूर्यास्तावधि समस्त जेवविल्या. ६५
अन्नार्थी जे आले त्यांसि म्हणे धर्मराज, ‘जेवा, या.’
तों आली पंचसुता[10] एक निषादी[11] हि तेथ जेवाया. ६६
जेउनि यथेष्ट पुत्रांसह मद्यहि सेविलें निषादीनें.
काळें आदर दावुनि देतां प्यावें न कां विषा दीनें? ६७
मद्यें भुले निषादी, पडले तत्सुतहि पासले शवसे[12].
कोणाच्याही हृदयीं देहस्मृतिचा न वास लेश वसे. ६८
ज्यासि पृथा भी, जैसी व्याघ्राच्या सावधान गाय वना,
त्या भवना जो राखे, ये नीज अघाचिया[13] नगा यवना. ६९
‘विश्वासघात यवना न घडो, हो सुख, न आपदा सांस[14].’
ऐसें विचारितां, तें साधूंच्या काय पाप दासांस? ७०
विवरीं शिरले, भवनद्वारीं लावूनि वीतिहोत्रा[15] ते.
पळतां वनांत [16]तिमिरीं, बहु भीतांचे[17] हि भीति हो! त्राते. ७१

१. मसलत. २. सहा अन्य माणसें. ३. पळून जाऊं या. ४. द्विजपूजनरूप यज्ञाला. ५. अट्टल बगळ्यासारखा. ६. टपत होता. ७. कपट. ८. घर. ९. चांगले दागिने. १०. पांच मुलें असलेली. ११. कोळीण. १२. प्रेतासारखे. १३. पापाचा पर्वतच अशा. १४. सहाजणांस. १५. अग्नीला. १६. अंधारीं. १७. भीतांचे त्रातेहि.

वाहे पृथेसि पृष्ठीं, हस्तीं धरि भीम अग्रजा[1], अनुजा[2],
यमळांसि[3] कडेवरि घे, तोचि गमे म्हणति 'अंजनाजनु'[4] ज्या. ७२
तेज न साहति त्याचें गहनीं[5] व्याघ्रादि काननौके[6] तें.
दे लाज विमानातें, मग दे तो भीम कां न नौकेतें? ७३
सत्संगें लाजेला, भीमबळें तेंवि तूर्ण अटवीला[7]
तरले मुमुक्षुसे[8] ते, तो खळ[9] षड्वर्गसाचि[10] फटवीला. ७४
विदुराप्तपुरुष[11] भेटे, दावी सांगोनि नाम नावेला.
ते म्हणति, 'कळे बोला[12], देवांच्या जेंवि कामना वेला.' ७५
विदुरप्रेषिततरिनें[13] तरले गंगेसि ते सुखें क्षिप्र[14].
हरिदत्तविरक्तिबळें[15] तरति महासिद्धिला जसे विप्र[16]. ७६

अध्याय तिसावा.

गृह जळतां पौर म्हणति, 'हा[17]!' कळलें त्यांसि कर्म फटकळ[18] तें.
गुप्त करी, सदसत्कृत[19], तत्काळ दहाजणांस अटकळतें[20]. १
अग्नि विझवितां, करितां शोध पुरजनीं, शिरोनि खनकानें
बिळ भस्में भरिलें, बुध भरि सूचकवदन[21], जेंवि कनकानें[22]. २

---

१. वडील बंधु. (धर्म). २. धाकटा बंधु. (अर्जुन). ३. नकुळसहदेवांना. ४. मारुति. (अंजनेपासून जनु म्ह० जन्म ज्याचें तो). ५. अरण्यामध्यें. ६. कानन=अरण्य हेंच ज्यांचें ओक=घर, ते वनचर. ७. अरण्याला. ८. मोक्षेच्छूसारखे. ९. यवन. १०. कामक्रोधादि षड्रिपूंप्रमाणेंच. ११. विदुराचा विश्वासु पुरुष. (सुखनक). १२. बापाला. ज्याप्रमाणें [याचकांच्या] इच्छा देवांच्या वेला (कल्पलेतला) समजतात त्याचप्रमाणें विदुराला [सर्व] कळतें. १३. विदुरानें पाठविलेल्या नौकेनें. १४. सत्वर. १५. ईश्वरानें दिलेल्या वैराग्याचे सामर्थ्यानें. १६. ब्राह्मण. (सत्पुरुष). १७. हाय! १८. दुष्ट. १९. चांगलीवाईट अशी कृति. २०. ज्ञात होतें, कळून येतें. २१. चहाडखोराचें तोंड. २२. सुवर्णानें. (द्रव्यानें).

ते सा प्राणी पाहुनि पौर म्हणति, 'हाय! काय हें कर्म?
हा! धृतराष्ट्रा! पांडवघातीं त्वां कोण देखिला धर्म? ३
यवना! युक्तचि तुज हें, न विलंब फळासि साधुहानीच्या;
जा नरका; कां वधिले वदान्य[1] विश्वस्त[2] साधु हा! नीचा?' ४
तें ऐकोनि ससुत धृतराष्ट्र रडे, म्हणुनि विदुर तोहि रडे;
कीं अंधें अमृतफळें टाकुनि पदरांत घेतले हिरडे. ५
करवी क्रिया, नृप रडे, पुत्रहि दुर्योधनादि सोंगाळा.
विदुरनयनें म्हणति, 'जळ[3] द्या खळ दुर्योधना दिसों, गाळीं[3].'
दुःख तिहीं[4] अनुभविलें जें कोण्हींही कधींहि न वनीं तें.
अति सुकुमार शरीरें त्यांचीं जैसीं नवीन नवनीतें[5]. ७
दक्षिणदिशेसि जातां, रवि उगवे मावळे, वनीं पळतां
भय बहु कीं, खळ येइल दैवें जगला असेल जरि जळतां. ८
सायान्हीं[6] माय म्हणे, 'तंग[7] न निंघे तोय पाज, सुतराया[8]!
या! तूंचि सेतु आम्हां या तृड्व्यसनाब्धिला[9] हि उतराया'. ९
धावे तरु मोडित तो, सुटला गिरिवरुनि थोर पाथरसा[10];
श्रमतां त्या गुरुभक्ता दे विद्याज्ञानसेंचि पाथ[11] रसा[12]. १०
पात्र नसे म्हणवुनि घे भिजउनि तो उत्तरीय[13]वास[14] वन.
वास[15] वनव्याघ्रा दे भय त्याचा, तेंवि अरिस वासव[16] न. ११
धांवत ये, पाहे तों श्रमनिद्रा[17] लागली स्वमातेतें.
वातें दवाचिसें[18] त्या दैन्यें गहनांत[19] दुःख माते[20] तें. १२
निजला सानुज धर्महि कल्पुनि[21] सुखशयन भूमितळ मळला.

१. दानशूर. २. ज्यानीं विश्वास ठेविला आहे असे. ३. जळ=अश्रु गाळा. ४. पांडवानीं. ५. लोणी. ६. संध्याकाळीं. ७. दम, धीर. ८. पुत्रराया भीमा! ९. तृषारूप संकटसमुद्राला. १०. फत्तराप्रमाणें, धोंड्याप्रमाणें. ११. उदक. १२. पृथ्वी. १३. पांघरावयाचें वस्त्र. १४ उदक. १५. गंध. १६. इंद्र. १७. श्रमामुळें आलेली झोंप. १८. वणव्याच्या ज्वाळेसारखें. १९. अरण्यांत. २०. माजे. २१. मानुनि.

तें पाहुनि [1]शुष्कऱ्हद्मीन तसा फार भीम तळमळला. १३
चोळी [2]खळांतकर कर, करकर [3]रद खाय, 'हाय! हाय!' करी,
गुंते गुर्वाज्ञेनें; [4]पंकीं पडला करील काय [5]करी? १४
अश्रु पुसोनि म्हणे, 'रे! दुष्टा दुर्योधना! कुळकळंका!
पोषू भू तव संगें, दशवदनाच्या जसी [6]पुलक लंका. १५
तुमचा पिताचि, [7]कुरुकुळविपिनाच्या अग्नि हो! [8]त्रपा प्याला.
लोभ्याला तेजस्वी बंधु नको, अग्निहोत्र पाप्याला. १६
शोकीं, अयशीं, नरकीं केला कीं मग्न दुष्ट हो! तात.
[9]अविचारितोक्त करितां [10]बालिश हो! आर्य रुष्ट होतात. १७
गजही साहूं न शकति ज्यांच्या [11]स्वमदांततत्परा गंधा,
ते केले [12]दुर्विधिहृतमति [13]शशकानीं [14]हरी [15]परागंधा. १८
काका! ते तुज रुचले, करिति महत्वासि भस्म [16]रासभ जे.
न गुणज्ञ तूं, धरि शिरीं [17]विधु, न [18]उमावल्लभ [19]स्मरास भजे.' १९
ऐसें जों भीम वदे, चिंती [20]कृष्णा [21]भयापहा, जागे.
भगिनीस हिडिंब म्हणे, 'ते कोण मनुष्यसे, पहा, जा गे!' २०
ती राक्षसी हिडिंबा धांवे कीं चरचरां नरा खावें.
रक्षील व्याघ्री क्षण, परि पळहि जिणें [22]जिणें न राखावें. २१
भुलली वनीं हिडिंबा भीमाची पाहतांचि सुंदरता.
तत्काळ सुंदरी ती होय जसी [23]दिव्ययोनि [24]सुंदरता. २२

---

१. आटून गेलेल्या डोहांतील मासा. २. दुष्टांचा नाश करणारे. ३. दांत. ४. चिखलांत. ५. हत्ती. ६. रोमांच. (दशवदनाच्या संगें जसी लंका). ७. कुरुकुलरूप अरण्याच्या. ८. लाज. ('लाज वांटून पिणें' हा एक मराठी भाषासांप्रदाय आहे). ९. अविचारीपणानें सांगितलेलें. १०. मूर्ख. ११. आपल्या मदाचा नाश करण्याविषयीं तत्पर अशा. १२. दुर्दैवानें ओढली बुद्धि ज्यांची. १३. सशानीं. १४. सिंह. १५. विदेशवासी. १६. गाढव. १७. चंद्र. १८. शंकर. १९. मदनास. २०. श्रीकृष्णाला. २१. भयहारका. २२. जीवित. २३. स्वर्गांत जिचा जन्म अशी. २४. सुंदनामक दैत्याचे ठिकाणीं रत झालेली अप्सरा (तिलोत्तमा).

भीमासि म्हणे, 'कां जी ! शिरलां या काननांत तापससे,
येथें जन बहु पावति, [१]मृगराजबिळांत जेंवि ताप ससे. २३
माझा हिडिंब राक्षस [२]सोदर, तुमचा करील वध; मातें
तेणेंचि धाडिलें, परि तुज वश मीं, त्या त्यजूनि अधमातें. २४
स्वीकार करीं साधो! [३]स्मर बाधो न मज, मींहि टाळीन
मरण, पळवीन तुजला, वरुनि सतीव्रत न तें विटाळीन. २५
हो मत्पति, ये स्कंधीं बैस, विमानीं [४]अमर्त्यसा धावें.
त्वांही म्याही रक्षुनि अन्योन्यातें स्वकार्य साधावें.' २६
भीम म्हणे, 'निद्रित हे माता भ्राते त्यजूं वनीं ? तुजला
जोडूं ? तोडूं प्रीति ? स्त्रीसंगसुखासि कोण गे! सुजला ?' २७
तों ती म्हणे, 'पळवित्यें, सर्वांस करा तुम्हींच परि जागे.'
भीम म्हणे, "सुखसुप्तां उठवीना; करिल काय अरि ? जा गे!
साधावा स्वार्थ, असें भय दावुनियां भयातुरा मातें ?
समरीं देईलचि, दे जेंवि यशोलाभ [५]यातु रामा तें. २९
तो अंधकार, मीं रवि; तो रावण, मींहि [६]पुष्कराक्ष; ससा
तो, [७]हरि मीं; तन्मुख मीं करिन पळामाजि शुष्क राक्षससा. ३०
हें उर, हे बाहु पहा, त्याचा आम्हांसि काय गे ! [८]लेखा ?
जा, त्याला म्हण, 'त्यांचे धाकेंचि गळोनि [९]काय गेले, [१०]खा.' "
होतां विलंब, राक्षस ये पाहे [११]स्वस्वसाचरित्रास;
कोपोनि म्हणे, 'दुष्टे! तुज नाहीं मृत्युचा [१२]परित्रास ? ३२
काळें मति तुज दिधली [१३]मर्त्यापसदास अनुसरायाची.
वांचेल कसो ? या [१४]सांसकट तुझी आजि तनु सरायाची.' ३३
ऐसें वदोनि धांवे सर्वांचाही करावया कवळ,

---

१ सिंहाच्या गुहेंत. २. सख्खा बंधु. ३. मदन. ४. देवासारखा. ५. राक्षस. ६. कमलाक्ष (रामचंद्र). ७. सिंह. ८. पाड, पर्वा. ९. शरीर. १०. खाऊन टाक. ११. आपल्या भगिनीची कृति. १२. भय, दरारा. १३. नराधमाला. १४. सहाजणांसह.

भीमें दटाविला तो करितां रदशब्द[1] निद्रितांजवळ. ३४
परि भगिनीसि वधाया धावे तो यातुधान[2] कोपानें,
भीम म्हणे, 'भू याच्या रक्तांच्या तृप्त आज हो पानें.[3]' ३५
पांडव रागें मागें त्या पापाच्या महानगा[4] ढकली.
द्वात्रिंशद्धस्तांवरि[5] करिति महागजसमान गाढ[6] कली[7]. ३६
त्यांच्या युद्धध्वनिनें जागी झाली पृथा सुतांसहित;
तों निकट[8] देखिली स्त्री, लावण्य जिचें जगीं तुळारहित[9]. ३७
कुंती तिला पुसे, ' तूं कोणाची सांग बाइको, पातें
न लवेचि तुज पहातां, पुसिल्याच्या न धरिं बाई! कोपातें. ३८
तूं काय अप्सरा? कीं वनदेवी? वद किमर्थ आलीस?
कां एकली? पतिकडे पाठविलें सुमुखि! काय आलीस[10]?' ३९
कुंतीस ह्मणे ती, ' मीं रात्रिंचरी[11] या वनींच मद्वसती,
येथें प्राणी कोणही अस्मत्त्रासेंकरूनियां नसती. ४०
स्वाग्रजहिडिंबवचनें[12] आल्यें मारावया तुह्मांला, जों
भुलल्यें नवहेमाभा[13] एका मीं, काय हो! तुह्मां लाजों? ४१
वरिला मनें तुझा सुत, न्यावा येथूनि शीघ्र पळवावा,
मद्भाव असा कीं, हा स्वविचार तुह्मांसही न कळवावा. ४२
तुमची संगति सोडुनि तो वश जाला मला न वीरमणी,
आश्चर्य थोर हें कीं, प्रार्थी परि नावडे नवी रमणी. ४३
मज लागला परोपरि बहुत विनवितां तुझ्या सुता वेळ;
तों सासुबाइ! कोपी मद्भ्राता धावला उतावेळ. ४४
आधीं माझे घ्याया, मग तुमचे प्राण मूर्त अंतकसा[14]

१. दातांचा 'करकर' असा शब्द. २. राक्षस. ३. प्राशनानें. ४. मोठ्या पर्वताला. ५. बत्तीस हातांवर. ६. घोर, भयंकर. ७. कलह, युद्ध. ८. समीप, जवळ. ९. तुलनारहित, निरुपम. १०. सखीला. ११. राक्षसी. १२. माझा वडील भाऊ जो हिडिंब त्याच्या आज्ञेनें. १३. नव्या सुवर्णाप्रमाणें कांति ज्याची अशा (भीमास). १४. यमासारखा.

धांवे, परि मत्पति तव सुत असतां, तो करील अंत कसा? ४५
तुमची सुखनिद्रा क्षणमात्रहि मोडूं नयेचि त्या अहितें[1],
या भावें मत्पति ने दूर तया पक्षिपति[2] जसा अहितें[3]. ४६
न धरील काय जी! खगपति[4]नखकरवाळ लाज, सापाला
सपदि[5] न वधितां, चुरिला असता खळ, वाळला जसा पाला. ४७
ते दोघे झगडति परि मत्पति मारील राक्षसापसदा[6].
गरुडापुढें तृणचि तो, इतरीं जऱ्हि असुहराक्ष[7] साप सदा.' ४८
ऐसें ऐकुनि सायुध[8] चौघेही बंधु धावले सहसा;
जिष्णु ह्मणे, 'वद आर्या! जरि अरि भासत असेल दुःसहसा,
तरि आज्ञा दे, वधितों, तुझियाचि दयेकरूनि यांतूतें[9].
श्रमलासि पथीं, व्हावा न श्रम बहु अस्मदाश्रया[10] तूतें.' ५०
भीम ह्मणे, 'होतो सुरसुदतीचा[11] शस्त्रमथित[12] नवरा, कीं[13],
भुजयुद्धींच मरो खळ; सोडावा त्वां स्वविशिख[14] न वराकीं[15]. ५१
मज[16] यातु तसेंचि, जसें अमृतीं विजयाश[17] तक्र; तुच्छा या
वधिन कुतुकें, करिल जऱ्हि यावरि आंगें शतक्रतु[18] छाया.' ५२
ऐसें वदोनि भीम श्रितपीडांच्या[19] निवारणारानीं
बाहूनीं करि अरिला व्यसु[20], जैसा सिंह वारणा[21] रानीं. ५३
विजयी भीम ह्मणे, 'या खळभगिनीचाहि वध करावा; हें
वृंदावन[22] भोग्य नव्हे, काय पहातोसि रे! कैरा[23]! वाहें.' ५४

---

१. शत्रूनें. २. पक्ष्यांचा राजा. (गरुड). ३. सर्पातें. ४. गरुडाचीं नखें हींच तलवार. ५. तत्क्षणीं. ६. राक्षसाधमा. ७. प्राणहारक नेत्र ज्याचे तो, (चक्षुर्विष). ८. आयुधांसह. ९. राक्षसातें. १०. आमचा आधारच अशा. ११. देवांगनेचा. १२. शस्त्रानें मारलेला (शत्रु). १३. म्हणून, यासाठीं. १४. आपला बाण. १५. तुच्छ राक्षसावर. १६. पाठांतर—**भीमीं हें यातु**. 'यातु' (राक्षस) हा शब्द संस्कृतांत नपुंसकलिंगीं आहे. १७ विजयाची इच्छा करणारें. १८. इंद्र. १९. आश्रितांच्या दुःखांचें निवारण करणाऱ्या बाहूनीं. २०. गतप्राण. २१. हत्तीला. २२. एक जातीचें कडु फळ (तशी हिडिंबा). २३. हे हाता! वाहें म्ह० या दुष्ट स्त्रीवर धांव.

धर्म ह्मणे, 'रे! बापा! रक्षीं बळिनायका! यश; स्त्रीतें
न वधीं; जें कर्म नव्हे सन्मत[1] करितील काय शस्त्री[2] तें?[3] ५५
खेचरी[4] म्हणे पृथेला, 'जाणसि दुःखासि तूंहि सासू! या.
न करीं मदुपेक्षा सति! मति कुळज्यांची नसेचि सासूया[5]. ५६
आर्यें! लोकद्वयहित[6] सुतचि नव्हे काय वद नवा सून[7]?
काय मरावें क्षुधितें, कल्पलतेजवळि वदन वासून? ५७
जो निःस्पृह संसारीं बहु विटला, तो यमी[8] न संग मनीं
जरि धरि, तरि तळमळतां, यत्न करिल तोयमीनसंगमनीं[9]. ५८
स्मरतां भेटेन पथीं, विषमीं[10] पृष्ठीं तुह्मांसि वाहेन,
सेवा करितां तुमची मीं आत्मसुखाकडे न पाहेन.' ५९
धर्म म्हणे, "धिवलें जें, मागसि वंदुनि पदास खेचरि! तें;
परि आमुचे करावे त्वां[11] प्रमुदितमति सदा सखे चरितें. ६०
क्रीडार्थ दिसां[12] ने, परि सांजे या स्वप्रियावहा[13] आण,
रक्षीं सत्य निशाचरि! 'घात करीना[14]' असी वहा आण[15]." ६१
खचरी म्हणे, 'चुकेना गुरुभजनीं देह हा निभावो जी!
वचनातिक्रम[16] करितां, क्षिप्र घडो देहहानि भावोजी!' ६२
गुरुवचनें मारुति[17] जें एकचि सदपत्यरत्न[18] दे तीतें,

---

१. सज्जनांस मान्य. २. शस्त्रधर. ३. ह्या चरणाची रचना कवीनें प्रारंभीं, '**जें कर्म नव्हे सन्मत सुखकर, करितील काय शस्त्री तें?**' अशी केली होती, व त्यामुळें 'यश आणि स्त्रीतें रक्षीं' असा प्रथमचरणाचा अर्थ होत होता. ४. राक्षसी. (आकाशगामी) ५. गुणाच्या ठायीं दोषाचा आरोप करणें ह्याला 'असूया' म्हणतात; तिनें युक्त. ६. इहपरलोकीं हित करणारा. ७. अन्वय-सून हा लोकद्वयहित नवा सुतचि नव्हे काय? वद. ८. इंद्रियनिग्रह करणारा. ९. पाणी आणि मत्स्य यांच्या एकीकरणाविषयीं. १०. संकटीं. ११. अन्वयार्थ-त्वां आमुचे सखे (बंधु) सदा [आपल्या] चरितें प्रमुदितमति (सानंदमानस) करावे. १२. दिवसा. १३. तुझें प्रिय करणाऱ्या (भीमाला). १४. करणार नाहीं. १५. शपथ. १६. प्रतिज्ञाभंग. १७. वायुपुत्र भीम. १८. उत्तम अपत्य (पुत्र)-रूप रत्न.

तन्नाम घटोत्कच[1], दे सुख पितरां, शतहि सुत न देती तें. ६३
कार्पटिकांचा[2] वेष स्वीकारुनि पांडुपुत्र ते, ज्यातें[3]
मिरवावेंचि, परि अरित्रासें आच्छादिति स्वतेजातें. ६४

अध्याय एकतिसावा.

स्कंधीं पृथेसि वाहुनि, लंघुनि मत्स्यादि देश दूरवर,
गेले तापसवेष[4] स्वीकारुनि पांडुपुत्र शूरवर. १
त्या व्यसनांत निवविला दर्शन देवूनि तापहा[5] व्यासें,
जो चिंती साधुजनीं संपत्ति सदा रता पहाव्यासें[6]. २
चिंतामणि अधना जें, धन्वंतरि जें गदाकुळा[7] देतो,
भेटोनि अकस्मात् सुख तें त्या कुरुच्या तदा कुळा दे तो. ३
पौत्रांसि[8] म्हणे, 'मज हें कळलें होतें; परंतु जळधीतें
मिळतां वळें नदीतें फिरविल कोण्ही बळी, न खळधीतें[9]. ४
हा! बालद्रुम[10] हो! कां खेद तुम्हां? मीं सुधाढ्य[11] आवाल[12];
पावाल वृद्धि पुष्कळ, दुष्टग्रीष्मासि[13] लाज लावाल. ५
प्रार्थावें नलगे मज, जें तुमचें हित करीन आधीं तें.
भेटेन, एकचक्रानगरींत रहा, हरीन आधींतें.' ६
जातां देवूनि अभय निजजनकाचा[14] पिता, महा ज्ञाते,
त्याचि नगरीं द्विजगृहीं होते पाळुनि पितामहाज्ञा[15] ते. ७

---

१. याचें मस्तक घटासारखें आणि उत्कच=केशरहित होतें, म्हणून याला 'घटोत्कच' असें नांव पडलें. २. तीर्थयात्रा करणाऱ्या लोकांचा. ३. ज्या तेजातें. ४. तपस्व्यांचा वेष. ५. दुःखहारक. ६. पहाव्या असें. ७. रोगग्रस्ताला. ८. नातवांस. (पांडव हे व्यासाचे नातु). ९. दुष्टाच्या बुद्धीला. १०. बालरूपी वृक्ष हो! ११. अमृतपूर्ण. १२. अळें. १३. दुष्टरूपी उन्हाळ्याला. १४. पांडूचा. १५. पितामह व्यास त्याची आज्ञा.

सिद्धान्न[1] मातृहस्तीं देती ते वरुनि वृत्ति माधुकरी[2].
भीमासि अर्ध दे ती, अर्धाचे पांच भाग साधु करी. ८
होते कांहीं काळ स्वीकारुनि भैक्ष्यवृत्तिला मुदित[3],
तों कुंती परिसे त्या आश्रयदब्राह्मणालयीं[4] रुदितें[5]. ९
भीमासि म्हणे, ‘रडतो दुःखें सकुटुंब विप्र बापा ! हें
मज बहु दुःसह झालें; आलें नेत्रांसि अश्रु बा! पाहें. १०
आम्हीं पक्षी, हें गृह नीडें[6], धरादेव[7] आश्रयागम[8] हा.
दुःख हरूनि करावी प्रत्युपकृति[9], होय हाचि याग[10] महा.’ ११
भीम म्हणे, ‘शोध करीं, जा, स्वमुखें विप्रनायका पूस;
वारीन दुःख सर्वहि; दहना[11] अतिभार काय कापूस?’ १२
द्विजरुदित पुन्हां तप्त श्रुति[12] करि झगटोनि यादवीची[13], तें
मोहे मन, जेंवि विषांबुधिच्या भेटोनि याद्[14] वीचीतें[15]. १३
जाय द्विजाकडे ती गाय जसी वासुराकडे मोहें.
करितां विलाप, बोलत होता निजदुःख तेधवां तो [16]हें, १४
‘ज्याये! वदलीस परस्थळगमनविचार, सर्वथा राहो.
माहेर येथ होतें; ओळखिती लोक सर्व थारा, हो! १५
गेलों असतों तरि कां पडतें हें प्राणसंकट प्रमदे !
स्वकुटुंबव्यसन जसें देतें, न तसें बुधा विष भ्रम दे. १६
जरि दान तुझें द्यावें कांते! मज भासतें तसें तरि तें,
सिंधूदरीं[17] विकावें स्वहितार्थे [18]तितीर्षुनें जसें [19]तरितें. १७

---

१. तयार झालेलें अन्न. २. मधुकर (भ्रमर) जसा नानाविध पुष्पांतील मध गोळा करितो तशीच घरोघर फिरून अन्नगोळा करणाऱ्यांची वृत्ति असते; म्हणून तीस ‘माधुकरी’ म्हणतात. ३. आनंदित. ४. आश्रय देणाऱ्या ब्राह्मणाच्या घरीं. ५. रोदन. ६. घरटें. ७. भूदेव. (ब्राह्मण). ८. आधारभूत वृक्ष. (अगम). ९. उपकाराची फेड. १०. यज्ञ. ११. अग्नीला. १२. कर्ण. १३. कुंतीची. १४. जलचर प्राणी. १५. लाटेला. १६. पुढीलप्रमाणें. १७. समुद्राच्या मध्यभागीं. १८. तरूं इच्छिणारानें. १९. नौकेतें.

पुत्रचि अधिक, न कन्या, अन्यास गमे, मला न लोभ्याला.
नयनयुगांतुनि एक हि द्याया स्वप्नीं न कोण तो भ्याला? १८
देतों निजवपु, परि तूं भीरु! कसी साहसील विरहातें?
स्वर्गींहि दुःसहचि जें म्हणसील मज स्मरोनि चिर[1] 'हा[2] !' तें.
प्राणाचा त्याग बरा, तुमचा न बरा. कसा न तो पापी?
कूपांत बळें अबळां घालुनि ठकवूनि दोर जो कापी.' २०
तों ब्राम्हणी म्हणे, ' हो! कवि साधु तुम्हीं करूं नका शोक.
यन्मूळ[3] 'आपदर्थें' तो शंकरसाचि आठवा श्लोक. २१
अजि ! [4]आत्मानं सततं रक्षेद्दारैर्धनैरपि ' श्लोकीं,
तेंचि करा हो! न बुडों द्या हो! मज, निजमतीसही शोकीं.
पतिपूर्वीं स्त्रीस मरण, तें लग्नाहूनि काय हो ऊन[5] ?
न रहावेंचि सतीनें पळभरिहि विरूपकाय होऊन. २३
रक्षाल तुम्हींच मुलें, अबळा भावील भार जीवा हे;
रक्षील कसी अन्या [6]नवपूरीं भीरु फार जी वाहे? २४
जाईन मींच, राक्षस जरि करकर सर्व मानवां चावे.
दैवें, स्त्री म्हणुनि दया येतां, मत्प्राण कां न वांचावे ? २५
मज भक्षीलचि तो तरि विधुरपणें सर्वथा नका राहूं,
ती स्त्री मींच, ह्मणा[7] जी ! मागें सारूनियां नकारा हूं.' २६
ऐसें म्हणतां स्त्रीच्या कंठीं घालुनि मिठी म्हणे, '[8]अयि ! ते
कथमेवमुक्तमदयं तदयं किमनुष्ठितुं क्षमो दयिते !' २७

---

१. बहुत काळ. २. हाय! हाय! ३. ज्याचा आरंभ 'आपदर्थें' असा आहे, तो श्लोक. (आपदर्थे धनं रक्षेद्दारान्रक्षेद्धनैरपि। आत्मानं सततं रक्षेद्दारैरपि धनैरपि॥). ४. [आपत्काळीं] बायकोचा आणि धनाचा नाश झाला तरी तो पत्करून आत्म-रक्षण करावें. ५. उणें. ६. नूतन [उदकाच्या] पूरांत. ७. नकारातें मागें सारूनि हूं म्हणा—**पंत.** ८. अयि ! ते कथं एवं अदयं उक्तं ? दयिते ! अयं तत् अनुष्ठितुं क्षमः किं ?=हे स्त्रिये ! तूं कसें हें निष्ठुर भाषण बोललीस ? हे प्रिये ! हा मी तें करण्यास समर्थ आहे काय ?

परिसे असें पृथा जों तों चि ह्मणे त्यांसि[1] कन्यका, 'मातें
द्या, द्यायाची च सुता, हें किमपि न ये चि अन्य कामातें. २८
आत्मा पुत्र, सखा स्त्री, कन्या चिंता चि, सर्वकाळ, जिला
प्रसवोनि वाहति मनीं श्रीमंत हि पितर सर्व काळजिला. २९
बुध, 'कन्या रक्ष' 'तिघांतुनि एका,' तुज ह्मणेल कां? 'टाकीं.'
बापा! कांस्थानें चि प्राज्ञ सुखें काढिताति कांटा कीं.' ३०
ऐसें वदोनि कन्या रडवूनि रडे, तशांत जवळूनि
खवळूनि उठे बाळक, बोले हस्तें तृणासि कवळूनि. ३१
समजावुनि त्यांसि[2] ह्मणे, 'एसें [3]लात्रिंचलासि मालीन;
कां ललतां आललतां? पलतां मीं सागलांत तालीन.' ३२
हासविलीं हर्षविलीं व्यसनार्त तिघें हि बाळशब्दानें.
[4]अब्दानें ग्रीष्म[5]दवाकुळबर्हिकुळें जसींचि [6]अब्दानें. ३३
तेव्हां चि पृथादेवी भेटे, अभयोक्ति जी वदे त्यांतें,
संजीवनी च जाणों ती, रोगेंकरुनि जीव देत्यांतें. ३४
रोदनकारण पुसतां विप्र ह्मणे, 'अंब! तापसि! [7]श्रवणें
घ्यावें शिव, अशिवाच्या व्यर्थ चि कां तूं हि तापसि [8]श्रवणें?
या राष्ट्रा बकराक्षस, [9]अजयूथा लांडगा तसा, [10]पाळी.
[11]तद्वेतनदानाची आलीसे आजि मजकडे पाळी. ३६
एक [12]महिष, एक पुरुष, [13]शाल्योदनराशि त्यासि भक्षाया

---

१. मातापितरांस. २. आई, बाप आणि बहीण यांना. ३. रात्रिंचरासि. (राक्षसासि). या आर्येतील बोबड्या भाषेचा विचार करितां, 'त्रिं' असें अक्षर नजरचुकीनें लिहिलें गेल्याचें दिसतें. ४. मेघानें. ५. उन्हाळ्यांतील वणव्यानें पीडिलेल्या मोरांचीं कुळें. ६. अप्+दानें=उदकाच्या दानानें. ७. श्रवणें (कानानें) शिव (कल्याण=शुभ गोष्टी) घ्यावें (ऐकाव्या). ८. ऐकण्यानें. ९. बकऱ्यांच्या कळपाला १०. रक्षितो. ११. त्याचें वेतन (कर) देण्याची. १२. रेडा. १३. साळीच्या भाताची रास.

द्यावा असें असे; या व्यसनीं मज कोण दक्ष[1] रक्षाया ?
विरहभयें एकास हि राक्षसहस्तीं न देववे चि; तसें
धन हि न पुरुष मिळेसें; स्वकुळ चि मीं भूमिदेव[2] वेंचितसें. ३८
सहज गजगंड[3] भेदी, हरिचा[4], नव्हता कळा सिकत, करज[5].
अकृतघ्नत्वार्थ[6] चि दे शुचिता मळल्या जळासि कतकरज[7]. ३९
तैसा कुलीन जन परदुःखध्वंसीं पटु स्वभावानें,
संकट हरि अरिचें ही, हरिना कां प्रार्थितां स्वभावानें?' ४०
कुंती म्हणे, 'दिला तुज एक स्वसुत, द्विजा ! नको चि रडों.
हा शोकभर स्वशिरीं घेउनि सकुटुंब तूं नको चिरडों.' ४१
विप्र म्हणे, 'शिव ! शिव ! परघातक जो स्वार्थलुब्ध नर कामी,
तो जैसा, तैसा या कर्मे पावेन घोर नरका मीं. ४२
करुनि पराचें अहित स्वहित विहित काय तापसि ! कवीसी.
माते ! असें कसें मज व्हाया याहूनि ताप सिकवीसी'? ४३
कुंती, म्हणे, 'मदात्मज[8] गुरुवरमंत्रें असे महातेजा;
साहों न शकति राक्षस वज्राघातास ही सहाते ज्या[9]. ४४
सुरवल्लिचा[10], नव्हे गा ! क्षुद्रलतागुच्छकासम, स्तबक[10].
स्पष्ट मदात्मजचरणीं अर्पील प्राणधन समस्त बक. ४५
परि हें विप्रवरा ! त्वां न प्रकटावें, मनीं च जिरवावें.
विद्यार्थिजनोपद्रव[11] लागेल म्हणोनियां न मिरवावें.' ४६
मग विप्र-पृथा-प्रार्थित[12] भीम धरुनि राक्षसापराध मनीं,

---

१. तयार, समर्थ. २. ब्राह्मण. ३. हत्तींचीं गंडस्थळें. ४. सिंहाचा. ५. नख. (कर=हात, त्यापासून उत्पन्न झालेलें). ६. जलानें आपलें पोषण केलें त्याअर्थी आपण त्याच्याशीं कृतघ्न न व्हावें या हेतूनें. ७. निवळीच्या बीचें चूर्ण. ८. माझा मुलगा. ९. ज्या मदात्मजाला. १०. कल्पलतापुष्पांचा गुच्छ, झुबका. ११. विद्यार्थी लोकांचा त्रास. (राक्षसवधाची गोष्ट जर सर्वश्रुत झाली तर मंत्रविद्या शिकण्याची इच्छा करणाऱ्या लोकांपासून भीमाला उपद्रव होईल). १२. ब्राह्मण आणि कुंती यांनीं प्रार्थिलेला असा.

कोपे, जाणों दहन चि तो होय, प्रार्थना तया धमनी[1]. ४७
तें मान्य करुनि, मुनिला, 'व्हा स्वस्थ' असें चि तो कवि प्रार्थी.
संसारी वित्तार्थी, तैसे चि कुलीन लोक विप्रार्थी. ४८
स्वानुज साहस कांहीं करणार, असें युधिष्ठिरा समजे.
'आकारें चि परेंगित[2] कळे' म्हणति कवि युधिष्ठिरासम जे. ४९
पुसतां पृथा कथी तें धर्म म्हणे, 'अंबे[3]! परिस तोक[4]-वच.
द्याया काय उचित, जो रणीं सहाणार अरिस, तो कवच[5]? ५०
द्यावा परा न तरतां अंबुधिमध्यें कसा स्वनावाडी?'
धार्मिक न तो, जना जो न गणुनि शिशुरोदनस्वना[6] वाडी[7].' ५१
कुंती म्हणे, "अरे! बा! पावो द्यावा मुनी कसा असुखा?
आम्हीं सुखें म्हणावें, 'काळा! द्विज सोड, आमुचे असु खा.' ५२
विप्रार्थ तुम्हीं असु हि, स्वर्गी सुखवावया जनक, वाडा[8].
हें चि हित, न काळास हि पाहुनि लाविति भले जन कवाडा. ५३
भीसी कां! अनुभविलें अनुजबळ तुवां न काय गा! रानीं[9]?
पावो ताप पराचा, परि हिमगिरिच्या न काय[10] गारानीं. ५४
पडला निपट[11] शिशुपणीं भीम मदंका[12]वरूनि, ज्यावरि तें
झालें चूर्ण शिळातळ, न धरीं भय, यश तवानुज्या वरितें. ५५
ब्राह्मणसाहाय्यकर क्षत्रिय जो तोचि संत, तोचि तरे,
ऐसें व्यासें कथिलें, म्हणुनि तुम्हां हेंचि संततोचित[13] रे!" ५६
जननीस धर्म वर्णी, नवल न वर्णील तीस सुरभी[14] ती.
तऱ्हिच तसे खळ वधिले तत्पुत्रानीं, जयांसि सुर भीती. ५७

---

१. फुंकणी. २. दुसऱ्याचा अभिप्राय. ३. हे आई! ४. [माझें] बालकाचें बोलणें. ५. चिलखत. (उत्तरार्धावरून धर्म असें सूचित करीत आहे कीं, भीमासारखा आपला रक्षक बकाला बळी देणें योग्य नाहीं). ६. स्वन=शब्द. ७. वाढी. ('वाढणें' या क्रियापदाचा 'अन्न वाढणें' असा एक विशिष्ट अर्थ होत असतो). ८. वाढा, अर्पण करा. ९. [हिडिंबवधसमयीं] वनामध्यें. १०. शरीर. ११. केवळ. १२. माझ्या मांडीवरून. १३. निरंतर योग्य. १४. कामधेनु.

रात्रौ एकाकी ही शिरतां सागरवनीं[1] न भी मकर,
भीम हि तसा बकवनीं आणि तदन्नीं[2] तसा चि भीमकर. ५८
जेवी भीम, 'बका! ये' ऐसी मारूनि हाक उग्रास[3];
शिरले काय सदुदरीं[4] सदोदनाचे[5] भिवोनि सुग्रास. ५९
हें पाहुनि बक धावे, मानेवरि दे धडाधड बुक्या, तें
होय त्वराशनीं[6] त्या कुरुकीर्तिकुच्यांचिया[7] हित बुक्यातें. ६०
हंसें हि जेववावा जो प्रेमें धरुनियां चिंबुक लावा[8],
तो त्या गरुडा झडपी, 'आमरण' म्हणे 'असा चि बुकलावा[9].'
भीम न सोडी भोजन, राक्षस ताडी बळें जरि बुक्यानीं.
खळ गांजी, परि सादर हरिभजन करी जसा बुध मुंक्यानीं[10].
पांडव जेवुनि आधीं मग राक्षसजीवितासि आचवला.
सन्माणि[11] न काळलक्षा[12] ये, येतो काय राक्षसा चवलां[13]? ६३
मारी हरि लीलेनें जेंवि गजा, तेंवि पार्थ[14] कुणपाशा[15].
तें सुर म्हणति, 'यमाच्या, गुरु साजति भीमबाहुगुण[16], पाशा.'
ठेवी नगरद्वारीं परमभयानक अशुद्धिमत्[17] कुणप,
जाणों मातेनें[18] तो वांधिला शिशुरक्तपोग्र[19] मत्कुणप[20]. ६५
भीमें हळू चि जावुनि कथिली वार्ता द्विजासि कानीं ती.

---

१. समुद्राच्या पाण्यांत. २. बकासुराच्या अन्नीं. ३. भयंकर अशा बकास. ४. साधूच्या पोटांत. ५. चांगल्या भाताचे. ६. त्वरेनें जेवण्याच्या कामीं. ७. कुरुकीर्तिरूप स्त्रीच्या स्तनाला [शोभविणाऱ्या] बुक्यासारखा जो भीम त्याला. ८. हनुवटी. ९. एक क्षुद्र पक्षी. १०. मुकाट्यानें ११. [भीमरूपी] सद्रत्न. १२. मृत्युपुरुषरूपी लक्ष रुपयांना. (राक्षसानें भीमाला मारावयाचें; पण असें न होतां उलट कसें झालें अशी शंका कल्पून कवीनें या चरणांत तिचें निरसन केलें आहे). १३. राक्षसरूपी दोन आण्यांस. १४. पृथापुत्र. (भीम). १५. प्रेत-भक्षकाला. (कुणपं=शव अश्नाति=खातो, तो कुणपाश). १६. भीमाचे बाहु हेच दोर. १७. अतिशय अपवित्र. १८. नगरीरूप मातेनें. १९. मुलांचें रक्त प्राशन करणारा असा भयंकर. २०. मोठा ढेंकूण.

श्लाघ्य[1]हि करुनि न मिरवी कुळज, सुजन हो ! असी सिका नीती.
‘ चुकलों, क्षमा करा मज, अपराधसहस्र घातुका[2] घडलें,’
या भावें जाणों तें द्वारीं[3] रक्ष[4] क्षमापना[5] पडलें. ६७
प्रातःकाळीं च तसें बकशव पाहोनि, एकचक्रा[6] तें
यश देती झाली करिवरपाळाच्या[7] चि एक चक्रातें. ६८
म्हणति विचक्षण पुरजन अन्योन्य मनीं धरूनि हरिख, ‘ चला,
ज्याचा वार[8] तयास चि हेतु पुसों कीं, कसा स्वअरि खचला ?’
सांगे विप्र, ‘ मजकडे येतां प्राणघ्न[9] उग्रतर वार,
बहु भ्यालों, अज[10] जैसा भीतो पाहोनि उग्र तरवार. ७०
सकुटुंब रडत होतों तों आला मंत्रसिद्ध विप्र कृती[11],
रोदनहेतु मज पुसे तो सदय महामना शुचिप्रकृती. ७१
ऐकोनि व्यसन वदे, ‘ मीं देतों अन्न राक्षसापसदा[12].
हरिणवनीं वृक[13] न बरा, मंडूकांच्या[14] विळांत साप सदा. ७२
मच्चिंता न करावी, स्वस्थ असावें’ असें अभय मातें
देवुनि जाय दमायाँ[15], जेंवि शिवाप्राणवल्लभ[16] यमातें. ७३
त्याचें चि कर्म हें, तो आम्हांला होय पौर हो ! तात.
साधूंसि सहाय सुखें देव सकर्पूरगौर[17] होतात. ७४
ऐसें परिसुनि पौर ब्रह्मोत्सव[18] करिति, गाति महिमा, ते
म्हणति, ‘ ब्राह्मणचि तुझा पति, गुरु आम्हां प्रजांसि, महिमाते[19] !’

---

१. स्तुत्य कार्य. २. घातक्याला. ३. नगरद्वारीं. ४. राक्षस. (हा शब्द नपुंसकलिंगीं आहे). ५. क्षमा मागण्यासाठीं. ६. एकचक्रानगरी. (सर्व नगरवासी लोक). ७. गजेंद्रसंरक्षक विष्णूच्या. ८. पाळीचा दिवस. ९. प्राणनाश करणारा. १०. बोकड ११. कुशल. १२. राक्षसामधा. १३. लांडगा. १४. बेडकांच्या. १५. माराया. १६. पार्वतीपति (शंकर). १७. कापरासारखा गौरवर्ण जो शंकर त्यासहित. १८. ब्राह्मणानें राक्षसवध केला म्हणून त्याच्या आदरार्थ नागरिकानीं हा उत्सव केला. १९. भूमाते !

अध्याय बत्तिसावा.

पांडव जेथें होते तेथें वासार्थ[1] एक विप्र हित
शुचि तेजस्वी आला, किरण जसा नीरजीं[2] रविप्रहित[3]. १
तो सांगे, 'द्रुपदमखप्रभवा[4] कृष्णा[5] अयोनिजा[6] कन्या,
तीचा स्वयंवरोत्सव, न कळे कवणा वरील ती धन्या.' २
पांडुसुत तिची पुसती जैसे अनभिज्ञजन[7] कथा नमुनी.
होय श्रोतृश्रोत्रक्षुधितार्भकतृप्तिजनक[8] थान मुनी. ३
कथिली द्रोणद्रुपदद्वेषकथा परिभवान्त[9] आधींची[10],
जी त्या पांच्याळाच्या झाली उत्पत्तिभूमि आधींची[11]. ४
मग विप्रें ऐकविली पुढिल कथा तो असी, "स्वअहितातें[12]
मारीसा सुत व्हाया, शोधी मुनितें तपस्विमहितातें[13]. ५
उपयाजाख्यमुनीतें[14] सेवी बहु, काम तो पुसे आर्य;
द्रुपद तयाला सांगे जें होतें योजिलें मनीं कार्य. ६
'अर्बुद[15] गायी देइन तुज, दे द्रोणांतहेतु-सुत[16] मातें.
नाशीं मद्व्यसनातें, जैसा नाशी विभावसु[17] तमातें.' ७
मान्य न करी महात्मा; परि नृप, 'जोडीन हात दास्यातें,'
विधुतें चकोरसा तो म्हणे, 'वरामृत वहा' तदास्यातें[18]. ८
उपयाज म्हणे, 'प्रार्थीं मद्भ्राता ज्येष्ठ याजनामा, जो

---

१. राहण्याकरितां २. कमलामध्यें. ३. सूर्यानें पाठविलेला. ४. द्रुपदाच्या यज्ञापासून उत्पत्ति जीची. ५. द्रौपदी. ६. शुक्रशोणितसंयोगावांचून जन्मलेली. ७. अज्ञानी लोक. ८. श्रोत्यांच्या कर्णरूप क्षुधित बालकाची तृप्ति करणारें असें. ९. पराभवापर्यंत. १०. मागची. ११. [नानाविध] चिंतांची. १२. स्वकीय शत्रूतें. १३. तपस्व्यांमध्यें पूज्य अशा मुनीतें. १४. उपयाज नांवाच्या ऋषीला. १५. दश-कोटी. १६. द्रोणाच्या नाशास कारण असा. १७. सूर्य. १८. त्याच्या मुखातें.

इच्छा ती सांग तया, तो परम समर्थ यो[1]जनामाजी. ९
कार्य करील तुझें, जा; आहे ज्ञाता, परंतु लोभी तो.
'हूं' न म्हणेल इतर जन, पापापासूनि फार जो भीतो. १०
म्हणसील कसा लोभी तरि आचरणावरूनि वळखावें;
[2]भक्षी विजनीं हा जें स्थळशुचिता न कळतां न फळ खावें.'
उपयाजमतें प्रार्थी पुत्रार्थी भूप हा तया, ज्याला
[3]धनलोभांक असे, परि जोडी द्विज[4]राज हात याजाला. १२
याज द्रुपदमनोरथ परिपूर्ण करावया, [5]नय-ज्ञात्या
अनुजा घेऊनि, करी [6]जो देता पुत्रदान यज्ञा त्या. १३
हवनांतीं याज म्हणे, 'ये राज्ञि! क्षिप्र घे [7]वरा [8]हवितें,
होइल [9]मिथुन तुज असें कीं, जें [10]शतपुत्रिमद न राहवितें.' १४
राज्ञी म्हणे, 'मुने! मीं पुण्य-हवि-प्राशना नसें उचिता;
तांतड कां? बा! थांबा, मलि[11]ना आहें, घडो मला शुचिता.'
याज म्हणे, 'देवि! रहा किंवा जा; न प्रयोगें[12] राहेल.
[13]घनबिंदु चातकीच्या काय विलंबें विलंब साहेल?' १६
देवीच्या [14]आत्मरजोदोषें जेव्हां स्वभाग राहविला,
याज शिखि[15]मुखीं [16]होमी संततिपीयूष[17]सागरा हविला. १७
कवच[18]-किरीट-शर-धनुश्चर्मासि-धरा विभावसु[19] कुमारा

---

१. यज्ञ करविण्यामध्यें. २. अन्वयार्थ—जें फळ स्थळशुचिता (भूमीची शुद्धता) न कळतां न खावें, [तें फळ] हा विजनीं (एकांतीं) भक्षी. ३. द्रव्यलोभ हाच कलंक. ४. ब्राह्मणश्रेष्ठ किंवा चंद्र. ५. नीति जाणणाऱ्या. ६. जो पुत्रदान देता त्या यज्ञा. ७. श्रेष्ठ. (पवित्र). ८. होमद्रव्यातें. ९. जुळें. १०. शेंकडों पुत्रवानांचा गर्व. ११. अस्पृश्या, अस्नाता, रजस्वला. १२. यज्ञाचा प्रयोग, (अनुष्ठान). १३. मेघजलबिंदु. १४. आपल्या रजाच्या दोषानें. १५. अग्निमुखीं. १६. हवन करी. १७. संततिरूप अमृताचा सागरच अशा. १८. चिलखत, मुगुट, बाण, धनुष्य, ढाल आणि तलवार यातें धारण करणारा. १९. अग्नि.

प्रसवे वेदी[1] हि महाकन्यारत्ना [2]स्वभावसुकुमारा. १८
कन्यारत्न जसें क्षिति[3] [4]जनकाला व्हावया सुख निवेदी,
तैसें चि द्रुपदाला भाग्यें होवूनियां सु-[5]खानि [6]वेदी. १९
होय नभोवाणी कीं, 'हे [7]सर्वस्त्रीश्वरी, सुसत्कार्या
अवतरली देवांच्या सिद्धिप्रति न्यावयासि सत्कार्या. २०
भय जानकीनिमित्तें झालें रात्रिंचरां जसें हो! तें,
[8]एतन्निमित्त [9]साध्वस सनृपजनां कौरवां तसें होतें.' २१
ऐसें श्रवण करुनि नरराज हि याज हि [10]सहाप्तजन नाचे.
गाणार सुरहि झाले [11]दिव्यकुमारीकुमारजननाचे. २२
राज्ञी म्हणे, ' मुने ! हे कन्या, हा सुत हि कलपनग मोहो.
माता जाणोत मला, [12]हविराहुति माय, यांसि न गमो हो.' २३
' धृष्टद्युम्न ' असें त्या पुत्राचें नाम [13]अर्थ साधूनीं,
'[14]कृष्णा' हें कन्येचें केलें [15]अभिधान सर्व साधूनीं. २४
याजाच्या मंत्रबळें त्यांला वाटे खरी च जननी ती,
[16]मोहप्रदा जन्हि तन्ही त्या मुनिची गाति साधुजन नीती. २५
द्रोण तयास हि पढवी, जऱ्हि झाला [17]स्वनिधना असें कळलें:
कीं, [18]भावि, यश न मळलें यत्नशतें ही कधीं नसे टळलें. २६

---

१. यज्ञपात्रें वगैरे ठेवण्यासाठीं अभिमंत्रित केलेली भूमि. २. जात्याच कोमल अशा. ३. पृथ्वी. ४. जनकराजाला. ५. उत्तम खाण. ६. वेदी [निवेदी=अर्पण करी]. ७. सर्व स्त्रियांमध्यें श्रेष्ठ. ८. ह्या द्रौपदीच्या निमित्तानें. ९. भय. १०. आप्तजनांसह. ११. द्रौपदी आणि धृष्टद्युम्न यांच्या अलौकिक जन्माचे. १२. होमद्रव्याची आहुति. १३. धृष्ट=प्रगल्भ+द्युम्न=वित्त=प्रगल्भतारूप धन, असा अर्थ. १४. वर्णानें काळसर असल्यानें 'कृष्णा' असें नांव ठेविलें. १५. नांव. १६. भ्रम उत्पन्न करणारी. १७. आपल्या नाशासाठीं. १८. अन्वयार्थ—कीं (कारण), न मळलें यश (शुद्ध अशी कीर्ति) यत्नशतेंहि टळलें नसे [असें तो द्रोण] भावि (मानी, समजे). द्रोणानीं विचार केला कीं, धृष्टद्युम्नाकरवीं आपण मरणारच; पण आपल्या मारकाला हि द्रोणानीं विद्या पढविली या शुद्ध कीर्तीचा नाश मात्र शेंकडों प्रयत्नानीं हि होणार नाहीं.

जें न मिळालें अन्या तिळमात्र हि वेंचितां हि कायशतें[1],
भृत्यजिता[2] अजिता कीं लाभे त्या सुज्ञनायका यश तें." २७

अध्याय तेत्तिसावा.

भेटोनि व्यास म्हणे पौत्रांसि[3], 'तुम्हां सुखाब्धिमज्जन[4] हो;
तुमच्या सत्कीर्तीनें बहु लज्जित अन्य कीर्तिमज्जन[5] हो[6]. १
ऐका सुकथा, कोणी ऋषिकन्या तप करूनि अत्यर्थ[7],
शंभुप्रति आराधी बहुकाळ तपोवनांत पत्यर्थ[8]. २
दर्शन देउनि हर 'वर माग' असें वचन तो अगाध[9] वदे.
ती पांचदा म्हणे, 'मज देवा! वरदेश्वरा! अगा! धव[10] दे.' ३
शंभु म्हणे, 'पांच दिले; त्यांची जन्मांतरांत[11] नवरी हो.'
ती प्रार्थूनि, म्हणे 'हें काय? सती बहुवरांसि न वरी हो!' ४
देव म्हणे, 'तूं पति दे ऐसें वदलीस पांचदा साचें,
करणें लागे प्रार्थित मज टाकुनि पंचपांच दासाचें.' ५
वर दे वरदेश जिला, झाली ती द्रुपदकन्यका, नातें
येतें तुम्हांकडे हें, जावूं द्यावें न अन्य कानातें. ६
द्रुपदपुरीं च रहा, जा, तेथ तुम्हांला वरील नवरी ती;
तोंवरि हे चि असों[12] द्या, बुध हो! दावूं नका चि नव रीती. ७
पृषत[13]कुळनंदनींच्या व्हाल वरुनि त्या सभाग्य वल्लीला
बहु लाजतील तुमच्या लीलेला सर्वभाग्यवल्लीला.' ८
मुनि गेल्यावरि चिंतिति त्यां[14], सेवी यत्पदांबुजा[15] मा[16] ते,

---

१. देहशतें. २. दासांनीं जिंकिलेल्या अजिता (ईश्वरास). ३. नातवांस. (पांडवांस). ४. सुखरूप सागराचें स्नान. ५. कीर्तिमान् जन. ६. होवो. ७. बहुत. ८. पतीकरितां. ९. गंभीर. १०. पति. ११. अन्य (पुढील) जन्मीं. १२. हेचि (रीति) असों द्या= हल्लींचाच द्विजवेष ठेवा. १३. पृषत राजाचें कुळ हेंच नंदनवन, त्यांतील. १४. त्या श्रीकृष्णाला. १५. ज्याच्या पदकमलाला. १६. लक्ष्मी.

मग तेथूनि निघाले, न्हाया पांचालराज-जामाते. ९
मार्गासि अहोरात्र क्रमितां रात्रौ धरूनि [1]कोलीत,
[2]चाले धनंजय पुढें स्व-पथींच्या [3]घनतमासि [4]सोलीत. १०
त्या [5]उल्मुकें, [6]कुठारें [7]घनवनसें, निबिड तिमिर भंगे तें;
आले जों ते पांडव रात्रौ मार्ग क्रमूनि [8]गंगेतें, ११
कोपे गंधर्वांचा राजा अंगारपर्ण पाहूनीं,
[9]दांपूनि म्हणे, 'वांचा मागें परतोनि, दूर राहूनीं. १२
इच्छित असाल न्हाया जरि [10]खगपतिगृहबिलेशयासम [11]यां.
नाहीं लंघीत कधीं, जे मुनिवर, ते हि लेश या [12]समयां. १३
गंधर्व-यक्ष-राक्षस-भाग [13]निशा, नर-विभाग दिन, याला
वेदप्रमाण, रक्षिति बुध मर्यादा धरूनि विनयाला. १४
गंधर्वराज मीं, या करिति क्रीडा जळांत [14]मज्जाया,
[15]वालिशें हो! येतां कां प्राणव्यसनाब्धिमाजि [16]मज्जाया?' १५
जिष्णु म्हणे, "रे! मंदा! गंगास्नानासि नियम काळाचा?
कोण करील [17]स्वांबाभिगमीं उत्साहभंग बाळाचा? १६
'रात्रौ थान न प्यावें, प्यावें दिवसा चि,' जो असें वदता
त्यालागि पशुत्वाची साची साजे [18]सुधीमतें [19]पदता. १७
हो दूर मार्ग सोडुनि रविचा तम होतसे जसें दूर.
गृध्र नव्हेचि अरुणसख, आ[20]नखशिख विखरितां हि सेंदूर." १८

---

१. जळतें लांकूड. २. पाठांतर—**चाले धनंजय पुढें गतिरोधक पथि-तमासि कोलीत.** (कोलीत=कोलवीत, दूर करीत. येथील मूळचा चरण लिहिला जातांच कवीनें हें पाठांतर रचून त्याचेपुढें च लिहिलें आहे). ३. निबिड अंधकाराला. ४. कमी करीत, नाहींसा करीत. ५. जळत्या लांकडानें. ६. कुऱ्हाडीनें. ७. दाट अरण्यासारखें. ८. सोमाश्रयायण नामक गंगातीर्थास. ९. दटावून. १०. गरुडाच्या गृहांत गेलेल्या सर्पाप्रमाणें. ११. पुढें या. १२. नियमाला. १३. रात्र. १४. माझ्या स्त्रिया. १५. मूर्ख. १६. बुडण्याकरितां. १७. आपल्या आईकडे जात असतां. १८. सज्ञांच्या मतानें. १९. स्थानत्व. (पदवी). २०. नखशिखान्त.

गंधर्वराज कोपे, सोडी शर, जे शिखी च तिखटपणें.
दाविति तें, जें भेकीं दाखविति क्षुधित उग्रविख[1] टपणें[2]. १९
खंडी शरासि अर्जुन लीळेनें फिरउनी अलातातें[3],
धरि मोहुनि अग्न्यस्त्रें[4]; नकुळ ह्मणे, 'जिंकिला भला तातें.' २०
केशीं धरूनि त्यातें ओढुनि धर्मासमीप जों आणी
पत्यभयार्थ[5] प्रार्थी जोडुनि कुंभीनसी[6] सती पाणी. २१
धर्म म्हणे, "हे याची मज म्हणत्ये नमुनि बायको, 'पावें,
सोडीं,' सिंहें शशकीं, मशकीं गरुडें हि काय कोपावें?" २२
जिष्णु म्हणे, 'गंधर्वा! देतो तुज अभय आर्य[7], जा, वांचें.
न सरो त्वदायु, न सरे जेंवि विवाहांत कार्य जावांचें[8].' २३
गंधर्व म्हणे, 'त्यजिलें म्यां निज अंगारपर्ण[9] हें नाम.
चित्ररथ म्हणा, मज तूं मान्य तसा, जेंवि भार्गवा[10] राम[11]. २४
मीं चाक्षुषी[12] स्व-विद्या देतों, घ्या दिव्य पांचशत वाजी;
श्रीपद्म[13] हो! तुम्हीं निजसख्यरसीं[14] हा द्विरेफ[15] तरवा[16]! जी. २५
घेउनि फळाद्युपायन[17] हर्षवितो तात पदनतापत्या[18],
तैसें करीं, म्हणो, 'हूं' मात्र तुझें दानि[19] वदन, तापत्या[20]!' २६

---

१. भयंकर विषारी सर्प. २. टपून बसणें. ३. कोलितातें. ४. ज्याची देवता अग्नि आहे असें अस्त्र. ५. पतीला अभय मिळावें याकरितां. ६. गंधर्वस्त्रीचें नांव. ७. श्रेष्ठ धर्मराजा. ८. परस्पर बंधुस्त्रियांचें. ९. निखाऱ्यासारखा (तेजस्वी व दुःस्पर्श) पर्ण (रथ) ज्याचा तो. १०. परशुरामास. ११. दाशरथीराम. १२. जगांतील कोणता हि पदार्थ आपल्या चक्षूनें म्ह० नेत्रानें जसा पहावा असें इच्छावें तसा दिसणें ह्या विद्येला 'चाक्षुषी' असें नांव आहे. १३. लक्ष्मीचें [विलासस्थान] जें कमल त्यासारखे. १४. आपली मैत्री हाच [कमलांतील] रस, त्यामध्यें. १५. ज्याच्या नांवांत दोन रेफ आहेत असा भ्रमर (पक्षीं) चित्ररथ. १६. तरावयास लावा. १७. फळादिकांची भेट. १८. पदीं नम्र झालेल्या मुलाला. १९. दानावि-षयीं हूं म्हणो (रुकार देवो). २०. तपतीवंशोद्भवा अर्जुना! (तपती ही सूर्याची कन्या आणि सोमवंशीय संवरणनामक राजाची स्त्री; हिला 'वैवस्वती तपती' असें म्हणतात).

जिष्णु म्हणे, " सख्य असो, माझें मज 'हूं' म्हणों न दे शील;
अस्त्रविनिमयें[1] घेऊं विद्या, जरि 'हूं' म्हणोन देशील. २७
पुसतों तें हि वद खरें आम्हीं कवणा गुणें उणे गमलों?
धर्षण[2] कां त्वां केलें? धर्मपथीं तों न लेश हि भ्रमलों. २८
भारत पौरव कौरव आम्हीं, तापत्य, वद, कसे? वदतां
उच्चारिलें सख्या! हें 'तापत्य' असें नवेंचि कीं पद तां[3]." २९
चित्ररथ म्हणे, " आश्रमरहित[4] अहां, एक हें तुम्हांत उणें,
आणि पुरोहित[5] हि नसे, धर्षण केलें कळोनि या चि गुणें. ३०
असतें पुरोहितकवच, लागों देतें न हा उपद्रव तें,
ब्राह्महिमें[6] घन[7], अल्पें अहितोष्णें[8] क्षात्र हें तुप द्रवतें. ३१
वाढो भुजसागरजळबळ, तुमचें वांछिलें पुरो, हित हो;
शक्रें बृहस्पति तसा, विजयार्थ बरा वरा पुरोहित, हो!. ३२
वदलों 'तापत्य' असें तें सत्य चि, तत्कथा तुम्हीं परिसा.
तुमचा पूर्वज होता संवरण महायशा बळी हरिसा[9]. ३३
साधुमतिमक्षिकांला[10] झाली स्थिति शुद्ध शर्करा ज्याची,
भक्ति सदा वाखाणी निजभक्तजनांत अर्के[11] राज्याची. ३४
अनुरूप[12] वर मिळावा, या कामें तीव्र जी करी तप, ती
अर्क म्हणे, 'संवरणा द्याया स्वसुता असे बरी तपती.' ३५
मृगयेसि एकदा तो जाय मृगानुसरणें, चुके कटका[13],
अश्व हि मरे गिरिवनीं, हिंडे मार्ग भ्रमोनि एकटका[14]. ३६
त्या समयीं एकांतीं दर्शन दे त्या नृपासि ती तपती,

---

१. अस्त्रांच्या अदलाबदलीनें. २. प्रतिबंधरूप उपद्रव. ३. त्वां. ४. गृहस्थाश्रम-रहित, स्त्रीरहित. ५. उपाध्याय, कुलगुरु. ६. ब्राह्मणाचें—पुरोहिताचें तेज हाच बर्फ, त्यानें. ७. घट्ट [होतें, थिजतें]. ८. शत्रुरूप उन्हानें. (तुमचा पुरोहित तुमच्याबरोबर असता तर तुमचें तेज घन झालें असतें, असा म्हणण्याचा भाव). ९. सिंहसा. १०. माश्यांला. ११. सूर्य. (संवरणराजा हा सूर्योपासक होता). १२. योग्य, सदृश. १३. सैन्याला. १४. एकटा.

यत्सख्यार्थ सुरसुता[1] सांबशिवातें[2] उपासिती[3], तपती[4]. ३७
भूप[5] म्हणे, ‘ जन्मुनि जें कुळ केलें धन्य, सांग सुंदरि ! तें.
मत्कर्णांनीं केलें वृत्तरस[6] भरावया स्वतुंद[7] रितें. ३८
त्वन्माता जी, साजे रत्नाकर[8] बंधु, आयताक्षि[9] ! तिला.
स्वर्गशताधिक महिमा आला आतां चि आयता क्षितिलीं[10]. ३९
नयनद्वय, भूरितृषा[11], त्वद्वपु[12] पीयूषवर्षि[13] सुतनो[14] ! हें.
हळहळतों बहु, कीं, मीं दशशतदृक्[15] कश्यपर्षिसुत[16] नोहें. ’ ४०
विनवी असें, परि न ती उत्तर दे भानुजा[17], अदर्शन[18] दे.
तो समय जसा त्याला, ताप चकोरासि तेंवि दर्श[19] न दे. ४१
संवरणीं होय तिचा, सीतेचा विरह तो जसा रामीं.
सांगों काय बहु ? असो; कथितों तुज ती कथा चि सारा[20] मीं.
नृप मूर्छित पडतां, ती भेटोनि म्हणे, “ अहो ! पहा हे मीं;
कोण कुशळ जन मणिला न म्हणेल ‘जडोनियां रहा हेमीं[21].’
मीं तपनसुता[22] तपती, विनवा माझ्या मदर्थ जनकास.
तरती मनोरथातें निजधर्माची धरूनि जन कास. ४४
धर्मेंकरूनि भजतां होताहे विषलता हि सोम-लता[23];
त्यजितां धर्मपथातें धरित्ये पीयूष-वल्लि सोमलता[24].” ४५
‘ गांधर्वें[25] मजला भज ’ ऐसें विनवी नृपाळ, परि तपती
पितृसंकोचें[26] गेली; पडला तीचा विलाप करित पती. ४६

---

१. देवांच्या मुली. २. गौरीसह शंकराला. ३. पूजिती. ४. तप कारिती. ।. संवरण राजा. ६. वृत्तांतरूप रस. ७. आपलें पोट. ८. रत्नाचा आकर= ाण=समुद्र. ९. हे दीर्घनयने ! १०. पृथ्वीला. ११. [पाहण्याची] उत्कट च्छा. १२. तुझें शरीर. १३. अमृताचा वर्षाव करणारें. १४. हे सुंदरि ! १५. हस्र नेत्र ज्याला तो (इंद्र). १६. इंद्र. १७. तपती. १८. अंतर्धान पावे. ९. अमावास्या. २०. श्रेष्ठ अशी. २१. सुवर्णीं (कोंदणामध्यें). २२. सूर्यकन्या. ३. सोमसंज्ञक वल्ली. २४. सोमलत्व=विषत्व. २५. प्रेमप्रधान अशा विवाह- द्धतीनें. २६. बापाच्या (सूर्याच्या) धाकामुळें.

शोधीत [1]सचिव आला, झाला [2]कश्मळ समस्त हरिता तें.
करुणा करी तयावरि, जेंवि करावी [3]स्वसूनुवरि तातें. ४७
सचिव म्हणे, 'रविला चि प्रार्थीं, दुसरा उपाय न करावा.'
करितां तसें चि भेटे [4]आपव, सरतां चि दिवस अकरावा. ४८
ज्याचें तेज न तापद, ज्या लोपविलें नसे चि [5]चरमागें,
तो [6]अपर अद्भुत तपन, नरपतिस म्हणे, 'अभीष्ट वर मागें.'
भेटोनि जेधवां त्या अभयवरातें मुनींद्र आपव दे,
यापरि संवरण तया प्रभुला कळवूनि आत्मताप वदेः— ५०
'आंगें चि वारिला त्वां [7]प्रणतार्तांचा न ताप वारविला;
यास्तव मदर्थ कन्यारत्नातें माग आपवा ! रविला.' ५१
कार्यार्थ [8]व्योम-पथें गेला हो ! तो [9]रविप्रतिम हर्षी.
श्रीमान् वसिष्ठ भेटे, दुसरा रविसा रविप्रति महर्षी. ५२
सूर्य म्हणे, 'वद तुज जें व्हावें, देतों असंशय मुने ! तें.
म्यां [10]सन्मतितें [11]पुरवुनि आळ सुखविलें, तसें न [12]यमुनेतें.' ५३
मुनितिलक म्हणे, 'झाली पावुनि [13]धात्री [14]अनामया ज्यातें,
तपती मागों आलों मीं त्या संवरणनाम [15]याज्यातें.' ५४
रवि आणवूनि हर्षें मुनिहस्तीं दे [16]तदैवें तनयेतें.
[17]नित्याराधित जें कां कामा वर देत दैवत न ये तें? ५५
गुरुनें दिली जसी ती सद्विद्या कीं [18]सदोषधी रमणी;

---

१. राजाचा अमात्य. २. मोह, मूर्च्छा. ३. स्वपुत्रावर. ४. वसिष्ठ. ५. अस्ताचलानें. (चरम=पश्चिमेचा+अग=पर्वत). ६. दुसरा अलौकिक सूर्यच असा. ७. नम्र अशा पीडितांचा किंवा नम्र आणि पीडित यांचा. ८. आकाशमार्गानें. ९. सूर्यासारखा. १०. चांगली आहे बुद्धि ज्यांची अशा सज्जनांला. ११. हट्ट, ळला. १२. ही नदी सूर्याची एक कन्या आहे. १३. पृथ्वी—**पंत.** १४. सुखरूप, आमय (रोग)-रहित. १५. यजमानासाठीं. (याज्य=ज्याच्यासाठीं यज्ञ करितात तो.) १६. त्याच वेळीं. १७. अन्वय—जें नित्याराधित दैवत तें वर देत कामा कां नये? १८. उत्तम वनस्पति.

तीणें सुखमय केला, जो होता तो सदोष[1] धीरमणी. ५६
पावोनि निवे तीतें तो नृप रोगी जसा नवसुधेतें.
भुलला तिला चि राजा, द्वादश वर्षें भजे न वसुधेतें[2]. ५७
तपतीस पुत्र झाला कुरु, तद्वंशीं तुम्हीं म्हणोनि असें
तापत्यनाम, 'पौरव' 'कौरव' इत्यादि वंशनाम जसें." ५८
जिष्णु वसिष्ठमुनीचा महिमा गंधर्वपतिमुखें परिसे,
ज्याचे वर्णन-वर्ण[3] त्रास-द दुरितासि[4], करि-कुळा हरिसे. ५९

अध्याय चवतिसावा.

पार्थ म्हणे, 'तो कोण ब्रह्मर्षि असे? मनोरम हि ऱ्यां तें
तद्यश नसे परिसिलें; सांग सख्या! तूं तदीय महिम्यातें.' १
गंधर्व म्हणे, "होता कुशिकतनुज[5] गाधि[6] कन्यकुब्जपती[7],
तत्सुत विश्वामित्र प्रभु, यत्सेवेस्सि नृप सदा जपती. २
सबळसचिव[8] तो भूपति मृगया करितां वनीं बहु श्रमला;
दैवें वसिष्ठमुनिच्या पुण्याश्रमपद विलोकितां रमला. ३
स्वपदनतगाधिजातें[9] सत्कारुनि मुनि म्हणे 'अगा! राया!
जावें न क्षुधितें त्वां, येउनियां आमुच्या अगारा[10] या.' ४
वाल्मीकिच्या जन जसा तृप्तिसि पावे कुळासकट कवनीं[11],
मुनिच्या उटजीं[12] तैसा तो गाधिज भूप ही सकटक[13] वनीं. ५
नृपति म्हणे, 'कोठुनि हें आलें साहित्य जेवणा रानीं?
अस्मद्गृहीं हि न कधीं वरिली ती तृप्ति जेवणारानीं. ६

१. [कामदोषरूप] व्याधिपीडित. २. पृथ्वीतें. ३. वर्णनसंबंधीं अक्षरें. ४. पापाला. ५. कुशिक नांवाच्या राजाचा मुलगा. ६. एका राजाचें नांव. ७. कनोज देशाचा राजा. ८. सैन्य आणि अमात्य यांसह. ९. आपल्या चरणीं नम्र झालेल्या विश्वामित्रातें १०. घरा. ११. कवितेंत. (रामायणांत). १२. झोंपडीमध्यें. १३. सैन्यासह.

जें न नृप[1]-प्रासादें तें मुनिच्या भुक्ति[2]-सुख दिलें उटजें,
हें मोटें नवल; अहो! लाजविला पारिजात[3] कीं कुटजें[4]. ७
वल्कलरुद्राक्षधर[5] ब्राह्मण अकृतान्ययत्न[6] हा, रानीं
बळ[7] पूजिलें कसें हो! बहुमूल्य दुकूलरत्नहारानीं[8]?' ८
करितां शोध कळे कीं, उटजीं सुर-धेनु-नंदिनी[9] आहे;
पाहे तीस नृप म्हणे मग मुनिला 'गाय मागतों, द्या हे. ९
अर्बुद[10] गायी देतों, अथवा देतों स्वराज्य भोगाया,
दे गाय, काय विनिमय[11] हा भवदर्थोन[12]? मान्य हो गा! या.' १०
मुनिवर म्हणे, 'नृपा! हें वचन तुझें मन्मनासि कंपा दे,
या धेनुबळें माझा हा आश्रमधर्म[13] सांग[14] संपादे. ११
कोण ज्ञाता राज्यस्वीकार करील आधि[15] ज्यामाजी?
मागों नको, न देयां[16], हेयां[17] हे धेनु गाधिज्या! माजी.' १२
विश्वामित्र म्हणे, 'मीं क्षत्रिय, आधार जाण तेज्याचा[18],
आज्ञा-मानस-भंग[19] न करिती भद्रेच्छु[20] जाणते ज्याचा. १३
स्वाध्याय[21] तुझें बळ, तूं ब्राह्मण, कैंचें असह्य तेज तुला?
पिप्पलजत्व[22] सम असो; दहनीं[23] तेजस्विता न ते जतुला[24]. १४
मानधन[25] प्रभु मीं, जें वदलों कर्तव्य तें करीन खरें.
ऐसा कोण प्राणी, ज्यातें न करील वश हरी नखरें[26]?' १५

---

१. राजवाड्यानें. २. जेवणाचें सुख. ३. कल्पवृक्ष. ४. कुड्याच्या झाडानें. ५. झाडाच्या साली आणि रुद्राक्ष धारण करणारा. ६. [वेदपठणावांचून] अन्य यत्न न करणारा. ७. सैन्य. ८. रेशमीं वस्त्रें आणि रत्नांचे हार, यानीं. ९. कामधेनूची मुलगी. १०. दशकोटी. ११. मोबदला. १२. तुमच्या अर्थाहून (धेनुहून) कमी. १३. गृहस्थाश्रमाचा धर्म. (कर्तव्यकर्म). १४. संपूर्ण. १५. मनोव्यथा. १६. देण्यास योग्य. १७. टाकण्यास योग्य. १८. क्षात्रतेजाचा. (वीर्याचा). १९. आज्ञा व मन मोडणें. (मर्जीविरुद्ध वागणें). २०. कल्याणेच्छु. २१. वेदाध्ययन. २२. पिंपळापासून उत्पन्न होण्याचा गुण. २३. अग्नीचे ठिकाणीं. २४. लाखेला. २५. मान हेंच धन ज्याचें असा. २६. नखानें.

भगवान् वदे, 'बळी तूं, तुझिया चतुरंगसैन्य[1] सांगातें[2].
तुज कर्तव्य असे जें, सिद्ध न करिसी अभीष्ट[3] कां गा! तें?'१६
कौशिकें[4] अनुगांसि[5] म्हणे, 'सोडा हो! धेनुला, चला, हाका.
हा काय रत्नभोक्ता[6]? मारू अनुताप पावुनीं हाका.' १७
दंडें ताडुनि नेतां, फोडी ती धेनु फार हंबरडे;
तेव्हां आश्रमवासि द्विज[7]-मृग-खग-देवता-कदंब रडे. १८
नेतां बळें चि धांवत येउनि ती मुनिपुढें उभी राहे,
आणूनि लोचनीं जळ, बहुदीनत्वें मुखाकडे पाहे. १९
धेनु म्हणे, "स्वामी! त्वां पालन केलें, करी न बाप तसें.
कां मज उपेक्षिलें हो! मीं खळदंडें उदंड तापतसें.' २०
साधु म्हणे, 'मज हृदयीं शत[9], तुज बाहेर हे कशा[10] लागे.
मीं ब्राह्मण क्षमावान्, माते! रडतीस तूं कशाला! गे? २१
क्षत्रियतेज असें हें, जें तुजला पीडितो कशापातें[11].
मत्तेज[12]क्षांति मला म्हणत्ये 'हां हां! न ओकें[13] शापातें.' २२
मन्मति-दरींत[14] न शिरे कोप-मतंगज[15] विवेक-हरि[16] जागे;
म्यां न त्यजितां नेतो भूप बळें, तुज रुचेल तरि जा गे!" २३
गाय म्हणे, 'भगवंता! नसतां आज्ञा तुझी, न मद्धरणीं[17]
काळ हि बळी; किती हां[18]? न तृणबळें होय वह्नि बद्ध रणीं.'
विप्र म्हणे, 'नेला कीं दृढबद्ध करूनि वत्स दाव्यानें,

१. चार अंगें (गज, अश्व, रथ व पदाति=पायदळ) ज्याचीं असें सैन्य. २. बरोबर. ३. इच्छित. ४. विश्वामित्र. ५. सेवकांसि. ६. [गोरूपी] रत्नाचा उपभोग घेणारा. ७. ब्राह्मण, पशु, पक्षी व देवता यांचा समुदाय. ८. पुष्कळ. ९. शंभरपट. १०. चाबूक. ११. चावकाच्या मारानें. १२. माझ्या तपश्चर्येंपासून आलेली सहनशीलता १३. देऊं नको. १४. गुहेमध्यें. १५. हत्ती. १६. सिंह. १७. मला हरण करण्याविषयीं. १८. याची काय किंमत?

[1]स्वबळें नृपें [2]मदाश्रम, देह जसा व्यापिला सदा [3]व्यानें. २५
शक्य असेल तरि रहा,' ऐसें मुनि बोलतां चि ती क्षोभे.
[4]ग्रीष्मगर्मध्यान्हार्कप्रतिम तिचा देह तेधवां शोभे. २६
[5]धेनुमिषें त्या मुनिची [6]सुतपस्यासिद्धि कोपली वाटे.
फाटे [7]गाधिजबळतम त्या [8]चपळेच्या धरूनियां [9]वाटे. २७
अंगांपासुनि केले प्रकट तिणें म्लेच्छ, यवन, शबर, शक;
बळ उडविलें तिहीं [10]खगपतिपक्षांहीं जसें सहज मशक. २८
जेंवि दिगंताप्रति ने [11]तिमिरीं [12]तूळीं [13]रविप्रभा [14]वात्या.
सेना तसी नृपबळा, [15]निस्तुळ म्हणती [16]कवि [17]प्रभावा त्या. २९
दशशतसहस्र पीडिति एकैका गाधिजानुगा यवन;
गाय वन स्वर्ग हि, तें दावि पितां आपणांत गाय [18]वन. ३०
'[19]पकडा, लिया, कहां? लो, [20]बे! [21]बिसवामितर [22]भाग जावेगा,'
[23]यवन म्हणति; दाविति त्या, वायु म्हणे 'भूरिभाग' ज्या वेगा.
मागें पाहों न दिलें, तीं बारा कोस पळविलीं कटकें.
यशें हारविलें तेथें किति शस्त्रें, हार, कुंडलें, [24]कटकें? ३२
भूप म्हणे, 'जे नेणति गोब्राह्मणतेज, ते जन [25]क्षेत्रीं

---

१. स्वसैन्यानें. २. माझा आश्रम. ३. व्यान नांवाच्या वायूनें. (हा शरीरांत सर्वत्र फिरणारा एक वायु आहे). ४. उन्हाळ्यांतील दोनप्रहरच्या सूर्यासारखा. ५. गाईच्या रूपानें. ६. चांगल्या तपश्चर्येचें सामर्थ्य. ७. विश्वामित्राचें सैन्य हाच अंधकार. ८. विजेच्या. ९. मार्गाला. १०. गरुडाच्या पंखांनीं. ११. अंधकाराला. १२. कापसाला. १३. सूर्याचें तेज. १४. वावटळ. १५. निरुपम. १६. शहाणे लोक. १७. पराक्रमा. १८. वन (पाणी) पितां तें आपणांत गाय दावी. (गाधिजमुनीच्या सैन्यास ती गाय पाण्यांत हि दिसूं लागली असा भाव). १९. परिशिष्टांत पहा. २०. अरे! २१. विश्वामित्र. २२. पळून जाईल. २३. पाठांतर—**यवन म्हणति; दाखविती शब्दीं, हरि करिवरांसि ज्या वेगा.** २४. कडीं. २५. क्षत्रियांचे ठिकाणीं.

कलिपति, जसें न पाहुनि शिशु शशभृत्तेज[1] तेज नक्षत्रीं. ३३
धिक् क्षत्रियतेजातें! सार नसे लेश या पलालसमीं[2];
येणें चि जाहलों हतकाम[3] पराभूत पापलालस[4] मीं. ३४
क्षत्रबळ नाव फुटकी, जें ब्राह्मणतेज तें चि नव नौका.
बुडतों न अन्यथा मीं, तरता व्यसनांत तो हि न वनौका[5]. ३५
प्राज्य हि राज्य हित नव्हे; तप साधावें, तयांत सर्व हितें.
तप न करावें कोणा प्रभुनें विनिमग्न ज्यांत शर्व[6] हि तें?' ३६
निश्चय करूनि, राज्यश्री सोडुनि, सर्व ताप साहूनीं,
होमुनि[7] तपोनळीं[8] वपु, होय अधिक सर्व तापसाहूनीं. ३७
सिद्धि म्हणति, 'पति वरिले व्यर्थ तुम्हीं बहु तपोनि, धिक् क्षणदे[9]!
धिक् स्वाहे[10]! धिक् पद्मिनि[11]! सुख न, जसें हा तपोनिधि क्षण दे.'
ब्रह्मर्षिता[12] वरी त्या पतिस म्हणे, 'तूंहि अच्छ[13] विप्र खरा;
रवि मानी[14] कीं, भुलली निजरुचि[15], अन्यत्र न छवि प्रखरा.' ३९
झाला नृपति वसिष्ठस्पर्धेनें विप्र, तें असो आतां;
विस्तर भय दे, नाहीं तरि, काळाचें हि भय न हें गातां. ४०
त्या मुनिनें[16] सिद्धिबळें[17] मोहुनि सौदास[18]नृपतिच्या मतितें,
केला वसिष्ठ सुतशतशोकार्त[19], किजे जसें महापतितें[20]. ४१

---

१. शश=ससा, त्यास धारण करणारा तो शशभृत्=चंद्र, त्याचें तेज. २. पाचोळ्यासारख्या (क्षत्रियतेजामध्यें). ३. नष्ट झाल्या आहेत इच्छा ज्याच्या तो, हताश, निराश. ४. पाप करण्याविषयीं लाचावलेला. ५. वन हेंच ओक=गृह ज्याचें तो वसिष्ठमुनि. ६. शंकर. ७. हवन करुनि, अर्पुनि. ८. तपरूप अग्नीमध्यें. ९. हे रात्रि! (क्षण=उत्सव—आनंद—विश्रांति, ती देणारी ती क्षणदा). १०. हें अग्नीच्या स्त्रीचें नांव. ११. हे [सूर्यविकासिनि] कमलिनि! १२. विश्वामित्र जातीचा क्षत्रिय असून आपल्या तपःसामर्थ्यानें ब्रह्मर्षि झाला. १३. शुद्ध. १४. मानी. १५. आपली कांति. १६. विश्वामित्रमुनिनें. १७. तपाच्या सिद्धीच्या सामर्थ्यानें. १८. ऋतुपर्णपुत्र सुदास, त्याचा पुत्र तो सौदास (कल्माषपाद), त्याच्या. १९. शंभर पुत्रांच्या शोकानें पीडित. २०. महापातक्यानें.

ज्येष्ठ सुत वसिष्ठाचा शक्तिमुनि पथीं[1] वनांत आढळला;
कल्माषपाद[2] मागे पथ, परि कवि तो न सर्वथा ढळला[3]. ४२
संकुचित पथ न सोडी म्हणुनि नृपें ताडिला कशा-पातें.
'धर्मघ्ना! राक्षस हो' दे मुनि या उग्रपाकशापातें[4]. ४३
भेटे राक्षस मंत्री गाधिसुताज्ञेकरूनि शापाला[5].
ग्रासी मोह नृपाला, राहु महाग्रह जसा निशापाला[6]. ४४
मृगमांसभोजनार्थी[7] त्यावरि भेटे द्विज क्ष्मापतिला,
मान्य करुनि तें विसरे[8], कीं शापें मोह जाहला मतिला. ४५
रात्रौ स्मरलें, सरलें, होतें यद्यपि उदंड परि पळ[9] तें.
दैव प्रसन्न नसतां, वस्तु सकळ भे[10] दिल्याचिपरि पळतें. ४६
'नरमांस द्या' ह्मणे[11] नृप, 'कोठुनि आणूं तदर्थ[12] हरिणा मीं.'
नुमजे[13] मोहें कीं, 'हें कर्म मला तापवील परिणामीं.' ४७
करितां तसें चि सूदें[14], उमजे, नुमजेल काय हो! मुनितें[15]?
पेटे जें अति शुष्क क्रोधज्वलनांत काय होमुनि तें. ४८
विप्र म्हणे, 'हा! दुष्टा! ब्राह्मण नरमांस काय रे! खाती?
श्रुतिकृतमर्यादेची[16] जो पुसिली आजि काय रेखा[17] ती? ४९
मीं विप्र, नव्हें राक्षस; राज्यमदांधें न नीट वळखावें.

---

१. मार्गांत. २. सौदासराजाचें हें नांव पडण्याचें कारण, एकदा त्यानें गुरूस शाप देण्याकरितां अभिमंत्रित केलेलें जल वायकोच्या उपदेशावरून पुन्हां आपल्याच पायावर टाकलें. त्यामुळें त्याचे पाय कल्माष म्ह० कृष्णवर्णाचे झाले; यास्तव 'कल्माषपाद' असें याचें नांव पडलें. ३. हालला. (मार्ग दिला नाहीं, हा भाव). ४. ज्याचा परिणाम भयंकर अशा शापातें. ५. किन्नर नामक राक्षस त्या शापाला मंत्री (मसलत देणारा) भेटला. ६. निशापति चंद्राला. ७. मृगमांसयुक्त भोजन इच्छिणारा. ८. मृगमांसभोजन देण्याचें विसरे. ९. मांस. १०. भय. ११. नृप असें आपल्या आचाऱ्यांला म्हणे. १२. त्या ब्राह्मणासाठीं. १३. न+उमजे=जाणेना. १४. आचाऱ्यानें. १५. त्या अन्नार्थी विप्रातें. १६. वेदानीं घालून दिलेल्या मर्यादेची. १७. रेघ.

हें त्वां चि आजिपासुनि राक्षस होवुनि मनुष्यपळ[1] खावें.' ५०
हे दोन[2] शाप, राक्षस[3], गाधिज, एकामतें चि गुरु[4] चवघे.
पढवुनि मित्रसहकरें[5] मारविती श्रीवसिष्ठसुत अवघे. ५१
सेवी द्विजरक्तरसा नृपति, वसिष्ठ हि नव्या चि शोकरसा.
सेवन करवी, भरवी, [6]विधि त्याचा शाप, भूप तो करसा. ५२
होय विफळयत्न मुनि स्वतनुत्यागीं धरून कामातें,
मेर्वग्न्यब्धींस[7] म्हणे, "म्हणतां कां हो! 'मरू नका' मातें?"
बद्ध करूनि कर-चरण बुडतां, तोडी महानदी पाशा[8].
कोणा नको सुतेजा? काय पतंगीं लहान दीपाशा[9]? ५४
तोडी पाश, न बुडवी जी सकरुणमानसा धुनी[10], तीस
ठेउनि नाम विपाशा[11], गाति सबहुमान साधु नीतीस. ५५
जैसा यत्न न सोडी, जरि धन न मिळे, तथापि धनकामी[12],
निधनार्थी[13] मुनि हि म्हणे, 'यत्नीं फळ[14]; आवरूं स्वमन कां मीं?'
शक्तिस्त्री[15] न[16] विसंबे श्वशुरासि, वनीं फिरे तयामागें,
गुरुसेवनें भुलविलें मन कुळज्यांचें, तसें न हेमागें[17]. ५७
भरि एकदा श्रुतिरवें, तद्गर्भाचें हि, कानना, तुंड[18].

---

१. मनुष्याचें मांस. २. राक्षस होणें व नरमांस खाणें. ३. किन्नरराक्षस. ४. उपदेशक. ५. कल्माषपादाच्या हातें. (मित्रसह आणि वीर्यसह हीं कल्माषपादाचींच दुसरीं नांवें). ६. दैव. ७. मेरुपर्वत, अग्नि आणि समुद्र यांस. (मेरुपर्वतावरून कडेलोट केला, अग्नीमध्यें उडी घेतली, समुद्रांत बुडी दिली तरी मरण येईना, म्हणून 'म्हणतां कां हो! मरू नका मातें?' असें त्यांस संबोधून म्हटलें आहे.). ८. हातपाय बांधून वसिष्ठ नदींत बुडूं लागला, तों तिनें त्याचे पाश (करचरणबंधन) तोडिले. ९. दीपसंबंधीं आशा. १०. नदी. ११. पाशच्छेद करणारी (नदी). १२. द्रव्येच्छु. १३. मरणेच्छु. १४. यत्नीं फळ [मिळतें]. १५. वसिष्ठपुत्रशक्तीची भार्या. १६. न सोडी. १७. सुवर्णपर्वत मेरूनें. १८. त्या शक्तिस्त्रीच्या गर्भस्थ मुलाचें तोंड श्रुतिरवें (वेदघोषानें) कानना (अरण्या) भरून टाकी.

तें[1] कुललय[2]शोकतमीं धरिल हिमकर[3]त्व कां न नातुंड? ५८
ब्रह्मर्षि पुसे, 'वत्से! शक्ति तसा वेद कोण गे! ह्मणतो?
वाटे आलिंगावा कडकडुनि, मला दिसेचिना पण तो.' ५९
ती साश्रु[4] अदृश्यंती[5] बोले जोडूनि हात, 'मामाजी!
गर्भ मदुदरीं म्हणतो मज घालायासि हा तमा[6]माजी.' ६०
मुनिपति म्हणे, 'अगा! कुळतंतो! संतोषदान[7] नातूंनीं
न दिलें, असें अमृत तव गळतें संतोषदानना[8]तूनीं.
ऐसें मद्व्यसन[9]शमन कवण दयित सोयरा शिशो! करिता?
तव वेदध्वनिघटजें[10] केला विषतोयराशिशोक[11] रिता?' ६२
सोडुनि मरणोद्यम शमधन[12] अनघ[13] नलिनभवप्रभव[14] परते;
चित्तीं म्हणे, 'अकृपसे गमले मेर्वादि, सदयतम[15] पर ते.' ६३
तों मार्गीं भक्षाया मुनिसह तत्कुळकरा[16] हि उर्वरिता[17]
तो[18] भूप ये सुहृत्त्व[19] त्यजुनि विधिबळें धरूनि उर्वरिता[20]. ६४
गुरुशापदुरिंधनहततेजा[21] राजर्षि, वह्नि तो याज्य[22],
व्हाया पुन्हां प्रकाशित सिंची मुनि मंत्रपूत[23] तोयाज्य[24]. ६५

---

१. तें नातुंड (नातवंड, नातू). २. कुलाच्या संहारामुळें होणारा शोक हाच अंधकार त्यांत. ३. चंद्रत्व. ४. डोळ्यांत अश्रु आले आहेत अशी. ५. शक्तीच्या भार्येचें नांव. ६. मोहांत. ७. संतोषाचें देणें. ८. संतोष देणाऱ्या मुखांतून. ९. माझ्या संकटाचें निरसन. १०. वेदपठनाचा शब्द हाच अगस्त्यमुनि, त्यानें. ११. 'शोक-विष-तोय-राशि' या समासांतील पदक्रम कवीनें यमकसुखार्थ बदलला आहे. १२. शांति हेंच धन ज्याचें तो. १३. निष्पाप. १४. कमलोद्भव ब्रह्मदेवापासून उत्पत्ति ज्याची तो वसिष्ठ. १५. अतिशय दयाळु. १६. त्या वसिष्ठाची कुलवृद्धि करणारा पराशर, त्याला. १७. उरलेल्या. १८. कल्माषपाद. १९. मैत्री. २०. उरु=पुष्कळ+अरिता=शत्रुत्व=हाडवैरीपणा. २१. गुरुशापरूप दुष्ट काष्ठानीं दग्ध तेज ज्याचें असा. २२. यजमान. २३. मंत्रानें पवित्र केलेलें. २४. उदकरूप तूप.

मलिन कुगंधि कुरूप क्रूर कठिन शुष्क राक्षसत्वानें,[1]
तो नृप केला स्मरसा[2] सहसा त्या पुष्करा[3]क्षसत्वानें. ६६
जी निजसत्कीर्ति तिला होवूं दे न वितथा[4], पिशा[5] पावे.
यद्यपि शापार्ह तिघे, न म्हणे तो कवि तथापि शापावे. ६७
तारुनि नृपासि कुळंकर[6] पुत्र[7] हि दे, न सुकृतासि[8] मुनि वेची.
तत्कीर्तिला नमी श्री[9] शरदृतुच्या लक्ष वेळ पुनिवेची[10]. ६८
व्हावा अद्भुत जैसा प्रध्वस्ततमःपराश[11] रविस रवी,
मुनिला सुतशोक तसा होउनि शक्तिज पराशर विसरवी. ६९
तो आज्याला चि म्हणे 'तात;' किजे अधिक काय हो! तातें?
खेद अदृश्यंतीतें दे, श्वशुरा 'तात' म्हणत होता तें. ७०
ती एकदा म्हणे, "'बा' म्हणसि असें चि पसरूनि आज्याला
म्हणुनि तुवां निववावें तें कैंचें? म्हणसि 'तात' आज्याला.
मामाजींस म्हणसि, तें न म्हण; म्हण तयांसि 'आर्य आज्याबा.'
आज्या 'बा[12]' न म्हणावें, गहिंवर येतो तया[13] हि माझ्या[14] बा[14]! ७२
राहु निशेच्या, माझ्या राक्षस, करि रोष, नंदना! तिलकीं[15].

---

१. राक्षस होऊन राहिल्यामुळें. २. मदनासारखा. ३. कमलाक्ष विष्णूप्रमाणें धैर्य ज्याचें त्या वसिष्ठानें. ४. व्यर्थ. ५. वेड्या राक्षसाला. (वसिष्ठास पिसा झालेला कल्माषपाद सांपडला हा इत्यर्थ). ६. कुलवृद्धि करणारा. ७. कल्माषपादानें राक्षसस्थितींत एका ब्राह्मणास मारून खाल्लें, तेव्हां ब्राह्मणस्त्रीनें 'स्वस्त्रीसंग करितांच मरशील' असा शाप दिला, म्हणून कल्माषपादाच्या विनंतीवरून त्याच्या स्त्रीशीं (दमयंतीशीं) दिव्यविधीनें संग करून वसिष्ठानीं एक पुत्र निर्माण केला व तो कल्माषपादराजास दिला. ८. पुण्याला न वेची=न खर्च करी. (वसिष्ठानें नृपपत्नीशीं मैथुन न करितां पुत्र उत्पन्न केला; त्यामुळें परस्त्रीसंगपातकानें होणारा पुण्यक्षय झाला नाहीं). ९ शोभा. १०. पौर्णिमेची. ११. नाशिली आहे तमोरूप (राहूरूप) शत्रूची आशा ज्यानें असा (पक्षीं) नाशिली आहे तमोगुणरूप शत्रूची आशा ज्यानें असा. १२. बाप. १३. त्यांना. (वसिष्ठाना). १४. माझ्या बाळा! १५. निशेच्या तिलकीं=चंद्रीं; माझ्या तिलकीं=सौभाग्यतिलकीं (पतीवर).

काय वदावें? दावें[1] गिळिला अल्पद्रु[2] नंदनांतिलें[3] कीं. ७३
ज्यांस म्हणत होती कर जोडुनि विद्या कळा सभा 'वो! जी!'
हरिस हरिणसे झाले नव्याण्णव त्या खळास भावोजी." ७४
पितृघातवृत्त कळतां सर्वां लोकांसि दोष तो[4] लावी,
कीं शक्तोपेक्षकमति[5] ती अघकृन्मतिसवें[6] चि तोलावी. ७५
जैसें सुटों न द्यावें प्राणक्षयतत्परा शरासि, कवी
ब्रह्मर्षि[7] तसें चि करी, निजशांतिकळा पराशरा शिकवी. ७६
'धरिति शिवेच्छु[8] क्षत्रियजन जिंकाया परा शरालीला[9],
संत क्षमेसि धरिती, तुज हेचि रुचो पराशरा! लीला. ७७
व्याघ्रवृकहरिव्याळप्रभृतींचा जो समूह हानिकर,
त्याहूनि कामकोपप्रमुखांचा निपट[10] दुष्ट हा निकर[11]. ७८
बा! सादर अभयाच्या तापस दानींच; हा निकर विखरी
धृतिला धुळींत[12]; देउनि ताप सदा नीच हानि करवि खरी. ७९
जी शीतागाधजळा[13] सरिता[14], शिरतां निवे करी[15] तींत,
निवतो प्रवेशतां जन सर्व हि तैसा विवेकरीतींत. ८०
नाशी स्वसेवनकरा[16], अन्यजना ही, म्हणोन कोपानें
बहु अहित होय, तैसें अहित विषाच्या म्हणों नको पानें. ८१
भृगुकुळज और्वमुनि[17] ही पूर्वीं ऐसा चि कोपला होता,
पितृवचनें परि टाकी स्वक्रोधाग्नीस[18] सागरीं पोतां[19]. ८२
दे मज हें, लोकांचें भस्म क्रोधें करूं नको, पावें.
कथिला धरूनि हनु[20] नय, अनुनय[21] किति बा! करूं? न कोपावें.

---

१. वणव्यानें. २. लहान वृक्ष, (पक्षीं) तरुण. ३. नंदनवनांतील. ४. पराशरऋषि. ५. समर्थाची उपेक्षाबुद्धि. ६. पाप करणाऱ्याच्या बुद्धीशीं. ७. वसिष्ठ. ८. कल्याणेच्छु. ९. बाणपंक्तीला. १०. केवळ. ११. समूह. १२. धुळींत विखरी=मातींत पसरी. (नष्ट करी). १३ थंड आणि खोल पाणी जीचें अशी. १४. नदी. १५. हत्ती. १६. आपला अंगीकार करणाराला. १७. ऊरु म्ह० मांडी तीपासून झालेला तो और्व. १८. हा और्वमुनीचा क्रोधाग्नि च समुद्रांतील वडवाग्नि झाला. १९. बाळाला. २०. हनुवटी. २१. आर्जव.

कोपें कुळज[1] जरि, तमें[2] तरि फुगवुनि गल्ल भानु[3] गांठावा.
महिमा क्षेमारताचा[4] बहु तो श्रीवल्लभानुगां[5] ठावा. ८४
नंदनशील[6] म्हणति त्या तापाकुळ[7] नंदनाप्रति[8] ज्ञाते.
सोडावी मद्वचनें बापा! कुळनंदना! प्रतिज्ञा[9] ते.' ८५
लोकक्षयसंकल्प त्यागुनि, सुखवुनि मनांत आजोबा,
राक्षससत्र करी, कीं, भाव्यजसुतसा[10] सुरांत साजो बा[11]. ८६
जें भस्मसात्[12] पराशर करि मंत्रबळें पुलस्त्यसंततितें[13],
आले संरक्षाया ऋत्वत्रिपुलस्त्यपुलह[14] संत तितें. ८७
त्यासि पुलस्त्य म्हणे, 'बा! तुज पाहुनि सर्व ताप हरपावे,
सद्यः साधुसमागम, तेंवि न नाशूनि ताप हर पावे. ८८
तेजप्रमाण आम्हां तत्त्वज्ञांस प्रमाण न वय जनीं.
तें अद्भुत तेज तुझें दिसलें कोणासि या न नव यजनीं? ८९
हा आर्य[15] हि न क्षांति क्षण दूर करूं न कोपला शांत.
काळ चि निमित्त करितो भलत्यास, करूं नको पलाशांत[16]. ९०
पावे क्षमी सुकृत, सुख, यश, जें पावेचिना अमर्षी[17] तें
विधुतें लक्ष्म[18] तसें हें अकृपपण नसो भवत्समर्षीतें[19]. ९१
साहे न कोपवेगा जो, कीं जो कांपरा शरास रणीं,
त्याची रुचेल शांतिस, कीं कीर्तीस कां पराशरा! सरणी[20]? ९२
कामाची क्रोधाची ज्यांहीं केली जपोनि आज्ञा, ते
चुकले, स्वहिता मुकले, त्यांतें पाहोनि म्हणति 'हा' ज्ञाते. ९३

---

१. कुलीन. २. अंधकारानें. ३. सूर्य. ४. क्षमेमध्यें निमग्न असलेल्याचा. ५. लक्ष्मीपति विष्णूच्या सेवकांला. ६. आनंददायक स्वभाव ज्याचा तो. ७. दुःखानें पीडित. ८. पुत्राला. ९. [सर्वलोकनाशाची] प्रतिज्ञा. १०. भक्तियुक्त नारदासारखा. ११. बाप. १२. भस्माधीन. ('सात्' हा प्रत्यय अधीनार्थी होतो; जसें—राजसात्, अग्निसात्.) १३. राक्षसातें. १४. क्रतु, अत्रि, पुलस्त्य आणि पुलह हे सृष्टिकर्त्या सप्तर्षींपैकीं आहेत. १५. श्रेष्ठ वसिष्ठ. १६. राक्षसाचा नाश. १७. क्रोधी. १८. लांछन. १९. तुझ्यासारख्या ऋषीला. २०. पद्धति.

हित इतर न धन शमसम, यावरि तुज हें न कार्य[१] सत्र[२], पहा;
कवि रविरुचि[३] शुचिभव[४] तव व्हावा येणें न आर्य[५] स-त्रप[६] हा.'
शक्ति-ज सत्र पुरें करि, सद्वचनांच्या निवे चि तो पानें.
हो पानें सुखद अमृत, परि सद्वचनें चि शांति-सोपानें[७]. ९५
गंधर्वोक्त[८]-वसिष्ठप्रभु-चरितें जिष्णु[९] तो निवाला हो!
प्रेमें म्हणे, 'जसा मीं सर्व हि जन पात्र या शिवाला[१०] हो.' ९६
पुसतां पुरोहितें[११], म्हणे, "आचार्यत्वेंकरूनि सौम्यातें
उत्कोचनामतीर्थीं क्षिप्र वरा जा नमूनि धौम्यातें[१२]. ९७
जाणे, तो गुण जाणे, जे तत्पूर्वज मुनींद्र देवल[१३] ते.
तत्पदयुगली[१४] म्हणत्ये, 'न सुख स्पर्धेंत बाइ! देव-लते?'" ९८
देउनि अग्र्यस्त्रातें, ठेवुनि चित्तीं तदुक्तमंत्रास[१५],
धौम्याप्रति जातां दे कुदशेसि पदोपदीं हि संत्रास[१६]. ९९
तीर्थी स्वानुजरूपें[१७] जी होती तप करीत देवलतां[१८],
तीणें बहु लाजविली पांडुसुतेच्छित करूनि देव-लता. १००
'[१९]यत्ध्रुवमाश्रिततारकमनलसमुरुभवपयोनिधौ स्या तें,
हें यानपात्रें[२०] वरिलें,' धर्म म्हणे पद धरूनि धौम्यातें. १०१

---

१. करावयास योग्य. २. यज्ञ. (राक्षसयज्ञ). ३. सूर्याप्रमाणें कांति ज्याची तो. ४. शुद्ध जन्म ज्याचा तो. ५. वसिष्ठ. ६. सलज्ज. ७. शांतीच्या पायऱ्या [होतात]. ८. चित्ररथ गंधर्वानें सांगितलेल्या. ९. अर्जुन. १०. कल्याणाला. ११. पुरोहित [कोण करावा असें] पुसतां. १२. ऋषिविशेष. (हा देवलमुनीचा कनिष्ठभ्राता). १३. एका मुनीचें नांव. १४. त्याचें पादद्वय. १५. त्या चित्ररथानें [चाक्षुषी विद्येविषयीं] सांगितलेल्या मंत्रास. १६. भय. १७. आपला धाकटा भाऊ धौम्य याच्या रूपानें. १८. देवलत्व. (देवलमुनीचा भाव). १९. उरुभवपयोनिधौ यत् अनलसं, ध्रुवं आश्रिततारकम्=विशालभवसागरामध्यें जें आलस्यरहित होऊन निश्चयानें आश्रितांस तारणारें, तें (पद). २०. नौका.

अध्याय पस्तिसावा.

गेले धन्य कराया पांडूचे नंदन द्रुपदराज्या,
तो गुरु[1] हि जांय समुचित[2] पसराया नंदनद्रु[3] पदरा ज्या. १
राजसुतांसि रहाया त्या द्रुपदपुरीं कुलाल[4] दे शाला[5].
काळगति पहा बुध हो!, बा! एखादे भुलाल देशाला. २
मिरवायासि न उरला स्वमहत्वाचा कुला[6] लव सतींत,
रत्नगृहोचित[7] पृथ्वी-पति-सुत वसले कुलाल-वसतींत. ३
सेवुनि भिक्षान्न सुखें, रत होते देव-विप्र-भजनांत,
कोण्हीं हि न ओळखिले, कीं ते दाटूनि विप्रभ[8] जनांत. ४
बहु विप्र, बहु क्षिति-पति, बहु मागध[9], सूत[10], बंदिजन[11] आले.
कृष्णा-स्वयंवरोत्सव-दर्शन-भाग्येच्छु[12] देव ही झाले. ५
वरबुद्धि अर्जुनीं च स्थिर होती सर्वदा, परि पुरा जे
आले, ते आदरिले द्रुपदें, पहिले जन्हि स्व-रिपु राजे. ६
झालें जतु-गृह-दाह-श्रवण, परि मना न साच वाटे तें.
वांच्छित-सिद्ध्यर्थ धरी तो राजा युक्तिच्या च वाटेतें. ७
करवी लक्ष्य[13] व्योमीं पार्थास चि शक्य भेद त्याचा कीं,
चळचक्र[14] तळीं भेदनसाधन, तें सूक्ष्म रंध्र त्या चाकीं. ८
शर पांच मात्र, धनु ही त्र्यंबककोदंडमित्र[15] कठिनपणें.
करवुनि ऐसें भिववी बहुतांच्या ही मनांसि कठिनपणें[16]. ९

---

१. धौम्य. २. योग्य. ३. कल्पवृक्ष. ४. कुंभार. ५. [मातीचीं भांडीं घडण्याची] जागा. ६. अन्वयार्थ—कुला (कु=पृथ्वी तिला) सतींत (साध्वी स्त्रियांमध्यें) मिरवायासि स्वमहत्वाचा लव (अल्पांश हि) न उरला. ७. रत्नखचित घरामध्यें राहण्यास योग्य. ८. निस्तेज. ९. राजवंशाचें वर्णन करणारे. १०. पुराणवक्ते. ११. स्तुतिपाठक, भाट. १२. द्रौपदीचा स्वयंवरोत्सव पाहण्याच्या भाग्याची इच्छा करणारे. १३. निशाण. १४. चलयंत्र. (याला च छिद्र होतें). १५. शंकराच्या धनुष्याचें मित्र. १६. घोर प्रतिज्ञेनें.

घोषविलें[1] कीं, ‘ चढवुनि धनुला पांचा शरांत लक्षातें
भेदील जो कृती, त्या माझी कन्या वरील दक्षातें.’ १०
सर्व मिळाले रंगीं[2] विप्र-नृपांहीं सु-मंच शोभविले.
रंगीं ते लोक तसे कमळवनीं जेंवि भृंग लोभविले. ११
बसले होते पांडव विप्रांच्या शिवमया[3] समाज्यांत.
कोण न होतील तदाश्रित, शांति दया सुधासमा ज्यांत? १२
रंगीं धृष्टद्युम्नें धरुनि करीं आणिली स्वसा[4] रमणी
जाणों भुजगें[5] प्रेक्षक-जन-नयन-मनोहर[6] स्वसार[7] मणी. १३
तद्रूपें मोहे सुरजन हि, धरिल धैर्य तो कसा रंग?
मूर्तिमती गीति[8] गमे ती, भुलले ते हि लोकसारंग[9]. १४
वरिलें उमापण तिणें पाववुनि स्व-च्छवि[10] प्रकाशाला.
तसि नसती तरि मिळते बहु सुज्ञ स्वच्छ विप्र काशाला? १५
कर वळविला अजें[11] जें विष्णुधृतस्त्रीस्वरूप[12] कित्ता तें,
चित्र तसें चि उतरिलें चतुरें, वाटे कवींद्र-चित्तातें. १६
रंगीं धृष्टद्युम्न स्वभुज उभारुनि म्हणे, ‘ अहो! परिसा,
भेदील लक्ष तो या मद्भगिनीला वरूनि हो हरिसा[13].’ १७
कृष्णेसि म्हणे, ‘ वत्से! दे माळा लक्ष्यभेद करित्यातें,
कुल, शील, रूप, सद्गुण असतील स्वानुरूप जरि त्यातें. १८
हा दुर्योधन नृप, हे व्यासवरें बंधु जन्मले शत, गे!
हा कर्ण, ज्यापुढें परचापश्रुतिकुशळता[14] न लेश तगे. १९
हा शल्य मद्रपति, हा चेदिपें[15], शिशुपाळ, हा जरासंध,

---

१. जाहीर केलें. २. सभास्थानीं. ३. कल्याणरूपा. ४. बहीण. ५. सर्पानें. ६. पाहणाऱ्या लोकांचे नेत्र व मन हरण करणारा. ७. आपलें धनसर्वस्व च असा. ८. गायनकला. ९. लोक हेच हरिण. १०. आपली कांति प्रकाशाला पाववुनि तिणें गौरीत्व वरिलें. ११. ब्रह्मदेवानें. १२. विष्णूनें [अमृतमंथनसमयीं] घेतलेलें स्त्रीचें (मोहिनीचें) रूप. १३. सिंहसा किंवा इंद्रसा. १४. शत्रूचें धनुर्वेदकौशल्य. १५. चेदिदेशाचा राजा.

गंधद्विप[1]गंध तसा दुःसह यांचा हि शत्रुला गंध. २०
हे राम कृष्ण यदुपति, हे दोघे साधु उद्धवाक्रूर,
गमले रिपु गोपस्त्रीहृदया, जे परम शुद्ध वा[2]क्रूर.' २१
ऐसें [3]समागतांचें कळवी कुळशीळकर्मजन्म तिला.
कीं, लक्ष्यभेदकर ही अकुळज कोण्ही रुचो न सन्मतिला. २२
दुर्योधनादिकांची कन्यारत्नीं च वेधली दृष्टी;
वृष्टि जसि चातकांला, त्यांला तसि ती विरंचि[4]ची सृष्टि[5]. २३
कृष्णेकडे जनाची तसि दृष्टि, श्रीकडे जसी सृष्टी.
भक्ताकडे चि हरिची दृष्टि, जसी वासुराकडे गृष्टी[6]. २४
बळदेवासि म्हणे प्र[7]भु, 'आर्या ! त्या ब्राह्मणांत तो धर्म,
तो भीम, तो धनंजय, ते यम[8], म्यां वळखिले, नव्हे नर्म[9]. २५
ब्राह्मणवेष असो द्या, तेज पहा, चातका सदा दाते
घनसे निववितिं, मज वश झाले चि; न घातकास दादा ! ते.'
'नवल ई[10]टांत मिळाल्या कनकाच्या ई[11]ष्टका, मला भा[12]चे
गुरुचे ब[12]हु, यांहुनि शतहर्ष उणे इष्टकामलाभाचे.' २७
ऐसें बलभद्र म्हणे, वर्णी त्या विश्व[13]साक्षिदृष्टीतें,
सृष्टीतें जो रचि तो, यश न जिचें ये सुधाब्द[14]वृष्टीतें. २८
देशोदेशींचे नृप झटले, परि प[15]रशुरामसा चाप
न वळे, लवे भुजबळें, त[16]त्ताडित बहुत पावले ताप. २९

१. मदोन्मत्त हत्तीचा गंध. २. वाणीनें भयंकर असे. (कृष्णास मथुरेस नेले तेव्हांचें अक्रूराचें भाषण आणि उद्धवाचें गोपीसांत्वनपर भाषण त्या गोपींस क्रूर वाटलें, असा कथासंदर्भ). ३. जमलेल्यांचें. ४. ब्रह्मदेवाची. ५. द्रौपदीरूप. ६. नूतन प्रसूत झालेली गाय. ७. कृष्ण. ८. नकुळसहदेव. ९. थट्टा. १०. [मातीच्या] विटांत. ११. विटा. १२. गुरूचे (वसुदेवाचे) भाचे (पांडव) मला बहु (मान्य) [आहेत]. १३. सर्व जगाला पाहणारी दृष्टि ज्याची त्या कृष्णाला. १४. अब्द=मेघ. १५. परशुरामासारखा. १६. त्या धनुष्यामें ताडिलेले.

चोळुनि कर, करकर रद खाउनि, [1]दष्टोष्ठ [2]मोघचापल ते
[3]हतदर्प भूप म्हणती, '[4]हंतें! [5]हताः स्म [6]त्वयाद्य [7]चापलते!' ३०
तेव्हां [8]स्वात्युत्साहें [9]हृष्टमना तात [10]उष्ण-कर करुनीं
रविसमवर्णे कर्णे चाप चढविलें क्षणांत करकरुनीं. ३१
स्वमनीं पांडव म्हणती, 'हा! हा! या [11]दुष्कुळ-प्रसूतानें
नेलें चि लक्ष्य भेदुनि [12]सह कन्यारत्न यश हि [13]सूतानें.' ३२
जों कर्ण म्हणे, 'न शिवों देईन इला दुज्या [14]नवऱ्या मीं,'
तों चि म्हणे ती कृष्णा, '[15]सूतमहं जातुचिन्न वरयामि.' ३३
कर्ण [16]विगुणधनु टाकुनि, पाहुनि रविला, चुरूनि हातातें,
चित्तीं म्हणे, 'कशाला केला निर्माण पुत्र हा तातें? ३४
[17]वैतरणी [18]सुतरा, [19]ह्री बुडवी, निंदोत [20]पाप [21]सुतरेतें.
केला कां बुडवाया दुस्तर-लज्जा-नदींत सुत रेतें?' ३५
शिशुपाळ यत्न करि, परि बोले स्व-मनांत [22]चापदैवत, 'मीं
न कठिन, तुला बुडवितें आठवुनि तुझें चि पाप दैव [23]तमीं.' ३६
[24]मागधजरासुत म्हणे, 'कृष्णा होईल आजि [25]मज्जाया.'

---

१. चाविले ओंठ ज्यानीं ते (भूप). (येथें ओष्ठ शब्द पुढें आला म्हणून पररूप संधि झाला आहे). २. निष्फळ चपलपणा ज्यांचा ते. ३. गतगर्व. ४. हाय! हाय! ५. मारले गेलों. ६. त्वां, आज. ७. हे चापलते! तूं आज आम्हांला ठार बुडविलेस! (लवचीकपणावरून धनुष्याला लतासादृश्य कल्पिण्याचा कविसंप्रदाय आहे). ८. आपल्या अति उत्साहानें. ९. आनंदित आहे मन ज्याचें असा. १०. उष्ण किरण ज्याचे तो सूर्य. ११. नीचकुलोत्पन्नानें. १२. द्रौपदीरूप कन्यारत्नासह. १३. सूतपुत्र कर्णानें. १४. नवऱ्याला. १५. अहं सूतं जातुचित् न वरयामि=मी सूत जो कर्ण त्यास कधीं हि वरणार नाहीं. १६. दोरीनें रहित असें धनु. १७. [पूरक्तमिश्रित] एक नदी; ही यम लोकीं जातांना लागते. १८. तरण्यास सोपी. १९. लज्जा रूपी नदी. २०. पापी लोक. २१. वैतरणीतें. २२. चापरूपी दैवत. २३. अंधकारांत. (दुःखांत). २४. मगधदेशाचा राजा जरासंध. २५. माझी बायको.

त्यासि म्हणे चापलता, 'लज्जापंकीं[1] तुम्हीं हि मज्जा, या.' ३७
शल्य हि पडला, झडला मद; न प्रकटूनि शकिला जे तें
कौतुक पाहत होते, सांपडले ते च कवि[2] न लाजेतें. ३८
पाहति उगे चि दूरुनि न शिवो दे चाप त्या अ[3]-हीन-कुळां
लेखी[4] तृणतुच्छ[5] जसा अबळां बाळां बळी, अही[6] नकुळां[7]. ३९
जाणो तत्तेज[8] म्हणे त्यांला, 'वश चित्तवृत्ति कामा जी
ती न भली, सावध व्हा; कां करितां निपट मृत्तिका मांजी[9]?' ४०
'न बुडो क्षत्रयश' म्हणुनि उठवी उत्साहदायि[10] मन पार्था;
धर्म हि म्हणे, 'असो गुरुलब्धा[11] शिक्षा सदैव अनर्पार्था[12].' ४१
जैं धनुकडे निघे द्विजवृंदांतुनि[13] विप्र एकला जाया,
साधूंसि तो चि सिकवी साधूत्साहातिरेक लाजाया. ४२
कोणही म्हणति, 'निवांरा[14], आम्हां क्षत्रियकृतोपहासाचें[15]
पात्रत्व नवें द्याया सुचपळ वटु[16] जोडितो पहा! साचें.' ४३
किति म्हणती, "जावूं द्या, होउं न देईल कर्म कुत्सा[17] हें;
पूर्वी श्रीराम जसा, उठलासे हा तसा चि उत्साहें. ४४
प्याला अगस्त्यनामा ब्राह्मण निःशेष नदनदीपातें[18],
विस्मरलां रामातें[19] कां त्या भृगुवंश[19]-सदन-दीपातें? ४५
ब्रह्मतपःकेलिगृह[20] ब्राह्मण न करील काय हो! बोला?
'विजयोस्तु' म्हणा, चढला विप्राशीनें[21] न कोण तो मोला?" ४६

१. लज्जारूप चिखलांत. २. शहाणे लोक. ३. उत्तम कुलोत्पन्नांला. ४. मानी, गणी. ५. तृणासारखा क्षुद्र. (कस्पटासमान). ६. सर्प. ७. मुंगसांला. ८. त्या राजांचें तेज. ९. माझी (तेजाची). १०. उत्साह देणारे. ११. द्रोणगुरूपासून प्राप्त झालेली. १२. सफला. (व्यर्थ नव्हे अशी). १३. ब्राह्मणसमुदायांतून. १४. निवारण करा. (आवरून धरा.) १५ क्षत्रियांच्या केलेल्या थट्टेचें. १६. लहान मुलगा. १७ निंदा. १८. नद आणि नद्या यांचें पालन करणाऱ्या समुद्रातें. १९. भृगुऋषीचा वंश हेंच घर त्यांतील दीपच अशा परशुरामातें. २०. ब्रह्मरूप तपश्चर्येच्या क्रीडेचें स्थानच असा. २१. ब्राह्मणांच्या आशीर्वादानें.

पावे तत्काळ महावृद्धिप्रति[1] पार्थ तोकें[2], विप्राशी
त्या माता कामदुघा[3], कारुण्य स्तन्य[4], तो कवि[5] प्राशी. ४७
नमिला आधीं पार्थें विश्वप्रियसुहृदकृत्रिम[6] पिनाकी[7];
ह्मणती यद्यश सेवुनि, 'अमृतीं गोडी नसे किमपि' नाकी[8]. ४८
मग हृदयीं आठविला कुशलकर कुशेशयाक्ष[9] कंसारी[10],
यत्स्मरणें शुचिमतियतिपतिगतिला[11] योग्य होय संसारी[12]. ४९
करुनि प्रदक्षिणा, धनु उचलूनि, ख्याति तो करी मोटी,
चापाच्या चि न केवळ नरवीरांच्या हि वांकवी कोटी[13]. ५०
यंत्रच्छिद्रद्वारें पांच हि शर एकदा चि सोडूनीं
पाडी पळांत पृथिवीवरि पुरुषप्रवर[14] लक्ष्य तोडूनीं. ५१
प्रीति मुनिगणाच्या, ऱ्ही राज्यांच्या, कीर्ति सोमवंशाच्या[15]
घाली कंठीं माळा, कृष्णा त्या श्रीमरुत्वदंशाच्या[16]. ५२
आशीर्वादांच्या द्विज, पुष्पांच्या करिति सुर हि वृष्टीतें;
द्रुपदपुरी जनकपुरीसम सुखदा होय साधुदृष्टीतें. ५३
ब्राह्मण नाचति रंगीं, आनंदें उडविति स्वचैलातें[17];
तें तोय[18] होय हो! यश खळनृपजन चित्ततप्ततैलातें[19]. ५४
सत्कांतलाभचिंता[20] उत्साहें उचलितां चि धनु सरली[21].
सद्गुणरक्ता[22] कृष्णा कृष्णाजिनधारका[23] हि अनुसरली. ५५

---

१. मोठेपणाला. २. बालक. ३. मनोरथ पूर्ण करणाऱ्या. ४. दूध. ५. अर्जुन. ६. विश्वाचा प्रियमित्र व स्वतःसिद्ध असा शंकर. ७. ज्या शंकराचें यश. ८. देव. ९. कमलनयन. (कुशेशय=कमल). १०. कृष्ण. (कंसशत्रु). ११. पवित्र बुद्धि ज्याची अशा श्रेष्ठ संन्याशाच्या गतीला. १२. प्रापंचिक मनुष्य. १३. धनुष्याचीं टोकें, (वीरपक्षीं) कोटिसंख्या. १४. पुरुषोत्तम. (अर्जुन). १५. चंद्रकुलोत्पन्न राजांच्या. १६. इंद्राच्या अंशाच्या. (अर्जुनाच्या). १७. स्ववस्त्रातें. १८. पाणी. १९. चित्तरूप तापलेल्या तेलातें. २०. चांगला पति कसा मिळेल ही काळजी. २१. नाहींशी झाली. २२. सद्गुणाचे ठायीं अनुरक्त झालेली. २३. हरिणाचें कातडें धारण करणाऱ्या हि [पण गुणवान् अशा अर्जुनाला].

कोपोनि कर्णशल्यप्रमुख नृपति ह्मणाति, 'हा द्रुपद खोटा,
आह्मां मानधनांचा केला अपमान, वात हा मोटा. ५६
मुख्य स्वयंवरीं अधिकारी क्षत्रिय, न विप्र, हें कळतें;
भलतें चि बळें करितो, श्रुतियश[1] ऐशा खळामुळें मळतें. ५७
विप्र नव्हे वध्य, वधा द्रुपदा, न करो दुजा अशा अनया[2].
चढवा गुण[3], घ्या शर, हूं, धर्मार्थ मुहूर्त[4] दृढ करा मन, या. ५८
आह्मां नृपांत भलत्या एका स्वमतें वरील नवरी ती.
विप्र स्वयंवरवधूवर, हे स्थिति नाशहेतु, नव रीति. ५९
नवरी न वरील परा जरि, तरि दीप्तानळांत[5] होमा[6] ती
वारुन तें[7]; जें अनया कारण, त्याची[8] पळांत हो माती.' ६०
युद्धोद्यतनृपचक्रत्रस्तमति[9] द्रुपद काळजी वाहे;
विप्रांसि ह्मणे, 'माझ्या झाले चि नृपाळ काळ जीवा हे.' ६१
कमळवनावरि गजसे द्रुपदावरि धावले बळी पर[10] ते;
त्यांवरि सज्य करुनि धनु धन्वीश्वर[11] जिष्णु सिंहसा परते. ६२
सरळ सबळ जवळ द्रुम समयीं मिळतां कशास कोदंड[12]?
वाटे, भीम परतला काळ, कवळिला न वृक्ष तो दंड[13]. ६३
शरणागताभिमानी समरोद्यत[14] सर्व विप्र पाहोनीं
अर्जुन बोले, डोले सुरगुरु[15] रोमांचभार वाहोनीं. ६४
'षडरिघ्न[16] तुह्मीं गुरु हो! षडरिजितमदासि[17] काय हरिना मीं?

१. वेदाचें यश. (विप्राला स्वयंवराचा अधिकार नाहीं अशी वेदाज्ञा आहे; तिचें उल्लंघन द्रुपदानें होऊं देणें ह्मणजे श्रुतियश मळविणेंच होय). २. अन्याया. ३. धनुष्याची दोरी. ४. घटकाभर. ५. प्रज्वलित अग्नीमध्यें. ६. जाळा. ७. ब्राह्मणास वरणें. ८. अन्यायाला कारण जी द्रौपदी तिची. ९. लढाईस तयार झालेल्या राजसमूहानें भयभीत केली आहे बुद्धि ज्याची असा. १०. शत्रु. ११. धनुर्धाऱ्यांमध्यें श्रेष्ठ. १२. धनुष्य. १३. यमदंड. १४. युद्ध करण्याविषयीं तयार. १५. बृहस्पती. १६. षड्रिपूंचा नाश करणारे. १७. षड्रिपूनीं जिंकलेल्या लोकांच्या गर्वाला.

अरि[1] हरिनें नुचलावें अघदलनीं[2] बळ उदंड हरिनामीं. ६५
युष्मदभयवर[3] आह्मांकरवीं करवील दुष्ट-मद-नाशा.
साधुपुढें अहिताशा[4], शंभुपुढें जेंवि दुष्ट मदनाशा[5].' ६६
भीमार्जुन शत्रूंवरि फिरतां दावी मुकुंद[6] रामातें;
ज्या पाहे त्यासि ह्मणे बळ[7], 'तूं बहु सुखद सुंदरा! मातें.' ६७
कर्णासीं भीमानुज, शल्यासीं भीमसेन युद्ध करी.
तत्तेजस्तब्ध[8] इतर नृप झाले, जेंवि पंकरुद्ध[9] करी. ६८
रणविस्तर काशाला? हेमाक्ष[10]-रणीं महाकिरी[11] टिकला,
कीं अर्जुन कर्ण-रणीं; अरिस हि बहु तोषवी किरीटिकला[12]. ६९
कर्ण ह्मणे, 'विप्रवरा! आनंद दिला तुवां भला आजि;
ऐसी नसे चि पूर्वीं आढळली कामुका[13] मला आजि[14]. ७०
तूं चापवेद[15], कीं वा भार्गव[16], कीं शक्र, कीं स्वयें विष्णु?
कीं मजसीं झगडेसा होता सुत एक पांडुचा जिष्णु? ७१
या पांचांमध्यें तूं कोण? वद स्पष्ट, जाणत्या कळतें.
वरि गारसा हिरा परि, त्या कवचें[17] तेज काय हो! मळतें[18]?' ७२
पार्थ ह्मणे, 'मीं कार्मुकवेद नव्हें, राम ही नव्हे, आहें
विप्र गुरुप्रिय, अस्त्रीं, शस्त्रीं पटु[19] चित्र[20] ह्मणसि कां गा! हें? ७३
गुरुचा प्रसाद ज्यावरि काळास हि तो कदापि आटेना;
वाटे नारायणसा, अजितपरा तत्सुकीर्ति वाटेना.' ७४
या विप्रवेषवासवि[21]-मुखवर्णांनीं भरूनियां कर्ण

---

१. चक्र. २. पापनाश करण्याच्या कामीं. ३. तुमचा अभय देणारा वर. ४. अकल्याणाची इच्छा. ५. मदनाची इच्छा. ६. श्रीकृष्ण. ७. बळराम. ८. त्यांच्या पराक्रमानें स्तब्ध. ९. चिखलांत रुतलेले. १०. हिरण्याक्ष–**पंत.** ११. आदिवराह–**पंत.** १२. अर्जुनाची युद्धकला. १३. युद्धाची इच्छा करणाऱ्या. १४. युद्ध. १५. [मूर्तिमंत] धनुर्वेद. १६. परशुराम. १७. वरील आच्छादनानें. १८. कमी होतें. १९. कुशल, पटाइत. २०. आश्चर्य. २१. ब्राह्मणाचा वेष धारण केलेल्या अर्जुनाच्या तोंडच्या अक्षरानीं.

परते, पुरतें जाणे, 'जय्य[1] नव्हे ब्राह्मतेज[2]' हें कर्ण. ७५
त्या भीमानें हि सुचिर[3] रुचिर[4] समर अमरतोषकर[5] केला;
यत्कीर्तिनें विरेसा दिला जडात्मत्वदोष[6] करकेला[7]. ७६
भीमें शल्य क्षितिवरि कंदुकसा[8] भुजरणांत[9] आपटुनीं,
हांसविले मुनि, न तसे शिशु हि कधीं हास्यरसकथापटुनीं[10].
शल्यपराभव पाहुनि कर्णादिक सर्व शंकले, वर तें[11]
दाविति, परि धैर्य उडे आधीं, मग मद्रपति-कलेवर[12] तें. ७८
नृप ह्मणती, 'हे ब्राह्मण आह्मांला भीड फार वेदाची.
मानधनांसि न साहे वार्ता अपमानजन्यखेदाची. ७९
कोठील ब्राह्मण हे तेजस्वी भीमजिष्णुसे धीट?
शोधूं, बरें करूं, करणें तें न विचारितां नव्हे नीट.' ८०
ऐसें वदोनि गेले नृप निजशिबिरासि[13] कीर्ति हारवुनीं,
झाले म्लानश्री ते द्विजतेजें, जेंवि पुष्पहार वुनीं. ८१
साग्रज[14] जिष्णु हि बहु त्या द्रुपदसुरद्रुप्रसूनमाळेला[15],
सांभाळुनि स्ववस्त्रच्छायेंत क्षिप्र जाय शाळेला. ८२
वदले, 'भिक्षा घेउनि आलों, ये जननि! घे' असें कवि ते,
तच्चिंतातिमिरहृदयपद्मांचे[16] प्रेक्षणीय जे सविते[17]. ८३
शाळेंत पृथा बोले, 'भिक्षा माझ्यासमीप ती ठेवा,
हो तृप्तिदा सुधासी[18], सर्व भ्राते मिळा, सुखें सेवा.' ८४

---

१. जिंकण्यास शक्य. २. ब्राह्मणाचें तेज. ३. फार वेळ. ४. मनोहर. ५. देवांना आनंदकारक. ६. अचेतन देहत्वरूप दोष. ७. गारेला. ८. चेंडूसारखा ९. बाहुयुद्धांत. १०. हास्यरसाच्या गोष्टी सांगण्यांत कुशल अशा लोकानीं. ११. वरवर तें (धैर्य) दाविति. १२. शल्याचें शरीर. १३. सैन्याच्या तळावर. (छावणींत). १४. वडील बंधु भीम त्यासह. १५. द्रुपदरूप कल्पवृक्षाच्या पुष्पमाळेला (द्रौपदीला). १६. तिची (कुंतीची) चिंता हाच अंधकार आणि हृदय हेंच कमळ यांचे. १७. सूर्य. १८. अमृतासारखी.

नमितां द्रुपदसुतेतें पाहुनि कुंती ह्मणे, 'अहा देवा !
वदल्यें कसें असें, कीं, सर्व भ्राते मिळा, सुखें सेवा.' ८५

भलतें चि वदे सासू, सासूया[1] जाहली न परि सून;
कुंती अधर्मभीता[2] मुदिता[3] ही होय वृत्त परिसून. ८६

गौरवुनि धरूनि करीं नेउनि धर्माकडे सुने,[4] त्या तें
सांगोनि, पुसे अनृताधर्महर[5] सुयुक्ति त्या सुनेत्यातें.[6] ८७

मातेला समजाउनि धर्म म्हणे, ' अर्जुना ! इचा विधिनें[7]
पाणि स्वीकारावा आतां त्वां शक्तिकीर्तिच्या निधिनें.' ८८

* जिष्णु म्हणे, 'गुरुलंघन[8] अज्ञ जन करो, करी न परि वेत्ता,[9]
मीं तों न आपणाला जाणत जाणत करीन परिवेत्ता.[10] ८९

त्वां, भीमें, म्यां, नकुळें, सहदेवें कार्य[11] पाणिपीडन,[12] तें
व्हावें क्रमें चि, धर्म्यव्यवहारीं धरु नये चि भीड नतें.[13]' ९०

धर्म विचार करी तो, अनुज्यांच्या आपुल्या हि नयना तें
रुचलें स्त्रीरत्न, मनें एक चि धरिलें, त्यजूनि नय नातें.[14] ९१

जनकें[15] हि चुंबिली, जी चुंबावी नंदनें[16] हि नलिनी,[17] ती,
धरिली त्या कृष्णारतमतिनीं[18] अति लोचसी च अळिनीती.[19] ९२

गज गंगेंत निवाया म्हणति, न चिंतूनि शुद्धि, ' मज्जन हो;'
तैसे चि पांडुसुत त्या लावण्यनदींत, बुद्धिमज्जन[20] हो ! ९३

---

१. विकल्पाधीन. २. अनेकपतित्वाच्या अधर्माला भ्यालेली. ३. आनंदित. ४. सुनेला. ५. असत्यरूप अधर्म नाहींसा करणारी. (आपणास खोटें बोलल्याच्या दोषापासून सोडविणारी). ६. उत्तम मार्ग दाखविणाऱ्या (धर्माला). ७. शास्त्रपद्धतीनें. ८. वडिलांचा उपमर्द. ९. जाणता. १०. ज्येष्ठ बंधूपूर्वी विवाह करणारा तो परिवेत्ता. ११. करावें. १२. पाणिग्रहण. (विवाह). १३. नम्रानें. १४. पत्नीपणाचें नातें. १५. बापानें. १६. मुलानें. १७. कमलिनी. १८. द्रौपदीचे ठायीं रमलें आहे मन ज्यांचें त्यानीं. १९. भ्रमरांची रीति. २०. बुद्धिमान लोक.

धर्म म्हणे, 'ज्या ध्याना[1] अनुसरले हे स्वबंधु चवघे, तें
धरिलें माझ्या हि मनें कोणास हि न पुसतां चि चव घेतें. ९४
झालें वश निजतनया[2] मन, या अनया न यत्न; होगलितें[3]
जैं भेदे[4] कटक, किजे तैं रायें युद्ध काय हो! गलितें[5]? ९५
व्यासोक्ति[6] पृथोक्ति[7] जसी अस्मद्वृत्ति हि पहा तसी च वरें.
प्रभुच्या कोण न सन्मत[8] देतो दासांसि कीर्तिचीं चंवरें[9]? ९६
ज्याची हे स्त्री होइल होतिल रिपु त्या स्वबंधुचे अन्य[10];
जो वासिता-सहचर[11] द्विप, होती तदरि[12] मदकरी[13] वन्य.' ९७
धर्म भ्रात्यांसि म्हणे, 'पांचाची हे सती असो भार्या;
श्रुतिची मातेची सम आज्ञा आम्हां नव्हे चि परिहार्या[14].' ९८

अध्याय छत्तिसावा.

प्रभु राम कृष्ण दोघे गेले शाळेसि त्या कुलालाच्या;
तद्भस्मभाग्य[15], भाळीं[16] न बुक्याच्या तें न वा[17] गुलालाच्या. १
सांगुनि नाम, युधिष्ठिर नमिला यमिलोलसाकरयशानीं[18];
भ्यावें श्रिताशिवांहीं[19] ज्यांप्रति, जैसें हरिप्रति शशानीं[20]. २

---

१. ध्यानास्पद वस्तूला. २. आपल्या मुलास=मदनास. (मदन हा मनापासून उत्पन्न होतो म्हणून त्याला 'मनाचा पुत्र' म्हणतात). ३. हांकून लावणारें कटक=सैन्य. ४. पराभव पावे. ५. धैर्य खचलेल्या (रायें). ६. अ० ३३, गीति १ ते ८ पहा. ७. मागची ८४ वी गीति पहा. ८. सज्जनास मान्य. ९. चामरें. १०. इतर बंधु त्याचे वैरी होतील. ११. हत्तिणीचा सोबती. १२. त्याचे शत्रु. १३. हत्ती. १४. उल्लंघन करण्याजोगी. १५. त्या कुंभार-वाड्यांतील राखेचें भाग्य. १६. कपाळीं. (नशीबीं). १७. अथवा. १८. जितेंद्रिय योग्यानीं इच्छा करण्याजोगीं यशें ज्यांचीं त्यानीं. १९. आश्रितांच्या अकल्याणानीं. २०. सश्यानीं.

म्हणति पृथेला, 'आत्याबाई! नमिताति हे तुला भाचे.'
यत्पदरजांहुनि[1] उणे इष्टाच्या सर्व हेतु[2] लाभाचे. ३
हरि भीमासि नमी, दे आलिंगन जिष्णुला, तया यमळ[3]
नमिति; वृकोदर भेटे रामा, यच्चिंतनें चि जाय मळ[4]. ४
कुंती म्हणे, "असे तों ताप न, अमृताब्धिची हरी[5] लहरी[6],
झालें चि, म्हणत होत्यें मीं जें कीं, 'व्यसन हें हरील हरी.' ५
या दिनतुळेसि[7] पावे न दिवाळी, पाडवा हि न, न दसरा;
आम्हांसि भेटलां, हें तेंवि, जसा वाळतां चि वन-द[8] सरा[9]. ६
हे द्वारका, न भार्गवशाळा[10], मज भेटलें चि माहेर;
आहे रक्षाव्रतरुचि[11] करुणा तुमच्या चि आंत बाहेर." ७
ज्याच्या स्वरोमकूपीं[12] सतत सुखस्वस्थ[13] सत्यपांड[14] वसे,
धर्म म्हणे त्या प्रभुला, 'कळलों हे केंवि सत्य पांडवसे?' ८
कृष्ण म्हणे, "असतां ही गूढ कसा अग्नि भारता! कळतो?
आकळिला[15] मृगमद[16] जरि बहुयत्नें वास काय आकळतो? ९
लोपे कवि[17] न कुवासें[18], पावे ख्यातीस मंद न सुवासें[19],
कळतो चि जाणत्याला सर्वतरुश्रेष्ठ चंदन सुवासें. १०
आहेत वीर बहु जरि, परि भेदाया पणा असाध्या या
निपुण तुम्हीं च, मज इतर नाहीं जी! आपणाअसा[20] ध्यांया[21]. ११
व्यसन चुकविलें, पहिला लोकीं हा लाभ साजिरा, ज्या जी
प्रथम असावी ती ही कीर्ति मिळाली च आजि राज्याजी! १२

---

१. ज्यांच्या पायांच्या धुळीहून. २. कारण. ३. नकुल, सहदेव. ४. पाप. ५. कृष्ण. ६. लाट. ७. दिवसाच्या तुलनेस. ८. मेघ. ९. सरोवराला. १०. कुंभार शाळा. ११. रक्षणाच्या व्रताची आवड. १२. रोमरंध्राचे ठायीं. (येथील 'स्व' निरर्थक दिसतो). १३. सहजपणानें स्वस्थ. १४. सत्य लोकाचा पालन कर्ता ब्रह्मा, त्याचें अंड=ब्रह्मांड. १५. आवरिला. १६. कस्तूरी. १७. शहाणा. १८. वाईट वस्त्रानें. १९. चांगल्या वस्त्रानें. २०. आपणासारखा. २१. ध्यान कराया, चिंताया.

वाटे, म्हणेल त्यांची मति त्यांला कीं, 'तुम्हीं नभा उखळा'
मूर्ख भलतें चि करिती, सज्जन ही आवडे न भाउ खळा. १३
वृद्धि असावी तुमची, शत्रूंचे सर्व गर्व हरपावे;
व्यसनीं बुडवूं पाहति खळ ज्यां, त्या सज्जनांसि हर पावे. १४
द्यावा निरोप आम्हां, झालों भेटोनि आज सानंद.
धर्म तुम्हांला व्यसनीं रक्षक, मज साग्रजा जसा नंद. १५
प्रिय आमुचे बहिश्चर पंचप्राण चि तुम्हीं; न अस्वहित
कोणही ही होवूं दे; भवद्वन स्वहित, अन्य अ-स्वहित." १६
ऐसें वदोनि ते प्रभु करिती कोणांसि न कळतां गमन;
मग भिक्षान्नें केलें रात्रौ त्या साधुनीं क्षुधाशमन. १७
राहोनि गुप्त धृष्टद्युम्नें तच्छोध लाविला अंगें.
त्यातें द्रुपदनृप पुसे, 'वत्सेची गति कसी? सुता! सांगें.' १८
धृष्टद्युम्न म्हणे, 'ज्या पुरुषें नेली स्वसा महाभागें,
गेलों कुलालशाळेप्रति शोध करावया तयामागें. १९
ते पांच बंधु, आहे माता त्यांची जसी सुरी तीतें
त्यांतें पाहुनि झालों हृष्ट विलोकूनि ही सुरीतीतें. २०
त्यांचें विलोकिलें म्यां तैसें कोठें हि दिव्य तेज नसे;
आश्चर्यरूप पांच हि न पहावे ते धरापते! जनसे. २१
भिक्षान्न त्यांसि वाढुनि, मग कृष्णा तें चि जेविली नमुनी,
गमलें नसेल तैसें सुख त्यां, ब्रह्मीं हि जे विलिन मुनी. २२
त्यांच्या चि पायथां ती निजली; ते राशि रत्न-हेमाचे
गणिले कुशशयनोन चि कृष्णेनें हे पलंग, हे माचे. २३

---

१. दुर्योधनाची. २. दुःशासनादिकांला. ३. शरीराबाहेर संचार करणारे. ४. प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान असे शरीरांतील पांच प्राण (वायु) आहेत. ५. प्राणनाश. (असु+अहित). ६. तुमचें रक्षण. ७. कृष्णबळराम. ८. स्वतः. ९. महाभाग्यवान् पुरुषें. १०. देवस्त्री. ११. सदाचारातें. १२. सामान्य लोकांसारखे. १३. रत्नें आणि सुवर्ण यांचे. १४. दर्भशय्येहून उणें.

मज त्यांच्या शब्दादिव्यवहारीं[१] क्षत्रियत्व आढळलें;
जन्हि भिक्षुवेष शिव[२] तरि, तेज तया त्यजुनि काय गा! ढळलें?
न जळाले पांडव ते, होईन चि सत्यतर्क[३] बहुधा मीं;
न विशेष[४] विप्रवेषीं त्यांच्या[५] दिसतो, विशेष बहु धामीं.[६]' २५
राजा म्हणे, 'असो हा वत्सा! तव सत्य तर्क रे! तें हो,
जें दमयंतीजनका[७] सुख; मुख हें पात्र शर्करेतें[८] हो.' २६
प्रातःकाळीं धाडी मग पार्षत[९] त्यांकडे पुरोध्यासें[१०].
'देवद्विजप्रसादें' तो हि म्हणे, 'नृपतिचा पुरो ध्यास.' २७
त्यांसि[११] उपाध्याय म्हणे, 'स्वयशोर्थ[१२] करा कृपा, सकळ वाहो
आधि[१३] महासुखपूरें[१४], कुळ नाम तुम्हीं नृपास कळवा हो! २८
झाला द्रुपद बहु सुखी, आजि तुम्हां न्हाणणार[१५], कनकानें
पूजील, पूजिले ते जैसे दशरथकुमार जनकानें. २९
वाटे, होता अर्जुन वर व्हावा, तो चि काम पुरला हो!
बुध हो! निजकुळ कळवा, हें मिथिलेच्या[१६] यशासि पुर लाहो.' ३०
पूजुनि धर्म म्हणे, 'कां नृप करितो खेद? जें गत न ये तें.
हा पण, कीं लक्ष्याचा भेदक जो, तो चि योग्य तनयेतें. ३१
जालें तें चि, मनोरथ पुरला असतां किमर्थ हा शोध?
समजा मनीं, कसें यश मेळविता अकुळ[१७] भलतसा योध[१८]?' ३२
यापरि धर्म वदे, तों द्रुपदें प्रेषूनि[१९] आप्त 'जेवा या,'
ऐसें प्रार्थुनि नेले, गेले स्वरथीं बसोनि जेवाया. ३३

---

१. त्यांच्या युद्धादिकांसंबंधानें झालेल्या गोष्टींत. २. ईश्वर–**पंत.** ३. खरा आहे तर्क ज्याचा असा. ४. विशेष प्रकारचा गुण. ५. अर्जुनाच्या. ६. तेजामध्यें. ७. भीमराजास. ८. साखरेतें. (मुखांत साखर पडो=तुझें बोलणें खरें होवो). ९. द्रुपद. (पृषतपुत्र). १०. उपाध्यायास. ११. पांडवांस. १२. आपली कीर्ति व्हावी यास्तव. १३. मनोव्यथा. १४. महासुखाच्या पूरानें. १५. न्हाऊं घालणार. १६. ही जनकराजाची नगरी. १७. कुलहीन. १८. योद्धा. १९. पाठवून.

ऐकुनि धर्मोक्त पुरोहितवदनें हृष्ट होय तो लेश,
[1]चिंताब्धिमग्नमतिभूद्धारा योजी [2]उपायकोलेश. ३४
ज्या ज्या [3]वर्णा जें जें व्यवहारा योग्य वस्तु सर्व हि तें,
तद्दृष्टीस पडेसें मांडविलें पार्षतें [4]सुधी-महितें. ३५
वर्णपरीक्षार्थ असें केलें कीं वस्तु जें तयां इष्ट
त्यावरुनि जाति त्यांची जाणावी ते अशिष्ट कीं शिष्ट. ३६
पाहुनि त्यांसि जन म्हणाति, 'अहा! पहा हो अहो! अजि! [5]नराहि तें
उडविति सुरत्व रूपें; करितिल हे काय कीं अजि नरहितें!' ३७
द्रुपदा ते [6]द्रुप दाते स्वर्गींहुनि वाटले गृहा आले:
[7]आधीं तें आधींतें तद्दर्शन नुरवि, सर्व ही [8]धाले. ३८
बसतां [9]वरासनीं कीं भोजन करितां न शंकले चुकले.
[10]श्रीमद्गुणवत्त्वें ते पांडुतनय [11]जिष्णु-विष्णुसीं [12]तुकले. ३९
त्या विविधवस्तुमध्यें जें जें धनुरादि वस्तु [13]समर-हित,
तिकडे चि ते पहाति, जैसे विषयांकडे चि [14]शमरहित. ४०
[15]असकृत् [16]भागवत जसें [17]मुमुक्षुहीं [18]धीरजनकृतस्तुतिहीं,
अवलोकिलें, धरुनियां बहु आदर संगरार्ह वस्तु तिहीं. ४१

---

१. चिंतारूप समुद्रांत बुडालेली जी बुद्धिरूप पृथ्वी तिच्या उद्धाराला. २. (उपायरूप) महावराह—**पंत.** ३. जातीला. (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे चार वर्ण आहेत). ४. सुज्ञांस मान्य अशा द्रुपदानें. ५. अन्वयार्थ—नर हि [आपल्या] रूपें तें सुरत्व उडविति—हे पांडव मनुष्य असून [आपल्या] रूपानें देवपणाचा (अर्थात् देवांचा) तिरस्कार करितात. (हे पांडव देवांपेक्षां हि सौंदर्यानें अधिक आहेत हा भावार्थ). ६. कल्पवृक्ष. ७. मनोव्यथांतें. ८. तृप्त झाले. ९. श्रेष्ठ आसनावर. १०. श्रीमंतांच्या गुणानीं संपन्न असल्यामुळें. ११. इंद्र. १२. तुलना पावले. १३. युद्धोपयोगी. १४. मनोनिग्रहरहित, विषयी लोक. १५. वारंवार. १६. श्रीमद्भागवत ग्रंथ. १७. मोक्षार्थी जनानीं. १८. सुज्ञ लोकानीं केली आहे स्तुति ज्यांची त्यानीं. (हें मुमुक्षु व तिहीं यांचें विशेषण).

नृप, तच्चेष्टित[1] पाहुनि विप्र न ते, पांडुसुत, असें समजे.
सुज्ञासि झांकिले ही कळति गुण ख्यात[2] मृगमदासम[3] जे. ४२
धर्मासि मग म्हणे, 'हो! पूर्ण करा सर्व कामना, मातें
सांगा स्वनाम, सांगति जैसे गुरुराज रामनामातें. ४३
माझें मानस आहे तुमच्या बहु साभिलाष[4] कुलनामीं,
पावेन श्रवण करुनि पीतामृततुष्टपुष्टतुलना[5] मीं. ४४
विधिनें करीन कन्यादानमहोत्सव, ह्मणून कामातें
पुरवा हो! पुर[6] वाहो सुखपूरीं पर[7] ह्मणू नका मातें.' ४५
धर्म म्हणे, 'नरनाथा! युष्मत्कृत[8] तर्क जे न ते लटिके;
तज्ज्ञातज्ञपरीक्षेमाजि[9] पळ हि घृतपणें[10] न तेल टिके. ४६
भूदेव[11] नहों, क्षत्रिय आम्हीं श्रीपांडुराजसुत, राया!
हा विप्रवेषसेत्ववलंब[12] व्यसनार्णवासि[13] उतराया. ४७
ओळख गा! ओळें[14] खगावरि[15] घनसा, राजसत्तमा! राया!
हे ते चि, जपत होता ज्यां तो[16] मदमद्यमत्त[17] माराया.' ४८
द्रुपद म्हणे, 'मीं च सुखी, न असा पावोनि अन्य कामातें,
झाली ताराया शतपुत्रवरा[18] धन्य कन्यका मातें. ४९
व्यसनीं सहाय झाला रामाला काननांत[19] वानर ही,
होइल सहाय मग तुज भीष्माच्या कां न नातवा नर ही? ५०
विहित[20] चि सत्कार्यार्थ[21] स्वप्राणांचा विनाश पथकरितां[22].
दैवाधीन सकळ, परि मज तें भय दाविना शपथ करितां.' ५१

---

१. त्यांचें आचरण. २. प्रख्यात. ३. कस्तूरीसारखे. ४. इच्छायुक्त. ५. अमृतप्राशनानें जो तुष्ट आणि पुष्ट झाला त्याची समता. ६. नगर. ७. परका. ८. तुम्हीं केलेले. ९. तें जाणणारे व न जाणणारे यांच्या परीक्षेंत. १०. तूप म्हणून. ११. ब्राह्मण. १२. ब्राह्मणवेषरूप सेतूचा आश्रय. १३. संकटरूप सागरास. १४. वळ. (प्रसन्न हो). १५. पांखरावर. (चातकावर). १६. दुर्योधन. १७. मदरूप मद्यानें मस्त झालेला. १८. शंभर पुत्रांपेक्षां श्रेष्ठ अशी. १९. अरण्यांत. २०. योग्य. २१. साधूंच्या कार्यासाठीं. २२. स्वीकारतां.

करुनि समाधान असें पंचायतनापरी[१] च तो भावें
पूजी पांडुकुटुंबा; सुज्ञें पूज्यासि कां न लोभावें? ५२
'पाणिग्रहण करावें कृष्णेचें अर्जुनें विधानानें,'
हें धर्माप्रति म्हणतां द्रुपदानें प्रीतिच्या निधानानें[२], ५३
धर्म म्हणे, 'मीं आधीं मग भीमप्रभृति बंधु हे तीतें
विधिनें धरितील करीं, धरिति जसे वीर एक हेतीतें[३].' ५४
द्रुपद म्हणे, 'धर्मज्ञा! सविधि वरावी तुवां चि, अथवा हे
एकें चि युष्मदनुजें[४]; म्हणसी ऐसा जगीं न पथ वाहे.' ५५
धर्म म्हणे, 'मातेची आज्ञा आम्हां नृपा! श्रुतिसमान;
धर्मज्ञ साधु देती मान गुरूक्तिस, जसा श्रुतिस मान. ५६
बहुतां ऋषींस भजली जटिलाख्या[५] गौतमी, तथैव सती
वार्क्षी[६] दशप्रचेतःस्त्री[७], यत्कीर्तीस सत्सभा वसती[८].' ५७
धर्मोक्तें वक्ता परि केवळ पांचाळ कोंडला[९]; गावें
तत्कालागत-शुकगुरु-सद्यश[१०], तेथें चि तोंड लागावें. ५८
द्रुपदातें एकांतीं नेउनियां देवगुह्य[११] सांगाया,
व्यास म्हणे, "धर्माचें शुचि मत, होसी न मान्य कां गा! या?
पूर्वीं सत्रीं दीक्षित[१२] यम असतां राहिलें प्रजाशमन[१३],
त्यास्तव सेंद्रसुरांचें[१४] इच्छी अमरप्रजाविनाश[१५] मन. ६०

---

१. शिव, विष्णु, सूर्य, गणपति, आणि देवी यांच्या समूहास 'पंचायतन' म्हणतात. २. स्थानानें. (द्रुपदानें). ३. तरवारीतें. ४. तुझ्या धाकट्या बंधूनें. ५. जटिला ही गौतमऋषींची कन्या; ती सर्व धर्मरक्षकांमध्यें श्रेष्ठ असून सात ऋषींची भार्या होती. ६. वृक्षापासून उत्पन्न झालेली मारीषासंज्ञक कन्या. ७. प्राचीनबर्हिराजाचे समुद्रकन्या सवर्णा हिच्या ठायीं झालले जे प्रचेतःसंज्ञक दहा पुत्र, त्यांची स्त्री. ८. राहण्याचें ठिकाण. ९. कुंठित झाला. १०. त्या च वेळीं [तेथें] आलेल्या व्यासाचें उत्तम यश. ११. देवांचें रहस्य. १२. ज्यानें यज्ञदीक्षा घेतली तो. १३. प्रजा मारण्याचें काम १४. इंद्रासहित देवांचें. १५. मृत्युरहित झालेल्या प्रजांचा नाश.

विधि विनविला तिहीं, तो सांगे सत्रीं यमाकडे जाया,
येतां विलोकिली श्रीगंगा-स्रोतां[१]त ऐश्वरी[२] माया. ६१
हेमाब्ज[३] येत होतें वाहत त्याचा करावया शोध,
एकाकी[४] शक्र निघे अवलंबुनि देवसिंधुचें[५] रोध[६]. ६२
गंगेत पावकद्युति[७] योषा[८] दूरूनि देखिली रडती.
तीचे, होती कांचनपद्म, जळीं अश्रुबिंदु जे पडती. ६३
शक्र म्हणे, 'कोणाची तूं, दुःखा पात्र दुःसहा या जी'?
ती 'सांगूं काय?' म्हणे, 'पुसतां चि तरि स्वयें[९] पहा यें[१०] जी!'
स्त्रीसह जातां हरि[११] गिरिवरशिखरीं[१२] अशनिला[१३] करीं वाहे.
सिद्धासनस्थ अक्षक्रीडारत[१४] दिव्य दंपती[१५] पाहे. ६५
दावि प्रभुत्व[१६] शब्दें तों त्या पुरुषें[१७] विलोकिला मात्र,
झाला स्तंभितगात्र[१८] छात्र[१९] गुरूचा[२०] भयर्धिला[२१] पात्र. ६६
त्या स्त्रीस ह्मणे तो प्रभु[२२], 'आण पुढें फार दावितो बळ हा.'
स्त्री स्पर्शतां चि पडला छिन्नांघ्रिद्रुम[२३] जसा तसा बळहा[२४]. ६७
आज्ञा करूनि करवी त्या[२५] हातीं दूर अद्रिच्या शिखरा.
तेव्हां शक्र समजला कीं, हा चि प्रभु बळांबुराशि[२६] खरा. ६८
शिखरपिधानापनयन[२७] करितां चि गुहेंत[२८] तो पुरुष चवघे[२९]
पाहे बहुतेजस्वी, मंजूषेमाजि[३०] मणि तसे अवघे. ६९

---

१. प्रवाहांत. २. ईश्वराची (माया=अद्भुत कृति.). ३. सुवर्णकमल. ४. एकटा. ५. गंगेचें ६. तीर. ७. अग्नीसारखी तेजस्वी. ८. स्त्री. ९. स्वयें या. १०. अजि! ११. इंद्र. १२. श्रेष्ठ पर्वताच्या शिखरावर. (हिमालयावर). १३. वज्राला. १४. फांसे खेळण्यामध्यें निमग्न. १५. जोडपें. (शिवपार्वति). १६. सत्ता. १७. शंकरानें. १८. स्तब्ध झालें शरीर ज्याचें असा. १९. शिष्य (इंद्र.) २०. बृहस्पतीचा. २१. भीतीच्या समृद्धीला. (अतिशय भीतीला). २२. ईश्वर. (शंकर). २३. ज्याचीं मुळें तुटलीं आहेत असा वृक्ष. २४. इंद्र. (बलनामक राक्षसास मारणारा). २५. त्या इंद्राच्या. २६. बलसागर. २७. शिखर हेंच पिधान (झांकण) त्याचें अपनयन (दूरीकरण). २८. हे चारी पुरुष पूर्वींचे इंद्र होत. २९. पेटीमध्यें. ३०. रत्नें.

‘चौघांत पांचवा हो’ ह्मणतां, हरि त्या महेश्वरां[1] कुपिता
नमुनि म्हणे, ‘विश्वगुरो! होताति कु-पुत्र परि नव्हे कु-पिता.
देव ह्मणे, ‘रे! यावरि मदमत्त तुह्मीं कदापि व्हाना कीं?
जा, होउनि नर, भूभर[2] हरुनि पुन्हा वासयोग्य[3] व्हा नाकीं[4]. ७१
बहुभोगासक्त तुह्मीं नव्हतां चि मदर्चनीं[5] बरे जागे[6],
पांचांसि दिली स्वश्री[7] हे स्त्री[8]; मुलि! तूं हि जन्म घे, जा गे!’
ती कृष्णा, हे पांडव झाले ते पांच इंद्र मानव, रे!
त्वत्कन्येचे पांच हि होणार चि हे नरोत्तमा! नवरे. ७३
तैसे चि भूमिभरपरिहारार्थ सहाय यांसि लोकेशें
सित असित कच दिले, बळ शुक्लें, कृष्णें हि कृष्ण तो केशें[9].”
सांगोनि देवगुह्य, व्यास स्वकमंडलुस्थ तीर्थजळ
लावुनि नयनीं देता झाला द्रुपदासि दिव्यदृष्टि पळ. ७५
शक्रांश एक, पहिले च्यार; असे इंद्र पांच त्या रूपें
अवलोकिले प्रसादें मुनिच्या तत्काळ पार्थतें भूपें. ७६
मुनिला नमुनि विमोहद्रुपदें[10] स्वीकारिली तदाज्ञा ते.
कन्या पांचांसि दिली; झाले बहु हृष्टधी[11] तदा ज्ञाते. ७७
द्रुपद पृथेसि म्हणे, ‘ज्यां वरिले कुरुकीर्तिहेतु[12] जामाते,
परि पाळावी दिधली कन्या सेवेसि हे तुज्या माते!’ ७८

---

१. शंकराला. २. पृथ्वीचा भार. ३. राहण्यास योग्य असे. ४. स्वर्गीं. . माझ्या पूजेविषयीं. ६. जागृत, सावध. ७. स्वर्गलक्ष्मी. ८. इंद्रास घेऊन कराकडे गेलेली स्त्री. ९. भगवान् नारायणानें. [शंकराच्या आज्ञेप्रमाणें च ७१ वी गीति पहा.) भगवान् नारायणानें हि ह्या पांची इंद्रांना आज्ञा केली व ांना सहाय्य करण्यासाठीं सित=पांढरा व असित=काळा असे आपले दोन केश पटून यदुकुळांत टाकले. तेव्हां श्वेतकेशाचा अवतार बळराम व कृष्णकेशाचा ीकृष्ण झाला अशी कथा आहे]. १०. पांच पांडवांशीं एका मुलीचा विवाह ासा लावावा याविषयींचा मोह ज्याचा दूर झाला आहे अशा द्रुपदानें. ११. ात्यंत संतुष्ट आहे मन ज्यांचें. १२. कुरुकुलाच्या कीर्तिस कारणीभूत असे.

कृष्णें पांडव गज-रथ-हय-दासी-दास-रत्न-धन-दानें
गौरविले ऐसे ज्यां पाहुनि व्हावें सलज्ज धनदानें[1]. ७९
पांडववृत्तश्रवणीं स्वउर क्षाळुनि उदश्रुबिंदूनीं[2]
गेले स्वयंवरागत नृप, भीष्मास[3] हि मनांत निंदूनीं. ८०
दुर्योधन कर्ण शकुनि बहु निंदुनि त्या पुरोचना[4] यवना
भवना[5] गेले, लावुनि वैर हरीसीं करी[6] जसे स्व-वना. ८१

अध्याय सदतिसावा.

विदुर म्हणे, 'राज्याजी[7]! कौरव[8] उदयासि पावले जाणा,'
धृतराष्ट्र म्हणे, 'कृष्णेसह मन्नमना[9] सुयोधना[10] आणा.' १
क्षत्ता[11] म्हणे, 'नृपाळा! नमना आतां चि आणितों, पण ती
पांडवभार्या कृष्णा आहे निजपितृपुरीं[12], असें म्हणती.' २
अंध म्हणे, 'गा! विदुरा! झालें हें वृत्त अमृत कानांतें.
जें द्रुपदासीं घडलें तें न यशस्कर गमेल कां नांतें? ३
यांच्या[13] त्यांच्या[13] ठाईं समता ममता न तातता[14] दुसरी,
तत्सुख मत्सुख, हे तनु होत चि होती तदाधिनें[15] उसरी[16].' ४
विदुर म्हणे, 'गा[17]! बापा[17]! बुद्धि असावी असी च आर्याची;

---

१. कुबेरानें. २. नेत्रांतून जे अश्रुबिंदु बाहेर आले त्यानीं. ३. त्यानीं धृतराष्ट्राची तर निंदा केली च; पण भीष्माची हि केली. ४. लाक्षागृहासकट पांडवांस जाळून टाकण्याची कामगिरी याच्याकडे होती. ५. गृहाला. ६. हत्ती. ७. हे राजा धृतराष्ट्रा! ८. (विदुरमतें) कुरुकुलोत्पन्न पांडव; (परंतु धृतराष्ट्रमतें) स्वपुत्र. ९. मला नमन करण्याकरितां. १०. दुर्योधनाला. ११. दासीपुत्र. (विदुर). १२. आपल्या बापाच्या नगरीं. १३. कौरवांच्या व पांडवांच्या. १४. पितृत्व. १५. त्या पांडवाच्या चिंतेनें. १६. सुकविलेल्या अळु इत्यादि भाज्या. (तनु वाळून शुष्क होत होती असा भावार्थ). १७. पाठांतर—**शतवर्षें.**

या लोकीं परलोकीं संपत्तीहूनि हे चि कार्यांची[1]. ५
नसतां विदुर, सुयोधन धृतराष्ट्राला म्हणे, ‘ अहो! तात!
मज बहु दुःखद तुमचे आतांचे मंत्रवर्ण[2] होतात. ६

करिसि सपत्नगुणस्तुति[3]; मानिसि रिपुवृद्धिला स्ववृद्धि नृपा!
व्यर्थ अपत्यें कां हीं? कांहीं यांवरि कसी नसे चि कृपा?’ ७

प्रज्ञाचक्षु म्हणे, ‘ मज पडतो संकोच फार विदुराचा,
सर्व[4] हि हेतु सुखाचा स्वापत्यांच्या तसा न विधुराचा[5]. ८

पांडवगुणवर्णन तें विदुरमनोधारणार्थ हें साचें;
वरि सरस, आंत नीरस मद्भाषण मित्र[6] होय फेंसाचें[6]. ९

इनकांत[7] काय येतो मंदाक्षाच्या[8] त्यजूनि काच मना?
मज हित तूं चि, न धर्म, प्राणांच्या तो करील आचमना[9]. १०

दुष्कर हि करीन, वदा धरिला स्वमनांत निजहितोपाय;
छेदावा गतिहेतु[10] हि जो विषरुग्दुष्ट[11] निज हि तो पाय.’ ११

स्वमत सुयोधन सांगे, ‘ भेदावा[12] द्रुपद भूरिधनदानें[13];
येणें कोण चळेना? काय महातरु चळेल न नदानें? १२

कीं जें अन्योन्य असे पावेल प्रेम अंत, राया! तें.
जेणें योजावें त्या पांचांत स्त्र्यादि[14]अंतरायातें. १३

कीं भीम मारवावा देवुनि क्ष्वेड[15] हें चि भद्र[16] हित,
मरतील चि, वांचोनि हि काय? शव[17] चि ते समस्त तद्रहित[18].’

---

१. कामाची, उपयोगाची. २. मसलतीचीं अक्षरें (बोलणीं). ३. शत्रूंच्या गुणांची स्तुति. ४. पित्रादि-**पंत.** ५. संकटाचा, दुःखाचा. ६. फेंसाचें मित्र=फेंसासारिखें दिसावयास सरस परंतु वस्तुतः नीरस. ७. सूर्यकांत. ८. मंद दृष्टी ज्याची त्याच्या. ९. तो माझे प्राण घेईल, असा भाव. १०. चालण्याच्या उपयोगी असा. ११. विषयुक्त रोगानें दूषित झालेला. १२. फितूर करावा १३. पुष्कळ द्रव्याच्या देणगीनें. १४. स्त्रियादिक विघ्नातें. १५. विष. १६. कल्याण. १७. प्रेत. १८. भीमरहित.

ऐशा सांगे तो खळ मूर्ख पित्याजवळि नैककूपाया,[1]
सुविचारहंस भेटति कैसे कुविचारभेककूपा[2] या? १५
कर्ण म्हणे, 'राया! हें व्यर्थ, जसें बुद्धिहीन मृगपोर[3]
योजावें पढवुनि वधयुक्ति विदारावयासि मृगपोर.[4] १६
तों वणवा विझवावा, जों भेटि तया दिली नसे वातें;
यदुबळ न भेटतां अरि मारा, जें अन्य मत न सेवा तें. १७
ऐसें स्वमत तुम्हांला कथितों मीं आप्त म्हणुनि मायेनें.
मज आजि ऑजिनें फळसिद्धि दिसे जसि, तसी न मायेनें.[6]'
धृतराष्ट्र म्हणे, 'कर्णा! कथितो शक्रासि जीव जेंवि हित,
कीं यदुवरासि उद्धव, सांगसि मज तूं तसें चि जें विहित.'१९
मग भीष्म-द्रोण-विदुर संमत घ्याया समीप आणविले.
त्यांला वृद्ध-सुयोधन-कर्णांनीं निजविचार जाणविले. २०
गांगेय म्हणे, 'वत्सा! गांधारीनंदना! स्वभावांसीं
न बरा विरोध दुष्टांसीं[10] हिं; करिल कोण सुस्वभावांसीं[11]? २१
मज ते तुम्हीं सम, जसा धृतराष्ट्र, तसा चि पांडुराजा गा!
कुरुवंश हा जयास्तव सुयशा डिंडीरपांडुरा[12] जागा.[13] २२
तुमचें तसें चि त्यांचें राज्य; तयां भाग द्या सम; न्यूनें[14]
अंशें, अनिष्ट, धरितां धन्व करीं अर्जुनें समन्यूनें. २३
वैरें भस्म करावें न कुरुकुळा, जेंवि कानना दावें;[15]
यश सुख पुण्य मिळे, मग बंधूनीं नीट कां न नांदावें? २४

---

१. अनेक दुष्ट उपायांला. २. दुष्ट विचाररूप बेडूक आंत असलेल्या विहिरीला (दुर्योधनाला). ३. हरिणबालक. ४. सिंहहृदय—पंत. ५. युद्धानें. ६. कपटानें. ७. बृहस्पति. ८. श्रीकृष्णासि. ९. वृद्ध धृतराष्ट्र. १०. दुष्टांसीं हि स्वभावांसीं. ११. चांगला स्वभाव ज्यांचा अशांसीं. १२. फेंसाप्रमाणें शुभ्र अशा सुयशा. १३. स्थान. (पात्र). १४. अन्वयार्थ—न्यूनें (कमी—उण्या) अंशें (असम राज्यभाग दिल्यानें) समन्यूनें (सक्रोधें) अर्जुनें धन्व (धनुष्य) करीं धरितां अनिष्ट [होईल]. १५. वणव्यानें.

सामजळें[1] प्रक्षाळा, व्याकुळ करितें महापयश[2] मातें
तप्त[3] हि सन्मन धरितें पुनरपि वरितें महापय[4] शमातें.[5] २५
साधील[6] हरि[7]-मुखीं ही कोणही घालूनि हात कवळा[8] हो!
दुर्मिळ पांडुसुतामिष[9], न तुम्हीं व्हा आत्मघातक, वळा हो!'
द्रोण म्हणे, 'धृतराष्ट्रा! पुसतां, जें युक्त तें चि सांगावें;
सुजनीं, सुजनें त्यागुनि हरिगीत, ग्राम्यगीत[10] कां गावें? २७
तिकडे सामपटु[11] पुरुष शीघ्र तुम्हांकडुन आत्मसम जावा,
द्या अर्धराज्य त्यांला, आणा, चित्तीं शिरोनि समजावा.[12] २८
धाडा उत्तम वस्त्रें रत्नालंकार हार अथवा जी
हे संपत्ति समर्पा, प्रेषा[13] पत्ति[14], द्विपेंद्र, रथ, वाजी.[15]' २९
कर्ण म्हणे, "मेळउनि प्रभुपासूनि[16] प्रभूत[17] धन मान,
बहु अंतरंग[18] होउनि करिति[19] स्वार्थार्जनीं[20] न अनमान. ३०
प्रभुचें न कथिति, आपण यद्यपि नयधर्मपटु, तथापि हित;
अद्भुत हितशत्रुत्व[21] न उमजे सद्रीतिसत्कथापिहित.[22] ३१
शठमित्रमंत्रपान[23] प्राज्ञमतें परम विषम[24] रायाला;
हें घडतां नलगे चि प्राशावें इतर विष मरायाला. ३२
शिष्ट म्हणति, 'दिष्ट[25] खरें सुखदुःखद विष्टपीं[26],' दुजें इष्ट,

---

१. सख्यरूप उदकानें. २. मोठी अपकीर्ति. ३. संतापलेलें (पक्षीं) कढलेलें. दूध. ५. शांतीतें (पक्षीं) शीतत्वातें. ६. मिळवील. ७. सिंह. ८. ग्रासाला, साला. ९. पांडवरूपी मांस. १०. अश्लील, बीभत्स असें गीत. ११. सख्य घडवून णण्यांत कुशल. १२. समजूत करा. १३. पाठवा. १४. पायदळ. १५. घोडे. ६. राजा धृतराष्ट्रापासून १७. पुष्कळ. १८. जिवलग. १९. [भीष्मद्रोण] रेतीं. २०. स्वतांचा मतलब साधण्यांत. २१. हित दाखवून केलें जाणारें शत्रुत्व. २. उत्तम रीति आणि उत्तम कथा यानीं आच्छादित असें (हितशत्रुत्व). ३. लबाड मित्रांच्या मसलतीचें सेवन, (त्याच्या मसलतीप्रमाणें वागणें). २४. संकट. ५. दैव २६. जगत्—**पंत.**

किंवा अनिष्ट करितें[1] मित्र नसें, अन्य कल्पन[2] क्लिष्टें[3]. ३३
लोकांत सावधपणें शब्दें हित अहित ओळखा, वागा,
दुर्योधना! सख्या बहु बोलुनि स्यां काय बोळ खावा गा?”
द्रोण म्हणे, ‘ आम्हीं हितशत्रु, न तूं, सुप्तसर्प[4] तुडवाया
सांगसि जो दाटूनि व्यसनविषमहार्णवांत[5] बुडवाया. ३५
रे कर्ण! दीर्घदर्शी[6] जो तो चि मनुष्य, अन्यथा नरसा
दिसला तऱ्हि पशु, ज्या दे, मातेचें त्या न अन्य थान रसा. ३६
सेवि तया वृद्धाचें मंत्रित हितें[7], हितें तसें न तरुणाचें;
विष म्हणसि कसें त्याला, अमृताधिक उक्त जें सकरुणाचें? ३७
झाला असतां प्राप्त क्षयनामा[8] काळवल्लभ[9] व्याधी[10],
क्षीणायुला[11] चि वाटे वैद्याची स्वाहिता[12] चि भव्या धी.’ ३८
विदुर ह्मणे, ‘दादाजी! करिताहे ज्यासि आ पतित[13] ऊन्हीं[14],
पाजिलिया हि धरावें तिळभरि हि न तें चि आप[15] तितवूनीं[16].
तैसें चि हें; गुरूक्ता तापत्रयतप्त[17] सुज्ञ आ पसरी[18],
जड[19] चि न घे, ज्याची[20] करि अमृत न सुरसिंधुचें[21] हि आप सरी[22].
भीष्मोक्तासि न देसी मन, देउनि काय त्याविना[23] कर्ण[24]?
गुरुसूक्तासि[25] हि तुमचा हितकरवर[26] सूक्त मानिना[27] कर्ण. ४१

---

१. करणारें. २. कल्पना, तर्क. ३. असंगत, अयुक्तिक. ४. निजलेला साप. ५. संकट हेच विष, त्याच्या मोठ्या समुद्रांत. ६. दूरवर विचार करणारा. ७. हितकर. ८. क्षय नांवाचा. ९. काळाचा मित्र. १०. रोग. ११. ज्याचें आयुष्य सरलें त्यास. १२. आपल्या अकल्याणाची. १३. पडलेला. १४. उन्हामध्यें. १५. पाणी. १६. चाळनी—**पंत**. १७. आधिभौतिक, (पंचमहाभूतांपासून होणारा धरणिकंपादि) आध्यात्मिक, (शरीरास होणारा ज्वरादि रोगरूप) आधिदैविक (देवापासून होणारा अनावृष्टि, अतिवृष्टि इ०) ह्या त्रिविध तापानीं संतप्त झालेला. १८. स्वीकारतो. १९. मूर्ख. २०. ज्या गुरूक्ताची. २१. भागीरथीचें. २२. बरोबरी. २३. मनावांचून. २४. कान. २५. गुरु द्रोणाच्या हितवचनास. २६. हित करणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ. २७. मानिना.

काय न हितवाग्गुरु[1] हे? हितवाग्गुरुहूनि काय गा! बाळ?
टाकूनि सार सुज्ञा! गोळा करितोसि काय गाबाळ? ४२
दुर्योधनकर्णशकुनिमंत्र महाघातकर अगा! राया!
बाळोक्ता वश होउनि लाविशि शोकाग्नि कां अगारा या? ४३
पूर्वजसंपादित जें करितो ज्ञाता भला जतन यश तें;
तुझिया तों लोभहतज्ञानें[2] त्यजिली च लाज तनयशतें. ४४
पांच न ते, पांचशतें, पांडुतनय वीरधीरहीरमणी[4];
हे[5] काच साच, नाचति, परि राज्यश्री[6] न मंदधीरमणी[7]. ४५
धर्मीं युधिष्ठिर निरत, युधिष्ठिरीं सबळ[8] वृष्णिवर[9] शौरी[10],
त्या शौरिचा चि ठायीं विजयश्री, जेंवि शंकरीं गौरी. ४६
यदुसिंह[11] सहाय जयां, त्यांला वधितील बाळ हे? राया!
न समर्थ वक्रनेत्रें पांडुकुमारांसि काळ हेरायां[12]. ४७
तें या कुळाहिताच्या[13] त्वां केलें दृढ न मानस त्यागा;
अद्यापि तरी राया! ती माझी उक्ति मान सत्या गा!' ४८
धृतराष्ट्र म्हणे, 'विदुरा! सर्वज्ञा! भरतकुळहिता! भ्रात्या!
युष्मद्वचना[14] भजतों मीं, जेंवि भजे शिखी[15] हिताभ्रा[16] त्या. ४९
ज्यास्तव मज लावितसे आचार्य द्रोण बोल[17] तात[18] हि तें
कर्म कशास? अगा! जे हितें[19], वचनें ते चि बोलतात हितें[20].
माझे चि पुत्र पांडव, त्यांचें, यांचें हि होय सम राज्य,

---

१. हित बोलणारे गुरु. २. लोभानें नष्ट झालें ज्ञान ज्यांचें त्या. ३. शंभर पुत्रानीं. ४. शूर व स्थिरचित्त अशा पुरुषांमध्यें हिरे (श्रेष्ठ). ५. हे तुझे दुर्योधनादि शतपुत्र. ६. राज्यलक्ष्मी. ७. मूर्खाची स्त्री. ८. बळरामासहित. ९. यादवांत श्रेष्ठ. १०. शूरकुलोत्पन्न श्रीकृष्ण. ११. यादववर श्रीकृष्ण. (सिंह, शार्दूल वगैरे शब्द श्रेष्ठत्ववाचक आहेत). १२. पाहण्यास. १३. कुळाचा शत्रु दुर्योधन त्याच्या. १४. तुमच्या भाषणाला. १५. मोर. १६. हितकारक अशा मेघाला. १७. शब्द, दोष. १८. भीष्म. १९. हित करणारे, स्नेही. २०. हितकारक [वचनें]

वैराग्नि पेटवाया दाटुनि सिंचील कोण समराज्य[1]? ५१
जा, पांडव घेउनि ये, जें लागेल प्रभूत[2] वसु[3], ने तें.
पाहोत तूर्ण विदुरा! भीष्मद्रोणप्रभू तव सुनेतें. ५२
मान्य बृहस्पतिला तूं वक्त्यांचा साधुराय, काव्या[4] ही;
आम्हांवरि प्रसन्नस्वांत[5] करीं बंधुनायका! व्याही[6].' ५३
राजाज्ञेनें भेटे विदुर द्रुपदा नृपा सदिष्टातें[7].
मग पांडवबलभद्रप्रभुसहिता सांवळ्या सदिष्टातें[8]. ५४
वस्त्रालंकारांहीं द्रुपदप्रमुखांसि कवि[9] अलंकारी,
विदुरप्रियार्थ सर्वांसह घे तो भोजकुलकलंकारी[10]. ५५
विदुर म्हणे द्रुपदातें, 'तुज म्हणतो या[11] मुखें असें व्याही[12];
नातें तुझें मधुर हें न रसा मधुरत्व देवसेव्यां[13] ही. ५६
नंदननाम[14] सुतीं ऋत[15] केलें त्वां हें करूनि नव नातें;
श्रवणं जसा सुखदता[16] या[17] आजि, सुरांचिया हि न वनातें[18]. ५७
सीतेस्तव अर्कातें[19], कृष्णेस्तव[20] कीं स्ववंश सोमातें[21]
बहु मान्य आजि, राया! यावरि सुतविरह हा नसो मातें. ५८
या मागें न तसें, मज आजि जसें दुःख एक गा! राया!
कृष्णाविलोकनसुखा पात्र न गारा[22] नसोनि गारा या[23]. ५९
ज्यांहीं साकेतींचें[24] श्रुत केलें कुतुक, नरवरा! ते तें
या गजपुरीं[25] स्मरोत प्रेक्षुनि सस्त्रीक नर वरातें.' ६०

---

१. युद्धरूपी तूप. २. पुष्कळ. ३. द्रव्य. ४. शुक्राचार्याला. ५. प्रसन्न मन ज्यांचें असा. ६. द्रुपदराजा. ७. दैवयुक्त—**पंत**. ८. साधूंना इष्ट अशा कृष्णातें. ९. ज्ञाता विदुर. १०. कंसशत्रु—**पंत**. ११. या माझ्या मुखानें. १२. धृतराष्ट्र—**पंत**. १३. देवानीं सेवन करण्यास योग्य अशा (रसा हि=अमृताला सुद्धां). १४. नंदन (आनंद देणारा, पुत्र) हें नांव. १५. सत्य—**पंत**. १६. सुख देण्याचा गुण. १७. या (पुत्रवाचक) नंदननामातें. १८. नंदननामक वनातें. १९. सूर्यातें. २०. द्रौपदीमुळें. २१. चंद्रातें. २२. त्यांचा. २३. अस्मन्नेत्रयोः—**पंत**. २४. अयोध्येचें. २५. हस्तिनापुरीं.

द्रुपद म्हणे, 'विदुरा ! म्यां काय वदावें ? तुला सकळ कळतें;
प्रेक्षकमन बहु चरणें[1] चुरितां वंद्यां[2] फुलास कळकळतें[3]. ६१
वर्तेन तसें चि, जसें विहित तुम्हीं परम आप्त सांगाल,
अमृत भरवितां सत्कृपें[4] फुगवील स्वहितकाम[5] कां गाल[6] ?' ६२
धर्म म्हणे, 'ताता[7] ! तूं द्रुपदनृपति, रामकृष्ण परमहित
सांगाल तसें चि करूं, आम्हां न तुम्हांपरीस पर महित[8]. ६३
कृष्ण म्हणे 'धर्मा ! जा कीं आला न्यावया स्वयें चुलता,
धृतराष्ट्र वांचला त्वत्कुशळें, नाहीं तरी उरीं उलता[9]. ६४
कोणें हि पाविजेल स्वप्नीं हि विनाश न विदुराधीनें[10].
व्याकुळ होऊं देइल न तुम्हां हा साधु कवि दुराधीनें[11].' ६५
प्रणतां देतें ज्याच्या पदपद्माचें सदा रज गतीतें[12],
त्या प्रभुमतें परततां, बहु सुखविति ते सदार[13] जगतीतें. ६६
कृष्णाग्रजावरज[14] बळकृष्णाश्रित करुनि कीर्तिला जतन
कृष्णात्मज[15]-कुलनंदन कृष्णापति[16] वीर पावले वतन[17]. ६७
धृतराष्ट्रनृप-प्रहित[18]-द्रोण-कृप-विकर्ण[19]-चित्रसेनां[19]हीं,
नगरांत आणिले ते पांडव वेष्टूनि चित्र[20] सेनांहीं. ६८
पौर म्हणति, 'जसि द्यावी येउनि गहना[21] प्रभा[22] वसंतानें,

---

१. पायानें. २. वंदन करण्यास योग्य अशा. ३. हळहळतें. ४. सदय मनुष्यानें. ५. स्वहितेच्छु. ६. गाल फुगविणें हें कोपाचें चिन्ह आहे. ७. बापा ! विदुरा ! ८. मान्य, पूज्य. ९. फुटला असता. (मेला असता). १०. विदुराच्या अधीन अशा (कोणें हि). ११. दुष्ट मनोव्यथेनें. १२. सद्गतीतें, मोक्षातें. १३. भार्या द्रौपदीसह. १४. अर्जुन, त्याचे वडीलबंधु धर्म, भीम व धाकटे बंधु नकुलसहदेव. १५. व्यासनंदन पांडु—**पंत.** (पांडूच्या वंशांतील पुत्र पांडव). १६. द्रौपदीपति. १७. पूर्वार्जित हक्काची जागा. (हा शब्द अरबी भाषेंतील आहे.) १८. पाठविलेले. १९. हे उभयतां धृतराष्ट्रपुत्र होत. (विकर्ण हा पापभीरु आणि सत्यवादी होता). २०. नानाविध. २१. अरण्याला. २२. शोभा.

तसि पांडुच्या[1] दिली या नगरा अतुळप्रभाव[2] संतानें[3].' ६९
म्हणति स्त्रिया, 'पुरश्री[4] जाउनि समजाउनि, स्वयें भार्या
होउनि, घेउनि आली, वाटे द्रुपदात्मजा न हे आर्या. ७०
पांडव नव्हेत, हे घन, यांची हे सहचरी सुतनु[5] शंपा[6].
या स्वविरहदवहतपुरविपिनीं[7] केली उदंड अनुकंपा. ७१
सितकाक[8] मानसश्रीकर[9] नोहे करुनियां अध[10] मराळीं[11],
शालि[12] कनकपात्रोचित[13] न धरुनि हि सुवृत्तता[14], अधम[15] राळा[16]. ७२
प्रभु रामकृष्ण हे तों चिंतामणिचे[17] श्रिता[18] जना वाडे,
आपत्सरिदुत्तारक[19] धर्माचे आप्तराज[20] नावाडे.' ७३
ऐसें श्रवण करीत प्रियजनहृन्नीरजांसि[21] फुलवीत,
उलवीत असदुरांतें[22], कुरुराज्यश्रीमनासि भुलवीत, ७४
जाउनि पांडव भीष्मप्रमुखगुरुजनाचिया पदीं नमनें
करुनि, निजप्रासादामाजि सुखें राहिले अदीनमनें[23]. ७५
कांहीं काळ कुरुपुरीं[24] होते, सामें तयासि मग राजा
अंध म्हणे, 'राज्यार्ध स्वीकारा, या त्यजूनि नगरा, जा. ७६
राज्य करा, नगर रचा, वसवा वासार्ह[25] खांडवप्रस्थ[26].

---

१. पांडु राजाच्या. २. निरुपम पराक्रम जिचा. अशा ३. संततीनें. ४. नगर-लक्ष्मी किंवा नगराची शोभा. ५. चारुगात्री. (सुंदरी) ६. वीज. ७. आपल्या वियोगरूप वणव्यानें दग्ध झालेल्या नगररूप अरण्यामध्यें. ८. पांढरा कावळा. ९. मानससरोवराला शोभा देणारा. १०. खालीं (धिकृत) करून. 'अधः' हें अव्यय विसर्गांत असून हि येथें त्याचा अकारान्त उपयोग केला आहे. ११. हंसाला. १२. भात. १३. सुवर्णपात्रांत [राहायास] योग्य. १४. उत्कृष्ट वर्तुलाकारता. १५. कमी प्रतीचा. १६. एक धान्य. १७. इष्टवस्तु देणाऱ्या मण्याचे. १८. आश्रित लोकांना. १९. विपत्तिरूप नदीच्या परतीरास नेणारे. २०. आप्तांमध्यें श्रेष्ठ. २१. प्रियजनांच्या हृदयरूप कमळांस. २२. दुष्टांच्या वक्षस्थलातें. २३. उदार (मोकळ्या) मनानें. २४. हस्तिनापुरीं. २५. राहण्यास योग्य. २६. इन्द्रप्रस्थ.

चांदाची[1] वृद्धि असो, नांदा सानंद सानुग[2] स्वस्थ. ७७
भ्रात्यांत पुन्हां विग्रह[3] न प्रकटावा, न पूर्व[4] तापावे;
कुलजविरोधें संतत ताप गुरुमनीं[5] अपूर्वता[6] पावे.' ७८
वंदुनि पित्यासि साच्युत पांडव हि चतुर्मुखांडवप्रस्था[7]
स्वयशासि घालवाया बाहिर, गेले स्वखांडवप्रस्था. ७९
तेथें त्रिभुवनशिल्पी[8] प्रभु आपण कथुनि युक्तिला, पुर तें
जें रचवी धर्माचें, निरुपम झालें नसेल कां पुरतें? ८०
प्रभु पुर असें रची कीं, हरिसा सानंद धर्मसुत[9] राहो,
सर्व जनास हि दुस्तर[10] सुरभोगेच्छापगा[11] हि सुतरा[12] हो. ८१
जें प्रभुदर्शन दुर्लभ कामित[13] नाकीं हि तें हि तें पुरवी,
मग कोणतीं न संश्रितलोकांचीं[14] कामितें हितें पुर वी[15]? ८२
तें न पुर, प्रभुनें रसपूर्ण स्वजनासि वाढिलें पात्र.
चोळिति निजागुणें[16] कर बहु मलिनप्रकृति मक्षिका मात्र. ८३
स्थापुनि सन्मणिकनकप्रासादीं[17] पांडवांसि राम-हरी
गेले द्वारवतीतें गात्यांचा श्रम यदीय[18] नाम हरी. ८४

---

१. द्वितीया चंद्रवत्—**पंत** २. सेवकांसह. ३. तंटा. ४. पूर्वज. ५. वडिलांच्या मनांत. ६. ताप अपूर्वता पावे=पश्चात्ताप होई. ७. ब्रह्मांडाच्या तटावर राहणाऱ्या. ८. त्रैलोक्य रचणारा कारागीर. ९. यमपुत्र. (धर्मराज). १०. तरून जाण्यास कठीण. ११. देवांचे उपभोगांची इच्छा हीच कोणी नदी ती. १२. तरण्यास सुलभ. १३. इच्छित. १४. आश्रित जनांची. १५. वितें. (देतें, पूर्ण करितें.) १६. आपल्या अगुणें (दुर्गुणानें). १७. उत्तम रत्नें आणि सोनें यानीं मढविलेल्या राजवाड्यांत. १८. ज्यांचें.

अध्याय अडतिसावा.

इंद्रप्रस्थीं, राया! धर्माला म्हणति लोक 'हा राम,
साधु, विवेकी, कामद[1]; अधिक न जड[2] कल्पभूरुहाराम[3].' १
न पराचें, आवडलें धर्माचें त्या प्रजेसि नव राज्य;
रसनेसि[4] वैराज्य[5] जसें गव्य[6] चि, माहिषें[7] गमेल न वराज्य. २
तेथें नारद आला, पूजुनियां त्यासि धर्म तन्नमना[8]
कृष्णेसि आणवी, ती वंदी, मुनि होय सुप्रसन्नमना. ३
तीस म्हणे, 'सति! पतिमतिरतिदा[9] हो, राज्ञि! पुत्रि! हा राजा
सानुज नांदो तुजसीं चिर, विरह नसो, करा विहारा, जा.' ४
कृष्णा जाय, मग म्हणे श्रीनारद पांडवांसि, "पौरव[10] हो!
नयशीलधर्मरक्षाप्राप्त[11] तुम्हां सत्सभेंत गौरव हो. ५
एक स्त्री पांच तुम्हीं, भेद घडेना असी करा नीति;
प्रीतिक्षतिकरविषयापासुनि[12] बहु साधुमानसीं भीति. ६
धर्मा! एकस्त्रीच्छु भ्राते भेदासि[13] पावले मागें,
एकात्मे[14] ही मेले, ऐकावें तें तुवां महाभागें. ७
कनककशिपुकुळसंभव[15] होते सुंदोपसुंद[16], ते देहें
कीं नामें भिन्न, मनें एक चि, विख्यात अद्भुतस्नेहें. ८
ब्रह्मांडाचा स्वतपस्तेजें अतितप्त करुनि ते मध्य,
परमेष्ठिवरें[17] झाले अतुळबळ स्वेतराखिलावध्य[18]. ९

---

१. इच्छा पूर्ण करणारा. २. अचेतन. ३. कल्पवृक्षांचा बाग. ४. जिभेला. ५. उत्तम तूप. ६. गाईचें. ७. म्हशीचें. ८. सुप्रसन्न मन ज्याचें असा. ९. पतीच्या मनाला आनंद देणारी. १० पूरुकुलोत्पन्न पांडव. ११. नीति व सदाचरण यानीं केलेलें जें धर्मरक्षण त्यापासून मिळालेलें. १२. प्रेमाचा नाश करणाऱ्या विषयापासून. १३. विरोधास, शत्रुत्वास. १४. एका जिवाचे. १५. हिरण्यकशिपूच्या कुळांत ज्यांचा जन्म असे. १६. सुंद व उपसुंद. १७. ब्रह्मदेवाच्या वरामुळें. १८. स्वतांशिवाय इतर सर्वांकडून मारले जाण्यास अशक्य.

त्रस्ततरसुरप्रार्थितविधिवचनें[1] चतुर विश्वकर्मा[2] तें
व्यसन हराया, द्याया निजकौशल्यें सुरांसि शर्मातें[3], १०
लोकत्रयस्थ[4] तिळतिळ उत्तम लावण्य मेळउनि यत्नें
स्त्रीरत्न रची, जाणों अवयव ते न खचिलीं च तीं रत्नें. ११
नामें तिळोत्तमा ती, लावण्य तिचें नृपा! अपार चि तें,
जेणें वेधावें[5] चि क्षण तरि, जें मन महातपा[6] रचितें. १२
तीस म्हणे द्रुहिण[7], 'अये[8]! देवि! त्रैलोक्यसुंदरि! पुनीते[9]!
वारीं ताप, जगा जे दिधले सुंदोपसुंदरिपुनीं ते.' १३
ती, भुलले सुर हरिहर पाहुनि लोकैकसुंदरा[10] ज्याला[11],
ब्रह्मनियोगें[12] दावी तें मोहक वदन सुंदराज्याला[13]. १४
विंध्यवनीं[14] ललनाजनपरिवृत[15] ते दैत्यराज पीतसुर[16],
स्वर्गाधिपत्य[17] साधुनि होते स्वबळेंकरूनि भीतसुर[18]. १५
पुष्पावचयव्याजें[19], जैसी चपळा[20] घनीं, वनीं चपळ
फिरतां तिला पहाती, स्थिर पाहुनि बैसती न नीच पळ. १६
अवलोकितां चि चित्तें तद्रूपीं जेंवि सुंद रमला हो!
उपसुंद ही म्हणे, 'हें प्राप्त स्त्रीरत्न सुंदर मला हो.' १७
धावुनि धरिति कर तिचे सोडुनि सुंदोपसुंद रीतीतें,
दोघांचें हि कटाक्षें अनुमोदी कृत्य सुंदरी ती तें. १८
सुंद म्हणे, 'म्यां वरिली, सर परता, त्यजुनि हात तो डावा;

---

१. अतिशय पीडित अशा देवानीं प्रार्थिलेल्या ब्रह्मदेवाच्या आज्ञेनें. २. देवांचा शिल्पी; ह्यास 'त्वष्टा' हि म्हणतात. ३. सुखातें. ४. त्रैलोक्यांतील. ५. भुलवावें. ६. मोठ्या तपश्चर्येला. ७. ब्रह्मदेव. ८. अगे! ९. पवित्रे! १०. लोकांमध्यें एकच (अद्वितीय) सुंदर अशा. ११. ज्या वदनाला. १२. ब्रह्मदेवाच्या आज्ञेनें. १३. राक्षसराजा सुंद याला. १४. विंध्यपर्वतावरील अरण्यांत. १५. स्त्रीजनानीं वेष्टित. १६. मद्य प्यालेले. १७. स्वर्गाचें स्वामित्व. १८. भय पावले आहेत देव ज्यापासून असे. १९. फुलें वेंचण्याच्या मिषानें. २०. वीज.

गुरुदारधर्षणोद्यत[1] जो, तो लागेल हात तोडावा' १९
उपसुंद म्हणे, 'माझी न करावी धर्महानि, करकरुनीं[2]
कां धरिला मृदुकर? सर, हर! हर! मरशील हा निकर करुनीं.'
सुंद जसा, उपसुंद हि दे, देत्यां[3] दे जसें गगन[4] गाळी[5],
ज्यासि अमर्ष[6] रुचे, तो अंध विवेकासि कां मग न गाळी[7]? २१
सुंदीं जैसा काम क्रोध उठे, तदनुजीं तसा चि तदा.
बिंबप्रतिबिंब चि तें; घे ज्येष्ठ, कनिष्ठ ही तसीच गदा. २२
सुंदाची उपसुंदीं, उपसुंदाची गदा पडे सुंदीं,
तन्मरणमुदुद्धासें[8] गणपतिच्या कळ[9] नुठेल कां तुंदीं[10]? २३
परम सखे होते, परि एकस्त्रीरत्नभोगकामुक ते
मेले चि, जरि न ऐसें करिते, तरि जीवनासि कां मुकते? २४
म्हणुनि तुम्हीं स्वस्नेहप्राणयशोव्यय[11] न होय, सुख वाढे,
ऐसें वर्ता बुध हो! कटु हि सदुपदेश हित, जसें काढे." २५
पांडव म्हणति, 'गुरुवरें हित कथिलें, अमृत पाजिलें कानीं,
अवलोकिला बहुदिसां राजर्षी पांडु आजि लेंकानीं. २६
आम्हांत जो द्रुपदजासहिता पाहेल केलिच्या[12] भवनीं[13],
तो ब्रह्मचारिधर्में वर्तेल द्वादशाब्दकाळ[14] वनीं.' २७
समय[15] असा करउनि मुनि गेल्यावरि एकदा असें घडलें.
गोधन[16] कोणा एका विप्राचें दस्युच्या[17] करीं पडलें. २८
तो द्विज शक्रप्रस्थीं[18] हाका मारी म्हणे, "अगा! राया!

---

१. वडील [बंधूच्या] स्त्रीचें धर्षण (अपमान) करण्यास तयार झालेला. २. अनर्थ, नीचपणा. ३. देणाऱ्याला. ४. आकाश. ५. शिवी. (आपणास गाळी देणाराला गगन जसें [उलट] गाळी देते ह्म. प्रतिध्वनि करितें). ६. क्रोध. ७. टाकी. ८. त्यांच्या मरणाच्या आनंदानें आलेल्या हास्यानें. ९. तिडीक. १० पोटांत. ११. आपला स्नेह, जीव आणि कीर्ति यांचा नाश. १२. क्रीडेच्या. १३. मंदिरांत. १४. बारा वर्षें. १५. नियम. (शपथ). १६. गाई. १७. चोराच्या. १८. इंद्रप्रस्थामध्यें (प्रेऊत).

संरक्षितोसि राष्ट्राप्रति, कीं तूं आपुल्या अगारा या? २९
दुष्टविनाशें यश बहु वाढो म्हणती, न तें खचो, राजे;
ते साधु भूप, देती सुख साधुजनासि, दुःख चोरा जे. ३०
चोरापहृत[1]-ब्राह्मणगोधन, निजकीर्तिधन, उठा, राखा,
न ह्मणो पुनरपि भगवान् राम[2], 'क्षत्रियकुळा कुठारा[3]! खा.'
न द्विजगोधन केवळ नेलें, तुमचें हि सुयश, धांवा हो!
धांवा रे पांडव हो! म्हणतां रक्षार्ह वस्तु कां वाहो[4]?", ३२
तें ऐकतां चि, 'मा भैर्विप्र[5]!' म्हणे सद्वनैकरस[6] कृष्ण.
परि तैं शस्त्रागारीं होता श्रीधर्मभूवर[8] संकृष्ण[9]. ३३
वासवि[10] पडे विचारीं कीं, 'कैसा स्वकृतनियम मोडावा?
रक्षण न करुनि कैसा विप्राचा अप्रसाद जोडावा? ३४
विप्रार्थ चि रक्षावा; लागो निजनियमलंघनें शब्द.
बारा सारावे वनवासीं, बुध शत हि सारिती अब्द.' ३५
निश्चय करुनि असा तो शस्त्रागारीं शिरे, नमूनि नृपा,
धनु घेउनि, चोर वधुनि, संपादी कार्य करुनि विप्रकृपा. ३६
मग बहुकष्टें धर्में आज्ञा दिधली, सुखें न, वनवासा.
तीर्थाटनीं धनंजय उत्सव[11] पावे सदा नवनवासा. ३७
त्या तीर्थपरा[12] प्रभुला बहु मानवती सुरर्षि[13]नाकर्षी;
कामाकुळा[14] उलूपी[15] गंगाद्वारीं जळांत आकर्षी. ३८
ती ऐरावतनागपवंशजकौरव्यकन्यका[16] आर्या
नेऊनि नागलोकीं पितृगेहीं होय जिष्णुची भार्या. ३९

---

१. चोरानीं हरण केलेलें. २. परशुराम. ३. परशो! ४. वाहून जावो. (नष्ट होवो). ५. हे ब्राह्मणा! भिऊं नको. ६. साधूंच्या रक्षणाविषयीं मोठी आवड ज्यास तो. ७. अर्जुन. ८. श्रीधर्मराजा. ९. द्रौपदीसह. १०. अर्जुन. ११. आनंद. १२. तीर्थाटन करण्याविषयीं तत्पर अशा. १३. देव, ऋषि आणि स्वर्गांत राहणारे ऋषिविशेष. १४. मदनपीडित अशी. १५. एक नागकन्या. १६. सर्पश्रेष्ठ ऐरावताचा वंशज कौरव्य, त्याची कन्या.

चित्रांगदा हि वरिली मणिपूराधीश-चित्रवाहन-जा
ज्ञात्यासि न व्रतच्युति[1], विषयांचा वाहवि प्रवाह न ज्या. ४०
तैश्या चि पावल्या ज्या होत्या ग्राहत्व[2] अप्सरा[3] शापें,
त्या पांच हि उद्धरिल्या, तीर्थीं पार्थें हरूनियां पापें. ४१
तीर्थें पाहत पाहत गेला तो वासवि प्रभासा[4] जों,
भेटुनि कृष्ण म्हणे, 'ये दोघे सुखऊनि यदुसभा साजों.' ४२
जो देवाश्रयगर्वितमणिसानुप्रति[5] हि रैवतक[6] दांपी[7];
तेथें ने, न विसंबे क्षण ही तें इष्ट दैवत कदापी. ४३
मिरवीत स्वपुरींत प्रभुनें नेला सिताश्व[8] वासवसा.
वृष्णि म्हणति, 'अर्जुनजी! येथें चि पुरे करा प्रवास, वसा.'
वसुदेवें आदरिला बहु करुनि तदात्मरंजना भाचा;
सर्वत्र मान पावे साधु सखा भक्त कंजनाभाचा[9]. ४५
कुंतीसुतें सुभद्रा नवरी वसुदेवकन्यका सुरुची[10]
देखिलि अनुजा[11] मनुजाकारधरा त्या विरंचिच्या[12] गुरुची[13]. ४६
अमृतांशुची[14] अहंकृति[15] सर्व जिच्या नाशिली मुखानें ती
तद्धृतिस[16] होय हृदयीं हाणुनि नयनां[17] शिलीमुखा नेती. ४७

---

१. व्रतभंग २. सुसरीचा जन्म. ३. वर्गा, सौरभेयी, समीचि, बुद्बुदा व लता ह्या पांच अप्सरानीं (देववेश्यानीं) एकदा एका तपस्वी विप्राचा तपोभंग करण्याचा केलेला प्रयत्न साध्य न होतां उलट त्या विप्रानें त्यांस 'तुम्ही शंभर वर्षें जलामध्यें नक्र होऊन रहाल' असा शाप दिला; परंतु त्या अप्सरा शरण आल्यासें पाहून त्यानें पुन्हां उःशाप दिला कीं, 'शतवर्षांतीं कोणी थोर पुरुष येऊन तुमचा उद्धार करील.' ह्या उःशापाप्रमाणें अर्जुनानें येऊन त्या अप्सरांचें ग्राहत्व दूर केलें. ४. द्वारकेजवळच्या एका तीर्थाला. ५. देववसतीमुळें गर्वित अशा मेरु पर्वताला ही. ६. द्वारकेजवळील एक पर्वत. ७. दटावी. ८. ज्याच्या रथाचे घोडे पांढरे आहेत असा अर्जुन. ९. नाभिस्थानीं कमल ज्याच्या, त्या कृष्णाचा. १०. चांगली तेजस्वी. ११. धाकटी बहीण. १२. ब्रह्मदेवाच्या. १३. बापाची. (कृष्णाची). १४. चंद्राची. १५. अहंकार १६. त्या अर्जुनाच्या धैर्यास. १७. नेत्ररूप बाणाला.

जाणोनि भाव भक्तप्रियकर हांसे, म्हणे, ‘ मन कुलीनें
त्वां न दिलें, परि नेलें करुनि बळ पहा कसें पटु[1] मुलीनें.’ ४८
पार्थ म्हणे, ‘तूं चेतश्चोर[2], तसी च स्वसा तुझी देवा!
मोहावा स्मरहर[3], हर! हर! तेथें आमुचा किती केवा?’ ४९
करुनि कृपा कृष्ण म्हणे, ‘अर्जुनजी! तरि मुलीस पळवा हो!
पळ वाहो कोपें बळ[4], हे तनु[5] अतनु-ज्वरें[6] न पळवा हो.’ ५०
शीघ्रचरें[7] चरें[8] प्रेषुनि, धर्माज्ञा आणवूनि, मग तीतें
पळवी[9]; पळ वीशांनें[10], हरिलीसें वाटवूनि जगतीतें. ५१
रैवतनगोत्सवीं[11] ती हरिली ऐकोनि राम कर चोळी,
नुरवी[12] रिपुदारजनीं[13] जो तच्छोभाविरामकर[14] [15]चोळी. ५२
यादव सर्व हि झाले सिद्ध, परि हरि स्वयें न लेश वदे.
बळभद्र म्हणे, ‘ऐका यादव हो! न मन यांत केशव दे. ५३
बसला उगाच मौनव्रत धरुनि, स्वस्थ कुतुक पाहतसे,
थांबा यासि पुसों द्या, कां हा स्वातिक्रमासि[16] साहतसे.’ ५४
ऐसें म्हणोनि बळ, बळ[17] पळभरि तें स्थिर करूनि, भावाला
आपण पुसे, ‘उगा कां? वद, जाणों दे त्वदीयभावाला[18]. ५५
माझ्या मतें वधावें त्या यदुकुरुकीर्तिनाशका पापा[19],
जेणें भलें म्हणविलें पाजुनि पय पाळिल्या खळा सापा. ५६

---

१. चतुर. २. मन हरण करणारा चोर. ३. मदनहर. (शंकर). ४. बळराम. ५. शरीर. ६. काम—**पंत.** कामज्वरानें, कामसंतापानें. ७. लौकर चालणारा. ८. दूत. ९. श्रीमद्भागवत दशमस्कंध अ० ८६, यांत अर्जुनानें त्रिदंडी संन्यास घेऊन सुभद्राहरण केल्याचें वर्णन आहे व पंतानीं हि आपल्या ‘मंत्रभागवत’ व ‘कृष्ण-विजय’ ह्या ग्रंथांत त्याचा अनुवाद केला आहे; परंतु प्रस्तुतचें वर्णन त्या वर्णनाहून भिन्न आहे असें दिसून येतें. १०. गरुड—**पंत.** ११. रैवतकपर्वतावरील उत्साहांत. १२. उरवीत नसे. १३. शत्रुस्त्रियांचे ठायीं. १४. त्या रिपुस्त्रियांच्या शोभेचा नाश करणारा (जो राम). १५. कंचुकी. १६. आपल्या अपमानास. १७. सैन्य. १८. तुझ्या हेतुला. १९. दुष्टाला. (अर्जुनाला.).

आम्हीं, तुझा सखा, या भावें तो पूजिला सदा सुरसा;[1]
सर्पा अर्पावें जें, विषपण येतें तया पया सुरसा.[2] ५७
ज्यांत[3] सदन्नें[4] जेवी, भंगी[5] हाणोनि दुष्ट लत्ता तें,
न कृतघ्न उपेक्षावा, शीघ्र वधावें अशा प्रमत्तातें. ५८
स्वयशोघ्न[6] जो, वधावा, तुज आजि उपेक्षणीय कां गमला?
करिसी काय विचार? स्पष्टतर[7] स्वमत शीघ्र सांग मला.' ५९
कृष्ण म्हणे, 'दादाजी! पडला आहे असा विचार मला,
कीं भगिनीहरणास्तव जिष्णु तुम्हां दुष्ट वध्यसा गमला! ६०
कन्येच्या लाभाचा निश्चय नाहीं स्वयंवरीं स्पष्ट,
घ्यावें दान, दिलें तरि हें कर्म हि मानधनजना[8] कष्ट.[9] ६१
धन देउनि घ्यावी, तरि न अपत्याचा भला करी विकरा,
चित्तीं या दोषांच्यां आणुनि त्या पंडितोत्तमें निकरीं,[10] ६२
युक्त प्रसह्यहरण[11] क्षत्रप्रभवांसि,[12] या चि भावानें,[13]
यदुकुरुकुळकीर्तिकरें नवरी हरिली महाप्रभावानें.[14] ६३
मज तों ऐसें दिसतें कीं, जो धर्मज्ञ शुद्ध कुळ ज्याचें,
तो अन्याय करीना; धर्मीं च मन प्रसन्न कुळज्याचें.[15] ६४
किंच,[16] पराभव त्याचा श्रीकंठ[17] करूं म्हणेल, तरि त्याला
नाहीं अशक्य कांहीं, दृक्पातें[18] भुवन भस्म करित्याला. ६५
शक्ति पुरहरावांचुनि[19] पार्थपरिभवीं नसे चि अन्यास;
पण[20] न घडतां मरण, कीं मानधनजनास युक्त सन्यास. ६६
न सुचे, कन्या अन्या धन्या कवणा वरासि अर्पावी;

---

१. देवासारखा. २. मधुर अशा पया. ३. ज्या पात्रांत. ४. उत्तम अन्नें. ५. फोडी. ६. आपल्या यशाचा नाश करणारा. ७. अगदीं स्पष्टपणें. ८. मान हेंच धन ज्याचें अशा पुरुषाला. ९. कष्टदायक. १०. दोषांच्या समूहाला. ११. बलात्कारानें हरण करणें. १२. क्षत्रियकुलोत्पन्न पुरुषांला. १३. हेतूनें. १४. मोठ्या पराक्रमानें. १५. कुलीनाचें. १६. आणखी असें कीं. १७. शंकर. १८. दृष्टि फेंकण्यानें. १९. त्रिपुरारि शंकरावांचून. २०. प्रतिज्ञा.

क्षितिधर[1] एक चि, न दुजा, कद्रू[2] हि तशा दुज्या न सर्पा वी.
यास्तव मज वाटतसे सुज्ञ प्रेषूनि पार्थ फिरवावा,
जिरवावा कोप मनीं, भगिनीसह तो पुरांत मिरवावा.' ६८
केलें तसें चि रामें; वृष्णिपुरीं लग्नकार्य साधूनीं[3]
पार्थ स्वपुरा आला, गौरविला बंधुपौरसाधूनीं. ६९
कुंतीतें नमुनि, तिची आज्ञा घेऊनि, फार शंकितसा[4]
कृष्णेकडे हळूहळु एकाकी जिष्णु जाय अंकितसा[5]. ७०
प्रणयें[6] प्रिया[7] प्रियातें स्मित[8] करुनि म्हणे तया नरमणीतें,
'दृष्टि निववली, जा जी! स्ववियोगें द्या भया न रमणीतें[9]. ७१
हा[10] प्रेमबंध पहिला, दुसरा तो प्रेमबंध, दृढ अन्य;
भाराचा ही बंध प्रथम श्लथ[11] होय जाणती वन्यें[12]. ७२
मधुप[13] नव्या नलिनीला सोडुनि पहिलीस काय सेवील?
कां सद्यः[14] पक्वान्न त्यजुनि रसिक यातयाम[15] जेवील? ७३
जिष्णु म्हणे तद्रचितें[16] मज मिळतिल हे न गोडवे[17] दास्यें;
लागति तुझ्या मुखें हे बोल, जसे शब्द गोड वेदास्यें[18]. ७४
दास्यें तुझी सुमति [19]हे सुखविल, सुरसिंधु[20] जेंवि गौरीची;
मूर्ति धरूनि तुजकडे आली हे प्रीति जाण शौरीची[21].' ७५
बहु रंजवी प्रियेच्या करुनि परोपरि सुसांत्वन मनातें.
[22]गोपीवेषें प्रेषी, सुशिवेला[23] द्रुपदजांघ्रिनमनातें. ७६

---

१. शेष—**पंत.** २. नागमाता—**पंत.** ३. संपादून. ४. सुभद्रेशीं दुसरें लग्न केल्यामुळें द्रौपदी आपणावर रागावेल ह्याविषयीं शंकित असा. ५. सेवकसा. ६. प्रेमानें. ७. द्रौपदी. ८. हास्य. ९. आवडती जी सुभद्रा तिला. १०. हा माझा प्रेमबंध. ११. शिथिल, सैल. १२. रानटी लोक. १३. भ्रमर. १४. तत्काल. १५. गतरस—**पंत.** (शिळें). १६. सुभद्रेनें केलेल्या दास्यानें. १७. आपल्यावर एखाद्याचें प्रेम असून तो तें विसरला असतां त्याच्यासंबंधानें आपल्या मुखांतून जे उद्गार निघतात त्यांस 'गोडवे' म्हणतात. १८. वेदमुखानें. १९. ही सुभद्रा. २०. देवनदी. (गंगा). २१. कृष्णाची. २२. गवळणीच्या वेषानें. २३. सु-भद्रेला. (शिव=भद्र).

कृष्णेसि पट्टमहिषीवेषें[1] यावा न कोप या भावें
वेष तसा करवी, कीं, आवृत[2] लावण्य तें तिचें व्हावें. ७७
परि ती फार चि शोभे, गुंजाशिखिपिच्छधातुधर[3] तीचे
भ्राते झाले चेतोहर[4] सांगा कोणत्या न गरतीचे[5]? ७८
'देवि! तुझी प्रेष्या[6] मीं' नमुनि असें ती[7] म्हणे स्वसवतीतें.
कृष्णा[8] बहु मानवली त्या नम्रपणें तिच्या प्रसवतीतें[9]. ७९
कृष्णा[10] भेटोनि म्हणे, 'नित्य असो निःसपत्न[11] तव नवरा,
नव नव राज्यसुख पहा, पाव सुताद्यखिलभव्यभवनवरा[12].' ८०
साक्रूरोद्धवसात्यकिवृष्णिकटकयुक्त रामकृष्ण मग
आले आंदण घेउनि, भक्तांचे मूर्तिमंत देवनग[13]. ८१
भरिलें तिहीं धनें पुर, राष्ट्र हि बहु धर्मगृह न केवळ तें;
चातकसुख चि भरी कीं अभ्र[14] भरायासि भूमिके वळतें. ८२
बळ जाय, कृष्ण राहे, ठेवी न सुत, न वधु, न सेना, कीं
जें सुख भक्तगृहीं या हरिस, तया हरिस[15] तें नसे नाकीं. ८३
शक्रप्रस्थीं असतां झाला नरवेष[16] विष्णुला भाचा.
फार चि कामुक[17] हो त्या स्वसख्यासह[18] त्या[19] चि जिष्णु लाभाचा.
ह्मणति, 'पितृकृतध्यानें[20] झाला तो बाल[21] कृष्ण साच' कवी.
आजवळीं निजचित्रें जो भासे बाळकृष्णसा, चकवी. ८५
धरिली प्रभुनें[22], बहु निजरूपनिरत जिष्णु म्हणुनियां, तनु ती,

---

१. अभिषिक्त राणीच्या वेषानें. २. आच्छादित. ३. गुंजा, मयूरपिसें आणि गैरिकादि धातुरस धारण करणारे. ४. मनोहर. ५. कुलीनस्त्रीचें (गृहरत= घरामध्यें—आपल्या संसारामध्यें—रत ती—गरत). ६. दासी. ७. सुभद्रा. ८. मान्य झाली. ९. मातेला. (देवकीला). १०. द्रौपदी. ११. शत्रुरहित. १२. पुत्रादि सर्व सुखांचें घरच अशा वराला. १३. कल्पवृक्ष. १४. मेघ. १५. त्या इन्द्रास. १६. मानववेषधारी. १७. सस्पृह. १८. आपला मित्र श्रीकृष्ण त्यासह. १९. पुत्र—पंत. २०. बापानें केलेल्या कृष्णाच्या ध्यानानें. २१. अभिमन्यु. २२. कृष्णानें.

हा तर्क फार बरवा, एक असो दोष, फार यांत नुती[1]. ८६
तो अभिमन्यु[2] बहिश्चर साक्षात् स्वप्राण पद्मनाभाचा,[3]
आत्मा[4] हि तसा त्याच्या वल्लभ न गमे, जसा मना भाचा. ८७
प्रसवे कृष्णा[5] पांचापासुनि सुत पांच, त्यांत जो ज्येष्ठ
तो प्रतिविंध्य महात्मा, दुसरा सुतसोम गुरुजनप्रेष्ठ[6]. ८८
श्रुतकर्मा आणि शतानीक श्रुतसेननाम एवं[7] च
धर्मज भीमज जिष्णुज नकुळज सहदेवज क्रमें पंच. ८९
दोघां कृष्णांसि[8] जसा आवडला तद्गुणांस[9] ही फार,
विद्या कळा मग न कां सौभद्रगळांत घालिती हार? ९०
प्रतिविंध्यादि कुमार स्वपितृसम ज्ञानशौर्यरूपगुणें;
अत्याग्रहें पहातां, दिसलें वय एक मात्र त्यांत उणें. ९१
एके समयीं ससुहृज्जन[10] ते[11] सद्देवतरु[12] निके[13] लीला
दाविति विषयिजनांच्यीं[14], त्या श्रीयमुनेंत करुनि केलीला[15]. ९२
तेथें द्विजरूप अनळ[16] एकांतीं त्यां प्रभूंसि भेटोनीं,
मागे खांडववन तो व्हाया नीरोग[17] त्यांत पेटोनीं. ९३
श्वेतकिनृप[18] घृतधारा द्वादश वर्षें मुखीं सतत ओती,
बहु धां[19] म्हणों न देती झाली निजसेवनीं हळु हि 'ओ'[20] ती.
श्वेतकिची ब्रह्मांडीं अप्रतिमा[21] कीर्ति हे, तुपा प्याला

---

१. स्तुति. २. 'अभिमन्यु' हें नांव स्वभावद्योतक आहे. (अभि=निर्भय+न्युमान्=क्रोधवान्). ३. श्रीकृष्णाचा. ४. [स्वतःचा] जीव हि. ५. द्रौपदी. ६. प्रेष्ठ=प्रिय. ७. याप्रमाणें. ८. कृष्णार्जुन यांना. ९. त्यांच्या (कृष्णार्जुनांच्या) गुणांला. १०. मित्रजनांसह. ११. कृष्णार्जुन—**पंत.** १२. साधूंना कल्पवृक्षाप्रमाणें सारखे. १३. खरे. १४. विषयासक्त [अशा सामान्य] जनांच्या. १५. क्रीडेला. १६. अग्नि. १७. रोगरहित. १८. यानें असंख्य यज्ञ केले, त्यामुळें अग्नीचे ठिकाणीं यज्ञांतील तुपानें फार जाड्य आलें. १९. तृप्त हो. २०. घृतधारा—**पंत.** २१. निरुपमा.

झाला रुग्ण[1] अनळ; असि न दुजी पूतत्वहेतु[2] पाप्याला. ९५
चक्र[3] दिलें गुरु[4] कृष्णा, कुरुकृष्णा[5] अक्षयेषुधर[6] भाते,
गांडीवधनु, कपिध्वजरथ[7], हय जे हरिति शीतकरभा[8] ते. ९६
दिव्यरथीं बैसुनि ते कृष्ण म्हणाति, ‘भय तुला न वाटावें,
आरोग्यार्थ ज्वलना ! खांडववन-भेषजासि[9] चाटावें.’ ९७
रक्षिति दहना गहनांसह[10] नानाजातिसत्वरस[11] खात्या;
होतां सहाय ईश्वर, भेटे धांवोनि सत्वर सखा[12] त्या. ९८
माधवपांडव[13] खांडवगहना दहनासि देति भक्षाया.
यत्न करी परि सामर[14] शक्र न झाला समर्थ रक्षाया. ९९
आला सर्वांचा हि प्राणघ्न[15] महोग्र[16] एकदा समय,
खग[17] च्यार, पांचवा अहि[18], वांचे तैसा चि एक दास मय[19]. १००
मातेनें[20] वांचविला तक्षकसुत अश्वसेन, जनकानें[21]
शार्ङ्गकपक्षी, पार्थें मय, हें परिसो हितार्थि जन कानें. १०१
शरणागतासि हे चि व्यसनीं देणार शर्म परम [22]तिघे.

---

१. रोगी. २. पवित्रतेस कारण. ३. वज्रनाभ नांवाचें चक्र. ४. सर्वोत्तमा. ५. कुरुवंशजा अर्जुना. ६. अक्षय बाण धरणारे. ७. कपि (वानर—मारुति) आहे ध्वजावर ज्याच्या असा रथ. ८. चंद्राची कांति. ९. औषधास. १०. अरण्यासह. ११. अनेकविध प्राणी आणि रस. १२. वायु—**पंत.** १३. कृष्णार्जुन. १४. देवांसह. १५. प्राणनाशक. १६. मोठा भयंकर. १७. पक्षी. १८. सर्प. १९. मयासुर. २०. आईनें. [तक्षकसर्पाची स्त्री स्वपुत्राचें मुख व पुच्छ आपल्या मुखांत धरून वनाबाहेर निघून जात असतां अर्जुनानें तिला ठार मारलें, तेव्हां इन्द्रानें तिच्या मुलास (अश्वसेनास) रक्षिलें. तात्पर्य, आईनें स्वतःचा प्राण दिला, पण मुलास रक्षिलें]. २१. बापानें—**पंत.** (मंदपालनामक मुनीनें, पुत्रवान् लोकांना प्राप्त होणारी गति आपणास मिळावी म्हणून पक्षियोनींत जन्म घेऊन, जरितानामक पक्षिणीचे ठायीं संतति उत्पन्न केली; ते हे चार शार्ङ्गकपक्षी. मंदपालानें अग्नीची प्रार्थना करून ह्यांस वांचविलें). २२. कृष्ण, अर्जुन, आणि अग्नि.

या तत्वातें येथें मूर्ख न घे, स्वहित[1]धर्मपरमति घे. १०२
श्रीरामनाम[2]गुरुपद सुनिपुणवादक, मयूर[3]मुख वाद्य,
श्रीरामदया गाती[4], गीतें[5] जय[6]ग्रंथ, पर्व हें आद्य[7]. १०३

ऐकां[8] सज्जन हो! भवद्वचें[9] खरें, आश्चर्य म्यां पाहिलें,
वाल्मीकिप्रभृतिस्वबंदिनिकरीं[10] दीना मला बाहिलें[11].
केलें प्राकृत[12] काव्य, ईश्वरपदीं धत्तूरसें[13] वाहिलें,
सांगों काय वरप्रसाद? अजि! तें व्यासें[14] हि कीं साहिलें. १०४

इति श्रीमहाभारते[15] श्रीरामनंदनमयूरेश्वरविरचित आदिपर्व संपूर्णम् ॥

॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

---

१. स्वहितधर्मपरायण बुद्धि ज्याची तो. २. श्रीरामनामरूपी गुरूचे चरण हाच कुशल वादक (वाद्य वाजविणारा). ३. [माझें] मयूरकवीचें मुख हेंच वाद्य. ४. गाणारी. ५. गाणें. ६. भारतग्रंथ. ७. पहिलें. ८. कविजनांचा असा सांप्रदाय आहे कीं, सर्गसमाप्तीचे वेळीं शेवटील एकदोन पद्यें भिन्नवृत्तांत रचावयाचीं. मोरोपंतानीं हि तशाच कांहीं हेतूनें या आदिपर्वाची समाप्ति शार्दूलविक्रीडित वृत्तानें केली असावी. ९. तुमचें वचन. १०. वाल्मीकिप्रमुख जे आपले स्तुतिपाठक त्यांच्या समूहांत. ११. बोलाविलें. १२. मराठी. १३. धोत्र्याच्या फलासारखें. १४. व्यासानीं सुद्धां माझी कृति सहन केली (मान्य केली). १५. पंतानीं आपल्या आर्याभिरचित भारताचा '**आर्याभारत**' असा विशिष्ट नामनिर्देश अन्यत्र केलेला असल्यामुळें आम्हीं या एकाच नांवाचा सर्वत्र उपयोग केला आहे.

सभापर्व.

अध्याय पहिला.

पांचाळीपतिस[1] म्हणे मय[2], 'कांहीं सांग आपुली सेवा.'
पार्थ म्हणे, 'सख्य असो, अथवा हें माग यादवा देवा.' १
श्रीपति त्यासि म्हणे, 'तूं शिल्पचमत्कारकोटिजनक[3] मया!
निर्मुनि दे रुचिर[4] सभास्थाना निर्दोषरत्नकनकमया.[5]' २
आज्ञा करुनि असि, प्रभु भेटवुनीं सबहुमान धर्मातें
स्वपुरीस[6] जाय; मग करि भगवदुदित[7] दैत्य विश्वकर्मा[8] तें. ३
देवानीं हि करावा ज्याच्या[9] स्वेष्टार्थ[10] नवस भात्यातें,
अनृणत्वार्थ[11] मयासुर निर्मुनि दे दिव्य नव सभा त्यातें. ४
स्थळ तें जळ, जळ तें स्थळ भासे, जीमाजि रत्न-सारस-भा[12]
भुलवि भ्रमरां अमरांस हि, ती चित्रा[13] चि रत्नसार[14] सभा. ५
भीमाला आणुनि दे वृषपर्व्याच्या[15] गदोत्तमगदेतें,

---

१. द्रौपदीपति अर्जुनास. २. खांडववनदाहप्रसंगीं अर्जुनानें आपलें रक्षण केल्याचे उपकार स्मरून तें ऋण फेडण्याकरितां मयासुर अर्जुनास 'कांहीं सेवा सांग' असें म्हणत आहे. ३. कलाकौशल्याचे कोट्यवधि अद्भुत प्रकार निर्माण करणारा. ४. सुंदर. ५. शुद्ध रत्नें आणि सुवर्ण यानीं युक्त अशा. ६. आपल्या नगरीस. (द्वारकेस). ७. श्रीकृष्णानें सांगितलेलें. ८. विश्व (सर्व जगत्) कर्म (कृतीनें साध्य) ज्यास तो विश्वकर्मा दैत्य=मयासुर. मयासुरास देवशिल्याचें 'विश्वकर्मा' हें नांव विशेषण करून लाविलें आहे. ९. ज्या अर्जुनाच्या. १०. आपल्या इष्ट हेतूकरितां. ११. ऋणमुक्तीकरितां. १२. रत्नकमलांची कांति. १३. चित्रविचित्र. १४. उत्कृष्टरत्नें जीमध्यें आहेत अशी. १५. असुराधिपतीच्या.

म्हणति रिपु जिचें दर्शन आधीं भय, मृत्युचें हि मग देतें. ६
दे देवदत्त[1]शंख स्वत्रात्या अर्जुनास दास मय,
घे मागोनि असें कीं, 'मज भेटीला असो सदा समय[2].' ७
त्या मयसभेंत शोभे धर्म सुधर्मासभेंत[3] वासवसा;
बुध अन्योन्य म्हणति, 'कां जातां? या; हा चि नाकवास[4]; वसा.'
अर्थिजनासह[5] धाडुनि गुण[6] दे साधूंसि धर्म सहवास,
कमळाकर[7] मधुपांतें जेंवि प्रेषूनि[8] वायुसह वास. ९
नव नव नवल कराया न धरी लेश हि ईची[9] च आळस भा[10];
राजर्षि महर्षि सकळ येथें, शून्या चि भूमिपाळसभा. १०
नित्य नवे चि महोत्सवकोटींचे त्या सभेंत भर भरती[11].
विस्तर कशास? परि हरिदासगृहींची उदंड भरभर[12] ती. ११
तेथें ज्ञानविशारद[13], शारदशशिगौर[14], गौरवार्ह[15], कवी,
दुस्तरभवाब्धिपारद[16] नारद येउनि सुनीतिला शिकवी. १२
तच्चरण प्रक्षाळुनि, जें चिंतिति पर[17] महर्षि, तें पाणी
सेवूनि, जोडिले कुरुकुलतिलकें परमहर्षितें पाणी[18]. १३
तो मुनि धर्मासि म्हणे, 'वात्सल्य करी पिता परम तोकीं[19],
तैसें भवान्[20] स्वराष्ट्रीं करुनि, निवारूनि ताप, रमतो कीं[21]? १४
जे राजधर्म सुरतरुसख[22] मखसे[23] सुखद उद्धवद नाकीं

---

१. हा महाशंख वरुणाचा होता. २. वेळ. (परवानगी). ३. देवसभेंत. ४. स्वर्गवास. ५. याचकावरोवर. ६. स्वसद्गुणवार्ता. ७. कमलांची खाण. (सरोवर). ८. पाठवून. ९. या सभेची. १०. कांति. ११. उत्कर्ष पावती. १२. भरभराट. १३. ज्ञाननिपुण. १४ शरदृतूंतील चंद्राप्रमाणें गौरकांतीचा. १५. सत्कारास योग्य. १६. तरून जाण्यास कठीण अशा संसारसमुद्राच्या पैलतीरास नेणारा. १७. श्रेष्ठ. १८. हात. १९. अपत्याचे ठायीं. (लहान मुलावर.) २०. तूं. ('भवान्' शब्दाचा प्रयोग असला म्हणजे क्रियापद तृतीयपुरुषीं असतें.) २१. हें प्रश्नार्थक अव्यय. याचा पर्याय 'ना' हा रूढ आहे. २२. कल्पवृक्षाचे मित्र. २३. यज्ञसे.

त्यांसि जपोनि, गुरूंच्या[1] देसी यश परमशुद्ध वदना कीं ? १५
वर्तत आले जैसें पूरुकुळज साधु भीष्मपर्यंत,
वर्तसि तसें चि कीं तूं ? करिसी कीं सद्यशोर्थ अर्यंत[2] ? १६
नाम खरें केलें कीं ? सुखद जसा मेघ कोटिकेकींतें[3],
सुयशा[4] तसा कवींतें, सद्यश कवणा नको ? टिके कीं तें ?' १७
धर्म म्हणे, 'गुरुराया ! बहु काय वदों तुम्हांपुढें देवा !
तुमचा प्रसाद इच्छुनि करितों संत्रास[5] दास मीं सेवा. १८
युष्मत्पद[6], राज्यपद[7] प्रभुजी ! करितों जपोनि परिचरण[8];
मीं तों अशक्त मंद चि, तुमचे श्रितकल्पवृक्ष परि चरण.' १९
यापरि वदोनि हितमितवर्णा[9] कर्णामृता[10] खऱ्या वचना
मुनिस म्हणे धर्म, 'तुम्हीं विश्वाची सर्व जाणतां रचना. २०
मयकृत सभा जसी हे, ऐसी कीं ईपरीस जरि बरवी
कोठें असेल, सांगा; सत्य जगच्चक्षु[11] तूं असा न रवी.' २१
हांसोनि म्हणे नारद "भूवरि तों हे चि दिव्यरुचि[12], राज्या !
ऐक, सभा तुज कथितों देवांच्या ईपरीस रुचिरा ज्या. २२
शक्रसभा सार्धशतकयोजनदीर्घा[13], तसी च विस्तीर्णा
शतयोजनें, तदाश्रित जनता[14] ती सर्वदुःखनिस्तीर्णा[15]. २३
वाल्मीकिमुनि पराशर दुर्वासा याज्ञवल्क्य मूर्तमख[16],
तेथें शुक्र बृहस्पति जलद हरिश्चंद्र, सर्व[17] वायुसख[18]. २४

---

१. वडील माणसांच्या. २. शत्रूंचा नाश. ३. कोट्यावधि मयूरांना. ४. सुकीर्तिमान् [असा तूं]. ५. सभय. (काळजीपूर्वक). ६. आपले चरण. ७. राज्य. ८. सेवा. ९. हितकारक आणि परिमित अक्षरें ज्यांच्या ठायीं अशा. १०. कर्णमधुर अशा. ११. ' जगच्चक्षु ' असें सूर्यास ह्मणतात. परंतु तूं च जगच्चक्षु सत्य, सूर्य नव्हे. १२. देदीप्यमान कांति जिची अशी. १३. दीडशें योजनें (सहाशें कोस) लांबीची. १४. जनसमूह. १५. सर्व दुःखांतून पार पडलेली. १६. मूर्तिमंत यज्ञ. १७. अग्नि एकंदर सत्तावीस असल्यामुळें 'सर्व' म्हटलें आहे. १८. वायुमित्र. (अग्नि).

तीमाजि अप्सराजन नाचे, गंधर्ववृंद आलापी,
या सु-रसा सुरसा[1] जन[2] सुकृती[3] आतृप्ति[4] तेथ आला पी. २५
कोट्यब्द[5] तपश्चर्या करितां तनु रात्रिदिवस भागावी,
क्षणमात्र ती पहावी असि सुखदा फार, किति सभा गावी?
धर्मा ! यमधर्मसभा शतयोजनविस्तृता असी मोटी,
राजर्षिब्रह्मर्षिप्रवरांच्या[6] जींत नांदती कोटी. २७
जींत ययाति-नहुष-नळ-शिबि-जनक-भरत-मंदालसातनय[7],
मुचुकुंद-दाशरथि-नृग-निमि-शंतनु-पांडु-कुशिक-वैन्य-गय. २८
वरुणसभा हि असी च प्रह्लादप्रमुख दितिदनुज[8] राजे
तेथें वासुक्यादिक वसति अहि ख्यात कुरुकुळवरा ! जे. २९
गंगा यमुना विदिशा इत्यादि नद्या उपासिती वरुणा,
त्यांवरि वरुणसभेची वत्सांवरि सुरभिची[9] जसी करुणा. ३०
धर्मा ! जी धनदसभा[10], ती ही शतयोजनायता रम्या,
शम्यानंदकरी[11] शिवपदपूता[12] तज्जनेतरागम्या[13]. ३१
शिवसखसभेंत[14] निरुपम सुख; सुर मुनि सिद्ध मूर्तनग[15] वसती:
तेथें चि ते पहावे जे जे अन्यत्र संत न गवसती[16]. ३२
सुखगीतनृत्य तेथें, मजला ही तो चि एक थारा हो:
स्मरला स्मरहर[17], भरला[18] कंठ, न वदवे चि ते कथा, राहो. ३३
जो हा भगवान् तेजोमंडलरूपी जगास भासविता[19]

---

१. देवासारखा. २. [तेथें आलेला] मनुष्य. ३. पुण्यवान्, भाग्यशाली. ४. तृप्ति होईपर्यंत. ५. कोटि वर्षें. ६. प्रवर=श्रेष्ठ. ७. अलर्क—**पंत**. ८. दैत्य आणि दानव. ९. कामधेनूची. १०. कुबेराची सभा. ११. जितेंद्रिय साधूंना आनंद देणारी. १२. शंकराच्या चरणानें पवित्र झालेली. १३. त्या कुबेराच्या लोकांवांचून इतरांना अगम्य (अप्रवेश्य). १४. शिवमित्र कुबेराच्या सभेंत. १५. मूर्तिमंत पर्वत. (हिमवान्, पारियात्र, विंध्य, कैलास इ० पर्वत). १६. सांपडती. १७. मदनशत्रु, शंकर. १८. गळा दाटून आला. १९. प्रकाशित करणारा.

कथिता झाला पूर्वीं मद्गुरुंची[1] मज अगा ! सभा सविता[2]. ३४
[3]तद्दर्शनकामुक मीं पुसता झालों उपाय तपनातें[4];
वदला रवि कीं, 'तप कर, जपनातें[5] किति ? समर्थ तप-नातें.'
केलें तप[6] तपनोदित[7] दशशतवर्षें हिमाचळीं, मग मीं
झालों कृतकृत्य, तपीं बहु शक्ति, न पारिजातकीं[8] अगमीं. ३६
ब्रह्मसभा चि गुरु[9] सभा, तन्यूना वर्णिल्या सुरसभा ज्या;
देव्युत्थ[10] शाकभाज्या किंवा हे[11] शाक, या सुरस भाज्या ? ३७
प्रभुमूर्ति सभा झाली पुरवाया काम [12]दासभावाचे,
याहुनि न वर्णवे बहु माझ्या ती कामदा सभा वाचे. ३८
जें जें असे त्रिलोकीं जंगम[13] कीं स्थाणु[14] सर्व तें व्यक्त[15]
म्यां पाहिलें नृपा ! हरिमूर्तींत जसें चि पाहतो भक्त. ३९
कथिल्या, विलोकिल्या ज्या, त्या चि सभा तूज पांच वीरा ! या;
येथें तुझी हि अधिका, जसि त्या चौघींत पांचवी राया !" ४०
धर्म म्हणे, 'गुरुराया ! पुरवीं माझी दुजी हि ही आळ[16],
त्वां यमधर्मसभेंत चि कथिले कीं प्रायशः[17] क्ष्मापाळ[18]. ४१
वरुणसभेंत दितिदनुज सरिदब्धिव्याळ[19] वर्णिले लक्ष;
धनपतिसभेंत गुह्यक[20] राक्षस गंधर्व अप्सरा त्र्यक्ष[21]. ४२

---

१. माझ्या पित्याची. (ब्रह्मदेवाची). २. सूर्य. ३. ब्रह्मसभा पाहण्यास उत्सुक असा. ४. सूर्यातें. ५. ब्रह्मनामाचा जप करणें हें नातें किती ? तपनातें च समर्थ; यासाठीं तप कर. ६. ब्रह्मव्रत. ७. उदित=सांगितलेलें. ८. पारिजातक-नामक कल्पवृक्षाचे ठायीं. ९. मोठी. १०. शाकंभरी—**पंत.** देवीपासून उत्पन्न झालेल्या आदिमायेनें, देवांच्या विनंतीवरून त्यांच्या शत्रूंचें निर्दालन करण्याकरितां वेळोवेळीं घेतलेल्या अवतारांपैकीं ' शाकंभरी ' हा एक होय. ह्या अवतारीं देवीनें जीवांच्या पोषणासाठीं शाकभाज्या (फळभाज्या) निर्माण केल्या अशी कथा आहे. (सप्तशती). ११. हे मनुष्यकृत. १२. दासाच्या मनांतील हेतु. १३. जाग्यावरून हलणारें. १४. स्थावर, न हलणारें. १५. स्पष्ट. १६. आवड. १७. बहुधा. १८. राजे. १९. नद्या, समुद्र आणि सर्प. २०. देवयोनिविशेष. २१. त्र्यंबक. (शंकर).

ब्रह्मसभेंत महर्षि श्रुतिशास्त्रें मूर्तदेवतें सर्व
शक्रादि लोकपाळक कथिले, मुनि वालखिल्य[1] हरि[2] शर्व[3]. ४३
इंद्रसभेंत सकळ सुर गंधर्व वराप्सरा पर-महर्षी
त्यांत हरिश्चंद्र नृपति एक चि सुरनाथसा[4] परम-हर्षी. ४४
पुण्य हरिश्चंद्राचें काय, प्रिय ज्यास्तव त्रिदशपतिला[5]?
हें सांगोनि, स्वामी ! या शिष्याच्या प्रमोद द्या मतिला.' ४५
देवर्षि म्हणे, "नृप तो सम्राट्[6] प्रभु राजसूयमखकर्ता,
इतर करद[7], परदमिता[8], एक हरिश्चंद्र सर्वभूभर्ता. ४६
सत्कार हरिश्चंद्रीं पाहुनि तव तात पांडु वदला हें
कीं, 'सांग सुतासि मुने ! जेणें तैसें चि मीं हि पद लाहें[9].' ४७
सुरपतिसभेंत भोगू सौख्य तव पिता महासवें[10] साधो[11]
हें,[12] नांदसील तूं ही सपितृप्रपितामहासवें[13], साधो ! ४८
हा राजसूयमहिमा, परि याची सिद्धि दुर्घट स्पष्ट;
बहुविघ्न[14] क्षत्रक्षय[15], कर्ता बहु मग हि पावतो कष्ट." ४९
सांगोनि असें गेला मुनि, कृष्ण पहावयासि तेथूनीं;
कीं सुज्ञ हि न असे[16] जे, घेती भरवुनि निजास्य[17] ते थूंनीं[18]. ५०
धर्म म्हणे, 'कष्ट घडो, हो जें होणें असेल, परि तात
व्हावा पूर्णमनोरथ, सत्पुत्र गुरूक्त[19] सर्व करितात. ५१
पुसतां ऋत्विग्[20], बंधु, व्यास, सचिव, आप्त म्हणति, 'देवा[21]! हूं.

---

१. आदि० अ० ४।११९ ते १३३ पहा. २. विष्णु ३. शंकर. ४. इन्द्रासारखा. ५. देवाधिपति इन्द्राला. ६. सार्वभौम. (सम्यक्=चांगल्या रीतीनें+राजते=शोभतो तो, सम्राट्). ७. कर देणारे. ८. शत्रूंचें दमन करणारा. ९. मिळवीन. १०. महायज्ञानें. ११. संपादन करो. १२. हरिश्चंद्रासारखें पद. (इन्द्राला प्रिय असणें). १३. बाप, आजा व पणजा यांसहवर्तमान. १४. ज्यांत बहुत विघ्नें आहेत असा. १५. ज्यांत क्षत्रियांचा नाश होतो असा. (राजसूय). १६. नारदसमान भक्त—पंत. १७. आपलें तोंड. १८. थुंकीनें. १९. गुरूनें (बापानें) सांगितलेलें. २०. कुलगुरु. २१. हे धर्मराजा !

ईश गुरूक्तकरास व्यसननदीं[1] सर्वथा न दे वाहूं.' ५२
धर्म म्हणे, 'सिद्धि भजे यन्मंत्रा,[2] जेंवि वासवा रंभा,
त्या स्वसख्या[3] प्रथम पुसों मंत्र, मग करूं शिवा[4] संवारंभा.[5]' ५३
करुनि विचार असा, पटु दूत द्रुत[6] धाडिला मुरारिकडे,
ज्याच्या चरणस्मरणें अत्यघटित[7] सर्वकार्यसिद्धि घडे. ५४
तो इंद्रसेननामा दूत नव्हे, शुद्ध भाव रायाचा,[8]
कीं तद्भक्तिवधूचा[9] हार श्रीवल्लभा[10] वरायाच्या.[11] ५५
मधुपास जसा पद्माप्रति आणी, बळ करूं न दे वास,[12]
घेउनि आला धर्माप्रति अत्युत्सुक करून देवास. ५६
त्या संकल्पबिभीषणरामातें[13] सन्मनोभिरामातें[14]
धर्म कथी पितृवाचिकजनितोत्कटराजसूयकामातें.[15] ५७
कृष्ण म्हणे, 'कुरुराया![16] धन्य ह्मणतसे सदेव शक्र तुला,
तूं न करिसील बापा! स्वगुणांहीं कोणत्या वश क्रतुला?[17] ५८
परि एक जरासंध प्रबळ क्षितिपाळ काळ आजि तसा,
तो[18] चि पळालों त्रासें, ज्या आह्मां बहु तुम्हीं संभाजितसा.[19] ५९
करिति जतन वतन, पतन[20] मत न भल्यांला, तथापि तें वरिती;
त्यजिली स्वराजधानी मथुरा अमरावती[21] च भूवरि ती. ६०
हर आर्जवूनि तेणें राजे षडशीति[22] कोंडिले असती,

१. संकटरूप नदीमध्यें. २. ज्याच्या मसलतीस. ३. आपल्या मित्रास. (कृष्णास). ४. मंगलप्रद. ५. यज्ञारंभा. ६. लवकर. ७. घडण्यास अतिशय कठीण. ८. धर्मराजाचा. ९. धर्माच्या कृष्णभक्तिरूप वधूचा. १०. लक्ष्मीपति श्रीकृष्णास. ११. वरण्याच्या हेतूनें पाठविलेला. १२. सुगंध. १३. संकल्परूप बिभीषणाच्या रामास. १४. सज्जनांच्या मनास संतोष देणाऱ्यातें. १५. पांडु-निदेश–**पंत.** (पांडुनिदेशानें उत्पन्न झालेल्या प्रबळ अशा राजसूययज्ञाच्या इच्छेतें). १६. धर्मराजा! १७. यज्ञाला. १८. तो च (मी कृष्ण). १९. पूजित अहां. २०. अन्वय–पतन भल्यांला मत (मान्य) न; तथापि तें (पतन) वरिती; [परि] वतन जतन करिती. २१. इन्द्राची नगरी. २२. शायशी.

हरणार असु[1] हरुनि वसु[2] तदसिलता[3], न गणिका तसी अ-सती.
मूर्धाभिषिक्त राजे पशुसे षडशीति बद्ध आहेत.
पशुपतिपुढें वधावे शत, ऐसा त्या कुबुद्धिचा हेत. ६२
त्यां राज्यांला मुक्त न करितां, त्या न वधितां जरासंधा,
साम्राज्य राजसूयें कैंचें? इतरां सुदुस्तरा संधा[4].' ६३
धर्म म्हणे, 'अघटित तूं म्हणसि, तरि घडेल काय अन्यास?
तरि राजसूय राहो, आज्ञा दे घ्यावयासि सन्यास.' ६४
भीम म्हणे, 'देवा! कां माझ्या अवमानितोसि बाहूंतें?
वर्णिसि अनमानेसें, चाल जरासंधतेज पाहूं तें. ६५
अथवा, हें किति त्याला, जो तूं निजबाहुचा अनादरिता,
यच्छ्रितधनुचा[5] न हरुनि रिपुयश फिरला कधीं न नाद रिता.'
कृष्ण म्हणे, 'गा! भीमा! मतिबळ[6] बळ हें चि मान्य सु-कवींतें;
भुजबळ तें एखादे समयीं तत्काळ ओंठ सुकवीतें.' ६७
जिष्णु म्हणे, 'परि एक चि हें आम्हां त्वत्पदानुगां[7]! ठावें,
सर्वत्र तूं यशस्वी, त्वद्दासें यश सुखें चि गांठावें. ६८
दुर्घट अरिपरिभव-सव[8] अजित[9] यशस्वींद्र[10] तूं परि सहाय,
म्हणवील काय लोहाकरवीं[11] हि कधीं तरी परिस 'हाय'? ६९
देशिल यश मद्धनुतें अभिमानी तूं वृकोदरगदेतें;
अयशें सिंहासनग[12] न वपु हर्ष यशें वृकोदरग दे तें.' ७०
धर्म पुसे, प्रभु सांगे, मगधवरोत्पत्ति[13] ती असी परिसाः-
"होता बृहद्रथनृपति सद्गुणसंपन्न, विक्रमी हरिसा. ७१

---

१. प्राण. २. द्रव्य. ३. त्या जरासंधाची तलवार. ४. प्रतिज्ञा. ५. ज्या (तुझ्या) आश्रितांच्या (अर्जुनादि भक्तांच्या) धनुष्याचा टणत्कार. ६. बुद्धीचें बळ. ७. तुझ्या चरणसेवकांना. ८. यज्ञ. ९. कधीं न जिंकलेला असा. १०. यशस्वी लोकांत श्रेष्ठ. ११. लोखंडाकडून. १२. अन्वयार्थ—सिंहासनग वपु (सिंहासनस्थ शरीर) अयशें हर्ष न दे; पण तें वृकोदरग (लांडग्याच्या उदरांत गेलेलें) वपु यशें हर्ष दे. १३. जरासंधाची जन्मकथा.

[1]अनपत्यत्वसुदुःखित तो वरदा चंडकौशिका ऋषितें
सुखवी करूनि सेवा, चित्तें [2]सुतदर्शनामृतीं [3]तृषितें. ७२
'माग वर' असें म्हणतां, [4]सुतवर मागे नृपाळ तो नमुनीं;
आम्रतरुतळीं होता ध्यानस्थ क्षण तपोनिधान मुनी. ७३
तों [5]अंकीं आम्राचें एक सरस फळ गळोनि उतरे, तें
देउनि म्हणे मुनि, 'असो येणें, जरि तुज न होय सुत रेतें. ७४
पावेल पुत्ररूपें हें फळ [6]परिणामें, दे [7]स्वजायेतें.
जा, निश्चयें नराकृति होउनि, सुख यश गृहीं तुज्या येतें.' ७५
बुडतां जें चिंतेच्या झालें अद्भुत [8]अलाबु ओघीं तें.
देता झाला राजा स्वकरें समभाग करुनि [9]दोघींतें. ७६
[10]अंतर्वत्नी पत्नी झाल्या व्याल्या [11]सुपुत्रफळशकलें.
त्यजिलीं हि दूर, परि मुनिवच भंगाया न दैवबळ शकलें. ७७
रात्रौ शकलें त्यजिलीं अश्रुसह [12]चतुष्पथांत दायानीं;
तों राक्षसी जरा ये, काय करावें नृपा! तदा यानीं? ७८
न्यावीं, खावीं, व्हावीं [13]सुवहें शकलें म्हणोनि ती जोडी.
तों तीं जडलीं, धर्मा! मुनिवचनीं शक्ति काय हे थोडी? ७९
आला न सत्प्रसादीं कोणाला ही कधीं हि तोटा हो!
झाला कुमार अद्भुतरूप, [14]करी तत्क्षणीं च तो [14]टाहो. ८०
[15]बर्हिवनीं [16]घनरवसा गेला अंतःपुरांत तो टाहो.
होय सुकाळ सुखाचा, पडला होता [17]मुहूर्त तोटा हो! ८१
मागोनि घे सुतातें नृप पसरुनि राक्षसीपुढें पदर,

१. मूल नसल्यानें फार दुःखी झालेला. २. पुत्रदर्शनरूप अमृताविषयीं. ३. तान्हेलेल्या अशा (चित्तें). ४. पुत्र होवो असा वर. ५. मांडीवर. ६. रूपान्तर. ७. आपल्या भार्येतें. ८. भोपळा. ९. दोन्ही स्त्रियांतें. १०. गर्भिणी. ११. उत्तम पुत्ररूप फळाचे दोन अर्ध. १२. चवाठ्यावर. १३. नेण्यास सोपीं अशीं. १४. आक्रोश करी, रडे. १५. मोर राहतात त्या अरण्यांत. १६. मेघांच्या शब्दासारखा. १७. थोडा वेळ.

विप्रप्रसाद निर्भय; नाहीं तरि गज हि तन्मुखीं[1] बेंदर[2]. ८२
नाम 'जरासंध'[3] असें याकरितां, उपजला असा राया!
कथिल्या तद्वीर्यकथा[4] म्यां साच, नव्हेत गा! असारा या. ८३
बहु काय वदों? कन्यापति[5]कंसविनाश ऐकतां मागें
फेरे एकोनशत[6] स्वभुजबळें निजगदेसि दे रागें. ८४
एकोन योजनें शत टाकी मधुरापुरीं[7]त, अशनीची[8]
शक्ति किति? दृष्टि हि तसी बहुधा उग्रा असेल न शनीची. ८५
परि भीमार्जुन मज दे, जातों, येतों करूनि कार्यातें;
परमोदार वृकोदरभुज यश देतील शीघ्र आर्यातें." ८६
कुंत्याशी, धर्माज्ञा घेउनि वेषें च विप्रता[9] राया!
सत्वर तिघे निघाले मगधपतिस ते कवि प्रतारा[10]या. ८७
गोष्ठीं[11] हरिसे, नगरीं शिरले माराया मगधराज्या,
प्रथम, 'असो पत्यंतर[12],' 'हननाश नसो,' म्हणे मग धरा[13] ज्या.
चढले गिरिव्रजाच्या[14] प्राकाराधारगिरिशिरीं[15] हरिसे.
ज्यांसि[16] सकृत्[17] ताडुनियां ध्वनिला जन एकमासवरि परिसे. ८९
वृषरूप[18] दैत्य मारुनि, तच्चर्में साधु[19] मढविले होते,
अद्भुत तीन असे जे दुंदुभि[20], ताडूनि फोडिले हो! ते. ९०

---

१. त्या जरेच्या मुखांत. २. बोर. ३. जराराक्षसीनें दोन शकलें सांधून तयार केला म्हणून 'जरासंध' असें नांव पडलें. ४. मागें ५८ ते ६२ गीति पहा. ५. कंस हा जरासंधाचा जांवई होता. ६. नव्याण्णव. ७. मथुरानगरींत. ८. वज्राची. ९. ब्राह्मणत्व. १०. फसवाया. ११. गोठ्यांत. १२. दुसरा पति (राजा). १३. धरा (पृथ्वी) त्या कृष्णार्जुनास प्रथम म्हणाली कीं, जरासंध मरून मला दुसरा पति प्राप्त होवो; नंतर पुन्हां म्हणाली कीं, पण तो दुसरा पति मात्र हननाश (वातेच्छु, दुष्ट) नसो. १४. स्थलविशेष. १५. तटासारख्या आधारभूत असलेल्या सभोंवतालच्या डोंगरांचे शिखरावर. १६. ज्या नौबतींस. १७. एकवार. १८. बैलाचें रूप ज्यानें घेतलें आहे असा. १९ चांगले. २०. नौबती.

भंगिति भुजप्रहारें शृंगातें ह्मणति जन '[1]मनूरा' ज्या;
शिरले पुरीं [2]अमार्गें माराया [3]आम्रफळजनू राज्या. ९१
राजगृहांत हि शिरले, पाहुनि मगधेंद्र ही म्हणे, 'यावें'
मानुनि वेषें [4]स्नातक [5]भूसुर पूजावया उठे भावें. ९२
कृष्ण म्हणे, 'राया! हे दोघे मौनव्रती [6]अदीन मुनी
वदतिल, सारुनि नियम, [7]प्रहरद्वय रात्रिचें अतिक्रमुनीं.' ९३
स्थापुनि [8]अग्निगृहीं, मग त्या काळीं तो हुताग्नि [9]वर्चाया
काळांसि विप्र मानुनि आला, झाला हि सिद्ध अर्चाया. ९४
'कुशलं [10]स्वस्त्यस्तु' असें वदले ते प्रथम, बसविले भूपें,
पुसिलें कीं, 'वेषें तों विप्र तुह्मीं, अन्य भासतां [11]रूपें. ९५
आलां पुरीं अमार्गें कां केला शृंगदुंदुभिध्वंस?
ब्राह्मण तों मन्नगरीं न क्षोभे, जेंवि मानसीं हंस. ९६
पूजन हि घेत नाहीं कां हो! या भूमिदेव दासाचें?
कोण तुम्हीं? क्षत्रिय कीं ब्राह्मण? राज्यापुढें वदा साचें.' ९७
[12]शौरि म्हणे, 'रिपुसदनीं [13]अद्वारें शिरति बुध, अगा! राया!
द्वारें चि [14]सुहृत्सदनीं, आलों [15]तैसें चि कीं अगारा या. ९८

---

१. गोपुर–**पंत**. २. आडमार्गानें. ३. आंब्यापासून जन्म ज्याचा अशा. ४. ब्रह्मचर्यव्रतसमाप्तीचे वेळीं करावयाचें स्नान ज्यानीं केलें आहे असे. (सोडमुंज झालेले). ५. ब्राह्मण. ६. अतिशय दीन. ७. मध्यरात्रीचा समय. ८. होमशाळेंत ९. उद्धरण (प्रज्वलन) करण्याकरितां. १०. कल्याण असो. दुसरा अर्थः–[हे राजा !] सु (अत्यंत अविनाशीं) अस्ति (असें जें मोक्षपद) [तें तुला] कुशल (निर्विघ्नपणें) अस्तु–असो. श्रीकृष्णपरमात्म्यासमोर मरणाराला मोक्षपदप्राप्ति अवश्य होते, ह्या समजुतीस अनुसरून हें वर्णन आहे. ११. आकारानें. (त्या तिघांच्या दंडावरील धनुष्याच्या दोरीचे वण पाहतांच हे ब्राह्मण नसून क्षत्रिय असावेत असा जरासंधाला संशय आला). १२. कृष्ण. १३. द्वाराशिवाय इतर मार्गानें. १४. मित्रगृहीं. १५. त्या नियमानुसार.

घेऊं नये चि अरिकृतपूजा, व्रत आमुचें असें आहे.'
ऐसें श्रवण करुनि, नृप वैर कसें काय, हें मनीं पाहे. ९९
हांसोनि नृप म्हणे, 'हो! विप्रांचा शत्रु मीं नव्हें व्यक्त[1],
सक्त[2] ब्राह्मणभजनीं[3] आहें, त्यांचा चि सत्य हा भक्त.' १००
कृष्ण म्हणे, "अस्मद्रिपु ते मोडिति सेतुला[4] नरवरा! जे.
कां कोंडिले पशु तसे? बहु रडती करुनि दीनें रव[5] राजे. १०१
यज्ञ करावा मारुनि पशुसे नृप काय हें बरें कर्म?
येणें प्रसन्न शंकर? रे! राज्या! हा अधर्म कीं धर्म? १०२
ऐसें कोण्हीं हि कधीं केलें नाहीं च कर्म हें मागें;
तूं काय? भस्म येणें देवांसह होइजेल हेमागें[6]. १०३
जरि हा स्वधर्म ऐसें त्वन्मत[7], तरि हें बरें चि; राया! हो
आम्हां भवदाज्ञा[8] कीं, 'यज्ञ करा, अज करें चिरा, या हो!' १०४
तूं क्षत्रिय, आम्हीं ही शंभुप्रीत्यर्थ या नव-क्रतुला
कां न करूं तुज मारुनि? सरळ वचन हें गमो न वक्र तुला.
तोडावे बंध सकळ, सोडावे भूप, हात जोडावे,
राजानें रक्षावे कीं दाटुनि धर्मसेतु मोडावे? १०६
मीं शौरि, हा धनंजय, हा हि तिजा नीट ओळख गदीन[9].
या बळिखगप्रभुपुढें[10] सर्व बळी अन्य टोळ खग दीन. १०७
सोडावे नृप, अथवा रथवाह[11]गजादिराज्यसुखभोग;
हो शीघ्र सिद्ध समरास मराया, तुज न अन्य हितयोग." १०८
मागध म्हणे, 'मखार्थ प्रोक्षितें[12] नृपपशु भयें न सोडीन,
कर ईश्वरासि किंवा तद्रूपब्राह्मणासि जोडीन.' १०९

---

१. स्पष्ट, खरोखर. २. आसक्त, तत्पर. ३. ब्राह्मणसेवेंत. ४. धर्मसेतुला. (धर्मनियमाला). ५. केविलवाणा शब्द. ६. देवांसह मेरुपर्वत हि भस्म होईल, मग तुझी कथा काय? ७. तुझें मत. ८. तुझी आज्ञा. ९. गदी=गदा घेऊन युद्ध करणारा+इन=स्वामी, श्रेष्ठ. (भीम). १०. बळवान गरुडापुढें. ११. रथवाह=अश्व. १२. उदकसिंचनानें पवित्र केलेले.

ऐसें वदोनि सनयीं[१] तनयीं[२] राज्याभिषेक तो करवी;
त्यासि म्हणे, 'हर्षद हो सुहृदां, कमळांसि जेंवि तोकरवी[३].'
विस्तर असो, तयासीं भीमासीं बाहुयुद्ध आरंभे;
पूर्वागता[४] म्हणति किति, 'हा उर्वशि! हा घृताचि! हा रंभे!'
आरंभ कार्तिकाचा युद्धाचा तुल्य[५] वर्णिती संत,
भूतातिथिदिवसाचा[६] त्या हि मगधभूमिजानिचा अंत. ११२
होते हर्षविषादाकुळमानस[७] सार्ध घस्र[८] तेरा जे
प्रभुनें केवळ हर्षाकुळ केले, पुसुनि अस्र[९], ते राजे. ११३
जो प्रथम तारकामयसंग्रामीं[१०] जिष्णुविष्णुनीं साजे,
तो रथ बृहद्रथसुतें संपादुनि सर्व जिंकिले राजे. ११४
त्यावरि चढोनि, देउनि अभय जरासंधनंदना अजितें,

---

१. नीतियुक्त, सदाचारसंपन्न अशा. २. [सहदेवनामक] पुत्राचे ठिकाणीं. ३. बालसूर्य. ४. धारातीर्थीं शत्रुसन्मुख मरण पावलेल्या वीरांच्या गळ्यांत स्वर्गामध्यें अप्सरा माळा घालितात या समजुतीस अनुसरून, किती (स्वर्गांतील कित्येक प्रेक्षक) पूर्वागता (प्रथम वर आलेल्या वीरासंबंधीं) म्हणति [हे] उर्वशी! घृताचि! रंभे! हा (पूर्वागत वीर आहे; ह्याच्या गळ्यांत माळा घाला). ५. सारखा. (कार्तिकमासारंभाबरोबरच युद्धारंभ झाला). ६. भूतें (पिशाचराक्षसादि) आहेत अतिथि (पाहुणे) ज्या दिवसांत, त्या दिवसांचा आणि मगधभूमि आहे जाया (पत्नी) ज्याची असा जो जरासंध त्याचा अंत संत तुल्य (समानकालीं झाला) असें वर्णन करितात. (युद्ध सरल्यामुळें रक्तमांस खाणाऱ्या भूतांचे हि चैनीचे दिवस गेले आणि जरासंध हि मरण पावला). ७. भुजयुद्धाचा परिणाम कसा काय होईल याचा नियम नसल्यामुळें हर्षखेद-युक्तमानस असे राजे. ८. दिवस. ९. अश्रु. १०. तारका (बृहस्पतीची भार्या तारा) ही आहे आमय म्ह० रोग (लक्षणेनें प्राणनाशक असा भाव) ज्यांत असा जो संग्राम युद्ध त्यांत. (तारेनिमित्त बृहस्पती व चंद्र यांचेमध्यें पूर्वी जें मोठें घनघोर युद्ध झालें, त्या वेळीं विष्णु आणि इन्द्र बसल्यामुळें जो रथ शोभला तोच रथ जरा-संधानें मिळवून त्यांत बसून सर्व राजे जिंकिले).

to the reference has taken from,

आणुनि धर्मासि दिलें यश, आम्हांला हि घ्यावया आजि! तें.
त्या चि रथावरि बैसुनि मग जाय द्वारकेसि केशिघ्न[1];
तें शंभु म्हणे, 'याच्या मात्र जना भय न देवि! दे[2] विघ्न.' ११६

अध्याय दुसरा.

मग जिष्णु उत्तरेला जिंकाया भीम वासवाशेला[3],
सहदेव दक्षिणेला, वरुणादिशेला[4] हि नकुळ तो गेला. १
कवि म्हणति, 'चतुर्भुजभुज[5] जे धर्मसहायदक्ष[6], अजित रणीं
ते हे[7]; कीं चतुराशासुखद[8] चतुर्मूर्ति[9] होय अजि तरणी[10].' २
हरिति रिपूंचे मदगद[11], पद[12] न, दयासिंधु ते सुजनमहित[13],
झाले केवळ न दरद[14], बदरद[15] हि न गांजिला प्रणत[16] अहित[17]. ३
करुनि चतुर्दिग्विजय द्रविणाचे[18] अमित राशि जोडूनीं,
ते स्वपुराला आले, विजित नृपांचें हि मन न मोडूनीं. ४
तैसें चि आणिलें बहु वित्त युधिष्ठिरपुरास दास-जितें[19]
अजितें, अजि! तें त्यां[20] तत्प्रेम[21] अशा कौतुकीं[22] सदा सजितें[23]. ५

१. केशिनामक राक्षसास मारणारा. (कृष्ण). २. अन्वयार्थ—शंभु म्हणे, देवि! (पार्वति!) याच्या (कृष्णाच्या) मात्र जना (भक्ता) विघ्नभय न दे. ३. इन्द्राच्या दिशेला (पूर्वदिशेला). आठ दिशांचे आठ पालक आहेत, त्यास अष्टदिग्पाल म्हणतात; त्यापैकीं इन्द्र हा पूर्वदिशेचा स्वामी आहे. ४. पश्चिमेला. ५. कृष्णाचे बाहु. ६. धर्माला सहाय्य करण्याविषयीं सिद्ध. ७. पूर्वोक्त गीतींतील अर्जुनादि चवघे. ८. चार दिशांला सुख देणारा (अर्जुन). ९. चार मूर्ति धारण केलेला. १०. सूर्य. ११. गर्वरूप रोग. १२. राज्यपद. १३. सज्जनमान्य. १४. भीतिदायक. १५. बोर देणारा. (अगदीं थोडा करभार देणारा देखील). १६. शरण आलेला. १७. शत्रु. १८. द्रव्याचे. १९. भक्तानीं जिंकलेल्या कृष्णानें. २०. त्या कृष्णाला. २१. त्या दासांचें प्रेम. २२. कौतुकानें. २३. सजवितें.

धर्मपरें धर्मपरा धन दिधल्या काय दोष? कर दे, हें[1]
किति? दासदास्य[2] हि करी श्रीश श्रीचित्ततोषकर देहें. ६
धर्म प्रभु, न पर प्रभु, जेणें केला प्रसिद्ध तो[3] कर-द[4],
मोठ्यांमोठ्यांला ही बुडतां व्यसनाब्धिमाजि जो कर-द. ७
धर्म म्हणे, 'देवा! तुज दीक्षा साजेल, मज न, यज्ञाची;
हो साम्राट् सर्वेशा! दृष्टि निवो सर्व-सव-नयज्ञाची[5].' ८
कृष्ण म्हणे, 'राया! तूं उचित अनुद्धत[6], न उद्धत क्रतुला;
योग्य न दुग्धस्थानीं योजाया प्रिय हि शुद्ध तक्र तुला. ९
देवा! सेवा चि भली दे मज, दुसरी न घेववे दीक्षा;
सुखकीर्तिहेतु[7] आम्हां तव नव-सव-भूमिदेव-वेदीक्षा[8]. १०
करिन ब्राह्मणपादप्रक्षाळन, सावडोन मीं उष्टीं;
सर्व हि करीन, देहीं फळ हें चि, न अन्यथा वृथा-पुष्टीं[9]. ११
कृतकृत्य[10] यांत आम्हीं, हो तूं सम्राट् प्रभो! अगा[11]! धवळा
हो त्वद्यशें त्रिलोकी राया! कुरुसत्तमा! अगा[12] धवळा. १२
जैसी यज्ञेशाज्ञा[13] झाली कुरुसत्तमा अतिप्राज्ञा,
तैसी च तत्कुळोत्तमधौम्यद्वैपायना[14]दिविप्राज्ञा. १३
धर्में सर्वोत्सवोत्सुक नृप आणविले स्वदूत धाडूनीं,
विप्र क्षत्रिय वैश्य हि सच्छूद्र[15] हि भूवरील झाडूनीं. १४
भीष्म, सकळत्रसुत[16] धृतराष्ट्र, कृप, द्रोण, विदुर, पुरवासी
धर्में आणविले मृगें[17], जाणों प्रेषूनि नकुळ-सु-रवासी[18]. १५

---

१. कर देणें. २. भक्तांचें दास्य. ३. तो श्रीकृष्ण. ४. हात देणारा. ५. सर्व यज्ञविधि जाणणाऱ्यांची. ६. नम्र. ७. सुखाला व कीर्तीला कारणीभूत. ८. नवीन यज्ञ, ब्राह्मण आणि यज्ञकुंड यांचें अवलोकन. ९. व्यर्थ पुष्ट झालेल्या देहीं. १०. सफळमनोरथ. ११. अन्वयार्थ—अगा! (राया!) त्वद्यशें त्रिलोकी (त्रैलोक्य) धवळा (शुभ्रा) हो (होवो). १२. ववयोरभेदः—**पंत.** १३. कृष्णाज्ञा. १४. व्यास. १५. चांगले (सदाचारसंपन्न) शूद्रजन हि. १६. बायको व पुत्र यांसह. १७. हरिण. १८. नकुळ हाच सुरव म्ह० गायनांतील मधुर ध्वनि, त्यास.

सवसाहित्य किति वदूं? राबति भुज जेथ साधु[1]-सुर-तरुचे,
ज्या खटपटेपुढें न श्रीशास श्रीस ही न सुरत रुचे. १६
रामादि सर्व यादव, शिशुपाळादिक नृपाळ बहु आले,
अर्पुनि उपायनें[2] बहु धर्मकृतें आदरें बहुत धाले. १७
अध्वर्यु[3] याज्ञवल्क्य, ब्रह्मा[4] श्रीव्यास, पैलमुनि होतां[5],
सुमुनि सुसामानामा सामग[6] यज्ञांत जाहला होता. १८
जेथ सभासद नारद, फार दयाज्ञान ज्यांत वास करी,
जेथें विप्रपदाब्जप्रक्षाळन तीर्थपाद[7] देव करी; १९
जेथें साहित्यासि श्रीभीष्म द्रोण विदुर बहु जपती,
न विसंबति क्षण जसे गुणवदपत्यासि[8] वृद्ध मनुज-पती[9]. २०
यजमान हि गुरुदेवद्विजभक्त अजातशत्रु[10], तज्जाया[11]
मूर्तिमती[12] श्रद्धासी[12], आले गुण ज्या सुधेंत[13] मज्जाया[14]. २१
वाढी स्वमायसी कीं मूर्तिमती सुरभि गायसी ते[15] तें,
जें जो इच्छी, ईतें गाय[16] भुवन, जेंवि गाय सीतेतें. २२
यन्नामें सफळ सकळ सव, सगुणब्रह्म[17] ज्यांत राबे[18] तें.
त्या क्रतुच्या वर्णावें कीर्तिसुधेतें, न अन्य राबेतें[19]. २३
इतुक्या चि राजसूयक्रतुच्या या वर्णनें रसिक हर्षो;
काय डरडरां ढेंकर देउनि चातक म्हणेल, 'बहु वर्षो?' २४

---

१. सत्पुरुषांचा कल्पवृक्ष जो श्रीकृष्ण त्याचे. २. नजराणे, भेटी. ३. अग्नींत आहुति देणारा यजुर्वेदी ऋत्विज्. ४. आद्यंतीं प्रणवोच्चार करणारा वेदत्रयज्ञ ऋत्विज्. ५. यज्ञदेवतांस आव्हान करणारा ऋग्वेदी ऋत्विज्. ६. देवतांच्या रंजनार्थ सामवेदाचें गायन करणारा. (उद्गाता). ७. तीर्थ आहे पदांचे ठायीं ज्याच्या असा देव. (कृष्ण). ८. गुणवान् मुलास. ९. राजे. १०. ज्यास कोणी शत्रु नाहीं तो. (धर्मराज). ११. त्याची भार्या. (द्रौपदी). १२. मूर्तिमंत अस्तिक्य बुद्धि च अशी. १३. ज्या (द्रौपदीरूपी) अमृतांत. १४. स्नानार्थ. १५. ती द्रौपदी. १६. स्तवी. १७. कृष्ण. १८. काम करी. १९. काकवीपेक्षां दाट असा जो रसाचा रांधा ती राब.

तें यजनकर्म झालें पूर्ण सविधि परमशुद्ध रायाचें.
उद्धरिलें भगवंतें भरताचें गोत्र उद्धरायाचें[1]. २५
तेव्हां देवर्षि[2] मनीं आणी कीं, ‘क्षत्र[3] सर्व शुद्ध-रणें[4]
उद्धरणार प्रभु, परि आधीं शिशुपाळ आजि उद्धरणें.’ २६
धर्मासि म्हणे[5], ‘राया! आले यज्ञोत्सवार्थ नगरा जे
यांमध्यें पूजावा त्वां प्रथम श्रेष्ठ, सर्व मग राजे.’ २७
धर्म म्हणे भीष्मातें, ‘सांगा जी! मज तुह्मींच जें विहित,
सांगत आलां पूर्वीं जैसें मद्भावुकार्थ[6] जेंवि हित.’ २८
भीष्म ह्मणे, “वत्सा! जरि पुससी ‘सर्वांत कोण पूज्य’ असें,
तरि वासुदेव आधीं पूजावा त्वां विशुद्ध-भक्ति-रसें. २९
ज्योतिर्गणांत[7] रविसा, तेजस्वी कृष्ण या सदांत[8] पहा;
तेज[9] अहा! क्षिप्र वहा, अर्घ वहा, एक पूज्य वृष्णिप[10] हा.” ३०
पूजी प्रभुला प्रेमें व्हाया[11] दृक्कामपूर्ति[11] सहदेव.
पूजित झाले सस्थिरचर[12] त्या श्रीविश्वमूर्तिसह देव. ३१
नारदभीष्मप्रमुखां साधूंच्या होय दृष्टिलाभा[13] जी
भा[14] जीमूतश्याम[15] प्रभुची ती चैद्यदृष्टिला[16] भाजी[17]. ३२
भगवत्सत्कृति पाहुनि कोपे शिशुपाळ सत्समाज्यांत,
दुष्टीं जसी पिशाची भरती दुर्बुद्धि तत्समा ज्यांत[18]. ३३
धर्मासि करी[19] सज्जनवृंदीं पाण्यापरीस[19] पातळ, तें

---

१ उद्धरण्यास योग्य असें. २. नारद. ३. क्षत्रिय. ४. धर्मयुद्धानें. ५. [भीष्म] म्हणे. ६. माझ्या कल्याणार्थ. ७. नक्षत्रसमूहांत. ८. सभेमध्यें. ९. अन्वयार्थ—अहा! [कृष्णाचें] तेज [अवर्णनीय आहे]; [त्याला] क्षिप्र (लवकर) वहा (बोलावा) (आणि) अर्घ (पूजासाहित्य) वहा. १०. यादवपति. (कृष्ण). ११. दृष्टीची अवलोकनेच्छा पूर्ण होण्याकरितां. १२. स्थावरजंगमासह. १३. नेत्रांला लाभदायक. १४. कांति. १५. मेघश्याम. १६. शिशुपालाच्या दृष्टीला. १७. जाळी, संताप आणी. १८. शिशुपाळांत. १९. पाण्यापेक्षां पातळ करणें=निंदा करणें, अपमान करणें, पाणउतारा करणें.

वद्वेना; सन्निंदावागनुवादें[1] हि पाप आंतळतें[2]. ३४
गांजी पुष्कळ लावुनि मूर्खपण तशा सभेंत शांतनवा[3];
परि साहे, कीं, जन्मापासुनि बहु शांत, तो न शांत नवा. ३५
त्रिजगत्पूज्यपद प्रभु गुरु पुण्यश्लोक[4] सार्वभौम खरा,
त्या निंदी श्रीकृष्णा कीर्तिश्रीशांतिभूति[5]च्या मखरा. ३६
बहु सांत्वन धर्म करी, न शमे, न वळे परंतु तो चैद्य.
मरणारा रोग्याला काय करिल जाणता भला वैद्य? ३७
भीष्म ह्मणे, 'खळसांत्वन कां करितो? याचिया नसे कानें
हें ऐकिलें, निवे घृत कढलें तोयांचिया[6] न सेकानें.' ३८
क्षोभे बहु या वचनें, त्याला उपमान[7] दुष्ट कुतरें च;
विस्तर असो, तयाचा उतरी, शिर हरुनि शौरि[9]सुत, रेंच[8]. ३९
सोसुनि शत अपराध प्रभुनें शिशुपाळ मारिला चक्रें;
केला पात्र सुगतिला, जी प्रार्थावी गति स्वयें शक्रें. ४०
शिरलें तद्देहोत्थित[10] तेज प्रभुच्या मुखीं, पदा नमुनीं,
मानिति मनांत त्या वैरचरितास[11] महावरप्रदान मुनी. ४१
देवर्षिप्रमुख सुजन म्हणती, 'जीवांसि एक हरि हित रे!
अद्भुत महिमा याचा, भक्त तरे, करुनि वैर अरि हि तरे.' ४२
ऐसें सद्यश निर्मुनि, नेउनि सिद्धीस दासयागा त्या,
केली[12] हृष्टा वाणी कविच्या हि तिच्या सदा सया गात्या. ४३

---

१. साधुनिंदेच्या शब्दानुवादानें. २. स्पर्श करितें. ३. भीष्माला. ४. पुण्यदायक कीर्ति ज्याची तो. ५. भूति=ऐश्वर्य. ६. अन्वयार्थ–तोयांचिया (पाण्याच्या) सेकानें (सिंचनानें) कढलें घृत न निवे; [उलट त्यास ज्यास्त च कढ येतात]. ७. उपमा. ८. रेंच उतरी=गर्व हरण करी, खोड मोडी, रग जिरवी. ९. कृष्ण. १०. त्याच्या देहापासून उत्पन्न झालेलें. ११. श्रेष्ठ चरित्र ज्याचें त्या (श्रीकृष्णास). १२. [कृष्णानें] हृष्टा (आनंदपूर्ण) वाणी (भाषण) केली. [आणि] तिच्या (कृष्णवाणीच्या) सया (मैत्रिणी) [अशा ज्या] कवीच्या वाणी त्या हि सदा गात्या [केल्या].

धर्में विप्रादि सकळ पूजुनि आनंदवूनि बोळविले,
भूदेवपदरजांत[1] स्वजनाकरवीं हि देह घोळविले. ४४
प्रभु हि स्वपुरा गेला, दुर्योधन शकुनि राहिले होते.
त्या मयसभेसि डोळे धृतराष्ट्रें काय वाहिले हो! ते[2]. ४५
घेतां निरोप सांगे व्यास मुनीश्वर युधिष्ठिरासि असें:-
'वत्सा! होणार पुढें क्षत्रक्षय, फार सावधान असें. ४६
कारण करूनि तुजला क्षत्रक्षय करिल काळ, हें चुकवी
ऐसा कोण त्रिजगीं? म्हणती दुर्वार[3] भाविलीं[4] सु-कवी. ४७
दुर्योधनापराधें क्षत्रक्षय भीमजिष्णुबाहुबळें
होणार, बा! त्रयोदशवर्षांतीं आटतील वीरबळें[5]. ४८
क्षत्रक्षयीं कुरुपते! धर्मा! तुजला निमित्त जो कर्ता,
स्वप्नांत निज सुदुर्लभ दर्शन देईल तो जगद्भर्ता[6].' ४९
ऐसें भावि कथुनि मुनि गेला कैलासपर्वता, राया!
प्रभुला[7] विनउनि, अयशोभीत[8] निजसुपौत्र[9] सर्व ताराया. ५०
धर्म म्हणे, 'भ्राते हो! क्षत्रक्षय मन्निमित्त होयाचा[10];
अयश नसावें, त्यजितों जीवित, उपयोग काय हो! याचा[11]?'
जिष्णु म्हणे, 'मतिनाशकमोहीं द्यावें न चित्त आजि राया!
कश्मळपंकें[12] भरितां पटुबुद्धिनटी[13] त्यजील अजिरा[14] या[14]. ५२
बुध मतिकवचें[15] व्यसनीं स्वपरपरित्राण कीं करी; राया!
बुधविबुधसाधुमान्या[16]! रक्षीं सत्स्वद्रुमा[17] शरीरा या.' ५३
धर्म म्हणे, 'व्हाल तुम्हीं जरि मज अनुकूळ तरि करीन असें

---

१. ब्राह्मणांच्या चरणधूळींत. २. दुर्योधन व शकुनि. ३. अनिवार्य. ४. होणाऱ्या गोष्टीला. ५. वीरांचीं सैन्यें. ६. जगत्पालक. (श्रीशंकर). ७. शंकराला. ८. अपयशाला भ्यालेले. ९. आपले सच्छील नातु. (पांडव). १०. व्हावयाचा. ११. या जीविताचा. १२. मोहरूप चिखलानें. १३. सुज्ञांची बुद्धिरूप नटी. १४. या (देहरूप) नृत्यांगणास. १५. बुद्धिरूप चिलखतानें. १६. ज्ञाते, देव आणि साधु यांस मान्य अशा (हे धर्मा!). १७. सज्जनांचा कल्पवृक्ष च अशा.

ज्ञातींसीं इतरांसीं वर्तन तसें, तयांसि इष्ट जसें. ५४
कथिली दुर्व्यसनांची[1] भेदमयी[2] बुद्धि हे खनि पटूनीं;
शिवखनिसम[3] मति धरितों मीं निजपरभेदलेख[4] निपटूनीं[5].' ५५
विग्रहकारण[6] भेद त्यागावा, युक्ति हे नपा सुचली.
भीमार्जुनादिसाधुस्वांतासि[7] सुधेपरीस ती रुचली. ५६
आधीं च धर्म नयरुचि[8], सर्वत्र सम, क्षमी, कृती[9], करुण,
स्थिर ज्यापुढें विवेक व्यक्त सदा, जेंवि रविपुढें अरुण. ५७
तत्साधुत्व[10] किति वदों? स्वगुरूंच्या हितवचा सिकविल्याला
जपला जो रात्रिंदिव, दृढसद्गुणसुकवचासि कवि त्याला. ५८

अध्याय तिसरा.

त्या मयसभेंत रचना पाहुनि राजा सुयोधन भ्रमला,
प्रौढकविकृतींत[11] जसा बाळ[12] म्हणे जो 'कळे अदभ्र[13] मला.' १
मानुनि जळ स्थळाला वस्त्रातें आवरी करें वाटे[14],
कोठें पडे जळीं तो जळ न, जळ स्थळ चि तें खरें वाटे. २
पिहित[15] द्वार विवृतसें[16] मानुनि जातां कपाळ आपटलें,
झाला व्याकुळ दुर्मति आपुलिया चि भ्रमाचिया पटलें. ३

---

१. मोठ्या संकटाची खाण. २. फुटाफूट करणारी. ३. कल्याणाच्या खाणी-सारखी. ४. हा आपला, हा परका असा भेदविचार. ५. नाहींसा करून. ६. तंट्याचें मूळ. ७. अंतःकरणास. ८. नीतीची गोडी ज्यास असा. ९. कुशल, पंडित. १०. अन्वयार्थ–जो कवि (धर्मराज) दृढ सद्गुणरूपी सुकवचासि त्याला [व] स्वगुरूंच्या सिकविल्याला हितवचा (हितकर वचनाला) रात्रिंदिव जपला, तत्साधुत्व (त्याचा थोरपणा) किति वदों? ११. प्रतिभासंपन्न अशा कवीच्या कवितेंत. १२. मूर्ख, अजाण. १३. पुष्कळ. १४. वाटेमध्यें, मार्गीं. १५. झांकलेलें. १६. उघडें असें.

जाय बळें उघडाया कर देउनि उघडिल्या हि अररा[1] ज्या,
तोंडघसींच पडे हो ! होय चमत्कार तापकर राज्या. ४
भीमार्जुन पोषिति अतिहासा अंधजसुदुःसहा[2] यमें[3] ही.
त्यां[4] 'निजभरहर हरिचे[5] सुसहाय[6]' म्हणे, न 'दुःसहाय,' मही.
त्या उपहासें झाला बहुत चि संतप्त तो सुयोधन हो !
चित्तीं म्हणे, 'मरो, परि अपमानित सर्वथा सुयोध न हो.' ६
जातां पुरासि मार्गीं शकुनि म्हणे कुरुवरास, 'सांग मला,
तूं अप्रसन्न कां ? गा ! वाङ्नियम[7] सदैव विहित कां गमला ?' ७
दुष्ट म्हणे, 'जें झालें खर[8] दुःख कृतांतरूप[9] मामा ! तें
दावार्चिसें[10] कराया भस्म पहातें तरूपमा मातें[11]. ८
झालें युधिष्ठिराला भूमंडल विक्रमें वश, कुनेते[12]
भ्राते नव्हेत त्याचे, नरतनुधर सर्व देव शकुने ! ते. ९
तो राजसूय सन्मख, वैश्यापरि ते तसे[13] करद राजे,
स्मरीं न गणायाचे अभिमानी वज्रभृत्करदरा[14] जे. १०
एक हि शतांत न, जसा अज[15] सिंहें डुंगिल्या अजा तारी,
तेंवि न नृप चैद्याला; मारविता रक्षिता अजातारी[16]. ११
श्रीकीर्तिभूतिमहिमा शक्रींचा या युधिष्ठिरीं भूपीं;
अन्यत्र[17] लेश. कैचें सलिल[18] जसें सागरीं तसें कूपीं ? १२
या स्वसंपत्नोत्कर्षें[19] जळतों मीं अंतरीं च, अ-सुखा या

---

१. द्वारास. २. पाठांतर—**निजबंधुदुःसहा.** (दुर्योधनास दुःसह अशा अतिहासा). ३. नकुळ, सहदेव. ४. भीमादिकांना. ५. श्रीकृष्णाचे. ६. उत्तम सहाय्यकर्ते. ७. मौन. ८. प्रखर, तीक्ष्ण. ९. यमासारखे. १०. वणव्याच्या ज्वालेप्रमाणें. ११. वृक्षासारख्या मला. १२. पृथ्वीचे शासनकर्ते. १३. पुढील चरणांत वर्णिलेले. १४. वज्रधारी हात ज्याचा त्या इंद्राच्या भयाला. १५. बकरा. १६. धर्मराज. १७. इतर राजांचे ठिकाणीं. [तो महिमा] लेश (अत्यल्प आहे). १८. पाणी. १९. आपल्या शत्रूंच्या उत्कर्षानें.

सोसील कोण मानी? देतों मीं पावकासि[1] असु[2] खाया. १३
घेउनि दे गुर्वाज्ञा[3] मज हा अग्नींत काय होमाया;
दुःखद जो स्वपराला त्याची ज्ञात्यासि काय हो! माया? १४
भ्रमलों सभेंत, केला उपहास तिहीं ससेवकानीं कीं,
फसलों दैवें पंकीं[4], हंसखग जसा फसे बकानीकीं[5].' १५
शकुनि म्हणे "राया! ते[6] प्रिय, अप्रिय काय तूं अगा! धात्या[7]?
'कर्मानुरूप देतो फळ' म्हणाति असें भले अगाधा[8] त्या. १६
पुण्य तसें चि तयांचें, व्हावा उत्कर्ष नित्य नव साचा;
महिमा पूर्वींच्या हा सुकृतभराचा[9], नव्या न नवसाचा. १७
यत्न तदुच्छेदीं[10] त्वां शत केले, परि कवे! न शकलास;
पूर्णेंदु[11] काय जिंकीं उडु[12]? ज्याच्या जिंकवे न शकलास[13]. १८
तुज ही सहाय गुरु[14], गुरुसुत[15], कृप, वृष[16], बंधु, भीष्म आहेत;
होईल पूर्ण दिग्जय, बहुदक्षिणयज्ञ[17], कीर्ति हा हेत." १९
नृप त्यासि म्हणे, 'मामा! योजिसि येथें कशास सामोतें[18]?
सांग उपाय, युधिष्ठिरपरिभव जेणें घडे, असा मातें.' २०
शकुनि म्हणे, 'पांडुसुत, द्रुपदनृपति, तत्सहाय कंसारी,
यांसि भुजबळें जिंकी ऐसा कैंचा समर्थ संसारी? २१
परि एक उपाय असे, धृतराष्ट्र तुला म्हणेल जरि, कर गा!
होइल युधिष्ठिराची श्री-पृथ्वी निश्चयें चि तरि कर-गा[19]. २२
प्रेमें[20] बहु, पटुत्व नसे द्यूतीं, धर्म स्वयें असे भोळा,

१. अग्नीस. २. प्राण. ३. वडिलांची परवानगी. ४. चिखलामध्यें. ५. बगळ्यांच्या समूहांत. ६. पांडव. ७. ब्रह्मदेवाला. ८. अगम्य गूढ व अशा. ९. पुण्यातिशयाचा, मोठ्या पुण्याईचा. १०. त्यांच्या नाशार्थ. ११. पूर्णचन्द्र. १२. नक्षत्र. १३. तुकड्यास. (शुक्लपक्षारंभींच्या अपूर्ण चंद्रास). १४. द्रोण. १५. द्रोणपुत्र अश्वत्थामा. १६. कर्ण. १७. पुष्कळ दक्षिणा ज्यांत असा यज्ञ. १८. समजुतीतें. १९. हस्तगत. २०. आवड.

अनिवर्तनप्रतिज्ञा[1]; तच्छ्रीला[2] या[3] बळें करीं गोळा.’ २३
कुरुखळ[4] म्हणे, ‘तरि नृपा! घे आज्ञा, तूं चि हें वद पित्यातें.
मीं हें बोलों न शकें, जरि करितो बहु दया, तदपि त्यातें.’ २४
करुनि कुविचार, नगरीं जावुनि, एकांत समय पाहूनीं,
नृप गांठिला हळू हळु तच्छास्त्रविवेकचंद्रराहूनीं[5]. २५
शकुनि वदे, ‘राजा! हा झाला त्वज्ज्येष्ठपुत्र कृश हरिण,
क्षण हि स्वस्थ नसे चि, व्याघ्रवनामाजि जेंवि शिशुहरिण.’ २६
वृद्ध वदे, ‘वत्सा! कां पांडुर[6] कृश जाहलासि सांग मला?
भोगिसि भोग सुरांचे, निष्कंटक राज्य, खेद कां गमला?’ २७
कलिपुरुष[7] म्हणे, “देती तिळ हि न सुख हे स्वभाग्यभोग मला;
पाहुनि युधिष्ठिरश्री मज तुच्छ स्वविषय[8] प्रभो! गमला. २८
मतिचक्षु[9] भेदिलें हो! माझें अतिदुःसहें किरीटि-कणें[10];
मज संसारीं कैंचें चितेनें लागतां किरी[11] टिकणें? २९
मीं घटतों[12], परि तुमचें मन केवळ बांढ[13] तात! ते[14] ज्यानें
अवलोकिले, कळे त्या शिशुशशिसे[15] वाढतात तेज्यानें. ३०
इतरांची काय कथा! जे देणार त्रिखर्व[16] बळि[17] बा! गा!
त्यांतें वारित होते द्वारप[18], दारापुढें न ज्यां जागा. ३१
संज्ञा[19] केली होती, कीं होतां लक्ष[20] त्या मखीं पात्र,
उच्चगृहाग्रगपुरुषें[21] फुंकावा शंख एकदा मात्र. ३२

---

१. द्यूत खेळावयास बोलविलें असतां मागें न फिरण्याची प्रतिज्ञा. २. त्या धर्माच्या राज्यलक्ष्मीला. ३. या द्यूताच्या बळानें. ४. दुर्योधन. ५. त्याच्या (धृतराष्ट्राच्या) शास्त्रविचाररूप चंद्राचा ग्रास करणाऱ्या (शकुनिदुर्योधनादि) राहूनीं. ६. निस्तेज, फिकट. ७. कलीचा अंशावतार. (दुर्योधन). ८. आपलें राज्य. ९. बुद्धिरूप नयन. १०. अर्जुनरूप कणानें ११. कीड. १२. कृश होतों. १३. दृढ. १४. पांडव. १५. बालचंद्राप्रमाणें. १६. तीन खर्व रुपये. १७. कर. १८. द्वारपाल. १९. संकेत. २०. लक्ष पात्र होतां=लक्षब्राह्मणभोजन होतां. २१. उंच घरावरील पुरुषानें.

वाजत होता संतत दर, जाणों विष वचोगृहीं[1] वमला;
त्या अनिशरवश्रवणें[2] बापा! आलें खरें च हींव मला. ३३
मयकृतसभेंत पडलों मीं वापींत स्थळभ्रमें सहसा.
हसले सपत्नदार[3] हि, न म्हणे कोण्हीं हि कीं, 'उगे, न हसा.' ३४
खदखद हांसे भीम हि, जिष्णु हि मजला तसे चि बा! यम ही;
तद्दुर्दशा न करितां, निस्तेजा[4] मज वठेल[5] काय मही? ३५
पडलों उघडूं जातां, द्वार गमे विवृत[6] ही यथापिहित.[7]
तत्कृतबोधाहुनि[8] मज गमलें तम[9], अहित जन्हि तथापि हित.
विवृतद्वाराकार[10] प्रेक्षुनि भित्तिप्रदेशीं[11] जों शिरतों,
फुटलें[12] तें थोडें, बहु जें धरिलें शत्रुनें स्वयें शिर तों. ३७
'धृतराष्ट्रसुता! ये, मीं दाखवितों, द्वार हें, न बापा! हें,'
वदला असें वृकोदर जें, तद्वाक्यार्थ[13] तूं चि बा! पाहें." ३८
अतिशयित भाग्य त्याचें[14], स्वीय[15] हि अतिशयित दुःख कळवीलें.
जों त्या खळतिलकानें[16] कांहींसें अंधचित्त[17] वळवीलें; ३९
तों शकुनि म्हणे, "राया! अभिमानधना! सुयोधना! जरि! तें
भाग्य हरावें चि असें इच्छिसि जिंकूनि दुर्जया अरितें, ४०
तरि मज कपटद्यूतीं आहे बळ, फार हा उपाय भला,
धर्म हि न म्हणेल 'नको,' हें ही ठावें असे यथार्थ मला. ४१

---

१. कानांत. २. सतत चालू असणाऱ्या शंखनादाच्या श्रवणानें. ३. द्रौपदी आदिकरून शत्रुस्त्रिया. ('दार' शब्द पुल्लिंगीं आहे). ४. पराक्रमहीन अशा. ५. वठणीस येईल, ताब्यांत राहील. ६. उघडें असलेलें. ७. झांकल्यासारखें. ८. मी मूर्छित पडलों असतां त्यानीं मला सावध केलें त्यापेक्षां. ९. मूर्छा, घेरी. १०. उघडलेल्या दारासारखा आकार. ११. भितीची बाजू. १२. अन्वयार्थ—जें शिर [भितीवर आपटून] थोडें फुटलें [होतें] तें शत्रूनें स्वयें धरिलें [त्यामुळें] बहु (फुटलें असें वाटतें). १३. अंधळ्याचा पोर हि आंधळा, असा वाक्यार्थ. १४. त्या धर्मराजाचें. १५. स्वतःचें. १६. दुर्योधनानें. १७. धृतराष्ट्राचें मन.

धर्माची '[1]आह्वतो न निवर्तेयं' असी प्रतिज्ञा, ते
न [2]मृषा, द्यूताप्रति [3]अतितरखर म्हणति न [4]असिप्रति ज्ञाते." ४२
खळमणि म्हणे, 'नृपाळा! दे आज्ञा, श्री हरील शकुनी ती.
कां न स्वीकारावी, करिल जरि महारिला वश कु-नीती?' ४३
धृतराष्ट्र म्हणे, 'पुसतों विदुराला, तो विवेकराशि कवी
मज हित सदा शिकवितो, जेंवि बृहस्पति [5]सुरेश्वरा शिकवी.'
भरतकुलकलंक म्हणे, 'मोडील विदुर विचार हा [6]केला,
मग मीं मरेन, राया! कथितो मारूनि उच्च हाकेला. ४५
तो चि [7]इहामुत्रसुखद तुज, न प्रिय सुत, जसा प्रिय [8]क्षत्ता;
मजमागें राज्य करा दोघे, कोणांस हो! नको सत्ता?' ४६
पुत्रप्रियकर राजा आज्ञापुनियां निजानुगां बरवी
जींत सहस्र स्तंभ स्वर्णमणिखचित असी सभा करवी. ४७
आप्तानीं विदुराला हा कपटद्यूतमंत्र जाणविला;
मग त्या धृतराष्ट्रें ही [9]तो बुद्धिसुधासमुद्र आणविला. ४८
नमुनि कवि म्हणे, 'राया! न द्यूतविचार हा मला रुचला.
त्यजुनि [10]सहकार [11]पिकला, [12]पिक लाजेना वरावया [13]कुचला?' ४९
अंध म्हणे, 'होवूं दे द्यूतक्रीडाविनोद भावांत;
[14]अस्मन्निकट तयांच्या न शिरेल दुराग्रह स्वभावांत. ५०
मीं, तूं द्रोण, [15]नदीसुत बैसों जेथें समर्थ, घात कसें
द्यूत करील? [16]शमेल श्रीरामगुणांसमक्ष पातकसें. ५१
[17]होणें होतें, साधो! चित्त तुझें ही न काळजी वाहो,
ज्याचें आचरण जसें, त्या तैसा फळद काळ [18]जीवा हो.' ५२

---

१. बोलावलें तर मागें फिरावयाचें नाहीं. २. असत्य. ३. अति तीक्ष्ण. ४. खड्गाप्रति. ५. इन्द्राला. ६. केलेला. ७. इहपरलोकीं सुख देणारा. ८. विदुर. ९. विदुर. १०. आंबा. ११. पिकलेला. १२. कोकोळ. १३. एक विषारी फळ. १४. आमच्या (गुरुजनांच्या) सन्निध. १५. भीष्म. १६. द्यूत शमेल= विकोपास जाणार नाहीं. १७. जें व्हायचें तें. १८. प्राण्याला.

क्षम[1] हि बुधोक्त न रुचलें, रुचलें बालोक्त[2] अक्षम हि, म्यां[3] तें
काय वदावें ? भुलला दोषज्ञ हि भूप[4] अक्षमहिम्यातें[5]. ५३
'धर्मासि सुहृद्द्यूतक्रीडार्थ[6] क्षिप्र आण जा, विदुरा !'
ऐसें वँदे[7] वचन, तें कविहृदयास[8] चि न, कांपवी भिदुरा. ५४
असकृद्धितोपदेशें[9] विदुर न शकला नृपासि[10] वळवाया,
कीं, तो पुत्रस्नेहें झाला सिद्ध स्वकीर्ति मळवाया ! ५५
जो पोकळ वळवाया स्वमनास हि न शकला, तयां खळ तो[11]
सिकतासेतूस[12] महाबळतोयमहौघसा[13], कसा वळतो ? ५६
धर्मासि निरोप हरिप्रस्थीं[14] कटु केवळ स्व-भावाचा[15],
चिंताम्लानच्छविनें[16] कविनें कथिला चळ-स्वभावाचा[17]. ५७
जो पतिदत्त[18] गरळरस[19] आणुनि पाजी सुतां[20] कयाधू, ती,
हो विदुररीति हि सख्या[21]; दोघींच्यां[22] अपयशा दया धूती. ५८
धर्म म्हणे, 'बापाजी ! ऐसें म्हणतात काय हो तात ?
बहु उत्तम, वचनकरां[23] तारक गुरुचे चि पाय होतात. ५९
गमले तुम्हांपरिस ते कितव[24] हित वसुंधरावरा ! कांहीं,

---

१. हितकर. २. मूर्खाचें भाषण. ३. मोरोपंत कवीनें. ४. धृतराष्ट्र. ५. द्यूतप्रभावाला. ६. मित्राबरोबर द्यूत खेळण्याकरितां. ७. [धृतराष्ट्र] वदे. ८. ज्ञात्याच्या हृदयास च कांपवी असें नाहीं, तर भिदुरा (वज्राला हि) कांपवी. ९. वारंवार केलेल्या हितोपदेशानें. १०. धृतराष्ट्राला. ११. दुर्योधन. १२. वाळूच्या बांधास. १३. प्रबल अशा उदकाच्या मोठ्या ओघाला. १४. इन्द्रप्रस्थीं. १५. आपल्या भावाचा. १६. चिंतेमुळें म्लान झाली आहे मुखकांति ज्याची अशा कवीनें (विदुरानें). १७. चंचल स्वभाव ज्याचा अशा (स्व-भावाचा). १८. पतीनें (हिरण्यकशिपूनें) दिलेला. १९. विषरस. २०. पुत्रास. (प्रह्लादास). २१. परस्पर मैत्रिणी होत. २२. अर्थ–[कयाधूची पुत्रविषयक व विदुररीतीची धर्मादिपांडवविषयक] दया त्या दोघींच्या [अकृत्य केल्यामुळें आलेल्या] अपयशा (दोषा) धूती (धुवून टाकिते, नाहींसें करिते). २३. आज्ञा पालन करणाऱ्यास. २४. द्यूतक्रीडेची भर देणारे ते शकुनिप्रभृति ठक, जुगारी.

जाणों तुम्हीं बुडविली श्री उद्धरिजेल त्या [1]वैराकांहीं. ६०
न [2]विचक्षण [3]हितें मानी [4]दर्शितनवपुष्टिगुणभरा रोगा,
[5]नवकितवसचिवमंत्रें तरि कुरुगुरुभाग्य बहु [6]भरारो गा! ६१
चाला, अवश्य येतों, [7]भावि चुकेना चि जें [8]भलें खोटें,
अयश पुन्हां वृद्धपणीं गुरुचें होईल, दुःख हें मोटें. ६२
स्वप्नीं हि अनय न घडो, अपकीर्ति नसो, असें असेल मनीं,
तरि तारील जगत्पति मज, [9]सालस जरि नसेन तन्नमनीं. ६३
युद्धास द्यूतास हि जावें, 'नाहीं' म्हणों नये, बा! हे
माझी अशी प्रतिज्ञा सत्या, [10]अत्यादरोचिता आहे.' ६४
ऐसें वदोनि राजा सकुटुंब निघोनि गजपुरा आला;
त्याला पाहुनि आप्तां थोडा, बहु हर्ष दुर्जना झाला. ६५

अध्याय चवथा.

दुसरे दिवसीं नेले पांडुसुत नव्या सभेंत बाहून;
शकुनि म्हणे, 'खेळों या;' धर्म म्हणे, 'अधिक काय [11]याहून?' १
[12]भीष्म द्रोण विदुर कृप धृतराष्ट्र, सकर्ण जे शतभ्राते
खळ होते, साधूंचा करणार बळें सभेंत बभ्रा ते. २
कपटद्यूतीं लावी प्रथम चि तो [13]साधुगीतकथ रथ रे!
तों शकुनि ह्मणे, 'जितिला;' तैं [14]थोड्यांचें चि चित्त न थरथरे. ३

१. नीचानीं. २. शहाणा. ३. हितकर. ४. दाखविला आहे पुष्टतेचा भर (लठ्ठपणा) ज्यानें अशा सूज इ० रोगांस. ५. नव्या दुष्ट मंत्र्याच्या मसलतीनें. ६. उत्कर्ष पावो. ७. पुढें होणारें. ८. बरेंवाईट. ९. आळशी. १०. मोठ्या सत्कारास योग्य. ११. खेळाहून. (पण लावून द्यूत खेळावयाचें आहे काय? असा भावार्थ). १२. अन्वय—भीष्म, द्रोण, विदुर, कृप, धृतराष्ट्र [आणि] जे साधूंचा बळें बभ्रा करणार (करणारे) ते सकर्ण खळ शतभ्राते [त्या] सभेंत होते. १३. साधूनीं गाइल्या आहेत कथा ज्याच्या तो (धर्म). १४. थोड्यांचे चि न=पुष्कळांचें.

मग धर्म लक्षदासीपण मांडी; 'जिंकिला' म्हणे शकुनी;
कपटें जिंकूं पाहे हंसाला जेंवि दुष्ट बक[1]-शकुनी. ४
धर्म म्हणे, 'छळ[2] करिसी, मर्यादा त्यजुनि ढाळिसी फांसे;
शकुने! त्यजितां धर्मव्यवहारपथासि, सत्सभा हांसे.' ५
'कोणा व्यवहारीं छळ नाहीं? दे धरुनि गजवरा[3] खळगा;
भ्यालासि तरि निर्वर्तें[4]' प्रभुला[5] हि म्हणे असें चि तो खळ[6], गा!
राजा म्हणे, "प्रतिज्ञा माझी 'नाहीं म्हणों नये' असि कीं,
त्यागीन तिला कां मीं, यत्त्यागें निष्फळें यशें असिकीं[7]? ७
देवनकर्ता[8] मजसीं मत्तुल्य सभाग्य कोण गा! आहे?"
धर्म असें सत्य वदे, तें दुर्मति तो सुयोधन न साहे. ८
गर्वें म्हणे, 'अहो! मीं मामाला द्यावया धनें, रत्नें
आहें समर्थ, देवनसाहित्य करीन सर्वथा यत्नें.' ९
धर्म म्हणे, 'अन्यासीं अन्याचें द्यूत हें विषम[9] वाटे,
ऐसें हि असो, परि परिणामीं भय, सोडितां सु[10]-नय-वाटे.' १०
मणि, हार, दास, दासी, रथ, हय, गज, कनकनिधि हि तो[11] लावी[12]
जिंकी कपटी[13], जी श्री श्रीदश्रीसीं[14] विशंक तोलावी. ११
कपटद्यूत विलोकुनि विदुर म्हणे, 'काय हें अगा! राया[15]!
कां भ्रमलासि? स्वकरें अग्नि कसा लाविसी अगारा या? १२
मद्वाक्य तुला न रुचे मरणारा अगदसें[16] अगा बापा!
पुत्र[17] कसें म्हणसी यां[18], नरकीं नेत्या सविग्रहा[19] पापा? १३

---

१. बकपक्षी. २. कपट. ३. मोठ्या हत्तीला. ४. मागें फीर, खेळ सोडून जा. ५. राजा धर्माला. ६. दुष्ट शकुनि. ७. सगळीं. ८. द्यूत खेळणारा. ९. अन्याय्य, पक्षपाती. १०. सुनीतिमार्गातें. ११. तो धर्मराज. १२. [पणाला] लावी. १३. शकुनि. १४. कुबेराच्या संपत्तीसीं. १५. धृतराष्ट्रा! १६. औषधासारखें. १७. पुत्र=पुन्नामक नरकापासून [पितरांना] तारतो, तो. १८. दुर्योधनास. १९. सदेह, मूर्तिमान अशा.

कोल्हा चि पाळिला त्वां, आरडला उपजतां चि जंबुकसा[1].
श्रीद[2] त्यजिले, वरिला अदक्षिणावर्त[3] तुच्छ कंबु[4] कसा ? १४
मधुतें[5] चि मूढ पाहे, पाहत नाहीं परि प्रपातातें[6];
त्वां घातली कुरुकुळीं द्यूतविषमयी[7] बरि प्रपा[8] तातें; १५
त्यजिले खळ सुत कविनीं पाहुनि तत्संग्रहांत[9] अत्यांग[10],
न्याय त्याग अशांचा, केवळ अन्याय होय अ-त्याग. १६
भोजकुळीं कंस, तसा या हि कुरुकुळीं कळंक हा[11] राया !
नांदोत ज्ञाति[12] सुखें, दे आज्ञा पामरासि माराया. १७
तो कृष्ण त्या खळाला[13], तैसा हा कृष्ण[14] या खळासि वधू;
त्याली असंग्रहार्हा[15] म्हण गा भूपा ! अशा मळासि वधू[16]. १८
देवूनि काक[17], घ्यावे पांच तुवां चित्र-बर्ह-शितिकंठ[18];
घे पंचानन[19] पांच, क्रोष्टा[20] दे; मानवेल शितिकंठ[21]. १९
राया ! कुलार्थ पुरुष, ग्रामार्थ कुळ हि समस्त सोडावें,
ग्राम हि देशार्थ, मही आत्मार्थ; बुधें भलें चि जोडावें. २०
भाग्यें येउनि बसले स्वर्णष्ठीवी[22] निजालयीं[23] पक्षी,
आमिषलोभांध[24] परम पामर कोणही तशां खगां भक्षी. २१

---

१. दुर्योधन जन्मतां च कोल्ह्यासारखा आरडल्याचें वर्णन आहे. २. संपत्ति देणारे. ३. ज्याच्या डाव्या अंगास भोंवरा आहे असा. ४. शंख. (दक्षिणावर्त शंख शुभ व अदक्षिणावर्त अशुभ असें मानतात). ५. मधाला. ६. तटातें, कड्याला. (पर्वताच्या कड्यावरील मध मात्र मूर्ख पाहतो, पण तेथून कडेलोट होईल हें तो जाणत नाहीं). ७. द्यूतरूपी विषानें भरलेली. ८. पाणपोई. ९. त्या दुष्ट पुत्रांचा संग्रह करण्यांत. १०. मोठा अपराध. ११. हा दुर्योधन. १२. नातेवाईक, स्वजन. १३. कंसाला. १४. अर्जुन. १५. असंग्राह्य अशा. १६. तुझी बायको गांधारी. १७. काकरूपी पुत्र. १८. चित्रविचित्र पंखांचे मोर. १९. सिंह. २०. कोल्हा. २१. शंकर. (ही अदलाबदल देवाला आवडेल असा भाव). २२. सुवर्ण ओकणारे. २३. आपल्या घरीं. २४. मांसलोभानें अंध झालेला.

मग तळमळे, रडे बहु तो आपण आपला करुनि घात,
तैसें चि तुज हि घडतें, हो सावध, आवरीं नृपा! हात. २२
धनलोभें गुमजे, परि तूं म्हणसील क्षणक्षणीं मग 'हा[1]!'
आमिषलोभांध जसा तो पश्चात्तप्त मंद्धी खग-हा[2]. २३
माळाकार[3] तरूंचें घेतो फळपुष्प जेंवि, तेंवि नृपा!
घे पांडुसुतांपासुनि वित्त, असों दे मनांत पूर्ण कृपा. २४
धनलोभ धरुनि चित्तीं, द्यूतें चरणाश्रितां न गांजावें,
त्वां नरकासि न, घेउनि संगें स्वसचिवसुतानुगां, जावें. २५
ऐका, हो! सर्व तुम्हीं या रायाचें करूनि हित वांचा;
साधुच्छळें कुळक्षय, कीर्तिश्रीभंग संग कितवांचा[4]. २६
शकुनि कुनीतिज्ञ कुमति; येथुनि आतां चि या खळा दवडा;
हा न भला; बुडवाया शिरला या राजमंदिरीं कवडा[5].' २७
इत्यादि विदुर बोले तें ऐकुनि ही अचक्षु[6] तो न वळे.
दुर्योधन, पंचाक्षरिमंत्रें[7] परमोग्रभूतसा, खवळे. २८
जनकाहूनि परम हित, पर-महित[8] ज्ञानसिंधु जो, त्यातें;
धिक्कारी; उडवी त्या स्वशिवगृहाधारभूत[9] जोत्यातें[10]. २९
"विदुरा! उगा उगा, गा! मेळविलें बुडवितोसि यश कां गा?
कोण तुला पुसतो? कीं, 'अजि! आम्हां नेणत्यां स्वहित सांगा.'
निपुण असेल निजहितीं, करिल पराचें हि तो चि धीर[11] हित;
स्वामिद्रोहरता[12] तुज काय कळे? तूं प्रसिद्ध धी-रहित[13]. ३१

१. हाय हाय! २. पक्षी मारणारा. ३. माळी. ४. जुगाऱ्यांचा, शठांचा. ५. कित्येक पक्षी शुभाशुभसूचक मानले आहेत; त्यांत कवडा हा पक्षी अशुभसूचक होय. ६. अंध. (धृतराष्ट्र). ७. अंगांतील पिशाच्च काढणाऱ्या पंचाक्षरयुक्त मंत्रानें किंवा मांत्रिकाच्या मंत्रानें. ८. अत्यंत पूज्य. ९. आपल्या कल्याणरूपी घरास आधारभूत अशा. १०. चौथऱ्याला. (विदुराला). ११. सुज्ञ, पंडित. १२. राजद्रोहाची खोड असलेल्या. १३. बुद्धिहीन, बेअकली.

तूं पोषिलासि सादर सतत जसा [1]आत्मकाय [2]मत्तातें,
निंदिसि सभेंत दुष्टा! [3]कर्म विसरलासि काय मत्ता! [3]तें. ३२
[4]अस्मदहितहित इच्छिसि, लाविसि आम्हां [5]दहांत [6]बालिशता,
वाचाळ कृतघ्न कुटिल भरतकुळीं तूं चि पात्र [7]गालि-शता. ३३
राजसभेंत वदावें कैसें तें न शिकलासि अभ्यासीं,
चतुरपण परम दुर्मिळ, तुज परिचय न घडला चि सभ्यासीं.
तुज काय राजनीतिज्ञान? अरे! साप दुखविला साचा,
मृत्यु तसा चि सपत्न हि, कैंचा मग लाभ सुख-विलासाचा?
शत्रूच्छेद करावा, करितों, कां लावितोसि अन्याया?
आह्मीं च साहतों, न दुरुक्ति तुझ्या सोसतील अन्या या. ३६
जों मृदु लागे तों तों दडपी शिशु फार वून भातातें,
तैसें न करावें त्वां, न बसावें हारवून [8]भा तातें. ३७
[9]शास्ता एक चि, न दुजा, [10]गर्भीं जीवांसि [11]जो सिकवितो रे!
करितों [12]तच्छिक्षित मीं, बैस उगा, तूं न होसि कवि [13]तोरें. ३८
हितशत्रु निकट न बरा; जा त्यांप्रति, [14]दयित जे तुला असती.
टाकुनि जाती च बहु प्रेमें जरि सतत सांत्विली [15]अ-सती." ३९
विदुर म्हणे, 'न धरील [16]श्रोत्रियवचनें सदाचरण कुलटा,
टाकवितां दुर्व्यसन, द्वेषें इच्छील घात ती उलटा. ४०
बोध प्रगल्भ हा जरि न करायाचा स्वधर्महानि, बरा;
परि कुरुवरमति न वरी, नवरी जैसी [17]वरा [18]महानिबरा. ४१
अप्रिय परि पथ्य असें वक्ता श्रोता हि दुर्लभ स्पष्ट,

---

१. स्वदेह. २. माझ्या बापानें. ३. तुझें पोषणरूप कर्म. ४. आमच्या शत्रूंचें कल्याण. ५. चारचौघांत. ६. मूर्खपणा. ७. शेंकडो शिव्यांना. ८. तेज. (प्रतिष्ठा, मान). ९. शासनकर्ता. १०. गर्भवासांत. ११. सृष्टिनिर्माणकर्ता ब्रह्मदेव. १२ ब्रह्मदेवाच्या प्रेरणेप्रमाणें आचरण. १३. तोरें=गर्वानें, तोऱ्यानें. १४. प्रिय. १५. जारिणी स्त्री. १६. वेदाध्ययन करणाऱ्याच्या भाषणानें. १७. पतीला. १८. अतिप्रौढ अशा. (म्हाताऱ्या).

बहु सुलभ प्रिय वदते[1] वाढविती, चुकविती न ते कष्ट. ४२
सुप्तव्याघ्रासि[2] नको लावूं दाटूनि शृंग, परिणामीं
संकट पडेल, म्हणतों काय अहित हें मदांधहरिणा! मीं?[3] ४३
स्पष्ट हित अहित कथिता जो होय, सहाय तो चि रायास;
प्रियवाङ् नर कीं नरकीं भोगवितो भोगितो चिरायास[4]. ४४
सदय हितकाम[5] जो, त्या असमंजस कर्म पाहवेना गा!
कैसें लावूं द्यावें पद, ज्या लंघन[6] न साहवे नागा[7]?' ४५
भ्रातृहितेच्छु[8] बिभीषण पावे धिक्कार कीं परम हा[9] ही.
खळ बहु खोटा, त्यांसम[10] म्हणति किती कवि भला पर महाही.
शकुनि म्हणे, 'धर्मा! त्वां हारविलें धन समस्त कीं आहे?'
या वचनासि न[11], पुच्छीं दत्तपदाला[12] भुजंगसा, साहे. ४७
'काय पुससि रे! अयुतप्रयुत[13], तथा शंकुपद्म, अर्बुद कीं,
खर्वनिखर्व, समुद्र[14] हि पूर्ण धनीं मीं, जसा उदधि उदकीं. ४८
हा ग्लह[15] माझा शकुने! हूं खेळ; च्छळ नको करूं होगीं[16],
कपटें यमदूतवृकव्याघ्रांमध्यें न कोकरूं हो गा!' ४९
ऐकुनि म्हणे '[17]जितं' तो, मत्स्यातें बक जसा, खळ पणातें
ग्रासी, उपमा चि नसे दुसरी त्याच्या विशृंखळपणातें[18]. ५०
'वृष, हय, धेनु, अजाविक[19], हें धन स्यां लाविलें' ह्मणे धर्म,

---

१. प्रिय बोलणारे. २. निजलेल्या वाघास. ३. ही गीति पर्यायानें दुर्योधनाला अनुलक्षून आहे. ४. चिरकाल आयास. ५. हित करण्याची इच्छा ज्यास असा. ६. [केवळ] ओलांडून जाणें. ७. सर्पाला. ८. बंधूचें (रावणाचें) हित इच्छिणारा. ९. विदुर. १०. अन्वयार्थ—किती कवि त्यासम (खळासम) महाहि (मोठा सर्प) म्हणती; पर (परंतु) [तो महाहि] भला. ११. [धर्म] न साहे. १२. [शेंपटावर] दिलें आहे पाऊल ज्यानें अशा पुरुषाला. १३. अयुतपासून निखर्वापर्यंत सर्व संख्या आहेत. १४. अन्वयार्थ—उदकीं जसा उदधि पूर्ण [तसा] मीं हि धनीं पूर्ण समुद्र. १५. पण. १६. उगाच, व्यर्थ. १७. जिंकिलें. १८. उद्दामपणातें. १९. शेळ्या व मेंढ्या. (अजा+अविक).

तों तो 'जितं' म्हणे; हो! होय भरतकुळसभेंत हें कर्म! ५१
'वर्जुनि विप्रधन, सकळ पुरजनपदभू[1] अविप्रपुरुष असें
हें शिष्टं[2] मद्धन' म्हणे धर्मात्मा[3]; भावि तें चुकेल कसें? ५२
दुर्जन 'जितं' म्हणे, हो! मग सर्व अमूल्य निज-कुमार-मणी[4]
द्यूतीं लावी, जिंकी त्या नियति[5], जसी हरा उमा रमणी. ५३
मग धर्म वदे, "सिंहस्कंध[6] युवा[7] श्याम[8] दीर्घभुज नकुळ,
हें माझें धन, जेणें 'धन्य' म्हणे कुरुकुळासि सु-जन-कुळ[9]."
'इदमपि धनं जितं ते'[10] शकुनि म्हणे, दीप्तपावक[11] पटानें[12]
बांधी मणिभ्रमें[13], बहु फुगला मलिनस्वभाव[14] कपटानें. ५५
धर्म म्हणे, 'गा शकुने! न कुनेत्रें जाय रूप, कुज्ञानें;
ज्ञानासि लोचनाहुनि फार जपावें म्हणोनि सुज्ञानें. ५६
सद्गुणमंडित पंडित दंडि-तपस्वीड्य[15] सद्विवेक-पिता
सहदेव ग्लह माझा, स्वप्नीं हि न यन्मना सिवे कपिता[16].' ५७
'त्वद्बंधुरत्न हें ही द्यूतीं म्यां जिंकिलें' म्हणे शकुनी;
साहे महापराध हि, दंड खळाला करावया शकुनीं[17]. ५८
'ग्लह केले माद्रीसुत; परि आतां परम कठिन वाटेल,
सोदर[18]भीमधनंजयपण करितां कंठ फार दाटेल.' ५९
धर्म म्हणे, 'मीं ह्मणतों मूर्तिधर बहिश्चर स्व-असु यांतें;
शकुने! परुषोक्तींतें[19] भ्याल्या श्रुति[20], कांपतील न सुयांतें. ६०
सर्व अनिष्ट करावें शकुने! त्वां कीं परें हि अंत-रतें[21]
परि न वदावें बंधुप्रेमीं जेणें पडेल अंतर तें.' ६१

---

१. नगर व देशभूमि. २. शिल्लक राहिलेलें. ३. धर्मपरायण. (धर्मराज). ४. आपलीं पुत्ररूपी रत्नें. ५. दैव. ६. सिंहासारखे खांदे ज्याचे असा. ७. तरुण. ८. सांवळा. ९. सुजनांचा समुदाय. १०. हें हि तुझें धन जिंकलें. ११. प्रज्वलित अग्नि. १२. वस्त्रानें. १३. रत्नाच्या भ्रांतीनें. १४. शकुनि. १५. संन्यासी आणि तपस्वी यांना स्तुत्य. १६. माकडचेष्टा. १७. समर्थ असून हि. १८. सोदर=सख्खे बंधु. १९. कठोर वचनांस. २०. कान. २१. नाशाविषयीं तत्पर अज्ञानें.

शकुनि म्हणे, 'कौंतेया! द्यूतीं कितव[1]प्रलाप बहुतर; ते
वदते हित मित, कितव व्यसनीं बुडते कशास? बहु तरते.
ज्येष्ठ श्रेष्ठ नृपा! तूं न धरावे बोल हे मनीं कांहीं
द्यूतीं[2] बहु कितवांहीं[2] बडबडिजे, संगरीं अनीकांहीं[3].' ६३
धर्म म्हणे, 'ग्लह केला अर्जुन, जरि योग्य हा न या[4] कामीं;
शकुने! याच्या तेजें झालोंसें विदित फार नाका[5] मीं.' ६४
'तो जिंकिला' म्हणे खळ, बसला सूळींच नागवायाला,
कीं भेटला कपटमिष साक्षात्कोल्हा[6] चि नागवा याला. ६५
धर्म म्हणे, 'पण केला आतां, ज्याच्या कृतांत[7] भी महिम्या;
अमितबळ संनतभ्रू[8] तिर्यक्प्रेक्षी[9] गदींद्र[10] भीम हि म्यां.' ६६
शकुनि म्हणे, 'या हि पणा जिंकुनि, पणविजयतत्पर मदक्ष[11]
धर्मा! ग्लहांतराची वाट पहाताति हे परम दक्ष. ६७
सुत बंधु हि हारविले, उरलें धन काय गा! पणास हितें[12]?'
धर्म म्हणे, 'मीं द्यूतीं बुडवी सर्वस्व आपणासहित.' ६८
धर्मास हि जिंकी खळ कपटजयें, परम अक्षम[13] हि माते[14],
जे व्यसन टाकणारे बुध हा ऐकोत अक्षमहिमा[15] ते. ६९
शकुनि म्हणे, 'चुकलासि; ग्लहयोग्य हि संग्रहीं असोनि धन,

---

१. जुगारी लोकांची बडबड. २. पाठांतर—**द्यूतीं कितवमुखानीं**. ३. सैन्यानीं. ४. पणास लावण्याचे कामीं. ५. स्वर्गाला. ६. एखाद्याला अचानक कांहीं लाभ झाल्यास 'त्याला नागवा कोल्हा भेटला,' असें म्हणण्याचा भाषासांप्रदाय आहे. (कोल्ह्याचें शेंपूट मोठें व केसाळ असून जमिनीपर्यंत लोंबत असतें; तें कुत्र्याच्या शेंपटीप्रमाणें वर वळलेलें नसतें; तेव्हां 'नागवा कोल्हा' ही अद्भुत गोष्ट आहे, व ती दृष्टीस पडणें हें बहुभाग्याचें लक्षण मानिलें आहे). ७. यम. ८. खालीं वळल्या आहेत भुवया ज्याच्या असा. ९. वक्रदृष्टीनें पाहणारा. १०. गदाधरांमध्यें श्रेष्ठ. ११. माझे फांसे. १२. उपयुक्त. १३. असमर्थ असून हि. १४. माजे, उन्मत्त होई. १५. फाशांचा पराक्रम. (फांसे खेळण्याचा परिणाम).

जिंकोनि घेतलें कां? समयीं चुकणें नसो, असो निधन[१]. ७०
घे आपणासि राया! सोडवुनि, द्रौपदीस लाव[२] कसा;
श्रीचा कैवारी नृप धन्य, स्त्रीचा सदैव लावकसा[३].' ७१
धर्म म्हणे, 'शकुने! जी रूपें श्रीला[४], क्षमागुणें महिला[५]
साजे सखी, अखिन्ना कृत्यभरें, सुमति आमुची महिला[६]. ७२
शरदुत्पळपत्राक्षी[७] शरदुत्पलपुण्यगंधसमगंधा[८],
अस्खलित[९] चालवी गृहधर्मीं मज, यष्टि[१०] जसि पथीं अंधा. ७३
आली मखवेदीच्या[११] जी द्रुपदसुकृतभरास्तव[१२] कुशीला[१३],
वाटो बरा सु-शीलां[१४], वाटेल न हा बरा स्तव[१५] कु-शीला. ७४
आधीं जिनें उठावें, पाहुनि निजलों असें मग निजावें,
रागेजणें[१६] सुदुर्मिळ, तें हि जिचें ज्वाळसें गगनि जावें, ७५
धौम्यापासुनि गोपांपर्यंत जिनें स्वयें समाचार
घ्यावा, श्रितताप[१७]हर श्रीगंगेचा जिचा समाचार[१८], ७६
ती देवी आतां म्यां या द्यूतीं लाविली. अहाहा! रे!
छळिसी[१९]; द्यूतीं च कसा हारे? अन्यत्र कां न हा हारे?' ७७
धर्म नयज्ञोत्तम[२०] जो, द्यूतीं स्वकलत्ररत्न[२१] तो लावी.

---

१. मरण. २. [पणास] लाव. ३. लावकपक्ष्यासारखा. (हा पक्षी आपल्या मादीविषयीं फार लंपट असतो असा समज आहे). ४. लक्ष्मीला. ५. पृथ्वीला. ६. स्त्री. ७. शरदृतूंतील कमलपत्रासारखे नेत्र जिचे अशी. ८. शरदृतूंतील कमलाप्रमाणें पवित्र सुगंध जिचा अशी. ९. अडखळूं न देतां. १०. काठी. ११. यज्ञपात्रभूमीच्या. १२. द्रुपदराजाच्या पुण्यातिशयामुळें. १३. उदरास. १४. सुस्वभावी जनास. १५. स्तुति. १६. रागावणें. (द्रौपदी अगोदर कधीं रागावयाची नाहीं; त्यांतून कधीं रागावली च तर, अग्निज्वाला जशी तत्काळ आकाशांत निघून जाते तद्वत् तिचा राग हि तत्काळ नाहींसा होतो). १७. आश्रितांचा ताप हरण करणारा. १८. समान आचरण. १९. अर्थ–[शकुने! तूं] छळिसी (कपट करितोस); [कारण तसें न म्हणावें तर] हा (धर्म) द्यूतीं च कसा हारे [तसा] अन्यत्र कां न हारे? २०. नीति जाणणाऱ्यांमध्यें श्रेष्ठ. २१. आपलें स्त्रीरत्न.

हांसे 'जितं' म्हणे खळ, कवि हो! ती गोष्टि काय बोलावी?
'धिक् धिक्!' सभ्यजन म्हणे, विदुर अधोवदन बैसला उगला[1];
भीष्मद्रोण ह्मणति, 'हा! भाच्यांसह शकुनि जयसुखें फुगला.'
'किं जितमिह[2]? किं जितमिह?' ऐसें असकृत्[3] पुसे अचक्षु रसें[4];
रडले सभ्य, तयांच्या हृदयीं तें[5] लागलें वचं क्षुरसें[6]. ८०
सखिहस्तीं[7] हस्त न वृष[8], पांडवहृदयांत सायका[9] मारी;
क्रोधातें भीम गिळी, गरळातें जेंवि काय कामारी[10]. ८१
अंधसुत[11] म्हणे, 'विदुरा! कृष्णा दासी सभेसि आणावी,
गृहसंमार्जन[12] करणें, हे सेवा तीस योग्य जाणावी.' ८२
विदुर म्हणे, 'शस्त्र[13] वधी गिळितां तत्काळ बोकडाला, हें
तैसें चि कर्म करिसी; रे मंद[14]! न[15] मृत्यु रोकडा लोहें[15]. ८३
हरिच्या[16] पुनःपुन्हां कां काड्या[17] नाकांत घालिसी? शशका[18]!
यश काय पक्षिपतिचें[19] येइल हे चार[20] करुनि तुज? मशका[21]! ८४
ब्रूयात्क्षमी[22] गभीरोऽसीति बत युधिष्ठिरं प्रभुं को न?
निज नीचपण प्रकाटिसि, तूं श्वान भल्यावरी हि भुंकोन. ८५
पांडव किमपि न वदती, तूं वदसि सभेंत शब्द घाणेरे;
हे सकळखळतिळांचे[23] रगडुनि करणार पिष्ट घाणे रे!' ८६

---

१. स्तब्ध. २. या डावांत काय जिंकलें? ३. वारंवार. ४. आवडीनें. ५. वचन. (धृतराष्ट्राचें विचारणें). ६. वस्र्यासारखें तीक्ष्ण. ७. मित्र दुर्योधनाच्या हातावर. ८. कर्ण. ९. बाणाला. १०. शंकर. ११. दुर्योधन. १२. वरांतील झाडसारवण. १३. [शस्त्र] गिळितां [तें] शस्त्र तत्काळ बोकडाला [च] वधी. १४. मूर्खा! १५. मिळवूं नको. (मृत्यु येईल असें करूं नको). १६. (धर्मरूप) सिंहाच्या. १७. नाकांत काड्या घालणें=खिजविणें, चिडविणें मर्मभेदक भाषण करणें. १८. (दुर्योधनरूप) सशा! १९. (धर्मरूप) गरुडाचें. २०. चेष्टा. २१. (दुर्योधनरूप) चिलटा! २२. क्षमी गभीरः असि इति युधिष्ठिरं प्रभुं कः बत न ब्रूयात्?=तूं क्षमाशील व गंभीर आहेस असें धर्मराजास कोण बरें म्हणणार नाहीं? २३. सर्व दुष्ट जन हेच तीळ, त्यांचे.

दुर्योधन, हित कथितां[1] 'धिक्कार तुला असो' असें च वदे.
ज्वरितां[2] जसें ससितपय[3], सद्वचन न दुर्जना तसें चंव[4] दे. ८७
कल्यंश[5] खलशिरोमणि[6] कपटपटु कटुस्वभाव सद्वेषी[7],
तो प्रातिकामिनामक सूतातें द्रौपदीप्रति प्रेषी[8]. ८८
'सूता ! जा कृष्णेला घेउनि ये, भय नसे तुला लेश;
सर्वज्ञ न, किंचिज्ञ[9] क्षत्ता; ब्रह्मा नव्हे कुलालेश[10]. ८९
बहु कातर[11] विदुर, सदा वटवट करितो असी च हा नीच;
या खोट्याला गमत्ये जी अस्मद्वृद्धि[12] ती स्वहानी च.' ९०
जाउनि तो सूत म्हणे, 'कृष्णे ! द्यूतांत तूं स्वयें धर्में
हारविलीस[13], सुयोधनसदनाप्रति ये करावया कर्में[14].' ९१
हें वाक्य त्या सतीतें बहु दुःसह, जेंवि वज्र कंदलीतें[15];
परि परिसावें, धैर्यें त्यासीं जें ती सुबुद्धि[16] वदली, तें. ९२
"सूता ! काय वदसि हें ? द्यूतीं हारविति संपदेतें गा !
'श्री' म्हण, न 'स्त्री' म्हण[17], हें त्वद्वचन मनास कंप देतें गा !"
सूत म्हणे, 'आधीं श्री, मग सात्मज[18]बंधुमंडली धर्में
हारविली, निजमूर्ति द्यूतीं, स्त्री सेवटीं असत्कर्में.' ९४
राज्ञी म्हणे, "तरि अगा ! जा पूस सभेंत तूं असें आर्या,
'राजेंद्रा ! हारविली प्रथम द्यूतीं स्वमूर्ति कीं भार्या ?' " ९५
सूत सभेंत विचारी धर्मातें कीं, "पुसे असे आर्या,
'राजेंद्रा ! हारविली प्रथम द्यूतीं स्वमूर्ति कीं भार्या ?' " ९६

---

१. [विदुरानें] हित कथितां. २. ज्वर आलेल्या रोग्याला. ३. शर्करायुक्त दुग्ध. ४. गोडी. ५. कलीचा अंश. (दुर्योधन). ६. दुष्टांचा मुकुटमणि. ७. साधूंचा द्वेष करणारा. ८. पाठवी. ९. अल्पज्ञाता. १०. कुंभारांचा स्वामी. (श्रेष्ठ कुंभार). ११. भितरा. १२. आमचा उत्कर्ष. १३. कर्मणि प्रयोगांत कर्मपद प्रायः तृतीय पुरुषीं असतें; परंतु कवितेमध्यें मात्र प्रथम व द्वितीय पुरुषीं हि आढळतें. १४. झाड-सारवणादि कामें. १५. केळीस. १६. बुद्धिमती. १७. श्री (राज्यश्री) हारविली असें ह्मण; परंतु स्त्री हारविली असें म्हणूं नको. १८. पुत्रासहवर्तमान बंधुमंडळी.

धर्म न कांहीं च वदे; तों दुर्योधन म्हणे, 'सभेस तिनें
यावें, स्वयें पुसावें, जें पुसणें योजिलें तिच्या मतिनें.' ९७
कृष्णेप्रति सूत म्हणे, "देवि! न कांहीं च धर्म वदला गे!
जाणों सभासदांस हि कठिन त्वत्प्रश्नवाक्यपद[1] लागे. ९८
दुर्योधन वदला कीं, 'त्वां चि पुसावें सभेंत, डोलेल[2]
त्वत्प्रश्नश्रवणसुखें, तुज पाहुनियां यथार्थ बोलेल.' ९९
बहुधा सभेंत तुजला नेईल क्षुद्रबुद्धि गांजाया;
नसतां उपाय कांही, आग्रह करिसील तूं हि कां जाया?" १००
कृष्णा म्हणे, 'समर्थ न कोण्ही ही सुज्ञ भावि टाळाया,
जेंवि विधु[3] राहु येतां पर्वीं[4] आत्मप्रभा विटाळाया. १०१
रक्षील धर्म समयीं, धरिती त्याचा चि भरवसा सु-कवी;
आर्जविला असतां तो स्वजनव्यसनासि[5] निश्चयें चुकवी. १०२
भरतकुळधर्म न बुडो; सभ्यांला पूस एकदा जा, गा!
तन्मत मान्य मला, कीं, नय तच्चित्तीं सदा असे जागा.' १०३
पुनरपि सभेंत जाउनि सूत म्हणे, "सभ्य हो! तुह्मांस सती,
'द्यूतांत मीं जिता कीं अजिता,' ऐसें मदाननें[6] पुसती." १०४
दुर्जनदुराग्रहाचे[7] ज्ञाते सभ्य हि न पाहती च वर,
तेथें उत्तर कैंचें? न चलेसें[8] न वदती कवि-प्रवर[9]. १०५
जाणुनि संकट धर्मैं दूतमुखें कळाविलें स्वजायेतें
कीं, श्वशुरासि[10] शरण ये,' गुरु[11] कवचें[12], व्यसन उग्र ज्या येतें.'
सभ्य न वदती कांहीं, पांडव ही मूकबधिरसम गमती,
पाहुनि असें सुयोधन बोले तों सत्पथोपरम-ग-मती[13]. १०७

---

१. तुझ्या प्रश्नाच्या वाक्यांतील [प्रत्येक] शब्द. २. सभा संतोष पावेल. ३. चंद्र. ४. पूर्णिमेस. ५. भक्तांच्या संकटाला. ६. माझ्या मुखानें. ७. दुर्जन (दुर्योधन), त्याच्या दुराग्रहाला जाणणारे. ८. न चालेल असें, पसंत न पडेल असें. ९. सुज्ञश्रेष्ठ. १०. सासऱ्याला. (धृतराष्ट्राला). ११. वडिल माणसें. १२. चिलखत. (रक्षण करण्याचें साधन). १३. सन्मार्गापासून निवृत्त बुद्धि ज्याची तो.

'तीतें चि आण जा; रे! ती कां स्वमुखें पुसे न येऊनीं?
सभ्यजनीं हितपृच्छक[1], शीतार्त[2] हि कोण गा! नये ऊनीं? १०८
सभ्यानीं प्रश्नोत्तर योजावें नीट, कीं न योजावें?
आर्तें[3] वैद्यगृहाला, गुण यो, कीं प्राक्तनें न यो, जावें.' १०९
मत्तें[4] श्वयूथपें[5] श्वा सिंहीप्रति धाडितां धरायाला,
जाईल कसा? तैसा सूत हि भी कर्म तें करायाला. ११०
तांतड[6] करी सुयोधन, परि सूत पुन्हा म्हणे, 'अहो सभ्य!
काय वदों? प्रश्नोत्तर कृष्णेला कां न होय हो! लभ्य[7]?' १११
कोपें म्हणे सुयोधन, 'भीतो भीमासि सूत हा भितरा;
दुःशासना! स्वयें जा, आण तिला, कर्म हें नव्हे इतरा[8].' ११२

अध्याय पांचवा.

तो हरिणीग्रहणार्थी[9] अत्युग्रप्रकृति[10] लांडगासा च
गेला तें चि कराया दुःशासन दुष्ट दांडगा साच. १
कृष्णेसि म्हणे, 'चाल, द्यूतीं तुज जिंकिलें, भज कुरूंतें[11],
कुरुपतिस[12] पहा, लज्जा त्यज, सेवावें सुखें शतगुरूंतें[13].' २
त्या दुष्टोक्तिश्रवणें पांडूंची[14] संकटीं पडे जाया;
संरक्षणार्थ धांवे धृतराष्ट्राच्या स्त्रियांकडे जाया. ३

१. हिताची विचारपूस करणारा. २. थंडीनें पीडित. ३. रोग्यानें. ४. माजलेल्यानें. ५. कुत्र्यांच्या कळपाच्या नायकानें. ६. घाई. ७. प्राप्त. ८. [तुझ्याशिवाय] इतराच्या हातून हें काम होणार नाहीं. ९. मृगीला पकडण्याची इच्छा ज्यास आहे असा. १०. अतिशय क्रूर आहे स्वभाव ज्याचा असा. ११. दुर्योधनादि शतबंधूंना. (कुरु, रघु, पांडु, यदु वगैरेंचीं नांवें त्यांच्या कुळांत उत्पन्न झालेल्या पुरुषांस हि लावतात). १२. दुर्योधनातें. १३. शंभर पतींना किंवा शतकौरवांच्या मातापित्यांना. १४. पांडवांची.

पळतां धावोनि तिला, त्या केशांतें धरूनि, आकर्षी,
ज्यां राजसूययज्ञीं अभिषेचिति बहु महर्षि नाकर्षी[1]. ४
कृष्णा म्हणे, 'सभेंत न न्यावें मज, मीं रजस्वला, आंगा
आच्छादन एकांबर[2], नेतोसि असीस आग्रहें कां? गा!' ५
दुष्ट म्हणे, 'स्वसभेला तुजला नेतों चि, दूरसी[3] अस कीं
एकांबरा अस; तुझीं अंगें नग्नें असोत हीं असकीं[4].' ६
देवी म्हणे 'अनार्या[5]! नाहीं च तुझ्या मनांत पापदर[6],
ओढूं नको फरफरां, घेऊं दे सावरूनि हा पदर.' ७
अधम म्हणे, 'द्यूतजिता दासी तूं, लाजसी कशाला गे!
चाल उगीच, प्रभुसीं हठ करितां पाठिला कशा[7] लागे.' ८
कृष्णा म्हणे, 'पति कसें पाहुनि हें कर्म साहतील? न द्या
पद सर्पशिरीं, तुमच्या रक्तांच्या स्पष्ट वाहतील नद्या. ९
गुरुजनसभेंत कैसा नेसी ओढूनि कायहा[8], नीच्या!
करितोसि कर्म दुष्टा! प्राप्त्यर्थ बळें चि कायहानीच्यां[9]? १०
धर्म परम सूक्ष्म[10] असे, धर्मात्मा धर्मनृप नसे चुकला;
सावध व्हा, कंठीं यमपाश कसे घालितां? अहा! उकला[11].' ११
ओढुनि सभेंत नेली तेव्हां ती द्रौपदी ह्मणे, "कुरुची
कीर्ति बुडाली, हा! धिक्! कुरुवृद्धांला हि मानली कुरुची[12]. १२
हा! भीष्मद्रोण कसें न ह्मणति, 'हे सहजमित्र[13]! सत्व! रहा.'
अन्यायें बुडणार व्यसनीं कुरुराजवंश सत्वर हा. १३
अन्यायाचळभिदुरें[14] विदुरें अनवरतशुद्धसत्वरतें[15]

---

१. स्वर्गर्षि—देवर्षि. (नारदादि). २. एकवस्त्र. ३. दूर राहण्यासारखी. (रजस्वला). ४. अवघीं. ५. नीचा! ६. पापभय. ७. चाबूक. ८. हा माझा देह. ९. देहनाशाच्या. १०. जाणण्यास कठिण. ११. उलगडून टाका. १२. वाईट कृत्याची आवड. १३. हे सहजमित्र सत्व! (हे जन्मसिद्ध मित्रा सत्वगुणा!) रहा; (आम्हांला सोडून जाऊं नको). १४. अनीतिरूप पर्वतास वज्रासारख्या अशा (विदुरानें). १५. निरंतर शुद्ध अशा सत्वगुणांत रमणाऱ्यानें.

जाऊं दिलें कसें, जें गेलें सोडूनि सख्य सत्वर, तें[1]? १४
कारुण्यरसें भरले होते, जे दुर्बळांसि उद्धरिते,
झाले कसे अकस्मात् ते केवळ कुरुगुरु प्रबुद्ध[2] रिते[3]?” १५
प्रेरियेले[4] भेदाया पतिधैर्यद्विरदकट[5] कटाक्ष तिनें,
प्रथम न म्हणति[6] श्रीच्या, म्हणति[6] स्त्रीच्या चि ‘कटकटा[7]’ क्षतिनें[8].
पेटे पांडवकोपानळ[9], कृष्णादृष्टि[10] होय तद्धमनी[11];
काय करितील हो! ते निजमर्यादागुणें[12] चि बद्ध मनीं? १७
दुःशासनासि म्हणती भीमादिक निजमनांत, ‘हे बाळें[13]!
हूं; सुत सर्पिणीतें मेली मानूनि ओढ हेबाळ[14].’ १८
केश धरुनि दुःशासन तीस बळें फिरफिरोनि दे हिसके,
भाविंतमःप्रशमीं[15] न[16], क्षम[17] ही होऊन तेज[18] देहि, सके[19]. १९
‘दासी दासी’ ऐसें असकृत् तो खळ ह्मणे सहास[19] तितें;
जाणों क्षमालि[20] सिकवी, ‘जें जें अरि करिल तूं सहा सति! तें.’
‘दासी दासी’ म्हणतां दुर्योधन कर्ण शकुनि मानवती[21];
हांसति खळ, सभ्य रडति, दुष्टें छळितां सभेंत मानवती[22]. २१
गांगेय ह्मणे, “सुभगे[23]! धर्म परम सूक्ष्म, यास्तव स्पष्ट,
‘[24]ऐसें चि’ असें मजला वदवेना, हा विचार बहु कष्ट[25]. २२
वदला ‘जितोऽस्मि[26]’ ऐसें धर्म; शकुनिनें तयावरि स्वमतें
पण करविला तुझा, यावरुनि तरि न तूं जिता असें गमतें. २३

---

१. सत्व. २. ज्ञाते, जाणते. ३. रिकामे, शून्य. ४. पाठविले. ५. पतिधैर्य-रूप गजांचीं गंडस्थळें. ६. [पांडव] ह्मणति. ७. हाय! हाय! ८. नाशानें. ९. पांडवांचा क्रोधरूप अग्नि. १०. द्रौपदीचे कटाक्ष. ११. त्या कोपाग्नीला फुंकणी. १२. आपल्या मर्यादारूप दोरीनें. १३. हे मूर्खां! १४. हिसकाहिसक कर. १५. पुढें होणाऱ्या (वस्त्रहरणादि) दुःखाचा उपशम करण्यास. १६. समर्थ झालें नाहीं. १७. समर्थ. १८. सामर्थ्य. १९. उपहासपूर्वक. २०. क्षमारूप सखी. २१. हर्ष पावती. २२. सन्मान्य अशी. २३. हे सौभाग्यसंपन्न स्त्रिये! २४. अमूकच असें निश्चयानें. २५. कष्टकर. २६. मी जिंकला गेलों आहें.

द्यूतांत परस्वपण[1] स्थापाया निःस्व[2] जन नव्हे शक्त,
स्त्रीचें भर्तृवशत्व[3] हि पाहोनि न मीं वदों शकें व्यक्त." २४
कुरुवृद्ध[4] असें बोले, उपहासें ताप ते कितव देती.
सभ्यांसि निर्णयार्थ प्रार्थुनि पुनरपि अशंकित[5] वदे ती- २५
'द्यूतीं अनतिनिपुणनृप[6] कितवानीं आणिला बळें चि कसा ?
दावुनि कर्पूर जसा घालावा लोचनीं खळें चिकसा, २६
केलें तसें चि; हरिलें कपटें सर्वस्व, सेवटील पणें
नृप जिंकिला शकुनिनें; याला नरकीं च सेवटीं लपणें. २७
केलें स्वपरिभवांत[7] द्यूत, पुन्हां भूप दावु दारपण[8],
या बुद्धिनें शकुनिनें दाखविलें आपुलें उदारपण. २८
ऐसें असतां द्यूतीं अजिता मीं कीं जिता ? करा सवदा[9]
पुण्याचा, पुसिलें हें सत्य पहा, जोडित्यें करास, वदा. २९
कुरुगुरुवचन तसें जरि संदिग्ध वदाल तरि न भागावें[10];
अजि सभ्य हो ! जरि गुरु हि न हरी संदेह, तरि नभा[11] गावें.'
न वदे कोणही हि किमपि, दुःशासन धावरी करी तीतें;
'तद्रीति[12] सम' कवि म्हणो, 'ग्रामहरींच्या[13] बरीक[14] रीतीतें.' ३१
तें पाहुनि भीम म्हणे, 'राया[15] ! आम्हांसमक्ष कृष्णेची
हे दुर्दशा बरी कीं ? पूर्ति[16] असे कीं न अक्षतृष्णेची[17] ? ३२
आहेत कितव पुष्कळ, पुष्कळ त्यांच्या गृहांत बटकी ही,
स्नेहें ते हि न त्यांतें पण करिति, मदुक्ति काय लटकी ही ? ३३

---

१. दुसऱ्याच्या द्रव्याचा पण. २. निर्धन. ३. पतीच्या स्वाधीन असणें. ४. भीष्म. ५. निर्भीडपणें. ६. फार निपुण नसलेला धर्मराज. ७. आपला पराजय अंतीं ज्याच्या असें (द्यूत). ८. बायकोचा पण. ९. जोड ('सवदा' हा व्यापारवाचक फारसी शब्द आहे). १०. तसदी घेऊं नये. ११. आकाशाला—शून्याला. (गुरु च संदिग्ध बोलतील तर दुसरा कोणी निर्णय करील ही आशा च उरली नाहीं असा भाव). १२. त्या दुःशासनाची वागणूक. १३. ग्रामसिंह—कुत्र्याच्या. १४. मात्र. १५. धर्मराजा ! १६. पूर्तता, तृप्ति. १७. द्यूतक्रीडेच्या इच्छेची.

श्री बुडविली [1]महेंद्रश्रीतुल्या, मज इची नसे परवा;
पर [2]वामलोचनेच्या ऐकों न शकें चि या विलाप-रवा. ३४
या साध्वीस न दुःखद परकर चि, तुझा स्व-कीर्ति-हानि-कर
हा निकर पातकांचा; कैसा केला खळें [3]महा-निकर ? ३५
रे सहदेवा ! सत्वर पुष्कळसा अग्नि आण, [4]जा च कसा,
जाळूं [5]याचे हे कर, आम्हां हा सोसवेल जाच कसा ?' ३६
[6]श्वेताश्व म्हणे, 'बापा ! भीमा ! जीमाजि वास अ-[7]शिवाचा
केवळ बाळपणीं ही वदलासि न तूं कधीं हि असि वाचा. ३७
द्यूतीं [8]स्वधर्मगौरवधन बहुधा त्वां हि सर्व हारविलें;
उक्तींत तें दिसेना लेश, जसें [9]भित्तिचित्रं सारविलें. ३८
[10]क्षात्रव्रत स्मरोनि द्यूतीं पाचारिलें म्हणुनि आला,
[11]व्यसनी स्वयें नव्हे हा [12]आर्य, [13]अतिक्रमिसि कां बुधा ! याला ?
[14]सद्गुण [15]सुसेव्य हा [16]गुरुदेवप्रिय यासि, जेंवि हार बुनीं
घालिसि तापांत कसा ? गति कोण पुढें स्वसत्व हारवुनीं ?४०
आम्हां व्यसनार्तांची [17]धर्मस्थिति हे चि [18]बीज, पावें गा !
त्वां मोडावें न इला, स्वस्वास्थ्यसुखार्थ बा ! जपावें गा !४१
हें काय बरें ? या गुरुघातें रिपु परम मुदित होतील;
स्वमुखीं विष, अमृतरस व्याळमुखीं, कोण सुज्ञ ओतील ?'४२

---

१. इंद्राच्या संपत्तीसारखी. २. सुंदर नेत्र जीचे त्या द्रौपदीच्या. ३. मोठा अनर्थ. ४. लवकर जा कसा पाहूं. ५. या धर्माचे. ६. अर्जुन. ७. अकल्याणाचा. ८. स्वधर्माचें (स्वबंधुविषयक पूज्यबुद्धीचें) गौरव (महत्त्व) हें च धन. ९. सारविलेलें भिंतीवरील चित्र. १०. क्षात्रधर्म. ११. [द्यूताविषयीं] आसक्त. १२. श्रेष्ठ. (धर्मराज). १३. अवमानितोस. १४. या चरणांतील विशेषणें 'धर्म' व 'हार' या उभयपदांकडे लागतात. सद्गुण=उत्तम गुणयुक्त (पक्षीं) चांगल्या दोरीनें (सूत्रानें) तयार केलेला. १५. सेवा करण्यास योग्य (पक्षीं) सेवन करण्यास योग्य. १६. गुरु आणि देव प्रिय ज्याला तो (पक्षीं) गुरु आणि देव यांना प्रिय. १७. स्वधर्मानें राहणें. १८. खाटलें.

भीम म्हणे, '[1]न विनवितें जरि फार असें चि मन हि[2], कर करुनीं
[3]भस्म, ललाटीं धरितों, कीं करितों प्रथम बद्ध करकरुनीं.' ४३
निववी असुरांत जसा साधु प्रह्लादराय कवि-कर्ण
धृतराष्ट्रसुतांत तसा एक चि नय[4]निपुणनायक विकर्ण. ४४
भीष्मधृतराष्ट्रविदुरद्रोणकृपनृपांसि बोल[5] तो लावी
कीं, 'समयीं न वदावी तरि मग केव्हां स[6]दुक्ति बोलावी? ४५
बोला हो! बोला हो! बोला हो! सर्व सभ्य बोला हो!
अस[7]मयमौनें तुमच्या सुज्ञपणाच्या न हानि मोला हो. ४६
श्रवण तरि करा, मज जें सुचलेंसे, तें चि भीड तोडूनीं
वदतों, प[8]द तों गुरुचें न शिवों द्यावें शिखीसि, सोडूनीं. ४७
च्यार व्यसनें मृगया, स्त्री, पानें[9], द्यूत यांत जो सक्त,
तो धर्मच्युत, तत्कृत[10] सत्कृत[11] न, महाजनांत हें व्यक्त. ४८
धर्म द्यूतव्यसनीं झाला कितवांसि वश, पराभूत;
कां हो! भ्रांत करीना स्वम[12]तात्यशुचिक्रियापरा भूत? ४९
धर्म जयाच्या नाडीं लावुनि, जिंकूनि शकुनिनें आर्या
पण आपण चि करविली पांचांची आपुली सती भार्या. ५०
[13]अन्यर्त्विगननुमत जें द्रव्य न होतीं[14] असोनि, होमुनि तें

---

१. माझें मन मला असें तुझ्या म्हणण्याप्रमाणें वागण्यास न विनवितें, तर [धर्माचे] कर भस्म करूनीं (जाळून) इत्यादि. २. पाठांतर—**मन हि असें चि भस्म.** ३. पाठांतर—**आत्म.** ४. नीतिज्ञ जनांत श्रेष्ठ. ५. दोष. ६. सत्य—यथार्थ—भाषण. ७. अवेळीं धरलेल्या मुकेपणानें. ८. अन्वयार्थ—गुरुचें पद (वडीलपणाची पदवी—योग्यता) सोडून (तें) शिखीस (अग्नीस) शिवों न द्यावें. (तुह्मांला वडीलपणाचें स्थान मिळालें आहे, करितां या संकटप्रसंगीं मौन धरून त्या वडीलपणाची राखरांगोळी करूं नका, असा भावार्थ). ९. मद्यपान. १०. त्या व्यसनासक्त पुरुषाची कृति. ११. सन्मान्य. १२. आपले मतानें अतिशय अपवित्र कर्म करण्याविषयीं तत्पर अशाला. १३. अन्य ऋत्विजांस अमान्य. १४. [जो] होता (यज्ञ करणारा) न असोनि (नसोनि).

होइल सभेंत बहुमत तो एकातरि हि काय हो ! सुनितें ? ५१
द्यूतीं साधा[१]रण धन, पण करुनि, नव्हे चि एक हारविता[२].
गिळिल दुराग्र[३]हराहु, त्यजिना परि मद्विचार हा रविता[४]. ५२
सभ्यांमाजि वदाया विहित असें बोलतां चि अजि तत्व,
हरिकीर्ति सती[५] हे ही तुल्या, यांचें समान अ-जितत्व[६].' ५३
तें साधु[७] 'साधु ! साधु ![८]' ध्वनि करिती म्हणाति, 'बोल[९] कानांहीं
प्यावे[१०] असे चि, तूं कीं विदुर, तिजा[११] स्पष्ट बोलका नाहीं. ५४
न्याय[१२]मृकंडसुताच्या दुस्तर[१३]धृतराष्ट्रजाब्धिसाधुवटा !
सभ्या ! भला भला ! विधु[१४] लाजेल तुझ्या चि मानसा[१५] धुवटा.'
कर्ण म्हणे, "वाचाळा ! रे ! सर्वस्व[१६]ग्लहांत हे[१७] आली;
अजिता कसी ? तुझी मति मतिमंदा ! विदुरबुद्धिची आली[१८].
वरकड हे काय मुके ? वक्ता धर्मज्ञ तूं चि ? बैस उगा.
न भला स्वभाव हा तुज बालिशजनपंक्तिला न बैसउ गा ! ५७
न वदति सभ्य, न पांडव, जरि हे कृष्णा म्हणे, 'अहो ! सांगा'
अजिता असती तरि हे तैसें चि स्पष्ट न वदते कां गा ! ५८
म्हणसील 'सभेंत सती नाणावी,' तरि सती न हे अ-सती;
असतो एक सतीचा उपभोक्ता, पांच ते इला असती. ५९
आनयन[१९] सभेंत इचें, कीं हें एकांबर[२०]त्व न विचित्र;
नग्नत्व हि नवल नव्हे; न चुना बहु नासिकेसि[२१] ज्या श्वित्रें[२२]. ६०
सस्त्रीक सधन पांडव शकुनिजित स्पष्ट, काय बोलसि ? रे !

---

१. समाईक. २. हारविणारा. ३. दुराग्रह हा च राहु. ४. सूर्यपणा. ५. पतिव्रता. (द्रौपदी). ६. अजिंक्यपणा. ७. सज्जन. ८. उत्तम उत्तम! ९. भाषण. १०. श्रवण करावें. ११. तिसरा. १२. न्याय हा च मार्कंडेयमुनि, त्याच्या. १३. तरण्यास कठिण अशा धृतराष्ट्रसुतरूप समुद्रांतील उत्तम वटवृक्षा! १४. चंद्र. १५. स्वच्छ, निर्मल अशा मनाला. १६. सर्व धनाच्या पणांत. १७. ही द्रौपदी. १८. मैत्रीण. १९. आणणें. २०. एकवस्त्रता. २१. नाकास. २२. श्वेतकुष्ठ, पांढेर कोड.

दे तो सभेंत लघुता[1], जो स्वाविषयीं[2] बळें चि बोल शिरे. ६१
दुःशासना! न याचे ऐकावे फोल बोल; हा बाळ
गोष्पतिपुढें[3] मिरवितो साक्षरता[4] दाखवूनि गाबाळ[5]. ६२
वदतो बुधांत भलतें, बोलाया न स्त्रियांत हि सकोनीं;
हूं, घे पांडववस्त्रें, या दासीचें हि वस्त्र हिसकोनीं." ६३
तें ऐकतां चि वस्त्रें टाकुनि, उघडे चि पांच ही बसले.
भीष्म म्हणे, 'हें दुःसह, हृदयांत असा न शरकदंब[6] सले. ६४
माहात्म्य सतीचें हो, देवा! पावो न आस[7] विलयाला;
'हे[8] आपणासि ह्मणत्ये बाळमृगी[9], स्पष्ट आसविल[10] याला[11].' ६५
दुःशासन सोडाया झोंबे स्वकुळाहितोद्या[12] लुगड्या,
तेव्हां स्मरली कृष्णा[13], कृष्णा दीनांचिया दयालु गड्या. ६६
तो दुर्जन आधीं ही साधूंच्या करुनि हानि रीतीची,
नग्न सभेंत कराया पाहे खळ धरुनि हा निरी तीची. ६७
जें दुर्दशा कराया दुर्दैवें सिद्ध नीच हा केला,
तें दीनबंधुला ती कृष्णा मारी मनीं च हाकेला. ६८
"हे नाथ! रमानाथ! व्रजनाथ! हरे! मुकुंद! कंसारे[14]!
गोविंद! कृष्ण! केशव! दीनार्तिहरस्त्वमेव संसारे[15]. ६९
काळें हि सख्या! न तुझ्या दासीस पहावयास हि सकावें,
त्वद्भगिनीवस्त्र खळें नग्न करायास काय हिसकावें? ७०
जीहुनि नसे सुभद्रा तुज बहुमान्या, अकीर्ति हे तीची;[16]

---

१. कमीपणा. २. आपला विषय नव्हे त्यांत. ३. बृहस्पतीपुढें. ४. विद्वत्ता. ५. गदळग्रंथ. ६. बाणसमूह. ७. 'माहात्म्य सतीचें हो' ही आस. ८. ही द्रौपदी. ९. बालहरिणी. १०. आस्वल. ११. दुःशासनाला. १२. स्वकुळनाशाच्या उपायाकरितां. १३. द्रौपदी. १४. कंसशत्रो! १५. संसारांत दीन जनांचें दुःख हरण करणारा तूं च आहेस. १६. त्या तुझ्या बहिणीची (माझी).

धांव दयाब्धे[1]! होत्ये विश्वांत तुझ्या अकीर्ति हेतीची[2]. ७१
झालासि त्राता चि, न, होउनि विधिच्या[3] अधीन, होगलिता;
बिरुदावली[4] तुझी हे गजवरवरदा[5]! कधीं न हो गलिता[6]. ७२
'भगिनी' ऐसें वदल्यें, परि फार चि लाजल्यें, न हें लटिक[7];
प्रभुजी! रक्षा, तुमच्या दासांची मीं लहानसी बटिक. ७३
जिंकिल काय खळा तो, जिंकी द्यूतीं[8] न धर्म जो डावा?
सुज्ञें पंकपतितपरधेनूद्धरणें[9] हि धर्म[10] जोडावा. ७४
भागा[11], या, गाय तसी मीं, न धरी अघभयास[12] हा यवन[13];
गुरुजनसद[14] पाळक, परि झालें या निर्दया सहाय वन[15]. ७५
कोत्यर्थ उद्धरीं मज, उद्धरिलें[16] जेंवि सागरीं महिला;
त्वद्दासांची होती त्या अमृतीं[17], आजि या गरीं[18] महिला[19]. ७६
बा! ढळतां तिल हि पदर भावि[20] व्यजनासि[21] सागस[22] रामा[23] जी,
ती[24] खळसभेंत उघडी पडत्ये न पडोनि सागरामाजी. ७७

---

१. दयासागरा! २. शस्त्राची. ३. ब्रह्मदेवानें एकदा गोकुळांतील गोप, गायी आणि गोवत्स यांस धरून नेलें असतां, स्वसामर्थ्यानें त्या सर्वांस पुन्हां निर्माण करून श्रीकृष्ण त्यांचा त्राता झाला; पण ब्रह्मदेवाच्या अधीन होऊन होगलिता (मूर्खपणानें ऐश्वर्य घालविणारा) झाला नाहीं. ४. यशाची पंक्ति. ५. गजेन्द्रास वर देणाऱ्या! (अगस्तिमुनीच्या शापानें गजेन्द्र झालेल्या इंद्रद्युम्नराजास विष्णूनें शापमुक्त केल्याविषयींची 'गजेन्द्रमोक्षकथा' प्रसिद्ध च आहे). ६. भ्रष्ट. ७. खोटें. ८. [फांशाच्या] खेळाला. ९. चिखलांत पडलेल्या दुसऱ्याच्या हि धेनूचा उद्धार करून. १०. पुण्यांश संपादावा. ११. कष्टी व्हा. १२. पापभयाला. १३. हा यवनासारखा दुष्ट दुःशासन. १४. श्रेष्ठ लोकांची सभा. १५. अरण्य. (निर्दयाला जसें अरण्यांत वाटेल तें दुष्कृत्य करितां येतें त्याप्रमाणें). १६. [कूर्मावतार घेऊन] उद्धरिलें. १७. अमृततुल्य सुखांत. १८. विषतुल्य दुःखांत, संकटांत [पडली आहे]. १९. भार्या द्रौपदी. २०. मानित असे. २१. पंख्यास. २२. अपराधी. २३. स्त्री. २४. ती द्रौपदी दुष्टांच्या सभेमध्यें उघडी पडत्ये, यापेक्षां समुद्रांत बुडत कां नाहीं?

भो भगवन्! भो वत्सल! भो हतचाणूरमल्ल[1]! भागावें[2].
विश्वें तुझें चि, दुसरें न, यश श्रीप्राणवल्लभा[3]! गावें. ७८
आजि असत्परपुरुषस्पर्श[4], न अपराध अन्य केला हो!
झांका प्रसादपदरें न कुजनदृक्स्पर्श[5] कन्यकेला[6] हो." ७९
अवतरला उतराया जो दुःसह दुष्टभार महिवरला,
अहिवरलास्यपटु[7] प्रभु करुणोक्तें द्वारकेंत गहिवरला. ८०
परमेश्वर रूप धरी स्वपर[8]-जन-हितोदया लुगडियांचें,
निववाया सभ्यांसह नयन मन हि तो दयालु गडियांचें[9]. ८१
हा अंबरावतार[10] श्रितलज्जारक्षणार्थ अकरावा[11],
प्रभुमत असें, 'सदवनीं[12] आग्रह वेषीं कदापि न करावा.' ८२
शेले, शालू, साड्या, क्षीरोदकें[13], लांबरुंद पाटावें[14],
झाला अनंत वस्त्रें, कीं, तीसि अनाथसें न वाटावें. ८३
पदसेवार्थ चि भजती अनवरत[15] महाविभूति ज्या निपट[16],
तो कृष्णावपु झांकी होवूनि महाविभूतिजानि[17] पट. ८४
पहिलें वसन व्यसनप्रतिपादनपटु[18] करें कुमति सोडी,
तों दुसरें आहे चि प्रथमाधिक वस्त्र, त्यास ही ओढी. ८५
कृष्णादेहसदंबररत्नाकर[19] त्यासि खळभुजा[20] टिटवी,

---

१. [कंससभेंतील] चाणूरनामक मल्ल ज्यानें मारिला आहे अशा! २. कष्टी व्हावें. (धांवत यावें). ३. हे लक्ष्मीच्या प्राणप्रियकरा! ४. दुष्ट परकी पुरुषाचा स्पर्श. ५. दुष्टांच्या दृष्टीचा स्पर्श. ६. 'क' हा प्रत्यय वात्सल्य, अनुकंपा व अल्पत्व दर्शवितो. ७. सर्पश्रेष्ठ जो कालिय त्याच्या फणांवर नृत्य करण्यांत कुशल असा. ८. आपल्या भक्तजनांच्या उत्कर्षाकरितां. ९. मित्रांचें. (पांडवांचें). १०. वस्त्ररूप अवतार. ११. मत्स्यकूर्मादि दशावतार व हा अकरावा. १२. सांधूंचे रक्षणाविषयीं. १३. पांढरें पातळ. १४. रेशमी वस्त्रें. १५. नित्य, अखंड. १६. केवळ. १७. महाविभूति (लक्ष्मी) आहे जाया ज्याची तो (कृष्ण). १८. दुःख देण्यांत कुशल असा. (दुःशासन). १९. द्रौपदीचा देह हा च उत्तम वस्त्रांचा सागर. २०. दुष्ट दुःशासनाची भुजा (हात) ही च टिटवी.

उपर्सी, परि गांभीर्यें आपण न '[1]उहूं' म्हणोनि तो[2] विटवी. ८६
मानिति [3]माया केवळ अल्प सभेंतील भूमितळ [3]पट, हो!
म्हणति अदित्यादि [4]सत्या, 'या मेल्यांचें समूळ तळपट हो.'
जें झांकिलें अनंतें दिव्यें भव्यें सदंबरें [5]सुघडें,
तें [6]साधुकाय काय क्षुद्रमति करील नागवें उघडें? ८८
तो शतशः पट झटझट फेडुनि भागे, सभेंत वेडावे,
किति खळबळ? जळनिधिचे किति दुस्तरतर [7]तरंग [8]फेडावे?
होय सभेंत '[9]हलहला' स्वन, कृष्णेसि प्रशंसिती राजे;
'छी!' ते हि खळासि म्हणति, गेले [10]भवनदपरप्रतीरा जे. ९०
भीम म्हणे, 'राजे हो! तरि [11]पूर्वजगति न हो मला, परिसा,
जरि दुःशासन-[12]वक्षःक्षतज न सेवीन मीं स्वयें हरिसा.' ९१
सभ्य सकळ '[13]साधु!' म्हणति भीमातें, 'धिक्!' खळास ही ह्मणती;
हरि! हरि! हरि-हरिणांत चि [14]त्यांची केली च त्या जनें गणती.
तेव्हां विदुर म्हणे, "हो! [15]प्रश्नोत्तर द्या, न सत्य बुडवावें,
कीं [16]देवभोग्य [17]दाम न बालें सुज्ञांसमक्ष तुडवावें. ९३
प्रह्लादसुत विरोचन, विप्र सुधन्वा सुशील [18]आंगिरस;
[19]प्राणपणवृत्त यांचें परिसा हो! यापुढें अमृत विरस. ९४
[20]स्वकरग्रहणोद्युक्तां त्या दोघांला हि केशिनी[21] कन्या
प्रार्थुनि म्हणे, 'भजेन, श्रेष्ठ उभयतांत जो, तया धन्या.' ९५

---

१. नको. २. वस्त्ररूप रत्नाकर. ३. पट (वस्त्रें) मावण्यास. ४. पतिव्रता स्त्रिया. ५. चतुरें. (चांगली घटना–रचना–करणाऱ्यानें). ६. सज्जनाचें शरीर. (द्रौपदीचें पवित्र शरीर). ७. लाटा. ८. दूर करावे, निवारण करावे. ९. 'हा! हा!' असा शब्द. १०. संसाररूपी नदीच्या परतीराला. ११. पूर्वजांस मिळालेली सद्गति. १२. उरांतील रक्त. १३. शाबास! १४. भीमदुःशासनांची. १५. द्रौपदीच्या प्रश्नाचें उत्तर. १६. देवानीं उपभोग घेण्यास योग्य. १७. माळ, पुष्पहार. १८. अंगिराऋषीचा पुत्र. १९. प्राणांचा आहे पण ज्यांत असें वृत्त. २०. आपल्या विवाहाविषयीं उत्सुक अशा. २१. एक राजकन्या.

'मीं वर,' म्हणे सुधन्वा कीं साक्षात् तात अंगिरा ज्याचा;
'मीं वर,' म्हणे विरोचन कीं तो सुत साधुसंगि[1] राज्यांचा.
'श्रेष्ठ नव्हेसा झालों तरि यावज्जीव मीं तुझा दास,'
ऐसा प्राणपण तिहीं केला हो! करुनियां विवादास. ९७

विप्र म्हणे, 'चाल, पुसों दोघे ही हें तुझ्या चि बापाला;
मज मान्य तदुक्त[2] असे, कीं तो भीतो अकीर्ति-पापाला.' ९८
प्रह्लादास म्हणे मुनि, 'जें सत्य असेल सांग कविपा[3]! तें;
वदतां अयथार्थ तुझा मूर्धा शतधा फुटेल पविपातें[4].' ९९
जाय[5] पुसाया त्यातें, ज्या सुतपोराशि[6] कश्यपा दास
जितसे[7] षडरि[8] भजति, यमनियम[9] हि, होऊनि वश्य पादास.
प्रह्लाद म्हणे, 'स्वामी! वक्ता अस्पष्ट कीं मृषा[10] वक्ता
प्रेत्यगति[11] कसी त्याची? हें सांगावें तुम्हीं मला भक्ता.' १०१
कश्यप म्हणे, 'कळोनि न बोले जो स्पष्ट, त्यास वरुणाचे
दशशत पाश करकरुनि बांधिति पापकृदृष्टकरुणाचे[12]. १०२
जो साक्षी अनृत वदे, वत्सा! त्याची हि होय ती च गती;
वर्षांतीं एक[13] सुटे, एवं[14] च सहस्र अब्द[15] ते तगती. १०३
जेथें धर्मिष्ठाला खोटेपण लाविती स्वयें खोटा,
तेथ अवचनें[16], अनृतें[17], संदिग्धें[18] घात होतसे मोटा. १०४

---

१. सत्पुरुषांचा सहवास ज्यास आहे त्या राजा (प्रऱ्हादाचा). २. प्रऱ्हादाचें भाषण. ३. कविश्रेष्ठा! ४. वज्राच्या आघातानें. ५. [प्रऱ्हाद] जाय. ६. उत्तम तपाचा सांठा च अशा. ७. जिंकलेल्या दासासारखें. ८. कामक्रोधादि षड्रिपु. ९. यम=अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह; नियम=शौच (शुचिर्भूतपणा), संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वरप्रणिधान (सर्व कर्मं ईश्वरार्पण करणें). १०. खोटें. ११. मेल्यानंतरची गति. १२. पाप करणाऱ्याविषयीं पाहिली नाहीं करुणा ज्यानें अशा (वरुणाचे). १३. एक पाश. १४. याप्रमाणें. १५. वर्षें. १६. मुकेपणानें. १७. मिथ्या बोलण्यानें. १८. संशयित, अस्पष्ट बोलण्यानें.

हें धर्मशल्य[1] दूर न करितां, दुरितार्धभाग[2] भर्त्याला,[3]
उरल्या दुरितार्धाचा सभ्यांला[4] पाद,[5] पाद कर्त्याला. १०५
भूतपुरुष[6] सप्त, तसे भावी ही सातजण, असे चवदा
वदतां अनृत बुडवि तो, याकरितां साधु हो! खरें च वदा.
हृतधन,[7] हतपुत्र,[8] ऋणी, व्याघ्र-नृप-ग्रस्त,[9] साक्षिहत,[10] बा! हे
समदुःखः असी च स्त्री सुतहीना कीं जिला सवत आहे; १०७
हीं दुःखें पडति गळां त्याच्या, जो पुरुष बोलतो लटिकें;
वत्सा! पळ हि विनोदाकरितां हि तशासमीप तूं न टिकें.'
प्रार्थुनि आज्याला,[11] ज्या राज्या माजानिसेवकें[12] उक्ती
आइकिल्या, त्या वरिल्या, भवतरि[13] देवर्षिच्या[14] जशा युक्ती.१०९
प्रल्हाद म्हणे, 'पुत्रा! आवडतो धर्म, तेंवि तूं न मज;
तुजपरिस हा सुधन्वा श्रेयान्[15] स्वमनांत हें बरें समज. ११०
याचा चि पिता श्रेयान्, न तुझा श्रेयान् पिता; तुझी माता
न श्रेयसी तसी, जसि याची माता; यथार्थ हें ताता![16] १११
त्वत्प्राणेश[17] सुधन्वा, जा दास्य करीं जपोनि आमरण;
विप्रचरणपरिचरण[18] चि कामद;[19] पुरवील काय काम रण?' ११२
विप्र[20] ह्मणे, 'साधो![21] त्वां त्यजिला नंदन हि, धर्म न त्यजिला;
घे सुत दिला.' तिला कां न जपेल मुकुंद मान्य सत्य जिला?[22]
ऐसी कथा असे हो! उपेक्षितां जीवनासि[23] गाय[24] मुके,

१. धर्माला बाधक असें कृत्य. २. पापाचा अर्धा वांटा. ३. सभापतीला, सभाध्यक्षाला. ४. सभासदांला. ५. चतुर्थांश. ६. मागील पुरुष, पूर्वज. ७. ज्याचें धन हरण झालें तो. ८. ज्याचे पुत्र मेले तो. ९. वाघानें किंवा राजानें ग्रासलेला. १०. साक्षिदारानीं ज्याचा घात केला तो. ११. प्रल्हादाचा आजा जो काश्यप मुनि, त्याला. १२. लक्ष्मीपति विष्णूच्या भक्तानें. (प्रल्हादानें). १३. संसारसमुद्रामध्यें नौकारूप. १४. नारदाच्या. १५. श्रेष्ठ. १६. बाळा! १७. तुझा मालक. १८. ब्राह्मणपदसेवा. १९. इच्छा पुरविणारी. २०. सुधन्वा. २१. प्रल्हादा! २२. द्रौपदीला. २३. जीवितासि. २४. हीं गाईसारखी दीन द्रौपदी.

मौन[1]शिशुचे चि घेतां त्यागुनि सत्यामृतासि काय मुके?"११४
आर्येला[2] मानियलें बहु पाहुनि सज्जनीं चमत्कृतिला[3];
खळ चि न मानिति; जैसे बहुदूषणसज्ज[4] नीच मत्कृतिला[5].११५
कोणही हि दयाळु न ती, त्या पंकांतूनि गाय काढी गा!
भी कृष्णा त्या मूर्ता[6] पापांच्या त्रासदायका ढीगा[6]. ११६
देवी म्हणे 'रहा क्षण, करिसी निरयार्थ[7] काय जोडि[8], खळा!
सभ्योक्त आयकों दे, रे! न शिळेला[9] अपाय जो डिखळा. ११७
पुसिलें तें सांगा जी! अजि सभ्य! तुह्मांसि विनवित्यें नमुनी
न वदावें हें सङ्गत; परि यांसि[10] सभेंत आणिती न मुनी.' ११८
ऐसें वदतां, वोढुनि पाडी, ओढी तशा हि पतितेतें[11];
विषसें गिळिती तीचें पडणें रडणें तदीय पति ते तें. ११९
कृष्णा म्हणे, 'अहा! जी! द्रुपदसुता, धर्मनृपतिची भार्या,
श्रीमद्यदुनाथसखी[12], मानवल्या[13] सर्वदा जिला आर्या[14], १२०
तीला खळ ओढितसे वात हि न विशंक जीस आतळला[15];
न वहता[16] ताप, कटाहीं[17] जरि असता सुचिर काय हा[18] तळला.
केला तप्त अनघजन[19] तैलाच्या तापल्या हि न कटाहें;

१. मौनरूप पुत्राचें. २. द्रौपदीला (पक्षीं) पंतांच्या आर्याछंदाला. ३. भगवंतानीं वस्त्रें पुरवून केलेल्या चमत्काराला (पक्षीं) पंतांच्या आर्येतील शब्दार्थचमत्काराला. ४. अनेक दूषणें देण्यास तत्पर (पक्षीं) काव्यदोष काढण्यांत पटाईत. ५. माझ्या (विदुराच्या) मताला (पक्षीं) माझ्या (मोरोपंताच्या) काव्यकृतीला. ६. मूर्तिमंत पापाच्या राशीला. (दुःशासनाला). ७. नरकप्राप्तीकरितां. ८. साधन. ९. दगडाला मातीच्या डिखळासारखी भीति नसते; तसें, तुला जर सत्याचें बळ असेल, तर सभासदांच्या भाषणाचें भय नको, असा द्रौपदीचा आशय. १०. या मानव्रतासि. ११. पडलेलीला. १२. श्रीमान् यादवश्रेष्ठ कृष्णाची सखी. १३. मान देत्या झाल्या. १४. श्रेष्ठ स्त्रिया. १५. स्पर्शला. १६. न होता, झाला नसता. १७. कढईमध्यें. १८. हा माझा सुंदर देह. १९. निष्पाप जन.

कुरुगुरु धन्य! सहाता न जनें धिक्कारिला हि नकटा[1] हें. १२२
कष्टें सांचविलें यश बुडवितसे मंद[2] मत्त, पाहूनी
साहति कसें नवल हें, ज्यांचें तप उग्र मत्तपाहूनीं? १२३
सांगा यांची[3] दासी कीं मीं दासी नव्हें? मता[4] निवडा.
श्रवणीं[5] धरूनि सूक्ता[6] राजसभा शोभते न तानिवडा[7].' १२४
भीष्म म्हणे, 'गे बाई! वदलों पहिलें चि सूक्ष्म धर्म-गती,
ज्ञात्यांला हि कळेना, इतरांसि कळेल काय गे! मग ती? १२५
बळवान् वक्ता असतां होय अधर्म हि सुधर्मसा धन्ये!
दुर्बळ वक्ता असतां, धर्म हि होतो अधर्मसा कन्ये!' १२६
श्रीभीष्माशय[8] हा कीं, 'अजिता म्हणतां चि हे अतिक्रुद्धा
जाळील कौरवांतें, अन्यायें गांजिली सती शुद्धा. १२७
द्रौपद्यपमानज[9] कीं कुरुनाशज[10] दोष गुरु[11]? न हें समजे.
कौरवनाश[12] चि होतो, उरतात उद्दंड दुष्ट यांसम जे. १२८
पांडव अशस्त्र केवळ परदास हि, धार्तराष्ट्र[13] तत्स्वामी;
कृष्णेस हि दोषावह तन्नाश[14], नसो कळंक तद्धामीं[15]. १२९
खळलय होणार चि, मग तप बुडवावें किमर्थ सांचविलें?'
ऐसें चिंतुनि भीष्में स्पष्ट न बोलोनि त्यांस वांचविलें. १३०
'जें व्यसनीं सद्वृत्त[16] त्यागावें, तें च कर्म अति नीच;

---

१. नकटा हि. (वास्तविक कुरूप असून हि जर कोणाचा धिक्कार केला तर तो हि हें न सहाता). २. मूर्ख. ३. कौरवांची. ४. निर्णय करा. ५. कानांत. ६. उत्तम भाषणातें, सुभाषितातें. ७. कर्णभूषणातें. ८. आशय=मनांतील हेतु. ९. द्रौपदीच्या अपमानापासून झालेला. १०. कौरवांच्या नाशापासून झालेला. ११. मोठा. १२. द्रौपद्यपमानज दोष गुरु म्हणावा, तर द्रौपदी क्रुद्धा होऊन या वेळीं केवळ कौरवांचा च नाश होईल; पण मग कौरवांसमान जे इतर पुष्कळ दुष्ट आहेत ते तसे च राहतील. १३. कौरव. १४. कौरव हे पांडवांचे स्वामी झाले असल्यामुळें त्यांचा नाश करणें द्रौपदीला हि दोषावह च होय. १५. तिच्या तेजाचे ठिकाणीं. १६. सदाचरण.

अत्याज्ज धर्मपथ, हें तुज कथिलें, न वदतां हि, पतिनीं च. १३१
वत्से! [१]सत्सेव्य त्वत्सत्वा [२]दृग्दोषलव नसो, सकता
न सहाया शांत हि या व्यसना, अन्यत्र हे न [३]सोसकतां. १३२
सांगो धर्म जिता तूं कीं अजिता हें, प्रमाण तें चि सति!
[४]सत्वसुधानदि कृष्णे! [५]व्यसुसे द्रोणादि सभ्य हे दिसती.' १३३

अध्याय सहावा.

दुर्योधन हि म्हणे, "गे! धर्मास '[६]अनीश [७]अनृत' हें चवघे
तव [८]धव भीमादि मुखें म्हणोत, ऐकोत सभ्य हे अवघे. १
[९]येणें चि दासभावापासुनि तूं पावसील सुटकेला.
[१०]अस्मत्प्रसादकारण हें चि, न [११]शतवार [१२]पाणिपुट केला. २
कीं 'मीं अनीश्वर' असें धर्म म्हणो साधुरीतिस त्यजुनीं;
[१३]आवडती तूं चि नवी, बहु नावडती च होय सत्य जुनी. ३
काय वदतील सभ्य? व्याकुळ झाले तुझ्या चि तापानें,
कीं [१४]एकदा चि फुटलें त्वत्पतिपंचककपाळ पापानें." ४
त्या दुर्योधनवचनें [१५]खळबळलें [१६]तदनुजादिखळबळ तें,

---

१. साधूनीं सेवा करण्यास पात्र. २. दृष्टिदोषाचा लव नसो=दृष्टि न लागो. ३. सहनशीलपणा. ४. सत्वरूपी अमृताची नदी च अशा कृष्णे! ५. मेल्यासारखे. ६. [हा आमचा] स्वामी नव्हे असें. ७. असत्यवक्ता असें. ८. पति. ९. या अशा म्हणण्यानें. १०. [तुजवर] आमची कृपा होण्याला कारण—उपाय. ११. शेंकडो वेळां. १२. पाणिपुट करणें=हात जोडणें. (कोणत्या हि वस्तूचा द्रोणासारखा आकार करितात तो पुट; जसें:—अंजलिपुट, श्रवणपुट, कर्णपुट, पर्णपुट इ०). १३. तूं नवीन म्हणून आवडती व साधुरीति जुनी म्हणून नावडती होईल; अर्थात् साधुरीति सोडून धर्म तुझा स्वीकार करील असा भावार्थ. १४. एकदम. १५. क्षुब्ध झालें. १६. त्या दुर्योधनाच्या धाकट्या भावांचें दुष्ट मंडळ.

जैसें श्रवणीं पडतां साधूक्त [1]पिशाचकटक खळबळतें. ५
धर्माकडे चि पाहत होते ते कुजन सुजन ही, परि तो
किमपि न वदला; बहुधा [2]संमयीं [3]समयज्ञ मौन ही धरितो. ६
भीम म्हणे, "[4]अस्मदसुप्रभु धर्म, नृपेंद्र हा नव्हे लटिका,
नसतें असें, तरि मला तुमच्या मथना न लागती घटिका. ७
कपटद्यूतीं अजित हि नृप जरि जित आपणासि मानील,
मानूं तसें चि आम्हीं, अस्मद्रीतीस विश्व वानील. ८
हे कृष्णा तीं अजिता, ऐसें हि असोनि साहतों अनया,
गुरुवश नसतों तरि अरिरुधिरांच्या कां विनिर्मितों न [5]नैया?
[6]हे काय अशक्त? पहा या माझ्या वज्रतुल्य बाहूंतें;
यांच्या आकृतिला जें उचित, [7]भुजगराजतेज [8]बाहूं तें. १०
माते! [9]क्षमे! म्हणों दे या [10]त्वद्वशगा [11]मनुष्यदेवा 'हूं,
हो भीम पळ [12]विशृंखळ, खळखळ खळरक्तपूर दे बाहूं.' ११
गुरु आज्ञा देता, तरि [13]अरिकरिहरि मीं [14]सपत्न-शशकांतें
वधितों, काय श्रम मज मथितां या धार्तराष्ट्र-मशकांतें? १२
आज्ञा पुन्हा कशाला? आहे पहिली च गुरु [15]वराज्ञा; ते
न पुसति पुनःपुन्हा जे झाले सेवूनि गुरुवरा ज्ञाते." १३
भीष्म द्रोण विदुर त्या क्रुद्धाला म्हणति, 'बा! न कोपावें,
करिसील सर्व; संप्रति ह्मणतोसि तसें करूं नको, [16]पावें.' १४
कर्ण म्हणे, 'हे च [17]तिघे [18]धर्मविलंघनसमर्थ, चवथा न;

१. भूतसैन्य. २. संकटसमयीं. ३. कोणत्या वेळीं कसें वागावें हें ज्यास समजतें तो. ४. आमच्या प्राणांचा स्वामी. ५. नद्या. ६. हे बाहु. ७. शेषाचें सामर्थ्य. ८. बोलावूं. (या बाहूंच्या तेजाला ज्याची बरोबरी साजेल असें एक शेषाचें च तेज आहे, असा भावार्थ). ९. हे सहनशीलते! १०. तुला वश असणाऱ्या. ११. राजा धर्माला. १२. उच्छृंखल, निर्बंधरहित. १३. शत्रूरूप गजांचा सिंह च असा. १४. शत्रुरूप सशांना. १५. वररूप आज्ञा. १६. कृपा कर. १७. भीष्म, द्रोण, विदुर. १८. स्वधर्माचें उल्लंघन करण्यास समर्थ.

यांसि तसें पतिनिंदाव्यसन[१], जसें दे मुलांसि चव थान. १५
इच्छिति मूळच्छेद[२] स्वामीचा, न गणिती महाघातें[३],
व्याकुळ मनीं न होती, सुकृतयशांच्या अशा महा घातें. १६
द्रौपदि! ऐक मदुक्त, छात्र[४] तनुज दास हे अधन; यांत
तूं दासधन[५], सुयोधन नाथ तुझा, स्पष्ट हें स्मृति-नयांत[६]. १७
दुर्योधनदारचरणसंवाहननिरतबुद्धि[७] हो भावें,
त्वन्नाथ धार्तराष्ट्र, न पांडव, दोनीं[८] तुवां न लोभावें. १८
अथवा स्वपतिजयें जरि आत्मजयातें[९] न मानिसी स्वमतें,
तरि तूं तरुणि अपतिका[१०], अन्य करीं कांत हें भलें गमतें. १९
वर्तति मनमानेसें सुरतपरा[११] अपतिका स्त्रिया बटकी,
तें तुज विदित असो, गे! जो तो कामी गळां पडे, हटकी[१२]. २०
तुज परिमितपतिक[१३] असा काशाला दारभाव? सांडावा.
अपरिमितपतिक दास्य स्वीकारुनि कामचार[१४] मांडावा. २१
सहदेव नकुळ अर्जुन भीम युधिष्ठिर हि दास हे अवघे,
न तुझे पति, तूं दासी, जो तुज मानेल तो सुखें धव घे.' २२
ऐसें ऐकुनि सोडी अहिपतिसा[१५] भीमसेन सुसकारा,

---

१. राजाच्या (दुर्योधनाच्या) निंदेचें व्यसन. २. समूळ नाश. ३. मोठ्या पापाला. ४. शिष्य, पुत्र व दास हे तिघेजण अधन होत; त्यांच्या धनावर अनुक्रमें गुरु, पिता व धनी यांचा हक्क आहे. ५. तूं दुर्योधनाचे दास जे पांडव त्यांचें अर्थात् दुर्योधनाचें धन आहेस. ६. स्मृत्युक्तनीतींत. ७. दुर्योधनाच्या बायकोचें चरणमर्दन करण्याविषयीं तत्पर बुद्धि जिची अशी. ८. दोन पांडवांचे ठिकाणीं. ९. आपल्या पतीला जिंकल्याच्या योगानें आपल्याला हि जिंकलें असें. १०. पतिहीना. ११. संभोगसुखेच्छु स्त्रिया. १२. हाका मारीबोलावी. १३. नियमित पति ज्यांत असा. १४. स्वैरवर्तन. १५. सर्पश्रेष्ठ शेषासारखा.

बहुधा गुरुसंकोच ग्रासी तन्नामवर्ति[1] सु-'स'कारा. २३
भीम म्हणे धर्मातें, "राया! या नीच सूततनयास[2]
काय म्हणों? 'स्वकुळोचित वदतो,' ह्मणतील साधुजन यास.
द्यूत न करितासि जरि न्यायें जरि वर्ततासि, तरि बापा!
कां होतों दास? नृपा! स्वप्नांत हि न करितां किमपि पापा.२५
कां या सभेंत करिते अरि तेजोभंगें[3]? कां असें वदते?
जे शशरवें[4] विरावे, देती मृगराजमस्तकीं पद ते!" २६
तों दुर्योधन बोले 'धर्मा! अजिता जरि द्रुपदतनया
तरि वद, वदन वरि करीं, कीं जाणसि सुज्ञ तूं नया अनया.'
ऐसें पुसे, कुचेष्टा तो दुर्मद[6] त्या सभेंत ही मांडी·
कृष्णेदेखत दावी डावी उघडी करूनियां मांडी. २८
भीम ह्मणे, 'जरि समरीं या मांडीवरि गदा न बसवीन,
तरि पितृसालोक्यांतें[7] क्षण हि न पावेन, नरक[8] वसवीन.' २९
विदुर ह्मणे, 'हे अजिता, खळ हो! हें कर्म काय हो! करितां?
कैंचें कुशळ शशांचें, शापुनि[9] समरासि सिंह होकरितां[10]?' ३०
पुनरपि सुयोधन ह्मणे, "कृष्णे! चौघे 'अनीश धर्म' असें
बोलोत, मुक्त करितों; कीं मत्सदनीं करूनि कर्म असें[11]." ३१
जिष्णु म्हणे, 'यापूर्वी होता हा ईश आमुचा साचा,
आतां प्रभु कोणाचा? न मला संकोच दुष्टदासाचा[12].' ३२

---

१. 'भीमसेन' या नांवांत असलेल्या उत्तम 'स' कारास गुरुसंकोच (धर्माची भीड) ग्रासी, म्हणजे भीमसेनाचें 'भीमएन' असें नांव झालें. (भीम म्हणजे भयंकर सेना ज्याची तो भीमसेन, आतां, भयंकर पातक ज्याचें असा झाला. सारांश, भीमसेनानें धर्माच्या भिडेनें द्रौपदीचें रक्षण केलें नाहीं म्हणून तो मोठा पातकी झाला, असा भाव). २. कर्णास. ३. पाणउतारा, अपमान. ४. सशांच्या शब्दानें. ५. विरघळून जावे, घाबरून जावे. ६. मस्त. ७. पितर ज्या लोकीं राहतात त्या लोकास. ८ नरकांत वसती करीन. ९. शाप देऊन, अपशब्द बोलून. १०. बोलावितां. ११. ऐस, रहा. १२. दुष्टांचा (दुर्योधनादिकांचा) दास जो धर्म त्याचा.

इतुक्यांत चि धृतराष्ट्रक्षितिपतिच्या अग्निहोत्र[1]-भवनांत
जंबुक[2] शिरोनि बोले, पितरांच्या जेंवि वल्लभ वनांत[3]. ३३
तो जंबुक आरडतां, बहु रासभ[4] दुष्ट खग[5] हि आरडले,
उत्पातज्ञ[6] सदय जन तेव्हां चि मनीं म्हणोनि 'हा!' रडले. ३४
तेव्हां धृतराष्ट्रातें गांधारी विदुर अशुभ कळवीती,
त्यातें अतिप्रयासें नानापरि बोध करुनि वळवीती. ३५
वृद्ध ह्मणे, 'रे मंदा! कां स्वकुलज्येष्ठबंधुभार्येसीं
आम्हांसमक्ष करिसी अतिवाद[7] त्यजुनि लाज आर्येसीं[8]. ३६
असकृन्निवारिलें[9] जरि सुज्ञें विदुरें तसें चि मत्तातें[10],
करिसी भलतें चि कसें? अवमानिसि कां सदुक्त मत्ता! तें?
वत्से! सति! मतिमंति[11]! अतिमान्या मज तूं, क्षमा करीं दे हें,
वर माग, राग न धरीं, मत्पुत्रांचीं तुझ्या करीं देहें.' ३८
सुमति ह्मणे, "जरि देतां वर, वचनें स्तवुनियां हि, मामाजी!
'धर्म अदास असो,' हा वरपट[12] द्या आजि या[13] हिमामाजी[13]. ३९
प्रतिविंध्यास[14] ह्मणावें, 'हा दासात्मज' असें न बाळानीं[15],
अनुचित दाससुतत्व, स्कंधीं[16] ज्या वाहिलें[16] नृपाळानीं." ४०
भूप म्हणे, 'हें दिधलें, दुसरा मज माग वर सुने!' त्रात्या,
ऐसें परिसोनि पुन्हां वर मागे ती सती सुनेत्रीं[17] त्या. ४१
'सायुध सरथ नकुळसहदेवार्जुनभीम यांस दासत्व
न शिवावें, हें द्यावें मज यांचें स्थिर असो सदा सत्व[18].' ४२
'माग' म्हणे तिस राजा तिसरा जाया लया तिचा राग;

---

१. होमशाळेमध्यें. २. कोल्हा. ३. प्रियकर वनांत. (स्मशानांत). ४. गर्दभ. ५. पक्षी. ६. शुभाशुभ जाणणारे. ७. अमर्याद भाषण. ८. श्रेष्ठ द्रौपदीसीं. ९. असकृत् (वारंवार) निवारिलें. १०. भीष्मानें. ११. बुद्धिमति! १२. वररूप वस्त्र. १३. या संकटरूप थंडीमध्यें. १४. धर्माच्या पुत्राचें नांव. १५. लहान मुलानीं. १६. अंगाखांद्यावर घेऊन खेळविलें. १७. प्रज्ञाचक्षुप्रति—पंत. १८. तेज, सद्गुणवैभव.

नागवधूतें जाणों पाजी वरदुग्ध[1] करुनियां आग[2]. ४३
देवी ह्मणे, 'उदारा! स्त्री योग्य नव्हे तिजां[3] वर वराया,
लोभें आशींची[4] चि न, मणिराशींची बरी वरव[5], राया! ४४
नीचत्वतीर्ण[6] मत्पति हे सुकृतें पावतील कल्याण.
येतां सदश्व[7] हाता, दुर्लभ त्याहूनि काय पल्याण[8]?' ४५
कर्ण म्हणे, 'ज्यां व्यसनोदधिमग्नां[9] गुरु, सुमित्र, सुत नुतरी[10],
त्यांला झाली भाग्यें प्राप्त, पहा, हे समर्थ सुतनु[11] तरी[12].' ४६
'स्त्री गति[13] पांडुसुतांची, हा! दैव!' असें म्हणोनि भीम कर[14]
चोळी, अनुजासि म्हणे, "जिष्णो! यादोगणीं[15] न भी मकर, ४७
तैसा मीं शत्रुगणीं, परि पाश[16] तयासि तेंवि मज राजा[17],
दाखवितों कौतुक, जरि वत्सा! म्हणतासि 'करुनि गर्जरा[18] जा[19].'
स्त्रीस सभेंत हि शिवला, मग एकांतीं नसेल कां विट[20] तो?
जो शुचि[21] तो स्वप्नीं ही परदारांच्या विलोकनें विटतो[22]." ४९
कर्णाकडे विलोकुनि हांसोनि म्हणे[23], 'धनंजया! स्मरतें
कंसातें[24] मन; त्यां[25] जें ग्रासी तत्काळ तेज तूं स्मर तें.' ५०
जिष्णु म्हणे, 'नीचासीं संत न वदती, म्हणोनि सुज्ञानें

---

१. वररूपी दूध. २. अपराध. ३. ब्राह्मणानें शभंर, राजानें तीन, क्षत्रिय-स्त्रीनें दोन व वैश्यानें एक वर मागावा असा नियम आहे. ४. आशीर्वादांची. ५. अयं शब्दः भाषायां संग्रहपर्यायः स्त्रीषु प्रसिद्धः—**पंत.** (हा शब्द मराठीमध्यें 'संग्रह' शब्दाचा पर्याय असून स्त्रियांच्या मुखीं प्रसिद्ध आहे). ६. नीचत्वापासून मुक्त झालेले. ७. चांगला घोडा. ८. खोगीर. ९. व्यसनरूप समुद्रांत बुडालेल्यांस. १०. न उतरी, पार उतरूं देत नाहीं. ११. सुंदरी. १२. नौका. १३. संरक्षणस्थान, आधारस्तंभ. १४. कर चोळणें हें संतापल्याचें द्योतक आहे. १५. जलचर प्राण्यांच्या समुदायामध्यें. १६. फांस. १७. धर्मराज. १८. गर्जना, जयघोष. १९. शत्रूशीं लढावयास जा. २०. दुष्ट, जार. २१. पवित्र, सच्छील. २२. कंटाळतो. २३. [भीम] म्हणे. २४. कर्णाला पाहून कंसाची आठवण होते. २५. त्या कंसाला जें ग्रासी तें तेज. (कृष्णतेज).

सोसावें, बा आर्या! कीं तूं आहेसि पूर्ण सुज्ञानें.' ५१
भीम म्हणे, "धर्मा! 'हूं' मात्र म्हण, प्राज्य[1] राज्य तूं कर गा!
करगों[2] भूमि करीं मग, हरिला, व्हाया सदा मुदाकर[3], गा[4]". ५२
क्रोधें भीम खवळला कल्पांतज्वलनसा[5] च, परि त्यातें
प्रतिबंधकमणि[6] झाला धर्म, रिपुपतंगदाह करित्यातें[7]. ५३
धृतराष्ट्राप्रति अंजलि करुनि युधिष्ठिर म्हणे, 'अहो तात!
तुमचे पाद[8] तसे प्रिय अमृतकराचे[9] हि मज न होतात. ५४
ईश्वर तूं, त्वद्वचनीं मन्मन, जाणोनि परम हित, रमतें;
राज्यपदाधिक गुरुपद, वदतो हें गुरुमतें, न इतर-मतें. ५५
पूर्वी गुरुवचनें जो पी दुग्धरसा गरांसहित[10] राया!
त्या प्रह्लादातें बुध गाती भवसागरास हि तराया. ५७
देवा! सांगावेंसें जें तुज वाटेल, सांग पां[11] यातें,
हे[12] वाहतील पांच[12] हि तुझिया प्रीत्यर्थ आंग पायातें.' ५७
धृतराष्ट्र म्हणे, 'धर्मा! आलासि तसा चि त्या नवें[13] पुरा[13] जा.
रक्षार्हें[14] शीलें[15] रक्षीं, रक्षो हें च स्वयें, न वपु राजा. ५८
वत्सा! अजातशत्रो! तूं बंधुकृतापराधविसरा[16] या
अंध स्थविर[17] गुरुकडे[18] पाहुनि आहेसि योग्य विसराया. ५९
अतिशुद्ध बुद्धिचें फळ शांति, भले सहनशील, बापा! हें,
सर्व तुला विदित असे, आम्हां वृद्धांकडे चि बा! पाहें. ६०
सुकृतातें चि स्मरति, न कुकृतातें, या चि साधु-रीतींची

---

१. पुष्कळ. (मोठें). २. हस्तगत. ३. हर्षाची खाण. (आनंदित). ४. गायन कर. ५. प्रलयकाळच्या अग्नीसारखा. ६. अग्निभयनिवारक असा एक मणी असल्याची समजूत आहे. ७. शत्रुरूप पतंगांचें दहन करणाऱ्या (भीमाला). ८. चरण (पक्षीं) किरण. ९. चंद्राचे. १०. विषासह. ११. कवितेमध्यें येणारें एक पादपूर्णार्थक अव्यय. १२. आम्ही पांच हि पांडव. १३. नूतन नगरास. (इन्द्रप्रस्थास). १४. रक्षणीय. १५. सद्वर्तन. १६. दुर्योधनादि बंधूंनीं केलेल्या अपराधांच्या समूहाला. १७. वृद्ध. १८. वडिलाकडे. (मज धृतराष्ट्राकडे).

रुचि रसिका, न सुधेची; कीं, केवळ अल्प माधुरी तीची. ६१
हें[1] म्यां उपेक्षिलें कीं, पुत्रबळाबळ मला विदित व्हावें,
[2]द्यूतविलोकनकौतुकमिलिताप्त हि भेटतील या भा[3]वें. ६२
कळलें पुत्रांत तुम्हीं श्रेष्ठ भले, जा स्वराज्य सांभाळा;
बुडतां असदनुसरणें[4], लावावा शब्ददोष कां भाळा?' ६३
नमुनि पित्यासि निघाला तो व्यसनोन्मुक्त सस्वजन पार्थ[5],
सुजनासि गमे ज्याच्या कीर्तिश्रवणें चि जन्म अनर्पार्थ[6]. ६४
दुःशासन, कर्णशकुनिदुर्योधन हे जया स्थळीं होते,
तेथें जाउनि सांगे, 'शक्रप्रस्थासि चालिले हो! ते. ६५
सुटले शत्रु दुखविले अहिसे, वधितील हे तुम्हां, तारा
व्यसनांत आपणातें; न बरा हा नाशहेतु म्हातारा.' ६६
जाणोनि अत्यनिष्ट क्षिप्र तया आंधळ्यासि भोंदाया,
धावुनि गेले शतसुत शोका[7]जगराननांत कोंदाया[8]. ६७
त्यातें म्हणे सुयोधन, 'केला कीं व्यर्थ यत्न हा तातें,
मोहें गमाविलें, जें आलें अहिमूर्धरत्न[9] हाता, तें. ६८
जों झाले न र[10]णोद्यत सर्वोपायें सपत्न मारावे,
यांत चि कुशळ; स्वाश्रित जन सुखें सर्वथैव तारावे. ६९
वृत्रा[11]रिप्रति वदला गुरु[12] ज्या या भद्रधा[13]म नीतीतें,
प्रभुवर्या! अवमानुनि करिसी बहु खिन्न कां मनीं तीतें? ७०
द्यूतजित[14]प्रचुरधनें पूजुनि नृप सर्व, करुनि वश, अरि ते
मारावे, हें मन्मत; कीं, न भले वृ[15]त्तिचें हरण करिते. ७१

---

१. द्यूताकडे म्यां या भावें दुर्लक्ष केलें कीं. २. द्यूत पाहण्यासाठीं कौतुकानें मिळालेले आप्तजन. ३. हेतूनें. ४. दुष्टांचें अनुसरण केल्यानें. ५. पृथापुत्र धर्म. ६. सफळ. ७. शोकरूप अजगराच्या मुखांत. ८. कोंबाया, भराया. ९. सर्पाच्या मस्तकावरील मणि. १०. युद्ध करण्याविषयीं उद्युक्त. ११. इन्द्राप्रत. १२. बृहस्पति. १३. कल्याणाचें गृह च अशा. १४. द्यूतांत जिंकलेल्या पुष्कळ द्रव्यानें. १५. उपजीविकासाधनाचें.

पांडव न सोडिले ते, दुखउनि अत्यंत उग्र अहि तातें.
नीतिज्ञ कोण दुसरा आत्मसुतांच्या करील अ-हितातें? ७२
येतील कटक घेउनि, आम्हां वधितील, राज्य हरितील,
दयितेच्या[1] क्लेशातें चिंतुनि ते काय गा! न करितील? ७३
आझुनि तरि सावध हो, द्यूतार्थ फिरोनि ये तसें कर, गा!
करिल पुन्हां मन्मातुळ शत्रूंच्या राज्यसंपदा कर-गा. ७४
द्यूतीं असा करूं पण, 'करणें वनवास अब्द बारा,' हें
होतां, 'अज्ञातवसति वत्सर' आइक, उगा चि बा! राहें. ७५
अज्ञातवास अंतीं करणें जो काय, तो समानजनीं[2],
जरि उमगले, वसावें द्वादश वर्षें पुन्हां तसें चि वनीं. ७६
सिद्धिदें[3] मामा, 'मा मा'[4] न म्हण, मदिष्टार्थ[5] तप नको कांहीं.
प्रार्थावा पुत्रांहीं स्वपिता स्वसुखार्थ तपन[6] कोकांहीं[7]. ७७
होवूनि बद्धमूळ[8], स्वसहाय[9] करूं समस्तनृपकटक,
मग मज भक्ष्य, व्यसनीं तरले ही अरि, जसे घृतीं[10] वटक. ७८
व्यसनीं संरंध्र[11] हि उरे, जोंवरि राहे धरूनि तळ उगला[12],
भक्ष्य चि इतर सुवृत्त[13] हि वटक कटाहीं[14] तरोनि जो फुगला.' ७९

---

१. प्रिय भार्येच्या. २. समान योग्यतेच्या लोकांत. ३. सिद्धि देणारा. ४. नको, नको. ५. माझें कल्याण करण्यास. ६. सूर्य. ७. चक्रवाकपक्ष्यानीं. (या जातीच्या नरमादींचा रात्रीं नित्य वियोग होतो, म्हणून ते पक्षी लवकर उदय व्हावा म्हणून सूर्याची प्रार्थना करितात अशी समजूत आहे). ८. ज्यांचें मूळ दृढ झालें असे. ९. आपलें साहाय्य करणारें. १०. अन्वयार्थ—जसे घृतीं [तरलेले] वटक (वडे) भक्ष्य (खाण्यास योग्य), [तसे] व्यसनीं तरले ही (संकटांतून पार पडलेले हि) अरि (शत्रु, पांडव) मज भक्ष्य, (जिंकण्यास योग्य). ११. सच्छिद्र (पक्षीं) न्यून, उणेपणा असलेला. १२. कढईच्या तळाशीं असतो (पक्षीं) आपल्या ठिकाणीं हालचाल न करितां राहतो. १३. चांगला वर्तुलाकार (पक्षीं) सद्वर्तनसंपन्न. १४. कढईमध्यें.

अंध म्हणे, 'हूं, फिरवा, जावूं द्या जवनें[1] दूत, नंदन हो !
देवा ! युधिष्ठिराचा तो द्यूतोत्साह लेश मंद न हो.' ८०
द्रोणादि सुज्ञ वारित होते, परि न वळला चि तो कांहीं,
भरला भैरीं[2], भुलविला, दावुनि धनलोभ दुष्ट तोकांहीं[3]. ८१
लोभांध[4] न गुरु हो ! तो आत्मारि तथा निजानुगांधारी,
[5]आंत हि जो अंध तया बोध किती हो ! करील गांधारी? ८२
'नरकीं बुडवील, न[6] हा पुत्र, त्याग चि बरा न अत्याग;
बांधा, वधा खळाला, खोहें[7] घडतें तुह्मांसि अँत्याग. ८३
क्षणभरि मात्र खळतनुजविरहातें[8], मन करूनि गाढ, वहा[9]:
राजगृहीं न वसावा, भ्रमलासि, नव्हे सदश्व[10], गाढव हा. ८४
एकैक शतसुताधिक ते सुत[11], यांह्नि काय हो ! ऊन[12] ?
सन्मणि टाकुनि घेतां काच कसे सुज्ञराय होऊन ?' ८५
भूप म्हणे, 'बहुधा कुळ बुडतें, वारावयासि मीं न शकें,
गरुडास हि लंघ्य न जें; लंघावें दैव तें कसें मशकें ? ८६
गांधारि ! उगीच रहा, होऊं दे द्यूत; औरसा[13] मान्य
श्रुति म्हणाति, न इतराला; त्या मानिसि केंवि पौर सामान्य ?'
ऐसें वदोनि भूपें पाठविला प्रातिकामि सूत बळें;
तेव्हां स्तविति खळ खळां, गळति खळखळां सु-साधु-नेत्र-जळें.
तो सूत दूर धावत जावुनि गांठी पथांत पार्थातें,

---

१. वेगवान्. २. ईर्षेस चढला. ३. अपत्यानां. ४. अर्थः–तो धृतराष्ट्र केवळ लोभांध च नव्हे तर आत्मघातकी होता; व त्याप्रमाणें च आपल्यामागून येणाऱ्या (आपल्या तंत्रानें चालणाऱ्या) आंधळ्यांचा (स्वतः विचार न करणाऱ्यांचा) शत्रु (शत्रूसारखा नाश घडवून आणणारा) होता. ५. अंतःकरणांत हि अंध=अज्ञ, मूर्ख. ६. हा दुर्योधन पुत्र च नव्हे; कारण, 'पुत्र' म्हणजे पुन्नामक नरकापासून पितरांना तारणारा असा अर्थ आहे. ७. मोठा अपराध. ८. दुष्ट पुत्राच्या विरहातें. ९. सहन कर. १०. उत्तम घोडा. ११. पांडव. १२. उणे, कमी. १३. औरस पुत्राला.

ठकवुनि लुटावया पटु ठक जेंवि स-सार्थवाह-सार्थातें[1]. ८९
'द्यूतार्थ बाहतों[2] तुज तात, युधिष्ठिर ! नराधिपा ! परत,'
ऐसें तो सूत म्हणे; दे श्रवणें दुस्तराधि[3] पाप-रतें[4]. ९०
धर्म म्हणे, "क्षम नाहीं लंघाया सुज्ञ ही नर कपाळा[5]:
स्तुत होय[6] स्वःपाळा[7], केव्हां 'जी! जी!' म्हणे नरकपाळा[8]. ९१
द्यूतें क्षय हें कळतें, परि फिरतों; लंघ्य काय हो ! तात?
पितृवचनकर निरुपम श्रीकीर्तीचे निकाय[9] होतात." ९२
द्यूतासि पुन्हां सेवी गुर्वाज्ञेकरुनि शिशु जसा गरळा[10].
किंवा परार्थ जेंवि प्राशी श्रीकंठ घोरसा गरळा. ९३
बसले सभेंत पांडव, शकुनि म्हणे, "गा युधिष्ठिरा ! जरि तें
जितधन[11] दिधलें, देवू, वृद्धें[12] करू सर्व गेह आज रितें. ९४
राया ! आतां द्यूतीं एक चि आम्हीं तुम्हीं करूं पण हो !
'सर्वस्व[13] हारवावें कीं जिंकावें' न भीरु तूं पण[14] हो. ९५
द्यूतीं निर्जित[15] झालों[15], तरि आम्हीं रौरवाजिनें[16] धरुनीं
द्वादशवत्सर व्हावें वनवासी सुमुनिवृत्तिला वरुनीं. ९६
अज्ञातवास[17] सज्जनीं[18] परि वत्सर एक मग करावा हो !
होतां चि ज्ञात, पुन्हां पहिला वनवासपथ धरावा हो ! ९७
जित होतां वर्तावें या चि न्यायें तुम्हीं सदारानीं[19],
सज्जनीं[18] वर्षभरि वसा, द्वादश वर्षें वसा सदा रानीं. ९८
तेरा वर्षें ऐसीं क्रमिल्यावरि लागतां चि चवदावें
राज्य करावें आपण, हा पण कोणीं असत्य न वदावें." ९९

---

१. व्यापाऱ्यांच्या पुढाऱ्यासह व्यापाऱ्यांना. २. बोलावतो. ३. तरण्यास कठिण अशी चिंता. ४. दुष्कर्मासक्त. (धृतराष्ट्र). ५. दैवा. ६. 'होय' व 'म्हणे' ह्यांचा कर्ता 'नर.' ७. स्वर्गपालास. (इन्द्रास). ८. यमाला. ९. राशी, भांडार. १०. मातृचर्वितौषधरसः—**पंत.** आई औषधें चावून त्याचा रस मुलास पाजते तो. ११. जिंकलेलें द्रव्य. १२. धृतराष्ट्र. १३. सर्व धन. १४. परंतु. १५. जिंकिलें गेलों, हरलों. १६. मृगचर्में. १७. प्रकट न होतां राहणें. १८. लोकवस्तीच्या प्रदेशांत. १९. स्त्रीसहित अशा (तुम्हीं).

सभ्य म्हणति, 'अक्षग्रह[1] घातभ्रमकर[2], नसे असा धुतरा[3].
कौरव हो! गौरव हो सुजनीं; न करुनि असें असाधु[4], तरा[5].
अन्योन्यकरें तुमचा बुध हो! समरांत न सहसा वध हो.
धर्मा! तूं तरि आइक, देती भयलक्ष[6] अक्ष, सावध हो.' १०१
धर्म म्हणे, "न व्यसनी मी, त्यजितां परि निज प्रतिज्ञा ते,
जे सुप्रसन्न मजवरि केवळ विटतोल संप्रति ज्ञाते. १०२
शकुने! खेळ यथेष्ट, द्यूतीं म्यां मांडिला त्वदुक्तपण,
'छद्में[7] कल्याण नसे,' ऐकावें प्रथम हें मदुक्त पण." १०३
पूर्वोक्त पणोच्चारण करुनि, सभेमाजि शकुनि अक्षांतें
टाकुनि, 'जितं' म्हणे, खळ कपटें जिंकी खळान्त-दक्षांतें[8]. १०४

अध्याय सातवा.

अजिनें[9] नेसुनि झाले पांडव वनवासदीक्षित[10], तशांतें
दुःशासन बहु हांसे, गावें ज्यांच्या सुधोत्तमयशांतें. १
आजि, पराजिपराजित[11] नव्हते जे, ते च हे पराजित कीं,
आम्हां सुखें चि तितकीं दुःखें जीं आमुच्या परा जितकीं. २
आजि अकंटक[12] केलें नृपनयनिपुणें[13] सुयोधनें राज्य,
प्राज्य प्रीतिद झालें सुहृदांला, गाळिलें जसें आज्य. ३
तात म्हणे, 'नित्य असो या धर्मा भव्य[14] भाग्य[14] मत्तनया;

---

१. फांसे हातांत धरणें. (द्यूतक्रीडा). २. घात करणारा व बुद्धीला मोह पाडणारा. ३. धोतऱ्याचें फळ. ४. दुष्कर्म. ५. स्वकल्याण साधा. ६. लाखों भयें. ७. कपटानें. ८. दुष्टांचा अंब करण्यांत दक्ष अशा पांडवांतें. ९. मृगचर्में. १०. वनवास करण्याची दीक्षा ज्यानीं घेतली ते. (दीक्षा=व्रतग्रहण). ११. शत्रूकडून युद्धामध्यें पराभूत. १२. शत्रुरहित. १३. राजनीतिनिपुण अशा. १४. उत्तम दैव.

ते हे आम्हां हांसत होते; रक्षी न भाग्यमत्त[1] नया[2]. ४
हे पंडित, परि पांडव नरकीं श्रीमद् धरूनि कां पडले?
कैवर्तांस[3] अदीक्षित[4] अजिनधर वनांत बंधु सांपडले. ५
आपण षंढतिळें[5] असें निःसंशय जाणतील हे आतां,
गर्वें फुगले होते फुगवूनि[6] स्वगुण गायकीं[7] गातां. ६
क्लीबांसि सुता देउनि, सुमति परि द्रुपद फार चुकला हो!
यमभट हो! बळकट या स्वापत्यविडंबकासि[8] चुकला हो! ७
द्रौपदि! हे कुरु दांत[9] क्षांत[10] सधन, यांत कांत जोडावा;
लाभ नसे, ताप वसे ज्यामध्यें, तो कुसंग सोडावा. ८
षंढतिल, चर्ममयमृग[11], काकयव[12] जसे, तसे चि फटकळ गे!
हे व्यर्थ कांकणाचे दाविति न समरसिंधुतट[13] कळगे[14]. ९
कृष्णे! काडी मोडीं, काय तुला दीन मानले शवसे?
जे राज्यभ्रष्ट कितव, ज्यांच्या ठायीं न मानलेश वसे.' १०
भीम म्हणे, 'रे कोल्ह्या! याचा घेईन सूड जाण खरें,
हाणीन बाण मर्मीं हाणिसि वचनें जसीं च बाण-खरें[15]. ११

---

१. सद्भाग्यानें उन्मत्त झालेला पुरुष. २. नीतीला. ३. कोळ्यांस. ४. यज्ञदीक्षा घेतली तर मृगाजिनें परिधान करितात; परंतु पांडवांना दीक्षा नसतां च मृगाजिनें धारण करावीं लागलीं. त्यामुळें नेहमीं चर्म धारण करणाऱ्या कोळी वगैरे लोकांस पांडव हे जातभाई च सांपडले, असें म्हणून धृतराष्ट्र पांडवांची थट्टा करीत आहे. ५. अफल आणि निर्वीर्य तिळाप्रमाणें. ६. फाजील स्तुति करून गातां. ७. भाटांनीं. ८. आपल्या अपत्याची (द्रौपदीची) विटंबना करणाऱ्यास. ९. इंद्रियनिग्रही. १०. सहनशील. ११. चामड्याचें केलेलें हरिण. १२. ज्यामध्यें तांदूळ नाहींत असें काकयवनामक वांझ कणीस. (निष्फळ तृणधान्य). १३. युद्धरूप समुद्राचें परतीर. १४. कांकणाचा चुरा=कळगा. 'कळगे' हें बहुवचन. (पांडव हे कळग्यांसारखे निरुपयोगी आहेत, त्यांच्यांत शौर्याचा लेश सुद्धां नाहीं असा भावार्थ). १५. बाणासारखीं तीक्ष्ण (वचनें).

[1]काळातिथिमधुपर्कीं जे पांडवपशु [2]निवेदिले होते,
जाणों न मारिले, [3]वधकातर सोडूनियां दिले हो! ते.' १२
'[4]गौगौ' असें म्हणे [5]खळ दुःशासन, अति असंत तो नाचे,
किति वर्णावे सद्गुण सन्नीतिकरूनि [6]संततोनाचे? १३
दुर्योधन आपण [7]मतिवेश्येचा [8]जरि नवा [9]ढवा, [10]यांला
हांसे [11]गत्यनुकारें, [12]बाळ न भी [13]ज्वलन वाढवायाला. १४
हंसखगा काक जसा, कीं धुतरा पुष्पकुळवरा कमळा,
वेडावी, लावाया वांछी [14]अर्कीं हि तो [15]वराक [16]मळा. १५
तें अवलोकूनि म्हणे त्यासि [17]निवृत्तार्धकाय भीम असें:–
'मंद! रहा, मंदर हा मीं भीम [18]खळाब्धिमथनयोग्य असें. १६
मीं या सुयोधनाचा हंता, जन्हि मन्मनांत [19]अनहंता,
सहदेव या शकुनिचा, कर्णाचा जिष्णु दुष्ट-जन-हंता.' १७
जिष्णु म्हणे, 'कर्तव्य प्रकट न करिती [20]निजाननें आर्य.

---

१. कालरूप अतिथींची मधुपर्कपूजा करण्याचे वेळीं. (हा एक प्रकारचा पूजाविधि कोणी प्रतिष्ठित पाहुणा घरीं आला असतां करीत असत. या विधींमध्यें पशुवध करावयाचा असतो. काळरूपी पाहुण्याची पूजा करतेवेळीं पांडव हेच पशु निवेदन केले असा भाव). २. उच्चारिलेले. (मधुपर्कसमयीं 'गौगौगौः' असा त्रिवार उच्चार करून वध किंवा उत्सर्ग करावा लागतो). ३. वधाविषयीं भितरे. ४. गाय रे गाय! (अगदीं दीन असा भाव). ५. दुष्ट. ६. निरंतर जो हीन त्याचे. ७. बुद्धिरूप वेश्येचा. ८. जणुं काय. ९. वेश्येच्या मागें पखवाज वाजविणारा साजिंदा. १०. भीमाला. ११. येथें 'गति' शब्दावर श्लेष आहे. (ढवा हा नायकिणीच्या गतीची वाद्यावर साथ करून व तिच्याबरोबर पुढेंमागें सरून हांसत असतो. येथें, दुर्योधन सभेतून चालणाऱ्या भीमाच्या गतीचें ढव्याप्रमाणें च अनुकरण करून हांसत होता). १२. मूर्ख. (दुर्योधन). १३. अग्नि. (वैर). १४. सूर्याचे ठिकाणीं. १५. नीच. १६. दोषा. १७. मागें फिरवला आहे शरीरार्धभाग ज्यानें असा. १८. दुष्टजनसमुद्राचें मंथन करण्यास समर्थ असा मंदर पर्वत. १९. अहंकाराचा अभाव. २०. स्वमुखानें.

पाहूं तें, चौदाव्या अब्दीं यावरि घडेल जें कार्य.' १८
भीम ह्मणे, 'दुर्योधनदुःशासनशकुनिकर्णरक्तानें
भू त्वां तृप्त करावी, ऐकावें [1]गुरुवचोनुरक्तानें.' १९
पार्थ म्हणे, 'करिन, तुझें जें प्रिय, तें चि, प्रसाद जोडाया.
हें किति? मज उशिर नसे [2]त्वप्रतिकूळें स्वबाहु तोडाया. २०
अनुगांसह कर्णातें मारुनि मीं हर्षवीन आर्यातें,
तोडीन स्वभुज हि जरि, हे न तुझ्या साधितील कार्यातें. २१
परि अरि राज्य न देइल, जरि [3]हायनें लागतां चि चवदावें.
गुरुसीं वाक्य प्रथम चि सुविचार बरा करूनि च वदावें.' २२
सहदेव म्हणे, 'शकुने! अक्ष म्हणसि, परि नव्हेत हे अक्ष;
मूढा! सहदेवाचे त्वां वरिले शर रणीं स्व-वधदक्ष. २३
कार्यें उरकुनि घे रे!, तेरा वर्षें चि राहिलें आयु,
होतिल चतुर्दशाब्दीं माजे शर सर्प, असु तुजे [4]वायु. २४
[5]पोषी जसी [6]पतिशुभाशुभभवमुदमुद्भरें [7]पुळक लंका,
[8]गांधारराजधानी पोषू तैसी च रे कुलकलंका!' २५
नकुळ म्हणे, 'व्याघ्रशिरीं दिधला हा वाम पाद [9]ओतूनीं.
हा! तापविली दयिता कर्णीं [10]परुषोक्तिगरळ ओतूनीं. २६
कृष्णेसि रुक्ष वदले जे जे, मरतील ते समस्त रणीं;
खळबळनकुळ तसे, [11]तृणदव कीं, किंवा जसे [12]तमस्तरणी.' २७
एवंविध प्रतिज्ञा करुनि, [13]महासत्व पांडुसुत राया

---

१. गुरुवचनाविषयीं प्रीतियुक्त अशानें. २. तुझ्या आज्ञेप्रमाणें न करणारे. ३. वर्ष. ४. प्राणवायु. (माझे बाणरूप सर्प तुझे प्राणवायु भक्षण करतील असा भाव). ५. वाढवी, धारण करी. ६. रावणाच्या शुभाशुभ कार्यांपासून होणारा जो हर्ष किंवा विषाद त्याच्या भरानें. ७. रोमांच. ८. गांधारदेशाची प्रधान नगरी (तक्षशिला). ९. मांजरानीं. १०. निष्ठुर भाषणरूप विष. ११. गवत आणि वणवा. १२. अंधकार आणि सूर्य. १३. मोठे धैर्यशाली.

धृतराष्ट्रा पुसति नमुनि, त्यां धर्में[1] आपदब्धि[2] उतराया. २८
धर्म पुसे ज्यांज्यांतें, मागे जाया वनासि आज्ञा ते,
भीष्म द्रोण कृप विदुर होवूनि उदश्रु[3] म्हणति 'हा!' ज्ञाते. २९
त्यां हि पुसे, स्वाहित[4] जे, वाजविती, न धरुनि त्रपा[6], टीरें[5],
धर्मासि एक साजे सदसत्समशीळ[7] मित्र पाटीर[8]. ३०
छळकासि कवि न शापिति, देतें जड कनक काय हो! गाळी[9]?
गाळी जो त्यासि मधुर इक्षु, तसा त्या हि, अदय जो गाळी. ३१
विदुर म्हणे, 'कुंतीचें वपु कोमळ वासयोग्य न वनीं तें.
कष्टांत वृद्धदेहें न उरावें[10], आतपांत[11] नवनीतें[12]. ३२
सेवाधिकार मज द्या, ठेवा माझ्या गृहीं स्वमातेतें,
दुर्गत[13] बंधु पहातां दुःख जसें, इतरथा[14] न माते[15] तें.' ३३
पांडव म्हणति, 'बहु बरें, पितृतुल्य पितृव्य[16] तूं, बुधा! सरसें[17]
भवदुपदेशें निवतों, त्वद्भाषण तापल्यां[18] सुधा-सरसें[19]. ३४
तूं आमुचा परमगुरु, न त्वत्सम ऐकिला सदय चुलता,
त्वच्छायें[20] नसतां किति आम्हीं? या संज्वरें[21] गिरि हि उलता.'
विदुर म्हणे, 'बा धर्मा! व्यसनीं सद्रीतिनीति नव नौका,
करिशील राज्य, झाला काय श्रीरामराय न वनौका[22]? ३६
सर्व असा एकमतें, जें युष्मत्प्रिय घडेल सत्वर तें,
कोठें हि कधीं हि चिर स्थिर अनुभविलें न दुःख सत्व-रतें[23].'
कथिली विदुरें सन्मति, जाणों दिधली तयां सिदोरी ती;

---

१. वडिलांना मान देणें ह्या धर्में. २. संकटसमुद्र. ३. साश्रु. ४. आपले शत्रु. ५. आनंद प्रदर्शित करिती. ६. लाज. ७. चांगलें आणि वाईट यांच्या ठायीं समभाव ज्याचा तो. ८. चंदन. ९. शिव्या. १०. जीवंत राहणार नाहीं. ११. उन्हांत. १२. लोण्यानें. १३. दरिद्री. १४. अन्यथा, दुसऱ्या प्रकारानें. १५. माजे, वृद्धि पावे. १६. चुलता. १७. प्रेमयुक्त अशा. १८. तप्त झालेल्यांस. १९. अमृतसरोवरासारखें. २०. तुझ्या [कृपेची] सावली. २१. संतापें. २२. वन हेंच ओकस् (घर) ज्याचें तो, वनवासी. २३. सत्वसंपन्न पुरुषानें.

कीं व्यसनकूपपतितां अनुपायज्ञां[1] तयांसि दोरी ती. ३८
पुत्रवियोगें कुंती बहु तळमळली, म्हणे, 'अहाहा!' तें[2]
सांगूं, कीं निंदूं त्या, लिहिला जेणें कुलेख हा हातें? ३९
असु जातां तनु विकळा[3], कीं जातां वत्स जेंवि धेनु, सती
तेंवि ह्मणे, 'अळिकीं[4] कां लिपि लिहिली अश्रुदा विधे! नुसती.
त्यजिली जसी तुह्मीं हे[5], सुत हो! त्यजिली तसी न कां असुनीं?
हे[6] या संज्वरगेहीं[7] देहीं होतील तप्त कीं असुनीं. ४१
सुत हो! शुद्धांस कसें आतळलें व्यसन? अंक[8] हा राविला.
विपरीत चि हें कुरुकुळदीपानीं[9] स्वप्रकाश हारविला! ४२
आलां हतभाग्येच्या पोटाला ह्मणुनि भोगितां ताप;
संसर्गें[10] भोगावें पुण्य जसें, साधु हो! तसें पाप. ४३
तुमचा धन्य पिता, ती माता माद्री सती हि धन्या हो!
वंध्यत्व बरें, परि मजऐसी कोणास ही न कन्या हो. ४४
माझा पुत्रस्नेह, त्यजुनि मला, तुजकडे चि आला गे[11]!
स्वव्रतवत् प्रतिपाळीं, रक्षाया[12] अधिक काय या लागे? ४५
वत्से! कृष्णे! माझा बाळक सहदेव देवसा, यास
बहु सांभाळीं, व्हावा सुकुमार कुमार हा न सायास[13]. ४६
म्यां वत्स निरविला तुज हा मदसुन्यास[14], यास जतन करीं,
विश्वासें दिधलें हें तुझिया जीवनहित स्ववतन करीं. ४७
रे वत्सा! सहदेवा! जावूं दे धर्म भीम वनवासा.

---

१. जे उपाय जाणत नाहींत त्यांस. २. **पंत** म्हणतात, कुंतीनें जो शोक केला तो वर्णन करूं, किंवा ज्या विधात्यानें हें दुःख तिच्या नशिबीं लिहिलें त्याची निंदा करूं? ३. व्याकुळ. ४. कपाळीं. ५. ही कुंति. ६. प्राण. ७. संतापाचें घर च अशा देहीं. ८. डाग, कलंक. ९. कुरुवंशाला सुप्रकाशित करणाऱ्या पांडवानीं. १०. सहवासामुळें. ११. गे कृष्णे! १२. ह्याचें संरक्षण होण्यास तुझ्या पातिव्रत्यापेक्षां जास्त कशाची हि गरज नाहीं, हा भाव. १३. कष्टी. १४. माझ्या प्राणांची ठेव.

जावू अर्जुन नकुळ हि; कां बा! झालासि बांधव [1]नवासा? ४८
मजविण तुज, तुजविण मज तेरा [2]कल्पांत, ते न वत्सर, हा!
ने मज, [3]नेम जरि अधिक, पाहों तरि दे [4]मुखेंदु, वत्स! रहा.
हा! कृष्णा! जगदीशा! काय बरें दैन्य हें, अगा धात्या!
[5]व्यसना रचीं तराया सेतु जसा सागरा अगाधा त्या. ५०
कृष्णा! [6]श्रितजनसर्वव्यसनघनघनप्रकंपना! बापा!
तापाकुळ कुळ कुरुचें संरक्षावें हरूनिया पापा. ५१
गे बाई कौसल्ये! संसाराला न हे वृथा आली,
झाली [7]तुहिनकर-कुळीं उत्पन्न दुजी तुजी पृथा [8]आली. ५२
काय करूं? चुकला विधि भाळीं लिहितां लिहावया मरण,
[9]बहुमुखमद्विधितेजें पडलें चतुराननासि विस्मरण.' ५३
विदुर तिला समजावुनि, नेउनि सदनीं, म्हणे, 'नको चि रडों,
जननि! उगी, धीर धरीं, या चिंतागिरिभरें नको चिरडों. ५४
सति! [10]भर आनंदाला जो देतो, तो चि भर विलापाला.
[11]बळजळनिधिनें विधिनें श्रीराममुखीं हि भरविला पाला.' ५५
कौरवपौरवधू बहु रडति, म्हणति, तें कुकर्म परिसून,
'वृद्ध श्वशुर [12]च्यवला, न च्यवली गांजिली हि परि सून. ५६
बाई द्रौपदि! केली [13]आत्मश्रीची च दुर्दशा कुरुनीं,

---

१. परकासा. २. ब्रह्मदेवाचे दिवस. ३. तुझा वनवासाला जाण्याचा निश्चय जर माझ्या म्हणण्यापेक्षां अधिक महत्त्वाचा असेल तर. ४. मुखचन्द्र. ५. संकटसमुद्राला. ६. आश्रितांचीं सर्व दुःखें हे च निबिड मेघ, त्यांचा महावायु च अशा हे कृष्णा! ७. चंद्रकुलामध्यें. ८. सखी. ९. ब्रह्मदेवाचीं मुखें काय तीं चार च; पण माझ्या दैवाचीं मुखें पुष्कळ आहेत; तेव्हां त्या चतुराननाच्यानें माझ्या बहुमुख दैवाच्या प्रतापापुढें टिकाव न धरवल्यामुळें तो तें विसरून गेला, असा भावार्थ. १०. अतिशय, ऊत. ११. बळसागर अशा विधीनें. १२. भ्रष्ट झाला. १३. आपल्या राज्यलक्ष्मीची.

गुरुनीं न दंडिले[१] कां? वारावें काय दुर्जना दुरुनीं[२]? ५७
स्तवितील लोक तुज गुरु सुकृतें[३] व्यसनांत बाइ! तरलीला,
गेया[४] हे या वंशीं त्वल्लीला, आसि नसे इतर लीला.' ५८
स्वकृतानय आठवितां धृति[५] पावे नाश अंध रायाची,
आवळिली आधिमहापाशें[६] बांधूनि कंधरा[७] याची. ५९
उद्विग्नचित्त होवुनि, आणवुनि क्षिप्र सुस्वभावातें[८],
'पांडव वनासि कैसे गेले?' ऐसें पुसे स्व-भावातें. ६०
'नृप[९] मुख झांकुनि गेला, देता झाला जना न पाहूं तें:
पाहत होता जातां विपिनासि वृकोदर स्वबाहूंतें. ६१
जो सर्वशिष्यवृंदीं द्रोणाला परमतोषकर सिकता[१०],
त्याचा वनासि जातां पेरित होता पथांत कर सिकतां[११]. ६२
नकुळ रजांहीं[१२] मळवुनि सर्वांगाला वनासि गेला हो!
सहदेवें ही जातां सारवुनि मुखेंदु मलिन केला हो! ६३
केशानीं मुख झांकुनि, गेली रोदन करीत तव सून,
द्रुपदें विलोकिली जी कन्या देवव्रजांसि[१३] नवसून[१४]. ६४
कुशदर्भपाणि[१५] भगवान् धौम्य पैरे[१६] गात गात गेला हो!'
क्षत्ता[१७] म्हणे, 'तुम्हां म्यां श्रुत तद्गमनप्रकार केला हो!' ६५
अंध म्हणे, 'गा! माझ्या चतुरा चतुरास्यसुज्ञ भावां[१८]! तें
रूप तसें विविध तिहीं कां केलें? स्पष्ट सांग भावातें[१९].' ६६
क्षत्ता म्हणे, "युधिष्टिर करिता झाला स्वदृक्पथा[२०] पिहितें[२१],

१. शासित केले. २. दुर्जनाला नुसत्या दुरून निवारण्यानें कांहीं उपयोग होत नाहीं, शासनच करावें लागतें, असा भावार्थ. ३. थोर पुण्याईनें. ४. गाण्यास योग्य अशी. ५. धैर्य. ६. चिंतारूप जबरदस्त पाशानें. ७. मान. ८. सुस्वभावी अशा विदुरातें. ९. धर्मराज. १०. शिकणारा, शिष्य. ११. वाळू. १२. धुळीनें, मातीनें. १३. देवसमुदायास. १४. नवस करून. १५. कुश आणि दर्भ हातीं ज्याच्या तो. १६. मृतकर्मांतील मंत्रविशेष. १७. विदुर. १८. ब्रह्मदेवाप्रमाणें जाणत्या बंधो! १९. हेतूतें. २०. आपल्या नेत्रमार्गास. २१. आच्छादित.

यद्यपि भस्म करावे तव सुत, चिंती सदा तथापि हित. ६७
'घालींन गांठि सत्य स्वरिपूंसीं संगरांत बाहूनीं,'
समजावी भीम असें, तळमळ करितां मनांत बाहूनीं.[1] ६८
हा भाव अर्जुनाचा कीं, 'शत्रूंसीं घडो समर, सिकता
जेंवि अशा इषु[2] सोडिन, माझी समरीं हरासम[3] रसिकता.' ६९
कोण्हीं न ओळखावें हस्तिपुरीं आपणासि, हा नियम
करुनि करिती रजांहीं लिंपूनि स्वस्वरूपहानि यम.[4] ७०
कृष्णेच्या भाव असा, 'ज्यांहीं मज गांजिलें अति द्वेषें,
त्यांच्या स्त्रिया समस्ता चवदाव्या वत्सरीं अशा वेषें, ७१
देउनि जळांजळि स्वप्रियसुतबंधूंसि, म्हणुनि 'हा!' रडत,
सोडूनि मोकळे कच येतील पथीं अशा चि आरडत.' ७२
धौम्याभिप्राय हि हा, 'जैं वरिजेतील[6] कुरु परेतत्वें,[7]
गातील पुढें कुरुगुरु[8] दर्भ धरुनियां करीं परे तत्वें.[9]'" ७३
ऐसें विदुर वदे तों देवर्षि, त्यजुनियां नभा, उतरे,
बोले सभेंत कीं, 'हा! [10]लोभीं कविचा हि हा[11] न भाउ तरे; ७४
दुर्योधनापराधें भीमधनंजयबळें महागर्व[12]
हे कौरव चवदाव्या वर्षीं मरतील निश्चयें सर्व.' ७५
बोलोनि भविष्य असें भरला[13] नारद मुनींद्र गगनीं च.
द्रोणासि शरण गेले राज्यनिवेदन करुनि मग नीच. ७६
शरणागत दुर्योधनभूपाला गुरु म्हणे, 'अगा! राज्या!
रक्षील कोण त्याला, दवदहनें व्यापिलें अगारा ज्या? ७७

---

१. भुजानीं. २. स्त्रीलिंग—**पंत.** बाण. ३. शंकराप्रमाणें. ४. आवड. ५. जुळे बंधु. (नकुलसहदेव). ६. स्वीकारतील. ७. प्रेतपणातें. ८. कौरवांचे उपाध्याय. ९. खरोखर. १०. पाठांतर—**शुकमुनीचा हीं धना न भाउ तरे.** व्यासजत्वात् धृतराष्ट्रः शुकबंधुरिति—**पंत.** [शुक व धृतराष्ट्र हे दोघे व्यासापासून जन्म पावले असल्यामुळें परस्पर बंधु होत. शुकमुनींचा भाऊ (धृतराष्ट्र) धना (द्रव्यलोभास) न तरे]. ११. धृतराष्ट्र. १२. मोठे गर्विष्ठ. १३. अंतर्धान पावला.

पांडव अवध्य सुरसुत[1] धार्मिक, माझे बहिश्चर असु खरे,
तत्त्यागीं महद्दुःख[2], प्राणत्यागीं नसे मज असुख रे ! ७८
आलां शरण मज तुम्हीं तुमचा ही उचित होय अ-त्याग[3],
शरणागतारिच्या[4] हि त्यागें घडतें जनासि अत्याग[5]. ७९
मन्निधनार्थ द्रुपदें केला उत्पन्न तनय, तो मातें
धृष्टद्युम्न टपतसे ग्रासाया, जेंवि राहु सोमातें. ८०
भगिनीप्रियार्थ[6] समरीं होइल पांडवसहाय मद्रिपु[7] रे !
काळापुढें किती मीं ? हरिसीं[8] युद्धांत काय अद्रि[9] पुरे[10] ? ८१
ज्यासि जयश्री न त्यजि तसि, जसि ऐरावतासि अभ्रमु[11] रे !
यच्छरपवनें[12] समरांजिरगगनीं[13] शत्रुकंटकअभ्र[14] मुरे[15], ८२
त्या अर्जुनासवें जें करणें समरांगणीं समागम[16], तें
मरणशताधिक संकट सत्य मज तदीय[17] पितृसमा गमतें. ८३
तुजकरितां मज आलें चौदाव्या वत्सरीं रणीं मरणें;
शाश्वत न, तुम्हीं हि करा सत्वर सर्व हि असेल जें करणें.' ८४
अंध म्हणे, 'विदुरा ! गुरुवचन खरें, पुत्र वदति तें न खरें,
यां[18] दुःसहें धनंजयशस्त्रें, हरिचीं गजां जसीं नखरें. ८५
त्यांला वनवास न हो, सत्यव्रतरक्षणार्थ अथवा हो,
परि पादचार[19] न विहित[20], त्यांसि तयांचा सशस्त्र रथ वाहो[21].'

---

१. देवपुत्र. (देवांच्या अंशानें झालेले). २. मोठें दुःख. ३. स्वीकार करणें. ४. शरण आलेल्या शत्रूच्या. ५. मोठा अपराध. ६. द्रौपदीचें प्रिय करण्याकरितां. ७. माझा शत्रु. (धृष्टद्युम्न). ८. इंद्रासीं. (पूर्वी पर्वतांस पंख असत; त्यामुळें ते वारंवार उडून जनतेला फार त्रास देऊं लागले, तेव्हां इंद्रानें वज्रानें त्यांचे पंख तोडले, अशी कथा आहे). ९. पर्वत. १०. पुरा पडणार आहे, टिकणार आहे. ११. ऐरावतस्त्री. १२. ज्याच्या बाणरूपवायूनें. १३. रणांगणरूप आकाशांत. १४. शत्रुसैन्यरूप मेघ. १५. वितळून जाई. १६. सामना. १७. त्याच्या पित्यासारखा जो मी त्या मला. १८. दुर्योधनादिकांना. १९. पायीं चालणें. २०. योग्य. २१. घेऊन जावो. (पांडव रथांत बसून जावोत).

गेले वनवासाला जेव्हां ते विष्णुचे सखे दास,
संजय असें पुसे त्या अंधास स्वानयें[1] स-खेदासें[2]. ८७
'राया ! सुतविजयीं तुज व्हावा आनंद, खेद कां गमला ?
धर्म बुडविला, हरिली श्री, चुकलें[3] काय कार्य ? सांग मला.'
धृतराष्ट्र म्हणे, 'आतां कैंचा आनंद संजया ! मातें ?
चिंतारजनीच्या[4] अनुभवितें मच्चित्तकंज[5] यामातें[6]. ८९
हृतमणिफणिवैर[7] बरें, बा ! गा ! साहेल कोण वैरा या ?
कळतं[8] चि कुकर्म केलें कुरुकुळ काळाननांत[9] वैरायां[10]. ९०
विदुरोक्त हित हि, तनुजस्नेहैकपरें[11] न मानिलें कांहीं;
केली म्यां चि, न केली अक्षाहीं, वा न हानि लेकांहीं.' ९१
भक्तमयूरकरें हें श्रीगुरुनें लिहविलें सभापर्व,
कीं आर्यानंदांचें[12] रसिकांचा नित्य हो सभा पर्व[13]. ९२

इति श्रीरामनंदनमयूरकातिकृतौ महाभारते सभापर्व समाप्तम ॥
॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

---

१. आपल्या च अन्यायानें. २. खेदयुक्त झालेल्या धृतराष्ट्राला. ३. होण्याचें राहिलें: (हें संजयाचें भाषण औपरोधिक आहे). ४. चिंतारूप रात्रींच्या. ५. माझें अन्तःकरणरूपी कमल. ६. प्रहरातें. ७. हरण केला आहे मस्तकांतील मणि ज्याच्या अशा सर्पाचें वैर. ८. समजत असून, जाणूनबुजून. ९. मृत्यूच्या तोंडांत. १०. घालाया. ११. पुत्रप्रेमासक्त अशा मीं. १२. आर्यांपासून उत्पन्न होणाऱ्या आनंदांचें. १३. पर्वणी, महोत्सव.

वनपर्व.

अध्याय पहिला.

[1]डमरुधरप्रियगुणसख पांडव गेले वनासि सांगनें,[2] तें
यश परिसा, बुध हो! ज्यां कथिजेल भवद्वरें चि सांगें[3] नतें. १
जाय वनासि युधिष्ठिरनृप [4]सहवासार्थिभूमिसुरसहित,
ज्याला न विप्रसंगाहुनि वाटे स्वर्गिसेव्य[5] सुरस हित. २
ब्राह्मणकुळ [6]वृत्त्यर्थ प्रार्थी कौंतेय भानुला भावें;
कीं, त्या प्रभुप्रसादें प्रणतें मोक्षादि इष्ट लाभावें. ३
जसि नंदिनी वसिष्ठा, दे धर्मा लोकबांधव [8]स्थाली;
[9]ती चिंता हरि, जैसी शुद्ध [10]ब्रह्मज्ञता [11]अवस्थाली. ४
धर्माश्रितांसि रक्षी ती हरिची जेंवि सर्वथा लीला,
'हे' म्हणति '[12]अन्नपूर्णा' ते पांडव, विप्र सर्व थालीला. ५
अमृतरसातें हांसति ते ते सर्व हि पदार्थ, ती जे [13]वी;
तोंवरि [14]चतुर्विधान्नें प्रसवे, जोंवरि न [15]पार्षती जेवी. ६

---

१. डमरु धारण करणाऱ्या शंकरास ज्याचे गुण प्रिय अशा श्रीकृष्णाचे मित्र. (पांडव). २. अंगनासह–**पंत.** ३. पूर्ण. ४. समागम इच्छिणाऱ्या ब्राह्मणांसहित. ५. देवानीं सेवण्यास योग्य. ६. उपजीविकेसाठीं. ७. सूर्य. ८. अन्न शिजविण्याचें पात्र. ९. ती स्थाली. १०. ब्रह्मज्ञान असणें ही स्थिति. ११. [जागृति, स्वप्न आणि सुषुप्ति ह्या तीन अवस्थांची] पंक्ति–**पंत.** १२. अन्न पुरविणारी देवी. (दुर्गा, पार्वति). १३. प्रसवे, उत्पन्न करी. १४. चार प्रकारचीं अन्नें:–भोज्य (भात वगैरे), पेय (दूध, रस, पानक वगैरे), चोष्य (पक्काम्र-फलादि), लेह्य (खीर वगैरे). १५. पार्षताची (द्रुपदाची) कन्या (द्रौपदी).

सब्राह्मणगण पांडव वसले जावूनि काम्यकवनांत[1];
ग्राम्यालाप[2] त्यागुनि जेंवि सुमतिरसिक काम्य-कवनांत[3]. ७
धृतराष्ट्र स्वहित पुसे, त्यासि म्हणे विदुर, 'खेद कां? टाकीं
या खळसुतासि, करितां हा केवळ हृदयभेद[4] कांटा कीं. ८
अद्यापि तरी राया! हृदय तुझें पांडवांसि आपंगू[5],
ते सुगति[6] सहाय बरे तुज भवमार्गांत, काय हा[7] पंगू?' ९
अंध म्हणे, 'रे विदुरा! खोटा, हितशत्रु तूं, न भाउ खरा;
न सुसंगतिगुण लागे दुष्टा, कीं[8] वृष्टिगुण[9] नभा उखरा. १०
औरस पुत्र प्रौढ ज्येष्ठ त्यागार्ह काय हा निखळ[10]?
कळलें स्पष्ट मला कीं, करितो चित्तीं शिरोनि हानि खळ. ११
आकारें चि परेंगित कळतें, बोलें[11] न काय हो! कळतें?
असती[12] सुसांत्विता[13] हि त्यजिती, जें तत्प्रियोक्त[14] पोकळ तें. १२
जिकडे असे मन तुझें, आश्रय तुज तो चि युक्त, जा तिकडे.'
हंसीं हंस, बकीं बक मिसळे; जन ओढतो स्वजातिकडे. १३
दशकंधरें[15] बिभीषणसा तो अपमानिला कवि क्षत्ता.
तत्ताप किति वदावा? वसल्या हृदयीं दुरुक्ति[16] त्या लत्ता. १४
रामाकडे बिभीषण, गेला धर्माकडे तसा च कवी;
शास्त्राभ्यास खरा गुरु, समयीं रक्षी, न मानसा चकवी. १५

---

१. सरस्वतीच्या तीरीं असणाऱ्या अद्वैतनामक वनांत. २. रिकाम्या गोष्टी. ३. सुंदर कवितेंत. ४. हृदयभेद करणारा. ५. सांभाळो, प्रेमपूर्वक रक्षण करो. ६. ज्यापासून उत्तम गति प्राप्त होते असे. ७. हा खळ दुर्योधन. ८. जसा. ९. वृष्टिगुण नभा लागे [तसा] उखरा न लागे=वृष्टि करण्याचा गुण आकाशांत असतो तसा डोंगरी किंवा माळ जमिनींत नसतो. १०. निखालस, केवळ. ११. शब्दानें, भाषणानें. १२. व्यभिचारिणी. १३. उत्तम प्रकारें जिचें सांत्वन केलें आहे अशी. १४. त्याचें प्रिय भाषण. १५. दहा कंधरा (कंठ) ज्यास त्या दशानन रावणानें. १६. दुर्भाषणें.

दूरुनि विदुर विलोकुनि धर्म म्हणे, 'दृष्टि निववली वढिलें[1],
कुरुकुळकल्याण[2] चि हें वरि विधिनें लोकरीतिनें मढिलें[3]. १६
जें न्यायामृत टाकुनि दाटुनि अन्यायमद्य कुन्नर पिते[4],
जाणों करणार हरण शस्त्रांचें द्यूत करुनि पुनरपि ते.' १७
धर्म म्हणे त्यासि 'पित्या! टाकुनि आलां किमर्थ अंधातें?
जें स्वीकृत[5] यष्टित्व[6] त्यजिलें त्वां केंवि सत्यसंधा[7]! तें?' १८
विदुर म्हणे, 'बा! न रुचे जेंवि कुमारीस पळ हि पति पिकला[8],
तेंवि नृपतिमतिला हा क्षत्ता न रुचे, सुनीति जरि शिकला. १९
घालविलें मज रायें मानुनियां मदुदितें[9] हितें अहितें[10]?
ह्मणुनि तुजकडे आलों; कोण उपासील[11] कोपल्या अहितें[12]? २०
प्रेमें काककुळास चि संतर्पायासि[13] आम्र पिकला जो,
त्याच्या गळां पडाया साहुनि अपमान कां न पिक[14] लाजो?' २१
धर्म विदुरासि निववी घर्मद्वार्ता[15] शिखीस[16] घन जेवीं,
प्रार्थुनि म्हणे,'पित्या! हो स्वस्थ, स्थिर करुनियां स्वमन जेवीं[17].'
राहुनि समीप शिकवी धर्माला त्या महर्षिसुत[18] रीती
विपदर्णवांत[19] होउनि नौका ज्या स्वाश्रितांसि उतरीती[20]. २३
धृतराष्ट्र म्हणे[21], 'चुकलों, विदुर न तो दवडिला कुशळ-विसरें[22];
करितों तळमळ गतधन जनसा, न पडे चि एक पळ विसर. २४

---

१. वडिलानें. (विदुरानें). २. [विदुर] हें कौरवकुळाचें [मूर्तिमंत] कल्याण च आहे. ३. मढविलें. ४. पिणारे. ५. स्वीकारलेलें. ६. आंधळ्या धृतराष्ट्राला काठी-प्रमाणें आधार देण्याचें काम. ७. सत्य प्रतिज्ञा ज्याची अशा! ८. ज्याचे केस पिकले आहेत असा. (म्हातारा). ९. माझीं भाषणें. १०. अप्रियें-**पंत.** ११. सेवा करील. १२. सर्पांतें. १३. तृप्त करायासि, पोसायास. १४. कोकिळ. १५. उन्हा-ळ्यांतील वणव्यानें पीडित जो त्याला. १६. मयूरास. १७. भोजन करीं. १८. व्यासमुनिपुत्र विदुर. १९. संकटसमुद्रांत. २०. उतरून परतीरास नेतात. २१. [संजयास] म्हणे. २२. समुदाय-**पंत.** कल्याणांचा समुदाय.

भलतें वदलों भ्रात्या, वदतो जैसें अबंधु अभ्रात्या[1],
पाहुनि होतील सुखी पांडवचातकमयूर अभ्रा त्या.' २५
परवृद्धि नसावी हा भाव प्रकटुनि न बोध मळवीला.
रडला, पडला मूर्छित, तळमळला, विदुरविरह कळवीला[2].२६
नृप संजयासि धाडी भ्रात्या विदुरासि शीघ्र आणाया,
शिकवी पुनःपुन्हां कीं, "बा[3]! म्हण घालूनि त्यासि आणीं[4], 'या[5].' "
सर्वस्व परित्यागुनि ज्याचें स्मरताति पादकंज[6] यमी[7]
त्या हरिच्या आप्तां तो नमुनि म्हणे, "दास सूत संजय मी,
आलों राजाज्ञेनें, गुरुदास्यमहर्धि[8] भविदुरापा[9], हें
जाणसि, कवे! पहा निजगुरुला[10] चि, मुहूर्त न विदुरीं[11] पाहें.२९
बहु म्हणतो नृप अनुदिन[12] गतधन कृपणा जनापरिस 'हाय!'
व्हावें[13] सुझें बुडतां भलत्या हि निवारिलें परि सहाय[13]." ३०
भीम म्हणे, 'बापाजी! जा समयीं[14], येथवां चि कां धाई!
तूं येथ नसावें, या भावें[15] करितो वरी च कांगाई[16].' ३१
धर्म म्हणे, 'ताता! तो तुजविण वर्तेल वृद्ध अंध कसा?
सत्संगशिवाविण[17] त्या दुःसह भव, वासवास[18] अंधकसा[19].' ३२
भेटे विदुर गजपुरीं असदाचरणोनितप्रभा[20] वढिला,
ज्याचा झाला साधुद्वेषें स्वाभाविक प्रभाव ढिला. ३३

---

१. जो भ्राता नव्हे अशाला. २. धृतराष्ट्रानें संजयास विदुरविरह कळविला. ३. बा संजया! ४. शपथा. ५. या चला. ६. चरणकमल. ७. संन्यासी, योगी. ८. गुरुसेवारूप मोठी समृद्धि. ९. संसारी जनास दुर्लभ. १०. आपल्या वडिल भावाला, धृतराष्ट्राला. ११. लांब असलेल्यास. १२. दररोज. १३. सहाय व्हावें. १४. योग्य काळीं, मरणसमयीं. (ही भीमाची क्रोधोक्ति आहे). १५. हेतूनें. १६. कांगावा. १७. सत्सहवासरूपी शंकरावांचून. १८. इंद्रास. १९. अंधकासुरासारखा. (अंधक हा महिषासुराच्या सेनेंतील एक प्रमुख असुर; यानें इन्द्रादि देवांस युद्धांत जर्जर केलें होतें). २०. [ऊनित=] न्यून—**पंत.** असदाचरणानें न्यून कांति ज्याची अशा.

जरि अप्रसन्न चित्तीं वरि दावी प्रेम, बैसवी अंकीं,[1]
अंध ह्मणे, 'हर्ष जसा मज, न तसा राज्य पावल्या रंकीं. ३४
जें कांहीं मीं वदलों वत्सा ! तुझिया मनीं न राहो तें,
पुण्य यश प्राप्त सहनशीलत्वें सज्जनीं नरा होतें.' ३५
विदुर म्हणे, 'दादाजी ! परम गुरु प्रभु हि तूं क्षमाकर[2] गा !
आम्हां पदाश्रितांची वृत्ति-स्थिति-कीर्ति[3] ही भवत्करगा[4]. ३६
ते[5] हे[6] मज सम, परि मन पाहुनि दीना मुलास कळकळतें,
गुरुजनशील असें चि प्रायः[7], प्रभुजी ! तुला सकळ कळतें.' ३७
समजावुनि पांडवहित[8] विदुर पुरा आणितां पुन्हा तातें,
दुर्योधन करि चिंता, कल्पुनि चित्तीं निजार्थघाता[9]तें. ३८
स्वहितकरशकुनिकर्णप्रमुखांसि ह्मणे, 'गृहांत अहि तातें
हा आणिला, दुखविला, सर्वांच्या ही करील घातां[10]तें. ३९
मोहुनि वृद्धमतीतें दायादांतें[11] फिरोनि आणवितो,
हा त्यां हातीं आम्हां बाळतरूला समूळ खाणवितो. ४०
न पहावे, न सहावे तें, मरतों, आजि भक्षितों विष मीं,
एवंविधमरणीं सुख, न मला काळीं तशा महाविषमीं[12].' ४१
शकुनि ह्मणे, 'प्राणाहुनि रक्षिति सत्यव्रताप्रति ज्ञाते,
शंका धरिसि वृथा कां? त्यजितील कसी कृता प्रतिज्ञा ते? ४२
जरि आले चि तरि, पुन्हां, योजूनि अपाय लक्षशा उडवूं.
रंध्रान्वेषी[13] आम्हीं बहु, त्यातें व्यसनसागरीं बुडवूं.' ४३
सांत्वन करि दुःशासन, कर्ण हि परि आग्रही न तो समजे;
टाकूं पाहे पंचप्राण, प्रियबंधु ते हि, त्यांसम[14] जे. ४४

---

१. [आपल्या] मांडीवर. २. क्षमेची खाण. ३. उपजीविकासाधन, सुरक्षितता व कीर्ति. ४. तुझ्या हातीं [आहे]. ५. पांडव. ६. कौरव. ७. बहुतकरून. ८. पांडवांचा हितकर्ता. ९. स्वार्थनाशातें. १०. पाठांतर—**अहितातें**. ११. बांधवांतें—पांडवांतें. (दाय+आद=वडिलोपार्जित द्रव्य घेणारा, बंधु, वारसदार). १२. मोठें संकट ज्यांत अशा काळीं. १३. व्यंग शोधून काढणारे. १४. त्या पंच-प्राणांसारखे आवडते जे बंधु त्यांका हि.

कर्ण म्हणे, ‘ हें न रुचे, तरि अरिकरिहरि[1] असों[2], अगा राया!
जें चित्तीं तें चि करूं, न उपेक्षीं भूतिच्या[3] अगारा यां[4]. ४५
पडले व्यसनीं केवळ ते तेजोहीन दीन दायाद,
ग्रीष्माल्पसरीं[5] सोडुनि गेलें जैसें नदीनदा याद. ४६
बळपति[6] गुहसा[7] मीं, त्या[8] अधिक बहुभुजास्यगात्र[9] आया[10] सा,
चाल, करूं शत्रुक्षय, पळ हि न होसील पात्र आयासा[11].’ ४७
ऐसें अनुमोदन दे दुष्टाला, जेंवि मद्य वेडसरा,
धांवे साधुवरि श्वा खवळविला जेंवि पाळकें डसरा[12]. ४८
सबळ सुयोधन पांडवहननार्थ निघे, अशांत अयनांत[13]
व्यास प्रकटे, ज्याच्या नांदे करुणा मनांत नयनांत. ४९
वारुनि त्यांसि मुनि म्हणे, ‘ धृतराष्ट्रा! तनुज हा तुझा खळ गा!
विनिपातहेतु[14] मार्गामाजि रजःपिहितमुख[15] जसा खळगा. ५०
हा हरुनि पांडवांचीं सर्वस्वें, जीवितें हि उर्वरितें[16]
हरणार, कसें म्हणसी तूं हितकर या अशा हि उर्वरितें[17]? ५१
देईल शोक, बुडवुनि कुळ, आपण ही बुडोनि, तुज राया!
सांग हित, सुज्ञ गुरु तूं आहेसि समर्थ यासि उजराया[18]. ५२
श्रमदा हि अन्यरोगा मानिति बहु[19], विटति साधु सुतरोगा[20];
किंवा हा[21] धर्माचें दास्य करुनि दुर्गुणाब्धि उतरो[22] गा! ५३
अथवा कशास हें ही? सुगंध कर्पूर हि न करी लसुणा,

---

१. शत्रुगजांचे सिंह. २. आपण आहों. ३. ऐश्वर्य—**पंत.** ४. या दुर्योधनाला. ५. ग्रीष्मऋतूंतील लहान सरोवरांत. ६. शक्तिमान्. ७. कार्तिकस्वामीसारखा. ८. त्या कार्तिकस्वामीला. ९. पुष्कळ (बारा) भुजा व (सहा) मुखें ज्यास असें शरीर. १०. माता—**पंत.** ११. कष्ट—**पंत.** १२. चावरा. १३. अयनं वर्त्मेत्यमरः—**पंत.** मार्गांत. १४. पडण्यास कारण. १५. धुळीनें आच्छादित मुख ज्याचें असा. १६. उरलेलीं. १७. उरुः+अरिः=उर्वरिः श्रेष्ठ शत्रूंतें इत्यर्थः—**पंत.** १८. सरळ करावयास. १९. फार बरा. २०. पुत्ररूपरोगाला. २१. दुर्योधन. २२. उल्लंघून पार जावो.

सिंहगुणस्वीकृतिला[1] तत्संगें काय गा! करील सुणा[2]? ५४
स्वपरयशोवृद्धि रुचे सुजनास, स्वपरकीर्तिहानि खळा;
बैसविला भूभूषणपदपदकीं[3] काय कांच[4]? हा निखळा[5]. ५५

मज वाटे हा कुरुचा वंश सुखें या जनांत नांदावा;
काय करूं? खळ करितो साधूंसीं स्वक्षयार्थ कां दावा?' ५६

धृतराष्ट्र म्हणे, 'ताता! जें हें द्यूतादि दैवकृत सारें,
भावि कसें टाळावें लोकें प्रारब्धकर्महृतसारें[6]? ५७

दुष्टसुतोत्थापयशें[7] कर्पूरविशुद्ध आत्मकुळ मळतें,
कळतें; तदपि स्नेहें मन टाकायास यास[8] कळकळतें.' ५८

व्यास म्हणे, 'सत्य वदसि वत्सा! आत्मा चि पुत्र वेदमतें,
ऐसें चि चित्त माझें पुत्रस्नेहेंकरूनियां भ्रमतें. ५९

एक कृषीवळपीडित[9] दुर्बळ वृष[10] पाहतां चि महिवर ती
ख्याता सुरभी[11] देवी स्नेहें झाली उदंड गहिंवरती. ६०

तूं पांडु विदुर मज सम, परि माझा पांडवांकडे ओढा;
निम्नाकडे[12] चि धांवे, नाटोपे जेंवि अद्रिचा[13] ओढा. ६१

कीं नाहीं जनक कनक[14], वन[15] कदनकरांसि[16] सेवणें पडलें,
वाटे बहु अवघड, जें न घडावें ज्यांस, त्यांस तें घडलें. ६२

पुष्कळ सुख भोगावें ऐसें चित्तीं असेल, तरि त्यातें[17]
हित सांग, कळेल तसें, साधुद्वेषें स्वघातकरित्यातें.' ६३

---

१. सिंहाच्या गुणांच्या अंगिकाराला. २. श्वान—**पंत.** ३. पृथ्वीला भूषणस्थान अशा पदकावर म्ह० सिंहासनावर. ४. कांच. (हा शब्द संस्कृतांत निरनुस्वार आणि पुल्लिंगीं आहे). ५. काढून टाका. ६. पूर्वकृतकर्मानें हरण केलें आहे सामर्थ्य ज्याचें अशा (लोकें). ७. दुष्ट पुत्रापासून उत्पन्न झालेल्या अपकीर्तीनें. ८. दुर्योधनास. ९. शेतकऱ्यांनीं पीडिलेला. १०. बैल. ११. कामधेनु. १२. उतरत्या प्रदेशाकडे. १३. पर्वताचा. (पर्वतापासून निघालेला). १४. सुवर्ण. (द्रव्य). १५. वनवास करणें भाग पडलें. १६. युद्ध करणारांस. (शूरांस). १७. त्या दुर्योधनातें.

राजा[1] म्हणे, 'करावें आजि तुम्हीं सुमतिधाम[2] नातुंड;
शिकवा स्वहित, पुरवितें तुमचें कीं विश्वकामना[3] तुंड[4].' ६४
व्यास म्हणे, 'पाजी घन वनें[5], खग असतो करूनि आ जो बा!
बापासि[6] बाप न म्हणे ऐशाला काय होय आजोबा? ६५
पांडव पाहुनि आतां मैत्रेय महर्षि येथ येईल,
बोधील[7] ऐकिल्यावर, नाहीं तरि उग्र शाप देईल.' ६६
ऐसें वदोनि, सोडुनि दुर्मतिसंसर्ग, मुनि पळाला हो!
कीं ताप आपणाला दुःसह शाप हि न त्या खळाला हो. ६७
आला मैत्रेयमुनि प्रार्थुनि शिकवावया हित ज्ञानी,
'खळबोधश्रम[8] निष्फळ' ऐसें कथिलें जरी हि तज्ज्ञानीं[9]. ६८
पूजुनि धृतराष्ट्र म्हणे, 'माझा[10] तापें न काय पळवा[10] हो,
पळवा हो! अघ[11], मजवरि तुमचा करुणासुधाब्धि[12] पळ वाहो.
हे ते बंधु प्रेमें नांदोनि जगीं सुकीर्ति करितिल कीं,
व्यसनार्तीं या दासीं करिल कृपा देव, जेंवि करितिल[13]कीं.' ७०
मैत्रेय म्हणे, 'राया! आहे हातीं तुझ्या चि बापा! हें,
त्यांच्या यांच्या ठायीं समतेसि पुढें तरी हि बा! पाहें. ७१
तूं ज्या सभेंत, तेथें ती कुलज्या[14] तेंवि काय गांजावी?
कुरुकुलकीर्ति श्रीमद्भीष्म हि असतां लयासि कां जावी? ७२
कां दंडिले न ते त्वां? स्वसभेंत चि घालिते दरवडा जे,
हा! हा! तो साधुमनीं अद्यापि असाधुवादरव[15] डाजे[16]. ७३

---

१. धृतराष्ट्र. २. सुबुद्धीचें घर. ३. जगाचें इच्छित. ४. मुख. ५. पाणी. ६. जो प्रत्यक्ष तुझें—बापाचें ऐकत नाहीं तो माझें—आजोबाचें ऐकेल काय? असा भावार्थ. ७. [दुर्योधनास] बोधील. ८. दुष्टांस केलेल्या उपदेशाचे श्रम. ९. तें जाणत्यानीं. १०. अर्थ—संतापानें माझें शरीर वाळलेल्या पाल्याप्रमाणें शुष्क न होवो. ११. दुःख. १२. करुणामृताचा सागर. १३. गजेंद्र—**पंत.** १४. कुलीन स्त्री. (द्रौपदी). १५. दुरुक्तींचा ध्वनि. १६. सलतो.

झाली [1]तस्करवसती जी होती कुरुसभा [2]जनकशाला.
अद्यापि इचें करिती भीष्म विदुर कवि [3]सभाजन कशाला? ७४
आतां सर्व असो तें, वत्सा! दुर्योधना! पहा हित रे!
[4]सदतिक्रमकर न [5]तैसा, जेंवि [6]गरुडलंघनें महाहि [7]तरे. ७५
संसार दों दिसांचा, यश जोडी जो कुलीन तो चि तरे;
घ्यावें [8]बरें म्हणोनि स्वपरमुखें; तें कुलीनतोचित रे! ७६
भ्राते साधु यशस्वी शस्त्रास्त्रज्ञ प्रसिद्ध वासवसे,
पद्म चि [9]ते ज्यांत सदा [10]श्री [11]गुणगणरसयशःसुवास वसे. ७७
भासति तसे चि [12]सत्वें जैसे होते सविप्र भवनांत,
अद्यापि वल्कलाजिनवसन हि दिसती न [13]विप्रभ वनांत. ७८
भीमें हिडिंबबकखळ वधिले मागें, जसे करी हरिनें,
[14]किर्मीरनाम राक्षस सांप्रत, भ्यावें मनीं जया [15]हरिनें. ७९
ऐशा प्रबळांसीं तूं सख्यें जरि वर्तसील, तरशील;
सुख भोगिशील पुष्कळ, नाहीं तरि हा! वृथा चि मरशील.'
ऐसें सत्य हित वदे, परि न तयाला धरूनि [16]तोख वळे,
शापासि यत्न [17]मांडी, मांडी [18]ताडी, [19]कुदेव तो खवळे. ८१
[20]ज्याच्या, सुहित करावें अहितकरानयविषा दमुनि, पानें,
उपदेशामृत थुकितां, कां न धरावा विषाद मुनिपानें? ८२

---

१. चोरांचें वासगृह. २. ब्रह्मवेत्त्या राजा जनकाचें मंदीर च अशी. ३. पूजन—**पंत**. ४. साधूंचें लंघन करणारा. ५. न तसा तरे. ६. गरुडाचा अनादर केल्यानें. ७. न तरे. ८. बरें म्हणून घेणें. ९. ते भ्राते पद्म (कमळासारखे) होत. १०. लक्ष्मी (पक्षीं) शोभा. ११. गुणसमुदायरूप रस आणि यशोरूप सुवास. १२. प्रतापानें, शौर्यानें. १३. निस्तेज. १४. हा बकासुराचा भाऊ. १५. इन्द्रानें. १६. संतोष. १७. सुरू करी. १८. थोपटी. १९. भूदेव—**पंत**. २०. अन्वयार्थः—अहितकरानयविषा (अहित करणाऱ्या अनीतिरूप विषाला) दमुनि (नाहींसें करून) ज्याच्या पानें सुहित करावें, [तें] उपदेशामृत थुकितां मुनिपानें (मुनिश्रेष्ठानें) विषाद कां न धरावा?

मैत्रेय म्हणे, "[1]पापा [2]तापावह सदुपदेश [3]परिसविता,
[4]घूंका दृष्टीस नको [5]सर्वजगत्तोषहेतु परि [6]सविता. ८३
दुर्योधना! तुज जरि न शिक्षावें, तरि म्हणेल [7]मत्तप 'हा!
खळ [8]मल्लंघन करितो, तूं हि न हो [9]क्षांतिभाग्यमत्त, पहा.' ८४
यास्तव घे शाप, तुझ्या भीमगदा करिल चूर्ण मांड्यांतें,
वाढिल काळा, बाळा जसि वाढी माय [10]तूर्ण [11]मांड्यांतें." ८५
पाय धरुनि अंध म्हणे, 'फिरवा जी! शाप.' मुनि म्हणे, "न रडें,
'[12]वाक् करिन,' म्हणो, [13]स्वौषधिवदनाचें व्याघ्र न चघळी नरडें.
धर्मन्यायें वर्ता, तिळ हि न करिजेल हानि शापानें,
तापद नव्हे चि, केला [14]स्वसुहृन्मैत्रेय हा [15]निशापानें." ८७
मुनि गेल्यावरि राजा विदुरासि म्हणे, '[16]भया [17]अ-दभ्रा त्या
वत्स वृकोदर कैसा परिहरिता जाहला? वद भ्रात्या!' ८८
विदुर म्हणे, "कथिलें जें धर्मे किर्मीरहननवृत्त मला,
तें फार काय सांगों? त्या कर्मीं भीम [18]भीमसा गमला. ८९
निर्मी किर्मीर [19]महामाया, तो काळसा करी लगट,
वनदेवतांसि वाटे सर्व प्राण्यांसि हा करील गट. ९०
[20]तन्नाद कांपवी बहु कृष्णेतें, जेंवि वायु कदलीतें;
[21]पांचां ही वीरां, ती तेव्हां जें 'हाय! हाय!' वदली तें. ९१
'कोण तुम्हीं? सांगा रे!' वदत असें दुष्ट ये जवळ खाया,

---

१. अधमाला २. तापकारक. ३. ऐकविणारा. ४. घुबडाला, दिवाभिताला. ५. सर्व जगाच्या आनंदास कारण. ६. सूर्य. ७. माझें तप. ८. माझा—तपाचा अनादर. ९. सहनशीलतारूप ऐश्वर्यानें उन्मत्त. १०. लवकर. ११. पक्वान्नविशेषातें. १२. '[तुमच्या] बोलण्याप्रमाणें मी करीन' असें दुर्योधन म्हणो. १३. सु (उत्तम मारक) औषधी आहे ज्याचे वदनीं अशाचें. १४. आपला मित्र मैत्रेय. १५. चंद्रानें. १६. [किर्मीरराक्षसाच्या] भयाला. १७. बहु. १८. उग्र महादेवासारखा. १९. इन्द्रजालासारखें कपट. २०. त्याचा शब्द. २१. पांच पांडवांला हि तिनें 'हाय हाय' असें रोदन कांपवी, असा भावार्थ.

धर्मोक्त वृत्त कारण होय बकाराति[१]तेज वळखाया. ९२
दुष्ट म्हणे, 'होउनि परलोकीं त्वद्रक्ततृप्त बक राहो,
भीमा! स्वभ्रात्यांसह किर्मीरव्याघ्र[२]भक्ष्य बकरा हो.' ९३
वारुनि धनंजयातें, घालुनि दृढ कास, धरुनि नग[३] हातें,
भीम भिडे रक्षासीं[४], प्रथम म्हणे, 'हूं' रणांत, मग 'हा' तें[५].
वधिलें भीमें जेव्हां हरिसें[६] हि तें रक्ष नावरायाचें,
सुर वदले याचिपरि, 'स्वरिपु वधुनि रक्ष नावँ[७] रार्याचें[८].'" ९५
भीमाच्या विजयातें विदुर सविस्तर नृपासि आयकवी,
तें ग्रंथविस्तराला भ्याला जो, तो वदेल काय कवी? ९६

अध्याय दुसरा.

'दुष्टानीं नागविला कपटद्यूतांत धर्म,' हे वार्ता
जातां झाल्या यादवपांचाळमती[९] महाधिनें[१०] आर्ता[११]. १
यादवपांचाळ वनीं आले भेटावयासि धर्मातें,
निंदिति धृतराष्ट्राच्या तत्तनयांच्या हि दुष्ट कर्मातें. २
पाहोनि पांडवांचीं रूपें तो विश्वभावन[१२] वनीं तीं,
पावे त्या भावातें[१३] जो तापें होय भाव नवनीतीं[१४]. ३
कृष्ण म्हणे, 'बा साधो! स्वकृतकुकृत आठवूनि रडतील.
छळ करिते छळक[१५] रिते[१६] धनें यशें जीवनें हि पडतील. ४

---

१. बकासुराच्या शत्रूचें तेज. २. किर्मीररूप वाघाचें भक्ष्य. ३. वृक्ष. ४. पाठांतर-**यातूसीं.** ५. तें रक्ष (तो राक्षस) 'हा!' असें म्हणे. ६. इन्द्रास. ७. कीर्ति, नांवलौकिक. ८. धर्मांचें. ९. मातृपक्षाकडील यादव आणि श्वशुरपक्षाकडील पांचाळ यांचें मन. १०. मोठ्या चिंतेनें. ११. पीडित. १२. विश्वाचा निर्माणकर्ता. (कृष्ण). १३. दयार्द्रभावातें. १४. लोण्याचे ठिकाणीं. १५. साधु-पीडक. १६. रिक्त, रहित.

दुर्योधनदुःशासनकर्णशकुनिरक्त भूमि सेवील,
[1]गृध्रशिवासंघ सुखें तन्मांसातें यथेष्ट जेवील. ५
धर्मन्यायीं त्वत्सम [2]पूर्वाभ्यासी [3]रते, नवा न रते;
खळ आकारें दिसती, परि नर न, विवेकहीन वानर ते. ६
कां गेला विदुर पुन्हां? म्हणतो त्या आंधळ्यासि कां 'जी' 'जी'
ती प्यावी [4]अमृतांधें काय, त्यजिली वमूनि कांजी जी? ७
खळ हो! वळें तुम्हीं च व्यसनीं बुडवावया असु [5]सका रे!
सोडाल आठवूनि स्वकृतदुरित दीर्घ उष्ण सुसकारे. ८
[6]सत्तापद हो! [7]खदिरांगारानीं न्हाल, व्हाल पापडसे,
साप डसे एकास चि, सद्द्वेष्ट्याच्या कुळासि पाप डसे.' ९
जिष्णु म्हणे, 'कृष्णा तूं भगवान् विश्वेश विष्णु मज कळलें;
तत्त्व व्यासें कथिलें, कीं हें सद्भाग्य सत्फळीं फळलें. १०
सत्य तुझा संकल्प प्रभुजी! जें कार्य तें चि करिसील.
[8]स्वपदाश्रितजनतापत्रयतम तूं तरणि तूर्ण हरिशील.' ११
कृष्ण म्हणे, 'त्वत्प्रिय ते मत्प्रिय, [9]भवदहित ते चि [10]मदहित रे!
तुज मज जो न अनुसरे तो न भवाब्धींत एक पद हि तरे.' १२
[11]श्रीकृष्णा श्रीकृष्णा दाउनि [12]खळपाणिकृष्टकेश वदे,
उक्तिकडे मन दे, परि नयन [13]तदास्याकडे न केशव दे. १३
'हे केश धरुनि वोढुनि नेलें दुःशासनें सभेंत, सख्या!

---

१. गिधाडें आणि कोल्हे यांचे कळप. २. पूर्वीं ज्यानें अभ्यास केला आहे तो. ३. रममाण होतो, आनंद पावतो. ४. [अमृत हें च अंध (अन्न) ज्याचें त्या] देवें—**पंत**. ५. शक्य व्हा. ६. साधूंना ताप देणारे हो! ७. खैराच्या निखाऱ्यानीं. ८. आपल्या चरणांचा आश्रय केलेल्या भक्तजनांचें तापत्रयरूप तम (अंधकार) त्याचा सूर्य. ९. तुमचे शत्रु. १०. माझे शत्रु. ११. द्रौपदी. १२. दुष्ट दुःशासनानें स्वहस्तानें ओढलेले केश. १३. द्रौपदीच्या मुखाकडे. (द्रौपदी फार क्रोधानें बोलत होती, त्यामुळें तिच्या मुखाकडे कृष्णाच्यानें पाहवलें नाहीं असा भावार्थ.)

तेव्हां मज आठवली त्वत्पदयुगली सखी, न अन्य सख्या. १४
ईणें चि राखिली बा! लज्जा, उघडी पडों दिली न सती;
यदुकुरुकीर्ति न उरती, जरि मज हे ठावुकी किली[1] नसती. १५
होते समीप पांच हि पति, अतिमति[2] हे, मनें उदासीनें;
म्यां व्यसन साहिलें तें न असेल विलोकिलें कुदासीनें[3]; १६
सोडी पुनःपुन्हा खळ, न धरुनि लज्जा भया दया, लुगड्या,
उघडें पडतें वपु तरि तूं अंतरतासि गा! दयालु गड्या! १७
जें[4] पापें, गरदें[5], अग्निद, सर्वस्वहर, स्वदारवस्त्रहर,
तदुपेक्षा करिति कसी? हे साक्षादेकमुख सशस्त्र हर. १८
गुरु तात बंधु पति सुत कोण्हीं च मला नसे; जिला असती
तीस घडेल असें कां? हसतील सतीजनव्रता असती[6]. १९
स्त्रीलंघन करित्यातें प्राकृत हि न साहती, पहा, लावा[7].
हा! लावावा कर मज? वातें हि न, पदर ही न हालावा. २०
यांचीं शस्त्रें अस्त्रें दोर्दंडबळें[8] खळें वृथा केलीं,
धिक्कष्टम्[9]! सर्व यशें सुज्ञानें एकदा लया गेलीं.' २१
ऐसें वदोनि रडतां कृष्ण म्हणे, '[10]अंब! तूं नको चि रडों,
कळवळतें मन्मन सखि! या शोकाचळभरें[11] नको चिरडों. २२
सखि! अखिलसतीपूज्ये! मद्धैर्य तवाश्रुबिंदुसह गळतें,
केवळ तुझें चि न वदन, अमृतद्युतिगौर[12] मद्यश हि मळतें. २३
तुज गांजिलें जिहीं त्यां ज्यांत यशोनाश अंगनाश तशा
वरितील दशा, त्यांच्या शोकें रडतील अंगना शतशा. २४
अससी असी च धर्मी चित्तीं माझा धरूनि बोल टिकें,

---

१. किली—युक्ति. २. अतिशय बुद्धिमान्. ३. नीच बटकीनें. ४. दुष्ट, पापी. ५. विष देणारे. ६. जारिणी स्त्रिया. ७. तुलना करा. ८. बाहुबळें. (दोः=बाहु). ९. अरेरे!! हाय! हाय! १०. हे माते! (राजपत्नी, गुरुपत्नी, मित्रपत्नी, साध्वी, श्वश्रु व माता या सर्वांस 'अंब' शब्द लावतात). ११. शोकरूप पर्वताच्या भारानें. १२. चंद्रासारखें स्वच्छ.

झालें कधीं च न मृषा, होईल मदुक्त काय हो ! लटिकें ? २५
होइल मद्वच न मृषा, केव्हां तरि वारिराशि आटेल,
ग्रहगण गळेल, हिमगिरिराज खचेल, क्षिती हि फाटेल.' २६
ऐसें ऐकुनि साध्वी मध्यमपति[1]च्या मुखाकडे पाहे;
जिष्णु म्हणे, ' या प्रभुच्या वचनीं विश्वास आमुचा आहे.' २७
धृष्टद्युम्न म्हणे, ' कुरुगुरु भीष्मप्रभु जसा तसा द्रोण;
[2]खळकाळ कां न झाले ? पाहेल कुकर्म सभ्य तें कोण ? २८
वारावे मारावे खळ, तें केलें न कर्म दोघानीं,
नय सोडुनि, अघ जोडुनि, वद वांचावें कशास मोघांनीं[3] ? २९
द्रोणासि मीं, शिखंडी भीष्मासि वधील, काय हें खोटें ?
मोटें यश यांत भगिनि ! कां तूं कर्णांत घालीसी बोटें ? ३०
मारावा दुर्योधन भीमें, पार्थें हि कर्ण, हा नियम
न चुकेल, जसा न चुके निमिष हि करितां प्रजा[4]सुहानि यम.'
कृष्ण म्हणे, ' शिशुपाळप्रियसख यदुशत्रु शाल्व माराया
जरि गुंतलों न असतों, न श्रम हा पावतासि गा ! राया ! ३२
समयीं धांवत येतों, द्यूतातें कथुनि दोष राहवितों,
जरि न वळते विशृंखळ खळ, खळखळ रक्तपूर वाहवितों: ३३
पाहोनि राजसूयक्रतु जातां, शाल्वसंकटीं शिरलों;
तें शमलें, तों द्यूतव्यसन परिसतां तसा चि मीं फिरलों. ३४
आतां काय उपाय ? व्यसन न तुमच्या हि हें गळां पडलें
आम्हां सुहृदांच्या ही; बा ! मत्पुर[5] सर्व खळखळां रडलें. ३५
सरतील क्षणलवसे लघु[6], केले अवधि अब्द[7] तेरा जे;
त्वत्सम साधु न लागों देती स्वयशासि शब्द ते राजे.' ३६
सांत्वन करूनि जातां प्रभु भिजवी स्वाश्रुनीं स्वसेलां[8] हो !

१. अर्जुनाच्या. २. खळांचे शासनकर्ते असे काळ. ३. निष्फळ जीवित ज्यांचें त्यानीं. ४. प्रजेची प्राणहानि. ५. माझें नगर. (द्वारका). ६. लवकर. ७. वर्षें. ८. आपला शेला.

ने स्वरथीं वाहुनि कीं ताप न अभिमन्युला स्वसेला[1] हो. ३७
धृष्टद्युम्नें नेले प्रतिविंध्यप्रमुख जे सकळ भाचे;
अतितुच्छ ज्यांपुढें दिग्द्विरदाच्या[2] गतिविलास कळभाचे[3]. ३८
नकुळ[4]सहदेवभार्या माहेराला स्वबंधुनीं नेल्या.
जो इंद्रसेन[5] सेवक धात्री[6] दासी हि हरिकडे गेल्या. ३९
द्वैतवनाप्रति धौम्यद्रुपदसुतायुक्त पांडव हि गेले.
तेथें मार्कंडेयें दर्शन देवूनि धन्य ते केले. ४०
तो मुनि म्हणे, 'विलोकुनि तुज झालें स्मरण रामराज्याचें.
आनंदभरित चरित त्वरित करितसे सुपामरा ज्याचें.' ४१
द्वैतवनीं द्रुपदसुता पातिला होवूनि तप्ततनु गांजो,
वदली लेश हि न कधीं श्रुतिकटु[7] अपराधियां हि अनुगां[8] जो. ४२
द्यूत महाव्यसन असें नाइकिलें काय नरवरा ! कानीं ?
सर्वस्व हरुनि सहसा केलासि अरण्यचर वराकानीं. ४३
श्रोतृश्रुतिहर[9] कीं तूं वदता सुविचारखनि कथा पिकसा[10],
व्यसनांत बुडालास भ्रात्यांसह सुज्ञ जरि हि तथापि कसा ? ४४
प्रासादीं नगरीं जे वसले ते तरुतळीं दव-स्थानीं[11],
झाले विच्छवि[12] रवि[13]-कवि-पविधरसे बंधु असदवस्थानीं[14]. ४५
यांसि पहातां कैसें व्याकुळ मानस तुझें नव्हे राया ?
तुज काय दया यांची ? प्राणांस हि सिद्ध तूं अव्हेराया. ४६
व्यसनप्रसंग तुज ही तेजस्विवरासि अंक[15] हा रविला,

---

१. वहीण जी द्रौपदी तिला. २. दिग्गजाच्या. ३. छाव्याचे. ४. नकुळाची स्त्री करेणुमति, ही शिशुपालाची कन्या आणि धृष्टकेतूची भगिनी; हिच्या पुत्राचें नांव निरमित्र. सहदेवाची स्त्री विजया, ही केकयदेशच्या राजाची कन्या; हिच्या पुत्राचें नांव सुहोत्र. ५. धर्माचा सारथी. ६. दाया. ७. कर्णकठोर. ८. सेवकांस. ९. श्रोत्यांच्या कर्णांस मोहणारा असा. १०. कोकिळेसारखा. ११. वन—**पंत**. वनप्रदेशांत. १२. निस्तेज. १३. सूर्य, ब्रह्मदेव (अगर शुक्र) आणि इन्द्र यांच्यासारखे. १४. दुष्ट, वाईट अशा ठिकाणीं. १५. कलंक—**पंत**.

झालासि दीन, वाटे द्यूतीं तो हि प्रताप हारवला. ४७
या दुष्टाप्रति आलें सोडुनि मेल्या दशानना शील[1];
ती कोणा धीराच्या धृतिला माझी दशा न नाशील? ४८
ती स्पर्शली नसेल चि कोणा हि सभेंत दुर्दशा स्त्रीतें,
योग्य पहाया काय द्रोण, नदीसुत, तुम्हीं हि शास्त्री[2] तें? ४९
सर्वत्र क्रोध जसा तैसी सर्वत्र न क्षमा साजे,
ते कैसे न वधावे, तोडिति परघातदक्ष मासा जे? ५०
येऊं द्या कोप मनीं, एकिकडे संप्रति क्षमा राहो;
कां गोष्पदांत[3] बुडतां? यश रक्षा, खळ विपक्ष[4] मारा हो! ५१
क्रोध असावा समयीं, केवळ वश चित्त न क्षमेला हो!
कोप त्यजितां जरि जमदग्नि[5] धनुर्वेददक्ष, मेला हो!' ५२
धर्म म्हणे, "मतिमति! सति! यतिपति[6]गति अतिसमर्थ जो हरि तो
म्हणतो, 'क्षमा चि बरवी,' परवीरयशें स्वसद्गुणें हरितो. ५३
व्यास द्रोण विदुर कृप भीष्म श्रीकृष्णनाथ हे सुकवी
म्हणति, 'क्षमा शिवतरुंप्रति[7] पोषी, क्रोध सर्वथा सुकवी.' ५४
व्याघ्र व्याळ[8] क्रूर, क्रूरतर क्रोध, बोधरोधक[9] हा[10],
क्रोधवशासि विलोकुनि बहु म्हणति स्वहिततत्त्वशोधक 'हा![11]'
वरिली सुयोधनें ती[12], ह्यां ही भावुकपद[13] क्षमा[14], तींत[15]
रत जे इला न सेविति, दवडिति हित ते अदक्ष मातींत. ५६
त्यजुनि तिला बहु तरले, एक हि न इला त्यजूनि तरला गे!
कृष्णे! क्षमा सुधारस, रसिका रस गोड कां इतर लागे? ५७

---

१. स्वभाव. (दुःस्वभाव). २. शास्त्रज्ञ. ३. गाईचें पाऊल उमटलेल्या जागीं सांचणाऱ्या अत्यल्प पाण्यांत. ४. शत्रु. ५. जमदग्नि हा परशुरामाचा पिता. हा धनुर्वेदांत निपुण होता; पण क्षमाशील झाल्यानें सहस्रार्जुनानें यास ठार मारिलें. ६. थोर संन्यासी जनांला आश्रयस्थान. ७. कल्याणरूप वृक्षाप्रत. ८. सर्प. ९. ज्ञानाला प्रतिबंध करणारा. १०. हा क्रोध. ११. खेद—**पंत.** १२. ती क्षमा म्ह० पृथ्वी. १३. कल्याणाचें स्थान च अशी. १४. क्षांति. १५. क्षमेंत—पृथ्वींत.

श्रितहित करिती, हरिती सर्वव्यसन क्षमाभवानी हो!
आराधावी आम्हीं [1]खळमहिषापहृतवैभवानीं हो." ५८
भीम म्हणे, 'देवा! त्वां जन्मापासूनि सेविला धर्म'
त्याचें हें फळ, नाहीं धन, मान, स्थान, यश, नसे [2]शर्म. ५९
ज्यांसीं जैसें त्यांसीं तैसें जरि वर्ततासि, तरि अरि ते
हरिते कां सर्वस्व? व्यसनीं आम्हांसि मग्न कां करिते? ६०
न क्षत्रिय तूं, साधु ब्राह्मण [3]आम्नाय पढविता, पढता,
मानधन क्षत्रिय या व्यसनें, ज्वलनें कटाहसा, कढता, ६१
राज्योपद्रव गेला, झाला [4]अभिलषित लाभ [5]अजिनाचा,
परमोत्सवीं उगे कां? अजि! गा, उडवा स्ववल्क, अजि! नाचा.
काय म्हणों तुज आर्या! ब्राह्मणवृत्तीस काय अनुसरसी?
त्यजुनि जळधिवसति कसी [6]तिमिंगिळें सेविजेल [7]तनु सरसी?
श्रेयस्कर स्वधर्म त्यागुनि घ्यावी न विप्रता [8]पदरीं;
प्रकटी यशोर्थ, बुडवी न कधीं त्वत्समकवि प्रताप दरीं. ६४
हे आर्या! हे भार्या, हे आम्हीं, योग्य काय वनवासा?
वल्काजिनधर वससि, स्वस्थ कसा या वनांत [9]नवासा? ६५
देतील राज्य न सुखें, धरिजे कितवोक्तिचा न विश्वास,
काळाचा हिं भरवसा नाहीं, जो नित्य खाय [10]विश्वास. ६६
द्वादश वर्षें [11]गहनीं, स्वजनीं अज्ञात वर्ष तेरावें
लोटावें कैंवि बरें? दूरविचारें करूनि हेरावें. ६७
वसवेल [12]कथंकथमपि आम्हां [13]तप एक [14]साजणां रानीं,
न कळत कसें वसावें तेजें विश्वांत [15]साजणारानीं? ६८

---

१. दुर्योधनादिरूप महिषासुरानीं हरण केलें वैभव ज्यांचें त्यानीं. २. सुख. ३. वेद-पंत. ४. इच्छिलेला. ५. कृष्णाजिनाचा. ६. एक जातीचा मासा; याची लांबी शतयोजनांपेक्षां अधिक असते. ७. लहान. ८. भयीं, संकटीं. ९. नवा नव्हे असा. १०. जगास. ११. अरण्यांत. १२. कसें तरी, मोठ्या कष्टानें. १३. बारा वर्षें. १४. सहाजणां. १५. शोभणारानीं.

रविवरि अभ्रें तैसीं वस्त्रें तव विग्रहाउपरि[1] मळकीं,
गुप्ता हि मृगमदातें[2] प्रकट करितसे स्वयें सुपरिमळ कीं. ॥ ६९
अज्ञातवास करितां जरि आम्हीं अरिचरासि[3] आढळलों,
स्वपदचरमसोपानापासुनि[4] देवा! न काय गा! ढळलों? ७०
चरमदिनीं हि उमगतां व्हावें वनवासनिष्ठ पुनरपि कीं?
तो न द्रवेल सुजनीं, कल्पुनि काकत्व जेंवि कुनर पिकीं. ७१
मरती वनांत पडतां बा! जेंवि न पावतां नदा यादें,
आम्हीं तसें मरावें, करिजेल न राज्यदान दायादें. ७२
सोडील कसा तीतें, जी देती नित्य लाभ नव धरणी?
वध्य चि खळ, धर्म चि हा, चोराचा, दोषहेतु न, वध रणीं.
भिणगापरि[5] न वस वनीं, म्हण गा! बापा! मनुष्यदेवा! 'हूं'
दे बाहूंस यश रणीं खळखळ खळरक्तपूर दे बाहू. ७४
पुरुषाच्या शोभेला जें बळ खळविजय दे न नग[6] दे तें,
हित सत्य, असें म्हणतां देवा! किति मीं म्हणों 'न न' गदेतें.
धर्म म्हणे, "भीमा! बा! दुर्व्यसनी मीं च हेतु तापातें,
दुःखीं साश्रित[7] हि बुडे, करितो जो मीलिताक्ष[8] पापातें. ७६
तेव्हा चि क्षण निष्ठुर होवुनि हे मूर्तिमंत पाप कर
त्वां जरि केले असते भस्म, न होते तुम्हांसि तापकर. ७७
द्यूताला युद्धाला जावें चि बलाविल्या, प्रतिज्ञा ती
रक्षूं जातां, कपटें हरिता झाला पदाप्रति ज्ञाती[9]. ७८
पूज्या मर्यादा, परि भ्याला कांहीं हि न शकुनी तीतें;
तो नावरे चि घातक दुर्जन जो होय वश कुनीतीतें. ७९
हे कृष्णा तरि[10] झाली, तरलों त्या दुस्तरा हि आवर्ता[11],

---

१. शरीरावर. २. कस्तूरीतें—**पंत**. ३. शत्रूकडील हेराला. ४. आपल्या पदाच्या शेवटच्या पायरीपासून. ५. भिकाऱ्याप्रमाणें. ६. अलंकार, दागिने. ७. आश्रित जनांसह. ८. मिटले आहेत डोळे ज्यानें असा. ९. स्वजन, गोत्रज, (दुर्योधन). १०. नौका—**पंत**. ११. भोंवऱ्यास. (शकुनीस).

बुडतों चि, या सतीचा महिमा जरि काय हात आवतो. ८०
दाटूनि अनुद्यूतीं[1] आणुनि पण करविला पुनरपि, तया
लंघूं कैसें? पाडी नरकीं जो अनृत तो कुनर पितयां[2]. ८१
प्राणांस तुम्हांस हि मीं त्यजिन, न धर्मासि[3] पळ हि सोडीन,
हें व्रत धर्म चि रक्षू, बापा! न कदापि अयश जोडीन. ८२
बा! गा! धर्माच्या तों कोण्हीं सोडूं नये चि कासेतें,
निष्फळ होती मेघें त्यजिलीं आलीं[4] हि जींविका सेतें. ८३
अंभोदासि[5] पहाती जैसीं पसरूनि नित्य 'आ' शेतें,
धर्मासि तसीं भूतें[6]; करि पूर्ण समर्थ हा चि आशेतें. ८४
निजहितकरधर्माचें कुशळें विटवूं नये चि मन कांहीं,
यापरि पोषणपालनलालन करिजे न अन्यजनकाहीं. ८५
साधु म्हणति, 'जो न करी धर्मासीं नीतिसीं विरोधा, त्या
रक्षीं व्यसनीं, तद्दितर जन उदकीं लोष्टसा[7] विरो, धात्या[8]!'
म्हणवूनि अनुसरावें सुज्ञें न क्रोधलोभकाम-मता,
पतनार्थ कां अहंता पोषावी, गा! तसीच कां ममता? ८७
तुमचे प्रताप जे जे दिग्विजयीं[9] प्रकटले न ते लटिके,
कुरुगुरुपुढें परि न गुरु, यज्ञांत घृतापुढें न तेल टिके. ८८
भक्षुनि अन्न न समयीं अंतर देती भले नयज्ञाते,
द्रोणकृप युद्धयज्ञा वरितील, तसे परा न यज्ञा ते. ८९
आम्हीं नियम त्यजितां, न चुकेल नदीज ही उगाराया[10],
त्या सर्वज्ञ प्रभुला बा! कोण म्हणेल, 'गा! उगा, राया!' ९०
हे सर्व असोत, जया वीरप्रवरा सुयोध नत सारे,

---

१. पुन्हा—**पंत.** पुन्हां खेळलेल्या द्यूतांत. २. पित्याला. ३. प्रतिज्ञापालनादि धर्मास. ४. जींविका आलीं—पिकास आलेलीं (शेतें). ५. मेघास. ६. प्राणिमात्र धर्माकडे तसें पाहोत. ७. मातीच्या ढेंकळासारखा. ८. हे ब्रह्मदेवा! ९. राजसूय यज्ञ करण्यापूर्वी केलेल्या दिग्विजयांत. १०. [आम्हांवर शस्त्र] उगाराया.

एक चि कर्ण पुरे तो; [1]कार्यपति जसा, सुयोधन तसा रे! ९१
यांसीं कलि करणें हें न म्हणेल कधीं सुधी नर विहित रे!
धर्मन्याय त्यजितां तेजस्वी ही तमीं न रवि हि तरे." ९२
भीम उगा चि वसे, तों ये भगवान् व्यास सुप्रसन्नमनें,
जाणों साक्षाद्धर्म चि तो, ते झाले कृतार्थ तन्नमनें. ९३
दिव्यास्त्रलाभकारण सद्विद्या तो दयांबुराशि कवी
एकांतीं [2]राज्ययशःकामा त्या श्रीयुधिष्ठिरा शिकवी. ९४
धर्म हि, मुनि गेल्यावरि, त्याच्या आज्ञेवरूनि जिष्णूतें
सद्विद्या उपदेशी, जैसा कश्यपमहर्षि विष्णूतें. ९५
तो [3]काम्यकीं प्रतिस्मृति विद्या उपदेशिली तया विधिनें,
जी आपणासि जैसी दिधली द्वैपायनें दयानिधिनें. ९६
धर्म असें वदला कीं, "जिष्णो! सुतपें समस्त ताप सरे,
हो यास्तव आम्हां या व्यसनीं तारावयासि तापस रे! ९७
या विद्यासामर्थ्यें तप करितां सर्व विघ्न पळतील.
तुज दिव्यास्त्रें द्याया शक्रादिकलोकपाळ वळतील. ९८
ज्याचें भाषण सोडुनि बाळपणीं सुस्वरीं किमपि न रतूं,
त्या व्यासें कथिलें कीं, 'नारायणसख पुराणऋषि नर तूं.' ९९
करिशील महत्कर्म तूं नारायणसहाय [4]शुभशील,
त्वद्यश म्हणेल, 'किति [5]सुरधेनूधा! सद्रसासि [6]दुभशील?'
हो सिद्ध, शीघ्र ये, बा! हे बाहु तुझे असोत जयशाली,
हो वृष्टि तपोभ्राची, बहु हृत्क्षेत्रीं पिकोत [7]नयशाली." १०१
भ्रात्यांतें भार्येतें जिष्णु म्हणे, 'जें अभीष्ट सत्वर तें
होईल सिद्ध, न चिरव्यसनीं बुडिजे कधीं हि [8]सत्वरतें. १०२

---

१. कार्याचा पति. (केवळ भोक्ता असा भावार्थ). २. राज्य आणि यश यांची इच्छा ज्यास, त्याला. ३. काम्यकवनांत. ४. मंगलकारक आहे स्वभाव ज्याचा असा. ५. धेनूची वोंटी—**पंत**. हे कामधेनूच्या कांसे! ६. देशील. ७. नीतिरूप तांदूळ. ८. सत्वसंपन्नानें.

धौम्याच्या धर्मांच्या क्षण हि चुकावें तुम्हीं न सेवेला,
गुरुचरणा यश जैसें स्वर्गींच्या ही तसें नसे वेला[1].' १०३
मग जाय तप कराया गुरुपद वंदूनि इंद्रकीलनगा,
तद्विरहितां दिसे तम दिवसा, नसतां हि नेत्रमीलन गा! १०४
'येथें चि रहा' ऐसें गगन[2] म्हणे त्या पुरातना ऋषितें,
प्राशी[3] तपस्विवेष स्वर्नाथ[4] तयासि दृग्द्वयें[5] तृषितें. १०५
शक्र म्हणे, 'कां धरिलें जें शस्त्र विरुद्ध तापसत्वा तें?
शांतें येथ तपावें, लेश हि द्यावा न ताप सत्वातें[6]. १०६
क्षत्रिय कीं ब्राह्मण तूं शस्त्रपरिग्रह[7] किमर्थ? सांग मला,
त्वच्चित्ताला तापसविरुद्ध हा वेष योग्य कां गमला?' १०७
पार्थाचा दृढ निश्चय कळतां, दर्शन तयासि वासव दे,
खेदानंदाश्रुभरें भिजवुनियां उत्तरीयवास वदे:— १०८
'पुत्रा! वर माग, तुला द्यावें म्यां काय गा! यशोधीतें[8]?
जाणसि, जें प्रेम, मुखें वत्साचा काय[9] गाय शोधी[10], तें.' १०९
पार्थ म्हणे, 'दिव्यास्त्रें जीं वर मजलागि हा चि शोभन द्या;
तृषितासि यथाभिलषित जळ देती, न धरिती च लोभ नद्या.'
इंद्र म्हणे, 'पुत्रा! हें काशाला? दिव्य भोग माग मला;
तुज जो अनर्थ केवळ अर्थ कसा पंडितोत्तमा! गमला?' १११
पार्थ म्हणे, 'दिव्य हि जे सुखभोग नको चि, बा! दयाभ्रा! ते.
केंवि वनीं टाकावे? वांछिति माझ्या हितोदया भ्राते. ११२
मज दिव्य भोग रोग चि, तें सुख जें काय दुःख शुद्धरणीं[11].
[12]तो शव चि बंधुहृद्गतशल्याच्या जो न योग्य उद्धरणीं.' ११३

१. कल्पलतेला. २. गगनस्थवाणी, आकाशवाणी. ३. डोळ्यानीं प्राशन करणें=आदरानें, प्रेमानें पाहणें. ४. इन्द्र. ५. दोन डोळ्यानीं. ६. प्राण्यातें. ७. शस्त्र-स्वीकार. ८. यशःसमुद्र—**पंत**. ९. शरीर—**पंत**. १०. चाटून स्वच्छ करी. ११. शास्त्रोक्त युद्धांत. १२. आपल्या भावांच्या हृदयांत गेलेल्या शल्यास बाहेर काढण्याच्या कामीं जो योग्य नाहीं तो प्रेतासारखा च होय.

शक्र म्हणे, 'बा! तुजसम तूं चि भला विश्वमहिततरशील;
व्यसनातें बंधूंसह निर्दाळुनि सर्व अहित तरशील. ११४
शंभुप्रति आराधीं, आधीं साधीं प्रसाद या अगमीं,
येईन लोकपाळांसह सत्कारावया तुला मग मीं.' ११५
ऐसें धनंजयाला उपदेशुनि गुप्त होय मघवा हो!
शिवभक्तियशःश्रवणें प्रेमाश्रुभरासमेत अघ वाहो. ११६

अध्याय तिसरा.

तरली चांडाली हि न भावें वाहोनि शंकरा बेल,
हें जाणता बुध न कां त्याच्या भजनीं विशंक रावेल? १
जिष्णूव्रतपें भ्याले सर्व तपश्रीविलाससदन मुनी,
कैलासाप्रति जावुनि कथिति श्री शंकरासि पद नमुनीं. २
भगवान् म्हणे, 'न भ्यावें, त्याचा संकल्प शुद्ध, मीं जाणें;
स्वस्थमनें स्वस्थानाप्रति, टाकुनि भीतिला, तुह्मीं जाणें.' ३
मुनि जातां चि, किरातत्वाच्छादन मूर्तिसंपदेवरि घे,
जेथें पार्थ तप करी, त्या चि वनीं सानुकंप देव रिघे. ४
आला किरातरूपी शिव जिष्णुसमीप, तों चि हननाश
दानव वराहरूपी मूक हि करि जो तपस्विजननाश. ५
दुष्टासि एकदा चि प्रेक्षिति ते वीर पार्थ भव दोघे,
म्हणती "शरप्रहारां, तापसजन 'हाय हाय!' न वदो, घे." ६
खरतर नरहरशरें परजीवन एकक्षणीं च संहरिती,

१. जगास अत्यंत वंद्य स्वभाव ज्याचा तो. २. पर्वतीं. ३. शिवलीलामृत अ० ३ पहा. ४. किराताचा वेष हें च आच्छादन. ५. शरीररूप संपत्तीवर. ६. सदय—**पंत.** ७. मारणेच्छु—**पंत.** ८. मूकनामा—**पंत.** ९. शंकर. १०. तापस जन 'हाय! हाय!' न वदो, [यास्तव] शरप्रहारा घे, [असें ते दोघे] म्हणती. ११. अतितीक्ष्ण. १२. अर्जुनाचे आणि शंकराचे बाण. १३. शत्रूचे (मूकाचे) प्राण.

सम देव भक्त, ऐसें जाणों कळवावया असें करिती. ७
अर्जुन म्हणे, 'किराता! त्वां मृगयाधर्म लंघिला दर्पें,
स्वांतार्थ[1] मजपुढें अघ केलें, खगपतिपुढें जसें सर्पें. ८
हा प्रथम मत्परिग्रहें[2] असतां, त्वां ताडिलें कसें किरितें[3]?
पाथरवटें स्वटंकें भेदावें वज्रपाणिसह[4] गिरितें!' ९
त्यासि किरात म्हणे, 'रे! मद्धन हें, प्रथम म्यां चि हा पिटिला,
म्यां वधिला असतां, तूं कोण शरें हाणणार या किटिलों[5]? १०
खद्योतत्व[6] सम असो, रवि कीं तिमिरासि काजवा खाणी[7]?
नवल रविपुढें कीट[8] स्वकृततमोनाशकाज[9] वाखाणी. ११
मिरविसि सुज्ञत्व बृथा अन्याला स्वकृत पाप लावूनीं.
काय न दगड तपस्वी, भिजला वृष्टींत तापला वूनीं? १२
जोडुनि पुण्यवनीं तप, बुडसी त्याच्या भरें चि गर्वतमीं;
तूं मजपुढें किती रे! कोण हरिपुढें[10] म्हणेल पर्वत 'मीं'? १३
हो सिद्ध, जरि असेल स्वतपोबळगर्व, सज्ज्य चाप करीं,
होसील विमद, पडला गरुडाच्या जेंवि मत्त साप करीं.' १४
तें वाक्य अर्जुनाला गरळ जसें यामुनाह्रदा[11] कढवी,
पढवी जो चापश्रुति[12] रामासि[13], तयावरि[14] स्वधनु चढवी. १५
शर ते जाणों वाहे एक निमेषांत एक लाखोली,
प्रभुची जाणेल कसा बाहुबळें तो चि एकला खोली[15]? १६
स्वरवें गिळों न देते कवळ हि सिंहा विदें[16] रितेभा ते,
सरले शर, दोन्ही ही झाले सहसा तदा रिते भाते. १७
भ्याला, परि धैर्य धरुनि, ताडी त्या ईश्वरासि कोदंडें,
देता विश्व कवळिल्या उग्रा काळासि कंप जो दंडें. १८

---

१. स्वनाशार्थ. २. माझा स्वीकार. (माझा शिकार). ३. डुकरातें. ४. इंद्रासह. ५. वराह—पंत. ६. नभःप्रकाशत्व—पंत. ७. खणून काढी. ८. किडा. (काजवा). ९. कार्य. १०. इन्द्रापुढें. ११. यमुनेच्या डोहाला. १२. धनुर्वेद. १३. परशुरामास. १४. त्या शिवावर. १५. अगाधता. १६. ज्यानें हत्ती मारिले त्या.

जें युद्धांत म्हणे, 'हो! भास्करजी ! न करजाळ[1] विकिरा[2]' तें
गांडीव धनु हि हरिलें कामाद्यरिमदतमोरवि-किरातें[3]. १९
ज्याचा पाद म्हणे, 'रे! भक्तभवा[4]! स्वकुदशा[5] न कर, वाळ[6],'
त्यावरि धनंजयाचा भंगे, पावे यशा न, करवाळ[7]. २०
प्रभुला जिंकूं पाहे भुजयुद्धीं, जेंवि काजवा सवित्या,
परि तोषवी स्वधर्में आराधुनि भक्तराज वासवि त्या. २१
'मृत्युभयासि तराया न जडसुधेचें धरा चिबुक[8],' लीला
ज्याच्या असें सुरांस हि म्हणती तो प्रभु बरा चि बुकलीला. २२
शोणितें[9] वमला, श्रमला, भ्रमला, गमला नुठेलसा पडतां;
परि उठला, मोह कसा राहेल दयाकटाक्ष सांपडतां? २३
न पहाते झाले हो! पूर्वीं कौतुक कदापि नाकी तें,
विजयार्थ शरण गेला नर नतकामदपदा[10] पिनाकीतें. २४
वाहे पार्थिवलिंगीं[11] भावें जें माल्य[12] तो प्रतापार्थ[13],
पाहे तें चि पुरस्थःस्वमदघ्नकिरातमस्तकीं[14] पार्थ. २५
प्रभुला प्रभुप्रसादें त्या माल्यें करुनि ओळखे दास;
तो पात्र होय, गरुडातिक्रमकर जेंवि टोळ, खेदास. २६
पाय धरुनि पार्थ म्हणे, 'ब्रह्मांडीं अघ न माय[15] बा! पाहें
तूं चि हरीं पंक[16], हरिल अमृताचा घन न मायबापा! हें. २७
प्रभुजि! क्षमा करा, जी मागतसें पसरुनि स्वदपरा मीं;
या दासीं हि करो हें पदयुग, जैसें करी स्वपद रामीं[17].' २८

१. किरणसमूह. २. विखरा, पसरा. ३. मदनादिक षड्रिपूंचा गर्वरूप जो अंधकार त्याचा रवि च अशा किरातानें. ४. भक्तांच्या संसारा! ५. आपली दुर्दशा. ६. शुष्क हो, वाळून जा. ७. खड्ग. ८. हनुवटी. ९. रक्त. १०. शरणागतांचे काम पूर्ण करणारें ज्याचें पद अशा पिनाकीतें (शिवातें). ११. पूजेसाठीं तयार केलेल्या मातीच्या शिवलिंगावर. १२. पुष्प. १३. प्रताप च अर्थ ज्याचा तो, यशोभिलाषी. १४. पुढें उभा असलेला व आपला गर्व हरणारा जो किरात, त्याच्या मस्तकावर. १५. मावे, राहे. १६. चिखल. (पाप). १७. परशुरामीं.

त्यजुनि विचार, कराया इच्छित होता बळें परिभवातें,
लंघन असह्य गुरुला, स्वसंभाजन[1] वाटलें परि भवा तें. २९
नमुनि 'क्षमस्व[2]' म्हणतां, प्रकट करुनि रूप बाहुनीं कवळी,
अधराप्रति स्मितानें[3] स्वयशानें त्रिभुवनास हीं धवळी[4]. ३०
तो दीनबंधु उजरी[5] देउनियां अभय पाशुपत[6] नातें[7];
बोले असें, हरी जो स्वपद स्मरतां चि आशु[8] पतनातें[9]. ३१
'सर्वत्र रणीं विजयी तूं नारायणसखा नरा! हो रे!
स्वप्नीं हि अयश तुझिया अवलंबुनि पदनखा न राहो रे!' ३२
न कळत हि नाम घेतां पाप्यास हि जो म्हणोनि 'ओ' तारी,
गेला, संकल्पें चि ब्रह्मांडें निर्मिणार ओतारी[10]. ३३
मग वरुण धनद[11] पितृपति[12] सुरपति हे लोकपाळवर[13] आले,
इंद्रेतर सर्व हि ते स्वास्त्रें[14] पार्थासि अर्पिते झाले. ३४
शक्र म्हणे, 'स्वर्गी ये, रथ तुज आणावयासि धाडीन,
अस्त्रें देउनि पुत्रा! तुजकरवीं स्वाहितांसि[15] नाडीन[16].' ३५
ते लोकपाळ गेले मग रथ घेऊनि मातली[17] आला,
नमुनि म्हणे, 'अर्जुनजी! तात बहातो, बसा रथीं, चाला.' ३६
शुचि[18] होउनि मातलिला दिव्यरथीं बैसवूनि मग चढला.
सदतिक्रम करिल कसा जो धर्मन्याय गुरुमुखें पढला? ३७
निघतां गिरिसि[19] म्हणे, 'बा! म्यां व्हावें आजि काय उतराई[20]?

---

१. आत्मपूजन. २. क्षमा कर. ३. मंदहास्यानें. (हास्याचा वर्ण शुभ्र आहे असा कविसंकेत आहे). ४. शुभ्र करी. ५. नीट करी, समर्थ करी. ६. पशुपति (महादेव) संबंधीं=अस्त्रविशेष. ७. दीनबंधुत्वाचें नातें. ८. त्वरित. ९. अधोगतीतें. १०. धातूंचीं ओतकामें करणारा. ११. कुबेर. १२. यम. १३. अष्टलोकपालांतील श्रेष्ठ. १४. यमानें काळदंड, वरुणानें पाश व कुबेरानें कौबेरास्त्र अर्जुनास दिलें. १५. आपल्या शत्रूंना. (येथें 'आपल्या' हा शब्द अनेकवचनी व पक्षसूचक मानावा). १६. ठकवीन, पराभूत करीन. १७. इन्द्रसारथी. १८. [स्नान, जप, पितृतर्पण वगैरेनीं] शुद्ध. १९. इंद्रकीलपर्वतास. २०. ऋणमुक्त.

भवदुपकाराद्रिपुढें हा केवळ होय पांडसुत राई.[1]' ३८
अमरावतीस जावुनि गहिवरवी तो गुणाढ्य मघव्याला.[2]
व्याला[3] न साधुला जो, लाजो तो बाप मूर्त अघ व्याला. ३९
जातां चि पार्थ मोही स्वगुणें तत्काळ त्या सुरसभेला,
न पिपीलिकसेनेस[4] हि सुसितेचा ही तसा सुरस भेला.[5] ४०
वसवुनि निजासनीं हरि करि पुत्रस्नेह जें जसें करवी,
शिरं[6] हुंगी, आलिंगी, फिरवी तनुवरि सुधेसि जो कर वी. ४१
देवांकरवीं बरवी करवी नरवीरसूनुची अर्चा,
शोभे जसा स्वतेजें देवेंद्र तसा चि तो महावर्चा.[7] ४२
प्रेमें वज्राद्यस्त्रें हरि देता जाहला स्वतनयातें,
पात्र चि पितृसर्वस्वाप्रति जो जाणे भला सुत नयातें. ४३
मग पार्थ चित्रसेनापासुनि अत्यंत आदरें सकळा,
इंद्राज्ञेनें शिकला निरुपमवादित्र[8]नृत्यगीतकळा. ४४
जन्हि पार्थ पांच वर्षें वसला स्वर्गी पित्याचिया भवनीं,
भ्रात्यांला न विसरला, खिन्न चि होता तसा तदा, न वनीं. ४५
एकांतीं इंद्र म्हणे त्या गंधर्वेंद्रचित्रसेनातें,
'स्वर्गी हि खिन्न सुत जरि हें वैभव काय? काय हें नातें? ४६
गुणवत्कलत्रविरहज्वरिता[9] सुखहेतु शुचिरतापचिती,[10]
स्पष्ट तदन्या जी जो पूजा देणार सुचिर ताप चि ती. ४७
स्पर्शो शृंगारसुधानिधिची धृतमूर्ती उर्वशी लहरी,[11]
सुत[12]विकळत्व हरो, जसि सत्संगति सर्व उर्वशीलें[13] हरी.' ४८

---

१. मोहरी. २. इन्द्राला—**पंत**. ३. प्रसवला. ४. मुंग्यांच्या समूहाला. ५. उत्तम साखरेचा खडा. ६. मस्तक हुंगी. (मस्तकाचें अवघ्राण करणें हा एक प्रेमद्योतक प्रकार आहे). ७. महातेजस्वी. ८. वादित्र=वाद्य. ९. गुणवती स्त्रीच्या वियोगानें जो दुःखित झाला, त्याला. १०. शृंगाररतरूप पूजा. (शुचि=शृंगाररस). ११. अन्वय–शृंगारसुधानिधीची लहरी धृतमूर्ति उर्वशी स्पर्शो. १२. पुत्र अर्जुनाचें खिन्नत्व. १३. मोठा दुष्ट स्वभाव. (उरु+अशील).

देखत होता सादर सुत, जें स्मितपूर्व साभिनय नाचे,
प्रकटी विलास नटतां बहु ती गंभीरनाभि[1] नयनाचे. ४९
तो[2] तीस म्हणे, 'सुंदरि! जो तुज मागोनि दत्त[3] सुख नेतो[4],
माझ्या वदनें कांहीं प्रार्थितसे सुगुणरत्नखने[5]! तो. ५०
या स्वर्गीं मूर्तिमती तूं चि सुधा, जी प्रसिद्ध असुधा ती;
न तिच्या पानें जैसे त्वदधरपानें क्षणांत असु[7] धांती[8]. ५१
वास्तव या स्वर्गीं हा पुरुषोत्तम पार्थ पात्र सुरसा[9], हो!
परि तृप्त येथ येउनि सेवुनियां यां चि मात्र सुरसां[10] हो.' ५२
देवी स्मित करुनि म्हणे, 'गंधर्वपते! उदंड आजवर
प्रभुनें काम पुरविले, परि मज दिधला अनर्घ्य[11] आज वर. ५३
येवूं देईल मुखीं कां प्रवरप्रेमेंकाम[12] मन्मथ[13] न?
कोपें करील सोडुनि पांचां[14] हि शिलीमुखांसि[15] मन्मथन[16]. ५४
गंधर्वपते! जा तूं, हा जन बहु आजि सुखविला साचा,
भेटेन त्या प्रिया मीं पाहुनियां समय सुखविलासाचा.' ५५
जीच्या सुरस वपुपुढें खालें वदनासि अमृतसर[17] घाली,
ती जाय त्याकडे, जसि सुमधुकडे वेग करुनि सरघाली[18]. ५६
शृंगारमानसींच्या[19] पाहुनि तो पार्थ त्या मरालीला[20]
उठला, तसीच पूज्या ती स्त्री शतमखमुखामरालीला[21]. ५७
स्वकरें आसन देवुनि नमुनि करी पार्थ तत्सभाजन हो!

---

१. खोल नाभि जिची अशी. २. चित्रसेन. ३. [तूं] दिलेलें. ४. घेतो. ५. हे सगुणरूप रत्नांचे उत्तम खाणी! ६. इन्द्र. ७. प्राण. ८. तृप्त होती. ९. देवसदृश—**पंत.** १०. [तुझ्या] अधरामृतरसातें. ११. अमूल्य. १२. उत्तम नराविषयीं कामेच्छा. १३. विचारांचें मथन करणारा. (मदन). १४. मदनाचे पांच बाण मानले आहेत व यावरून त्याला 'पंचशर' असें हि म्हणतात. १५. मुखीं शल्य ज्यांच्या त्यांस. (बाणांस). १६. माझा नाश. १७. अमृताचें सरोवर. १८. मक्षिकाप्रंक्ति—**पंत.** १९. शृंगाररसरूप मानससरोवरीं राहणाऱ्या. २०. हंसीला. २१. इन्द्रप्रमुख देवपंक्तीला.

‘मज आज्ञा काय ? ’ म्हणे, परिसा साधुत्व सत्सभाजन[1] हो !
ती उर्वशी म्हणे, ‘गा ! कीर्तिश्रीच्या नृमूर्तिकरवीरा[2] !
शक्रोक्तें स्वरसें[3] ही आल्यें, मत्कामपूर्ति कर वीरा ! ५९
करितां नृत्य मजकडे पाहत होतासि, त्या पहाण्यानें
सूचविलें त्वदभिलषित हरिला मजला हि त्या शहाण्यानें. ६०
जाणोनि त्वद्गुरुचें प्रिय हें त्वन्मित्रचित्रसेनमुखें
अनुसरल्यें तुज, सुजना ! नीरजनयना[4] ! करीं विलास सुखें.’
कर्णावरि कर ठेवुनि ‘शिव! शिव!’ ‘हर! हर!’ असें म्हणे नर तो,
‘माते ! हा पुत्र रतो भजनीं, परि ह्मणसि तूं तसें न रतो. ६२
माद्री पृथा शची[5] तूं मज तुल्या, योग्य हें नसे तूतें,
परि रक्षिति प्रयत्नें गुरुजन तों भंगिती न सेतूतें[6]. ६२
ऐसें पाहत होतों कीं, हे नारायणोरुजा[7] आर्या
पूर्वज[8] पुरूरव्याची, श्रीपतिची श्री जसी, तसी भार्या.’ ६४
हांसोनि म्हणे देवी, ‘आम्हां देवींस अघ असेना तें;
जाणत नव्हते रमले पौरव ते काय तुजअसे नातें ? ६५
लावूं नये चि सुज्ञें भुक्तोच्छिष्टत्वअघ[9] नव सुधेतें,
स्वजनकभुक्ता माता ह्मणुनि त्यजिती सुधी न वसुधेतें. ६६
सांगों काय करिति जें आर्जव लोकेश सुर तसे जे तें ?
घालिति आलितिरस्कृत[10] ही, इच्छुनि लेशसुरत[11], [12]सेजेतें. ६७
आल्यें स्वयें तुजकडे कामार्ता स्त्री, म्हणोन कोमळ हो;

---

१. अहो श्रेष्ठसभेंतील लोक हो! २. [मनुष्यमूर्तिरूप] करवीरक्षेत्र—**पंत.** ३. स्वकीय प्रीतीनें. ४. कमलनयना ! ५. इन्द्रपत्नि. ६. धर्ममर्यादेस. ७. नारायण-मुनींच्या मांडीपासून झालेली. ८. [माझा] पूर्वज जो पुरूरवा राजा, त्याची. (एकदां आदित्याच्या शापानें उर्वशी स्वर्गांतून पृथ्वीवर पडली असतां केशी-नामक दैत्य तिला धरून पळूं लागला, तेव्हां पुरूरव्यानें तिला सोडविलें. पुढें या उपकारास्तव तिनें त्याला वरिलें अशी कथा आहे). ९. उष्टेपणाचा दोष. १०. [माझ्या] सख्याना तुच्छ केलेले. ११. अल्प सुरतसुख. १२. शय्येतें.

मद्भोगासि 'सुकृतफळ' म्हणति सकळ, तूं म्हणो नको मळ[1] हो!'
पावे न शुकापासुनि, कर जोडुनि शरण जाय परि, रंभा,
तद्वन्नारायणसख[2]मुनिपासुनि उर्वशी हि परिरंभा[3]. ६९
पार्थ म्हणे, 'तूं माता, मीं सुत, धर्मज्ञ नर, न वानर कीं.
पडतां गळां हि गुरुनीं द्यावा जाया न वर नवा नरकीं. ७०
हो सुप्रसन्नमति, हा जननि! जन निज न निमग्न नरकीं हो.
अमर नव्हें, पशु हि नव्हें, मीं त्वदुदरजान्वयोत्थ[4] नर कीं हो.'
क्षोभे, प्रसन्न व्हावें, परि मन कामासि जें वश स्त्रीचें;
'हो क्लीब' असें शापी, उग्रत्व तिचें तसें न शस्त्रीचें. ७२
शक्र म्हणे, 'वा साधो! करिता तूं एक शुद्ध तप शुकसा,
तूं चि नर, इतर वानर; इंद्रियविषयैकनिष्ठ[6] न पशु कसा? ७३
दिव्य विषयार्णवीं[7] तूं बोधनळस्पृष्ट[8] साधु पर्वत रे!
छायाग्रहासि[9] कपिसा, या विषया विरळ जन, न सर्व, तरे. ७४
अज्ञातवासकाळीं हा बहु येईल शाप कामाला,
मातेचा[10] अस्नेह हि होय यशोहेतु साधुरामाला.' ७५
लोमशमुनि पार्थातें हरिच्या अर्धासनीं स्वयें पाहे,
शक्रासि पुसे, 'याचें सुकृत असें सांग कोणतें आहे?' ७६

---

१. पाप. २. नारायणमुनीचा मित्र जो नर (अर्जुन) त्यापासून. ३. आलिंगन—**पंत.** ४. तुझ्या उदरापासून झालेला वंश, त्यापासून निर्मित असा. ५. येथून पुढें अध्याय ५।५ पर्यंतचीं **पंत**लिखित पानें गहाळ झालीं असल्यामुळें चातुर्मास्येबोवांच्या प्रतीवरून संशोधन केलें आहे. ६. इंद्रियांस मोह उत्पन्न करणाऱ्या विषयाचे ठायीं ज्याची अत्यासक्ति आहे असा (नर). ७. विषयरूप समुद्रामध्यें. ८. बोधरूप नळवानरानें स्पर्शिलेला असा. (नळवानरानें समुद्रांत टाकलेले पर्वत मुनिशापामुळें बुडत नसत या कथेकडे येथें कवीचें लक्ष्य आहे). ९. सिंहिका नांवाच्या एका राक्षसीनें सीताशोधार्थ निघालेल्या मारुतीच्या समुद्रजलावर पडलेल्या छायेचें आकर्षण करून त्याची गति कुंठित केली; तेव्हां मारुतीनें तिला ठार मारिलें, या कथेकडे येथें कवीचें लक्ष्य आहे. १०. कैकेयीचा.

देवेंद्र म्हणे, "साक्षान्नारायणसख पुराणऋषि नर हा,
अवतरला भरतकुळीं भूभारातें म्हणावया 'न रहा.' ७७
आला दिव्यास्त्रार्थ, प्रेमें[1] झाला प्रसन्न भवचरणीं;
मरणार याचिपासुनि वरदर्पित खळ निवातकवच[2] रणीं. ७८
सिकला दिव्यास्त्रें हा शीघ्र चि साधूनि देवकार्यातें,
येईल सांग ऐसें धर्मातें साधुसेवकार्यातें[3]. ७९
जा, त्यासि तीर्थयात्रा सांग घडेसें स्वयें चि तूं कर गा !
पुण्याविणें जयश्री होईल कसी मुनीश्वरा ! करगा !" ८०
हें स्वर्गींचें वृत्त व्यास स्वसुतासि[4] सर्व आयकवी,
[5]तो ममतेला, आपण करुणेला वश, करील काय कवी ? ८१
जिष्णूत्कर्षश्रवणें व्याकुळ मति होय अंधराज्याची,
[6]दुर्मोच्यमोहपाशें आळँपिली[7] घट्ट कंधरा[8] ज्याची. ८२
नृप संजयाप्रति म्हणे, "जिष्णूचा शंभुसीं समागम तो
प्रेमें स्वविजयसा चि स्पष्ट मला तत्पित्यासमा गमतो. ८३
पाशुपताद्यस्त्रांचा लाभ, स्वर्गीं वरासनाचा[9], हो,
हें बहु, म्हणे हरि, 'अहो उर्वशि ! सुखवा वरास, नाचा हो !'
झाला प्रसन्न ज्यावरि भगवान् कल्पांतकाळनट[10] कळहें,
त्यासीं विरुद्ध मत्सुत, दिसतें, मज कर्म फार फटकळ हें." ८५
संजय म्हणे, 'धरावें हितकर मत हें च, 'हा !' न च वदावें,

---

१. संतुष्ट. २. निवातकवच हे प्ऱ्हादभ्राता संऱ्हादाचे तीन कोटी पुत्र. हे ब्रह्मदेवाच्या वरानें उन्मत्त होऊन इन्द्रास हि अजिंक्य झाले होते; परंतु शेवटीं अर्जुनाच्या हातून त्यांना मरण आलें. ३. साधूंची सेवा करणाऱ्या श्रेष्ठ धर्मराजातें. ४. धृतराष्ट्रासि. ५. अन्वय—तो धृतराष्ट्र [पुत्र–] ममतेला [आणि] आपण (स्वतां) कवि (व्यास) करुणेला वश [असल्यामुळें] काय करील ? ६. सोडविण्यास कठिण अशा मोहपाशानें. ७. आवळली, दाबली. ८. मान. ९. इन्द्राच्या अर्धासनाचा. १०. प्रलयकाळीं सर्व सृष्टीचा संहार करून नर्तन करणारा भगवान् शंकर.

म्यावें न बा! न व्हावें तें वर्ष[1]अराज्यदान चवदावें.' ८६
वदला धर्म हरिप्रति 'मज द्या हें, येउ अब्द चवदावा;
पद न दिलें, तरि उरु[2] कुरुगुरुरक्तांची शरांसि चव दावा.' ८७

अध्याय चवथा.

कुशलप्रवृत्ति न कळे जिष्णूची, बहुत लोटले अब्द,
धर्मासि भीम लावी 'राज्य तुवां बुडविलें' असा शब्द. १
बृहदश्व[3] द्विजराज श्रीधर्माच्या समीप आला, जो
ताप उरीं चि न देतां, त्यासि विधु न कां ह्मणोनि 'हा!' लाजो?
पूजुनि त्यासि नृप म्हणे, 'परिसावें स्वकृत मीं निवेदीन,
पूज्यांसि दुःख सांगुनि अमृतनदानिमग्नसा निवे दीन. ३
जरि हि धर्मन्यायद्विजदेवसपर्यापथीं[4] सदा रत मीं,
द्यूत करूनि बुडालों सानुग सानुजसुहृत् सदार तमीं[5]. ४
द्यूतपणीं हारविली, ओढुनि नेली सभेंत मज्जाया;
काय वदों? तें केलें म्यां चि व्यसनीं स्वराज्य मज्जाया[6]. ५
संप्रति हा दास असा स्वीकारुनियां अरण्यवास वसे,
झाली पहा कसी हे[7], हे[8] ही जे तैं सभाग्य वासवसे. ६
दिव्यास्त्रें साधाया पाठविला तो हि वत्स न परतला;
वाटे मज कितवासि त्यजुनि, मुनिजनीं वरूनि तप रतला. ७
वाटे दुःखी मत्सम मीं च, वदा, जरि असेल आढळला.

---

१. चवदाव्या वर्षीं पांडवांस राज्यदान नाहीं असें तें वर्ष न व्हावें. २. मोठी. ३. ह्या ऋषीनें धर्मास अश्वहृदयविद्या व अक्षविद्या शिकवून अनेक इतिहास सांगितले. ४. धर्म, नीति, विप्र व देव यांची पूजा करण्याच्या मार्गीं. ५. अंधकारांत (शोकांत). ६. बुडाया. ७. ही द्रौपदी. ८. हे भीमादि बंधु हि.

न असा [1]अयशःपद कीं [2]भूपदकपदीं जडोनि हा! ढळला.' ८
हांसोनि मुनि म्हणे, "बा! नळभूप जसा दुजा न [3]साधि तसा,
न तुम्हीं दीन, न दुःखित, साधावें तें वनीं हि साधितसा. ९
आशांत बंधु चौघे, धृतमूर्ति [4]उपायसे, सुनय शस्त्री;
[5]साक्षाच्छ्रीसी च सती, होऊं दे म्लान न मुख न यश, स्त्री. १०
परिसा नळगति, तुमची [6]श्रुतिरति हे [7]ही सती, [8]अनळसा, हो!
होता नळ तेजस्वी भास्करसा इंदुसा [9]अनळसा, हो! ११
श्रीवीरसेनसुत नळ निषधेश्वर सुगुणमणि [10]करंडक हो!
[11]ब्रह्मण्यप्रभु [12]दुर्गतदारिद्र्यसमुद्रवरतरंडक हो. १२
तो [13]पुण्यश्लोक रणीं करिता रिपुवीरहानि वासवसा,
तत्कीर्ति म्हणे, '[14]गी-श्री-धी हो! या, योग्य हा निवास, वसा.'
[15]वैदर्भ भीमराजा होता बहु खिन्न [16]हीनें संतानें,
तो भेटोनि सुखविला [17]दमनानें [18]स्वपदलीनसंतानें. १४
नृपदास्यतुष्ट मुनिचें मन त्या मुनिला म्हणे, 'सखे दमना!
झाला शुद्ध, करावा संततिसुखपात्र हा [19]सखेदमना.' १५
ब्रह्मर्षिवरें दमनें वर दिधला त्या नृपासि संततिचा,
झाले तीन सुत, सुता चवथी, गाती गुणौघ संत तिचा. १६
ठेवी दम, दांत, दमन, दमयंती, हीं असीं तयां नावें,

---

१. अयशाचें स्थान. २. भूपद हेंच पदक त्यावर. ३. दुःखी. ४. साम, दान, भेद व दंड या राज्योपयोगी चार उपायांसारखे. ५. साक्षात् लक्ष्मीसारखी. ६. ऐकण्याची आवड. ७. ही द्रौपदी. ८. आलस्यरहित. ९. अग्नीसारखा. १०. करंडा. ११. ब्राह्मणाचे ठिकाणीं भक्तिमान् असा राजा. १२. दरिद्र्यांस दारिद्र्यसमुद्रांतून तारण्याविषयीं उत्तम नौकारूप. (भावार्थ–मोठा दानशूर). १३. पवित्र आहे कीर्ति ज्याची तो. १४. हे सरस्वती, लक्ष्मी व बुद्धि हो! १५. विदर्भ देशाचा. १६. संततिरहित असा. १७. दमन ऋषीनें. १८. आपल्या चरणीं लीन झालेल्यास जो कल्पवृक्षासारखा, त्यानें. १९. खेदयुक्त मन ज्याचें असा.

ज्यां मुनिवरप्रसादप्रभवांतें[1] त्रिभुवनें हि मानावें. १७
भीम नृपति दुग्धोदधि, दमयंती श्री च, वपु सुरुचिर तिचें;
त्याहूनि देह, दिवसोदिवस दिसे दीन, जन्हि सुरुचि रतिचें. १८
जाणों कळे भविष्यद्दमयंतीची[2] स्मरा रुचिरतरता[3],
हरदृगनळीं[4] जळाला, रतिच्या विटला चि तो रुचिरत[5] रता. १९
ती पाहिल्यावरि गमे कोणास हि न स्वरूप सुंदरसें?
श्रीवनमाळे[6] हि पुढें मिरवील स्वमद काय कुंद रसें[7]? २०
श्रीकृष्ण रुक्मिणीला, श्रीकृष्णा रुक्मिणी जसी आतां,
दमयंतीस नळ, नळा दमयंती आयके जनें गातां. २१
नळ नृप म्हणे, 'शिवा! ती नवरी हो, मन दुजीस न वरी हो.'
भैमी म्हणे, 'शिवे! तो नवरा हो, प्रेम नित्य नव राहो.' २२
एका समयीं धरिला हंस नळें तो म्हणे, 'कृपा कर, गा!
सोड मला, जरि व्हावी ती दमयंती वधू, नृपा! करगा. २३
करिन तुझें गुणवर्णन जेणें होइल तुझी च नवरी ती.'
सत्य प्रिय हित वदती शुद्धात्मे न धरिती च नव रीती. २४
राधाप्राप्त्यर्थ जसा तो[8] स्वकरगतामळा[9] यशा सिनळें[10],
सोडी दमयंत्यर्थ क्षिप्र चि अतिदुर्लभा तशासि नळ. २५
नळमुक्तराजहंसांसह हंसांची नभःपथें आली[11]
आली प्रमदवनीं[12], तों भैमी ही घेउनि प्रिया आली[13]. २६
भैमी म्हणे, 'मराळग्रहणेच्छा मन्मनांत आली हो!
एकासि तरि धरूं या, विखरा मुक्ता[14] वनांत आली हो!' २७

---

१. मुनिश्रेष्ठाच्या प्रसादापासून उत्पत्ति आहे ज्यांची अशा मुलांस २. पुढें होणाऱ्या दमयंतीची. ३. [रतीहून] अधिक सुंदरता. ४. शंकराच्या तृतीय नेत्रांतील अग्नींत. ५. सौंदर्यलुब्ध. ६. श्रीविष्णूच्या गळ्यांतील आपादलंबिनी माळ. ७. मकरंदानें. ८. तो प्रसिद्ध. ९. आपल्या हातांतील शुभ्र अशा. १०. जार. (कृष्ण). ११. पंक्ति, कळप. १२. अंतःपुरोचित क्रीडावनीं. १३. सख्या. १४. मोत्यें.

इतरा हंसानीं [1]त्या नेल्या बहु लोभवूनि दूरवर,
भैमी त्यासि धरूं ये, ज्या दे असुदान दानशूरवर. २८
एकांतीं तीपासीं स्तविला निषधेंद्र तो खगानें हो!
जाणों राधेला दे [2]खगभगवद्वेणु [3]तोखं गानें हो! २९
'काय [4]द्विजें, तुला द्विजराजें ही काय? [5]मान-वसु-तनये!
जों त्वत्करासि तो [6]सुरपसुतशतप्रवर मानवसुत न ये. ३०
पुण्यश्लोक निषधपति नळ खळबळजळधिवाडवानल गे!
लोकां महोत्सवप्रद तो चि सदा, त्यांसि [7]पाडवा न लगे. ३१
[8]स्मरबुधदस्ररुचिरतर ऐसें म्हणणार जे न ते लटिके,
[9]हैय्यंगवीन जैसें [10]सुरसिकरसनेपुढें न तेल टिके. ३२
अनुपम अनुरूप अनघ जरि वरिला त्वां नृपात्मजे! न नळ,
[11]होइल केवळ तापद, कीं जो नर नळ न होय तो [12]अनळ. ३३
नळकस्तूरी टाकुनि कां तूं घेसील अन्यनर माती?
जरि वरिती न हरिप्रति घेती म्हणवूनि धन्य न रमा ती. ३४
नररत्न तो चि, तूं चि स्त्रीरत्न, उदंड आडनावांचीं;
न बुडविति न वा तारिति चित्रें बरवीं हि [13]आडनावांचीं.' ३५
ती सुमति म्हणे, 'आर्या! त्वां तिकडे ही असें चि कळवावें,
साधो! हळुहळु मृदु [14]मधु हित मित बोलोनि चित्त वळवावें.'
'आज्ञा' म्हणोनि येथुनि कळवुनि हें प्रेम तेथुनि उडाला.

---

१. त्या दमयंतीच्या सख्या. २. पक्षी (हंस) हा च श्रीकृष्णाचा वेणु. ३. तोष, आनंद. ४. पक्ष्यानें. ५. मान हें च द्रव्य ज्याचें अशा राजाचे कन्ये! ६. इन्द्रपुत्रासारख्या शंभरांत हि श्रेष्ठ असा मनुष्यपुत्र नळ. ७. वर्षप्रतिपदा. ८. मदन, बुध व अश्विनीकुमार यांपेक्षां हि [हा नळ] सुंदर [आहे]. ९. आदले दिवसाच्या गाईचे विरजणावरील लोण्याचें केलेलें ताजें तूप. १०. चांगल्या रसज्ञांच्या जिभेपुढें. ११. [नळावांचून इतर कोणी] केवळ तापद होईल. १२. अग्नि. १३. आड आणि नावा यांची. १४. मधासारखें गोड.

हंस प्रत्युपकारीं हर्षीं[१], कामज्वरीं नळ, बुडाला. ३७
झाली स्मरज्वरार्ता द्याया ही योग्य हें पिता समजे,
जाणति, न सांगतां सुख असुख पराचें जगीं सदा समें[२] जे. ३८
योजी स्वयंवरोत्सव, रायांसि सुख प्रकाम[३] दे वार्ता,
आले नाहूत[४] हि, मति कोणाची तैं न कामदेवार्ता[५]? ३९
देवर्षिमुखें परिसुनि शक्र करी धरुनि हरिखें[६] गमनातें;
त्यांच्या[७] विमान येइल काय? न येता चि हरिखग मनातें. ४०
जों निकट कुंडिनाच्या[८] आले यम वरुण भूभृदर्यनळ[९].
तों तो हि सकळसद्गुणनिधि पुण्यश्लोक वीरवर्य नळ. ४१
ते सुर म्हणति, 'अहाहा! नळ चि सकळपुरुषमुकुटहीरमणी,
नवरी न वरील कसी, याला पाहोनि सुमति ही रमणी? ४२
आम्हांला चि न केवळ लावितसे व्यक्त लाज हा रविला;
आम्हीं निजतेजोमद याचिपुढें सर्व आज हारविला.' ४३
नें[१०] सुचति जरि भलतैसी युक्ति प्रियकार्यसाधिका, मुकते
त्या साधुसंगतिमहालाभास हि सर्व साधि कामुक ते. ४४
भेटोनि त्यासि म्हणती, 'कार्यपरें[११] सर्वथा न लाजावें,

---

१. हंस उलट उपकार ज्यांत अशा आनंदामध्यें [आणि] नळ [आपल्यावर दमयंतीचें प्रेम आहे म्हणून] कामज्वरामध्यें बुडाला. २. समदर्शी. ३. अत्यंत. ४. न बोलावले ते ही. ५. मदनपीडिता. ६. हर्ष. ७. [इंद्राला दमयंतीस्वयंवरोत्सवाला जाण्याची इतकी घाई झाली कीं, त्या वेळीं वाहनासाठीं] त्याच्या मनातें हरिखग (गरुड) न येता चि; [मग] विमान येईल काय? ८. कुंडिन ही भीमकाची राजधानी. ९. पर्वतशत्रु इंद्र आणि अग्नि. १०. अन्वयार्थ—जरि भलतैसी (अयोग्य हि) प्रियकार्यसाधिका (दमयंतीप्राप्तिरूप आवडतें काम साधणारी) युक्ति न सुचति [तर] ते सर्व साधि (मनोव्यथायुक्त) कामुक (कामी) देव त्या साधुसंगतिमहालाभास हि मुकते (त्या साधु-नलाच्या संगतिरूप महालाभास हि अंतरते). ११. कार्यतत्परें.

हो अस्मद्दूत, विमुख न जनें सत्यव्रता नला! जावें.’ ४५
‘होतों दूत’ नळ म्हणे, ‘कार्य वदा, कोण हो! तुम्हीं चवघे?’
ओळख देउनि म्हणती, ‘आम्हीं भैम्यर्थ पातलों अवघे. ४६
भैमी स्वयें वरू या आम्हां चवघांजणांत [1]अन्यतमा,
हें कार्य, दूत हो गा! जा गा! बा! तोकडे चि धन्यतमा!’ ४७
सस्मितवदन नळ म्हणे, ‘प्रभुजी! जो हेतु [2]सुरवरागमनीं
माझ्या हि तो चि; सर्वां हि मृगांच्या तुल्य [3]सुरवराग मनीं. ४८
दूत करुनि मज तिकडे कार्यास्तव पाठवूं नको, [4]पावा,
कोण्हावरि हि [5]सुनयें न स्वातिक्रम आठवून कोपावा.’ ४९
शक्र म्हणे, ‘वदलासि प्रथम तसें वचन, मग असें वदसी.
[6]अचळ करीं च असावा व्यवहारीं शब्द संगरीं सदसि.’ ५०
भूप म्हणे, ‘[7]यां कर्मीं पवन हि होईल मज न सांगाती,
अंतःपुरप्रवेशीं, जी प्रभुजी! साधु युक्ति सांगा ती.’ ५१
शक्र म्हणे, ‘जा गा! तूं, चिंता आधीं च करिसि कां गा! ती?
आम्हांसि हें कठिन जरि तरि सुज्ञ प्रभु म्हणोनि कां गाती?’
शक्रवरें नळ गेला, शिरला अंतःपुरीं सुखें सुरसा,
भैमीच्या हा, याच्या ती, सेवी रूपसंपदा [8]सुरसां. ५३

---

१. कोणा तरी एकाला. २. [आपणा] देवश्रेष्ठांच्या आगमनीं. ३. मधुरध्वनी-विषयांची आवड. ४. कृपा करा. ५. [जो] सुनय (नीतिमान्) [आहे तो सेवकानें] स्वातिक्रम (आपली अमर्यादा) [केली असतां ती] आठवून कोणावर हि न कोपावा (त्यानें कोपूं नये). [देव हो! तुम्ही मला दूत करून माझ्या हिताचा भंग करूं पहातां व तो भंग तर होऊं न देण्याविषयीं मला आपली अमर्यादा करावी लागते. पण सरळमार्गानें आत्महित साधणें इष्ट आहे, म्हणून आपण माझ्यावर रागावूं नये, हा भावार्थ]. ६. अन्वय—व्यवहारीं शब्द अचळ असावा [व] संगरीं करीं सदसि (उत्तम खड्ग) च अचळ असावा. ७. जेथें वायूचा हि प्रवेश होणें अशक्य अशा कडेकोट बंदिस्त अंतःपुरांत माझा प्रवेश कसा होणार? असा भावार्थ. ८. अमृताला.

भैमी हर्षे त्याच्या, विधुच्या तसि कुमुदिनी न आगमनीं:
सत्कारूनि म्हणे, 'जी! यावें मद्भाषणें न [1]आग मनीं. ५४
सुंदरवर कोण तुम्हीं? [2]गुरुच्या वाटो न हें[3] [4]पराग मना,
कीं जें जें अंतःपुर तें तें हि विषय नव्हे परागमना. ५५
आलां कसें [5]अवारित? [6]कार्यार्थ प्रकट आयकों दावा:
वाटे कर्णीं तुमचा [7]वाङ्मय [8]सौवर्णआय [9]कोंदांवा.' ५६
वाहों लागे [10]गुरुघनरसपूरित वीरसेन[11]भूपनळ.
'सुंदरि! मीं [12]पाशिपितृपपावकपुरुहूतदूत भूप नळ. ५७
सुमुखि! प्रार्थिति बहु तुज ऐसें प्रभु लोकपाळ ते चववे,
अवघे उणे चि रस, तूं [13]दिव्यरसाची च सर्वदा चव घे. ५८
सुज्ञे! तुवां वरावा आम्हां चौघांजणांत [14]अन्यतम,
[15]धन्यतमत्व तुला यो, न शिवो पळ दयितविरहजन्य[16]तम.' ५९
हांसोनि म्हणे भैमी, "'[17]प्रणतिप्रिय देव गुरु,' असें म्हणती,
त्यांहीं क्षमा करावी, स्वीकारावो यशोर्थ सत्प्रणती. ६०
वरिले हे चि चरण म्यां, त्यजितां ज्वलनांत काय होमीन;
[18]यज्जीवन [19]जीवनें तो दुग्धीं वांचेल काय हो मीन?" ६१

---

१. अपराध. (मी जें पुढें बोलणार त्याचा राग नसावा). २. बापाच्या (भीमकाच्या). ३. तुमचें आगमन. ४. मोठा अपराध. ५. निवारण (प्रतिबंध) केलें नाहीं असे. ६. कार्यार्थ प्रकट आयकों दावा (द्यावा)=कोणत्या कामासाठीं आपण आलां हें स्पष्टपणें मला ऐकूं द्या. ७. वाणीरूप. ८. सुवर्णाकार. (सुवर्ण=चांगलीं अक्षरें, सोनें; आय=आकार). ९. भरावा. १०. मोठा व उदकानें पूर्ण गच्च भरलेला. ११. वीरसेनपुत्र नळ हा च पन्हळ. (प्रौढ व फार सुरस असें नळाचें भाषण सुरू झालें असा भाव). १२. वरुण, यम, अग्नि व इंद्र यांचा दूत. १३. अमृतरसाची. १४. कोणी तरी. १५. अत्यंत कृतार्थता. १६. मनुष्यास वरिलें असतां तो मरणाधीन असल्यानें पतिविरहजन्य दुःख सोसावें लागेल; पण देवांपैकीं कोणास वरिलें तर तें दुःख सोसावें लागणार नाहीं, असा भाव. १७. नमस्कारप्रिय. १८. ज्याचें वांचण्याचें साधन. १९. पाणी.

नळ नृप म्हणे, ‘सुबुद्धे! या दासावरि तिहीं न कोपावें,
मदधिक कोटिगुणें ते, आग्रह कांहीं करूं नको, पावें. ६२
मृत्यु असो, [1]परवंचन करुनि सुधेच्या जिणें नको पानें;
त्वत्पाणिग्रहणें मीं देवांच्या बहु शिणेन कोपानें.’ ६३
विदुषी म्हणे, “म्हणा जा कीं ‘म्यां कथिलें परोपरी, पण ती
प्रणति प्रभूंसि करिती, ‘[2]अनुकंप्या मीं [3]स्वयंवरा’ म्हणती.’ ६४
सत्संमतस्वयंवरविधिनें वरितां तुम्हीं न अपराधी;
काय करूं! त्यजुनि तुम्हां माझी पळ अनुसरे न [4]अपरा धी.
होईल देह [5]रंगीं सुरपतिनरपतिसमक्ष [6]नलगामी,
हा जन तुमच्या चि असे इतरा कोण्हाचिया हि न [7]लगामीं;”
होय [8]अकृतकार्य हि नळ सुरवरसंमत खरें निवेदून;
सत्यें जसा तसा न प्राज्यें हि सुधारसें निवे [9]दूंन. ६७
रंगीं सर्व मिळाले, तेव्हां आली तयांत दमयंती;
जाणों चकोर ते, ती [10]मूर्तज्योत्स्ना चि [11]तापदमयंती. ६८
साहे न परोत्कर्षा ज्याची मति सच्छळीं [12]सदानळसा,
बैसे तिघांजणांसह हरि हि [13]अधिष्ठूनि त्या [14]सदां नळसा. ६९
रंगीं पाहों जातां दिसले चौघे हि ते धवासम जे;
भैमी देवकृतच्छळ ऐसें चित्तांत तेधवा समजे. ७०
पांचा नळांत जेव्हां काय दिसेना चि भेद लव तीस,
[15]बुद्धि म्हणे, ‘कां भीसी? गुरुचरणीं त्यजुनि खेद लवतीस.’
कर जोडूनि म्हणे ती, ‘नळ भर्ता भीमकन्यकेला हो,

---

१. दुसऱ्यास फसविणें. २. दयेस पात्र अशी. ३. स्वतः पति पसंत करून त्यास वरणारी. ४. दुसऱ्याला. ५. समाजांत. ६. नलानुसारी. ७. अधीन. ८. केलें नाहीं कार्य (देवकार्य) ज्यानें असा. ९. तप्त—**पंत.** १०. मूर्तिमंत चंद्रकांति. ११. ताप शमविणारी. १२. निरंतर आलस्यरहित, उद्युक्त अशी. १३. आश्रय करून. १४. सभेला—**पंत.** १५. अन्वयार्थ—बुद्धि म्हणे [‘जर] गुरुचरणीं (गुरु जे इंद्रादि देव त्यांचे चरणीं) खेद त्यजुनि लवतीस [तर तूं] कां भीसी?’

प्रभुजी! स्वप्नांत हि जरि संकल्प नसेल अन्य केला हो! ७२
नळ पति, इतर पुरुष पितृबंधु जरि मनांत मानिले असती,
तरि ताराल इला हो! प्रभुजी! कैसी तरेल जी अ-सती?' ७३
तीचा बळवान् निश्चय सुरहृत[1] नळरूप घे हिरावूनीं,
बहु तेज प्रकट करी शुचि सत्वगुण च्छळीं, हिरा ऊनीं[2]. ७४
शुद्ध सर्वांग[3] कृश नैळद[4], परि उपभोगोचितत्व[6] नैळदासी[5],
ऐसें मनांत आणुनि दमयंती सुमति होय नळदासी. ७५
पतिरूप सोडवुनि ती लोकेशांचा[7] प्रसाद साधूनीं,
घाली नळासि माळा स्तविली प्रेमप्रसन्नसाधूनीं. ७६
नळ तीस म्हणे, 'कुलजे! त्वां जरि[8] देवांसमक्ष मज वरिलें,
जों सासु[9] तों तुझा मीं होतां हि प्रेम ऊन मजवरिलें.' ७७
'प्रत्यक्ष दर्शन मखीं, सुगति,' असे वर नळासि वासव दे,
'प्रकटेन इच्छितां, मम लोकीं येसील' हें हुताश[10] वदे. ७८
'पाकीं पटुत्व, धर्मी स्थिति,' हे वर दोन धर्म[11] दे त्यातें,
वरुण 'जललाभ माल्याम्लानत्व[12]' हि त्या प्रमोद देत्यातें. ७९
गेले सुरपति नरपति पाहुनि तो साधुतोषकर जोडा,
बहु वदले, 'या पुण्यश्लोका, जाया स्वदोष, कर जोडा.' ८०
झाला विवाह, गेला स्वपुरा, मग नळ तिसीं सदा रमला;

१. देवानीं [कपटानें] घेतलेलें. २. उन्हांत. ३. यज्ञांग. ४. दर्भ. ५. वाळा—**पंत.** ६. उपभोगाची योग्यता. (या आर्येंत दमयंतीनें देवांस सोडून नळाला कां वरिलें याचें कारण **पंतानीं** दृष्टांतानें असें सांगितलें आहे कीं, दर्भ आणि वाळा याशिवाय यज्ञाचें काम चालावयाचें नाहीं म्हणून ते समान योग्यतेचे खरे; परंतु जें उपभोगक्षमत्व वाळ्यांत आहे, तें दर्भांत नाहीं. भावार्थ असा कीं, देव पवित्र म्हणून प्रेमार्ह; परंतु नलराजा संगमार्ह म्हणून अधिक प्रेमार्ह). ७. इंद्रादि लोकपालांचा. ८. ज्याअर्थीं. ९. जीवंत. १०. अग्नि. ११. यम. १२. पुष्पमाला म्लान न होणें. (जलजय, वायुजय आणि अग्निजय ह्या तीन सिद्धि नळास देवांपासून प्राप्त झाल्या).

भूमि म्हणे, 'ताराया अवतरला विष्णु हा सदार मला.' ८१
कन्येसि 'इंद्रसेना,' पुत्राला 'इंद्रसेन' हें नाम
ठेवी, प्रजांसि दे बहु सुख पुण्यश्लोक तो जसा राम. ८२
[1]सद्वापरकलि मार्गीं भेटे हरिला [2]सलोकपाळाला,
कळतां [3]वृत्त क्रोधें घे बहु बुडवूनि तो कपाळाला. ८३
त्यांसि म्हणे, 'केंवि तुम्हीं प्रभुनीं हि स्वाभिमान मोकलिला?
नळ गुरु काय तुम्हांहुनि? सोसे न स्वापमान तो कलिला. ८४
देवांसमक्ष कैसा दमयंतीनें मनुष्य हा वरिला?
[4]दंड्या तो; दंडाहीं उठला प्रभुनीं न हात आवरिला.' ८५
शक्र म्हणे, 'गा! पुण्यश्लोक नळ गुणाढ्य रामसा च कवी,
दे सत्व सात्विका सुख सज्ज्ञानें, तम चि तामसा [5]चकवी. ८६
योग्या ती च तयाला, तो चि तिला योग्य, जेंवि काम रती,
अनुरूप योग सन्मत; साधूत्कर्षें असाधु कां मरती? ८७
कामा, क्रोधा, लोभा अनुसरतां लोक फार बा! ठकले,
न करावा सद्द्वेष, स्वहिता देवूं नये चि पाठ कले!' ८८
ऐसें शिकवुनि गेला स्वर्गाला शिष्यराय [6]जीवाचा;
मलिन कलि न मान्य करी, ती त्यासि शिवेल काय जी [7]वाचा?
[8]रंध्रान्वेषण केलें कलिनें वर्षें समग्र बारा हो!
खळ न विटे चि, जरि म्हणे द्वापर, 'हा दुष्प्रयत्न बा! राहो.'
नळ भूप [9]मूत्रशौचीं करि, [10]पदधावन चुकोनि संध्या हो!
जाणों तो साधु म्हणे, कलिची हि प्रार्थना न [11]वंध्या हो. ९१
त्या रंध्रीं शिरला त्या श्रीच्या गेहीं हळू च कलि [12]कवडा,

---

१. द्वापर आणि कलि ह्या त्या त्या युगाच्या मूर्तिमान् देवता होत. २. वरुण, अग्नि व यम यांसह इंद्राला. ३. नलदमयंतीविवाहवृत्त. ४. शासनास योग्य. ५. फसवी. ६. बृहस्पती—**पंत.** ७. इंद्रानें उच्चारलेली बोधामृतपूरित वाणी. ८. [नळाच्या] दोषांचा शोध. ९. मूत्रोत्सर्गानंतर शरीरशुद्धि करण्याच्या कामांत. १०. पादप्रक्षालन करण्याचें विसरून. ११. विफल. १२. एक अशुभसूचक पक्षी.

छेदाया श्रित[1]सुखदा जेंवि भजे शस्त्रपाणे[2] हलिक[3] वडा[4]. ९२
आपण शिरे नळीं कलि, शिखवी त्या द्वापरासि पाशांत[5];
व्यसनीं भल्यासि पाडी खळ, हरिणा व्याध[6] जेंवि पाशांत[7]. ९३
'द्यूत कर' असें शिकवी मग नळदायाद[8] पुष्करासि कली,
न शिकावें परि तन्मति त्या दुर्मंत्रा[9] सुदुष्करा सिकली. ९४
पुष्कर म्हणे, 'करावें द्यूत,' नळ म्हणे, 'अहा! भलें सुचलें,
अमृतापरीस माझ्या कर्णयुगाला त्वदुक्त हें रुचलें.' ९५
द्यूतीं आनंद जयें थोडा त्या पुष्करासि, अति कलिला,
हानि नळाला नुमजे, केली मलिनें शिरोनि मति कलिला[10]. ९६
दुष्कर साधन जीचें त्या श्रीतें[11] मेळवूनि पुष्करसा[12]
पुष्कर साजे, नळतनु जसि सरसी ग्रीष्मकाळशुष्करसा[13]. ९७
बहु मास भरीं भरला, प्रियसख सचिवांसि विसरला निपट,
स्त्री हि श्री हि बहु रडे; कलिनें दाटूनि पाडिलें विपट[14]. ९८
सर्वस्वनाश होतां सचिवमतें ती करूनि यत्नातें,
धाडी माहेराला रथरत्नासह अपत्यरत्नातें. ९९
सर्वस्व हरुनि पुष्कर नळराजाला म्हणे, 'उदारपणें
सेवट गोड करावा द्यूतरसाचा तुवां सुदारपणें[15].' १००
गरळरसाच्या अब्दें[16], या तच्छब्दें अतीव तळमळला;
परि न ढुरुकें आपण तो पुण्यश्लोक धीर नळ मळला. १०१
जाय विभूषण दारानुगत[17] नळ त्यागुनि स्वनगरातें;

---

१. आश्रयास आलेल्यांना सुख देणाऱ्या. २. ज्याच्या हातीं शस्त्र (कुऱ्हाड) आहे असा. ३. शेतकरी. ४. वटवृक्ष—पंत. ५. फांशांत. ६. पारधी, शिकारी. ७. जाळ्यांत. ८. नळाचा भाऊ जो पुष्कर त्याला. ९. दुष्ट मसलतीला. १०. कलुषित, मलिन. ११. राज्यश्रीतें. १२. कमळासारखा. १३. उन्हाळ्यामुळें जिच्यांतील पाणी शुष्क झालें आहे अशी सरसी (सरोवर). १४. वितुष्ट, वांकडें. १५. सुंदर स्त्रीच्या पणानें. १६. मेघानें. १७. स्त्री आहे पाठीमागून ज्याच्या असा.

भूमि म्हणे, 'ताराया अवतरला विष्णु हा सदार मला.' ८१
कन्येसि 'इंद्रसेना,' पुत्राला 'इंद्रसेन' हें नाम
ठेवी, प्रजांसि दे बहु सुख पुण्यश्लोक तो जसा राम. ८२
सद्वापरकलि मार्गीं भेटे हरिला सलोकपाळाला,
कळतां वृत्त क्रोधें घे बहु बुडवूनि तो कपाळाला. ८३
त्यांसि म्हणे, 'कैंवि तुम्हीं प्रभुनीं हि स्वाभिमान मोकलिला?
नळ गुरु काय तुम्हांहुनि? सोसें न स्वापमान तो कलिला. ८४
देवांसमक्ष कैसा दमयंतीनें मनुष्य हा वरिला?
दंड्या तोः दंडार्हीं उठला प्रभुनीं न हात आवरिला.' ८५
शक्र म्हणे, 'गा! पुण्यश्लोक नळ गुणाढ्य रामसा च कवी,
दे सत्व सात्विका सुख सज्ज्ञानें, तम चि तामसा चकवी. ८६
योग्या ती च तयाला, तो चि तिला योग्य, जेंवि काम रती,
अनुरूप योग सन्मत; साधूत्कर्षें असाधु कां मरती? ८७
कामा, क्रोधा, लोभा अनुसरतां लोक फार बा! ठकले,
न करावा सद्वेष, स्वहिता देवूं नये चि पाठ कले!' ८८
ऐसें शिकवुनि गेला स्वर्गाला शिष्यराय जीवाचा;
मलिन कलि न मान्य करी, तो त्यासि शिवेल काय जी वाचा?
रंध्रान्वेषण केलें कलिनें वर्षें समग्र बारा हो!
खळ न विटे चि, जरि म्हणे द्वापर, 'हा दुष्प्रयत्न वा! राहो.'
नळ भूप मूत्रशौचीं करि, पदधावन चुकोनि संध्या हो!
जाणों तो साधु म्हणे, कलिची हि प्रार्थना न वंध्या हो. ९१
त्या रंध्रीं शिरला त्या श्रीच्या गेहीं हळू च कलि कवडा,

१. द्वापर आणि कलि ह्या त्या त्या युगाच्या मूर्तिमान् देवता होत. २. वरुण, अग्नि व यम यांसह इंद्राला. ३. नलदमयंतीविवाहवृत्त. ४. शासनास योग्य. ५. फसवा. ६. बृहस्पती—**पंत.** ७. इंद्रानें उच्चारलेली बोधामृतपूरित वाणी. ८. [नळाच्या] दोषांचा शोध. ९. मूत्रोत्सर्गानंतर शरीरशुद्धि करण्याच्या कामांत. १०. पादप्रक्षालन करण्याचें विसरून. ११. विफल. १२. एक अशुभसूचक पक्षी.

छेदाया श्रितसुखदा[1] जेंवि भजे शस्त्रपाणि[2] हलिक[3] वडा[4]. ९२
आपण शिरे नळीं कलि, शिरवी त्या द्वापरासि पाशांत[5];
व्यसनीं भल्यासि पाडी खळ, हरिणा व्याध[6] जेंवि पाशांत[7]. ९३
'द्यूत कर' असें शिकवी मग नळदायाद[8] पुष्करासि कली,
न शिकावें परि तन्मति त्या दुर्मंत्रा[9] सुदुष्करा सिकली. ९४
पुष्कर म्हणे, 'करावें द्यूत,' नळ म्हणे, 'अहा! भलें सुचलें,
अमृतापरीस माझ्या कर्णयुगाला त्वदुक्त हें रुचलें.' ९५
द्यूतीं आनंद जयें थोडा त्या पुष्करासि, अति कलिला,
हानि नळाला नुमजे, केली मलिनें शिरोनि मति कलिला[10]. ९६
दुष्कर साधन जीचें त्या श्रीतें[11] मेळवूनि पुष्करसा[12]
पुष्कर साजे, नळतनु जसि सरसी ग्रीष्मकाळशुष्करसा[13]. ९७
बहु मास भरीं भरला, प्रियसख सचिवांसि विसरला निपट,
स्त्री हि श्री हि बहु रडे; कलिनें दाटूनि पाडिलें विपट[14]. ९८
सर्वस्वनाश होतां सचिवमतें ती करूनि यत्नातें,
धाडी माहेराला रथरत्नासह अपत्यरत्नातें. ९९
सर्वस्व हरुनि पुष्कर नळराजाला म्हणे, 'उदारपणें
सेवट गोड करावा द्यूतरसाचा तुवां सुंदारपणें[15].' १००
गरळरसाच्या अब्दें[16], या तच्छब्दें अतीव तळमळला;
परि न दुरुक्तें आपण तो पुण्यश्लोक धीर नळ मळला. १०१
जाय विभूषण दारानुगत[17] नळ त्यागुनि स्वनगरातें;

---

१. आश्रयास आलेल्यांना सुख देणाऱ्या. २. ज्याच्या हातीं शस्त्र (कुऱ्हाड) आहे असा. ३. शेतकरी. ४. वटवृक्ष—**पंत.** ५. फांशांत. ६. पारधी, शिकारी. ७. जाळ्यांत. ८. नळाचा भाऊ जो पुष्कर त्याला. ९. दुष्ट मसलतीला. १०. कलुषित, मलिन. ११. राज्यश्रीतें. १२. कमळासारखा. १३. उन्हाळ्यामुळें जिच्यांतील पाणी शुष्क झालें आहे अशी सरसी (सरोवर). १४. वितुष्ट, वांकडें. १५. सुंदर स्त्रीच्या पणानें. १६. मेघानें. १७. स्त्री आहे पाठीमागून ज्याच्या असा.

बहु लाजवी, म्हणति तैं जें 'हा! हा!' पौर तो स्वन[1] गरातें.[2]'
त्या पुण्यश्लोकाला आश्रय देती न दिनें[3] पुरोपवन,[4]
नळ जठराग्नीस म्हणे, 'जळ कीं तुज तृप्तिला पुरो पवन.'
पुष्करभयें न पुसती कोण्ही ही आप्त त्या नळाला हो!
हिंडे वनोवनीं तो अन्नावांचूनि बहु गळाला हो! १०४
यत्पादतळमृदुत्वें लाजावें कामधेनुनवनीतें,
वरमिथुन[5] पादचारें हिंडे, पावे फळें हि न वनीं तें. १०५
हेमच्छद[6] खग पाहुनि कल्पी आहार-हेम-लाभ वनीं,
वस्त्रें धरी, म्हणे, 'हा! प्राप्त न झालें चि हे मला भवनीं.' १०६
वस्त्रीं धरितां गेले वस्त्र हरुनि ते उडोनि खग नीच,
'वस्त्रहर अक्ष[7]' ऐसें कळवुनि झाले अदृश्य गगनीं च. १०७
वनदेवता न पाहों शकती लज्जानता[8] नलास्याला;
करिति न रोमंथाला[9] हरिण, मयूर हि तदा न लास्याली[10]. १०८
साध्वीनें स्वपटार्धें स्वतनु तसी झांकिली स्वपतितनु ती;
वेद हि अस्या सतीची करिति सदा, परि न पळ हि पतित नुती[11].
वर्णी नदीनगांतें दावूनि तिला विदर्भदेशपथ.[12]
त्याग समजोनि रडतां, समजाउनि नळ सतीस दे शपथ. ११०
एका सभेंत[13] रात्रौ निजला मग आठवूनि निजलीला,[14]
कलिमलिनबुद्धि तो नळ सोडूं पाहे श्रमोनि निजलीला. १११

---

१. शब्द. (हाय! हाय!). २. विषातें. ३. एक दिवस. ४. नगर आणि बाग. ५. श्रेष्ठ जोडपें. ६. सोन्याच्या पंखांचा. ७. फांसे. (कलीनें अक्षांना हेमच्छद पक्ष्यांच्या रूपानें पाठवून नळाजवळ एक वस्त्र होतें तें हि त्यांच्या द्वारें हिरावून नेलें). ८. लज्जेनें नम्र अशा नळाच्या मुखाला. ९. चर्वण—**पंत.** १०. नृत्या—**पंत.** ११. स्तुति. १२. विदर्भदेशाचा मार्ग दाखवून, नळानें दमयंतीला, तिनें अशा प्रसंगीं आपल्या पित्याकडे जावें असें सुचविलें, व तिनें हि तो नळाभिप्राय जाणला. १३. धर्मशाळेंत. १४. आपली क्रीडा. (आपलीं पूर्वकर्में).

'जावें कसें न कळतां? मज पाश चि दारसंग[1] हा निपट.
आपण असोनि अक्षत[2] होऊं देइल न संगहानि[3] पट. ११२
फाडावा स्वकरें तरि आतां पट जागवील निजलीला,
होता[4] मदर्थ जरि हरि असि असि म्हणता दुजी न निजलीला.'
शोधुनि सभा पहावी ऐसी आधीं दिली नळास मती,
मग खड्गलता कलिनें; वाटे त्या सुकृतसत्फळासम ती. ११४
कलियोगें जें धरिलें रायें तीक्ष्णत्व कापितां वस्त्रा
न धरील कधीं च तसें शाणशतें[5] गरळलेपनें वस्त्रा. ११५
खड्गें पट कापविला न तिचा अर्धा गळा चि तो कलिनें,
न मळावें चि कधीं तें प्रेम कसें मळविलें खळें मलिनें? ११६
जाय पुन्हा नळ परते, पाहे येउनि तिच्या मुखाला हो!
साश्रु नळ म्हणे, 'देवा! हे वामाक्षी[6] सती सुखा लाहो.' ११७
जाय पुढें, ये मागें, परतोनि सवें चि जेंवि दोला[7] हो!
तो लाहो[8] भेटीचा घे कीं न पुढें स्वदृष्टि लोला[9] हो. ११८
'विश्वंभरे[10]! क्षमे[11]! या साध्वीला रक्ष, ज्यां निरविली[12] हो!
सर्वंसहे[13]! तुजपुढें न स्वाधिकता इणें मिरविली हो! ११९
बापा! सतीव्रता[14]! हे तुज बहु जपली, न जीवितासि सती,
तूं हि इला बहु जप गा! त्वां त्यजिल्या न स्त्रिया बऱ्या दिसती.'
कलि दमयंतीप्रेमा हे दोघे ओढिती नळाला हो!
प्रेम्याला त्याचें मन सांपडलें, देह त्या खळाला हो! १२१

---

१. स्त्रीसान्निध्य. २. न फाटलेला. ३. वियोग, ताटातूट. ४. अन्वयार्थ—जरि मदर्थ हरि (भगवान् विष्णु) असि होता (खड्ग, तरवार झाला असता) [तर] असि दुर्जा निजलीला (हरिलीला) न [असें मी नल] म्हणता. ५. शेंकडों सहाणांनीं. ६. अति सुंदर नेत्र जिचे अशी. ७. हिंदोला—**पंत**. झोंपाळा. ८. लाभ. ९. चंचला. १०. विश्वाला धारण करणारे! ११. [सामर्थ्यसंपन्न अशा] हे पृथ्वि! १२ स्वाधीन केली. १३. सर्व अपराध सहन करणारे! १४. पातिव्रत्या!

सत्यांश्रित[1] गुणमय[2] शुचि[3] कापुनि घे, परि न दे चि हांक[4], पट,
पुण्यश्लोकीं राहुनि उघडिल त्याचें चि केंवि हा कपट? १२२
नळ गेल्यावरि कलिनें जागविली कीं तिचे असु खपावे,
पति न दिसतां म्हणे, 'हा!' राज्यभ्रंशें न ती असुख पावे. १२३
'अजि नाथ! अहो नरवर! अजि इकडे एक वेळ हेरा हो!
एकाकी जाल कसे? दासी सेवा करील हे, राहो[6]. १२४
चुकल्यें, क्षमा करा, जी! न चुकेन पुढें कदापि सत्कार्या,
त्यजिली दया अकस्मात्, त्यांगाही काय ती हि सत्कार्या? १२५
माझें मन बहु तुमचा चिंतूनि असाधुवाद[9] तळमळतें;
अजि पुण्यश्लोक! पहा मत्त्यागें कीर्तिपादतळ[10] मळतें.' १२६
व्याघ्रांला ही रडवी भ्रमतां गहनीं[11] तदा विलाप तिचा,
पदमुद्रित[12] पथ हि तिला कलिवशदैवें न दाविला पतिचा. १२७
ज्याच्या चरणाचें गुरु म्हणुनि धरावें शिरीं रजें[13] गरानें
त्या शोकें गिळिलीला गिळिलें विजनीं वनीं अजगरानें. १२८
त्या समयींचा तीचा गणिला दवसा[14] च पळ विलाप वनें,
व्याधासि आर्तरव तो कर्णीं लागोनि कळविला पवनें. १२९
तो व्याध अजगरातें खरशस्त्रेंकरुनि[15] होय हो! चिरिता,
कुतुकें म्हणे, 'शिखिशिखा[16] न जिरेल, इला वमूनि हो चि रिता.'
त्यास हि ती कीर्तिसुधा[17] न पचे, कीं योग्य तो न राहु[18] तिला,

१. सतीचा आश्रित (पक्षीं) सत्याचा आश्रित. २. सूत्रमय (पक्षीं) सद्गुणप्रचुर. ३. निर्मळ (पक्षीं) निष्पाप. ४. हांक देणें=जागें करणें, इषारा देणें. ५. प्राण जावे. ६. बरोबर राहू दे. ७. त्याज्य. ८. सत्कार करण्यास योग्य. ९. खोटें बोलणें. (शपथभंग). १०. कीर्तिरूप पायांचें तळ. ११. अरण्यांत. १२. पायानें चिन्हित. (पावलें उमटलेला). १३. धूलि. १४. वणव्यासारखा. १५. तीक्ष्ण शस्त्रानें. १६. अग्निज्वाला. १७. व्याधानें अजगरापासून दमयंतीला वांचविल्याची कीर्ति हें च अमृत. १८. अमृतमथनकथा पहा.

देवीकोपानळ घे निज[1]धर्षणकामपामराहुतिला. १३१
मग तीन अहोरात्रें पतिविरहार्ता घनीं[2] वनीं भ्रमली,
वृक[3]संत्रस्ता यूथभ्रष्टा[4] बाला मृगी तसी भ्रमली. १३२
पाहे रम्याश्रमपद सीतासी[5], त्यांत ती निवे कांहीं,
पूजूनि सांत्विली बहु मुनिवर्यांहीं महाविवेकांहीं. १३३
'होईल भेटि पतिची, कलिचें हें कृत्य, नळ न दे विपदा,
लागेल तिळप्राय हि तुमच्या अपवादमळ[6] न देवि ! पदा. १३४
शीघ्र चि राज्यपदीं पतिसह बहु सुख भोगिसील शीलवती !
लवती[7] श्री सत्वरता, अन्याला दे न एक ही लव ती.' १३५
सांत्वन करितां हो तें भैमीचें स्वस्थ चित्त कांहींसें.
तद्दुःख तसें अद्भुत, तें आश्रमपद हि होय नाहींसें. १३६
विस्मित होउनि तेथुनि पुनरपि शोधी तया शरण्यातें[8]:
पाहे न कंटकक्षत वपुतें ती पाहतां अरण्यातें. १३७
अगं[9] नगं[10] खग मृग पाहुनि त्यांसि म्हणे, 'नळ विलोकिला, बोला,'
त्या शोकगररसाच्या[11] पानीं मुनि शंभुची च मति लोला[12]. १३८
सार्थ वनीं आढळतां जवळ करी ती मृगी च कळपा त्या,
नळकृष्णसार[13]विरहें जीच्या न पडे चि पळ हि कळ[14] पात्या[15]. १३९
निजवृत्त सार्थवाहा[16] कथुनि पुसे जो मनांत देवें[17] नळ,
सार्थप म्हणे, 'मनुष्य न आढळले, बहु वनांत देवनळ[18].' १४०
पुसतां सांगे सार्थप, 'जाणें चेदिप[19] सुबाहु-देशाला,'

---

१. आपल्यावर बलात्कार करूं इच्छिणारा जो नीच (व्याध) त्याच्या आहुतीला. २. निबिड अशा. ३. लांडग्यांना भ्यालेली. ४. कळपांतून चुकलेली. ५. सीतेनें वाल्मिक्याश्रम पाहिला तशी. ६. लोकापवादरूपी दोष. ७. लवून प्रसन्न होते. ८. शरण जाण्यास योग्य अशा [नळातें]. ९. पर्वत. १०. वृक्ष. ११. शोकरूप विषाच्या. १२. आसक्त. १३. कृष्णसार=मृगविशेष. (काळविट). १४. विश्रांति–**पंत.** १५ डोळ्यांच्या पापणीला. १६. व्यापारी तांड्याच्या पुढाऱ्याला. १७. राजा. १८. एक प्रकारचे पोकळ बोरू. १९. चेदिदेशाधिपति सुबाहूच्या देशाला.

तत्सहवासें चाले धरुनि मनीं निषध[1]जनपदेशाला. १४१
रात्रौ निद्रावश तो सार्थ वनीं विजन-दाव-नगजानीं,[2]
[3]सार्थगजदानगंधक्षुब्धानीं मर्दिला वनगजानीं.[2] १४२
पामर म्हणती, 'आली जी शोध करीत बायको पतिचा,
ती कृत्या,[4] न पिशाची, ऐसा अत्युग्र काय कोप तिचा ?' १४३
'दिसतां चि तीस मारूं' ऐसें म्हणति स्वकार्यपटु वाणी;
ती कांपवी बहु गजत्रस्ता भैमीस कर्णकटु वाणी. १४४
तेथुनि पळोनि शिरली गहनीं भैमी, मनांत कांप तिच्या;
स्वकृतासि बोल लावी, लावील सती पदासि कां पतिच्या ?
ब्राह्मणसमागमें ती चेदिपतिपुरासि[5] पावली सांजे,
टाकित होत्या उतरुनि जीवरुनि गृहागमीं सख्या सांजे. १४६
शच्याद्यमरी म्हणती, 'आम्हीं योग्या इच्या नसों गतिला,[6]'
परि वेष्टिति पौरांचीं पोरें मानुनि मनांत सोंग तिला. १४७
प्रासादावरुनि तिला पाहे प्राज्ञा सुबाहुजननी ती,
धात्री धाडुनि धामीं ने; कीं, ठावी तिला सुजननीती. १४८
तीच्या लावण्यगुणें द्रवली, दावी स्वमातृसम रीति,
गमली तिला सुकृतलयनाकभ्रष्टा[7] सुमूर्ति अमरी[8] ती. १४९
पुसतां स्ववृत्त सर्व हि सांगे, पतिरीतिची कथी थोरी,
'सैरंध्री[9]' म्हणउनि घे, पतिनाम स्वात्मनाम[10] ही चोरी. १५०
'उच्छिष्टाशन पादक्षालन परपुरुषभाषण स्पष्ट[11]

---

१. निषधदेशाधिपति नळास. २. निर्जन अरण्यांतील पर्वतावर जन्मलेल्या वनगजानीं. ३. व्यापाऱ्यांच्या हत्तींच्या मदगंधानें क्षुब्ध झालेल्यानीं. ४. असुरी देवता. ५. शुक्तिमती अथवा त्रिपुरी नगरीस. ६. पदवीला. ७. पुण्यलयामुळें स्वर्गापासून भ्रष्ट झालेली. ८. देवांगना. ९. दुसऱ्याच्या घरीं राहून स्त्रियांचे केश विंचरणें, वेणी घालणें आणि वस्त्रालंकारादि रचना करणें इत्यादि शिल्पकाम करणारी व स्वातंत्र्यानें वागणारी स्त्री. १०. आपलें स्वताचें नांव. ११. निश्चयानें.

न घडेल, द्याल[1] तरि निजपतिशोधावधि करीन मीं कष्ट. १५१
बोलेन प्राणप्रियशोधार्थ ब्राह्मणासवें मात्र,
मदधीन असावें हें व्रत माझें, देवि! आणि हें गात्र.' १५२
राजप्रसू[2] म्हणे, 'मज मान्य असे सर्व हें असें चि, रहा,
हो मत्सुता प्रियसखी, विरहानळ उपरमो[3], नसो चिर हा.
सुख नृपसुतासुनंदाज्योत्स्नासख्यें[4] सतीव्रता पाहे,
पावे भवार्तमतिसी सत्संगतिनें न तीव्रतापा हे. १५४
स्त्रीपट चोरूनि पळे तेव्हां कैंचीं नळास पायतणें?
सिंहासनीं मिरवले, ते चिरले हो! वनांत पाय तृणें[5]. १५५
जातां वनांत ऐके ऐसी दूरूनि हाक, 'वणव्याला
भ्यालों, पुण्यश्लोका! रक्ष; दुजा अभयदा कवण व्याला[6]?' १५६
धावोनि जाय नळ, कीं, न विपत्पूरीं[7] पदप्रवण[8] वाहो,
पाहे तों अहि आहे, आलासे त्यासमीप वणवा हो! १५७
पुसतां नळासि सांगे, "घडलें मज गुर्वतिक्रमें[9] पाप;
'स्थावरसा[10] हो, जों नळ नुचली तों' हा सुरर्षि दे शाप. १५८
त्वद्धित करुनि यशातें हा नागसखा नवा नळा! लाहो.
यातें रक्षुनि तुजला, तोष न भक्षुनि दवानळाला हो." १५९
अंगुष्ठमात्र झाला तो कर्कोटक असें वदोनि हित,
दावविवर्जितदेशीं[11] त्यातें नळ भूप ने, करी विहित. १६०
सोडावा भूवरि तों राहे अवलंब करुनि तो खातें[12],
मग बोले क्षण द्याया रोखातें[13], मग अनंत तोखातें[14]. १६१
'करितों हित कांहीं बा! स्वपदें मोजीत सज्जना! चाल,

१. **पंतां**च्या दप्तरांतील अन्यलिखित प्रतींत '**घ्याल**' असा सरस पाठ आहे. २. राजमाता. ३. शांत होवो. ४. नृपसुता सुनंदारूपी चंद्रकांतीच्या सख्यानें. ५. गवतानें. ६. सर्पाला. ७. संकटाच्या पुरांत. ८. पदीं नम्र झालेला. ९. गुरूच्या (नारदाच्या) अमर्यादेनें. १०. न हलणारा असा. ११. दावाग्निरहित अशा स्थानीं. १२. आकाशातें. १३. रोषातें. १४. संतोषातें.

साधु तुम्हीं कां न नतोद्धारीं होवूनि सज्ज नाचाल?' १६२
'एकद्वित्रीणि' असें मोजी नळ लंघितां धराभाग,
दशमीं पदीं म्हणे 'दश,'[1] तों चावे कलिपताज्ञ[2] तो नाग. १६३
तत्काळ विकृत झाला नळ, त्यातें नाग तो म्हणे, "देवा!
सेवा हे; बा! माझा किति पचवाया कृतघ्नपण[3] केवा? १६४
डसलों यास्तव कीं, या कुदर्शेत तुला जनें न वळखावें,
त्वद्गतकलिचें राघवनामेंसें मद्विषें हि बळ खावें. १६५
माझें बहुहितकर तव देहीं न गमो चि, विष, मरणद, मनीं;
लेवविलें कवच तुला हें सुखजयहेतु विषम-रण-दमनीं.[4] १६६
शीघ्र अयोध्येप्रति तूं ऋतुपर्णनृपासमीप जा, गा! तो
जागा तोषाचा बहु, जन त्याचा गुण जसा तुजा गातो. १६७
'मीं बाहुक सूत' असें सांग, रहा तत्समीप सेवकसा,
या व्यसनीं सेव्य नव्हे रविवंशज तो मनुष्यदेव[5] कसा? १६८
सत्संगीं न शिरे बा! लवमात्र हि ताप, जेंवि न दव सरीं,
दावावा हयहृदयज्ञानचमत्कार[6] त्यासि सदवसरीं.[7] १६९
देइल अक्षहृदय[8] तुज, द्यावें त्वां अश्वहृदय ऋतुपर्णा;
द्याया नवर्धि[9] राहों देना चि नगीं वसंतऋतु पर्णां. १७०
तैसें जें गेलें तें सर्वस्व पुन्हां अनंत देणार,
स्वस्थ स्वसत्वजीवनमात्र[10] असो, फार भाग्य येणार. १७१

---

१. दहा (पक्षी) दंश कर. २. 'दश' या शब्दावरून मानिली आहे आज्ञा ज्यानें तो. ३. भावार्थ—नाग म्हणतो, 'मी कृतघ्न नाहीं; कारण, कृतघ्नपणा पचविण्याचें माझें काय सामर्थ्य आहे? परंतु सध्यां जें मी तुला चावलों त्यायोगें मात्र तुझी सेवा च केली आहे असें समज.' ४. संकटसमयरूप रणाच्या नाशाविषयीं. ५. राजा ऋतुपर्ण. ६. अश्वविद्याचातुर्य. ७. योग्य प्रसंगीं. ८. द्यूतक्रीडाज्ञान. ९. नवीन समृद्धि. (वृक्षांला नूतन पल्लवांकुरादि समृद्धि देण्यासाठीं पूर्वींचीं पानें वसंतऋतु वृक्षांवर राहूं देत नाहीं). १०. आपले धैर्यादि गुण व प्राण यांचें धारण होईल इतकें च.

निजरूप प्रकटावें, हृदयीं जेव्हां उठेल हा काम[1],
हें दिव्यांबर देहीं घे, ‘कर्कोटक’ असें मुखीं नाम.” १७२
गेला नळासि सुखउनि, दुखउनि तच्छळक रासभा[2] सद्ही[3],
सद्धितकर कर्कोटक मात्र न तो, जिष्णुचा सभासद ही. १७३
नैषध ऋतुपर्णाला भेटोनि म्हणे, “निजाश्रयीं ठेवा,
देवा! बाहुकनामा सारथि आहें, करीन मीं सेवा. १७४
आज्ञा कराल तरि हय घटिकेंत हि चालवीन शतगावें,
पाक करीन असा कीं, अमृतें वासापुढें हि न तगावें. १७५
जाणें कविता, गायन, मुख्य कळा या चि दोन, येरा ज्या
त्या ही ठाव्या म्हणति, ‘स्वगुण स्वमुखें वदों नये’ राज्या!” १७६
पंक्तिसहस्र[4] सुवर्ण[5] प्रतिमासीं करुनि वेतन स्थापी,
वरिली वृत्ति नळें ती जसि हंसें मानसच्युतें वापी. १७७
तेथें असतां नित्य हि निद्रासमयीं च उत्तमश्लोक[6]
आठवुनि स्वमनांत स्त्रीस म्हणे एक उत्तम श्लोक. १७८
‘कोठें असेल मंदें[7] त्यजिली क्षुत्तृट्समाकुला[8] बाळा?
मागेल अन्न कोणा? वांचेल कसी वनांत? हा! भाळा[9]!’ १७९
जीवल[10] सखा पुसे, ‘ही कोण तुझी? जीस नित्य शोचिसि रे!’
बाहुक म्हणे, “भल्याच्या हृदयीं परशोकवन्हिशोचि[11] सिरे.
आठवते मज कोणी मंदें त्यजिली वनांत हे बाळा,
सीतेसि राक्षसीशा बहु चिंता जीस म्हणति ‘हेवाळा[12].’ १८१
कितवें मंदें पापें देउनि विश्वास कापिला च गळा,
देउनि गेला चिंतावृद्धव्याघ्रीस[13] कीं ‘इला चंगळा[14].” १८२

---

१. इच्छा. २. गाढवाला: (कलीला). ३. उत्तम सर्प. ४. (पंक्ति)=दश–**पंत**. ५. एक तोळा सोन्याचें नाणें. ६. पुण्य कीर्ति नलराजा. ७. ज्यां मूर्खानें–ज्यां हतभाग्यानें. ८. क्षुधेतृषेनें व्याकुळ अशी. ९. कपाळा (दैवा!) १०. हा ऋतुपर्णाचा अश्वपाळ. ११. दुसऱ्याच्या शोकाग्नीचें तेज. १२. छळा. १३. चितारूप वृद्धव्याघ्रीस. १४. चघळा, खा.

अज्ञातवासकाळीं[1] भीमें शोधासि धाडिले विप्र,
ते साधु बहु यशोधनलोभें सर्वत्र धांवले क्षिप्र. १८३
त्यांत सुदेव ब्राह्मण होय यशस्वी, कपींद्रसा सुकृती,
जो व्यसनीं थोरांच्या कामा ये तो चि धन्य सासु[2] कृती[3]. १८४
पुण्याहवाचनीं[4] तो चेदिपतिगृहांत जाय सन्महित
दुरुनि दमयंतीतें वळखे, मानी मनीं स्वजन्महित. १८५
भेटे हळू चि आधीं प्रार्थुनि तो आप्तराज[5] साश्रु तिला,
वर्णें[6] वळखे, कलिनें मळविलियां ही सुधी जसा श्रुतिला. १८६
'दम-दांत-दमनसख मीं कुंडिनवासी सुदेव आइकसी?
बाइ! कसी गे! व्यसनीं पडलीस? न ती रडेल आइ कसी?'
गहिंवरली ओळखितां बंधुसखा वाडवा[7] सुदेवातें,
जेंवि मुमुक्षुमति जगीं वसत्या त्या आड वासुदेवातें. १८८
तें मातेसि सुनंदा सांगे, ती त्या द्विजासि बाहूनीं,
भाव पुसे, 'रडली कां सैरंध्री आज तूज पाहूनीं?' १८९
विप्र म्हणे, 'नळमहिषी भीमसुता हे विलोकितां कळली,
भ्रूमध्यग[8] पिप्लु पहा, व्यक्त न तद्रुचि[9] दिसे,'मळें मळली.'
मळ धूतां चि अविप्लुतें[10] पिप्लु तमविमुक्त भानुसा साजे.
लाजे सुबाहुमाता, विषसें स्वाज्ञान तन्मनीं डाजे. १९१
प्रेमें भेटोनि म्हणे, 'वत्से! केलें असें तुवां कां? गे!
त्वन्माता मद्भगिनी,' ऐसें नातें रडोनि ती सांगे. १९२
भैमी म्हणे, 'सुनंदा तसि हे हि असें चि पाहिलें कीं तें
कोटि गमे; प्रीतिपुढें तुच्छा अमृतप्रपा[11] हि लेंकीतें. १९३

---

१. नळदमयंती अज्ञात असतां. २. स+असु=सप्राण. (जीवंत). ३. उत्तम, कुशल. ४. पुण्याहवाचनसमयीं. ५. पूर्ण विश्वासु. ६. रंगानें (पक्षीं) अक्षरानें. ७. ब्राह्मणा. ८. दोन भुवयांच्या मधला काळा वर्ण, तीळ ९. त्याची शोभा. १०. स्पष्ट–**पंत.** ११. अन्वय–लेंकीतें [मातृ]–प्रीतिपुढें अमृतप्रपा हि (अमृताची पाणपोई) तुच्छा गमे.

जाणोनि[1] दया केली ते[2] तों तुच्छा चि मावसी[3], हेमीं
रत्नीं हि न रुचि, शीलीं[4]; घाल्यें तेणें चि मावसी! हे मीं. १९४
होतां पतिप्रवृत्ति द्यूतीं, जाणोनि भावि बाधा मीं
पाठविलीं स्वापत्यें, रडतो पाहोनि त्यांसि बा[5] धामीं[6].' १९५
भैमीस मायसी जें सत्कारी फार मावसी ते, तें
वाटे श्रीअनसूया पूजी सप्रेमभाव सीतेतें. १९६
भैमी म्हणे, 'पितृगृहा पाठवितां देवुनि स्वसेनेला,
मावसि! उगी; लया त्वां ताप सुनंदे! सये! स्वसे! नेला.'
येतां भैमी, आर्धी धाडुनि आनंद हेर माहेरा
दृष्टींसि म्हणति कन्या[7], 'धन्या व्हा, सत्य हे रमा हेरा.' १९८
माता, तात, भ्राते, स्वापत्यें, पुर विदर्भ मात्र न ती
सुखवी, विश्वास हि, परि एक मलिन कलि[8] न होय तुष्टमती.
भैमी मातेसि म्हणे, 'गांजी साधूंसि, दे वियोगाऽधी
स्नेह चि विश्वामित्र, न पर, एतन्नामका वियो गाधी[9]. २००
दयित चि सुजनाकरवीं, स्वमुखाकरवीं[10] च आणवा हूं न;
हें न करितां मरेन चि, सांगावें काय आण वाहून?' २०१
राज्ञी म्हणे पतिस, 'जरि भुजगी द्यायासि मृत्युभी डसती,
न च गडबडती वत्सा, न असें वदति त्यजूनि भीड सती.' २०२
भीमें नळ शोधाया केले जे विप्र सिद्ध त्यांसि कवी

---

१. नात्याचा वगैरे संबंध ओळखून. २. ती दया. ३. कपटरूप अशी. ४. [तुझी] उत्तम स्वभावाचे ठायीं गोडी आहे. ५. बाप. ६. घरीं. ७. पौरकन्या. ८. वियोगजन्य मनोव्यथा. ९. अन्वयार्थ—साधूंसि गांजी [व] वियोगाधि दे [असा] स्नेह चि विश्वाऽमित्र (विश्वाचा अमित्र, शत्रु); न पर; गाधि एतन्नामका वियो. (गाधिराजा 'विश्वामित्र' या नांवाच्या पुत्राला प्रसवो; पण त्या नांवाच्या शब्दार्थाप्रमाणें स्नेह हा च खरा विश्वाऽमित्र आहे). १०. नुसतें तोंडानें च 'हूं' (होय आणवितों) असें म्हणूं नका तर तशी कृति करा.

नळ उमगाया भैमी, सर्वत्र असें वदा, असें सिकवी. २०३
'पुण्यश्लोका ! त्यजिली निजली असतां वनीं कसी भार्या ?
नसतां दोष सतीचा योग्य परित्याग काय गा ! आर्या !?' २०४
येउनि असें चि सांगति नळविरहें जीस पितृभवन कारा[1],
'आलों पाहुनि देवा, साकारा[2] मात्र, त्या न अनकारा[3].' २०५
पर्णाद द्विज सांगे, "एक चि ऋतुपर्णपुरुष[4] साकेतीं[5],
त्वां शिकविलीं वचें जीं श्रवणीं पडतां सखेद ठाके तीं. २०६
तो ह्रस्वबाहु[6] बाहुक पुरुष म्हणे, 'त्यागिजे स्वतनु, न सती:
करिता[7] बळ, जरि विधिनें विधिची धरिली यशोर्थ हनु नसती.
व्यसनविलुप्तविवेक[8] न पावे चि, उपेक्षितां स्वतनु, कंपा,
ऐशा दैवहतावरि[9] साध्वी न विटो, त्यजूनि अनुकंपा.' २०८
वदला असें पुरुष तो, आहे केवळ विरूप, परि पाक[10]
कीं शीघ्रयान येथें नळसा; अवितर्क्य कर्मपरिपाक[11]." २०९
पूजुनि पर्णादातें, भैमी घेउनि मतीं स्वमातेतें,
योजी जें काम कुतुककीर्तिकर सरस्वतीसमा ते तें. २१०
त्या चि सुदेवासि म्हणे, "द्यावें त्वां एक दान दादानें[12],
हें शुष्यज्जीवन[13] सर पूर्ण असो एकदा नदादानें[14]. २११

---

१. तुरुंग. २. अकारसहित अशा नळाला=अनळाला (अग्नीला). ३. अकाररहिता=नळास-**पंत**. ४. ऋतुपर्णाचा एक सेवक. ५. अयोध्यानगरीमध्यें. ६. आखूड भुज ज्याचे असा. ७. अन्वयार्थ—विधीनें (विधात्यानें) विधीची (दैवाची) यशोर्थ हनु धरिली नसती (यश प्राप्त व्हावें म्हणून दैवाचें आर्जव केलें नसतें) तर [विधि] बळ (बळात्कार) करिता. दैव प्रसन्न झालें होतें म्हणून देहत्याग केला नाहीं. ८. संकटानीं नष्ट झाला आहे विचार ज्याचा तो. ९. हतभाग्यावर. १०. अन्नपाक आणि रथ त्वरेनें हाकणें या दोन कामांत. ११. कर्माचा परिणाम. (कोणच्या कर्माचा परिणाम कसा होईल ही गोष्ट तर्काच्या बाहेरची आहे). १२. ज्येष्ठ बंधूनें. (सुदेव हा मानिलेला ज्येष्ठ बंधु). १३. शुष्क (आटलें) आहे पाणी ज्यांतील असें. १४. नदाच्या ग्रहणानें.

ऋतुपर्णाला म्हण कीं 'नळ नुगमे, तो नसेल या भावें
होतो पुनःस्वयंवर दमयंतीचा; प्रभो ! तुम्हीं जावें. २१२
गेले पुष्कळ राजे राजकुमार स्वयंवरासि, अहा !
परि तो उद्यां चि कीं हो ! जा, जरि जाणें घडेल; शक्ति पहा.' "
तद्भावज्ञ द्विज तो साकेतीं शिकविलें तसें च वदे;
ऋतुपर्णा श्रवणीं तें वृत्त जसें अमृत हि न तसें चव दे. २१४
तें वृत्त बाहुकाला सांगोनि करूनि फुल्ल गाल वदे,
'साधो ! मित्रत्वें द्विजराजीं[1] पद काय गा ! न गालव[2] दे? २१५
मीं कुंडिनगमनोत्सुक, जाणसि तूं शीघ्रयान, ने मातें,
'हूं' म्हण, उद्यां स्वयंवर, व्हावा प्रत्यूह[3] या न नेमातें.' २१६
नळ वरि म्हणे, 'बहु बरें;' स्वमनीं हा लागला खरखरा[4] हो !
प्रथम गमे सुज्ञमतें खर[5] योषिद्भाव[6] तो खर[7] खरा हो. २१७
मग पुण्यश्लोक म्हणे, "न सतीचा दोष हा नियतिचा कीं,
[8]भ्रमवी बळें भ्रमाच्या करुनि स्थिरनियमहानि यति चाकीं. २१८
पुत्र असोनि असें कां? हां ! म्यां वरिली वनांत विटलीला,[9]
नाम न रुचेल मग, सुत मानेल कसा मनांत विटलीला? २१९
न बुडालों यामागें, आजि हि आहें, उद्यां बुडेन तमीं,
बत[10] ! मीनकेतन ! कथं घटितं ते? काय तुज नसें नत मीं?
विटली न वामनातें श्री अन्या ही सती न दीनातें;

---

१. पक्षिश्रेष्ठ गरुडावर. २. गालव हा विश्वामित्राचा शिष्य; यानें गुरुदक्षिणार्थ आठशें अश्व मिळविण्याकरितां गरुडाच्या पाठीवर बसून सर्वत्र संचार केला, अशी कथा आहे. गरुडानें जसें मित्रभावानें गालवाचें कार्य केलें, तसें च तूं हि माझें कर, असा ऋतुपर्णाच्या बोलण्याचा भावार्थ. ३. विघ्न. ४. खुरखुर, चटपट. ५. कठिण. ६. स्त्रीभाव. ७. गाढव. ८. अन्वय–नियति (दैव) यति (योग्याला) स्थिरनियमहानि करुनि भ्रमाच्या चाकीं बळें भ्रमवी. ९. जाराचा आचार. १०. अरेरे ! (बत) मदना ! (मीनकेतन) कशी (कथं) तुझी (ते) [ही] घटना? (घटितं)?

सुकर्ता सिंधु सरासीं लावील कसें महानदी नातें[1] ? २२१
न्यावा चि हा बहूत्सुक, वदलों या सूर्यवंशभूपा 'हूं,'
ज्याला वरील भैमी तो सुकृती भगवदंशभू[2] पाहूं." २२२
योजी ऋतुपर्णरथीं स्वाद्भुतविद्याबळें हयां सजुनीं,
स्वजना दारिद्र्येंसीं स्मरवूं हि न दे गतें[3] तयांस जुनीं. २२३
विद्याप्यायित[4] बाहुकबाहुकलितरश्मि[5] ते चपळ वाजी,
फुरफुरति म्हणों जाणों, 'आम्हां रविहयमदां[6] हि पळवा जी!'
ऋतुपर्ण आपणास हि 'धन्य' म्हणे होय सव्यथरथ[7] रवी,
क्षितिहृदयातें बाहुक दावुनि रथवेग भव्य थरथरवी. २२५
ऋतुपर्णाचा सारथि वार्ष्णेय म्हणे मनीं, 'असा मान्य,
होता नळ कीं संप्रति या लोकीं येक हा असामान्य. २२६
हा! पुण्यश्लोका! बा! होतों मीं सारथी तुझा पहिला,
काय तुझी गति झाली? कां त्वां दिधला वियोग या महिला?
रूपें न, गुणें शुचि कवि दाता सकरुण अनुग्र हा नळसा,
तो च गति दृष्टि रीति स्थिति आर्तीं जी अनुग्रहानळसा[8].' २२८
त्या नृपवार्ष्णेयांचे दाटति पाहोनियां जवास[9] गळे,
तों स्यंदनावरुनि भूपृष्ठीं साकेतराज-वांस[10] गळे. २२९
भूप म्हणे, 'पडला गा! भूपृष्ठीं उत्तरीयपट[11], थांब.'
बाहुक म्हणे, 'पडों द्या, तो योजन येक राहिला लांब.' २३०
पाहुनि बिभीतकद्रुम[12] भूप म्हणे, 'बाहुका! प्रसंख्यानीं[13]
मत्सम हि पटु न कोण्ही, मजला कर जोडिले असंख्यानीं.' २३१
ऐसें म्हणोनि सांगे तो त्या तरुचीं फळें दळें[14] गणुनीं

---

१. संबंध. २. भगवंताच्या अंशानें जन्मलेला. ३. गमनें—**पंत.** ४. बाहुकाच्या अश्वहृदयविद्येनें संतुष्ट झालेले. ५. बाहुकाच्या भुजानीं धरिल्या दोऱ्या ज्यांच्या ते (घोडे). ६. सूर्याच्या अश्वांचा गर्व ज्यांस आहे अशा. ७. पीडित आहे रथ (रथाश्व) ज्यांचा तो. ८. अनुग्रह करण्याविषयीं अनलस अशी. ९. वेगास. १०. वस्त्र. ११. अंगावरील वस्त्र. १२. बेहडा—**पंत.** १३. गणना करण्याविषयीं. १४. पानें.

बाहुक म्हणे, 'पहातों मोजुनि, संदेह वाटतो म्हणुनीं.' २३२
'संख्यान अक्षहृदय हि जाणें मीं सत्य, तुज नमो, जावें
सूर्यास्तापूर्वी, कीं लागेल विलंब बहु, न मोजावें.' २३३
बाहुक म्हणे, 'असें तरि जा, भो वार्ष्णेय! सूत! रथ हाकीं,
काय कठिन हो! जातो कुंडिननगरासि नीट पथ हा कीं.' २३४
राजा म्हणे, 'शरण तुज आलों, ने क्षिप्र कार्य तें साधो.'
बाहुक म्हणे, 'मुहूर्त स्थिर हो, मोजीन तूर्ण मीं, साधो! २३५
नेऊं, परि पाहों द्या, बहु कौतुक वाटतें मना म्हणुनीं.'
भूप म्हणे, 'तरि इतुकीं या शाखेचीं च तूं पहा गणुनीं.' २३६
शाखा छेदुनि मोजी प्रथम फळें, मग तसीं च नळ पानें,
भरतां होय गतश्रम, विहिरा[1] उकरूनि जेंवि जळपानें. २३७
'अश्वहृदय मीं देतों, द्या मज संख्यानें[2] अक्षहृदय[3] हि तें,'
ऐसें मागितलें त्या दातृवरें सर्वदक्षहृदयहितें[4]. २३८
द्रुतकुंडिनगमनार्थी[5] शिकवी त्या बाहुकासि तो कवि तें[6],
जाणों दिव्यौषध दे अंतर्गतकळिविषासि ओकवितें. २३९
विद्या द्रुष्टीं[7] भय दे, जसि रघुची परमनीं[8] चमू ठकली
कीं स्वस्था[9] नहुषा मुनिहुंकृति[10], भो परम नीच मूढ कली. २४०

---

१. नदी वगैरेचे तीरीं खणतात जो डोहरा (डुरा) तो. २. रास केलेल्या पत्रफल-पुष्पधान्यादिकांची लांबी, उंची, विस्तार, संख्या इत्यादि केवळ पाहून सांगण्याची गणितविद्या—नीलकंठ; भारतटीकाकार. ३. फांशाच्या (द्यूताच्या) अभिमानी देवतेचें हृदय वश करणारा मंत्र. ४. सर्व चांगल्या लोकांच्या चित्तास हितकर अशा (दातृवर नळानें). ५. कुंडिन नगराला त्वरित जाण्याची इच्छा करणारा. ६. तें संख्यान आणि अक्षहृदय. ७. कलीचे ठायीं. ८. शत्रूंच्या मनांत. ९. स्वर्गस्था. १०. अगस्त्यमुनीची क्रोधवाणी (शाप). [इंद्रपद पावल्यानंतर इंद्राणीविषयीं मनांत कामवासना धरलेला नहुषराजा वाहनास सप्तर्षि लावून तिजकडे जात असतां वाटेंत त्यानें 'सर्प, सर्प' (चला चला) असें म्हणून त्या सप्तर्षींना लत्ताप्रहार

वर्णिति कवि ते प्याले गुरुकरुणामृतमहारसाला जे,
स्पर्शोनि कळि नळाला श्रोत्रियमुनिला[1] महारसा लाजे. २४१
नळशक्तिपुढें कलिची शक्ति हि सिंहीपुढें जसी कुतरी,
चाले न लंघनीं गुरुच्या माया[2], जेंवि सिंधुच्या कु-तरी[3]. २४२
शापूं पाहे नळ, परि सुचलें जें[4] वज्रकवच कलिला तें;
सद्भीतें[5] नमनातें, दवभीतें[6] सेविजे सुसलिलातें. २४३
नमुनि म्हणे कलि, 'देवा! पुण्यश्लोका! महायशा! पावें;
दे अभय मुखीं याया स्तोत्र[7], न यायास 'हाय!' शापावें. २४४
दुष्कर न शिखिनिषेवण[8] हालाहलनामगरनिषेवण वा[9],
शिरला या तनुकक्षीं[10] भैमीशापाहिवरविषें[11] वणवा. २४५
पूजिति अतापदा बहु, देवा हि न तापदा अरण्यनळा[12];
सत्पद[13] चि, न हरि हरि! हरि! हरिचें[14] हि नतापदा[15] अरण्य नळा!
स्मरणें[16] त्वद्भावातें पाहेन जनीं लवें हि अनळसमीं,

केला, तेव्हां तूं स्वर्गच्युत होऊन 'सर्प' होशील असा अगस्त्यानीं त्याला शाप दिला; परंतु नंतर नहुषानें विनवणी केल्यावरून, 'जो तुझ्या प्रश्नांचें उत्तर देईल तो तुला शापमुक्त करील' असा उःशाप दिला. याप्रमाणें यामुनगिरीवरील सरोवरांत सर्प होऊन पडलेल्या नहुषाला पुढें धर्मानें शापमुक्त केलें].

१. वेदवेत्त्या मुनीला २. कपट. ३. फुटकी नौका. ४. जें [नमनरूप] वज्रासारखें दृढ कवच तें कलिला सुचलें. ५. साधूपासून भ्यालेल्यानें. ६. वणव्याला भ्यालेल्यानें उत्तम उदकाचा आश्रय करावा. ७. [तुझें] स्तोत्र. ८. अग्निसेवन=अग्नीनें जाळून घेणें. ९. किंवा. १०. शरीररूप गवतांत. ११. दमयंतीच्या शापरूपी महासर्पाच्या विषानें. १२. अग्निहोत्र्याच्या अरणीपासून उत्पन्न होणाऱ्या अग्निदेवाला हि. १३. साधूचे चरण च [हरि]. १४. इंद्राचें नंदनवन देखील. १५. शरणागताची आपदा (संकट). १६. अन्वयार्थ—[तुझ्या] स्मरणें लवें हि (अल्पमात्र हि) अनळसमीं (तेजस्वी अशा) जनीं [मीं] त्वद्भावातें पाहेन (त्याला तुझ्यासारखा च पूज्य समजून छळणार नाहीं).

अनळसमीर[1]चि तूं तों मज कक्षा,[2] पदिं असेन अनळस[3] मीं.'
कोपासि आवरी नळ, सन्मति[4] केवळ न रुक्षता सिकली.
आधीं दूषी याचकसुरतरुला,[5] मग बिभीतकासि[6] कली. २४८
तें स्वमुखें प्रकट करुनि दत्ताभयदानधर्म[7] न विटाळी,
खळकृतसच्छलकथन-प्रस्तावातें[8] कुलीन कवि टाळी. २४९
बैसोनि रथीं पुनरपि अश्वांतें तो प्रियंवद[9] पिटाळी,
कुंडिनपुर दावुनि, भय ऋतुपर्णमनांत जें तदपि टाळी. २५०
कळतां, ऋतुपर्णाला भीमें भेटावयासि आणविलें,
भैमीस रथरवें[10] 'नळ आला' हें, 'नळ' हयां हि जाणविलें.
वळखे वार्ष्णेयाला,[11] त्या ही रविवंशभवनदीपा[12] हे,
नळसिंधुप्रति च न तो भीममुकुंदांघ्रिभवनदी[13] पाहे.[14] २५२
तो ह्रस्वबाहु सारथि तिसरा, चवथा रथीं नसे नळ कीं.
हा! कीं भ्रमलीं नेत्रें अश्रुभरें सर्वकाळ ही मळकीं. २५३
ऋतुपर्णाची सत्कृति करुनि म्हणे भीम भूप वासवसा,
'गोड करा, हंस[15] तुम्हीं, हा स्वीकारूनि कूपवास, वसा.' २५४
वार्ता स्वयंवराची स्वप्नीं हि नसे, कथील तो आर्य?
आगमनहेतु पुसतां, 'नमनावांचूनि कोणतें कार्य?' २५५
भैमी दूतीस म्हणे, 'मद्धृदयीं तर्क हा असा वागे,

---

१. अग्नि आणि वायूसारखा च. २. गवताला. ३. निरलस, तत्पर. ४. सज्जनांची बुद्धि केवळ रुक्ष (कठोर)च असते असें नाहीं; तर प्रसगीं मृदु हि असते. ५. याचकांच्या कल्पवृक्षाला—नळराजाला ६. कलीनें नळाच्या शरीरांतून बिभीतक —बेहड्याच्या झाडामध्यें प्रवेश केला. ७. दिलेलें अभयरूप दान हा च धर्म. ८. प्रस्ताव=समय, प्रसंग. ९. गोड बोलणारा. १०. रथाच्या आवाजानें. ११. नळाच्या सारथ्याचें नांव. १२. सूर्यकुलगृहभूषणाला. (ऋतुपर्णाला). १३. भीमकराजा हा च विष्णु, त्याच्या पायांपासून उत्पन्न झालेली नदी भागीरथी ती (दमयंती). १४. सिंधु हा नदीचा पति, अर्थात् नळसिंधु म्ह० पति नळ, त्यातें न पाहे. १५. मानससरोवरांत राहणारे हंस च असे तुह्मी.

ऋतुपर्णाचा सारथि बाहुक जो तो चि नळ असावा, गे!
केशिनि[1]! जा, शोध करीं; मळलें विमळ स्वरूप बहुधा त्या
मलिनकलिनयनपातें[2]; जाणों संदहित[3] चि मान्य बहु धात्या[4].'
जाउनि रथशालेंत प्रार्थुनि बहु बाहुकासि ती वदवी,
शोधुनि पाहे भैमीहृदयाच्या कार्यसिद्धिची पदवी[5]. २५८
पर्णादाजवळि जसें वदला तैसें[6] चि केशिनीजवळ,
धवळ मधुर ते वर्ण[7] श्रुतिला[8] गमले तिच्या सुधाकवळ[9]. २५९
ती भैमीस म्हणे, 'जी! येइल भलत्या जनासि न गहिवर;
दिसतें सत्व[10] असें कीं, पडतां न चळेल हेमनगें[11] हि वर. २६०
गहिवरला जी! बाई! परि आवरिला बळें चि गहिवर तो,
योगें[12] रूप फिरविलें[13], सूत[14] नव्हे हो! समर्थ महिवर[15] तो[16].' २६१
पुनरपि पाठविली ती, येउनि सांगे हळू च कीं, 'अनळ[17]
जळ हि घटांत निघालें, बाइ! म्हणावें कसें तया न नळ?
चुरलीं हि फुलें झालीं पूर्वाधिक[18], अग्नि हि न करा पोळी[19],
खिडकी[20] हि होय मोटी, येइल तसि एक हि न करा[21] पोळी.'
'तत्कृत पदार्थ कांहीं आण, कर तदर्थ जा मिषाला[22] गे!'
ऐसें म्हणतां आणी, चाखाया त्या चि आमिषा[23] लागे. २६४
लागे खमंग पळ[24], परि तनुचें स्तोकावशिष्ट[25] हि मग रसें[26]

---

१. दमयंतीच्या दासीचें नांव. २. दुष्ट कलीच्या दृष्टिपातानें. ३. साधूंचें अकल्याण. ४. ब्रह्मदेवास. ५. स्थान. ६. मागें २०७।८ गीति पहा. ७. शब्द. ८. कानाला ९. अमृतग्रास. १०. बळ. ११. मेरुपर्वत. १२. दैवयोगानें. १३. विद्रूप केलें. १४. सारथि. १५. भूपति. १६. नळ. १७. अग्नि. १८. पूर्वींपेक्षां अधिक [सुगंधी आणि टवटवीत] झालीं. या व मागच्या पद्यावरून वायु, जल आणि अग्नि ह्यांचा जय बाहुकास प्राप्त असल्याचें सुचविलें आहे. १९. भाजी. २०. त्या बाहुकाला जावयाचें असेल तेथील लहान असलेलें हि दार आपोआप मोठें होई. २१. करावयास. (बाहुकानें केलेल्या पोळीसारखी एक पोळी हि कोणास करितां येणार नाहीं). २२. कपटाला, सोंगाला. २३. मांसाला. २४. मांस. २५. अल्प राहिलेलें—**पंत.** २६. गोडीनें.

तें सर्व भान[1] पळवी, पळ वीर्यें[2] पीतें[3] मिष्ट हिमें[4] गरसें[5]. २६५
सावध होऊनि म्हणे, 'ओळखिला तो चि सुरस[6] मासाचा;
झांकूनि रूप होसी कां लटिका? हो चि सुरसमा[7]! साचा[8].'
मग बाहुकाकडे ती स्वापत्यें न्यावया तिला सिकवी,
तीं पाहतां चि धावे, धरुनि उरासीं रडे विलासि कवी. २६७
'स्वापत्यस्मृतिनें मीं झालों ऐसा' असें म्हणे सुकवी;
त्या सुदृढ[9]प्रेममहापाशांत हि सांपडोनि तो चुकवी. २६८
हें ऐकुनि साध्वीनें मातेकरवीं पित्यासि जाणविलें,
तदनुमतें चि तया बहु विनउनि अंतःपुरांत आणविलें. २६९
ती पाहतां धृतिमृगीकर्णीं[10] कटु[11]शोकसिंहहाक सिरे,
स्वमनीं नळ कलिस म्हणे, 'केली वर[12]कांतिहानि हा! कसि रे?'
अन्योन्य दृष्टि मिळतां, शोकभरें ती हि साधि[13], तो हि रडे.
विधिहत[14]मति जन हरउनि करगं[15] अमृतफळ हि साधितो[16] हिरडे.
दुःसह[17]निजविरहव्रतकृशतनुला देखतां चि कळवळला;
तीवरि शुष्यत्[18]सस्यक्षितिवरि घनसा[19] दयाळु नळ वळला. २७२
जीनें पति[20]पदपंकजरेणुपुढें तुच्छ लेखिला कायें[21],
ती त्यासि पुसे, 'सुप्तस्त्री[22]त्यागी साधु देखिला काय? २७३

१. देहभान, शुद्धि. (नळानें तयार केलेल्या मांसान्नाची चव जाणणाऱ्या दमयंतीनें, चवीवरून तें अन्न तयार करणारा बाहुक हा नळ च असें ताडलें). २. सामर्थ्यानें. ३. प्यालेलें. ४. थंड. ५. विषासारखें. ६. उत्तम गोडी, सुरुचि. ७. हे देव तुल्या (नळा!). ८. खरा. ९. बळकट अशा [अपत्य]–प्रेमाच्या मोठ्या बंधनांत. १०. धैर्यरूप मृगीच्या कानांत. ११. कटु अशी शोकरूप सिंहाची हाक. १२. सुंदर कांतीची नासाडी. १३. मनोव्यथायुक्त. १४. दुर्दैवानें नष्ट केली बुद्धि ज्याची तो. १५. हस्तगत. १६. मिळवितो. १७. असह्य अशा आपल्या विरहरूपी व्रतानें कृश झालें आहे शरीर जिचें तिला. (दमयंतीला). १८. शुष्क होत आहेत धान्यें जीचीं अशा पृथ्वीवर. १९. मेघसा. २०. पतीच्या चरणकमलधूळीपुढें. २१. शरीर. २२. निजलेल्या स्त्रीचा त्याग करणारा.

पाईं भ्रमली श्रमली निजली भिजली निजाश्रु-नीरानीं,
धार्मिक न पाहिला तो, जो जाय असीस टाकुनीं रानीं. २७४
पति निजला मग निजली, तेव्हां चि प्रथम न उठली, चुकली.
[1]आग त्याग[2]विहित हें? सुज्ञ मरे तों हि फळ[3]हरा बुकली? २७५
विटला[4] जाणों प्रभु कीं वरिला नर, सुरवरास[5] न वधूनीं[6];
हें अघ, तरि न वरावें काय सुगुणगण[7]वरासन वधूनीं? २७६
जळविरहें मत्स्यीसी मरती कीं प्रेम दाविती बोलीं,
पाहों वरी परीक्षा, नेत्रें करिती क्षणक्षणीं ओलीं. २७७
पुण्यश्लोकें रामें सीतासी हे हि अग्निच्या कुंडीं
टाकूनि पाहिली, तों रागें[10] शुकीच्या, तसा इच्या [11]तुंडीं. २७८
बहुधा यां[12] भावें ही त्यजिली स्त्री, पंडितें जसी असती[13];
काळें[14] हि कीं न पुण्यश्लोक त्यजिता, जरी बरी[15] असती.' २७९
पुण्यश्लोक म्हणे, 'गे! राज्यश्रीस्त्रीवियोगहेतु कली,
शतमरणविपत्तीसीं मतिमति[16]! सति! अतिविपत्ति हे तुकली[17].
देवि! कलि तुझ्या शापें, बहु कर्कोटकविषें हि तळमळला,
गेला पळोनि, जेणें विधुंतुदें[18] विधु तसा चि नळ मळला. २८१
आलों तुजकरितां चि, श्रीमति! साध्वि! प्रसन्न हो महिते[19]!
न सतीप्रसादसम सुखदायक सत्तीर्थवास होमें[20] हि ते. २८२
दुःखांत पाडिले ऋजुमति[21]! दुःसंगें तुझे असु खगानें[22],
व्याधाच्या मधुरें ही हरिणीला सेवटीं असुख गानें. २८३

१. अपराध. २. त्याग करण्याजोगा ३. फळ (फळासारखी क्षुल्लक वस्तु) चोरणाऱ्याला. ४. कंटाळला, रुष्ट झाला. ५. इंद्रास. ६. अनुकूळ होऊन. ७. उत्तम गुणसमुदायाचें श्रेष्ठ स्थान च अशा नरास. ८. भाषणानीं (वरवर). ९. अश्रूनें भिजलेलीं. १०. लाली. ११. तोंडावर. १२. सदोष आहे या भावें. १३. व्यभिचारिणी. १४. कालांतरीं हि. १५. शुद्ध. १६. हे बुद्धिमति! १७. तुलना पावली. १८. राहु—पंत. १९. हे पूजनीय स्त्रिये! २०. यज्ञादि कृत्य. २१. सरळ बुद्धीचे दमयंति! २२. पक्ष्यानें. (हंसानें).

कैंचें सुख दहनासीं, स्वच्छ करो सख्य वा रण करो रूं[1],
तेंवि कळत्रास[2] कितवसंग न सुखहेतु, वारणकरोरू[3] ! २८४
जरि तूं स्वयंवरीं वरणार परीक्षूनि गुणसुखनिधीतें,
युक्त चि कवि गातील चि तुझिया निर्दोषगुण[4]सुखनिधीतें.
प्रेमें जरि खळ वरिला, तरि लावो मानसीं खरखरा, गे !
लोपविला न अकार[5] चि, आकार हि, नळ न हा, खरं[6] खरा गे !
ऋतुपर्ण पावता म्यां केला समयीं न देवि ! मीं चुकलों,
कळत चुकेन कसा हो !? नकळत चुकतां महा[7] सुखा मुकलों.'
भैमी थरथर कांपे, नमुनि म्हणे, 'हा[8] उपाय आगमनीं,
वाहीन शपथशत मीं, न धरावें यावरूनि आग[9] मनीं. २८८
त्यजुनि सुर, चरण वरिले हे, कीं, सौंदर्य पदं[10]नखापरतें
चंद्रीं ही न, पराचें सादर पाहे न वदन, खापर तें. २८९
उत्तर तुम्हीं दिलें तें पर्णादें कळवितां चि मातेतें,
कथुनि असें केलें जी ! सत्पदरतचित्त जें न माते तें. २९०
ऋतुपर्णाजवळि तुम्हीं सूतपणें जरि असाल, तरि त्यातें
एकदिनीं शतयोजन आणाल चि आत्मपोषकरित्यातें[11]. २९१
सम शुद्ध भाव सोडुनि मति अनुसरली असेल विषमातें[12],
तरि हें चि दर्शनामृत मारू होवूनि उग्र विष मातें. २९२
प्राण्यांच्या प्राणांचे पोषक वातार्कचंद्र हे असती.
आतां चि प्राणांतें सोडूत, जरी असेल हे अ-सती.' २९३

---

१. कापूस. २. वायकोला. ३. हत्तीच्या शुंडेसारख्या मांड्या जिच्या अशा (दमयंती)! ४. दोषरहित गुणांची उत्तम खाण अशा बुद्धीतें. ५. अवर्ण च लोपविला असें नाहीं, तर आकाराचा हि लोप केला; म्हणजे जो पूर्वीं अकारयुक्त नळ म्हणजे अनळ (अग्नि) होता, तो च नळ झाला, अर्थात् तेजोरहित झाला आणि आकाराचा (स्वरूपाचा) हि लोप झाला. ६. खल (रलयोरभेदः) किंवा गाढव, अविचारी. ७. तेजा. ८. स्वयंवर हा. ९. अपराध. १०. या पायाच्या नखापेक्षां. ११. आपल्या पोषणकर्त्यातें. १२. वाईट मार्गाला.

आकाशीं वायु वदे, 'पुण्यश्लोका नळा! न गांजावें;
ऐसें हि होय समयीं कीं स्थैर्य त्यजुनियां नगां[1] जावें. २९४
परि शीलें[2] कोणा हि व्यसनीं क्षणभरि हि सोडिली न सती;
तरतासि कसा स्त्रीनें जरि शीलसमृद्धि जोडिली नसती? २९५
असतीस[3] सतीत्व जसें त्या श्रीमद्रामपादतामरसें[4]
देवा[5]! इच्या[6] हि द्यावें 'दमयंती' या विशुद्धनामरसें[7].' २९६
गर्जति नभीं न केवळ मातीं[8] त्या सुरपुरांत[9] न नगारे[10],
पुष्पघन पडे, म्हणती गंधर्वा सुर, 'पुरातन[11] न गा रे!' २९७
दिव्यांबरें स्वतनुला झांकुनि, कर्कोटकासि नळ भूप
स्मरला जों, स्मर लाजो लागेसें प्रकटलें रुचिर रूप. २९८
स्वपतिगळां पहिली [12]श्री जों, साध्वी स्त्री हि तों, बळें चि पडे.
[13]ते दंपती न, डोळे व्यर्थ विना प्रेम बोवळें चिपडे. २९९
आलिंगुनि अंकावरि घेउनि, नेत्रें पुसूनि तो हातें,
बाष्पभररुद्धगळ[14] नळ समजावी हरुनि शोकमोहातें. ३००
हर्ष इला नळलाभें बहु, न तसा कुमुदिनीस शशिलाभें;
पुण्यश्लोकपदें[15] [16]हे किंवा [17]ते धरि मनांत न शिला[18]भें. ३०१
हळुहळु चि रडत होत्या दमयंतीच्या दयाळु ज्या माता
त्या मोठ्यानें रडल्या होतां चि प्रकट साधु ज्यामाता. ३०२

---

१. पर्वताला. २. उत्तम आचारानें. ३. (अर्थानुसंधानानें) अहल्येस. ४. शोभायमान रामाच्या चरणकमलानें. ५. हे नला! ६. या दमयंतीच्या. ७. पवित्र नामाच्या गोडीनें. ८. मावतात. ९. अमरावतींत. १०. 'नगारा' हा आरबी शब्द आहे. ११. पूर्वीचें जुनें गाणें गाऊं नको; (नवें नलदमयंतीस्तुतिपर असें गा). १२. स्वरूपशोभा. १३. अन्वयार्थ–विना प्रेम ते दंपती न; [तसें च] विना बोवळें डोळे व्यर्थ चिपडे [होत]. १४. ज्याचा गळा अश्रूंनीं दाटून आला आहे तो. १५. पुण्यश्लोक नलाच्या किंवा श्रीरामचंद्राच्या पदाच्या योगानें. १६. दमयंती. १७. शिलारूप अहल्या. १८. भय.

भीम रडे, न प्रकटी, पूर्वी जो वेपमान[1] साधि[2] रडे,
केलें होतें चिंतावाळविनें जरि हि मानसा धिरडें[3]. ३०३
ऋतुपर्ण हि सुख पावे, स्वार्थाग्रह लेशमात्र न कुलीनीं.
साधु[4]मतिनीं न धरिजे परभोगीं द्वेष काम न कुलीनीं. ३०४
नळद[5]त्ताश्वहृदयवराविद्येनें तो[6] हि सुखविला साचा,
झाला लाभ नळासम ज्यास सुगतिभोगसुखविलासाचा. ३०५
च्यार घटिका हि दुःसह ज्यां, त्यांसि वियोग च्यार हायन[7] हो;
हाय न होरपळविला मीन, म्हणे अरि हि, न विरहायन[8] हो.
आधीं लीळेनें श्रीहर[9] भैमीताप जिंकिला भूपें,
मग तो पुष्कर[10] हि, कसें हरवावें वारिराशि[11]ला कूपें? ३०७
पुण्यश्लोकानें त्या श्रोतृदुरिततूल[12]संपदनळानें
गौरविला अहितकर हि पुष्कर, कलिहृदय[13]कंपदनळानें. ३०८
केलें राज्य बहु दिवस पुण्यश्लोकें नळें जसें रामें,
कलि कांपतो थरारां ज्याच्या कवि[14]कोटिकीर्तितें नामें. ३०९
नळ पुण्यश्लोक तसा तूं हि; कलि तसा सुयोधन हि खोटा.
द्यूतें पदच्युति समा[15], परि या तापापरीस तो मोटा. ३१०
अनुकूळा स्त्री भ्राते ब्राह्मण शतशः समागमें वसती.
धर्मा! तुझी वनींची प्रमद[16]वनवसतिसमा गमे वसती. ३११
करुनि खळपराभव तूं निष्कंटक राज्य सुचिर करिसील,
घे अक्षहृदय, पडल्या योग तसा दुष्टगर्व हरिसील." ३१२

---

१. कंपायमान. २. दुःखी. ३. एक सच्छिद्र खाद्य पदार्थ. ४. सुबुद्ध जनानीं. ५. नळानें दिलेल्या अश्वहृदयरूप श्रेष्ठ विद्येच्या योगानें. ६. ऋतुपर्ण ७. वर्षे—**पंत**. ८. विरहाचें स्थान. ९. शोभा हरणारा. १०. नळाच्या भाउबंदाचें नांव. (पूर्वी नळाला द्यूतांत जिंकलेला त्याचा भाऊ). ११. सागराला. १२. श्रोत्यांचीं पातकें ही च कापसाची संपत्ती (ढीग) त्यास अग्नीसारख्या अशा पुण्यश्लोक नळानें. १३. कलीच्या हृदयास कंप देणाऱ्या नळानें. १४. अनेक कवीनीं स्तविलेल्या. १५. सारखी. १६. अंतःपुरोचितक्रीडावनांतील वसतीसारखी.

बृहदश्व अक्षहृदया देउनि संध्या करावया गेला,
केला प्रमुदित पुण्यश्लोकयशें धर्म चित्रसा ठेला. ३१३

अध्याय पांचवा.

ऋषिकथित परमदुष्कर जिष्णुतपःश्रवण करुनियां धर्म,
सानुज सदार चिंता पावे, पावे चि ना मनीं शर्म[1]. १
देवर्षि[2], तीर्थयात्राफळ जें गंगात्मजा[3] पुलस्त्य[4] वदे,
तें आपण ही सांगुनि धर्माला धर्मसंग्रहोत्सव[5] दे. २
धौम्य हि विचार पुसतां सांगे धर्मासि तीर्थयात्रा त्या,
कविविस्तरभय न हरिति, जरि हि हरिति भक्तभवभया त्रात्या[6].
तों येउनि सांगे सितवाहचरित[7] हरिनियुक्त[8] लोमश[9] तें,
प्रत्युत्थान[10] जयाला द्यावें सच्छ्रोतृकर्णलोमशतें[11]. ४
"धर्मा ! दिव्यास्त्रज्ञ त्रिदशवरार्धासनस्थ[12] वासवसा,
अर्जुन विलोकिला म्यां, स्वस्थ तुम्हीं करुनि वनानिवास वसा. ५
शक्रें तुज कथिलें कीं, 'अर्जुन झाला कृतार्थ, पाठवितों,
त्वद्धृद्गतराधासुतभयशल्योद्धारयत्न[13] आठवितों. ६
विजयार्थ तीर्थयात्रा लोमशकथिता अतामसी[14] कर गा !

---

१. सुख. २. नारद. ३. भीष्मास. ४. पुलस्त्यमुनीनें पूर्वीं भीष्मास तीर्थयात्राफळ सांगितलें होतें, त्याचा च अनुवाद येथें नारदानीं केला आहे. ५. धर्मसंग्रह करण्याविषयीं उत्साह. ६. रक्षणकर्त्या (अशा त्या तीर्थयात्रा). ७. अर्जुनाचें चरित्र. ८. इंद्रानें पाठविलेला. ९. एक ऋषि. १०. उत्थापन. ११. रसिक श्रोत्यांच्या शतशः कर्णांनीं व केशांनीं. (कुतुहलमय कथा ऐकण्यास कान उत्थित होतात व रोमांच उभारतात, हें अनुभवगम्य आहे). १२. देवश्रेष्ठ इंद्राच्या अर्धासनावर बसलेला. १३. तुझ्या हृदयांतील कर्णभयरूप शल्य उपटून काढण्याचा यत्न. १४. तमोगुणरहित.

कर[1]गा होईल श्री, कृष्णामृतसिंधुनामसीकर[2] गा[3].' ७
मज पार्थें हि प्रार्थुनि कथिलें; गा! पार्थिवोत्तमा[4]! धर्मा[5]!
करवीन तीर्थयात्रा, चाल, असें मीं सहाय या कर्मा." ८
चित्तांत तीर्थयात्राकाम, तया पुरविता प्रभु हि आला,
जैसा अंभोद[6] तृषित चातकखग पसरितां चि वरि 'आ' ला. ९
सेवी पांडव सिद्धाश्रमतीर्थांतें तदीय महिम्यांतें,
विस्तरभयें न लिहिलें रसिकानुमतें मनोरम हि म्यां[7] तें. १०
तीर्थें करीत गेला, कीर्ति बहुत ऐकुनि प्रभासाची[8],
तेणें भेटविली, हो! पुण्यर्द्धि[9] नवांबुदप्रभा[10] साची. ११
मुनि सर्व तीर्थयात्रा करवुनि ने गंधमादननगातें[11],
गातों; मन्मति[12] म्हणत्ये, 'मानवतिल साधुपाद न, न गा तें.' १२
कठिन पुढील पथ म्हणुनि, धर्म म्हणे, 'सद्गुणभ्रमरबकुळा[13]
भीमा! गंगाद्वारीं वस, एका मात्र येउ दे नकुळा. १३
रक्षुनि पांचाळीला, सहदेवाला सहर्षिधौम्याला[14],
स्वस्थ रहा, नेतों मी त्वदनुमतेंकरुनि या चि सौम्याला[15].' १४
भीम म्हणे, 'हें गुरुला[16] विनवा, आम्हां तिघांसि न वदावें,
अर्जुनविरहग्रीष्मीं[17] न जळावें त्वद्वियोगनवदावें[18]. १५

---

१. हस्तगत. २. (कृष्णरूप अमृतसमुद्राचे नामरूप) अंबुकण—**पंत.** तुषार. ३. स्तवन कर. ४. श्रेष्ठ राजा! ५. लोमश—**पंत.** ६. मेघ. ७. मोरोपंतानें. ८. प्रभासतीर्थाची. (हें तीर्थ द्वारकेजवळ आहे). ९. पुण्याची समृद्धि. १०. श्रीकृष्ण—**पंत.** कृष्ण हा कृष्णवर्ण असल्यानें त्यावर नूतन मेघाच्या कांतीचा च आरोप येथें केला आहे. ११. गंधमादनपर्वत. (हिमालयाच्या उंच शिखरांपैकीं हें एक आहे). १२. **पंत** म्हणतात, मी गातों; पण सज्जनाना वर्णनविस्तार आवडावयाचा नाहीं म्हणून तो करूं नको असें माझें मन मला सांगतें. १३. सद्गुणरूप भ्रमरांस बकुलपुष्पासारख्या अशा! १४. ऋषिसहित. १५. कोमल मनाच्या नकुळास. १६. धौम्याला. १७. अर्जुनाचा विरह हा च ग्रीष्मसमय (उन्हाळा), त्यांत. १८. तुझ्या वियोगरूपी नूतन वणव्यानें.

चौघांस हि वाहेन, त्यजितां दाटूनि कां नरविमाना[१]?
शिरतां पाताळबिळीं दीप हि पावेल कां न रविमाना[२]?' १६
कृष्णा हांसोनि म्हणे, 'छायेला[३] काय जी! महायास?
चाला, चालेल पहा, योग्या नोहे चि [४]हे रहायास.' १७
भेटे साधु कुलिंदक्षितिनाथ[५] सुबाहु त्या अनन्यांस[६],
परमाप्तास[७] प्रभुवर धर्म म्हणे, 'रक्ष हा जनन्यास[८].' १८
घेउनि जाय तयांला लोमश पाजूनि पुण्यपुंजरसा[९],
सुरसत्कृतबीभत्सुप्रेक्षोत्साह[१०] हि पतत्रिकुंजरसा[११]. १९
जातां दुर्गममार्गें अश्रुत चि पदार्थ नित्य नव दावी,
सांगे कथा अशा मुनि, गोष्टि सुधेची हि ज्यांत न वदावी. २०
वातें वर्षें[१२] पावे कृष्णेचो गिरिपथांत तनु कंपा,
रंभासी[१३] पडतां ती, व्याकुळ करि पांडवांसि अनुकंपा[१४]. २१
[१५]वीजी वल्कें[१६] वायुज[१७], अंकीं शिर धर्म तो दयाघन घे,
धौम्यें[१८] मुखीं जळ घाली; देवर्षि[१९] म्हणे, 'शमस्तु[२०] ते अनघे[२१]!'
तच्चरण अजिनशयनीं[२२] चुरिती, म्हणति, नवरी[२३] न यम[२४] तीतें,
साधूंच्या दुःखितजनहितकृत्यान्य[२५] न वरी[२६] नय[२७] मतीतें. २३

---

१. नररूप विमानाला. २. सूर्याच्या योग्यतेला. ३. सावलीला. (द्रौपदी आपणास धर्माची सावली म्हणत आहे). ४. ही द्रौपदी. ५. कुलिंददेशाचा राजा. ६. ज्याला कोणी अन्य-परका नाहीं त्यास. (धर्मराजास). ७. परमविश्वासु सुबाहूला. ८. जनरूप ठेवा. ९. पुण्यसमूह हा च रस, त्याला. १०. देवानीं सत्कारिलेल्या अर्जुनास पाहण्याचा उत्साह. ११. गरुड-**पंत.** पक्षिश्रेष्ठासारखा. (कुंजर, नाग, हरि वगैरे शब्द श्रेष्ठत्ववाचक आहेत). १२. वृष्टीनें. १३. केळीसारखी. १४. कृपा, प्रेम. १५. वारा घाली. १६. वल्कलानें. १७. भीम. १८. धौम्यानें रक्षोघ्नमंत्रानें अभिमंत्रित असें जल द्रौपदीच्या मुखांत घातलें व आशीर्वाद दिला. १९. नारद. २०. तुझें कल्याण असो-**पंत.** २१. हे पापरहिते! २२. मृगचर्माच्या शय्येवर. २३. पत्नी, बायको. २४. नकुळ-सहदेव. २५. दुःखित जनास हितकर अशा कृत्याहून इतर. २६. स्वीकारी. २७. नियम, वर्तनक्रम.

धर्म म्हणे, 'बा भीमा! घे स्कंधीं, योग्य ही न गमनातें,
निष्ठुरसा गमला हा सत्संश्रययोग्य[1] ही नग मनातें.' २४
भीम म्हणे, 'मीं ईस हि, तुज हि, यमांस हि, सुखें चि वाहेन,
अथवा होइल आज्ञा तरि आजि घटोत्कचासि[2] वाहेन.' २५
धर्मानुमतें स्मरतां द्याया गुरुदास्यपुण्य[3] जनकानें[4],
ऐके 'घ' घरीं, 'टोत्कच' नमनीं, तो सत्य पुण्यजन[5] कानें. २६
धर्म नकुळ सहदेव द्रुपदसुता धौम्य भीमसेन मुनी,
प्रेमास्राशीर्वर्षी[6] घनसे केले घटोत्कचें नमुनीं. २७
भीम म्हणे, 'पुत्र सुखें पावुनि गुरुदास्यपुण्यपर्व[7] तरे,
आम्हांसि गंधमादननामा हो सुगम पुण्यपर्वत रे!. २८
हे कृष्णा त्वन्माता चालों न शके पथीं, इला वाहें,
तारक तुल्य, स्कंधग[8] गुरुमूर्ती[9] गंडकीशिला[10] वा हें[11].' २९
पुत्र म्हणे, 'भिन्न असति पंचायतनासि[12] काय संपुष्ट[13]?
वाहो सर्वां माझा, आहे नीरोग काय संपुष्ट[14]. ३०
पांच तुम्हीं धौम्य हि गुरु, दुर्लभ मज दास्य अन्यदा[15] सांचें,
वाहेन तुम्हां, हे मुनि जनु[16] सफळ करूत अन्य दासांचें[17]. ३१

---

१. साधूंच्या आश्रयास योग्य. २. याचें डोकें घटासारखें उत्कच (केशरहित) होतें म्हणून यास 'घटोत्कच' असें नांव पडलें. ३. पितृसेवेचें पुण्य. ४. बापानें. (भीमानें). ५. राक्षस. (घटोत्कच किती जलद आला हें ह्या गीत्यर्धांत खुबीनें दाखविलें आहे). ६. प्रेमाश्रु आणि आशीर्वाद यांचा वर्षाव करणाऱ्या. ७. पितृसेवारूप पुण्याचा पर्वकाल. ८. खांद्यावर असलेली. ९. मातेची मूर्ति. १०. शालिग्रामशिला. (गंडकी नदींतील शिला). ११. हें द्वय. १२. पांच देवतांचें (शिव, विष्णु, सूर्य, गणपति आणि देवी यांचें) आयतन (गृह, समुदाय), त्यास. १३. देव ठेवण्याचें पात्र. १४. बळकट, लठ्ठ. १५. दुसऱ्या वेळीं. १६. जन्म—पंत. १७. भावार्थ—मी तुम्हां सहाजणांना वाहीन आणि ह्या बाकीच्या मुनींना माझे दुसरे सेवक वाहतील.

अथवा त्या देवीतें[1] विंध्य, तसा मीं इला चि वाहेन,
[2]स्वाश्रितरक्षःकृतभवदुद्वहनजसुकृतभाग लाहेन.' ३२
रक्षःस्कंधीं धौम्यप्रमुख ऋषि प्रथम बसविले, पावे
शिवसा सत्संग. न कां गरुडसखें[3] गरळरस विलेपावे[4]? ३३
[5]चक्षुर्विष अहि रक्षी अमृतघटातें, मुखीं न ओतुनि घे
[6]हरितेजें; हें हि तसें; शिवशुकसेवेसि कां न ओतु[7] निघे? ३४
कपिच्या सीता, हरिच्या[8] कीं विंध्यमहाद्रिच्या हि आदिसती[9],
देवी घटोत्कचाच्याच्या स्कंधीं तसि होय त्या जना दिसती. ३५
शोभति घटोत्कचाश्रितरक्षःस्कंधीं चढोनि कुरुवर ते,
जाणों नभीं घनांच्या साक्षाद्रवि चंद्र शुक्र गुरु वरते. ३६
योगारूढ[10] श्रीमुनि लोमश चाले पुढें जसा अर्क[11],
अर्कद्वय अद्भुत हें, हा क्षण खेचरमनीं[12] उठे तर्क. ३७
दावुनि दूरुनि हरगिरि[13] मंदर, नारायणाश्रमीं उतरी,
जेथ सदा संनिहिता[14] गंगा भवसिंधुपारदा[15] सुतरी[16]. ३८
[17]अर्काभ सहस्रच्छद[18] सौगंधिक[19] पद्म मारुतानीत[20]
कृष्णेपुढें चि पडलें, होय जणों तन्मुखाब्जभाभीत[21]. ३९

---

१. विंध्यपर्वतवासिनी व महिषासुरमथिनी दुर्गादेवीतें. २. आपला आश्रित जो राक्षस त्यानें केलेलें जें आपलें उद्वहन (खांद्यावरून घेऊन जाणें) तज्जनित पुण्यांश. ३. [सर्पशत्रु अर्थात् विषनाशक असा] गरुड आहे मित्र ज्याचा त्यानें. ४. अंगाला लावावे. ५. चक्षुर्विषनामक सर्प. ६. विष्णूच्या प्रभावानें. (आदि० अ० ४।४८ पहा). ७. मार्जार–**पंत**. ८. सिंहाच्या. ९. पार्वती, दुर्गादेवी. १०. योगसिद्धि ज्यास झाली तो. ११. सूर्य. १२. आकाशांत संचार करणाऱ्या देवांच्या मनांत. १३. कैलास. १४. जवळ असलेली. १५. भवसमुद्राचा परतीर देणारी. १६. उत्तम नौका. १७. सूर्यसदृश कांतियुक्त. १८. हजार पाकळ्या ज्यास आहेत असें. १९. उत्तम सुवासिक किंवा ‘ सौगंधिक ’ या नांवाचें. २०. वाऱ्यानें आणिलेलें. (वाऱ्यानें उडून आलेलें). २१. द्रौपदीच्या मुखकमलशोभेला भ्यालेलें.

'ऐसीं च मदर्थ तुम्हीं आणा सौगंधिकें' म्हणे पतितें,
भीम निघे, श्रुतिचेंसें[1] मान्य तिचें सांगणें तया अति तें. ४०
एकाकी ही शिरतां तो जेंवि महार्वनीं[2] न भी मकर,
सिंहादिकांसि भासे यमदंडाहुनि उणा न भीमकर. ४१
ज्याच्या रामयशासह सुयशासि सदा सहर्ष नाकें[3] पितो,
कदलीवनांत मार्गीं भीमाला दे स्वदर्शना कपि[4] तो. ४२
रुचिर हि रूप कपित्वें प्रथम चि नयना न गोड वाटे तें,
पांडव सावज्ञ[5] म्हणे, 'जावूं दे, ऊठ, सोड वाटे तें.' ४३
वानर म्हणे, 'न पथ मीं देइन, जावें तुवां न या वाटे.
होईल घात जातां, यास्तव मजला तुझी दया वाटे.' ४४
भीम म्हणे, 'हो[6] कांहीं, पुसतो तुज कोण हात जोडून?
होसील व्यथित[7] वृथा, हो प्लवगा![8] दूर मार्ग सोडून.' ४५
वानर म्हणे, 'उठाया शक्ति नसे मज, जराव्यथावश[9] मीं,
जाणें तरि लंघुनि[10] जा, पथ सोडाया शके न हा दशमी[11].' ४६
भीम म्हणे, 'परमात्मा व्यापक सर्वां घटीं असें जाणें,
मग लंघन करुनि तुझें प्लवगा! माझें घडे कसें जाणें? ४७
नसतें[12] असें, तरि जसा हनुमान् लंघूनि जाय जळधीतें,
जातों या गिरिस हि मीं लंघुनि बहु लाजवूनि खळधीतें[13].' ४८
प्लवग म्हणे, 'गा! साधो! हनुमान् तो कोण सांग? जळधीतें
लंघुनि गेला कां? गा! होय कसी काय लाज खळधीतें?' ४९
भीम म्हणे, 'तो हनुमान् मद्बंधु[14], तुळा[15] न ज्याः न कीशा[16] तें

१. वेदतुल्य असें. २. मोठ्या पाण्यांत. ३. स्वर्ग. (स्वर्गस्थ देव). ४. वानर. (मारुति). ५. धिक्कारपुरःसर. ६. होवो. ७. दुःखित. ८. वानरा! ९. वार्धक्याच्या व्यथेच्या अधीन असा. १०. ओलांडुनि. ११ वृद्ध—**पंत.** शंभर वर्षें आयुर्मानांतील दहावी (अखेरची) अवस्था ज्याची असा. १२. मला हें ईश्वराचें ज्ञान नसतें तर. १३. दुष्टबुद्धीतें. १४. भीम आणि मारुती हे उभयता वायुपुत्र, अर्थात् बंधु होत. १५. तुलना. १६. वानरा—**पंत.**

तेजें[1] श्रुत तुज हीं ज्या जग गातें जेंवि जानकीशातें. ५०
रामवधू शोधाया तो अब्धि उडोनि जाय शतगावें,[2]
जाळी लंका न जिच्या यशापुढें सुरपुरीयश[3] तगावें. ५१
तो एक वीर मारुति मनुज्यांत सुरासुरांत बळकट कीं
मीं भीमः मज पहातां क्षण हि खळांच्या तुरे चि बळ कटकीं.
कथिलें हें कळलें कीं ? रोधूं ये काय सिंधुवाट[4] सरें[5] ?
हो दूर, मर्दिजेतो पथकंटक[6] सुज्ञ सदय वाटसरें.[7]' ५३
चित्तीं हांसोनि म्हणे, 'भीता भय दाखवूं नको, पावें,
मत्पुच्छ दूर सारुनि जा, साधो ! दुर्बळीं न कोपावें.' ५४
दूर झुगारूं पाहे वामकरें[8] धरुनि पुच्छ सावज्ञ,
गरिमगुणें[9] सुरगिरिगुरु[10] होय भवांशभव[11] भीमभावज्ञ.[12] ५५
भीमबळें, विघ्नें रघुपतिपादाब्जस्थ[13] चित्तसें, पुच्छ
तिळ हि न ढळे, गुरुपुढें भावबळ श्रेष्ठ, बाहुबळ तुच्छ. ५६
दोन्हीं हि भागले भुज, वर्षे घनसा चि भीम घामातें.
चित्तांत म्हणे, 'आली कोठुनि? नव्हती च भी मघां मातें.' ५७
जाय शरण होउनियां तो गतमदगद[14] अदभ्रदय[15] कपिला,
ज्याची लीला प्रणताखिलवांछितसिद्धिदा[16] महाकपिला.[17] ५८
जाणावया स्वरूप प्रार्थी मोक्षेच्छुजन वृषाकपितें,[18]

---

१. त्या हनुमानाचा पराक्रम. २. शंभर योजनें. ३. अमरावतीचें यश. ४. समुद्रमार्ग. ५. सरोवराकडून. ६. मार्गांतील कांटा. ७. वाटसरूकडून. ८. डाव्या हातानें. ९. गरिमान्=गुरुत्व; आपल्या अंगीं पाहिजे तितका जडपणा आणण्याच्या गुणानें. १०. मेरुपर्वतासारखा जड. ११. रुद्राच्या अंशापासून जन्म ज्याचा तो. १२. भीमाचा अभिप्राय जाणणारा. १३. रामाच्या चरणकमळीं स्थिरावलेल्या. १४. गेला आहे मदरूप रोग ज्याचा तो भीम. १५. अत्यंत दयाळु. १६. शरणागताचें सर्व इष्ट सिद्धीला नेणारी अशी. १७. कामधेनु. १८. शंकर किंवा विष्णु यांस. ('वृषाकपि' हा शब्द शंकर आणि विष्णु या उभयतांचा वाचक आहे).

भीम तसा त्या हरित्या स्वयशें[1] श्रवणेच्छुजनतृषा कपितें. ५९
भीमासि असें सांगे कीं, " मारुति आंजनेय[2], वीरा ! मीं
आहें रामगुणरसीं[3], पूर्वीं होतों निबद्धधी[4] रामीं. ६०
'यावत् स्वकथा तावज्जीव'[5] असा पावला सुवर दास,
हा 'रामायण' सेवुनि आहे तृप्त स्मरोनि वरदास[6]." ६१
भीम म्हणे, 'ज्या रूपें शतयोजन सिंधु लंघिला गा ! तें
दावावें आजि मला, ज्याला अद्यापि विश्व हें गातें.' ६२
मारुति म्हणे, 'असों दे, अत्युग्र न पाहवेल, भीमा ! तें;'
पार्थ म्हणे, 'पाहों द्या, स्पर्शेल, दया करा, न भी मातें.' ६३
वाढों लागे सहसा कदलीखंडीं[7] नभीं महाकाय[8],
त्यातें पाहुनि पावे काळ हि भय, मग न भीम हा काय? ६४
लोकांत राममहिमा कीं प्रेमा आपला जसा रामीं,
वाढे तसा चि, योजूं दृष्टांता कां परा[9] असारा[10] मीं[11]? ६५
पावे, जेंवि पहातां क्षयरुद्रा[12] रत्नसानु[13], कंपातें,
आटोपाया[14] पान्हासें लागे यत्न सानुकंपा तें. ६६
भीम म्हणे, दादाजी ! केली दुर्योधनें दया वाटे,
हे पाय पाहतों मीं कैसे? जरि लागतों न या वाटे[15].' ६७
देवें[16] म्हणे, 'रे ! वत्सा ! 'हूं' म्हण, जैसें वधूनि अहि[17] तातें

---

१. आपल्या कीर्तीनें. २. अंजनीपुत्र. ३. श्रीरामाच्या गुणरूप रसांत. ४ आसक्त आहे बुद्धि ज्याची असा. ५. जोंपर्यंत पृथ्वीवर रामकथा राहील तोंपर्यंत तूं जीवंत रहा. ६. वर देणाऱ्या रामास. ७. कदलीवनांत. ८. विशाल शरीराचा. ९. अन्य, दुसऱ्या. १०. निःसार, निरर्थक अशा. ११. मोरोपंत कवि. १२. प्रलयकाळच्या शंकराला. १३. रत्नें आहेत शिखरस्थानीं ज्याच्या तो मेरुपर्वत. १४. वत्साला पाहून प्रेमानें फुटलेला पान्हा आवरण्यास जसें मातेला कठिण जातें त्याप्रमाणें तें शरीर आवरण्यास सदय मारुतिरायाला फार कष्ट पडले. (हा दृष्टांत मारुतीचें भीमावरील प्रेम व्यक्त करितो). १५. मार्गाला. १६. मारुति. १७. सर्प.

गरुडें पृथुकासि[1], अभय द्यावें तुज म्यां, मथूनि अहितातें[2].' ६८
भीम म्हणे, 'गजगंडश्रीचा[3] हरिनखरतेज[4] नवरा[4] कीं,
आर्या! बहु तेजस्वी जे होती न खरें[5] ते जन वराकीं[6]. ६९
तूळीं[7] तेजस्विकरानुगृहीत[8] द्युमणिकांतसा[9], आर्या!
हा[10] त्या तुच्छीं मिरवू तेज, प्रभु! तूं न योग्य या कार्या.' ७०
आलिंगूनि म्हणे, 'बा! हो दुःसह तूं नरामरा[11] जा, गा!
शब्दें साह्य करिन मीं, परि चित्तांतून रामराजा गा.' ७१
सांगुनि सौगंधिकवनपुष्करिण[12]च्या सुनीतिच्या हि पथा,
आटोपी मूर्तिप्रति मारुति, हा कवि हि तद्विशालकथा. ७२
सौगंधिकपुष्करिणी कैलासाच्या समीप पाहूनी,
हर्षे पांडव, तीं हीं नेला गुण दाखवूनि बाहूनी. ७३
तद्रक्षक धनदानुग[13] राक्षस धर्मानुज्यासि पाहूनीं,
'तूं कोण?' असें पुसती तत्कृतधर्षण[14] मनीं न साहूनीं. ७४
'सौगंधिकार्थ आलों धर्मनृपतिबंधु भीम मीं आहें,
व्हा दूर, पळा, तोंडें झांका, करितां कशास रे! 'आ' हें?'
राक्षस म्हणति, 'पहातां काय? अरे! या खळा नरा खावें,
क्षणभर हि महदतिक्रम[15] करित्या सुविशृंखळा[16] न राखावें.' ७६
आधीं क्रोधवशांला[17] युद्धीं उत्साह, परम भी[18] मग दे
ऐसें करीं[19], म्हणे श्रीकाळी[20] हि मनांत, 'साधु[21]! भीमगदे[22]!' ७७

१. (आपल्या) मुलास. २. शत्रूतें (दुर्योधनातें). ३. हत्तीच्या गंडस्थळरूपी लक्ष्मीचा. ४. सिंहाच्या नखाचें सामर्थ्य हा च नवरा. ५. कठोर. ६. क्षुद्रावर. ७. कापसावर. ८. सूर्यकिरणानीं ज्यावर [स्पर्शरूपी] अनुग्रह केला अशा. ९. सूर्यकांतमण्यासारखा. १०. हा भीम. ११. मनुष्यास आणि देवास. १२. जीमध्यें सौगंधिकनामक कमलांचें वन आहे अशा सरोवराच्या. १३. कुबेरसेवक. १४. त्या भीमानें केलेला उपमर्द. १५. थोरांची अमर्यादा. १६. उन्मत्त, अत्यंत उच्छृंखल अशाला. १७. क्रोधाधीन झालेल्यांना. १८. भीति. १९. [भीमगदा] करी; [तेव्हां]. २० श्री दुर्गादेवी. २१. शाबास! २२. हे भीमाच्या गदे]!

आधीं हरिसा क्रीडा अरिहरिणचमूंत भीमसेन करी,
मग त्या नलिनींत[1] गमे एक हि जैसा सभीमसेन[2] करी[3]. ७८
जन्हि पावले बहु करुनि भीमासीं आहवा[4] निधन दास[5],
हतशेषमुखें[6] कळतां, न गमे प्रभुभावहानि[7] धनदास. ७९
इकडे धर्म म्हणे, 'हे कथिती उत्पात[8] भावि भी[9] मातें,
नकुळा! सहदेवा! व्हा सिद्ध, करा सावधान[10] भीमातें. ८०
मज तद्दर्शन तैसें वृद्धां पितरांसि जेंवि तोकवचें[11],
वद देवि! दयित कोठें? केला काय स्वकरग[12] तो कवच?' ८१
कृष्णा सांगे, "उडवुनि सौगंधिकपद्म आणिलें वातें,
'व्हावीं असीं,' असें मीं वदल्यें दावूनि त्यांसि देवा! तें. ८२
त्यावरि न देखिले ते[13], दाखविलें म्या कशास अगई! तें?
अतिकठिना हे वाटे हीरांचीं[14] ही नमील अंग[15] इतें[16]." ८३
धर्म म्हणे, 'रक्षील त्वद्व्रत, झालीस घाबरी कां? गे!'
हें वृत्त लोमशाला, तैसें चि घटोत्कचासि, तो[17] सांगे. ८४
हे मुक्तिची विशाला[18] न रुचे आम्हांसि त्याविना शाला,
याच्या नाशा भीतों, भ्यालों न तशा हि त्या[19] विनाशाला. ८५
भीमह्रदाप्रति[20] आम्हां[21] यादां[21] द्यायासि तृप्ति परमा न्या.
मान्या उपकृति, न परा सिद्धि बुधा, जेंवि हरिस[22] न रमान्या[23].
नेला बंधुजवळि नृप, जाणों होता चि तो नसे नेला.
मुनिसिद्धिला न दुष्कर किमपि न त्या यातुधानसेनेला[24]. ८७

---

१. कमलिनींत. २. भयंकर सेनेसहवर्तमान. ३. हत्ती. ४. युद्धा. ५. कुवेर-सेवक. ६. मरून उरलेल्या सेवकांच्या मुखानें. ७. प्रभुत्वाचा नाश. ८. अपशकुन. ९. पुढें उत्पन्न होणारें भय. १०. सावध, जागें. ११. बालभाषण. १२. आपल्या हातीं असलेला. १३. ते भीमसेन. (पति). १४. हिऱ्यांचा. १५. पर्वत. १६. हिला—मला. १७. धर्म. १८. मोठें गृह. १९. त्या द्यूतकृत. २०. भीमरूप डोहाप्रत. २१. आम्हां जलचर प्राण्यांना. २२. विष्णूस. २३. लक्ष्मीहून दुसरी (स्त्री). २४. राक्षससेनेला.

धर्म म्हणे, 'भीमा! हें [१]ईश्वरसखसैन्यहनन अनुचित, रे!
न तरेल [२]महल्लंघनकर्ता, तो एक [३]वायुजनु चि तरे.' ८८

[४]श्रीरामायणकृतिसी ती दिव्या [५]अमृतरसवती नलिनी
बहु दिवस सेविली, हो! त्या [६]धर्मप्रमुखसर्वसाध्वलिनीं. ८९

धर्म म्हणे, 'भीमा! म्या राज्यश्री स्पष्ट [७]लेखिली अ-सती,
[८]निर्वती बहु दृष्टि सख्या! [९]अलका जरि काय देखिली असती.'

तों गगनीं वात वदे, 'धर्मा! येथूनि [१०]वर्त्म जें [११]पर तें
न नरोचित, मर्यादा न विलंघीं, चित्त आवरीं, परतें. ९१

जा [१२]आर्ष्टिषेणमुनिच्या स्थानीं तूं गंधमादनीं आधीं,
तेथूनि [१३]धनदफाल्गुनदर्शनसुखकार्यसिद्धीला साधीं.' ९२

परतोनि धर्म आला त्या [१४]श्रीनारायणाश्रमीं राहे,
तेथें हि विघ्न बाधे, सादर गावें असें चि तें आहे. ९३

आश्रय करूनि होता दुष्ट [१५]जटासुर धरूनि [१६]ऋषितेतें,
जाणे न धर्मराजा, न घटोत्कच ही, न अन्य ऋषि ते तें. ९४

भीमघटोत्कच नसतां कृष्णासहदेवनकुळधर्मातें
पळवी, करी [१७]दशमुखाद्यखिलकपटिमत्यशक्यकर्मातें. ९५

त्यासि म्हणे धर्म, 'पळ, [१८]प्रेक्षकें मार्गीं न भीम हो तूतें.

---

१. शिवमित्र कुबेराच्या सैन्याचा नाश करणें. २. थोरांचा अपमान करणारा. ३. हनुमान्—**पंत.** ४. श्रीरामायणकाव्यासारखी. ५. अमृतरसयुक्त. ६. धर्मप्रमुख सर्व साधुरूप भ्रमरानीं. ७. मानिली. ८. शांत होती, तृप्त होती. ९. कुबेराची नगरी. (मला कुबेरनगरी पाहण्याची फार उत्कंठा आहे असा धर्माच्या बोलण्याचा आशय). १०. मार्ग. ११. अन्य, पुढचें. १२. या ऋषीचा आश्रम बदरिकाश्रमाजवळ आहे. १३. कुबेर आणि अर्जुन यांच्या भेटीचा आनंद हीं च कार्यसिद्धि, तिला. १४. बदरिकाश्रमीं. १५. अलंबुष राक्षसाचा पिता. १६. मुनिवेषातें. १७. रावणादि सर्व कपटी जनांच्या बुद्धीला अशक्य अशा कर्मातें. १८. पाहणारा.

तो वांचेल कसा रे! जो खळमूषक[1] न भी महोतूतें[2]?' ९६
भीमाच्या, मन ठेवी धर्म, जसें विष्णुच्या इभें[3] स्मरणीं.
प्राणव्यसनीं[4] पावे, दे अभय, खळा करूनि भस्म रणीं. ९७
वायूक्तपथें गेला त्या चि मुनिवराश्रमासि मग धर्म;
दे आर्ष्टिषेण आश्रय, तेथें निःसीम पावला शर्म. ९८
तेथें हि भीम कृष्णावचनें त्या गिरिशिरीं बळें चढला,
मथिलें धनदबळ रणीं कळतां कोपें कुबेर बहु कढला. ९९
जाय पुन्हां त्र्यंबकसख[5]भटमथनें करुनि आव रायांचा[6];
योजी सामोपाय[7] द्रुत[8] जाउनि त्यासि[9] आवरायाचा. १००
इतुक्यांत श्रीदें[10] हि ये, फार निवे देखतां चि चवघांस.
दृष्टिसि संत चि देती अमृताचे न रसनेसि चव घांस. १०१
नमिला पांडुसुतांनीं, झाला श्रीद प्रसन्न सुजनकसा.
सदयप्रभुप्रसादा पात्र न होईल नम्र सुजन कसा? १०२
धर्मासि म्हणे, 'साधो! संकोच नको धरूं मनीं कांहीं,
फळ भोगिलें महामुनिशापाचें[11] आमुच्या अनीकांहीं[12]. १०३
भीमा! अगस्त्यमुनिवर मत्सख मणिमान् महामदें[13] थुकला,
मुकला स्वजीवना तो, संसर्गी पर हि जन, जरि न चुकला.
आलां स्वपितृगृहाला, स्वस्थ रहा, जन्म धन्य लेखाल[14],
येथें चि अर्जुनाला तज्जनका जिष्णुला[15] हि देखाल. १०५
धर्मा! भजेल पुनरपि तुज चि हृदयवल्लभा विशंक रसा[16].'
ऐसें वदोनि गेला जो जाणे भूतभावि शंकरसा. १०६
[17]स्वसदारबंधुलोचनचिरतृषितचकोरपारणा व्हाया

---

१. दुष्ट उंदीर. २. महामार्जार—**पंत**. ३. गजेंद्र. ४. प्राणावरच्या संकटांत. ५. कुबेर—**पंत**. ६. धर्माचा—**पंत**. ७. शत्रूला सांत्वनानें वश करण्याचा मार्ग. ८. लवकर. ९. भीमासि—**पंत**. १०. कुबेर. ११. महामुनि अगस्त्यांच्या शापाचें. १२. सैन्यानीं. १३. अत्यंत उन्मत्तपणानें. १४. मानाल. १५. इन्द्राला. १६. पृथ्वी. १७. आपली स्त्री आणि बंधु यांच्या नेत्ररूप तृषित चकोरास पारणा. (पारणा=उपोषणांतींचें भोजन).

प्रकटे नरचंद्र[1], म्हणाति मुनि अरिधैर्याब्जवारणाव्हा[2] या. १०७
त्यां तद्दर्शनलाभें सुख, तें अधना न रत्ननिधिलाभें.
सद्दर्शनलाभाला न खळाचें, फार रत्ननिधिला भें[3]. १०८
शक्र हि दर्शन देवुनि धर्मनृपाला म्हणे, 'अगा! साधो!
स्थैर्यें श्री कीर्ति तुज, न तसि सुरमणिसंश्रया[4] अगा[5] साधो[6].
स्वरतासि[7] तामसी[8] धृति दे, तसि च निकाम[9] राजसी[10], ताप;
जो सात्विकीप[11] विजयी तो साक्षाद्रामराज सीताप[12]. ११०
आलापा सिकवितसे तोष, इतर[13] साधुचा विलापा, हें
जाणुनि दिव्यास्त्रकर[14] त्वद्दासा अर्जुना दिला पाहें.' १११
करुनि समाधान असें हरि जाय, तयावरि स्व-भावातें
धर्म पुसे, वृत्त कथीं तो सकळ हि त्या शुचिस्वभावातें. ११२
सांगे स्वतप, किरातप्रभुदर्शन[15], खळवराहवधयुद्ध[16],
भगवत्प्रसाद[17], सद्वर, पाशुपतास्त्रादिलाभ जो शुद्ध. ११३
लोकपदत्तास्त्रकथा[18] सांगुनि त्यांचीं[19] विशुद्धतुरग[20] मनें
गीतें हरिणकुळें[21] सीं मोही कथितें[22] महेंद्रपुरगमनें[23]. ११४
स्वमुखें अर्जुन कथितां हरिदत्तार्घासनादि[24] बहुमान
खालीं घाली केवळ न परांची, आपुली हि बहु मान. ११५

---

१. अर्जुनरूप चंद्र. २. शत्रूंच्या धैर्यरूप कमलांस गजासारखें नांव ज्याचें अशा. ३. भय. ४. देव आणि रत्नें यांच्या आश्रयभूत अशा. ५. मेरुपर्वताला. ६. प्राप्त होवो. ७. आत्मनिष्ठ पुरुषाला. ८. तमोगुणजनित, अज्ञानमूलक. ९. अत्यंत. १०. रजोगुणोत्पन्न. ११. सात्विकीधृतिसंपन्न. १२. सीतापति. १३. तोषाहून इतर=असंतोष, क्रोध. १४. दिव्यास्त्ररूप हात. १५. किरातरूपधारी शंकराचें दर्शन. १६. वराहरूपधारी मूकनामक दैत्याच्या वधानिमित्त झालेलें युद्ध. १७. शंकराचा प्रसाद. १८. अष्टलोकपालानीं दिलेल्या अस्त्रांची कथा. १९. धर्मादिकांचीं. २०. अर्जुन-**पंत**. २१. हरिणांचा समुदाय. २२. सांगितलेल्या. २३. अमरावतीप्रत गमनानें. (तत्संबंधीं वृत्तानें). २४. इंद्रानें दिलेला अर्घासन इत्यादि थोर मान.

[1]वरदर्पित कोटित्रय सुररिपु वधिले [2]निवातकवच रणीं,
पार्थ म्हणे ‘त्या विजयीं न मन परममुदित, आजि तव चरणीं.
[3]पौलोम [3]कालकेय [4]स्वरहित [5]कामगहिरण्यपुरवासी
वधिले पाशुपतास्त्रें, भ्यालों तद्दारशोक[6]कुरवासी. ११७
म्यां या विजयें न मनीं, [7]त्वदहितविजयें चि फार [8]हरिखावें,
[9]स्वागस्करगजमौक्तिक, कीं भलत्याचें म्हणेल [10]हरि खावें ? ११८
त्वद्विरहें शक्रार्धासनग हि नव्हता चि हा बरा नाकीं,
वाटे क्षणक्षण असें कीं, चिंतुनि ताप [11]घाबरानां कीं ? ११९
म्हणवित होते स्वर्गीं हीं पांच हि ‘हाय !’ [12]वत्सरें मला हो !
सुरभीचा [13]तत्स्तन्येतरसुरसीं काय वत्स रमला हो !?’ १२०
धर्म म्हणे, “बा वत्सा ! झालों कृतकृत्य; साधिली [14]महि म्या;
मीं [15]श्रीचतुर्भुजाच्या [16]विजयिचतुर्बंधु पावलों महिम्या. १२१
‘[17]गुरुदत्ता ही सिद्धिद्वारीं त्या प्रभुविना किली लाजे,’
ऐसें ते साधु म्हणति, जाणति वरदा [18]पिनाकिलीला जे. १२२
[19]या नेत्रानीं कीं ती श्रीमूर्ति विलोकिली, अहो भाग्यम् !

---

१. [ब्रह्मदेवाच्या] वरानें उन्मत्त झालेले. २. प्र्‍हादबंधु सं्‍हाद याचे पुत्र. ३. पुलोमा आणि कालका अशा दोन दैत्यकन्यकांचे पुत्र. ४. स्वर्गाचे (देवांचे) शत्रु. ५. इच्छागामी अशा सुवर्णपुरांत राहणारे. ६. कुशब्द–**पंत**. त्या दानवस्त्रियांच्या शोकरूप कुत्सित शब्दांस. ७. तुझ्या शत्रूच्या पराभवानें मिळालेल्या विजयानें. ८. आनंदावें. ९. आपल्या अपराधी हत्तीच्या [गंडस्थलांतील] मोत्यें. १०. सिंह. ११. घाबरत नाहींना? १२. वर्षें. १३. त्या कामधेनूच्या दुधाहून इतर सुरसीं. १४. पृथ्वी. १५. श्रीविष्णूच्या. १६. पराक्रमी चार बंधु आहेत ज्याचे तो. १७. गुरूनें दिलेली हि किल्ली. [गुरूनें सांगितलेली हि लाभाची किल्ली (युक्ति) प्रभुप्रसादाशिवाय सिद्धिदायक होत नाहीं असा भाव]. १८. शंकराच्या लीला. १९. अर्थ–ती श्रीशंकराची मूर्ति या नेत्रानीं पाहिली ना? अहाहा! काय हें भाग्य! अरे! चार हि वेद ज्याला महातेजस्वी असें म्हणतात त्या श्रीशंकराला द्वंद्वयुद्धामध्यें [अर्जुनानें] स्पर्श केला!

स्पृष्टः स बत नियुद्धे ब्रुवते श्रुतयो महन्महोभाग्यम्. १२३
काळाधीन शतक्रतु, शिवसेवक सत्य[1] पांडवा ! सवते[2];
किति शक्रार्धासन तें? सतत अमितसत्य[3]पांडवासव ते. १२४
जे लांब रुंद मायामय[4]देह सुरारि लाख वावें गा !
तन्नाश[5]काास्त्रकौतुक मजला त्वां आजि दाखवावें गा !" १२५
अर्जुन करी उपक्रम, तों पावे रत्नसानु[6] कंपातें;
वारिति सुरवर त्यातें त्रस्ताखिलसत्वसानुकंपातें[7]. १२६
तेथुनि धर्म फिरे, कीं, बंधुकथित हित अमान्य न करावें,
वनवासीं दश गेलीं, तें त्या बारांत वर्ष अकरावें. १२७

अध्याय सहावा.

गेल्या पथें चि होउनि रक्षःस्कंधाधिरूढ[8] ते आले,
हिमगिरिवरप्रदेशीं वसतां यामुननगीं[9] सुखी झाले. १
तेथें भीमासि धरी बळवान् नगकुहरगत[10] महाजगर[11];
भयविकळ तद्वपु गमे, दवदहनें जेंवि वेष्टिलें नगर. २
भीम तयासि पुसे, 'तूं कोण बळी? करिसि काय हा कबळ?
मद्गति हे, अन्याचें येथें मारील काय हाक बळ?' ३

---

१. शाश्वत, सनातन. २. अन्य, स्वतंत्र. ३. अमितब्रह्मांडाधिपति—**पंत.** ४. मायामय आहे देह ज्यांचा असे. ५. त्या राक्षसांचा नाश करणाऱ्या अस्त्रांचा चमत्कार. ६. मेरु. ७. त्रस्त झालेल्या सर्व प्राण्यांविषयीं दयायुक्त अशा (अर्जुनानें). ८. राक्षसांच्या खांद्यावर बसलेले. ९. यमुनानदीचा उगम ज्यांतून झाला त्या पर्वतावर. १०. पर्वताच्या बिळांत गेलेला. ११. मोठा अजगर (सर्प).

सर्प म्हणे, "भीमा ! म्यां बहुधा स्वयशें सलज्ज शिबि[1] केला;
परि वाहविता झालों विप्राकरवीं बळें स्वशिबिकेला[2]. ४
गमलें मज उद्धतपण सुखद, जरि विषापरीस अहिमें[3] हि तें.
आलों अगस्त्यमुनिच्या शापें[4] होवूनि उग्र अहि, महितें. ५
भीमा ! त्वत्पूर्वज मीं झालों होतों महेंद्र[5], परि मोटे
मारक न पर[6], अनुभवें जाणे हा नहुष, बहु षडरि[7] खोटे. ६
म्यां पोसावा खावुनि सुगुण सुरसमान लेंकरूं[8] काय[9],
बापा ! कर्म असें हें दैवाला मानलें करूं काय ? ७
'त्वत्प्रश्नाचें उत्तर देता ज्ञाता करील तुज मुक्त,'
हें त्या श्रीमन्मुनिचें म्यां जतन मनांत ठेविलें उक्त." ८
भीम म्हणे, 'बा सर्पा ! लेश हि नाहीं च मृत्युभी मातें.
बंधु मरतील बहुधा झाला ऐकोनि मृत्यु भीमातें. ९
शोकें मरेल माता, मरतां न करूनि भीम भीमरण[10],
दे वीरसूसि[11] अपयश पुत्राचें तसि न भीम भी मरण.' १०
पाहुनि उत्पात पुसे आधीं भीमासि, धर्म तो भ्याला,
याची च त्यासि चिंता, जेंवि धनाची च फार लोभ्याला. ११
कृष्णा म्हणे, 'किती मीं ? बहु रमवितसे तयां अरण्यांनी[12];
म्यां सांभाळावें किति ? सांभाळावें तुम्हीं शरण्यांनीं[13].' १२
'वत्सा धनंजया ! त्वां पांचाळी आत्मकीर्ति लक्षावी,
दक्षा वीरवरा ! हे माझ्या आज्ञेपरीस रक्षावी.' १३

---

१. शिबि हा सोमवंशीय राजा; यानें विप्रवेषधारी ब्रह्मदेवास त्याच्या इच्छे-प्रमाणें आपल्या पुत्राचें मांस देण्याची सिद्धता करून व एकदा पक्षिरूपधारी इंद्र व अग्नि यांना स्वतःचें मांस देऊन आपलें निरुपम औदार्य प्रकट केलें आहे. २. आपल्या पालखीला. ३. उष्ण. (तापकर असें). ४. मागें अध्याय ४।२४० वरील टीप पहा. ५. इंद्रश्रेष्ठ. ६. शत्रु. ७. कामक्रोधादि षड्रिपु. ८. [तुझ्यासारखें] लेंकरूं. ९. देह. १०. भयंकर युद्ध. ११. वीरास प्रसवणारीला, वीरमातेला. १२. मोठें अरण्य. १३. दीनांचें रक्षण करण्यास समर्थ जे त्यानीं.

धर्म ऋषींस म्हणे, 'श्रितरक्षण आंगें कराल, करवाल,
तुमचा आशीर्वाद प्रत्यूहांतक[1] कराल[2] करवाल[3]. १४
यम हे माझे डोळे, जपतों यां तेंवि यां न डोळ्यांतें;
त्यजुनि विमानें ज्ञाता वरुनि करिल केंवि यान[4] डोळ्यांतें[5]? १५
या डोळ्यांचें रक्षण तुमच्या व्रत होय पादपात्यांचें[6].
जे श्रित, असे चि करणें इष्ट सकळ देवपादपा[7], त्यांचें.' १६
जावुनि सधौम्य धर्में द्रुत[8] अहिकुहरासमीप[9] मागानें[10],
भीम निरखिला, जैसा नंदें[11] धरिला स्वसूनु नागानें[12]. १७
धर्म म्हणे, 'रे वत्सा! केला कुरुवंशघात सापानें,
त्वद्व्यसनदर्शनें बहु ताप, न विषवह्निच्या तसा पानें. १८
विपरीत चि हें, गिळिला नागानें गरुड कीं, अगा धात्या!
यां[13] शोषाया केला हा, जैसा घटजकर[14] अगाधा त्यां[15].' १९
भीम म्हणे, "आर्या! हा म्हणतो 'मीं नहुष,' बळ नवल याचें,
दुर्मोच्य काळपाशासम याच्या होय वेळन[16] वलयाचें[16]." २०
धर्म म्हणे, 'मत्पूर्वज नहुष तुम्हीं काय? जी! वदा नातें;
घ्या मजपासुनि दुसरें भोजन, द्या यासि जीवदानातें.' २१
सर्प म्हणे, 'उगळावा[17] स्वनियतिनें[18] भरविला न सुग्रास,
खाइन उद्यां तुज हि, जा, बहु विनवावें तुवां न उग्रास. २२
मत्प्रश्नांचें उत्तर देसिल तरि मात्र यासि सोडीन,
मी शाप मुक्त होउनि, तुज निजकुळजासि हात जोडीन.' २३
राजा म्हणे, 'पुसा, मीं जोडितसें हात हे तुम्हां, तारा,

---

१. विघ्नः—**पंत** विघ्नांतक २. भयंकर. ३. खड्ग. ४. गमन—**पंत.** ५. डोळींना. ६. चरणरूप नेत्रपटलांचें. (तुमच्या चरणकृपेनें या नकुलसहदेवांचें रक्षण झालें पाहिजे, असा भावार्थ). ७. कल्पवृक्षाला. ८. लौकर. ९. सर्पाच्या बिळाजवळ. १०. शोध काढीत. ११. कृष्णपित्यानें. १२. कालिय सर्पानें. १३. भीमाला. १४. अगस्त्यमुनींचा हात. १५. सागरास—**पंत.** १६. कड्याचें वेष्टन, वेढा. १७. ओकून टाकावा. १८. आपल्या दैवानें.

कोण्हा हि कुळांत नसो निजबाळकघातहेतु म्हातारा.' २४
सर्प म्हणे, 'ब्राह्मण तो कोण? कसा? वेद्य[1] काय? वद, राया!
मिळतां साधूक्तामृतफळ मीं सेवूं कशास बदरा या?' २५
धर्म म्हणे, 'कथितों चि, स्ववचाला जरि हि तूं न जपसील,
तो चि ब्राह्मण, जेथें क्षांति दया दान सत्य तप[2] शील. २६
वेद्य तरि परब्रह्म चि, न स्पर्शे जेथ मृतिजनन[3]शोचि,
ज्यातें पावोनि पुन्हा संवर्तशतीं[4] हि कृतिजन[5] न शोची.' २७
एवंविध अन्योन्यप्रश्नोत्तर होय अमृतवर्ष[6] तसें,
'सच्छ्रोतृवक्तृसंगमसम[7]' घन न म्हणेल 'अमृत वर्षतसें.' २८
सद्भाषणें चि पावे शापापासूनि नहुष सुटकेला.
साधु चि अमृतकर,[8] सदा यास चि कविनीं स्वपाणिपुट[9] केला.
ठेवी यशोर्थ कंठीं, उरवी लोकीं न, जेंवि अँज[10] गरता,[11]
सत्संग जय[12]ग्रंथीं दावी, नहुषीं न तेंवि अजगरता. ३०
नहुष जसा स्वर्गाला गेला पावोनियां स्वभावाला;[13]
धर्म हि निजाश्रमाला पावोनि तसा चि त्या स्व-भावाला. ३१
ऋषि म्हणती, 'बा भीमा! ऐसें साहस नको करूं, दे हें.
तुजवीण आमुचीं हीं निर्जीवेंसीं च भासती देहें.' ३२
तेथूनि काम्यकीं जों आला तो समुनिजन अजातारी,[14]

---

१. जाणण्यास योग्य. २. स्वधर्माचरण. ३. मरण व जन्म ही च अग्निज्वाला. ४. प्रलयशतीं. ५. पुण्यवान् मनुष्य. ६. अमृताची वृष्टि. ७. उत्तम श्रोता व वक्ता यांच्या संयोगासारखें उत्तम अमृत (उदक) मी वर्षतसें असें घन (मेघ) ही न म्हणेल. ८. चंद्र. ९. हस्तांजली. १०. शिव–**पंत**. ११. विषत्व. १२. भारत–**पंत.** अन्वयार्थ–सत्संग (धर्माचा समागम) जयग्रंथीं [मात्र] अजगरता (नहुष अजगर झाल्याची कथा) दावी; तेंवि नहुषीं न [दावी]; (पूर्वीं नहुष हा अजगर झाला होता असें अनुमान हि करितां येणार नाहीं अशा रीतीनें नहुषाचा अजगरपणा गेला). १३. स्वरूपाला. १४. अजातशत्रु. (धर्मराज).

तों प्रभु भेटाया ये, पडतां मोहांत जो अजा[1] तारी. ३३
पांडव म्हणेन चातक; परि, घन हरि, वीज सत्यभामा ती
न म्हणेन, त्यांपुढें घनशंपांची[2] होय सत्य भा[3] माती. ३४
अंकें[4] जैसीं शून्यें सद्यःकार्यक्षमें[5], न तीं अन्यें.
केलीं पांडवदेहें त्या आद्यें[6] सगुणविग्रहें[7] धन्यें. ३५
ब्रह्मादि साधु योगी ज्याच्या पद्भक्तिच्या पथीं शिरतो,
धर्माच्या, भीमाच्या ठेवी पायांवरि स्वयें शिर तो[8]. ३६
आलिंगिला प्रभूच्या भुजभुजगानीं[9] किरीटिपाटीर[10],
बहु कांपविता झाला जाणों त्याचा वियोग हा टीरें[11]. ३७
ऐसे धन्य पृथेचे मात्र न, सुत[12] वंदिते हि माद्रीचे
गंगाधरप्रियसख हि झाले, केवळ न ते हिमाद्रीचे. ३८
गंगाह्रदें[13] करावें मरणोत्तर सुरसमानवपु न्हाते[14]
जे हरिनतिरसमुदित[15] न म्हणति सुधा सुरस मानव पुन्हा ते.
भामा कृष्णा, गंगायमुनाश्या भेटल्या अनादिसत्या[16],
साक्षाल्लक्ष्मी गौरी ऐश्या झाल्या चि त्या जना दिसत्या. ४०
कुशळप्रश्नें निवबुनि देव म्हणे, "हा चि धन्य वासर[17], हो !
सद्दर्शन सुसर[18], न पर, मानस वा, थोर अन्य वा सर हो. ४१

---

१. ब्रह्मदेवाला. (पूर्वीं एकदां ब्रह्मदेवानें कृष्णाचें सामर्थ्य पाहण्यासाठीं त्याच्या गाईचीं वासरें वगैरे चोरून नेलीं; पुढें एक वर्षपर्यंत कृष्णानें आपले व्यवहार अगदी यथापूर्व चालविले, यावरून ब्रह्मदेवाचा त्याच्या सामर्थ्याविषयींचा मोह दूर झाला अशी कथा आहे). २. मेघ आणि वीज यांची. ३. कांति. ४. एक, दोन इत्यादि अंकांच्या योगें. ५. तत्क्षणीं च कार्य करण्यास समर्थ अशीं. ६. आदिपुरुषानें. ७. गुणविशिष्ट शरीर धारण करणाऱ्या (कृष्णानें). ८. कृष्ण. ९. बाहुरूप सर्पांनीं. १०. अर्जुनरूप चंदन. ११. कुला. १२. वंदन करणारे. १३. गंगेच्या डोहानें. १४. स्नान करणारे. १५. हरिनमनरूप रसानें आनंदित असे. १६. द्रौपदी व सत्यभामा ह्या आदिमाया. १७. दिवस. १८. उत्तम सरोवर.

अंतर्बाह्य निवालों तुमचीं अवलोकितां चि पंच मुखें,
वाटे मनासि दर्शन दिधलें मज काम्यकांत पंचमुखें[1]. ४२
प्रथम चि तुझी तुळा शतजन्में[2] हि सुदुर्लभा परा सुकृतें[2];
संप्रति तव कर्में परकर्में जीवत्कृतें परासुकृतें. ४३
फिरलासि उद्धराया तीर्थांतें, तूं न मज्जन[3] कराया;
सच्चरण म्हणति 'आधीं पुण्यर्द्धी[4] हो! नमज्जनकरा[5] या.' ४४
आतां पुण्यश्लोका! काय तुजपुढें टिकेल खळबळ तें?
त्वद्भुज[6]घटजस्मरणें अरिसिंध्वंतर[7] उदंड खळबळतें[8]. ४५
खद्योतें[9] व्योमपथीं[10] भानुपुढें[11] काय देखिले टिकले[12]?
त्रिनयनभालेंदुपुढें[13] सरतिल[14] सित[15] रक्त[16] रेखिले टिकले[17]? ४६
नगरी मज शंभूची इषुधि[18] गमे, जींत सिद्ध यादव ती;
सिंधूच्या पुरतील न वृष्ण्युत्साहा[19] लिहावया दवती. ४७
संपत्ति शक्ति विद्या सत्साहित्यें चि होय अनपार्था[20]
यास्तव वृष्णि बहूत्सुक, जोडूं दे भव्य कीर्तिधन पार्था." ४८
धर्म म्हणे, 'श्रीकृष्णा! भुललों सेवूनि बोल कानाहीं,
बा! तुज वेद हि लाजे, ज्यासम कोठें चि बोलका नाहीं. ४९

---

१. शंकरानें. २. अर्थ—शतजन्मांतील पुण्याईनें हि दुसऱ्यांना तुझी साम्यता मिळणें प्रथम च अशक्य होतें; संप्रति (आतां तर) तव कर्में जीवत्कृतें [आणि] परकर्में परासुकृतें=तीर्थयात्रादि प्राप्तपुण्यानें तुमचीं कर्में जीवंत केलीं आहेत आणि शत्रुकर्में परासु (मृतप्राय) केलीं आहेत. ३. स्नान. ४. अहो पुण्याचे निधींनो! ५. [आम्हांला] नमन करणाऱ्या जनांच्या हातीं. ६. तुझ्या भुजरूप अगस्तिऋषीच्या स्मरणें. ७. शत्रुरूप समुद्राचें हृदय. ८. क्षुब्ध होतें. ९. काजवे. १०. आकाशमार्गीं. ११. सूर्यापुढें. १२. स्थिर राहिले. १३. त्रिनेत्र शंकराच्या मस्तकावरील चंद्रापुढें. १४. सरसावतील काय? १५. शुभ्र. १६. तांबडे. १७. टिळे. १८. भाता. १९. यादवांच्या उत्साहाला. २०. सफळ.

स्तुति न दिल्या त्वां [१]आशीराशी, श्रितसर्वलोककल्पतरो !
प्रभुजी ! तुझ्या प्रसादें व्यसनीं हा दास [२]तोककल्प तरो.’ ५०
कृष्णेला कृष्ण म्हणे, ‘सखि बरि आहेसि कीं, असें नातें
‘पुस’ ‘न पुस हि’ मज म्हणतें, काय करूं ? क्षण उगें असेना [३]तें.
मूर्त [४]बहिश्चर [५]असुसे प्रतिविंध्यादि त्वदीय सुत सा जे
त्यांहीं, देवि ! सुभद्रागृह [६]षण्मुखमातृसदनसम साजे. ५२
[७]प्रद्युम्नें शस्त्रास्त्रीं पटु केले, शिकति नित्य त्याजवळ,
आवडलें हें चि तयां बहु, तैसें देवि ! तें न [८]आजवळ.’ ५३
सांत्वन कृष्ण करी, तों ये मार्कंडेय मुनि पहायास,
तितुक्यांत नारद हि ये, ज्याच्या स्मरणें सरे महायास. ५४
तो ब्राह्मणमाहात्म्य क्षत्रियमाहात्म्य त्यांसि आयकवी,
वर्णी पतिव्रतेचें माहात्म्य हि सर्वयोगिराय कवी. ५५
[९]धर्मव्याधस्कंदप्रभवादिकथा उदंड तो बोले;
श्रवणें धर्म ब्राह्मणगण नारद [१०]देवदेवें ही डोले. ५६
[११]सत्या कृष्णेसि म्हणे, ‘वदत्यें तें तूं खरें च मान सये !
लोक म्हणोत, परि पळ हि माझ्या हातीं न [१२]कांतमानस ये. ५७
त्वां हे पांच पति कसे वश केले ? भजति सर्व एकांतें ?
थोडें याहुनि पाहुनि [१३]नटती [१४]कादंबिनीस [१५]केकी तें. ५८

१. आशीर्वादांच्या राशि. २. बालसदृश. ३. तुझें माझें जें बहिणभावाचें नातें आहे तें. (प्रसंगीं आपल्या हातून द्रौपदीला जें साहाय्य व्हावयास पाहिजे होतें तें झालें नाहीं, असें वाटल्यामुळें कृष्णाची ही संकोचोक्ति आहे). ४. [देहा]-बाहेर संचार करणाऱ्या. ५. प्राणासारखे. ६. कार्तिकस्वामीच्या आईच्या (पार्वतीच्या) गृहासारखें. ७. कृष्णपुत्रानें. ८. आजोबाचें (द्रुपदाचें) घर. ९. धर्मनामक खाटीक व कार्तिकस्वामी यांच्या उत्पत्तीच्या कथा. १०. देवाधिदेव (कृष्ण). ११. सत्यभामा=सत्या, भीमसेन=भीम असा नामैकदेशानें व्यवहार करण्याचा प्रघात आहे. १२. पतिचित्त. १३. नाचतात. ‘नट्=नाचणें’ या धातूपासून संस्कृत पद्धतीवर केलेला हा प्रयोग आहे. १४. मेघमाला–**पंत.** १५. मयूर–**पंत.**

सांग वशीकरण कसें केलें? त्वां देवि! कोणत्या मंत्रें?
कीं दिव्यौषधिमूळें किंवा वात्स्यायनोदितें[1] यंत्रें?' ५९
कृष्णा हांसोनि म्हणे, 'भामे! मोहावयासि पतिला जे
मंत्राद्युपाय करणें या श्रवणें बहु मदीयमति लाजे. ६०
प्रेमें पतिचरणासि न देवुनि दे हात तायिताला[2] जे
ते स्त्री न रुचे पतिला, कीं, तीतें आततायिता[3] लाजे. ६१
पतिपरमेश्वरचरणा जी तत्सेवार्थ न नवशी[4] करणें,
ती मुग्धा कैसी गे! वळवील स्वाभिमन वशीकरणें? ६२
जाणें वशीकरण हें करित्यें जेणें कधीं न कोपति तें.
सखि! तूं हि असें चि करीं, मद मत्सर दाखवूं नको पतितें.
पतिचे प्रसाद देती ज्या सद्गतितें न योग[6] सर्व तीतें;
वाहे पहा शिरीं शिवदेहार्धगता[7] शिवा[8] स्वसवतीतें.[9]' ६४
श्रुतिला[10] कविधीसी ती मानवली फार शुद्ध वदलीला,
न पतींस चि कर्णांस[11] हि सत्य सती होति उद्धवदलीला.[12] ६५
जें सासुरां मुली पितृगमनिं करिति ते हि कानन[13]ौके[14]तें,
कवळिति जवळि तिमिंगिळ[15] दिसतां भटवर[16] हि कां न नौकेतें?
देव म्हणे, "जरि होते वनवासें कृश मदीय असु, खमतें,[17]
असुख मतें माझ्या हें, जें दृक्प्रिय[18] मुख, नसो चि असुषम[19] तें.

---

१. वात्स्यायनऋषीनें सांगितलेल्या. (हा ऋषि 'कामसूत्र' ह्या ग्रंथाचा कर्ता होय). २. पतिवशीकरणार्थ पंचाक्षऱ्याकडून भारून आणलेल्या ताइताला. ३. घातकीपणा. ४. 'नवस' या नामाचें 'नवस करून अर्पण करणें' अशा अर्थी 'नवसणें' हें क्रियापद केलें आहे. ५. [आपलीं] इंद्रियें. ६. यज्ञ. ७. महादेवाची अर्धांगी. ८. पार्वती. ९. आपली सवत जी गंगा तीतें. १०. परिशिष्ट पहा. ११. श्रवण—**पंत.** १२. उत्सव—**पंत.** आनंदप्रद लीला ज्यांच्या अशा. १३. वनवासी पांडव—**पंत.** १४. रोदन. १५. तिमिनामकमाशांना गिळणारा एक मोठा मासा. १६. मोठे योद्धे. १७. सोसतें. १८. दृष्टीला आवडणारें, प्रेक्षणीय. १९. शोभाहीन.

कृष्णे ! करिल चि म्हणसिल जरि ‘या भूमंडळा नभा [1]उखळ,’
तुजकरितां सखि! अखिल हि असु [2]वसु वेचील हा, न भाउ खळ.
सखि ! सोसिजेल लंघुनि काय [3]खगोत्तमगरुद्वा टोळें ?
कां [4]दृगुपद्रवदमशकततिचें न करील रुद्र वाटोळें ?” ६९
करूनि समाधान असें, गेला तीचा निरोप घेऊन.
[5]श्रितताप हरि हरि, न पर, तापहर हि [6]आतपत्र घे ऊन. ७०

अध्याय सातवा.

पांडववृत्तश्रवणें धृतराष्ट्र उदंड काळजी वाहे,
कीं, दुखविले भुजगसे निश्चित होतील काळ जीवा हे. १
सशकुनि कर्ण म्हणे, ‘[7]कुरुराया ! संप्रति [8]धनेश तुज लाजे,
झाले [9]भणग, मदानें हांसत होते सभेंत तुजला जे. २
[10]स्वश्री दावुनि द्याया दायादां दुःख, कानना चाला,
लाजतिल [11]वाक्‌शिखीच्या [12]हृतपक्षमयूर कां न नाचाला?’ ३
राजा म्हणे, “म्हणेल चि पांडववत्सळ [13]सबंधु [14]जनक ‘नका.’
आम्हां, प्राणांसि, न बहु जपतो तो अंध, [15]बंधुजनकनका.” ४
कर्ण म्हणे, ‘हूं, हें किति? [16]घोष-परामर्श-मिष पुढें कर, गा !
मज [17]मंत्रदासि, देवुनि [18]पीतजयसुधेकरूनि ढेंकर, [19]गा.’ ५

---

१. उखळून टाक. २. द्रव्य. ३. गरुडाचा (च्या) पक्षशब्दास—**पंत.** ४. दृष्टींला उपद्रव देणाऱ्या मक्षिकांच्या पंक्तीचें (समुदायाचें). ५. आश्रितांचें दुःख. ६. छत्र. ७. दुर्योधना ! ८. कुबेर. ९. भिकारी. १०. आपली राज्यलक्ष्मी. ११. सरस्वतीमयूराच्या—**पंत.** १२. उपटले आहेत पंख ज्यांचे असे मोर. १३. बंधु जो विदुर त्यासह. १४. धृतराष्ट्र. १५. पंडुराजाचें द्रव्य (कनक) जे पांडव त्यांस. १६. गवळवाड्याच्या समाचाराचें निमित्त. १७. मसलत देणाऱ्याला. १८. प्यालेलें जयरूप अमृत, तेणेंकरून. १९. स्तवन कर.

त्या चि मिषें आज्ञेला पुसती जों, नृप करी नकारा तों;
स्पष्ट म्हणे, 'बालिश हो! मरणप्रदकुमतिसीं नका रातों[1]. ६
द्वैतवनाश्रय करुनि छळिले ते पांडुपुत्र आहेत,
त्यांला पुन्हा छळावें, आहे तुमच्या मनांत हा हेतें[2]. ७
दिसतो भीमधनंजयकृष्णाक्षोभें सुयोधनाशें[3] मला,
[4]म्हणतों वनप्रवेशें दहनापरि या सुयोधना शमला.' ८
शकुनि म्हणे 'गाईंतें पाहूं, मृगया वनीं करूं, परतूं[5],
धर्माकडे न जावूं, व्यर्थ भिसी, धैर्यनिधि सुधी परें तूं. ९
धर्मज्ञ धर्म जपतो कृतसमया[6], असति वश तया भ्राते;
कां विटंवितील[7] आज्ञा लंघुनि चातक तसे दयाभ्रा[8] ते? १०
दायादाचें दर्शन घ्यावें काशास ताप साधाया?
वल्किजटिदर्शनेच्छा[9] तरि पाहूं साधुतापसा धायीं[10].' ११
अंधमतिकुमारीच्या[11] ते मोहिति बोलनग[12] मनाला हो!
अनुमोदन देइल कां प्रेमाचा डोल न गमनाला हो!?' १२
शिरला सदार सानुज सशकुनि सांगेशें[13] तो सकटक वनीं,
दूषावया शिरे खळ जैसा निजदुर्गुणांसकट कवनीं. १३
[14]घोषीं सुयोधन वसे हरिसा[15], परि साच मुग्ध[16], न वनीं तें[17]
यश संपादी, केवळ नाशी सेवूनि दुग्धनवनीतें. १४

---

१. रमूं नका, आसक्त होऊं नका. २. हेतु. ३. उत्तम वीरांचा नाश. ४. अन्वयार्थ—[मी धृतराष्ट्र] या शमला सुयोधना (पापी दुर्योधनाला) म्हणतों कीं, वनप्रवेशें (तूं द्वैतवनांत प्रवेश केलास तर) दहनापरि (अग्निसमान अशा) भीम-धनंजय-कृष्णाक्षोभें मला सुयोधनाश दिसतो. ५. परंतु. ६. केलेल्या शपथेला (समय=शपथ). ७. दुःखित करतील. ८. दयारूप मेघाला. (धर्माला). ९. वल्कलधारी व जटाधारी अशांच्या दर्शनाची इच्छा. १०. तृप्त होण्यास. ११. धृतराष्ट्राची बुद्धि ही च कुमारी, तिच्या. १२. भाषणरूप अलंकार. १३. अंगदेशचा राजा कर्ण यासह. १४. गवळवाड्यांत. १५. कृष्णासारखा. १६. पण खरोखर च मूर्ख. १७. तें कृष्णसंपादित यश.

कुरुपति अनुगांसि म्हणे, ‘मृगयाक्रीडा वनीं भली केली,
त्या द्वैतवनाख्यसरीं[1] स्वप्रमदांसह चला करूं केली[2].’ १५
पूर्वींच तेथ येउनि गंधर्वाधीश चित्रसेन रते;
दुर्योधनप्रहित[3] जे झाले पाहोनि चित्रसे नर ते. १६
गंधर्वांसि म्हणति नर, ‘येताहे मनुजदेव शूर सरा[4],
हें द्वैतवनस्थान त्यागुनि आतां चि सर्व दूर सरा.’ १७
खेचर[5] म्हणति, ‘कुमति हो! सिंहींचें काय रे! करील शुनीं[6]?
मृगमदपरिभवकर[7] गुण नायकिला लेशमात्र ही लशुनीं[8]. १८
गंधर्वराज करितो जळकेलि, निघा, पळा चि, पामर हो!
नातरि मराल, तुमचा[9] पति तो हो सनरकोटि सामर हो.’ १९
तें ऐकुनि भूप म्हणे स्वभटांतें, ‘शीघ्र सोडवा सर, हो!
पळवा गंधर्वांतें, हा स्वजयेंकरुनि गोड वासर हो.’ २०
कुरुपतिभट म्हणति, ‘अरे! सोडा, गंधर्व हो! सरोवर तें,
आम्हांपासुनि खेचरबळ कुंठितगति न हो, सरो वरतें.’ २१
करितां मदें अतिक्रम, कळवुनि त्यांची स्वकुळवरा[10] करणी,
गंधर्वांनीं वधिले द्वैतवनानिकट बहु वराक[11] रणीं. २२
निजकटक भग्न[12] पाहुनि कर्णें प्रकट करुनि प्रभावातें,
गंधर्वांची हरिली दीपांची ज्यापरि प्रभा वातें. २३
त्यासि भट म्हणति, ‘विजयश्रीचा अतुळप्रभाव नवरा हा;
याची प्रभा परा, जसि यज्ञवराहप्रभा[13] वनवराहा.’ २४

---

१. द्वैतवननामक सरोवरांत. २. क्रीडा. ३. दुर्योधानानें पाठविलेले. ४ सरोवराप्रत. ५. गंधर्व. ६. कुत्री. ७. कस्तूरीला मागें सारणारा. ८. लसणामध्यें. ९. तो तुमचा राजा कोटि मनुष्यांसहित असो किंवा देवांसहित असो. १०. आपल्या कुळांतील श्रेष्ठ अशा (चित्रसेनास). ११. क्षुद्र (कौरववीर). १२. अस्ताव्यस्त, पराभूत. १३. अन्वयार्थ—जसि यज्ञवराहप्रभा (विष्णूच्या दशावतारांतील तिसरा जो वराहावतार त्याचें तेज) वनवराहा (रानडुकराला) [असह्य] (तसी) याची प्रभा परा [असह्य होय].

[१]त्या चित्रसेन भेटे, जैसा भगवान् अगस्त्य [२]सिंधुरसा;
होउनि विरथ पळाला, सिंहपरित्रस्तचित्त [३]सिंधुरसा. २५
[४]कर्णपरिभवांत असा झाला असतां [५]सुयोधनाश रण,
होउनि विकळ भट म्हणति, 'आम्हांला हो सुयोधना! [६]शरण.'
[७]कलिपुरुष चित्रसेनावरि धावुनि जाय [८]आशु, न कदापि
खळ भी, [९]हरिसि, पिसाळे जो, तो पसरूनि आ [१०]शुनकें, दापी.
[११]जयहेतु काय होइल अहिला [१२]बळयत्नकोटि [१३]केकिरणीं?
मिरवे प्रकाश [१४]तिमिरीं [१५]खद्योताचा, न तो टिके [१६]किरणीं. २८
करुनि विरथ दुर्योधन धरिला जैसा भुजंग [१७]खगपानें,
[१८]लघुहित न [१९]गुर्वतिक्रम, वदन न फाटेल काय [२०]नगपानें? २९
सानुज सदार दुर्जन दुर्योधन खेचरेश्वरें धरिला,
जाणों [२१]क्षितिहृदयांचा साक्षात् कांटा चि तो [२२]समुद्धरिला. ३०
दुर्योधनासि जिंकुनि नेतां बांधूनि आपुल्या [२३]अयनें,
धर्मासि शरण गेले [२४]सचिव भरुनि अश्रुच्या भरें नयनें. ३१
ते वृत्त कथुनि म्हणती, 'तव [२५]संदर्शनसुखोदया भ्राते
पावोत, सोडवावे बंधापासुनि तुवां दयाभ्रा! ते.' ३२
भीम म्हणे, '[२६]खळमत हें, आम्हां श्री दाखवूनि गांजावें.
त्या [२७]हितकरसुहृदासीं आम्हीं भांडावयासि कां जावें?' ३३
धर्म म्हणे, 'रे भीमा! शरणागत रिपु हि रक्ष्य सन्महित,

---

१. कर्णास. २. समुद्राच्या उदकास. ३. हत्तीसारखा. ४. कर्णाचा पराभव हा च शेवट ज्याचा असा. ५. उत्तम वीरांचा नाश ज्यांत असा (रण). ६. त्राता. ७. दुर्योधन. ८. लवकर. ९. सिंहासी दापी (दटावी). १०. कुत्रा. ११. जय येण्यास कारण. १२. सामर्थ्यानें केलेले कोटिशः यत्न. १३. मयूरांशीं युद्ध करण्यांत. १४. अंधारांत. १५. काजव्याचा. १६. सूर्यकिरणांत. १७. गरुडानें. १८. अल्प [देखील] कल्याण करणारा. १९. थोरांचा अपमान. २०. पर्वतप्राशनानें. २१. पृथ्वीच्या काळजांतील. २२. उपटून टाकिला. २३. मार्गानें. (आकाशांतून). २४. दुर्योधनाचें अमात्य. २५. तुझ्या दर्शनानें होणाऱ्या सुखाच्या उदयास. २६. दुष्टांचा विचार. २७. कल्याण करणाऱ्या मित्रासीं. (गंधर्वासीं).

बा ! जरि घडेल भीताभयदान[१] जगीं तरी च जन्महित. ३४
न सहावा अन्यकृतज्ञातिपराभव बुधें, उठा, रचितो
जन्मुनि सुयशासि न जो, जननीयौवनवनीं[२] कुठारें[३] चि तो. ३५
आरंभिता न मखे[४] तरि जाता, हा[५] पळ हि राय न रहाता,
सुयशोमृतासि पसरिति अमर, न पसरील काय नर हाता ?' ३६
चौघे हि म्हणति, 'तुमचे घेउनि येतों चि ते असुज्ञाती[६].'
सुज्ञासि गुर्वनुज्ञा कामदुघा[७] बहुमता, असुज्ञा[८] ती[९]. ३७
होवुनि सज्ज कुरुरथारूढ[१०] तयां गांठिती महाबळ ते,
खेचर फिरले, नसते मरणार, भिवूनि तरि न कां पळते ? ३८
गंधर्वांसि म्हणति, 'रे ! दुर्योधन बंधु आमुचा सोडा
ऐसी श्रीधर्माज्ञा, स्वमुखें 'चुकलों' म्हणोनि कर जोडा.' ३९
गंधर्व म्हणति, 'जो खळबळजळधीतें[११] महातपा[१२] प्याला,
आम्हां मता[१३] तदाज्ञा[१४], नातरि शिवता न हात पाप्याला. ४०
प्राप्त सुधा हि अव्हेरुनि जीसें[१५] सदा पसरितात आ ज्ञाते,
आम्हीं नरदेवाज्ञा-कांजी[१६] प्यावी, त्यजूनि आज्ञा ते ?' ४१
ऐसें निष्ठुर वदले कीं, 'खळमथनांत[१७] लेश अनय नसे,'
झाले होते हि विजयजमदें[१८] सनयन[१९] असोनि अनयनसे. ४२
'कां मरतां ? सोडा रे ! सोडा गंधर्व हो !' म्हणति चवघे;
त्यांवरि खवळोनि खचर खरतरशरनिकर[२०] सोडिती अवघे. ४३

---

१. भ्यालेल्यास धीर देणें. २. मातेच्या तारुण्यरूप वनांत. ३. कुऱ्हाड. ४. यज्ञ. ५. हा राय. (मी धर्मराज). ६. प्राणांसम असे बांधव. ७. कामधेनु. ८. वेडगळास. ९. ती प्रसिद्ध कामधेनु. १०. कौरवांच्या (दुर्योधनादिकांच्या) रथावर आरोहण केलेले. ११. दुष्टांचें सैन्य हा च समुद्र, त्यातें. १२. महातपस्वी (साक्षात् अगस्त्य च). १३. मान्य. १४. त्याची (चित्रसेनाची) आज्ञा. १५. ज्या चित्रसेनाच्या आज्ञेस. १६. राजा धर्म याची आज्ञा ही च कांजी. १७. दुष्टांना शासन करण्यांत. १८. जय मिळाल्यानें उत्पन्न झालेल्या गर्वामुळें. १९. डोळस. २०. अतितीव्र बाणांचा समूह.

त्या हरिचे[1] आश्रित ते[2], या हरिचे[3] प्रबळ दास हे[4] तिपट,
झांकिति न त्यांसि, त्या ही खचरां[5] त्यांचे[6] विशाळ हेतिपट[7]. ४४
गर्वें[8] हरिसीं भिडतां कां होतिल शुद्ध चित्रसे[9] न करी?
जिष्णुपुढें[10] तसि खेचरगति होतां, युद्ध चित्रसेन करी. ४५
तच्छस्त्रास्त्रैकार्णवमध्यंगत[11] तो महाकिरी[12] टिकला,
अपराजितां[13] शिवासी समरीं विजयावहा[14] किरीटि-कला[15]. ४६
अन्यत्र नवल, परि त्या पांडुकुमारीं नव्हे नवल यश तें;
हरिहरदासपरिभवक्षम न सकळ देव दानव लयशतें[16]. ४७
तो[17] भेटोनि म्हणे, 'कां झालासि खळा सुयोधना शरण[18]?
केला शक्राज्ञस्तस्वहितकरामितसुयोधनाशरण[19]. ४८
हें काय बरें सुज्ञा? जो दारुण दंशकाम[20] साप सदा,
तन्मथन अनिष्ट? अभय द्यावें त्या सर्वतामसापसदा[21]?' ४९
अर्जुन म्हणे, 'सख्या! मज अकृतज्ञ असें म्हणो नको, पावें,
कैसें अजातरिपुवरि[22] अहितहितनिरत[23] म्हणोन कोपावें? ५०
जेंवि शरणागताच्या त्यागा, प्राणांचिया न, शिबि[24] भ्याला,
सन्मति[25] अपवादा भी, करणीच्या[26] हि न वधू तसि बिभ्याला[27].

---

१. इंद्राचे. २. गंधर्व. ३. कृष्णाचे. ४. भीमार्जुनादि. ५. सूर्यास. ६. पांडवांचें. ७. शस्त्ररूप वस्त्रें. ८. युद्ध करितां. ९. हत्ती चित्रसे होतील=निश्चल—गतप्राण होतील. १०. अर्जुनापुढें. ११. त्या चित्रसेनाच्या शस्त्रास्त्ररूप महासागराच्या मध्याप्रत गेलेला. १२. (तो अर्जुनरूप) आदिवराह. (प्रलयकालीन महासागरांत जसा आदिवराह, तसा त्या गंधर्वांच्या शस्त्रास्त्रसागरांत तो अर्जुन मात्र टिकला, असा भावार्थ). १३. पराभव न पावलेल्या. १४. यशस्वी. १५. अर्जुनाची चापकुशलता. १६. शेंकडों प्रलयकाळानीं हि. १७. चित्रसेनगंधर्व. १८. रक्षणकर्ता. १९. इंद्राज्ञेस्तव तुझें स्वतांचें हित करणाऱ्या असंख्य सुयोधांचा नाश ज्यांत असा रण. २०. चावण्याची इच्छा ज्यास असा. २१. सर्वतामसाग्रणी अशा दुर्योधनाला. २२. धर्मावर. २३. शत्रुहिताविषयीं तत्पर. २४. शिबिराजा. २५. साधूंची वुद्धि. २६. चेटकाच्या, जादूच्या. २७. बिब्याला. (बिब्याच्या फुल्यांना).

सोशील मृत्यु, परि गुरु शरणागतताप पळ न सोशील,
तारिल सकळांसह त्या, बा! तें क्षणमात्र चळ नसो शील. ५२
खेचरसिंहा[1]! दे कुरुसिंहाला[2], उचित भाग हरिलों[3] जो;
या कर्में तुज मुक्ताकवळ[4] नुगाळिता[5] हठींद्र[6] हरि[7] लाजो.' ५३
तो खेचरनाथ म्हणे, 'कुरुवंशीं धन्य तो अजातारी,
खळरक्षकां तुम्हां प्रभु बहु बहु मानील, जो गजा[8] तारी. ५४
धन्य तुम्हीं गुर्वर्पितवाक्चेतःकाय[9] कीर्तिलोभरत[10],
आठवला मज आद्यें कविनें[11] जो काय कीर्तिलों[12] भरत[13].' ५५
भेटुनि वर्णुनि धर्मा, गंधर्वश्रेष्ठ जाय नाकाला[14];
खळ बहु लाजे, जाणों तो न यशा ने हरूनि, नाकाला[15]. ५६
मृत गंधर्व उठविले शक्रें तत्काळ अमृतसेकानें
स्वमरणकथेसि ऐकति सुप्तोत्थित[16] सत्य अ-मृतसे कानें. ५७
धर्में सदार सानुज बंधु हित कथुनि पुरासि[17] पाठविला;
आठविला तत्परिभवखेद चि, न तदीय दोष आठविला. ५८
मार्गी भेटोनि म्हणे कर्ण, 'सख्या! धन्य तूं महातेजा,
मज पळविलें जिहीं ते शत्रु न झाले रणीं सहाते ज्यां[18]. ५९
खेचरनाथपरिभवें तुजला सुरपाळ[19] कां न कांपावे?
चापश्रुतिजगदंबा[20] समयीं प्रियबाळका न कां पावे?' ६०
दुर्योधन त्यासि म्हणे, "काय सख्या! वर्णितोसि कर्णा! तें
निजवृत्त काय सांगों? होइल अति तप्त तैल कर्णातें. ६१
अरिनें केलें मजला विरथ करुनि सानुजासि बद्ध रणीं,

---

१. गंधर्वश्रेष्ठा (चित्रसेना!). २. दुर्योधनाला. ३. सिंहाला. ४. मोत्यांचा घांस. ५. न ओकणारा. ६. मोठा हट्टी. ७. सिंह. ८. गजेंद्रास. ९. गुरूला अर्पिली वाणी, मन आणि शरीर ज्यानीं ते. १०. कीर्तिलाभाविषयीं आसक्त. ११. आद्यकवीनें. (वाल्मीकीनें). १२. वर्णिलेला. १३. रामभ्राता. १४. स्वर्गाला. १५. नासिकेला हरूनि ने. १६. निजून उठलेले. १७. हस्तिनापुराला. १८. ज्या तुला. १९. अष्टदिग्पाळ. २०. धनुर्वेद ही च जगदंबा.

सोडविलें धर्मानें, तें झालें दुःख बहु, न मद्धरणीं[1]. ६२
अस्मन्मंत्रित[2] कथिलें गंधर्वेंद्रें युधिष्ठिरासि खरें,
तेव्हां खचोनि पडलीं मजवरि दुःखाद्रिचीं महाशिखरें. ६३
प्राणांकडे न पाहुनि म्यां केला धरुनि मृत्युकाम रण,
कर्णा! आलें नाहीं मज तच्छस्त्रेंकरूनि कां मरण? ६४
वदलों शतदा मी कीं, 'घे पोटीं भूमिदेवि! वरदे! हा.'
विश्वंभरा[3] क्षमा[4], परि न शिराया भूमि दे विवर[5] देहा. ६५
बुडविति तापविति श्रुतमात्रा सहसा चि दुर्दशा[6], न नैया[7],
मद्दुःख बहु, न झाला पात्र समरनिहत[8] तो दशानन[9] या. ६६
प्रायोपवेशें[10] करितों, दावूं काय त्रपावहास्याला[11]?
पाव मला, मरणाज्ञा दे, लोकांच्या न पाव हास्याला. ६७
दुःशासना! धृति धरुनि अंधपितृहितप्रियार्थ[12] हो राजा,
अभिषेचितों पुढें ये, निजगुर्वाज्ञा[13] चि होय होरी[14] जा[15]." ६८
'म्यां राज्यभर सहावा कैसा, प्रियपुत्रशोकभर तातें?
गुरुदत्तराज्यभोगें संस्तविते काय लोक भरतातें?' ६९
ऐसें वदोनि झोंबे कंठीं दुःशासन स्वभावाच्या,
सर्वांशि दुःख होतें भाविवियोगें[16] समस्वभावाच्या. ७०
कर्ण म्हणे, 'बालांस हि हें ऐसें झोंबणें गळां ठावें,
कां रडतां भारतें[17] हो! न शिरोनि तुम्हीं तमीं[18] गळांठावें[19]. ७१

---

१. माझ्या हरणीं. (मला हरण करून नेल्यानें). २. आमची मसलत. ३. जगाला धारण करणारी. ४. समर्थ अशी. ५. छिद्र. ६. केवळ ऐकलेली अशी दुर्दशा. ७. नद्या. ८. युद्धामध्यें मारला गेलेला. ९. रावण. १०. मरणाच्या संकल्पानें उपोषणें करीत निश्चल बसणें. ११. लाजिरवाण्या मुखाला. १२. अंध पित्याचे हितास्तव व आवडीस्तव. १३. आपल्या गुरूची (वडील भावाची—माझी) आज्ञा. १४. मुहूर्त. १५. ज्या. १६. सारख्या स्वभावाच्या पुरुषांच्या होणाऱ्या वियोगानें. १७. भरत-कुलोत्पन्न हो! (हें पद साभिप्राय आहे. तुम्ही भरतासारख्या थोर कुलीन राजाच्या कुलांत उत्पन्न झालेले असून असें रडता काय? तुम्हां थोरांना हें रडणें शोभत नाहीं, असा ध्वनितार्थ). १८. मोहांत. १९. धैर्यगलित व्हावें, घाबरावें.

प्रभुनें प्रजा, प्रजानीं प्रभु, रक्षावा चि संकटीं असुनीं,
कां न जपावें तुज त्या पांडुसुतानीं त्वदाश्रयीं असुनीं? ७२
पावे [1]हर हि पराभव, मग अन्य न कां सुयोध [2]नाडावा?
या अपयशें मळो पदनखर हि न तुझा सुयोधना! डावा.' ७३
शकुनि हि म्हणे तयातें, 'यांत दिसे लेश न मज लाभाचा.'
प्रिय हित सत्य हि सांगे, परि तद्वचनें न समजला भाचा. ७४
[3]सुरजित [4]पातालग [5]दितिदनुसुत [6]निजहितसुयोधनाश तदा
जाणुनि [7]कृत्याहस्तें नेउनि बोधिति सुयोधना शतदा. ७५
असुर असें वदले कीं, 'होतां हें त्वच्छरीर असु-रहित,
राज्या सुयोधना! मग कोण पर प्रभु करील असुरहित? ७६
[8]सांबें दिलासि निर्मुनि पूर्वीं आम्हांसि तूं [9]तपस्तुष्टें,
कीं, व्हावीं असुरकुळें बहु सेउनि तव यशोमृतें पुष्टें. ७७
[10]नाभ्यूर्ध्व वज्रमय तव जगदीशें निर्मिला [11]महाकाय,
पुष्पमय [12]अधस्तन जगदंबेनें, त्यजिसि हा अहा! काय? ७८
[13]भगदत्तादि तुज तुझ्या कार्यासि सहाय होतिल कराया,
[14]अस्मत्पक्षश्रीच्या भाळीं तूं भव्य हो तिलक राया! ७९
भीष्मादिकांत अंशें राक्षसवीर प्रवेश करितील,
तेणें निर्दय होउनि ते [15]स्वसुहृज्जीवनासि हरितील. ८०
नरकासुर हि [16]ससखयदुवरहननार्थी शिरेल कर्णांत;
तो हि [17]अरिबळीं जैसा सिंधूच्या [18]वाडवाग्नि [19]अर्णांतें. ८१

---

१. शंकर. (किरातार्जुनयुद्धप्रसंग लक्षांत आणावा). २. नागविला जावा, पराभूत व्हावा. ३. देवानीं जिंकिलेले. ४. पाताळांत असणारे. ५. दिति आणि दनु या कश्यपस्त्रियांचे पुत्र—दैत्य, दानव. ६. आपल्या हितकर्त्या वीरांचा नाश. ७. आसुरी उग्र देवतेच्या हस्तें. ८. अंबेसह शिवानें. ९. तपानें संतुष्ट झालेल्या (सांबें). १०. नाभीपासून वरचा. ११. मोठा देह. १२. [कमरे]—खालचा. १३. हा नरकासुराचा पुत्र. १४. आमच्या पक्षाच्या [विजय]—लक्ष्मीच्या. १५. आपल्या मित्रांच्या प्राणाला. १६. मित्र अर्जुनासह कृष्णाच्या घाताची इच्छा करणारा. १७. शत्रुसैन्यांत. १८. समुद्रांत राहून जलशोषण करणारा अग्नि. १९. पाण्यांत.

क्षत्रकुळीं दितिजदनुज बहु राक्षस जन्मले, अगा राया !
तुज ते सहाय होतिल, न उपेक्षीं भूतिच्या[1] अगारा[2] या. ८२
सुरगति[3] धर्म, असुरगति तूं, यास्तव पसरितात आ शेतें
मेघा तुज, असुरकुळें जीवनलाभार्थ[4] धरुनि आशेतें. ८३
स्वसुतार्जुनहितकामें याचकवेषासि वृत्रहा[5] धरिल,
करिल कपट वामनसा, कर्णाचीं कवचकुंडलें हरिल. ८४
परि संसप्तक[6] समरीं करितिल हरिपुत्रघात[7] राक्षससे,
भीतील त्यांसि पांडव, सिंहांला जेंवि कातराक्ष[8] ससे.' ८५
ऐसें पाताळीं दितिदनुज स्वमुखें रहस्य कळवूनि,
स्वस्थानीं पाठविती कृत्याहस्तें तयासि वळवूनि. ८६
प्रकट न तें वृत्त करी जाणों होईल त्या स्वनिधिला भें[9],
होय मनीं च प्रमुदित जैसा लुब्धांत लुब्ध[10] निधिलाभें. ८७
प्रातःकाळीं रोदननमनार्जुनमारणप्रतिज्ञानीं[11]
वळवी राधेय, जसा प्राणत्यागोद्यताप्रति[12] ज्ञानी. ८८
कर्णासि म्हणे, 'सखया ! मित्रावांचुनि[13] पडे चि साधि[14] तमीं[15],
करितों त्वदुक्त, आलों त्वन्मंत्रें चि स्वकार्य साधित मीं.' ८९
जाय पुरा, दुर्योधन यश देवुनि बंधुशकुनिकर्णातें,
वनवृत्त श्रुत झालें भीष्मद्रोणादिपूज्यकर्णां तें. ९०
भीष्म म्हणे, 'कथितों हित रिपुस हि, सांगेन कां न नातूतें ?
कां गेलासि, मदाज्ञा नसतां जायासि कानना तूतें ? ९१

---

१. ऐश्वर्याच्या. २. शरीराला. ३. देवांना आश्रयस्थान असा. ४. उदकलाभार्थ [पक्षीं] प्राणलाभार्थ. ५. वृत्रासुराला मारणारा. (इंद्र). ६. सत्यप्रतिज्ञ, पूर्वी शपथ घेतल्यामुळें युद्धांतून पराङ्मुख होत नाहींत ते. (त्रिगर्तराजाचे पुत्र भारतीय युद्धांत 'संसप्तक' या संज्ञेस पात्र होऊन गेले). ७. इंद्रपुत्र अर्जुनाचा घात. ८. भयभीत नेत्र ज्यांचे असे. ९. भीति. १०. लोभी. ११. रोदन, नमस्कार व अर्जुनास मरण्याची शपथ यानीं. १२. प्राणत्याग करण्याला तयार झालेल्याला. १३. सूर्यावांचुनि (पक्षीं) स्नेह्यावांचुनि. १४. संचित. १५. अंधकारीं (पक्षीं) दुःखीं.

स्वपरस्वरूप तुजला कळलें कीं? कां? कसा अजातारी?
कर्ण कसा? पार्थ कसा? वत्सा! पंकांत[1] गज गजा तारी. ९२
न स्तुत्या[2] धेनुपरिस जरि बहु दुध दे अजा[3] तरि पुराणा[4],
सद्वदना कर्ण तसा स्तुत्य न, सोडुनि अजातरिपु राणा. ९३
हर्षे कुलज भट तदा, होय रणीं बाणराजिलाभ[5] यदा[6],
ती सूतसुता[7] झाली, जसि पत्रिपदृष्टि[8] राजिला[9] भयदा. ९४
यांचें[10] जो तेज हरी त्याचें[11] फाल्गुन[12], म्हणोनि जे कवि ते
कर्णखचरार्जुनां[13] कां म्हणति न खद्योतरात्रिकरसविते[14]? ९५
या कर्णे उडुपें[15] त्वां लंघाया पांडवाब्धिला जावें?
हा! बालिश हो! न तुम्हीं या अविवेकेंकरूनि लाजावें. ९६
दे राज्य, संधि कर, कर जोड, गुरुयुधिष्ठिरासि हो नत रे!
नयसेतुपथाश्रय[16] जो न करी व्यसनार्णवांत तो न तरे.' ९७
जें सन्मत भीष्मवचन पावे दुर्मतिपुढें अनादर तें,
'गीचें[17] हि अनादरिजे काय न गायन जडें[18] अनादरतें? ९८
होती प्राप्त जयाच्या[19] स्वीकारें मंगळें अवधिरहितें[20],
कविशतसत्कृतकुळगुरुवचन[21] न घे तो[22] जऱ्ही अबधिर[23] हि तें.
जाय उठोनि कुमति कीं, हा राज्यानिष्टहेतु म्हातारा[24],
न वदोनि[25] वदे नातू, 'बुडतां म्हणतिल न हे तुम्हां तारा.' १००

---

१. चिखलांत. (संकटांत). २. स्तुति करण्यास योग्य. ३. शेळी. ४. पुराणाला. (पुराणानीं जसें गाईचें वर्णन केलें आहे, तसें पुष्कळ दूध देत्ये म्हणून शेळीचें केलें नाहीं असा अर्थ). ५. शरांच्या पंक्तीची (समूहाची) प्राप्ति. ६. जेव्हां. ७. सारथिपुत्र कर्णाला. ८. गरुडाची नजर. ९. निर्विष सर्प—**पंत.** १०. कर्णाचें. ११. त्या चित्रसेनाचें. १२. अर्जुन. १३. कर्ण, चित्रसेन व अर्जुन यांस अनुक्रमें. १४. काजवा, चंद्र, सूर्य. १५. लहान नौकेनें. १६. नीतिरूप पुलाचा आश्रय. १७. सरस्वतीचें. १८. जो नादलुब्ध नाहीं अशा जडें (मूर्खानें). १९. ज्या वचनाच्या. २०. निरंतर. २१. शेंकडों पंडितानीं सत्कारिलेलें असें कुलगुरूचें वचन. २२. दुर्योधन. २३. बधिर नसतांना. २४. भीष्म. २५. न बोलतां सुचवी.

कर्ण म्हणे, "कुरुराया! मजसीं सुश्राव्य शांतनव[1] न वदे,
कर्णांसि[2] ताप बहु कटुभाषी हा अप्रशांत नव नव दे. १०१
धिक्कारूं त्यासि कसें? गुरुधिक्कारेंकरूनि पाप डसे,
नाहीं तरि म्यां ऐसे चुरिले असते धरूनि पापडसे. १०२
आहे पांडुतनयकृतदिग्विजयाचें नृपा[3]! पैंडप[4] यास;
माझा अभिमान असो तुज, जैसा वारिचा[5] जड पयास[6]. १०३
दिग्विजय स-सेनाहीं केला त्यांहीं न तो अ-सेनाहीं,
परि म्हणतो, 'विजयी भुज कोणाचे ही जगीं असे नाहीं.'
दिग्विजय करुनि येतों, एकाकी एकरथ अ-सैन[7] हि मीं,
किति हें? त्वदर्थ वर्षीं[8] उघडा, ग्रीष्मातपीं[9], असेन हिमीं[10]."
गांधारि[11] म्हणे, 'सखया! आहे मज बहु तुझा चि विश्वास,
वीरा! एकाकी ही तूं यद्यपि जिंकिसील विश्वास. १०६
परि शोभार्थ असों दे, त्याग करावा न आत्मसैन्याचा,
माझा सखा तसा हो क्षितिला वश करुनि त्या हि वैन्याचा[12].'
दिग्विजयार्थ सुदिवसीं तो तेजोराशि शूरज[13] निघाला,
घालावया अनम्राकरदाहितसर्वशूरजनिं[14] घाला. १०८
दुर्योधन बहु मानी शकटशतानीत[15] मणिकनक दाते[16]
भरिलें घृतें, भरावें जें तैलानें हि मणिक[17] न कदा तें. १०९
त्यावरि तो दुर्योधन निजकुळगुरुला म्हणे, 'पुरोहित हो!
मत्काम राजसूयक्रतु करणें, हा सुखें पुरो[18], हित हो.' ११०

१. भीष्म. २. कानास. ३. दुर्योधना! ४. कोणाएकास कोणाएकाची सर्वदा प्रतिष्ठा व्हावी, ती वर्णावी, असें जें तद्विषयीं पक्षपातानें वाटणें तें. ५. पाण्याचा. ६. दुधास. ७. सेनारहित. ८. पावसांत. ९. ग्रीष्मऋतूंतील उन्हांत. १०. थंडींत. ११. दुर्योधन. १२. पृथु—**पंत.** हा एक महापराक्रमी राजा असून यानें च पृथ्वीचें दोहन केलें अशी प्रसिद्धि आहे. १३. सूर्यपुत्र कर्ण. १४. उद्धट, करभार न देणारे व दुष्ट अशा सर्व शूरजनांवर. १५. शेंकडों गाडे भरून आणलेलें. १६. दात्यानें. (कर्णानें). १७. मडकें—**पंत.** १८. पूर्ण होवो.

तो साधु म्हणे, 'वैष्णवसत्र[१] करावें तुवां नयज्ञा !, तें
ऐसें[२] चि फळद; असतां[३] धर्म उचित तूं हि या न यज्ञातें.' १११
तें मान्य करुनि रायें 'वैष्णवसत्रोत्सवा पहायास
यावें' म्हणुनि नृपांप्रति पाठविले दूत बहु बहायास. ११२
मरता चि, न मरता जरि म्हणता चि सदा हि अन्य सत्रप[४] 'हा!'
दूतमुखें दुर्योधन धर्मासि म्हणे, 'मदीय सत्र पहा.' ११३
धर्म म्हणे, 'गांधारे! साधु करिसि कर्म भारतोचित[५] रे!
जो धर्मसेतुसंश्रित[६] वाहुनि गुरुराज्यभार[७] तो चि तरे. ११४
बा! येती पुण्ययशःसंपत्ती जोडितां न येरा या;
यावें, परि संप्रति वनवासव्रत सोडितां नये, राया!' ११५
भीम म्हणे, 'धर्मासह निश्चित येईन समरसत्रास[८],
रुचतो हा चि रस मना, देतो पर अमृतसम रस त्रास.' ११६
तें सत्र पूर्ण होतां, कर्ण म्हणे, 'पांडवायु हरिशील
ऐसा चि, कुरुपते! तूं विश्वस्तुत राजसूय करिशील. ११७
जोंवरि न अर्जुनातें मारीन रणांगणांत मीं निकरें,
तोंवरि न पादधावन[९] करवीन, करीन आपुल्या चि करें. ११८
सेवीन न मांसातें, जैसा मोक्षेच्छु सुजन न सुरेतें[१०],
न तदुक्त मृषा, ज्याचें सुक्षेत्रामाजि सुजनन सुरेतें[११].' ११९
गांधारि म्हणे, 'कर्णा! पूर्ण भरवसा मला तुझा चि असे;
त्वद्भुज संश्रितकामद[१२], ते मंदारादि[१३] पांच ही न असे.' १२०

---

१. ज्यामध्यें विष्णुदेवता मुख्य आहे असा यज्ञ. २. राजसूयासारखें. ३. एकानें राजसूययज्ञ केला तर तो जीवंत असेंपर्यंत त्या कुळांतील दुसऱ्यानें तो यज्ञ करूं नये असा शास्त्रनियम आहे, म्हणून दुर्योधन राजसूययज्ञ करण्यास अयोग्य. ४. ज्याला लाज म्हणून आहे असा अन्य कोणी. ५. भरतकुलोत्पन्नाला योग्य असें. ६. धर्मरूप सेतूस (पुलास) अवलंबून असलेला. ७. मोठा राज्याचा भार. ८. रणयज्ञास. ९. पादप्रक्षालन. १०. मद्यातें. ११. पवित्र वीर्यानें. १२. आश्रितजनांचे मनोरथ परिपूर्ण करणारे. १३. मंदार, पारिजातक, संतान, कल्पवृक्ष, आणि हरिचंदन हे पांच ही कल्पवृक्ष.

अध्याय आठवा.

चिंतित होता विपिनीं[1] तो धर्म सबंधु विप्रभव्यास,[2]
तों त्यासि भेटि देवुनि धन्य करी शशिरविप्रभ[3] व्यास. १
व्यास म्हणे, 'वत्सा! मीं झालों द्विजतर्पणें प्रहर्षित रे!
स्वल्प हि अन्न सुपात्रीं देवुनि सकुटुंब मुद्गलर्षि तरे.[4] २
जोडी सात्मजदार[4] द्रोणमितें[5] व्रीहि[6] पंधरा दिवसीं,
विधिवत् सेवी करवुनि पेज कण्या भात पानगे[7] दिवसीं.[8] ३
समयीं सर्व हि भक्षी दुर्वासा नाम विप्र सादा[9] तें,
सत्वासि न टळतां[10] तो भगवान् बहु दाखवि प्रसादातें. ४
सत्वासि न चुकले ते तरले, तरशील तूं हि, बारा या
सरल्या चि समा[11] यापरि तेरावी ही सरेल, बा! राया! ५
व्यसनांत शीलवश[12] जन तरला नळवश[13] जळांत पाथरसा.[14]
सोडी सत्वासि न शुचिगुण,[15] तप्त हि जेंवि शुद्ध पाथ[16] रसा.[17]' ६
शिष्यायुतयुत[18] भगवान् दुर्वासा गजपुरासि ये राहे,
सत्संगति सत्फळदा, सुज्ञासि पचे, पचे न येरा हे; ७
चित्रं,[19] छळ सोसुनि खळ[20] मुनिभजनीं सर्वकाळ राबे, तें[19],
न विटे सत्सेवेतें जेंवि पिपीलिकसमूह[21] राबेतें. ८
दास्यें प्रसन्न होउनि 'माग' म्हणे तो तपोनिधी राज्या,

---

१. अरण्यामध्यें. २. ब्राह्मणांच्या कल्याणास. ३. चंद्रसूर्यासारखी प्रभा ज्याची असा. ४. पुत्र व स्त्री यांसह. ५. अर्धा मण. ६. तांदूळ. ७. फळें. (पक्वान्नविशेष). ८. साहा वेळ—**पंत.** ९. मिळविलेलें अन्न. १०. मुद्गलमुनि. ११. वर्षें—**पंत.** १२. उत्तम स्वभावास अनुसरून असलेला. १३. [रामसैन्यांतील] नळ वानराला वश अशा. (नळाच्या हातांतील). १४. दगडासारखा. १५. विमल आहेत गुण ज्याचे तो. १६. पाणी. १७. रुचीला, माधुर्याला. १८. दहा हजार शिष्यानीं युक्त असा. १९. तें आश्चर्य [होय]. २०. दुर्योधन. २१. मुंग्यांचा समूह.

जो देणार तशा ही सिद्धि, असुलभा तपोनि धीरा[1] ज्या. ९
खळ त्यासि म्हणे, 'येथें जैसा झालासि अतिथि, सुतपा ! हें
शिष्यकटक घेउनि बा ! तो हि कुरूत्तंस[2] पांडुसुत पाहें. १०
परि सुकुमारी कृष्णा जेवूं द्यावी, जपोनि धेनु[3] सती
दोहावी जाणा हें, सत्वमयी[4] ती तपोनिधे ! नुसती.' ११
श्रोत्यांच्या व्हावें बहु तप्त प्राशूनि ज्या वरा कानें,
मागीतला तसा वर सद्गुरुपाशीं हि त्या वराकानें. १२
तो मुनि 'अवश्य' ऐसें बोलोनि निघे, असाधुजन नाचे;
त्यातें पूजिति ते प्रियसख[5] त्या यदुवंशविहितजननाचे. १३
प्रार्थुनि धर्में मुनि तो स्नानासि सशिष्यकटक पाठविला,
त्या संकटीं सतीनें श्रितकल्पद्रुम मुकुंद आठविला. १४
स्वमनिं म्हणे ती कृष्णा, "श्रीकृष्णा ! धाव, पाव, नाश तदां[6]
ह्रीचा[7] होवूं न दिला, स्मरतें मज तें चि पावना ! शतदा. १५
सत्य असो जें म्हणती कवि भवसिंधूंत नाव नामा तें,
संप्रति चुडे भरावे त्वां करुनि श्रितजनावना[8] मातें. १६
नेसविता झालासि प्रेमें तूं करुनियां दया लुगडीं,
आतां चुडे भरीं बा ! आश्रय मज एक तूं दयालु गडी. १७
तुजहुनि इतरें कोणें वारावा क्षिप्र अंतराय[9] महा?
दंडील चि, साहेल न, देवा ! स्वल्पा हि अंतरां[10] यम हा[11]. १८
मग मत्स्वरूप[12] काय ? ब्राह्मण आले दुरूनि जेवाया,
त्यासि तुझी भगिनी हे, बा ! नमुनि जरि न म्हणेल 'जेवा, या.'
या मुनिकोपासि जसा लागे न पयाचिया[13] उता वेळ,

१. धैर्यवान्, जितेंद्रिय अशा पुरुषाला. २. कुरुकुलभूषण असा धर्म. ३. सतीरूप धेनु. ४. पुण्यनदी—**पंत.** ५. यदुकुलांत ज्यानें जन्म धारण केला त्या श्रीकृष्णाचे आवडते मित्र, पांडव. ६. वस्त्रहरणप्रसंगीं. ७. लज्जेचा. ८. आश्रित लोकांचें रक्षण. ९. विघ्न. १०. विलंबाला. ११. साक्षात् यम च असा हा दुर्वास. १२. माझें मोठेंपण तें काय राहिलें ? १३. दुधाच्या.

श्रीकृष्णजी! तुम्हीं मजवरि करुनि दया चि या उतावेळ."२०
स्मरतां चि ये प्रभु. दया सत्य सुरभि, भक्तवत्स लागावें
कासेसि याचिया चि, त्यजुनि सकळ, या चि वत्सला गावें.२१
ते काय, जे न केवळ भक्तवश पुरंदरादि[1] सुर भितरे?
ती ही काय, न आपण ही जी व्यसनार्णवांत सुरभि[2] तरे? २२
येतां चि दीनबंधुप्रति कळवी ती नमूनि आर्धीतें,
भगवान् म्हणे 'भुकेलों; सखि! वाढ मला असो चि, आर्धी तें.'
कृष्णा म्हणे, 'अहा! बा! वाढावें काय? गा! पहा, हातें
क्षाळूनि घातलेंसे आतां कीं पालथें अहाहा! तें[3]. २४
अन्न मद्दर्शनावधि[4] रविदत्तस्थालींत[5], मग नसे लव ही.
त्वद्दृष्टि सर्व जाणे, यमधर्माची असी नसेल वही.' २५
कृष्ण म्हणे, 'नर्म[6] पुरे; तर्पाया योग्य सर्व थालीला;
मीं च नव्हें काय? इची सखि! सुरभिसखी च सर्वथा लीला.
आण बरें, पाहों दे,' ऐसा आग्रह करूनि आणविली,
कृष्णेसि सत्सभेसि[7] स्थालीस हि बहु दया चि जाणविली.२७
त्या पात्राच्या कंठीं स्वल्प चि शाकान्न लागलें होतें;
सत्परिचयें[8] चि जड[9] ही समयीं सत्वासि जागलें हो! तें[10]. २८
तो यज्ञभुक्[11] तशा ही त्या शाकान्नासि वोडवी[12] पाणी[13],
कृष्णेकरवीं आपण सांगुनि संकल्पें[14] सोडवी पाणी. २९
प्राशुनि म्हणे प्रकट[15] हरि, 'विश्वात्मा देव तुष्ट हो येणें;'
हळु चि म्हणे, 'हे मुनि किति? घेवुनि शतकोटि दुष्ट हो! येणें[16].'

---

१. इंद्रादि. २. कामधेनु. ३. पात्र, स्थाली. ४. माझें भोजन होईपर्यंत. सूर्यानें दिलेल्या पात्रांत. ६. विनोद, थट्टा. ७. सज्जनसमुदायाला. ८. साधु-मागमाच्या योगें. ९. अचेतन. १०. तें पात्र. (स्थाली). ११. यज्ञभोक्ता. ीकृष्ण). १२. पुढें करी. १३. हात. १४. व्रतारंभीं देशकालास अनुसरून 'अमुक रणास्तव अमुक कर्म करितों' असा उच्चार करितात तो. १५. उघडपणें. ६. यावें.

कृष्णेसि म्हणे, 'बाई! बाहुनि आणीव विप्रकटकातें[1].'
ती सहदेवासि म्हणे, 'जा, जी! क्षुधित मुनिवृंद हटका[2] तें.' ३१
अघमर्षणीं[3] च तो मुनि झाला आकंठ तृप्त सहसा, जे
शिष्य अयुतमित होते, गर्भिण्यापरि[4] तयां हि सह साजे. ३२
जो तो हि पूर्ण चाळी[5] विप्र यथापूर्व नें वपु, ढेंकर [6]वी.
तृप्ति, प्रतिपदिं 'सोडूं छळ' हा संकल्प नव पुढें करवी. ३३
हरिला स्वजन[7] प्राणाधिक, तैसें वित्त हीं न लोभ्याला.
चिंतूनि अंबरीषच्छळपरिणाम[8] हि मुनींद्र तो भ्याला. ३४
ते शिष्य म्हणति, 'गुरुजी! न सुचे, कर्तव्य काय तें कळवा-'
गुरु त्यांसि म्हणे, 'मळवा यश, परि सत्वर पळा, मला पळवा-
म्यां आजिपासुनि शपथ करुनि नमस्कार सच्छला[9] केला,
[10]ईंग्वित न विषशलाका[11], टाकुनि कर्पूरसच्छलाकेला[12]. ३६
झालों गुरूदर[13] जशा अत्यासन्नप्रसूति[14] गरवारी[15],
सच्छळकर्म स्वल्प हि सद्यःक्षयहेतु जेंवि गर-वारी[16]. ३७
अस्मदुदरें सदन्नें न कळत अघमर्षणीं च कीं भरिलीं;
[17]विश्वंभरें सुरद्रुमचिंतामणिकामधुग्यशें[18] हरिलीं. ३८
काय गिळावें आतां? मज एक हि तुहिनपर्वताभ[19] सितें[20]:
मीं किति? करील कृष्णाकोपानळ तुहिनपर्वता भसितें[21]. ३९

---

१. ब्राह्मणसमुदायातें. २. बोलवा. ३. अघमर्षण=अखिल पापांचें क्षालन करणाऱ्या मंत्रांचा जप; तो करितां च. ४. गर्भिणींच्या समुदायाप्रमाणें. ५. हालवूं शकेना. ६. प्रसवे. (देई). ७. स्वभक्त. ८. अंबरीषराजाचा छळ केल्याचें फळ. ९. साधूंचा छळ करण्याचें सोडून दिलें. १०. दृष्टीला हितकर अशी. ११. विषयुक्त सळई. (डोळ्यांत अंजनादि ज्या काडीनें घालतात तिला 'सळई' म्हणतात). १२. कर्पूरयुक्त उत्तम सळईला. १३. मोठीं पोटें ज्यांचीं असे. १४. अति जवळ आला आहे प्रसूतिकाळ ज्यांचा अशा. १५. गर्भिणी. १६. विषमिश्रित उदक. १७. विश्वपालकें. (कृष्णानें). १८. कल्पवृक्ष, चिंतामणी आणि कामधेनु यांचीं यशें. १९. हिमालयपर्वतासारखे. २०. भाताचें शीत. २१. भस्म.

त्या श्रीमदंबरीषाहुनि धर्म तपोबळें नसे ऊन,
हा! मीं मंद चि केवळ, सच्छळगरळा जळेंन सेऊन. ४०
त्या पांडुसुतांमध्यें भीम महात्मा उदार बळसत्वें[1];
चारील मुष्टिमोदक, आतिथ्यासि न चुकेल अळसत्वें.[2]' ४१
ऐसें म्हणत चि पळतां प्रबळ भय चि होय बळद दुर्वास्या;
भासे लंबोदरसा[3] तो, गळत्या तज्जटा हि दूर्वास्या[4]. ४२
बंधु[5]कथित तीर्थतटग[6]विप्रश्रुततत्पलायनोदंत
मोही धर्मा; अहिचा शिरला हृदयांत काय तो[7] दंत? ४३
धर्म म्हणे, 'येईल स्पष्ट निशीथीं[8] छळार्थ दुर्वासा,
त्या दावाग्निपुढें या स्त्रीतनुसह मूर्ति शुष्क दूर्वा सी. ४४
त्वद्दास होय हा जन, बा! शुद्धदयासुधानदा! साचा,
सेवासादर असतां, छळ योग्य तुला बुधा! न दासाचा.' ४५
झाला होता सानुज[9] तो राजा धर्म चित्रसा सांधी[10];
सुयश, निशीथीं भेटुनि भक्तां पद्मांसि मित्रसा[11], सांधी[12]. ४६
देव म्हणे, 'मीं आलों कृष्णेपासीं मघां चि, मज्जन[13] हो!
चिंतितसें कीं, स्वप्नव्यसनीं हि क्षण तुम्हां न मज्जन[14] हो. ४७
कृष्णाचिंतेनें हें संकट[15] मज कळविलें, अगा राया!
आलों संरक्षाया धांवत मीं आपुल्या अगारा या. ४८
जरि तेजस्वितपस्विप्रवर[16] छळशील[17] दुःसह त्रिजगा
भ्याला त्वत्तेजाला, धर्मा! गेला पळोनि अत्रिज[18] गा!. ४९

---

१. बळरूप द्रव्यानें. २. आळशीपणानें. ३. गणपतीसारखा. ४. दूर्वांकुरासारख्या. ५. भावानें (सहदेवानें) सांगितलेली. ६. गंगातटाकीं असलेल्या ब्राह्मणांकडून ऐकलेली त्यांच्या (दुर्वासादिकांच्या) पलायनाची वार्ता. ७. तो उदंत= ती वार्ता. ८. मध्यरात्रीस. ९. सहा. (पांडव आणि द्रौपदी मिळोन). १०. संचित. ११. सूर्यसा (पक्षीं) लेह्यासारखा. (श्रीकृष्ण). १२. संपादी. १३. माझ्या भक्तानो! १४. बुडणें. १५. दुर्वासागमनरूप. १६. श्रेष्ठ. १७. छळ करण्याचा स्वभाव ज्याचा. १८. अत्रिमुनीचा पुत्र दुर्वास.

[१]अनळसमीहित साधी राया ! वारा महीवरा ! कामा,
अनळस मीं हि, तसा धीरा ! यावा राम ही वराका मा.' ५०
ऐसें बोलोनि करी स्वजनघनें[२]श्रीद यानें[३] दीपकसा,
भक्तांसि उपेक्षील व्यसनीं तो श्रीदयानें[४]दीप कसा ? ५१
कीर्ति न देता, देता जरि म्हणता श्रीमदत्रिज 'गदा द्या.'
सोसे स्वच्छळ, न सुहृच्छळकतपःश्रीमद[५] त्रिजगदाद्या.[६] ५२
धर्म म्हणे, 'मतिमति ! सति ! संसारामाजि अन्य कुणंगा[७] तों
केवळ अनिष्ट, परि हा बहु धन्य तुझा म्हणोनि गुण गातों. ५३
तुजविण न [८]दीपिके ! सति ! कृष्णे ! तरतों नयज्ञ हि तमातें;
करितों जऱ्हि, तऱ्हि गमती कृष्णेतर[९] तों न यज्ञ हित मातें. ५४
देव तुझा कैवारी, शुद्धें प्रेमें तुझ्या चि वळला गे !
दे धेनु दुग्ध धावुनि वत्सा, इतरा तदर्थ बळ लागे.' ५५

---

१. अन्वयार्थः—[हे] धीरा महीवरा राया ! अनळसमीहित कामा (अ- ग्नीनें इच्छिलेल्या कार्यास) वारा साधी, तसा मीं हि [तुझें इच्छित कार्य साधण्या- विषयीं] अनलस (निरलस—तत्पर) [आहे]. [या कामीं] राम (बळराम) ही यावा; [मग] मा वराका (लक्ष्मी—विजयलक्ष्मी क्षुद्र च आहे); [ती येईल च]. २. स्वजनांस विपुल संपत्ति देणारा. ३. प्रयाण. ४. लक्ष्मी आणि दयारूप नदी यांचा पति. ५. आपल्या मित्राचा छळ करणाऱ्या मुनीच्या तपो- लक्ष्मीचा गर्व. ६. त्रैलोक्यास आदि (मूळकारण) असलेल्या (श्रीकृष्णास). ७. एकत्र कुटुंबांतील स्त्रिया गुप्तपणें जें धन जमवितात तें. ८. मार्गदर्शिके ! (दीपिका=मशाल). ९. कृष्णभक्तीहून इतर यज्ञ.

अध्याय नववा.

राया[1]! धृतराष्ट्राचा प्रिय जामाता[2] विवाहकाम वनीं
आला, जयद्रथाख्य स्वबळभरें[3] कांपवीत ती अवनी. १
मृगयार्थ पांडुनंदन गेले असतां, निजाश्रमद्वारीं
होती उभी द्रुपदजा, जैसी शंपा[4] नवांबुभृद्वारीं[5]. २
तीतें पाहुनि झाला तो रावणसा चि पात्र अन्याया,
मित्रासि म्हणे, ' चित्ता हे चि बहुमता, नको चि अन्या यां[6]. ३
जा कोटिका[7] सख्या! तूं पूस तिचें वृत्त, होय मत्करगा
ऐसें आधीं चतुरा! साम[8] चि निजकार्यसिद्धिमत्[9] कर गा!' ४
सांगुनि निज वृत्त, तिचें वृत्त पुसे तीस कोटिक विहितसें[10],
स्वल्पांत ती हि सांगे, बोलों शकती न कोटिकावि हि तसें. ५
कळलें कोटिकवदनें ती कृष्णा स्वभगिनी असें नातें,
तन्हि भय न धरी लज्जेसह, पळ कामातुरीं असेना तें. ६
कृष्णेसि म्हणे, 'माझी राणी हो, लाजतीस कां? बस ये,
अंकावरि घेवूं दे, आइक सुखकर मदुक्त, थांब, सये! ७
राज्यच्युतसंगें[11] श्रमपात्र करिसि दिव्यदेह कां गे! हें?
श्रीमद्देह मिळाल्यां सेवावीं निर्धनें चि कां गेहें? ८
त्वां फेडिलें चि त्यांचें तत्संगें कृश करूनि देह रिण,
हो मद्दयिता, देइन मन तुज, गानासि जेंवि दे हरिण.' ९

---

१. हे जनमेजया! २. धृतराष्ट्राची दुःशला नांवाची कन्या सिंधुराज जयद्रथ यास दिली होती, म्हणून तो धृतराष्ट्राचा जामाता होय. ३. आपल्या सैन्याच्या भारानें. ४. वीज. ५. नूतन मेघसमुदायांत. (अंबुभृत्+वार=जलधरसमूह). ६. या मला. ७. हा शिबिदेशाधिपति सुरथराजाचा पुत्र आणि जयद्रथाचा मित्र. ८. सामोपचार. ९. आपलें कार्य तडीस नेणारें. १०. [पुसण्याला] योग्य असें. ११. राज्यभ्रष्ट पांडवांच्या संगतीनें.

कृष्णा म्हणे, 'कुबुद्धे ! खद्योतीं कीटकाधमीं मलिनीं
द्युमणि[1]प्रति सोडूनि प्रियभाव धरील काय रे ! नलिनी[2]? १०

क्षणमात्र स्वप्नीं ही वरिली कुशळेच्छुनें न विटलीला[3],
हे आवडली बहुधा त्वन्मतिला जीवनासि[4] विटलीला[5]. ११

स्पर्शीं च मृतिप्रद[6] हा[7] वीरपरिग्रहें, महाहिचा मणि कीं !
अंडघटीं[8] द्युमणिद्युति योग्या नांदावयासि कीं मणिकीं[9]? १२

त्यजितिल भट तुज समयीं, त्यजिति हरि[10] जसे नगासि[11] नगदाहें[12];
भीमप्रिया प्रियसखी[13] लव हि न साहेल लंघन गदा हें.' १३

कामांध खळ करीना, अन्य करी लेश तरि विवेक पिसा,
धांवोनि बळात्कारें 'हां हां' म्हणतां हि तो शिवे कपिसा[14]. १४

पावे व्यसन अनाथा, जाणों विजनांत[15] तापसी ते तें.
खळ दे तिला, जसा तो पापमति दशास्य ताप सीतेतें. १५

कृष्णेनें भाविनरकपाताच्या प्रत्ययासि जड[16] लाहो
म्हणउनि कृष्ट निजोत्तरपट[17] आसुडितां चि, दुष्ट पडला हो ! १६

धौम्यासि म्हणे, 'धांवा, मजला हें[18] मूर्त पातक विटाळी;
रक्षा मज कीर्तिस ही; कीं, स्वपरव्यसनपात कवि टाळी.' १७

पुनरपि कपिसा च पिसा क्षिप्र धरायास तीवर उंगारे[19];
तों धाउनि धौम्य म्हणे, 'न उठ धराया सतीवर, उगा, रे !' १८

ती नमुनि म्हणे मुनिला, 'न वदावें व्यर्थ, दुष्ट हा निपट[20],

---

१. सूर्यास. २. कमलिनी. ३. जारलीला. ४. जगण्यास. ५. कंटाळलेल्या (मतीला). ६. मरणदायक. ७. ही मी वीरपत्नि. ८. ब्रह्मांडरूप घटामध्यें. ९. मडक्यांत. १०. सिंह. ११. पर्वतासी. १२. वृक्ष–**पंत**. १३. माझी आवडती सखी (जी भीमाची गदा ती). १४. मर्कटासारखा. १५. अरण्यांत. १६. मूर्ख. (जयद्रथ). १७. [जयद्रथानें] ओढलेलें आपल्या अंगावरील वस्त्र. १८. हें जयद्रथरूप मूर्तिमंत पातक. १९. चवताळून येई, धाऊन येई. २०. अगदीं.

ओढिल तरि जीवन ही, पावेल न एक मात्र हानि पट. १९
भवदाज्ञेनें बैसो हे दुष्टरथीं वृकोदरगदासी.
न हरिप्रसादकविची आपन्ना खळवृकोदरग दासी.' २०
बसतां स्वरथीं हर्षे तो, जेंवि दशास्य जानकीलाभें,
धरि पररथासि ती, कीं, स्पर्शाया अंत्यजा न कीला भें. २१
ती बहु त्यासि दटावी, कार्पासा काय दापिना कीला?
काय बधेल पराला सती, त्यजुनि कांयदा पिनाकीला? २२
दुष्टरथासह धांवत धौम्य मुनीश्वर म्हणे, 'अगा राहो!
राहो मद, तूं न तया जौल्मत्वख्यातिच्या अंगारा हो. २३
जरि तूळराशिमध्यस्थबिळीं नेईल आखु वातीतें
तरि वाति आखुतें वा सहसा भक्षील आखु वा तीतें? २४
रे! तत्काळ चि साध्वीधर्षणकर, जन्हि महातपा, मरतो,'
धौम्य मुनि असें सांगे हित, परि जोडी न हात पामर तो. २५

---

१. प्राण देखील. (मला ओढण्यांत केवळ माझें वस्त्र च हानि पावेल, फाटेल असें नाहीं; तर याचें जीवन ही हानि पावेल, हा मरेल असा अर्थ). २. अन्वयार्थ—[हे धौम्य!] भवदाज्ञेनें (तुमच्या आज्ञेनें) हे (ही मी द्रौपदी) वृकोदरगदासी (भीमाच्या गदेप्रमाणें) दुष्टरथीं (दुष्ट जयद्रथाच्या रथांत) बैसो. (भीमाच्या गदेप्रमाणें माझ्या बसण्यापासून याचा नाश होईल असा भाव). [मी एकदां त्याच्या हातांत सांपडल्यावर सुटणें कठीण अशी शंका नको; कारण,] हरिप्रसादकविची (कृष्णकृपा हा च दैत्यगुरु, त्याची) दासी खळवृकोदरग (दुष्ट जयद्रथरूप लांडग्याच्या पोटांत गेलेली) [जरी होय तरी ती] आपन्ना (संकटग्रस्ता अर्थात् मृत) न (होणार नाहीं). येथें कचोपाख्यान अनुसंधेय आहे. ३. शुक्राची—**पंत.** ४. अतिशूद्राला. ५. अग्निशिखा—**पंत.** ६. कापसाला. ७. ज्वाला—**पंत.** ८. दक्षकन्या. (पार्वती). ९. अर्धांग देणाऱ्या. १०. अदूरदर्शित्वाच्या प्रसिद्धीच्या. ११. गृहा. १२. कापसाच्या राशीमधील बिळांत. १३. उंदीर. १४. अथवा. १५. पतिव्रतेची विटंबना करणारा.

कृष्णा हि म्हणे, 'काय न कापिल गिळितां [1]वृकानना [2]शस्त्री ?
वधि दशमुखा, मग करिल एकमुखाचा हि कां न नाश स्त्री ?'
अपशकुनज्ञ युधिष्ठिर समजोनि अनिष्ट सानुज परतला,
जो मृगयेंत न, चित्तें त्यजुनि दया रामनामजप, रतला. २७
तों मार्गीं [3]भृत्याची भार्या [4]धात्रेयिका चि आढळली.
धांवे, पडे हि [5]असकृन्[6]नगशिखराहुनि जशी शिला ढळली. २८
वृत्त कथुनि कोपानळ दीप्त करायासि [7]पांडुयोधमनीं
[8]सरला [9]सुवंशजा ती झाली धात्रेयिका चि, हो! [10]धमनी. २९
रिपुला गांठाया ते पांडव देती भरों न घटिकेतें,
[11]खळबळ बहु भी, जाणों न पळ हि साधूंपुढें अघ टिके तें. ३०
गांठिति रिपुकटकातें, हरिणांच्या सिंह जेंवि कळपातें,
रक्षील काय [12]पतिला तें व्यसनीं, होय [13]जें [14]विकळ [15]पातें? ३१
स्वरथावरूनि भूवरि उतरुनि देवीस, जरि हि [16]नाकद न
वरिलें पलायन खळें, कीं, न पहावे चि लोचना [17]कदन. ३२
धर्म स्वरथीं स्त्रीतें मुनितें घेउनि म्हणे [18]पुरोध्यातें,
'व्हा शांत, असें चि प्रिय राज्यश्रीमोचनें पुरो, [19]ध्या तें.' ३३
अर्जुन भीमासि म्हणे, 'न करावें व्यर्थ भीतभटकदन,
गेला पळोनि बहुधा दुष्ट जयद्रथ न दाखवी वदन.' ३४
भीम म्हणे, 'सपुरोहित राया! तूं आश्रमांत जायेतें
निववीं, तें चि करावें तेणें, जें स्वच्छ कर्म ज्या येतें. ३५
जा सहदेवा! नकुळा! तूं ही जा, यां तिघांसि सांभाळा,

---

१. लांडग्याच्या तोंडाला. २. शस्त्रधारी. ३. सेवकाची. ४. धात्रेयिका-नामक. ५. वारंवार. ६. पर्वताच्या माथ्यावरून. ७. वीर पांडवांच्या मनांत. ८. सरळ (पक्षीं) निष्कपट. ९. उत्तम कुळांत जन्मलेली (पक्षीं) वेळूपासून झालेली. १०. फुंकणी. ११. दुष्ट जयद्रथाचें सैन्य. १२. धन्याला. १३. जें कटक–सैन्य. १४. व्याकुळ. १५. पतन (पराजय) पावल्यामुळें. १६. स्वर्ग देणारें. १७. संहार. १८. पुरोहित धौम्यातें. १९. चिंतन करा.

लावावा गेलें धन येतां हातासि, बोलं[1] कां भाळा[2]? ३६
येतों आतां चि, नको साधाया शत्रुवध मला उशिर;
कृष्ण[3] असो[4]; जा आर्या[5]! त्वच्चरणा तो न अधम[6] लाउ शिर.'
धर्म म्हणे, 'रे! बा! त्या निज[7]भगिनीच्या न उग्र हो तिलकीं[8],
नित्य सुता[9]सौभाग्यक्षयशोकें पितर[10] साश्रु होतिल कीं.' ३८
कृष्णा म्हणे, 'अहो! जरि मत्प्रिय करणें, वधा चि तरि त्यातें;
मारावें चि नयज्ञें श्रीतें स्त्रीतें बळें चि हरित्यातें.' ३९
क्रोश[11]मितांतर असतां, बीभत्सु[12] म्हणे शरांस, 'कळवा जी!
आलों असें अरिस, तो दूर न जावा, वधा सकळ वाजी[13].' ४०
अर्जुन[14]नामांकितशरहत हय पाहूनि फार तो भ्याला,
कुंजनासि[15] कुजीवित[16] [15]ही प्रिय, जैसें पापवित्त[17] लोभ्याला. ४१
धावोनि त्यासि सार्जुन भीम महाबळ पळांत आटोपी,
ज्याचें चित्त म्हणे स्वक्रोधा, '[18]और्वा! खळाब्धि आटो, पी.'
अर्जुन म्हणे, 'उभा रे! सिंहत्व त्यजुनियां न कुतरा हो.
उत[19] राहो, क्षण पाहों, जा यमभट हो! तळीं न उतरा हो! ४३
रे! रे! जयद्रथा! हें योग्य नव्हे तुज पलायन, परत रे!
अभिमुख[20] मरोनि च तरे, पळतां न महाबलायन[21] पर तरे. ४४

---

१. दोष. २. कपाळाला. ३. अर्जुन–**पंत.** ४. [माझ्याबरोबर] असूं दे. ५. श्रेष्ठ धर्मराजा! ६. तो दुष्ट जयद्रथ तुला शरण न येवो; कारण तसें झालें तर तुला त्याची दया येईल, असा भावार्थ. ७. आपल्या बहिणीच्या. (दुःशलेच्या). ८. सौभाग्यतिलकीं. ९. कन्येच्या सौभाग्यक्षयानें (वैधव्यानें) झालेल्या दुःखानें. १०. धृतराष्ट्र, गांधारी. ११. कोसभर अंतर. १२. अर्जुन. १३. घोडे. १४. अर्जुनाच्या नांवानें चिन्हित अशा बाणानीं मेलेले. १५. मूळ पाठ–**बहु पापजीवित हि त्या.** १६. पापमय आयुष्य. १७. पापाचारानें मिळविलेलें धन. १८. [माझ्या क्रोधरूपी] वडवाग्ने! १९. अथवा [तें] राहो. (जयद्रथाला घेऊन जाण्यासाठीं येण्याची यमदूत घाई करीत आहेत असें पाहून अर्जुन त्यांना उद्देशून म्हणतो). २०. समोर लढत असतां. २१. मोठ्या बलाचें स्थान असा, मोठा बलवान्.

भीम रथावरुनि उडी टाकुनि धावुनि धरी तया अरितें.
वाटे, प्रभुचें भीमाकृति[1] खलबलदलनलब्धयश[2] अरि[3] तें[4]. ४५
व्यसनीं न पडेल कसा व्याघ्रबिळीं जो मदांध ओतुं निघे?
कीं पद्मराग[6] मानुनि जो पदरीं विंगळांसि[7] ओतुनि घे. ४६
बुकली भीम, बुकलिती जैसें यज्ञांत बोकडाला हो!
कीं तो साध्वीधर्षणदोषफळानुभव रोकडा लाहो[8]. ४७
विकळ जयद्रथ होतां, वारी धर्मानुजा[9] गुंडाकेश[10],
कीं तत्संत्सेव्यगुणा[11] कोप न दूषू, जसा गुडा[12] केश. ४८
भीम म्हणे, 'गुरुदुःखद तो[13] स्त्रीजितसा चि हा[14] दयाजित[15] कीं,
चालों न दे चि कर्मे मीं करितों जीं हितोदया जितकीं. ४९
हा धर्म दयाजित तुज योग्य सखा स्त्रीजिता दशरथा! रे!
शर सह्य पार जाता, हृदयीं च जनापवादशर[16] थारे[17]. ५०
वत्सा! जैसा तो गुरु होतोसि तसा चि तूं हि कां? पावें,
या पापातें पाहुनि सन्नयनें न, नरकें हि कांपावें. ५१
देवूं दे प्राणांतप्रायश्चित्त; स्वकीय हा नर कीं[19],
मूर्खा! सुहृत्[20] वसावा स्वर्गी चिरकाळ कीं महानरकीं?' ५२
वधसम विडंबन, असें समयीं च स्मरण शास्त्रपाटव[21] दे.

---

१. भीमाच्या आकाराचें. २. दुष्टांच्या सैन्यनाशापासून मिळविलें आहे यश ज्यानें असें. ३. चक्र, सुदर्शन. ४. तें भीमाचें कर्म. ५. बोका. ६. तांबड्या रंगाचें रत्न. (लाल). ७. निखाऱ्यांस. ८. मिळवो, लाधो, पावो. ९. भीमाला. १०. अर्जुन. (गुडाका+ईश=निद्राधिपति; ज्यानें निद्रा—निद्रारूप भ्रांति जिंकली आहे असा). ११. त्याच्या (भीमाच्या) सज्जनानीं सेवण्यास योग्य अशा [धर्मांशाधारकतारूप] गुणाला. (मागें ३८ वी आर्या पहा). १२. गुळा. १३. तो दशरथ [जसा] स्त्रीनें [कैकयीनें] जिंकिला तसा. १४. धर्म. १५. दयारूप बायकोनें जिंकिलेला. १६. लोकानीं दिलेलें दूषण हा च बाण. १७. स्थिर होतो. १८. धर्म. १९. कारण. २०. आप्तलग, संबंधी. २१. शास्त्रज्ञत्व.

अर्धेंदुशरें[1] त्याच्या माथां काढूनि पांच पाट[2] वदेः– ५३
"'मीं पांडवदास' असें स्वमुखें सर्वत्र बोलशील तरी
देईन जीवित तुला, तारी विपदब्धिमाजि शीलंतरी[3]." ५४
वंदुनि म्हणे जयद्रथ, 'ऐसें च म्हणेन मीं सदा साचें;
मारूं नका बुक्यानीं, रक्षावें जीवित स्वदासाचें.' ५५
ज्यापासूनि[4] धरावी प्रबळतराराति[5]च्या हि भी[6] मानें[7],
बांधुनि केतुस्तंभीं[8] खळ नेला स्वाश्रमासि भीमानें. ५६
प्रेषूनि कोटरेतें[9] प्रेम्यानें[10] जेंवि बाण राखविला,
तैसा चि निजाज्ञेनें जेणें तो त्या प्रभूसि[11] दाखविला. ५७
धर्म तशासि विलोकुनि भीमासि म्हणे, 'अगा! महाबाहो!
सोड, न विलोकवे मज, द्याया असु मृत्युला न हा बाहो[12].' ५८
भीम म्हणे, 'देवीला सांगा; ती जरि म्हणेल, सोडीन;
नाहीं तरि मीं याचा सत्यंचलकर्षि[13] पाणि[14] तोडीन. ५९
कां सोडितां? असो द्या; हा निजदासांत दास राबावा;
या कामहता[15] रक्षा[16] पायांचा द्या चि आसरा, बावा!' ६०
कृष्णा धर्मासि म्हणे, 'देवा! सोडावयासि सांगा, जी!
मज देखवे न शिवती निर्दयतेसह अकीर्ति आंगा जी.' ६१
धर्म म्हणे, 'रे साधो! जावूं दे, सोड, दे मला बा! हें;

---

१. अर्धचंद्राकृति बाणानें. २. डोक्यावरील केशांचे पाट काढणें हा एक शिक्षेचा प्रकार आहे. ३. सद्वर्तनरूप नौका. ४. ज्या भीमापासून. ५. अतिबलाढ्य शत्रूच्या. ६. भय. ७. गर्वानें, ताठ्यानें. ८. ध्वजस्तंभीं. ९. बाणासुराची माता, तीतें. १०. पुत्रप्रेमानें. (बाणासुर व कृष्ण यांचें युद्ध चाललें असतां बाणासुराचा पराभव होतो असें पाहून, त्याची आई कोटरा कृष्णापुढें नग्न उभी राहिली, त्या वेळीं कृष्णानें लाजेनें मान खालीं घातली; तेव्हां ही संधि साधून बाण युद्धांतून परतून आला, अशी कथा येथें अनुसंधेय आहे). ११. धर्मासि. १२. बोलावो. १३. सतीचा पदर ओढणारा. १४. हात. १५. मदनानें जर्जर केलेल्या. १६. राक्षसास. (नीच जयद्रथास).

जातें त्यजुनि भलेपण, न विटावें सुयश[1] तें, तया बाहें.’ ६२
भीम म्हणे, “‘मीं पांडवदास,’ असें तीन वेळ मोठ्यानें
हा खळ म्हणो; भल्याला विनवावें धरुनि पाय खोट्यानें.” ६३
धर्म म्हणे, ‘गा भीमा! तुज जरि आम्हीं प्रमाण, तरि सोडीं,
न वदें निष्ठुर कांहीं, अभयवितरणें[2] संदीड्य[3] यश जोडीं.’ ६४
भीमें, गुरुमंत्रवशव्याघ्रें[4] मृगसा चि, सोडितां, नमनें
धर्मासि करि, लवे वरि[5] मात्र शिरें, दुष्ट अंतरीं न मनें. ६५
नृप त्यासि म्हणे, ‘घ्याया भुजगीच्या झोंबता नर मणीतें
वांचेल, परि पराच्या चित्तें हि स्पर्शता न रमणीतें[6]. ६६
जा, यावरि न करावें पाप असें, मागतों मला दे हें;
जें कर्म धर्मशर्मद[7], त्यास चि संपादितो भला देहें.’ ६७
खळ न खळत्व त्यागी, जरि सामें गौरवूनि बोळविला,
लकुच[8] कटु चि अमृतकराकरवीं[9] ही शर्करेंत घोळविला. ६८
हरदर्शनार्थ गंगाद्वारीं तपतां तयां[10] कृपापर तो[11]
भेटोनि म्हणे, ‘घे वर, कष्टापासूनि मति नृपा! परतो.’ ६९
‘युद्धांत पंचपांडवपरिभव हो मत्करें’ असें च वदे,
प्रभुकर्णीं तें बहु कटु वच, जाणों गर[12] मुखीं रसें चव दे. ७०
शंभु म्हणे, ‘नारायणसख नर अर्जुन पुराणऋषि, तातें
धनसें, पाशुपत हि म्यां त्याशि दिलें, जेंवि अमृत तृषितातें.
मजपासीं तुज द्याया तद्भंगावह[13] असा नसे च वर;
हो मशकमक्षिकाहर, गरुडा उडवी असें नसे चवर[14]. ७२

---

१. सुयशाला–भलेपणाला बोलाव. (सुयश राख). २. अभयदानानें. ३. साधूंना स्तुत्य असें. ४. गुरूच्या मंत्रास वश झालेल्या वाघानें जसा मृग सोडावा तसा. ५. वरवर, बाह्यात्कारी. ६. स्त्रियेतें. ७. पुण्य व सुख देणारें. ८. निंबुणीचें फळ. ९. चंद्राकरवीं. १०. जयद्रथाला. ११. शंकर. १२. विष. १३. त्या अर्जुनाचा पराभव करण्यासारखा. १४. चवरी.

यश एकदा[१] चि अर्जुनरहितां चवघां रणांत भंगुनि घे;
मेरु असो, बहु हें ही, जरि लंघुनि कुळगिरींसि[२] पंगु निघे.' ७३
झाला गुप्त महेश्वर, तो बालिश मनुजदेव वेदा[३] त्या
प्रभुस हि विटवी मागुनि, जें तैशा[४] ही न देववे दात्या. ७४
मागावा कामाद्यरिपरिभववर[५] वरदनायका, परि तो
सत्परिभववर मागे, खळ न पराहित[६] निजाहित हि करितो.
स्वगृहा जाय जयद्रथ विसरुनियां दुःख तें परिभवाचें,
दासासमंजसत्वें[७] क्षोभे मन शांत ही परि भवाचें[८]. ७६

अध्याय दहावा.

मार्कंडेयासि म्हणे धर्म, 'बुडालों अगाध शोकांत;
सांगा मत्सम मदधिक जरि दृष्टश्रुत[९] असेल लोकांत.' १
त्या धर्माला श्रीमद्रामकथा[१०] सांग[११] होय परिसविता
भगवद्यश-कथिता[१२] चि त्रिजगद्बंधु[१३], न तमोघ्न[१४] परि सविता. २
इक्ष्वाकुकुलज[१५] दशरथ राजा, तत्कीर्ति विष्टपीं[१६] सुतता[१७],

१. एकवार. २. महेंद्र, मलय, सह्य, शुक्तिमान्, गंधमादन, विंध्य, पारियात्र या सप्त कुलपर्वतांस. ३. ज्ञानरूप शिवाला. ४. शंकरासारख्या दानशूरास हि. ५. कामादि षड्रिपूंचा पराभव व्हावा हा वर. ६. दुसऱ्याचें अहित. ७. भक्ताच्या (जयद्रथाच्या) असमंजसपणानें. ८. शंकराचें. ९. देखिलेला किंवा ऐकिलेला. १०. भारतीय रामायण व वाल्मीकि रामायण यामध्यें सर्वांशीं एकवाक्यता नाहीं; तसें च **पंतां**चें भारतीय रामायण व मूळ भारतीय रामायण यामध्यें हि वर्णनभेद दिसून येतो. ११. सर्व. १२. भगवंताची कीर्ति सांगणारा. १३. सूर्य. १४. अंधकारनाशक. १५. वैवस्वत मनूचा ज्येष्ठ पुत्र. १६. जगांत. १७. चांगल्या रीतीनें पसरलेली अशी.

स्वीकारिली तयाची साक्षातच्छ्रीप्राणवल्लभें[1] सुतता[2]. ३
कौसल्यासुत राम प्रभु, कैकेयीज कीर्तिला[3] भरत,
पुत्र सुमित्रेचे ते लक्ष्मण शत्रुघ्न कीर्तिलाभरत[4]. ४
एक चि देवें[5] चतुर्धा[6] यापरि त्या रविकुळांत अवतरला,
'यन्नामें विषपानॅव्यसनीं[7]' म्हणती कवींद्र 'भव[8] तरला.' ५
मुनिवर पुलस्त्य[9], तत्सुत वैश्रवण[10], त्यजुनि त्यां[11] दयानिधिला
पद्माला भृंग तसा तो नित्य भजे पितामहा[12] विधिला[13]. ६
सुत[14] पीडाया देहांतर घे तो ख्यात विश्रवा नावें,
रसिक कवीनीं त्याचें तें हि चरित अमृतमिश्र वानावें. ७
वरदें विधिनें दिधली वैश्रवणा अमरता[15] कनकलंका,
सख्य हि तेणें देवें[16] नाशी ज्याचें विलोकन कलंकीं[17]. ८
तो विश्रवा पिता न क्षोभावा म्हणुनि राक्षसी कन्या
सेवार्थ दे[18] तिघी[19] ज्या, त्या बहु आराधिती तया धन्या. ९
तो विश्रवा म्हणे 'वर मागा' ऐसें तिघींस हि, तदा त्या
सुत मागती प्रसन्ना मुनिला जोडुनि हात हितदात्या. १०
पुष्पोत्कटेसि दिधले सुत दशमुख कुंभकर्ण या नावें,
साधु बिभीषण मालिन्यात्मज, ज्या त्रिभुवनें हि वानावें. ११
खर शूर्पणखा झालीं दोन अपत्यें तिज्या हि राकेला,

---

१. लक्ष्मीपति श्रीविष्णूनें. २. पुत्रत्व. ३. कथिजेला, वर्णिला. ४. यशप्राप्तीविषयीं आसक्त. ५. विष्णु. ६. चार प्रकारानीं. ७. हालाहलनामक विषाचें सेवन केलें त्या संकटातून. ८. शंकर. ९. ब्रह्मदेवाचा मानसपुत्र. १०. विश्रव्याचा मुलगा, कुबेर. ११. पुलस्त्याला. १२. आज्याला. १३. ब्रह्मदेवाला. १४. मुलगा (कुबेर). (मुलानें आपणाला सोडून ब्रह्मदेवाची आराधना केली म्हणून संतापून पुलस्त्यमुनीनें स्वतः तपःसामर्थ्यानें अन्य देह धारण केला. त्याचें नांव 'विश्रवा' असें प्रसिद्ध आहे). १५. देवत्व. १६. त्या देवाशीं. (शंकराशीं). १७. दोषा. १८. कुबेर दे. १९. पुष्पोत्कटा, राका व मालिनी.

ज्यांहीं लज्जित दावुनि हृत्काठिन्या[1] निज्या हिरा केला. १२
एका काळीं धनपति पाहुनि ते दशमुखादि तळमळले,
साधूत्कर्षासहनत्वें[2] केव्हां कोणते न खळ मळले? १३
शुभकाम बिभीषण, दशमुख कुंभश्रुति[3] कुकाम हे भारी,
तप करितां भय देती विघ्नांसि[4], जसे वृकां मंहेभारी[5]. १४
खर शूर्पणखा त्यांची सेवा करिती जपोनि, धीरानीं
आराधिला तपें विधि, न तसे तपले तपोनिधी रानीं. १५
एकसहस्राब्दांतीं[6] शिर दशवदनें स्वयें चि कापावें,
तें होमूनि, म्हणावें, 'पद्मभवा[7]! वरदनायका! पावें.' १६
भेटे प्रसन्न विधि त्या दशकंठा कापितां चि दशमातें[8],
वारुनि म्हणे, 'म्हणोत न या कर्में निर्दय त्रिदश[9] मातें. १७
वर एका अमरत्वावांचुनि देतों समस्त; माग मला,
वत्सा! वद; हें तप गुरु भार मंज[10] तुझ्या गुरूत्तमा[10] गमला. १८
येतिल शिरें, विरूप न दिससिल, होसील कामरूपधर[11];
जेता[12] रणीं अरींचा, स्थैर्यें जैसा महीध्रभूपधर[13].' १९
रावण म्हणे, 'प्रभो! मीं सादर ऐसा तपीं असें देहें,
अमरत्व न देसी जरि तरि मजला मागतों असें दे हें[14]. २०
असुर-सुर-यक्ष-राक्षस-किन्नर-गंधर्व-सर्प-भूतगणें
मत्परिभव न करावा, हे माझ्या शासनांत भू तगणें.' २१

---

१. हृदयाच्या कठोरपणाला. २. सज्जनांचा उत्कर्ष सहन न झाल्यामुळें. ३. कुंभकर्ण. (श्रुति=कर्ण). ४. विघ्नांला च भय देतात. ५. मोठ्या हत्तीचे शत्रु (सिंह). ६. एक हजार वर्षांचे शेवटीं. ७. कमलोद्भवा! (ब्रह्मदेवा!). ८. दहाव्या शिरातें. ९. ज्यांना सदा तिसरी दशा (यौवन) असतें ते, देव. १०. ह्या श्रेष्ठ गुरु अशा मला. ११. इच्छित रूप धरणारा. १२. जिंकणारा. १३. (महीध्रवत्-**पंत.** पृथ्वीला धारण करणाऱ्या मेरुपर्वताप्रमाणें राजांना धारण करणारा. राजाधिराज). १४. पुढीलप्रमाणें.

ब्रह्मा म्हणे, 'मनुष्यांवांचुनि जे कीर्तिले तुवां सारे,
यांपासूनि नसो भय, परि न नरां वानरांसि हांसा रे!' २२
घटकर्ण महानिद्रा मागे जोडूनि हात दात्यातें,
मंदा सुरद्रु झोळी, तैसी दे ती च हा तदा त्यातें. २३
'परमापदेंत[1] ही मति धर्मीं च रतो, अशिक्षित[2] चि देवा!
ब्रह्मास्त्र हि स्फुरो[3], हें द्या गुरुजी! साधुची घडो सेवा.' २४
मागे असें बिभीषण, त्यासि म्हणे ब्रह्मदेव, 'वत्सा! हें
घे, अमर हि हो, व्हाया सुयश ब्रह्मण्यदेववत्[4] साहें.' २५
विधि वर देवुनि जातां, करुनि रणीं कीर्तिहानि धनपतितें,
प्रथम पराभावेलें त्या दशकंठें[5] व्हावया निधन पतितें. २६
पुष्पकविमान[6], लंका हरितां, धनपति म्हणे, 'कुलकलंका!
त्रासें[7] संप्रति, हर्षें मग, पोषू त्वत्क्षयें पुलक लंका. २७
मल्लोचनीं निरखिलें बहु, परि कुतरा चि यागग[8] न यांनीं[9],
योग्य नव्हेसि बसाया, पापा! तूं तेंवि यां गगनयानीं[10]. २८
वाहेल तुज न पुष्पक, जो तुज मारील त्यासि वाहेल,
करितोसि गुर्वतिक्रम, परि हरि[11] या दुर्मदा न साहेल.' २९
शापुनि धनप मनिं म्हणे, 'अनयीं[12] हा शक्तिसंपदंध[13] रतो.'
परिभवुनि अग्रजातें[14] लंकापति होय पंक्तिकंधर[15] तो. ३०

---

१. मोठ्या आपत्तीमध्यें. २. ब्रह्मास्त्र शिकविलें नाहीं तरी. ३. उपदेशावांचून प्राप्त होवो. ४. ब्राह्मणांचें रक्षण करण्याविषयीं कुशल अशा भगवान् विष्णूप्रमाणें सहनशील हो. (विष्णूनें भृगुलत्ताप्रहार सहन केला या कथेकडे येथें कटाक्ष आहे). ५. पापी दशकंठानें. ६. पुष्पक हें कामगामी विमान कुबेराला तपोबळानें मिळालें होतें. ७. अन्वयार्थ—लंका संप्रति त्रासें पुलक (रोमांच) पोषू [व] मग त्वत्क्षयें (तुझ्या नाशानें) हर्षें पुलक पोषू. ८. यशांत जाणारा. ९. या लोचनानीं. १०. पुष्पक विमानांत. ११. विष्णु. १२. अन्यायामध्यें. १३. बल आणि संपत्ति यानीं अंध झालेला. १४. कुबेरातें. १५. पंक्ति (दहा) आहेत कंधरा (कंठ) ज्याला तो, रावण.

केवळ विशृंखळ खळ छळ[1]बळजळनिधि दशास्य तो यत्नें
आक्रमुनि सुरासुरनरनागवरांतें हरी धनें रत्नें. ३१
लोकविनाशकरत्वें 'रा[2]वण' हें नाम पावला खळ[3]धी,
पळ धीरवीरहृदया स्वास्थ्य न दे तो कुबुद्धिचा जळधी. ३२
जावूनि सत्यलोकीं ब्रह्मर्षि सुरर्षि सि[4]द्ध बहुधा त्या
पीडा पा[5]वकवदनें कळविति 'हा! हा!' म्हणोनि बहु धात्या.
ब्रह्मा म्हणे, 'सुरासुर साहेल रणांत त्या न मत्तातें,
तन्नाशार्थ तर[6]णिकुळ केलें जन्मोनि धन्य मत्ता[7]तें. ३४
क्यां विनविला स्वगुरु कीं हो नररूप न म्हणोत तापस 'हा!'
प्रभु झाला दशरथसुत, करिल सुखी, स्वल्पकाळ ताप सहा.'
ब्रह्मा शक्रासि म्हणे, 'प्रभुला व्हाया सहाय ऋक्षींतें[8]
द्या का[9]मरूपबळ सुत, करिजे जें चंद्रकार्य ऋक्षीं[10] तें. ३६
अमितबळ सुरसुतांतें क्षिप्र प्रसवोत वानरी, हित [11]मीं
कथितों, प्रभुदास्यरता प्रजा न ज्यां बुडति त्या नरी हि तमीं.'
सुरकार्यसिद्धि व्हाया गंधर्वी दुं[12]दुभी हि आठविली,
युक्ति पढवुनि प्रभुनें कैकेयीच्या समीप पाठविली. ३८

---

१. कपट आणि सामर्थ्य यांचा समुद्र च असा. २. रावयति–भय दाखवितो तो, रावण. ३. दुष्टबुद्धि असा. ४. देवविशेष. ५. अग्निमुखानें. ६. सूर्यवंश. ७. माझ्या बापानें. (विष्णूनें). ८. आस्वलींतें. ९. इच्छेप्रमाणें रूप आणि बळ आहे ज्यांस असे. १०. नक्षत्रानीं. (नक्षत्रें ज्याप्रमाणें चंद्राला साहाय्यभूत होऊन त्याचें कार्य करितात त्याप्रमाणें ऋक्षानीं प्रभुकार्य करावें). ११. देवांच्या मुलानीं मृत्युलोकीं जन्म घ्यावयाचा च तर वानरींच्या पोटीं घेण्यापेक्षां मनुष्यस्त्रियांच्या तरी पोटीं घेतलेला बरा, असें कोणी म्हणेल तर, ब्रह्मदेव म्हणतो, ज्यांना प्रभुदास्यरता प्रजा (संतति) नाहीं त्या नरी हि (मनुष्यस्त्रिया असल्या तरी सुद्धां) तमीं (अज्ञानांधकारीं) बुडतात. तुम्हीं प्रभुदास्यरत असल्यावर वानरयोनींत हि जन्म घेण्याचें तुम्हांला भय वाटावयास नको, असा भावार्थ. १२. एक गंधर्वस्त्री.

कामबळ कामरूप त्रिदशांचे वानरर्क्षतनु[1] सुत ते
दुःसह, अलंघ्य सकळां, कल्पांतींचे जसे जलधि उतते[2]. ३९
निर्मुनि अपत्य, हर्षे सर्व हि शक्रादिदेव तो, कपिसें.
हरिदास्य यल्ललाटीं[3] धन्य चि तें जन्हि असेल तोकें[4] पिसें[5]. ४०
काळीं दुस्स चरांजननगशिखरेंशीं[6] विवूनि आसविलें,
देवांहीं हिमगिरिला क्षीराधिला[7] स्वयश तुच्छ भासविलें. ४१
देहें कुब्जा[8], नामें झाली ती मंथराभिधा[9], नातें
कैकेयीसीं लावी साधाया कार्यसंविधानातें[10]. ४२
श्रीगाधिजमुनि[11] ध्याया सत्कविवृंदासि सुमहिमा गाया
दशरथमधुपाप्रति ये प्राप्तसुतसुरद्रुसुम[12] हि मागाया. ४३
'दे रामलक्ष्मण मखत्राणार्थ[13]' असें तयासि तो यांची[14],
ओपी नृप, जेंवि पितां[15] निजपात्री मरुपथांत[16] तोयांची[17]. ४४
तो अतिथि तृप्त सुखें अर्पुनियां तें स्वताट केला, हो!
जातां पथीं मुनि म्हणे, 'रामा! सद्गतिदे[18] ताटकेला[19] हो.' ४५
तीतें त्या मुनिवचनें मारी तो, न रघुराज नय शोधी;
कीं, जो गुर्वाज्ञापर[20] सर्व हि होतो खरा जन यशोधि[21]. ४६
मुनिदत्तास्त्राशीर्धन[22] जोडुनि सिद्धाश्रमासि तो पावे,
मारी मखघ्न राक्षस, कीं, संत खळांपुढें न लोपावे. ४७

---

१. वानर आणि आस्वल यांच्या देहातें धरणारे. २. उतास आलेले. ३. ज्याच्या कपाळीं (दैवीं). ४. बालक. ५. वेडें. ६. जणुं काय संचार करणाऱ्या कज्जल पर्वतांचीं शिखरें च अशीं. ७. क्षीरसमुद्रास. ८. कुब्जेप्रमाणें शरीरानें तीन ठिकाणीं वांकडी. ९. मंथरा नांवाची. १०. [देवांच्या] कार्यभागातें. ११. विश्वामित्रऋषि. १२. प्राप्त झालेलें पुत्ररूप कल्पवृक्षाचें पुष्प. १३. यज्ञरक्षणासाठीं. १४. मागे. १५. पीत असतां. १६. मारवाड देशांतील मार्गांत. १७. पाण्याची. १८. उत्तम गति देणारा. १९. ही सुकेतु यक्षाची कन्या व सुंदराक्षसाची स्त्री. २०. गुर्वाज्ञेविषयीं तत्पर. २१. यशस्वी. २२. विश्वामित्रानें दिलेलें जृंभकास्त्र व आशीर्वादरूपी धन.

जनकमखाप्रति जातां श्रीराम करूनि वंदन वदान्या[1]
त्या गुरुसि म्हणे, 'आम्हां भागाल[2] असें कदापि न वदा, न्या.'
गाधिज रामाकरवीं मार्गीं गौतमसतीसि[3] उद्धरवी,
मानी तत्पादास[4] स्वकरसहस्रापरीस[5] शुद्ध रवी. ४९
मुनि जनकासि म्हणे, 'हो! जें हरितें धन्विगर्व[6] यो[7] धनु तें.'
आणवितां चि उचलिलें रामें शर्वादिसर्वयोधनुतें[8]. ५०
गुण जोडूनि सलीलें[9] प्रभुनें आकर्षितां चि भंगे तें,
तद्रव[10] न मुनिसभेस चि कंपवि विभुमूर्धगा[11] हि गंगेतें. ५१
होता कठिन पण, पण[12] प्रभु पुरवुनि होय जानकीजानी[13],
झाले उदश्रु[14], धरिली होती हृदयांत जानकी ज्यानीं. ५२
जनकें चवघी कन्या[15] दिधल्या रामासमेत चवघांस,
ते दृष्टिस देति, तसे अमृताचे हि न जिभेसि चव घांस. ५३
भग्नगुरुधनुर्ध्वानश्रवणें[16] भार्गव[17] धरूनि ये कोपा,
स्वप्नीं हि पराभविला जो न क्षत्रें करूनि येकोपा[18]. ५४
आला म्हणत असें कीं, 'विजयश्रीचा असें चि नवरा मीं;'
परि त्या चालेल अनवरामाचें[19] तेज काय नवरामीं[20]? ५५
श्रीरामाला दशरथ द्यावें युवराजपद असें योजी,

---

१. दानशूर अशा. २. श्रमाल, थकाल. ३. गौतमऋषीची स्त्री अहल्या, तिला. (इंद्राशीं व्यभिचार घडला म्हणून पतिशापानें ही शिला झाली होती). ४. रामचरणास. ५. आपल्या हजार किरणांपेक्षां. ६. धनुर्धरांचा गर्व. ७. येवो. ८. महादेवादिक सर्व योद्ध्यांनीं स्तुत अशा. ९. सहज, लीलेनें. १०. त्या धनुष्यभंगाचा आवाज. ११. शिवाच्या मस्तकावर असलेल्या. १२. परंतु. १३. जानकी जाया ज्याची तो. (राम). १४. रोदनयुक्त. १५. सीता रामास, मांडवी भरताला, श्रुतकीर्ति शत्रुघ्नाला आणि ऊर्मिला लक्ष्मणाला. १६. मोडलेल्या शिवधनुष्याच्या ध्वनीच्या श्रवणानें. (शिव हा भार्गवाचा गुरु). १७. भृगुकुलोत्पन्न परशुराम. १८. एकी. १९. म्हाताऱ्या रामाचें. (परशुरामाचें). २०. तरुण दाशरथी रामाचे ठायीं.

गुरु सचिव म्हणति, 'इच्छित होतों कीं हें चि तव मना यो जी!'
अभिषेकनिश्चय करुनि करवी साहित्य सर्व हि तदा, तें
वाटे न मंथरेच्या चि मना आनंदपर्व हितदातें[1]. ५७
ती कैकेयीस म्हणे, 'दासत्व तुझ्या सुतीं न यो, ध्या[2] हो!
कल्याण कुमाराचें, भवदाज्ञावर्तिनी[3] अयोध्या हो. ५८
विश्वास काय यांचा? सुविषम होताति नर सदा सम ही,
गुर्वनुमतें[4] अनुसरण करुनि मग विटेल न रसदास[5] मही[6]. ५९
दायाददास्यदहनीं[7] वेड्ये! करिसील आज्य[8] भरतातें,
होसिल विपक्षदासी[9], देतां रामासि राज्यभर तातें.' ६०
ज्या प्रभुला[10] धन्य म्हणत होत्या कविसाधुसुरसभा, केला
वश तो कैकेयीनें, घेउनि, बोलोनि सुरस, भाकेला. ६१
'वर माग' असें म्हणतां, मागे प्रिय काम[11] हा शुभरततातें[12],
'द्या चवदा वर्षें वन रामातें, राज्य आशु[13] भरतातें.' ६२
कैकेयीच्या आलें जों ऐसें दारुणोक्त तोंडास,
त्या दशरथहृदयाचा घे मोहमहाभुजंग तों डास. ६३
वरदानवृत्त परिसुनि वदला तो[14] यापरि स्वजन-कवच,
'हो राजभ्रष्ट तनुज' परि सत्यभ्रष्ट न स्वजनकवच[15]. ६४
संत म्हणति, 'संततिहुनि संसारीं प्राज्य सार सत्या[16] गी[17],'
ती गुरुची न मळाया राममधुप[18] राज्यसारस[19] त्यागी. ६५
जनकादिगुरुजनातें वंदुनि रघुवंशपद्मभानु[20] निघे,

---

१. हितकारक. २. ध्यान करा. ३. तुझ्या आज्ञेप्रमाणें वागणारी. ४. दशरथाच्या संमतीनें. ५. प्रेम देणाऱ्या—करण्याला पर्ताला. (रामाला). ६. पृथ्वी. ७. भाऊबंदाच्या सेवारूप अग्नींत. ८. तूप. ९. सवतीची दासी. १०. दशरथाला. ११. मनोरथ. १२. मंगलकार्यांत रममाण अशा दशरथातें. १३. लौकर. १४. राम. १५. आपल्या बापाचें भाषण. १६. खरी. १७. वाणी, भाषण. १८. रामरूप भ्रमर. १९. राज्यरूपकमळ. २०. रघुकुळरूप कमळाचा सूर्य.

वनवासातें परमानुग्रह ऐसें मनांत मानुनि घे. ६६
लक्ष्मण निघे पदाधिक[1] जाणुनि तत्पाद[2]सुपरमाणूस,
त्यजिल गुरुभजन कैसें हें आयकिल्या हि उपर माणूस? ६७
श्रीराम म्हणे 'मदधिक गुरुचरण[3] त्यजुनि काय निघसी ते?'
लक्ष्मण म्हणे, 'भजावे[4] गुरुचरण, त्यजुनि काय, निघ सीते!' ६८
सीता म्हणे, 'त्यजावी हे न, न चपळेस[5] ही वनद[6] सोडी,
यद्यपि झडती[7] जड[8] ती, आपण उबगे[9] पटास न, द[10]सोडी.' ६९
जाय प्रसन्नवदन श्रीराघव अकृतकुत्स[11] वनवासा,
कीं मानिला प्रभुमनें तो देसवटा[12] हि उत्सव नवासा. ७०
भेदूनि काळिजाला गेला लोकापवादशर; थानें
शिशुसा, रामें त्यजितां, त्यजिले स्वप्राण त्या दशरथानें. ७१
दूत प्रेषुनि मातुळनगराहुनि भरत शीघ्र आणविला,
कैकेयीनें स्वमुखें सर्व हि वृत्तांत त्यास जाणविला. ७२
भरत म्हणे, 'शिव! शिव! इह[13] केयमपूर्वेदृशी कुशीला? हा!
वत्सा! शत्रुघ्ना! वद, ही ती, आला जिच्या कुशीला हा?
जा वेड्या![14] [15]तसि च दिसो; दुर्वृत्ता राक्षसी च हे तीची
आकृति धरिली बरवी वर, वीरा! आंत आलि[16] [17]हेतीची. ७४
गेलां विचार न करुनि केंवि? अहो! पुष्कराक्ष[18]! सीमा या

---

१. राज्यपदापेक्षां अधिक. २. रामचरणाच्या उत्तम धूलिकणास. ३. पितृचरण. ४. रामाच्या म्हणण्याकडे लक्ष न देतां लक्ष्मण सीतेला च म्हणतो कीं, तूं गुरुचरण (पतिचरण) शरीर त्यजुनि हि भजावे; [यासाठीं] सीते! [तूं आम्हांबरोबर वनवासाला] निघ. ५. विजेस. ६. जलद, मेघ. ७. झडत्ये. ८. अचेतन. ९. कंटाळे. १०. वस्त्राची दशी. ११. ज्यानें निंदा केली नाहीं असा. १२. वनप्रदेश. १३. इह का इयं अपूर्वा ईदृशी कुशीला? हा! =ही येथें कोण अशी अपूर्व दुष्ट स्वभावाची? हिला धिक्कार असो! १४. तुला कांहीं समजत नाहीं. १५. माझी आई कैकेयी, तिच्यासारखी च ही दिसो; [परंतु]. १६. सखी. १७. शस्त्राची. (तरवारीची). १८. कमलाक्ष रामचंद्र!

तुमच्या साधुत्वाची, माय न हे शुष्क[1] राक्षसी माया. ७५
वरिली कां हे निजकुळसर[2] व्हाया शुष्क राक्षसी तातें?
जेणें गुरुहानि, करिति कां लक्ष्मण पुष्कराक्ष सीता तें? ७६
गे! कौसल्ये! माते! दायादत्वें[3] न साच हा रामीं,[4]
घेइन टाकुनि चिंतामणिहार कळोनि काचहारा मीं? ७७
आण तव पदाची मज, अवगत नव्हता चि हा विनाशपथ,
त्यागीन प्राणांतें, जरि तुज मच्छुद्धि दाविना शपथ.' ७८
कौसल्या त्यासि म्हणे, 'वत्सा! तुज तों असें न वाटावें,
बा! ठावें त्वन्मन मज; सर मीनाच्या मतें न आटावें. ७९
एकात्मे साधु तुम्हीं, ऐसे तों ऐकिले हि न भ्राते;
जे इतर, सहज विषयास्तव बहु घेती करूनि बभ्रा ते. ८०
कैकेयीच्या मतिचें कृत्य न मन्नियतिचें[5] चि तांता[6]! तें;
बहु दुःख हें, त्यजुनि मज आपण वरिली तुझ्या चितां तातें.
वत्सा! भरता! ज्यांचा मार्दवलेश हि नसे चि नवनीतीं
वत्सांचीं पदपद्में कैसीं भ्रमतील निर्जनवनीं तीं?' ८२
करुनि क्रिया पित्याची गेला तो श्रितभवाब्धिसेतुकडे,[8]
पौर सचिव हि, अयाचे[9] सच्चुंबकमणिकडे[10] जसे तुकडे. ८३
धावुनि गळां चि पडली होती जी राज्यभू,[11] तिला भरत
झिडकारूनि निघे, कीं, रामपदप्राज्यभूतिलाभरत.[12] ८४
रामासि चित्रकूटीं, जैसा गाईस तर्णक[13] वनांत
भेटे, निवे तदुटजीं,[14] या ज्यापरि रसिककर्ण कवनांत. ८५

१. निर्द्रव. (निर्दय). २. स्वकुळरूपी सरोवर. ३. भाउबंदकीमुळें. ४. मीं. ५. माझ्या दुर्दैवाचे. ६. बाळा! ७. सरण. ८. आश्रितांस संसारसमुद्रावरील सेतूप्रमाणें असलेला जो [राम] त्याकडे. ९. लोखंडाचे. १०. चांगल्या लोहचुंबक मण्याकडे. ११. राज्यभूमी [ही च स्त्री]. १२. [तो भरत] रामचरणरूपी मोठ्या ऐश्वर्याच्या लाभाचे ठायीं रत [होता]. १३. वत्स, वासरूं. १४. त्याच्या (रामाच्या) झोंपडींत—पर्णकुटिकेंत.

रामपदीं भरत मिठी घाली क्षत[1]कंटकीं, तदपि त्याचें,
तें[2] मानें[3] तन्मतिला, निष्[4]कंटक हि न रुचे पद[5] पित्याचें. ८६
अंकीं घेउनि रडत्या निजशिशुतें, पुसुनियां वदन, तातें
जें सुख द्यावें, दिधलें श्रीरामें तें चि त्या पदनतातें. ८७
हे बंधु स्नेहामृतरत सुरसिक, अमृतरत न सुरसिक ते;
न कदापि अर्थशास्त्रें कविगुरुपासूनि असुर सुर सिकते. ८८
भरत कथी स्वागमना[6]वधि तैलीं तातकाय होता तें.
राम म्हणे, 'हा! त्यजिले मच्छोकें प्राण काय हो! तातें? ८९
हा तात! हा नृपोत्तम! हा वत्सळ! हा प्रभो!' असें चि रडे,
प्रभुचें गुरुशोकभरें हृत्कंज[7] महोपळें[8] तसें चिरडे. ९०
यच्चरण[9]सरित्तटमृतसुकृतें [10]गोचें हि न करकंज[11] लिही,
तो स्मृतिनें[12] अमृत[13] दिलें ज्या[14], त्या दे पिंड, तिळ हि अंजलि ही.
प्रार्थुनि तो भरत म्हणे, 'अमृतरस हि मज तुम्हांविना कुंचला[15],
काढा क्षिप्र अयोध्याहृद्गत[16]निजविरहवज्रशंकु, चला. ९२
राज्यश्रीस वळविता तूं, जेंवि इभीस[17] अंकुश तसा च,
मृगराज[18] तूं, त्वदाज्ञाकर आम्हीं सर्व रंकुशतें[19] साच.' ९३
श्रीराम म्हणे, "वत्सा! वेदोक्त तसें गुरूक्त[20] सन्मा[21]हित,
त्वां म्यां हि चालवावें, या रविवंशीं तरी च जन्महित. ९४

---

१. मोडले आहेत कांटे ज्यांत अशा रामपदीं. २. क्षतकंटक पद. ३. मान्य झालें, आवडलें. ४. शत्रुरहित असें. ५. राज्यपद. ६. आपण [आजोळाहून] येईपर्यंत. ७. हृदयकमल. ८. मोठ्या दगडानें. ९. ज्याच्या चरणसंबंधी नदी-(भागीरथी)-च्या तीरीं मरण पावलेल्या जनांचीं पुण्यें. १०. सरस्वतीचें. ११. हस्तकमल. १२. [आपल्या नाम]-स्मरणानें. १३. मोक्ष. १४. ज्या दशरथाला. १५. काजरा. (एक विषारी बी). १६. अयोध्येच्या हृदयीं गेलेला तुमच्या विरहरूप वज्राचा खिळा. १७. हत्तिणीस. १८. सिंह. १९. शेंकडों मृग. २०. पितृ-वचन. २१. सन्मान्य.

न मिळे गुरूक्त[1]धनुसीं जो गुण[2], तो व्यर्थ लाख वावें हो.
वचन करुनि परलोकीं तरि सुख जनित्यासि[3] दाखवावें हो! ९५
व्यसनीं बुडों दिलें निजजीवित हि, बुडों दिलें न यश तातें,
वत्सा! पहा विचारुनि हें चि सुसंमत असे नयशतातें. ९६
साकेतीं[4] वस, मज हें दे, मीं च वनीं असेन, चवदावें
सरतां चि येइन, उगा, कोण्ही हि 'नको' असें न च वदावें."
भरत म्हणे, 'तरि हें श्रीपदयुग[5] संपादु काम हा, यास[6]
न शिवो देवूत, पदीं बैसुनि या पादुका, महायास[7]. ९८
तें सिंहासन भूषित या श्रीमत्पुण्यपादुकानीं[8] हो;
कीं, यांच्या[9] बहु यश नय तेज सुकृत[10] शिवें[11] कृपा दुकानीं, हो!'
सौवर्णी[12] मणिखचिता[13] भरतकरें प्रभु पळार्ध ज्या त्याला,
त्या पादुका दिल्या त्या भक्ताला भक्तिनें चि ज्यालयाला[14]. १००
सांत्वुनि निजजननीजन सर्व सचिव पौर गुरु सखे दास
प्रेषुनि[15] पुरीप्रति, प्रभु मानी सुख वननिवासखेदास. १०१
नंदिग्रामीं, होउनि वल्कजटाधर, वसे, परतला जो,
प्रभुसि न आणुनि तो श्रीमदयोध्येला न कां भरत लाजो? १०२

अध्याय अकरावा.

प्रभु चित्रकूट टाकुनि, राहे गोदावरीतटीं उटजीं,
मानससरःसरसिरुहवनवासी[16] हंसवर जसा कुटजीं[17]. १

१. पितृवचनरूपी चापासीं. २. धनुष्याची दोरी. (गुरुवचनरूपी धनुष्यासीं जो गुण मिळता होत नाहीं तो शेंकडों वावे लांब असला तरी व्यर्थ होय, असा अर्थ). ३. बापास. ४. अयोध्येंत. ५. आपलें पादद्वय. ६. या भरताला. ७. मोठे कष्ट. ८. आपल्या पवित्र पादुकानीं. ९. या पादुकांच्या. १०. पुण्य. ११. कल्याण. १२. सुवर्णनिर्मित. १३. रत्नजडित. १४. जगलेल्याला. १५. पाठवुनि. १६. मानससरोवरांतील कमलवनांत राहणारा. १७. कुड्याचे झाडावर.

वरि शोभवूनि कपटें वपु जें मळमूत्रमणिक[1] रंडा तें
द्याया ये शूर्पणखा खचरी[2] त्या सुगुणमणिकरंडातें.[3] २
तन्नासाकर्णांतें,[4] दूषाया काय, कापवि त्रासी;[5]
कीं, दुर्दानें[6] दूषूं पाहे श्रीनायका पवित्रासी. ३
आला नर मानुनि खळ खर घेउनि मनुसहस्र[7] बळ खाया,
किति तो? मुनि हि न पुरति प्रभुला तत्वेंकरूनि वळखाया. ४
झाले भस्म चि, पडतां सर्व हि राक्षस कुंवर्ण[8] ते रामीं.
म्हणतों[9] खरादि पाप्मे, प्रभुशर तन्मनुसुवर्ण तेरा, मीं. ५
बंधु खर सबळ बुडउनि धावत लंकेसि जाय ती नकटी,[10]
कुदशाराज्ञीसिंहासन[11] निजमुख दशमुखापुढें प्रकटी. ६
ती त्यासि म्हणे, 'दादा! पंचवटीयासि कामिनीरत्न
तुज सर्वरत्नभोक्त्या द्याया गेल्यें करावया यत्न. ७
तत्पतिनें कर्णयुग छेदुनि केल्यें पहा विनासा, हें
त्वत्कीर्तिविरूपकरण;[12] मानधना! अन्य याविना साहें. ८
ती स्त्री सीता, तीचा जो पति तन्नाम राम, नर जात्या,

---

१. मलमूत्राचें मडकें च अशी. २. राक्षसी. ३. सुगुणरूप रत्नांचा करंडा च असा जो राम, त्यातें. ४. तिचें नाक व कान यांतें. ५. त्रासलेला (राम). ६. [स्वशरीराच्या] अपवित्र दानानें. ७. ४३ लक्ष २० हजार वर्षांचें एक मन्वंतर, याप्रमाणें कल्पांतापावेतों १४ मनु होतात; यावरून मनु म्हणजे १४ असा अर्थ समजण्याची रूढी आहे. रस, अश्व, वसु, रुद्र व सूर्य इत्यादि शब्द हि अनुक्रमें ६, ७, ८, ११ व १२ या संख्यांचे पारिभाषिक शब्द आहेत. ८. वाईट रंगाचे. (भेसूर, भयानक). ९. [राक्षस भस्म कसे झाले याविषयीं कवि म्हणतात,] ते खरादि राक्षस [मूर्तिमंत] पाप्मे (पापें) च होत, आणि प्रभु रामचंद्राचे बाण हे [पापनाशक असे] 'श्रीराम जयराम जयजयराम' या तन्नाममंत्रांतील तेरा उत्तम वर्ण (अक्षरें) च होत असें मी म्हणतों. १०. जिचें नाक कापलें आहे अशी. ११. दुर्दशारूप राणीचें सिंहासन च असें. १२. तुझ्या कीर्तिरूप स्त्रीच्या रूपाचा नाश.

तदनुज लक्ष्मणनामा, जावुनि हो तूं [1]प्रभंजन रजा [2]त्या.' ९
अग्निज्वाळांसि वमे मुखरंध्रें [3]दुष्टरक्ष कोपे तें,
ओकावा वन्हि जसा [4]वल्मीकें क्रुद्धत[5]क्षकोपेतें. १०
श्रीसीतार्थ निघे अवलंबुनि वेगा भुजंग[6]मारीच्या,
गांठी श्रीगोकर्णीं तो दशकंधर[7]भुजंग [8]मारीचा. ११
तो कळतां भाव म्हणे, 'राया! हें स्पष्ट कर्म [9]अविहित, रे!
व्यसनीं हरि हि बुडे बळ न पहातां, पाहिल्यासि [10]अवि हि तरे.
कोणी हें तुज कथिलें [11]चक्षुर्विषनागपुच्छ तुडवाया?
दाटुनि कां करिसी गा! रामासीं वैर वंश बुडवाया? १३
शतयोजनें उडालों हा मीं [12]रामेषुपक्षभूपवनें,
लीलेनें चि जलधिचीं शोषिल तो अस्त्रदक्षभूप [13]वनें.' १४
रक्ष म्हणे, 're मूढा! भिवविसि, वर्णूनियां नरा, मातें?
चाल उगा चि, मरसि कां स्तवुनि महेशा[14]समान रामातें?' १५
[15]असुहर दोघे हि, परि श्रेष्ठ गमे रामराय मारीच्या;
गंगेच्या कांठीं द्यावा धीरें वीरें न [16]काय [17]मारीच्या. १६
होवुनि रत्नकनकमृग गेला रामाश्रमासि वेगानें,
पाहुनि त्यासि कराया वश ती [18]रामा [19]श्रमा सिवे [20]गानें. १७
ती रामासि म्हणे, 'जी! अवलोका मृग असोन, सोन्या, या

---

१. वारा. २. रामलक्ष्मणरूप धूलिकणांला. ३. तो दुष्ट राक्षस (रावण). एखाद्याविषयीं तुच्छता दर्शवावयाची झाली तर त्याला नपुंसकलिंगीं संबोधावयाचें, असा एक भाषासांप्रदाय आहे. ४. वारुळानें. ५. खवळलेल्या तक्षकानें युक्त अशा. ६. सर्पशत्रु जो गरुड, त्याच्या. ७. जार. ८. हा रावणाचा मामा. ९. अयोग्य. १० मेंढा. ११. नेत्रांमध्यें विष ज्याच्या अशा सर्पाचें शेंपूट. १२. रामबाणाच्या पिसाऱ्याच्या वाऱ्यानें. १३. उदकें. १४. शंकर हें रावणाचें आराध्यदैवत असल्यामुळें त्याला त्यासमान दुसरें कांहीं ही स्तुत्य वाटत नाहीं. १५. प्राणनाशक. १६. शरीर. १७. महामारीच्या. १८. स्त्री. (सीता). १९. श्रमाला. २०. गायनानें.

भेद नसे चि, गृहा हा न्यावा, दुसरें असो नसो न्याया. १८
आणा धरुनि मृग पहा, कैसा दिसतो मनोरम? उठावें,
जातो कीं धांवा जी!, आहे कीं हरिणहृदय मउ ठावें.' १९
ठेवी उटजीं अनुजा[1] लंघाया शक्त ज्या न कीनाश[2],
कीं व्हावा न कपटपटु यातूंपासूनि[3] जानकीनाश. २०
त्या कपटमृगामागें धांवे प्रभु रुद्रसा[4] शरी[5] रानीं,
वरिति सुर यदंघ्रिरजस्पर्शें[6] बहु मुद्रसा[7] शरीरानीं. २१
व्यर्थ[8] पळे पशु; ऐसा कोण कृती[9], एक पळ विलय मातें
न घडो म्हणोनि, यत्नें जो दावुनि धाक पळविल यमातें? २२
प्रभुवर खरतरविशिखें[10] जेव्हां मर्मीं च अस्रपा[11] वेधी,
समयीं गुरूक्तिस, तसी त्याची कपटस्मृतीस पावे धी. २३
'हा सीते! हा लक्ष्मण!' ऐसें मरतां म्हणोनि मोट्यानें
अमृतप्रदीं[12] करावें अहिनें, केलें तसें चि खोट्यानें[13]. २४
सीता म्हणे, 'अहाहा! धांवा, हो! मारितात हाकेला.
लक्ष्मणजी! धावा हो! म्यां चि बळें आत्मघात हा केला!' २५
सौमित्रि म्हणे, 'तुमचें व्हावें न त्रस्त मन अहो! वहिनी!

---

१. लक्ष्मणाला. २. यम. ३. राक्षसांपासून. ४. येथील अनुसंधेय कथा पुढील-प्रमाणें आहे:—विश्वोत्पादक ब्रह्मदेवानें देवी सरस्वतीला उत्पन्न केल्यावर, तिच्या सौंदर्यामुळें तो तिचा अभिलाष करूं लागला असतां तिनें भीतीनें हरिणीचें रूप घेतलें; तें पाहून ब्रह्मदेव हि हरिणाचें रूप घेऊन तिच्यामागें लागला; परंतु ब्रह्मदेवाचें हें दुष्कर्म इतर देवांना न आवडून त्यांनीं आपल्यांतील क्रोधांशापासून रुद्रदेव उत्पन्न केला. रुद्रानें व्याधरूपानें त्या हरिणाचें मस्तक उडविलें तें 'मृगशीर्ष' या नांवानें नक्षत्रांत प्रसिद्ध आहे. तसें च सरस्वती 'रोहिणी' या नांवानें व रुद्र 'लुब्धक' या नांवानें आकाशांत ताऱ्यांच्या रूपानें प्रसिद्ध आहेत. ५. शरधारी. ६. ज्याच्या चरणरजस्पर्शानें. ७. हर्षरसास. ८. ही आर्या कव्युक्ति आहे. ९. कुशल. १०. अति तीव्र बाणानें. ११. रक्त—**पंत.** रक्तपि मारीच्याला. १२. दूध देणाऱ्याचे ठायीं (पक्षीं) मोक्ष देणाऱ्याचे ठायीं. १३. कपटी मारीच्यानें.

हें मृगकपट; करावा गरुडाचा नाश काय हो! अहिनीं?' २६
सीता म्हणे, 'न धांवसि जेव्हां तूं परिसतां चि हाकेला,
स्त्री[1]कामा! गुरुघात श्रीकामा[2]परिस तां[3] चि हा केला.' २७
ऐसें हि म्हणे बहुधा 'उटजीं परमाधमा! नसावास!'
तो बोल करि व्याकुळ त्यास विषव्रत[4]तिचा जसा वास. २८
युक्त चि, सीतेसि नमुनि तो बंधुकडे चि होय जाता, तें.
माय जया रडवी शिशु जाय कथाया स्वदुःख तातातें. २९
त्यजितां उटज[5] म्हणे, 'वनदेवी हो! जानकीस रक्षा हो!
लाविल इला बळें कर जरि खळ परपुरुष सकुळ रक्षा[6] हो.'
गेला लक्ष्मण, तों यतिवेषें उटजीं दशास्य शिरला हो!
कीं, दैवमतें त्याचें प्रभुशस्त्रेंकरुनि पतन शिर लाहो. ३१
उटजीं न यातु[7] शिरलें, तें अग्निगृहीं[8] अभद्र[9] कुतरें च.
हा उतरिता चि त्यांचा[10] असता तरि मानवेंद्रसुत[11] रेंच[12]. ३२
जासि[13] हे जयद्रथें तासि ती देवी त्या खळें बळें हरिली,
न करी च भस्म, जाणों बाळें भुजगी धृतव्रता[14] धरिली. ३३
सीता म्हणे, 'मज हि पर हरितो हें काय हो! अहा! तात!?
अद्यापि कां न येती? अबळेचा अंत किति पहातात? ३४
लक्ष्मणजी! बहु चुकल्यें, आधीं रक्षूनि जीवित, रुसा हो!
तुमचा भुज श्रित[15]सुखद मरुमार्गज[16]दीर्घजीवितरुसा हो. ३५

१. स्त्रीचा अभिलाष ज्यास अशा (लक्ष्मणा!). २. भरत—**पंत.** राज्यलक्ष्मीची इच्छा करणाऱ्या भरतापेक्षां ३. त्वां च. ४. विषवल्लीचा. ५. पर्णकुटी. ६. राख. ७. राक्षस. (रावण). ८. होमशाळेंत. ९. अमंगल. १०. राक्षसाचा. ११. राजपुत्र. (राम). १२. रेंच उतरिता=खोड मोडता. १३. द्रौपदी. १४. धरिलें आहे व्रत (दंश करावयाचा नाहीं असें व्रत) जिनें अशी. १५. आश्रितांस सुख देणारा. १६. मारवाडांतील मार्गांमध्यें असलेल्या व पुष्कळ काळ वांचणाऱ्या वृक्षासारखा. **'मार्गज'** या ठिकाणीं **'मार्गग'** असा मूळ पाठ आहे.

हा राम! हा रघूत्तम! धांवा हो! न त्यजा स्वभांवास[1],
रक्षूनि जोडवा[2] मग मजकरवीं अंजलि स्वभावास[3].' ३६
वाहुनि रथीं, गगनपथ अवलंबुनि, जानकीस खळ पळवी,
तें व्यसन तिचें रोदन तच्छ्वशुरसखा[4] जटायुला कळवी. ३७
गृध्र म्हणे, 'रे! कोठें नेसी माझ्या सुनेसि फटकाळा[5]!
मीं पक्षिप[6], तूं केवळ मदमत्त व्याळ पंक्तिफट[7] काळा. ३८
बहु वृद्ध गृध्र जरि मीं, जरि तूं वज्रींदुराहु[8] तरणा रे!
तरसिल न मज, जरि तुझे सुरबळजळधीस[9] बाहु तरणारे.' ३९
रोधावें जेंवि वनीं अतिचपळा वानरा वणवंयानें[10],
केलें तसें चि गृध्रें, वृद्धा हि तरे न रावण वयानें. ४०
सीता गृध्रासि म्हणे, 'नमित्यें व्हा मुक्तिहेतु[11] मामाजी!
उचिता स्वतनूपेक्षा[12], कुदशा उचिता न हे तुम्हां माजी.' ४१
गृध्रें क्षण सोडविली, विरथ करुनि शत्रुला, जसी तातें[13].
मृगदर्शनादि जें जें स्वप्न म्हणे धरुनि लाज सीता तें. ४२
गृध्रें प्रभुकीर्तिरतें खळ, लंघुनि कीर्ति, घाबरा केला;
विसरेल चकोर[14] कसा, सेवुनि परळांत[15] राब, राकेला[16]? ४३
चुकवूनि दृष्टि, खंडी खड्गें तो दुष्ट गृध्रपक्षातिला[17],
पडतां मूर्च्छित वाटे, समजावी साधु गृध्रप क्षितिला[18]. ४४

---

१. मूलप्रकृतीला. २. नमस्कार करवा. ३. आपल्या बंधूस. (लक्ष्मणास). ४. तिचा श्वशुर दशरथ, त्याचा मित्र जो एक गृध्रपक्षी, त्याला. ५. हे दुष्टा! ६. गरुड. ७. फणा—**पंत.** दहाफणांचा सर्प. ८. इंद्र हा च चंद्र, त्यास राहु तसा. ९. देवसैन्यरूप सागराला. १०. वणव्यानें. ११. सोडविण्यास कारण. १२. आपल्या शरीराची उपेक्षा. १३. बापानें मुलीस, त्याप्रमाणें जटायूनें सीतेस सोडविलें. १४. चंद्रिकाकिरणांवर ज्याचें जीवन चालतें असा पक्षी. १५. खापरांत. १६. पूर्णिमेला. १७. जटायूच्या पक्षमूलाला. १८. पृथ्वीला. (कवि म्हणतात, तो जटायु मूर्छित पडला तेव्हां असें वाटलें कीं, तो मूर्छित पडला नाहीं; तर, आपली कन्या जी सीता तिच्यावरील संकटामुळें दुःखी झालेल्या पृथ्वीचें तो सांत्वन च करीत होता).

सीतेसि निजस्कंधीं बसवुनि तो राक्षसेंद्र चोर पळे,
ती तत्स्पर्शें तापे बहु, जेंवि मृगी दवांत[1] होरपळे. ४५
खळ मूषक लंकातृणराशिस्थ[2] स्वकुळ सर्व चाटून,
तो खाववावया ने त्या साध्वीवर्तिलागि[3] दाटून[4]. ४६
मृग मारूनि परततां भेटे लक्ष्मणमयूर अभ्रा त्यां[5],
जाणुनि वृत्त म्हणे प्रभु, 'हें[6] भ्रात्या! तुज न उचित, अभ्रात्या[7].
व्हावी च विकळहृदया वध जाणुनि भीरु बायको पतिचा,
त्वां वत्सा! त्यजिली कसि? करिता इतुक्यांत काय कोप तिचा?
धरिलें मृगरूप खळें, कीं, सोडुनि उटज हा निघो रानीं,
वाटे बहुधा केली मुग्धेची[8] प्राणहानि घोरांनीं[9]. ४९
वत्सा! मज पथ न सुचे, तूं च पुढें काढ चाल, बापा! हूं,
किति आलों? किति उरलें? झाली गति काय? चाल बा! पाहूं.'
येतां, राक्षस गणिला, पडला होता जटायु तो रानीं,
केलीं सज्ज धनुष्यें धावनविगलज्जटायुतोरानीं[10]. ५१
तो[11] त्यांसि म्हणे, 'तुमच्या हृदया जें भासलें, असेना तें,
सुत हो! जाणा, दशरथसख गृध्र जटायु मीं, असें नातें. ५२
रावण घेउनि गेला स्ववधूरत्नासि[12] करुनि अन्याया,
कीर्तिक्षति बहु बाधे, क्षतितति[13] बाधति तशा न अन्या या. ५३
कपट न करितां, पडता क्षणमात्रें अंतकाननीं[14] चोर,
तें पावतें अशा या चंचूनें अंत कां न नीचोरें[15]?' ५४
श्रीराम म्हणे, 'ताता! गेला कोणा दिशेसि तो हंतक[16]?

---

१. वणव्यांत. २. लंका हा च गवताचा राशि, तेथें असणारा. ३. साध्वी (सीता)–रूप वातीला. ४. जाणूनबुजून. ५. त्या रामरूपी मेघाला. ६. आश्रमांत एकटीला सोडून येणें. ७. जो बंधु नव्हे अशाला. ८. सुंदरीची. (सीतेची). ९. भयंकर, हिंस्र जे त्यानीं. १०. धांवण्यामुळें विस्खलित झालेल्या जटानीं व्यापलेलीं आहेत उरःस्थलें ज्यांचीं अशा (रामलक्ष्मणानीं). ११. जटायु. १२. स्नुषा–**पंत.** १३. नाशपरंपरा. १४. मृत्युमुखांत. १५. नीचांचें हृदय. १६. शठ, नीच.

गतकलुष[1] हो यशोजळ[2] त्यांत पडो तदसुनाश[3] तें कतक.[4]' ५५
स्वशिरःकंपें दावुनि दक्षिणदिग्गृध्र, 'याउपर मातें
शक्ति नसे तिळ हि' असें, पावे, कळवूनियां, उपरमातें. ५६
'हा तात! मन्निमित्त भ्राते दोघे[6] हि पावलां मरण,
बहुधा स्वर्गीं हि तुम्हां क्लेशकर चि मद्विपत्तिचें स्मरण.' ५७
ऐसें रडोनि, सुतवत्तद्दहन करूनि भूमिबाळेला
शोधी वनीं, प्रभु गमे, श्रीविरही जेंवि वृद्ध बाळेला. ५८
'हा सीते! हा सीते! टाकुनि जावें तुवां न रामातें,
राहूतें जेंवि सुधा, देवि! न जिरलीस तूं नरा मातें.' ५९
वाहति न नद्या, न चरति हरिणी, चोंखी न थान तोकं वनीं,
जेणें विलाप विभुचा[10] मज[11] वदवे सर्वथा न तो कवनीं. ६०
योजनबाहु[12] कबंध[13] क्षणदाचर लक्ष्मणासि धरि खाया,
मृगलाभें वृकसा तो लागे चित्तांत फार हरिखाया.[14] ६१
सौमित्रि म्हणे, 'आर्या! काळाचा होय हा सखा, यास
सांपडलों, अंतरलों तुज, मज नेतो सहास[15] खायास. ६२
मारुनि रावण त्याचे दारें[16] तदस्त्रें[17]करूनि न्हाणून,[18]
गेल्या[19] निजकीर्तिसह श्रीमत्सीतासतीस आणून, ६३
जातां पुरासि[20] यावें सामोरें भरतसह अनीकांहीं,[21]
त्वां बैसोनि स्वपदीं नुरवावा[22] काम जनमनीं कांहीं, ६४

१. निर्मळ. २. यशोरूप उदक. ३. त्या रावणाचा प्राणनाश. ४. निवळीचें बीं. ५. मरणातें. ६. जटायु आणि दशरथ. ७. सीतेला. ८. वेडसर झालेला, बावचळलेला. ९. तान्हें मूल. १०. विश्वव्यापक रामाचा. ११. मला मोरोपंताला. १२. चार कोस लांब बाहु ज्याचे तो. १३. कबंध नांवाचा राक्षस. १४. संतोषाया. १५. हास्ययुक्त. (हसत हसत). १६. स्त्रिया. १७. त्यांच्या अश्रूंनें. १८. स्नान घालून. १९. गेलेल्या. २०. अयोध्यानगरास. २१. सैन्यानीं. २२. उरवूं नये.

ऐसें[1] अवलोकावें, हें बहु माझ्या मनांत बा! होतें,
दैवीं नसे, बरें, पुरसुर[2]जन पाहोत दीर्घबाहो[3]! तें.' ६५
श्रीराम म्हणे, 'वीरा! त्वां खड्गें करुनि बाहु तो डावा,
हा म्यां हि एकदा चि, श्रीकांतें[4] जेंवि राहु तोडावा.' ६६
खंडिति तद्बाहूंतें त्यांचे ते सुकर[5]वाळकालाही,
काळां[6] हि उशिर लागे कापाया सुकर[7] वाळकाला[8] ही. ६७
झाला दिव्यशरीर प्रभुच्या जैं निर्मळा[9]सिनें तुटला,
विश्वावसु गंधर्व द्विजशापापासुनि क्षणें सुटला. ६८
त्या श्रीरामातें कां साधु न बहु मानितिल? कबंधातें
मारी, तारी, वारी[10] त्याच्या तो मानितिलक[11] बंधातें[12]. ६९
तो सांगे, 'श्रीरामा! सीता नेली दशाननें, त्याची
होइल बहु, तसि शिशुची भुजगीच्या दुर्दशा न नेत्याची[13]. ७०
स्वकरबळें[14], तेजस्वी लोकीं जैसा रवि, प्रसरसी[15] तें
कथितों, पंपेप्रति जा, वर्णिति त्या फार विप्र सरसीतें. ७१
मग ऋष्यमूकनगग[16] प्लवगपसुग्रीवसख्य[17] साधूनीं
यश जोडिसील; अमृत हि सोडुनि [18]तें सेविजेल साधूनीं.'
गंधर्व जाय, तो हि श्रीरघुकुलसारसरवि[19] सरसीतें.
ती त्यासि म्हणे, 'कैसें अनुभविलें[20] सारसर[21] विसरसी तें? ७३

---

१. गीति ६३–६४ यांत वर्णिलेली स्थिति. २. पुरजन आणि देव. ३. ज्याचे बाहु दीर्घ अशा (रामा)! ४. लक्ष्मीरमणें. ५. (उत्तम खड्ग हा च) कृष्णसर्प—**पंत**. ६. केळीच्या कालास. ७. मूळपाठ—**उशिर**. ८. कांकडीला. ९. पवित्र खड्गानें. १०. निवारण करी. ११. मानी पुरुषांमध्यें श्रेष्ठ असा. १२. राक्षसाच्या देहबंधनातें. १३. नेणाऱ्याची. १४. आपल्या किरणबलानें (पक्षीं) आपल्या बाहुबलानें. १५. विख्यात होशील. १६. ऋष्यमूक पर्वतावरील. १७. वानरांचा राजा सुग्रीव, त्याचें सख्य. १८. यश. १९. श्रीरघुकुलरूप कमलाचा सूर्य. २०. अनुभविलेलें. २१. श्रेष्ठ सरोवर.

प्रभुला दे ताप तिचा[1] वात, जरि सुगंध मंद शीतळ तो.
वाटे नलिनींत[2] न, हा देह कढाईंत सर्वथा तळतो. ७४
'हा सीते! तुजवांचुनि सर्व हि मज तापहेतु, हा सीते!
हा सीते! तूं चि, मज व्यसनसमुद्रांत सेतु, हा सीते! ७५
हा सीते! हा न जगत्प्राण[3], खरा वाघ वायु हा, सीते!
हा सीते! व्याळ[4] चि हा, व्यक्त पितो[5] राघवाऽयु हा, सीते! ७६
हा सीते! मज देतो त्वन्मुखजित[6] चंद्र ताप हा सीते!
हा सीते! करितो द्विजराज[7] हि म्हणवूनि पाप हा सीते! ७७
हा सीते! कसि कळली त्वद्व्यसनकथा[8] पिकास, हा सीते!
हा सीते! जन्हि नत मी, कसितो[9] चि तथापि कास हा, सीते!
हा सीते! जे त्वत्कचभाराजितकलाप[10] मोर, हा सीते!
हा सीते! ते नाचति, मज पाहुनि, मजसमोर, हा सीते! ७९
बहु लाजवीत[11] होतों करिकेसरिकीरकेकिहरिणां मीं;
हांसत कर्म करावें, भोगावें रडत तें चि परिणामीं. ८०
हा सीते! हा सीते! अससिल अद्यापि तूं कसी सासु[12]?
ऐकुनि या वार्तेतें प्रियसखि! वांचेल ती कसी सासु[13]? ८१
मेला श्वशुर[14], न समयीं आम्हीं आलों, भिवूनि उग्रास[15],

---

१. त्या पंपासरसीचा. २. सरांत—**पंत.** ३. वायु. ४. सर्प. ५. रामाचें आयुष्य. ६. तुझ्या मुखानें जिंकलेला असा. ७. चंद्र (पक्षीं) ब्राह्मणश्रेष्ठ. ८. तुझ्या नाशाची वार्ता. (तुझ्या मधुर स्वरानें लज्जित होऊन कोकिळानें आजवर मूकव्रत घेतलें होतें; परंतु आतां तें भय नाहींसें झालेंसें पाहून तो पुन्हां शब्द करूं लागला आहे, असा आशय). ९. बांधितो. १०. तुझ्या केशभारानें जिंकला आहे पिसारा ज्यांचा असे मोर. ११. सतिची मंदगति, कृशकटि, सरलनासिका, कृष्ण केशकलाप, आणि दीर्घ, चपल व काळेभोर असे नेत्र, यानीं यथानुक्रम हत्ती, सिंह, पोपट, मोर आणि हरिण यांस लाजवित होतों. १२. जीवंत. १३. कौसल्या. १४. जटायु—**पंत.** १५. भयंकरास. (रावणास).

तूं भीरु! व्यसु[1] होउनि झालीस चि तन्मुखांत सुग्रास. ८२
हा सीते! हा सीते! हा सीते! सुदति[2] मुदतिशयसुखने[3]!
मुख नेत्रां दावुनि, परलोकीं मज साध्वि! द्यावया सुख ने. ८३
हा दयिते! हा जानकि! हा भामिनि[4]! हा सुगात्रि[5]! हा शीते[6]!
हा सुदति! हा कृशोदरि[7]! हा सुंदरि! हा वरोरु[8]! हा शीते[9]!'
ऐसा विलाप करितां लक्ष्मण वंदुनि म्हणे, 'अहो आर्या!
धैर्य त्यजितां, कैसी, मारुनि खळ, सोडवाल ती आर्या? ८५
करिती इष्टवियोगें जे प्राकृत ते चि नर विलापातें,
व्याकुळ होवूनि तमीं[10] त्वां द्यावी लाज न रविला पातें[11]. ८६
ल्याली आहे पातिव्रत्याशनिकवच[12], सर्वकाळ जिला
घडतें त्वद्ध्यानामृतपान हि, कां ती धरील काळजिला? ८७
सुग्रीव ऋष्यमूकीं आहे, भेटों तयासि आधीं, तें
साधूं, अन्योन्यांच्या नाशूं, साधूनि सख्य, आधींतें. ८८
चिंतारत्नश्रीगुरुवरदान[13] तुझ्या असे चि पदरीं तें
मग साधिसील न कवण सिद्धि, सुखें संहरूनि सदरींतें[14]? ८९
मीं बंधु सचिव भृत्य हि, हें लटिकें काय जी! वदा, नातें?
देईन कार्यसिद्धिप्रति जाया कायजीवदानातें[15].' ९०
पंपेंत स्नान करुनि विभु गेला ऋष्यमूकगोत्रास[16],

---

१. गतप्राण. २. चांगले दंत जिचे अशी. ३. आनंदातिशयाची उत्तम खाण च अशी. ४. प्रथम '**भाविनि**' असें लिहिलें गेलें होतें. ५. हे सुंदरांगि! ६. सीते–**पंत**. ७. कृश आहे उदर जिचें अशी. ८. चांगल्या मांड्या आहेत जिच्या अशी. ९. सीतळे–**पंत.** १०. अंधकारांत (मोहांत). ११. पतनानें, अवनतीनें. (तूं सूर्यकुलोत्पन्न असल्यानें तुझ्या पातानें सूर्याला लाज वाटणार च; तर तसा प्रसंग न यावा, असा लक्ष्मणाचा अभिप्राय). १२. पातिव्रत्यरूप वज्रासारखें (कठिण) कवच. १३. चिंतलेली वस्तु देणारें रत्न च असें गुरूचें वरदान. १४. साधूंचे शत्रूंना. १५. देह आणि प्राण यांच्या दानातें. १६. पर्वतास. (गां=पृथ्वी, त्रायते=रक्षति–पृथ्वीचें रक्षण करितो–धारण करितो तो गोत्र=पृथ्वीधर, पर्वत).

यातें दूरुनि पाहुनि पावे सुगळ[1]प्लवंग तो त्रास. ९१

पवन[2]सुतासि म्हणे, 'ते तापस परि कार्मुकी[3] शरी रानीं
येतात कोण? पुस जा, स्पष्ट गमति देवसे शरीरानीं.' ९२

'आज्ञा' म्हणोनि, भेटे गिरिखालें प्लवग[4]पाळकपि त्यातें,
तत्काळ निवे पाहुनि बहुदिवसां जेंवि बाळक पित्यातें. ९३

दव[5]तप्त द्विप[6] निवतो जैसा पावोनि गांग[7]तोयातें,
तेंवि निवे कपि, राम हि सांगे निजवृत्त सांग[8] तो यातें. ९४

रुग्णा धनिकासि जसा वित्तार्थी वैद्य, पवनजें कपिला[9]
भेटविला प्रभु, न जसि चुकल्या वत्सासि कामधुक्कपिला. ९५

सुग्रीवें सीतेचें साभूषण[10]उत्तरीय दाखविलें,
पितृवृत्तिपत्र[11]सें जें होतें त्या नग[12]गुहेंत राखविलें. ९६

तेजें करि प्रकाशित तें अद्भुत[13]धाम कानना चेलें[14],
त्यातें पाहुनियां तो साधि श्रीराम कां न नाचेल? ९७

'मोहूत[15] भुजग; मोहा केंवि तुम्हीं मजसम स्तनग? होतें
तुमचें हि सुकृत सरलें कां? सांगा मज समस्त नग हो! तें.' ९८

सुगळ म्हणे, 'रामा! म्यां शोधावी जानकी, शपथ करितों.'
राम म्हणे, 'कार्य[16] तुझें जें, तें मीं जानकीश पथ[17]करितों.' ९९

शिखि[18]साक्षिक सख्य करुनि राम करी कार्य मान्य; वालिशतें[19]
क्षण ज्यापुढें नुरावें, प्रभुबळ नुमजे सुकंठ[20] बालिश[21] तें. १००

---

१. सुग्रीववानर. २. मारुतीस. ३. चापधर. ४. वानरपति. (मारुती). ५. वणव्यानें तापलेला. ६. हत्ती. ७. गंगाजलातें. ८. संपूर्ण. ९. सुग्रीवाला. १०. सहित आहेत अलंकार ज्याच्या असें पांघरावयाचें वस्त्र. ११. वडिलार्जित सनदेसारखें. १२. ऋष्यमूक पर्वताचे गुहेंत. १३. अलौकिक तेज ज्याचें असें. १४. वस्त्र–**पंत.** १५. परिशिष्ट पहा. १६. वालिवध, स्वस्त्रीसंपादन व राज्याभिषेक. १७. पत्करतों. १८. अग्नि आहे साक्षी ज्यांत असें. १९. वालिवानरासारख्या शेंकडों वानरानीं. २०. सुग्रीव. २१. मूर्ख.

तत्प्रत्ययार्थ[1] एकें बाणें भेदूनि सप्ततालीला[2]
वाळीस वधी ज्याची स्वजनीं नुरवी च तप्तता, लीला. १०१
निववी कपिराज्यपदीं अभिषेचुनि तप्त अंग दासाचें.
कुरवाळुनि वाळिसुता दे प्रियपुत्रत्व अंगदा साचें. १०२
प्रार्थी[3] सुगळ बहु, परि प्रभु किष्किंधापुरीं न मन घाली;
माल्यवदगीं[4] च राहे सानुज तो सन्मनोब्रुडनघाली[5]. १०३
लंकेंत[6] अशोकवनीं जसि बाळमृगी वृकींत, तसि देवी
बहुराक्षसींत होती, न स्नान करी, न ती निजे, जेवी. १०४
छळवी छळी परोपरि तीस वश करावयासि मायावी.
न वळे चि; परकरा कसि कुळभित्तिंगता[7] वधूत्तमा यावी? १०५
हें हि म्हणे[8], 'राक्षसि हो! सेवटिं घेउनि महानसा[9] जा, गे!'
न बळात्कारतम[10] उठे, मनिं शापदिवा[11] लहानसा जागे. १०६
त्या नगगुहेंत[12] वार्षिकमासचतुष्टय दिवानिशीं[13] क्रमुनीं,
ऐसें अनुज्यासि म्हणे तो धन्वियशस्विमानिशक्र[14] मुनी[15]. १०७
"जा वत्सा! चापीं गुण चढवुनि एका चि सायकां[16] पूसें[17],

---

१. त्या सुग्रीवाची खात्री व्हावी म्हणून. २. ताडांच्या सात झाडांना. ३. किष्किंधेंत रहावयास या, असें सुग्रीव रामाला प्रार्थी. ४. माल्यवान् पर्वतावर. ५. साधूंच्या मनोरूप कमलावरील निष्कलंक भ्रमर. (अप्+रुड्=पाण्यामध्यें उगवणारें) कमळ—**पंत.** ६. १०४ ते १०६ ह्या तीन आर्या कवीनें मागाहून रचून पोथींत समाविष्ट केल्या आहेत. ७. सत्कुलरूपी भिंतीच्या आड असलेली. (कुलीन). ८. [रावण] म्हणे. ९. स्वयंपाकगृहास. १०. बलात्काररूप अंधकार. ११. शापरूप दिवा. (पूर्वी रावणानें एकदां रंभेवर बलात्कार केला होता, त्या वेळीं तिचा पति नलकूवर यानें त्यास शाप दिला कीं, 'परस्त्रीवर बलात्कार करशील तर मरशील' या कथेकडे येथें लक्ष्य आहे). १२. माल्यवान् पर्वताच्या गुहेंत. १३. रात्रंदिवस. १४. धनुर्धर, यशस्वी आणि तेजस्वी यांमध्यें श्रेष्ठ असा. १५. विचारशील. (राम). १६. बाणास. १७. बाणानें चांगला भेद करावा म्हणून तो पुसून साफ कर.

'कापूस ज्वलनीं किति?' ऐसें त्या प्लवगनायका पूस[1]. १०८
बहुधा कृतघ्न मिथ्यावादी दुष्परिहराघ[2] वानर तो,
अंगद असो कपीश्वर, तारेसीं सुगळ, राघवा[3]! न रतो." १०९
जातां चि लक्ष्मणातें धावुनि भेटे सुकंठ, तो भ्याला,
नमुनि म्हणे, 'स्वप्नीं मज कार्य[4] दिसे, जेंवि वित्त लोभ्याला.
लंघील कवण, जेणें वधिला एकें शरें कपीश तशा[5]?
सर्व दिशा शोधाया पाठविले असति म्यां कपी शतशा.' १११
ऐसें सांगोनि निघे भेटाया त्या हि राघवा राया,
दिसलें कृतघ्नपण जें तें हि महादुर्धराघ[6] वाराया. ११२
प्रभुतें पाहोनि निवे, जैसा निधिदर्शनें[7] निवे दीन,
अंजलि बांधोनि म्हणे, 'जरि अभय असेल तरि निवेदीन. ११३
मज बोलवाल तैसें बोलेन चि मीं अज्ञान कीर[8] चि, तें
कार्य घडेल कसें, जी! सुकृतें इतरें अजानकीरचितें[9]? ११४
देवीतें शोधाया पाठविले प्लवगवीर बोधून,
भरला चि अवधिमास[10], द्रुत[11] येतिल ते दिशांसि शोधून.' ११५
श्रीराम म्हणे, 'साधो! कृतकृत्य तुझा सखा नवा नर[12] हो;
जा तिकडे, कायें गुणें[13] तूं? बहुमत शतमखा[14], न वानर, हो.'
तों पूर्वोत्तरपश्चिमदिक्शोध करूनि कीश[15] कवि चार[16]
आले म्हणति, 'न देवी ती आढळली, न तो[17] हि अविचार.'
राम म्हणे, 'कर्णीं कर ठेवू[18] तीं तरि न दक्षिणा आशा[19],

१. विचार. २. अनिवार्य पाप ज्याचें तो. ३. लक्ष्मणा! ४. सीतेचा शोध करणें हें कार्य. ५. तशा वीराला. (रामाला). ६. फार दुःसह पाप. ७. जमिनींत पुरून ठेविलेल्या द्रव्याच्या सांठ्याच्या दर्शनानें. ८. अजाण पोपट. ९. जानकीवांचून इतर स्त्रीनें केलेल्या सुकृतें (पुण्यानें). १०. नेमलेली महिन्याची मुदत. ११. लवकर. १२. तुझा नवा मनुष्यमित्र जो मी राम. १३. तुझे गुण काय वर्णावे? १४. इंद्राला. १५. वानर. १६. हेर. १७. तो अविचारी रावण हि. १८. कानावर हात ठेवणें म्ह० आपणास अमुक एक गोष्ट माहीत नाहीं असें दर्शविणें. १९. दिशा.

मज फार दक्षिणेची[1] विप्रा जसि तसि च लागली आशा.' ११८
मासानंतर दधिमुख[2] सांगे मधुवनविनाशबोभाट[3],
सुगळासि गमें तो निजभटसुयशातें[4] चि वर्णितो भाट. ११९
दुसरे दिवसीं प्रभुला वंदिति कपि अंगदादि येवून,
तद्दर्शन तें जाणों, त्या शीतार्तां[5] यथेष्ट ये वून. १२०
राम म्हणे, 'शोधक हो ! सकरुण हो ! जरि असेल सांगातें[6],
द्या जीवनौषध मला, कीं त्यांचें[7] स्थान कोण सांगा तें ? १२१
वांचेन काय ? होइन साधूंसि, रसांत आर्ज्यसा[8], मान्य ?
मरण वरें, यश ज्यांत श्रेष्ठ न, त्याह्नुनि राज्य सामान्य.' १२२
हनुमान् वदे, 'प्रभो ! म्यां लंकेंत विलोकिली अनादिसती[9];
रविभा[10] जसी उलूकीनयना[11] तसि राक्षसीजना दिसती. १२३
ज्या शिखिशिखेसि[12] भुलला तो दुष्ट पतंग मत्त पाहून,
ती म्यां विलोकिली: तप गुरु अन्यांचें न मत्तपाहून. १२४
वांचेल पतंग कसा लावुनियां वदन दीपकळिकेला[13] ?
म्यां तों त्यासीं, लंघुनि शतयोजन[14] नदनदीप[15], कळि[16] केला. १२५
पुर जाळिलें चि, चुरिला अक्षाख्य[17] सहोपवन[18] कुमाररमणी[17],
वाटे प्रसन्न झाली सती प्रिया शंभुची उमा रमणी. १२६
चूडामणि[19] पाठविला या चरणावरि वहावयाला जो,

---

१. दक्षिण दिशेची (पक्षीं) दानद्रव्याची. २. एका वानराचें नांव; हा सुग्रीवाचा मातुल असून मधुवनाचें रक्षण करीत असे. ३. मधुवननामक बागेचा नाश केल्याची वार्ता. ४. आपल्या योद्धयांच्या सुयशाला. ५. थंडीनें कुडकुडलेल्या मनुष्यावर. ६. जवळ, बरोबर. ७. त्या जीवनौषधाचें. (सीतेचें). ८. तुपासारखा. ९. सीता. १०. सूर्याची कांति. ११. घुबडीच्या डोळ्याला. १२. अग्निज्वालेस. १३. दिव्याच्या ज्योतीला. १४. चारशें कोस. १५. नद आणि नद्या यांचा पति. (समुद्र). १६. कलह. १७. अक्ष नांवाचा [रावणाचा] उत्तम पुत्र. १८. उपवनासह. १९. शिरोभूषण.

तो हा; पादाब्जस्था[1] यां[2] पद्मासन[3] महावया[4] लाजो. १२७
तुज ऐषीकास्त्राची[5] कथिती झाली रडोनि खुण, गा! ती
प्राणव्यसनीं पडली, करिवरमतिसी[6] तुझे चि गुण गाती. १२८
भस्म कराया घेउनि गेला तो दैवहतक[7] लंकेला,
रक्षा स्वकीर्तिला रविकुळदीपा! त्या हि गतकलंकेला.[8]' १२९
राम म्हणे, 'साधो! त्वां वांचविलें, घेतलें विकत मातें,
मरणीं अमृत दिलें, जें उपकारीं न वुडवील कतमातें[9]?' १३०
प्रभुच्या प्रहर्षसमयीं सुगळाज्ञेकरुनि यूथराज[10] वळी,
बहुसंख्य सिद्ध होउनि आले साह्यार्थ ईश्वराजवळी. १३१
नळ नील सुषेण[11] पनस गज गवय गवाक्ष गंधमादन[12] ही
आले जांववदादि स्वबळभरें कांपविति समस्त मही. १३२
कोटिसहस्रबळाधिक एकैक असंख्य तें मज न कथवे.
दिसती प्लवगर्क्षांचे[13] जिकडे तिकडे जिताभ्रकनक[14] थवे. १३३

---

१. पदकमलावरील. २. या चूडामणीला. ३. कमलासन. (ब्रह्मदेव). ४. वृद्ध. (ब्रह्मदेवाचा पादकमलस्थ असण्याचा अधिकार जुना, वहुत दिवसांचा असून, तो एकाएकीं या नव्या सद्यःप्राप्त चूडामणीनें हिरावून घेतला म्हणून ब्रह्मदेवास लाज वाटूं दे). ५. ऐषिकास्त्राची कथा पुढीलप्रमाणें आहेः—इंद्रपुत्र जयंतानें, पूर्वीं दंडकारण्यांत सीता असतांना तिच्या लावण्यानें मोहित झाल्यामुळें, कावळ्याच्या रूपानें येऊन तिच्या स्तनप्रदेशावर पक्षतुंडनखाघात केले, तेव्हां त्या अपराधावद्दल रामानीं त्या कावळ्यावर इषिकानामक गवताची काडी अभिमंत्रून सोडली. नंतर तें 'ऐषिकास्त्र' त्याच्या पाठीमागें लागलें. त्या अस्त्रापासून कावळ्याचा बचाव कोणास ही करितां न आल्यामुळें अखेर तो रामास च शरण गेला; तेव्हां रामानीं त्याचा एक डोळा काढून घेऊन त्याला दोषमुक्त केलें. येथून च कावळा 'एकाक्ष' झाला अशी समजूत आहे. ६. गजेंद्राच्या मतीसारखी. ७. दुर्दैवी (रावण). ८. गेला आहे कलंक (लांछन) जीपासून तिला. (सीतेला). ९. कोणत्यातें—**पंत**. १०. कळपांचा स्वामी. ११. वरुणाचा पुत्र. १२. कुवेराचा पुत्र. १३. वानरांचे आणि आस्वलांचे. १४. जिंकले आहेत मेघ आणि सुवर्ण ज्यानीं असे.

अध्याय बारावा.

सुदिनीं रघु[1]सिंह निघे माराया त्या दशाननगजातें;
प्रभुचा क्षम होय चुरुनि कर द्याया दुर्दशा न नग[2] ज्यातें. १
तो उत्तराब्धि जाणों जातो त्या दक्षिणाब्धिवरि, त्यातें
जिंकाया, दुष्टातें आश्रय देवुनि कुकीर्तिवरित्यातें. २
स्वप्नांत सिंधु सांगे, ' नळवानर विश्वकर्म[3]सुत, राया !
रामा ! तो सेतु रचू, हा कीर्तिप्रद उपाय उतराया.' ३
प्रभुच्या आज्ञेनें नळ सेतूतें, धरुनि अनळसत्व[4], रची;
तो सिद्ध होय जगदघराशीं[5]चा मूर्त अनळ[6] सत्वर चि. ४
तेथ बिभीषण राक्षस नमुनि म्हणे, ' बा ! परांघ[7] वाराया
तूं चि सुतीर्थ नता मज; तूं माता बाप राघवा ! राया !' ५
शरणागत अरिबंधु हि रामें प्रेमें चि घेतला पदरीं;
खळदत्तीं अमृफळीं न प्रभुरुचि, बहु सदर्पितीं बदरीं[8]. ६
' सुग्रीव पांचवा[9], बा ! गुणरंजितसर्वसत्सभा[10] ! सावा,
तूं बंधु, न कोण्ही ही दीन सुधी सुरभिवत्स[11] भासावा.' ७
ऐसें पूजुनि त्यातें प्रभु लंकाराज्य दे, न वेदा ते
गुण वर्णवती, ज्यांहीं लाजविले बहु जुने नवे दाते. ८

---

१. राम हा च कोणी सिंह. २. कैलास—**पंत.** अन्वयार्थ—ज्यातें (ज्या रावणातें) चुरुनि दुर्दशा द्याया (त्याचा चुराडा करण्यास) प्रभुचा नग (कैलास-पर्वत) क्षम (समर्थ) न होय, [त्या रावणाला] चुरुनि दुर्दशा द्याया प्रभुचा (रामाचा) कर (हात) क्षम होय. (कैलासपर्वत रावणानें उचलिला होता या गोष्टीकडे येथें कटाक्ष आहे). ३. विश्वकर्म्याचा पुत्र नळ. ४. आलस्यराहित्य. ५. जगाच्या पापसमूहांचा. ६. अग्नि. ७. मोठें पाप. ८. साधूंनीं अर्पण केलेल्या बोराचे ठिकाणीं. ९. आम्ही चौघे बंधु मिळून चार व सुग्रीव पांचवा. १०. गुणानीं रंजविली आहे सकल सज्जनांची सभा ज्यानें अशा हे बिभीषणा ! तूं सहावा. ११. कामधेनूचा वत्स.

शतयोजन आयत[1] दशयोजन विस्तीर्ण सेतु शंकेतें
दे, गेला बुडवाया कोपाकुळ भूमिबाहु लंकेतें. ९
किंवा तो[2] कपिकटकोत्तरसिंधूद्भत[3] बुभुक्षु[4] कालाहीं
दूर पसरला खाया रात्रिचरां[5] क्षुद्र बेडकांला हीं. १०
सेतु न तो यत्पतिनें[6] स्वसुता नेली, जसी वृकें एणी,[7]
त्या लंकेची श्रीभूदेवीनें ओढिली असे वेणी. ११
रामजयश्रीलग्नीं[8] लंका घाली सुनीळ पाटावें,[9]
सेनावऱ्हाडणींला पायघडी कां असें न वाटावें? १२
बहुधा तुच्छ जलधितृण[10] चाटायाचा धरूनियां वीट,
गेला प्रभुप्रतापासितपथ[11] रक्षोटवीकडे[12] नीट. १३
कीं पतित पति त्यागुनि विश्वशरण्याकडे[13] रडत वाटे
आली जी लंकाश्री तीचा तो[14] सांजनाश्रु[15] पथ वाटे. १४
कीं चिरलें स्वापयशें[16] शोकानलदग्ध[17] सागरोर[18] चि तें,
सूचविले तर्क असे त्या सेतुवरें महासुधीरचितें[19]. १५
प्रभु सेतुपथें उतरुनि शत्रुकडे वाळिसूनुला धाडी,

---

१. लांब. २. तो सेतु कालाहि (कालसर्प) होय. ३. वानरसैन्यरूपी उत्तर-समुद्रापासून उत्पन्न झालेला असा. ४. क्षुधित. ५. राक्षस हे च कोणी क्षुद्र बेडूक, त्यांना. ६. ज्या लंकेच्या पतीनें. ७. हरिणी. ८. रामाचें जयश्रीसीं लग्न व्हावयाचें होतें त्या प्रसंगीं. (१२ ते १५ पर्यंतच्या चार आर्यांतील सेतूवरील उत्प्रेक्षा, कवीला पोथी लिहून झाल्यानंतर सुचल्या असाव्यात, असें, त्या चार आर्या पूर्वींचे क्रमांक बदलून पत्राच्या समासांत लिहिल्या आहेत, यावरून दिसून येतें). ९. रेशमी वस्त्रें. १०. समुद्ररूपी गवत. ११. रामप्रतापरूप अग्नि. (असितपथ=कृष्णवर्त्मा=अग्नि). १२. राक्षसरूपी महारण्याकडे. १३. विश्वाचें आश्रयस्थान जो राम, त्याकडे. १४. तो सेतु. १५. काजळासहित जे अश्रु, त्यानीं युक्त असा. १६. आपल्या अपकीर्तीनें. १७. [आपल्यावर माकडानीं सेतु बांधला या अपकीर्तीनें झालेल्या] शोकरूपी अग्नीनें जळालेलें असें. १८. समुद्राचें वक्षस्थळ. १९. महाबुद्धिसंपन्न नळानें रचिलेल्या सेतुवरें (श्रेष्ठ सेतूनें).

कीं कोण्हीं न म्हणावें ‘ न कळत जावूनि घातली धाडी.’ १६
जावुनि सभेंत अंगद दशकंठातें म्हणे, “ अगा राया !
आलों अखिलप्रभुवररामाज्ञेस्तव तुझ्या अगारा या. १७
श्रीमद्रामप्रभुची आज्ञा आहे असी, परिस तीतें,
‘ हरिति यशोर्थ पराच्या श्रीतें, न स्पर्शती परि सतीतें. १८
येणें[1] क्षयपात्र[2] अमृतकर[3] हि, कुदशदेह[4] देव मघवा[5] हीं,
आपण चि भारवाही बुडतो, बुडवी कुळा हि अघवाही[6]. १९
दीपकलिकेसि द्याया आलिंगन जो करी पतंग जवें[7],
तो वा तूं ? सिंहीला लातेनें हाणिता मतंगज[8] वा[9]. २०
होउनि तूं व्याघ्रव्रतपर[10] चरचर न बहु मानवां चावें,
कुलजें धरूनि चित्तीं नयलयभय[11] सबहुमान वांचावें. २१
न कुरीतीतें हृदयीं ठेवीं, टाकूनियां सुरीतीतें,
ईतें चि सुधाधारा बुध म्हणती, रावणा ! सुरी[12] तीतें. २२
भक्षिसि नरमांसातें, हा पापा ! प्राशिसी सुरेतें कीं !
हा ! रे ! भ्रष्टा ! घडलें तुज जन्म महर्षिच्या[13] सुरेतें कीं ! २३
धरिली असेल असती[14] जी रीति, तसी च जी सुरी तीतें
त्यज, तुज बहु सुख व्हाया देतों मीं आपुल्या सुरीतीतें. २४
सीतेपरीस हि मला प्रीति असे फार साधुरीतीची,
ती देतों चि तुज, पहा आधीं सेवूनि माधुरी तीची. २५
नाहीं च तरि हठें तूं देणार प्राण, मद्यपा ! हूं, दे;

---

१. परस्त्रीहरणानें. २. क्षयी. ३. चंद्र. (चंद्रानें गुरु बृहस्पतीच्या पत्नीचें-तारेचें हरण केलें वगैरे कथा येथें अनुसंधेय आहे). ४. दुर्दशायुक्त देह ज्याचा असा. [आपल्या बायकोशीं (अहल्येशीं) इंद्रानें जारकर्म केल्यामुळें गौतमानें त्याला, ‘ तुझ्या अंगाला सहस्र भगें पडतील ’ असा शाप दिला, ही कथा येथें अनुसंधेय आहे]. ५. इंद्र हीं. ६. पापाचें ओझें घेणारा, पापी. ७. वेगा. ८. हत्ती. ९. अथवा. १०. वाघाचे व्रताविषयीं तत्पर. ११. नीतिभंगाचें भय. १२. कुरीति—**पंत.** १३. (विश्रवा) मुनीच्या पवित्र वीर्यानें. १४. असाधु.

त्वद्दुर्दशा पहाया बहु इच्छिति, त्यांसि सद्य[1] पाहूं दे.'" २६
खळ[2] 'मारावें चि' म्हणे, कथितां चि सुखावहा निरोपातें;
हतभाग्य[3] कां म्हणेना हो सुरतरुच्या हि हानि रोपातें? २७
मधुपांसि[4] बहु प्रिय जो आत्मप्राणव्रजासम[5] स्तबक[6],
सकळरसिकप्रिया त्या न दुकोन हि पाहती समस्त बक[7]. २८
झोंबति राक्षस चौघे त्यातें काळाहि जेंवि खगपातें[8],
त्यांतें उडोनि झाडी, झाले ते चूर्ण जेंवि नगपातें[9]. २९
तें ऐकतां चि राम स्वसहायांतें म्हणे, 'उठा, राहो
नाम चि शेष खळांचें, विस्मय भार्गवसखा[10] कुठारा हो.' ३०
कपि एकदा चि 'जयति श्रीरामो जयति लक्ष्मणो' म्हणती,
रणतीव्रयत्न ते[11] त्या लंकावरणासि[12] लाविती खणती. ३१
टंकघनाधिक[13] त्यांचे खर[14] कूर्पर[14] दंत[14] नखर[14] गुडघे[14] ते
तन्यून चि, दुष्काळीं जे राशीचा लुटोनि गुड[15] घेते. ३२
लंकेवरि कपिसेना, सेतावरि टोळधाडसी, पडली.
मधु प्यावया पिपीलिकपृतना[16] कीं स्वर्णभाजनीं[17] जडली. ३३
वाटे पिपीलिकावृतभोगा[18] ती होय आकुळा व्याली,

---

१. आतां च. २. रावण 'अंगदाला मारावें च' असें म्हणे. ३. सुरतरूच्या रोपातें (कल्पवृक्षाच्या कोंवळ्या झाडाला) हानि हो (नाश होवो) [असें] हतभाग्य (दुर्दैवी) कां म्हणेना? (कां म्हणणार नाहीं? अर्थात् म्हणेल च). ४. भ्रमरांला. ५. आपल्या प्राणसमूहासारखा. ६. पुष्पगुच्छ. ७. बगळे. ८. गरुडातें. ९. पर्वतावरून होणाऱ्या पतनानें. १०. भार्गवरामाचा (परशुरामाचा) मित्र जो कुठार, त्याला. ११. युद्धाविषयीं ज्यांचे तीव्र यत्न असे ते वानर. १२. लंकेच्या तटाला. १३. टांक्या आणि घण यांहून अधिक. १४. तीक्ष्ण कोंपर, दांत, नखें व गुडघे. १५. कापणी केल्यानंतर सुडी रचण्यापूर्वीं वावरांत धान्यासह ताटांच्या पेंड्या बांधून सुकत टाकलेल्या असतात, त्यांस 'गुड' म्हणतात. १६. मुंगळ्यांचा समूह. १७. सुवर्णपात्रांत. १८. मुंग्यानीं व्यापिला आहे देह जिचा अशी सर्पीण.

न[1] पुरी न[1] कटककोपें उग्रा गरळाग्निच्या कुळा व्याली[2]. ३४
क्षोभे साखिलखलबैल[3] रावण सभुजगसमूह तक्षकसा,
हृतदार[4] गरुडसा प्रभु होय न तद्दर्पभंगदक्ष[5] कसा? ३५
दशकंठ म्हणे, 'झाले गज मर्कटनखरभग्नकट[6] कटकीं,
नर वानर तुच्छ म्हणत होतों, परि माजली च कटकट कीं. ३६
मद्भटलक्ष[7] हि वारूं न शके एका हि माकडा, गमला
मद्विक्रम तुच्छ नरा[8], शिवला हा जेंवि काक डाग मला.' ३७
चिंतुनि ऐसें उठवी घटकर्णालागि[9] तो उपाय शतें,
सांगुनि वृत्त म्हणे, 'बा! रक्षावें त्वां चि यातुपा[10]! यश तें.' ३८
घटकर्ण म्हणे, 'चिंता न करावी गा! समस्तयातुपते!
नर वानर जे आले, उद्दीपक[11] या धनंजयां[12] तुप ते. ३९
म्हणसी, एक चि गेला जाळुनि लंकापुरास माकड बा!
निजलासि तूं हि? हूं! कपिकोटि हि मंज[13] सिंधुरासमा कडबा.
वाटे नवल, व्याघ्र हि भ्याला निजकाननांत ओतूंतें[14],
जावूं, प्रदीप्त होवूं, कपिबळघृत[15] आननांत ओतूं तें.' ४१
आज्ञा घेउनि निघतां, भासे तो[16] प्रलयकाळपावकसा[17],
कपि म्हणति, 'दयामेघा! श्रीरामा! शीघ्र वर्ष[18], पाव कसा.' ४२
त्यातें वेष्टुनि ताडिति कपिकोटी जेधवां अंगनगानीं[19].

---

१. दोन न प्रस्तुतार्थ दृढ करितात. २. प्रसवली. ३. सर्व दुष्टांच्या सैन्यासह. ४. ज्याची स्त्री हरण केली असा राम. ५. त्याचा (रावणाचा, तक्षकाचा) गर्वनाश करण्यास तत्पर. ६. माकडांच्या नखानीं भग्न झालीं आहेत गंडस्थळें ज्यांची असे. ७. माझे एक लक्ष वीर. ८. मनुष्याला (रामाला). ९. कुंभकर्णाला. १०. हे राक्षसपते–**पंत.** ११. प्रज्वलित करणारें. १२. अग्नीला. (कुंभकर्णाला). १३. हत्तीसारख्या मला. १४. मार्जारातें. १५. वानरसैन्य हें च तूप. १६. कुंभकर्ण. १७. प्रळयकाळच्या अग्नीसारखा. १८. वृष्टि कर. १९. पर्वत आणि वृक्ष यानीं.

तैं कोटिहोम[1] होतो ऐसें क्षण भाविलें[2] गगनगानीं[3]. ४३
शतशः प्लवंग गटगट गिळितां न म्हणे, 'नको' पलाशमन[4];
त्या पापिकुंभकर्णापरि केव्हां ही न कोपला शमन[5]. ४४
ते मृतिभीत[6] पळाले कपि ज्या घटकर्णनासिकेवाटे
ती प्राणावनधर्मा[7] प्राणविहितवर्णना[8] सिके वाटे. ४५
भयकंचुकासि[9], धरितां घटकर्णें प्लवगरायें[10] कपि त्याला,
सोडवि लक्ष्मण, मारुनि अहिसि जसा पक्षिनायक पिल्याला.
मग रामलक्ष्मणांवरि ये रावणपुत्र[11] जो अविप्रहित[12],
व्याघ्रांवरि मत्त जसा, मत्तें तत्स्वामिनें[13] अवि[14] प्रहित[15]. ४७
तो इन्द्रजिन्महाबळ मायावी, जेंवि दुष्ट राहु, निघे;
प्रभुपुष्पवत्प्रभेतें[16] कपटें गगनांत गुप्त राहुनि घे. ४८
श्रीरामलक्ष्मण प्रभु त्या इंद्रजितें शरव्रजें[17] खिळिले,
अद्भुत[18], मोहाजगरें जे होते दिग्गजेंद्रसे गिळिले. ४९
केले बिभीषणें प्रभु मंत्रौषधिनें विशल्य ते, ज्यांचें
नाम चि करि पाण्याहुनि पातळ यश भास्करादितेज्यांचें[19]. ५०
श्रीराम दिव्यदृष्टिप्रद धनदप्रेषितांबुनें[20] नयनें
प्रक्षाळी अनुज्याचीं मग जीं दिव्यांबुजप्रभाजयनें[21][22]. ५१

१. एक कोटि वानरांचा नाश. २. मानिलें. ३. आकाशगामी देवानीं. ४. मांसभक्षणेच्छु. (कुंभकर्ण). ५. यम. ६. मरणातें भ्यालेले. ७. प्राणरक्षणधर्मातें. ८. प्राणानीं केलें आहे वर्णन (प्रशंसा) जिची ती. ९. भयरूप अंगरख्यातें. १०. सुग्रीव. ११. इंद्रजित. १२. ब्राह्मणशत्रु. १३. त्या मेंढ्याच्या मालकानें, मेंढपाळानें. १४. मेंढा. १५. पाठविलेला. १६. सूर्यचंद्रवत्—**पंत.** १७. बाणसमूहानें. १८. इंद्रजितानें रामलक्ष्मणास बाणानीं खिळल्यानें त्यांस मूर्च्छा आली, याविषयीं कवि म्हणतात, हें मोठें अद्भुत झालें; कारण, मोहरूप अजगरानें दिग्गजेंद्रासारखे जे रामलक्ष्मण त्यांस गिळिलें! (अजगरानें हत्तीस गिळणें म्हणजे मोठें आश्चर्य च). १९. सूर्यादिक तेजस्वी पदार्थांचें. २०. कुबेरानें पाठविलेल्या उदकानें. २१. दिव्य कमलाच्या शोभेस जिंकणारीं (नयनें). २२. जिंकणारीं—**पंत.**

मग सुग्रीवहनूमज्जांबवदंगदमुख स्वनेत्रास
तें दिव्य तोय लावुनि, देति खळांला [1]जयस्वनें त्रास. ५२
प्रभुला बिभीषण म्हणे, 'पावेल जया न [2]रावणि कदापी,
निजकपटज्ञा [3]पाणी जोडी, भोळ्या नरा वणिक दापी.' ५३
कळवुनि पित्यासि निजजय येतां पाहून मेघनादा त्या
कपिबळ नाचे वेष्टुनि, [4]नटतें शिखिकुळ गमे घना [4]दात्या. ५४
क्षुब्ध असें ही पाहुनि [5]आसोंदी [6]तर्तुकाम रावणि ज्या
तो श्रीलक्ष्मण बुडवी त्यासि जसा सिंधु पामरा वणिजा. ५५
सौमित्रिनें, त्रिनेत्रें स्मरसा, सुत नामशेष केला, हें
परिसुनि दशवदन म्हणे, 'तूं हि मरण भूमिकन्यके! लाहें.' ५६
खड्गासि म्हणे, 'त्वदधिक कोणही ही प्रिय मला असेना च.
चाल, प्राशुनि [7]सीतागलगलदसृगासवा [8]असे! नाच.' ५७
सीतेवरि जातां तो दे लाज पिसाळल्या हि कुत्र्यातें,
'मेल्या! रांड तुझी हो' ऐसें शापी हळू च [9]कुं त्यातें. ५८
साधु अविंध्य निशाचर त्यासि म्हणे, 'वात [10]कायसी तेला
हरितां? [11]करितां पतिचा मारीना घात काय [11]सीतेलो? ५९
शक्रा! त्वद्बाहूची जेंवि हरीची [12]इभों गमे लीला,
मारूं पाहसि काय प्रभु तो तूं [13]भूरिभागों [14]मेलीलों?' ६०
आलें मनास तें, मग [15]पाप परतला, न जाणतां महिम्या,
वाटे [16]मत्ताखु म्हणे, 'खावा स्वकुळासि भक्षिता अहि म्या.' ६१

---

१. जयजयकाराच्या शब्दें. २. रावणपुत्र इंद्रजित्. ३. हात. ४. दात्या घना [पाहुनी] शिखिकुळ (मोरांचा समूह) नटतें (नाचतें) [असें] गमे. ५. मिळवी, धरीं, गांठी. ६. तरूं इच्छिणारा. ७. सीतेच्या कंठापासून गळणारें रक्त हें च मद्य, त्यातें. ८. हे खड्गा! ९. पृथ्वी—**पंत.** १०. वातीची काय मातब्बरी आहे? ११. पतीचा (रामाचा) घात सीतेला मारीना काय? (रामाचा घात केला असतां सीता वांचेल काय? नाहीं वाचणार असा ध्वनितार्थ). १२. हत्तीला. १३. महाभाग्यसंपन्न. १४. जी मृतवत् आहे तिला. १५. रावण. १६. माजलेला उंदीर.

मत्तेभ[1]रद म्हणे हित जैसा बालिश सर्पा[2]म, रामरण
हित मानी रावण; कीं, पाडी भ्रांतींत पामरा मरण. ६२
गांठिति त्या कपिकटका खळसेना, जेंवि वह्निच्या पुंजा
गुंजा, तो हि खळमणि प्रभुला, श्रीनृहरिला जसा मुंजा. ६३
बैसुनि शक्ररथीं करि विजयश्रीकेलिकुंज[3] राम रण.
तद्दैव[4] हि अनुमोदन दे, द्याया यातुकुंजरा[5] मरण. ६४
करि कपटशत, असो तें, दंडहताहीस[6] न क्षमा यावी,
बहुसंख्य रामलक्ष्मण निर्मी तो मोहदक्ष मायावी. ६५
श्रीरामरावणसमर होय श्रीरामरावणसमरसा,
ते वृष्टि जसी न करिति तसि शुचि सशकाररावण[7] समरसा[8].
गाईस गोपसे, कपिसेनांसि दशास्यसायक[9] वळीती[10],
जाणों[11] न वानरचमू मिटक्या देवूनि साय कवळी ती. ६७
जिंकील न आत्मगुणें[12] गिळुनि सितायुक्त[13] साय काक पिकां,
खळ निजयशा[14] तसा, हें समजुनि भीतील सायका कपि कां?
प्रबळदशवदनखरशरनिकरें[15] सुग्रीवकटक वितुळे, तें
कथितां योजिल दृष्टानिलबलभिन्नाभ्रघट[16] कवि तुळेतें[17]. ६९
त्या प्रभुपुढें समर्थ झालीं न स्वावनीं[18] चमूकवचें,

---

१. माजलेल्या हत्तीचा दांत. २. खर्जुला—**पंत.** ३. विजयलक्ष्मीचें विलास करण्याचें कुंजवन. ४. त्या रावणाचें दैव. ५. राक्षसश्रेष्ठ रावणास. ६. काठीनें मारिलेल्या सर्पास. ७. आषाढ, श्रावण—**पंत.** शकारयुक्त रावण म्ह० श्रावण. ८. समान आहे उदक जिचें ती (वृष्टि). ९. रावणाचे बाण. १०. वळवितात. ११. रावण ती वानरांची सेना ही जणूं दुधाची साय च मिटक्या मारून भक्षण करिता झाला. १२. आपल्या गुणानें. (आपल्या कर्कश शब्दानें). १३. शर्करायुक्त. १४. आपल्या (कपींच्या) यशाला. १५. बलाढ्य रावणाच्या प्रखर बाणांच्या समूहानें. १६. वायुवेगानें विसकटलेली मेघपंक्ति ज्यानें पाहिली असा. १७. उपमेतें. १८. आपल्या रक्षणाविषयीं.

तीं [1]हास्यफळें चि जसीं [2]देवगुरुसमक्ष [3]नीचमूकवचें. ७०
उपदेशांहीं खंडी उग्रा मोहासि जेंवि [4]कपिलास्य,
तेंवि प्रभु धनुइषुहीं अरिला, तें करिति हृष्ट कपि [5]लास्य. ७१
त्यास श्रीराम म्हणे, 'रे मंदा! [6]सर्वरक्तपापसदा!
[7]बापें सदाचारी त्वां लाजविला कीं करूनि पाप सदा. ७२
प्राण तुझे स्वपराहित पळ ही रक्षोधमा! न वांचावे;
चाविसि जसा खळा तूं, खळ हि अहि तसा न मानवां चावे.
[8]कामरता! मर, पामर सामरसामरसदाप्तलोकातें
मानुनि अहित अहितसा क्षोभे, कीं, पावणार शोकातें.' ७४
ऐसें वदोनि, वधिला तो [9]ब्रह्मास्त्राभिमंत्रितें [10]रोपें,
सोपें पडलें, बहुधा केलें प्रभुसाह्य जानकीकोपें. ७५
[11]वैद्युतवह्निविमर्दित [12]विटपिवर तसा खचे [13]महाकाय,
सुर म्हणति, 'अहा! झाली दोषें याची हि गति पहा काय?'
सर्वांहीं गणिला तो जयकाळ श्रावण [14]प्रसूनगणीं;

---

१. हास्य हें च फळ (परिणाम) ज्याचें अशीं. (हास्यास्पद). २. बृहस्पतीपुढें. ३. क्षुद्र आणि मुखदुर्बळ यांचीं बोलणीं. ४. कपिलमुनीचें मुख. (हा सांख्यशास्त्राचा प्रवर्तक होय). ५. नृत्य. ६. अखिलराक्षसाधमा! (रक्तप=रक्त पिणारे+अपसद=नीच). ७. विश्रवामुनि. ८. अन्वयार्थ—पामर सामर-सामरस-द-आप्त-लोकातें अहित मानुनि अहितसा क्षोभे, कीं शोकातें पावणार, [तसा हे] कामरता! मर=जो नीच असतो तो पुढें शोक प्राप्त होणार म्हणून च कीं काय इंद्रादिदेवांसमवेत समेट कर, कलह करूं नको, असा उपदेश करणाऱ्या हितैषी जनाला शत्रु मानून सर्पासारखा क्षुब्ध होतो. त्याप्रमाणें हे कामासक्ता नीचा रावणा! तूं केलेंस, तेव्हां तूं ही आतां मर. ९. ब्रह्मास्त्राच्या मंत्रानें अभिमंत्रित अशा. १०. बाणानें. ११. विजेच्या अग्नीनें मर्दन केलेला. (वीज पडून दुखवलेला). १२. महावृक्ष. १३. प्रचंड शरीर ज्याचें असा (रावण). १४. पुष्पसमुदायानीं.

क्षणभरि फाल्गुन न असें स्वसुनांसह रावणप्रसू[1] न गणी. ७७
करिती रावणतनुला आलिंगुनियां विलाप बहु विधवा;
ते सकळ एकविध[2] वा सुश्रोते हो! असोत बहुविध वा; ७८
विस्तरभय नसतें तरि वर्णाया काय सुकविला परवा?
प्रभुच्या हि वर्णिति श्रीवाल्मीकिव्यासशुक विलापरवा. ७९
ज्या पापें[3] सुरवानरकृतघनजयरव[4] मुहूर्त लोपविला,
खळदारविलापरवा[5] कां वर्णिल कविमयूर कोपविला[6]? ८०
लंका बिभीषणकरीं देवुँनि[7], द्यायास तसिं[8] सुख, निरँवी,
जसि अंधकार नाशुनि सुनृपकरीं दे सुरत्नसुखनि[9] रवी. ८१
जीच्या सुव्रततेजें कंपित व्हावें सदा सदूरूनीं[10],
त्या जानकीस विनवी सदमात्य अविंध्य दास दूरूनीं- ८२
'रक्षुनि सुगळ बिभीषण जेणें स्वयशें सलज्ज शिबि केला,
माते! त्या स्वपतिकडे चाल अधिष्ठूनि शुद्ध शिबिकेला.' ८३
वत्साला सुरभीसी जी निजदासासि पावणारी, तें[11]
अनुमोदी, मग नेउनि कळवी तो साधु रावणारीतें. ८४
जनसंग्रहार्थ[12] तो श्रीराम प्रभु कपटमानव[13] सतीस
बोले, "विलोकितों तुज जरि तूं परमंदिरीं[14] न वसतीस. ८५

---

१. रावणाची माता (कैकसी). रामानें रावणास मारलें त्या वेळीं, श्रावणमासीं जशी मेघ पर्जन्यवृष्टि करितात तशी देवानीं पुष्पवृष्टि केली; त्यामुळें सर्वांना तो जयकाळ फाल्गुन असून हि श्रावण च आहे कीं काय असें वाटलें; परंतु रावणाच्या बायकांना व आईला मात्र तो फाल्गुन नव्हे असें क्षणभरि हि वाटलें नाहीं. तात्पर्य, त्यानीं दुःखानें शंखध्वनि केला. २. एका प्रकारचे. ३. ज्या दुष्ट विलापरवानें. ४. देव व वानर यानीं केलेला मेघासारखा गंभीर जयघोष. ५. [त्या] दुष्ट रावणाच्या स्त्रियानीं केलेल्या आक्रोशाला. ६. कोपविलेला. ७. देऊन टाकी. ८. लंकेस—**पंत.** ९. पृथ्वी—**पंत.** उत्तम रत्नांची खाण. १०. साधूंच्या मांड्यानीं. ११. अविंध्यभाषण. १२. लोकांचें स्वधर्माचे ठायीं प्रवर्तन होण्यासाठीं. १३. मायेनें मनुष्यरूप धारण केलेला. १४. परक्याच्या किंवा शत्रूच्या घरांत.

रिपु मारुनि सोडविलें कीर्त्यर्थ चि तुज, न देवि ! भोगाया,
कीं नमुनि ईश्वराला ‘ यश चि ’ म्हणति सुजन ‘ दे विभो! गाया.’
परकरग[1] स्वकलत्र स्पर्शें चि महायशासि वाहवितें[2];
कोण प्राज्ञ म्हणेल, श्वा सिवला ज्या तशा[3] सिवा हवितें[3]? ८७
जा स्वैरें[4], म्हण स्त्रींच्यां, ‘ सुखदे ! हो सुप्रसन्न,’ मोकळिके[5];
जी चुंबिली भुजंगें मधुप म्हणेल चि तिला ‘ नमो कळिके[6] !’”
असि अप्रियोक्ति कर्णीं, भूपृष्ठीं ती हि एकदा चि पडे,
प्रभुला पाहों न शकति कपि डोळे जेंवि भानुला चिपडे[7]. ८९
चित्तीं म्हणे प्रभु, ‘ अहा ! पडली सहसा गरांत मज्जाया.
वदलों असें कसें भूलोकांसह सागरांत मज्जाया? ९०
सावध होवूनि करिल जरि लोकप्रत्ययार्थ हे शपथ
प्राणप्रियेसह सुखें आतां चि धरीन मीं स्वदेशपथ.’ ९१
सुर म्हणति, ‘ सती मोहें मुखिं भरिली आपल्या पहा रे! तें.’
विधि शिव म्हणती, ‘ अजगर गिळिल कसा तापल्या पहारेतें?’
जेंवि व्यसनीं त्रिजगन्नाथस्मृतिचा[8] धरी करीश[9] पथ,
ती तेंवि सत्यधर्मस्मरणपरा जानकी करी शपथ. ९३
‘ चुकल्यें असेन तिळभरि तरि शापावें मला सतीव्रातें[10].
भुजगीतें[11] कीं तुमच्या भुजभुजगातें[12] शिवेन तीव्रातें. ९४
स्वप्नीं हि तुम्हांहुनि पर पुरुषीं गेलें असेल हें मन, हो!
तरि युष्मच्चरणरजःस्पर्शें[13] मद्देहलोह[14] हेम[15] न हो. ९५

---

१. दुसऱ्याचे हातीं गेलेलें. २. घालवितें. ३. कुत्रा शिवलेल्या होमद्रव्यातें. ४. स्वच्छंदानें. ५. स्त्रियांच्या स्वतंत्रतेला. ६. सर्पदष्ट पुष्पकलिकेला भ्रमर ‘ तुला नमस्कार असो ’ असें च म्हणेल. (तिला स्पर्श करणार नाहीं). ७. पुवळलेले. ८. त्रैलोक्याधिपति श्रीविष्णूच्या स्मरणाचा. ९. गजेंद्र. १०. पतिव्रतांच्या समूहानें. ११. सर्पिणीला. १२. बाहुरूप सर्पातें. (मी जर असति असलें तर तुमचा भुजभुजग मला ठार करील, हा भाव). १३. तुमच्या चरणधूलीच्या स्पर्शेंकरून. १४. माझें शरीररूपी लोखंड. १५. सुवर्ण.

मळलें असेल हृदय स्वसतीव्रतनियमलेशभंगोहें[1],
प्रभुजी ! तरि मन्मस्तक आतां चि तुम्हांसमक्ष भंगो हें.' ९६
करितां शपथशत असें वाय्वग्निप्रमुख देवता म्हणती,
'श्रीरामा! सीतेतें करिति, करितिल हि महासती प्रणती.' ९७
विधिहि म्हणे,'असि कुलजा अर्पुनि वपु तुजअशाहि कुलतिलकीं[2]
परतेल काय? ऐकुनि हें साध्वींचीं उरें चि उलतिल कीं.' ९८
तों दिव्यविमानस्थित दशरथ हि म्हणे दशाननारीतें,
"वत्सा! सतीव्रतबळें ग्रासी कष्टा दशा न नारीतें. ९९
सीता महासती हे म्हणुन चि तरलासि तूं हि सैदरींतें[3],
जें सर्वव्यसनौषध सद्व्रत आहे इच्या चि पदरीं तें. १००
सुर मज म्हणति 'सदा निजसद्गतिदव्रतपरा सुनेला गा,'
कोण न यमदूतांहीं शोकें होतां परासु[4] नेला गा!? १०१
बा! हे जन्हि खळरुद्धा शुद्धा चि सदा सती, अगा! ईतें
त्याज्या म्हणसि तरि यवनकृतरोधें त्यजिति कां न गाईतें ?
रामा! बा! माज्या, हे साध्वी साध्वीड्यसद्गुणा[5] सुहिता,
मेघें शंपासी[6] त्वां अंकीं घ्यावी नृपर्षिची दुहिता. १०३
भरत रिपुघ्न प्रियसख सचिव सकळ भृत्य पौर गौरवुनीं,
पाडीं गुणें उणें, जें छत्र सुधास्रावि[7] चंद्रगौर[8] उनीं. १०४
होवूं न दिलें सत्यभ्रष्ट तुवां स्त्रीजितास मज साधो !
साधोरणा[9] गजीसी[10], त्वद्युक्ता श्री असो, सुयश साधो. १०५
सीता चि न त्रिलोकी हर्षविली त्वां दशाननवधानें,
या त्वच्चरितश्रवणीं न टिकावें क्षण अघें अनवधानें[11]." १०६

---

१. [आपल्या पातिव्रत्याविषयींचे जे नियम त्यांच्या लवमात्र] भंगाच्या संकल्पें—**पंत.** २. कुलभूषणीं. ३. बलाढ्य शत्रूंतें. ४. गतप्राण. ५. साधूंनीं स्तवन करण्यास योग्य असे उत्तम गुण आहेत जिचे. ६. वीजसी. ७. उन्हांत अमृत स्रवणारें. ८. चंद्राप्रमाणें शुभ्र असें. ९. महामात्रसहिता—**पंत.** महातास-हित अशा. १०. हत्तिणीप्रमाणें. ११. असावधपणानें.

गुरुदेववाक्य मान्य श्रीराम करी, सतीस घे अंकीं,
अंकीं[1] गण्य न तें सुख, ये बहु मालिन्य इंदुच्या[2] अंकीं. १०७
वृत्रारि अमृतसेकें उठवी विगतासुकीशकटकातें[3],
दे देव देवेंराया[4] यश, दुर्घट काय विश्वघटका[5] तें? १०८
श्रीमार्कंडेय म्हणे, 'कपि उठले ब्रह्मदेववरदानें,
हो! त्यासि दिलें यश त्या प्रभुनें सब्रह्मदेववरदानें[6].' १०९
राम म्हणे, 'त्वां चि दिली त्रिजटे! म्हणतों तुला चि वसुधा[7] मीं;
तव उपकार फिटेसें धनदाच्या[8] ही नसेल वसु[9] धामीं. ११०
फेडील कोण भाग्यें या सीतादानसूपकारातें[10]?
केलें सुधाप्रदें[11] जें न घडे चि नळीं[12] हि सूपकारा[12] तें.' १११
ऐसें चि अविंध्यास हि पूजी, कीं नित्य त्या चि दोघांहीं
व्यसनीं वांचविले प्रियदार, जसे जीव मुद्विदोघांहीं[13]. ११२
सीता म्हणे, 'हनूमन्! त्वद्गत सेतुत्व हें न मज्जनकीं[14]
घडतें चि, भेटतासि न तरि मज विपदर्णवांत मज्जन कीं. ११३

---

१. आंकड्यानीं. २. परित्यागभियाऽश्रुमलिनं सीतामुखं मत्तोऽतिमलिनमिति मन्यमानस्येन्दोः पुनः पतिप्रसादलब्धसुषमं पश्यतोऽतितरां मालिन्यमभूत्–**पंत**. त्यागाचे भीतीमुळें अश्रूनीं मलिन झालेलें सीतेचें मुख माझ्यापेक्षां अतिशय मलिन आहे असें मानणाऱ्या चंद्राचे ठिकाणीं, पतिप्रसादानें पुन्हां सतेज झालेलें सीतामुख पाहून फार च मालिन्य उत्पन्न झालें. (सतेज सीतामुखापुढें चंद्र फिका पडला हें तात्पर्य). या गीतींतील 'अंक' हा शब्द अनुक्रमें उत्संग, संख्या आणि कलंक या तीन अर्थीं प्रयुक्त आहे. ३. मृत अशा वानरसैन्यातें. ४. इंद्रातें. ५. विश्वनिर्माणकर्त्याला. ६. ब्रह्मदेवासह सर्वांस वर देणाऱ्या अशा. ७. पृथ्वी. (तूं च या सीतेची जननी असा भाव). ८. कुबेराच्या ही घरीं. ९. द्रव्य. १०. सीतादानरूप थोर उपकारातें. ११. अमृत देणाऱ्यानें. (चंद्रें). १२. पाककर्ता–**पंत**. (नळराजा हा उत्तम स्वयंपाककर्ता खरा; पण त्यास हि अमृतस्रावी चंद्राप्रमाणें अन्न बनवितां येणार नाहीं). १३. आनंदज्ञानाच्या ओघांहीं–**पंत**. १४. माझ्या पित्याचे ठायीं.

तूं धन्य महाभागा ! बा ! गा ! [1]भांगा तुझ्या चि यश आलें,
झालें होतें मद्वपु दशवदनीं, [2]घस्मरीं जसें आलें. १९४
[3]यांच्या कीर्तिसुधासरिदुदरीं स्वानंदमत्त मासा हो;
त्वद्विरहातें क्षण हि न सिद्धहृदय साधुसत्तमा ! साहो. ११५
भजतील मत्प्रसादें सर्व हि तुज दिव्य भोग संतत रे !
त्वद्भक्तिनें तरो जन, हरिहरभजनें जसा चि संत तरे.' ११६
श्रीसीतावात्सल्यें त्यजिली च असेल [4]अंजना [5]भानें,
सीता ही लाजविली बहुधा [6]नररूपकंजनाभानें. ११७
सुग्रीवप्रमुखांसह बैसे श्रीराम पुष्पकविमानीं,
त्यासि [7]सकुलालिवरसमधिष्ठित [8]दिव्यद्रुपुष्प [9]कवि मानी. ११८
राम म्हणे, 'पावाया [10]शुचिसुकृतनिवासमानसे ! तूतें,
तरलों व्यसनीं या अवलंबूनि शिवासमान सेतूतें. ११९
त्वत्पुण्यें [11]टिकला सति ! येणें सिंधूंत पळ हि न तगावें,
शतगावें कीं हो हा, विश्वें होवूनि यासि नत गावें. १२०
पाहुनि यासि न वदलों कीं कैसा भेटतो [12]खळप हा ! हा !
जेणें सेतु विरचिला नमितो तुज देवि ! तो नळ पहा हा. १२१
सुगळादि राबले बहु, न दुकाळीं तेंवि रंक राबेल,
अर्पिति नळा [13]नगें, जसे बुध शिवरात्रींत शंकरा [14]बेलें.' १२२
ऐसें मनःप्रियेसीं बोले [15]विरहोत्थमानसाधीतें,

१. वांट्याला. २. बहुभोक्ता–**पंत.** ३. रामचंद्रांच्या कीर्तिरूप अमृतनदीच्या उदरीं. ४. हनुमन्माता–**पंत**. ५. मारुतीवर सीतेचें इतकें प्रेम होतें कीं, तें पाहून अंजनेचें देहभान च गेलें असेल. ६. मानवरूपधारी कमलनाभ भगवान् विष्णूनें म्हणजे रामानें आपल्या प्रेमानें सीतेला लाजविलें. ७. कुलासहित अशा भ्रमर-श्रेष्ठानें आश्रयिलेलें असें. ८. कल्पवृक्षाचें फूल. ९. मोरोपंत समजतो. १०. शुद्ध पुण्याचा निवास मानसामध्यें जिच्या ती. ११. हा सेतु टिकला. १२. दुष्टशिरोमणि. (रावण). १३. सेतुबंधासाठीं पर्वत अर्पिति. १४. बिल्वदलांच्या लाखोल्या. १५. विरहानें उत्पन्न झालेल्या मनोव्यथेतें.

कळवुनि साधावें जें तत्प्रिय देवूनि मान साधी तें. १२३
प्रभु बोळवी चमूंतें बहु पूजुनि, पितर जेंवि कन्यांतें,
दृष्टांत एकदेशी, ठावें तत्प्रेम[1] काय अन्यां तें? १२४
मग किष्किंधेंत म्हणे, स्वकरें स्पर्शोनि अंग, दासा हें,
‘हा यौवराज्यभर या सुग्रीवसुखार्थ अंगदा! साहें.’ १२५
धन दे, परि तात न दे बहु आवडत्या हि अंग दायादा[2];
तत्तुल्य[3] कसा प्रभु, जो साक्षादमृताब्धि अंगदा यादा[4]? १२६
त्या श्रीकर तीर्थपद[5] प्रभुचा दे भाग्य आयतें पाणी,
जें पंककारण[6] अधोगति ज्या देईल काय तें पाणी? १२७
पुत्रांसि[7] म्हणे, “म्हणत्ये मज सीता, ‘चाल, सिद्ध हो, तारे[8]!’
परि लाजे मन, वदल्यें बहु कटु, जें नाथ[9] विद्ध होता रे!” १२८
अंगद म्हणे, ‘सदरिलां[10] करितो सोडूनि भल्लें[11] भस्म रणीं,
नमितां, न रत अघांच्या, हा सीताप्राणवल्लभ, स्मरणीं. १२९
लोकीं धन्यत्वप्रद या प्रभुचे पाय हे तुम्हा तारे!
यांपरि न सुखद होती पति अथवा कायहेतु[12] म्हातारे.’ १३०
‘बां[13]! हूं, चाल, शिरोब्जें[14] वाहूं रामप्रसूपदीं[15], राहूं,
पाहूं अभिषेकोत्सव, लाहूं सुख, सवतिला[16] हि दे बाहूं.’ १३१
सीतेसवें विमानीं बसतां मानी पुरास दव[17] तारा,
न निवे, न भुले कोण, प्रेक्षुनि त्या कापुरा सदवतारा[18]? १३२

१. पितरांचें किंवा प्रभूचें प्रेम. २. पुत्राला. ३. त्या तातासारखा. ४. जलजंतुरूप अंगदाला. ५. रामाचा सौभाग्यदायक व तीर्थस्थानापन्न असा हात. ६. जें चिखलास कारण (पापास कारण) व ज्या उतरती गति आहे तें पाणी काय देईल? अर्थात् कांहीं देणार नाहीं. ७. अंगदास. ८. वालिस्त्रिये! ९. वालि. १०. सज्जनांचे शत्रूला. ११. बाण. १२. देह देण्यास कारण. १३. हें तारेचें अंगदाशीं भाषण आहे. १४. शिरःकमलें. १५. कौसल्येच्या चरणीं. १६. रुक्मेला. (ही सुग्रीवपत्नि). १७. वणवा. १८. साधूचा अवतार हा च कापूर, त्याला.

चढली अजा[1] गजशिरीं, फळली सदमृतफळें चि कटु[2]तुंबी,
तें हें चि, जें कवि म्हणति ऐसें विधुला[3] पिपीलिका चुंबी. १३३
दावी प्रियेसि अगें[4] नगें[5] गगनग[6] खग रथ वनें नद नद्या या,
बहुवर्णनीं[7] अनुज्ञा भरतस्मृति मज न दे वदन द्याया. १३४
श्रीराम म्हणे, 'वत्सा! अक्षारे![8] शीघ्र धाव, बापा! हूं;
करितोसि कसें व्यसनीं रक्षुनि भरतासि नांव बा! पाहूं. १३५
आलों म्हण, भरताचें वपु पावो सुमहिमा नव पुन्हा तें,
होय रुचिर न कसें जें अमृघनें दह्यमान वपु न्हातें? १३६
मागें पित्यासि[9] सांडी जन्हि त्यासि असे सदा सवें गमनीं,
आंपुलिया[10] चि बसे तो पंडित जाणो तदा सवेग मनीं.' १३७
श्रीराम चंद्र, त्याचा[11] करें[12] तो कपि सर्व ताप वाराया
धावुनि भेटे व्यसनीं भरतशिशुचकोर तूर्ण[13] ताराया. १३८
'आला सदार सानुज कुशली श्रीराम जो स्वजन-कवच,'
ऐसें वदे पवनसुत, वाटे भरतासि तें स्वजनक-वच. १३९
प्रेमें भुलला नसता भरत कपि हि राम[14]पदरजप्रवण
तरि राज्य[15]पारितोषिक देतां घेतां हि वारिता कवण? १४०

---

१. शेळी. २. कडु भोंपळी. ३. पिपीलिका विधुला (चंद्राला) चुंबी ऐसें जें कवि म्हणतात तें हें च होय. (तारा वानरी असून विमानांत बसली याविषयीं कवि म्हणतात, हत्तीवर शेळी बसावी किंवा कडुभोंपळीस अमृतफळें यावींत तसें हें झालें किंवा चंद्राचें चुंबन मुंगी घेतें असें जें कवींचें म्हणणें आहे तसें हें झालें). ४. वृक्ष. ५. पर्वत. ६. गगगचुंबित. ७. अन्वयार्थ—बहुवर्णनीं वदन द्याया मज (कवीला) भरतस्मृति अनुज्ञा (अनुमति) न दे. ८. अक्षनामक जो रावणपुत्र त्याच्या शत्रो! (मारुति!). ९. वायूसि. १०. तो पंडित (मारुति) इतक्या वेगानें आपल्या इष्ट स्थळीं गेला कीं जणुं काय तो आपल्या वेगवान् मनोरूपी वाहनावर च बसून गेला. ११. रामस्वरूपी चंद्राचा. १२. हात (पक्षीं) किरण. १३. लौकर. १४. रामपदाच्या धुळीवर नम्र झालेला. १५. राज्यरूप बक्षीस भरतानें दिलें असतां व मारुतीनें घेतलें असतां त्यांचें निवारण कोण करणार होता?

'आला श्रीराम?' असें भरत पुसे पांचसातदा साचें;
उत्तर हि तसें चि करी आवृत्ती पांचसात दासाचें. १४१
जाणों निववायास्तव तो चातक[1] होय दाससा मोरा[1],
बोधुनि घेउनि गेला सांभाळुनि तोयदास[2] सामोरा. १४२
प्रभुकारुण्य चि धांवे होउनि पुष्पकविमान भरभर तें,
कीं व्हावें न व्याकुळ वाहुनि दुर्वाह्य राज्यभर भरतें. १४३
भेटि प्रभुभरतांची स्मरतां चि श्रोतृकोटिला[3] निववी,
जिववी मृतां सुधा जी तीस ईचें[4] यश इच्या पदा शिववी.
जो पीडिला रडविला देउनि माथां स्वराज्यभर तातें,
तदधिक कसा नव्हे प्रभु, जो दे सुख, हरुनि भार भरतातें? १४५
मज वर्णवेल तें सुख अथवा वदवेल काय हो यश तें?
कीं जें अपार तेथें गुरुशेषांच्या हि काय होय शतें[5]? १४६
जासि अब्जिनी[6] प्रमुदिता[7] उदितार्कातें[8] विलोकितां होती,
तसि हर्षली अयोध्या पाहुनि रघुवंशभूषणा हो! ती. १४७
पावे चंद्रें हि तसें कुमुद न, अर्कें हि तोख[9] राजीव[10],
मज हें कळे कळेवरें[11] वरपुर[12] तें, राम तो खरा जीव. १४८
जाणों केलें येणें[13] शुष्कसरोमीनसन्निध[14] नदानें,
धनदानें[15] सुखवाया कीं केवळ निर्धनांसि धनदानें[16]. १४९
न पुरी प्रकाशिली, भू प्रभुरविनें हरुनि अंधकारा ती;
आला जाणों दीनोद्धारोत्धुर[17] सांब[18] अंधकाराती[19]. १५०

---

१. चातक=मारुति, मोर=भरत. २. मेघास. ३. कोट्यवधि श्रोत्यांना. ४. या भेटीचें. ५. बृहस्पति आणि शेष यांच्या शतानें. ६. कमलिनी. ७. प्रफुल्लित. ८. उदय पावलेल्या सूर्यातें. ९. संतोष. १०. सूर्यविकासी कमळ. ११. शरीर. १२. उत्तम शहर (अयोध्या). १३. आगमन. १४. शुष्क सरोवरांतील मत्स्याजवळ. १५. कुबेरानें. १६. द्रव्यदानानें. १७. दीनांचा उद्धार करण्याविषयीं उद्युक्त असा. १८. अंबेसह. १९. अंधकासुराचा शत्रु. (शंकर).

[1]कर्दमशेषसरीं जों न्हावें व्यसु[2] शुष्ककाय[3] यादानीं
तों जाणों घन वर्षे, पुण्य यश स्वल्प काय या दानीं? १५१
जें सीतेचें कैचें तें स्वर्गींच्या सुभाग्य वल्लीला?
प्रभुला हि लाजल्या हो! शतकोटिवदान्यभाग्यवल्लीला[4]. १५२
प्रेमाश्रुवृष्टि करितां लाजे घनकोटि दृष्टिला ज्यांच्या,
त्या पौरवधूंच्या किति कविजन वर्णील वृष्टि लाज्यांच्या[5]? १५३
बहु हर्षे पाहुनि वनवासनिवृत्त[6] स्वकायज्या माता;
सुखविल सासूसि तसें यमगेहागत[7] हि काय ज्यामाता? १५४
कैकेयीस नमी रघुसिंह, पळे तों तदीय तापससा[8];
सुखधन द्याया धनद चि जन्हि वरि वेषेंकरूनि तापससा[9]. १५५
[10]हर्षविली जी भ्याली संकोचा जेंवि अंधकारा ती,
अन्वर्थ रामचंद्र, ध्यातो यास्तव चि अंधकाराती. १५६
त्या मंथरेस हि म्हणे, "वेड्ये! त्वां सर्वथा न लाजावें,
हें सद्यश जोडाया मद्बुद्धि हि न म्हणती मला 'जावें.' १५७
भरता! तरि राज्य करिन, जरि तूं म्हणसिल 'न ईस भाजीन[11];'
कीर्ति करी कैकेयी, हे पुण्याची नई[12] सभाजीन[13]." १५८
तो साधु म्हणे, 'अमृताहुनि आर्यनिदेश गोड कळला, हो!
जरि हा सुगुरु[14], तदपि जन यासि वहातां न मोडकळ लोहो[15].'

---

१. ज्यामध्यें [केवळ] चिखल च शिल्लक राहिला आहे अशा सरोवरांत. २. गतप्राण. ३. रसहीन झाला आहे देह ज्यांचा अशा. ४. शतकोटि जे भाग्यवान् दाते, त्यांच्या लीला. ५. लाह्यांच्या. ६. वनवासापासून परत आलेल्या आपल्या पुत्राला. ७. यमगृहापासून परत आलेला जामाता (जांवई). ८. तापरूपी ससा. ९. तपस्व्यासारखा. १०. अन्वयार्थ—जेंवि अंधकारा [तेंवि] जी (कैकेयी) संकोचा भ्याली ती हर्षविली; यास्तव चि अंधकाराति (शंकर) अन्वर्थ रामचंद्र (चंद्र हें नांव ज्याचें यथार्थ आहे असा राम) ध्यातो (रामनामाचा जप करितो). ११. छळीन. १२. नदी. १३. पूजीन. १४. अतिशय जड. १५. पतन न पावो.

राज्याभिषेकउत्सव सुमुहूर्तीं होय हो ! यथाविधि, तें
कल्याणपर्व भुलवी गिरिशा[1]सह हंसवररथा[2] विधितें. १६०
सिंहासनीं जिहीं प्रभु सीतेसह देखिला, तिहीं प्राज्य[3]
वरिलें धन्यत्व, तसें न सुरांचें द्यावया शके राज्य. १६१
तेव्हां गंधर्वमुखीं जिकडेतिकडे हि तननंनं[4] तननं,
मुनि म्हणति, 'वानराणामपि[5] न नराणां सुमंगलं जननं.' १६२
परशब्द[6] न साकेतीं स्वर्गीं:ही आयकों न दे वाद्य;
यां गजरें[7] चि निवे चि, न 'तप तप' हें आयकोन देवाद्य. १६३
ईश हि नाचे, पावे वृद्धीतें प्रीति, देहभा[8], नाचें
किति अप्सरा? न मांडे[9] गौरीचित्तीं[10] हि देहभानाचें[11]. १६४
शतलक्षकोटि खंडी कल्पतरूंचीं फुलें उडविलीं, हो!
तीं सुरभोग्यें[12] कपिनीं पौरानीं पुरपथीं तुडविलीं, हो! १६५
कविकोटिला न वदवे लव हि श्रीरामदेवराज्याचा
रस, कामधेनुच्या ही रसिकासि वदों न दे वराज्याचा[13]. १६६
वेडावले महाकवि वर्णूं जातां धरूनि आवांके[14],
तेथें मयूरमति किति, जी प्रेमभरें करूनि आ वांके? १६७
ऐसें चरित्र सांगुनि मार्कंडेयें सबंधु तो धर्म
विज्वर[15] केला, कोण न पावे प्रभुचरित सेवितां शर्म[16]? १६८

---

१. शंकरासह. २. हंसश्रेष्ठ हा च रथ ज्याचा त्या ब्रह्मदेवाला. ३. पुष्कळ. ४. सनईचे सूर किंवा गाण्यांतील ताना. ५. मनुष्यांचें च जन्म उत्तम आहे असें नाहीं; तर वानरांचें ही जन्म उत्तम आहे. ६. दुसऱ्याचा शब्द. (आयकों न दे या क्रियेचें कर्म). ७. त्या गजराचा प्रभाव इतका मोठा होता कीं, देवाद्य (शंकर) गजरें चि निवे; 'तप, तप' (तप करा, तप करा) हें आयकोन [इतका] न निवे चि. ८. त्या शरीराची कांति. ९. मांडें=रोपडें, अंकुर. (?). १०. पार्वतीच्या चित्तांत हि. ११. देहस्मृतीचें. १२. देवानीं उपभोगण्यास योग्य अशीं कल्पतरूंचीं फुलें. १३. उत्तम तुपाचा. १४. धैर्य. १५. तापरहित. १६. सुख.

अध्याय तेरावा.

धर्म पुन्हां त्यासि म्हणे, 'मार्कंडेया मुनीश्वरा! आर्या!
आढळली तुज लोकीं सत्वाढ्या[1] आमुची जसी भार्या?' १
मुनि त्यासि म्हणे, "होती सावित्रीनाम अश्वपतितनया[2],
तच्चरित श्रवण करीं, ऐकाया योग्य, साधु, पतित, न यां[3]. २
होय प्राप्त विधिस्त्रीसावित्रीच्या[4] वरें चि ती राया,
यत्कीर्ति[5] जना म्हणती, 'कर देत्यें, रे! अघाब्धितीरा[6] या.' ३
झाली भक्तसुता ती श्रीसावित्री च उद्धरायाला,
श्री क्षीराब्धिला[7] जन्मुनि जें दे यश तें च शुद्ध रायाला. ४
बहु लाजवी वरांला तीचा कुलशीलरूपमहिमा, गा!
'मागा' म्हणे गिरीश चि, 'न जडगिरि स्वस्तरूपमहिमागा.'
अश्वपति म्हणे, 'वत्से! चिंता मज हे चि एक परमा, गे!
झालीस दानयोग्या, परि कोणही ही तुला न वर मागे. ६
जा, शोधुनि ये, वत्से! वरुनि मनें मानल्या कुलीनातें,
कीं तुजकडे चि आहे शतपुत्रांचें हि गे! मुली! नातें.' ७
'स्ववर पहा, जा,' ऐसें योग्य जनीं तो चि तीस चि वदाया.
गुरुच्या वचनें गेली आपण घेवूनि ती सचिव दाया. ८
अनुरूप वर विलोकुनि आली तों, त्या नृपा परमहर्षी
सांगत होता सुकथा श्रीनारद जो कृपापर महर्षी. ९
ती दोघांतें वंदी, तों तीस ब्रह्मकायभू[9] पाहे,
सस्मित असें पुसे कीं, 'त्वत्तनया होय काय भूपा! हे? १०

---

१. सत्वशील. (कसा हि प्रसंग आला तरी धैर्यानें राहणारी). २. अश्वपति-नामक मद्रदेशाधिपतीची कन्या. ३. या चरित्राला हें सत्पुरुष आणि हे पापी असा भेदभाव नाहीं. ४. ब्रह्मदेवाची बायको सावित्री, तिच्या. ५. ज्या सावित्रीची कीर्ति. ६. पापरूप समुद्राच्या तीरास. ७. लक्ष्मी ही क्षीरसमुद्राची कन्या. ८. परिशिष्ट पहा. ९. ब्रह्मदेवाच्या शरीरापासून झालेला. (नारद).

कोठें गेली होती? श्वशुरगृहाहूनि काय आणविली?
हा[1]! सचिवानीं आझुनि दानोचितता इची न जाणविली.' ११
भूप म्हणे, "परिसावें तें चि तुवां[2] सर्वसाधुकुलगीतें,
म्या पाठविलें होतें स्ववर पहाया स्वयें स्वमुलगीतें. १२
वद वत्से! काय कसें? वर बरवा पाहिला? न लाजावें,
या गुरुनें 'धन्य' असें म्हणुनि स्वमुखें तुला मला, जावें." १३
सांगे ती सावित्री, 'नृप द्युमत्सेन शाल्वपति[3] आहे,
जरि वृद्ध अंध रिपुहृतराज्य वनस्थ हि न काळजी वाहे, १४
कुलशीलसत्वगुणनिधि तो पुत्रकलत्रमात्रपरिवार,
परि वारें[4] सर्व सण त्या; कीं, मथिला स्वांतरस्थ[5] अरिवार[6]. १५
तो श्वशुर मानला मज, चित्तें त्याचा कुमार म्यां वरिला;
जरि लाजविति सख्या, अनुसरली गौरी हरा, न त्या हरिला.'
नारद म्हणे, 'नृपा! हे चुकली योजूनि सत्यवान् नवरा;
न वरावा जरि गुणवान्[7], योजू अन्या, असे उणें न वरा.' १७
भूप म्हणे, 'सर्वज्ञा! देवा! उमजे असें चि सांग मला,
गुणवान् युवा[8] कुलज[9] वर जरि, तरि हि तुम्हां अयोग्य कां गमला?
काय इणें न धरावें अधनत्वें[10] भूपज नवरा[11] जीवीं[12]?
कां न प्राशावें मधु मधुपीनें कूपजनवराजीवीं[13]?' १९
मुनि सांगे, 'वर्षांतीं येइल त्या भूपपुत्रका व्यसुता;
अन्य वरू, वृत[14] हि कच त्यजुनि, वरी भूपपुत्र[15] काव्यसुता[16].' २०

---

१. सावित्री अविवाहित आहे असें कळल्यावर नारद म्हणतो. २. सर्व साधुजनांच्या समुदायानें स्तविलेल्या त्वां. ३. शाल्वदेशाचा राजा. ४. त्याला सर्व दिवस सणासारखे आनंदप्रद आहेत. ५. आपल्या अंतःकरणांत राहणारा. ६. कामक्रोधादि शत्रुसमूह. ७. जरी गुणी आहे, तथापि तो वरूं नये. ८. तरुण. ९. कुलीन. १०. दारिद्र्यामुळें. ११. नवऱ्या(ला). १२. जीवीं धरणें= प्रिय मानणें. १३. विहिरीमध्यें झालेल्या नूतन कमलाचे ठायीं. १४. वरलेला. १५. राजपुत्र. (ययाती). १६. शुक्रकन्या देवयानी.

भूप म्हणे, 'न वरावा वत्से! जन्हि सुगुणसागर लवायु[१];
शीतल मंद सुंगध हि वद सेवावा कसा गरल[२]वायु?' २१
ती सुमति म्हणे, 'ताता! न त्यजुनि पयोधिला नदी परते,
न पतंगचित्तवृत्ति क्षण ही रत्नीं, त्यजूनि दीप, रते. २२
वरिला तो वरिला चि, स्पर्शावा या न अन्य कायातें;
हा दृढ निश्चय माझा, स्तवितील कुलीन कन्यका यातें[३]. २३
आयुष्य असो कितितरि, मज तदितर पुरुष तुजसम चि राया!
मन न चळेल चि, येइल जरि चरचर हा गळा यम चिराया.'
देवर्षि म्हणे, 'त्यास चि दे साध्वीव्रतपरा सुता, राया!
शुचिनिश्चयाहुनि अधिक अमृतरस नसे परासु[४] ताराया.
हे बहु धन्या कन्या अन्यायन्याय[५]धर्मभावज्ञा
किंबहुना[६] स्वल्पा तरि करि आद्यसती हि वल्लभावज्ञा. २६
होतें सद्धर्माच्या कासेला लागतां सदा शिव, हो!
येतों, बसा, प्रसन्न प्रभु मृत्युंजय[७] तुम्हां सदाशिव[७] हो.' २७
गेला मुनि जो भगवत्कीर्तिमहाकामधेनुचा दुहिता[८];
नेउनि दिली नृपें ती सद्विधिनें[९] सत्यवत्करीं[१०] दुहिता[११]. २८
माता तात परततां बहु रडती, परि[१२] रडे न सावित्री
सुमृदु सुमंत्री हि म्हणुनि[१२], त्यासि म्हणे, 'नामें[१३]गा नसावि त्री.'

---

१. अल्पायुषी. २. विषयुक्त वायु. ३. या निश्चयातें. ४. गतप्राण मनुष्याला. ५. न्याय, अन्याय, धर्म इत्यादि भाव जाणणारी. ६. फार काय सांगावें? पार्वतीदेवी हि आपल्या पतीची अवज्ञा थोडी तरी करील; पण ही सावित्री मुळीं सुद्धां करणार नाहीं. ७. मृत्यूतें जिंकणारा श्रीशंकर. ८. दोहनकर्ता, धार काढणारा. ९. शास्त्रोक्त विवाहपद्धतीनें. १०. सत्यवानाच्या हातीं. ११. मुलगी. १२. परि सावित्री सुमृदु [असून] सुमंत्री हि [होती] म्हणुनि न रडे. १३. 'सावित्री' या नांवांतील 'त्री' हें अक्षर. (सावित्री म्हणते—माझ्या नांवांतील जी 'त्री' ती नसावी, म्हणजे मी 'सावि' असावी. माता, पिता, सासू, सासरा व पति हे पांच खुशाल असले तर मी सावी—सहावी हें तात्पर्य).

झाली तपोवनांत स्वीकारुनि वल्क तापसी ते तें
अद्भुत सत्व[१] तिचें बा !, तितका नव्हता चि ताप सीतेतें. ३०
वेद श्वशुर, श्वश्रू स्मृति, ती स्वाचार[२]पद्धती च सती,
मुनि म्हणति 'या नृपाच्या उटजीं सिद्धि[३] स्नुषामिषें[४] वसती.'
तो सत्यवान् म्हणे, 'हे पितृराज्यश्री तपोवनांत पती
हो आपन्मुक्त म्हणुनि बहुधा आपण हि या मिषें[५] तपती[६]'. ३२
तत्सद्गुणें प्रमुदितें झालीं केवळ मनांत न तिघें तीं,
सकळें सदेवतापसवृंदें हि तपोवनांत नति घेतीं[७]. ३३
ती स्वमनांत म्हणे, 'तुज तनु रडविल सर्वकाळ, जीवा ! हे,
सोड इला, वेड्या ! बुध न कुसंगति धरुनि काळजी वाहे. ३४
आध्यनळें[८] हृन्मणिकीं[९] काळाचा कवळ व्हावया सिजसी,
जीवा ! क्रियां[१०] सुटेना, केली जें प्राप्त व्हावयासि जसी.' ३५
ऐसें चिंती, वाळे, मोजी उर्वरितें[११] दिवस महिने ती;
नसतें तसें, तरि सुखें, वय, भोगुनि तदधिक श्रम हि, नेती. ३६
उरतां च्यार दिवस ती करि वांचाया पति व्रतारंभा.
तन्नियमीं[१२] प्रियवाक् कीं शुकीं विलोकी न तीव्रता रंभा ! ३७
श्वशुर म्हणे, 'त्रिदिनव्रत झालें कीं ! वंश धन्य केला गे !
कर पारणा, क्षुधा बहु पूर्ववयामाजि कन्यके ! लागे.' ३८
ती, 'संकल्पीं आहे सूर्यास्तीं पारणा करायाची,'
ऐसें श्वशुरश्वश्रूचरणांतें जोडुनी करा याची. ३९

---

१. बल, धैर्य. २. सदाचाराची रीति. ३. फलसिद्धि. ४. सुनेच्या मिषानें. ५. या सावित्रीच्या रूपानें. ६. तप करिते. ७. [सावित्रीचे] नमस्कार घेणारीं. ८. चिंतारूप अग्नीनें. ९. हृदयरूपी मडक्यांत. १०. कर्म. ११. [पतीच्या मरणसमयापैकीं] उरलेले. १२. अन्वयार्थः—तन्नियमीं [जी] तीव्रता [होती] [ती] तीव्रता प्रियवाक् (मधुर भाषण करणारी) रंभा शुकीं हि न विलोकी कीं ! (शुकाचार्यापेक्षां हि तिचें व्रताचरण कडक होतें असा भाव. 'कीं' हें येथें आश्चर्यदर्शक अव्यय समजावें).

फळमूळार्थ निघे पति, त्यासि म्हणे, 'मज हि सत्तमा[1]! न्या, हो!
वन पाहेन, तुम्हां हे न प्रथम प्रार्थना अमान्या हो.' ४०
चित्राश्व[2] म्हणे, 'दयिते[3]! गमली वनसरणि[4] काय कोमळ ती?
श्रमसिल शिबिकास्था[5] ही, दुर्गवनपथांत[6] बायको मळती[7]. ४१
उपवास तीं दिसांचा, तूं आधीं च प्रिये सुमृदुला गे!
न्यावें कसें? चरणयुग नवनीतापरिस ही सुमृदु लागे. ४२
मज सोसेल कसी, जी न पहावे स्त्रीव्यथा नरा नीच्या?
श्रमदा प्रमदाहृदया कथिती हि कवी कथा न रानींच्या. ४३
येणार चि तरि साध्वि! श्वश्रूश्वशुरांसि पूस, मग ये, तें
योग्य तुज मज हि, मानिति गुर्वाज्ञाधिक सुबुद्धि न गयेतें[9].' ४४
सावित्री त्यांच्या ही आज्ञेतें तत्प्रसाद साधुनि घे;
उटजांतूनि सतीसह वंदुनि तो स्वपितृपाद साधु निघे. ४५
ती न स्त्री, रक्षाया त्यासि निघे आत्तमूर्ति[10] जनकाशी[11],
परमशिव जीतें[12] नांदे म्हणुनि जिला म्हणति सुज्ञजन 'काशी.' ४६
जे पक्षी, जे श्वापदसंघ[13] अधिष्ठूनि[14] कानना वसती,
त्यांचें तद्वचनामृतपानार्थ[15] पुसेल कां न नाव सती? ४७
पात्र भरूनि फळानीं काष्ठें फोडी वनांत, सत्वर तें
पाहूनि तत्कळत्रें[16] स्मरलें मुनिवचें[17] मनांत सत्वरतें[16]. ४८

---

१. आर्या!, श्रेष्ठ पुरुषा! २. सत्यवानाचें च दुसरें नांव. ३. प्रिये! ४. वनमार्ग. ५. पालखींत बसलेली. ६. अरण्यांतील कठिण मार्गांत. ७. कांतिहीन होते. ८. दुःखदायक. ९. गयाक्षेत्राला. १०. मूर्तिमती. ११. पित्याची आशी (आशीर्वाद). १२. ज्या आशींत. १३. पशुसमूह. १४. आश्रय करून. १५. त्या सत्यवानाच्या वचनरूप अमृताच्या प्राशनार्थ. (सत्यवानाला बोलवावें या हेतूनें त्या वनांतील पशुपक्ष्यांचीं नांवें सावित्री त्यास विचारीत होती हा भाव). १६. धैर्यशील अशा त्या सत्यवानाच्या पत्नीनें. (सावित्रीनें). १७. नारदाचें भाषण.

जों साध्वी हळु च म्हणे, 'हा नाथा! नियतमानदा[१]! रुचिरा
मूर्ति श्रमत्ये, भ्रमत्ये मति, कीं जी! प्रियतमा! न दारु[२] चिरा.'
तों चि म्हणे तो, 'उठल्या करित्या स्मृतिहानि[३] वेदना, लागे
शूलशतें[४] शिरीं, जाणों सखि! अक्षम[५] हा[६] निवेदनाला गे! ५०
तुझिया मृदुशीतांकीं शिर ठेवुनि वाटतें निजावें गे!
त्वत्स्पर्श अमृत म्हणउनि या मत्तापें[७] पळोनि जावें गे!' ५१
मांडी देवुनि पतिचें मस्तक हस्तकमळें सुधी[८] रगडी,
दे धैर्य सतीस तिचा निजनिश्चय, जो खरा सुधीर गडी. ५२
सीता दशकंठा जसि तसि सत्वें भी न तीव्रतापा हे;
तों पाशपाणि[९]पुरुषाप्रति पतिपार्श्वीं पतिव्रता पाहे. ५३
क्षितिवरि पतिशिर उतरुनि,सविनय झडकरि उठोनि,कर जोडी,
नमुनि म्हणे, 'देव! तुम्हीं, असि कैंची अन्यदर्शनीं गोडी? ५४
केलें चि धन्य दर्शनदानें, येवूनि कानना, मातें,
अजि देवेश! निवावे बहु हे सेवूनि कान नामातें[१०].' ५५
देव म्हणे, 'सति! यम मीं,' 'कां आलां?' 'न्यावया तुज्या पतितें,'
'हें दूतकार्य कीं जी!' 'जें सेवककृत्य वेगळें सति! तें. ५६
हा सत्यवान् सुकृतवान् गुणवान् न्यावा न सेवकानीं कीं,
ज्या कर्मीं योग्यत्व स्वामीचें तें न सेवकानीकीं[११].' ५७
अंगुष्ठमात्र[१२]पुरुषाप्रति यम पाशेंकरूनि आकर्षी,
तैं 'हाय! हाय!' म्हणती बहु गद्गदकंठ साश्रु नाकर्षी[१३]. ५८
त्यातें बांधुनि घेउनि यमधर्म प्रभु निघे अवाचीतें[१४],

---

१. निश्चयेंकरून [माझ्या वचनास] मान देणाऱ्या! २. काष्ठें. ३. स्मरण नाहींसें करणाऱ्या. ४. शेंकडों शूल. ५. असमर्थ. ६. मी. ७. माझ्या संतापानें, मस्तकशूलानें. ८. चांगली बुद्धिमति अशी सावित्री. ९. ज्याच्या हातीं पाश आहे अशा पुरुषाला. (यमाला). १०. आपलें नांव ऐकण्याची मला फार उत्कंठा आहे, असा भावार्थ. ११. सेवकसमुदायांत. १२. अंगुष्ठपरिमाणाच्या अर्थात् सूक्ष्मशरीरी अशा पुरुषाला. १३. स्वर्गस्थ ऋषि. १४. दक्षिणदिशेतें.

भ्याला सतीस बहुधा, जें ब्रह्मलिखित बरें न वाची तें. ५९
त्यामागें ती हि निघे, धर्म म्हणे, ' भागलीस, जा परत;
स्नेहऋण फेडिलें त्वां, करुनि स्वपतिक्रिया, रहा स्मरत.' ६०
साध्वी म्हणे, "प्रभो! पति जिकडे जावी च मूर्ति हे तिकडे,
[1]स्वगुरुव्रतप्रसादें मद्गतिसि न रोधितील हेति[2] [3]कडे. ६१
संत म्हणति, '[4]सप्तपदें सहवासें सख्य साधुसीं घडतें,'
[5]सन्मित्र चि न व्यसनीं, अन्याखिलमित्र संकटीं पडतें. ६२
तुज संत म्हणति ' [6]पितृपति [7]समवर्ती धर्मराज बापा! हें
सत्य यश, म्हणुनि या ही कन्येसि दया करूनि बा! पाहें." ६३
ऐसें सती वदे; [8]ते बोल शशी, [9]देव तो हि सागरसा
प्रेमें [10]उंचंबळे, हो! धरि कारुण्यें द्रवासि [11]साग [11]रसा. ६४
धर्म म्हणे, 'साध्वि! बहु श्रमलीस; स्वाश्रमासि जा मागें.
जो मागसील तो वर देतों, घे, इष्ट तें मला मागें.' ६५
'देवा! व्हावे [12]चक्षुस्तेजःसंपन्न आश्रमामाजी
मामाजी ऐसें द्या; मति साहेना चि त्या श्रमा माजी.' ६६
'दिधलें' धर्म म्हणे, परि जात चि होती तसी च मागूनि;
देव म्हणे पुनरपि, ' जा, वत्से! घे वर दुजा हि मागूनि.' ६७
ती सुमति म्हणे, 'राज्यभ्रंशें बहु खिन्न सासुरा होतो,
पावुनि भवत्प्रसादें निजपद बहुकाळ [13]सासु राहो तो.' ६८
'होइल जा' धर्म म्हणे, परि करि अनुगमन सबहुमान सती;
कीं जी हंसी हंसावांचुनि मानील न बहु मानस ती. ६९

---

१. माझ्या वडिलांच्या आणि व्रताच्या कृपेनें. २. शस्त्रें–**पंत.** ३. डोंगरांचे कडे. ४. सात पावलें सोबतीनें चालल्यानें. ५. साधूंचा मित्र. ६. पितरांचा पति. ७. सर्वांस समदृष्टीनें पाहणारा. ८. ते तिचे बोल (भाषण) हा चंद्र. ९. तो देव यम हा समुद्र. १०. उसळे. (चंद्रोदयानें समुद्रास जसें भरतें येतें, तसें सावित्रीच्या भाषणानें यमास प्रेमाचें भरतें आलें हा भाव). ११. सपर्वता-पृथ्वी–**पंत.** १२. नेत्रांच्या तेजानें युक्त. (डोळस). १३. जीवंत.

पुनरपि मार्गीं काढी जें धर्मरहस्य जेंवि नव[1] पुसती,
तें होय वशीकरण[2] चि, कीं भासों दे तयासि न वपु[3] सती[4].७०
धर्म म्हणे, ‘ गे बाई ! करिसी कां व्यर्थ या श्रमास ? तिजा
वर घे, नको चि मार्गीं, आलीस सुदूर, आश्रमा सति ! जा.’
त्यासि म्हणे सावित्री, ‘संपन्न असो पिता सुतनयशतें[5].’
हा लक्ष्मीसुतकवि[6] किति लिहिल ? सतीचें उमासुत[7] न यश तें.
उडुपा[8] उडुसें[9] धर्मौदार्या लाजोनि अभ्र[10] मुरडे, हो !
सावित्रीच्या सुयशीं न दिसे पति म्हणुनि अभ्रमु[11] रडे हो ! ७३
ऐसें शिरोनि चित्तीं, घेउनि भारी हि तीन वर, देवा
सोडीना, सोडविल्यावांचूनियां ती सती नवरदेवा. ७४
देवें[12] म्हणे, ‘ तूं स्वच्छा स्वच्छायासी च; मागतीस तिघे
वर घेउनि ज्या चवथ्या, देतों, मागोनि मागती सति ! घे.’ ७५
नमुनि म्हणे ती वरदा, “ तुजला अति भार न चवथा, न पित्या,

---

१. नवीन पुस्ती. २. मन वश करून घेण्याचा उपाय. ३. त्याचें देहभान नाहींसें करी. ४. साध्वी सावित्री. (यमाचें मन दुसरीकडे वेधण्यासाठीं सावित्रीनें कांहीं धर्मरहस्याच्या गोष्टी काढल्या, त्या लहान मुलाच्या नवीन पुस्तीप्रमाणें होत्या. त्यायोगें यम देहभान हि विसरला व त्याला तें वशीकरण च वाटलें). ५. उत्तम शंभर पुत्रानीं. ६. लक्ष्मी हें **पंतां**च्या मातेचें नांव. ७. गणपति. ८. चंद्रास. ९. नक्षत्रांसारखें. १०. मेघ. (मेघासारखा दानशूर नाहीं असें मानतात). ११. ऐरावतस्त्री–**पंत.** (ऐरावताचा वर्ण शुभ्र आहे व यशाचा वर्ण हि शुभ्र मानतात, यामुळें सावित्रीच्या सुयशांत बुडून आपला पति कोठें दिसेनासा झाला म्हणोन अभ्रमु रडूं लागली, असें म्हटलें आहे. तात्पर्य, सावित्रीचें यश अत्यंत निर्मल होय). १२. अन्वयार्थ—देव (यम) म्हणे, तूं स्वच्छा (पवित्र, पतिव्रता) स्वच्छायेसी च (माझ्या सावलीप्रमाणें च आहेस, म्हणजे माझ्यामागून येत आहेस). तिघे वर घेउनि ज्या चवथ्या (वरास) मागतीस [तो वर मी तुला] देतों. [हे] सति ! मागोनि (नंतर तरी) मागती (माघार) घे (परत फिर).

[१]स्वरगा आधि सुरभिचें भागे द्यायासि न चव थान [२]पित्या.
व्हा सुप्रसन्न, 'वत्से! तुज हो सुतशत' असें वदा, न्या हो!
सुयशोराशि स्वर्गीं; लज्जाप्रद सुरनगा [३]वदान्या हो." ७७
भुलला धर्म [४]द्युतिला धृतिला मतिला तिच्या तथा स्तुतिला,
न करुनि विचार, जावी मागें म्हणवुनि, म्हणे '[५]तथास्तु' तिला.
हळु चि म्हणे सावित्री, 'पावेन वरें करूनि संततिला,
तुमचा प्रसाद म्हणुनि प्रेमें गातील सर्व संत तिला; ७९
तरि मत्पति मज द्या [६]कीं तुमची पावेल मान सत्या [७]गीं,
यश रक्षाया प्राण हि [८]सत्यगुणासक्तमानस त्यागी.' ८०
रोमांचित धर्म म्हणे, 'बाई! गातिल तुझा प्रभाव सती,
पतिसीं [९]अविनाभावें वससिल, रविसीं जसी प्रभा वसती. ८१
राज्य [१०]चतुःशत वत्सर करिल तुझा कांत, सोडिला, जा, गे!
हा त्वन्महिमा जागो, सीतेनें जेंवि जोडिला जागे.' ८२
तें [११]वृत्त [१२]वर्तमान स्वल्प हि न तिच्या कळे [१३]वरा [१४]पाशीं,
जातां यम, सावित्री धांवत आली [१५]कळेवरापाशीं. ८३
पुनरपि तसी च बसली अंकीं घेवूनियां स्वपतिशिर ती;
जासि [१६]चेतना [१७]धवांगीं [१८]होय, इची जीवितांत मति [१९]शिरती. ८४
वनदेवता म्हणति त्या, 'बा! गा! [२०]मूर्च्छोत्थिता चकोरा! हो
स्वस्थ, ज्योत्स्ना कीं [२१]हे, द्रुत उठसि, [२२]नमावया नको राहो.'

१. कल्पवृक्ष—**पंत.** २. प्राशन करणाऱ्यास. (वत्सास). ३. उदार अशा कल्पवृक्षाला तो तुमचा सुयशोराशि लज्जाप्रद हो. ४. कांतीला. ५. तसें (तुझ्या म्हणण्याप्रमाणें) होवो. ६. अशासाठीं कीं. ७. वाणी. ८. सत्याचे ठिकाणीं ज्याचें चित्त आसक्त झालें आहे असा. ९. अवियुक्त स्थितीनें. १०. चारशें. ११. झालेलें. १२. चालू असलेलें. १३. पतीला (सत्यवानाला). १४. पाशांत असतां. १५. प्रेताजवळ. १६. जीवनकला. १७. पतीच्या अंगीं. १८. भासमान होई. १९. सावित्रीच्या जीवांत जीव आला. २०. मूर्छेतून उठलेल्यास. २१. ही सावित्री ही च कोणी चंद्रिका. २२. नमस्कार करावया. (चंद्रिकेला नमस्कार केल्याशिवाय राहूं नको).

नेत्रें उघडुनि पाहे तो दयितेच्या मुखास चि वनीं, ती
दे त्यासि, जसि नृपासि व्यसनीं देती सुखा सचिवनीती. ८६
स्त्रीस म्हणे, '[1]सुभगे! त्वां मृदु मांडी मांडिली उशी, रमला
आत्मा निद्रेसीं, रवि मावळला, लागला उशीर मला. ८७
[2]पुरुष श्याम महौजा ओढित होता बळें चि मजला जो,
तो कोण? पुसेंन तया; नसतां, स्वप्नोत्तमर्ण मज लाजो.' ८८
'कथिन उद्यां, झाली बहु रात्रि, बळ असेल तरि उठा, राया!
देत्यें हात, चला, जो! घेत्यें [3]फळभाजना [4]कुठारा या.' ८९
नेत्रें पुसोनि पदरें पतिस म्हणे, 'भेटतील मामाजी
[5]बाई! म्हणतां, रडतां, पडतां दाटूनि कां श्रमामाजी? ९०
भेटवित्यें ताताला मातेला, या, उठा,' असें वदली,
आली घेउनि, अद्भुत वाटे [6]कलभासि सांवरी [7]कदली. ९१
ये[8] स्नेहहंस जाणों ईप्रति सोडुनि तदीय मातेला,
कीं दूर वाहवुनि ने ती सत्वमहानदी यमा तेला. ९२
आला प्रकाश नेत्रीं, अंधत्वाचा वरें नुरे गंध.
परि भूप पुत्रमोहें केला पहिल्यापरीस ही अंध. ९३
त्याला म्हणती गौतम दाल्भ्य भरद्वाज धौम्य तापस, 'हा!

---

१. हे सुंदरि! २. अर्थ–सत्यवान सावध झाल्यावर म्हणतो, "प्रिये! जो श्यामवर्ण (सांवळा) व अत्यंत तेजस्वी असा पुरुष मला बळें चि ओढित होता तो कोण? तूं कोण व मला कां ओढित होतास असें मी तया पुसेंन. परंतु वस्तुतः जर तसा कोणी नसेल च तर मात्र स्वप्नांत त्या दिव्यपुरुषाचा समागम घडलेल्या अशा मला एकादा स्वप्नांत झालेला सावकार लाजो; कारण, त्याच्यापेक्षां माझें स्वप्नवैभव मोठें होतें. ३. फळांची पाटी. ४. कुऱ्हाड. ५. अगबाई! ६. बालगजास. ७. केळ. ८. अन्वयार्थ–जाणों [हा] स्नेहहंस (प्रेमरूप हंस–सत्यवान्) तदीय (त्याच्या–आपल्या) मातेला (मानससरसीला–जननीला) सोडून ईप्रत (महानदीप्रत–सावित्रीप्रत) ये; कीं, (याचें कारण,) ती सत्वमहानदी (धैर्यशालिनी सावित्रीरूपिणी महानदी) यम तेला (यमरूपी तेलाला) दूर वाहवुनि ने.

बा! गा! उगा, मुहूर्तप्रस्थित[1] दुर्दैवदत्त[2] ताप सहा. ९४
सावित्री शुभलक्षणगुणसंपन्ना महासती, बा! हे.
जो जो साध्वी स्वधवानुमतें[3] द्वारस्था[4] महास[5] तो बाहे[6]. ९५
वाखाणिति बहु, पाहति मुनिदार[7] हि भासुरव्रत[8] तिला जे.
साध्वी च देवताहो, साध्वीला बा! सुरव्रतति[9] लाजे. ९६
शोकें रडतां डोळे जावे, गेले कधीं न यावे, गा!
दिसतें कल्याण पुढें, होवूं चि नको अधीन यीं[10] वेगा.' ९७
ऐसें समजाविति त्या राज्याला जों दयापर महर्षी,
तों झाले, अवलोकुनि सावित्रीसह तया, परमहर्षी. ९८
मुनि म्हणती, 'हा आला, नेत्रें उघडुनि पहा, सदारा या,
मोटा भाग्याचा तूं प्रमुदित यांसह रहा सदा, राया! ९९
दे आलिंगन, अंकीं घे, मस्तकपद्म[11] हुंग, वाराया
आत्मात्मजतापातें[12], दे आशी, राजसत्तमा! राया[13]!' १००
पुसतां विलंबकारण, चित्राश्व म्हणे, 'शिरोव्यथा-शयन,'
मुनि म्हणति, 'हें नव्हे, वद वत्से!, हो तूं चि आमुचें नयन.'
सावित्रीनें कथिलें तें वृत्त अशेष साधुसद[14] नमुनीं,
तेव्हां झाले अतुलप्रीतिक्रीडेसि केलिसदन[15] मुनी. १०२
मार्कंडेय म्हणे, 'बहु वर्णावें काय? जेंवि शिवसेवा
मज काळापासुनि[16] तसि, मुक्त करी त्यासि ती मनुजदेवा[17]!' १०३

---

१. क्षणभर प्राप्त झालेला. २. दुर्दैवानें दिलेला. ३. आपल्या पतीच्या अनुमोदनानें. ४. दारांत असलेल्या. ५. उत्सवास–**पंत**. ६. बोलाविते. (पातिव्रतेच्या द्वारीं आनंद नेहमीं उभा असतो असा भाव). ७. मुनिपत्नि. ८. उत्तम आचारसंपन्न असे जे (मुनिदार). ९. कल्पवल्ली. १०. शोकावेगास. ११. शिरकमल. १२. आपल्या व आपल्या पुत्राच्या विरहदुःखातें. १३. हे द्युमत्सेना! १४. साधुसभा. १५. क्रीडेचें स्थान. १६. मार्कंडेय हा अल्पायुषी होता; त्यास शिवसेवा जशी यमपाशांतून मुक्त करिती झाली; त्याप्रमाणें. १७. हे राजा धर्मा!

दुसरे दिवसीं प्रकृति[1] प्रार्थिति येवूनि आपुल्या पतितें,[2]
'या, राज्य करा, सचिवें वधिला, हरिली स्वभूमि ज्या पतितें.'[3]
मुनि म्हणति, 'अनुभवावें स्वस्थमनें राज्यपद, नता राया!
न तपोवन वर तुज बहु सावित्रीयुक्त सदन ताराया.' १०५
सिंहासनीं बसविला सावित्रीच्या व्रतें चि, हा नियम;
वरसामर्थ्य म्हणा, परि गेला होता करूनि हानि यम. १०६
सावित्रीनें केला उभयकुळोद्धार हा असा, राज्या!
कृष्णा हि असी च, स्तुति येती न मुखासि या असारा[4] ज्या."
रामघन[5]मयूर म्हणे, 'निववाल चि सुरसिकासि केकां[6] हो!
शंभु हि म्हणे 'न सेविति मंद म्हणुनि झुरसि कासिके! कां? हो!'"

अध्याय चौदावा.

स्वप्नीं द्विजरूपी दिनकर कर्णाला म्हणे, "अगा! राया!
कांहीं विहितें[7] हित तुला आलों सांगावया अगारा या. १
'तूं ब्रह्मण्य[8] वदान्य श्रेष्ठ' असें विश्व सुमहिमा गातें,
म्हणतें त्वन्मुख, 'न क्षम ज्या द्याया स्वर्द्रु[9]सुम हि मागा तें.'२

---

१. प्रधान—**पंत**. २. राजा द्युमत्सेनातें. ३. पाप्यानें. ४. निःसार, तुच्छ अशा. ५. राम हा च मेघ तो आवडतो ज्यास असा मयूर (पक्षी) मोरोपंत. ६. **पंत** म्हणतात, केका (मयूरवाणी) हो! (पक्षीं) आर्या हो! [तुम्हीं] सुरसिकांसि निववाल चि. [तथापि, मूर्ख संतुष्ट होणार नाहींत याबद्दल तुम्हांला वाईट वाटावयास नको; कां तर] शंकर हि काशीस म्हणतात, 'हे काशिके! मंद न सेविति म्हणुनि कां झुरसि ?' (झुरण्याचें कारण नाहीं; ते मूर्ख च होत, तेव्हां ते तुझी कशी सेवा करतील)? ७. शास्त्रमान्य. ८. ब्राह्मणाविषयीं दयाळु. ९. कल्पवृक्षाचें पुष्प.

विप्रांसि म्हणासि 'इच्छित[1] तें 'द्या' हा मात्र वर्ण न वदा, न्या;'
करिति कवि तुझें होउनि रोमांचितगात्र वर्णन, वदान्या! ३
देयार्थें[2] पात्रेच्छापूर्ति[3] बुध म्हणेल बा! कशास न हो?
परि वंचाया विप्रच्छद्में[4] येणार पाकशासन[5], हो! ४
अमृतोद्भव कुंडलयुगसहजकवच हें तया न ओपावें,
तदितरसर्वस्वार्थी[6] जो विप्र तया म्हणोनि 'ओ' पावें." ५
कर्ण म्हणे, 'कोण तुम्हीं?' विप्र म्हणे, 'मीं तुजा पिता सविता;
तळमळतो वाराया अहिता, साधावया हितास, वितां[7].' ६
कर जोडुनि कर्ण म्हणे 'करिति न गुरुवर्य कूपदेशाला[8],
नेती न मानसींच्या निजशिशुतें हंस कूपदेशाला[9]. ७
हा केल्यां[10] शुद्धव्रतसख्यातें[11] करुनि पातळ[12] मळेल[13];
स्वामी! मन तुमचें ही पाहुनि मज निस्त्रपा[14] तळमळेल. ८
स्वर्द्रु[15] सुरभि चिंतामणि वश ज्याला, जो सुरांत सुपदेश[16],
सत्पात्र विमुख नोहे, ऐसा चि करा सुतासि उपदेश. ९
हानि नसो उपदेशें तुमच्या, बहु वृद्धि मद्यशाला हो,
सत्कीर्ति अमृतशाला[17] गुरुजी! अपकीर्ति मद्यशाला[18], हो! १०
शोभा[19] यशें चि, न असी लोकीं धृतदिव्यकुंडलें कानें;
जोडुनि अयश न व्हावें पितृहृदयीं अग्निकुंड लेंकानें.' ११

---

१. [जें] इच्छित तें द्या असा वर्ण (शब्द) न वदा, [तर] इच्छित तें न्या. ('द्या' असें म्हणण्याचें कारण नाहीं). २. देण्यास योग्य अशा अर्थानें. ३. सत्पात्र ब्राह्मणाची इच्छातृप्ति. ४. ब्राह्मणाच्या वेषानें. ५. इन्द्र. (पाक नांवाच्या राक्षसाचा हंता). ६. त्याहून इतर अर्थ मागणारा. ७. प्रसवणारा. (बाप). ८. वाईट उपदेशास. ९. विहिरीप्रत. १०. केलेल्या. ११. कोणास 'नाहीं' म्हणावयाचें नाहीं असें केलेलें शुद्धव्रताचें जें सख्य, त्यातें. १२. पातळ केल्यामुळें. १३. हा (कर्ण) पापी होईल. १४. निर्लज्जा. १५. कल्पवृक्ष. १६. चांगल्या स्थानाचा धनी. १७. अमृताचें स्थान. १८. दारूचा गुत्ता. १९. यशानें च शोभा प्राप्त होते, कुंडलमंडित कानें शोभा प्राप्त होत नाहीं, असा अर्थ.

भास्कर म्हणे, 'बुडावें त्वच्छोकविषार्णवांत[1] पुत्रा! म्या;
हें वाटेल उचित तरि दे कुंडलकवचदान सुत्राम्या.[2]' १२
कर्ण म्हणे, "जो अयशा गुरुशोकद[3] तो चि मंद नर मेला;
विष्णु हि म्हणेल 'व्हावा सुयशा शोकद हि नंदन रमेला.'" १३
सूर्य म्हणे, 'मागावी बा! दिव्यामोघशक्ति हरिकरंगा[4];
वत्सा! स्ववधेच्छुधनंजयवधसाहित्य हें चि तरि कर, गा!'
'हें करिन, हरिन अरिनरदेवप्राण[5] हि, विचिंत[6] तूं जा, गा!'
ऐसा स्वप्न[7] विलोकुनि तो श्रीमान् कर्ण जाहला जागा. १५
स्वस्वप्नवृत्त कथितां करुनीं आपृष्ठताप[8] जप नमन,
कर्णमन, दृष्टि मिळतां, सप्रत्यय[9] होय, तप्त तपनमन[10]. १६
द्विजकामपूर्तिपर्वीं[11] मंत्र जपाच्या जपोनि अवसानीं[12]
ये द्विजतनु[13] हरि[14], दुर्लभ ज्याचें दर्शन जनासि नवसानीं. १७
शक्र म्हणे, "तुज चि पुढें 'दे' हें उच्चारितां न भी कवि, भो!
साधो! म्हणवुनि आलों, कांही मागावयास भीक, विभो!"
कर्ण म्हणे कर जोडुनि, 'पुसतो हा विप्रदास, कळवा जी!
काय तुम्हां द्यावें म्यां? धन कन्या ग्राम वा सकळ वाजी?' १९
ब्राह्मण म्हणे, 'अदेय[15] स्वप्राण हि बा! बुधा! न दात्यातें;
जें सत्कृतियश कैंचें जीवनदा[16] ही सुधानदा त्या तें? २०
निजकवचकुंडलें मज दे, दात्या! याविणें नको कांहीं;

१. तुझ्या शोकरूप विषाचे सागरांत. २. इंद्रास. ३. वडिलांना शोक देणारा. ४. इंद्राच्या हातांतील. ५. शत्रु जे नरदेव (नरनारायणावतारी) कृष्णार्जुन, त्यांचे प्राण. ६. चिंता न करतां. ७. हा शब्द येथें कवीनें पुल्लिंगीं योजिला आहे. ८. पाठ तापेपर्यंत. ९. अनुभव आला आहे असें. १०. सूर्याचें मन. ११. ब्राह्मणाच्या मनोरथाची पूर्ति करणें हें च पर्व, त्यांत. १२. अंतीं. १३. विप्रशरीरधारी. १४. इंद्र. १५. देण्यास अयोग्य असें. १६. जीवन देणाऱ्या.

[1]तापद हि [2]मानिजेतो, [3]तापहर हि सेविजे न, [4]कोकांहीं.' २१
कर्ण स्मित करुनि म्हणे, 'ऐसें द्यावें तुम्हीं च [5]वरदानीं;
अजि! देवेश्वर हो! मज कां योजितसा अशक्यवरदानीं? २२
द्यावें कसें [6]स्वजीवनहेतु[7]सरोदान मीनर्यादानें?
द्यावें हि कसें [9]जलदें? देवा! वांचेन मीं न या दानें. २३
होईन वध्य मीं, तूं उपहास्य, असें करूं नको, पावें;
प्रभुनें काय [10]न्यायव्रतवर्तिच्छळ करून कोपावें? २४
घ्या कवचकुंडलें, ग्रहणाग्रह जरि, परि असें तरि करा, जी!
द्या शक्ति ती अरिवधीं, बहुमान्या [11]अरिधरा हरिकरा जी.' २५
शक्र म्हणे, 'घे, देतों, मागें कोण्हास ही न दिधलीला,
[12]कृत्याव्याल्यशनींच्या दावितसे शक्ति [13]नैकविध लीला. २६
सोडावी हे प्राणव्यसनीं एकीं, करील [14]कृत्यासि;
नाहीं तरि परतोनि त्वत्प्राणातें हरील कृत्यासि. २७
एक रिपु वधुनि येइल [15]मद्धस्ता, [16]श्री जसी [17]स्वकरवीरा;
स्मरण असों दे, ईच्या मोक्षीं बरवा विचार कर, वीरा!' २८
कर्ण म्हणे, 'मीं समयीं ईतें एकीं [18]नरीं च सोडीन,
मग हे जावू, मज न त्यागी ऐसी सुकीर्ति जोडीन.' २९
शक्र म्हणे, 'परि जपतो जो सम सर्वत्र परम हि [19]तदवना,

---

१. ताप देणारा. (सूर्य). २. पूजिला जातो. ३. ताप हरण करणारा. (चंद्र). ४. चक्रवाकपक्ष्यानीं. ५. वर देणाऱ्यानीं (तुम्हीं). ६. आपल्या जीविताला कारणभूत अशा. ७. सरोवराचें दान. ८. मत्स्यासारख्या जलचरानें. ९. मेघानें. (मेघाची उत्पत्ति पाण्यापासून; तेव्हां त्यानें हि सरोवराचें दान करणें अनिष्ट च). १०. न्यायव्रतास अनुसरून वागणाऱ्या जनांचा छळ. ११. सुदर्शन–**पंत.** सुदर्शन धरणाऱ्या. १२. कृत्या (उग्रदेवता), सर्पिणी आणि वज्र यांच्या. १३. नाना-प्रकारच्या. १४. इष्ट कार्यास. १५. माझ्या हातास. १६. महालक्ष्मी. १७. आपल्या करवीरक्षेत्रास. (करवीर हें महालक्ष्मीचें प्रसिद्ध स्थान आहे). १८. अर्जुनाचे ठिकाणीं. १९. त्याचे रक्षणार्थ.

लोकीं प्रभुप्रियत्वें होय, गुणें अल्प पर महित दवना[1].' ३०
कापूनि कर्ण दे जें वज्रसम अभेद्य सहजकवच[2] रणीं,
ऐसे चि सत्वशील श्रीवर[3] वाहे स्वनेत्र भवचरणीं[4]. ३१
त्या शुचि सत्वसमुद्रा दात्यांच्या नायका पिता काय
धन्य म्हणे, हरि हि मनीं तो जेव्हां होय कापिता काय[5]. ३२
त्या कवचकुंडलांतें घेउनि बहु करुनि वर्णन वदे हें,
'साधो ! तुझ्या वरावा आतां चि सुरम्यवर्ण नव देहें.' ३३
दातृत्वव्रत अद्भुत कीं गुर्वाज्ञेसि ही हठें मोडी,
पहिल्यापरीस पुष्कळ सद्यश सद्वर्ण[6] कर्ण तो जोडी. ३४
सज्ञान म्हणति, 'तरला, बळि कीं हा साधु कर्ण न बुडाला.'
खळ तळमळति जसे घटझष[7] पडतां छिद्र सूक्ष्म हि बुडाला[8]. ३५

अध्याय पंधरावा.

सरला वनवास, मग द्वैतवनीं पांडुनंदन वसति, तें
दिवसांत वांकुल्यां[9] शत दावी हो ! त्या हि नंदनवसातितें[10]. १
विप्रासि आंधि[11] तेथें बहु दे जो हरिण हरुनि अरणींतें[12],
तन्मारणीं[13] करिति ते, कौशल केलें कधीं हि न रणीं तें. २
शृंगाग्रविलग्नारणि[14] तो मृग गेला चि, लागले होते
त्यामागें, जे फार चि पांच हि नरसिंह[15] भागले, हो ! ते. ३

१. दवणा. (हा एक सुगंधी पदार्थ आहे). २. उपजत च असलेलें कवच. ३. लक्ष्मीपति. ४. शिवचरणीं. (कथासंदर्भ परिशिष्टांत पहा). ५. शरीर. ६. उत्तम देहकांति. ७. घागरींतले मासे. ८. (त्या घागरीच्या) तळाला. ९. वांकुल्या दाखविणें=उपहास करणें. १०. नंदनवनांतील वसतीला. ११. पीडा. १२. अग्निमंथनकाष्ठें १३. त्या हरिणाला मारण्याविषयीं. १४. शृंगांच्या अग्रांत अडकल्या अरणी ज्याच्या असा (मृग). १५. पुरुषश्रेष्ठ.

भेटे वनीं अकस्मात्तापापह[1] साधुसा चि एक वट[2],
तच्छीतच्छायेतें सेविति ते तृषित वीर एकवट[3]. ४
धर्म चि धैर्यें साहे, सोसील व्यसन काय दुसरा तें?
नकुळ तदाज्ञा घेउनि आणाया तोय जाय सुसरातें. ५
उष्णें झाला होता तप्त तृषित जेंवि धेनुसुत[4] डागें,
धावे, तरंगहस्तें[5] जाणों पाचारिला चि सुतडागें[6]. ६
तों यक्ष म्हणे, 'बापा! आधीं सेवूं नको चि तोयातें,
मत्प्रश्नोत्तरदाता प्याया न्याया हि योग्य तो यातें.' ७
करुनि अनादर पीतां पडला तो धैर्यमेरु ही नकुळ,
किमपि न वदे, न पाहे, पतित श्रीमत्त[7] जेंवि हीनकुळ[8]. ८
मग सहदेव धनंजय भीम हि पडले तसे चि जळपानें;
गमले वधिले ते त्या स्वह्रदतटीं[9] कालियाख्यखळपानें[10]. ९
धर्म म्हणे, 'हा! दैवा! न कळे झाला अनर्थ काय कसा?
मज बंधु एक तरि जळ द्याया यावा चि शीघ्र सायकसा[11]. १०
हा! रे! कितवा[12]! धर्मा! स्वकृतें निजजीवितासि आंचव; घे
'धिग्धिग्!' म्हणोनि; विटते द्यूत न करितां सुबंधु कां चवघे?'
ऐसें म्हणोनि जावुनि धर्में ते बंधु पाहिले शवसे;
साधूंत अहंतासी[13] ज्यांमध्यें चेतना[14] न लेश वसे. १२
"हा! भीम! हा! धनंजय! न स्वर्गीं सुख पहाल, हा! नकुळा!
हा! सहदेवा! दोष त्यजितां मज काय हा लहान कुळा? १३
गेलासि केंवि भीमा! त्यागुनियां मज गुरुप्रति, ज्ञात्या!?
त्यजिल्या सुयोधनोरुध्वंसादि[15] कशा गुरु प्रतिज्ञा त्या? १४

---

१. ताप दूर करणारा. २. वड. ३. एकदम. ४. बैल. ५. तरंगरूप हस्तानें. ६. उत्तम तलावानें. ७. संपत्तीनें मस्त झालेला. ८. नीचकुलोत्पन्न. ९. आपल्या डोहाच्या तीरावर. १०. कालिय नांवाच्या प्रख्यात दुष्टशिरोमणी सर्पानें. ११. बाणासारखा. १२. जुगाऱ्या! शठा! (धर्म स्वतांला च म्हणत आहे). १३. मीपणासारखी. १४. हालचालीची शक्ति. १५. दुर्योधनाच्या मांड्या गदेनें चुरून टाकीन, इत्यादि मोठ्या प्रतिज्ञा.

वत्सा! न भंगलासि प्रभुसीं हि करुनि तशा हि विषम रणा;
कालविलें काय जळीं त्या दुष्टांहीं वशाहिविष मरणा? १५
विष कालविलें असतें, तरि सलिलीं करपतीं न कां नलिनें?
अलिनें त्यजिलीं असतीं, होतीं तुमचीं हि आननें मलिनें. १६
गेलां स्वर्गासि? बरें, जा; परि कवणासि हा निरविला हो!?
अत्यद्भुत हें; म्हणतिल न कधीं ही पद्में 'हानि रविला हो.' १७
'विजयिचतुर्बंधुचतुर्भुजलीलेकरुनि आक्रमीन रसा,'
ऐसें चि म्हणत होतों, परि झालों आजि दीन मीं नरसा. १८
यामागें न, व्यसनीं आजि बुडालों, जळीं महोपळसा,
रे मुग्ध जीवशुक! जा सोडुनियां, लुब्ध या न हो पळसा. १९
मेले कसे अकस्मात्? तेज असे म्हणुनि होय न व्याधी,
तर्क न चाले बहुधा, माझी तृष्णाकुळा चि भव्या धी. २०
प्रियबंधुमरणकारण शोधूं, जळपान करुनि, तर्कशतें,
जें क्षुत्तृट्प्रतिबंधा न गणी, मुनिचें चि हृदय कर्कश तें." २१
चिंतुनि ऐसें प्याया गेला जों साधु दक्ष तोयातें,
विनिवारी तों चि सरस्तटगत बकरूप यक्ष तो यातें. २२
'रे कौंतेया! केले अनुज तुझे प्रेतरूप म्यां चवघे,
तूं तरि वांच, हठें जळ सेवुनि मरतां उगे चि कां अवघे? २३

---

१. हे अर्जुना! २. शंकराशीं देखील. ३. भयंकर. ४. वश केलेल्या सर्पांचें विष. ५. कमळें. ६. भुंग्यानें. ७. तुमचीं तोंडें काळीं पडलीं असतीं. ८. हा धर्म कोणाच्या स्वाधीन केला? ९. तुम्हीं मला टाकून गेला हें अत्यद्भुत आहे. १०. कमळें. ११. विजयशाली चवघे बंधु हेच कोणी चार भुज, त्यांच्या सहज लीलेनें. १२. सामान्य मनुष्यासारखा. १३. मोठ्या दगडाप्रमाणें. १४. जीवरूपी पोपटा! १५. यांच्या शरीरावर तेज दिसत आहे यावरून यांना कांहीं रोग झालेला नसावा. १६. तहानेनें व्याकुळ अशी माझी बुद्धि झाली आहे. १७. कठिण. १८. सरोवराच्या तीरावर असणारा.

मत्प्रश्नाचें उत्तर दे, जळ सेवूं नको चि, थांब कसा.'
धर्म म्हणे, 'ऐसा तूं कोण प्रभु? जाहलासि कां बकसा?' २४
'मीं यक्ष' असें सांगे दावी प्रकटुनि शरीर पर्वतसें,
पूर्वीं कधीं हि जालें प्राप्त न [1]आश्चर्यभीतिपर्व तसें. २५
धर्म म्हणे, 'अग्निपुढें पांडित्य करील काय कापूस?
कळल्या उत्तर देइन, पुसणें तें यक्षनायका! पूस.' २६
यक्षातें चि न निववी [2]नृपदत्त [3]प्रश्नशतसमुत्तर तें
सुश्रोतृवृंद [4]ज्याच्या श्रवणें होवूनि बहु [5]समुत् तरतें. २७
यक्ष म्हणे, 'कौंतेया! या पांडित्यें [6]गुरू हि तुज लाजो,
जालों प्रसन्न, चवघांमाजि उठो एक इष्ट तुजला जो.' २८
धर्म म्हणे, 'नकुळ उठो;' यक्ष म्हणे, 'मान्य जे [7]शतक्रतुला,
भीम नको, विजय नको, आवडलें त्यजुनि अमृत तक्र तुला?'
धर्म म्हणे, 'बा यक्षा! मज तों माद्रीपृथा समा, नावें
दोघींचीं हि असावीं, म्या अधिक उणें कधीं न मानावें. ३०
उरलों मीं कुंतीचा, माद्रीचा ज्येष्ठ पुत्र उरवा, हो!
स्वर्गीं न [8]अश्रुहारा त्या [9]मातेचें कदापि उर वाहो.' ३१
यक्ष म्हणे, 'बा साधो! तूं चि परम धन्य [10]भरतसंतानीं,
तुझिया यशीं निवाया नित्य असावें चि [11]भरत संतानीं. ३२
पाहसि समभावें अनुज्यांसि, सुतांस हि असें न [12]बा पाहे,
[13]सुप्तोत्थितसे भ्राते चवघे हि तुझे उठोत, बापा! हे.' ३३
त्या यक्षवरें उठले सुखसुप्त तसे पळांत चवघे ते,
फार निवाले पांच हि, अमृताची जेंवि देव चव घेते. ३४

---

१. आश्चर्य आणि भय यांचा समय. २. धर्मराजानें दिलेलें. ३. प्रश्नशताचें उत्तम उत्तर. ४. ज्या प्रश्नोत्तराच्या. ५. सहर्ष—**पंत.** ६. बृहस्पति. ७. इंद्राला. ८. अश्रुबिंदूंच्या हाराला. ९. आई माद्रीचें. १०. भरताच्या कुळांत. ११. शिरत. १२. बाप. १३. निजून उठल्यासारखे.

भूप म्हणे, 'यक्ष न तूं, कोण प्रभु? अद्भुतप्रभावांचे
लीळेनें असु हरिले; न तुजपुढें आमुची प्रभा वांचे.' ३५
पुसतां ऐसें प्रेमें सांगे तो त्या नृपास, 'मज तात[1]!
धर्म, असें जाण सुता! कवि ज्याची सम[2] कृपा समजतात. ३६
झालों प्रसन्न, वत्सा! धर्मात्मा तूं चि धन्य मत्तनया!
वर माग, मत्प्रसादा पात्र भला होय, अन्य मत्त न या.' ३७
भूप म्हणे, 'हें द्या, ज्या हरिणहृता सांपडोत त्या अरणी.'
धर्म म्हणे, 'या घे बा! कैंचा मृग? आमुची च ती करणी. ३८
माग दुजा वर, बा! गा! घ्यावें सर्वस्वसें[3] असे नातें;
वत्सा! तुला न द्यावें म्या तातें वस्तु जें असेना तें.' ३९
राय म्हणे, 'संवत्सर दुर्घट अज्ञातवास हा तातें
हो निर्विघ्न असा वर द्यावा, ठेवुनि शिरीं स्वहातातें.' ४०
पितृपति म्हणे, 'विराटक्षितिपतिनगरीं तुम्हीं विशंक रहा;
गुप्त असाल, उगाचि न वर गुरुवर अतुललील[4] शंकर हा. ४१
तिसरा वर माग, तुझ्या भुललों मीं साधुनायका! महिम्या.'
वंदुनि म्हणे युधिष्ठिर, 'जिंकावा लोभ कोप काम हि म्यां.'
ऐसे सद्वर देवुनि आशीरमृतें यथेष्ट वर्षोनि,
स्पर्शोनि शिरीं झाला अंतर्हित धर्मराज[6] हर्षोनि. ४३
पांडव त्या विप्राच्या ठेविति आधीं शिरींवुजें चरणीं,
मग अर्पिति धर्मप्रभुदर्शनवरलाभहेतु[7] त्या अरणी. ४४

---

१. अरे बाळा युधिष्ठिरा! २. सर्वांवर सारखी. ३. सर्व च द्रव्य घ्यावें असें. ४. निरुपम कृति ज्याची असा. ५. गुप्त. ६. यमधर्म. ७. यमाच्या दर्शनास आणि वरप्राप्तीस कारण अशा.

अध्याय सोळावा.

सहवासि ब्रह्मसभा विनउनि, घेउनि सुखें तदाज्ञा[1], ते
गुत वसाया गेले, सरला वनवास जैं तदा ज्ञाते. १
खगमृगवनवनदैवतसरिदद्रिसरांसि[2] हात जोडूनीं,
रडले पांडव जातां सहवासि ब्रह्मवृंद सोडूनीं. २
एवं[3] भक्तमयूरें[4] श्रीमद्रामप्रसादघनपर्वीं[5]
केलें तांडव[6] तोषें श्रीमद्भारततृतीयवनपर्वीं. ३

इति श्रीमदार्याभारते श्रीरामनंदनमयूरकृतौ तृतीयं वनपर्व
श्रीरामचरणयोरर्पितम् श्रीः

---

१. त्या ब्राह्मणांची आज्ञा. २. पक्षि, हरिण, अरण्य, वनदेवता, नद्या, पर्वत आणि सरोवरें यांस. ३. याप्रमाणें. ४. भक्त मोरोपंतानें (पक्षी) मोरानें. ५. श्रीरामप्रसादरूप वर्षाकालामध्यें. ६. नृत्य.

विराटपर्व[१].

अध्याय पहिला.

वत्सळ[२] ताताधिक जो गुरु[३] धौम्य ज्ञानपुण्यराशि कवी[४]
अतिगहन राजसेवाधर्म[५] तया कुरुकुळेश्वरा शिकवी. १
धौम्य, द्रुपदपुराप्रति जातां घेवूनि अग्निहोत्रास[६],
प्रार्थूनि[७] म्हणे, 'न शिवो या यजमानासि, अग्नि हो! त्रास.' २
सशतांग[८] इंद्रसेनाद्यनुचर[९] कृष्णाश्रयासि[१०] धाडून,
पाठविला द्रुपदपुराप्रति दासीदासवर्ग झाडून[११]. ३
गेले विराटनगरा पांडव अज्ञातवासकामुक[१२] ते,
चुकतें भावि[१३], तरि सुखा सुज्ञ श्रीकांतदास[१४] कां मुकते? ४

---

१. या पर्वाची **पंत**लिखित प्रत त्यांच्या दप्तरांतून नाहींशी झालेली असल्यामुळें मूळाची पहिली नक्कल व मूळाचे अभावीं तितकी च विश्वसनीय मानतां येईल अशी जी **पंत**मित्र **चा**तुर्मासेबोवा यांची प्रत, तिच्यावरून व **पंतां**च्या च दप्तरांतील एका परलिखित प्रतीवरून हें पर्व संशोधिलें आहे. २. दयाळु. ३. उपाध्याय. ४. पंडित, ज्ञानी. ५. धर्मादि पांडवांना आतां विराटराजाच्या गृहीं राहून आपला अज्ञातवास संपवावयाचा असल्यामुळें अतिशय कठिण असा जो राजसेवारूप धर्म तो त्यानीं जाणणें अवश्य होतें, म्हणून धौम्यानीं धर्माला तो शिकविला. ६. अज्ञातवास संपेपर्यंत धर्मादिकांच्या अग्निहोत्राचें रक्षण करण्याकरितां धौम्यमुनी त्यांचें अग्निहोत्र घेऊन द्रुपदपुराकडे गेले. ७. अग्नीची प्रार्थना करून. ८. सरथ—**चा. प्र.** ९. इंद्रसेनप्रमुख सेवक. १०. द्वारकेंत कृष्णाच्या आश्रयानें राहण्यासाठीं. ११. एकूणएक, सर्व. १२. अनोळखीपणानें राहूं इच्छिणारे. १३. होणारें, नशीब. १४. श्रीकृष्णभक्त जे पांडव ते.

जी [1]तच्छस्त्रत्राणा आश्रय त्या संकटांत होय [2]शमी
शिवमूर्तिसी श्मशानीं, तीचें वर्णूं न काय हो! यश मीं? ५

भेटोनि विराटासि प्रथम युधिष्ठिर वदे [3]मनोज्ञ असें,
'नामें कंक द्विज मीं, [4]धर्माश्रित, [5]अक्षकेलिदक्ष असें.' ६

ठेवी विराटनृप बहुमानें सभ्यांत या हि सभ्यास,
[6]वर्ते नृपाश्रितांत नृपाश्रितसा चि, नसतां हि अभ्यास. ७

मग भीम म्हणे, 'राया! मीं धर्माश्रित लहानसा, माजी
[7]आख्या [8]बल्लव, सेवा होती प्रभुच्या [9]महानसामाजी.' ८

स्वमहानसीं विराट स्थापी पूजूनि बल्लवाला, हो!
हळहळुनि म्हणे धर्म, '[10]स्वपदा [11]हरिपादपल्लवा! [12]लाहो.' ९

होवूनि मलिनवेषा जातां [13]राजप्रियेकडे कृष्णा
चित्तीं म्हणे, 'अहा! बहु अवघड हे उंबरे[14] कडे, कृष्णा!' १०

पाहुनि पुसे सुदेष्णा, 'बाइ! कवण तूं? असी दशा कां? गे!'
'[15]कृष्णाश्रिता [16]भुजिष्या [17]सैरंध्री मीं,' असें तिला सांगे. ११

राज्ञी म्हणे, 'पहाया रूप असें, ई[18]श्वरीस नवसावें.
कोण [19]सचक्षु म्हणेल स्वगृहीं तुज सुंदरीस न वसावें? १२

---

१. त्यांच्या (पांडवांच्या) शस्त्रांचें रक्षण होण्याला. २. शमीचा वृक्ष. (विराट-नगरींत प्रवेश करण्यापूर्वीं पांडवानीं आपलीं शस्त्रें एका शमीवृक्षाच्या ढोलींत ठेविलीं होतीं). ३. मधुर. ४. धर्मराजाचा आश्रित. ५. द्यूतक्रीडापटु. ६. वागे. ७. नांव. ८. आचारी. ९. स्वयंपाकगृहांत. १०. आपल्या (तुमच्या) पदाला. (वैकुंठाला). ११. विष्णुपदकमला! १२. मिळवो. हा धर्म वैकुंठास जावो—अशा प्रकारच्या यातना भोगण्यापेक्षां मला मरण आलें तर बरें, असा धर्माचा आशय. १३. विराटाच्या सुदेष्णानामक राणीकडे. १४. उंबरे हे बहु अवघड कडे [असती]. (दुसऱ्याचे उंबरे ओलांडणें—पराधीनतेनें राहणें हें पर्वत चढण्यासारखें दुःखद आहे). १५. द्रौपदीची आश्रिता. १६. दासी. १७. वेणीफणी वगैरे कामें करणारी व स्वतंत्र अशी स्त्री. १८. अंबिकेला. १९. डोळस.

परि निश्चयें त्यजिल मज, पाहुनि तुज भूप सुकमनीये[1]तें;
वाटे विलोकिता जरि हें अद्भुत रूप शुक, मनीं[2] येतें. १३
काय करावें म्यां तरि, जरि सुंदरि ! अनुसरेल पति तूतें?
वद, केंवि आवरावी अमृतफळहृता[3] रसज्ञमति[4] तूतें[5]?' १४
'दैवें सैरंध्रीपण हें कांहीं काळ पातलें पंदरा
पांचां गंधर्वांची[6] पत्नी मीं पावल्यें कधीं न दरा[7]. १५
स्पर्शों न दे चि बाई ! स्वप्नीं ही मन्मना विवेक मळा[8],
गगनमणिकरींच्या[9] तम[10] केव्हां तरि काय हो ! शिवे कमळा?
हें वपु[11] परभोग्य नव्हे; जो पुरुष बळें चि हात लाविल या,
पावेल लय, ज्योतिस्पृग्[12] जेंवि पतंग मातला[13] विलया. १७
उच्छिष्ट चारितां मज, मजकरवीं धुववितां चि चरणातें,
नर कीं नारी पावे मत्पतिपासूनि सद्यं[14] मरणातें.' १८
तीतें म्हणे सुदेष्णा, 'मन्निकट[15] स्वस्थ तूं सये ! राहें;
त्वत्सख्यभाग्यदुर्लभ[16], यावें स्वप्नांत ही न येरां[17] हें.' १९
मग तंतिपाळ[18]नामें राहे सहदेव होवुनि खिलारी[19],
लीला हे, कौरव किति? न बहु हरिजनीं स्मरादि निखिलारी[20].

१. अत्यंत सुंदर अशा (तुज). २. आवडलें असतें. (शुकाचार्यांचें हि मन वेधलें असतें). ३. (लक्षणेनें) आम्रफळानें हरण केलेली–त्याला लुब्ध झालेली. ४. रसिकाची बुद्धि. ५. तुतीच्या फळानें. ६. पांडव देवांशज म्हणून गंधर्वसमान होत. ७. भयाला. ८. पातकाला. ९. सूर्याच्या हातांतील. १०. अंधकार. ११. शरीर. १२. ज्वालेला स्पर्श करणारा. १३. माजलेला. १४. तत्काल. १५. माझ्याजवळ. १६. तुझ्याशीं सख्य जुळून येण्याचें सुदैव. १७. इतराला. १८. तंति=गाईबैलांना बांधण्याची दोरी, ती पाळणारा–बाळगणारा. १९. गुराखी. २०. कामक्रोधादि सर्व वैरी. (हरिभक्तांच्या ठिकाणीं कामक्रोधादि षड्रिपूंचें हि कांहीं चालत नाहीं; मग कौरवांची ती कथा काय? पांडवांवर कठिण प्रसंग ओढवला ही केवळ हरिलीला होय).

स्त्रीवेष क्लीबत्व[1] स्वीकारी शक्रभू[2]; पतन[3] येतें
इतरा, परि तो न चळे; शिकवी नृत्यादि भूपतनयेतें. २१
रक्षिति हरिहररूपें[4] पक्ष्में ज्या अतिशयप्रिया बुबुळा,
नामें बृहन्नडा तो होय, धरुनियां करांत कंबु[5], बुळा. २२
नकुळ म्हणे, ‘मीं ग्रंथिकनामा हयशास्त्र जाणता, राया!
तो शालिहोत्र[6] कीं हा तुल्य चि; अश्वांसि, जाण, ताराया. २३
ज्याचा ठायीं नांदे सन्नीति जसी दयाधिका[7] रामीं,
राया! करीत होतों त्या धर्माच्या हयाधिकारा[8] मीं.’ २४
मत्स्य म्हणे, ‘आश्रय मीं तुज, पल्वल[9] जेंवि मानसमराला[10];
नरयान[11] त्यापुढें किति, कामा[12] ये जें विमान समराला? २५
धर्माश्रितांसि आश्रय मीं, लोकां हांसवितिल कविराट[13],
परि शोभेल चि, भासत होता लोकांस वितिलक[14] विराट.’ २६
ग्रंथिक[15] म्हणे, ‘नरेंद्रा! येथें हि स्पष्ट तो चि धर्म[16] असे;
ऐसें नसतें, तरि हे येते न प्रार्थितां कशास असे?’ २७
अज्ञातवासकाळीं त्यांची कष्टा दशा वदावि किती?

---

१. नपुंसकत्व. (वनपर्व अ० ३, ३५ ते ७५ आर्या पहा). २. इंद्रपुत्र अर्जुन. ३. पतित दशा. ४. अन्वय–श्रीकृष्ण व मारुति हींच पक्ष्में (पापण्या) ज्या अतिशयप्रिया बुबुळा (अर्जुनास) रक्षिति. ५. शंख. (शंखाच्या बांगड्या). ६. अश्वशास्त्रकर्ता. (हा कपिलमुनीचा पुत्र; यानें रचलेल्या अश्वशास्त्रविषयक ग्रंथास ‘शाल्यहोत्र’ असें म्हणतात). ७. अधिका आहे दया जींत अशी सन्नीति. ८. अश्वशाळेवरील आधिपत्याला. ९. लहानसें सरोवर. (डबकें). १०. मानससरोवरांतील हंसाला. ११. पालखी, मेणा वगैरे. १२. उपयोगाला. १३. कविश्रेष्ठ. १४. तिलकरहित. (शोभारहित). मी धर्माश्रितांला आश्रय झालों असें उपहासपूर्वक वर्णून कविश्रेष्ठ लोकांना हांसवितील; परंतु जो विराट आजपर्यंत लोकांना शोभाहीन भासत होता, तो आतां धर्माश्रितांच्या साहचर्यानें तरी शोभेल च, असा अर्थ. १५. नकुल. १६. (गर्भितार्थ) धर्मराजा; (व्यक्तार्थ) त्या धर्मासारखा च तूं हि येथें आहेस.

द्रव्यार्थ भीमअर्जुन अन्नें[1] लब्धांबरें तदा विकिती. २८
वरचेवर दे धर्म द्यूतविजितपणधन[2] स्वभावांस[3];
[4]समयज्ञ कवि न म्हणतिल 'कृपण' असें त्यां घनस्वभावांस[5].
एकांतीं गुप्तपणें भेटे, चोरांसि जेंवि चोरसखा,
सहदेव म्हणे, 'बहु कृश दिसतां, व्हा तुष्ट, पुष्ट, गोरस खा.' ३०
स्वामीपासुनि नकुळ हि जोडी भ्रात्रर्थ[6] धन हयां सजुनीं,
अंतःपुरीं मिळालीं वस्त्रें अर्जुन हि दे तयांस जुनीं. ३१
दयितांसि[7] द्रुपदसुता भेटे भलत्या मिषें[8], न दे विरहा;
तन्मति तिला म्हणे 'पति अतिमृदुल, न भेटतां न देवि! रहा.'
तें अमृतवर्ष[9] दर्शन त्यांसि, अदर्शन चिरांटन[10] गरांत,
एवं मासचतुष्टय ते क्रमिती त्या विराटनगरांत. ३२
ब्रह्मोत्सवांत[11] तेथें ये साक्षान्मल्लकाळ[12] जीमूत[13],
ज्याची आणी बहुतां भुजरणनिपुणांसि[14] काळजी मूत. ३४
'आहे कोण्ही मजसीं भांडेसा?' हें सगर्व मल्ल वदे;
[15]रंगीं तया क्रियोत्तर[16] राजाज्ञेनें सशंक बल्लव दे. ३५
काळासीं हि कराया सिद्ध चि तो धीरवीर भीम रणा;
कळतां, सुयोधन पुन्हा व्यसनीं पाडील, या चि भी मरणा.
भीमभुजाशनिपातें[17] बाहुरणीं दुष्ट मल्ल तो चिरडे;
रंगीं बहुगर्वें जो हांसे फुगवूनि गल्ल[18], तो चि रडे. ३७
धरिती घडींत शतदा ते म्लानिविकास[19] सर्व मल्लास्यें[20];

---

१. भीम महानसांतील उरलेलीं अन्नें व अर्जुन अंतःपुरांतून मिळालेलीं वस्त्रें द्रव्यार्थ विकिती. २. द्यूतांत जिंकलेल्या पैजेचें द्रव्य. ३. आपल्या भावांना. ४. प्रसंग जाणणारे. ५. मेघाप्रमाणें [दानशूर] स्वभाव ज्यांचा अशांस. ६. भावांसाठीं. ७. पतींना. ८. निमित्तानें. ९. अमृताची वृष्टि. १०. चिरकाल परिभ्रमण. ११. हा उत्सव अश्विनवद्यांत येतो. १२. मल्लांचा मूर्तिमंत काळ. १३. मल्लविशेष. १४. बाहुयुद्धप्रवीणांस. १५. आखाड्यांत. १६. क्रियारूपी उत्तर. १७. भीमाचे बाहुरूपी वज्रपातानें. १८. गाल. १९. निस्तेजता व सतेजता. २०. मल्लांचीं मुखें.

जिष्णु म्हणे, 'न धरावा जनरंजनरंगगर्व[1] मल्लास्यें[2].' ३८
फिरवुनि शतदा केला पिष्ट[3] क्षितिवरि सलील[4] आपटुनीं.
तें प्राशिलें नियुद्धामृत[5] नयनमुखें[6] करूनि आ पटुनीं[7]. ३९
रायें प्रसन्न होउनि देतां निजवस्त्ररत्नधनदानें,
'हाय!' म्हणे भीम, जया पूजावें करुनि यत्न धनदानें. ४०
मग भीम करी हरिसीं[8], पुरवाया राजदारकाम[9], रण,
कृष्णा म्हणे, 'सख्या! हरि! देसि न मज तूं उदार कां मरण?'
दश मास क्रमिति असे, प्रभुसम मंत[10] जे सदार विश्वास,
अत्युग्र[11] दीर्घ सोडी, ज्यांसि विलोकुनि, सदा रवि श्वास. ४२
कीचकनामा सेनापाल श्याल[12] प्रसिद्ध राज्याचा
भंगूं पाहे कृष्णाव्रत[13], वांछी अभ्युदय धरा[14] ज्याचा. ४३
भगिनीस म्हणे, 'पूर्वीं आढळली या न[15] हे मला भवनीं[16],
वाटे जन्मदरिद्रा झाला बहुकोटिहेमलाभ वनीं. ४४
मोहेल इला पाहुनि शक्र हि; मग अन्य कां न नर मोहे?
मजसीं, अधःकराया[17] अहिसुरनरकन्यकानन[18], रमो हे.' ४५
लब्धतदनुमोदन[19] तो जंबुक[20] सिंहीस, कीं सकाम ससा

---

१. जनरंजन करणाऱ्या रंगभूमीविषयींचा गर्व. २. माझ्या नृत्यानें. (भीमाच्या बाहुयुद्धकौशल्यानें थक्क झालेल्या सभेकडे पाहून अर्जुन म्हणाला, माझ्या नृत्यानें च जनमनरंजन होतें असा गर्व मी आतां धरावयास नको). ३. पिष्ट करणें=पीठ करणें–ठार करणें. ४. लीलेनें. ५. बाहुयुद्धरूपी अमृत. ६. नेत्ररूपी मुखानें. ७. मल्लयुद्धवेत्त्यानीं. ८. सिंहासीं. ९. राजस्त्रियांची इच्छा. १०. मान्य. ११. आपण पांडवांसारखे तेजस्वी नाहीं म्हणून दुःखानें रवि अतिशय उष्ण सुसकारे टाकूं लागला. पाठांतर—**अत्युष्ण—पं. प्र.** १२. पाठांतर—**सेनापालक शालक—पं. प्र.** (श्याल, शालक=मेहुणा, पत्नीचा भाऊ). १३. द्रौपदीचें व्रत. (पातिव्रत्य). १४. पृथ्वी. १५. ही द्रौपदी. १६. गृहीं. १७. लाजविण्याला. १८. नाग, देव आणि मानव यांच्या कन्यांचें मुख. १९. मिळविली आहे तिची (सुदेष्णेची) संमति ज्यानें तो. २०. कोल्हा.

व्याघ्रीस, सतीस बळें शांतीस वरावयासि तामससा, ४६
रावणसा बहु विनवी, प्रेम प्रत्यक्षरीं[1] हि नव दावी.
कीचक नीच कलुषनिधि[2], त्याची आर्यांत गोष्टि न वदावी. ४७
मळवूं पाहे स्वबळें या श्रुतिला[3] काय नीच[4] कलि हा? वा[5]
दशमुखमुखमळजळनिधिखळपतिपंक्तींत[6] कीचक लिहावा. ४८
कृष्णा म्हणे, 'अहाहा! बुडती, तरि भजति नीच कामातें[7],
सावध हो, गा! वध हो न, व्याळी[8] जाण कीचका! मातें. ४९
परदारा[9] मीं, मत्पति गंधर्व, प्रबळ उग्र शिवशीलें[10],
मागें सरसिल, तरसिल; मरसिल, जरि मज बळें चि शिवशील.'
प्रिय पांचजन्य[11] जीसें[12], प्रिय तदितर त्या भुजेसि कंबु[13] कसा?
झिडकारिला सतीनें, सिंहीनें दुष्टबुद्धि जंबुकसा. ५१
बंधु भजो, पति न भुलो, म्हणउनि, नसतां परस्व[14] सामान्य,
ती[15] त्या कार्यासि करी, जरि न करावें, पर स्वसा मान्य. ५२
ती तीस[16] म्हणे, 'कीचकसदना जावूनि आण गे! हाला[17].'
धाडी बळें वृकाच्या[18], घालुनि हरिणीस आण[19], गेहाला[20]. ५३
कृष्णा म्हणे, "न जाइन, जेंवि मृगी वृकबिळा, विटागारा[21],

---

१. प्रत्येक अक्षरांत. (शब्दागणिक). २. पापांचा सांठा. ३. या वेदतुल्य सैरंध्रीला. ४. कीचकरूपी नीच कलिपुरुष. ५. अथवा. ६. रावणप्रमुख जे पापसमुद्र व खलश्रेष्ठ अशांच्या पंक्तींत. ७. मदनास. ८. नागीण. ९. परस्त्री. १०. शंकराप्रमाणें [उग्र] स्वभाव ज्यांचा असे. ११. पांचजन्यनामक शंख. (हा विष्णूच्या हातांत असतो). १२. ज्या विष्णुभुजेस. १३. [सामान्य] शंख. १४. [द्रौपदीरूपी] दुसऱ्याचें धन. १५. अन्वयार्थ—ती स्वसा (बहीण-सुदेष्णा) जरि न करावें पर (तरि) त्या [कीचकाच्या अभीष्ट] कार्यासि मान्य करी. १६. सैरंध्रीला. १७. मद्य. १८. लांडग्याच्या. १९. शपथ. (निक्षून आज्ञा करून, असा भावार्थ). २०. घराला. २१. जार पुरुषाच्या घराला.

साधुगृहा[1] धाड, परमतप्ता तत्पथशिळाविटा गारा." ५४
उचित शुचि[2] तरि च नृवपु,[3] व्रतविघ्न[4] म्हणोन देवि! टाळावें.[5]
म्हणति विट 'विटाळावें,'[6] परि वेद म्हणों न दे 'विटाळावें.'"
विनवी ऐसें बहु तरि तीस सुदेष्णा म्हणे तरी 'जाच.'
फार चि बरी निरयगति,[7] परवशता शतगुणें[8] करी जाच. ५६
ती आपणा म्हणे, 'हा! द्रौपदि! तुजवरि हरी च विटला, गे!
चुकलीस तूं चि, नसतां पदरीं अघ, पाठिला न विट लागे.'
ज्या श्रीकृष्णसखीतें योग्य नमाया सुरासुर सतीतें,
प्रेषी[9] आणाया ती राज्ञी, मानुनि सुरा सुरस, तीतें. ५८
जातां परार्थ[10] ही बहु तापातें पावली सुरामा[11] ती,
न करील कां पित्यांची[12] दुर्गतिची मावली सुरा माती? ५९
त्या संकटीं सतीनें दीनांचा बंधु कृष्ण आठविला,
त्या सवितृमंडलस्थें[13] राक्षस रक्षार्थ गुप्त पाठविला. ६०
कीचक विलोकुनि म्हणे त्रिजगद्गुरुविष्णुच्या[14] हि आलीस,
'रंभा चि सुदति![15] तूं या नळकूबरमंदिरासि[16] आलीस. ६१
सर्वस्व अर्पितों तुज, देवि! करीं पूर्ण काम, हो दारा,
विकत मिळतां स्मितसुधालेशें[17] घेसी न कां महोदारा?'[18] ६२

---

१. सैरंध्री म्हणते, "मला एकाद्या सज्जनाच्या घरीं धाड; मग त्याच्या घराच्या वाटेंतील दगड, विटा या जरी अत्यंत तापलेल्या असल्या तरी त्या गारांप्रमाणें अत्यंत थंड समजून मी जाईन." २. शुद्ध, पवित्र. ३. मनुष्यदेह. ४. पातिव्रत्याचें विघ्न. ५. चुकवावें, दूर करावें. ६. [शुचि नृवपु] विटाळावें. ७. नरकवास. ८. शेंकडों पटीनें. ९. पाठवी. १०. दुसऱ्याकरितां मद्य आणण्यास जात असतां देखील. ११. चांगली स्त्री. १२. पिणाऱ्याची. १३. सूर्यमंडलांत राहणाऱ्या कृष्णानें. (द्रौपदीनें सूर्याची प्रार्थना केली. श्रीकृष्ण सर्वत्र च असल्यामुळें त्यानें सूर्याकडून एक राक्षस तिच्या रक्षणार्थ गुप्तपणें पाठविला). १४. तिन्ही जगांचा स्वामी विष्णु (कृष्ण), त्याच्या सखीस. १५. सुंदर आहेत दांत जिचे. १६. कुबेरपुत्राच्या घरीं. १७. मंदहास्यरूप अमृतकणानें. १८. अत्यंत उदार अशा मला.

इत्यादि नीच कीचक दुष्कर्माची धरूनि आस वदे.
कृष्णा म्हणे, 'सुदेष्णेकरितां पात्रीं भरूनि आसव[1] दे.' ६३
तों कर धरुनि खळ म्हणे, 'दासी आहेत फार अन्या[2] या,
बैसा शयनीं, राज्ञी[3] करित्ये, करवूनि दास्य, अन्याया.' ६४
कर आसुडितां चि पडे धडडड वात्याजवें[4] जसा विटपी[5],
कैंचें तेज बळ तशा दुर्वृत्तीं जो सुरारसा विट पी ? ६५
तवकें[6] उठोनि धावुनि, पळतां, कवळूनि नीच कबरीतें[7],
नृपतिसमक्ष हि पाडी लत्ता हाणोनि कीचक बरीतें[8]. ६६
तों तो राक्षस पाडी मागें ढकलूनि कीचकाला ही,
जाणों गरुडें उडवुनि आपटिला मत्त नीच काला[9]ही. ६७
पाहे विराटनिकटस्थित[10] धर्म, तदंतिकस्थ[11] भीम हि, तें,
न सतीस लात बाधे, जेंवि पुनररण्यवासभी[12] महितें[13]. ६८
अस्तीकशपथ[14] अहिचें[15] कीं हरिचें[16] आवरी बळ खलीन[17],
धर्म तसें भीमाचें, तो म्हणतां, 'भूखलीं[18] खळ खलीन.' ६९
भीमांगुष्ठासि धरी स्वांगुष्ठें धर्मराज दडपून,
नाहीं तरि, तेव्हां चि श्येनतसा[19] मारिता चि झडपून. ७०
रोधी युधिष्ठिराज्ञावेळा[20] भीमार्णवाचिया[21] वेगा,

---

१. मद्य. २. दुसऱ्या. ३. तुजकडून दास्य करवून राणी अन्याय करिते; कारण तुला दास्य योग्य नाहीं. ४. वावटळीच्या वेगानें. ५. वृक्ष. ६. तत्काळ. ७. वेणीला. ८. साध्वीला. ९. कालसर्प. १०. विराटाच्या जवळ बसलेला. ११. धर्माजवळ बसलेला. १२. पुनः अरण्यवासाची भीति. १३. पृथ्वीला. (पांडव प्रकट झाले तर त्यांस पुनः अरण्यवास करावा लागेल व आपणाला भारभूत असलेल्या दुष्टांचें शासन लांबणीवर पडेल ही भीति पृथ्वीला जितकी दुःखद झाली तितकी द्रौपदीला कीचकाची लात हि दुःखद झाली नाहीं). १४. आर्या-भारत आदिपर्व अ० ७–६६–६७ आर्या पहा. १५. सर्पाचें. १६. घोड्याचें. १७. लगाम–**पं. प्र.** १८. भूमिरूप खलांत–**पं. प्र.** १९. ससाण्याप्रमाणें. २०. धर्माची आज्ञा ही च समुद्रमर्यादा, ती. २१. भीमरूपी सागराच्या.

नाहीं तरि, जगदंतक[1] पूर तया तेधवा चि यावे, गा! ७१
कृष्णा रडत म्हणे, 'या रायावरि धर्मनीति विटताहे,
कैसी उपेक्षितां, हो! सभ्य[2]! श्रीकीर्तिहानि[3] विटंता[4] हे? ७२
प्रेमें रक्षितिल सदा, म्हणुनि दिलें मीं जयांसि मत्तातें[5],
ते गंधर्व उपेक्षिति मज कां? कां मारिती न मत्तातें? ७३
या[6] शुचि वपुतें योग्य न सेवाया, योग्य कीचक मळातें[7];
जें राजहंससमत[8], त्या तुडवितसे काक नीच कमळातें.' ७४
ज्या[9] नीति सतीची बुधमान्या अत्युच्च पायरी, तीतें
दासीपरि पाहे हा, नुमजे चि विराटराय रीतीतें. ७५
भूप म्हणे, 'मज तुमचें कलिकारण[10] न समजे चि तर्कशतें[11];
नुमजुनि मधुर हि वदतां, लागे गाळीपरीस कर्कश तें.' ७६
कंक म्हणे, 'सुज्ञे! जा, त्वां न अनाथासमान वरडावें,
गे! गांजितां परें स्वस्त्रीतें, न म्हणेल मानव रडावें. ७७
गंधर्व त्वत्पति कीं, तरि ते सुसमर्थ, देशसमयज्ञ[12];
थोरां न अन्य मान्य श्रितरक्षणकीर्तिलेशसम[13] यज्ञ.' ७८
तेथुनि राज्ञीपासीं जावूनि, म्हणोनि 'तात! अंब!' रडे,
फोडी जैसी व्याघ्रविमुक्त[14] कुळभ्रष्ट[15] धेनु हंबरडे. ७९
कळतां म्हणे सुदेष्णा, 'नाहीं च विचार कीचकीं अधमीं,
सखि! उगि; जरि म्हणसिल, तरि करिन तव सुखार्थ बंधुचा वध मीं.'

१. जगताचा नाश करणारे. २. सभासद हो! ३. ऐश्वर्य आणि कीर्ति यांची हानि करणारी. ४. जारक्रिया. (बलात्कार). ५. माझ्या पित्यानें. ६. या माझ्या पवित्र देहाला. ७. घाणीला. ८. राजहंसाला मान्य असें. ९. अन्वय— ज्या सतीची नीति बुधमान्या [आणि] पायरी अत्युच्च तीतें हा विराटराय दासीपरि पाहे; रीतीतें नुमजे चि. १०. भांडणाचें मूळ. ११. शेंकडों तर्कांनीं. १२. देशकाल जाणणारे. १३. आश्रितांच्या रक्षणानें प्राप्त होणाऱ्या अल्पमात्र कीर्तीप्रमाणें. १४. वाघाच्या जबड्यांतून सुटलेली. १५. कळपांतून चुकलेली.

कृष्णा म्हणे, 'वधावा भ्राता त्वां कां ? तुजा न अपराधी;
पति गंधर्व न दुर्बळ, माजी प्रार्थील किमपि न परा[1] धी[2].' ८१
निजदुःखाहुनि केवळ कनकनगास हि गणील हा[3] न सती,
तैं द्वारकापुर तसें आणी बहुदा मनीं महानस ती[3]. ८२
जाय निशीथीं[4] साध्वी, दावी तिस तत्प्रभा चि वाट तमीं[5];
चित्तांत म्हणे, 'भीमा दयिता[6] दयितां[7] नसेंन वाटत मीं?' ८३
पाहोनि म्हणे भीमा, 'आश्रय तुज काय हें महानस? हा!
न यशोहानि सहा, गा! सुज्ञा! सहकाय[8] हेमहान[9] सहा[10].' ८४
साश्रु गळां पडुनि म्हणे, "मेलां किंवा तुम्हीं अहां सासु[10]?
होत्यें म्हणत, 'वियाली[11] माजी च रिपुक्षयावहां[12] सासु.' ८५
मीं काय? भली निद्रा सुखदात्री! काय हा[13] लहान सखा?
गमलें वपु चि यशोधिक, तरि अन्न चि, धरुनि हें महानस, खा.
निजलां काय मृतापरि? जागे व्हा, सिंहसे उठा, राहो
निद्रा, कीर्ति वरा, हो! ह्रीप्रद[14] हा बाहु भृगुकुठारा[15] हो." ८७
भीम गडबडोनि उठे अंकीं च निवास[16] तीस दे वामीं[17],
चित्तीं म्हणे, 'बहुदिसां आतळलों[18] या सतीस देवा! मीं.' ८८
'दयिते! कां आलीस? प्रमदे! हा आर्द्र[19] कां पदर? ज्याये[20]!

१. दुसऱ्याला. २. बुद्धि. ३. अन्वयार्थ—हा भीम आपल्या (द्रौपदीच्या) दुःखाहून केवळ कनकनगास हि न गणील [असा विचार करून] ती सती द्रौपदी जसें [नेहमीं] द्वारकापुर (तेथील श्रीकृष्ण) मनीं आणी (आठवित असे) तसें तैं (त्या वेळीं) महानस (स्वयंपाकगृहस्थ भीम) मनीं आणी. ४. मध्यरात्रीं. ५. अंधारांत. ६. प्रियकर अशा भीमाला. ७. प्रियपत्नी. ८. देहासहित सुवर्णहानि (धनहानि). ९. सहन करा. १०. जीवंत. ११. जन्म देती झाली. १२. शत्रुनाश करणाऱ्या अशा [पुत्रांस]. १३. निद्रा हा लहान सखा काय? छे! १४. लज्जास्पद. १५. भार्गवरामाच्या परशूस. १६. जागा. १७. डाव्या. १८. भेटलों. १९. ओला. २०. जाये!

भ्यालीस भीरु[1]! भय कां? भेटे त्याला चि कांप, दर ज्या[2] ये.
तूं काय भार? भामिनि[3]! उतरासि मांडीवरूनि कां? बस, ये,
झालें काय? वद सुदति! सुमुखि! सति! रडों नको चि, थांब, सये[4]!"
देवी म्हणे, “ पुसतसां, जाणुनि ही खेद काय मातें? हो!
विनवा तुम्हीं तरि, ‘ सुकृत जें बंधच्छेदका, यमा तें हो.’ ९१
पुसतां, नसे स्मृति म्हणुनि? बहु उत्तम, सांगत्यें बरें, परिसा;
परि साच निजाना, कीं लोहाची भीड काय जी! परिसा? ९२
कृष्णसखी, द्रुपदसुता, धर्मस्त्री, सून पांडुराज्याची
कविगण[5]गणपतिगौरी कीर्ति सुधासिंधुपांडुरा ज्याची; ९३
कवि जीस राजसूयामाजि, व्यापुनि महीनभा[6], गाती,
झाली विराटसदनीं सैरंध्री परम हीनभागा[7] ती; ९४
जी कुरुसभेंत नेली द्यूतजिता[8] किंकरी[9] म्हणुनि अरिनीं,
बहु घाबरी च केली, जसि देवुनि हाक हस्तिनी[10] हरिनीं; ९५
खळ[11] दुर्दशार्थ सोडित होता चि, त्यजुनियां दया, लुगड्या,
स्मरतां चि भीड पडली जीची, दीनांचिया दयालु गड्या[12]; ९६
कीचक नीच कर तिचा धरि, परि हरिची सखी न अनुसरली,
कर[13] आसुडितां पडतां खळ, तेथुनि दूर ती सुतनु[14] सरली. ९७
पळतां, पाठीस तिच्या लागे, वेणी धरूनि दे हिसके,
स्वकराग्रें[15] हि शिवाया न रवि जिच्या कांतिसंपदे[16] हि सके. ९८

---

१. भित्रे! २. ज्याला भय प्राप्त होतें, त्याला च कांप सुटतो. (तूं कांपत आहेस, त्याअर्थीं तुला कांहीं तरी भय प्राप्त झालें आहे, असा भावार्थ). ३. कोपशीले! ४. गडे! ५. कविगणरूपी गणपतीची जननी पार्वतीच व अमृतसागराप्रमाणें शुभ्र अशी ज्याची कीर्ति, त्या पांडुराजाची सून. ६. पृथ्वी व आकाश यांना. ७. हतभागी, दुर्दैवी. ८. द्यूतामध्यें जिंकलेली. ९. दासी. १०. हत्तीण. ११. दुःशासन. १२. श्रीकृष्णाला. १३. हाताला हिसके देत असतांना तो दुष्ट कीचक पडला तेव्हां. १४. कृशांगी. (द्रौपदी). १५. आपल्या किरणाग्रांनीं. (कर=हस्त, किरण). १६. लावण्यातिशयाला.

लत्ता हाणुनि मूर्छित केली सुकुमार मूर्ति [1]भूपातें,
अजि ! सोसलें कसें पतिहृदया? सोसो [2]ससभ्यभूपा तें. ९९
[3]पैका बुद्धि करितसे सुयशाची वृद्धि, मृत्तिका[4] [5]कांची;
हरिनीं [6]श्ववृत्ति वरिली, कीं हंसानीं च वृत्ति काकाची. १००
तेज तुम्हां असतें तरि, उरता हाणोनि न विट लातेला;
[7]अहितायुला न पीतां तेजस्वी दीप न विटला तेला. १०१
देवा ! वांचाया, हे स्त्री मातीसी च तुडविली, लाजो;
तो हि पति, उद्धरीना अरिनें व्यसनांत बुडविलीला जो. १०२
हे स्त्री नव्हे, प्रतिष्ठा[8] तुमची, जरि ईस सोडितां [9]पाणी,
'[10]धर्मे चार्थे च,' असें वदलां कां प्रथम जोडितां [11]पाणी? १०३
निस्तेज मीं हि; [12]दीपकवर्तिहर जसा [13]खराखु, [14]रामेला
श्रीरामाच्या हरितां, [15]तत्तेजें [16]खळ खराखुरा मेला. १०४
मज मरण सुसह, परि हें दुःसह बहु, [17]धाता ! न रामेला
रक्षी वरूनि जो, जन म्हणती बहुधा तया नरा मेला." १०५
दावी रडोनि जाले जे गंध उगाळितां स्वहात [18]किणी.

---

१. जमीनीवर पाडून. २. सभासदांसह राजा विराटाला. ३. कसलेली. ४. माती. [नाश]. ५. कच्ची (बुद्धि) सुयशाची मृत्तिका करितसे. ६. कुत्र्याचा स्वभाव. ७. अन्वयार्थ—[जसा] दीप तेला पीतां न विटला (विटलेला कधीं आढळला नाहीं) [तसा] तेजस्वी (पराक्रमी पुरुष) अहितायुला (शत्रूच्या जीविताला) पीतां न विटला. (तेजस्वी पुरुषानें किती हि शत्रु मारले तरी ते त्याला पुरेसे होत नाहींत). ८. [मूर्तिमंत] बहुमान. ९. पाणी सोडणें=सर्वस्वीं त्याग करणें, टाकणें. १०. 'मी या वधूला सोडून धर्मार्थकामसंपादन करणार नाहीं' या विवाहकाळच्या वराच्या प्रतिज्ञावाक्यास अनुसरून ही द्रौपदीची उक्ति आहे. ११. पाणिग्रहण करितांना. १२. दिव्यांतील [जळती] वात नेणारा. १३. प्रखर (दुष्ट) उंदीर. १४. सीला. (सीतेला). १५. तिच्या तेजानें. १६. रावण. १७. हे ब्रह्मदेवा ! १८. घट्टे पडलेले.

भीम म्हणे, ' विधिलेखनि[1] ! लेखनिं[2] नच वेंचकलीस[3] घातकिणी!'
नेत्रें पुसोनि कवळुनि भीम सतीला म्हणे, "उगी, न रडें,
अज्ञातवास नसता, तरि अरिचें तें चि मुरडितों नरडें. १०७
धर्माज्ञेतें भ्यालों मीं, साध्वि! न [4]अंधनंदनगदेतें;
सुख [5]गुरुवचोनुग चि वपु दे, न [6]सुरसगंधनंदनग दे तें. १०८
एकांत नृत्यशालाशयनीं [7]भेटे, असें चि कर; ज्याये!
येइल तसें चि माज्या, नृहरीच्या यश जसें चि करर्ज्या ये.
काळा हि न भीति सती; [9]स्त्रीश्वरि! भ्यालीस काय अल्पा या?
[10]कल्पाया सत्य, स्मित कर, म्हण, '[11]नृत्यालयस्थतल्पा या.' ११०
[12]कल्पाग्निपुढें [13]कूपीं कृष्णे! राहेल काय ओलावा?
गरुड म्हणतां 'प्रति[14]भटा!' वांचेल कसा म्हणोनि 'ओ' लावा?
उत्साहभरें हृदयीं [15]पर्वीं [16]पाथोधिसा चि वाढत मीं
पूर्वीं च नृत्यशाळाशयनीं जावुनि बसेन [17]गाढतमीं. ११२
मुळमुळ रडों नको, सति! सीतेस हि सोडिलें न भोगानें,
तेज असोनि हि वरिले [18]काळकृताभ्युदयलय [19]नभोगानें. ११३

---

१. हे ब्रह्मदेवाचे लेखणी! २. [द्रौपदीच्या कपाळीं अशा प्रकारच्या हालअपेष्टा] लिहितांना. ३. भ्यालीस. ४. दुर्योधनाच्या गदेतें. ५. वडील माणसांच्या बोलण्याप्रमाणें चालणारें. ६. देवांच्या सुगंधयुक्त किंवा उत्तम रस व गंध यांनीं युक्त अशा नंदनवनांत जाणारें (वावरणारें) वपु तें [सुख] न दे. ७. [कीचक] भेटे. ८. नखाला. ९. हे स्त्रियांमध्यें श्रेष्ठ अशा द्रौपदि! १०. [कीचकास] खरें वाटण्यासाठीं. ११. नृत्यशाळेंतील शय्येवर. १२. प्रलयकालीन अग्नीपुढें. १३. विहिरींत. १४. हे शत्रो! (गरुडानें 'प्रतिभटा' म्हणून आव्हान केलें असतां लावापक्षी 'ओ' म्हणून कसा वांचेल)? १५. पर्वकाळीं. १६. समुद्राप्रमाणें. १७. निबिड अंधकारांत. १८. काळानें केलेलें उदय आणि अस्त. १९. सूर्य—चा. प्र.

हरिभक्तच्छळ करितां, तत्काळ उलेलें[1] कां न नीचोरें[2]?
निश्चय[3], सद्धन[4] हरितां, निजमार्ग भुलेल काननीं चोर." ११४
करवुनि खळवधनिश्चय, तेथुनि गेली सती स्वशयनातें,
कंठीं क्षेपा[5] स्मरोनि प्राणसख्या पुंडरीकनयनातें[6]. ११५
गांठी तिला पुन्हां तो खळ, जेंवि पतंग दीपकळिकेला[7],
प्रार्थुनि म्हणे, 'सुमुखि! मज भज, तुजसीं म्यां चुकोनि कळि[8] केला.
सुंदरि! विराट राजा नावांचा जाण, साच मत्स्यप[9] हा,
श्रृंगाररसतरंगिणि[10]! तळमळतो संगमार्थ मत्स्य पहा. ११७
जरि हा विराट राजा, तरि कांहीं काल कां न वदला? गे!
वृद्धकळत्र[11] युव्यां[12], मज हें तेंवि पहावयासि पद[13] लागे.' ११८
त्यासि खरें भासेसें प्रियशिक्षित[14] सस्मित[15] स्वयें वदली;
परि कांपली सतीची तनु, जैसी मंदमारुतें कदली[16]. ११९
खळ पाय धरूं पाहे; सुमति म्हणे, 'कासया[17] नति[18]? सरा[19] हो!
परि पात्र निजरहस्या[20] भ्राता वा[21] दास, या न तिसरा हो.'१२०
तें वाटे त्या हालापानाद्यतिपातकायना[22] सत्य;
मग मनिं म्हणे, 'पित्याचा[23] पाहतसे हात काय नासत्य[24]?'१२१

---

१. फुटेल. २. नीचाचें हृदय. ३. खचित. ४. सज्जनांचें धन. ५. रात्रि—**चा. प्र.** ६. कमलनयन श्रीकृष्णानें. ७. दिव्याच्या ज्योतीला. ८. कलह. ९. मत्स्यदेशाचा राजा. १०. हे शृंगाररसाचे नदि! ११. वृद्धाची स्त्री. १२. तरुणाला. १३. राज्यपद. १४. प्रियानें (भीमानें) शिकविलेलें. १५. हास्यपूर्वक. १६. केळ. १७. कशाला. १८. नमन, पाय धरणें. १९. दूर व्हा. २०. आपल्या गुप्त विचाराला. २१. अथवा. २२. मद्यपानादि अति—महा—पातकांच्या स्थानास. २३. दिवस मोठा झाला असें वाटून कीचकाची शंका. **पं. प्र.** २४. देवांचा वैद्य आश्विनीकुमार. (नासत्य आणि दस्र हे दोघे बंधु आश्विनीकुमार या नांवें देवांचे वैद्य म्हणून प्रसिद्ध आहेत. यांचा पिता सूर्य होय). सूर्यास्त होऊन केव्हां एकदा सैरंध्रीची भेट होते असें कीचकास झालें होतें, असा भावार्थ.

केल्या संकेतातें ती निजरमणासि[1] सूचवी रमणी,
विटदृष्टितें[2] कळत्रीं भावी स्वनखांत सू[3] च वीरमणी. १२२
त्या शून्यनृत्यशाळाशयनीं सांजे चि गुप्त भीम निजे,
जागति[4] ते, स्वाकारें भुजगांच्या[5] नित्य देति भी मनिं जे. १२३
झाली शाळा केवळ कृष्णा[6] पोषूनि अंधकारा ती,
जाणों सुयशोर्थ तमोगुण धाडी तेथ अंधकारांती[7]. १२४
चित्तीं भीम[8] म्हणे, "सुरवर घे म्हणवूनि 'हा! सुरापसदा!'
'धिग्धिग्! छी छी!' म्हणवुनि घेइल लोकांत हा सुराप[9] सदा."
आला त्या साध्वीसीं इच्छुनि जो परम नीच कामरण[10],
प्राप्त न होईल कसें त्या मद्यमदांध कीचका मरण? १२६
पाहे शयनीं निजला होता जो कांत[11] कीर्तिवरटांचा[12];
बसल्या ज्याच्या[13] दुर्जननागफणांरूपकीर्तिवर[14] टांचा. १२७
जों सांसपी[15] तयाच्या[16], मृगपतिच्या जेंवि फेरु[17] आंगातें,
करिती करकर, जाणों म्हणति जडवरासि 'मरसि कां?' गातें[18].
'आलों तुज भेटाया घेवुनि सर्वस्व हें उपायन[19] हो!

१. भीमाला. २. पत्नीच्या ठिकाणीं असलेली जार कीचकाची दृष्टि ही आपल्या नखांत धरलेली चांगली ऊ च आहे असें भीमाला वाटलें. ३. ऊ—**चा. प्र.** ४. ते भुज. ५. सर्पांच्या (पक्षीं) जारांच्या. ६. कृष्णवर्णा (पक्षीं) मूर्तिमती द्रौपदी च. ७. शंकर. ८. भीम मनांत म्हणाला, [अहल्याधर्षण करून] इंद्रानें हि 'हा! सुराधमा!' असें म्हणवून घेतलें. ९. मद्यपी. (कीचक). १०. मदनयुद्ध. (सुरतक्रीडा). ११. नवरा. १२. कीर्तीरूप हंसिणीचा. १३. ज्या भीमाच्या. १४. दुर्जनरूप सर्पांच्या फणारूप कीर्तीवर. १५. चांचपी? १६. भीमाच्या. १७. जंबुक—**चा. प्र.** १८. पलंगाचीं लाकडें. (कीचक पलंगावर येऊन बसला तेव्हां त्याच्या भारानें पलंगाचीं लाकडें करकरा वाजूं लागलीं. परंतु कवि म्हणतात, तीं वाजत नसून त्या मूर्खशिरोमणि कीचकाला 'कां मरसी' असें च जणुं काय म्हणत होतीं). १९. भेट, नजराणा.

प्रमदे! त्वत्प्राप्तीस्तव बहु केला; विफळ हा उपाय न हो. १२९
असता दीप तरि, सुमुखि! मानुनि मज मूर्तमदन, रमतीस;
'लटिकी' म्हणूनि, हृदयामाजि न देतीस [1]पद [2]नरमतीस.'
हळुच म्हणे भीम, "तुम्हीं [3]सुमहागुणनदनदीप; काशाला
दीप? प्रकाशली कीं पावुनियां [4]वदनदीपका शाला. १३१
तुमचें लोकांत, अहो कीचक! सामान्य काय हो! [5]शील?
परि तूं वरटेसि [6]करट नीच कसा [7]मान्यकाय होशील? १३२
संगासि उर्वशीच्या स्वप्नीं तरि काय गा! [8]ढवा लाहे?
सैरंध्री [9]वीरवधू या तुज [10]नरकाय गाढवालीं[11] हे. १३३
नारद म्हणे, 'मिळविलें यश, निर्मुनि हें चि रत्न; [12]मत्तातें.'
वंदावें माथां कीं तुडवावें त्वां धुळींत मत्ता! तें? १३४
धरितोसि जीविताशा तूं [13]गरळप मंद नीच काशाला?
[14]त्वद्रक्तकर्दमें हे आतां चि भरेल कीचका! शाला. १३५
भगिनी रडेल, तुज अनुमोदुनि, नरकालयासि पाठवुनीं,
[15]दुर्मंत्रीं सुख पावे जी; हेमंतांत जेंवि पाठ वुनीं." १३६
ऐसें बोलुनियां, [16]धृतखळगल बलजलधि तो भला बुकली;
पावेल जय कसा, [17]प्रभुसेतुसवें करिल जो [18]अलाबु कली? १३७
प्रबळासीं करिल स्त्रीस्तव [19]आमृति कां न नीच मूढ कली?
[20]सुकवि हि दशमुख निजतनुसह [21]काळवृकाननीं [22]चमू ढकली.

---

१. जागा. २. [मी] मनुष्य आहे अशा बुद्धीस. ३. अत्युत्तम गुणरूप नद व नदी यांचा स्वामी समुद्र. ४. मुखरूपी दीपाला. ५. स्वभाव. ६. काक—**चा. प्र.** ७. मान्य आहे शरीर ज्याचें असा. ८. हिजडा. ९. वीरपत्नी. १०. मनुष्यदेहधारी. ११. येथें 'योग्य नाहीं' या शब्दांचा अध्याहार करावा. १२. माझ्या पित्यानें. (ब्रह्मदेवानें). १३. विषपी. १४. तुझ्या रक्ताच्या चिखलानें. १५. वाईट मसलतींत. १६. धरला आहे दुष्टाचा (कीचकाचा) गळा ज्यानें. १७. रामाच्या सेतूबरोबर. १८. भोपळा. १९. मरेपर्यंत. २०. चांगला शाहणा, समजूतदार. २१. काळरूपी लांडग्याच्या तोंडांत. २२. सैन्य.

प्राणा मुकेल इच्छुनि सिंहीचे गज हि [1]सबहुमान मुके;
[2]मां न मुके कोल्हा ? कां 'छी !' म्हणतिल त्या जनाधमा न मुके ?
ब्रह्म्यां[3]करवीं स्मरवी, मधुसूदनचरित जें, पवन[4]भू तें
कांपवि शेषफणेतें न विराटाच्या चि त्या [5]भवनभूतें. १४०
[6]दावी दूरुनि नरकग्रामाची भीम कीचका वेस
कलिमाजि लघुत्वप्रद शक्तीस तसे चि नीच कावेस. १४१
जें सुयश पाकशाळा मिरवी, न हते[7]भकेसरिगुहा तें;
हें किति ? असो; नि[8]युद्धाविषयीं याची न ये सरि [9]गुहातें.
जातां भीम म्हणे, 'गे ! अपराध तुजा करूनि पर मेला;
वांचेल नीच कीचक कैसा, लावूनि पाय परमे[10]ला ? १४३
त्या सीतेला [11]वासविवायससा, तुज हि कीचक विटाळी,
त्या या हि दंडिता प्रभु; साहे दोषासि नीच, कवि टाळी. १४४
व्यसनीं प्रभु रक्षी, मीं काय ? विसरलीस काय गे ! हरितें ?
तत्[12]स्मरणदीप नसतां, व्यापिल तम कां न [13]कायगेह रितें ? १४५
ऐसे चि खळ विदारुनि, देइल बहु लाज भीम[14]कर [15]पविला,
[16]ज्यांहीं न [17]हा चि चित्तीं, तो हि [18]सतीकांत भीम[19] [20]करपविला.'
[21]गुर्वाज्ञा म्हणवुनि जों जाय सती मृतविटासि लक्षाया,
मानी दिधला काळव्याघ्राला मांसपिंड भक्षाया. १४७

---

१. मोठ्या आदरानें. २. तर मग. ३. ब्रह्मदेवाकडून. (भीमानें त्या वेळीं ब्रह्मदेवाला श्रीविष्णूनें मधुनामक दैत्यास मारलेल्या प्रसंगाची आठवण करून दिली). ४. मारुती. ५. घरांतील जमिनीला. ६. परिशिष्ट पहा. ७. मारला आहे गज ज्यानें अशा सिंहाची गुहा. ८. बाहुयुद्धाविषयीं. ९. कार्तिकस्वामीला. १०. श्रेष्ठ अशा तुला. ११. इंद्रपुत्र जयंतरूपी कावळ्यासारखा. (रामायण—जयंतकाककथा पहा). १२. त्या प्रभूचें स्मरण हा च दीप. १३. शरीररूपी गृह. १४. भीमाचा बाहु. १५. वज्राला. १६. ज्या खळानीं. १७. हा च सतीकांत (द्रौपदीपति) भीम. १८. पार्वतीपति. १९. शंकर. २०. त्रासविला. २१. भीमाची आज्ञा.

स्मित करुनि म्हणे, ‘ पापा ! कां रे ! [1]प्राणादिसर्वहानीच्या
बीजा [1]व्यभिचारित्वा भजलासि, धरूनि गर्व, हा ! नीच्या ! ’
साध्वी तेथूनि निघे, चिंती पतिभुज मनांत [2]हरिसारे,
[3]राजसभापाळांतें दूरूनि म्हणे, ‘ समस्त ! परिसा, रे ! १४९
मत्पति गंधर्व, तिहीं सोडविलें, वधुनि कीचका, मातें.
मेले दशाननादिक, तन्हि वश होतात नीच कामातें.’ १५०
सैरंध्रीनें कथितां कीचकवधवृत्त, धांवले लोक,
[4]तदनुज उपकीचक शत [5]ससुदेष्णाविराट पावले शोक. १५१
तें देखत, खांबाला आलिंगुनि, दूर राहिली होती,
कृष्णा [6]मृतबंधूनीं [7]साश्रूंत [8]निरश्रु पाहिली हो ! ती. १५२
[9]बहुधा काळ म्हणे तिस, ‘ मारिन [10]खळ तव बळें, नसें दूर;
[11]अरिरक्त पहा, [12]दृक्प्रिय [13]गणपमुखस्थ हि असा न सेंदूर.’ १५३
खळ म्हणति, ‘ सस्मितमुखी ती सैरंध्री पहा उभी, मरण
गुरु पावला [14]यदर्थें, करुनि पतींसीं जिच्या [15]सुभीम रण. १५४
हूं, आणा, बांधा, हो ! एकाकी वीर हा न सेउ चिता,
मेला [16]स्वसंगकामें, [17]तत्सहगति कसि इला नसे उचिता ? १५५
[18]भावोजी ! जेणें या दासीस प्राप्त होय [19]सुरता, तें

१. प्राण आदिकरून सर्व प्रकारच्या हानीचें बीज च (मूळकारण) अशा व्यभिचारीपणाला. २. सिंहासारखे. ३. त्या नृत्यशाळेच्या रखवालदारास. ४. त्या कीचकाचे धाकटे भाऊ. (हे १०५ होते; पुढें आर्या १६६ पहा). ५. सुदेष्णेसह विराटराजा. ६. मृत आहे बंधु ज्यांचा त्या उपकीचकानीं. ७. दुःख करणाऱ्यांमध्यें. ८. दुःखी नाहीं अशी. ९. या आर्येत, द्रौपदी निघून न जातां ‘ तें देखत ’ तेथें च उभी कां राहिली याचें कारण कवी उत्प्रेक्षेनें कथन करित आहे. १०. दुष्ट. (उपकीचक). ११. कीचकाचें रक्त. १२. दृष्टीला आवडणारा. १३. गणपतीच्या तोंडावरील. १४. जिच्या पायीं. १५. मोठें भयंकर. १६ आपल्या (द्रौपदीच्या) उपभोगेच्छेनें. १७. त्या कीचकाशीं सहगमन. १८. हे विराटराजा ! (वडील बहिणीच्या नवऱ्यास ‘भावोजी’ म्हणण्याची चाल आहे). १९. देवपणा.

वाइट काय ? म्हणा ‘ हूं ’ स्वर्गीं दोघें करूत सुरतातें.’ १५६
चालविली कृष्णसखी बांधुनि, जसि ती स्वबंधुची किरडी,[1]
चिरडी तत्काळ न त्यां, भीम विवेकी भला, न तो शिरडी.[2]
नेतां सती म्हणे, ‘ जरि वधितां मज, मारितां न हा[3] कामी,
गंधर्वराजसुत हो ! दीनापरि मारित्यें न हाका मीं. १५८
धांवा, उडी च घाली, मानी[4] घाली, न नीच, कास रणीं;
रक्षा स्वकीर्ति, घालूं पाहति मजसहित कीचका सरणीं.[5]’
श्रमला, परि भीम उठे, सुचवी, ‘व्याकुळ न हो’ असें तिजला.
गज गंजितां व्रतस्था[6] सिंही, राहेल सिंह कां निजला ? १६०
निजवेषासह[7] टाकी प्राकारावरुनि[8] तो उडीला, हो !
कां जीव म्हणेल, ‘पतन जरि हे लाहेल, तरि कुंडी[9] लाहो ?’
द्याया त्या दुष्टांच्या जनु* अंतःपूर्वपुर[10]विलापाला,
जावुनि पुढें चि भीमें तरु उपडुनि, त्यासि नुरविला पाला.
‘ बा[11] ! विटलासि सुबिरुदा कैंवि ?’ असें केशवास हसतीला
जाळावयासि घेउनि गेले जों ते शवासह[12] सतीला, १६३
तों तो गर्जोनि म्हणे, ‘ हा आलों, सर्व मारितों खळ गे !
हे केवळ कंटक[13], या राष्ट्रीं न बरे, जसे पथीं खळगे.’ १६४
बहु खळबळ[14] खळबळ करि पाहुनि कुरुनायका,[15] द्रवे,[16] यश तें
अद्भुत, पक्षिपतिपुढें[17] ठाकावें[18] काय काद्रवेयशतें[19] ? १६५

---

१. तिरडी. २. शिरडी ? ३. हा कामांध कीचक. ४. मानी रणीं कास घाली. ५. चितेवर. ६. [आपला प्रभाव व्यक्त न करण्याचें] व्रत घेतलें आहे जिनें अशी. ७. आपल्या [गंधर्वासारख्या] पोषाखासह. ८. तटावरून. ९. शरीर. १०. ‘अंतः’ हा शब्द आहे पूर्वीं ज्याच्या तें पुर म्ह० अंतःपुर (तेथील स्त्रिया), त्यांच्या विलापाला. ११. ‘बा ! [आपल्या] चांगल्या ब्रीदाला कैंवि विटलासि’ असें [म्हणून] कृष्णाला हसणाऱ्या (सतीला-द्रौपदीला). १२. [कीचकाच्या] प्रेतासह. १३. कांटे. १४. दुष्टांचा (उपकीचकांचा) समूह. १५. भीमाला. १६. विरघळे, धैर्यगलित होई. १७. गरुडापुढें. १८. सामना देण्यास उभे राहावें. १९. शेंकडों सर्पांनीं. * जन्म-

त्यजुनि पळाले पंचोत्तरशत[1] मनुजाकृती[2] पशु चितेतें.
अजि ! साहतील कैसें, शुचिदुःसह[3] तेज जें अशुचि ते तें ?
भीमप्रतापतपनें[4] झाले बहु शुष्क ते जसे पळवे[5],
पळ[6] वेचे तों[6] गांठी, हरिणांला हरिपुढें कसें पळवे ? १६७
वधिले खळ अपराधी गरुडें अहिसे, न लागतां पळ, ते;
वधिता चि भीम गांठुनि, जन्हि लंघुनि सप्तसागरां पळते. १६८
पुष्पोत्कटा[7] चि दुसरी गणितील अजान[8] कीचकवितीतें[9],
जी कृष्णा साध्वी, कां म्हणतील न जानकी च कवि तीतें ? १६९
भीम म्हणे, 'करिन तुजें, सति ! मर्दुनि रिपुशतायुतें[10], हित मीं;
बुडवी बळें अकाळीं सद्द्वेष[11] महाशतायुतें[12] हि तमीं. १७०
छळिले दशाननें, परि झाले प्रभुदार[13] काय कातर[14] ते ?
भीतां द्वंद्वांसि[15] कसे हरिजन[16] भवसिंधुनायका[17] तरते ? १७१
जें कर्म सिंधु इतरां, मज हरिदासासि आड[18] वाटे तें,
जा तूं आल्या चि पथें, जातों मीं धरुनि आडवाटेतें.' १७२
जोडुनि यश मिरवे जन, परि भगवज्जन कशास मिरवेल ?
बहु पानवेल मिरवी, तेंवि न मिरवी यशास मिरवेल[19]. १७३
ज्या[20] स्तवुनि म्हणति हरिभुज, 'कवि हो ! आम्हांत पौरवा घाला,'
त्या हि जसे ते भ्याले, स्वप्नीं हि तसे न पौर[21] वाघाला. १७४

---

१. एकशेंपांच. २. उपकीचक. ३. पवित्र मनुष्याला हि असह्य असें. ४. भीमाच्या प्रतापरूपी सूर्यानें. ५. गळलेले पाले, पाचोळे. ६. क्षण गेला नाहीं तों च. ७. रावणाची आई. ८. अज्ञ. ९. कीचकाच्या आईला. १०. शत्रूंचीं शेंकडों अयुतें. (अयुत=दशसहस्रसंख्या). ११. सज्जनांचा द्वेष. १२. देवांचीं शंभर वर्षें आहे आयुष्य ज्याचें त्यांना. १३. प्रभु रामचंद्राची बायको, सीता. १४. भयभीत. १५. सुखदुःखादि द्वंद्वांस. १६. भगवद्भक्त. १७. संसार हा च सिंधुनायक. (समुद्र). १८. विहीर. १९. मिऱ्याचा वेल. २०. ज्या भीमाची प्रशंसा करून प्रत्यक्ष विष्णूचे हि [महाप्रतापी] बाहु 'कवि हो ! आम्हांत पौरवा घाला' (भीमाची आमच्यांत गणना करा, भीम हा हि एक हरिभुज च आहे असें समजा) असें म्हणति. २१. पुरवासी लोक.

भी च चतुर्थी, कृष्णादेह चि बहुधा [1]कलाप [2]हा, याला
स्त्री, बाळ, वृद्ध, साधु हि, पुरजन बहु [3]धाकला पहायाला. १७५
स्त्रीस विराट म्हणे, "गे! सैरंध्रीला निरोप दे, विनवीं,
म्हण तीस, '[4]त्वदतिक्रमजन्यें यावीं भयें न देवि! नवीं.' १७६
भुलविल गंधें [5]रुचिर स्त्री मूर्तिमती सुरा, न राहो ती;
दुःसह कामविकार स्त्रीरत्नास्तव सुरा नरा होती. १७७
गंधर्वभयें काळिज धडधड उडतें, करें पहा गे! हें,
त्वद्बंधूंचीं झालीं [6]युगपच्छू[7]न्योत्सवें महागेहें." १७८
येतां मार्गें पाहे, यद्द्वारीं भीम, तें महानस ती,
स्वविवाहमंडप गणी, मानी वृत्तोपयममहा न सती. १७९
स्मित करुनि म्हणे, 'त्राता त्या गंधर्वाधिपा असो नमन,
विसरेल कसें, व्यसनीं अभयें सुख पावलें असोन, मन?' १८०
बल्लव म्हणे, '[9]विराजे [10]पाणि [11]श्रितसमवनें, न [12]वलयशतें;
केलें कलत्ररक्षण पतिनें, तरि काय हो! नवल यश तें?' १८१
ये उत्तरा पहाया सांडुनि गाण्यास नाचण्यासहित,
केंवि म्हणेल [13]रसज्ञा, सोडुनि शालीस, नाचण्यास हित? १८२
रोमांच तिच्या देहीं विजयश्रवणीं उभारती, [14]वांटे

---

१. चंद्र. २. हा द्रौपदीदेह. ३. भ्याला. (आपणावर कांहीं तरी आळ येईल या भीतानें गणेशचतुर्थीच्या दिवशीं चंद्राकडे पाहण्यास बृहस्पतीनें त्याला दिलेल्या शापामुळें लोक जसें धजत नाहींत त्याप्रमाणें द्रौपदीकडे पाहण्यास कोणी हि धजेनासें झालें). ४. तुझा उपमर्द केल्यानें उत्पन्न होणारीं. ५. अर्थ—सुंदर स्त्री हा साक्षात् दारू च होय; ती आपल्या गंधें (लावण्यानें) सर्वांना मोह पाडील; याकरितां आपल्या येथें ती सैरंध्री राहूं नये. ६. एकसमयावच्छेदेंकरून—**चा. प्र.** ७. उत्सवरहित अशीं. ८. जाल्या विवाहाच्या उत्सवास.—**चा. प्र.** ९. शोभतो. १०. हात. ११. आश्रितांचें रक्षण केल्यानें. १२. शेंकडों सलकड्यानीं. १३. जिव्हा—**चा. प्र.** १४. वाटेंत.

भेटे खळबळविजयीं[1] साक्षाद्देवीस[2] भारती[3], वाटे. १८३
'गे ! सखि ! सैरंध्रि ! कसें जालें ? कासि गे ! सुटोनि आलीस ?'
ऐसें बृहन्नडा ही तीस पुसे, जेंवि आलि[4] आलीस. १८४
तीस म्हणे सैरंध्री, 'तुज मजसीं काय उत्सवद्[5] नातें ?
स्पर्शेल, वृत्त वदतां, खळनाम प्राप्तकुत्स[6] वदनातें. १८५
तुज लाभ काय यांत, व्यासंग त्यजुनि नृत्यगानाचा ?
जा संकळा[7], मद्वृत्तश्रवणानें काय कृत्य ? गा, नाचा.' १८६
बोले बृहन्नडा, 'प्राक्सहवासें[8] दुःख सुख तुजें शिवतें,
नेणे जनमन, साक्षी विश्वाचा एक जाणतो शिव तें.' १८७
गेली राजगृहीं, तों तीस सुदेष्णा म्हणे, 'न कोपावें,
सैरंध्रि ! भूप भीतो, तूं या नगरीं वसों नको, पावें.' १८८
कृष्णा म्हणे, 'त्रयोदश[9] दिवस वसों दे,' असें चि वद राज्या:
अयश न यावें तुमच्या, यावें अस्वल्प[10] सुयश पदरा ज्या. १८९
येथुनि नेतील मला गंधर्व, बहुप्रसाद[11] करितील,
हरितील ताप तुमचे, ज्ञाति[12] सपूर्वज[13] हि कीर्ति वरितील.' १९०
वदतां असें समंजस, मग केंवि म्हणेल तीस ती 'जाच' ?
अपराध लव हि नसतां, कां हो ! सोसील ती सती जाच ? १९१

---

१. दुष्ट (महिषासुराचें) सैन्य जिंकलें त्या वेळीं. २. प्रत्यक्ष दुर्गेला ३. सरस्वती. ४. मैत्रीण. ५. आनंद देण्याजोगें. (माझ्या वृत्तांतानें आनंद होण्यासारखें तुझें माझें काय नातें)? ६. प्राप्त झाली आहे निंदा ज्याला असें (खळनाम). ७. सर्व-जणी ८. पूर्वसहवासामुळें. ९. तेरा. १०. मोठें. ११. [तुमच्यावर] मोठी कृपा करितील. १२. जातिबांधव. १३. पूर्वजांसहित.

अध्याय दुसरा.[1]

'गंधर्वांनीं वधिला, सिंहानीं चपळ नीच कपिसा च;
होता मद्यप, निस्त्रप[2], परयोषित्सक्त[3], कीचक पिसा च. १
तो आपण चि न केवळ, पावे सानुज[4] हि पातकी नाश,
देतो सकुटुंबा ही पापरता[5] नरकपात कीनाश[6].' २
ऐसी वार्ता परिसुनि, गेले दुर्योधनाकडे चर[7] ते,
जे पांडवशोधार्थ क्षितिवरि सर्वत्र नित्य संचरते[8]. ३
ते चर कथिती त्या धृतराष्ट्रसुता पांडवप्रभावार्ता[9],
हे मात्र कीचकाची तदरिहृदंबुजरविप्रभा[10] वार्ता. ४
कीचकनिधन परिसतां, तो पांडवशत्रु, 'परमकर्कश[11] तें
कोणाचें कृत्य?' असें पाहे शोधुनि मनांत तर्कशतें[12]. ५
मग बोले, 'सर्वत्र भ्रमले[13] निरलस[14] सुदास हे रानीं,
पांडवशोध कराया चित्त न केलें उदास हेरानीं. ६
कर्णा! ते मेले, कीं गेले योगें[15] सकाय[16] बाहेर?
हे[17] शोधितील असतां, नसतां, करितील काय बा! हेर? ७
बोला हो! सभ्य! तुम्हीं योग्य वदाया मतिप्रति[18] ज्ञाते.
हरितिल न पद, प्राण हि, नेउनि सिद्धिप्रति प्रतिज्ञा ते. ८
सुचली युक्ति करावी, मग जरि दैवें न होय शोध, न हो,
अज्ञातवास उरला अत्यल्प चि कीं अहो! यशोधन हो! ९

---

१. ह्या अध्यायास 'दक्षिणगोग्रहण' (विराटनगरीच्या दक्षिणेकडील गाईंचें हरण) असें नांव आहे. २. निर्लज्ज. ३. परस्त्रीलंपट. ४. धाकट्या बंधूंसहित. ५. पापासक्त जनाला. ६. यम. ७. गुप्त हेर, बातमीदार. ८. फिरणारे. ९. पांडवांच्या पराक्रमानें दुःख पावलेल्या. १०. कौरवांच्या अंतःकरणकमलाला सूर्यतेजाप्रमाणें आनंदकारक. ११. अति निष्ठुर. १२. शेंकडों तर्कांनीं. १३. फिरले. १४. आलस्यरहित. १५. योगबलानें. १६. सदेह. १७. हे हेर. १८. बुद्धिवादाला.

दूर चढोनि पडावे ते गोमयगोळेकार[1] कीटकसे,
अस्खलित[2] उच्चपदवीप्रति लंघूं पाहतात नीट कसे?' १०
कर्ण म्हणे, 'प्रेषावे ते देवा[3]! देवपतिसमा[4]! हेर,
ज्यांच्या वाटे प्रभुचें[5] लघु हि गुरु हि कार्य मतिस माहेर. ११
न दिसति म्हणवुनि केवळ काय नसति गुर्जरीस[6] कुंच[7]? राज्या!
वेडा चि तो, न दिसले भूमिगत[8] हि पांडुपुत्र कुचरा[9] ज्या.' १२
तों दुःशासन बोले, 'ते भोगुनियां श्रमा नें[10] वांचावे,
कां न मरावे व्यसनीं, ज्यां आधिमहाहि[11] मानवां चावे?' १३
श्रीद्रोण म्हणे, 'शिव! शिव! मरतील महानुभाव[12] कां गा! ते?
व्यसनीं जरि गडबडते साधु, तरि तयांसि सुज्ञ कां गाते? १४
रवि नें टळे[13] चि; गिळी, परि उगळी[14] खळ मलिन मंद राहु, टळे;
गुर्वापदे[15] हि साधु न भी, न चळे जेंवि अचळ वाहुटळे[16]. १५
त्यां[17] आधिस्तव होइल आवडि भलत्या हि काय हो! मरणीं?
तैशां धीरां वीरां करणारां स्वपरकायहोम रणीं. १६
न पडो दृष्टि पराची म्हणुनि तपःसिद्धिनें स्वपदरानें
ते झांकिले, न दिसती, पांडव गेले मरोनि न दरानें[18].' १७
भीष्म म्हणे, "या कुरुगुरुसम[19] हितें[20] मितें[21] अन्य बोलका नाहीं,

---

१. शेणाचे गोळे करणाऱ्या. २. अडथळा पावल्यावांचून. ३. राजा दुर्योधना! ४. इंद्रसदृशा! ५. धन्याचे. ६. गुजराथ देशांतील स्त्रीला. ७. स्तन. (गुर्जरींचे स्तन इतके आच्छादित असतात कीं, ते असून हि नाहींतसें वाटतात). ८. पृथ्वीवर असून. ९. ज्या कामचुकारू किंवा वाईट–नालायख हेराला. १०. वांचले नसावे. ११. मानसिक दुःखरूपी मोठा सर्प. १२. मोठा आहे पराक्रम ज्यांचा असे. १३. नाहींसा होत नाहीं. १४. ओकतो, परत टाकतो. १५. मोठ्या संकटाला हि. १६. वाहुटळेला. (वाहुटळेच्या योगानें). १७. अन्वय–हो! रणीं स्वपरकायहोम करणारां त्यां तैशां धीरां वीरां आधिस्तव भलत्या हि (रणमरणेतर) मरणीं आवडि॰ होइल काय? १८. भीतीनें. १९. द्रोणाचार्यांसारखा. २०. हितकर. २१. परिमित, मेजका.

हित[1]कामें प्राशावें याचे चि, न अन्य बोल कानाहीं. १८
जरि विश्व[2]गुरुत्व असे [3]कर्तृत्वास्तव [4]अजा, तरि [5]पुराणा
ज्या पुरुषा ध्यातो, त्या कृष्णास हि मत अजातरिपु राणा. १९
जेथें [6]तो तेथें कृतयुग[7]धर्म समस्त, तो चि [8]वर देश,
ऐसा तन्महिमा कीं त्या हरिहर हि प्रसन्न [9]वरदेश. २०
[10]धर्मस्थिति, तेथें कृतयुगगुण हे स्पष्ट दाविली खुण, गा!
उमगा बरें चतुर हो! तो साधु तपःसमृद्धिचा कुण[11]गा. २१
प्रा[12]साद सद्गुणांचे ते पांच, तसी च ती सभा [13]सावी;
त्यांची भेटि, अशुचि जी दृष्टि न जाली च, तीस भासावी. २२
उघडा हि निधि अभाग्या न दिसे, [14]मलिना जना हि [15]अत्रिजे, गा!
तेजस्वी कां मरतिल? भीतिल ते कोपल्या हि न त्रिजगा. २३
अज्ञातवासपण म्हणउनि सुनिपुण गुणसमुद्र ते, जन हो!
लावाया वेड तुम्हां म्हणतात, 'प्रकट आत्मतेज न हो.'" २४
कृप हि म्हणे, "कुरुवर्या! [16]तन्मार्गण तों अशक्य [17]दक्षमतें,
जें पाठवाल यावरि चतुर चरप्र[18]वरलक्ष अक्ष[19]मं तें. २५
अज्ञातवास दुष्कर, परि [20]तदवधि [21]निपट अल्प उरला, गा!
त्वच्छस्त्रांसि म्हणेल चि भीमाचें वज्रकल्[22]पं उर 'लागा.' २६
गांठि तुम्हांसीं त्यांसीं पाडील चि, वाढला विरोध रणीं.

---

१. हितेच्छूनें. २. विश्वाचें जनकत्व. ३. निर्माण केल्यास्तव. ४. ब्रह्मदेवाला. ५. अनादि अशा. ६. धर्म. ७. ह्याला च सत्ययुग म्हणतात; ह्या युगांतील प्रजेचे सर्व आचारविचार पवित्र असतात. ८. श्रेष्ठ. ९. वरदात्यांमध्यें श्रेष्ठ. १०. धर्मराजाची वस्ती. ११. गुप्त ठेवा. १२. राजवाडे. १३. सहावी (द्रौपदी). १४. पापी. १५. श्रीदत्तात्रेय. (हे भिक्षेच्या निमित्तानें नित्य नूतन वेषांत सर्व पृथ्वीभर संचार करितात; परंतु पाप्यांना मुळींच ओळखले जात नाहींत, असें गुरुचरित्रांत लिहिलें आहे). १६. त्यांचा शोध. १७. शहाण्यांच्या मतानें. १८. लक्षावधी श्रेष्ठ हेर. १९. [पांडवांचा शोध लावण्यास] असमर्थ. २०. त्याची मुदत. २१. अगदीं. २२. वज्रासारखें काठिण असें भीमाचें उर तुझ्या शस्त्रांची परवा करणार नाहीं, असा भावार्थ.

वाटे, म्हणाल चि, 'अस्रुक्सिंधूंत[1] विरेल, तरि विरो धरणी.'
शोध कराल तरि करा, संत्वर सिद्धा करा चि परि सेना,
गुरुसुहृदाप्तोक्तातें[2] राया! हितकाम कोण परिसेना?" २८
बोले त्रिगर्तराज[3], "प्रस्तुत पांडवदशा विराटा हो.
प्राप्ताहि[4] त्यजुनि म्हणे न शिखंडीचा परा 'विरा' टाहो. २९
मेला कीचक घेतां[5], पीडुनि बहुधा, करा त्रिगर्तांचा,
त्याचा आम्हां, तेंवि न पांथा बहु धाक रात्रिं गर्तांचा[6]. ३०
कीचकरहित विराट स्पष्ट जसा सर्प नीरदंन[7] दीन,
अल्प[8] अनल्प बळें तो तूं संप्रति, जेंवि नीरद नदीन." ३१
कर्ण म्हणे, 'त्या मत्स्या[9] ग्रासूं आम्हीं तुम्हीं समस्त बक;
बहुसुखशोभाप्रद न स्वस्तरुचा[10] ही यशासम स्तबक[11]. ३२
पांडव मेले गेले, त्यांची आतां वृथा कथा राहो,
निर्दीप निलय[12] जैसा आंधारा, आधिला[13] न थारा[14] हो.' ३३
राजा म्हणे, 'बहु बरें; पात्र तुम्हीं या यशें सुशर्मा[15] व्हा.'
प्रेषी[16] पुढें कराया गोग्रहणं[17] खळा नृपा सुशर्माव्हा[18]. ३४

१. रक्ताच्या समुद्रांत. २. वडिल मनुष्यें, मित्र व संबंधी यांच्या भाषणाला. ३. सुशर्मा. ४. प्राप्त (हस्तगत) असलेला सर्प सोडून देऊन मयूराचा टाहो दुसऱ्या सर्पाला "विरघळून जा—मृतप्राय व्हा" असें न म्हणे. (सुशर्म्याच्या बोलण्याचा भाव असा कीं, पांडवांचा शोध करीत बसण्यापेक्षां कीचकरहित झाल्यामुळें निर्बल झालेल्या विराटाचा च अगोदर समाचार घ्यावा). ५. त्रिगर्तांचा करा घेता=त्रिगर्तांपासून करभार घेणारा. ६. खांचखळग्यांचा. ७. दंतहीन. ८. अन्वयार्थ—तो (विराट) जेंवि नीरद (मेघ) [तेंवि] बळें (सामर्थ्यानें) अल्प [व] तूं जेंवि नदीन (सागर) [तेंवि] बळें अनल्प (भारी) [आहेस]. ९. मत्स्यदेशाच्या राजाला (पक्षीं) माशाला. १०. कल्पवृक्षाचा. ११. झुबका. (पुष्पगुच्छ). १२. घर ('निलय' शब्द पुल्लिंगीं आहे). १३. चिंतेला. १४. स्थान, जागा. १५. उत्तम कल्याणाला. १६. पाठवी. १७. गाई धरणें. १८. सुशर्मा नांवाच्या नृपा.

आपण सकर्ण सानुज, जीत गुरु[1], द्रौणि[2], शांतनव[3], कृप, ती
सर्वाप्तशूरपूर्णा सेना घेवूनियां निघे नृपती. ३५
संपूर्ण पांडवांचा जुगता अज्ञातवास सरला जों,
लागे विराटनगरा जों प्रविकासोन्मुखाब्जसर[4] लाजों, ३६
सेनानी[5] कीचकसा जों ये चित्तास कंक[6] राज्याच्या,
श्रीरामाच्या तैशा बहु मान्या रीति शंकरा ज्याच्यां[7], ३७
इतुक्यांत तो सुशर्मा दंडाहतपन्नगोग्र[8] हानी च
व्हाया स्वकीर्तिची, करि धावोनि विराटगोग्रहा नीच. ३८
परिसे त्रिगर्तपतिकृतगोग्रहण विराट गोपवदनाहीं[9],
रदनाहीं[10] अधरातें[11] चावे; रिपुसम असह्य गद[12] नाहीं. ३९
न रणा भ्याला, ल्याला क्रोधानळतप्तकाय[13] तो कवच,
प्रिय ही जीवित वीरां[14]; धीरा भुलवील काय तोकवच[15]? ४०
देवुनि रथादि घेता झाला कंकादिकां हि चवघांस[16];
वीर स्वशक्ति चतुरा कळविति, गंधे चि जेंवि चव घांस. ४१
ते गांठिले त्रिगर्त द्युमणिविरामीं[17] च मत्स्यसेनाहीं[18],
केले भट सुभटांहीं, प्रबळांहीं अबळ मत्स्यसे[19], नाहीं[20]. ४२
उग्र, परि सुखद, शिवसा सुकवींस न वर्ण्य काय संगर[21] तो?
कीं जो म्हणे, 'सकळ जन पावुनि सुरयुवतिकायसंग[22] रतो[23].'

---

१. द्रोण. २. अश्वत्थामा. ३. भीष्म. ४. उमलूं लागलीं आहेत कमळें ज्यांतील असें सरोवर. ५. सेनापति. ६. कंकरूपी धर्मराज. ७. ज्या कंकाच्या. ८. काठीनें मारलेल्या सर्पाप्रमाणें चवताळलेला. ९. गवळ्यांच्या तोंडून. १०. दांतानीं. ११. ओंठाला. १२. रोग. १३. क्रोधाग्नीनें तापलें आहे शरीर ज्याचें तो विराट. १४. [अंगावर कवच चढविण्याचें कारण] वीरां ही जीवित (स्वप्राण) प्रिय [असतें]. १५. बालकाचें भाषण. १६. अर्जुनेतर पांडवांस. १७. सूर्यास्तसमयीं. १८. विराटाच्या सेनानीं. १९. माशासारखे. २०. नाहींसे केले. २१. संग्राम. २२. अप्सरांचा शरीरसमागम. २३. रममाण होवो. (संग्रामीं मरण आलेल्या वीरांना स्वर्गीं अप्सरांचा समागम घडतो, ह्या शास्त्रमताबर येथें कवीचें लक्ष्य आहे).

करिते जाले दारुण रण ते दोघे हि सिंहसम राजे;
पाहति कौतुक, तेथें उरले होते करूनि समरा जे. ४४
धरिला विराट लाजे, वरि न करी कंधरा[1] त्रिगर्तांत;
नेणे कर्तव्य, जसा पडला अतिअंधरात्रिं[2] गर्तांत. ४५
धर्मा न सोसवे, जें धरि गोरक्षणपरा[3] सुशर्मा, तें,
कीं सासु[4] हि दुःखातें पावे भंगें, परासु शर्मातें. ४६
धर्म म्हणे, 'भीमा! हूं, हो व्यसनाब्धींत[5] नाव गा! त्यातें;
भलत्यातें हि नुपेक्षी बुध, हरिचें जेंवि नाव गात्यातें[6]. ४७
मां[7] अन्नद आश्रयद व्यसनीं जो केंवि तो न सेव्य जना?
पाळकतापहरत्वें[8] मान जडां[9] अन्यथा नसे व्यजना[10]. ४८
त्या भीमें[11] द्विजें[12] तो, त्वां रक्षावा हा हि अंतकाऽननगें[13];
चाप[14] चि हो पात्र यशा, दुष्टांच्या मूर्त अंतका! न नग.' ४९
भीम म्हणे, 'हो! त्याचा लेखा[15] आम्हांसि कायसा? राया!
सिद्ध समस्त हि आहों युष्मत्कार्यार्थ[16] कार्य[17] सारायां[18].' ५०
ऐसें वदोनि धांवे, अरिवरि गेले न रामबाण तसे;
साधुमनांत गुरुकथित[19] हरिनाम तसें चि काम[20] बाणतसे. ५१
क्षुद्र विलंघील कसा त्या पौरवसत्तमा[21]? कडा हो! तो

---

१. मान. २. अतिशय अंधाऱ्या रात्रीं. ३. रक्षण करण्याविषयीं तत्पर अशा विराटाला. ४. वीर जीवंत राहिला तरी पराभवामुळें दुःख पावतो; मेलेला [मात्र] सुख पावतो. ५. संकटसमुद्रांत. ६. गाणाराला. ७. तर मग ८. पालन करणाराचें दुःख निवारण करीत असल्यामुळें. ९. अचेतना. १०. पंख्याला. ११. शंकरानें. १२. मार्कंडेय. १३. मृत्युमुखांत गेलेला. १४. धनुष्य च यशाला पात्र हो; नग (वृक्ष) न हो. (धर्माच्या बोलण्याचा आशय असा कीं, तूं आपल्या नेहमींच्या रीतीस अनुसरून वृक्षपाषाणादिकानीं युद्ध न करितां धनुष्यानें कर. कारण, तसें न केलेंस तर अज्ञातवास संपण्यापूर्वीं च तूं भीम म्हणून ओळखला जाशील). १५. पर्वा, किंमत. १६. तुमच्या कार्यासाठीं. १७. देह. १८. वेंचण्याला. १९. गुरूनें उपदेशिलेलें. २०. [गुरुकथित] कार्य. २१. भीमाला.

हेमाद्रिचा न हरिस हि लंघ्य, कसा मत्त माकडा होतो? ५२
गांठी भीम, जसा अहिपति हरितां सुप्रभा[1] वैरमणीला[2],
टपतो सुकीर्तिला बहुतर, तेंवि न सुप्रभाव[3] रमणीला. ५३
झाला भग्न सुशर्मा[4], हरिसीं पडतां चि गांठि सिंधुरसा[5],
रस मिसळोनि स्वबळें जिंकीसा कवण लवणसिंधुरसा[6]? ५४
अरि धरिला, असतां ही असि[7], शक्ति[8], धनुष्य, पूर्णशरभाते[9].
खरतर[10] हि नखर[11] हरिचे, करितिल समरांत काय शरभा[12] ते? ५५
उग्रा त्रिगर्तपाळा[13] व्याळा[14] तो वीरवर[14]सुपर्ण कुटी;
दे[15] तापतापसाला करुनि तयाची तनू सुपर्णकुटी. ५६
भीमें धर्मापासीं ओढित नेला, धरूनि शेंडि, खळ,
झाला सुमृदु विराला; उदकीं केवळ विरे जसें डिखळ. ५७
सुटला गरुडें धरिल्या श्येनापासूनि काय तो लावा?
कीं शरभधृतमृगेश्वरमुक्तेभासीं[16] च राय[17] तोलावा. ५८
भासे तो शंभुपुढें स्मर[18], यूपाजवळ[19] कांपता पशु कीं,
धर्मी भूतदयेस्तव उठले जैसे चि कांप, ताप शुकीं[20]. ५९

---

१. चांगल्या तेजस्वी. २. श्रेष्ठ रत्नाला. ३. पराक्रमी पुरुष. ४. पराभूत. ५. हत्तीसारखा. ६. क्षारसमुद्राच्या पाण्याला. (समुद्रांत मिसळून जाऊन कोणता रस आपल्या गुणानें त्याचा खारटपणा घालवूं शकेल)? ७. खड्ग, तरवार. ८. आयुधविशेष. ९. पूर्ण आहेत शर ज्यांत असे भाते. १०. अत्यंत तीक्ष्ण. ११. नखें. १२. हा सिंहाला हि मारणारा एक प्राणी आहे, व ह्याच्या एकंदर आठ पायांपैकीं चार पाय व नेत्र वरच्या बाजूकडे असतात असें ह्याचें वर्णन आहे. १३. त्रिगर्तदेशाचा राजा (सुशर्मा) हा च सर्प, त्याला. १४. वीरश्रेष्ठ (भीम) हा च गरुड. १५. तो भीम तापरूपी तपस्व्याला [राहण्यासाठीं] त्या सुशर्म्याची तनु [ही च] उत्तम पर्णशाला करुनि दे. १६. शरभानें धरलेल्या सिंहापासून सुटलेल्या हत्तीबरोबर. १७. विराट. १८. मदन. १९. यज्ञांतील पशुवधस्तंभाजवळ. २०. शुकाचार्यांचे ठिकाणीं.

भीम म्हणे, 'उघडें[1] दिसे हें चि खरें काय? जी! वदा नातें.'
धर्म म्हणे, 'हा याचक, तूं दे[2]ता [3]कायजीवदानातें. ६०
जोंवरि नसे कवळिला, तोंवरि मं[4]डूक दापितो भुजगा,
जो स्पर्शिला रणीं त्वां, न धरी कंडू कदापि तो भुज, गा! ६१
हा वीरश्रीस करस्थि[5]त अनुचित, भारती[6]स वा[7]यससा,
सोड, वधावा सिंहें केला अपराध म्हणुनि काय ससा?' ६२
भीम म्हणे, "'मीं तुमचा दास,' असें स्पष्ट बोल पापा! हूं."
धर्म म्हणे, 'जावूं दे, न शकें मीं या धृ[8]तत्रपा पाहूं.' ६३
'नमन पुरे, रे[9]! जा, रे! ध्याव्या, गाव्या, दिसोत गाईशीं[10]
शिवमूर्ति, कि रे! यांचें लंघन सोसेल काय गा! ईशा?' ६४
अभय दिलें, तन्हि काढी, नमुनि विराटा, निका[11]मं नीच पळे.
बोधीं[12] बाहेरि निकों[13] होय, परि नव्हे निका मनीं, चं[14]पळ. ६५
[15]यश सोडवूनि वसविति, पावुनि विजयोत्सवा, [16]रणाजिर तें;
अभिमान हरिसि ज्याचा, कैसें त[17]द्वस्तु वारणीं[18] जिरतें? ६६
पांडुसुतांतें पूजुनि, मत्स्यपति म्हणे, 'दिली तुम्हां मं[19]हि म्यां
हे काय [20]प्रत्युपकृति? गाइन तुमच्या चि नित्य या महिम्या. ६७
कंका! हो राजा, हे ब[21]ल्लवमुख सचिवरा[22]य होवूत;
तुमचें यश शुचि, याहुनि [23]दुग्धाधिचा अधिक काय हो! वूत? ६८

---

१. तो सुशर्मा वध्य व मी त्याचा वधिता असें ह्याचें माझें नातें उघड दिसे हें चि खरें काय, तें जी! मला सांगा. २. देणारा, दाता. ३. सशरीरप्राणदानाला. ४. बेडूक. ५. हातांत असलेला. ६. सरस्वतीला. ७. कावळ्याप्रमाणें. ८. सलज्जास. ९. रे सुशर्म्या! १०. बाहेरून गाईशा दिसल्या तरी त्या गाई प्रत्यक्ष शिवाच्या मूर्ति होत. ११. अत्यंत. १२. उपदेश करीत असतांना. १३. शुद्ध. १४. कुत्सित. १५. गोधनरूप यश. १६. रणभूमि. (पांडव मुख्य रणभूमींत च रात्रभर निश्चितपणें राहिले, असें मूळांत आहे). १७. तें वस्तु. १८. हत्तीला. १९. पृथ्वी. २०. उपकाराची फेड. २१. बल्लव (भीम) आदिकरून. २२. मुख्य मुख्य प्रधान. २३. क्षीरसमुद्राचा. पाठांतर–**दुग्धाचा–पं. प्र.**

हे क्षिति किति? योग्य तुम्हीं भोगाया सार्वभौमपदवीतें,
ऐशा [1]सुयशस्तीर्था ज्यां तुमचें [2]सत्वविष्णुपद [3]वीतें.' ६९
कंक म्हणे, 'आम्हांला राज्यादिक सर्व पावलें, नृपते!
[4]ज्यां करद स्खलनीं जे, त्यांचीं नमिताति पावलें नृप ते. ७०
[5]स्वाश्रयभजन स्वभजन, न परार्थ, स्वार्थ यत्न, हा राज्या!
त्या आपुल्या चि, केल्या सत्कृति [6]चिंताख्यरत्नहारा ज्या. ७१
आधीं निजविजय पुरीं चार प्रेषूनि शीघ्र कळवावा,
नरसिंहा! क्षिप्र [7]सुहृद्धृदयसरोगाधिनाग पळवावा.' ७२
राय म्हणे, 'चर हो! जा, [8]चिंतातटिनींत तें न पुर वाहो,
सांगोनि विजय [9]निजजनकर्णसुधापानकाम पुरवा, हो! ७३
नगर अलंकृत करवा, [10]अमरीकृतपुष्पवृष्टिला ज्यांची
शोभा [11]विपक्ष ऐसी, [12]स्त्रीनिकरें करूत वृष्टि [13]लाज्यांची.' ७४
कथिलें पुरासि धांवत जाउनि तें विजयवृत्त हेरजनीं.
पुरजन म्हणती, 'चिंता सरली, परि कसि सरेल हे [14]रजनी?'

---

१. उत्तम यशरूपी तीर्थाला. २. सत्वगुणरूप विष्णूचे चरण. ३. उत्पन्न करितें. ४. अन्वयार्थ–ज्यां (ज्या लोकांना) स्खलनीं (अवनतकाळीं) जे नृप करद (हातभार लावणारे) [होतात] त्यांचीं पावलें ते [लोक] नमिताति. ५. आपल्या आश्रयदात्याची सेवा ही स्वतांची च सेवा होय. ६. चिंतानामक मणिहाराच्या रक्षणासाठीं कर्त्यानें केलेले पराक्रम हे स्वतांसाठीं च केलेले असतात; चिंतामणिहाराचें त्यांत कांहीं हित असतें म्हणून तो तें करित नाहीं, असा भावार्थ ७. मित्रांचें अंतःकरण हें च सरोवर, त्यांत शिरणारा चिंतारूपी गज. ८. चिंतारूपी नदी. ९. आपल्या लोकांच्या कानांची [विजयवार्ताश्रवणरूप] अमृतपान करण्याची इच्छा. १०. अप्सरानीं केलेल्या पुष्पवृष्टीला. ११. प्रतिस्पर्धी. (सवतीसारखी). १२. स्त्रीगण. १३. लाह्यांची. १४. रात्र. (रात्र सरून आपण विजयोत्सव केव्हां करूं असें नागरिकांस झालें).

अध्याय तिसरा[1].

[2]मत्स्यपुरोत्तरभागीं प्रातःकाळीं च ये सुयोधन, हो !
[3]ज्यांसि जयप्राप्ति, मनीं म्हणती भीष्मादि ही [4]सुयोध, न हो. १
सहसा [5]व्रजांत गांठुनि, बहु ताडुनि करुनि [6]बद्धभुज गवळी,
[7]षष्टिसहस्र [8]सुगोधन तो [9]कुरुकुळचंदनद्रुभुजग वळी. २
[10]गोपाध्यक्ष रथावरि बैसुनि धांवे नृपासि सांगाया,
चित्तीं म्हणे, 'बुडाया [11]कुर्वधमां ! हरिसि धेनु कां गा ! या?' ३
तो राजगृहीं जावुनि रायाच्या [12]उत्तराख्यतनयातें
नमुनि म्हणे, 'हो ! नेतो दुर्योधन धेनु करुनि [13]अनयातें. ४
गोधन षष्टिसहस्र, व्रज ओस करूनि, नेतसे [14]कुटिल,
लुटिल प्रजा हि; जो गोपीडक, तो ब्राह्मणां न कां कुटिल ? ५
[15]कवची धन्वी खड्गी व्हा, चित्तीं रामचंद्र हि असा ध्या,
बैसा रथीं, जयश्री [16]गोविप्रावनपरासि न असाध्या.' ६
उत्तर म्हणे, 'असें जरि मीं एकाकी लहान, परि [17]स्वतें
यश जोडितों चि असता सारथि तरि, कथन मज न [18]परिसवतें.
होता परम निपुण, परि त्या [19]ख्यात रणांत सारथि गळाला,

---

१. ह्या अध्यायास 'उत्तरगोग्रहण' (विराटनगरीच्या उत्तरेकडील गाईंचें हरण) असें म्हणतात. २. विराटनगरीच्या उत्तरेकडील बाजूला. ३. ज्या दुर्योधनाला. ४. चांगले योद्धे. ५. गोठ्यांत. ६. बांधले आहेत हात ज्यांचे असे. ७. साठ हजार. ८. उत्तम गाई हें च धन. ९. कौरवांचा वंश हा च चंदनवृक्ष, त्यावरील सर्प. १०. गवळ्यांवरील मुख्य अधिकारी. ११. कुरुकुळांतील नीचा ! १२. उत्तरनामक मुलाला. १३. अन्यायातें. १४. दुष्ट, वक्रगामी. १५. चिलखत, धनुष्य व तरवार धारण करणारे असे व्हा व अशा च वेषांत असलेल्या श्रीरामाचें स्मरण करा. १६. गोब्राह्मणांचें रक्षण करण्यांत तत्पर असलेल्यास. १७. स्वतंत्र. १८. ऐकवतें. १९. प्रसिद्ध. ("पूर्वी अठ्ठावीस दिवसपर्यंत किंवा वास्तविकपणें एक महिनाभर जें युद्ध झालें त्यांत माझा सारथि पडला," असें मूळांत आहे).

झांको छिद्र[1] भलतसा; अडले म्हणतात ‘सार[2]’ थिगळाला[3]. ८
कर्णादिकांसि देता समरीं वैराटिकेसरी[4] करिता[5],
जिष्णुपुढें[6] असुरजनीं कोण्हीं वैरा टिके सरी[7] करिता? ९
मिळवा कोण्ही तरि, हो! धैर्याचा मात्र उदधि सारथि जो,
कुरुभटसमूह[8] पावुनि मज, जेंवि हिमासि[9] सुदधिसार[10] ‘[11]थिजो’
ऐसे बहुत चि बोले तो बालिश[12] बोल बायकांमाजि.
चित्रपटकटकसें[13] शिशुभाषण येईल काय कामा? जि! ११
तें परिसुनि एकांतीं पार्थ म्हणे, ‘देवि! कृष्णसखि[14]! जावें
उत्तरसारथि होवुनि म्यां, त्वां मजवरि कदापि न खिजावें[15].’ १२
कृष्णा म्हणे, ‘बहु बरें, व्हा मारुत[16], हो पलाल[17] खळबळ[18] तें;
मद्धृदय न अरिसैन्यें, तुमच्या दैन्यें चि फार खळबळतें[19]. १३
त्या उत्तरासि सांगे[20], ‘सारथ्य बृहन्नडा करिल; यातें[21]
सूत[22] करुनि, विजयानें नेले बहु खांडवीं[23] अरि लयातें. १४
सारथ्यगीतनृत्यप्राप्तीचा हेतु[24] जिष्णुसहवास[25];
पूर्णत्वाचा लागे पशुपां[26], भ्रमतां हि विष्णुसह[27], वास. १५
भगिनीमुखें[28] चि विनवा तन्मतिला उत्तरा चि वळवील,

---

१. न्यून. २. योग्य, उत्तम. ३. ठिगळाला. ४. विराटपुत्र (उत्तर) हा च सिंह. ५. गजता. ६. इंद्रापुढें. ७. बरोबरी—**पं. प्र.** ८. कौरवांकडील योद्ध्यांचा समुदाय. ९. बर्फाला. १०. उत्तम दह्याचें सार=तूप. ११. घट्ट होवो (पक्षीं) किंकर्तव्यतामूढ होवो. १२. मूर्खपणाचे. १३. चित्रपटांतील सैन्याप्रमाणें. १४. हे द्रौपदि! [बृहन्नडा हा पूर्वीं अर्जुनाचा सारथि होता, तो तुझें सारथ्य करील, असें तूं उत्तराला जाऊन सांग]. १५. चिडावें. १६. वायु. १७. केरकसपट, पांचोळा. १८. दुष्टांचें (कौरवांचें) सैन्य. १९. क्षुब्ध होतें. २०. द्रौपदी सांगे. २१. या बृहन्नडेला. (बृहन्नडा हा शब्द पुल्लिंगी हि योजतात). २२. सारथि. २३. खांडववनदाहप्रसंगीं. २४. कारण. २५. अर्जुनाचा सहवास. २६. गोपांना. २७. कृष्णासह. २८. उत्तरेच्या तोंडून.

अतिसहवासिवच[१] मना, कतकें[२] कलुषितां[३] वनां[४] निवळवील.'
उत्तर म्हणे, 'कुरुकटक न पशूंस, यशास हि, स्वसे[५]! नेतें,
अवकाश पळ हि नाहीं कळवाया वृत्त हें स्वसेनेतें. १७
माजें सारथ्य करो तुजिया वचनें बृहन्नडा, गमला
हा चि सदुपाय, वत्से! लागो अपकीर्तिचा न डाग मला.' १८
ती धांवत जाय, म्हणे, 'गानादिक हें बृहन्नडे! राहो,
समयीं सारथ्यगुण न उघडूनि कदर्युचा[६] न डेरा हो. १९
गोधन षष्टिसहस्र स्वपुरा नेताति हरुनि कौरव हो!
गौरव[७] हो न बुधजनीं, त्या मेल्यांला अनंत रौरव[८] हो[९]. २०
त्यांवरि जातो उत्तर, त्याचें सारथ्य ये करायास,
सुखद इहामुत्र[१०] हि गोविप्रत्राणोत्थ[११] जे[१२] करायास[१३]. २१
देता जाला पूर्वीं तुज निजसारथ्य सव्यसाची, हो!
सैरंध्रीची वाणी, व्हाया गोवत्सभव्य[१४], साची हो.' २२
उठल्या उत्साहाच्या त्या शांतश्रीमदुदधिवरि[१५] लहरी;
धरितां हनु[१६], 'ननु' म्हणतां, प्रणतांचें कां न सुदधि वरिल हरी?

---

१. अतिपरिचित मनुष्याचें भाषण. २. निवळीचें बीं. ३. गढुळ अशा. ४. पाण्याला. ५. हे भगिनि! ६. कृपण मनुष्याचा. (" कृपणानें डेऱ्यांत पुरून ठेविलेलें द्रव्य कधीं च कोणाच्या उपयोगीं न पडल्यामुळें व्यर्थ होय; तसा तुझा सारथ्यगुण समयीं प्रकट न होईल तर व्यर्थ होय, असें तात्पर्य "–नवनीत). ७. चांगल्या लोकांत त्याची कीर्ति होऊं नये. ८. रौरवनरक. ९. [प्राप्त] होवो. १०. इहपरलोकीं सुद्धां. ११. गोब्राह्मणांचें रक्षण करण्यापासून उत्पन्न झालेले. १२. पाठांतर–**ये–चा. प्र.** (यमकासाठीं ब व, ड ल, र ल, ज य, ख ष, यांत अभेद मानावा, असा नियम आहे). १३. हाताचे श्रम. १४. वासरांचें कल्याण. १५. गंभीर व शोभायमान अशा [अर्जुनरूपी] समुद्रावर. १६. अन्वयार्थ–हनु (हनवटी) धरितां [आणि] ननु (घ्या हो महाराज!) म्हणतां प्रणतांचें (शरणागतांचें–गोपींचें) सुदधि (चांगलें दहीं) हरि कां न वरील? (त्याचप्रमाणें, त्या युद्धप्रिय अर्जुनाला, कौरवांशीं युद्ध करितांना आपल्या भावाचें सारथ्य करण्याची उत्तरेची विनवणी कशी मान्य होणार नाहीं, असा भावार्थ).

देवातें भक्ति तसी पार्थातें ने करूनियां वश, हो !
त्याच्या हि मनीं होतें कीं विश्वामाजि आपुलें यश हो. २४
उत्तर म्हणे, 'बहु बरें, देवुनि वचनास मान आलीस;'
बोले बृहन्नडा स्मितपूर्वक, 'विटवील कोण आलीस? २५
वाद्य असो, नृत्य असो, हो [1]अभिनय, [2]किमपि गान अथवा हो,
[3]जाणोनि कसें म्हणतां समरांत बृहन्नडा चि रथ वाहो?' २६
वैराटि म्हणे, 'नर्तन[4] [5]हो, कीं [6]वादक तथैव [7]गायन हो,
सारथि हो या समयीं, एक हि वश कौरवांसि गाय न हो.' २७
ऐसें वदे, कवच दे त्या [8]श्रितकुशलावहास [9]ल्यायाला,
तद्धारणीं चुके तों [10]कन्यां पाहोनि हांसल्या याला. २८
[11]ज्याचें [12]किरातरूपिप्रभुधिक्कृतिगर्भ गाय [13]नाक वच,
हांसे आपण हि, म्हणे, 'ठावें मज काय गायना कवच?' २९
लेवविलें राजसुतें, जाणों ल्याला कधीं न तो कवच,
सच्चरित [14]अप्रगल्भ हि [15]हृदयहर जसें [16]स्वधीन तोकवच. ३०
होउनि सिद्ध रथावरि चढतां चि, [17]सहोत्तरा तिच्या आली
म्हणती, 'बृहन्नडे ! तुज वीरश्री गौरवावया आली. ३१
[18]दिव्यरुचिरवस्त्रांतें आण करायासि बाहुल्या, कटकें

---

१. हावभाव. २. कसलें हि. ३. [वाद्याभिनयनृत्यगानादि कर म्हणाल तर मी करूं शकेन; युद्धांत सारथ्य करणें हें कांहीं माझें काम नव्हे हें] जाणत असून हि. ४. नाचणारा. ५. ऐस. ६. वाजविणारा. ७. गाणारा. ८. आश्रितांना कल्याणकारक अशा (अर्जुनाला). ९. धारण करण्याला. (अंगांत घालण्याला). १०. उत्तरा आदिकरून मुली. ११. ज्या अर्जुनाचें. १२. किरातवेषधारी शंकराविषयींचा धिक्कार ज्याच्या पोटीं आहे असें वचन. १३. स्वर्ग. (तेथील सिद्ध, गंधर्व वगैरे). १४. अप्रौढ देखील. १५. मनोहर. १६. सुतरामधीनं लालनानुकूलं यत्तोकं तस्य भाषणं तथेति—**चा. प्र.** लाडानें अत्यंत अनुकूल झालेल्या बालकाच्या भाषणाप्रमाणें. १७. उत्तरेसह. १८. बहुमोल व सुंदर अशा वस्त्रांतें.

जिंकुनि अरिचीं तूं [1]हीं; बहु शोभाया स्वबाहु, ल्या [2]कटकें.'
'उत्तर आणिल तें तें, जें निर्माया सुबाहुल्या लागे,
मज कवच लेववुनि, [3]हा आपण चि पहा सुबाहु ल्याला, [4]गे!'
ऐसें बोलुनि हाकी उत्तररथरत्न [5]कृष्णसारथि तें,
सांगे स्वदास्य सिंहा, हरवाया तेज, [6]कृष्णसार थितें[7]. ३४
म्हणति स्त्रिया प्रयाणीं, 'तुजला मंगळ बृहन्नडे! हो तें,
जें खांडववनदाहीं नरसारथ्यांत[8] जाहलें होतें.' ३५
द्विज म्हणति 'या यशस्वी होउनि; जयदायि आज्यंजिर[9] तें हो.
खळबळ सदाश्रितजनीं[10], दहनीं[11] पुष्कळ हि आज्य[12], जिरतें, हो!'
सत्वर बृहन्नडा नृपसुतरथ नेवूनि जाय बाहेर,
त्यासि म्हणे, "'हेरावें[13]' म्हणसी 'कुरुकटक काय?' बा! हेर."
आपण चित्तांत म्हणे, 'मेळवितों आजि, नीच हो! यश मीं,
शिवमूर्तिसी श्मशानीं अस्मज्जयहेतु[14] ती च होय शमी[15].' ३८
कुरुकटकासि पहातां तो उत्तर बाळ फार गडबडला,
स्वपरबळाबळ[16] नेणुनि बालिश बहु बायकांत बडबडला. ३९
बोले, 'बृहन्नडे! हें कुरुबळ कल्पांतसिंधुसें[17] गमतें,
ने रथ पुरांत, माजें मन नयन हि पाहतां बहु भ्रमतें[18]. ४०
दुर्योधन, दुःशासन, कर्ण, कृप, द्रोण, भीष्म ज्या कटकीं

---

१. हीं अरिचीं (कौरवांचीं) कटकें (सैन्यें). २. करभूषणें, कडीं. ३. हा सुबाहु (वीर) उत्तर. ४. गे उत्तरे! ५. कृष्ण आहे सारथी ज्याचा तो (अर्जुन). ६. हरिण. (काळविट). ७. [आपल्याजवळील] अल्पस्वल्प तेज. ८. अर्जुनाचें सारथ्य करण्यांत. ९. आजि+अजिर=रणांगण. १०. सज्जनांच्या आश्रित लोकांच्या ठिकाणीं. ११. अग्नीमध्यें. १२. तूप. १३. न्याहाळून पहावें. १४. आमच्या जयाला कारण. १५. या च शमीवृक्षावर पांडवानीं वनवास संपवून अज्ञातवासास आरंभ करितांना आपलीं आयुधें ठेविलीं होतीं. १६. आपलें तसें च प्रतिपक्ष्याचें सामर्थ्य व असामर्थ्य. १७. प्रलयकालीन समुद्रासारखें. १८. भ्रांति पावतें.

त्यांत मरेन चि शिरतां, कांट्यांवरि घालितां [1]चिरे [2]पट कीं.
एकाकी मीं, रिपु बहु, या ऐशा कीर्ति काय हो! मरणीं?
[3]पश्वर्थें केंवि करूं [4]सर्वपुमर्थदसुकायहोम रणीं? ४२
आज्ञा नसतां आलों, रागें न भरेल काय हो! तात?
रोमांच [5]घर्म [6]कंप प्रकट, व्यापूनि काय, होतात.' ४३
पार्थ म्हणे, "राजसुता! आतां वदतोसि हें अहा! काय?
शय्येवरि न पडाया योग्य, रणक्षितिवरी च, [7]हा काय. ४४
तेव्हां स्त्रियांत तैसें बोलुनि, आतां असें कसें वदसी?
एक हि बाण न सुटला, नाहीं अद्यापि झळकला [8]सदसी. ४५
गोमुक्त्यर्थ न शिरतां धैर्यें या [9]वीरनायकानीकीं,
करिजेल हास्य, [10]आस्य प्रेक्षुनि, नगरांत बायकानीं कीं. ४६
देउनि सारथ्य मला घेउनि आलासि काय उत्साहें?
नेणसि काय, पलायन करितां, लोकांत होय [11]कुत्सा, हें? ४७
निज[12]वृत्तिरसीं लोभी हो, साधो! बुद्धि अन्यथा न करीं.
निजहितलोभें धरितो शिशु हि मुखीं एक, अन्य थान करीं.
सैरंध्रीनें कथिलें माजें [13]सारथ्यनिपुणपण साचें,
टाकिति न बाह्यरंगें फळ नीरस म्हणुनि निपुण [14]पणसाचें. ४९
मीं भांडेन, स्थिर हो, तुज हि मज हि [15]विहितें आजि न परतणें;
हरितील न गाईंतें, भीतिल, करितील [16]आजि न [17]परतणें. ५०
मरती च, न दाखविती, पाखुल हि पळोनि, तोंड लेंक [18]विस्यां,

---

१. फाटे. २. वस्त्र. ३. जनावरांसाठीं. ४. धर्मार्थकाममोक्षादि चारी पुरुषार्थ देणारें जें चांगलें शरीर, त्याचा नाश. ५. शाहरे. ६. घाम. ७. हा क्षत्रियाचा देह. ८. उत्तम तरवार. ९. वीरश्रेष्ठांच्या सैन्यांत. १०. मुख. ११. निंदा. १२. युद्धकर्म ह्या क्षात्रधर्मरूपी रसाचे ठायीं. १३. सारथ्यकर्मांतील नैपुण्य. १४. फणसाचें. १५. योग्य. १६. युद्ध. १७. शत्रुरूप तृणें (गवतें). १८. पिल्याला.

म्हणती '[1]सद्यः कीर्तिप्रज्ञाघ्नस्पर्श तोंडलें' [2]कवि त्या. ५१
कज्जळ कस करूं, जें सैरंध्रीकृत [3]दुधासम स्तवन?
सन्मन [4]अनृता भीतें, जेंवि [5]कुठारायुधा समस्त वन. ५२
ती या मुखीं न येतां, यावी सुयशेंकरूनि [6]सुखमा जी,
दावाया सैरंध्रिप्रति हे मति वरिल केंवि मुख माजी? ५३
चाल, उगा चि अपयशें न तुजें मुखचंद्रमंडल मळावें,
होतां [7]बळाब्धिपारद, [8]पारदतुल्य न तुवां [9]डळमळावें." ५४
ऐसें पार्थ वदे तों भिवुनि [10]कटकबागुलासि पोर पळे,
[11]शत्रुप्रतापदावज्वाळानीं तो [12]कुरंग होरपळे. ५५
पार्थ म्हणे, "[13]प्रभुपासीं वर हा घे, हें चि [14]याचितों, [15]डमरो!
'बोलेल बहु निरर्थक, तो स्वजनीं दावितां चि तोंड मरो.'" ५६
[16]त्यांस हि म्हणे, 'अरे! [17]रथगिरिशिखरच्युत [18]महोपळ! [19]उभारे,
आली तुला वराया कीर्ति, [20]पराङ्मुख न हो, [21]पळ उभा रे!
[22]हरिनीळहार कृष्णव्याळ नव्हे, स्वभ्रमें पळविलास;
वरितां अकीर्ति, न रुचे रंभेसीं [23]हरिसें ही पळ विलास.' ५८

---

१. तत्काल कीर्तिरूप बुद्धीचा नाश करणारा आहे स्पर्श ज्याचा असें. (तोंडल्यांच्या सेवनानें बुद्धिमांद्य येतें अशी समजूत आहे). २. शहाणे लोक. ३. दुधासारखें शुभ्र असें. ४. असत्याला किंवा असत्यवाद्याला. ५. कुऱ्हाड आहे शस्त्र ज्याचें त्याला, किंवा कुऱ्हाड हें च शस्त्र त्याला. ६. सुषमा=कांती—**चा. प्र.** ७. सेनासमुद्रांतून पार नेणारा. ८. पाऱ्यासारखें. ९. अस्थिर, चंचल व्हावें. १०. सैन्यरूपी बागुलबोवास. ११. शत्रुप्रतापरूपी वणव्याच्या ज्वालांनीं. १२. हरिण. (उत्तर). १३. शंकरापाशीं. १४. [मागणें] मागतों. १५. हे डमरुनामक वाद्या! (हें शंकराच्या हातांतील वाद्य आहे). १६. उत्तराला. १७. रथरूपी पर्वताच्या शिखरावरून पडलेल्या. १८. मोठ्या दगडा! १९. चढ. २०. पाठमोरा. २१. पळभर. २२. [तुला वरण्यासाठीं आलेला हा कीर्तिरूप] इंद्रनीलमण्यांचा हार, [तूं समजत आहेस, पण] कृष्णसर्प नव्हे. २३. इंद्राला सुद्धां.

तो किमपि न दे उत्तर उत्तर, उत्तर दिशेसि सोडूनीं,
जाय पळत [1]दक्षिणादिग्गत नगरीप्रति, अकीर्ति जोडूनीं. ५९
जाय पुरीप्रति, जोडी अपकीर्ति, सुकीर्ति हातिची द्वडी,
मातेप्रति पोर जसें [2]मुद्रा हारवुनि, मेळउनि कवडी. ६०
धांवे पार्थ धराया, कीं त्यास हि अपयशीं न [3]मज्जन हो,
उपदेशी भगवान् कीं, 'असि मज्जनरीति हो, [4]नमज्जन हो!'
[5]सकळा [6]सकळा विद्या [7]श्रुतमात्रा ज्यांसि राहिली पाठ,
[8]अरिनीं [9]कुसंगतिस्तव त्या तैशाची हि पाहिली पाठ. ६२
वाटे, पुढें पळे तो [10]स्त्रीसंगविरक्तधी [11]कुमारमणी,
पुत्रस्नेहें धांवे त्यामागें शंभुची उमा रमणी. ६३
किति हासले विलोकुनि, झाले किति चकित [12]बुद्धनय [13]शस्त्री,
कीं वांछील भगवतीहुनि अन्या, करुनि युद्ध न, यश स्त्री. ६४
कौरव म्हणति, 'नव्हे स्त्री, [14]व्यक्त स्त्रीवेषपुरुष तर्कशतें,
[15]मृदुलप्रकृति [16]स्त्रीवपु, [17]एवंविध धावनीं न कर्कश तें. ६५
[18]सारूप्य अर्जुनाचें, बाहु [19]परिघसे, तसें चि कीं शिर तें;
पय [20]रुंचिकसम, परि रसिकमन काय पयीं तसें चि कीं शिरतें?
हा क्लीब हि समवेषें, क्लीबीं ऐसें परंतु तेज नसे;
वाटति देखावेसे काय पुरुषवेष षंढ ते जनसे? ६७

१. दक्षिणदिशेकडील. २. आंगठी. ३. बुडणें. ४. नमन करणारे भक्तजन हो! ५. कलांसहित. (या एकंदर चौसष्ट आहेत. जिज्ञासूनीं त्यांचीं नांवें भागवत—दशमस्कंध अध्याय ४५, श्लोक ३६ वरील टीकेंत पहावीं.). ६. एकूणएक, सर्व. ७. केवळ ऐकल्यानें. ८. ज्या अर्जुनाला. ९. उत्तरासारख्याच्या वाईट संगतीमुळें. १०. स्त्रीसंगाविषयीं पराङ्मुख झाली आहे बुद्धि ज्याची असा. ११. कार्तिकस्वामी. १२. पाठांतर—**ज्ञातनय—चा. प्र.** (युद्धनीति जाणणारे). १३. शस्त्रधारी. १४. उघड, स्पष्ट. १५. निसर्गतः कोमल असें १६. स्त्रियांचें शरीर. १७. अशा प्रकारें. १८. रूपाचा सारखेपणा. १९. अडसरासारखे. (विशाल). २०. रुईच्या चिकासारखें.

काल त्रिगर्तपतिनें गोग्रह केला, म्हणोनि पृ[1]तनेला
घेउनि विराट गेला, बहुधा तो पितृ[2]वनीं न मृत नेला. ६८
तत्सुत उत्तर होता नगरीं, तो परिसतां चि गोहरणा,
पार्थासि करुनि सारथि आला, जो बाळ सु[3]लभमोह, रणा. ६९
हरिण जसा सिंहीला, सेनेला पाहतां चि तो भ्याला;
सुयशाहुनि जीवित बहु बाळाला, जेंवि वित्त लोभ्याला. ७०
[4]कातर रथी पळाला, या अयशःसागरीं तरायाला
[5]मानी अर्जुन सारथि त्यामागें धावला धरायाला.' ७१
वदति असें कुरु जों, तों [6]पदशत धावोनि कुंत[7]ळीं धरिला;
जाणों [8]अपकीर्तिनदीपतित शिशु बळेंकरूनि उद्धरिला. ७२
स्वमनीं पार्थ म्हणे, "रे ! जरि विहित रडें चि मानितोस, रड;
'मीं प्रभु,' हें [9]अज्ञ पदीं कीं कुंपीं बसुनि मानितो सरड." ७३
उत्तर म्हणे, 'नको, गे ! पायां पडतों बृहन्नडे ! सोड,
जो[10]डें दिली, दुखउ नको; केवळ पितृ[11]करतळस्थ हा[12] फोड.' ७४
जों जों वैराटि रडे, तों तों तो पार्थ सदय, परि [13]सांचा

---

१. सेनेला. २. श्मशानांत. (कौरवांचा तर्क असा कीं, सुशर्म्यांचें व विराटाचें काल जें युद्ध झालें त्यांत विराट मरण पावला; पण त्याला अद्याप श्मशानांत नेले नसल्यामुळें उत्तर आज येथें येऊं शकला). ३. सुलभ आहे मोह (अज्ञान) ज्यास असा (बाळ). ४. भित्रा. ५. अभिमानी. ६. शंभर पावलें. ७. केशांचे ठिकाणीं. ८. अपकीर्तिरूपी नदींत पडलेला. ९. अन्वयार्थ—अज्ञ पदीं (मोठ्या जागीं) बसुनि कीं (किंवा) सरड कुंपीं बसुनि 'मीं प्रभु' हें (असें) मानितो. १०. या ठिकाणीं मूळ भारतांत उत्तर म्हणत आहे कीं, "बृहन्नले ! शुद्ध सुवर्णाचीं शंभर नाणीं, सुवर्णखचित आठ वैदूर्यरत्नें, दहा गज व सुवर्णमंडित रथ मी तुला देईन; पण मला सोड." ११. बापाच्या तळहातावर असलेला. १२. मीं उत्तर. (तळहातावरील फोडाप्रमाणें बाप मला जपतो, असा भावार्थ). १३. खरोखर.

खळसा हांसे, लोहा निंद्य नव्हे [1]ग्रावभाव परिसाचा. ७५
दाटूनि हित कराया तत्केशांतें धरूनि [2]आकर्षी,
बसवी रथीं बळें, हरिभजनीं मंदासि जेंवि [3]नाकर्षी. ७६
कुरवाळूनि म्हणे, 'गा! राजसुता! योग्य तूं न [4]कांपाळा,
मृदुलत्व म्लानत्व स्वीकारुनि, जाहलासि कां पाला? ७७
तुज उत्साह नसे तरि करितों घेवुनि धनूस मीं रण, हो!
[5]मज दहनासि कुरुवनीं जायासि सहाय तूं [6]समीरण हो. ७८
घे [7]रश्मि करीं, सारथि हो, हूं, चालीव आजि हे वाजी,
मीं मथितों [8]कुरुपृतना, करित्ये [9]क्षुब्धाब्धिसीं हि हेवा जी.' ७९
जाय शमीप्रति [10]किंचित्स्वस्थासि रथीं बळें चि वाहूनीं
आलिंगाया समरप्रियसख [11]गांडीवचाप [12]बाहूनीं. ८०
द्रोण म्हणे, 'कौरव हो! काय पहातां रथाकडे चि? रहा;
अद्भुत [13]अश्वाश्रुध्वजकंपाद्युत्पात ही पहा [14]चिरें हा. ८१
परिसा बरें [15]शिवांचें रुदित जरि असे [16]असुस्वर, क्षण हो!
व्यूह रचा, हो! रक्षा गोधन, हें यश, [17]असुस्वरक्षण हो. ८२
न बुडे बळें बुडवितां, उसळे चि जळीं जसा [18]अलाबु, बुळा
दिसतो, तसा चि जपतो स्वयशा, न जपे तसा भला बुबुळा.

---

१. दगडपणा. (लोखंडाला परिसाचा दगडपणा निंद्य नाहीं; कारण, त्यापासून त्याला सुवर्णत्व येतें. तद्वत् अर्जुनाच्या हसण्यानें उत्तराचें कल्याण च व्हावयाचें असल्यामुळें तें हि त्याला अनिंद्य होय). २. ओढी. ३. स्वर्गमुनि नारद. ४. अंगीं कंप सुटण्याला, घाबरण्याला. ५. मूळपाठ–**मज मेघासि कराया शरवृष्टि सहाय तूं समीरण हो.** ६. वायु. ७. लगाम. ८. कौरवांची सेना. ९. खवळलेल्या समुद्राशीं. १०. कांहींशा स्वस्थ झालेल्या उत्तराला. ११. हें अर्जुनाचें धनुष्य. १२. भुजानीं. १३. घोड्याच्या डोळ्यांतून पाणी येणें, ध्वजकंप होणें इत्यादि अशुभ चिन्हें. १४. पुष्कळ वेळपर्यंत. १५. कोल्ह्याचें. १६. बेसुर आवाजाचे. १७. प्राणधनाचें रक्षण. १८. भोंपळा.

राया ! भीष्मा ! सकृदपि[१] या नयना पाहवेल न क्लीबा,
बहुरूप अर्धनारीश्वरसा[२] तद्भक्त[३] हा हि नक्की[४] बा ! ८४
आइकतों कीं, हा कृश केवळ होता तपें, परि भवातें[५]
झाला बहुमत समरीं[६], करिल पराच्या न कां परिभवातें ? ८५
अस्मत्परिभव[७] करितो, आजि नभातें शरव्रजें[८] भरितो,
गोधन हरितो, वरितो कीर्ति, अशनिभृदरिकरिघटाहरि[९] तो.'
कर्ण म्हणे, 'कुरुगुरुजि ! स्तवितां मज यूथपतिपुढें[१०] कलभा[११],
म्हणतां शकलीं बहु रविकांतगिरिपरिस[१२] रविपरिस बल भा.'
भूप म्हणे, 'कर्णा ! हा जरि अर्जुन, देव पावला नवसा;
जाइल पुन्हां वनाला बंधुसह अरण्यवासि मानवसा. ८८
अथवा असेल दिसतो तैसा, तरि परिभवें बुळा लाजो,
मर्कट नुरे चि, झोंबे हनुमत्पाणिस्थिता[१३] गुळाला जो.' ८९
जावुनि शमीनिकट, तो विजय म्हणे, 'स्वस्थ तूं कुमारा ! हो;
पाहुनि मत्कृतखळबळमथन[१४] चकित भगवती उमा[१५] राहो. ९०
मद्भुजबळानिळें[१६] हें ध्वस्त[१७] अहितकटक[१८] अभ्रसारें हो;
परि हीं तुजीं धनुष्यें क्षण हि न टिकतील दभ्रसारें[१९], हो ! ९१

---

१. एकदा सुद्धां. २. अर्धनारीनटेश्वर जो शंकर त्याच्यासारखा. ३. त्या शंकराचा भक्त अर्जुन. ४. नकला करणारा, थट्टेखोर. ५. शंकरातें. ६. किरातरूपी शंकराशीं झालेल्या युद्धांत. ७. आमचा पराभव. ८. बाणसमूहानें. ९. अशनिभृत् (इंद्र), त्याचे शत्रु दैत्य हे च हत्तीचे समुदाय, त्यांना सिंहाप्रमाणें असलेला (अर्जुन). १०. [हत्तींच्या] कळपाचा पुढारी च अशा मजपुढें. ११. बालगजासारखा जो (अर्जुन) त्याला. १२. सूर्यकांतमण्याच्या पर्वतापेक्षां किंवा सूर्यापेक्षां ही [सूर्यकांतमण्याच्या] शकलीं (तुकड्याचे ठिकाणीं) भा (तेज) व बळ अधिक आहे असें तुम्हीं म्हणतां. १३. मारुतीच्या हातांतील. १४. मी केलेलें दुष्ट सैन्याचें मर्दन. १५. पार्वती, भवानी दुर्गादेवी. १६. माझ्या बाहुपराक्रमरूप वायूनें. १७. नष्ट. १८. ढगासारखें शत्रुसैन्य. १९. अल्पबळ—**चा. प्र.** (दभ्र=अल्प+सार=बळ).

आहेत पांडवांचीं दिव्यास्त्रें या शमीद्रुमीं, उतरीं[1];
पाहुनि पळोत त्या हरिनखरांतें[2] सर्व खळबळें[3] कुतरीं.' ९२
उत्तर म्हणे, 'शमीवरि शव[4] आहे ऐकिलें, न शिववे[5] चि;
सांगसि असें कसें? गे! कुणपाचा[6] स्पर्श सर्व शिव[7] वेची[8].'
पार्थ म्हणे, 'कैंचें शव? ठकवुनि बुडवीन काय हो! यश मीं?
त्या शस्त्रांला, असतां शव, आश्रय योग्य काय होय शमी?'
वृक्षीं वेष्टन सोडुनि, नमुनि म्हणे, 'रक्ष, आयुधग्रामा[9]!
आलों शरण तुला मीं, लोक जसा रक्षआयुधग्रामा[10].' ९५
जाणों, सच्छस्त्रें हो! स्वाश्रयपांडवजयार्थ[11] सुतपातें
करितां, व्हाया सद्यश लोकत्रितयांत अंधसुतपातें[12]. ९६
वैराटि चापखड्गाद्यायुधचिन्हें समस्त वाखाणी,
भव[13]भीतिसि कवि, ज्यांच्या करुनि हरिस्तवसम स्तवा, खाणी.
वर्णुनि शस्त्रांसि, पुसे, 'कवणांचीं कवण यांत सांग मला,
त्या पांडवांसि यांचा व्यसनांत त्याग योग्य कां गमला?' ९८
पार्थ म्हणे, 'वैराटे! ज्यावरि शतकनकबिंदु[14] पाहसि, तें
गांडीव, यशें जोडी जेणें विधुहूनि[15] शुभ्रवाह[16] [17]सितें. ९९
ब्रह्मा धरिता जाला गांडीवातें सहस्र[18]मित वर्षें,
धरिला प्रजापतीनें[19] त्र्युत्तरपंचाशदब्द[20] हा हर्षें. १००

१. खाली काढ. २. [पांडवांचीं अस्त्रें हीं च] सिंहाचीं नखें त्यांना. ३. दुष्ट कौरवसैन्यें हीं च कुतरीं. ४. प्रेत. (ह्या शमीवृक्षावर एक प्रेत बांधून ठेविलें आहे असें म्हणतात). ५. [मी क्षत्रियकुलोत्पन्न राजपुत्र व मंत्रयज्ञवेत्ता असल्यामुळें मला त्या प्रेताला] स्पर्श करवत नाहीं. ६. प्रेताचा. ७. कल्याण. ८. नाशी. ९. हे शस्त्रसमूहा! १०. राक्षसांचें आयुष्य जाळणाऱ्या रामाला. ११. आपल्यास आश्रय देणाऱ्या पांडवांच्या विजयासाठीं. १२. दुर्योधनादि धृतराष्ट्रपुत्रांच्या नाशानें. १३. संसारभीतीला. १४. सोन्याचे शंभर ठिपके. १५. चंद्रापेक्षां. १६. शुभ्र आहेत घोडे ज्याचे तो अर्जुन. १७. शुभ्र अशीं (यशें). १८. एक हजार. १९. दक्षप्रजापतीनें. २०. त्रेपन्न वर्षें. (मूळ भारतांत ५०३ वर्षें असें आहे).

मग पंचाशीति[1] समा[2] शक्रें[3], सोमें हि पंचशत अब्द,
वरुणें शत संवत्सर, याणें लागों दिला न दुःशब्द. १०१
आहे पार्थापासीं सार्धद्वात्रिंशदब्द[4] हा चाप;
राहे चरमापत्याजवळि[5] प्रेमार्द्रधी[6] जसा बाप. १०२
जें इंद्रगोपचित्रित[7], तें धर्माचें धनुष्य जाणावें;
ज्यावरि कांचनवारण[8] तें भीमाचें मनांत आणावें. १०३
धरिजे तें त्र्यर्कांकित[9] कार्मुक[10] नकुळें समस्तयोधनुतें[11],
सौवर्णें[12] शलभ[13] ज्यावरि, सहदेवाचें चि होय हो! धनु तें.’ १०४
सांगे असें चि वर्णुनि गुणें[14], तूण[15], कृपाण[16], बाण, जाणाया
तें गांडीवाद्यायुध[17] उतरुनियां आपुलें चि आणाया. १०५
“[18]कोठें बृहन्नडे! [19]ते, ज्यांचे गुण हर्ष नित्य नव देती?
कोठें देवी, जी ‘व्हा भस्म’ असें त्यां खळांसि न वदे, [20]ती?”
पार्थ म्हणे, ‘वैराटे! जो अर्जुन, तो चि मीं, असें जाण;
जो कंक, तो चि राजा धर्म, नव्हे अनृत हें, तुजी आण[21]. १०७
बल्लव भीम, ग्रंथिक तो चि नकुळ, तंतिपाळ सहदेव,
सैरंध्री ती, जीचा कैवारी वृष्णिमूर्तमहदेव[22].’ १०८

---

१. पंचायशी. २. वर्षें. ३. इंद्रानें. ४. साडेबत्तीस वर्षें. [मूळांत ६५ वर्षें असें आहे; परंतु प्रत्येक संवत्सरांत दोन वर्षें (वृष्टिकाल) येतात, या हिशोबानें साडेबत्तीस व पासष्ट यांमध्यें एकवाक्यता च आहे]. ५. सर्वांत लहान मुलाजवळ. ६. प्रेमानें आर्द्र (ओली) आहे बुद्धि ज्याची असा. (दयाळु). ७. अनेकवर्णयुक्त कीटकविशेष; तद्वत् चित्रविचित्र. ८. सुवर्णगज. ९. [सुवर्णाच्या] तीन सूर्यांनीं चिन्हित. १०. धनुष्य. ११. सर्व योद्ध्यानीं स्तुत अशा. १२. सोन्याचे किंवा कृष्णागरुवर्णद्रव्य मीना, त्यानें काढलेले. १३. टोळ. १४. श्रेष्ठपणाचे गुण. १५. भाते. १६. खड्ग, तरवार. १७. गांडीवादिक आयुध. १८. उत्तर अर्जुनास म्हणतो. १९. पांडव. २०. ती द्रौपदी. २१. शपथ. २२. यादवांचा मूर्तिमंत उत्साह च असा श्रीकृष्ण.

वैराटि म्हणे, 'ज्यांतें जाणति, जपती हि पूज्यपाद[1] शमी[2],
सांग बरें, जाणतसें नामें त्या शक्रसूनुचीं[3] दश[4] मीं.' १०९
सांगे, 'अर्जुन, फाल्गुन, जिष्णु, किरीटी,' असीं दहा नावें,
त्यांची निरुक्ति[5] हि करी, कीं तेणें सर्व सत्य मानावें. ११०
दशनामनिरुक्तिप्रति परिसुनि पार्थासि तो करी नमन,
प्रार्थूनि म्हणे, 'समरीं सारथि होवुनि, सुखी करीन मन.'
घेवूनि आयुधांतें उत्तर उतरे, परंतु संदेह
उठला, जेंवि रविपुढें उठती उदयीं च दैत्य मंदेह[6]. ११२
'सत्य चि अर्जुन जरि तूं, कां क्लीब? क्लीबवेष कां धरिला?'
पार्थ म्हणे, "गुर्वाज्ञा[7], म्हणुनि व्रत वर्ष एक आदरिला. ११३
बैस रथीं, तूं माजा सारथि हो, तरणिचा[8] जसा अरुण;
न्यावा चमूवरि[9] तुवां रथ, तरुणीप्रति जसा समरें[10] तरुण. ११४
आतां सोडवितों पशु[11], खळबळ पळ न लगतां चि पळवीतों,
मीं 'विजय' असें तुज चि न, सकळां ही कौरवांसि कळवीतों."
धृतरश्मिकुमार[12] म्हणे, 'दारुक[13] कीं आजि मातली[14] लाजो,
दंड करावा या कुरुसेनेला, योग्य मातलीला[15] जो.' ११६
काढूनि शंखवलयें[16], त्याला पुंभूषणें[17], सितें वस्त्रें,

---

१. पूज्य आहेत चरण ज्यांचे असे. २. शांतिवान् असे ऋषी. ३. इंद्रपुत्र अर्जुनाचीं ४. "अर्जुनः फाल्गुनो जिष्णुः किरीटी श्वेतवाहनः। बीभत्सु विजयः कृष्ण सव्यसाची धनंजयः" हीं तीं नावें होत. ५. व्याख्या, सकारणविवरण. ६. या नांवाचे साडेतीन कोटी राक्षस प्रत्यहीं उदयास्तकाळीं सूर्याचा ग्रास करण्याकरितां उत्पन्न होतात व ब्राह्मणानीं सूर्याला अर्घ्यें देतांना गायत्रीमंत्रानें तयार केलेलें पाणी वज्ररूप होऊन त्यांचा नाश करितें, असें शास्त्रवचन आहे. ७. धर्माची आज्ञा. ८. सूर्याचा. ९. सैन्यावर १०. मदनानें. ११. गाई. १२. धरिल्या आहेत दोऱ्या (लगाम) ज्यानें असा तो कुमार उत्तर. १३. कृष्णसारथि. १४. इंद्रसारथि. १५. उन्मत्त झालेल्या कुरुसेनेला. १६. शंखकंकणें. १७. पुरुषाचे अलंकार.

वांधोनि केश माथां, प्राङ्मुख[1] होवूनि आठवी अस्त्रें. ११७
तों तीं तद्दृष्टिप्रति गोचरें[2] होऊनि करुनियां प्रणती,
'आम्हां स्वकिंकरांला[3] आज्ञा काय? प्रभो!' असें म्हणती.
त्यांसि नमुनि जिष्णु म्हणे, 'या, या हृदयीं[4] रहा, असीं न रहा;
आधीं वीररसीं, मग बुडवावा सद्यशोरसीं नर हा.' ११९
शिरतां अस्त्रें चित्तीं, निजतेजें भानुला मनीं कढवी,
चढवी गुण गांडीवीं, तन्नादें कंपें[5] महिस ही पढवी. १२०
उत्तर म्हणे, "खरा[6] तूं, नाहीं कोण्ही च कीं परि सहाय,
म्हणतों मनांत पार्था! बहु वनसार्थाधिपापरिस[7] 'हाय!'"
हांसे जिष्णु म्हणे, "गा! तुजला असहाय पार्थ कां गमला?
आहे प्रसाद गुरुचा, कोण अधिक यापरीस सांग मला? १२२
मागें युद्धें केलीं, म्हणवूनि जनांत घेतलें धन्य,
तेव्हां गुरुप्रसादाहूनि मज सहाय कोण तो अन्य? १२३
असतां द्रोण, सुरेश्वर, हरि, हर हे गुरु[8] समर्थ, असहाय
एकाकी पार्थ कसा? न म्हणावें त्यजुनि वीररस[9] 'हाय!'"

अध्याय चवथा.

स्मरतां चि वांनरांकध्वज[10] गगनांतूनि उतरला महिला,
तो[11] स्थापिला रथीं त्या श्रीकृष्णसखें, शमीतळीं पहिला. १

१. पूर्वाभिमुख. २. दृश्यमान. ३. आपल्या सेवकांना. ४. या माझ्या अंतःकरणांत रहा. (मला यथाप्रसंगीं तुमचें स्मरण व्हावें). ५. त्या गांडीवाच्या टणत्कारानें पृथ्वीवरील सर्वांना कंप सुटला, इतकें च नव्हें तर भूमीला हि कंप सुटला—भूकंप झाला, असा भावार्थ. ६. खरा अर्जुन. ७. वनांतून भटकणाऱ्या काफल्याच्या (व्यापारी टोळीच्या) नायकापेक्षां. ८. द्रोणाचार्य, इंद्र, कुबेर, यम, वरुण, अग्नि, कृप, कृष्ण व शंकर यांची कृपा मजवर आहे, असें मूळांत आहे. ९. वीरोत्साह. १०. मारुति आहे चिन्ह ज्यावर असा ध्वज. ११. तो ध्वज.

जातां कुरुकटकावरि वाजविला दिव्य देवदत्त[1] दर[2],
[3]तो होय जनां जैसा कल्पांतीं[4] रुद्रदेव[5] दत्तदर[6]. २
भ्याला उत्तर, त्यातें जिष्णु म्हणे, 'पावलासि कांप दरें,
अद्यापि बांधिलेसें तुजिया मतिनें अधैर्य कां पदरें?' ३
तो वैराटि म्हणे, 'गा! कोणाचा ही असा न दर वाजे;
बा! लागले असावे अमरपुरीचे[7] हि आजि दरवाजे. ४
ते गज दिग्गज[8], भ्याले बहु या धैर्यावसानद[9] रवा जे;
वाटे, श्रीवृषवाहनविभुचा[10] हि रणीं असा न दर वाजे. ५
भ्याली बहुधा विद्युत् कांपतसे याचिया[11] चि निःस्वानें[12],
मीं किति? ज्याला भी श्री[13], त्याला भ्यावें कसें न निःस्वानें[14]?
अर्जुन तुम्हीं च कळलें, ठेवूं द्या दर[15], न मानसा दर[16] हो;
रक्षा धृति, आहें मीं सूतपणीं हरिसमान[17] सादर हो!' ७
हांसोनि म्हणे हरिसख[18], 'हो गाढासन[19], विकंपधी[20], धीट;
न धरीं बा! दर, हा दर सादर दे वाजवूं पुन्हां नीट.' ८
ऐसें वदे, करी मृदुपूर्वजलजवादनीं[21] मग जवा, जी!
तेव्हां त्या कुरुकटकीं हगले मुतले समस्त गज वाजी. ९

---

१. नामविशेष. २. शंख. ३. अर्जुन. ४. प्रलयकाळीं. ५. श्रीशंकर. ६. दिलें आहे भय ज्यानें असा. ७. देवांच्या नगरीचे, अमरावतीचे. पाठांतर—**अमरपुरांचें—चा. प्र.** ८. दिशांकडे असलेले गज. (पृथ्वीला धरून स्थिर ठेवण्यासाठीं आठही दिशांकडे आठ गज आहेत वगैरे पौराणिक कथा आहे). ९. धैर्यनाशकर अशा. १०. नंदी आहे वाहन ज्याचें तो शंकर. ११. या देवदत्तशंखाच्या. १२. शब्दानें. १३. संपत्तीची देवता लक्ष्मी. १४. दरिद्र्यानें, निर्धनानें. १५. शंख वाजविण्याचें राहूं द्या. १६. भीति. १७. कृष्णाप्रमाणें. १८. अर्जुन. १९. दृढ, स्थिर आहे आसन ज्याचें असा. २०. कंपरहित बुद्धि ज्याची असा, निर्भय. २१. पूर्व (पहिल्यानें) मृदु अशा जलजवादनीं (शंखवादनीं) मग जवा करी. (अर्जुन मग पहिल्यापेक्षां अधिक जोरानें शंख वाजवूं लागला).

द्रोण म्हणे, 'न दिसे जय, कां करितां आननें नत[1]? पहा रे!
आला विजय, जयाचें श्रीशंभुतपापुढें न तप हारे.' १०
गांधारि[2] म्हणे, 'गुरुजी! पण न करुनि पूर्ण हा प्रकटला, हो!
पुनरपि वनवास करो, गुरुघातकपातक[3] प्रकट लाहो[4].' ११
कर्णाद्यांसि म्हणे, 'तुमचे विजयी असोत हात रणीं;
शरपटलें[5] छादित[6] हो सार्जुनशस्त्रप्रताप[7] हा तरणी. १२
गुरुजांस काय पुसतां? चापीं गुण मद्वचें[8] चि चढवा, हो!
यांला हें चि म्हणावें, कीं आम्हां धर्मशास्त्र पढवा, हो! १३
प्रियशिष्यधनंजयगुण वर्णुनियां यांसि हृदय निववूं द्या,
उत्पातोत्प्रेक्षेनें[9] जरि आम्हां भिववितात, भिववूं द्या. १४
पढवावें मात्र ईहीं[10], भेदावें परहृदब्ज[11] कटुकवचें[12];
कीं दूरूनि दिसावें प्रेक्षकदृष्टीस युद्धपटु कवचें[13]. १५
प्रार्थुनि पुढें करावे हे यज्ञीं कीं सुभोजनावसरीं;
सिंधूंत तरेल कसी जी केली केलिहेतु[14] नाव सरीं[15]?' १६
खळकृतगुरुनिंदेतें वर्णील कधीं न विस्तरें सु-कवी;
कीं, ती[16] श्रीगुरुभक्तिप्रेमामरपादपांकुरा[17] सुकवी. १७
कर्ण म्हणे, 'सत्य वदसि, परि आधि तुझ्या नसो मनीं कांहीं
यद्यपि[18] समरोत्साह त्यजिला अर्जुनभयें अनीकांहीं[19]. १८
जावूत गोधनातें घेउनि हे, कीं उगे चि राहोत,
पाहोत युद्धकौतुक, परि भीतिनदींत हे न वाहोत. १९

---

१. नम्र. (तोंडें खालीं कां घालतां)? २. दुर्योधन. ३. गुरुहत्या करणाराचें पातक. ४. मिळवो. ५. बाणांच्या पडद्यानें–समुदायानें (पक्षीं) मेघानें. ६. आच्छादित. ७. अर्जुनासह त्याचा शस्त्रप्रभाव हा च सूर्य. ८. माझ्या वचनानें. ९. अशुभ चिन्हांच्या तर्कानें. १०. ह्या द्रोणादिकानीं. ११. दुसऱ्याचें हृदयकमल. १२. कडु भाषणानें. १३. कवच धारण केल्यामुळें. १४. क्रीडार्थ. १५. सरोवरांत. १६. गुरुनिंदा–**पं. प्र.** १७. गुरुभक्तीचें प्रेम हा च कल्पवृक्ष, त्याच्या अंकुराला. १८. जरी. १९. सैन्यानीं.

ख्यात जगांत धनंजय, याहुनि मीं कर्ण काय गा! [1]ऊन?
गाती, गातिल हि कवि; स्वगुण स्वमुखें चि काय गावून? २०

पाहोत सिद्ध, विद्याधर, मुनि, [2]गंधर्व, देव शुद्ध रण,
करितों आजि [3]सुयोधनहृच्छल्याचें सुखें चि उद्धरण. २१

हो स्वस्थ, [4]स्वमनस्था [5]आधिनगा [6]भरतसार्थपा! खाणीं,
[7]मच्छरटंक सहाया कैंचें सामर्थ्य [8]पार्थपाखाणीं? २२

म्यां जोडिलीं सदस्त्रें शस्त्रें जालीं च आजि [9]अनपार्थें;
देखुनि दर्शन, केलें माझें [10]अतिमात्र [11]हृष्ट मन पार्थें. २३

[12]श्रीभार्गवास्त्रतेजें भंगावें संगरांत [13]सुत्राम्या,
आश्चर्य काय, त्याच्या केलें जरि भग्न आजि [14]पुत्रा म्यां.' २४

त्यासि कृप म्हणे, 'कर्णा! सुज्ञाहीं ऐकतां चि डोलावें
ऐसें चि बोलणें जरि, तरि पुरुषानें दहांत बोलावें. २५

तूं नीतिविरुद्ध वदसि, साहस हें, फळ न दे [15]वचनयज्ञ;
अद्भुत कर्म करुनि ही बा! न वदति एक ही वच [16]नयज्ञ. २६

तूं भंगिसील कैसा? [17]आला बांधोनि काय हात रणीं?
[18]सर्वाहितांधकारध्वंसकर [19]मनुष्यकाय हा तरणी. २७

एकें चि खांडववनीं या पार्थें अग्नि तर्पिला, कर्णा!
सर्व सुरांच्या [20]स्वधनुर्ध्वानें चि त्रास अर्पिला कर्णा. २८

---

१. उणा, कमी. (बळानें अल्प). २. देवयोनिविशेष. ३. दुर्योधनाच्या मनांतील कांट्याचें. (अर्जुनाचें). ४. आपल्या मनांत असलेल्या. ५. चिंतारूपी पर्वताला. ६. भरतवंशपालका! (सार्थ=समुदाय). ७. माझी बाणरूपी टांकी. ८. अर्जुनरूपी दगडाचे ठिकाणीं. ९. सफल. १०. अत्यंत. ११. आनंदित. १२. श्रीपरशुरामापासून मिळालेल्या अस्त्राचे तेजानें. १३. इंद्राला. १४. इंद्रपुत्र अर्जुनाला. १५. वचनरूप यज्ञ, व्यर्थ बडबड. १६. नीतिमान् लोक. १७. [अर्जुन] आला. १८. सर्व शत्रुरूपी अंधकाराचा नाश करणारा. १९. मनुष्यदेहधारी. २०. आपल्या धनुष्याच्या टणत्कारानें.

एकें चि भगवदनुजा हरिली, भ्याला न लेश कळहाला;
जन्हि खवळला पिवूनि प्रभु खलबलदलनदक्षबळ हाला. २९
एकें चि ईश्वरासीं केलें युद्ध प्रसिद्ध, राधेया!
एकें चि असुर वधिले, तन्माया एक ही न बाधे या. ३०
एकें चि जिंकिला तो गंधर्वाधीश चित्रसेन रणीं,
रोमांचिततनु होती वीर धनंजयपराक्रमस्मरणीं. ३१
एकें त्वां काय कधीं केलें? कर्णा! स्वकर्म वाखाण.
हीरकँ वीरकरगनवटंकें हि चिरे न, जेंवि पाखाण. ३२
घालूं पाहसि, दंष्ट्रा उपडाया, अहिमुखांत आंगोळी,
ऐसें साहस करितां होइल तनुची पळांत रांगोळी. ३३
कंठीं बांधोनि शिळा बाहुबळें सागरासि तरशील,
परि साहसें न विजया; हें शील नसो, असो इतर शील. ३४
सर्व हि मिळोनि भांडों, कर्णा! व्हावें न साहसा मान्य,
यत्नें नृपयश रक्षूं आजि, नव्हे श्वेतवाह सामान्य.’ ३५
द्रौणि म्हणे, “एकाकी तूं चि क्षम जिष्णुवारणा सूत.
बहुधा बद्ध करील चि लूतेचें जिष्णुवारणा सूत. ३६
करिसि विकत्थन, जिंकुनि नेलें नसतां हि गोधन शिवेतें.
सत्प्रियशुचियश कर्णा! भलत्या, न करूनि शोध, न शिवे तें.

१. श्रीकृष्णभगिनी सुभद्रा. २. बलराम. ३. दुष्टाच्या सन्याचानाश करण्यास समर्थ आहे बल ज्याचें असा. ४. सुरा, दारू. ५. किरातरूपी शंकरासीं. ६. निवातकवच आणि कालखंज. ७. हिरा. ८. वीराच्या हातांतील नवीन टांकीनें. ९. दाढ. १०. सापाच्या तोंडांत. ११. बोट. १२. [अर्जुनास जिंकण्याचें साहस करण्याचा] स्वभाव. १३. अर्जुन. १४. अश्वत्थामा. १५. अर्जुनाच्या प्रतिकाराला. १६. तूं सूतपुत्र कर्ण च. १७. कोळी नांवाच्या किड्याचें. १८. इंद्राचा हत्ती जो ऐरावत त्याला. १९. दोरा. (जाळें). २०. बडबड. २१. [नगराच्या] सीमेपावेतों. २२. हे कर्णा! सज्जनांना प्रिय असें निर्मल यश पात्रापात्रविचार न करितां भलत्यासलत्याला वरित नाहीं.

साहे विविधोपद्रव, वाहे पृष्ठीं चतुर्विधें[1] भूतें,
आहे उगीच, कर्णा! न कधीं बोलोनि दाखवी भू[2] तें. ३८
जाळी ज्वलन[3], न बोले; न वदे चि जरि प्रकाश करि तरणी;
न वदोनि कुलज[4] पुरुष हि आले स्वयशःप्रकाश करित रणीं.
पावुनि हि सर्व महितें[5], विगुणा[6] हि गुरूसि, जे कुळज नर, ते
सत्कारिति, अलि कमळीं, तेंवि गुरुपदीं महाकुळजन[7] रते. ४०
राधेया! उद्धत तूं, हा दुर्योधन हि फार उद्धत, रे!
गुरुनिंदक हो! स्पष्ट व्यसनांत बुडे अशुद्ध, शुद्ध तरे. ४१
छद्मद्यूतें[8] केल्यां[9] सत्सर्वस्वापहारकर्मातें[10]
पुरुषार्थ[11] श्लाघ्य[12] असें मानुनि, पावेल कोण शर्मातें[13]? ४२
कोणा रणांत पांडव जिंकुनि तद्राज्य साधिलें वद, रे!
कृष्णेसि जिंकिलें त्वां कोणा समरांत सांग, रे! सद्रे[14]! ४३
'तुज कीर्ति, पांडवां अपकीर्ति,' म्हणे 'आयकावि' कतम[15] रण?
सावध रे! कां घेसी मंदा! खळनायका! विकत मरण? ४४
सिंहासीं द्वेष करुनि कोण बळी वारणांत उरणारे?
कां भ्रमलासि? कसा त्वां जय पावावा रणांत उरणा[16]! रे!? ४५
अरिच्या हि सद्गुणातें प्रेमें वाखाणितात सुज्ञानी,
खळ हो! मग वर्णावा कां न जगन्मान्य शिष्य सुज्ञानीं? ४६
तुजहुनि विशिष्ट[17] वीर्यें[18], चापीं जो शक्र, संगरीं विष्णु,

---

१. उद्भिज (वनस्पत्यादि) अंडज (पक्षिसर्पादि), स्वेदज (घामापासून होणारे ढेंकुण पिसवा इ०), जरायुज (जरायु नांवाचे चर्मानें–वारेनें वेष्टित गर्भ ज्यांचे असे मनुष्यपश्वादिक) असे चार प्रकारचे प्राणी. २. पृथ्वी. ३. अग्नि. ४. कुलीन. ५. संपूर्ण पृथ्वी जिंकून हि. ६. गुणहीन अशाहि. ७. थोर कुलांतील माणूस. ८. कपटद्यूतानें. ९. केलेल्या. १०. सज्जनाच्या अखिल द्रव्याचा अपहार करण्याच्या कर्माला. ११. पुरुषानें साधावयाच्या गोष्टी. (ह्या धर्म, अर्थ, काम व मोक्ष अशा चार आहेत). १२. स्तुत्य. १३. सुखातें, कल्याणातें. १४. सज्जनशत्रो! १५. कोणतें. १६. मेष—**चा. प्र.** १७. अधिक. १८. पराक्रमानें.

कोणा सुज्ञासि नव्हे तो पूज्य स्तुत्य शंभुसा जिष्णु[1]? ४७
सुत शिष्य सम; तयांत व्याधि[2] खळ कुधी[3], खरे असु[4] ज्ञाते;
प्रिय नसतील कसे जे साधुयशस्कर अरे! असुज्ञा[5]! ते? ४८
केलें दुर्द्यूत[6] जसें, त्वां शक्रप्रस्थ[7] तें जसें हरिलें,
स्वसभेंत आणिलें त्या साध्वीस जसें न भय मनीं धरिलें, ४९
आतां हि तसें चि तुवां पार्थासीं धैर्य धरुनि भांडावें:
भांडावें कर्ण! शकुनिसंमत[8]पांडित्य, अन्य सांडावें. ५०
पांचांस हि जो जिंकी सोडुनियां कुरुसभेंत अक्ष[9] महा,
एकासि शकुनिमामा जिंकाया काय आजि अक्षम हा? ५१
आम्हीं आजि झगडतों, जरि येता तो विराट, तरि त्यासीं;
झगडोंना शब्दें ही पार्थासीं, लव हि अघ न करित्यासीं." ५२
भीष्म म्हणे, 'द्रौणे! तूं उत्तम वदलासि, कृप हि शुद्ध वदे;
धर्मन्यायोचित[10] जें, तें चि सुभाषण मनासि उद्धव[11] दे. ५३
क्षत्रियधर्में केवळ इच्छितसे युद्ध कर्ण उत्साहें,
उचित चि, परंतु अनुचित करणें गुरुची दहांत कुत्सा[12] हें. ५४
द्रोणद्रौणिकृपांहीं आजि करावी क्षमा, न कोपावें,
भेदें[13] नसावा, बुध हो! भेदें स्वयश न परासि ओपावें.' ५५
दुर्योधन नमुनि म्हणे, 'गुरुजी! मज आरिकरीं न सोंपावें,
तेजोजनना[14]र्थ तसें वदलों, त्वन्मत्सरीं नसों, पावें.' ५६
हांसोनि द्रोण म्हणे, 'आम्हां कोपों न दे चि वत्सलता[15],
नसते क्षमाकवच[16] तरि हृदयीं त्वच्छब्द अशनिवत्[17] सलता.' ५७

---

१. अर्जुन. २. व्यथा. ३. वाईट बुद्धि ज्यांची असे. ४. प्राण. ५. मूर्खा! ६. कपटद्यूत. ७. इंद्रप्रस्थ. (पांडवांची राजधानी). ८. शकुनीला मान्य असलेलें [कपटरूप] पांडित्य. ९. फांसे. १०. धर्म व न्याय यांना शोभणारें. ११. उत्सव, आनंद. १२. निंदा. १३. विरोध, फूट. १४. ईर्षा उत्पन्न व्हावी यासाठीं. १५. दयालुत्व. १६. क्षमारूपी चिलखत. १७. वज्राप्रमाणें.

भीष्मासि मग [१]म्हणे, नृपें[२] 'पुसतों अज्ञातवासपण पुरला,
कीं कांहीं मास तरी, [३]पक्ष तरी, दिन तरी असे उरला?' ५८
भीष्म म्हणे, 'गांधारे! पांडव पंडित खरे, न [४]दभ्रमती;
न भ्रमले; जे [५]प्राकृत ते चि मनीं धरुनियां मद भ्रमती. ५९
कामी कोपी लोभी जे संसारांत पावति भ्रम ते.
प्राकृत पंडित पांडव असते, तरि हे हि केंवि न भ्रमते? ६०
शास्त्रमतें मासद्वय पांचां वर्षांत अधिक लेखावें,
अज्ञातवास यास्तव सरला चि असें चि [६]तत्व देखावें. ६१
तेरा वर्षांत अधिक दश पक्ष द्वादश [७]क्षपा पडती,
[८]चांद्रशरन्मानें हे संख्यां[९] संख्यावदादृता[१०] घडती. ६२
एवंच[११] चांद्रमानें तेरा हि स्पष्ट सारिले अब्द,
सत्यप्रतिज्ञ पांडव लागों देतिल न आपणा शब्द. ६३
येतां [१२]अन्यायलवें अल्पायासें हि इंद्रपद पदरा,
'हूं' न म्हणतील, काळापासुनि ही पावतील हे न दरा. ६४
युद्धेंकरूनि पाक्षिकें[१३] जय, त्यांत हि विजय पातला समरा,
सम [१४]रामासीं हा[१५], हो शमें[१६] राज्यसमर्पणें, हठें न मरा.' ६५
कुर्वधम म्हणे, 'युद्ध चि हो, सख्य न हो, पितामहा! यासीं.

---

१. [द्रोण] म्हणे. २. दुर्योधन. ३. पंधरवडा. ४. अल्पमति. ५. नीच, अज्ञ. ६. सत्य. ७ रात्री. ८. चांद्रवर्षमानानें. (चांद्रमान व सौरमान असे कालगणनेचे दोन प्रकार आहेत. अमावास्येपासून किंवा पौर्णिमेपासून सुरू होणाऱ्या महिन्याला 'चांद्रमास' व संक्रांतीपासून सुरू होणाऱ्याला 'सौरमास' म्हणतात. चांद्रमानानें वर्षाचे सुमारे ३५४ दिवस व सौरमानानें सुमारे ३६५ $\frac{१}{४}$ दिवस भरतात. पांडवानीं चांद्रमानानें आपला वनवास संपविला होता). ९. गणति. १०. पंडित—**चा. प्र.** संख्यावत्+आदृता=गणितज्ञ जे ज्योतिषी त्यानीं स्वीकारलेली (मान्य केलेली) अशी. ११. एकंदरींत. १२. थोड्या हि अन्यायानें. १३. कोणत्या तरी एका पक्षाचा. १४. परशुरामासीं. १५. अर्जुन. १६. शांति.

शक्र हि बुडेल, यातें मद्धृतें[१] पद ओपितां, महायासीं.' ६६
भीष्म म्हणे, "तरि कांहीं बळ घेउनि जा पुरा, नको राहूं,
बा! 'हूं' मज चि म्हण, न त्या द्विषदंगारांचियां[२] चकोरा 'हूं.'
आम्हांपासीं राहो अर्ध कटक पार्थसिंह घेराया,
एकें भागें न्याव्या गाई, तूं एक भाग घे, राया! ६८
मीं, कर्ण, कृप, द्रोण, द्रौणि असे हे रणांत पांच कसा[३]
उतरों धनंजयाच्या कीं नुतरों, तूं चि मात्र वांच कसा." ६९
धाडुनि पुढें नृपाला, त्यामागुनि गोधनासि सत्वर चि,
शास्त्रमतें व्यूहातें[४] तत्काळ चि तो अगाधसत्व[५] रची. ७०
कर्ण पुढें, गुरु मध्यें, ज्याच्या तेजासि शक्र हि न साहे;
दोंभागीं द्रौणि कृप, व्यूहामागें नदीज तो राहे. ७१
द्रोण म्हणे, "सैनिक हो! हा आला कीशकेतु[६] अर्जुन, हो!
कोण सुहृन्न[७] म्हणेल 'ख्यात जगीं विजय, विजय अर्जुन[८], हो?'
हे दोन बाण माज्या चरणांवरि उतरले, पहा, नमना;
या गौरवें मजपरिस गमला कनकाद्रि ही लहान मना. ७३
हे अर्जुननामांकितशर[९] मत्कर्णद्वयासि[१०] लागोनि
पडले पहा, अहा! रण न करी, आज्ञा मला न मागोनी. ७४
जाले बहु, होतिल बहु, आहेत हि बहु, परंतु यासम[११] हा;
यास महादेवा! दे जय, पाहिन कधि धनंजया समहा[१२]?" ७५
पार्थ म्हणे, 'वैराटे! रथ कुरुकटकासमीप राहों दे,
गोधन हरावयास्तव भेट[१३] आले कोण कोण पाहों दे. ७६

---

१. मीं हरण केलेलें. २. शत्रुरूप निखाऱ्यांना [सेवन करणाऱ्या] चकोर-पक्ष्याला. (अर्जुनाला). ३. कसोटीला. ४. व्यूह=सैन्यरचनेचा प्रकार. ५. अतिशयित आहे सत्व (बळ) ज्याचें तो. (भीष्म). ६. मारुति आहे ध्वजावर ज्याच्या असा (अर्जुन). ७. सुहृत्+न. (सुहृत=मित्र). ८. संपादून. ९. अर्जुनाच्या नांवानें चिन्हित ('अर्जुन' हें नांव ज्यावर लिहिलें आहे) असे बाण. १०. माझ्या दोन्ही कानाला. ११. या अर्जुनासारखा एक अर्जुन च आहे. १२. तेजस्वी अशा. १३. योद्धे.

तो गुरु, तो गुरुनदंन, तो कृप, तो कर्ण, तो पितामह, रे!
यांहीं धेनु वळाव्या! शिव! शिव! गोपाळकृष्ण! राम! हरे!
रे उत्तरा! शकुनिचा या व्यूहांत न दिसे मला भाचा[1],
त्यावांचुनि यांसीं जो करणें संग्राम, तो न लाभाचा. ७८
बहुधा गोधन घेउनि मागें गेला पळोनि कातर[2] तो,
सर्व हि खोटा व्यसनीं बुडतो, न पळो, पळो, निको[3] तरतो.
हें कटक सोड, तिकडे चाल, तुज्या हरुनि गोधना खळ तो
प्राणत्राणपरायण[4] जिकडे निरपत्रपाग्रणी[5] पळतो.' ८०
उत्तर निजतुरगांतें, द्याया अरुणासि[6] कौतुक, पिटाळी;
तों गर्जोनि कुरुकटककर्णीं[8] बसवी ध्वजस्थ[7] कपि टाळी. ८१
कृप सैन्यांसि म्हणे, 'हो! हो प्राप्तारिष्ट[9] शांत, न वधावा
राजा पार्थें, सांगपें[10] सगरु सगुरुसुत सशांतनव, धावा.' ८२
गांठुनि पार्थ म्हणे, "रे! आलों मीं अनुज भीमसेनाचा,
ज्याच्या शरांसि म्हणती सुर 'असुरबळांत भीमसे[11] नाचा.'
कोठें जाल? उभे रे! मत्स्येश्वरधेनुपश्यतोहर[12] हो!
सोडा गोधन, नाहीं तरि वधिन तुम्हांसि, वश्य[13] तो हर[14] हो."
शरपटळानें झांकी कुरुकटकाला चि तो न वासवि, त्या
खेचर[15] म्हणति, 'तेजस्वी लोपविता भेटला नवा सवित्या.'

---

१. दुर्योधन. २. भित्रा. ३. खरा. ४ प्राणरक्षणाविषयीं तत्पर. ५. निर्लज्ज शिरोमणि. (निर+अपत्रपा+अग्रणी). ६. सूर्याच्या सारथ्याला कौतुक वाटविण्यासाठीं. (अरुण सूर्याच्या रथाचे घोडे पिटाळतो त्यांपेक्षां हि अधिक वेगानें, सारांश, अत्यंत वेगानें). ७. [अर्जुनाच्या रथाच्या] पताकेवर असणारा कपि (मारुति). ८. कर्णीं टाळी बसवी—सोसेनासा मोठा आवाज करून कान हातानीं बंद करवी, कांठाळ्या बसवी. ९. आलेलें संकट. १०. सकर्ण. ११. शंकराप्रमाणें. १२. विराटाच्या गाई [धडधडीत] डोळ्यांदेखत चोरून नेणारे (पश्यतः+हर=पश्यतोहर) हो! १३. अनुकूल. १४. शंकर. १५. देव.

सुरदत्त[1]धनुर्गुणरथनेमिध्वजवासिभूतनादानीं
कांपे न चमू[2] चि, कु[3] ही, स्वकुचांच्या जेंवि पूतना[4] दानीं. ८६
खळबळजळनिधिमग्ना धेनु उसळल्या[5], अलाबु जाल्या, हो!
हांसुनि विजय, मनिं म्हणे, 'कां गोपसखा[6] मला बुजाल्या हो!?'
गेल्या पळोनि गाई पृष्ठोपरि[7] पुच्छभार[8] वाहोनी,
राहोनि निश्चळ[9] क्षण विजय निवे[10] त्यांकडे चि पाहोनी. ८८
येतां चि विक्रमलवें[11] श्रीहरिचा दयितदास[12] वीर गडी
हरि करिघटेसि[13] तैसा त्या कुरुसेनेसि वासवी रगडी. ८९
आंगावरि गोरज[14] तें श्रीगोपाळांघ्रिचें[15] चि भावुनि[16] घे,
जाया सुयोधनावरि भीमाचा भीमशक्ति[17] भावु निघे. ९०
भीष्मादि म्हणति, 'गेला कीं हो! दुर्योधनांतकाम[18] खरा.'
धांवोनि गांठिती त्या जयलक्ष्मीदत्तकौतुका[19] मखरा[20]. ९१
पाहुनि बीभत्सु म्हणे, 'आला दुर्योधनावना[21] कर्ण,
म्यां रिण परिग्रहाचें[22] वारावें आजि, जेंवि नाकर्ण[23].' ९२
तत्काळ उत्तरें तो नेला कर्णाकडे चि रथ, वातें

---

१. देवदत्त (शंख), धनुष्याची दोरी, रथचक्रधारा व ध्वजस्थ मारुति यांपासून उत्पन्न झालेल्या नादानीं. २. सेना. ३. पृथ्वी हि. ४. कृष्णाकडून कपटानें आपल्या विषयुक्त स्तनांचें पान करविणारी दुष्ट राक्षसी. ५. वर आल्या. ६. गोपाळकृष्णाचा मित्र अशा मला. (मी गोपाळकृष्णाचा मित्र च असल्यामुळें गाईनीं मला बुजायला नको होतें असा भावार्थ). ७. पाठीवर. ८. शेंपट्याचें ओझें घेऊन. (शेंपट्या उभारून). ९. स्थिर. १०. समाधान पावे. ११. अल्प पराक्रमानें. १२. प्रियभक्त व मित्र असा वीर अर्जुन. १३. हत्तींच्या कळपास. १४. गाईच्या पावलांची धूळ. १५. श्रीकृष्णचरणांचें च. १६. मानुनि. १७. भयंकर शक्ति ज्याची असा. १८. दुर्योधनाच्या नाशाची इच्छा ज्यास तो अर्जुन. १९. जयलक्ष्मीला दिलें आहे कौतुक ज्यानें अशा. २०. त्या अर्जुनरूपी मखराला. २१. दुर्योधनाच्या रक्षणासाठीं. २२. पत्नीचें. (द्रौपदीचें). २३. स्वर्गाचें (देवांचें) ऋण.

घन गिरिकडे, सुवैद्यें स्वौषध[1] रुग्णाकडे[2] चि अथवा तें. ९३
भंगुनि सहाय, मारुनि बंधु[3], हराया समस्त तन्मद हा
पार्थ शरानीं झांकी; देखोनि म्हणे तदीयजन्मद[4] 'हा!' ९४
दवें[5] जेंवि तृणाऽवरणा[6], वृष[7] भस्म करी महाशराऽवरणा[8],
पार्थ म्हणे, 'करितो गिरिशकमंडलुसीं[9] पहा शराव[10] रणा.' ९५
कर्ण हि इषुनीं[11] झांकी मग त्या मोक्षेच्छुमानसाध्वसखा[12],
रुग्णानळा[13] म्हणे जो, 'खांडव, सोडूनि सर्व साध्वस[14], खा.' ९६
तें किति वर्णावें म्यां? पाहत होते विचित्रसमरा[15] जे,
कर्णाच्या अपयानावधि[16] ते गमले चि चित्रसम[17] राजे. ९७

अध्याय पांचवा.

कर्णापयानकोपें[18] झालीं सैन्यें[19] समस्त एकवट,
त्यांत धनंजयरथ तो, जैसा प्रलयार्णवांत एक वट[20]. १
जाणों बुभुक्षितांतें तो दुष्काळांत अन्न दे खाया,
सदयोदारा[21] शतमख[22] ये होवुनि सुप्रसन्न देखाया. २

१. चांगलें औषध किंवा आपलें औषध. २. रोग्याकडे. ३. कर्णाचा बंधु. ४. त्या कर्णाचा जन्मदाता सूर्य. ५. वणवा. ६. गवताच्या आच्छादनाला. ७. कर्ण. ८. मोठ्या बाणरूपी आच्छादनाला. ९. शंकराच्या कमंडलूसीं. १०. परळ. (मातीचें पसरट पात्र, झांकणी). ११. बाणानीं. १२. मोक्षेच्छूच्या मनाला मार्ग (मार्गदर्शक) असा श्रीकृष्ण, त्याचा मित्र अर्जुन. १३. रोगी अग्नीला. १४. भय. १५. अद्भुत युद्धाला. १६. पलायनापर्यंत. १७. चित्रासारखे. (निश्चल). १८. कर्ण पळून गेल्याच्या रागानें. १९. कौरवपक्षीय समस्त वीरांचीं सैन्यें. २०. वटवृक्ष. (प्रलयकाळीं सर्व पृथ्वी बुडून जाते; परंतु एक वटवृक्ष मात्र राहतो व त्यावर विष्णु शयन करितो, अशी कथा आहे). २१. दयाळु व उदार अशा अर्जुनाला. २२. इंद्र.

होत्ये यदंशशेषश्वासज्वळनांत[1] हे समिद्[2] धरणी,
त्याचा सखा धनंजय[3] होय खलशलभलया[4] संमिद्ध[5] रणीं. ३
कोणाचें हि शरीर द्व्यंगुळ[6] हि अविद्ध[7] तो न राहूं दे,
मुनि म्हणति, 'खळांस हि गति बा! नारायणसखा! नरा![8] हूं, दे.'
वाहे[9] शोणितपूरीं शतश इभांचें हि कुणप, टोळांचा
मद किति गरुडीं? सद्भटभुजभुजग[10] हि वरिति गुण पटोळांचा.[11]
इतरांची काय कथा? अद्भुत संगर करी सहास[12] कृप,
होय विरथ, सुर म्हणती, 'सिंह पथ न दे करीस हा[13] सकृप.'
बीभत्सुपुढोनि विरथ सुविकळ[14] कृप पळविला नरवरानीं;
तद्धनुचा[15] भयद भटां, हरिचा हि तसा गजां न, रव[16], रानीं. ७
मग गगनगनगभिन्मुखसुरमत[17] गुरुसीं हि अनर्व[18] मुनि नर[19] तो
कलह करी, कीं इतरीं गुरुकळहीं, थांसि[20] जन वमुनि[21], न रतो.
प्रथम गुरुच्या रथासीं रथ भिडवी क्षिप्र, मग अकोपार्थ[22]
शिर चरणांसी प्रार्थुनि, 'करुणेसि' म्हणे, 'त्यजूं नको,' पार्थ.

---

१. ज्याचा (विष्णूचा—कृष्णाचा) अंश शेष, त्याच्या श्वासाग्नींत. (प्रलयकाळीं प्रखर सूर्यकिरणानीं तापलेल्या पृथ्वीची आग तिला आधारभूत असलेल्या शेषाच्या मस्तकाला पोंचतें व त्यामुळें त्यानें संतापून केलेल्या फूत्कारानें पृथ्वी जळून जाते; अशी कथा आहे). २. समिध. (आहुति). ३. अर्जुन, (पक्षीं) अग्नि. ४. दुष्ट (कौरव) हे च टोळ त्यांच्या नाशार्थ. ५. प्रदीप्त—**चा. प्र.** ६. दोन बोटें. ७. अक्षत. ८. अर्जुना! ९. रक्ताच्या प्रवाहामध्यें शेंकडों हत्तींचें प्रेत वाहूं लागलें. (येथें 'कुणप' हा शब्द नपूंसकलिंगी व जातिवाचक म्हणून एकवचनी आहे). १०. मोठमोठ्या वीरांचे बाहुरूपी सर्प. ११. पडवळांचा. (वीरांचे बाहु पडवळांसारखे लुले पडले). १२. हास्यपूर्वक. (सहज, लीलेनें). १३. अर्जुन—**पं. प्र.** हा सकृप (दयाळू) सिंह. १४. अतिशय विव्हल झालेला. १५. अर्जुनाच्या धनुष्याचा. १६. ध्वनि. १७. आकाशांतील इंद्रादि देवांस मान्य. १८. पुराण, प्राचीन. १९. अर्जुन. २०. या प्रस्तुतच्या कलहाला. २१. सोडून, टाकून. २२. राग न यावा म्हणून.

'गुरुजी! करा प्रहार प्रथम, तुम्हीं गुरु, अविप्र हां[1], रामीं[2]
शांतनवसा[3], करीन, प्रमुदित व्हाया कवि, प्रहारा मीं.' १०

सच्छिष्यावरि सद्गुरु आधीं प्रेमेंकरूनि आशींची,
मग वृष्टि बहिःकोपें[4] सुबहु करी बहुविधेषुराशींची[5]. ११

गुरुला विविधशरांची वाहे तो रागराशि[6] लाखोली,
भेटे अस्त्रततति[7] तया, जसि पाहों सागरा शिला खोली. १२

शरसागरीं तिमिंगिल[8] गुरु, पळभरि होय शिष्य कंप्र[9] तिमी,
परिभूत[10] द्रोण म्हणे, 'श्रीभार्गवसा[11] चि धन्य संप्रति मीं.' १३

त्या समयीं शंभु म्हणे, 'जरि तूं रुससील तरि उमे! रूसें[12],
गुह काय? विदारिल हा वत्स विजय शक्तिनें सुमेरूस.' १४

[13]करिती सूर्यास्तोदय एकमुहूर्तांत एक शतदा ते,

---

१. मी अर्जुन अब्राह्मण—क्षत्रिय आहें. २. परशुरामीं. ३. भीष्माप्रमाणें. (परशुराम व भीष्म या गुरुशिष्यांचें युद्ध काय कारणानें झालें वगैरे हकीकत प्रसंगानुसार भीष्मानीं च स्वमुखानें सांगितली आहे, ती पुढें उद्योगपर्व अध्याय १२।१३ यांत पहावी). ४. वाह्यात्कारीं [आणलेल्या] रागानें ५. अनेक प्रकारच्या बाणराशींची. ६. क्रोधराशि (पक्षीं) प्रेमराशि. ७. अन्वयार्थ—जसि शिला (दगड) सागरा खोली पाहों (पाहण्यास) भेटे [तीस] तया (गुरुला) अस्त्रतति (अस्त्रांची पंक्ति) खोली पाहों (त्याचें सत्व पाहण्यासाठीं) भेटे. ८. तिमिनामक माशाला गिळणारा एक मासा. ९. चपळ. १०. पराभव पावलेला. ११. [शिष्य भीष्मानें पराभूत केलेल्या] गुरु परशुरामासारखा. १२. पार्वतीनें रुसण्याचें कारण, आपला मुलगा गुह (कार्तिकस्वामी) याची निंदा आणि अर्जुनाची स्तुति. शंभु म्हणतो, "गुहानें क्रौंचपर्वताचें च विदारण केलें; पण हा अर्जुन मेरुपर्वताचें हि विदारण करील." १३. द्रोणार्जुनांपैकीं एकानें शरवृष्टीनें आकाश व्यापून सूर्य दिसेनासा करावा व दुसऱ्यानें त्या शरपटलाचा छेद करून तो पुन्हां दिसेसा करावा, असें ते उभयता एका क्षणांत शेंकडोंदा करीत.

त्यांत[1] न एकासम ही होती मेघांअसे हि शत दाते. १५
पाडिति शरपटलानीं जेव्हां नभ भरुनि अंधकारा ते,
कातरें[2] म्हणति, 'असमयीं करविसि कां कल्प[3] अंधकारा[4]ते!?'
द्रोणार्जुन तुल्यक्रिय[5] बिंब[6]प्रतिबिंबसे चि ते गमती,
किति कुरुकटकें? प्रेक्षक वृत्रघ्नांचीं[7] हि लोचनें भ्रमती. १७
समरीं शंकरसा च द्रोण गमे, जिष्णु ही अजित[8] साच;
त्रिजगद्विस्मयकर अति अद्भुत परिभव हि तो अजि! तसा च.
सुरमुनि म्हणति, 'छात्रें छिन्नध्वज[9]कवच गुरु पहा केला,
जालीं बळें पराङ्मुख, मारितसे कुमति[10] कुरुप हाकेला. १९
अधिका न क्षत्रियता, न न्यूना विप्रता; पहा[11] तरणा
नसतां हि कसा, ज्याचे विक्षत हि न विप्रताप हात रणा.' २०
केला शीघ्रास्त्र[12]बळें शिष्यें परिभूत सत्वराशि[13] कवी,

१. मेघासारख्या शंभर दात्यांना देखील त्या द्रोणार्जुनांतून एकाची हि बरोबरी करवणार नाहीं. मेघाच्या जलवृष्टिदातृत्वापेक्षां द्रोणार्जुनांचें शरवृष्टिदातृत्व फार च मोठें होतें, असें तात्पर्य. २. भित्रे लोक. ३. प्रळय. ४. शंकरा! ५. समान आहे क्रिया (पराक्रम) ज्यांचा असे. ६. मूळ पदार्थ व त्याची छाया असे. (द्रोण गुरु म्हणून बिंब व अर्जुन शिष्य म्हणून प्रतिबिंब). ७. इंद्राचीं. (कौरवपक्षीय सैनिकांना च द्रोण कोण व अर्जुन कोण हें ओळखतां आलें नाहीं असें नव्हे, तर तेव्हांचा प्रेक्षक जो इंद्र त्याला आपल्या सहस्रनेत्रानीं देखील तें ओळखतां आलें नाहीं). ८. विष्णु. (बाणासुराची कन्या उषा इचा कृष्णाचा नातु अनिरुद्ध याच्याशीं जुळून आलेला प्रेमसंबंध तिच्या पित्याला न रुचून त्या निमित्तानें बाणासुराचा पक्ष घेऊन आलेल्या शंकराशीं कृष्णाचें युद्ध झालें व त्यांत शंकर पराभूत झाले, या कथेकडे येथें कविकटाक्ष आहे). ९. भग्न आहे ध्वज व कवच ज्याचें असा. १०. दुर्योधन. ११. अर्थ—द्रोणाचार्य तरणा नसतां हि कसा [धीर वीर] आहे पहा कीं, ज्याचे विक्षत हि (जखमी झालेले असे हि) हात रणा (युद्ध करण्याविषयीं) विप्रताप (प्रतापरहित, असमर्थ) झालेले नाहींत. १२. वेगवान् अशा अस्त्राच्या सामर्थ्यानें. १३. धैर्याचा निधि च असा.

यां[1] चि सुयशोर्थ बहुधा न शिके हा, गुरु हि न त्वरा शिकवी.
अश्वत्थामा धांवे रक्षाया संकटांत जनकास,
जन कासया[2] विते सुत, कसिते न करावया भजन कास? २२
इंद्रोपेंद्र[3] तसे ते गुरुबंधु सखे कृपीपृथातनय,[4]
धन यश ज्यांचें, त्यांत हि उठवी वैरासि शकुनिचा अनयें.[5] २३
तो उत्तमर्णसा[6] गुरु सोडुनि, पुत्राकडे[7] हरिसख[8] वळे,
स्वपितृप्रतापहरणें द्रौणि हि हृतमणि[9]फणीपरिस खवळे. २४
सांवर्तिक[10]मेघांच्या लाजाव्या द्रौणिसायकां[11] धारा,
सत्तातां[12]हुनि होइल सुत, म्हणवायासि 'हाय!', कां धारा[13]?
'अत्युग्र राम कीं हा द्विज,' म्हणति असें पराशरव्यास,
'काळ हि चुकेल, याचा न चुकेल चि शर परा[14] शरव्यास.[14]' २६
बहु कल्पना सुकविसा, विजय हि बहु शरपरंपरा, व्याळीं,[15]
भंगू पाहे समरीं गुरुपुत्रास हि, जसें पराव्याळीं.[16] २७

---

१. अर्जुनानें द्रोणाचार्यांचा पराभव करण्याला इतका विलंब कां लावला अशी शंका घेऊन कवि तिचें समाधान करितात कीं, द्रोण हि बळाचा निधि होता व अर्जुनानें हि असा बळाचा निधि परिभूत केला, हें ते उभयतां शौर्यानें कांहीं वेळ लढल्याशिवाय कसें कळावें? म्हणून ह्या च सत्कीर्तीसाठीं अर्जुन त्वरा शिकला नाहीं गुरूनें हि त्याला ती शिकविली नाहीं. २. अन्वयार्थ—[आपलें] भजन (सेवा) कराया कास न कसते (सज्ज न होते) [तर] जन सुत कासया (कशाकरितां) विते (उत्पन करिते)? ३. इंद्र व उपेंद्र (इंद्राचा धाकटा भाऊ विष्णु). ४. कृपीपुत्र अश्वत्थामा व पृथापुत्र अर्जुन. ५. त्या उभयतां यशोधनांमध्यें हि शकुनीच्या अनीतीनें कलह लाविला. ६. सावकार—**चा. प्र.** ७. गुरुपुत्र अश्वत्थाम्याकडे. ८. कृष्णमित्र अर्जुन. ९. हरण केला आहे मणि ज्याचा अशा सर्पापेक्षां हि. १०. प्रलयकालीन मेघांच्या. ११. अश्वत्थाम्याच्या बाणांना. १२. चांगल्या बापापेक्षां. १३. लहान—**चा. प्र.** (कमी योग्यतेचा). १४. शत्रुरूप लक्ष्याला, निशाणाला. १५. सोडिता झाला. १६. परक्याला.

ज्या इषुनीं[1] क्षत[2] होतां रागें[3] वरि आंत ही हर[4] भरे, हो!
ते द्रौणिशरा, जैसे कपिला दासें[5] दिले हरभरे, हो! २८
तें सुर, नर, हय, गज, 'हा!' म्हणति, न यांचे[6] चि आठ वाजी 'हा!'
घडलें गुर्वघ[7] जाया, अद्भुत संग्राम आठवा जी! हा. २९
आचार्यसुतें केली छिन्ना[8], सोडूनि खरशरा[9] ज्या[10], तें
पाहुनि मुनि हि म्हणति, 'हा! पावेल[11] अजातरिपु न राज्यातें.'
भीष्मेंद्रमुख[12]नरामर म्हणति, 'भला गा! भला महाबाहो!
त्वद्दोःप्रताप[13] अतितर अद्भुत चि, कधीं उणा न हा बा! हो.'
हांसे नारायणसख तें सज्य पुन्हा करून कोदंड,
जें काळासि म्हणे, 'गा! झांक, मजपुढें करूं नको दंडें[14].' ३२
शक्र म्हणे, 'व्यर्थ भरीं हा[15], त्यजुनि विचार तर्क, विप्र भरे,
वत्सा[16]! तुझ्या शरानीं केला सुप्रभ हि अर्क विप्रभ रे!' ३३
स्त्रीस म्हणे, 'वत्साचे तैसे गुरुसूनुचे शचि[17]! न भाते,
अक्षय्य[18] काय असते, तरि करिते निरवकाश चि नभा ते.' ३४
प्रतिरवमिषें[19], शरानीं भरतां, कुंथावयासि नभ लागे;
देवी[20] म्हणति, 'सख्यानो! दारुण हा क्षत्रधर्म, न भला, गे!'
करितां तुमुलतर[21] समर, शर सरले, गुरुसुतीं उणें होतें,

---

१. बाणानीं. २. जखमा. ३. क्रोधानें (पक्षीं) प्रेमानें. ४. [किरातरूपी] शंकर. ५. भाविक मनुष्यानें. ६. यांचे=अर्जुन व अश्वत्थामा यांचे. (?). ७. महापातक. ८. भग्न. ९. तीक्ष्ण बाणास. १०. [अर्जुनाच्या] धनुष्याची दोरी. ११. अर्जुनाच्या धनुष्याची दोरी तुटल्यामुळें तो विजयी होणार नाहीं व मग अर्थात च धर्माला राज्यप्राप्ति हि होणें नाहीं असें मुनींना वाटलें. १२. भीष्म, इंद्र इत्यादि मनुष्य व देव. १३. तुझा बाहुप्रताप. १४. यमदंड. ('माझ्यापेक्षां काळाचा हि दंड उग्र नाहीं' असें तें अर्जुनचाप म्हणे, असा भाव). १५. अश्वत्थामा. १६. अर्जुना! १७. हे इंद्राणि! १८. द्रौणीचे भाते [अर्जुनाच्या भात्याप्रमाणें] [जर] काय अक्षय्य (ज्यांतील बाण संपत नाहींत असे) असते तर त्यांनीं सर्व आकाश भरून टाकले असते. १९. प्रतिध्वनीच्या रूपानें. २०. देवांगना २१. भयंकर. अत्यंत निकराचें.

पूर्णत्व पांडवीं, हें एकें हरिदासतागुणें हो! तें. ३६
झाले भाते समरीं, आणाया गुरुसुतीं उणीव, रितें;
देती सामग्री[1] जय, तरि कां सन्नीतिला गुणी वरिते? ३७
भंगे[2] अश्वत्थामा; अश्वत्था मा क्वचित्, सदा हरिला;
तसि इतरासि जयश्री, नित्य हरिजनासि, तो तिणें वरिला.
करितां पार्थें गुरुसुत घट[3]जमुनिवरें समुद्रसा चि रिता,
धावे कर्ण, गजावरि खर[4] नखरानीं तया जसा चिरितां[5]. ३९
कर्णधनुर्ध्वनि कर्णीं शिरतां, तिकडे चि पार्थ तो पाहे,
राहे[6] अश्वत्थामा, कढले चढले अपार कोपा हे[6]. ४०
पार्थ म्हणे, 'रे! कर्णा! बहु भट मजसीं भिडोनि गडबडती,
ही आजि आजि[7] आहे, नोहे केली सभेंत बडबड ती. ४१
तेव्हां पांच हि आम्हीं होतों दृढ धर्मपाशबद्ध[8], रणीं
आतां सुटलों, खळ हो! कसि हरिली कपट करुनि सद्धरणी[9]?
कत्थन[10] सुकर, सुदुष्कर समर, अमर यमरवींद्रमुख[11] हि तुला
होउत सहाय, न जयें होय खळांच्या कधीं हि सुख हितुलीं[12].
जें गांजिली कुरुसभेमध्यें त्वां बायको निकर करुनीं,
बांधावें चि यमें तुज पुरजे[13] तें नायकोनि करकरुनीं. ४४
तेव्हां यमधर्माचें अस्मद्धर्मापुढें न बळ मांडे,

---

१. साधनसंपूर्णता. २. अन्वयार्थ—अश्वत्थामा भंगे; [कारण], अश्वत्था (पिंपळाला) मा (लक्ष्मी) क्वचित् (फक्त शनिवारीं प्रातःकाळीं अश्वत्थापाशीं लक्ष्मीचा वास असतो असें शास्त्रवचन आहे.) वरिते, हरिला सदा वरिते; तसि जयश्री हरिजनासि नित्य, इतरासि क्वचित् वरिते. [म्हणून] तिणें (जयश्रीनें) तो (अर्जुन) वरिला. ३. मुनिश्रेष्ठ अगस्तीनें. ४. तीक्ष्ण. ५. चिरणारा. (सिंह). ६. तो अश्वत्थामा एकीकडे च राहिला, व हे कर्णार्जुन च अपार क्षुब्ध झाले. ७. युद्ध. ८. प्रतिज्ञापालनरूप धर्मपाशानें बांधलेले. ९. सज्जनांची भूमि. (आमचें राज्य). १०. बडबड. ११. यम, रवि, इंद्र, इत्यादि. १२. चित्ताला. १३. पुरजे?

आजि तुम्हीं ओगरिलां[1] कोळामत्रांत[2] सर्व खळ मांडे[3].' ४५
कर्ण म्हणे, 'आलों बळ दावायास, स्वयें पहायास,
शोभे समरीं च, तसा न भटांचा भाषणीं महायास. ४६
बहु कर्म करी पंडित, कथनावसरीं[4] हि थोडकें च वदे,
शाकांत[5] प्रवर[6] जसें पथ्य हि, तैसें न दोडकें चव दे. ४७
केला पण पूर्ण म्हणसि, आलासि करावयास कळहास,
ये, मजसीं युद्ध करीं, हो भग्न, करोत हे सकळ हास[8]. ४८
तूं काय? वासवास हि पळवीन रणांत आजि भंगुन, गा!
बहु हास्य येतसे, कीं, पाहे लंघावयासि पंगु नगा!' ४९
पार्थ म्हणे, 'राधेया! करुनि पलायन हि तूं न लाजसि रे!
साध्वी विटालयीं[9] जसि, तसि बहुधा त्वन्मनीं न लाज सिरे.
मारविला मजकरवीं त्वां अनुजें[10], न तारिला, न तारविला,
जारविलासन्याय[11] स्मरला यां[12] खळतमाचिया रविला.' ५१
ऐसें वदोनि, सहसा, न पहावा साधुधर्महानिकर[13]
म्हणुनि शरांचा सोडी, झांकाया त्यासि, तो महानिकर[14]. ५२
हस्तीं[15] हाणुनि खरतर शर, नरमुष्टीस कर्ण समरांत
सहसा विशीर्ण करिता, जाला होता हि मान्य अमरांत, ५३
त्या कर्णाच्या तोडी तो हरितनुजनु धनुष्यवल्लीला[15].

---

१. वाढले गेलां. २. (मृत्युरूपी) पात्रांत—**चा. प्र.** ३. पक्वान्नविशेष. ४. बोलण्याच्या प्रसंगीं. ५. भाज्यांत. ६. शाकविशेष (परवर). ७. शाकांत प्रवर जसें पथ्य [आणि] चव हि दे, तैसें दोडकें न. ८. उपहास. ९. जारगृहीं. १०. आपला धाकटा भाऊ. ११. जारविलास क्षणिक व नश्वर, तद्वत् तुझें बंधुप्रेम! १२. मज—**चा. प्र.** १३. सद्धर्माचा नाश करणारा. (कर्ण). १४. मोठा समूह. १५. अन्वयार्थ—समरांत हस्तीं (हाताचे ठिकाणीं) खरतर शर हाणुनि नरमुष्टीस (अर्जुनाच्या मुष्टीस) सहसा (एकाएकीं) विशीर्ण (भग्न) करिता (करणारा) [जो] कर्ण अमरांत हि मान्य जाला होता त्या कर्णाच्या धनुष्यवल्लीला तो हरितनुजनु (इंद्रपुत्र अर्जुन) तोडी.

जन म्हणति, 'मूर्त काळ चि हा, वरि दावी मनुष्यवल्लीला[1].'
उग्रें कोपें रोपें[2] भेदी मूर्छार्थ अंगपोराला[3],
रवि हि तमांत बुडे हो! न घडों द्याया कुंसंग[4] पोराला. ५५
हरिहरगुरुप्रसादज[5] अमित निजभुजप्रताप कळवीला,
वळवीला कर, जाणों, तो गर्वयशःसमेत[6] पळवीला. ५६
भीष्मावरि[7] जातां धृतिमान् केला जेंवि वज्रकवचानीं,
श्रांत भ्रांतस्वांत स्वांतत्रासार्त उत्तर वचानीं. ५७
तद्धैर्यार्थ स्वयशें वर्णी स्वमुखें, जऱ्ही न वानावीं,
स्थिर त्यासि रथीं करि, गुरु जैसा हरिच्या सुमानवा नावीं. ५८
कुरुगुरुपितामहांसीं जिष्णु करायासि जाय कळहातें,
कीं साधुच्या हि साधु हि पावे दुःसंगभंगफळ[8] हातें. ५९
नारायणप्रियसखें सर्वमुनिवरें नरें सुरोपास्यें[9]
प्रथम चि पितामहाचा ध्वज तोडुनि पाडिला सुरोपास्यें[10]. ६०
पाखंडागम[11] रोधूं पाहति, येऊनि आड, वेदास;
पार्थासि तसे कौरव, ज्या यावे एक आडवे[12] दास. ६१
खळ दुःशासन दुःसह आणि विविंशति विकर्ण हे चवघे
विजयें दमुनि पळविले, दोष जसे दाशरथिगुणें अवघे. ६२

---

१. मनुष्यवत् लीला. २. बाणानें. ३. कर्णाच्या उराला. ४. कु=पृथ्वी, तिचा संग. (पृथ्वीवर पतन). ५. हरि, हर व गुरु (द्रोण) यांच्या कृपेपासून उत्पन्न झालेला. ६. गर्व व यश यांसहवर्तमान. ७. अन्वयार्थ—भीष्मावरि [चालून] जातां श्रांत (थकलेला), भ्रांतस्वांत (भ्रमिष्ट झालें आहे चित्त ज्याचें असा) [आणि] स्वांतत्रासार्त (आपला अंत होईल या भयानें व्याकुळ झालेला) उत्तर जेंवि वज्र-कवचानीं (अभेद्य कवचानीं) तेंवि [अर्जुनाच्या] वचानीं (शब्दानीं) धृतिमान् केला. ८. साधु भीष्म हि साधु अर्जुनाच्या हातें दुष्ट कौरवांच्या संगतीमुळें पराभवरूपी फळ पावला. ९. सुरानीं उपासना करण्यास योग्य अशा नरें (अर्जुनानें). १०. चांगल्या बाणांच्या तोंडानें. ११. नास्तिकांचीं शास्त्रें. १२ दासपक्षीं सामोरे व कौरवपक्षीं प्रतिबंध करण्यास्तव.

सर्व महारथ[1] म्हणती त्या विजया, वासवा जसे नग, 'हूं,'
केले पिष्ट असुरगिरि जेणें, किति त्यास ते ससेन[2] गहूं? ६३
हरिनीं गजसे, कुरुभट जिष्णुशरानीं उदंड लोळविले,
दिव्यांगनांसह गगनयानीं मग बैसवूनि बोळविले. ६४
क्षतजनद्या[3] पक्षिरवें[4] म्हणती वीरांसि, 'आयका, मन द्या,
आम्हांऐशा बुडवुनि करिति दुज्या पूर्ण काय काम नद्या?' ६५
युद्ध न हरिसख मांडी, त्या सद्यःस्वर्गहेतुसत्त्रास[5];
जाले सहस्रशः कृतकृत्य, न जाले कृतार्थ सत्त्रास[6]. ६६
कर्ण, कृप, द्रोण पुन्हा धावुनि पार्थासि एकदा चि तिघे
झांकिति दिव्यास्त्रानीं, तैं तो पळभरि महाचळस्थिति[7] घे. ६७
योजुनि इंद्रास्त्रातें, पळवी सकळांसि तो महातेजा,
भीतिल त्या रिपु न कसे? भीती गगनस्थ[8] ही पहाते ज्या. ६८
द्रोणाद्यखिळ पळवितां, भीष्मप्रभु कार्मुकासि आकर्षी[9],
केतुस्थ[10] वानराला ताडी, तों खिन्न होय नाकर्षी[11]. ६९
नर तच्छत्रें[12] छेदी, लाजे पूर्णेंदु पांडुरें[13] ज्यातें,
सत्सुतकृतनिजपूर्वजलंघन ही श्लाघ्य पांडुराज्यातें[14]. ७०

---

१. दहा हजार प्रतिपक्ष्यांशीं लढणारा तो महारथ, अगणितांशीं लढणारा तो अतिरथ, एकस्याशीं लढणारा तो रथ आणि त्याहून अल्पबळ तो अर्धरथ असे रथांतून युद्ध करणाऱ्या वीरांचें चार भेद आहेत. २. ते ससेन (सेनेसह असे कौरवरूप) गहूं. ३. रक्ताच्या नद्या. ४. पक्ष्यांच्या शब्दरूपानें. ५. तत्काळ स्वर्ग देणाऱ्या यज्ञास. ६. भित्रे, सभय. (भित्रे कृतकृत्य झाले नाहींत, तर शूर झाले). ७. महापर्वताचें स्थैर्य. ८. आकाशांतून पाहणारे देव. ९. ओढी. १०. ध्वजावरील मारुतीला. ११. नारद. (हा आकाशांतून हें युद्ध पाहणाऱ्यांत होता. राम-रावण युद्धांत अद्वितीय पराक्रम गाजविलेल्या मारुतीला अर्जुनाच्या ध्वजावर बसून भीष्माचा शस्त्रप्रहार घ्यावा लागला, याचें नारदाला वाईट वाटलें). १२. भीष्माचीं छत्रें. १३. ज्या पांढऱ्याशुभ्र छत्रातें. १४. पांडुराजातें त्याच्या सत्पुत्रानें (अर्जुनानें) केलेली [भीष्मपराभवरूप] आपल्या पूर्वजाची अवज्ञा ह श्लाघ्य (प्रशंसनीय) होय.

चित्तीं भीष्म म्हणे, 'मजवर कर शस्त्रास्त्रवृष्टि, वत्सा! हूं,
आम्हीं पुण्ययशोर्थ स्वशरीरीं दिव्यवृष्टिवत् साहूं.' ७१

नर हि म्हणे, 'ज्यासि दिले स्वमुखींचे त्वां पितामहा! घांस,
तो हा तुसीं झगडतो, होवुनियां स्थापिता महाघांस[1].' ७२

पांघुरविलें स्वयें प्रियपौत्राला शस्त्रवस्त्र शांतनवें!
तत्काळ योजिलें हो! पहिलें होतां चि अस्त्र शांत, नवें. ७३

योजी आज्यावरि शरपटळ, करुनि चाप सज्ज, नातू, तें
पाहुनि कुळज कवि म्हणाति, 'हें परम श्लाघ्य सज्जना! तूतें.'

भीष्में विजयें हि सम चि शस्त्रपटळ सबहुमान वारावें,
अमररवें[2] चि भरावें तें नभ बहु न बहुमानवाऽरावें[3]. ७५

मानी[4] वृद्ध प्रेक्षक म्हणती, 'अपयश कधीं न यो जीनां[5].'
तरुण म्हणती, 'असोनि श्रीपाशुपत हि अधीन योजींना!' ७६

साधु प्रेक्षक सुर नर म्हणाति, 'भला! साधु! धन्य! शांतनवा!
तूं रविसा, दीपकसा योद्धा होता चि अन्य शांत[6] नवा[7]. ७७

पार्थप्रतिभट[8] गुरु[9] कीं जो[10] होय निमित्त पूतनामरणीं
कीं तो प्रभु[11], विजयप्रद ज्याचें मुनिवित्त[12] पूत[13] नाम रणीं.' ७८

निजकुळगुरुस्तुति[14]प्रति परिसुनि, अभिमन्युचा पिता महती[15]
तच्चापलता[16] खंडी, वर्णी धानुष्कता[17] पितामह ती. ७९

पार्थमनीं, 'साधावी, जिंकुनियां कुरुपितामहा महि म्यां,
ऐसा चि पात्र व्हावा सुरलोकीं गुरु पितां[18] महामहिम्या.' ८०

---

१. महापापांला. २. देवांच्या 'जयजीव' शब्दानें. ३. बहुत मनुष्यांच्या आरोळ्यानीं. ४. अभिमानी. ५. म्हाताऱ्या भीष्माला. ६. नष्ट. ७. नूतन, तरुण. ८. अर्जुनाची बरोबरी करणारा योद्धा. ९. भीष्म, द्रोण. १०. जो श्रीकृष्ण. ११. श्रीशंकर. १२. मुनींचें धन च असें. १३. पवित्र. (अर्जुनाची बरोबरी करणारे योद्धे गुरु, कृष्ण व शंकर हे तिघे च शोभतील). १४. भीष्माच्या स्तुतिप्रत. १५. मोठी. १६. भीष्माची धनुष्यवल्ली. १७. [अर्जुनाचा] धनुर्धरपणा. १८. पांडु.

केलें सज्ज धनु असें अतिसत्वर त्या समस्तयोधनुतें[1]
कीं, देशशताक्ष[2] हि म्हणे, 'तुटलें नाहीं च काय हो! धनु तें?'
वरकड चित्र चि झाले केवळ तें चित्रसे न ते[3], ज्यांतें
हरिहर मानुनि, वर्णी हरिपासीं[4] चित्रसेन ते ज्यांतें[5]. ८२
देवी म्हणाति, 'न भ्यावें, हो सावध, हे! सुरापगे[6]! सारे[7]!
त्वत्सुत ज्यांच्या पक्षीं, खळ केवळ हे सुराप[8] गे! सारे.' ८३
त्यांचा श्रम शमवाया बहु शीतल मंद गंधवह[9] वाहे,
शक्र स्वयें हि त्यांवरि पुष्पें प्रेमाश्रुबिंदुसह वाहे. ८४
सुरपुष्पवृष्टिला न स्पर्शो देती तयां तदिषुवृष्टि[10],
कीं मधुपचुंबिता[11] त्या पतितां[12] त्यांच्या पडो नये दृष्टि. ८५
खंडी धनुष्य, घाया निजनिपुणत्वें प्रमोद पुनरपि त्या;
[13]स्वगुणोत्कर्षें पूर्वज जिंकुनियां सुखविती, न कुनर पित्या. ८६
तुटलें कीं न अशा या घाली जों संशयांत देव पुन्हा,
तों पार्थ म्हणे, 'आर्या! स्वांबास्त्रें[14] शुद्ध होवु दे वपु, न्हा.' ८७
साहुनि पितामहाचे, त्याच्या पार्श्वीं[15] च तो असुख[16] रचितें
हाणी सत्वर खरशर दश, अमराचे हि ते असु खरचितें. ८८
त्या खरशरप्रहारें जों पावे मोह आपगेय[17] महा,
देवी गंगेसि म्हणाति, 'नातु नव्हे, बाइ! आपगे! यम हा.' ८९

---

१. सर्व योद्ध्यानीं स्तुत अशा. २. इंद्र. (भीष्माच्या हातांतील धनुष्य तुटतां च दुसरें धनुष्य घेण्यांत त्यानें इतकें चापल्य दाखविलें कीं, सहस्रनेत्र इंद्राला हि भीष्माचें धनुष्य तुटलें कीं नाहीं ही च शंका आली). ३. भीष्मार्जुन. ४. इंद्रापाशीं. ५. [भीष्मार्जुनांच्या] पराक्रमांतें. ६. हे देवनदि गंगे! ७. सारभूते! ८. मद्यपी. ९. वायु. १०. त्यांच्या बाणांच्या वृष्टि. ११. भृंगस्पृष्टा (पक्षीं) मद्यपानीं चुंबिलेल्या. १२. पडलेल्या (पक्षीं) भ्रष्टा. १३. अन्वयार्थ— [सुनर] स्वगुणोत्कर्षें पूर्वज जिंकुनियां (पूर्वजापेक्षां अधिक पराक्रम गाजवून) पित्या सुखविती; [परंतु] कुनर न. १४. आपल्या मातेच्या (गंगेच्या) अश्रूंनीं. १५. कुशीवर. १६. दुःख. १७. नदीपुत्र भीष्म.

कुरु म्हणति, "हाय! हाय! न व्हावा हा हरिचिया[1] हि हत[2] हातें,
त्या प्राकृतांसि युक्त चि, गीर्वाणांला[3] हि म्हणति 'बत[4]! हां!' तें."
दुःखद हि सुखद म्हणती कपि नारद 'रामराम! शिवशिव!' तें;
यद्ध्वनि पतिता जीवा, बापा मुलसें, बळें चि शिव शिवतें. ९१
पडतां मूर्छित नेला माघारा भीष्म जाणत्या सूतें;
ईशप्रहिता देइल, दुःख न ज्या दिव्य बाण, त्या सू तें. ९२

अध्याय सहावा.

जाले कर्णकृपगुरुप्रभृतिमहावीरभंग[5] नउ ठावें,
स्वबळ[*] हि तर्हि कुरुप उठे, जर्हि शिंक[6] म्हणे, 'कदापि न उठावें.'
हाणी भल्ल[7] ललाटीं, त्यासि म्हणे पार्थ, 'हाण, चवताळ[8],
धृष्टा[9]! दुष्टा! भ्रष्टा! तुझिया वृत्तीं[10] नसे चि चव[11] ताळ[12].' २
हांसे तो भटतल्लज[13], भल्लज[14] पीडा न तल्ललाटांत[15],
हेतींत[16] पोहणारा, सिंधूच्या जेंवि मल्ल लाटांत. ३
होय कुरुप नरशरपरिवृत[17] दववृत[18] जेंवि कुंज[19] रानीं, कीं
शिरला शरगणपंचानन[20] त्या कुरुकटककुंजरानीकीं[21]. ४
धावे विकर्ण सत्वर कीं तो निष्फळ असो नरायास[22],

---

१. इंद्राच्या. २. नष्ट. ३. देवांना. ४. खेदोद्गार. ५. कर्णकृपादि नऊ वीरांचे पराभव. ६. शिंक येणें हा प्रसंगानुसार शकुन किंवा अपशकुन समजतात. ७. बाण. ८. चीड, रागाव. ९. उद्धता! १०. वर्तनांत. ११. गोडी. (ग्राह्यांश). १२. तारतम्य, मर्यादा. १३. प्रशस्त भटः—**चा. प्र.** १४. बाणापासून झालेली. १५. त्या अर्जुनाच्या कपाळांत. १६. शस्त्रांत. (समररूप सागराच्या शस्त्ररूपी लाटांत). १७. अर्जुनाच्या बाणानीं व्याप्त. १८. वणव्यानें व्याप्त. १९. वेलींचीं जाळीं. २०. बाणसमूहरूप सिंह. २१. कौरवसैन्यरूपी हत्तीच्या कळपांत. २२. अर्जुनाचे श्रम (प्रयत्न). * आपलें हि सामर्थ्य ठाऊक होतें तरी दुर्योधन उठला.

प्राणव्यसनीं सोडिल केंवि, भ्राता असोन, रायास? ५
नर शर त्यावरि सोडी, वधिती तत्काळ त[1]न्महेभा ते;
प्रेमें म्हणे, 'पुजावे म्यां धनुसह बहुत जन्म हे भाते.' ६
[2]खळतत्सहायभंग चि निजसद्व्रत हें मनांत आणून,
प्रथम विकर्ण पळविला, मग नृप, [3]तदुरांत बाण हाणून. ७
मिळतां त्रि[4]वर्गसद्यश, सज्जन भेदील कां न नी[5]चोर?
जो खळ सर्वस्व हरी धर्माचें जेंवि काननीं चोर. ८
कुरुप म्हणे, 'बा! सूता! दे मज असुदान, हाक हाक [6]हरी.'
प्राकृत न म्हणतिल कसें, 'कां खवळविला [7]नैहाक हा क[8]हरी?'
पळतां सुयोधनातें, पार्थ म्हणे, करुनि बाहुशब्द, "अरे!
कोठें जाशिल? नाशिल तुज दहना[9] [10]मद्धनुःसदब्द अरे! १०
[11]वृद्धांधगुरुमिथुन [12]हो बहु धन्य परंतपा! परत रे! तें.
न मळो, जाला अससी ज्या शुद्धकुळीं, अपापरत, रे! तें. ११
केले होते कीं त्वां गुरुपाशीं क्षत्रधर्म मुखपाठ!
देती वृद्ध चि उष्णा कीं दहना व्हावयासि सुख पाठ? १२
कांपसि भयें? रणसमय हेमंतसमय नव्हे, तुझी आण;
मीं सत्य [13]धनंजय, परि पार्थ, नव्हें [14]असितपथ, खरें जाण. १३

---

१. त्या विकर्णाच्या मोठ्या हत्तीला. २. दुष्ट व त्याचा सहायकर्ता यांचा पराभव करणें. ३. त्याच्या छातींत. ४. धर्म, अर्थ, काम आणि उत्तम कीर्ति. ५. नीचाचें ऊर. ६. घोडे. ७. व्यर्थ. ८. कहर—अनर्थ करणारा. ९. अग्नीला. १०. माझें धनुष्य हा च उत्तम मेघ. ११. वृद्ध व अंध अशा धृतराष्ट्रगांधारीचें जोडपें. (पति अंध असल्यामुळें आपले डोळे बांधून गांधारी हि अंध झाली होती). १२. अन्वयार्थ—रे! परंतपा (शत्रुतापना!) परत; तें वृद्धांधगुरुमिथुन बहु धन्य हो. रे! ज्या शुद्धकुळीं [तूं] झाला अससी तें अपापरत (पापकर्मांत आसक्त न होणारें) कुळ [तुझ्या पलायनानें] न मळो. १३. अर्जुन (पक्षीं) अग्नि. १४. अग्नि. (अग्नीचा मार्ग—जळाल्याची खूण काळी असते म्हणून अग्नीला असितपथ, कृष्णवर्त्मन् अशीं नांवें आहेत).

म्हणतां, 'पुण्ययशःसुखहेतु स्वर्दान[1]' कां, 'नको, राहो'?
ऐका निजमतिचें, अभिमानमळनिरुद्ध[2] कान कोरा हो! १४
स्वर्गतिकपिलादान चि घे, बहुहित हें चि तुज सुपात्रास,
असु वसु[3] चि मानले, परि याला बहु काळदस्युचा[4] त्रास. १५
यश चि यशोभिरता[5] बहुमत, नाम चि एक जेंवि नामरता,
अपयश चि कुजन सेवी, जाणुनि ही पथ्य जेविना मरता. १६
मान विसरलां कीं तो सरला? रुसलां अहो! सुयोधन! हो!?
प्राणरहित हो, परि पळभरि मानरहित कधीं सुयोध न हो.
जसि कीर्ति सदा हरिस, न तसि आवडली नवी रमा नवरी,
स्वांतःपुरांत ही, जो गतकीर्ति[6], करी न वीर मान वैरी[7]." १८
इत्यादि नर वदे जें, जालें त्या कुंजरासि[8] अंकुश[9] तें,
सद्वचनें[10] दुखवे खळहृदय, जसें तप्तलोहशंकुशतें[11]. १९
परते पर पार्थावरि पदपीडितपुच्छभागतक्षकसा[12],
न उगारेल गरुडसा त्यावरि तो दुष्टनाशदक्ष कसा? २०
तेव्हां नृप रक्षाया सावध होता नदीज त्यामागें,
कर्णें हि वामपार्श्वीं[13] रक्षियला, निधि[14] जसा महानागें[15]. २१
त्याच्या दक्षिणपार्श्वीं अश्वत्थामा, पुढें कृपद्रोण.
दुःशासनादि बहु खळ होते, आर्यांत[16] योजितो कोण? २२
ते लागले समस्त हि शस्त्रांहीं एकदा चि वर्षाया,

---

१. पुण्य, यश व सुख यांला कारण असें स्वर्गदान. (रणमरणानें मिळणारा सुखकर स्वर्गवास). २. अभिमानरूप मलानें भरलेले. ३. धन च असे. ४. काळरूप चोराचा. ५. यशोलोलुपास. ६. गेली आहे कीर्ति ज्याची तो. ७. वर मान करित नाहीं, लज्जित होतो. ८. दुर्योधनरूप हत्तीला. ९. अंकुशाप्रमाणें टोंचणारें. १०. मूळपाठ—**खळहृदय साधुवचनें दुखवे, न सुतप्त लोहशंकुशतें.** ११. लोखंडाच्या तापलेल्या शेंकडों खिळ्यानीं. १२. पाय पडल्यामुळें दुखवलें आहे शेंपुट ज्याचें अशा सापाप्रमाणें. १३. डाव्या बाजूला. १४. ठेवा. १५. मोठ्या सर्पानें. १६. सज्जनांत (पक्षीं) कवितेंत.

हांसत म्हणे धनंजय, 'या हो! या, एकदा चि वर्षा, या.' २३
जैं स्वरथा हि नर शिवों एका ही [1]आशुगा न दे, वर्षे,
शक्र म्हणे, 'कर हरिहरविजयांचें [2]आशु गान, [3]देवर्षे!' २४
साधु म्हणति, "हा होय द्रोणप्रियशिष्य, होय हरदास,
होय [4]अजितसख, म्हणतिल [5]घनें 'गुरुजी' या [5]शरप्रकरदास."
प्रथम परास्त्रें वारी, [6]द्रुत मग [7]संमोहनास्त्र नर योजी,
चित्तांत म्हणे, 'गुरुजी! मनिं [8]बाणासुरसहाय हर यो, जी!'
संमोहनास्त्र, [9]चापप्रवर, [10]प्रोद्दाम देवदत्तदर,
मोहिति परा, नर तसा होय, जसा [11]वामदेव [12]दत्तदर. २७
पार्थ म्हणे, '[13]भगिनीचें स्मर उत्तर, उत्तरा! उतर, [14]वास
घे कर्णाचें, भ्रमले धनुच्या परिसोनि [15]राउत [16]रवास. २८
डसला [17]मोहाहि [18]ससुत गुरुस, मग न कां सुयोधना चावे?
एक [19]कबंध चि [20]सक्रिय हे हर्षाया सुयोध नाचावे. २९
जा, न हसावें, न तुवां भ्यावें, घेतां हरूनि वास, कृपा,
घे [21]मद्गुरुप्रसाद हि, [22]नत न लुटिति काय गा! शिवा सकृपा?
[23]गुरुसुतसुयोधनांचीं नीळें, [24]भरितें सदा नव [25]सुवासें,
घ्यावीं, त्यां काय उणें? कितिकां देती न दान [26]वसुवासें? ३१

---

१. बाणाला. २. लवकर. ३. नारदा! अर्जुनाला हरिहरांप्रमाणें मानून त्याच्या विजयाचें गान कर, असा भावार्थ. ४. कृष्णसख. ५. बाणाची वृष्टि करणाऱ्या या अर्जुनाला मेघ आपला गुरु समजतील; कारण, अर्जुनाची शरवृष्टि ही मेघवृष्टीपेक्षां हि मोठी होती. ६. लगेच. ७. मूर्छित करणारें पण हिंसा न करणारें असें एक अस्त्र. ८. बाणासुराचा सहायकर्ता. ९. धनुःश्रेष्ठ. (गांडीव). १०. अति गंभीर. ११ शंकर. १२. दिली आहे भीति ज्यानें असा. १३. उत्तरेचें. "दिव्यरुचिरवस्त्रांतें आण करायासि बाहुल्या" इत्यादि वचन. १४. वस्त्र. १५. घोडेस्वार. १६. शब्दास. १७. मोहरूपी सर्प. १८. पुत्रासहित द्रोणाचार्यांस. १९. धड. २०. चेतनायुक्त. २१. माझ्या गुरूची कृपा. २२. नम्र. २३. अश्वत्थामा व दुर्योधन यांचीं. २४. भरलेलीं. २५. सुगंधानें. २६. द्रव्य आणि वस्त्रें.

भ्रमला नसे महात्मा, आहे याहुनि हि शांतनव साजो,
शिवसा पावत आला, व्हाया व्यसन प्रशांत, नवसा जो.' ३२
हरवी बाळाकरवीं त्या पांचांचीं हि कीर्तिसह वासें,
बुडती च सदहितांच्या[1] बहु थोरांची हि कीर्ति सहवासें. ३३
भीष्माची परमसुखा विजयिहरिजना पहात पावे धी;
मग मुरडितां चि रथ तो, इषुनीं त्यातें महातपा[2] वेधी. ३४
पार्थ हि त्याच्या वेधी, सोडुनि शीघ्र क्षुरप्र[3], वाहांतें[4],
तत्सूताचें[5] हि धरी विजयविशिखहत[6] उर प्रवाहांतें. ३५
कुरुकटकांतूनि निघे घन*घनपटलामधूनि जेंवि रवी,
हरिजनतेज न वदवे, षडरींस हि, अरि वधूनि, जें विरवी[7]. ३६
हरिजन हरिसम सत्य, स्वरिपूस हि पार्थ सुगति दे वधुनीं,
आहे त्याची हि सदाचरणप्रभवा[8] सुकीर्तिदेवधुनी[9]. ३७
हे तों एक प्रभु, नरनारायण यांत भेद न गमो, जी!
यांच्या गुणापुढें न त्रिदशांचा[10] आपणासि नग[10] मोजी. ३८
भूप[11] म्हणे, 'ज्या एकें केले बहु हे असे परासु भट,
तो सोडिला कसा हो!? सोडिति जीवा, न परि परा, सुभट.'
हांसोनि नदीज म्हणे, 'हा काळवरि त्वदीय शक्तिमती[12]
कोठें गेल्या होत्या, चापलतेसह भुजा[13] हि शक्तिमती[14]. ४०
पार्थ बहु भला, तुमच्या तों आजि अपार्थ[15] कापिता माना;

१. सज्जनशत्रूंच्या. २. मोठें आहे तप ज्याचें असा. ३. बाण. ४. अश्वांतें. ५. त्याच्या सारथ्याचें. ६. अर्जुनाच्या बाणानें फोडलेलें. ७. विरघळवितें, नाहींसें करितें. ८. चांगल्या आचारापासून उत्पन्न झालेली. (विष्णुपक्षीं) 'सदा चरणप्रभवा' असा पदच्छेद. ९. चांगली कीर्ति ही च भागीरथी. १०. देवांचा वृक्ष, कल्पवृक्ष. ११. दुर्योधन. १२. शक्ति व मति. १३. बाहु. १४. शक्तियुक्त अशा. १५. व्यर्थ. * दाट अशा मेघपटलांतून.

या अभयदा, न व्हाया [1]नरजाति [2]अपार्थका, [3]पिता माना. ४१
बा! न द्रवे अधार्मिक; सर्व हि ये, परि न ये नटा कविता;
[4]अस्मद्वधार्थ [5]धृत असि याकरवीं काळ ही न टाकविता. ४२
जे काय दुरभिमानी, श्रमती जोडूनि अघ नर सदा ते.
भूपा [6]असदुपदेशद, [7]मरुपथिका जेंवि [8]अघनरसदाते. ४३
जावू गोधन, योध न वेंचावे, तूं पुरासि चाल कसा;
दे कर्णकृपद्रोणा रथ, मज ही [9]आतुरासि, [10]चालकसा.’ ४४
भूपाचें, उपदेशीं मग होतां गर्व शांत; न वच रणा.
वदला विहित हित म्हणुनि, नमिति मनें सर्व शांतनवचरणा.
परतों लागे जेव्हां कुरुबळ सोडूनि हुरुप दीनमनें,
विजय करी पाडुनि शर भीष्मद्रोणादिगुरुपदीं नमनें. ४६
मग कुरुपतिचें भेदुनि मुकुट, विखरिला धुळींत [11]मणिगण कीं;
भीमीं[12] भक्ति, बहु दया त्या ही तज्जन्मपत्रकरगणकीं. ४७
करि कृष्णसख [13]कुपतिची कुदशा केवळ, तथापि [14]कु रुसेना,
परते गरुडत्यक्ता जैसी नागी तसी च कुरुसेना. ४८
[15]पर ते प्रथम परतले, मग [16]नगभित्तनुज वीर तो परते.
[17]नरतेज किति तया, ज्या स्मरतां असुरवर युवतिसीं न रते?
[18]प्रभु [19]सुरदत्तदरातें वाजवि, परिसोनि तद्रवा हगती

१. मनुष्यजाति. २. निष्फला. ३. बाप. (भयापासून रक्षण करणारास आपला बाप समजावें. मनुष्यजाति उपकार स्मरणारी आहे, म्हणून अर्जुनाला पिता माना). ४. आमच्या वधाकारितां. ५. घेतलेली. ६. वाईट उपदेश करणारा. ७. मारवाडांतील प्रवाशाला. ८. पाण्यावांचून इतर रस देणारे. ९. पीडिताला. १०. जलद चालणारा. ११. रत्नसमुदाय. १२. भीमावर भक्ति असल्यामुळें त्याची दुर्योधनवधाची प्रतिज्ञा खरी व्हावी म्हणून व दुर्योधनाची जन्मपत्रिका करणाऱ्या ज्योतिषावर दया असल्यानें त्याचें दुर्योधनवधाचें भाकित खरें व्हावें म्हणून अर्जुनानें त्यास ठार केलें नाहीं. १३. पृथ्वीपति दुर्योधनाची, (पक्षीं) वाईट पतीची. १४. पृथ्वी. १५. शत्रु. १६. इंद्रपुत्र अर्जुन. १७. मनुष्यांची शक्ति. १८. अर्जुन. १९. देवदत्तशंखातें.

मुतती भयें, विसरती त्या कुरुकटकांत [1]भद्र [2]वाह [3]गती. ५०
तो [4]अभयदेश जातां मत्स्यपुरा, करुनि अभय देशपथें,
जे [5]भग्नभीतशरणागत कुरुभट त्यांसि अभय दे शपथें. ५१
हरुनि यशोधन गोधन, योध न गणित क्षयासि नेवून,
त्या [6]नृपपुत्रासि म्हणे, “चाल पुरा, हें [7]मनीं च ठेवून. ५२
यद्यपि सत्य वदावें [8]निजगुरुपासीं, तथापि [9]त्यासम जो
तुज बहुमत धर्म प्रभु, तदनुमतें हे कथा पिता समजो. ५३
म्हण ‘कुरुमर्दन, [10]गोधनमोचन, इत्यादि कर्म हें [11]माजें,’
[12]अनृत हि हित, साधूच्या रक्षी प्रेमा, तसें चि [13]हेमा जें.” ५४
‘साजेल कसा तुमच्या आंगींचा मज मुलास [14]पेरावा?
[15]लज्जाफळार्थ कैसा गुरुकर्णीं अनृतशब्द पेरावा? ५५
आहे [16]प्रसादकामुक, आज्ञा मोडील हा कसा दास?
म्हणतां तसें म्हणेल चि, [17]जड [18]कंदर दे चि हाक [19]सादास.’ ५६
जयकथन करिति जावुनि [20]नृपपुत्रप्रहित दूत नगरातें,
बाळांस हि न गिळों दे वदनींचा मधुर नूतन [21]गरा [22]तें. ५७
तीं स्वायुधें शमीवरि ठेववितां राघवा [23]वृषाकपिला
स्मरुनि कपि उडे, विजयश्री ज्यासि भजे, जसी [24]वृषा [25]कपिला.
मेला गगनपथें ध्वज जो निजतेजें म्हणे ‘उभा’ रविला,
पहिला [26]सिंहांकध्वज पार्थें त्या स्यंदनीं उभारविला. ५९

---

१. कल्याणकारक असे. २. घोडे. ३. जाणें. ४. अभय देणारांत
. ५. पराभवानें भ्यालेले म्हणून च शरण आलेले. ६. उत्तराला.
गुप्त ठेवून. ८. आपल्या पित्यापाशीं. ९. त्या पित्याप्रमाणें पूज्य.
. गाई सोडविणें. ११. माझें. १२. खोटें बोलणें. १३. सुवर्णाला. १४.
क. १५. लज्जारूप फल प्राप्त होईल म्हणून. १६. कृपेची इच्छा करणारा.
. निर्जीव. १८. दरी—**चा. प्र.** १९. प्रतिध्वनीस. २०. उत्तरानें पाठवि-
. २१. फणसाचा गरा. २२. कथन. २३. विष्णूला. २४. बैलाला. २५.
. २६. सिंहचिन्हाचा ध्वज.

झांकी वपुला[1] क्षतजें, बसतां वर्मीं[2] अरीषु[3], न्हाल्याला,
जाला सारथि पहिल्या योषावेषासि[4] तो पुन्हा त्याला. ६०
वैराटि रथी केला, सत्प्रेम[5] बहु श्रितीं, न बहु लेंकीं,
व्रीडद[6] महत्व त्या[7] तें, विजयजयश्रीविवाहबहुलें[8] कीं. ६१
विजयी विराट इकडे ये, पूजिति पौर विप्रजन यातें;
येतां चि सभेंत पुसे प्रेमें त्या उत्तरा स्वतनयातें. ६२
जन कथिति, "धेनु कुरुनीं वळिल्या, येवूनि उत्तराशेला[9],
त्वत्कीर्तिनें[10] पसरिला स्वपरित्राणार्थ उत्तरा शेला. ६३
गेला कुरु जिंकाया, आहे सारथि बृहन्नडा, गमला
सत्य कुमार[11] चि, वदला 'लागो अपकीर्तिचा न डाग मला.'"
भूप म्हणे, 'कुरु होतिल वारे, करितील आजि अभ्र[12] मुला[13];
दुःख सुदेष्णेला, जें शिरतां सिंहांत कलभ[14] अभ्रमुला[15]. ६५
अक्षत असाल ते जा, मेळविलें काल आर्य! हो! यश तें
लघु, गुरु हें घ्या, धीरां वीरांच्या सिद्ध कार्य होय शतें.' ६६
हांसुनि धर्म म्हणे, "हो! विजयिसुतातें पहाल नयनाहीं,
आहे बृहन्नडा जरि सारथि, तरि गोधनासि भय नाहीं. ६७
सारथि बृहन्नडा जरि, उत्तर मांसें भरील तरि भूतें[16],
परिभूतें[17] होतील चि तन्मंत्रेंकरुनि[18] आजि अरिभूतें[19]. ६८
ग्रालिल बृहन्नडा, जसि देवी[20] घाली नरामर[21] क्षेमीं[22],

---

१. रक्तानें न्हालेल्या शरीराला. २. मर्मस्थानीं. ३. शत्रूचे बाण. ४. स्त्रीवेषाला. ५. सज्जनांचें प्रेम. ६. लाज उत्पन्न करणारें. ७. उत्तराला. ८. विजय (अर्जुन) आणि जयश्री यांच्या विवाहाचें बहुलें. (तद्वत् निमित्तमात्र उत्तर). ९. उत्तर दिशेला. १०. तुझ्या (विराटाच्या) कीर्तीनें आपलें रक्षण व्हावें म्हणून उत्तररूप शेला पसरिला. ११. कार्तिकस्वामी. १२. मेघ. १३. उत्तराला. १४. हत्तीचा छावा. १५. हत्तिणीस. १६. पृथ्वीला. १७. पराभव पावलेलीं. १८. त्याच्या मसलतीनें. १९. शत्रुरूप पिशाचें. २०. दुर्गा. २१. मनुष्य आणि देव. २२. सुखांत.

वादी[1] म्हणेल 'उरचिन बाधा, घालीन रामरक्षे[2] मीं.'" ६९
ऐसें धर्म वदे, तों करिती येउनि सभेंत दूत नती[3],
कथिती विजयकथा, जी देणारी हर्ष नित्य नूतन, ती. ७०
"देवा! कुमार आला, सोडविल्या धेनु, पळविलीं कटकें,
'न वय प्रमाण तेजस्विजनीं[4]' म्हणती कवी, न तें लटकें." ७१
धर्म म्हणे, 'आयकिलें दूतांचें वचन चांगलें कानें,
राया! सुखरोमांचित[5] केलें कीं आजि आंग लेंकानें. ७२
सारथि बृहन्नडा ज्या, तद्विजयें[6] करुत बायका नवला,
चिंतामणिगलबालक[7] जो, दुर्लभ त्यासि काय कानवला? ७३
दूतांतें सुखवुनि नृप सचिवांसि म्हणे, 'गुढ्या उभारा हो!
पुर शोभवा, पुढें जा, राजपथीं विप्रजन उभा राहो. ७४
गाजत, वाजत, साजत, आज तया जतन करुनि आणा, हो!
मजमागें मत्स्याचा हा रिपुशशिराहुबाहु[8] राणा[9] हो.' ७५
यापरि वदोनि हर्षें, सामोरे सर्व लोक पाठउनीं,
आजि करावी अक्षक्रीडा[10] ऐसें मनांत आठउनीं, ७६
सर्वस्व[11] समर्पाया धर्मासि ब्राह्मणासि बाणकसें[12],
नृप कृष्णेसि म्हणे, 'गे! सैरंध्रि! मंदक्षपात्र[13] आण कसें.' ७७
धर्मासि म्हणे, 'हूं, या, मांडा उकलूनि रम्यतळ[14] पट, हो!'
कृष्णा हि म्हणे, 'मेल्यां अक्षकरांचें[15] समूळ तळपट हो.' ७८
'द्यूत करूं या' म्हणतां, धर्म म्हणे, "आवरूनि धी[16] राहें,

---

१. मंत्रवादी. २. रामरक्षामंत्राला. ३. नमस्कार. ४. तेजस्वी मनुष्यांत. ५. आनंदानें शहारे आलेलें. ६. त्या उत्तराच्या जयानें. ७. चिंतामणि (इच्छित वस्तु देणारें रत्न) आहे गळ्यांत ज्याच्या असा बालक. ८. शत्रुरूप चंद्राला राहूप्रमाणें आहे बाहु ज्याचा. ९. राजा. १०. द्यूतक्रीडा. ११. सर्व धन. १२. बाणासारखे. १३. मांझा सोंगट्यांचा पट. १४. सुंदर आहे तळ ज्याचा असा. १५. फांसे तयार करणारांचें. १६. बुद्धि.

सनावर्तीं पाडी, न निघों दे सावरूनि धीरा हें[२]. ७९
कामकोपलोभप्रमुखमहानर्थकोटिचें वेतन[३],
त!' न म्हणे कवण कितव? धर्म हि दुःखांत पावला पतन.
र्गी नळा हि देवन[६] दे वनवास प्रसिद्ध, उत्साहें
' न म्हणवे, विराटा निर्मोल प्राणहानि कुत्सा हे. ८१
हासह टाकूनि श्री, स्त्री, धी, कीर्ति ही कितव देतो,
ग्रह तरि प्रवर्तो द्यूत, नृपा! जो सखा, हित वदे तो." ८२
त प्रवर्ततां, तो भूप म्हणे, 'ऐकिलेंसि कंका! तें?
जिंकिले कुमारें, वय तरि अद्यापि उचित अंकातें.' ८३
र्ह म्हणे, 'हे कौरव किति? सूत बृहन्नडा कुमारा ज्या,
परीं अमरींच्या[१०] ही तो भय देईल कुंकुमा, राज्या!' ८४
स्य म्हणे, "रे! कंका! शंका सोडूनि बोलसी भलतें,
बासि मत्सुताधिक म्हणसी, हें वचन मन्मनीं सलतें. ८५
ा! रंका! सद्योजात[११] हि हरि[१२] भंगितो करिघटांतें[१३],
ांडाधिक हि घटज[१४], सेवुनियां सागरा, करि घटांतें. ८६
ाधमा! जरि मनीं वांचावें हें असेल, हो मूक[१५],
ुन्हा असें वद, सखा म्हणवुनि म्हणतों, 'न जीविता मूक.'"
र्ह म्हणे, 'जिंकाया शक्त न भीष्मादिकां नगारा[१६]ती,
गुरुपुढें विरे परशक्ति[१७], नृपा! होय कां न गारा[१८] ती? ८८
वरि बृहन्नडा चि प्रौढा, जसि दानवांवरि भवानी,
त्रें या दोघींचें यश भूपा! आदरें हरिभवानीं[१९]. ८९
गुरुसवें झगडतां त्या सुरगुरुचे हि ओंठ करपावे,

संकटाच्या फेऱ्यांत. २. द्यूतव्यसन. ३. मिरास. ४. हाय! हाय! ५.
६. अक्षक्रीडा—**चा. प्र.** ७. निंदा. ८. सुरू होवो. ९. मांडीवर बसण्यास.
ग्सियांच्या. ११. नुक्ता च जन्मलेला. १२. सिंह. १३. गजसमूहाला. १४.
ब्रह्मांडाधिक ही सागरा सेवुनियां घटांतें करी. १५. मुका. १६. इंद्र.
त्रूंचें बळ. १८. गाराप्रमाणें तत्काळ विरघळणारी. १९. हरिहरानीं.

विंध्यस्व
ऐसें सत
शिकवी
अक्षप्रह
तें स्वांज
धर्माभि
पतिहृद्र
तों तो
तेणें अत
तेव्हां कं
पाहोनि
रण नस
तो तत्क
हे सत्य
मारील
क्षत्त्यानें
राहे बा
उत्तर पि
तातासि
भूप म्ह
कीं, हा

१. विंध्या
हातांतील. ४.
आहे स्वर्ग ज
द्वारपालानीं.
अव्याकुळ आ

विंध्यस्कंधगशिशुचा[1] कां विधुच्या मंडळा न कर पावे ?' ९०
ऐसें सत्य वदे जों, तों घाली माळ अक्षमा[2] राया,
शिकवी युधिष्ठिराच्या भाळीं पाणिस्थ[3] अक्ष माराया. ९१
अक्षप्रहार होतां, वाहों लागे अशुद्ध[4] नाकानें,
तें स्वांजळींत[5] धरिलें, त्या शांतिक्षांतिविजितनाकानें[6]. ९२
धर्माभिप्रायज्ञा[7] कृष्णा ताटांत तें धरी रगत,
पतिहृद्गत साध्वीनें, नाडीनें जाणिजे शरीरगत[8]. ९३
तों तो उत्तर आला, द्वास्थानीं[9] त्या नृपासि जाणविला,
तेणें अत्युत्कंठित होउनि भेटावयासि आणविला. ९४
तेव्हां कंक हळू च क्षत्त्यासि[10] म्हणे, 'बृहन्नडा राहो,
पाहोनि हें, सभेंत न तत्क्षोभें रक्त नृपतिचें वाहो. ९५
रण नसतां मद्देहीं जो क्षत[11] कीं क्षतजलेश[12] काढील,
तो तत्काळ वधावा, जरि त्याला अमृत शक्र वाढील. ९६
हे सत्य तत्प्रतिज्ञा, या राज्याचें म्हणोनि हो हित, रे !
मारील विराटातें हें माजें देखतां चि लोहित[13], रे !' ९७
क्षत्त्यानें गुंतवितां, जरि सक्षत तरि निराकुलक्षणसा[14]
राहे बाहेर प्रभु[15], परम सुलक्षण हि तो कुलक्षणसा. ९८
उत्तर पित्यासि वंदुनि, पाहे कंकासि तों सभाकोणीं[16],
तातासि पुसे, 'ऐसा केला अन्याय हा महा कोणीं ?' ९९
भूप म्हणे, 'पुत्रा ! म्यां केला स्वकरें चि दंड या कंका;
कीं, हा करी प्रशंसा षंढाची, न च धरी मनीं शंका.' १००

---

१. विंध्याचलाच्या शिखरावर असलेल्या मुलाचा. २. असहनशीलता. ३. हातांतील. ४. रक्त. ५. आपल्या ओंजळींत. ६. शांति व क्षमा यानीं जिंकला आहे स्वर्ग ज्यानें. ७. धर्माचा हेतु जाणणारी. ८. शरीरांतील (रोग). ९. द्वारपालानीं. १०. द्वारपालास. ११. व्रण. १२. रक्ताचा लेश. १३. रक्त. १४. अव्याकुळ आहे उत्साह ज्याचा असा. १५. अर्जुन. १६. सभेच्या कोपऱ्यांत.

उत्तर म्हणे; 'अहाहा! केला अन्याय हा, धरा पाय,
ब्रह्मक्षोभ[1] स्वर्गापाय[2] हि, केवळ नव्हे धरापाय[3].' १०१
नमुनि विराट म्हणे, 'बा कंका! चुकलों, महायशा! पावें,
न मला सख्या तुवां, या मदघा[4] घेउनि सहाय[4], शापावें.' १०२
कंक म्हणे, "सोड चरण, मज 'सोसावें' असें जरि न कळतें,
गळतें रक्त महीवरि, तरि हें त्वद्राष्ट्र तत्क्षणीं जळतें." १०३
शमतां शोणितधारा, संपादी धर्मराज तो शुचिता[5];
तों ये बृहन्नडा, मग दावी जी रीति आपणा उचिता. १०४
राजा म्हणे, 'कुमारा! या वृत्तें[6] लाज त्या कुमारा[7] हो;
निंदुनि इंदुनिभयशा[8] क्षण मौनव्रतपरा[9] उमा[10] राहो. १०५
त्वां जिंकिला कसा तो अश्वत्थामा? तसा चि तो कर्ण?
तो हि द्रोण महात्मा दिव्यधनुर्वेदशंभुगोकर्ण[11]? १०६
केला कसा कृपाचा भंग? कसा पळविला सुयोधन गा!?
कैसा भीष्मप्रमुखा स्वभुजअशनि[12] कळविला सुयोधनगा[13]?'
उत्तर म्हणे, 'पित्या! कुरु पाहुनि, झालों भयाकुळ, पळालों,
सिंह प्रेक्षुनि यूथभ्रष्टकलभसा[14] च मीं बहु गळालों. १०८
मरणेच्छुनिर्धना[15] जें दाता, सोडूनि सुजळ, दे वसुतें[16],
जैसें यश, तैसें हें केलें मद्वदन उजळ देवसुतें[17]. १०९
मज सारथि करुनि रथी झाला, विद्या प्रकाम[18] रुद्रा ज्या

---

१. ब्राह्मणांस आणलेला राग. २. स्वर्गहानिकर. ३. इहलोकीं अपायकारक. ४. माझ्या पापामुळें. ५. स्वच्छपणा. ६. विजयाच्या बातमीनें. ७. कार्तिकेयाला. ८. चंद्राप्रमाणें शुभ्र अशा यशाला. ९. मूकभाव धारण करणारी. १०. पार्वती. ११. दिव्य असा धनुर्वेद हा च शंभु, त्याला गोकर्णक्षेत्राप्रमाणें आश्रयस्थान असा. १२. खड्ग. १३. उत्तम योद्धे हे च पर्वत, त्याना. १४. कळपांतून चुकलेल्या हत्तीच्या छाव्यासारखा. १५. मरूं इच्छिणाऱ्या निर्धनाला. १६. द्रव्याला. १७. देवपुत्रानें. (अर्जुनानें सांगितल्याप्रमाणें गोप्यस्फोट होऊं नये म्हणून उत्तरानें येथें 'देवसुत' या शब्दानें त्याचा उल्लेख केला आहे). १८. पुष्कळ.

धर्म म्हणे, 'बहु उत्तम; हें मज अश्लाघ्य काय हो! नातें?
मिळतां सुवर्णमुद्रा[1] अर्थी इच्छील काय होनातें?' २७
धाडूनि दूत धर्में आप्ताला[*] हा विवाह जाणविला;
अभिमन्यु, राम, कृष्ण, द्रुपद, स्वकुमारवर्ग[2], आणविला. २८
आणुनि संपत्ति दिल्या श्रीकृष्णें भक्तनायका[3] सारा[4];
तो आटतां चि आला भेटाया मेघ काय कासारा[5]? २९
अभिमन्युविवाहोत्सव जग निववी, जेंवि चंद्र पुनिवेचा,
धर्म म्हणे, 'हूं! कनकें मणि बहु वस्त्रान्नराशिहुनि वेचा[6].' ३०
नटनर्तकीगणांतें धर्म म्हणे, 'रामकृष्णगानाचा[7]
नृत्याचा रस शिवसे जाणति, जा त्यांपुढें चि, गा, नाचा.' ३१
भीम म्हणे 'वाढा हो देवि[8]! अहो भूमिदेव[9]! जेवा, जी!
चालों नका, बसा, या, न्या व्हावे जे महेभ[10], जे वाजी[11].' ३२
राम म्हणे, 'घालाव्या कुडक्या[12] च्यारी हि या च कानीं कीं.'
मुनि भूषवितां, भासे मूर्तस्वर्वृक्ष[13] याचकानीकीं[14]. ३३
सहदेव, नकुळ, अर्जुन, अच्युत, बळ, भीम, धर्म नव्या[15] ही
त्या नात्यासि न मिरविति, ते गमति विराटबंधु, न व्याही.

---

१. मोहोर. (ही होनापेक्षां अधिक मूल्यवान् आहे). २. द्रौपदीचीं मुलें. ३. भक्तश्रेष्ठाला. ४. श्रेष्ठा, मोठ्या. ५. सरोवराला. ६. संग्रह करा. ७. बलराम व कृष्ण यांच्या यशोगायनाचा व नृत्याचा रस शंकराप्रमाणें जे जाणत असतील त्यांचेपुढें जाऊन गा व नाचा. ८. द्रौपदी आदिकरून राजस्त्रिया हो! ९. ब्राह्मण. १०. मोठे गज. ११. घोडे. १२. एक मर्दानी कर्णभूषण. (एका कानांत एक, फार तर दोन कुडक्या घालण्याची रीत असताना एकैका कानांत चार चार कुडक्या घालावयास सांगून बळराम आपलें औदार्य व्यक्त करित आहे). १३. साक्षात् कल्पवृक्ष. १४. याचकांच्या समुदायांत. १५. त्या व्याहीपणाच्या नवीन नात्याला. * आप्तवर्गाला.

श्रोते हो! वर्णावें किति? मज 'गप्पी' असें वदाना कीं?
स्वल्प[1] उपप्लव्यपुरीं[2] उत्सव, बहु होय हो! तदा नाकीं[3]. ३५
वदवि मयूराकरवीं श्रीराम 'विराटपर्व' चवथें, बा!
स्वल्प[1] म्हणोनि न सोडी अमृताची शक्ति सर्व चव थेंबा. ३६
रामघन[4] सत्प्रसादामृत जों जों बहु वळोनि वर्षतसे,
तों तों भक्तमयूर स्वार्याकेका[5] करूनि हर्षतसे. ३७

इति श्रीमदार्याभारते श्रीरामनंदनमयूरेश्वरकृतौ विराटपर्व समाप्तम्
श्रीमद्रामचरणपद्मयोरर्पितम् ॥

---

१. अत्यंत लहान. २. विराटराज्यांतील एक नगरी. ३. स्वर्गांत. ४. रामरूप मेघ. ५. आपली आर्यारूप (मयूर) वाणी.

शुद्धिपत्र—आर्याभारत खंड १ ला.

पृष्ठ-पंक्ति	शुद्ध.
६।२४	आरुणे? हे आरुणे !
८।३	कास्युपन्यो !
१०।१९	जनमेजय पौष्यींचा
१३।२३	क्षपणकवेष
४।१२	जां !'
७।१४	च्यवनत्वहेतु
८।९	क्षयदहनें [प्रलयाग्नीनें].
२।२	डुंडुभ
२।४	त्याचें नाम खगम, तो
१।१८	कशासि
।१८	नाम 'जरत्कारु'
।१८	तुरंगपातिपुच्छीं,'
।१९	तुच्छीं,
।७	जगत्रय
४	निरोप हि
७	सर्व हीं
५	त्वत्संकल्पित हि
१२	तों तेथें
२३	५. अमृतातें.
।६	लटिक वटिक "फटिकपटें
।२	नयपुटतां.
६	८. संरक्षक.

पृष्ठ-पंक्ति	शुद्ध.
४३।१३	करायासि.
४६।२	परीक्षिन्नृपतीतें
५१।१०	तो गूढ.
५१।११	जाहलें
५३।१७	करूनि
५४।१०	—शशबिंदु,
५६।२३	झाला
५७।७	द्वकवलित०
५९।७	"परिसा
५९।८	व्यास.
५९।१८	हो! तो.
६३।१३	भूमिच्या
६५।९	तत्व."
६९।७	सोसवे काढा.'
७७।३	अस्मत्राणीं
७७।५	बसोनि
८५।९	'तापसोत्तमा !
९०।२१	उपायशतें
९७।२६	१७. पोषण—**पंत.** पोषण कर.
९८।१०	ये,
९८।२२	भरतें

पृष्ठ-पंक्ति	शुद्ध.
९९।११	अमृत प्रतीपचरित
१०२।१५	तिला दुज्या [दुज्या= आणि].
१०५।११	पहातां
१०७।११	माचिर्त्तीं
१०९।६	दाशपति
१११।११	व्हावया सकाम रण
१११।२४	११. पूर्ण झाली आहे इच्छा ज्याची असा.
११४।१८	त्वत्प्रजावतींनीं
११५।५	अमृतरूचें
११७।३६	९. सुपुण्यपुरुषरूपी मेघास.
१२४।८	पवनातें तेजातें
१२४।८	अहि तरणी,
१२६।१८	अवधि हि कथुनि
१३६।२२	मदीय[१३]पदरातिला. ’
१३९।५	मौ[६]ळीं.
१४०।९	भीष्मासि
१४५।६	तपःप्रभावानें.
१४६।८	बापमाय
१४९।८	विद्वत्वें, सधनत्वें
१५२।११	य[१३]त्नांतर ’
१५४।४	[४]नैतोक्तिच्या
१५६।७	[६]राहेल
१५६।७	तोयबिंदुपण ?
१५६।१३	वित्तेच्छु
१६९।६	व्हाया सकर्ण
१८२।३	विदुरमंत्रितें
१८७।१०	वाइ !
१९३।१०	ऐसें
१९३।३	जसीं च
१९४।१३	कवीसीं ?
१९४।१६	राक्षस,
१९४।१६	सहाते,
१९६।१२	राक्षस जीवितासि
१९६।१३	ये तो
१९७।२४	राक्षसाधमा
२०२।४	व[३]नतमासि
२०८।२२	९. सुरधेनूची नंदिनी नामक नंदिनी.
२०९।३	असें
२१०।१६	यश
२१७।१२	तेज प्रमाण
२२०।८	धृष्टद्युम्नें
२२१।२३	६. एकवार प्रसूत झाले
२२२।८	[१२]सैहकन्यारत्न
२२७।७	[११]वैरतें
२२७।२४	११. वरवर.
२३२।२०	प्रेपूनि[१९]
२४१।३	महा [४]धैय
२४१।८	[११]सामपद्ध

ृष्ठ-पंक्ति.	शुद्ध.
५११९	क्रृष्ण.
५५१४	जेवील ?’
५५१५	म्हणे, ‘तद्रचितें
७४१५	[12]अंगाधवळा !
७९१७	नृपा
८२।२५	अर्जुनरूप
९९।१५	काय हांनीच्या ?
९९।२४	९. नाशाच्या.
१३।२	अत्याज्य
२९।१९	—नेत्रजळें.
२७।६	[2]त्वत्प्रतिकूळ
२८।७	गोळी ?
२८।८	गाळी.
३२।२०	करूनि
३२।२५	शुकमुनिचा
३५।७	—कुळवृत्त्यर्थ
४५।२	धर्मोक्त
५५।२२	कायदु:ख (?)
५७।२१	वि[16]दारितेभा
५८।१५	[14]पुर:स्थ०
६।९	सुगुणमणि[1]करंडक
६।१०	ब्र[11]ह्मण्य प्रभु
८।१४	अन्यनर-माती ?
९।८	काय,
९।८	मनातें ?
४।६	वडवूनि

पृष्ठ-पंक्ति.	शुद्ध.
३८।१६	मत्सुताप्रियसखी
३८५।८	पितृगृहा
३८६।९	‘मावसि !
४०४।४	[3]सुरपुरीयश
४०४।५	सुरासुरांत
४०७।१६	‘हे
४०७।१९	[23]रमान्या.’
४०८।१९	२. —(पक्षीं) मोठें उड्डाण करणारा.
४१२।६	दाखवावें
४१६।११	सुत वंदिते[12]
४१६।१५	[16]अनादि [16]सत्या,
४२०।१५	सबंधु[13]
४२४।७	अ-[6]सुज्ञाती.’
४२४।२२	६. सुज्ञाति नव्हेत असे. (तुमची आज्ञा म्हणून घेऊन येतों, असा भाव.).
४२९।२७	मारण्याची
४४८।२	साक्षाच्छ्री०
४५१।२१-२२	सहायभूत
४७४।१४	अमृतफळीं
४७९।१८	ब्रक्षाळीं,
४७९।२०	४. राक्षस.
४७९।२२	१२. राक्षसांचा हितकर्ता.
४८९।१९	अमृतघनें
४९८।१३	देव

पृष्ठ-पंक्ति.	शुद्ध.
५०३।४	[६]बाँहे.’
५२४।९	हेर्महान सँहा. ’
५२४।१०	[१०]सौंसु ?
५२८।५	कंठीं
५२८।१५	[२१]वीं दास
५२९।५	जागति ते[४]
५३३।२१	२. वेडा, मूर्ख.
५३८।१३	[१६]वाँहुटळे.
५४५।१	अध्याय २ रा.]
५४७।१२	[१०]खेंळबळतें. ’
५४९।१५	[१६]स्वैधीनतोकवच.
५५२।३	कसें
५५९।२०	विजयः
५६०।२	वांधोनि
५६५।२१	स्वेदज
५६९।१३	सग्गुरु
५७३।१८	[तसि]
५७३।२३	शंभु
५७७।२८	१३. अर्ज, म्हणणें.
५८२।१३	न कुन्नर,
५८३।७	ईशप्रहिता देइल
५८३।७	सू [=पलायन, काढलेला पळ].
५८३।१०	स्वबळ हि,
५८३।२१	१३.प्रशस्तभटः—**चा.प्र.**
५८९।२५	१४. पोषाक.
५९०।२	[१]न्हाल्याला
५९०।२५	उत्तरापुढें
५९४।५	सख्या !
५९४।२५	१२. वज्र.
५९९।२२	९. ब्राह्मण हो !
६००।८	समासम्